
कविकुलगुरु - कालिदास - संस्कृत - विश्वविद्यालयः

# ॥ अथ श्रीयोगवासिष्ठसार प्रारंभः ॥


विश्वामित्र
वसिष्ठ
दशरथ

॥ अथ श्रीयोगवासिष्ठसार ग्रंथ प्रथम वैराग्यप्रकरण प्रारंभः ॥


श्रीराम
वसिष्ठ

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ जयजयाजीश्रीकृष्णानंदा ॥ परात्पर परमबोधा ॥ सच्चिदानंदैक अगाधा ॥ श्रीगुरुवर्या ॥१॥ जय जय नित्यनिर्मळ ॥ स्वप्रकाशाखिलमंगळ ॥ जय जय पूर्णानंद सोज्वळ ॥ श्रीगुरुवर्या ॥ २ ॥ जय जय पूर्णानंदघन ॥ विहीन द्रष्टा दृश्य दर्शन ॥ चित्सुखाब्धि जगदैकभान ॥ श्रीगुरुवर्या ॥ ३ ॥ जय जय स्वसंवेद्य ॥ जय जय परात्परैकवंद्य ॥ सर्वातीत सर्वाद्य ॥ श्रीगुरुवर्या ॥ ४ ॥ जय जय अज्ञानतमभास्कर ॥ जय जय प्रकाशा प्रकाशकर ॥ जय जय नित्यानंदनिरंतर ॥ श्रीगुरुवर्या ॥ ५ ॥ जय जय श्रीगुरु सर्वोत्तम ॥ पंचविंशतितत्वापरम ॥ सर्वसाक्षी सुखोत्तम ॥ श्रीगुरुवर्या ॥ ६ ॥ जय जय गुणत्रय विरहित ॥ जय जय सर्व सर्वातीत ॥ ज्ञाताज्ञेय ज्ञानविरहित ॥ श्रीगुरुवर्या ॥ ७ ॥ जय जय श्रीगुरो ॥ पूर्णानंदैक कल्पतरो ॥ निरतिशयानंद प्रवरो ॥ श्रीगुरुवर्या ॥ ८ ॥ जय जय श्रीअकलकलाशून्य ॥ सच्चिदानंदैक चैतन्यघन ॥ सर्वत्रैक सर्वविहीन ॥ श्रीगुरुवर्या ॥ ९ ॥ जय जय श्रीगुरो शांतमूर्ते ॥ मूर्तामूर्तैक अमूर्ते ॥ नित्यनिरंजन विश्वपते ॥ श्रीगुरुवर्या ॥ १० ॥ ऐसें दश श्लोकीं स्तवन ॥ प्राकृतवाणीं केलें जाण ॥ तोषावया तुजलागुन ॥ श्रीगुरुवर्या॥ ११॥

---

१ द्रष्टा= पाहणारा, दृश्य= पाहण्याचीवस्तु (दिसणारा पदार्थ) दर्शन= पाहणें (पाहण्याची क्रिया) या त्रिपुटीहून निराळा. २ ज्यावें त्यासच समजणारें ज्ञान स्वरूपवस्तु. ३ अज्ञानरूपी अंधःकार नाशक सूर्य. ४ प्रकाशास प्रकाश करणारा. ५ पंचमहाभूतें (पृथ्वी आप तेज वायु आकाश) पंचप्राण (प्राण अपान व्यान उदान समान) पंचकर्मेंद्रियें (वाचा हस्त पाद गुद शिश्न) पंचज्ञानेंद्रियें (त्वचा चक्षु श्रोत्र जिव्हा घ्राण) पंचअंतःकरणें किंवा अंतःकरणपंचक (अंतःकरण मन बुद्धि चित्त अहंकार) मिळून पंचवीस तत्वें. ६ सत्व रज तम. ७ ज्या आनंदापेक्षां दुसरा अधिक आनंद नाहीं तो. ८ श्रेष्ठ. ९ निष्कल अंश रहित. १० हे साकार निराकार एक ब्रह्मरूपा (संबोधन). ११ मायारूपी कपटरहित (निष्कलंक).

ह्मणों तूं बाप तूं माय ॥ येणेंही तुझी स्तुति नोहे ॥ तुझें रूप सर्वथा स्तव्य नव्हे ॥ अरूपपणें ॥ १२ ॥ यालागीं मौन्य तेंचि तुझें स्तवन ॥ अक्रियता तेंचि पूजन ॥ नचिंतन हेंचि ध्यान ॥ ध्येयें विहीन ॥ १३ ॥ ययापरी तुझें भजन ॥ तूं सर्वेंद्रियां अग्रांह्य जाण ॥ स्वसंवेद्यत्व संपूर्ण ॥ ययालागीं ॥ १४ ॥ ऐसियाजी श्रीगुरुमूर्ती ॥ तुज वंदन पुढतांपुढती ॥ करितसें जी आर्तमती ॥ सामरस्यें ॥ १५ ॥ तुज करितां जी नमन ॥ स्वयें ब्रह्मचि होइजे संपूर्ण ॥ तेथें इतरसिद्धींचि कोण ॥ गणना करी ॥ १६ ॥ यालागीं माझिये वाक्‌सिद्धी ॥ करीं कृपारसायणसिद्धी ॥ जेणें ऐश्वर्य तुझें बोधीं ॥ ग्रंथव्याजें ॥ १७ ॥ हे आइकोनीयां विनवणी ॥ प्रसन्न श्रीगुरु चितचिंतामणी ॥ प्रकाश करिता जाला वाणी ॥ स्वयंबोधें ॥ १८ ॥ वरद करू ठेउनी शिरीं ॥ ग्रंथ निर्माणीं आज्ञा करी ॥ तोचि प्रसादु अंगिकारी ॥ महाप्रसादत्वें ॥ १९ ॥ तुझी व्यक्ति तोचि गणेशू ॥ करी सकळ विघ्नांचा नाशू ॥ तुझी वाचा तोचि प्रकाशू ॥ शारदेचा ॥ २० ॥ यालागीं तुज वानितां सर्व लाभे ॥ परी सर्व लाभे तुज न लाभे ॥ तुझ्या वंदनीं शोभे ॥ सर्वां वंदन ॥ २१ ॥ जैसें वृक्षमूळ सिंचनीं ॥ शाखोपशाखा पावे पाणी ॥ शाखा शिंपितां निर्वाणीं ॥ कोरडें मूळ ॥ २२ ॥ यालागीं सर्वपणें तूंचि येकू ॥ हा पूर्वींचि बोलिला विवेकु ॥ कोण्ही करील कुतर्कू ॥ म्हणोनियां ॥ २३ ॥ म्हणोनि म्यां केलें तुझें नमन ॥ तेणें सर्व देवां सर्व सिद्धि वंदन ॥ जालेंचि असे परिपूर्ण ॥ श्रीगुरुराया ॥ २४ ॥ येणें वच

१ नकरणेंपणा. २ ध्यान करण्याची वस्तु. ३ ग्रहण करण्यास अशक्य. ४ अगोदर. ५ पीडित, दुःखित. ६ एकरसें (एकत्वें करून) अभिन्नत्वें करून. ७ वाणीची सिद्धि. ८ मिषानें. ९ जड नव्हे असा चैतन्य (समाण=सजीव) चिंतामणी (चिंतामणी= चिंतिलेलें फल देणारें रत्न तर तें जड आहे व येथें सद्गुरु चिद्रूप आहेत).

नें श्रीगुरुरावो ॥ तोषोनि दिधला पसावो ॥ म्हणति ग्रंथ बोलें साभिप्रावो ॥ अतिगोडपणें ॥ २५ ॥ तूं जें जें प्रमेय बोलसी ॥ तें तें वेदार्थचि परियेसी ॥ सुख होय सज्जनांसी ॥ तेंचि करीं निरूपण ॥ २६ ॥ तो महाप्रसादू घेउनी शिरीं ॥ प्रेमें चरणद्वय नमस्कारीं ॥ जी जी महाप्रसादू दुःसंसारीं ॥ लाधलों आजी ॥ २७ ॥ तरी तुझी होतांचि प्रसन्नता ॥ सिद्धपण बाणलेंचि इया ग्रंथा ॥ तेथें तूंचि होऊनि श्रोता वक्ता ॥ वदवीं मजकरूनी ॥ २८ ॥ ऐसी विनंति करी इतुकी ॥ तंव वरद हस्त ठेविला मस्तकीं ॥ तेणें मी होउनी परम सुखी ॥ बोलें ग्रंथु ॥ २९ ॥ आतां साधुजनांसीं करूनि नमन ॥ जयां दीनोद्धारीं सामर्थ्यपण ॥ ज्यांसीं जाल्या अनन्यशरण ॥ ब्रह्म पूर्ण पैं लाभे ॥ ३० ॥ तयां योग्य निरूपण ॥ करावया सामर्थ्य धरी कोण ॥ परि ते भावाचे भोक्ते जाण ॥ कृपालुत्वें ॥ ॥ ३१ ॥ जैसें नेणतें जें बाळ ॥ पितृमुखीं घाली कवळ ॥ तो स्वयें न करूनि अळुंमाळ ॥ मुखचि पसरी ॥ ३२ ॥ ऐसीया स्नेहाची जाती ॥ नेणें युक्तायुक्त प्रतीति ॥ बाळकें दिधलें तें अतिप्रीति ॥ अंगिकारीं तूं ॥ ३३ ॥ तैसा मीहि संतांचा पढियंता ॥ ते अंगिकारिती भलतैसा नेणता ॥ तेणेंचि मी होईन सरता ॥ तिहीं लोकीं ॥ ॥ ३४ ॥ ययालागीं बोबडाबोली ॥ बोलेन ग्रंथ नव्हाँळी ॥ श्रोता वक्ता ज्ञानांशुमाळी ॥ श्रीसद्गुरुस्वामी ॥ ३५ ॥ रंगनाथू ह्मणे श्रीगुरूचा ॥ ग्रंथ बोलेन रसाळ वाचा ॥ जो कां संवाद श्रीवसिष्ठाचा ॥ परब्रह्मेसी ॥ ३६ ॥ परब्रह्म जें कां निर्वाण ॥ तेंचि लीलाविग्रहीं जालें जाण ॥ तारावया भक्तजन ॥ साकार रूपें ॥ ३७ ॥ जरी धरिलें

१ प्रसाद. २ अभिप्रायासहित. ३ तात्पर्य, विषय. ४ कांहिं बांहिं. ५ आवडता, प्रिय. ६ वंद्य, श्रेष्ठ. ७ प्राप्ती. ८ ज्ञानसूर्य.

रूप साकार ॥ तरी ब्रह्मचि तें निर्विकार ॥ अज्ञानभ्रमें विकार ॥ मानिती मूढजन ॥ ३८ ॥ यालागीं भक्तानुग्रहार्थ जाण ॥ श्रीरघुनाथावतार पूर्ण ॥ पूर्णानंदैकाविद्धन ॥ साकारत्वेंही ॥ ३९ ॥ धरूनि तनु अतिश्यामल ॥ राजीवलोचन सकोमळ ॥ पूर्णगात्र वेल्हाळ ॥ मायिकपणें ॥ ४० ॥ स्वयें निष्प्रपंच आपण ॥ करी प्रपंचाचें विडंबन ॥ आणि शरणागता जाण ॥ आनंद करी ॥ ४१ ॥ जरी रूप धरिलें साकार ॥ तरी तें सच्चिदानंद निर्विकार ॥ नलोपूनियां अतिसुंदर ॥ मिरवी रूप ॥ ४२ ॥ नूतन जलधरु जयापरी ॥ अति शामता बाणे शरीरीं ॥ नाना अतसीपुष्पेंचिया हारी ॥ अंगकांती अंगीं ॥ ४३ ॥ अरुण वर्ण चरणतलें ॥ जैसें नभ शेंदुरें डवँरिलें ॥ तैसें पादतल मिरवलें ॥ अति सुरंग ॥ ४४ ॥ तया ध्वज वज्र ऊर्ध्वरेखांकित ॥ पद्म यव शोभा दावित ॥ प्रपद्य सुनील शोभत ॥ तोडरें युक्त ॥ ४५ ॥ वांकी नूपुरें चरणीं ॥ त्यांचा नादु तेचि महा वेदध्वनी ॥ ऊरू पोटरियांचि मिरवणी ॥ अलौकिकपणें ॥ ४६ ॥ कटितटीं कशिलें पीतवसन ॥ पीतांबर केला परिधान ॥ विद्युल्लता वेढी सजळघन ॥ तैसा शोभे ॥ ४७ ॥ वरी साडेपंधरें याची मेखळा ॥ रत्नखचित दीप्तिमेळा ॥ तेज न समाये नभमंडळा ॥ सतेजपणें ॥ ४८ ॥ तळीं मोतियांची झल्लरी ॥ क्षुद्र घंटिका वाजति नानापरी ॥ मनोहर दोंदावरी ॥ दक्षिणावर्त्त नाभी ॥ ४९ ॥ जें कीं ब्रह्मयाचें नाभिस्थान ॥ चराचराचें विश्रांतिभुवन ॥ तेथुनि

१ निळी २ प्रिय. ३ निष्कपट. ४ सोंग. ५ नवीन मेघ. ६ जवस-अळशी-शीरस. ७ शोभलें. ८ तोडे सांखळ्या. ९ मांड्या. १० सोनें. ११ उजवीकडे पिळलेली (आवर्त-भोंवराअसलेली).

रोमराजी सकोमळ जाण ॥ हृदयावरी ॥ ५० ॥ हृदय अतिविशाळ ॥ जैसें चिदाकाश अतिनिर्मळ ॥ दक्षिणभागीं सकोमळ ॥ श्रीवत्सपद ॥ ५१ ॥ वामभागीं श्रीविराजित ॥ ते शोभा नबोलवे ईषत ॥ कंठीं कौस्तुभ झळाळित ॥ तेजें लोपत दिनमणी ॥ ५२ ॥ दोंभुजांचा अंतर्भाव ॥ दोंचिभुजीं केला गौरव ॥ चौंभुजांची बरव ॥ दावी दोंचि भुजीं ॥ ५३ ॥ अभय वरदहस्त दोन्ही ॥ उभारले भक्तांलागुनी ॥ कार्यसमयीं धनुष्यबाण घेउनी ॥ मिरवे शोभा ॥ ५४ ॥ दशांगुळें वीरकंकणें ॥ अंगदादि मिरवती भूषणें ॥ मुखशोभा न धरिती चंद्रकिरणें ॥ अतिसुढाळत्वें ॥ ५५ ॥ मकराकार रत्नजडित ॥ कर्णीं कुंडलें तळपत ॥ ते दीप्ति असे पडत ॥ गंडस्थळावरी ॥ ५६ ॥ हनुवटी शुद्ध पातळ ॥ श्मश्रु बाणताति सकोमळ ॥ अधर सुरंग वेल्हाळ ॥ वोष्ठद्वय ॥ ५७ ॥ स्मितहास्य मिरवे वदनीं ॥ तेथें पुरे भक्तांची धणी ॥ स्थिरावले सर्व विसरोनी ॥ अवयवसमूह ॥ ५८ ॥ जैसें डाळिंबफळ विकाशित ॥ अंतरीं बीज झळाळित ॥ तैशी वोष्टांमाजी शोभत ॥ दंतपंक्ती ॥ ५९ ॥ बोलतां चौंकिंचे झळाळिती ॥ तेणें लोपे सूर्याची दीप्ती ॥ नासिक मनोहर सरळस्थिती ॥ सुंदरपणें ॥ ६० ॥ वायु हिंडतां सैराट ॥ विसरला आत्मस्वरूपाची वाट ॥ मग राहिला निकट ॥ नासापुटीं ॥ ६१ ॥ प्राणरूपें करी अवस्थान ॥ रामाच्या नासापुटीं विश्रामोन ॥ राहिला आनंदेंकरून ॥ घ्राणरूपें ॥ ६२ ॥ राजीवपणें अतिसुरेख ॥ नयनप्रांत आरक्त पीयूष ॥ वर्षत अवलोकणें संतोष ॥ भक्त परमसुख पावती ॥ ६३ ॥ भंवईरेखा धनुष्याकार ॥ व्यंकटा

१ केंसांची पंक्ति. २ लक्ष्मीसहित शोभायमान. ३ थोडी. ४ समावेश. ५ शोभा. ६ मंदहास्य. ७ दांत. ८ नाकपुडींत. ९ अमृत. १० वांकड्या.

२

सुनीळ मनोहर ॥ मद्नासीच करी मार ॥ लावण्यरूपें ॥ ६४ ॥ जैसें ब्रह्मसुख सुनिश्चळ ॥ तैसें मनोहर विशाळ कपाळ ॥ वरी कुंकुम केशरांकित निर्मळ ॥ चंदन शोभे ॥ ६५ ॥ आकर्ण रेखिला टिळा ॥ मध्यें रत्नाक्षतांचा मेळा ॥ ते शोभा बोलतां पांगुळा ॥ वाचा होती ॥६६॥ रत्नखचित मुगुट शिरीं ॥ खणोखणीं हिरियांच्या हारी ॥ नीळ शोभे शंख वरी ॥ अनर्घपणें ॥ ६७ ॥ जैसा षोडशकळीं पुरला ॥ शरत्काळीं पौर्णिमे उगवला ॥ वर्तुळ सोज्वळ शोभला ॥ गगनीं इंदू ॥ ६८ ॥ तैसी मुखशोभा निरुपम ॥ पूर्णचंद्रही उपमेसीं विषम ॥ देखोनियां भक्तोत्तम ॥ उल्हासती ॥ ६९ ॥ देखोनियां रघुनाथासीं ॥ परमानंद संसारियांसी ॥ मा समाधी होय विरक्तांसी ॥ अपूर्व काय ॥ ७० ॥ यालागीं सच्चिदानंदघन ॥ साकारत्वें रघुनाथ आपण ॥ अवलंबोनी अज्ञानपण ॥ मनुष्यत्व मिरवी ॥७१॥ तो स्वयें जरी ज्ञानमूर्ती ॥ तरीं लौकिकीं न प्रकटी व्यक्ती ॥ जन तारावया प्रश्नोक्ती ॥ करी नेणुं ऐसा ॥ ७२ ॥ त्याच्या प्रश्नाचें उत्तर ॥ देता श्रीवसिष्ठ अतिचतुर ॥ यया नाम ग्रंथ पूर्वापर ॥ वासिष्ठ बोलिजे ॥ ७३ ॥ परम गुरुत्वें जो वसिष्ठ ॥ ज्ञानविज्ञान अतिश्रेष्ठ ॥ ह्मणोनि बोलिजे तो वसिष्ठ ॥ ज्ञानगुरू ॥ ॥ ७४ ॥ तो बोलिला श्रीरामाप्रती ॥ तया संवादाची परम व्याप्ती ॥ भोगिताती विमळमती ॥ योगीश्वर जे॥७५॥ आतां रामपदाचें व्याख्यान ॥ यथामती करूं निरोपण ॥ राम बोलिजे कोणालागुन ॥ तेंही सांगूं ॥ ७६ ॥ यदर्थीं स्वयें श्रुती ॥ रामपदातें वाखाणती ॥ तेंचि कृपा करूनि संतीं ॥ सांर्थ आईकावें ॥७७॥ श्रुतिसंमती ॥ रमंते-



१ परादिवाणी. २ सुंदरपणें. ३ चंद्र. ४ अज्ञानी. ५ शब्दपरनिष्णांत. ६ शुद्धबुद्धिचे. ७ अर्थासहित.

योगिनोनंतेसत्यानंदेचिदात्मनि ॥ इतिरामपदेनासौपरब्रह्माभिधीयते ॥ १ ॥ ॥ अस्यार्थः ॥ ॥ शम दमादि साधनीं संपन्न ॥ जे योगीश्वर परमपावन ॥ ते निरंतर रमती तें स्थान ॥ परब्रह्म बोलिजे ॥ ७८ ॥ तेंचि रामरूपें असे वर्तत ॥ त्यासींच परब्रह्म बोलिजेत ॥ जेकीं सत्यज्ञानानंद अनंत ॥ प्रियत्वें आत्मा ॥ ७९ ॥ सत्य शब्दें सत्ता बोलिजे ॥ अस्तित्वें जें सर्व सुजे ॥ घटःसन्न पटःसन्न ह्मणिजे ॥ तेचि सत्ता॥ ८० ॥ आहे शब्द जे बोलती ॥ ते ते जाण सत्तेची व्यक्ती ॥ सत्ता अनुस्यूत अबाधिती ॥ वर्ते सर्वत्र ॥८१॥ आहेपणें जें जें भासे ॥ तें तें वस्तु जाण विश्वासें ॥ तेथेंचिजाण आनंद वसे ॥ केवळीं पाहतां ॥ ८२ ॥ सर्वांचेनि निरसनें ॥ केवळ उरे जें सत्तारूपपणें ॥ तेथेंचि आनंद कोंदलेपणें ॥ स्वतःसिद्ध ॥ ८३ ॥ सत्ता जेथें जेथें भासे ॥ तेथील विशिष्ट येक असे ॥ प्रत्यक्ष जो पदार्थ दिसे ॥ तो सांडावा कीं ॥ ८४ ॥ दृश्य तें तंव मिथ्याभूत ॥ ह्मणोनी टाकावें समस्त॥ केवळ सत्ताचि सुनिश्चित ॥ निवडूनि घ्यावी ॥ ८५ ॥ तेही सत्ता जड नव्हे ॥ केवळ ज्ञानरूपचि आहे ॥ ज्ञानविहीन केंवि राहे ॥ सत्ता सत्तारूपें ॥ ८६ ॥ तें सकळांचें प्रकाशक ॥ ज्ञानमात्रचि जें येक ॥ सत्तामिश्रित सम्यक ॥ नाहीं अनेक जियेठाईं ॥ ८७ ॥ ज्ञानावेगळी जे सत्ता ॥ ते जडत्वें पाषाण तुल्यता ॥ ह्मणोनि युक्तितें तत्वतां ॥ चित्कळा पूर्ण ॥ ८८ ॥ सत्ता आणि प्रकाश ॥ आतुंडे तेथें सुख असोसें॥ आहेचि पैं निराभास ॥ स्व

---

१ मनोनिग्रह. २ बाह्येंद्रिय संयम. ३ दिसतें. ४ घडा आहे. ५ वस्त्र आहे. ६ स्वरूप. ७ अखंड दंडायमान. ८ निरसनकेल्यानें. ९ तत्व. १० ज्ञानावांचून ११ सांपडे. १२ पुष्कळ. १३ भ्रांतिरहित

तः सिद्ध ॥ ८९ ॥ दुसरें मिश्रित नसतां ॥ केवळीं सुख प्रकाशता ॥ पाविजेचि कीं ब्रह्मवेत्ता ॥ योगेश्वर ॥९०॥ ऐसें असोनियांहि अनंत ॥ त्रिंविध परिच्छेदाविरहित ॥ देश काळ वस्तु हे निश्चित ॥ परिच्छेद तिन्ही॥९१॥ आतां परिच्छेदत्रयाचें लक्षण ॥ तेंही सांग सांगेन ॥ श्रोता होऊनि सावधान ॥ परिसिजो जी ॥ ९२ ॥ ग्राम येक येकला असे ॥ त्या सभवतें अरण्य वसे ॥ परी सर्वत्र व्यापक ग्राम नसे ॥ ह्मणोनि परिछिन्न तो ॥९३ ॥ ह्मणोनि ग्राम येकदेशी जाला ॥ सर्वत्र तोचि नाहीं देखिला ॥ ह्मणोनि देशपरिच्छेद त्या आला ॥ नेश्वर भला याचिलागीं ॥ ९४ ॥ जें देशेंकरूनि परिछेदलें॥ तें नश्वर सहजेंचि जालें ॥ तैसें ब्रह्म नव्हे तें व्यापलें॥ सर्वदेशीं ॥९५॥ ब्रह्म तें तंव सदोदित ॥ सर्वदेशीं सर्वत्र संतं ॥ ग्राम तो भूमीवरी दिसत ॥ नाहीं वर्तत स्वर्गलोकीं ॥९६॥ ब्रह्म तें स्वर्ग मृत्यु पाताळ भुवनीं ॥ पुरोनि उरलेंसे निर्वाणीं ॥ सर्वत्र सर्वदेशीं भरोनी ॥ कोंदलें असे ॥ ९७ ॥ आतां काळपरिछेद तो ऐसा ॥ पदार्थमात्रीं दिसे सहसा ॥ क्षणें दिसे क्षणें नाशा ॥ पावतु जाय ॥ ९८ ॥ येककाळीं घटु दिसे ॥ तोचि कल्पांतुवरी नसे ॥ मध्येंचि अल्पकाळें नाशे ॥ ह्मणोनि नसे सर्वदा ॥ ९९ ॥ पुष्पादि पदार्थ देखिजेती ॥ क्षणा येका नाहीं होती ॥ वस्त्र नूतन षट्मासांतीं ॥ असेचि ना ॥१००॥ तैसें दिवसाचें रात्रीं नाहीं ॥ रात्रीचें दिवसा न भेटे कांहीं ॥ स्वप्नीं तरीं तियें दोन्हीही ॥ असतीच ना ॥ १ ॥ येकेकाळीं वर्तमान ॥ आणि दुसरे काळीं जें क्षीणं ॥ तो काळपरिच्छेद संपूर्ण ॥ सर्व पदार्थीं ॥२॥ हेंचि नश्वरपदाचें लक्षण ॥ जें क्षणें

१ तीन प्रकारचे. २ भेद. ३ एकदेशी. ४ निश्चळ. ५ शेवटीं. ६ नाशयुक्त.

उदयो क्षणें क्षीण ॥ ह्मणोनि तो अनात्मा जाण ॥ नेतिंमुखें निरसे ॥ ३ ॥ तैसें नव्हे परब्रह्म ॥ सर्वकाळीं सर्वदा सम ॥ अवस्थात्रयीं नव्हे विषम॥येकरूपत्वें॥४॥काळें नाहीं परिच्छेदिलें ॥ ह्मणोनि अनंत नामासीं आलें॥अंतु नाहीं कोणें बोलें ॥ त्रिःप्रकारें जया ॥ ५ ॥ तैसाचि वस्तुपरिच्छेद नसे ॥ दुसरें तयाहुनी जेथें न वसे ॥ ते वस्तु अपरिच्छेद ऐसें ॥ जाणावें कीं ॥ ६ ॥ आकाश सर्वत्र सर्वदेशीं ॥ आहे हे प्रतीति जगासीं ॥ आणि काळें नाश नाहीं तयासीं ॥ हेंही देखिलें ॥ ७ ॥ स्वर्ग मृत्यु पाताळीं ॥ नाना ब्रह्मांडाच्या मेळीं ॥ असे आकाश पोकळी॥ सर्वदेशीं ॥ ८ ॥ आकाशेंविण ठावो रिता ॥ नाहींच जाणिजे सर्वथा ॥ तैसें सर्वकाळीं तिहीं अवस्था ॥ आकाश असे ॥ ९ ॥ ह्मणोनि देश काळ परिच्छेद ॥ आकाशासीं नाहीं बाध ॥ तेंचि तें देश काळें निर्विवाद ॥ वर्तत असे ॥११०॥परी पृथ्व्यादिकें महाभूतें ॥ दुजेपणें असती वर्ततें ॥ घट पटादिव्यक्तें ॥ नाना भासती ॥११॥ येणें वस्तुपरिच्छेद आला त्यासीं ॥ ह्मणोनि दृश्य नश्वर सर्वांसीं ॥ आत्मा निरंश आनंदरासी ॥ अपरिच्छेद्य ॥ ॥ १२ ॥ ह्मणसी दुजें नाहीं कैसें ॥ जगडवाळ तो अध्यारोप भासे ॥ तें मिथ्यापणेंचि नाहीं ऐसें ॥ येणें विचारें ॥ १३ ॥ ह्मणोनि देश काळ वस्तु विचारें ॥ परिच्छेद नाहीं सर्व प्रकारें ॥ अंतु न पवे कोणें निर्धारें ॥ ह्मणोनि अनंत बोलिजे ॥ १४ ॥ यालागीं सत्ता सुख स्वप्रकाश ॥ अनंत अपरिच्छेद निरंश ॥ आत्मा प्रिय उदास ॥ ब्रह्म

१ हें नाहीं अशा योगानें. २ नाहींसें होतें. ३ जागृतादि अवस्थेंत. ४ अखंड. ५ जगदाभास. ६ कल्पना.

ऐसें ॥ १५ ॥ येणें तिन्ही भेद निरसले ॥ जे सजातीय विजातीय स्वगत बोलिले ॥ तेही आतां सांगों भले ॥ प्रसंगेंची ॥ १६ ॥ देहादि प्रपंचु तितका विजाती ॥ भेदु नाहीं तया प्रती ॥ ते नश्वरपणें मिथ्या भासती ॥ सत्य त्रिजगतीं परब्रह्म ॥ १७ ॥ सत्य दुसरें जरीं असे ॥ तरीं वस्तुसीं परिच्छेद दिसे ॥ दुजें नसतां तेंचि असे ॥ परि-पूर्णत्वें ॥ १८ ॥ विजातीय जरीं साच असतें ॥ तरीं ब्रह्मेसी भेदु दावितें ॥ तें सत्य नसतां येकुलतें ॥ येकत्वें ब्रह्म ॥१९॥ शुंक्तिकेच्या ठाईं रजत ॥ भासलेपणें काय भेदु दावित ॥ कीं रज्जु सर्पासीं भेदु भासत ॥ दुजेपणें॥१२० भासतां नभासतां भेदु नाहीं ॥ जरी मृगजळ रश्मिंच्या ठाईं ॥ नाना स्वप्न पुरुषासीं काहीं ॥ भेदू करी ॥२१॥ तैसें भासतांही जगटवाळ ॥ मिथ्यापणें ब्रह्मचि केवळ ॥ भेद नसोनी नित्य निर्मळ ॥ अद्वयपणें ॥ २२ ॥ आ-णि कारणाचें जें कार्यजात ॥ तितुकें कारणचि जाणें निश्चित ॥ नाहीं भेदू तया ईषत ॥ येकरूपत्वें ॥२३॥ तैसी जगाची उत्पत्ती लय स्थिती ॥ ब्रह्मावेगळी कोठें वर्तती ॥ ह्मणोनि तेंचि तें सुनिश्चिती ॥ भेदु मिथ्या ॥ २४ ॥ सुवर्णाचें कार्य अलंकार ॥ तें सर्व सुवर्णचि मनोहर ॥ नाहीं भेद तेथें भेदांतर ॥ तयापरी हें ॥ २५ ॥ तैसें स्व-गत सजाती विजाती ॥ ईश्वर ब्रह्मादित्रय भासती ॥ तें तंव स्वतां चिद्घनमूर्ती ॥ भेद तो औपाधिक ॥ २६ ॥ मायां अविद्येचिया प्रतीति ॥ जीवेश्वरासीं भेद भासती ॥ तेही अनेक स्फुरती ॥ अज्ञान वशें ॥ २७ ॥ तरी सु-

१ शिंपीच्या. २ रूपें. ३ दोरी. ४ मध्यान्हिः सूर्यकिरणानें भूमीवर पाण्यासारखा होणारा भास. ५ किरणांच्या. ६ किंचित्. ७ चैतन्यरूप. ८ उपाधीनें केलेला. ९ इश्वरोपाधि. १० जीवोपाधि.

ळीं अविद्या नव्हे विद्यमान ॥ मिथ्यापणेचि व्यर्थ भान ॥ लटिकेनि साचासिं भिन्नपण ॥ हें तंव न घडे ॥२८॥ सुखापुढें अनेक दर्पण ॥ दावितां मुखा आलें अनेकपण ॥ तरीं मुख काय जालें भिन्न भिन्न ॥ विचारिजे ॥२९॥ नाना घटाचा अनेकपणीं ॥ भासतांही अनेक नव्हे तरणी ॥ तो येकुला येक स्वस्थानीं ॥ भेदुकाहाणी असत्य ॥१३०॥ शर्करेचा परिवारु केला ॥ तो शर्करेसीं भिन्न नाहीं जाला ॥ साखरपणेंचि संचला ॥ येकरूपत्वें ॥३१॥ तेंसे जीवेश्वर भिन्न भासती ॥ हे तंव समूळ मिथ्या भ्रांति ॥ ह्मणोनि येकत्वा नये खंती ॥ येकपणेंचि ॥ ३२ ॥ ह्मणोनि भेदु सजाती ॥ ब्रह्मांसि नाहीं सर्वार्थी ॥ येकत्वें अभेदमूर्ती ॥ निर्घोटपणें ॥ ३३ ॥ आतां भेदु बोलि-जे स्वगत ॥ सत्य ज्ञान सुखादि येथ ॥ तरी तें येक स्वरूपाचि निश्चित ॥ भेदू तदंतर्गत असेचि ना ॥ ३४ ॥ सत्ता ज्ञानाहुनी भिन्न नसे ॥ ज्ञानहीन तें जड असे ॥ जड तें अनात्मा सर्वांशें ॥ मिथ्याभूत ॥ ३५ ॥ अथवा ज्ञान सत्तेहुनि वेगळें ॥ ह्मणतांचि कल्पित जालें ॥ कल्पितासीं सत्यत्व कोणेंबोलें ॥ विचारिजो ॥ ३६ ॥ ह्मणोनि सत्ता आणि ज्ञान ॥ परस्परें नव्हतीं भिन्न ॥ तैसेंचि सुखही तद्रूप जाण ॥ अभिन्नपणेंसीं ॥ ३७ ॥ सुख सत्तेहुनी वेगळें करितां ॥ तरीं तें सुख कल्पीत तत्वतां ॥ विषय सुखाचे परी नश्वरता ॥ येईल तया ॥ ३८ ॥ सत्ता सुखावेगळी जाण ॥ असतां तेथें प्रवर्तेल कोण ॥ सुखेंविण पाषाण ॥ सेवी कोह्नी ॥३९॥ आतां सुखा वेगळें ज्ञान ॥ तेंही तें ऐसेंचि जाण ॥ सुखही ज्ञानेंविण ॥ तेंही जड॥१४०॥एवं सत्ता प्रकाश सुख ॥ परस्परें येकत्वें येक॥

१ जिवोपाधीमाया २ सत्य ३ सूर्य ४ प्रकार ५ हानि, खेद. ६ परिपूर्ण.

स्वगतभेदही निःशेष ॥ नाहींच ब्रह्मीं ॥ ४१ ॥ ह्मणोनि ब्रह्म तें अद्वयानंद ॥ सच्चिदानंद अगाध ॥ नाहीं जया देशकाळादि छेद ॥ अनंतपणें ॥ ४२ ॥ ऐसें जें ब्रह्म बोलिजे ॥ तेंचे रामशब्दें जाणिजे ॥ रामु तो सच्चिदानंदघन सहजें ॥ बोले स्वयं श्रुती ॥ ४३ ॥ येणें रामपदाचें व्याख्यान ॥ वाखाणिलें सच्चिदानंद जाण ॥ इत्यादिशब्दें ब्रह्मनिर्वाण ॥ बोलिजे रामू ॥ ४४ ॥ हें महावाक्याचें रहस्य ॥ जीव ब्रह्मांचें सामरस्य ॥ ब्रह्मस्वरूप सावकाश ॥ बोलिलें होय ॥ ४५ ॥ सच्चिदानंद पद वाखाणिलें ॥ सर्व ग्रंथाचें सार बोलिलें ॥ तें रामपदें सिद्ध जालें ॥ शब्दब्रह्म सर्व ॥ ४६ ॥ असो अनुभवी जाणती मातु ॥ येरां नकळे हा वृत्तांतु ॥ परी अनुभवीयालागीं हा ग्रंथू॥ आरंभिला असे ॥ ४७ ॥ असो एवंभूत हा श्रीरघुनाथ ॥ रामपदें ब्रह्म सदोदित ॥ तो श्रोता वसिष्टाचा येथ ॥ जगदुद्धारु ॥ ४८ ॥ या रामवसिष्टाचा संवाद ॥ तें वासिष्ठ बोलिजे विषद ॥ शतकोटि रामायण अनुवाद ॥ श्रीवाल्मिकीनें केला ॥ ४९ ॥ त्यामाजी गोड निरूपण ॥ सर्वां विश्रांतीचें स्थान ॥ तें हें वासिष्टसार जाण ॥ ग्रंथरावो॥ १५० ॥ जेहीं देखिलें नाहीं वासिष्ठ ॥ तया नचुकती संसारकष्ट ॥ अज्ञानें जाले निकृष्ट ॥ ज्ञानाभावें॥ ५१ ॥ संसृति चुकवावयाचें मूळ ॥ येक ब्रह्मचि ज्ञान निर्मळ ॥ येर उपाय तो काळ ॥ क्षेप करणें ॥ ५२ ॥ व्रत तप दान तीर्थाटण ॥ यज्ञादि साधनें गहन ॥ तें संसृतिसीच कारण ॥ आत्मज्ञान विरहित ॥ ५३ ॥ तया आत्मज्ञानाचें निजमंदिर ॥ कीं ज्ञानरूपचि मनोहर ॥ तेंचि तें वासिष्ठसार ॥ ग्रंथरूपें ॥ ५४ ॥ जयानाहीं सद्गुरुसीं भेटी ॥ त-

१ गंभीर. २ गुह्य ३ ऐक्य. ४ पुनःसांगणें. ५ ज्ञानाच्या अभावाने. ६ संसार.

या प्रवेश केंचा वासिष्ठीं ॥ यालागीं अध्यात्म शास्त्राचा मुकुटीं ॥ वासिष्ट रत्न शोभे ॥ ५५ ॥ यालागीं सर्वप्र-
कारें ॥ वासिष्ठीं प्रवेश करावा रे ॥ अर्थु कळलिया निर्धारें ॥ ब्रह्मचि तुह्मी ॥५६॥ परब्रह्मचि वसिष्ठ राम ॥ त्या
दोघांचा संवाद निरूपम ॥ ते ग्रंथ व्याख्या जें परम ॥ ब्रह्मरूप ॥ ५७ ॥ त्याहीमध्यें प्रकरणांतरीं ॥ श्लोक नि-
वडुनियां चातुरीं ॥ वासिष्ठसार कुसरी ॥ नवनीतहें ॥ ५८ ॥ प्रकरणानुक्रमें विशेषें ॥ श्लोकसंबंधु प्रकर्णमिषें ॥
वासिष्टचि सर्वांशें ॥ प्रतिबिंबे ॥ ५९ ॥ सर्व वसिष्ठाचें अर्थसार ॥ तेंचि बोलिजे वासिष्टसार ॥ भाग्यें उत्कंठ जो
चतुर ॥ तयासींचि लाभे ॥१६०॥ वासिष्ठसाराचा श्लोकचरण ॥ त्याचे अर्थीं होतां श्रवण ॥ समाधि सुख आ-
पण ॥ बाणें स्वयें ॥६१॥ समाधीच वरी तयासीं ॥ जे निर्वाणतुर्यांग परियेसी ॥ कृतकृत्यता अनायासीं ॥ समा-
धी त्या लाभे ॥६२॥ तेंचि करावया निरूपण ॥ वंदूनि श्रीगुरु चरण ॥ करुनी संतासीं नमन ॥ अवधान मागे ॥
॥ ६३ ॥ तुह्मी दिधलीया अवधान ॥ मुकया वक्तृत्व संपूर्ण ॥ वक्ताचि मुकावे जाण ॥ अनवसरे तुमचेंनी ॥६४॥
यालागीं मायबाप जे तुह्मीं संत ॥ त्यांप्रती विनवीतसे अती आर्त ॥ अवधानाचें दान देत ॥ करावें ह्मणोनि ॥
॥ ६५ ॥ तुमचेंचि ऐश्वर्य बोलतां ॥ साशंक तुह्मी अवधान नेदितां ॥ तुमच्या कृपाकटाक्षें पूर्णता ॥ बाणें सर्वा-
परी ॥ ६६ ॥ यालागीं पूर्ण द्यावें अवधान ॥ तुह्मी बोलविला मी बोलेन ॥ पुंसा पढविजे आपण ॥ संतोपाला-
गीं ॥ ६७ ॥ ऐसीये विनवणीसाठीं ॥ संतें पावलें कृपादृष्टी ॥ आतां ग्रंथ उठाउठीं ॥ बोलेनमी ॥ ६८ ॥ तंव संत

१ आत्मस्वरूप विचार. २ कौशल्य, चातुर्य. ३ उत्सुक. ४ शेवटची चौथी अवस्था. ५ लक्ष मनाची एकाग्रता. ६ लक्ष न दिल्याने. ७ पोपट.

ह्मणती भलाभला ॥ तुवां उपकार थोर केला ॥ ब्रह्मानंदाचा सोहळा ॥ भोगविसी आह्मां ॥ ६९ ॥ आतां झ-
डकरी कथन करीं ॥ विलंबू नकरीं क्षणभरी ॥ तोचि प्रसादू वंदुनी शिरीं ॥ ग्रंथु वैखरी बोले माझी ॥१७०॥
अहो वासिष्ठसाराचें व्याख्यान ॥ महाराष्ट्र वाणी करणें जाण ॥ हें तो अपांड अघटमान ॥ सर्वांपरी ॥ ७१ ॥ स-
मुद्र तरावयालागीं ॥ होडगें मेळविजे आशेलागीं ॥ तैसें हें सर्वांगीं ॥ अपांडर असे ॥ ७२ ॥ परी येथें इतुका-
चि धिंवसा ॥ जो कर्णधार सद्गुरु ऐसा ॥ आणी तुमचे कृपेचा सहसा ॥ सुवांयो साह्य ॥ ७३ ॥ इतुकी सामग्री
करितां ॥ ग्रंथाब्धि हा हेळां तरता ॥ प्रयास नाहीं सर्वथा ॥ ह्मणोनि प्रवर्तलों ॥ ७४ ॥ जो वाचादिकाचा प्र-
काशकु ॥ तो वदविता श्रीगुरूनायकू ॥ आणि तुमचा पूर्ण कृपावलोकू ॥ तेणें सकळ सिद्धी ॥ ७५ ॥ आतां ग्रंथा-
र्थाचि बोलेन ॥ श्रोतीं व्हावें सावधान ॥ श्रीरघुनाथु वैराग्यें पूर्ण ॥ असतांचि दावी ॥ ७६ ॥ तो स्वयें परब्रह्म नि-
र्गुण ॥ वैराग्यादिसाधनीं साध्य जाण ॥ ते वस्तूसीं वैराग्य पूर्ण ॥ हा लौकिकार्थू ॥ ७७ ॥ लोकसंग्रहार्थ आ-
पण ॥ दावी आपणा अज्ञानपण ॥ वैराग्य आणि गुरूभजन ॥ लोकसंग्रहार्थ वाढवी ॥७८॥ जो परब्रह्म पूतळा ॥
त्यासी कैंचि अज्ञानकळा ॥ वैराग्यादि साधनमेळा ॥ तोहि तैसाची ॥ ७९ ॥ बाप कृपाळु जगजेठी ॥ जगदो-
द्धारु सुनिंद्दृष्टी ॥ गुरुशिष्य संवाद प्रगटी ॥ नेणता होउनी ॥१८०॥ स्वयेंचि परब्रह्म आपण ॥ वरि नटोनियां
रामपण ॥ तेणें होउनी वैराग्य पूर्ण ॥ शोभवी आंगीं ॥ ८१ ॥ पृथ्वीचीं तीर्थें करावया ॥ श्रीराम पुसती दशर-

१ वाणी. २ कठिण. ३ दुर्घट. ४ दुष्कर. ५ धैर्य. ६ नावाडी. ७ उत्तम वायु. ८ ग्रंथरूप समुद्र. ९ सहज. १० हेतूनें.

थराया ॥ राजा श्रीरामासीं आज्ञा द्यावया ॥ प्राणांत मानीं ॥ ८२ ॥ ह्मणें रघुनाथाचे वियोगेंकरून ॥ तत्काळ जातील माझे प्राण ॥ ह्मणोनि राहिला आलिंगुन ॥ श्रीरघुनाथासीं ॥ ८३ ॥ कोणेंपरी न सोडी रामासीं ॥ ह्मणें तूं जाउं नको तीर्थ यात्रेसीं ॥ तुझेनि वियोगें प्राणासीं ॥ मुकेन जाण ॥ ८४ ॥ मग पुढील देखोनी कार्यार्था ॥ वसिष्ठ ह्मणती रायादशरथा ॥ आज्ञा देईं श्रीरघुनाथा ॥ तीर्थाटणासीं ॥ ८५ ॥ तंव रघुनाथ ह्मणती रायासीं ॥ मी शीघ्रचि येईन तुजपाशीं ॥ माझें मनचि तुमचे पायासीं ॥ लीन असे निरंतर ॥ ८६ ॥ मग अतिप्रयासें दशरथ ॥ श्रीरघुनाथासीं आज्ञा देत ॥ रघुनाथ वियोगें माता समस्त ॥ अति व्याकुळ जाल्या ॥ ८७ ॥ ऐसी आज्ञा घेउनी रघुपती ॥ वंदुनी गुरु माता भूपति ॥ अल्पसेनेसीं पृथ्वीपति ॥ प्रस्थानकरि ॥ ८८ ॥ पुष्करादि तीर्थें समस्तें ॥ प्रयाग वाराणसी कुरुक्षेत्र जेथें ॥ द्वारका श्रीशैल्य सेतूतें ॥ गेले श्रीराम ॥ ८९ ॥ इत्यादि तीर्थें सांगों किती ॥ तीर्थें पवित्रें करावया रघुपती ॥ आपुलेनी चरणस्पर्शें विश्वमूर्ती ॥ पवित्र करी ॥ १९० ॥ ऐसें सकल पृथ्वीचें तीर्थजात ॥ पवित्र करिताजाला रघुनाथ ॥ जैसी मंत्रविद्या ग्रहणार्थ ॥ शुद्ध कीजे ॥ ९१ ॥ ऐसें पवित्र करूनि खर्व तीर्थांसि ॥ श्रीरघुनाथ आले अयोध्येसीं ॥ हें आइकोनी राजा स्वमानसीं ॥ संतोष मानी ॥ ९२ ॥ नगर शृंगारिलें नानापरी ॥ राजा पुढारला सैन्य संभारीं ॥ राम देखोनियां जिव्हारीं ॥ उचंबळला ॥ ९३ ॥ आनंदें न माये सृष्टी ॥ श्रीरामाकंठीं घाली मिठी ॥ येरु चरण वंदोनियां पोटीं ॥ लीन जाला ॥ ९४ ॥ परस्परें सुख सुखावलें ॥ परमानंदें निवालें ॥ तें सुख न बोलवे बोलें ॥ वैखरी वाचा ॥ ९५ ॥ एवं गुरु पूर्वक माता ति-

न्ही ॥ रघुराज वंदी प्रेमें करुनी ॥ अयोध्येचा सकळ जनीं ॥ महोत्सव थोर केला ॥ ९६ ॥ देशोदेशींचे प्रजालोक ॥ राजेही आले मांडलीक ॥ रघुनाथ दर्शनीं सकळिक ॥ परमानंद पावले ॥ ९७ ॥ नगरांत आणूनि रघुनाथासीं ॥ सोहळा केला अति उल्हासीं ॥ सुखें राहिले स्वगृहवासी ॥ आनंदभरित ॥ ९८ ॥ ऐसा सकळांसीं उत्साह जाला ॥ परी रघुनाथ न मानी राज्य सोहळा ॥ स्वगृहीं राहे उद्वेगला ॥ भोगवर्जित ॥ ९९ ॥ राजदर्शना कदापि न जाती ॥ नाहीं बाळक्रीडेची आसक्ती ॥ नाहीं राजोपचारावरी प्रीति ॥ उद्विग्न चित्तीं सर्वदा ॥ ॥ २०० ॥ राजा कळवळूनि भेटीसीं ॥ बोलाऊं धाडी रघुनाथासीं ॥ तरीं पितृ वचनार्थ सभेसीं ॥ क्षण येक येती ॥ १ ॥ तेथेंही उद्विग्न होउनी बैसे ॥ सर्वांगीं कोमाइला दिसे ॥ तें राजा देखोनि निज मानसें ॥ दुःख मानी ॥ २ ॥ आदरें पुसे रघुनाथासीं ॥ बारे तुज कोण चिंता मानसीं ॥ वर्ते तें सांग आह्मासीं ॥ यथार्थ रामा॥३॥ तुज उद्विग्न वोसांवलें देखोन ॥ मज दुःख होतसे दारुण ॥ कारण न सांगतां प्राण ॥ जातील माझे ॥ ४ ॥ तुज जें असेल अपेक्षित ॥ तें मी देईन निश्चित ॥ परि चिंताग्रस्त ॥ राहों नको बापा ॥ ५ ॥ तुझेनी सुखें सुख आह्मासीं ॥ तुझेनी दुःखें प्राणांत परियेसीं ॥ तरी सांग व्यथा कोण मानसीं ॥ आधि कीं व्याधी ॥ ६ ॥ तंव राम ह्मणे भूपाळा ॥ तुमचेनी आह्मां नित्य सोहळा ॥ आधि व्याधीचा मेळा ॥ तेथें कैंचा ॥ ७ ॥ इत्यादि गौरव वचनीं ॥ परिहारू देतसे कोदंडपाणी ॥ ऐसे क्रमले स्वभुवनीं ॥ कित्येक दिवस ॥ ८ ॥ रघुनाथासीं उद्विग्न असतां ॥

१ उदासीन. २ सुकलेला म्लान. ३ ओस पडलेला. ४ इच्छित. ५ शारीरिकदुःखें.

राजा राणियांसि व्याकुळता ॥ राज्य गोड न वाटे चित्ता ॥ राजा मुख्य सकळां ॥ ९ ॥ ऐसे क्रमले दिवस किती ॥ तंव अपूर्व वर्तलें अयोध्येप्रती ॥ तें आइकावें येकाग्र चित्तीं ॥ कथा संगती सांगेन ॥२१०॥ विश्वामित्र महाऋषी ॥ तेणें यागू आरंभिला संभ्रमेसीं ॥ बोलाउनी समस्तां ऋषींसीं ॥ आपुल्या आश्रमीं ॥ ११ ॥ आचार्ये होते उद्गाते ॥ मिळोनियां महोत्साहें बहुते ॥ अवदान देती अग्नीतें ॥ स्वाहाकार मंत्रें ॥ १२ ॥ तेथें येउनियां राक्षसीं ॥ यागु विध्वंसिला क्षणार्धेंसीं ॥ ऋषी दुःखित जाला मानसीं ॥ पुन्हा यागासीं आरंभी ॥१३॥ तोही पूर्णाहुती पावतां ॥ यागु विध्वंसिला चरण घातां ॥ ऋषी आरंभी मागुता ॥ तोही विध्वंसिला ॥ १४ ॥ ऐसा जो जो याग आरंभी ऋषी ॥ तो तो विध्वंसिजे राक्षसीं ॥ विश्वामित्र दुःखवला मानसीं ॥ ह्मणे कोणासीं सांगावें ॥ १५ ॥ जें जें निर्माण करी आपण ॥ त्याचें राक्षस करिती विध्वंसन ॥ नचले मंत्राचें सामर्थ्य जाण ॥ ह्मणोनि दुःखी जाला ॥ १६ ॥ ह्मणें मी कोणासीं जावें शरण ॥ कोण करील माझें समाधान ॥ रावणबळें राक्षस दारुण ॥ अनिवार्य देवां ॥ १७ ॥ इंद्रासी सांगों गाऱ्हाणें ॥ तरी तो लपाला असे भेणें ॥ आतां पारिपत्य याचें कोणें ॥ करिजेल येथें ॥ १८ ॥ चंद्र सूर्यादि जे देव ॥ तेही पराभविले सर्व ॥ ते सांडूनि आपुलें वैभव ॥ कार्यमात्र चालविती ॥ १९ ॥ आतां भूमंडळींचे भूपती ॥ तेही रावणाभेणें पळती ॥ त्यांचें काय यया राक्षसांप्रती ॥ सामर्थ्य चाले ॥२२०॥ ऐसा आकुळ व्याकुळ मनीं ॥ होउनी लोटला मेदिनीं ॥ श्वासोश्वास टाकी मुनी ॥

१ समारंभ. २ उपाध्याय. ३ होमकरणारे. ४ यज्ञांत मंत्र ह्मणणारे. ५ भूमीवर.

अतिदुःख करी ॥ २१ ॥ ह्मणे महाविष्णु विमुख आह्मासीं ॥ ह्मणोनि उपेक्षी यागासीं ॥ यज्ञरक्षकु सर्वांसीं ॥ त्याविण नाहीं ॥ २२ ॥ ऐसे मुहूर्त दोनी दुःख करितां ॥ तंव अकस्मात स्मृति जाली चित्ता ॥ ह्मणे भगवंत तंव तत्वतां ॥ अवतरला असे ॥ २३ ॥ राया दशरथाच्या उदरीं ॥ श्रीरघुनाथु रावणारी ॥ अवतरला असे महामारी ॥ राक्षसांतकू ॥ २४ ॥ तो स्वतःसिद्ध असतां रघुपती ॥ कायसी यागचिंता मज चित्तीं ॥ जाउनियां दशरथाप्रती ॥ रामलक्ष्मण मागों ॥ २५ ॥ ऐसें विचारोनियां मनीं ॥ ह्मणें बापभाग्य माझें ये जनीं ॥ आजि रघुनाथु डोळेभरूनी ॥ धणीवरी पाहूं ॥ २६ ॥ तो आणोनियां यागासीं ॥ समस्तां निर्दळूं राक्षसांसीं ॥ यज्ञ समर्पूं रघुनाथासीं ॥ प्रत्यक्ष सिद्ध ॥ २७ ॥ ज्याचेनि उद्देशें यागु कीजे ॥ त्यासींच प्रत्यक्ष जरी समर्पिजे ॥ तरी कृतकृत्यता होईजे ॥ आणि कीर्ति जगीं ॥ २८ ॥ ऐसा निश्चयो करोनी मुनी ॥ प्रस्थान केलें तत्क्षणीं ॥ बहुतां शिष्यें परिवारोनी ॥ अयोध्येसीं आला ॥ २९ ॥ तंव रायें आइकिली मात्रू ॥ सामोरा आला धांवतु ॥ प्रेमें चरणासीं लागतू ॥ सभेसीं बैसविला ॥ ३० ॥ पूजा करोनी षोडशोपचारीं ॥ कर जोडोनि विज्ञप्ति करी ॥ ह्मणें आज्ञा काय ते झडकरीं ॥ देईं महंता ॥ ३१ ॥ येरू ह्मणे राया अजसुता ॥ आह्मा अपेक्षा नाहीं तुज राज्यकरितां ॥ सकळ सिद्धी असती प्राप्ता ॥ तुझेनी सामर्थ्यें ॥ ३२ ॥ परी इतुकेंचि माझें मनोगत ॥ जो आरंभिला यागु कीजे समाप्त ॥ त्यासीं राक्षसीं उपद्रवित ॥ विध्वंसिती यज्ञासीं ॥ ३३ ॥ यासि करितां उपाय कोटी ॥ परी नव्हे यज्ञसिद्धीसि भेटी ॥ ह्मणोनि आठवली बुद्धि पोटीं ॥ ते तूं आईक राया ॥ ३४ ॥ जरी हें तुज सांगों का-

यींतर ॥ तरी राक्षस असती अतिथोर ॥ तुझेनी न करवे संव्हार ॥ बहुतां काळें ॥ ३५॥ यालागीं मागेन तें देईं॥ तूं सत्यसंध[1] धीर वीर पाहीं ॥ राक्षसां निर्दाळिसी सर्वही ॥ परी बहुत दिवस लागती ॥ ३६ ॥ तुझी कीर्ति म-हाथोर ॥ तूं शूरांमाजि महाशूर ॥ शुक्रासिं केला महामार ॥ हें तंव मी जाणतूं ॥ ३७ ॥ परी आतां येकचि क-रीं ॥ मागेन तें मज देईं झडकरीं ॥ राम लक्ष्मण यज्ञ रक्षणावरी ॥ देईं मज ॥ ३८ ॥ आणखी न मागें गा तुज॥ देईं लक्ष्मणासहित रघुराज ॥ इतुकेनि माझा कार्य समाज ॥ सिद्धी पावेल ॥ ३९ ॥ इतुकें आइकतांचि वचन॥ राजा जाला मूर्छापन्न ॥ भूमि पडला आसनावरून ॥ विस्मरण पावला ॥२४०॥ मुहूर्ती येका जाला सावध ॥ दुःखें दाटला अगाध ॥ वाचा नफुटे जाला सद्गद ॥ ह्मणें हें काय मागीतलें ॥ ४१ ॥ जरी राज्य मागतासि मुनि-राया ॥ अथवा प्राण देतों तुज लागुनी पायां ॥ स्त्रिया भांडार स्वामिया ॥ नवंची[2] मी ॥ ४२ ॥ परी राम ल-क्ष्मणासीं मागीतलें ॥ हें थोर अनुचित केलें ॥ जें कां मज नवचे दिधलें ॥ प्राण गेलिया ॥ ४३ ॥ अगा रघुना-थेविण राज्य सकळ ॥ तें व्यर्थ शरीरासीं तळमळ ॥ स्त्रियादि भोग अमंगळ ॥ मानितों मी ॥ ४४ ॥ किंबहुना शरीर प्राण ॥ रघुनाथाविण शवंतुल्यजाण[3] ॥ रामेविण पाळी कवण॥अतिकुश्चित ॥४५॥ तेथें देश दुर्ग भांडार॥ हें तंव अतिशयेसीं नेश्वर ॥ रघुनाथेविण सर्व संसार ॥ वातांन्न[4] मानी ॥४६॥ याकारणें गा मुनी॥ रघुनाथ नेदीं भर्वसेनी ॥ लटकी झाली जरी वाणी ॥ त्रिःप्रकारें माझी ॥ ४७ ॥ जरी जाती माझे प्राण॥ तऱ्ही नेदीं श्रीराम

१ सत्य प्रतिज्ञा करणारा. २ देण्यास माघारें घेणार नाहीं. ३ प्रेतवत. ४ वमन केलेलें अन्न.

लक्ष्मण ॥ इतुकें आयकोनी ब्राह्मण ॥ अतीउद्विग्न जाहला ॥ ४८ ॥ ह्मणें याचक गेलिया पराङ्मुख ॥ तो ग्रहस्थासीं महादोष ॥ नको आग्रह करूं देख ॥ पराङ्मुख मी जातों ॥ ४९ ॥ राजा ह्मणें ऋषिराया ॥ मज रघुनाथाविण धर्म कर्म क्रिया ॥ तपादि साधन सर्व माया ॥ अंतवंत मानी ॥२५०॥ नाना वर्णाश्रमाचार ॥ तें तोंचिपर्यंत साचार ॥ जंव प्राप्त नाहीं रघुवीर ॥ तंवचि वरी ॥ ५१ ॥ वर्णाश्रम नानाधर्म ॥ तपादि साधनें नैमित्यक कर्म ॥ याचा तोंचिवरी संभ्रम ॥ जंव राम न भेटे ॥५२॥ श्रीराम जाहल्या प्राप्त ॥ सर्व वर्णाश्रमाचार व्यर्थ ॥ ते जाण दुःखमूळ समस्त ॥ संसारदायक ॥ ५३ ॥ ह्मणोनि जरी वर्णाश्रम धर्मजाती ॥ मिथ्या जाहली माझी भारती ॥ तऱ्ही मी नेदीं श्रीरघुपती ॥ सत्य जाण ॥५४॥ ऐसें वचन आइकोनी ॥ क्रोधाविष्ट जाहला मुनी ॥ मग चालिला कोपोनी ॥ द्वारा बाहेरी ॥ ५५ ॥ तंव वसिष्ठ ह्मणती रायासीं ॥ नको विन्मुख धाडूं विश्वामित्रासीं ॥ तो स्वयें जाण तपोराशी ॥ शापील तुज ॥ ५६ ॥ आणि जे जे सूर्यवंशींचे भूपती ॥ ते याचकासीं विमुख नव्हती ॥ त्यासि देती देहादि संपत्ती ॥ हें तुह्मासीं विदित ॥ ५७ ॥ यालागीं राया दशरथा ॥ बोलाउनी आणी महंता ॥ त्यासीं समर्पी श्रीरघुनाथा ॥ भय सर्वथा त्या नाहीं ॥ ५८ ॥ राम शूरांमाजी जगजेठी ॥ सकळां राक्षसां करील आटी ॥ यज्ञ सिद्धी उठाउठी ॥ करील जाण ॥५९॥ रघुनाथ पराभवेल ह्मणोनि ॥ सर्वथा भय न धरीं मनीं ॥ राम शूरांचा मुगुटमणी ॥ जाण निर्धारें ॥२६०॥ यावरी बोलाउनी विश्वामित्रासीं ॥ रायें सत्का-

१ नाशवंत. २ महत्व. ३ वाणी. ४ नाश.

रिला संभ्रमेसीं ॥ ह्मणें तूं कैसा रघुनाथासीं ॥ मागतोसि मज ॥ ६१ ॥ राक्षस जुनाट झुंझार ॥ बहु समुदाय महावीर ॥ श्रीराम अत्यंत सुकुमार॥पंचदश वर्षांचा ॥६२ ॥ विद्याभ्यासु तरी पूर्ण केला ॥ परी संग्रामीं नाहीं निवडिला ॥ आणि याचा वियोग मजला ॥ क्षणमात्र नसाहे ॥ ६३ ॥ तंव विश्वामित्र ह्मणे रायासीं ॥ तूं अद्यापी श्रीराम नेणसी ॥ परब्रह्म अवतरलें तुझे वंशीं ॥ धन्य कुसी मायेची ॥ ६४ ॥ वैकुंठनाथू आला पोटा ॥ तुज काय वाणूं भाग्योत्कटा ॥ तूं अज्ञानें नेणसी वैकुंठा ॥ श्रीरघुनाथासीं ॥६५ ॥ सकळां दैत्यासीं निर्दाळुन ॥ करावें साधु धर्मांचें पाळण ॥ ह्मणोनि रामरुपें अवतरण ॥ महाविष्णूनें केलें ॥६६॥ हा निर्दाळील दैत्यांसीं ॥ तारील तुझ्या वंशासीं ॥ अयोध्या हे वैकुंठासीं ॥ नेईल राया ॥ ६७ ॥ राया तूं कोण तप तपलासी ॥ कीं कर्वतीं फोडिलें स्वदेहासीं ॥ तेणें पोटा आला हृषीकेशी ॥ श्रीरामरूपें ॥ ६८ ॥ ह्मणोनि चिंता न करीं तूं रामाची ॥ हा तंव शांती करील राक्षसांची ॥ सिद्धी करील माझिया यज्ञाचि ॥ आणि कीर्ति करील ॥६९॥ हा योगियांचें समाधी धन ॥ आणि सकळ तीर्थांसीं परम पावन ॥ हा चित्सुखाब्धि निरंजन ॥ पुत्र तुझा ॥२७०॥ श्रीराम आमुची परम विश्रांती ॥ श्रीराम शांतीची परम शांती ॥ श्रीराम कीर्तिचि निजकीर्ति ॥ मंगळमूर्ती श्रीराम ॥ ७१ ॥ श्रीराम ब्रह्मांदिकांचा नियंता ॥ श्रीराम विश्वस्थितीसंहारकर्ता ॥ श्रीराम जगातें उद्धरिता ॥ स्वज्ञानें करोनी ॥ ७२ ॥ श्रीराम मंगळावें मंगळ ॥ श्रीराम परब्रह्म निष्कळ ॥ श्रीराम नित्य निर्मळ ॥ चिद्धनै-

१ चैतन्यानंदाचा सागर. २ निखिल, निष्कळंक. ३ ज्ञान मय एकरूप.

करूप ॥ ७३ ॥ ऐसें ऐकोनी ऋषिवचन ॥ राजा दशरथ सुखसंपन्न ॥ वसिष्ठासीं समाधी पूर्ण ॥ समाधान सभेसीं ॥ ७४ ॥ आनंद रायाच्या मनीं ॥ लागला विश्वामित्राच्या चरणीं ॥ ह्मणे निमालों तुझ्या वचनीं ॥ लोटांगणीं साष्टांग ॥ ७५ ॥ मग बोलावूं धाडिलें रघुनाथासीं ॥ ह्मणे राम देईन गा तुजपाशीं ॥ भय नाहीं मानसीं ॥ तुझेनी वचनें ॥ ७६ ॥ तंव हेरू धाडिती श्रीराम गृहासीं ॥ ह्मणती रावो बोलाविती तुह्मासीं ॥ रामु वचनमात्रें सभेसीं ॥ येताजाहला ॥७७॥ साष्टांग नमस्कार केला वसिष्ठासीं ॥ तैसाचि विश्वामित्रा आणि रायासीं॥ रायें आलिंगोनि पालखतिसीं ॥ बैसविला पुढां ॥७८॥ शिरोवघ्राण करुनि दिधलें चुंबन॥ वेळोवेळां करी मुखावलोकन॥ ह्मणे कोमाइलें दिसे तुझें वदन ॥ कोण्या काजा सांगपां ॥ ७९ ॥ तीर्थाटण करूनि आलियावरी ॥ कांहीं भोग न भाविशी शरीरीं ॥ वैराग्य उपजतसे भारी ॥ तें कारण सांगिजे॥८०॥ रघुनाथ चिंताक्रांत मानसीं॥विनविता जाला विश्वामित्रासीं ॥ ह्मणे मनोगत सांगेन तुह्मापासीं ॥ तें आइकें ऋषिराया ॥८१॥ नावडती तरुणी स्त्रियांचे भोग ॥ भोग तितुका क्षयरोग ॥ स्त्रीसंगें दुःख अभंग ॥ किती सांगों ॥८२॥ स्त्रीसंगें दुःख कोटी ॥ स्त्रीसंगें विपरीत सृष्टी ॥ स्त्रीसंगें रौरवेसीं भेटी ॥ होय देवा॥८३॥आणिकही आइकें ऋषिराया॥मन उठिलें विषयांवरुनियां॥ नावडती भोगक्रिया ॥ कोण्हेही विषई ॥ ८४ ॥ अतीप्रीति साधुच्या चरणीं ॥ उपजताहे अनुदिनी ॥ इतर पदार्थ कोण्ही ॥ नावडती मज ॥८५॥ नावडे देह सौभाग्य ॥ नावडे वैभव राज्यभोग ॥ नावडे स्त्रियांचे कटाक्ष

१ मांडीसी. २ मस्तकावघ्राण. ३ नरक. ४ ऐश्वर्य.

भोग ॥ वैरस्यत्वें ॥ ८६ ॥ नावडे बंधु मित्र संपत्ती ॥ नावडे खेळणें कर्माकृती ॥ स्वधर्माचरणीं उदास वृत्ती ॥ नावडोनियां ॥ ८७ ॥ नावडे देहादि उपचार ॥ नावडे ज्ञातिगोत्र कुळाचार ॥ सुगंधादि अष्टप्रकार ॥ भोगाचे जे ॥ ८८ ॥ सुगंध परिमळादि चंदन ॥ पुष्पस्त्रग चंदनादि वनिता जाण ॥ वस्त्रें नानापरिचीं परिधानें ॥ पीतांबराचीं ॥ ८९ ॥ गीत गायन नृत्यांगना ॥ तो संभ्रम नावडे कांहीं मना ॥ तांबूल खाद्य आणि भोजना ॥ मन न रिघे॥ ९०॥तैसेंचि शयनाच्या अवसरीं ॥ नावडे पर्यंक सुमनशेजारीं ॥ भूषणेंही नानापरी ॥ कटककुंडलादिकें ॥ ९१ ॥ ऐसें इत्यादि सांगों किती ॥ नावडे देहादि इंद्रिय संपत्ती ॥ वासना शरीरीं नाना उठती ॥ तेणें निर्बुजे बहू ॥ ९२ ॥ तैसेंच मनही महा ओढाळ ॥ क्षणभरीं न राहे निश्चळ ॥ करी संसारीं तळमळ ॥ व्याकुळपणें ॥ ॥ ९३ ॥ स्थीर करितांही क्षणभरी ॥ धांवोनि जाय विषयावरीं ॥ अहोरात्र वणवण करी ॥ तेणें भारी क्षोभ होतो ॥ ९४ ॥ या मना वासनेचेनि संगें ॥ अतीशयें मी आहाळूं लागें ॥ तें दुःख मी काय सांगों ॥ स्वामीप्रती ॥ ९५ ॥ मन हें अखंड श्वानाचेपरी ॥ विषयालागीं वणवण करी ॥ तेणें दुःख होतसे भारी ॥ किती सांगों ॥ ॥९६॥ ॥ श्लोक ॥ संमतिर्वासिष्ठ ॥ इतश्चेतश्चसुव्यग्रंव्यर्थमेवाभिधावति ॥ दूराद्दूरंदिनंदीर्घग्रामेकौलेयकोयथा ॥ ॥ २ ॥ ॥ टीका ॥ या मनाचें ओढाळपण ॥ किती सांगों तुजलागुन ॥ इतस्तता धांवे विषया कारणें ॥ उडी घाली भलतेथें ॥ ९७ ॥ प्राप्त विषईं आसक्ती धरी ॥ अप्राप्तीची अतिशयें चाड करी ॥ अविद्यमानालागीं नानापरी ॥ म-

---

१ विरसपणामुळें. २ सुगंधीक पदार्थ. ३ अलंकारादिक. ४ कंटाळे. ५ संतापूं. ६ इकडेतिकडे. ७ नाशवंत.

५

नोरथ भावी॥९८॥प्राप्त विषयींही व्यग्रता ॥ तेथेंही नाहीं स्थीरता ॥ व्यर्थचि धांवे इतस्तता ॥ नसतां प्राप्त ॥ ॥ ९९ ॥ देखिलें आइकिलें जें देशांतर ॥ अतिदूरि बहु धुरंधर ॥ तेथेंही उडी घाली सत्वर ॥ अत्याभिलाषें ॥ ॥ ३०० ॥ सप्त पाताळ मृत्युलोक ॥ सप्तस्वर्गादिब्रह्मलोक ॥ क्षणार्धें हिंडे जैसे रंक ॥ दीन होऊनियां ॥ १ ॥ जैसा थोरा ग्रामाच्या ठाईं ॥ श्वान हिंडे दिवसरात्रही ॥ बहु भक्ष मिळालिया इतरही ॥ पाहातांचिअसे॥२॥जगाचें कलिवर प्राप्तचि असतां॥गुरगुरूं लागे दुसरें देखतां ॥ थोडें मानुनी इतरार्थी ॥ अभिलाषितू॥३॥संमति ॥ श्लोक ॥ वासिष्ठ रामोक्ती ॥ ॥ नप्राप्नोतिकचित्किंचित्प्राप्तैरपिमहाधनैः॥नांतःसंपूर्णतामेतिकरंडकमिवांबुभिः॥३॥ टीका॥ ऐसे नाना मनोरथ करितां ॥ प्राप्त्यर्थ नाहीं सर्वथा ॥ तरी न राहे हिंडतां ॥ नाना स्थानें ॥४ ॥ ऐसेन महा- प्रयासेंकरून ॥ भाग्योदयें लाधला महाधन ॥ अथवा सार्वभौम इंद्रस्थान ॥ लाधलें जरी ॥५॥ तरी ते संपूर्ण- ता न मनीं ॥ वणवण करी अनुदिनीं ॥ तृष्णांकुळित त्रिभुवनीं ॥हिंडे सदां ॥६॥ भरिलेंच भरी सर्वथा ॥ तृप्तीच न पवे तृप्तता ॥ भरिजे तंव तंव होय रिता ॥ अतृप्तपणें ॥७॥ संमति ॥ श्लोक ॥ नजातुकामःकामानामुपभो- गेनशाम्यति ॥ हविषाकृष्णवर्त्मैवभूयोभूयोभिवर्धते ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ जंव जंव भोगी विषयजात ॥ तंव तंव व- णवण करी बहुत ॥ तिलांज्य आहुतीनें पूरित ॥ वैश्वानरू जैसा ॥८॥ शमवावयालागुनी ॥ घृतधारा विझविता महाअग्नी ॥ अधिकचि लागे गगनीं ॥ थोरावलेपणें ॥ ९ ॥ नाना वणवणेच्या विषईं ॥ प्राप्त विषय सर्वही ॥ भ-

१ चिंतातुर. २ प्रेत. ३ आशायुक्त. ४ तीळ व तुप. ५अग्नी.

रिजे तंवतंव रिता पाही ॥ मनोकोशहा ॥ १० ॥ जैसा वेळूचा करंडक ॥ जों जों भरिजे त्यांत उदक ॥ तंव तंव रिताचि अधिक ॥ जैसा तैसा ॥ ११ ॥ जंव जंव तो भरिजे नीरें ॥ तंव तंव रिताचि सर्वद्वारें ॥ कांहीं केलियाही न भरे ॥ कल्पांतवरी ॥ १२ ॥ तैसें मन हें मुनीराया ॥ पूर्णता न पवे कांहीं केलिया ॥ यासि काय करावें गा मुनिराया ॥ उपाय सांगा ॥१३॥ संमति ॥ श्लोक ॥ ॥ करेणजडतांयातस्तृष्णाभार्यानुगामिनी ॥ शवकौलेयकेनेव-ब्रह्मन्भुक्तोस्मिचेतसा ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ अगा अतीक्रूर हें मन जाण ॥ यासिं तृष्णाभार्या सहाय पूर्ण ॥ तियेमागें जाय धावोन ॥ स्त्रीसंगें जाय हें ॥ १४ ॥ तृष्णा धांवे जे जे पदार्थीं ॥ तेथें मन उडी घाली अवचितीं ॥ ऐसें त्रैलोक्य जरी हिंडती ॥ तऱ्ही तृप्ती नाहीं ॥ १५ ॥ ते तृष्णेभार्येचेनि संगें ॥ मन हें सैरावैरा धांवोंलागे ॥ अतिक्रूरता पावे वेगें ॥ आणि महाजडता ॥ १६ ॥ या मनाचेनि संगें मजलागुन ॥ देहीं जडता बाणली पूर्ण ॥ आप आपणातें विसरोन ॥ हे दशा प्राप्त ॥ १७ ॥ ऐसा जाल्या मनाधीन ॥ हें फाडफाडूं खाय तृष्णेकरून ॥ जैसें शवातें तोडी फाडी श्वान ॥ तयाचिपरी ॥ १८ ॥ तैसें ब्रह्मस्वरूपा ऋषीश्वरा ॥ फाडफाडूं खादलों गा या मनें सैरा ॥ याचा मज लागला भेदरा ॥ कासाविस होतसें ॥ १९ ॥ रात्रीं दिवस माझा अंगीं ॥ लागली असे गा तृष्णाधगी ॥ अग्नी लागला शिरोभागीं ॥ निववी मज ॥२२०॥ या मन तृष्णेचिया संगती ॥ काम क्रोध इत्यादि उठती ॥ तें दुःख सांगों कोणाप्रती ॥ मुनिराया ॥ २१ ॥ यापासुनी सोडवीं मजलागुन ॥ ह्मणोनि घातलें

१ करंडा. २ उदकानें. ३ इच्छा. ४ प्रेत. ५ भिती.

लोटांगण ॥ त्राहि त्राहि ह्मणऊन ॥ करुणा बोले ॥ २२ ॥ लघुवासिष्ठीं श्रीरघुनाथ ॥ वैराग्य बोलिले जें अद्भुत ॥ तितुकें लिहितां विस्तृत ॥ ग्रंथ वाढेल ॥ २३ ॥ यालागीं अल्प निरूपणें ॥ ग्रंथु संपादिला वैराग्यें येणें ॥ देह कुश्चिंत रघुनाथ ह्मणें ॥ नावडे मज ॥ २४ ॥ शरीर हें दुर्गंधीचें घर ॥ सकळां रोगाचें बिढार ॥ वात पित्त श्लेष्मा निरंतर ॥ वर्ते येथें ॥ २५ ॥ याचेनि संगें दुःख भारी ॥ उपचारितां नाना उपचारीं ॥ परी हें नश्वर सर्व प्रकारीं ॥ काय सांगों ॥२६॥ ऐसें येकेक बोलों किती ॥ बोलतां दुःखचि आठवे चित्तीं ॥ चिळसी येतसे पुढतपुढतीं ॥ या संसारीची ॥ २७ ॥ यालागीं आइकें ऋषिराया ॥ सोडवीं पासाव भवभया ॥ जेणें सुखरूप होवोनियां ॥ वर्ते मी जैसा ॥ २८ ॥ ऐसें वैराग्य बोलतां श्रीरामासीं ॥ विस्मय सकळ सुरवरांसी ॥ वसिष्ठ विश्वामित्र रायासीं ॥ आणिक ऋषी सकळांतें ॥ २९ ॥ तेथें मिळाले सुर नर किन्नर ॥ पन्नग गंधर्व विद्याधर ॥ तितुकीयासीं चमत्कार थोर ॥ सकळ सभा विस्मित ॥३३०॥ ह्मणती श्रीरामाची अल्प वयसा ॥ वैराग्यपूर्ण बाणलें सहसा ॥ सद्गुरु भेटावा ऐसा ॥ मनोभाव दिसे ॥ ३१ ॥ सकळ नावडोनियां चित्तीं ॥ येक साधु चरणीं अतिप्रीति ॥ हेंचि जाणावी शुद्धमती ॥ ज्ञान भूमिका ॥ ३२ ॥ हें देखोनियां विश्वामित्रासीं ॥ आनंद न माये मानसीं ॥ ह्मणें धन्य हा सूर्यवंशासीं ॥ पाहिलें आजी ॥ ३३ ॥ ह्मणें धन्य धन्य हा दशरथ ॥ जयासीं पुत्र हा रघुनाथ ॥ धन्य हा वसिष्ठ पुरोहित ॥ इये वंशीं॥३४॥श्रीराम परब्रह्म आपण ॥ तोही वैराग्य दावी पूर्ण॥वसिष्ठा तूं

१ कंटाळवाणा. २ स्थान. ३ वारंवार. ४ पासून. ५ पायरी.

ज्ञान संपन्न ॥ उपदेशीं श्रीरामू ॥३५॥ आजि तुजसारिखा सद्गुरु ॥ आणि श्रीराम वैराग्याचें पूर्ण तारूं ॥ कास-
या लाविसि उसीरू ॥ ज्ञान दाना ॥३६॥ वसिष्ठ ह्मणे विश्वामित्रासीं ॥ ज्ञानोपदेश करीं रघुनाथासीं ॥ येरू ह्म-
णें तुमच्या शिष्यासीं ॥ उपदेशावया मज सांगों नये ॥ ३७ ॥ आणिकाचा शिष्य सुबुद्धी ॥ आपण बोधूं नये
स्वार्थबुद्धी ॥ चाळवितां दूर्षणाब्धि ॥ पडिजे जाण ॥ ३८ ॥ यालागीं सूर्यवंशीं तूं कुळगुरू ॥ ज्ञानोपदेष्टा वक्ता
चतुरु ॥ श्रीराम वैराग्यें उदारू ॥ उसिरु येथें नलावीं ॥ ३९ ॥ वैराग्य बाणलिया शिष्यासीं ॥ विलंबू करूं न-
ये ज्ञानोपदेशीं ॥ आत्मविद्या सच्छिष्यासीं ॥ द्यावी तत्काळ ॥३४०॥ मग वसिष्ठ ह्मणती परियेसा ॥ शिष्या-
सी वैराग्य जालें सहसा ॥ परी गुरूसीं न प्रार्थितां उपदेशा ॥ पात्र नव्हे ॥४१॥ गुरूसीं शरण येउनी प्रश्न ॥
शिष्य न करी जंव आर्त होऊन ॥ तंव उपदेश करणें हें दूषण ॥ गुरुत्वासिं ये ॥ ४२ ॥ अभिलाषें करूनि बला-
त्कारें ॥ शिष्यासीं उपदेशिजे सादरें ॥ तेथें गुरूचें वोस पडे खरें ॥ संप्रदायही ॥ ४३ ॥ ऐसें बोले जंव वसि-
ष्ठऋषी ॥ तंव श्रीराम उठोनी लागे चरणासीं ॥ ह्मणें शरण आलों स्वामीसीं ॥ उद्धरीं मज ॥ ४४ ॥ आमुचे वं-
शीं स्वामि असतां कुळगुरु ॥ आणि आह्मासीं बाधि संसारु ॥ हा तंव विस्मय थोरु ॥ सद्गुरुराया ॥ ४५ ॥ तु-
झें जाहलिया दर्शन ॥ अविद्येचें भस्म पूर्ण ॥ कृपाकटाक्षें संपूर्ण ॥ ब्रह्मत्व लाभे ॥ ४६ ॥ यालागीं जी कृपा-
सागरा ॥ स्नेहपूर्वकजी ऋषीश्वरा ॥ मोहाचिया महापूरा ॥ तारीं मज ॥४७॥ ऐसें प्रार्थितां रघुनाथासीं ॥ कृपा

१ दोषांचा समुद्र. २ आतुर. ३ परंपरा. ४ अज्ञानमाया.

उपजली वसिष्ठासीं ॥ ह्मणें बारे रामा परियेसीं ॥ सांगेन तुज ॥ ४८ ॥ वैराग्यपूर्वक ज्ञान विज्ञान ॥ तुजलागीं सांगों संपूर्ण ॥ जें तूं ब्रह्मचि ब्रह्म पूर्ण ॥ होसी स्वानुभवें ॥ ४९ ॥ ऐसी प्रतिज्ञा स्वीकारुनी ॥ श्रीरामासीं सन्मुख बैसउनी ॥ सांगेल तें आतां निजश्रवणीं ॥ आइका श्रोतेहो ॥३५०॥आधींच श्रीराम ज्ञाता वरिष्ठ ॥ वरी उपदेशकर्ता श्रीवसिष्ठ ॥ तें ज्ञान अतिश्रेष्ठ ॥ उपनिषदार्थु ॥ ५१ ॥ दशधा निरूपण दशप्रकरणीं ॥ दोनीशतें एकविंशति[1] श्लोक वाखाणी ॥ श्लोकरूपें श्रुति कोडिसवाणि[2] ॥ दृढ संतजनीं सेवावी ॥ ५२ ॥ वैराग्यादि निर्वाणांत ॥ दशप्रकरण यथोचित ॥ वसिष्ठसाराचा विस्तारु येथ ॥ ज्ञानरूपें ॥ ५३ ॥ त्यामाजी प्रथम वैराग्यप्रकरण ॥ स्वयें बोले वसिष्ठ आपण ॥ त्यांतही दिसे ब्रह्मज्ञान ॥ अनुष्ठितांचि[3] ॥ ५४ ॥ प्रकरणाहुनी प्रकरणसार ॥ अर्थ गांभीर्यें गंभीर ॥ येकापरीस येक थोर ॥ अर्थपुष्टी करूनी ॥ ५५ ॥ श्लोक श्लोकातें विये ॥ अर्थु अर्थातें प्रसवे ॥ अभिप्रावोचि अभिप्रायें ॥ प्रकट करीजे ॥ ५६ ॥ ऐसा ग्रंथु सज्जनीं ॥ आइकावा अति श्रवणीं ॥ श्रवणमात्रेंचि तत्क्षणीं ॥ कृतकृत्यता होय ॥ ५७ ॥ इये ग्रंथीं अधिकारी ॥ ज्यासीं श्रवणीं आवडी अंतरीं ॥ आणि ब्रह्मत्वाचि प्राप्ती पुरी ॥ इच्छा जया असे ॥ ५८ ॥ तेचि श्लोकाचेनि मिषें ॥ प्रकट कीजेल आपैसें ॥ जें कीं बोलिलें असे ॥ श्रीवासिष्ठऋषी ॥ ५९ ॥ श्रीरघुनाथ समित्पाणि[4] होऊन ॥ श्रीगुरूसीं प्रदक्षिणा करून ॥ साष्टांग करी नमन ॥ शिष्य सांप्रदायें ॥३६०॥ प्रार्थना करूनि नानापरी ॥ वैराग्य निरोपिलें पूर्विलांपरी[5] ॥ ह्मणें तारीं तारीं



---

१ एकविस. २ थोडीसी. ३ अनुष्ठान करणें. ४ समिधा हस्तांत घेतलेला. ५ पूर्वीं प्रमाणें.

ये संसारीं ॥ बुडालों स्वामी ॥ ६१ ॥ तंव कळवळोनियां वसिष्ठमुनी ॥ शिरीं हस्त ठेउनीयां तत्क्षणीं ॥ ह्मणे बारे आइक तुजलागुनी ॥ करीन भवावेगळें ॥६२॥ तेंचि आइके निरुपण ॥ जें कीं स्वयें वाल्मीक बोले आपण॥ शत कोटि ग्रंथु रामायण ॥ निर्मिलें स्वयें ॥ ६३ ॥ त्यामाजी माझी उक्ती जे तुजप्रती ॥ त्यालागोन वासिष्ठ ऐसें ह्मणती ॥ वदली वाल्मिकाची भारती ॥ भविष्य पुढील ॥ ६४ ॥ तयामधील निरूपण ॥ सांगेन आधीं वैराग्यप्रकरण ॥ या ग्रंथाचा अधिकारी पूर्ण ॥ वोळखावा ऐसा ॥ ६५ ॥ तेंचि आतां येकाग्र होऊन ॥ सर्वांगाचें करी श्रवण ॥ सांगेन त्याचें मनन ॥ निदध्यासन करावें ॥ ६६ ॥ तो रे अधिकारी येथें ऐसा ॥ आईक आतां विरविलासा ॥ त्यासींच पात्रता उपदेशा ॥ सर्वथा जाण ॥ ६७ ॥ ऐसें वाल्मिकींचें वचन ॥ बोले अधिकारीयाचें लक्षण ॥ तें आइके येकाग्र मन ॥ करुनि रामा ॥६८॥ वाल्मीकउवाच ॥ श्लोक ॥ अहंबद्धोविमुक्तस्यामीतियस्यास्तिनिश्चयः॥नात्यंतमज्ञोनोतज्ञःसोस्मिन्शास्त्रेधिकारवान् ॥१॥ टीका ॥जो कीं अत्यंत अज्ञान॥जडमूढ मळीन ज्ञाण ॥ देहोचि हाआपण ॥ बोध जया ॥६९॥ मीपण तें देहाचे माथां ॥ देहापरतें नेणें सर्वथा ॥ देहसंबंधिया आत्मता॥ममताकारें करूनी ॥३७०॥ अहं हे देहासींच बोले ॥ स्त्रीपुत्रादि ममताकारा आले ॥ इतर कांहींच नकळे ॥ तो अती अज्ञानी ॥७१॥ मी कोण काय येथें आहे ॥ हा देह तो कवणाचा काय ॥ यासीं चळण कोणाचेंनि आहे ॥ हें कांहींच नेणें ॥ ७२ ॥ केवळ शिश्नोदरपरायण ॥ व्यवहारीं अतीदक्ष पूर्ण ॥ देवत्व मानी येक पाषाण ॥ सं-

---

१ संसारावेगळें. २ भाषण. ३ वाचा.

पूर्णभावें ॥ ७३ ॥ तोचि अतीअज्ञान जाण ॥ तो अधिकारी नव्हे पूर्ण ॥ जया देव कोण मी कवण ॥ उमजेचिना ॥ ७४ ॥ जैसें सिनीवालीचें निशिथ ॥ वरी जळद जालें अंबरयुक्त ॥ तैसें जयाचें अंतस्थ ॥ गडदपणें॥७५॥ तयासीं काइसें श्रवण ॥ तो केंविजाणें ब्रह्मज्ञान ॥ बंध अथवा मुक्तपण ॥ नस्मरे दोन्ही ॥ ७६ ॥ आपण एक देहावेगळा ॥ बांधला अज्ञान शृंखला ॥ इतुकी हि स्मरणकळा ॥ नाहीं जयासीं ॥ ७७ ॥ ऐसा जो अज्ञानी अती ॥ तो अधिकारी नव्हे इयेग्रंथीं ॥ जो स्वयें उदास श्रवणार्थीं ॥ मळीणपणें ॥ ७८ ॥ तो वाळिला अंत्यजाचेपरी ॥ नाहीं श्रवणाधिकारिगा रावणारी ॥ अत्यंत ज्ञानी तोही सर्वांपरी ॥ अधिकारी नव्हे ॥ ॥ ७९ ॥ तज्ज्ञशब्दें परोक्ष ज्ञानी ॥ ऐसा तर्क करील कोण्ही ॥ यालागीं अत्यंत पदसुचनी ॥ दोन्हीं पदासीं ॥ ३८० ॥ अत्यंत तज्ज्ञ ह्मणिजे जाण ॥ जयासीं असे अपरोक्षज्ञान ॥ तो येथें काय करील श्रवण ॥ समाधान जयासीं असे ॥८१॥ तो ब्रह्मानंदें डुल्लत ॥ देहीं देहाचि नेणें मात ॥ नेणें दुजें विश्वाआंत ॥ आपणाविण ॥ ८२ ॥ ऐसा जो कां ब्रह्मवेत्ता ॥ तो नव्हे अधिकारी तत्वतां ॥ सर्वदां ब्रह्मानंदें तृप्तता ॥ बाणली जया ॥ ८३ ॥ पूर्णाचें बोलतां लक्षण ॥ तरीं पुढां असे जीवन्मुक्ती प्रकरण ॥ तेथें कीजेल निरूपण ॥ ह्मणोनी अल्प केलें ॥ ८४ ॥ ह्मणोनी तो नव्हे अधिकारी ॥ जो पूर्णपणें जगामाझारी ॥ श्रवण हें साधन तो काय करी ॥ धालेपणें ॥ ८५ ॥ जो भोजन करुनि बैसला ॥ त्यास पाकव्यापार काय बोलिला ॥

१अमवास्येची. २ रात्र. ३ मेघ. ४ अंधकार. ५ तृप्ती.

ग्राम पावोनि सुखाडला ॥ त्यासि मार्गुकाय ॥ ८६ ॥ यालागीं जया पूर्णज्ञान ॥ तोही अधिकारी न-
व्हे जाण ॥ सांगेन अधिकारीयाचें चिन्ह ॥ तेंचि आइकें ॥ ८७ ॥ जो कीं अत्यंत नव्हे ज्ञानी ॥ अपरोक्षानुभव
नेणें स्वप्नीं ॥ नाना जो अत्यंत अज्ञानी ॥ जडमूढपणें ॥ ८८ ॥ आतां दोन्हीं नहोन जो मध्यस्तु ॥ तोचि अधि-
कारू प्रस्तुतु ॥ त्याचा सांगेन वृत्तांतु ॥ अतिविस्तारें तुज ॥ ८९ ॥ जयासीं आपांदता कळला अर्थु ॥ जाणें को-
ण मी देहातितु ॥ परी अज्ञानें असे आवृत्तु ॥ बद्धरूपें ॥ ३९० ॥ जो साधनचतुष्टय संपन्न ॥ तोचि येथें अधिका-
री जाण ॥ जो नव्हे ज्ञानी ना अज्ञान ॥ तोचि अधिकारी ॥९१॥ आतां साधनचतुष्टय कोण ॥ त्याचें संक्षेपें क-
रूं विवरण ॥ तूं करूनि येकाग्र मन ॥ आइकें रघुनाथा ॥ ९२ ॥ प्रथम नित्यानित्य विवेक ॥ नित्य तें आत्म-
स्वरूप एक ॥ ऐसें परोक्ष कळणें देख ॥ येर अनित्य सर्वही ॥ ९३ ॥ देहादि प्रपंच सर्व ॥ तो अनित्य नश्वर सां-
वेव ॥ हा जयासीं विवेकभाव ॥ जागतो आंगीं ॥ ९४ ॥ दुसरें साधन रघुपती ॥ इहामूत्र फळ भोग विरक्ती ॥
इहलोकींचे भोग नावडती ॥ जरी प्राप्ती स्वराज्य ॥ ९५ ॥ तैसेच परलोकिचें स्वर्गादि सुख ॥ तें मानीं वातांन्न
देख ॥ ऐसें जें वैराग्य चोख ॥ बाणे जया ॥ ९६ ॥ यदर्थीं वेदसंमती ॥ येकाग्र आइके विश्वमूर्ती ॥ वैराग्याची
स्वरूपस्थिती ॥ सांगेन तुज ॥९७॥ संमती ॥ श्लोक ॥ ब्रह्मलोकतृणीकारोवैराग्यस्यावधीर्मता ॥६॥ इत्यादि ॥
अगा ब्रह्मलोक पर्यंत ॥ तृणतुल्य भोग जया समस्त ॥ तोचितो वैराग्ययुक्त ॥ इहामूत्रादि विराग ॥ ९८ ॥ ति-

१ आपेआप. २ अवयवयुक्त. ३ वमनकेलेलेंअन्न.

सरें शम दम हें षट्कसाधन ॥ त्याचेंही सांगेन विवरण ॥ करूनि सावधान मन ॥ आइकें रामा ॥ ९९ ॥ मनबुद्धि विषयावरुनि आवरीजे ॥ तया नांव अंतरींद्रिय निग्रह बोलिलेजे ॥ तोचि शमू ऐसा ह्मणीजे ॥ षट्काचे प्रथम ॥ ४०० ॥ दुसरा तो दमू रघुनाथा ॥ बाह्येंद्रियवृत्ती निरोध सर्वथा ॥ स्वस्वव्यापारीं विमुखता ॥ करवावी त्या करवी ॥ १ ॥ तिसरें साधन उपरती ॥ तयाची ऐसी स्वरूपगती ॥ दमिली इंद्रियांसी पुनरावृत्ती ॥ करूनेदावी ॥२॥ आवरलीं इंद्रियें मागुतेनी॥ प्रवर्तों नेदावीं विषयांलागुनी ॥ हेचि उपरती भवसेनी ॥ जाण रघुपती ॥३॥ आतां चौथी तितिक्षा ऐसी ॥ सर्वदां सहावें द्वंद्वासी ॥ आपुलिया जे आचारासीं ॥ शीतोष्णें होती ॥ ४ ॥ संध्यास्नानादिक कर्में करितां ॥ शीतोष्णें बाधिती गा रघुनाथा ॥ ते ते साहावीं सर्वथा ॥ तैसेंचि सुखदुःख ॥५॥ प्रारब्धाचेनि वेगें ॥ सुखदुःखें जीं होती भोगें ॥ ते ते साहावीं जाणोनि वेगें ॥ तेचि तितिक्षा॥६॥ आतां समाधान तें ऐसें जाण ॥ सर्व विषई उपरम पूर्ण ॥ परी श्रवणादरू समाधान ॥ सुख जें होय॥७॥ सद्गुरू आणि सद्वचनाच्याठांई ॥ विश्वासू उपजे अनपाई ॥ तेचि श्रद्धा जाण येथें पाहीं ॥ सहावें साधन ॥ ८ ॥ हेचि शमादिषट्क जाण ॥ चौहींमाजि तिसरें साधन ॥ चौथें मुमुक्षता पूर्ण ॥ उपजे जया ॥ ९ ॥ देहेंद्रियाहुनि व्यतिरिक्त ॥ आपण जाणें सामान्य निश्चित ॥ बंध जाणें अज्ञानकृत ॥ तेणें तळमळी ॥४१०॥ अपरोक्ष बोधू तरी नाहीं जाला ॥ परमानंदें नाहीं धाला ॥ परि विषय संगासि कंटाळला ॥ यालागीं नप्रवर्ते ॥ ११ ॥ सामान्याकारें जाणें

१ विषयनिवृत्ती, वैराग्य. २ द्वैत, कलह. ३ शांती. ४ नाश न पावणारी. ५ निराळा. ६ निवाला.

आपणयासीं ॥ परकीयत्वें देखे देहेंद्रियासीं ॥ ह्मणोनी अत्यंत अज्ञान तयासीं ॥ ह्मणोनये ॥ १२ ॥ आतां अ-
त्यंत ज्ञानी ह्मणिजे ॥ परि अपरोक्षानुभव तो नेणिजे ॥ दोनीं नाहीं ह्मणतां सुंजे ॥ बद्धता आपुली ॥ १३ ॥ ह्म-
णोनि तो नव्हे अत्यंत ज्ञानी ॥ ना तो नव्हे अत्यंत अज्ञानी ॥ सामान्य ज्ञान वर्ते त्यालागुनी ॥ ह्मणोनी मध्य-
स्थ तो ॥ १४ ॥ ऐसा साधनचतुष्टय संपन्न ॥ आपुली बद्धता जाणें पूर्ण ॥ तोचि येथें अधिकारी जाण ॥ श्रीरघु-
राया ॥ १५ ॥ अनादि अज्ञानें भ्रमला ॥ परि ह्मणें मज बंध जाला ॥ याचा उपाय पाहिजे केला ॥ सुटिके ला-
गीं ॥ १६ ॥ बंधासि सुटिका आहे ॥ ऐसेंही पूर्ण जाणताहे ॥ सेविल्या सद्गुरुचे पाये ॥ मोक्ष सिद्धची ॥ १७ ॥
आतां ऐसा उपाय करीन ॥ सद्गुरुसीं जाईन शरण ॥ तेणें उपदेशिल्या ज्ञान ॥ मोक्ष सिद्ध होय ॥ १८ ॥ ऐसा नि-
श्चयो जयासीं ॥ सदां उदास विषयासीं ॥ तोचि यया शास्त्रासीं ॥ अधिकारी जाण ॥ १९ ॥ यया शास्त्राच्या ठाईं ॥
तोचियेक अधिकारी पाहीं ॥ इतर ते नव्हती देही ॥ निरूपिलें मागां ॥ ४२० ॥ ऐसा जो अधिकारी ॥ वै-
राग्य विषय व्यापारी ॥ आणि साधुभजनीं पुरी ॥ आवडी जया ॥ २१ ॥ साधुभजनीं आवडी ॥ नावडे
विषयाची गोडी ॥ ययासीं अनुग्रहो निर्वडी ॥ पाहिजे ईश्वराचा ॥ २२ ॥ ईश्वरानुग्रहेविण ॥ हे अर्थद्वय न-
घडतीजाण ॥ आतां ईश्वरानुग्रह कैसेन ॥ होइल तें सांगों ॥ २३ ॥ जें कीं कर्म नित्यनैमितिक ॥ जें कीं वर्णाश्रमनिया
मक ॥ तें करुनियां सम्यक ॥ ईश्वरीं अर्पावें ॥ २४ ॥ संध्यास्नानादि प्रतिदिनीं ॥ अग्निहोत्रादि यजनीं ॥ तें नित्य

१ समजे. २ चांमलें. ३ याग.

कर्म केलिया वांचुनि ॥ प्रत्यवाय करी ॥ २५ ॥ तें जाणावें नित्यकर्म ॥ नैमित्तिकाचें सांगेन वर्म ॥ राहुप्रयागादि पितृधर्म ॥ पर्वादिजाण ॥ २६ ॥ नित्यकर्माहुनी उंचावे ॥ तें तें नैमित्तिक जाणावें ॥ तें भक्ती करूनि अनुष्ठावें ॥ अत्यादरें ॥ २७ ॥ तें निष्कामबुद्धी ईश्वरार्पण ॥ विनियोगपूर्वक जाण ॥ करणें तें ईश्वर भजन ॥ अनन्यपणें ॥२८ ॥ तेणें होय अंतःकरण शुद्धी ॥ क्षयातें पावे पापसमृद्धी ॥ ईश्वरीं प्रेमा निरवधी ॥ भक्ती उपजे ॥ २९ ॥ ईश्वरीं जे अनन्यप्रीति ॥ तेचि जाणा विमल भक्ती ॥ तेणें आभारे विश्वमूर्ति ॥ सर्वेश्वरू तो ॥ ४३० ॥ ईश्वरू आभारलेपणें ॥ भक्तासीं अनुग्रह करणें ॥ तेणें वैराग्य तीव्रपणें ॥ उपजे देहीं ॥ ३१ ॥ ईश्वरानुग्रहें साधु संगती ॥ करणें हें सर्वदां उपजे चित्तीं ॥ साधु सेवेची परम आर्ती ॥ नित्य तृप्ती साधुसंगें ॥ ३२ ॥ जो परम भाग्यें आथिला असेल ॥ त्यासींच अनुग्रहो ईश्वराचा होईल ॥ अनुग्रहाची खुण सकळ ॥ आइके सांगों ॥ ३३ ॥ ईश्वरानुग्रहें विषयविरक्ती॥ईश्वरानुग्रहें शम दम प्राप्ती ॥ ईश्वरानुग्रहें विमळ भक्ती॥साधुसंगती ईश्वरानुग्रहें॥३४॥ ईश्वरानुग्रहें साधु भेटावा ॥ ऐसी आवडी उपजे जीवा ॥ ईश्वरानुग्रहें दयेचा वोलावा ॥ हा जाणावा ईश्वरानुग्रह ॥ ३५ ॥ अगा ईश्वरानुग्रहेंविण ॥ नुपजे करावें साधु सेवन ॥ त्याचेनि मुखें शास्त्रश्रवण ॥ नुपजे पूर्ण वसिष्ट बोलें ॥ ३६॥ तया श्लोकाची वित्पत्ती ॥ येकाग्र आइकावी संतीं ॥ श्रीवसिष्ठ महामती ॥ अतिप्रीति अनुवादे ॥ ३७॥ वसिष्ठउवाच ॥ श्लोक ॥ यावन्नानुग्रहःसाक्षाज्जायतेपरमेश्वरात ॥ तावन्नसद्गुरुःकश्चितसत्छास्त्रंवापिनो-

१ दोष. २ व्यवस्था. ३ ऐक्यभावानें. ४ निःस्सीम. ५ शुद्ध. ६ इच्छा. ७ संपन्न. ८ वैराग्य.

लभेत ॥२॥ टीका॥ जोंपर्यंत गा रघुनाथा ॥ ईश्वरानुग्रह नव्हे तत्वतां ॥ तों गुरुप्राप्तीची आवडी तत्वतां॥कदां कल्पांतीं उपजेना ॥३८॥ येक ह्मणती अनुग्रहो तोचि ॥ जे सर्वदां संपन्नता संपत्तिची ॥ परलोकीं स्वर्गभोगाची ॥ प्राप्ति साची जेणें होय ॥ ३९ ॥ हा तंव अनुग्रहो सामान्य ॥ ह्मणोनि साक्षात्पद घेतलें जाण ॥ जेणें उभय सुखाचें वैरस्यपण ॥ ईश्वरानुग्रहें ॥४४०॥ साक्षात ईश्वरानुग्रहेंविण ॥ नघडे सद्गुरूचें दर्शन ॥ भेटल्याही सद्गुरू जाण ॥ भावार्थ पूर्ण तेथें नुपजे ॥४१॥ उपजल्याही स्वभावो ॥ प्रसन्न जाला सद्गुरुरावो ॥ परी प्रश्नाचा प्रस्तावो ॥ करणें हा भाव उपजेना ॥ ४२ ॥ नकरिती सद्गुरूसीं प्रश्न ॥ नकरितां सच्छास्त्र कथन ॥ शिष्यासीं नघडे श्रवण ॥ चित्तीं वणवण अपूर्णतेचि ॥ ४३ ॥ मुख्य शास्त्र तें महावाक्य ॥ जें सद्गुरुमुखीचें बीजभूतक ॥ श्रवणमात्रेंचि अज्ञानपूर्वक ॥ विश्वावलोक मावळे ॥ ४४ ॥ जेणें समूळ तुटे संसार ॥ तेंचि सच्छास्त्र अक्षर ॥ सकळ शास्त्रांचें सार ॥ गुह्यतर सकळां वंद्य ॥ ४५ ॥ महावाक्य तें सूत्रभूत जाण ॥ इतर वेदांत तें वृत्तिस्थान ॥ वाक्य श्रवणेंही असंभावन ॥ जाल्या श्रवण वेदांताचें ॥ ४६ ॥ महावाक्येंचि साक्षात्कारू जाला ॥ तरीं वेदांत श्रवण कासयाला ॥ तो नव्हतां असंभावना जयाला ॥ वेदांताला आयकावें ॥ ४७ ॥ ह्मणोनि महावाक्य तें सूत्र होय ॥ सर्व वेदांत ते वृत्तिरूपें अंग पाहे ॥ ह्मणोनि सच्छास्त्र तें आन नव्हे ॥ बोलिली पाहे ह्मणोनी॥४८॥ यालागीं त्याचें गुरुमुखें श्रवण ॥ ईश्वरानुग्रहें वांचून ॥ कल्पांतीं नघडे जाण ॥ करितांही प्रयत्न सहस्त्रावधी ॥

१ विरसपणा. २ अध्यात्मशास्त्र. ३ विपरीतभावना. ४ भिन्न.

॥४९॥ यालागीं परब्रह्म तो सद्गुरु ॥ ज्याचे शब्दमात्रें तुटे संसारु ॥ होय प्रपंच मृगजळपुरु ॥ साक्षात्कारू स्वरूपेसीं ॥ ४५० ॥ अथवा ईश्वराचे अनुग्रहेंविण ॥ नघडे सद्गुरूचें दर्शन ॥ जेथें नघडे सद्गुरु दर्शन ॥ तेथें शास्त्र श्रवण तें कैचें ॥ ५१ ॥ शास्त्राचार्य हे ज्ञानाप्रती ॥ अंतरंगसाधन गा रघुपती ॥ ईश्वरानुग्रहेंविण नव्हे प्राप्ती ॥ जाण सर्वार्थी दोहींचिही ॥ ५२ ॥ आतां संसारार्णवलंघनीं ॥ नाहीं सद्गुरु वांचुनी ॥ शब्द मात्र सांगतां श्रवणीं ॥ संसार स्वप्नीं दिसेना ॥ ५३ ॥ श्लोक ॥ महानुभवसंपर्कात्संसारार्णवलंघने ॥ युक्तिसंप्राप्यतेरामद्दढानौरिवनाविकात् ॥३॥ टीका ॥ संसाराब्धि महा थोर ॥ तेथें अज्ञानजल अपार ॥ कामक्रोधाच्या लहरी फार ॥ तेणें परपार न पाविजे ॥ ५४ ॥ लहरींचें महाथोर उत्थान ॥ तेणें ज्ञानतारूं बुडविती संपूर्ण ॥ कामक्रोध ते वैरी जाण ॥ निपटोनि ज्ञान निर्दळती ॥५५॥ कामक्रोधाचिया वळसा ॥ ज्ञानतारू बुडतां सहसा ॥ तें नाहींच करती गा वीरेशा ॥ अपभ्रंशा मूळ हेंची ॥ ५६ ॥ यदर्थी श्रीभगवंत आपण ॥ पार्थासिं बोले वचन ॥ सर्व शास्त्रासीं प्रमाण ॥ प्रकाशमान भगवद्गीता ॥ ५७ ॥ संमतिगीता ॥ श्लोक ॥ कामएषक्रोधएषरजोगुणसमुद्भवः ॥ महाशनोमहापाप्माविद्ध्येनमिहवैरिणं॥७॥ टीका ॥ ययालागीं वैरि हे ज्ञाना ॥ कामक्रोध सकळ जाणा ॥ तयांचा लहरी संपूर्णा ॥ निबिडघन अज्ञानजळीं ॥ ५८ ॥ रजोगुणाचा महावात ॥ तेणें कामक्रोध लहरी उसळत ॥ ज्ञानतारुं अकस्मात ॥ सामग्रीसहित बुडोनि जाय ॥ ५९ ॥ तेथें गुणत्रय वृत्तींचें भरितें

१ संसाररूपी समुद्राचें उलंघन. २ पैलथडी. ३ उचंबळणें.

॥ भरती वासना खाडीयातें ॥ तेणें जळचि संभवतें ॥ मार्गु तेथें दिसेना ॥ ४६० ॥ नाना भोगेच्छा तें-
चि क्षारपण ॥ तेणें सेवितां नयेजाण ॥ सेविलें तरी निर्धारें मरण ॥ अकारणें प्राप्तहोय ॥ ६१ ॥ तेथें बुद्धी-
नेत्र उघडुनी पाहतां ॥ तेणें नेत्रीं भरे क्षारता ॥ मगनिर्बुजों लागे तत्वतां ॥ मार्गु आतां कोण देखे॥६२॥तेथें प्र-
मंदांचे वळसे ॥ विपरीतज्ञानें उठती कैसे ॥ आपणा विसरोनि अनारिसें ॥ देखे पिसें जयापरी ॥ ६३ ॥ स्वर्ग-
नर्क हे मर्यादा ॥ त्याह्लनि वरतें नचढे कदां ॥ तेथें कामक्रोधाचिया बाधा ॥ उसंत कदा नपविजे ॥ ६४ ॥ त्या
जळामाजी नाना जळचर ॥ मगर मीन मदमत्सर ॥ तयाचा अतिमार थोर ॥ सगळा नर गिळिती ॥ ६५ ॥ मद
मीनाच्या तोंडी पडले ॥ ते तेणेंचि चघळूनि टाकिले ॥ मत्सर मगरमिठीया सांपडले ॥ ते गेले नयेतिची॥६६॥
दंभ नक्र महा थोरथोर ॥ भयानक अति प्रचुंर ॥ ते ज्ञानतारुं चकचूर ॥ अतिसत्वर करिताती ॥६७॥ ऐसें या
महासमुद्रांत ॥ कोणपां तरेल अकस्मात ॥ स्वभुजीं तरावया उद्यंत ॥ येक आर्त निघाले॥६८॥ ते नेणपणाच्या
वळसां ॥ बुडोनि गेले गा सहसा ॥ येक कर्म मार्गाचा भरवसा ॥ पडले आयासा जन्ममृत्यूचा ॥ ६९ ॥ विधि-
निषेधाच्या कुमार्गीं ॥ पडती नरकीं चढती स्वर्गीं ॥ ते बुडाले आशेलागीं ॥ कर्ममार्गीं चालतां ॥४७० ॥ येकीं
नाना विद्यागुरु सेविले ॥ ते तयांचे कासे लागले ॥ ते मद मीनें गिळिले॥ नाहीं निघाले दोघेजण ॥७१॥ येकीं
देहवयसेंचि पेटी ॥ बांधली अभिमानें प्रवृत्ति पोटीं ॥ ते कामलहरींच्या कपाटीं॥थारा सेवटीं पातले॥७२॥येक

१ भ्रमों. २ स्त्रियांचे. ३ निराळें, भिन्न. ४ तीव्र. ५ तयार.

शब्दज्ञानाचिया होडगां ॥ बैसले भरवसा धरुनी पैंगा ॥ ते भरले अनेक मार्गी ॥ बुडाले वेगा शुद्धी नाहीं ॥७३॥ येक रूपाचा धरूनि भरवसा ॥ भवसमुद्रीं तरावयाची आशा ॥ निघाले ते गर्ववळसां ॥ पडले सहसा नानिघर्ती ॥ ७४ ॥ ऐसे नाना उपाय करुनी ॥ नानासाधनें साधुनी ॥ प्रवर्तले भवार्णवलंघनीं ॥ पारि गेले बुडोनि रघुवर्या ॥७५॥ यालागीं गा रघुनाथा ॥ भवार्णवलंघनासीं ताता ॥ येकचि उपावो तत्वतां ॥ सांगेन आतां परियेसीं ॥७६॥ तरी संपर्कमहानुभवाचेनी ॥ अपरोक्षज्ञान पावोनी ॥ तेणेचि तरिजे भवंसेनी ॥ अतिनिर्वाणीं भवार्णवु ॥७७॥ अगा महानुभावशब्दें सद्गुरु ॥ याचा परिस पां विचारु ॥ थोर सामर्थ्याचा सागरु ॥ अतिगंभीरु पूर्णत्वें ॥ ७८ ॥ सर्वही विद्या कौशल्ये निष्ट ॥ अज्ञान छेदनीं अतिवरिष्ठ ॥ ह्मणोनियां सकळां श्रेष्ठ ॥ सामर्थ्य उत्कट गुरुत्वें ॥ ७९ ॥ येवढें सामर्थ्य जयापासीं ॥ तें महानुभवत्व बोलिजे गुरूसी॥त्यापासाव युक्ति पाविजे ऐसी ॥ जे अज्ञानासीं निर्दळी॥४८०॥सद्गुरुचेनि चरण स्पर्शें ॥ ज्ञान पाविजे आपैसें॥तेंचि भवांब्धि तरावया ऐसें ॥ सावकाशें दृढतारूं ॥ ८१ ॥ दृढशब्दें बोलिजे अविनाशु ॥ ज्यासीं नाहीं असंभावनादीकीं नाशु ॥ तें ज्ञान दृढ तारूं सावकाशू ॥ सद्गुरु परेशू भेटवी ॥ ८२ ॥ जैसी महारण्यामाजी नदी ॥ पुरें दाटली जैसा जलँधी ॥ ते तरावयाचिया संधी ॥ नाना आपदीं तरवेना ॥ ८३ ॥ तेथें नावाडी अकस्मात ॥ दृढनाव घेऊनी जाला प्राप्त ॥ तें लाहोनियां त्वरित ॥ संकटें तेथें तरिजे कीं ॥८४॥ तैसें सद्गुरुपासुनी ज्ञानतारूं ॥ लाधलें तें पा-

१ संसाररूपी समुद्राचें उलंघन. २ स्पर्श; संबंध. ३ प्रचंड. ४ महाप्रताप. ५ संसारसमुद्र. ६ मायानियंता. ७ समुद्र.

वलें पैलपारु ॥ इतरां भवार्णवीं अपाय थोरु ॥ तो सविस्तरू सांगीतला ॥ ८५ ॥ ययालागींगा रघुपतीं ॥ जाणतीं नेणतीं सद्गुरुमूर्ती ॥ उपासावी अनन्यगती ॥ परमप्राप्ती पावावया ॥ ८६ ॥ अथवा गुरु करितांही साधु संगती ॥ तत्संगें वासनादि मळ जाती ॥ सद्गुरु सेवावा हे उपजे आर्ती ॥ यालागीं सेविजेती महानुभाव ॥ ८७ ॥ ह्मणोनी महानुभाव संपर्कें ॥ ज्ञान पाविजे अतिनिंकें ॥ भवार्णवलंघनी कौतुकें ॥ तारूंचि कीं ऐसें असे ॥८८॥ यालागीं जेथें नसती महानुभाव ॥ तो देश अथवा नगर गांव॥सांडावागा सर्वथैव॥श्लोकभावो परियेसी॥८९॥ श्लोक ॥ यस्मिन्देशेहितत्वज्ञोनास्तिसज्जनपादपः ॥ सफलःशीतलछायोनतत्रदिवसंवसेत ॥ ४ ॥ टीका ॥ जे देशीं नाहीं सज्जन ॥ तो देश नव्हे महारण्य ॥ जे ग्रामीं नाहीं सज्जन ॥ तें स्मशान रघुनाथा ॥ ४९० ॥ जो महारण्यांत पडला ॥ अती संतापें तापला॥क्षुधा तृष्णा असे पीडला ॥ अतीदग्धला चालतां ॥९१॥ तया कल्पवृक्ष भेटलिया सफळ ॥ कल्पिलें पुरवीं आणि शीतळ ॥ तो तापादि सकळ मेळ॥शमवी सकळ सेविलिया ॥९२॥तैसा जो संसार तापें तापे॥तया निवविजे सज्जनपादपें॥जो बाणला असेल अनुतापें॥अतिप्रतापें संसारजयीं॥९३॥ वृक्ष अनेकही भेटती ॥ परि ते पुरऊं नशकती आर्ती ॥ खैर आरी बोरी इतर जाती ॥ वृक्ष ह्मणती आपणयां॥९४॥अर्कवृक्षादि ताड बाभुळ ॥ सावरी सादडे इत्यादि सकळ ॥ हे जाती करूनि वृक्षमूळ ॥ परी तळमळ शमवीतना ॥९५॥ तैसे भेटती हि अनेक सज्जन ॥ जपी तपी व्रती जाण ॥ याज्ञीक कर्मी शब्दज्ञान ॥ अतिनिर्वाण जयापाशीं॥९६॥

---

१ इच्छा. २ स्पर्श. ३ चागलें. ४ सज्जनरूपीवृक्ष. ५ हेतु. ६ संपूर्ण.

येक बह्लठक कुटिळक वनचर ॥ येक पर्वतवासी कंथाधर ॥ येक भगवे येक दिगंबर ॥ नाना वेषधार जे असती ॥९७॥ येक माळा मुद्रा धरिती ॥ येक ते जटाजूट वाढविती ॥ येक जटी द्विजटी त्रिजटी असती ॥ बहु देखिजेती उदासपणें ॥९८॥ येक कक्षोपास्थीं जटा वाढविती ॥ येक दीर्घजटी बोलिजेती ॥ येक ते नखें वाढविती ॥ मौन्यव्रती सदाचार ॥ ९९ ॥ येक ते परिव्राजक संन्यासी ॥ येक ते बोलिजेती कर्मसंन्यासी ॥ एक दंडी त्रिदंडी ऐसी ॥ नानावेषीं शोभती ॥ ५०० ॥ येक ते करपात्र करिती ॥ येक ते गोमुखें जेविती ॥ येक ते यथेष्ट भक्षिती ॥ भिक्षा करिती येकनेमें ॥ १ ॥ येक ते अन्न धुउनि जेविती ॥ येक ते सर्वत्रही येकत्र करिती ॥ येक ते परहस्तें भक्षिती ॥ विटंबु करिती नानाविध ॥ २ ॥ येकासीं पंचग्रही नेम ॥ येकासीं मौनाचा संभ्रम ॥ येक ते निंब हिरडे भक्षून ॥ इंद्रियें दमन करिती ॥३ ॥ येक ते शिश्नाचा सुंगा घेती ॥ येक वृषण नाभिस्थाना नेती ॥ हेचि उपाय इंद्रियें दमनाप्रती ॥ येक करिती स्वमत्तें ॥४॥ इतुकीयातेंही लोक भावना ॥ सज्जन ह्मणती गा सज्ञाना ॥ ते भेटलीया भवभावना ॥ छेदु अज्ञाना काय होय ॥ ५ ॥ यालागीं अन्य वृक्षासरीं ॥ या सज्जनासीं दिधलिया पुरीं ॥ संतापु क्षुधा तृषा निवारी ॥ ये वृक्षीं पुरी शक्ति नाहीं ॥ ६ ॥ ऐसीया सज्जनाचेनि दर्शनें ॥ केंवि जाइजेल अज्ञानें ॥ अज्ञान निराशेविण निववणें ॥ कोणेही पुण्यें घडेचिना ॥ ७ ॥ तत्वज्ञ आणि सज्जन ॥ हें येकार्थ पदद्वय जाण ॥ पुनरुक्तकोण्ही आशंकेन ॥ करील त्या वचन निवारक हें ॥ ८ ॥ सज्जन शब्दें

१ बैरागी. २ नानाप्रकार. ३ विस्मय. ४ महत्व.

ऐसा तर्क करिती ॥ जरीं हे महानुभाव बोलिजेती ॥ ह्मणोनि तत्वज्ञपद महामती ॥ वसिष्ठ सर्वार्थीं बोलिले ॥ ॥ ९॥ अथवा सज्जन शब्दें जाण ॥ सत्कर्मानुष्ठाता शास्त्रज्ञ ॥ आणि तत्व जाणें तो तत्वज्ञ ॥ तोचि संपूर्ण सकळवृक्षु ॥ ५१० ॥ तत्वशब्दें बोलिजे परब्रह्म ॥ तें जाणें तो तत्वज्ञ उत्तम ॥ तत्वज्ञ होत्साता सज्जनोत्तम ॥ निरुपम सर्वार्थीं ॥ ११ ॥ ऐसा वृक्ष जो कीं तत्वज्ञ ॥ त्यासींच बोलिजे सज्जन ॥ तो जे देशीं नाहीं जाण ॥ तेथें दिवस क्षण नवसावें ॥ १२ ॥ तो देशु नव्हे परदेशु ॥ ग्रामु नव्हे तो नरकवासु ॥ गृह नव्हे तो कारागृहवासु ॥ जेथें शुद्धांशु सज्जन नाहीं ॥ १३ ॥ ते देशीं येक क्षण ॥ सर्वथा राहोंनये गा जाण ॥ रघुनाथा तूं सर्वज्ञ ॥ हेचि-खुण जाणावी ॥१४ ॥ असत्संगें नरकगती ॥ ह्मणोनि नकरावी ते संगती ॥ सत्संगें होय मुक्ति प्राप्ती ॥ ह्मणोनि सत्संगती सर्वदां करावी ॥ १५ ॥ जो कीं आपणातें नेणोन ॥ स्त्रैण जन जो स्त्रियेधीन ॥ नरक त्याचे संगती करून ॥ ऐसें श्रीभगवान् स्वयें बोले ॥ १६ ॥ संमती ॥ श्लोक ॥ श्रीभगवानुवाच ॥ महत्सेवाद्वारमाहुर्विमुक्ते-स्तमोद्वारंयोषितांसंगिसंगं॥महांतस्तेसमचित्ताःप्रशांताविमन्यवःसुहृदःसाधवोये॥८॥रहूगणैतत्तपसानयातिनचेज्ययानिर्वपर्णाद्गृहाद्वा ॥ नछंदसानैवजलाग्निसूर्यैर्विनामहत्पादरजोभिषेकं ॥ ९ ॥ नैषामतिस्तावदुरुक्रमांघ्रिंस्पृशत्यनर्थापगमोयदर्थः ॥ महीयसांपादरजोभिषेकंनिष्किंचनानवृणीतयावत् ॥ १० ॥ संसारेस्मिन्क्षणार्धोपि-सत्संगःशेवधिर्नृणां ॥११॥ टीका ॥ इत्यादि वचनें लिहावीं किती ॥ सत्संगें होय मुक्ती प्राप्ती ॥ असत्संगें नरक

१ सद्गुरु. २ उत्तम आचरणकरणारा. ३ बंदीखाना.

होय ऐसें श्रीपती ॥ स्वयें बोले ॥ १७ ॥ सत्सेवात्वें मोक्षाचें द्वार ॥ स्त्रीसंगीयाचा संग नरक घोर ॥ त्यालागीं सत्संगचि निरंतर ॥ दृढतर करावा कीं ॥१८॥ ब्रह्मीं जयाचें सर्वदां चित्त ॥ समब्रह्मत्वें विश्व हें देखत ॥ अधमोत्तम सर्वथा नेणत ॥ सदोदित ब्रह्मपणें ॥ १९ ॥ अतएव तें अतिशयेंसी शांत ॥ विश्वोपाधी नस्फुरे किंचित॥ सर्वत्र देखती ब्रह्मनिश्चित ॥ ह्मणोनि गलित क्रोध ज्यांचा ॥ ५२० ॥ दुजेपणें दुसरें स्फुरावें ॥ तेंहि प्रतिकूळत्वें जरी भासावें ॥ तरींच क्रोध तेथें संभवे ॥ येऱ्हवीं नव्हे ब्रह्मदृष्ट्या ॥२१॥ प्रतिकूळ कोणातें नदेखती ॥ ह्मणोनि सर्वांचे सुहृद होती ॥ अपकार [१]उपेक्षून उपकार करिती ॥ सोडविती [२]भवबंधा ॥२२॥ ययालागीं ते कृपाळू ॥ संसारें गांजिलिया दिनाचे दयाळु ॥ आपपर नेणोनि स्नेहाळु ॥ अति कणवाळु [३]सदयपणें ॥ २३ ॥ ऐसीं साधूंचीं लक्षणें बोलावीं किती ॥ पार नाहींगा साधुकीर्ति ॥ जिये लक्षणें ब्रह्मीं वर्तती ॥ तेचि स्थिती सज्जनाची ॥ ॥ २४ ॥ ते सदाचार निर्मळ ॥ काम क्रोध नाहीं ज्यां [४]आंडळ ॥ राहाटी वाचा जयाची सरळ ॥ तृप्त केवळ परमानंदें ॥ २५ ॥ ऐसेंचि जडभरतें रहुगणाप्रती ॥ ह्मणें साधुविण नव्हे ब्रह्मप्राप्ती ॥ यज्ञ तप अन्नदान संन्यासगती ॥ नव्हे प्राप्ती वेदाध्ययनें ॥ २६ ॥ जळ अग्नि सूर्य उपासना ॥ केलिया नव्हे ब्रह्मप्राप्ती जाणा ॥ नसेवितां येका सज्जना ॥ नकरितां स्नाना [५]तत्पादरजें ॥ २७ ॥ शास्त्राभ्यासें जालेंही जें ज्ञान ॥ परी अपरोक्षितां नव्हेचि जाण ॥ नसेवितां संतपादरजःकण ॥ बुद्धीसि स्पर्शन स्वरूपीं नघडे ॥ २८ ॥ जे-

१ मित्र. २ संसारबंधातून. ३ दयाळुपणानें. ४ प्रतिबंध. ५ पायांचेंतीर्थ.

सें निधीलाभें अतीसुख आहे ॥ तैसें क्षणार्धीं सत्संगें होये ॥ परि विषयसुख नश्वर आहे ॥ सत्संगें पाहे परब्रह्म सुख ॥ २९ ॥ आणिकही गा रघुनाथा ॥ साधुसंगेंविण साधनें ताता ॥ केलियाही होती वृ-था ॥ सत्संग नकरितां जाण तूं ॥ ५३० ॥ ऐसें षड्गुणैश्वर्य संपन्न ॥ स्वयें बोलिला श्रीकृष्ण ॥ उद्धवाप्रती जिवींचि खुण ॥ बाहें उभवुन बोलती ॥ ३१ ॥ संमतीभागवत ॥ श्लोक ॥ श्रीभगवानुवाच ॥ नरोधयतिमां-योगोनसांख्यंधर्मएवच ॥ नस्वाध्यायस्तपस्त्यागोनेष्टापूर्तंनदक्षिणा॥ १२॥व्रतानियज्ञछंदांसितीर्थानिनियमाय-माः ॥ यथावरुंधेत्सत्संगःसर्वसंगापहोहिमां ॥ १३ ॥ टीका ॥ ह्मणे रे उद्धवा परियेसीं ॥ हा अष्टांगयोग अति-प्रयासी ॥ केलिया जाण सर्वस्वेसीं ॥ मज हृदयस्थासीं नेणंतीते ॥ ३२ ॥ तैसेंचि आत्मानात्मविवेक ॥ जे कीं बोलिजे शास्त्रसांख्य ॥ तेंही मज वश्य नकरीं देख ॥ ध्यानासीं सम्यक नाणवेमी ॥ ३३ ॥ तरी सत्संगें पावले कोणकोण ॥ तेही आतां तुज सांगेन ॥ आइकें येकाग्र करूनि मन ॥ ह्मणें श्रीकृष्ण उद्धवासीं ॥३४॥ जेहीं जे-हीं सत्संग केला ॥ तयासींच मी प्राप्त जाला ॥ येरां संसारचि उरला ॥ अन्यें साधनाला प्रवर्तले जे॥३५॥संम-तिभागवत ॥ श्लोक ॥ सत्संगेनाहिदैतेयायातुधानाःखगामृगाः॥ गंधर्वाप्सरसोनागाःसिद्धाश्चारणगुह्यकाः ॥१४॥ विद्याधरामनुष्येषुवैश्याःशूद्रास्त्रियोंत्यजाः ॥ रजस्तमःप्रकृतयस्तस्मिन्नतस्मिन्युगेनघ ॥ १५ ॥ बहवोमत्पदं-प्राप्तास्त्वाष्ट्रकायाधवादयः ॥ वृषपर्वाबलिर्बाणोयमश्चाथाविभीषणः ॥ १६ ॥ सुग्रीवोहनुमानृक्षोगजोगृध्रो-

---

१ ठेवा सांपडल्यानें. २ नजाणती. ३ आत्मानात्म विचार शास्त्र. ४ इतर.

वणिग्पथः ॥ व्याधःकुब्जाव्रजेगोप्योयज्ञपत्न्यास्तथापरे ॥१७॥ तेनाधीतश्रुतिगणानोपासीतमहत्तमाः ॥ अव्र-
ताततप्तपसःसत्संगान्मामुपागताः ॥ १८ ॥ नचयोगेनसांख्येनदानव्रततपोध्वरैः ॥ व्याख्यास्वाध्यायसंन्यासैः
प्राप्नुयाद्यत्नवानपि ॥१९॥ टीका ॥ ह्मणोनी सत्संगें दैत्यासीं मुक्ती ॥ राक्षसा सत्संगें माझी प्राप्ती ॥ मृगपक्षी
यासि सत्संगती ॥ माझी प्राप्ती जाली असे ॥३६ ॥ गंधर्व अप्सर नाग देख ॥ सिद्धचारण आणि गुह्यक ॥ वि-
द्याधर आणि मनुष्य प्रमुख ॥ सत्संगें मत्सुख पावले ॥ ३७ ॥ मनुष्यामाजी हीन जाती ॥ वैश्य शूद्र स्त्रियादि
सुमती ॥ अति चांडाळ अंत्यज जाती ॥ तेही मत्प्राप्ती सत्संगें॥३८॥अगा रजतम प्रधाना ॥ जयाचा प्रकृती अ-
तिहिना ॥ तेही पावले मज जाणा ॥ सेवितां सज्जना भक्तिभावें॥३९॥ ऐसे सांगिजेती किती ॥ माझें स्वरूप पा-
वले साधुसंगती ॥ वृत्रासुर प्रल्हाद प्रभृती ॥ नेणो किती पावले मज ॥ ५४० ॥ वृषपर्वा बळी आणि बाण ॥
यम दैत्य आणि बिभीषण ॥ वानरामाजि सुग्रीव आणि हनुमान ॥ ऋक्षराज जाण पावले मज ॥४१ ॥ जटा-
यू आणि तुळाधार ॥ वाणी देखतां पसारकर ॥ तोही पावला माझें घर ॥ थोर बडिवार सत्संगाचा ॥ ४२ ॥
धर्मव्याध पापमूर्ती ॥ त्यासींही सत्संगें मत्प्राप्ती ॥ कुब्जा तींठाईं वक्र होती ॥ तिसीं सत्संगती मी प्राप्त ॥४३ ॥
अगा वृंदावनीच्या गौळिणी ॥ कोण ज्ञान तयालागुनी ॥ स्त्री जाती आणि वसती वनीं ॥ आचार करणी काय
त्यांची ॥ ४४ ॥ आणिकीं याज्ञिकांचिया स्त्रिया ॥ यज्ञपत्न्या बोलिलिया ॥ मूढजाती अज्ञानाचिया ॥ असती

१ नीच. २ विषयांमध्यें सततराहणारे. ३ मोठेपणा. ४ वांकडी.

घडलिया ब्रह्मेनी ॥४५॥ तेहीं वेदशास्त्र नाहीं पढिन्नलें ॥ तेहीं गुरूला नाहीं सेविलें ॥ व्रत तपादि नाहीं केलें॥ सत्संगेंचि लाधलें स्वरूप माझें ॥ ४६ ॥ अगा जेकीं माझें स्वरूप ॥ न पाविजे साधन करितां अमुप ॥ योग सांख्य दान व्रत तप ॥ याग अमुप जऱ्हीं केले ॥४७॥ सकळ शास्त्र अभ्यासिलें ॥ कां नित्य वेदाध्ययन केलें ॥ सन्यास विधान जालें ॥ प्रयत्न केले नानाविध ॥ ४८ ॥ तरींसत्संगेवीण जाण ॥ मी प्राप्त नव्हे संपूर्ण ॥ सत्संगें सर्व साधन ॥ मत्प्राप्ति कारण साधुसंग ॥ ४९ ॥ साधुसंगें सर्व प्राप्ती ॥ साधु सेवणें साधन संपत्ती ॥ करणें नलगे गा सर्वार्थीं ॥ सत्संगें तृप्ती स्वानंदाची ॥५५०॥संमतीभागवत ॥ श्लोक ॥ यथोपश्रयमानस्यभगवंतोविभावसु ॥ शीतंभयंतमश्चेतिसाधुसंसेवतस्तथा ॥२० ॥ निमज्योन्मज्यतांघोरेभवाब्धौपरमायणं ॥ संतोब्रह्मविदः शांतामौद्दढेवाप्सुमज्जतां ॥ २१ ॥ अन्नंहिप्राणिनांप्राणाआर्तानांशरणंत्वहं ॥ धर्मोवित्तंनृणांप्रेत्यसंतोर्वाबिभ्यतोरणं ॥ २२ ॥ संतोदिशंतिचक्षूंषिबहिरर्कःसमुत्थितः ॥ देवताबांधवाःसंतःसंतआत्माहमेवच ॥ २३ ॥ अस्यार्थः॥ टीका ॥ एका अग्निचें केलिया सेवन ॥ शीतंभय जाय संपूर्ण॥अंधकारू जाय नासोन ॥ समाधान जैसें होय॥५१॥ तैसें येके सत्संगें करुनी ॥ कर्मादिजाड्यं जाय नासोनी ॥ अगा मी जे गा संसारश्रेणी ॥ त्याचें भय मनी वाहत होतों ॥ ५२ ॥ अथवा यमपुरीच्या यातना ॥ भय जें उपजवी मना ॥ कांपो लागे जन्ममरणा ॥ अर्धक्षणांमाजि जाय ॥ ५३ ॥ कर्मजाड्य आणि भयाचें मूळ ॥ तें येक अज्ञानचि केवळ ॥ तें सत्संगें जाय तत्काळ ॥

१ पावले. २ पुष्कळ. ३ यज्ञक्रिया. ४ थंडी. ५ कर्माभिमान. ६ संसारपंक्ती.

सुखकल्होळ साधुसंगें ॥ ५४ ॥ ह्मणोनि संत ते अग्निरूप जाण ॥ ते सत्संगें होय अज्ञान छेदन ॥ पळोनि जाय संसारदैन्य ॥ सुखसंपन्न ब्रह्मानंदें ॥ ५५ ॥ अथवा संसार समुद्रामाझारी ॥ परमदुःखाच्या महा घोरीं ॥ बुडती निंदिती योनिद्वारीं ॥ कुंश्विताभारी उर्व्वीनीचा ॥ ५६ ॥ श्वान शूकरादिका योनी ॥ तेथें बुडे निंकें मागुतेनी ॥ उसंत नाहीं अर्धक्षणीं ॥ भोगिती योनी नानाविधा ॥ ५७ ॥ तें चुकवावया कारणें ॥ कीजेति नानासाधनें ॥ तेणें फारचि योनी भोगणें ॥ वैसे घरणें फळभोगाचें ॥ ५८ ॥ तिये भवार्णवाच्या महापुरीं ॥ ब्रह्मनिष्ठ साधु भेटे जरीं ॥ तरीं क्षणार्धें बुडतां निवारी ॥ पैलपारीं पाववी ॥ ५९ ॥ जैसी दृढनाव पावे समुद्रीं बुडतां ॥ तरींच तो तरे अपाई बुडतां ॥ तेथें अन्य साधनें नानाकरितां ॥ बुडेचि सर्वथा नावेविण ॥ ५६० ॥ तैसें सत्समागमेंविण ॥ योनीमाजी बुडणें जाण ॥ नचुकेचि भवार्णव गहन ॥ दुःखदारुण नचुकेची ॥ ६१ ॥ जैसें प्राणियासीं अन्नचि प्राण ॥ पीडितांसी मीचि येकु शरण ॥ तैसें संसारीयासिं संसार रक्षण ॥ साधु जाण सर्वस्वेसीं ॥ ६२ ॥ कां परलोकीं प्राणियासीं ॥ धर्मचि वित्त परियेसी ॥ तैसे संत हे बुडतयासीं ॥ भयभीतासीं रक्षक ॥ ॥ ६३ ॥ अगा साधुचें निजमहिमान ॥ जरीं नपवे सूर्यनारायण ॥ तो डोळ्यां बाह्य प्रकासी जाण ॥ अंतरज्ञान नप्रकटी ॥ ६४ ॥ तैसा नव्हे तो सद्गुरुनाथु ॥ सबाह्य अंतर प्रकाशु करितु ॥ कृपाकटाक्षें क्षणाआंतु ॥ करी भस्मांतु संसारुहा ॥ ६५ ॥ यालागीं सर्व देवता संतजन ॥ बंधु मित्र सुहृद सज्जन ॥ संत प्रियत्वें आत्मा पूर्ण ॥

१ संसार भय. २ दुर्गंधी. ३ चौऱ्यांसी लक्ष योनी. ४ पुनः ५ अपमृत्यु. ६ इतर.

संत चिद्घनब्रह्मरूप ॥ ६६ ॥ संत माता संत पिता ॥ संत सर्वस्वें कुळदेवता ॥ संत भवार्णवीं तारुं तत्वता ॥ होय कृतार्थता संतसंगें ॥ ६७ ॥ ह्मणोनि सज्जनवृक्ष सेविलिया ॥ त्याचे चरण तेचि शीतळ छाया ॥ तेणें पाप ताप हरोनियां ॥ जिज्ञासा तयावरी वेगीं ॥६८॥ कीं तयासीं जाल्या शरण ॥ अविद्येचें भस्म पूर्ण ॥ फळ तेंचि पावे ब्रह्मपूर्ण ॥ आर्ति हरण सर्वार्थीं ॥ ६९ ॥ ऐसा सज्जनपादप निर्मळ ॥ सफळ शीतळ प्रांजळ ॥ संसारीक जे तळमळ ॥ हरी सकळ कृपामात्रें ॥ ५७० ॥ ऐसे संत जेथें नसती ॥ तेथें क्षणही न वसावें सीतापती ॥ संत महिमा उद्धवाप्रती ॥ बोलिले श्रीपती तें सांगीतलें ॥ ७१ ॥ यालागीं सर्वदां सेव्य संत ॥ जे संसारार्णव लंघनीं समर्थ ॥ ते जेथें असती सर्वदां तेथें ॥ वसावें नित्य रघुनाथा ॥ ७२ ॥ श्लोक ॥ सदासंतोभिगंतव्यायद्यप्युपादिशंतिन ॥ याहिस्वैरकथास्तेषामुपदेशाभवंतिनः ॥ ५ ॥ टीका ॥ यालागीं सर्वदां भक्तिभावें ॥ संतांप्रती शरण जावें ॥ गेलिया संत स्वभावें ॥ उपदेश भावें करितील ॥ ७३ ॥ ते मेघाचेपरी उदार ॥ उपदेश करिती वेदांतसार ॥ जेणें अज्ञानपूर्वक संसार ॥ भस्मसार होउनी ठाके ॥७४ ॥ यद्यपि जरी उपदेश न करिती ॥ तऱ्ही प्राप्ती नचुकेगा रघुपती ॥ ते ज्या स्वैरें कथा करिती ॥ तेचि होती उपदेश ॥७५॥ संताचें जें सहज बोलणें ॥ तें महावाक्यासीं करी ठेंगणें ॥ उठवी संसाराचें धरणें ॥ कर्म करणें तोचि विधी ॥ ७६ ॥ यालागीं संतांजवळी गेलिया ॥ समूळ तुटोनि जाय माया ॥ नसाधितां पावे आपणयां ॥ जाय विलया भवभय ॥७७॥ संत सेविलि-

१ जाणण्याची इच्छा. २ अज्ञानमाया. ३ इच्छा. ४ वृक्ष. ५ लीलेनें.

या भावें ॥ काय येक मा लभ्य नव्हे ॥ तें चित्त देउनियां परिसावें ॥ सांगेन स्वभावें श्लोकार्थें ॥७८॥ श्लोक ॥ शून्यंसंपूर्णतामेतिमृत्युरप्यमृतायते ॥ आपत्संपदिवाभातिविद्वज्जनसमागमात् ॥ ६ ॥ टीका ॥ तोचि श्लोकार्थ ऐसा ॥ येकाग्र आइकें गा वीरेशा ॥ ज्ञानेंविण दशदिशा ॥ सदा वोसा अनात्मपणें ॥ ७९ ॥ रिती बुद्धी आत्मेनविण ॥ अनात्मपणें रितें अंतःकरण ॥ इंद्रियें वोसें आत्म्यावांचुन ॥ देह तो जाण अवघा रिता ॥५८०॥ सकळांसीं जालें शून्यपण ॥ देश ग्राम शून्य जाण ॥ शून्य चंद्र सूर्यनारायण ॥ विश्व शून्य अनात्मत्वें ॥८१॥ शून्य तीर्थ क्षेत्र जाण ॥ तेथें देवता उदक पाषाण ॥ शून्य अग्नी आणि ब्राह्मण ॥ कर्माचरण शून्यत्वें ॥ ८२ ॥ शून्य दशदिशा अंतराळ ॥ शून्य अवघे कुळाचळ ॥ शून्य सप्तही पाताळ ॥ शून्य भूगोळ अनात्मपणें ॥ ८३ ॥ जेणें देखे तेंही शून्य ॥ जेणें चाले तेंही शून्य ॥ जेणें बोले तेंही शून्य ॥ शून्य जाण प्रकाशकू ॥ ८४ ॥ एवं अंतर बाह्य सकळ शून्यता ॥ देश विदेश अवघी शून्यता ॥ आत्मेनविण अवघा रिता ॥ पोकळ सर्वथा अनात्मपणें ॥ ८५ ॥ तेंचि अवघें सत्समागमेंकरून ॥ शून्याचि पावे पूर्णपण ॥ ज्ञान पावे सत्संगें करून ॥ अनात्मपण नाहींच होय ॥८६॥ तें अवघें सत्समागमास्तव ॥ ज्ञान पाविजेगा अपूर्व ॥ तेणें शून्य तेंचि पूर्ण सर्व ॥ खल्विदंब्रह्म होउनी ठाके॥८७॥जो हारपला होता आत्मा ॥ सर्व भासत होता अनात्मा ॥ त्याची लोपली सर्व गरिमा ॥ सर्व आत्मा होउनी ठेला॥८८॥जैसे रज्जुचा ठाईं नाना भ्रम ॥ रज्जु लोपोनी अनेक संभ्रम ॥ धारा माळा भुजंगोत्तम ॥ अ-

१ आत्मज्ञानावांचून. २ खरोखर हें ब्रह्म. ३ योग्यता. ४ मोह.

ज्ञानकर्म इयापरी॥ ८९ ॥तेंचि सम्यक्ज्ञानें करुनी ॥ जरी पाहिजे न्याहाळुनी॥ तरी तेवढेंही नानात्व जाउनी ॥ रज्जु निर्वाणीं उरे येक ॥५९० ॥ तैसा सद्गुरुकृपें करुन ॥ समूळ तुटलिया अज्ञान ॥ हारपोनी जाय विश्वस्वप्न ॥ उरे परिपूर्ण ब्रह्म येक ॥९१॥ तेव्हां शून्य तेंचि जालें अशून्य ॥ नाहीं तें जालें परिपूर्ण॥सद्गुरु कृपेचें फळलेंपण॥ ब्रह्म निर्वाण उरे येक ॥ ९२ ॥ तेणें दहाही दिशा परिपूर्ण ॥ दिशाविदिशा ब्रह्मपूर्ण ॥ बुद्धि इंद्रियें अंतःकरण ॥ तें-ही परिपूर्ण ब्रह्मत्वें ॥९३॥ देह तोचि आत्मा पूर्ण ॥ देश ग्राम चंद्र तपन ॥ विश्वचि आत्मा परिपूर्ण ॥ तीर्थ क्षेत्र पूर्ण पूर्णत्वें ॥९४ ॥ उदक पाषाण पंचमहाभूतें॥ सचराँचर कर्माकर्म तें ॥ अंतराळ कुळाचळ रितें ॥ ब्रह्मापरतें असेचिना ॥९५ ॥ तें देखणें देखावें देखतां ॥ चालतां बोलतां आइकतां ॥ बुद्धि बोध बोधकता ॥ सर्वी पूर्णता पूर्णपणें ॥ ॥९६॥ बाह्य आणि अभ्यंतर ॥ आरुतें पारुतें पारावार ॥ सर्वही सर्व प्रकार ॥ ब्रह्म निरंतर ब्रह्मत्वें ॥९७॥ आतां येक येक किती बोलावें ॥ सर्व परिपूर्णचि स्वभावें ॥ शून्य तें परिपूर्णता पावे॥संतांचे सेवे करूनियां ॥९८॥ ऐ-सेनिहीं जो जाला मृत्य ॥ तो मृत्यूचि मोक्षरूपें अमृत ॥ कोण्ही प्राकृत मृत्य ह्मणत ॥ तोही अमृत धन्यपणें॥ ॥ ९९ ॥ सत्संगें जाला जो मृत्य ॥ तोचि ह्मणती अमृत ॥ हाही होय ऐसा अर्थ ॥ पारि सिद्धांतपूर्वक॥६०० ॥ आपत्ती तेचि संपत्ती ॥ सत्संगें विपत्ती ते नव्हे आपत्ती ॥ ऐसेंही येक ह्मणती॥ दुःख चित्तीं नवाटे ह्मणोनी॥१॥ तरी मुख्य अर्थाचें लक्षण ॥ येकाग्र आइका सांगेन ॥ ज्ञानि तो तंव निष्किंचिन ॥ परिग्रहशून्य सर्वार्थी ॥२॥

१ आत्मज्ञान. २ शेवटीं. ३ सूर्य. ४ स्थावरजंगम. ५ निःसंग्रह.

ते बाह्य दृष्टी दिसे आपत्ती ॥ परि स्वानंदें सुख संपत्ती ॥ ऐश्वर्यें पूर्ण त्रिजगतीं ॥ स्वराज्य प्राप्ती स्वराज्यत्वें ॥ ३ ॥ समागमें ब्रह्मविदाचेनी ॥ सर्व ब्रह्मचि तया पूर्णपणीं ॥ यालागीं दुर्लभ त्रिभुवनीं ॥ जनतारिणी ब्रह्मवेत्ता ॥ ४ ॥ जरी ब्रह्मवेत्ता नसता अवनीवरी ॥ तरीं सकळही जन बुडते संसारीं ॥ या महा मोहाच्या पुरीं ॥ कोणपां तारी साधुविणें ॥ ५ ॥ अथवा असतांही ब्रह्मज्ञानी ॥ ते राहाते निरंतर समाधानी ॥ निर्विकल्प समाधी अवलंबुनी ॥ जरी निर्वाणीं मौन असते ॥६॥ तरी उपदेश व्यवहार कैसा होता ॥ कोण या मुमुक्षातें तारिता ॥ तरी अज्ञानपुरें लोक दाटता ॥ नतुटे दुःख दाटतां भवार्णवीं ॥ ७ ॥ श्लोक ॥ ज्ञानिनामपिचित्तंचेत्केवलात्मसुखोदितं ॥ अज्ञानसंसारदुःखार्ताःकंयांतिशरणंतदा ॥ टीका ॥७॥ यालागीं ऋषिनायक वसिष्ठ ॥ बोलिला आनंद श्लोक ॥ तयाचाही अर्थ विशेष ॥ आईका सकळही श्रोतेहो ॥ ८ ॥ अथवा ज्ञानीहि असती मिळत ॥ ते दर्शना स्पर्शनासीं पावत ॥ तेणेंचि लोक तरत ॥ जे भाग्यवंत सभाग्यपणें ॥ ९ ॥ ज्ञानी दुर्लभ संसारीं ॥ सुलभाही आर्ति न उपजे पुरी ॥ आर्ति जालिया सहस्त्रांतरीं ॥ येखादा वरी साधूसीं॥१०॥ऐसें या साधूचें चित्त ॥ केवळ आत्मसुखीं उद्यत ॥ जालिया संसारें पीडित ॥ सत्वर शरणांगत कोणा जाते ॥ ११ ॥ ज्ञानियाचें जरी चित्त ॥ सर्वदां होतें वस्तुगत ॥ बाह्य पदार्थ नेणत ॥ सुखसंवलित आत्मत्वें ॥ १२ ॥ ते निर्विकल्प समाधी ॥ साधूसीं असती निरवधी ॥ केवळ आत्मसुखैकाब्धि ॥ मन बुद्धी विसरोनि जाय ॥१३॥ तेथें चालणें ना

१ पृथ्वीवरी. २ इच्छा. ३ तयार. ४ सुखानुभव. ५ अत्यंत.

बोलणें ॥ नव्हती व्युत्थान पाहाणें ॥ नाहीं कर्मीचें करणें ॥ आपणाविण नदेखे ॥ १४ ॥ ऐसे सर्वदा समाधिस्थ ॥ निरंतर राहाते जरी संत ॥ तरी लोक जे अज्ञानावृत[1] ॥ शरणांगत कोणासीं जाते ॥ १५ ॥ संतासीं शरण जावया ॥ जो संसारें पीडिला प्राणियां ॥ अर्ती दुःखी दाटला निघावया ॥ मार्गु न दिसे जावया तो अधिकारी ॥ १६ ॥ येणें अती वैराग्य सूचिलें ॥ तें अखंड जया बाणलें ॥ त्यासींच डोहोळे उपजले ॥ जाय वहिलें शरण साधुसंतां ॥ १७ ॥ यालागीं संसारदुःखें करूनि ॥ अत्यंत पीडिला जो प्राणी ॥ त्यासीं विश्रांती संतचरणीं ॥ सुख अनुदिनीं संतसंगें ॥ १८ ॥ अगा संतसंगेंचि होय वैराग्यज्ञान ॥ सत्संगें सत्कर्मानुष्ठान ॥ सत्संगें भक्ति उपजे पूर्ण ॥ आणि विज्ञान सत्संगें ॥ १९ ॥ सत्संगें उपजत अनुष्ठान ॥ सत्संगें अष्टांगयोग साधन ॥ सत्संगें राजयोग निर्वाण[3] ॥ सत्संगें जाण शम दम होती ॥ ६२० ॥ सत्संगें भाव उपजे देहीं ॥ सत्संगेंचि सद्गुरू भेटी पाहीं ॥ सत्संगेंचि देहीं विदेही ॥ ब्रह्मत्व पाहीं सत्संगें ॥ २१ ॥ सत्संगें संसाराचा नाशू ॥ सत्संगें अज्ञानाचा ध्वंसू[4] ॥ सत्संगें प्राप्त परेशू[5] ॥ स्वरूपीं वासु सत्संगें ॥ २२ ॥ सत्संगें अष्टमहासिद्धी ॥ सत्संगें प्राप्त सकळ रिद्धी ॥ सत्संगें तरीजे भवाब्धि[6] ॥ आधिव्याधि हरे सकळ ॥ २३ ॥ सत्संगें होय स्वराज्य प्राप्ती ॥ सत्संगें बाणें निजशांती ॥ सत्संगें स्वरूपप्राप्ती ॥ सत्संगती सर्वसंगतीसीं ॥ २४ ॥ सत्संगें अंतःकरण निर्मळ ॥ सत्संगें तुटे वासनाजाळ ॥ सत्संगें सुखाचा सुकाळ ॥ सत्संगें मेळ सत्ववृद्धीचा ॥ २५ ॥ अगा सत्संगापरतें कांहीं ॥ या

१ अज्ञानांत व्यापले. २ रात्रंदिवस. ३ मोक्ष, शेवट. ४ नाश. ५ सद्गुरु. ६ संसारसमुद्र.

त्रैलोक्यांत बरवें नाहीं ॥ यालागीं सर्वदां भलतेनही ॥ सत्संग सर्वदांही करावा ॥ २६ ॥ यालागीं सत्संगावां-
चुन ॥ कोणेंही साधनें करून ॥ अज्ञान हें न तुटे जाण ॥ कल्पांतीं पूर्ण रघुनाथा ॥ २७ ॥ अज्ञाननिराशे वांचु-
न ॥ कदां नुपजे ब्रह्मज्ञान ॥ ब्रह्मज्ञानेंविण समाधान ॥ नव्हे जाण रघुवर्या ॥२८॥ समाधान जालियावांचु-
न ॥ ब्रह्मता न बाणेंगा पूर्ण ॥ ब्रह्मतेविण जन्ममरण ॥ विश्वभान भ्रमु न चुके ॥२९ ॥ यालागीं कृपेनें जाणोनि
संत ॥ राहिले संप्रज्ञातसमाधिस्थ ॥ जन तारावया उद्यत ॥ कृपावंत कळवळोनी ॥६३०॥जें आर्तांसीं सांगावें
ज्ञान ॥ तेणें तोडावें संसारबंधन ॥ जन मुक्त करावे जाण ॥ स्वयें आपण विचरती ॥ ३१ ॥ जे दुसरे यासिं न-
ये उपकारा ॥ त्या काय वाहोनिज्ञानभारा ॥ नपुसतां सांगणें तो पसारा ॥ सैरावैरा बोलों नये ॥ ३२ ॥ जो
संसारदुःखें अती आर्त ॥ श्रीगुरुसीं होय शरणांगत ॥ तयासीं सांगिजे तो सार्थकार्थ ॥ ज्ञान निश्चित रघुनाथा
॥ ३३ ॥ श्लोक ॥ तद्ज्ञानंसचशास्त्रार्थस्तद्विज्ञानमखंडितं ॥ सच्छिष्यायविरक्तायसाधोर्यदुपदिश्यते ॥ ८ ॥ ॥
टीका ॥ तेंचि ज्ञान तोचि शास्त्रार्थ ॥ तेंचि वैराग्य अखंडित ॥ जे सच्छिष्य आणि विरक्त ॥ त्यालागीं निश्चित
उपदेशिजे ॥ ३४ ॥ हें श्लोकपद व्याख्यान ॥ याचें सांग कीजेल विवरण ॥ तेंचि भावार्थ टीका जाण ॥ परि-
पूर्ण परियेसा ॥ ३५ ॥ ज्या शिष्यासीं उपदेशिजे ज्ञान ॥ त्याचें रघुनाथा आईक चिन्ह ॥ संक्षेपें तुज सांगेन ॥
जाण खुण सज्ञानमूर्ती ॥ ३६ ॥ सच्छिष्यशब्दें सर्व सुचिलें ॥ तेथें विरक्तपद दुसरें बोलिलें ॥ पुनरुक्त नव्हे येणें

१ सविकल्पसमाधी. २ उद्युक्त. ३ इच्छिणारास. ४ स्पष्टीकरण. ५ सांगितलें.

बोलें ॥ तरी कां बोलिले तें आइका ॥ ३७ ॥ जेणें निषिद्धकर्म टाकुनी ॥ काम्यकर्म सांडी वोलांडुनी ॥ कर्मफळ तें अंतवंत ह्मणोनी ॥ उपेक्षुनी टाकी जो कां ॥३८॥ करी सत्कर्मानुष्ठानें ॥ नित्य नैमित्तिक अहेतुकपणें ॥ तेंही ईश्वरार्पण करणें ॥ जालें अंतःकरण शुद्ध ज्याचें ॥ ३९ ॥ जें कीं निःकाम कर्म करणें ॥ तें समूळ कामनेतें उपडणें ॥ तेंही जरी ईश्वरार्पण करणें ॥ घर रिघवणें चित्तशुद्धीतें ॥ ६४० ॥ ऐसें चित्तशुद्धि निर्मळ ॥ बोलणें पाहाणें ज्याचें प्रांजळ ॥ कदां कल्पांतीं नव्हे कुटिळ ॥ वर्तता सरळ इंद्रियें ज्याचीं ॥४१॥ सदां पवित्र गंगा जैसी ॥ निर्मळ जळ यमुना तैसी ॥ अकर्मीं वासनेचिया लेसी ॥ नव्हे साहसी समोर जो ॥४२॥ पाणि जेणें जेंउतें नेलें ॥ तेउतें आग्रहेंविण चाले ॥ तैसें जयाचें वर्तणें जालें ॥ आग्रह गेले जयापासुनी ॥ ४३ ॥ नवल अवगुणरहित वाचा ॥ शुभेच्छा संकल्प जयाचा ॥ शुभेच्छा यया बोलाचा ॥ भाव साचा परियेसा ॥४४॥ जें नश्वरपण अमंगळ ॥ जयाचा परिणामु कुश्चिळ ॥ तें विषयसुख सकळ ॥ अतिकुटिळ इंद्रियादिभोगु ॥ ४५ ॥ अमंगळ नश्वर जें जाण ॥ ज्याचा परिणाम दुःख निर्वाण ॥ तें अशुभ बोलिजे विषयाचरण ॥ सप्रपंच पूर्ण रघुनाथा ॥ ४६ ॥ यासर्वांच्या निँरासीं जें उर्वरित ॥ ज्याचेनि प्रकाशें सर्व प्रकाशित ॥ जें कीं आविनाश पूर्ण भरित ॥ अबाधीत काळत्रयीं ॥४७॥ तेंचि शुभ गा रघुपती ॥ जया ब्रह्म बोलिजे त्रिजगतीं ॥ त्याची होवावी मज प्राप्ती ॥ दृढ आर्ति ते शुभेच्छा ॥ ४८ ॥ हे शुभेच्छागा जयासी ॥ तो सच्छिष्य रामा परियेसीं ॥ कुसंगु नावडे जयासीं ॥ मनोमा-

१ जारणमारणवगैरे. २ नाशिवंत. ३ इच्छेविरहित. ४ जितकें. ५ चांगली इच्छा. ६ कठिण. ७ अवशिष्ट. ८ ईच्छा. ९ वाईट संग.

नसीं गुरुभजन ॥ ४९ ॥ गुरु देव गुरु तीर्थ ॥ गुरु तपदान गुरु व्रत ॥ सद्गुरु जाण कुळदैवत ॥ मंत्रतंत्रार्थ श्री-गुरुराया ॥६५०॥ गुरु जननी गुरु पिता ॥ गुरु सर्वस्व गुरु ज्ञाता ॥ शास्त्रार्थ वक्ता गुरुपरता ॥ देव नेणें ॥५१ ॥ गुरु कुळधर्म कुळाचार ॥ गुरु सद्विद्या सदाचार ॥ गुरु ज्ञानदातृत्वें उदार ॥ विष्णु ब्रह्मा हर गुरुमूर्ती॥५२॥ ऐसा-अनन्यपणें गुरुवांचुनी ॥ कांहींच नेणे जागृतीं स्वप्नीं ॥ गुरुरूप मनीं नयनीं ॥ नविसंबे क्षणी अवधानपणें ॥ ॥ ५३ ॥ हें जाण सच्छिष्याचें लक्षण ॥ अति शुद्धबुद्धि आणि मन ॥ शास्त्रश्रवणीं मेधा पूर्ण ॥ अतिसज्ञान सु-बुद्धी ॥ ५४ ॥ जयासीं सप्रेम ईश्वरभक्ती ॥ पापवासना नुपजे चित्तीं ॥ बसावें आवडे येकांतीं ॥ अंतरस्थिती बाह्यपणें ॥५५॥ जे उदार मनाचे ॥ जे अविकल्प भावाचे ॥ जे अळंकार सत्वबुद्धीचे ॥ परम भाग्याचे सभाग्यपणें ॥ ५६ ॥ हें सच्छिष्याचें लक्षण ॥ सांगितलें तुज संपूर्ण ॥ आतां वैराग्यवंत तो कोण ॥ परिस खूण रघुनाथा ॥ ॥ ५७ ॥ जया नावडे इंद्रियवर्गु ॥ जया नावडे देहसंगु ॥ देहाचा मानी उबेगु ॥ सर्वार्थें विसंगु देहयोगें ॥५८॥ देह नावडावयाचें कारण ॥ रघुनाथा तुज सांगेन ॥ याचें येकेक नश्वरपण ॥ कुश्चित जाण सर्वार्थीं ॥५९ ॥ देह केवळ अस्थीचें घर ॥ देहीं मांस मज्जा रुधिरें ॥ देहीं पूपंक क्रिमी थोर ॥ विष्ठामूत्र देहविकारू॥६६० ॥ देहा-सीं असती षड्विकारू ॥ विपरीणमते अपक्षीयते हो थारु ॥ अस्ती जायते विवर्धते प्रकारु ॥ विनश्यती मारु म रणाचा ॥ ६१ ॥ या एकैक विकाराचें दुःख ॥ सांगतां अती अटँक ॥ मन कंटाळलें सम्यक॥ तरी कांहीं येक सां-

१ अनुसंधान. २ बुद्धि. ३ कंटाळा. ४ रक्त. ५ किडे. ६ काम, क्रोध, लोभ, मोह, भय, शोक. ७ प्रतिबंध.

गों रामा ॥६२॥ मातेचिये ऋतुकाळीं ॥ पितयाच्या संयोगमेळीं ॥ प्राणापानाचिया उसाळीं ॥ रेतकमळीं अ-
णुमात्र पडे ॥ ६३ ॥ तेथें मातेचें जें विटाळ रक्त ॥ त्यामाजी पितृरेत असे पडत ॥ येकत्र जाल्या होत ॥ लिंगदे-
हामिश्रित स्थूळदेह ॥ ६४ ॥ हें अस्तीविकाराचें मूळ लक्षण ॥ तें दुःखमूळ कारण ॥ गर्भवासु अतिदारुण ॥
यातना कठिण नरकाहुनी ॥ ६५ ॥ मळमूत्राचा दाथरी ॥ उकडितू नवमास अवधारीं ॥ अधोमुख बांधोनि यो-
निद्वारीं ॥ चरफड करी अतीदुःखें ॥ ६६ ॥ तें अती दुर्गंधीचें स्थान ॥ तेथेंही तोडिती जंतु दारुण ॥ तयाक्षता-
वरी फणफण ॥ कट्वाम्ल तीक्ष्ण अन्नरस लागे ॥ ६७ ॥ तयागर्भाची अति व्यथा ॥ कवणा सांगावी गा रघुना-
था ॥ नाहीं श्रोता ना परिहार कर्ता ॥ येक येकुलता आपणचि ॥६८॥ नकरी कोणी संबोखन ॥ नेदी माता
स्तनपान ॥ येकला भोगी दुःख निर्वाणं॥नाहीं समाधान विवेकाचें ॥६९॥ असो हें सांगतां अतिविस्तार ॥ जा
यते आइकें दुसरा विकार ॥ उत्पति होतां योनिद्वार ॥ सांकडें थोर निर्गमीं॥७०॥तेथें अतिप्रयासें करुनी ॥ बाहेर
पडे मूर्छा येउनी ॥ दुःखें सोहंकार विसरोनी ॥ कोहंध्वनी थोर करी ॥७१॥ आक्रंदोनी बाहेर पडे ॥ कोहं स्वरें
दीर्घ रडे ॥ कांहीं केलिया न सुरवाँडे ॥ करी चरफड नेणोनी ॥७२॥ तें दुःख अतिदारुण ॥ बोलतां असे अती-
गहन ॥ कारितां नाळ खांडन ॥ दुःखें मन वेडावे ॥ ७३ ॥ अथवा उत्पत्तितें जायते विकार ॥ जालया असतां तो अ-
सती प्रकार ॥ विवर्धते तो तिसरा प्रकार ॥ त्याचा विस्तार सांगेन ॥७४॥ विवर्धते हा विकार तिसरा ॥ देह वाढते-

१ उकाडा. २ कडु, आंबट इ० ३ अतिशय. ४ सुखपावे.

गा रघुवीरा ॥ क्षुधा पीडि तयांच्या उदरा ॥ व्यथा थोरा त्याचमध्यें ॥ ७५ ॥ दुग्ध बोळा पिळिती तोंडीं ॥ तेणें न धांय त्याची कुडी॥उपवासी सदां चरफडी॥मग स्तनीं गोडी लाविती॥७६॥अति मृदु त्याची त्वचा॥ सुखवांडनाहीं अस्तंरणाचा ॥ काठिण्य पीडी परि सांगावयाचा ॥ पवाडवाचा पावेना॥७७॥अखंड मळमूत्रीं लोळे ॥ मुखें पुर पेटती लाळे ॥ नरकयातना कळवळे ॥ ते दुःखसोहळे देखोनी ॥ ७८ ॥ असो हें सांगणें किती ॥ आइक चतुर्थी विकाराची गती ॥ विपरीणमते वित्पत्ती ॥ आइक रघुपती ऐसी असे ॥ ७९ ॥ जे विशेषीं परिणाम पावे ॥ त्यासि विपरिणम ते ह्मणावें ॥ अथवा विविधा अवस्थि परिणाम पावे ॥ तेंचि जाणावें विपरीणम ॥६८०॥ विविधरूपें तारुण्या अवस्था ॥ चारी असती रघुनाथा ॥ ते संमती सांगेन आतां ॥ त्या श्लोकार्थी परिसपां॥८१॥

संमतीश्लोक ॥ कौमारंपंचमाब्दांतेपौगंडंदशमावधि ॥ कैशोरमापंचदशाद्यौवनंतुततःपरं ॥ २४ ॥ टीका ॥ येही चौअवस्थीं परिणामला ॥ ह्मणोनि देहपरिणामवंत जाला ॥ कौमारपणीं अति पीडला ॥ इंद्रियबळा नपवेची ॥ ८२ ॥ रांगतां चालतां बळहीन ॥ पडतुजाय सुरकुंडी खाउन ॥ मळमूत्राचें विलेपन ॥ मुखें भक्षण त्याचें करी ॥ ८३ ॥ हें पांचावर्षी भीतरी ॥ मग साहाव्यापासुन दाहावरी ॥ पौगंडदशा दुसरी ॥ खेळे भारी बाळपणें ॥ ८४ ॥ दाहापासुनि पंधरांत ॥ किशोरदशा अतीभ्रांत ॥ नेणें आपुलें हिताहित ॥ नाही पढंत खेळे प्रीति ॥ ८५ ॥ गुरु पितर ताडन करिती ॥ नित्य विद्याभ्यासु करविती ॥ ते नलगोनियां चित्तीं ॥ खेळे प्रीति आ-

१ तृप्तहोणें. २ सुखा. ३ पांघरुण. ४ विस्तार. ५ अनेक. ६ मिळतनाहीं. ७ विद्याभ्यास.

वडे ॥ ८६ ॥ तो अभ्यासाचा निबंधु ॥ वरी क्षुधे तृषेचा पावे बाधु ॥ पराधीनपणें उपरोधु ॥ नाहीं बोधु आत्म-
विषयीं ॥ ८७ ॥ हें सरलिया नंतरें ॥ यौवनता पावे अतीभरें ॥ आलें कामाचें भेउरें ॥ योनिद्वारें धांडोळितूं ॥
॥ ८८ ॥ मग नदेखे आपुली ना परावी ॥ स्त्रीव्यक्ती डोळां देखावी ॥ मग आद्यंता हारवी ॥ भुले सर्व भावी द-
र्शनमात्रें ॥ ८९ ॥ तेणें नावडे धर्माचरण ॥ नावडे तप दान याग यजन ॥ नावडे ईश्वराचें भजन ॥ परावर्तन ते-
थें कैचें ॥६९०॥ सर्व चिंतनीं स्त्रीमूर्ती ॥ कानीं ऐके योषिता कीर्ति ॥ सर्वदां स्त्रियेची उपास्ती ॥ परावृत्ति अ-
सेचिना ॥ ९१ ॥ स्त्रीपुढें नावडे ज्ञान ॥ स्त्रीपुढें नावडे भोजन ॥ स्त्रीपुढें नावडे वर्तन ॥ स्त्रीच पुण्य धाम जया ॥
॥ ९२ ॥ स्त्रीपुढें नावडे माता पिता ॥ स्त्रीपुढें नावडे बंधु भ्राता ॥ स्त्रीपुढें नावडे गुरु देवता ॥ सर्व ताता नावडे
॥९३॥ स्त्रियेलागीं सर्वस्वदेणें ॥ स्त्रियेलागीं प्राण वेचणें ॥ स्त्रियेलागीं जिणें मरणें ॥ स्त्रीकोणी न पाहावी॥९४
स्त्रियेचे ठाईं याचें मन ॥ परी स्त्री याच्या ठाईं उदासीन॥ तें दुःख सांगतां अतिगहन॥स्त्री निर्भर्त्सना किती सां-
गों ॥ ९५॥ जरी निर्भर्त्सल्या स्त्रिया ॥ तरी न निवर्ते गा रघुराया ॥ खरीं टेकूं नेदी खरा तया॥ परी तो तेथूनि-
यां न परते ॥ ९६ ॥ स्त्रीसंगें जरी लज्जा ॥ थोर जाली गा रघुराजा ॥ तरी न निवर्ते आत्मकाजा ॥ प्रवर्ते वो-
जा श्वानु जैसा ॥९७॥ जरी पावे मृत्युचा ठावो ॥ तरी तुंबगे ज्याचा मनोभावो ॥ बळिद्यावया नेला पाहा हो ॥
मैथुनभावो न सांडि मेंढा ॥९८॥ ऐसेनि आर्पत्य होती तियेसीं ॥ तोचि निंगड पडला पायांसीं ॥ भरण पोष-

१ भिती. २ दुसऱ्याची. ३ वैराग्य. ४ स्त्रियांची. ५ ध्यान, भक्ती. ६ गाढवी. ७ कंटाळेना. ८ बाळकें. ९ बंध.

णीं बुद्धी पिसी ॥ कासावीस थोर होय ॥९९॥ तेणें अती थोरावला ॥ ह्मणें मी आतां गृहस्थ जाला ॥ तंव अ-
कस्मात जरेनें ग्रासला ॥ मोहें मोहला सर्वांपरी ॥७००॥ अपक्षीयते पांचवा विकारु ॥ पावतां दुःखाचा डों-
गरु ॥ क्षुधे तृषेचा आड थोरु ॥ वन वन पुरु तृष्णेचा ॥ १ ॥ वळित पळित येतां आंगासी ॥ थोर होतसे का-
साविसी ॥ शुभ्र केश वेंचितां प्रतिदिवसीं ॥ शंके जनासी कळेना ॥ २ ॥ वृद्ध ह्मणतां मरण भारु ॥ वाहे लज्जे-
चा डोंगरु ॥ वय चोरोनी मी चतरु ॥ वय विचारु थोडा मज ॥ ३ ॥ ऐसें ह्मणें परी न निवर्ते ॥ आत्मविचारीं
मन रिते ॥ विषय वासनाचि अती ओंतें ॥ रिघे तेथें बळात्कारें ॥ ४ ॥ तया वार्धक्याचा वारा ॥ आंगीं बाणतां-
चि गा रघुवीरा ॥ मोहाचेनि तो मांजिरा ॥ होय ऐसा ममतेनी ॥ ५ ॥ सकळ इंद्रियांचा क्षीणपण ॥ बळ तेज-
हीन वागिंद्रीयीं जाण ॥ परि चित्तीं अतिशयें वणवण ॥ काम पूर्ण कदां नव्हे ॥६॥ स्त्रीपुत्रादिक होती उदास॥
असतां द्रव्य नये हातास ॥ तेणें चिंता वाहे बहुवस ॥ चित्तीं हव्यास वासनेचा ॥ ७ ॥ हात पांय होती लुळे ॥
सौंदर्य ठाईंचेंचि पळे ॥ इंद्रियें सांडवलीं बळें ॥ कोणही कळवळे ऐसें नाहीं ॥ ८ ॥ सर्वांसीही उबंग होय ॥ ह्म-
णती ह्मातारा कां वांचला आहे ॥ हा मरेल तरी बरवें होय ॥ नवसिये पाहे नवसती ॥ ९ ॥ रात्री दिवस खो
कितां उजगरा ॥ ह्मणती रात्र जागवी ह्मातारा ॥ कंपु सुटला सर्व शरीरा ॥ आयुष्य मातेरा सर्व केला॥७१०॥
काठी टेकणें धरितू आहे ॥ तरी चालतां चांचरी जाये ॥ ह्मणती देवो कोठें गेला आहे ॥ मृत्यु कां नये मजला-

१ पांढरें. २ इच्छा. ३ वृद्धापकाळ. ४ व्याकुळ. ५ फार. ६ आसक्ती. ७ कंटाळा. ८ नाश.

गीं ॥ ११ ॥ ऐसा कष्ट नानापरी ॥ अनेक व्याधी उठती शरीरीं ॥ अतिदुःखाचा डोंगरीं ॥ पडे भारी शोकयुक्त॥ ॥ १२ ॥ तरी मोह न सांडी स्त्रीपुत्रांचा ॥ सुना नातू सोस पशूंचा ॥ ह्मणें हा सर्व प्रपंच आमचा ॥ परी उपरंती-चा लेश नाहीं ॥ १३ ॥ हें किती सांगावें गा रघुपती ॥ त्या अनुभवाची सकळांसी प्राप्ती ॥ येक स्वयेंचि भो-गिताती ॥ तरुण देखती आणिकांचा ॥ १४ ॥ जें प्रगट जगामाझारी ॥ तेंचि तें बोलावें किती कुसरी ॥ अपू-र्वार्थ बोलिजेते पुरी ॥ सर्वांउपरी उत्तमोत्तमा ॥ १५ ॥ तरी अपूर्वार्थ तो ऐसा असे ॥ जो कोणासहि कळला नसे ॥ तोचि उपदेशी सर्वांशें ॥ अनुभव नसे लोकां ज्यांचा ॥ १६ ॥ तो परमार्थ अतीगुप्त ॥ सर्व लोकांसीं ना-हीं प्राप्त ॥ यालागीं न बोलणें हा पुरुषार्थ ॥ येरु व्यर्थ सिणु करणें ॥ १७ ॥ जें लोकामाजि प्रगट आहे ॥ ज्याचा अनुभव सकळांस होय ॥ त्याचा अनुवाद करूनि काय ॥ व्यर्थ वाचे इये सिणवावें ॥ १८ ॥ परी वाचे कारणें गा रघुपती ॥ इतुकेंचि आहे गा विश्वमूर्ति ॥ ऐसें वैराग्य ज्यां शिष्यांप्रती ॥ स्मरे चित्तीं संसारदुःखें ॥ ॥१९॥तोचि जाणें वैराग्यवंत ॥ त्यासींच ज्ञानोपदेश कीजे त्वरित ॥ हें जो न स्मरे किंचित ॥ त्यालागीं हा अर्थ निरोपिला ॥७२०॥ जो कीं अत्यंत अज्ञानीजन ॥ अनुभविलें दुःख नेणती जाण ॥ तयालागीं केलें कथन ॥ आइक पूर्ण वैराग्य हें ॥२१॥ तेंचि वैराग्य कैसें ॥ हें सांगावयाच्या निमिषें ॥ दुःख दर्शन आपैसें ॥ अवस्थांशें सांगावया ॥ २२ ॥ यालागीं प्रकटाचाचि अनुवाद ॥ केलिया सर्वथा नाहीं शुद्धबोध ॥ जे वैराग्यार्थ नेणती

१ वैराग्य. २ कौशल्य. ३ श्रम. ४ बोलणें. ५ निमित्य. ६ आपेआप.

अतीमंद ॥ त्यांसीं विषद करणें लागे ॥ २३ ॥ जे स्वयेंचि वैराग्यवंत आपण ॥ तयांप्रति नलगे हें निरूपण ॥ परी षड्विकारीं दुःख दारुण ॥ सांगावी खुण मंदाप्रति ॥२४॥ अपक्षीयते हा पांचवा विकारु ॥ तें जाण वार्धक्य अती थोरु ॥ महादुःख अती दुर्धरु ॥ नाहीं पारु सांगतां ॥ २५ ॥ देह तंव दुःखाची राशी ॥ तेथें वार्धक्य जाण चिळसी ॥ घेणें देणें सर्व दुःखेंसीं ॥ नाहीं पापासीं मर्यादा ॥ २६ ॥ विंनश्यती हा षड्विकारु ॥ तेथें मरण तें दुःखाचा डोंगरु ॥ तें सांगतां भय थोरु ॥ नाहीं पारु ह्मणोनियां ॥ २७ ॥ जितुकें आपुलें होतें मानिलें ॥ तें वृद्धपणींच सकळ राहिलें ॥ मग मरणासीं काय उरलें ॥ उपेगा गेलें कवणासीं ॥ २८ ॥ मरणायेवढा दुःखरासी ॥ कोठें नाहीं गा परियेसी ॥ तें सांगतां वाचेसीं ॥ उरी कैसी उरेल ॥ २९ ॥ स्त्री पुत्र सकळ सोयरीं ॥ जन धन तें राहिलीं दुरी ॥ तों वोढिजेतसे यमकिंकरीं ॥ तें दुःख भारी काय सांगों ॥७३०॥ तेणें दुःखें बोंभाउ जाय ॥ तंव वाचा राहिली उपेगा नये ॥ काकुळती आपुल्याकडे पाहे ॥ ते चंद्री होय ह्मणती सकळ ॥ ३१ ॥ पाहतां बोलतां सांगतां ॥ नये परि विकारू इंद्रियां समस्तां ॥ तेणें अती बिंभत्स दीसतां ॥ भय समस्तां उपजत ॥३२॥ तो काकुळती सांगावया करी ॥ येर ह्मणती लागली चंद्री ॥ बोलावया मुख पसरी॥ह्मणती खरी मरणवेळा ॥३३॥ दुःखें हात पाय खोडी ॥ शरीरीं वळे मुरकुंडी ॥ मळमूत्र करीतू चरफडी ॥ लाळ तोंडीं अनिवार ॥ ३४ ॥ मरणाचें दुःख ऐसें ॥ तें सांगतां नये अतिसोसें ॥ अल्पचि हें सांगीतलें असे ॥ जाणावया सकळां-

१ उघड. २ वृद्धापकाळ. ३ मरण. ४ बोलूं, सांगूं. ५ त्रिदोषवायू मरणवेळा. ६ कंटाळवाणा.

तें ॥ ३५ ॥ षड्विकाराचें दुःख ऐसें ॥ तें तूं स्मरतु जाय मानसें ॥ हेंचि वैराग्य विशेषें ॥ सर्वदा असे जयासीं ॥ ॥ ३६ ॥ ऐसें देहादि सर्व दृश्यजात ॥ तें देखे दुःखभरित ॥ तेणें उदासवृत्ती सतत ॥ अनासक्त सर्वदां जो ॥ ३७ ॥ ऐसा जो वैराग्यभरित ॥ आणि सच्छिष्य जो पूर्वोक्त ॥ त्यालागीं सांगिजेल ज्ञानार्थ ॥ तोचि यथार्थ ज्ञानमहिमा ॥ ३८ ॥ ऐसीया सत्पात्र शिष्यासीं ॥ नपुसतां ज्ञान सांगावें गा हृषीकेशी ॥ तया बोलिजे ज्ञानशब्दासीं ॥ येरु उपदेशी सदां रिता ॥ ३९ ॥ बीज तें बीज नव्हे जाण ॥ जें असत क्षेत्रीं पेरिलें वाहिंवेविण ॥ फळ नये ऋतुविण ॥ कोटि प्रयत्न करितांही ॥ ७४० ॥ ह्मणोनी शाब्दिक तें बोलिजे ज्ञान ॥ त्यासीं सत्क्षेत्रीं सच्छिष्य निपुण ॥ तेथें वांहोतें वैराग्य पूर्ण ॥ श्रद्धा जाण बोलावया ॥ ४१ ॥ तिये भूमीस जें पेरिजे ॥ तेंचि बीजशब्दें बोलिजे ॥ तेणें अद्भुत विस्तारिजे ॥ अपरमित फळां ॥ ४२ ॥ अगा सद्बीज जरी जालें ॥ उखरीं न वाहितां पेरिलें ॥ तें बीजचि परी वायां गेलें ॥ नाहीं फळलें ह्मणोनी ॥ ४३ ॥ यालागीं बीज तें बीज नव्हे ॥ जें सत्क्षेत्राविण वायां जाय ॥ तैसें असच्छिष्यासीं दीधलें होय ॥ तें ज्ञान नव्हे सर्वोथें ॥ ४४ ॥ नाहीं वैराग्य ज्या शिष्यासीं ॥ ज्ञान वायां जाय सांगितलें त्यासीं ॥ यालागीं ज्ञान शब्द ज्ञानासीं ॥ नघडे सर्वांसि रघुराया ॥ ४५ ॥ सच्छिष्य वृक्षही असिला ॥ परी वैराग्य ऋतुभरें नाहीं मांडला ॥ तरी कदां नये बोध फळा ॥ जरी सिंचिला शास्त्रजळें ॥ ४६ ॥ यालागीं सच्छिष्य आणि वैराग्यवंतु ॥ सांगतांचि ज्ञान चढे ज्याचा हातु ॥ ह्मणोनि तेंचि ज्ञान हा फळितार्थु ॥

१ आसक्तीरहित. २ जमीन कसल्यावांचून. ३ विवेकयुक्त. ४ खडकाळ जमीन.

निश्चितार्थु बोलिला ॥ ४७ ॥ तें वैराग्य नव्हे गा निश्चित ॥ जें खंड ना पावे अखंडित ॥ दुःख काळीं वैराग्यवंत ॥ सुखी आसक्त विषयासीं ॥ ४८ ॥ यालागीं तेंचि वैराग्य गा रघुनाथा ॥ जें अवस्थात्रई[1] न नासे सर्वथा ॥ पाठीच लागे गा दवडितां ॥ ते अखंडता वैराग्याची ॥ ४९ ॥ प्राप्त जालियाही इंद्रियार्थी ॥ शोभनाध्यासु[2] न करी चित्ता ॥ नैश्वरत्वें वैराग्य भासतां ॥ नव्हे उद्यता[3] कोणें समई ॥७५० ॥ हेचि वैराग्याची अखंडता ॥ शिष्याप्रती अखंड उपदेशितां ॥ विमुख होय इंद्रियार्थी ॥ जैसी पतिव्रता परपुरुषीं ॥५१॥ कां ज्ञाननिष्ठासीं महासिद्धी ॥ प्राप्त जालियाही नव्हे उजू[4] बुद्धि ॥ वोसंडोनि त्रिशुद्धी ॥ अखंड बोधीं बोधिलाजो॥५२॥कां विधें रांधिलीं षड्रसान्नें ॥ तें जेवणार बरवें जाणे ॥ तरीं तो लोटोनि आपलें भाणें[5] ॥ न परते कोणी पायां पडतां॥५३॥ परिणाम देखोनि दुःखांत ॥ चिळसी मानी जयाचें चित्त ॥ अवचट पाय पडल्या पाखोळ्यांत[6] ॥ चिळसी जन्मांत विसरेना॥५४॥जरी मृत्तिका जळें धुतल्या ॥ वरी चंदनादिकीं चर्चिल्या ॥ परी विसरेना कश्मळा[7] ॥ अति कंटाळा स्मरतांचि ॥ ५५ ॥ तैसेचि विषय टांकिले ॥ ज्ञानाचे मार्गी लागले ॥ तरी चिळसी नाहीं विसरले ॥ विषय देखिले रम्य जरी ॥५६॥ ऐसें तेंचि तें वैराग्य जाण ॥ शिष्य चित्तिं बाणें संपूर्ण ॥ अखंड शब्दें नव्हे क्षीण ॥ भोग संपूर्ण दावितांही॥५७॥तैसा तोचि तो शास्त्रार्थ ॥ सच्छिष्यासि बोधे यथार्थ ॥ शास्त्राचा फळितार्थ ॥ ज्ञान हस्तगत तत्काळ होय ॥ ५८ ॥ या श्लोकाचा मथितार्थ इतुका ॥ परियेसी गा रघुकुळटिळका ॥ सार्थ-

१ जाग्रती, स्वप्न, सुषुप्ती. २ सुखाची इच्छा. ३ उत्सुकता. ४ सरळ. ५ भोजनाचें ताट. ६ अमंगळांत. ७ मळ.

कता हेचि ज्ञानादिकां ॥ सच्छिष्य निकां प्रबोधिजे ॥ ५९ ॥ येथें येकाचि कारण गा रघुपती ॥ जरी जाली शा-
स्त्रवित्पत्ती ॥ आणि गुरूही उपदेश करिती ॥ परी नसतां शुद्धमती नफळे शिष्यासीं ॥ ७६० ॥ शिष्याची चि-
त्तशुद्धि नसतां ॥ तो उपदेश जाय रिता ॥ परी गुरु शास्त्राची बोधकता ॥ कल्प कल्पांतीं घडेना ॥६१॥ शिष्य
नसतां शुद्धमती ॥ तरी गुरुशास्त्रें काय करिती ॥ जरी स्वयें आला लक्ष्मीपती ॥ तरी स्वरूपप्राप्ती नकरवे ॥
॥ ६२ ॥ हेंचि करावया निरूपण ॥ श्लोक द्वयें श्रीवसिष्ठ आपण ॥ बोलती तें येकाग्र मन ॥ संतीं करून आय
कावें ॥ ६३ ॥ ॥ श्लोक ॥ उपदेशक्रमोरामव्यवस्थामात्रपालनं ॥ ज्ञप्तेस्तुकारणंशुद्धाशिष्यप्रज्ञैवकेवला ॥ ९ ॥
॥ टीका ॥ अगा येक शिष्य येक गुरू ॥ गुरु शिष्यासीं उपदेशाचारू ॥ हा ईश्वरा पासुनी व्यवहारु ॥ उत्तरो-
त्तरू चालिला असे ॥ ६४ ॥ प्रबुद्धें[1] अबुद्ध सोडवावा ॥ जागृतें प्रसुप्त चेववावा ॥ हा परंपराचारु पाळावा ॥ प-
री आपल्या फळभावा आपण हेतू ॥ ६५ ॥ येकू निरंजनीं असे निजला ॥ त्यासीं चेवावया कोण गेला ॥
चेतां चेववितां स्वयेंचि जाला ॥ नाहीं केला सावधू कोणें ॥ ६६ ॥ तैसा अज्ञानु जो दाटला ॥ तोचि सामग्रीनें
वोवाइला ॥ वैराग्यादि सकळ मेळा ॥ करी येकवेळा आपणांचि ॥६७॥ तया सद्बुद्धी कवणें दीधली ॥ शमदमा-
दि संपत्ति कैसी आली ॥ सत्संगती कैसी लाधली ॥ कोणें केली धांवाधांवी ॥६८॥ तेव्हां सद्गुरु नाहीं आला ॥
नाहीं अंतरीं विवेक उपजवीला ॥ विषयाचा कंटाळा ॥ कोणें लिहिला त्याचे हृदईं ॥ ६९ ॥ जरीं सद्गुरुचि का-

१ बुद्धिवंत. २ पठण. ३ ज्ञानी. ४ अज्ञानी. ५ निजलेला. ६ जागृत करावा. ७ जागा होणारा. ८ शमदमादि साधनें. ९ संपन्नझाला.

रण यासीं ॥ तरी पिंतरचि गुरू बाळकासीं ॥ ते विद्यादि प्रवर्तविती संसारासीं ॥ तो तयासीं उदासू ॥७७० ॥ मारुनी स्वव्यापारु शिकविती ॥ तो तें कांहींचि नेघे चित्तीं ॥ शास्त्र श्रवणीं अती आर्ती ॥ साधुसंगती आवडे ॥ ७१ ॥ साधुपासुनी उठऊनी नेति ॥ स्वंउद्यमीं प्रवर्तविती ॥ परि तें कांहींच नलगे चित्तीं ॥ करी पुढती ते चि स्वयें ॥ ७२ ॥ स्नान संध्या करूं नेदिती ॥ दर्भ पाणी जाला ह्मणती ॥ जप तपादिक सांडविती ॥ परी त्याची मती परतेना ॥ ७३ ॥ अथवा सद्विद्या कर्म शिकवितां ॥ विपरीताचि आचरे तत्वतां ॥ नाना प्रयत्नांहि करितां ॥ उछृंखळता अधीकाचि ॥ ७४ ॥ ऐसी पूर्व कर्माचेनि संस्कारें ॥ सत्कर्मींचि बुद्धी पसरे ॥ तेथें कोण कोण प्रकारें ॥ सांग पुरे उपदेशिलें ॥ ७५ ॥ यालागीं सद्बुद्धीशिं कारण ॥ आपला आपणचि जाण ॥ यदर्थीं श्रीभगवंत आपण ॥ सांगे खुण अर्जुनासीं ॥ ७६ ॥ ॥ संमतिगीता ॥ आत्मैवह्यात्मनोबंधुरात्मैवरिपुरात्मनः ॥ बंधुरात्मात्मनस्तस्ययेनात्मैवात्मनाजितः ॥ २५ ॥ टीका ॥ यालागीं गा रघुपती ॥ मुख्य कारण ज्ञानप्राप्ती ॥ अति शुद्ध शिष्याची मती ॥ स्वरूप स्थिती जेणें लाभे॥७७॥एवं प्रकारें ज्ञानाप्रति कारण॥ शिष्य प्रज्ञा सुचिली जाण ॥ उपदेशक्रमु तो पाळण ॥ विधीमात्र जाण रघुनाथा ॥ ७८ ॥ शिष्याची नसतां शुद्ध प्रज्ञा ॥ गुरूनें उपदेशिलिया ज्ञाना ॥ तरी व्यर्थ शिणुगा प्राज्ञा ॥ न घडे संज्ञा ज्ञानासीं ॥७९॥ शिष्याची शुद्ध मती असतां ॥ साधनचतुष्टय अती तीव्रता ॥ तेथें गुरूनें महावाक्य बोधितां ॥ अपरोक्षता तत्काळ होय ॥७८०॥ तेथें

१ बाप. २ तयारकरविती. ३ इछा. ४ आपल्या उद्योगांत. ५ वृचंबळता. ६ बुद्धी. ७ ज्ञाता. ८ साक्षात्कार.

गुरुसीं नसती आयास ॥ करणें नलगे योगाभ्यास ॥ आत्मा स्वयंभ स्वप्रकाश ॥ विश्वाभास परमानंदें॥८१॥
॥ श्लोक ॥ नशास्त्रैर्नापिगुरुणादृश्यतेपरमेश्वरः ॥ दृश्यतेस्वात्मनैवात्मास्वयासत्वस्थयाधिया ॥ १० ॥ टीका ॥
नाना शास्त्र आणि गुरु जन ॥ नव्हे कदां आत्मदर्शन ॥ देखिजे आपणा आपण ॥ साह्य पूर्ण सात्विक बुद्धी ॥
॥ ८२ ॥ नव्हतां शिष्याची शुद्ध मति ॥ जरी नाना शास्त्रें अभ्यासिजेति ॥ अथवा सद्गुरु स्वयें उपदेशिती ॥
परी स्वरूप प्राप्ती कदां नघडे ॥ ८३ ॥ तेथें वरकड साधनाचा पांड काये ॥ जे स्वस्वरूप प्राप्त करिती पाहे॥
करितांही अनेक उपाये ॥ हाता नये ब्रह्मज्ञान ॥ ८४ ॥ तेथें रघुनाथ ह्मणें श्रीगुरुमूर्ती ॥ साधन अंतरंग शास्त्र
वित्पत्ती ॥ तेणेंही नव्हे ब्रह्म प्राप्ती ॥ या बोलाचि क्षितीं वाटे बहू ॥८५॥सद्गुरु दर्शनेंचि स्वरूप प्राप्ती ॥ तें उप-
देशितांही नव्हे हे विप्रतिपत्ती ॥ हें ऐकोनि माझा चित्तीं ॥ संशय प्राप्ती जाली असे ॥ ८६ ॥ आत्मप्राप्तीचें
मुख्य कारण ॥ सद्गुरु आणि शास्त्र श्रवण ॥ तेणेंचि नव्हे हा संशय पूर्ण ॥ उद्विग्न मन गुरुराया॥८७॥मुख्य सा-
धनप्राप्ती असतां ॥ स्वरूप कां नप्रकाशे गुरुनाथा ॥ शिष्य प्रज्ञेची शुद्धता ॥ कां अपेक्षितां मुख्यत्वें ॥८८॥
तरी आत्मा काय अप्रकाश असे ॥ येहीं साधनींही नप्रकाशे ॥ शिष्य प्रज्ञेचें कारण काइसें ॥ मज सावकाशें
सांगावें ॥८९॥ तंव वसिष्ठ ह्मणती परियेसी ॥ सांगेन विवंचना तुजपाशीं ॥ आईक येकाग्र मानसीं ॥ जेणें तु-
जपाशीं संशय नउरे ॥ ७९०॥ आत्मा स्वयें स्वप्रकाश ॥ साधन प्रकाशी काय त्यास ॥ तो आपणा आपण

१ योग्यता. २ पठण. ३ शंका. ४ मतभेद. ५ बुद्धीची. ६ विचार.

स्वप्रकाश ॥ पर प्रकाश कदां नव्हे ॥ ९१ ॥ तूं ह्मणसी आत्मा स्वयेंचि प्रकाशे ॥ तरी सर्व जनां कां नदिसे॥
कायसें अज्ञानाचें पिसें ॥ विश्व भ्रंशे कोणा कार्या ॥ ९२ ॥ आत्मा स्वयंप्रकाश रघुनाथा ॥ या बोला ना-
हीं गा अन्यथा ॥ परी अज्ञान नतुटे सर्वथां ॥ जाण तत्वतां गुरुवाक्येंविण ॥ ९३ ॥ तें गुरुवाक्यही आलें
हाता ॥ परी साह्य बुद्धी पाहिजे सत्वस्था ॥ बुद्धीसीं वाक्याची व्यंजनंता ॥ तेणें तत्वतां अज्ञान नतुटे ॥९४॥
उपशमात्मकजो[2] सत्वगुण ॥ तेणें अति शुद्ध बुद्धी जे तीक्ष्ण॥ ते अंतर्मुख होतांचि समूळ अज्ञान ॥ भस्मांत पू-
र्ण होउनी जाय ॥ ९५ ॥ यंत्रौषधंस्थानी[3] बुद्धी जाण ॥ गुरुवाक्य अग्नीसीं व्यंजकपण[4] ॥ अग्नि लागतांचि यंत्र
पाषाण ॥ करी कारण आपुलें ॥९६॥ यंत्रौषध नसतां तीक्ष्ण ॥ काय करी गुरुवाक्य दीपण ॥ तैसें दुसरें शास्त्र-
श्रवण ॥ अकारण दोन्ही होती ॥ ९७ ॥ यालागीं सद्गुरु आणि शास्त्र श्रवण ॥ हें आत्मप्राप्तीचें मुख्य कारण ॥
परी शिष्य प्रज्ञा[5] नसतां जाण॥नव्हे ज्ञान तयालागीं ॥ ९८ ॥ आणि प्रतिबंध होतां जें अज्ञान॥ तें निरसलें न-
लागतां क्षण ॥ उरे आत्मस्वरूप परिपूर्ण ॥ स्वप्रकाशघन स्वप्रकाशें ॥ ९९ ॥ यालागीं शिष्य बुद्धीसि कारण
ता ॥ मुख्य बोलिलीगा रघुनाथा ॥ आत्मा स्वप्रकाश तत्वतां ॥ दोन्ही कथा निरोपिल्या ॥ ८०० ॥ ह्मणो-
नी आत्मदर्शनीं शुद्धमती ॥ शिष्याची पाहिजेगा रघुपती ॥ तेचि ज्ञानाची उत्पत्ती ॥ जाल्या कल्पांतीं नासे-
ना ॥ १ ॥ या ज्ञानाचें सामर्थ्य ऐक ॥ येकवार जाल्या सम्यंक[6] ॥ ननासेगा येकायेक ॥ वाढे अधिक सतेजप-

१ शून्यता. २ वैराग्ययुक्त. ३ आवाजाची दारु. ४ प्रकाश. ५ बुद्धि. ६ चांगलें.

णें ॥ २ ॥ श्लोक ॥ सर्वाबहिःकलाजंतोरनभ्यासेननश्यति ॥ इयंज्ञानकलारामसकृज्जाताभिवर्धते ॥११॥ टीका ॥ प्राणियाच्या सर्व बहिःकळा ॥ त्या अना[1]भ्यासें नासती सकळा ॥ सकृ[2]ज्जोल्या ज्ञानकळा ॥ वाढे सोज्वळा प्रकाशपणें ॥ ३ ॥ सकळ लोक अभ्यास करिती ॥ चौदा विद्या चौसष्टी कळा शिकती ॥ त्या अभ्यासेंविण नासती ॥ आईकें रघुपती सांगेन ॥ ४ ॥ अगा सकळ विद्येचें अधिष्टान ॥ सकळांचि उत्पत्ति जेथून ॥ सकळ कळांचें मूळभूत कारण ॥ सकळां प्रमाण हा वेदु ॥ ५ ॥ तो वेद प्रयासें करूनीं ॥ अभ्यास करिती अनु[3]दिनीं ॥ तोही त्रिपक्षें[4]क अभ्यासे वांचुनी ॥ जाती विसरोनी क्षणमात्रें ॥६॥ तेथें इतर विद्या ज्या असती ॥ ज्यांसी नाना प्रयास[5] करिजेती ॥ तें सर्वही नासेगा रघुपती ॥ विस्मय चित्तीं काय होय ॥ ७ ॥ जेथें वेद विसरलों ह्मणती ॥ नाठवे शास्त्राची वित्पत्ती ॥ स्तोत्रें शिकलों त्याची गती ॥ नस्फुरती अनाभ्यासें ॥ ८ ॥ नाना भाषा बोलति शिकती ॥ त्या अनाभ्यासें विसरलों ह्मणती ॥ एवं किती बोलावी वित्पत्ती ॥ सर्वंहि नाशती अनाभ्यासें ॥ ९ ॥ बहिःकळा ह्मणिजे तें काय ॥ अंतःशब्दें बोलिजे तें काय ॥ बाह्यनाशें अंतराची वृद्धी होय ॥ कारण काय रघुपती ॥८१०॥ ऐसिया आक्षे[6]पांसिं उत्तर ॥ देता जाला श्रीवसिष्ठ अती चतुर ॥ आइका याचाही विस्तार ॥ सविस्तर सांगेन ॥ ११ ॥ जरी बाह्य जितुकें बोलिजे ॥ तें तें दृश्य प्रपंच ह्मणिजे ॥ अंतःशब्दें ब्रह्म समजे ॥ हे खुण जाणिजे रघुनाथा ॥ १२ ॥ मन बुध्यादिकासीं जें ज्ञान प्रमाण ॥ तें तें दृश्य प्रपंच जाण ॥ ह्मणोनि बाह्य

---

१ अभ्यास न केल्यानें. २ एकवारझाल्यानें. ३ रात्रंदिवस. ४ तीनवेळ. ५ पठण. ६ शंका.

हें अभिधान ॥ बोले प्रमाण उपनिषदें ॥ १३ ॥ इंद्रियें जो ग्राह्य पदार्थु ॥ तो बहिःशब्दें हा फळितार्थु ॥ इंद्रियां नेघवे अंतरार्थु ॥ ऐसें समर्थु वेद बोले ॥ १४ ॥ तेंचि सांगेन निंदर्शन ॥ रघुनाथा तुजलागुन ॥ जें वेद बोलिला आपण ॥ तेंचि निर्वाण श्रुतीवाक्य ॥ १५॥ श्रुती ॥ परांचीरवाणीव्यतृणत्स्वयंभूःस्तस्मात्पराङ्पश्यतिनांतरात्मन् ॥ १६ ॥ स्वयंभू शब्दें चतुरानन ॥ तेणें बहिर्मुख केला इंद्रियगण ॥ ह्मणोनि ते बाह्यचि देखती जाण ॥ अंतरखुण नेणती ॥ १७ ॥ ह्मणोनि इंद्रिय प्रकाश तें दृश्यजात ॥ याचें अंतर तें ब्रह्म सदोदित ॥ तें सर्वांचें प्रकाशक तत्साक्षिभूत ॥ अंतर ह्मणिजे तयाचिलागीं ॥१८॥ जें सकळांचें प्रकाशक ॥ जया नाहीं सामान्य विशेष ॥ ह्मणोनि अंतःशब्दें सम्यक् ॥ बोलती देख परब्रह्म ॥ १९ ॥ त्यासि विषई करिजे ज्ञान ॥ तें तंव अंतर सर्वांहुन ॥ जया ब्रह्मेसि सान्निध्यपण ॥ तेंचि खुण अंतराची ॥८२०॥ येकापरिस येक अंतर ॥ ऐसाचि शास्त्र करी निर्धार ॥ अर्जुनेसीं सर्वेश्वर ॥ यदुवीर बोलिला ॥ २१ ॥ संमतिगीता ॥ इंद्रियाणिपराण्याहुरिंद्रियेभ्यःपरंमनः ॥ मनसस्तुपराबुद्धिर्योबुद्धेःपरतस्तुसः ॥२५॥ टीका ॥ बाह्य प्रपंचाहुनी जाण ॥ देह तो अंतर सर्वांहुन॥ देहापरीस इंद्रियगण ॥ त्याहुनी मन अंतर असे ॥ २२ ॥ मनाहुनी बुद्धि अंतर ॥ बुद्धिहुनी ब्रह्म निर्विकार ॥ यालागीं सर्वांचेंही अंतर ॥ ब्रह्म साचार नचुकेची ॥ २३ ॥ शुद्धबुद्धीचि जे वृत्ती ॥ तियेसींच ज्ञान हें बोलती ॥ तें ज्ञान अंतर सर्वार्थीं ॥ जाण सीतापती रघुवर्या ॥ २४ ॥ यालागीं अंतरपण श्रेष्ठ जाण ॥ बाहिःकळा बाह्यत्वें

१ नांव. २ घेण्यासयोग्य. ३ अनुभव. ४ केवळ. ५ साक्षिरूप. ६ निकटसंबंध. ७ विकाररहित.

हीन ॥ अंतरासीं सत्यत्वें बुद्धि जाण ॥ बाह्यत्वें क्षीण असत्यत्वें ॥ २५ ॥ बाह्य असत्य सर्वकळा ॥ अनाभ्यासें[1] नासती सकळा ॥ अंतर सत्यत्वें वाढे ज्ञानकळा ॥ येकवेळा जालिया ॥ २६ ॥ ऐसें ज्ञान तें गुरुविण ॥ सर्वथा नुपजेगा जाण ॥ केलियाही कोटि प्रयत्न ॥ शास्त्र श्रवण जरी केलें ॥ २७ ॥ पूर्वश्लोकीं काय सुचविलें ॥ जरी गुरु अथवा शास्त्र जालें ॥ तरी शिष्यासीं नवचे बोधिलें[2] ॥ कारण बोधिलें शिष्यप्रज्ञा ॥२८॥ जरी परीस सगुण[3] जाला ॥ पूर्ण सामर्थ्यें आथिला ॥ तो जरी पाषाणासीं लाविला ॥ तरी काय तयासीं सुवर्ण करी ॥ २९ ॥ परिसाचें सामर्थ्य तों यथार्थ ॥ परी पाहिजे तयास अष्टधातु ॥ तें लोह अथवा निचांत ॥ तरी निंभ्रांत[4] सुवर्ण करी ॥८३०॥ तैसी गुरु आणि शास्त्रमहिमा ॥ तें तंव नचुकेगा मेघःश्यामा ॥ परि शिष्य शुद्ध विरोत्तमा ॥ पाहिजे रामा शुद्धमती ॥ ३१ ॥ जरी गुरु अति कुशळ जाला ॥ तरि बोधील मनुष्याला ॥ परि पशु आणोनियां हेळां[5] ॥ नवचे बोधिला नानायुक्ती ॥ ३२ ॥ शास्त्रवित्पत्ती[6] प्राज्ञांसीं[7] ॥ परि केल्या नव्हती मूर्खांसीं ॥ यालागीं कारण शिष्यप्रज्ञेसीं[8] ॥ ज्ञानाभ्यासी बोलिले ॥ ३३ ॥ परि असे ज्ञानें शुद्ध जाला ॥ शास्त्राभ्यासू बरवा केला ॥ तरी सद्गुरूवांचुनी बोधिला ॥ नाहीं देखिला तिहीं लोकीं ॥ ३४ ॥ अज्ञानें परोक्ष[9] भ्रमू जाला ॥ तो अपरोक्षा[10]नुभवें पाहिजे गेला ॥ ऐसा अपरोक्षानुभव गुरू वेगळा ॥ नाहीं देखिला रघुनाथा ॥३५॥ गुरुवेगळें होय जरी ज्ञान ॥ शिष्यप्रज्ञाचि जरी कारण ॥ तरी सद्गुरु सेवावा हें वचन ॥ वेद अप्रमाण काय बोले ॥३६॥ आणि

१ अभ्यास न केल्यानें. २ बुद्धी. ३ संपन्न, थोर. ४ निःसंशय. ५ क्षण. ६ शास्त्रपठण. ७ ज्ञाता. ८ बुद्धीसीं. ९ असमक्ष. १० साक्षात्कार.

मागें साधु महिमेतें बोलिलें ॥ तें सकळ गुरुसंगेंचि पावलें ॥ परि गुरुविण ज्ञान जालें ॥ ऐसें नबोले कोणीही ॥३७॥ यदर्थीं वचनें बोलावीं किती ॥ स्वयें श्रुतीहि बोलती ॥ तेंचि आईक येकाग्रचित्तीं ॥ तुजप्रती काय सांगों ॥३८॥ संमतिश्रुती॥तद्विज्ञानार्थंसद्गुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिःश्रोत्रियंब्रह्मनिष्ठंआचार्यवान्पुरुषोवेद ॥नैषातर्केणमतिरापनेयाप्रोक्तान्येनैवसुज्ञानायप्रोष्ठेत्याद्याः श्रुतये ॥२६॥ संमतिगुरुगीता॥यस्यदेवेपराभक्तिर्यथादेवेतथा गुरौ॥यस्यैतेकथिताह्यर्थाःप्रकाश्यंतेमहात्मनः॥२७॥टीका ॥ऐसेंचिही श्रीकृष्णनाथु ॥ अर्जुनासीं गीता सांगतु ॥ चतुर्थाध्यायीं हे मातु ॥ ह्मणें शरणांगतु गुरूसिं होय ॥३९॥ संमतिगीता ॥ तद्विद्धिप्रणिपातेनपरिप्रश्नेनसेवया॥ उपदेक्ष्यंतितेज्ञानंज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ २८ ॥ टीका ॥ ऐसेंचि ब्रह्ममूर्ती ॥ एकादशीं उद्धवाप्रती ॥ सद्गुरु तो माझीच मूर्ति ॥ अनन्यगती भजावें ॥८४०॥ संमतिभागवत ॥ आचार्यमांविजानीयान्मावमन्येतकर्हिचित् ॥ नमर्त्यबुध्यासूयेतसर्वदेवमयोगुरुः ॥ २९ ॥ टीका ॥ ऐसें अनेक शास्त्रीं निरूपण ॥ अपरोक्ष ज्ञानासिं गुरूचि कारण ॥ गुरुवेगळें सर्वंहि अनु[१]मान ॥ नपवे खुण अनुभवाची ॥ ४१ ॥ जरी सर्वंहि शास्त्र मुखोद्गत झालें ॥ तेणें परोक्षज्ञानही हाता आलें ॥ परि स्वरूप नप्रकाशे कांहीं केलें ॥ सद्गुरु बोलेंवांचुन ॥४२॥ संमतिश्लोक ॥ नैषामतितावदुरुक्रमांघ्रिस्पृशत्यनर्थापगमोयदर्थः ॥ महीयसांपादरजोभिषेकंनिष्किंचनानानवृणीतयावत् ॥३०॥ ॥ टीका ॥ जरी जालें शास्त्रश्रवण ॥ प्र[४]ज्ञा जाली तीव्र दारुण ॥ तरी नकरवे स्वरूप दर्शन ॥ कल्पांतीं जाण

१ ऐक्यभावानें. २ तर्क. ३ तोंडपाठ. ४ बुद्धी.

रघुनाथा ॥ ४४ ॥ अगा सद्गुरुची चरण धुळी ॥ तेणें नकरी जंव आंघोळी ॥ तंव बुद्धी स्वरूपाहि जवळी ॥ कोण काळीं नजाय रामा ॥ ४५ ॥ यालागीं सद्गुरुवांचुन ॥ अपरोक्षानुभव नव्हे जाण ॥ नतुटे मिथ्या भ्रम अज्ञान ॥ नव्हतां शरण अनन्यभावें ॥ ४६ ॥ श्लोक ॥ स्वकंठेपिस्थितंवस्तुयथानप्राप्यतेभ्रमात् ॥ भ्रमांतप्राप्यतेतद्वदात्मापिगुरुवाक्यतः ॥ १२ ॥ टीका ॥ जरी आपणचि आत्मा स्वयंप्रकाश ॥ गुप्त नव्हे उघड उदास ॥ ज्याचेनिभासें सर्वहि भास ॥ इंद्रियें सावकाशें वर्तती ॥ ४७ ॥ सकळ इंद्रियांचें वर्तन ॥ नव्हे आत्मसत्तेविण ॥ सर्वदां सर्वांचें करी भान ॥ जो परिपूर्ण सर्वात्मक ॥ ४८ ॥ तो आत्मा स्वयें आपण ॥ सर्वसाक्षी अपरोक्ष जाण ॥ त्यातेंचि नेणिजे हें विचित्रपण ॥ नेणतां खुण सद्गुरुची ॥ ४९ ॥ यालागीं सद्गुरुवाक्यावांचुनी ॥ अपरोक्षता नव्हे भर्वसेनी ॥ जैसे दहा पुरुष असतां येकपणीं ॥ आपणा नमानी भ्रमपणें ॥५०॥ दहा समागमीं ग्रामांतरा ॥ येकत्र चालिले गा रघुवीरा ॥ मार्गीं मोजितां नव लेखाचारा ॥ दहावा खरा चुकला असे ॥५१॥ तो नवाजणांतें गणी ॥ आपण दहावा भ्रमें नगणी ॥ चुकूर होय तिये क्षणीं ॥ नदेखे नयनीं दहावा पुरुष ॥ ॥ ५२ ॥ मग तो प्राणांतिक करी व्यथा ॥ परी आपणा नगणी सर्वथा ॥ तंव कोणी येक आला अवचिता ॥ सांगे व्यथा तयाप्रती ॥ ५३ ॥ तो मागुता गणवी तयासीं ॥ तंव तो नवांसींच मोजी परियेसीं ॥ येरू हातीं धरूनि दावी त्यासिं ॥ दशमस्त्वमसि ह्मणोनियां ॥ ५४ ॥ तेव्हां तो भ्रमातें विसरला ॥ आपणा आपण प्राप्त

१ साक्षात्कार. २ प्रकाशन. ३ दुसऱ्यागांवास. ४ भ्रमिष्ठ. ५ शोक. ६ एकाएकीं. ७ तूंचआहेस.

झाला ॥ ह्मणे तूं उपकारी भला ॥ मजचि मजला भेटविलें ॥ ५५ ॥ तेणें तुझ्या उपकारा उत्तीर्ण ॥ आतां मी कैसा होईन ॥ अनादि भ्रमू दूरी करून ॥ आपणा आपण भेटविलें ॥५६॥ मी असतां आपणाजवळ आपण॥ कोण भ्रम जाला पूर्ण ॥ विसरलों माझें मीपण ॥ शोक दारुण करित होतों ॥ ५७ ॥ त्या शोकाचें कारण ॥ भ्रमरूप जें अज्ञान ॥ तें तुवां निरसिलें नलगतां क्षण ॥ हातीं धरुनि मज दीधलें ॥ ५८ ॥ तैसा आत्माचि असतां आपण ॥ अपरोक्ष स्वतां सिद्ध जाण ॥ परी प्राप्त नव्हे सद्गुरुविण ॥ जाणती खुण तोचि दावी ॥ ५९ ॥ जैसें आपुले स्वकंठीचें चामीकर[2] ॥ अथवा मणी वस्तु सुंदर हार ॥ असतांचि भ्रम थोर ॥ विस्मरण फार जैसें होय ॥८६०॥ असोनि त्यालागीं चुकूर होती ॥ इतस्तता[3] भ्रमें पाहाती ॥ येकें दाखविल्या भ्रमांतीं ॥ वस्तु पावती स्वकंठींची ॥ ६१ ॥ तैसा जंव हा भ्रमू आहे ॥ तंव स्वस्वरूप प्राप्त नोहे ॥ सद्गुरुवचनें भ्रमु हा जाय ॥ तरी सिद्धचि आहे आपणाआपण ॥ ६२ ॥ हें निरूपण केलें तुजप्रती ॥ गुरुवीण नाहीं स्वस्वरूपीं प्राप्ती ॥ गुरुभजनें ज्या वस्तु प्राप्ति ॥ धन्य त्रिजगतीं तो पुरुष ॥ ६३ ॥ आतां नरदेह पावलियावरी ॥ जे स्वस्वरूप नेणती ये शरीरीं ॥ ते व्यर्थ जन्मले ये संसारीं ॥ आईक रावणारी सांगेन ॥ ६४ ॥ त्याचें श्लोकद्वयें निरूपण ॥ आइकें रघुनाथा सांगेन ॥ वोजें[4] लावावया अज्ञानजन ॥ त्याचें निवेदन करिजेत ॥ ६५ ॥ श्लोक ॥ स्वस्वरूपमजानन्वै जनोयंदैववर्जितः ॥ विषयेपिसुखंवेत्तिपश्चात्पाकेविषान्नवत् ॥ १३ ॥ टीका ॥ स्वस्वरूप नेणता जो जन ॥ या

१ उतराई. २ सोनें. ३ इकडेतिकडे. ४ चांगुलपणा.

कारणास्तव तो दैवहीन ॥ विषयींच सुख जाणें संपूर्ण ॥ जैसें विषान्न परिपाकीं ॥ ६६ ॥ जो दैवें सांडिला न-
रु ॥ हतभाग्यें करंटा निष्ठुरु ॥ त्यासींच स्वस्वरूपीं विसरु ॥ विषयीं भरुं[1] सुखालागीं ॥ ६७ ॥ परि विषयीं तें
अतिदुःख ॥ हें कांहीं केलिया नेणती मूर्ख ॥ परी पांघुरविलें अल्प सुख ॥ तेणें अळुंके[2] विषयीं सदा ॥ ६८ ॥
विषयीं सुख आहे ह्मणती ॥ ते अतिमूर्ख गा रघुपति ॥ जे दुग्धाची चवी नेणति ॥ ते तृणें घांती[3] पशु जैसे ॥६९॥
विषयाच्या ठायीं दुःख आहे ॥ हें सांगीतल्याही ठावें नोहे ॥ जैसें विषें रांधिली क्षीर रसोय ॥ भुकेला खाय
नेणोनी ॥८७०॥ मग विष आपणा ऐसें करी ॥ जेवणारातें जिवें मारी ॥ तैसा विषय सेवी तो दुःखसागरीं ॥
भ्रमाच्या पुरीं बुडोनि जाय ॥ ७१ ॥ मग तेथुनी नुमंजे[4] कवणियेपरी ॥ तळवट[5] घे स्थावरांतवरीं[6] ॥ नानायोनी
भोगि भारी ॥ अज्ञानपुरीं पडलिया ॥ ७२ ॥ श्लोक ॥ बुध्वाप्यत्यंतवैरस्यंयःपदार्थेषुदुर्मतिः ॥ बध्नातिभावनां-
भूयोनरोनासौसगर्दभः ॥१४॥ टीका ॥ अगा हे विषय अतिविरसँ[7] ॥ सेवितां वासना वाढे अंसोस[8] ॥ इंद्रियें क्षीण
तरी वाढवी सोस ॥ सावकाश तृप्ती नव्हे ॥ ७३ ॥ विषय सेवितां वाटे सुख ॥ क्षणेंचि अतिशयें होय दुःख ॥
परिणामीं तरी अवी विख ॥ होय मारक अतीशयें ॥ ७४ ॥ ऐसें जाणोनी अत्यंत वैरस्यता ॥ दुःख पावे विषय
सेवितां ॥ मागुती वासना बाधे इंद्रियार्थी ॥ कदा कल्पांता परतेना ॥ ७५ ॥ तो अतिदुष्ट दुर्मती ॥ पापाचारी
निंद्य अती ॥ तो नररूपें गर्दभमूर्ति ॥ सांगों किती रघुनाथा ॥ ७६ ॥ गर्दभ धांवे गर्दभीपाठीं ॥ ते लागोंनेदी

---

१ आवडी. २ आसक्त. ३ समाधान पावती. ४ नसमजे. ५ अधोभाग. ६ पाषाणादी. ७ कंटाळवाणें ८ अतिशय.

पायँ लोटी ॥ तरी तो नसोडी तियेची पाठी ॥ वासना लांठी मागुती करी ॥ ७७ ॥ दुःख अनुभवीतसे शरी-
रीं ॥ परि वासना तेथोनि दूरि नकरी ॥ पापी निर्लज्ज दुराचारी ॥ अविचारी तैसा नरू ॥ ७८ ॥ ययालागीं
गा रघुनाथा ॥ सकळ दुःख वासनेच्या माथां ॥ ह्मणोनि वासना लेश्ू तत्वतां ॥ उपजों चित्ता नेदावा ॥ ७९ ॥
भलतियेचि पदार्थीं ॥ उपजली वासना घाली अनर्थीं ॥ तें समूळ आइकें गा रघुपति ॥ विस्तारें तुजप्रती सां-
गेन ॥८८०॥ श्लोक ॥ यत्किंचिदपिसंकल्पान्नरोदुःखेनिमज्जति ॥ नाकिंचिदपिसंकल्पात्सुखमक्षयमश्नुते ॥ १९ ॥
॥ टीका ॥ तरी आइकें गा रघुनाथा ॥ दुःखसागरु वासनेच्या माथां ॥ ते वासनेची जेथुनी प्रौढता ॥ आइकें
तत्वतां सांगेन ॥ ८१ ॥ मुख्य तें अज्ञान द्विःप्रकार ॥ आवरण आणि विक्षेपाकार ॥ सांगेन याचा विचार ॥
आवरण प्रकार तो ऐसा ॥ ८२ ॥ अज्ञानाचें जें आश्रयभूत ॥ तें शुद्ध ब्रह्मचि गा निश्चित ॥ ज्याच्यानि तेजें प्र-
काशत ॥ तें तदाश्रितचि बोलावें ॥ ८३ ॥ तें आपल्या आश्रयातें आवरी ॥ नेणतें करी क्षणाभीतरीं ॥ हें अ-
ज्ञानरूप निर्धारीं ॥ करी पुरी विस्मरण दशा ॥ ८४ ॥ आपुलें आपणासीं नेणनें ॥ केलें पैं अज्ञानें येणें ॥ ज-
ळोद्भव बाबुळीचें होणें ॥ आच्छादपणें निजाश्रया ॥ ८५ ॥ हें आवरणात्मक अज्ञान ॥ तेंचि विक्षेप करी निर्वा-
ण ॥ विस्मरण काय येक भान ॥ न करी जाण रघुवर्या ॥ ८६ ॥ मुख्य आपुलें नेणनें तोचि अनर्थ ॥ तेणें काय
येक नघडे अर्थ ॥ विपरीत ज्ञानें भ्रमार्थ ॥ स्वयेंचि व्यर्थ उपजेल ॥ ८७ ॥ प्रथम अहं हा पूर्ण संकल्प ॥ तोचि

१ मोठी. २ विस्तार. ३ आच्छादन. ४ अडथळा. ५ आश्रयाचें स्थान. ६ मोक्ष.

देहाकारें वाढला असुप ॥ जेणें वाढे वासनापादप ॥ पापरूप दुःखमूळ ॥ ८८ ॥ मुख्य वासनेची वाढी ॥ संकल्पापासाव होय देवढी ॥ वासना दार्ढ्य अनर्थ कोडी ॥ दुःख परवडी उत्तरोत्तर ॥ ८९ ॥ हा संकल्प किंचित कदाचित्तही ॥ जरी उद्भवला लिंगदेहीं ॥ तो प्रौढ वासनारूप होय पाहीं ॥ बुडवी डोहीं दुःखाचे॥८९०॥ दुःखसागरीं बुडावया कारण ॥ अणुमात्रचि हा संकल्प जाण ॥ प्राणी मरणा उपरी मरण ॥ पावे निर्वाण कल्प कोटी ॥ ९१ ॥ आतां नपावावया दुःख मरण ॥ उपायांचें सांगेन कारण ॥ आइकें देवा चित्त देउन ॥ अतिनिर्वाण उपाय हा ॥९२ ॥ तरी स्वस्वरूपाचेनि विस्मरणें ॥ जो संकल्प उठी देहपणें ॥ तो उठो नेदावा सावधपणें ॥ वासना जेणें प्रौढ नव्हे ॥ ९३ ॥ अतिवैराग्यें मुमुक्षता ॥ दृढ बाणली ज्याचे चित्ता ॥ तेणें आणिका नकरावें उपायार्था ॥ गमन तीर्था नकरावें ॥ ९४ ॥ नाना साधन धर्माचरण ॥ तीर्थ यज्ञ तपादि दान ॥ हें सकळही दुःखासीं कारण ॥ सुखा कारण येकही नव्हे ॥ ९५ ॥ तेणें सर्वदां सावध होउनी ॥ संकल्प उठों नेदावा कोणी ॥ तेणें सुखाचि भरे त्रिभुवनीं ॥ दुःख स्वप्नीं न देखे ॥ ९६ ॥ सुखस्वरूप तोचि आपण ॥ दुःख रूप तेंचि विपरीतभान ॥ संकल्पक्षयीं पावे आपण ॥ सुखसंपन्न तेणें करुनी ॥ ९७ ॥ यालागीं अक्षय सुख जें नित्यानंद ॥ परमानंदैक अगाध ॥ तें तो पावे निर्बाध ॥ निर्विवाद परमानंदें ॥ ९८ ॥ जें धर्मादि तीर्थें करणें ॥ तेणें अधिकचि वासनेतें वाढवणें ॥ वासना वृद्धीनें दुःखचि जेणें ॥ फार करणें आपणेंची ॥ ९९ ॥ साधनें

१ फार. २ वृक्ष. ३ अधिक. ४ प्रकार. ५ अन्यथा. ६ निःसंशय. ७ वाढविल्यानें.

साधावीं सुखाकारणें ॥ आणि दुःखचि जरी वाढे तेणें ॥ तरी आपुल्या पाईं लेववणें ॥ निगंड करणें दुःखरूप ॥ ९०० ॥ जो अत्यंत असेल जडमूढ ॥ त्यासींच साधन अतीगोड ॥ परि विचारू नकरिती दृढ ॥ साधनें प्रौढ कां प्रवर्तलीं ॥१॥ लौकीक परमार्थाचें साधन ॥ तेंही नित्य सुखासीं कारण ॥ आणि विपरीतार्थचि पाविजे तेणें ॥ तरी कां करणें सायास हे ॥ २ ॥ ययालागीं गा रघुपती ॥ संकल्प क्षयीं सुख प्राप्ती ॥ ह्मणोनि अणुमात्र ही संकल्पाप्रती ॥ चित्तवृत्ती वाढों नेदी ॥ ३ ॥ ऐसेनिसंकल्पें उठिला वासनांकुर ॥ तरी निवर्तावा धरूनि धीर ॥ जो वार्तिक कर्ता वेद उदार ॥ संमती थोर परियेसा ॥ ४ ॥ जो कीं भगवंत सुरेश्वर ॥ जो वार्तिक कर्ता सादर ॥ तेणें केला जो निर्धार ॥ श्रुत्यनुसार परियेसा ॥ ५ ॥ संमतिवार्तिक ॥यतोयतोनिवर्ततेविमुच्यंततततस्ततः ॥ निवर्तनाधिसर्वतोनवेतिदुःखमण्वपि ॥ ३१ ॥ अर्थ ॥ वासना निवर्तविजे ज्या ज्यापासुनी ॥ मुक्त होइजे त्या त्या स्थानीं ॥ जितुकी वासना काढिजे विषयावरुनी ॥ सुख निर्वाणीं तितुकेंचि होय ॥ ६ ॥ जों जों पदार्थाहुनी मन काढिजे ॥ तों तों सुखाचि संपत्ती पाविजे ॥ जों जों वासना वाढविजे ॥ दुःख लाहिजे तितुकेंची ॥ ७ ॥ जरी सर्वीं सर्वत्र निवृत्ति जाली ॥ तरी सुखाची संपत्ति हाता आली ॥ अणुमात्रही दुःख बोली ॥ कदाकाळीं नाइके तो ॥ ८ ॥ यालागीं सर्वदा हेंचि करावें ॥ संकल्पातें उपजो नेदावें ॥ वासनारूप जाल्याही त्यजावें ॥ विषय बरवे जरी जाले ॥ ९ ॥ ऐसेनि विषय वासना धरिजेति ॥ तेणें दुःखावरपडे होती ॥ शेवटीं

१ बंध. २ अन्यथा, वाईट परिणाम. ३ नाहींसा करावा. ४ ग्रंथाचें नांव. ५ शेवटीं. ६ पावेल. ७ विषयविरक्ती ८ दुखांत गुंतलेले.

विषयसुखाची प्राप्ती ॥ व्यर्थ भ्रांती स्वप्न जैसें ॥ ९१० ॥ श्लोक ॥ यथास्वप्नमुहूर्तेस्यात्संवत्सरशतभ्रमः ॥ तथामायाविलासोयंजायतेजाग्रतिभ्रमः ॥ १६ ॥ टीका ॥ स्वप्नींचे राज्यादि सकळ ॥ मुहूर्तयेक भोग अमंगळ॥ परि भोगितां सरे तत्काळ ॥ नलगतां वेळ रघुनाथा ॥ ११ ॥ ते भोग भ्रमेंकरुनी ॥ शतसंवत्सर दीर्घ मानीं ॥ लटिकाचि परि हर्ष दानीं ॥ दावी दोन्ही अतिभ्रमें ॥ १२ ॥ राज्यप्राप्तीनें अतिआनंदु ॥ तें गेलिया वाढ अतीखेदु ॥ पुत्रादि मरणें विषादु ॥ अल्पचि विषदु बहु मानीं ॥ १३ ॥ क्षणें तोंचि स्वप्न सरोनि जाय ॥ भ्रमें मानी बहु काळ आहे ॥ अल्पचि परि शतवरुषें पाहे ॥ अक्षय होय तयापासीं ॥ १४ ॥ त्या येका क्षणामाझारीं ॥ आपत्य उपजाविलें लग्नें करी ॥ तें मेलिया शोक भारी ॥ बुडे पुरीं मोहाच्या ॥ १५ ॥ पूर्वी स्वप्नीं सामान्य होता ॥ मग अपूर्व राज्य आलें हाता ॥ तें गेलिया मागुतें रिता ॥ करि चिंता अतीदुःखें ॥ १६ ॥ ऐसे हर्ष विषाद स्वप्नीं ॥ प्रत्यक्ष भोगी आपल्या मनीं ॥ विचारितां क्षणाचीच करणी ॥ बहु हर्ष मानीं अतिभ्रमें॥ १७॥ तैसें जागृतीच्या ठायीं ॥ सकळ मायामय विलास पाहीं॥त्याच्या विलासास्तव हा ही ॥ भ्रमें डोहीं बुडे रामा ॥१८॥ हा ही क्षणा येकाचा भोगू ॥ परि कल्पायेवढा मानीं चांगु ॥ नव्हे सावध नधरी उबगु ॥ अति निसूगं भ्रमेंकरुनी ॥ १९ ॥ आतां प्रपंचीं असोनियांही मुक्त ॥ जो शुभाशुभासीं अलिप्त ॥ त्याची श्रीवसिष्ठ स्तुती करित ॥ श्लोकद्वयांत परियेसा ॥९२०॥ श्लोक ॥ योंतःशीतलयाबुध्यारागद्वेषविमुक्तया ॥ साक्षीवत्प

१ वर्षे. २ दुःख. ३ मूल. ४ चांगला. ५ कंटाळा. ६ निर्लज्ज. ७ निराळा.

१४

इयतीदंहिजीवितंतस्यशोभते ॥ १७ ॥ टीका ॥ जो रागद्वेषींविहीन ॥ तिये अंतर शीतल बुद्धि करून ॥ जो साक्षित्वें करी विश्वभान ॥ जीवित्व धन्य त्याचें रामा ॥ २१ ॥ आतां आइक गा रघुपती ॥ जो प्रपंचीं अलिप्त गती ॥ त्याची कळा सांगेन वर्तती ॥ येकाग्रचित्तीं परियेसी ॥ २२ ॥ त्याची अंतर शीतल बुद्धी ॥ जो राग द्वेषीं नलगे त्रिशुद्धी ॥ तेचि शीतळ निरवधि ॥ आइक सुबुद्धी रघुवर्या ॥ २३ ॥ बुद्धीचें जें जळजळपण ॥ तें राग द्वेषी दोन्ही जाण ॥ विषयीं प्रीति तो राग पूर्ण ॥ द्वेषाची खुण परियेसी ॥ २४ ॥ प्रीतिचा जो विषय असे ॥ त्यासीं घातक जो प्रतिकूळ वसे ॥ तेथें बुद्धी जे कुसुंमुसे ॥ द्वेष ऐसें या नांव ॥ २५ ॥ या दोहींकरूनि विमुक्तता ॥ तेचि बुद्धी शितळता ॥ अंतःशब्दें सूक्ष्मता ॥ अतिशुद्धता बोलिली ॥ २६ ॥ ऐसीये बुद्धिकरून ॥ स्वयें साक्षी होय जो आपण ॥ साक्षित्वेंचि सर्व करी वर्तन ॥ अलिप्तपणें सर्वांपरी ॥ २७ ॥ जैसा दीपू साक्षिभूत ॥ गृहव्यापारीं अनासक्त ॥ तो सकळां प्रकाशुनि वर्तत ॥ प्रकाशमंत सूर्य जैसा ॥ २८ ॥ ऐसा वर्ततांही जगाआंत ॥ साक्षित्वें देखे जग समस्त ॥ तयाचें जीवित शोभित ॥ धन्य निश्चित तो जगीं ॥ २९ ॥ तयाचें धन्य जालेपण ॥ तोचि सर्वज्ञा सर्वज्ञ ॥ जो वर्ततसे साक्षि होउन ॥ धन्य धन्य तोचि येकू ॥ ३० ॥ श्लोक ॥ येनसम्यक्परिज्ञानंहेयोपादेयमूज्झता ॥ चित्तस्यांतेस्थितंचित्तंजीवितंतस्यशोभते ॥ १८ ॥ टीका ॥ अगा जेणें पुरुषें रघुनाथा ॥ हेयोपादेय जाणोनि तत्वतां ॥ त्यागु करिजे नविचारितां ॥ आइकें कथा सांगेन ॥ ३१ ॥ हेय

१ निराळा. २ अत्यंत, बहुत. ३ क्षोभयुक्त. ४ विरक्त. ५ त्याग, ग्रहणकरणें.

शब्दें त्यांज्य अर्थु ॥ प्रतिकूळ विषय बोलिजेतू ॥ उपादेय घेइजेतु ॥ जो प्रिय विषयार्थु सानुकूळ ॥ ३२ ॥ घेणें आणि टाकणें दोन्ही ॥ निःशेष गेलीं जयापासुनी ॥ चित्त चित्तीं स्थिरावोनि ॥ राहे निर्वाणीं निजरूपें॥३३॥ चित्ताआंत घालिजे चित्त ॥ याचा कैसा निश्चितार्थ ॥ तरीच तेणें संकल्पातीत ॥ राहे निश्चित स्वयें रूपें॥३४॥ चित्ताचें गेलिया चित्तपण ॥ चित्तीं चित्ता अचित्त होणें ॥ सर्व संकल्पाविहीन ॥ राहे परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ३५ ॥ चित्तीं राहिल्या चित्त पूर्ण ॥ नुपजे संकल्प देहस्फुरण ॥ देहस्फूर्तीविण प्रपंचभान ॥ नव्हे खुण जाण रामा ॥ ॥ ३६॥ देहो अहं हा संकल्प तुंठी ॥ ह्मणजे चित्तीं चित्ता पडिली मिठी ॥ तेणें आनंदु नमोडे सृष्टीं॥ धन्य जगजेठी तूं येकू ॥ ३७ ॥ अथवा चित्ताचा अंत जेथें होत ॥ चित्त निःशेष समाप्ति पावत ॥ ते आत्मस्वरूपीं जें स्थीर चित्त ॥ धन्य जीवित तयाचें ॥ ३८ ॥ तयाचें जिणें शोभिवंत ॥ तोचि धन्य तिहीं लोकांत ॥ ज्याचें समरसें चित्तीं चित्त॥ सुखें उन्नत सर्वदां ॥३९॥ सर्व यज्ञांदि साधनाचें फळ ॥ तोचि पावला गा सकळ ॥ देहीं असोनी देहा वेगळा ॥ सुखकल्लोळ सुखरूप ॥९४०॥ येकू जो संकल्पें गांजिला ॥ देहबुद्धीचा अंकिला ॥ तो वासनाजाळीं सांपडला ॥ दुःखकल्लोळा बुडोनिजाय ॥ ४१ ॥ देहबुद्धीनें जें जें करी ॥ तें तें दुःखाची भरोवरी ॥ विश्रांती नाहीं ज्याच्या अंतरीं ॥ बाह्यात्कारीं काय होय ॥ ४२ ॥ अंतरीं असे ज्वरें पीडिला ॥ बाह्य शीतळ चंदनें चर्चिला ॥ तो निवेल काय उपचारिला ॥ जरी सिंचिला शीतळ निरें ॥ ४३ ॥ किंवा येकू

१ टाकण्यासयोग्य. २ शेवटीं. ३ वेगळा. ४ उत्पन्नहोत नाहीं. ५ एकरस, ब्रह्मानंद. ६ पूर्ण. ७ स्वाधीन. ८ सामग्री. ९ संस्कारिला.

सुळीं द्यावया नेता ॥ कोटि तळमळ त्याचिया चित्ता ॥ त्यासी नाना भोगोपचार करितां ॥ सें-दुरें माथा शोभविती ॥ ४४ ॥ सर्वांगा लाविती चंदन ॥ नाना पुष्पें शृंगार भरण ॥ वाद्य ध्वनीं ग-र्जे गगन ॥ देती भक्षणा अपूर्व वस्तू ॥ ४५ ॥ इतुका करूनि सोहळा सकळ ॥ परी अणुमात्र क्षीण नव्हे जळजळ ॥ तरी त्या समारंभाचें कोण फळ ॥ नाहीं निश्चळ मन ज्याचें ॥ ४६ ॥ तैसे नाना या-गादि करिती ॥ लौकिकीं दीक्षितपणाची कीर्ति ॥ समारंभा अवभृथा[१] जाती ॥ असो व्यक्ति किती करावी ॥ ॥ ४७ ॥ तेणें कोण सुख उपजेल ॥ काय अंतरींचि जळजळ जाईल ॥ काय हें मन निश्चळ होईल ॥ काय नवल तेथें जालें ॥ ४८ ॥ काय चित्ता जालें समाधान ॥ कीं चुकलें तयाचें आयागमन[२] ॥ हें नव्हतां जें करिजे जाण ॥ तो विटंबु पूर्ण गा रघुनाथा ॥ ४९ ॥ अंतरीं अति दुःखें जो भरला ॥ बाह्य थोर समारंभ केला ॥ कडु दुधिया गुळें माखिला ॥ अंतरीं जाला गोड काय ॥ ५० ॥ कांतहीनेसीं[३] सौभाग्य उपचार ॥ केलिया वाटे दुःखचि फा-र ॥ अंतरीं जळजळ अपार ॥ बाह्य उपचार काय करी ॥ ५१ ॥ यालागीं राहे ज्याचें चित्तीं चित्त ॥ त्याचेंचि जिणें शोभिवंत ॥ येरू शब्दरूपें जीत ॥ वासनायुक्त चित्त ज्याचें ॥ ५२ ॥ अगा वासना क्षयाचें सुख ॥ तिहीं लोकीं ना-हीं देख ॥ ऐसी भारती[४] संमति सम्यक् ॥ बोले आइक व्यासमुनी ॥ ५३ ॥ संमतिभारत ॥ यच्चकामसुखंलोकेय-च्चदिव्यमहत्सुखं ॥ तृष्णाक्षयसुखस्यैतेनार्हतिषोडशींकलां ॥ ३२ ॥ टीका ॥ अगा इहलोकींचें जें महत्सुख ॥

१ यज्ञाच्या शेवटीं स्नान. २ जन्ममरण. ३ विधवेसीं. ४ वाचा.

परि तें सामान्य नव्हे देख ॥ राजा चक्रवर्ती जो येक ॥ नाहीं आणिक स्पर्धी जया॥ ५४॥इतरांसीं दुसरी याचें भय दारुण ॥ आणि काम सुखही नाहीं पूर्ण ॥ शरीर रोगी भार्येसीं कुरूपपण ॥ स्वेछांवर्तन जया नाहीं ॥ ५५ ॥ यालागीं बोलिला चक्रवर्ती ॥ ज्यासि स्पर्धि नाहीं पृथ्वीपति ॥ सकळ काम पूर्ण असती॥चित्तानुवर्ती पुत्र भार्या ॥ ५६ ॥ सकळही राज्य स्वाधीन ॥ शरीरासीं आरोग्यता दृढपण ॥ स्त्रीही सुंदरी परिपूर्ण ॥ कांहीं अपूर्ण असेचिना ॥ ५७ ॥ त्याचें जें कीं कामसुख ॥ कां स्वर्गीं जे कां इंद्रादिक ॥ त्यासिं उपमा नाहीं आणिक ॥ शतंमखी सम्यक लभ्य जें कां ॥ ५८ ॥ इये दोन्हीं सुखें ऐसीं असती ॥ आणि तृष्णा वासना येकि बोलिजेति ॥ त्याचेनींक्षयें जे सुखप्राप्ती ॥ खंद्योत होती दोन्हीं सुखें ॥ ५९ ॥ तृष्णा क्षयाचि सोळावी कळा ॥ ये दोनीं सुखें नपवतिगा वेल्हाळा ॥ तृष्णाक्षयें सुखाचा सोहळा ॥ क्षय मुळा दोन्हीं सुखें ॥९६०॥ यालागीं संकल्पक्षयीं जे सुखप्राप्ती ॥ तें सुख नाहीं गा त्रिजगतीं ॥ इंद्रादि पदाची कोण गति ॥ जळजळ चित्तीं सर्वदां ॥६१ ॥ जो साक्षी होउनी वर्ते देहीं ॥ त्या देहादि गेलिया नाठवे कांहीं ॥ जया आत्मबुद्धी वर्ते देहीं ॥ देहनाशें त्याही आत्मनाशु ॥ ६२ ॥ आत्मा अविनाशी नित्य शुद्ध ॥ देह तंव विनाशी प्रसिद्ध ॥ देहनाशें आत्मया बाध ॥ अतिमंद मानिती ॥ ६३ ॥ हेंचि निरुपावया स्पष्टपण ॥ श्लोका पांचाचें निरूपण ॥ आत्मा अनात्मा वेगळेपण ॥ जाणिजे मन तैसें कीजेल ॥ ६४ ॥ याचा वक्ता श्रीवसिष्ठमुनी ॥ श्रोता स्वयें कोदंडपाणी ॥ तया निरूपणाची

१ बरोबरी. २ आपले इच्छेकरून. ३ आज्ञेंत वागणारी. ४ इंद्रपदासारखें. ५ काजव्यासारखीं. ६ आशा.

श्रेणी ॥चित्त देऊनि परियेसीं॥६५॥श्लोक ॥ हृदयाकाशमात्रस्यविनाशोदेहनाशतः॥ व्यर्थंभूतानिशोचंतिनष्टआत्मेतिशंकया ॥१९ ॥ टीका ॥ अगा देहाचेनि नाशें ॥ हृदयाकाश नासलें दिसे ॥ तैसींच भूतें शोचती देहनाशें ॥ आत्मा नासे ह्मणोनियां ॥ ६६ ॥ तरी श्रीरघुनाथा आइक ॥ आकाश असे सर्व व्यापक ॥ त्यासि घटाकाश मठाकाश येक ॥ भिन्न सम्यक महदाकाश ॥ ६७ ॥ तैसेंचि सकळ देहीं भिन्न ॥ आकाश मानिति अन्यअंन्य ॥ घटभंगें आकाश भिन्न ॥ परिछिंन्न नाशेल ॥ ६८ ॥ तैसेंचि देहनाशें व्योमनाश ॥ ऐसें मानिति सावकाश ॥ नेणें जो व्यापक आकाश ॥ अविनाश अपरिछिन्न ॥ ६९ ॥ तेथें देहाचेनि विनाशें ॥ हृदयाकाश नासलें दिसे ॥ तोही भ्रमु अज्ञानांशें ॥ येरवि जैसा तैसाचि॥९७०॥ देह हा नासला पाहीं ॥ आकाश तेथुनी गेलें नाहीं ॥ तया गमनागमन दोन्हीहि ॥ कल्पीत पाहीं अज्ञानत्वें ॥७१॥ तैसेंचि देहाचेनि नाशें ॥ मानिती आत्मा नासला ऐसें॥ परि तो अविनाश्य सर्वांशें ॥ नाश पिंसे मानिती ॥ ७२ ॥ जया नाहीं मुळीं दृष्टी ॥ त्यासि परस्परें भिन्न सृष्टी ॥ तेथें आत्मा परिछिन्न हे गोष्टी ॥ भ्रम दृष्टी पडेचि कीं ॥७३॥ आत्मयाचें व्यापकपण ॥ नाहीं जयासीं पैं दर्शन ॥ त्यासिं देहचि आत्मा पूर्णज्ञान ॥ मरणें मरणचि देहाचेनी॥७४॥देहनाशें आत्मानासे ॥ऐसें दृढ मानिती लोक पिसे॥ शोक करिती असोसें॥ व्यर्थंचि ऐसें भ्रम जगीं ॥ ७५ ॥ सर्वत्र आत्मा असे येक॥वस्तुमात्रीं असे व्यापक ॥ परि पदार्थी नासे सम्यक ॥ येकायेक अविनाश्यु जो ॥ ७६ ॥ यदर्थीं आइकें निदर्शन ॥ विबुधवर्या तुज सांगेन ॥

१ पंक्ती. २ शोक करतात. ३ निरनिराळें. ४ नाशवंत. ५ आकाश. ६ अखंड. ७ अज्ञानी. ८ अतिशय. ९ परिणाम.

जेणें दृष्टांतें बुझंसी पूर्ण ॥ संशय क्षीण जेणें होय॥७७॥श्लोक॥ घटादिषुप्रनष्टेषुयथाकाशमखंडितं ॥ तथादेहेषुन ष्टेषुदेहीनित्यमलेपकः॥ २० ॥ टीका ॥ तरी आइकें दशरथनंदना ॥ दशग्रीवविध्वंसना ॥ तरी घट पट पदार्थ नाना ॥ विश्वरचना विचित्र असे ॥७८ ॥ त्या त्या पदार्थाआंत ॥ आकाश सर्वत्र वर्तत ॥ अंतर बाह्य अनुगं-त ॥ असे सतत सर्वदां ॥ ७९ ॥ ते नासल्या घट पट पदार्थ ॥ आकाश ननासे गा अखंडितार्थ ॥ खंडलें मोडलें हा अर्थ ॥ नाहीं यथार्थ लिंपलें॥९८० ॥ पदार्थ जळाल्या तें नजळे ॥ आंतपें तपल्या नपोळे ॥ उदकीं बुडाल्या विरेना जळें ॥ नव्हे मैळें मळादिकीं ॥ ८१ ॥ पदार्थजन्में नपवे उत्पत्ती ॥ पदार्थनाशें नपवे शांती ॥ धुळीं धुसरादि वृत्ती ॥ मैळ स्थिती पावेना ॥८२॥ तैसें देहादि प्रपंचजात ॥ व्यापुनि आत्मा येकू सतत ॥ नाहीं आत्मयाविरहित ॥ किंचित कदाचित कोण्हीही ॥८३॥ परि त्याचेनि संगें नव्हे संगी ॥ त्याचेनि भंगें नव्हे भं-गी ॥ त्याचेनि रंगें नव्हे रंगी ॥ अतिनिःसंगी उदासपणें ॥८४॥ देहनाशें नव्हे नाशू ॥ देहव्यापारें स्वयें उदासू ॥ देहलेपें स्वयें शुद्धांशु ॥ अविनाशू सर्वदां॥८५॥श्लोक ॥ नजायतेनाम्रियतेक्काचित्किंचित्कदाचन ॥ जगद्विवर्तरू-पेणकेवलंब्रह्मजृंभते ॥ २१ ॥ टीका ॥ अगा जया नाहीं उत्पत्ती ॥ उत्पत्त्यभावें मृत्यूची अप्राप्ती ॥ उपजती ते सर्व नासती ॥ विप्रतिपत्ति तेथें नाहीं ॥८६ ॥ जें उपजलें तें सर्वथा नासे ॥ नासलें तें सर्वदां दिसे ॥ तेथें षड्वि-कार आपैसे ॥ अनायासें प्राप्तचि ॥ ८७ ॥ उत्पत्तीचेनि निराशें ॥ षड्विकार नासलाची असे ॥ येथें नाहीं अ-

---

१ समजशील. २ मागेपुढें. ३ दडपलें. ४ सूर्य. ५ भतभेद. ६ आपोआप.

नारिसें ॥ नलगे दोष बोलावे ॥८८॥ क्वचित किंचित कदाचित ॥ यया पदाचा ऐसा अर्थ ॥ क्वचित् शब्दें स्थूळ बोलिजेत ॥ किंचित इषत वक्तृत्वें ॥८९॥ कदाचित्काळ सूचिला ॥ ऐसा पदत्रयार्थ भासला ॥ येणेंकरूनि नाहीं बोलिला ॥ जन्म नाशु भला आत्मयासीं ॥९०॥ काळ देश वस्तु विशेषें ॥ आत्मयासीं परिच्छिन्नता नसे ॥ यालागीं पदत्रयें विंन्यासें ॥ अविनाश ऐसें बोलिलें ॥ ९१ ॥ क्वचित् शब्दें कोणे ठाईं ॥ येणें देश सूचिला पाहीं ॥ देशीं उत्पत्ती नाशु नाहीं ॥ आत्मा सर्वही सर्वपणें ॥ ९२ ॥ आत्मा एकदेशी असे ॥ अन्य देश काय वोस पडला असे ॥ आत्मेविण रितें नसे ॥ उपजे नासे हे भ्रांतिचि कीं ॥ ९३ ॥ कदाचित् ह्मणिजे कोणे समयीं ॥ येणें काळ सूचिला पाहीं ॥ तरी काळें आत्म्यासीं नाशु नाहीं ॥ काळत्रयीं अबाधत ॥९४॥ उत्पत्ति स्थिती प्रळय ॥ हा एकचि काळ अनुपमेय ॥ यासिं विभागुनि काळत्रय ॥ व्यापारानुमेय बोलती ॥ ॥ ९५ ॥ काळाचें जें आस्तिक्यपण ॥ नघडे गा आत्मेनिविणें ॥ आत्मेनिविण भासक कवण ॥ काळज्ञान आत्मेनि होय ॥ ९६ ॥ काळत्रय जे काळविभाग ॥ आत्मेनिविण नघडे सांग ॥ आत्मा नसतां उत्पत्ति भाग ॥ कैसे सांग रघुनाथा ॥९७॥ आत्मा नसतां कोठें उत्पती ॥ तयावीण जगाचि स्थिती ॥ स्थिती नसतां नाशाप्रती ॥ कोण व्यंक्ति येईल ॥९८॥ उत्पत्ति स्थिती आणि नाश ॥ हा आत्मयाच्या ठांई भ्रमांश ॥ आत्मा सर्वदां अविनाश ॥ नाहीं लेश जन्ममरणा ॥ ९९ ॥ रंजताचें जन्ममरण ॥ नाहीं देखिलें शुंक्तिविण ॥ शुक्तिसत्ते

१ वेगळें. २ भाषण. ३ नाश. ४ विस्तारानें. ५ उपमेरहित. ६ आकृति. ७ रूपें. ८ शिंपी.

नें असे वर्तन ॥ शुक्तिविण असेचिना ॥ १००० ॥ भुजंगाचें जन्ममरण ॥ नाहीं देखिलें रज्जुविण ॥ स्थिती काळही जाण ॥ नाहीं वर्तन कदाचित ॥ १ ॥ जैसी जगाची वर्तती स्थिती ॥ वस्तुविण नाहीं नाशु प्राप्ती ॥ आत्मेविण जागृती सुषुप्ती ॥ स्वप्नस्थिती असेचिना ॥ २ ॥ आत्मेविण कोणाचि स्थिती ॥ आत्म्याच्या ठाईं अवस्थात्रय वर्तती ॥ निमिषोन्मेष आत्मेन होती ॥ दिवा रात्रीं ब्रह्मीं वर्ते ॥ ३ ॥ आत्मा काळें नव्हे परिच्छिन्न ॥ काळें नव्हे जन्म मरण ॥ वस्तु वस्तुत्वें परिपूर्ण ॥ नव्हे क्षीण किंचितपैं ॥ ४ ॥ वस्तु वस्तुत्वें अखंड स्थिती ॥ वस्तु वस्तुत्वें नित्य प्राप्ती ॥ वस्तु वस्तुत्वें प्रकाश गती ॥ स्वयं व्यक्ति वस्तुपणें ॥ ५ ॥ वस्तु अखंड चिद्विलास ॥ वस्तु अखंड स्वप्रकाश ॥ वस्तु काळत्रयीं अविनाश ॥ सावकाश पूर्णत्वें ॥ ६ ॥ तया कैंचें जन्म मरण ॥ अंज अव्यय नित्यानंदघन ॥ स्वप्रकाश चिद्घन ॥ अतिगहन अपार ॥ ७ ॥ अनात्मयाची जन्ममरण कथा ॥ आरोपिती आत्मयाच्या माथां ॥ ते समूळ भ्रांति गा रघुनाथा ॥ नव्हे तत्वतां ज्ञानदृष्टी ॥ ८ ॥ जग हें वास्तव असावें ॥ तरी उत्पत्ती नाश यास मानावें ॥ जग विवर्तरूप आघवें ॥ ब्रह्म स्वभावें विस्तारिलें ॥ ९ ॥ जैसा शुक्तींचा विवर्त रजँत ॥ तेणें रूपें शुक्तीच भासत ॥ पारि रजत वस्तुत्वें सत्य ॥ नघडे निश्चित रघुनाथा ॥ ॥ १०१० ॥ दीनमणी रश्मिचा विवर्त ॥ तें हें मृगांभ बोलिजेत ॥ परि तेणें रूपेंचि विजृंभित ॥ रश्मिचि भासत जळरूपें ॥ ११ ॥ तैसें जग विवर्तरूपें ब्रह्मचि एक ॥ ब्रह्मचि शोभे गा सम्यक ॥ ब्रह्मेंविण दुजें नाहीं देख ॥

१ जागृती, स्वप्न, सुषुप्ती. २ डोळे झांकणें व उघडणें. ३ जन्मरहीत. ४ अविनाशी. ५ भास. ६ शिंपी. ७ रूपें. ८ सूर्य. ९ किरणाचा. १० मृगजळ.

येकायेक तेंचि तें ॥ १२ ॥ श्लोक ॥ आकाशादपिविस्तीर्णःशुद्धःसूक्ष्मोऽव्ययःशिवः ॥ यआत्मासकथंरामजायते-म्रियतेऽथवा ॥ २२ ॥ टीका ॥ अगा जें आकाशाहुनि विस्तीर्ण ॥ जयासीं मर्यादाचि नाहीं जाण ॥ वस्तुता जें उपमेविहीन ॥ पूर्णानंदघन पूर्णत्वें ॥ १३ ॥ अगा आघवीं असती तीन परिमाणें ॥ एक अनुपरिमाण मध्यम परिमाण ॥ तिसरें जाण महत्परिमाण ॥ इतुकें गमन परिमाणाचें ॥ १४ ॥ त्यामाजि आकाश हें महत्परिमा-ण ॥ हें शास्त्रसिद्ध केलें जाण ॥ आत्मा तो निःपरिमाण ॥ उपमेविहीन ययालागीं ॥ १५ ॥ तैशीच शुद्धा अ-शुद्धाचि व्यावृत्ती ॥ ह्मणोनि ब्रह्मासिं शुद्ध ह्मणती ॥ या गुणत्रयाचि व्याप्ती ॥ नाहीं वर्तती तियेठायीं ॥ १६ ॥ नेती मुखें अनात्मनिरासु ॥ केलिया उरे जो शुद्धांशु ॥ तोचि शुद्ध शब्दें बोलिजे परेशु ॥ भ्रमनिरासु जेथें होय ॥ १७ ॥ तेंचि शुद्धशब्दें बोलिजे ॥ शुद्धत्वें सूक्ष्म ह्मणिजे ॥ जें जें शुद्ध सूक्ष्म ह्मणिजे ॥ जाण निर्व्याजें रघुराया ॥ १८ ॥ जें जें अशुद्ध करणा ग्राह्य ॥ तें तें अशुद्ध अनात्मा बाह्य ॥ अतींद्रिय तें शुद्ध सबाह्य ॥ अतीगुह्य सूक्ष्म-पणें ॥ १९ ॥ जें जें शुद्ध आणि सूक्ष्म ॥ तेंचि तें बोलिजे अव्यय परम ॥ जया व्यय नाहीं तें सर्वोत्तम ॥ परा परम परब्रह्म ॥ १०२० ॥ जें उत्पत्तिवंत षड्विकार ॥ तेंचि तें व्यय पावतसे क्षर ॥ ब्रह्म व्ययातीत अक्षर ॥ नि-र्विकार सत्यत्वें ॥ २१ ॥ जया काळत्रयीं व्ययो नाहीं ॥ तेंचि तें सर्वदां शिवरूप पाहीं ॥ दुःख व्यावृत्ति केलिया ही ॥ कोणेही समयीं दुःखरूप नव्हे ॥ २२ ॥ जें कीं उत्पत्ति क्षयातें पावे ॥ तें तें दुःखरूपचि स्वभावें ॥ ब्रह्म तें

१ विवंचना. २ निराकरण. ३ शुद्ध. ४ इंद्रियां. ५ अविनाशी. ६ नाश.

षड्विकाररहित जाणावें ॥ ह्मणोनि स्वभावें सुखरूप ॥ २३ ॥ यालागीं सर्वदां सुखरूप ॥ तेंचि शिवत्वें बोलिजे अमुप ॥ जें कीं आनंदाचे वडंप ॥ जें निर्लेप सर्वदां ॥ २४ ॥ एवंविध जो आत्मा ॥ तो कैसा उपजे नीमे गा रघूत्तमा ॥ ऐसेंनि बोलिजे रामा ॥ मूळ भ्रमा सत्य जाण ॥ २५ ॥ श्लोक ॥ सर्वमेकमिदंशांतमादिमध्यांतवर्जितं ॥ भावाभावविनिर्मुक्तमितिमत्वासुखीभव॥ २३ ॥ टीका ॥ मुख्य भ्रमू ह्मांचि रघुपती ॥ शुद्ध ब्रह्मीं विश्व आरोपिती ॥ हे अविचारित सिद्धि ह्मणती ॥ विचाराप्रति असेचिना ॥२६॥ स्थाणुच्याठाईं भ्रमु जाला ॥ तो अविचारेंचि सिद्धि गेला ॥ तेणें कार्यार्थु उपजविला ॥ विस्तारिला भयकंपु देहीं ॥ २७ ॥ तोचि विचारुनी पाहतां ॥ तंव तो स्थाणुचि तत्वतां ॥ चोर तेथें विचारितां ॥ समूळ वृथा रघुवर्या ॥ २८ ॥ नाना रज्जुच्याठाईं जैसें ॥ अँहिधारामाळादि भ्रमु भासे ॥ त्याचें मुख्य स्वरूप पाहतां दिसे ॥ सावकाशें रज्जुचि येक ॥ २९॥ तैसें अज्ञानभ्रमेंकरुनी ॥ ब्रह्मीं विश्वाभास देखिजे जनीं॥हे अविचाराची करणी ॥ विचार क्षणीं नाहींचि होय॥१०३०॥मृगांभाचें मूळ पाहतां ॥ रश्मिवांचुनी नाहीं तत्वतां ॥ तैसें प्रपंच स्वरूप विचारितां ॥ वस्तु तत्वतां अढळपणें ॥ ३१ ॥ तैसा विश्वाभास तो भ्रम ॥ त्याचें निजस्वरूप तें परब्रह्म ॥ हे खूण जाणे गुरुगंम्य ॥ अती सुवर्म जाण तया ॥३२ ॥ हें चराचर विश्व सर्व ॥ तें एकचि परब्रह्म स्वयमेव ॥ येथें नाहीं गा आणीक भाव ॥ करुनी अनुभव पाहें रामा ॥ ३३ ॥ अगा जयाविण जें नाहीं ॥ तें वस्तुत्वेंचि पाहीं ॥ येथें नाहीं आणीक

१ शोभा. २ अलिप्त. ३ खांबाच्या. ४ सर्प. ५ मृगजळाचें. ६ सद्गुरुचा अनुग्रही.

कांहीं ॥ संशयो देहीं उपजोंचि नेदी ॥३४॥ साचावेगळें लटिकेंचि नाहीं ॥ हें तव अनुभव सिद्धचि पाहीं ॥ रजतसिद्धी स्वतंत्र पाहीं ॥ शुक्तिंविण नाहीं देखिली ॥३५॥ दिसणें नदिसणें भुजंगासीं ॥ रज्जुविण असे कोणे देशीं ॥ यालागीं तो तियेसीं ॥ भिन्नतेसीं पावेना ॥ ३६ ॥ अभिन्न ह्मणतां वस्तु नव्हे ॥ भिन्न तरी कोणपदार्थ आहे ॥ भिन्नाभिन्नचि तें कोणीचि नव्हे ॥ यालागीं आहे रज्जुचि एक ॥३७॥ तैसें विश्व हें संत ह्मणावें ॥ तरी ब्रह्मावेगळें सिद्धि जावें ॥ आणि स्वतंत्र वस्तुत्वें असावें ॥ तें नसंभवे अनात्मपणें ॥३८॥ जें जें इंद्रियांसीं दृश्य होय ॥ तें तें जाण अनात्माचि आहे ॥ अनात्मा तो नाशिवंत पाहे ॥ हें अनुमान आहे वेदांतशास्त्रीं ॥ ३९ ॥ प्रपंच मिथ्या दृश्यत्वांत ॥ जें जें दृश्य मिथ्याभूत ॥ जैसा घट दृश्यपणें नाशिवंत ॥ सर्वथा असत्य मिथ्यापणें ॥१०४०॥ऐसीं अनुमानें अनंतें ॥ वेदांतशास्त्रीं उपपादितें ॥ करिती ग्रंथ विस्तारातें ॥ वाणी प्राकृत किती बोलावी ॥ ४१ ॥ यालागीं सर्व विश्व ब्रह्म बोलिजे ॥ ऐसेंचि वेदें निरूपिजे ॥ सर्वं खल्विदंब्रह्म जें ॥ येथें बुझिजे हाचि अर्थ ॥ ४२ ॥ सर्व विश्व हें ब्रह्मस्थिती ॥ ऐसें सर्वदां बोलती श्रुती ॥ परिणाम ते विश्वमूर्ती ॥ संशय चित्तीं ह्मणीं धरा ॥ ४३ ॥ विश्व हें ब्रह्माचा विवर्तू ॥ ऐसें बोले वेदांत सिद्धांतू ॥ याचा पूर्वींच दिधला दृष्टांतु ॥ नव्हे मांतु अनारिसी ॥४४॥ यालागीं सर्व विश्व हें एक ॥ एक शब्दें ब्रह्मचि सम्यक ॥ तेंचि तें परि नाहीं आणिक ॥ शांत कौतुक परियेसा ॥ ४५ ॥ शांत शब्दें अविकारी ॥ नाहीं विकारु तिळभरी ॥ क्षोभ नाहीं जयाभीतरीं ॥

१ रूपें. २ शिंपीविण. ३ नाशीवंतपणामुळे. ४ नीर्णयकरितात. ५ समजणें. ६ भास. ७ गोष्ट. ८ भिन्न.

तेंचि सर्वांपरी शांत जाण ॥ ४६ ॥ जें आदिमध्यांत वर्जित ॥ तेंचि तें ब्रह्म सदोदित ॥ नाहीं उपजलें देखिजे-
त ॥ कोण ह्मणिजेत आदि याची ॥४७॥ जे वस्तुसीं आदि नाहीं ॥ तें राहे वसे कोणें ठाईं ॥ स्थितीविण ना-
शु नाहीं ॥ अविनाशु पाहीं ययालागीं ॥४८॥ जयासीं आदि मध्य अंत ॥ ते वस्तु पाहीं नाशिवंत ॥ जैसा घट
आदिमध्यांत ॥ नासे निश्चित रघुनाथा ॥४९॥ पृथ्वीपासुनी जन्म घटासीं ॥ स्थिती आश्रयही तियेसीं ॥ भूमीच
विलयासीं ॥ निश्चयेसीं नचुके ॥ १०५० ॥ जिये वस्तुसीं आदि असे ॥ ते सर्वथा शेवटीं नासे ॥ या तिहीं विरहित
वस्तु असे ॥ अखंड वसे अविनाशपणें ॥ ५१ ॥ या ब्रह्माची माता पिता ॥ कोण ते सांगें जानकीकांता ॥ यासि
आश्रय कोण तो वसतां ॥ मा नाश तत्वतां कोणेंठाईं ॥ ५२ ॥ जयापासाव सर्व जग जालें ॥ परि तें जैसें तैसें-
चि संचलें ॥ विश्वोत्पत्ती नाहीं वेंचलें ॥ नाहीं नासलें विश्वनाशीं ॥ ५३ ॥ सर्वांचें जें आदिभूत ॥ आदि अंत
मध्य विवर्जित ॥ तेंचि तें ब्रह्म सदोदित ॥ विश्वभरित परिपूर्णत्वें ॥५४॥ जें कीं भावाभाव विनिर्मुक्त ॥ तेंचि
ब्रह्म जाण प्रविविक्त ॥ भाव शब्दें अस्तित्व ॥ अतिशून्यार्थ तो अभाव ॥ ५५ ॥ अस्तीशब्दें नव्हे दृश्य ॥ अ-
भावशब्दें नव्हे अदृश्य ॥ दृश्यादृश्य सामरस्य ॥ वस्तु अनिर्देश्य कांहींच नव्हे ॥५६॥ अथवा भावशब्दें का-
र्य जाण ॥ अभाव बोलिजे कारण ॥ कार्य कारण विहीन ॥ वस्तु परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ५७ ॥ येक कार्य शब्दें व-
स्तु असावें ॥ परि कारण ब्रह्मासि बोलावें ॥ ब्रह्मचि कार्य ह्मणावें ॥ तरी कार्य नसंभवे ब्रह्मासि पैं ॥ ५८ ॥

---

१ आरंभ. २ नाशासी. ३ विस्तारलें. ४ वेगळें. ५ निराळें. ६ स्वप्रवत. ७ ऐक्य. ८ अंगुलीनें दाखविण्यासारखें नव्हतें.

यालागीं कार्य कारण विहीन ॥ ब्रह्मचि येक परिपूर्ण ॥ अथवा भाव शब्दें स्थूळ जाण ॥ सूक्ष्म पूर्ण अभाव तो ॥ ५९ ॥ स्थूळ सूक्ष्म शब्दें विश्व बोलिजे ॥ तें तंव अनात्मपणें ब्रह्म नव्हिजे ॥ ब्रह्म तें अविनाश सहजें ॥ भावाभाव नाहीं जेथें॥१०६०॥ऐसें ब्रह्म जाणोनी ॥ सुखिया होईं सुखरूप होउनी ॥ अल्पही दुःख स्वप्नीं ॥ जनीं वनीं नदेखसी ॥ ६१ ॥ हेंचि बोलिजे गा ज्ञान ॥ येणेंचि होइजे सुखसंपन्न ॥ हें नेणिजे तेंचि अज्ञान ॥ दुःखकारण सर्वार्थीं ॥ ६२ ॥ शहाणा बोलिजे ज्ञानवंत ॥ मूर्ख तो अज्ञानी ह्मणिजेत ॥ मूर्खाचें मूर्खहत जीवित ॥ अतीनिंदित सर्वार्थीं ॥ ६३ ॥ मूर्खाचें जिणें तें व्यर्थ ॥ तो नररूपें गाढव मूर्तिमंत ॥ पापी निंद्य हतजीवित ॥ निंदितार्थ परियेसी ॥ ६४ ॥ श्लोक ॥ वरंशरावहस्तस्यचांडालागारवीथिषु ॥ भिक्षार्थमटनंरामनमौर्ख्यहतजीवितं ॥ २४ ॥ टीका ॥ अगा हातीं घेउनियां खापर ॥ चांडाळाच्या घरोघर ॥ भिक्षार्थ हिंडणें तें थोर ॥ अतीवर श्रेष्ठपणें ॥ ६५ ॥ चांडाळ गृहींचिया वीथि ॥ हिंडणें खापर घेउनि हातीं ॥ भिक्षा मागणें दीनवृत्ती ॥ श्रेष्ठत्व वृत्ती तीतें ह्मणिजे ॥ ६६ ॥ परि मौर्ख्य करूनि उपहत ॥ जें कीं अमंगळ जीवित ॥ तयापरिस तेंचि हत ॥ जें कीं पूर्वोक्त रघुनाथा ॥ ६७ ॥ अतिमूर्खता तें अज्ञान ॥ अज्ञानीयाचें व्यर्थ जीवन ॥ धिग् धिक् तें ज्ञानपण ॥ प्रपंचीं वर्तन जेणें होय ॥ ६८ ॥ परमानंदाची प्राप्ती ॥ जयासीं नाहीं गा विश्वमूर्ति ॥ तयाचें जिणें त्रिजगतीं ॥ जाण सर्वार्थीं उपहत ॥ ६९ ॥ मुख्य ज्ञानावांचुनी जें वर्तणें ॥ तेंचि समूळ जाण मूर्खपण ॥ त्याचें

१ दृश्य. २ अदृश्य. ३ आत्मज्ञानी संत. ४ विषयासक्त. ५ रस्त्यावर. ६ निस्तेज. ७ सद्गुरुची.

जीवित शव रूपजाण ॥ आनंदघन प्राप्ती नाहीं ॥ १०७० ॥ तयापरिस गा रघुपती ॥ हिंडणें उत्तम चांडाळ वींथि ॥ भिक्षा मागावी दीनवृत्ती ॥ परि मूर्ख स्थिती नसावें ॥ ७१ ॥ अथवा ज्ञानालागीं अंत्यजाच्या गृहीं ॥ हातीं खापर घेउनी प्रत्यहीं ॥ भिक्षा मागोनि ज्ञान देहीं ॥ साधावें याही जाणतेनी ॥ ७२ ॥ परी मूर्खपणें नसावें सर्वथा ॥ अज्ञानी मूर्खांचें जन्म वृथा ॥ तें तंव तुच्छ गा रघुनाथा ॥ सबाह्य रिता ज्ञान शून्य जो ॥ ७३ ॥ अगा मूर्खपणायेवढें दुःख ॥ तिहीं लोकीं नाहीं गा देख ॥ जरी उपजले दोष अनेक ॥ परी दुःखदायक ते नव्हती ॥ ७४ ॥ श्लोक ॥ नव्याधिर्नविपन्नापत्तथान्यद्वापिभूतले ॥ दुःखायस्वशरीरोत्थंमौर्ख्यमेतद्यथानृणां ॥ ॥ २५ ॥ टीका ॥ या शरीरीं नाना व्याधि करून ॥ शूळ ताप क्षय रोग कुष्ट जाण ॥ जळोदर अस्थि आर्ष दारुण ॥ इये नव्हती पूर्ण दुःख हेतू ॥ ७५ ॥ ऐसीया अनेका व्याधी ॥ दुःखदायक नव्हती त्रिशुद्धी ॥ तैसीच विपयांनीं दुःख समृद्धी ॥ जाल्या क्षयव्याधी दुःख नव्हे ॥ ७६ ॥ उदकीं बुडतां महापुरीं ॥ तैसें दुःख नव्हे गा शरीरीं ॥ गृहभंगु पुत्रशोक भारी ॥ दुःखसागरीं बुडवीतना ॥ ७७ ॥ तैसेंचि नापत ऐसा पाठ ह्मणतां ॥ आपत्ती दुःख नेदी सर्वथा ॥ दरिद्रदुःखें नानापरी पीडितां ॥ नेदी आरंबळता इत्यादि दुःखें ॥ ७८ ॥ अनेक दुःखें ये भूतळीं ॥ असंख्य आहेति पापमेळीं ॥ परि ऐसी दुःखजाळीं ॥ मौर्ख्य तळमळी ऐसी नाहीं ॥ ७९ ॥ इत्यादिकीं जें दुःख होय ॥ तें काळेंकरूनी नासोनि जाय ॥ दीर्घ काळ परि येचि देहीं होय॥देहांतर पाहे नेदिती ॥

१ प्रेतरूप. २ रस्ता. ३ सर्वातीत राहणारा. ४ दररोज. ५ दुःखाभाव. ६ विपत्ति.

॥१०८०॥ मूर्खपणाचें दुःख कैसें ॥ त्यासि प्रतिकार औषध नसे ॥ अज्ञानें करूनि कोटि कल्पांशें ॥ भोगवीतसे दुःखसंतती ॥ ८१ ॥ येरें दुःखें संबोखणें औषधें काळें ॥ नासोनि जाती गा सकळें ॥ मौर्ख्य तें वाढे इत्यादि मेळें ॥ कोणे काळें संपेना कीं ॥ ८२ ॥ आतां मौर्ख्य तेंच दुःख तें कैसें ॥ तेंही सांगों अल्पचि ऐसें ॥ सावधान होउनी विश्वेशें ॥ सावकाशें परिसावें ॥ ८३ ॥ तरी शरीरीं जे मूर्खता ॥ तेचि मनुष्यासी दुःखरूपता ॥ जेणें निज विसरोनि अनर्थता ॥ पडे सर्वथा कल्प कोडी ॥ ८४ ॥ तरी मूर्खता तें मुख्य अज्ञान ॥ अज्ञानें देहबुद्धी होय पूर्ण ॥ देहबुद्धीनें मीं तूंपण ॥ स्त्री पुत्र जाण देहबुध्या ॥ ८५ ॥ द्रव्य पशु आणि संपत्ती ॥ वैभव पौत्र स्नुंषा नाती ॥ इष्ट मित्र सुहृद सांगाती ॥ सर्व असती देहबुद्धीस्तव ॥ ८६ ॥ स्वामि सेवक इतर जण ॥ त्याहुनी इतर वैरगण ॥ हे देहबुद्धीस्तव संपूर्ण ॥ नाहीं आन रघुनाथा ॥ ८७ ॥ त्यांचेनि संगें सुखप्राप्ती ॥ वियोगें करूनि दुःख असती ॥ प्रिय भाषणें सुख उन्नती ॥ अप्रियें व्यक्ती दुःखाची ॥ ८८ ॥ स्वशरीर दुःखें करूनी ॥ आरंबळतू जाय प्रतिक्षणीं ॥ स्वकीयांचें दुःख त्याहुनी ॥ दुःख मानी आपणया ॥ ८९ ॥ ह्मणे माझा प्राण जरी जाता ॥ आणि या पशूची बरी होती व्यथा ॥ तरी थोर पावतों पुरुषार्था ॥ ऐसें दुःख नसतां बहु मानी ॥ ॥ १०९० ॥ इत्यादि नाना दुःखें इहलोकीं ॥ तो परलोकीं काय होईल सुखी ॥ स्वकीयाचेनि संगें अनेकी ॥ होय नरकीं यातना भोक्ता ॥ ९१ ॥ इतुकेयांचें मूळ मूर्खपण ॥ मूर्खपणें दुःखें दारुण ॥ मूर्खपणें अधःपतन ॥

१ दूरीकरण. २ समजणें ३ आत्मस्वरूप. ४ सूना. ५ वृद्धि. ६ प्रकटपणा. ७ आपल्याचें. ८ नर्कवास.

योनी भोगणें मूर्खत्वें होय ॥ ९२ ॥ मूर्खपणें दुःखाचा डोंगर ॥ मूर्खपणें विषयाचा सागर ॥ मूर्खपणें नरक थो-र ॥ यातना फार मूर्खपणें ॥ ९३ ॥ मूर्खपण योनिदायक ॥ मूर्खपण ज्ञानछेदक ॥ मूर्खपण अतिनिंदक ॥ क्लेश-दायक मूर्खपण ॥ ९४ ॥ मूर्ख तें अज्ञान गा रघुपती ॥ हें पूर्वीच सांगीतलें गा तुजप्रती ॥ याची टाकावी गा संगती ॥ हें सर्वार्थीं भयदायक ॥ ९५ ॥ नाना व्याधी शोक दुःख होती ॥ तेही अज्ञानकृतचि गा रघुपती ॥ अज्ञानेंचि देहबुद्धी वाहती ॥ दुःख प्राप्ती तेणेंचि होय ॥ ९६ ॥ तें आंगीं नसतां मूर्खपण ॥ मी देही ऐसें ह्मणें कोण ॥ देहबुद्धी नसतां दुःखानुसंधान ॥ शोक दारुण कोणासीं ॥ ९७ ॥ यालागीं दुःखाचें दुःख कारण ॥ तें हें मुख्य मूर्खता अज्ञान ॥ तें नसतां सुखसंपन्न ॥ दुःखभान स्वप्नीं नाहीं ॥ ९८ ॥ येथें संपलें वैराग्य प्रकरण ॥ वैराग्याचा मथितार्थ इतुका पूर्ण ॥ ज्ञान साधनीं वैराग्य प्रकरण ॥ अन्य साधन असेचिना ॥ ९९ ॥ वैराग्येवि-ण नसाधे ज्ञान ॥ वैराग्येविण इंद्रिय प्रत्यक् प्रवण ॥ नव्हती साधितां साधन ॥ सहस्त्र जाण कल्पकोटी ॥ ॥ ११०० ॥ वैराग्येविण विवेकु नाहीं ॥ वैराग्येविण निर्मूळ सर्वही ॥ वैराग्येविण नघडे कांहीं ॥ भक्तिज्ञान कांहीं उपजेचिना ॥ १ ॥ ययालागीं सर्वस्वासीं कारण ॥ एक वैराग्य अकृत्रिम जाण ॥ वैराग्य तेथेंचि स्थीर ज्ञान ॥ नाहीं आन रघुनाथा ॥ २ ॥ वैराग्येविण नाहीं ज्ञान ॥ ज्ञानेविण कैंचें साधन ॥ शांतिसुख जें संपूर्ण ॥ वैराग्येविण प्राप्त कैंचें ॥ ३ ॥ यालागीं गा रघुनाथा ॥ असावी वैराग्याची पूर्णता ॥ तेणेंविण नये हाता ॥

१ दुःखाचें ध्यान. २ विचारानें सिद्ध झालेला अर्थ. ३ आत्मप्रवृत्ती. ४ स्वाभावीक. ५ खरें.

ज्ञान तत्वतां परियेसा ॥ ४ ॥ नाना साधनें करिजेती ॥ तरी वैराग्येविण नव्हे प्राप्ती ॥ यदर्थीं श्रुति ऐसें बोलती ॥ आइक रघुपति सांगेन ॥ ५ ॥ श्रुती ॥ नकर्मणानप्रजयाधनेन ॥ त्यागेनैकेअमृतत्वमानशुः ॥ १९ ॥ अर्थ ॥ अगा कर्मे करितां नव्हे ज्ञान ॥ कर्म तें आविद्यक पूर्ण ॥ परस्परें अविरोध जाण ॥ अज्ञान छेदन कैसेंनि होय ॥ ६ ॥ संमतिश्लोक ॥ अविरोधितयाकर्मणानाविद्यांनिवर्तयेत् ॥ विद्याविद्यांनिहंत्येवतेजस्तिमिरसंघवत् ॥४०॥ टीका ॥ यालागीं गा रघुपती ॥ अविद्या कर्माची जनित्री ॥ ययालागीं कर्मे अविद्या न निवृत्ति ॥ आईक व्यक्ति सांगेन ॥ ७ ॥ रश्मीपासाव जें मृगजळ ॥ तें कार्य रश्मी नाशील सकळ ॥ किंवा उदकाचे कल्होळ ॥ तेणें जळ वाढे कीं नासे ॥ ८ ॥ यालागीं अज्ञानाचें जें विरोधी ॥ तें ज्ञान अज्ञानासीं बाधी ॥ तें जनासीं अंधःकार समृद्धी ॥ परि तमातें तम बाधी हें नघडे ॥ ९ ॥ यालागीं कर्मे अज्ञान नानिरसे ॥ पुत्रें अज्ञान नासे कैसें ॥ ह्मणती वेद बोलिले असें ॥ तेंही कैसें सांगेन ॥ १११० ॥ श्रुति ॥ नापुत्रस्यलोकोस्तीतितत्सर्वेपशवोविदुः ॥ ॥ २० ॥ अर्थ ॥ ऐसें प्रत्यक्ष वदे श्रुती ॥ पुत्रें मोक्ष होय ह्मणती ॥ तरी पुत्रें होय स्वर्गप्राप्ती ॥ अज्ञाननिवृत्ती कदां नव्हे ॥ ११ ॥ अथवा धनादिकांचेनि दानें ॥ कैसेनि नाशु पावे अज्ञानें ॥ अधिकचि फार होइजे तेणें ॥ फळ भोगणें नाना योनी ॥ १२ ॥ ज्ञानोत्पत्तीचा उपाय ताता ॥ मुख्य त्यागुचि बोलिजे गा रघुनाथा ॥ त्यागु तेंचि वैराग्य सर्वथा ॥ अनुभवाच्या माथां पाविजे जेणें ॥ १३ ॥ यालागीं ब्रह्मप्राप्तिप्रती ॥ येक वैराग्य कारण

१ अज्ञानरूपी. २ सख्य. ३ परमार्थ, अंतर्मुखवृत्ति. ४ प्रकार. ५ किरणापासून. ६ तरंग. ७ द्वेषी. ८ अंधःकारातें.

गा रघुपती ॥ जेणें होय ज्ञानाची उक्ती ॥ व्यर्थ बोलती वाचाळपणें ॥ १४ ॥ येथें अष्टावक्र संमती ॥ कारण वैराग्य बोलिलें ज्ञानाप्रती ॥ तेंचि आईक जानकीपति ॥ संशय चित्तीं नराहे जेणें ॥ १५ ॥ संमतिअष्टावक्र ॥ मुक्तिमिच्छासिचेत्तातविषयान्विषवत्त्यज ॥ क्षमार्जवदयातोषसत्यंपीयूषवद्भज ॥ ४१ ॥ आदौविजित्यविषयान्मदमोहरागे ॥ टीका ॥ इत्यादिकी नाना संमति ॥ येथें ल्याहाव्या किती ॥ येक वैराग्यचि ज्ञानाप्रति ॥ स्वरूपप्राप्तीसीं कारण ॥ १६ ॥ रघुनाथ ह्मणती ऋषिराया ॥ थोर संशय मना माझिया ॥ उपजे तो त्यजावया ॥ समर्थ स्वामिया तूं येक ॥ १७ ॥ अनेक शास्त्रीं वैराग्य बोलिलें ॥ विषय निंद्यपणें सर्वत्र दूषिले ॥ विषयसुखही स्वतां अनुभविलें ॥ नश्वर देखिलें सर्वांपरी ॥ १८ ॥ ऐसें असोनि श्रीगुरुराया ॥ वैराग्य नुपजे काय ह्मणोनियां ॥ अधिक प्रीति विषयीं लागावया ॥ कारण स्वामिया निरूपीं ॥१९ ॥ एवं वसिष्ठ ह्मणती गा रघुपती ॥ येथें हेंचि कारण गा महामती ॥ विषय शाश्वत मानुनी भुलती ॥ मिथ्यत्व चित्तीं बाणेना॥११२०॥ जरी नाना शास्त्रें आइकती ॥ तरी वैराग्य नुपजे चित्तीं ॥ उपजल्याही क्षणाप्रती ॥ नाशु सर्वार्थीं मळीणपणें ॥२१॥ विषयीं दुःख ही देखती ॥ नासल्याचि होय प्रतीति ॥ परि मिथ्यत्व नबाणें चित्तीं ॥ ह्मणोनि सेविती तेंचि ते ॥ ॥ २२ ॥ प्रारब्धकर्में चित्त मळीण ॥ तेणें जग मिथ्या नबाणें जाण ॥ जग सत्यत्वें नव्हे वैराग्य पूर्ण ॥ जाणखुण रघुवर्या ॥ २३ ॥ तें वैराग्य नुपजावया कारण ॥ जंव विषयीं नव्हे मिथ्याभान ॥ मिथ्यादर्शनें वैराग्य पूर्ण ॥ न साधितां आपण पाठिं लागे ॥ २४ ॥ अनेक साधनेंही साधितां ॥ कांहींचि वैराग्य नुपजे चित्ता ॥

१०

जग हें मिथ्यत्वें जाणतां ॥ वैराग्य तत्वतां पूर्ण होय ॥ २५ ॥ मिथ्या वस्तुचा निश्चयो जालिया ॥ मग प्रीति नधरी तया विषया ॥ यालागीं मिथ्यत्व देखावें रघुराया ॥ दृश्या यया सर्वदां ॥ २६ ॥ हें आइकोनी श्रीरघुपती ॥ बोलता जाला श्रीगुरुप्रती ॥ जग मिथ्यत्वाचि प्रतीति ॥ कोणे रितीं होय स्वामी ॥ २७ ॥ सत्य जग असतां श्रीगुरुराया ॥ तें मिथ्यत्वें कैसेंनि ये मना माझिया॥ तें मजप्रती सांगावया ॥ कृपा करूनि अनुवादावें ॥२८॥आइकोनि रघुनाथाची वाणी ॥ श्रीवसिष्ठ हर्षे निर्भरे मनीं ॥ ह्मणें धन्य शिष्या शिरोमणी ॥ अंतःकरणीं- लागटपणें ॥२७ ॥ हेंचि वैराग्याचें लक्षण ॥ परमार्थ प्राप्तीचि तळमळ पूर्ण ॥ चित्तीं लागली संपूर्ण ॥ लागटपणें याचि नावें॥११३०॥अतिश्रद्धा असेल जरि चित्तीं ॥ तेणेंचि करी प्रश्नोक्ती ॥ गुरुवचन तें अतिप्रीति ॥ स्वीकारिती अत्यादरें ॥३१॥ परि आईक आतां रघुपती ॥सांगेन तुझ्या प्रश्नाची उत्तरोक्ती ॥ ते येकाग्र आइकतां चित्तीं ॥ ते मिथ्या प्रतीति प्रपंचु हा ॥ ३२ ॥ तें उत्तर प्रकरणें करुनी ॥ सांगेन तुज कोदंडपाणी ॥ तेंचि आइकें चित्त देउनी ॥ परमार्थ धंणी जेणें होय ॥ ३३ ॥ ऐसें वासिष्ठऋषी बोलिले ॥ तेथें पूर्व प्रकरण संपलें ॥ तें यथामति वाखाणिलें ॥ सिद्धि पावलें सद्गुरुकृपा ॥ ३४ ॥ रंगनाथ ह्मणें श्रीकृष्णानंददासु ॥ सर्वांविषईं होइजे उदासु ॥ तेंचि वैराग्य सावकाशु ॥ विषय लेशू नाभिलाषीजे॥११३५॥ इतिश्रीयोगवासिष्टसारेश्रीवसिष्ठरामसंवादेवैराग्यप्रकरणंनामप्रथमप्रकरणंसमाप्तं ॥ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ संमति ॥४१॥श्लोक॥२५॥श्रुति॥२०॥

१ पुन्हाबोलावें. २ पूर्ण. ३ उत्सुकतेनें. ४ स्वामी. ५ सांगितलें.

॥ इति श्रीयोगवासिष्ठसारे प्रथमं वैराग्यप्रकरणंसमाप्तम् ॥

# ॥ अथ श्रीयोगवासिष्ठसारेद्वितीयजगन्मिथ्याप्रकरणप्रारंभः ॥

१८



॥ श्रीगणेशायनमः ॥ ॥ जयजयजी श्रीगुरुराया ॥ नमन करूनि तुझिया पायां ॥ ब्रह्मकथा निरूपावया ॥ देईं स्वामिया उन्मेषु मज ॥ १ ॥ तुझी कृपा झालियावरी ॥ वेदार्थु वाळंगे वैखरी ॥ तेथें अपूर्व कायजी अवधारीं ॥ भवगजकेशरी परियेसीं ॥२॥तुझी होतांचि कृपादृष्टी ॥ होय अपरोक्षें स्वरूपेसीं भेटी ॥ तेथें सिद्धि होय वाचासृष्टी ॥ शब्द परिपाठी काय नवल ॥ ३ ॥ तूं वाचादि इंद्रियांचा ईशु ॥ ह्मणोनि बोलिजे हृषीकेशु ॥ करिसी सर्व अंतःकरणा प्रकाशु ॥ जगन्निवासु स्वप्रकाशें ॥ ४ ॥ यदर्थीं बोलतसे श्रुती ॥ तूं सर्वेंद्रियां प्रकाशमूर्ति॥ परि इंद्रियें तुज नेणती ॥ एक संमति गुरुराया॥५॥ श्रुती ॥ यद्वाचानभ्युदितंयेनवागभ्युद्यते इति ॥१॥ टीका ॥ वाचा हे जाण उपलक्षण ॥ परि सर्वेंद्रियें नेणती जाण ॥ आणि वाचादिकांचें प्रकाशन ॥ स्वयें आपण तूंचि येक ॥ ६ ॥ श्रुती ॥ यन्मनसानमनुतेयेनाहुर्मनोमतं ॥ तदेवब्रह्मत्वंविद्धिनेदंयदिदमुपासते ॥ २ ॥ यच्चक्षुषानपश्यतियेनचक्षूंषिपश्यंति ॥ तदेवब्रह्मत्वंविद्धिनेदंयदिदमुपासते ॥३॥ यच्छ्रोत्रेणशृणोतियेनश्रोत्रमिदंश्रुतं ॥ तदेवब्रह्मत्वंविद्धिनेदंयदिदमुपासते ॥ ४ ॥ इत्यादि ॥ टीका ॥ एवं सकळांचा मथितार्थ ऐसा ॥ कोणीच तुज नप्रकाशी विश्वेशा ॥ तूंचि प्रवर्तक स्वप्रकाशा ॥ इंद्रियां ऐसा प्रकाशिसी ॥ ७ ॥ जें कीं सकळांतेंहि प्रकाशि ॥ तेंचि परब्रह्म सर्वस्वेसीं ॥ ऐसें श्रुती सांगे सर्वांसीं ॥ उपासावयासि निरंतर॥८॥जे ऐसें जाणोनि नकरिती उपास्ती ॥ त्यांसीं परम नाश्च बोले श्रुती ॥ ते भवार्णवींच हिंडती ॥ निरंया जाति निश्चयेसीं ॥ ९ ॥ श्रुती ॥ नचेदि-

१ ज्ञान, उल्लास. २ प्राप्तहोई. ३ वाचा. ४ प्रत्यक्ष. ५ उदाहरण, उपमा. ६ चाळक. ७ उपासना. ८ नरका.

वेदिर्महतीविनष्टि ॥ इत्यादि वचनें सांगों किती ॥ नभजती ते पडती कपाटीं ॥ कल्प कोटी ऐसा देख ॥१०॥ ऐसा सर्वेंद्रियांचा प्रकाशन ॥ जाणोनि मी तुज अनन्य शरण ॥ तेणें तूं झालिया प्रसन्न ॥ ग्रंथ निर्माण काय नवल ॥ ११ ॥ जयाचिया ईक्षणसत्ता ॥ जीवासीं ब्रह्मपणें होय पूर्णता ॥ तेथें ग्रंथ निर्माण करितां ॥ कोणत्या अर्थी सांकडें ॥ १२ ॥ जेथें सृष्टयादिक व्यापार ॥ तो तंव मायिक व्यवहार ॥ करणें नव्हे अपूर्व थोर ॥ तेथें इतर किती सांगों ॥ १३ ॥ तेथें वाचा कवित्व बोलणें ॥ हें तंव ब्रह्मत्वीं सर्व उणें ॥ ययालागीं चोंज करणें ॥ माझेनि मनें नकरिजे ॥ १४ ॥ मी तंव सकळहि पदार्थी मंद ॥ तो तुझियाकृपें पावोनि बोध ॥ झालों स्वस्वरूप अगाध ॥ चिदानंदबोध पूर्णत्वें ॥ १५ ॥ त्यामज हे ग्रंथ निर्माण ॥ करावया कोण प्रयोजन ॥ परि धालेपणाचे ढेंकर पूर्ण ॥ स्वरूप वर्णन तुझेंचि करी ॥ १६ ॥ आणि ग्रंथव्याख्यान करी ॥ इये श्लाघ्यतेचि कोण पां थोरी ॥ जयासीं समर्थ अंगिकारी ॥ तो हें करी काय नवल ॥ १७ ॥ क्षीरार्णव आंगण प्रदेशीं ॥ झाला असे जया पुरुषासीं ॥ सर्वदां तृप्ती ह्मणणें तयासीं॥ अपूर्वतेसीं काय मिळे॥१८॥नातरी धनंजयासीं कंसारी॥आत्मत्वें स्वयें अंगिकारी ॥ तत्पुरुषार्थें कौरव संहारी ॥ वर्णितां भारी काय होय ॥ १९ ॥ तेणें सृष्टयादि कार्य जरी केलें ॥ तरी तेथें काय नवल झालें ॥ जयासी ईश्वरें आत्मत्वें मानिलें ॥ कौरव मारिले हें काय नवल ॥ २० ॥ नातरी जनकतनुजापती ॥ स्वकीयत्वें मानिला मारुती ॥ तेणें लंका दहन क्षणाप्रती ॥ केली त्रिजगतीं ख्या-

१ अवलोकनसत्ता. २ नवल. ३ समाधानाचे. ४ योग्यतेची. ५ क्षीरसागर. ६ आपला.

ति तेणें ॥ २१ ॥ इत्यादिकीं त्रैलोक्यसंहरण ॥ अथवा केल्या उत्पन्न पाळण ॥ जेथें नाहीं अपूर्वपण ॥ तेथें हें करण काय वर्णिजे ॥२२॥ अथवा तेणें सत्यवतीसुतें ॥ कृपावलोकनें पाहिलें सुतातें ॥ तेणें संजयें धृतराष्ट्रातें ॥ निववीलें पुरतें ब्रह्मानंदें ॥ २३ ॥ यालागीं समर्थांचें कृपावलोकन ॥ झालिया अनाधिकारीहि होय पूर्ण ॥ सर्वत्र सर्वदां नव्हे न्यून ॥ तेथें मी अपूर्ण केंवि होय ॥ २४ ॥ तैसा मी तुमचा अंगिकार केला ॥ विशेषें आत्मस्वें मानिला ॥ तो मी जो बोल बोलिला ॥ तो कां वेदतुल्या येइना ॥ २५ ॥ माझें अहंकरण तूंचि येक ॥ सर्वेंद्रियांचा प्रकाशक ॥ साक्षी होउनि प्रवर्तक ॥ येकला येक तूंचि स्वामी ॥ २६ ॥ माझें करणें आणि नकरणें ॥ सर्वही तुवां येकेंचि होणें ॥ आणि संकल्पिजे जें जें मनें ॥ तें सर्वही होणें तुवांचि येकें ॥ २७ ॥ यापरी माझी जे जे वदे वाचा ॥ तो तो शब्दार्थु तूंचि साचा ॥ यालागीं जो बोल बोले तयाचा ॥ विस्मयो साँचा नव्हे स्वामी ॥ ॥ २८ ॥ तेथें म्यां काय तुज प्रार्थावें ॥ स्वामी ग्रंथव्याख्यान बोलवावें ॥ जेथें माझें मीपण गौरवावें ॥ तूंचि स्वभावें झालासी ॥२९॥ तेथें तुजवेगळा मी कैंचा उरें ॥ जो कां प्रार्थीं सकोमळ उत्तरें ॥ वदता वदविता साँचोकारें ॥ तूंचि तूं निर्धारें सर्वत्र ॥ ३० ॥ तें हो शुद्ध अथवा अशुद्ध ॥ तूंपणें अवघेंचि विशुद्ध ॥ ऐसें बोलतां वाचा झाली सद्गद ॥ ह्मणोनी सुबुद्ध आलिंगी ॥ ३१ ॥ प्रेमें आलिंगूनि सद्गुरुरायें ॥ आज्ञा केली ग्रंथीं इये ॥ ह्मणें बोल तूं ग्रंथ संचयें ॥ संस्कृतान्वयें सप्रेम ॥ ३२ ॥ ऐसा पावोनि प्रसाद ॥ तेणें ब्रह्मांडीं नमाये आनंद ॥

१ कृत्य. २ अधिकारास योग्यनाहीं असा. ३ चालक. ४ खरोखर. ५ विकळ. ६ शुद्धबुद्धीनें.

ह्मणें जी येणें प्रसादें ग्रंथ सिद्ध ॥ स्वतःसिद्ध तुझेनी ॥ ३३ ॥ तरी सद्गुरुअनुग्रहें आतां ॥ ग्रंथव्याख्यान यथार्थता ॥ करील सद्गुरुचि तें श्रोता ॥ सावधानता परिसावें ॥ ३४ ॥ वैराग्य प्रकरणाच्या अंतीं ॥ बोलिलें ऐसें रघुनाथाप्रति ॥ जे वैराग्येवीण ज्ञानोत्पत्ति ॥ कदां कल्पांतीं घडेना ॥ ३५ ॥ आणि ज्ञानेवीण जें जीवित्व ॥ तें अतिमौर्ख्यत्वें उपहत ॥ सर्वार्थीं होय निंदित ॥ अतिकुश्चित जडपणें ॥ ३६ ॥ चांडाळगृहीं भिक्षाटण ॥ करणें तें श्रेष्ठपण ॥ परि निंद्यत्वें मौर्ख्यता कनिष्ठ जाण ॥ दुःख कारण सर्वार्थीं ॥ ३७ ॥ मौर्ख्यता जाउनियां ज्ञान ॥ व्हावया वैराग्यचि पूर्ण ॥ वैराग्यासीं मुळ मिथ्यत्वदर्शन ॥ हेंचि कारण सर्वार्थीं ॥ ३८ ॥ हेंही केलें असे निरूपण ॥ तथापी ग्रंथारंभीं स्मरण ॥ अर्थान्वयें अनुसंधान ॥ स्मरण पूर्ण व्हावया ॥ ३९ ॥ जगन्मिथ्यापणदर्शन ॥ अथवा सत्यत्वें होय भान ॥ यादोहींस मनचि कारण ॥ मनचि बंधन मोक्षासीं ॥ ४० ॥ तंव रघुनाथ अपेक्षितीं ॥ ह्मणें जी श्रीवसिष्ठ सद्गुरुमुर्ती ॥ जे केली प्रतिज्ञा मजप्रती॥ जगन्मिथ्या स्थिती सांगावया ॥ ४१ ॥ ते आपुली प्रतिज्ञा साच करीं ॥ जगन्मिथ्यात्व सांगा झडकरीं ॥ वैराग्य सदृढ जेणें करी ॥ जालिया-पुन्हा नवजाये ॥४२॥ ऐसी प्रार्थना ऐकोनी ॥ अतिहर्ष निर्भर अंतःकरणीं ॥ ह्मणें रघुनाथा तुजलागुनी ॥ सांगेन तें मनीं दृढ धरीं ॥ ४३ ॥ तरी प्रपंच संहार आणि उत्पत्ति ॥ यासीं मनचि कारण गा महामती ॥ मनाचे शांतीनें विश्वशांती ॥ मनोत्पत्ती उत्पन्न ॥ ४४ ॥ यदर्थीं ऐकें उत्तर ॥ सांगेन तुज सविस्तर ॥ मनचि कारण हा

१ निस्तेज. २ विश्वाचा खोटेपणा. ३ जागृती. ४ इच्छीतात. ५ बळकट. ६ पूर्ण.

प्रकार ॥ अन्यथा विचार असेचिना ॥४५॥ श्लोक ॥ संयमान्मनसःशांतिमेतिसंसारसंभ्रमः ॥ चंद्रेचास्तमयंप्राप्ते यथाक्षीरमहार्णवः ॥ १ ॥ टीका ॥ नानाविचित्र हा संसारभ्रम ॥ असत्यपणेंचि साचा नेम ॥ कर्म सर्वदां आहे विषम ॥ वाढे भ्रम थोरावल्या ॥ ४६ ॥ जैसे स्वप्नींचे जे जे पदार्थ ॥ ते भ्रमरूपचि यथार्थ ॥ शय्येवरी येकाकीं शयित ॥ तेथें अपरिमित पदार्थ केंचे ॥ ४७ ॥ हस्ती अश्व रथ पदाती ॥ तेथें चतुरंग सेनेची प्राप्ती ॥ देह दुर्ग काळगती ॥ राहाटी पुरती सर्वांची ॥ ४८ ॥ तें काय रघुनाथा साच होतें ॥ कीं मनेंचि परीणमलें तेथें ॥ हें सांगपां मज निरुतें ॥ रचिलें तेथें कोणें हें ॥ ४९ ॥ तेथें सर्व ही व्यवहार करि ॥ झांकिल्या नेत्रें देखे भारी ॥ श्रवणें ऐके शब्दकुसरी ॥ नचळतां करी गमन क्रिया ॥ ५० ॥ पोटाळिलीया हातें घेणें देणें ॥ निचेष्ट असतां सर्व करणें ॥ हें साच कीं काय मनें होणें ॥ जाण या खुणें रघुवर्या॥५१॥ तेंचि मन उपशम पावतां ॥ तेवढी रचना होय वृथा ॥ जागृती होउनी पाहतां ॥ नदिसे तत्वतां कांहींचि ॥ ५२ ॥ येवढेंहि भ्रमरूप टवाळ ॥ मनपरिणामें विस्तार सकळ ॥ तेंचि मन होतां निश्चळ ॥ तें येवढें जाळ नाहींचि होय ॥ ५३ ॥ तैसा हा सकळ संसारभ्रम ॥ तोचि जाण मनाचाचि परिणाम ॥ तेंचि मन पावल्या उपरम ॥ तोही उपरम पावत ॥ ॥ ५४ ॥ जैसा चंद्राचेनि उदयपूर्णता ॥ क्षीरार्णव भरे भरिता ॥ तोचि चंद्र अस्तमय पावतां ॥ अस्तवे सर्वथा भरितेंहि ॥५५॥ ये संसारभ्रांतिप्रती कारण ॥ येक मनचि गा रघुनाथा जाण ॥ मनोदयें उदय पूर्ण ॥ होय क्षी-

१ प्रतिकूळ, मारक. २ निजलेला. ३ अगणित. ४ पायदळ. ५ निश्चयेंकरून. ६ लय. ७ शांति. ८ समुद्र.

ण मनोलयीं ॥ ५६ ॥ श्लोक ॥ चित्तोन्मेषनिमेषाभ्यांसंसारस्योदयक्षयौ ॥ वासनाप्राणसंरोधादनिमेषंमनःकुरु ॥ २ ॥ टीका ॥ चित्तउन्मेषानिमेषेंकरुन ॥ संसारासीं उदय क्षय जाण ॥ उन्मेष शब्दें उदय पूर्ण ॥ अस्तु जाण निमेषता ॥ ५७ ॥ अगा प्रपंचोन्मुखता मनाची ॥ मनाची उन्मेषता तेचि ॥ तेणें अनर्थ परंपरा भवाची ॥ असे होतचि परियेसीं ॥ ५८ ॥ प्रपंचोन्मुखपण मनाचें ॥ हेंचि विस्मरण स्वस्वरूपाचें ॥ देहीं अनर्थ पुनरावृत्तीचे ॥ जीवासीं साच येणेंचि होय ॥ ५९ ॥ मनाचा अस्तु तेंचि अनिमेषता ॥ झालिया स्वस्वरूपीं सावधानता ॥ प्रपंच पावे अस्तंमयता ॥ नभासे तत्वतां मिथ्यापणें ॥ ६० ॥ अगा साचचि प्रपंच वस्तुता ॥ तरी मनाच्या अस्तेंही असता ॥ ह्मणोनि मनोमय जाण तत्वतां ॥ नाश पुरता मनोनाशें ॥ ६१ ॥ याकारणें गा रघुनाथा ॥ प्रपंचोन्मुख होउं नद्यावें चित्ता ॥ याची करावी अनिमेषता ॥ स्वरूपीं तत्वतां बोधावें ॥ ६२ ॥ अनिमेष करावया चित्त ॥ येथें उपाय कोण पां प्रस्तुत ॥ ऐसें ह्मणसी तरी बहुत ॥ असती निश्चित रघुराया ॥ ६३ ॥ तरी चित्त अनिमेष करावया ॥ अनंत उपाय करिती रघुराया ॥ परि ते यासींच येती सहाया ॥ निवृत्ती यया नकरवे ॥ ॥ ६४ ॥ तरी ययाच्या उपायाप्रती ॥ येकचि कारण गा रघुपती ॥ सांगेन तें येकाग्रचित्तीं ॥ अयोध्यापती परिसपां ॥ ६५ ॥ तरी प्राण वासनेचेनि संयोगें ॥ मन हें सैराचि धावोंलागे ॥ प्राण नैश्चल्यें राहे उगें ॥ सारी वेगें संकल्प जाळ ॥ ६६ ॥ मन निश्चळही असतां ॥ वासना उठती अकस्माता ॥ तेणें करूनि चळ होतसे चि-

१ प्रपंचाविषयीं आसक्ति. २ पुन्हा जन्ममरण. ३ नाश. ४ हष्टीं. ५ विषयांपासूनमार्गें उलटणें. ६ स्थिरतेनें.

त्ता ॥ अनावरता अद्भुत ॥ ६७ ॥ तंव रघुराज ह्मणेजि श्रीगुरु ॥ हा तंव विस्मय वाटे चित्ता थोरु ॥ मन स्थीर असतां वासना भारु ॥ उठतां प्रकारु कैसा होय ॥ ६८ ॥ मनचि जरी स्वयें उठी ॥ तरीच वासना पुरवी पाठी ॥ मननैश्चल्यें वासना लाठी ॥ हे तंव गोष्टी अपूर्व ॥ ६९ ॥ तरी ते वासनेचें रूप कैसें ॥ तें सांगावें स्वामि विन्यासें ॥ तंव ऋषी ह्मणती सावकाशें ॥ अपूर्व ऐसें सांगेन ॥ ७० ॥ तरि पूर्वकर्माचेनि संस्कारें ॥ जो जो वृत्तीसि पदार्थ स्फुरे ॥ तें तें जाणावें निर्धारें ॥ वासना चतुरें इयापरी ॥ ७१ ॥ अगा मन असतांही निश्चळ ॥ स्फुरे घट पटादि पदार्थ मेळ ॥ तो संस्कार तोचि वासना जाळ ॥ जाण सकळ इयापरी ॥ ७२ ॥ मन निश्चळ असतां देहीं ॥ घट पटत्वें स्फुरे जो पाहीं ॥ तोचि संस्कार वासनारूपहि ॥ उठे पाहीं विबुधराया ॥ ७३ ॥ अथवा देहिं अकस्मात ॥ क्रोध लोभ असती उपजंत ॥ मग तेणेंचि असे मन चेष्टित ॥ होय निश्चित पदार्थाकारें ॥ ७४ ॥ कां जें येक वेळ देखिलें ऐकिलें ॥ जें जें कांहिं अनुभविलें ॥ तेणें संस्कारें मागुतें स्मरिलें ॥ तेंचि भलें वासनारूप ॥ ७५ ॥ यालागीं मनासीं चंचळ व्हावया ॥ दोनीच कारण गा रघुराया ॥ प्राण आणि वासना इया ॥ करिती चित्ता यया चंचळत्व ॥ ७६ ॥ तरी तुवां येकचि करावें ॥ वासना प्राणातें रोधावें ॥ तेणें चित्त हें स्वभावें ॥ अनिमेष भावें होईल ॥ ७७ ॥ अनिमेष झालिया मन ॥ मग कैचें होईल प्रपंचभान ॥ मिथ्या हें मिथ्यात्वेंचि जाण ॥ जग हें स्वप्न ऐसें भासे ॥ ७८ ॥ श्लोक ॥ अयंहिस्वविकल्पोत्थःस्वविकल्पपरिक्षयात॥

१ आटोपण्याची अशक्यता. २ उचंबळतें. ३ विस्तारेंकरून. ४ दृष्टीसीं. ५ जन्मापासून. ६ प्रतिबंध करावा. ७ प्रपंचविन्मुख.

क्षीयतेदग्धसंसारोनिःसारइतिनिश्चयः ॥ ३ ॥ टीका ॥ अगा सर्व संसार ॥ स्वविकल्पोत्पत्ति साचार ॥ विकल्प क्षयींच असार ॥ भस्मसार होउनि जाय ॥ ७९ ॥ स्वस्वरूप विस्मरण बहिर्मुखता ॥ जेधवां चित्तवृत्तिसीं होतां ॥ तोचि विकल्प जाण तत्वतां ॥ संसारव्यथाउपजे तेणें ॥ ८० ॥ या विकल्पाचीपासाव उत्पत्ति ॥ या संसाराची होय गा रघुपती ॥ विकल्पक्षयीं दग्धस्थिती ॥ जाय भस्मांतीं निश्चयें ॥ ८१ ॥ येक लवमात्रही स्वरूपीं विस्मरण ॥ होतांचि विक्षेप महादारुण ॥ देहादि प्रपंचभान ॥ सत्यत्वें पूर्ण भासोंलागे ॥ ८२ ॥ तेंचि स्वरूपीं सावध होतां ॥ विपरीत देहादि सर्व तत्वतां ॥ नस्फुरे गा रघुनाथा ॥ पावे भस्मांता विकल्पचि ॥ ॥८३॥ जैसा वेणु जळोनि भस्मसार ॥ तैसा भाव होय निःसार॥बंधरूपें काय प्रकार ॥ नकरवे साचार बाधलेपणें ॥ ८४ ॥अगा या संसाराची वृद्धी ॥ हा तंव अविचारित संसिद्धी ॥ विचाराप्रति क्षणार्धिं ॥ नराहे सुबुद्धि रामचंद्रा ॥ ८५ ॥ श्लोक ॥ रज्जुज्ञानेनसर्पत्वंचित्रसर्पस्यनश्यति ॥ यथातथैवसंसारःस्थितएवोपशाम्यति ॥ ॥४॥ टीका ॥ चित्रींचा देखोनि महाभुजंग ॥ अतिभयकंपें कांपे अंग॥देहांतुचि पावे सांग॥ यथार्थ अव्यंग मानोनियां ॥ ८६ ॥ तोचि परिज्ञानें पाहातां ॥ सर्पत्व नासोनि जाय तत्वतां ॥ तैसाचि हा संसार ताता ॥ होय वृथा संम्यक्ज्ञानें॥८७॥अगा अविचारीं संसाराचि फरांरी ॥ विचारें नराहे क्षणभरी ॥ यालागीं संसार भरोवंरी ॥ सर्व प्रकारीं भ्रममूळ ॥८८॥ हा मिथ्याचि परि मिथ्याचि किती ॥ बोलावा गा श्रीरघुपती ॥ मनोकल्पि-

१ आपले कल्पनेची रचना. २ खोटा. ३ विषयोन्मुखता. ४पासून. ५ विघ्न. ६ विस्तार. ७ स्वाभाविकस्थिती. ८ पूर्ण. ९ आत्मज्ञानें. १० ओढ,आभास. ११सामग्री.

त सर्वार्थी ॥ ऐक पुढती सांगेन ॥ ८९ ॥ श्लोक ॥ पुंसानिजमनोमोहःकल्पितोदुःखदःस्मृतः ॥ संसारश्चिरवेता
लोविचारेणप्रलीयते ॥ ५ ॥ टीका ॥ अगा मुख्य परब्रह्मीं जें अज्ञान ॥ तद्रूप जो मनोमोह जाण ॥ तेणें कल्पि-
त संसार दारुण ॥ सत्यत्वें पूर्ण कल्पिला ॥ ९० ॥ जेविं बागुल बाळकाप्रति ॥ आला ह्मणोनि भय दाविती ॥
तेणें यथार्थ मानुनि क्रांतमती ॥ दुःख अती देतसे ॥ ९१ ॥ बाळक आपुलेनि विसरें ॥ वेताळाचें मानुनी भेउरें॥
तेणें दुःख शोकादि स्फुरे ॥ पावे निर्धारें मरणांत ॥ ९२ ॥ तैसें मुळिचेनि अज्ञानेंकरून ॥ मनोमोह महादा-
रुण ॥ तेणें संसार कल्पिला जाण ॥ लटिकाचि पूर्ण साच केला ॥९३॥ लटिकाचि परी सर्व दुःखातें देता ॥
नाना योनि भोगविता ॥ सांगतां याची दुःखवार्ता ॥ मन सर्वथा कंटाळे ॥ ९४ ॥ सुखस्वरूप आत्मयाची वि-
स्मृती ॥ जाली तेव्हां दुःखाचि प्राप्ती ॥ ते गणितांनये अभिव्यक्ति ॥ अपार गती ययाची ॥ ९५ ॥ आपणातें
नेणोनि पाहिजे ॥ तंव दीर्घ संसारबागुल देखिजे ॥ याचेनि दुःख सहजें ॥ अंगीं वाजे आकल्पांत ॥९६॥ जरी
हा विचारें पाहिला ॥ तरी निःशेष जाण हारपला ॥ याचा मागू ही बुडाला ॥ नाहिं देखिला कोठेंहि ॥९७॥
अगा स्वप्नीचें वोडंबर ॥ स्वविस्मृतीनें दिसे महा थोर ॥ प्रबोधमात्रेंचि निःसार ॥ भस्मसार होउनि जाय ॥
॥ ९८ ॥ जैसें वोडंबरीचेनि अनेकपण ॥ क्षण एक बुद्धीसि होय भ्रमण ॥ विचारुनि पाहिजे मन ॥ नदिसे को-
णें पदार्थेंहि ॥ ९९ ॥ तैसा हा संसारबागुल ॥ साचपणें स्फुरला सकळ ॥ विचारें पहातां निर्मूळ ॥ मिथ्या

---

१ व्याकूळ. २ भय. ३ अनुभव. ४ बहूरूपी विद्या. ५ आपल्या विस्मरणानें. ६ जाग्रत अवस्थेनें. ७ खोटा.

फोलें होउनियां ॥ १०० ॥ ययालागीं गा रावणारी ॥ मिथ्याभूत हा सर्वांपरी ॥ ययातें सुखोपायेंचि मारी ॥ विचारें करी येकलेनी ॥ १ ॥ अगा सम्यक्‌विचारु जो रघुपती ॥ तेचि संसाराचि समूळ शांती ॥ स्थीर नराहे विचाराप्रती ॥ क्षणा भस्मांतीं पावतसे ॥२॥ हा जरी वास्तव्य सांच असता ॥ तरी ज्ञानादिकीं नलोटता ॥ हा स्वयें मिथ्याचि ह्मणोनि तत्वतां ॥ भासे वृथा अविचारें ॥३ ॥ हा संसारभ्रम गा रघुनाथा ॥ हे केवळ मायाचि तत्वतां ॥ मायेवेगळें विचारितां ॥ मूळ सर्वथा असेना ॥४॥ तेंचि ऐक आतां सांगेन ॥ माया शब्दें मिथ्या जाण ॥ तेंचितें अज्ञान संपूर्ण ॥ जाण खुण विबुधवर्या ॥५॥ श्लोक ॥ इहशीराममायेयंयास्वनाशेनहर्षदा ॥ नलक्षतेस्वभावोस्याःप्रेक्षमाणैवनश्यती ॥ ६ ॥ टीका ॥ अगा विश्वरूपें जाण हे माया ॥ हर्ष देतसे स्वनाशें करुनियां ॥ सम्यक्‌दर्शनें जाय नासोनियां ॥ स्वभावें राया अँलक्षपणें ॥ ६ ॥ जो कीं प्रपंच मिथ्याभूत ॥ तेचि हे माया जाण निश्चित ॥ इयेचा स्वभाव अलक्षित ॥ वेंचतांही सत्य मानीतसे॥७॥ खळाळीवेगें वाहिजे जळें ॥ तेथें तें गेलेंचि ऐसें कळे ॥ तें मागोनि जैसें तैसेंचि मिळे ॥ यालागीं नकळे वेंचलें ऐसें ॥ ८ ॥ खळाळीइतुकें वाहातां ॥ जळ वेगें जात असतां ॥ परि उणें नपडे सर्वथा ॥ मिळे तत्वतां ह्मणोनी ॥ ९ ॥ जातां वेग तरी दिसे ॥ परि तेथें शुष्क पडलें नदिसे ॥ मागोनि मिळे जैसें तैसें ॥ ह्मणोनि भ्रंशे देखोनी बुद्धी ॥११०॥ ऐसेनि हि भ्रमलेपणें जाण ॥ अपर दिवसीं खळाळी येउन ॥ ह्मणती तेंच हें जळ जाण ॥ वेचलेपणें लक्षवेना ॥११॥

१ खोटा. २ शुद्धविचार. ३ खरा. ४ अंतरज्ञानानें. ५ पसरतांही. ६ खळखळ वाहाणाऱ्या वोढ्याच्या वेगानें. ७ कोरडें. ८ दुसरे, अन्य.

तैसें घडतां मोडतांहि विश्वकोटी ॥ जना लक्षवेना भ्रमदृष्टी ॥ तेंचि हे साच ऐसी गोष्टी ॥ परिपाटी अनादि भासे ॥ १२ ॥ नाना अलातचक्राचिये परी ॥ वेगें अखंडचि दिसे भवंरी ॥ अलक्षपणें स्वयंभ पुरी ॥ जना भारी भासत ॥ १३ ॥ तेंचि स्थिरावोनि पाहिजे ॥ तंव ते परिछिन्न अणुमात्र देखिजे ॥ मग कोणतें ऐसें बोलखिजे ॥ निश्चय कीजे सम्यक्ज्ञानें ॥ १४ ॥ तैसें जग हें जितुकेंचि मोडे ॥ तितुकें तेणेंचि काळें घडे ॥ वेंचितां ही रितेंचि नपडे ॥ जन वेडे साच मानिती ॥ १५ ॥ यालागीं स्वभाव ये मायेचा ॥ अलक्ष लक्षवेना साचा ॥ परी स्वनाशेंही आनंदाचा ॥ सोहळा साचा करी तसे ॥ १६ ॥ माया शब्दें शुद्ध अज्ञान ॥ जिणें स्वसुखासि केलें व्यवँधान ॥ प्रत्यक्ष परिछिन्न ॥ केलें पूर्ण नास्ति ऐसें ॥ १७ ॥ नास्ती नप्रकाशितें ॥ ऐसें केलें स्वतःसिद्धातें ॥ तें नासलिया स्वप्रकाशातें ॥ आपणातें पाविजे ॥ १८ ॥ ते मायेच्या उद्भवें दुःखप्राप्ती ॥ इयेचेनि नाशें सुखसंपत्ति ॥ ह्मणोनि इयेचा लय गा सुमती ॥ करावा सर्वार्थीं रघुपुंगवा ॥ १९ ॥ अगा तूं ऐसें ह्मणसी ॥ इयेचेनि व्याप्यें वर्तणें त्रैलोक्यासीं ॥ आणि आछादक आत्मयासीं ॥ तें कैसेनि वर्तेल ॥ १२० ॥ इयेचें भय सिद्ध साधकासीं ॥ जपी तपी परिव्राजकांसी ॥ जे कीं नागवियाहि शरीरासीं ॥ जनां सर्वासीं छळितसे ॥ ॥ २१ ॥ ते नासलिया कैसी नासे ॥ आनंदघन कैसेनि प्रकाशे ॥ तरी ऐसें हे अनारिसें ॥ सर्वथा विश्वेशें न मानावें ॥ २२ ॥ अगा मायेचि येवढी थोरी ॥ शेवटीं नासे क्षणाभीतरीं ॥ परी ननासे उपायें सहस्त्रीं॥

---

१ विस्तारलेपणें. २ कोलितकांकणचे. ३ भ्रमण. ४ नाशवंत. ५ विवेकज्ञानानें. ६ खर्चितां. ७ अडथळा. ८ संन्यास्यासीं. ९ भिन्न.

सर्व प्रकारीं विचारेवीण ॥ २३ ॥ विचार शब्दें सम्यक्ज्ञान ॥ तेणेंचि सर्वथा नासे अज्ञान ॥ ज्ञानेविण सर्व साधन ॥ वृथा जाण कोटिवरी ॥ २४ ॥ इयेतें नासावयालागीं ॥ जे जे उपाय बाणती आंगीं ॥ तेणें अधिकचि साधनांगी ॥ इंधनें आगी प्रबळे जैसी ॥ २५ ॥ तैसें नित्य नैमित्तिक कर्मानुष्ठान ॥ अग्नि होत्रादि सर्वही यज्ञ ॥ जप तप अध्ययन तीर्थाटन ॥ उद्यापन व्रतादिकांचें ॥२६॥ इत्यादि साधन करितां॥ हे तंव माया कार्यंची तत्वतां ॥ कार्या कारण सर्वथा ॥ नविचारितां घडेचिकीं ॥ २७ ॥ प्रपंच तोडावयाकारणें ॥ नित्य प्रपंचानुसंधान करणें ॥ तरि तो तुटे कीं वाढे तेणें ॥ विचार सर्वज्ञें करावा ॥ २८ ॥ तोडावया इंद्रजाळ ॥ पारवी आम्र वृक्षादि सकळ मेळ ॥ तें केलिया तुटे कीं प्रबळ ॥ होय हें सकळ विचारि जो ॥२९॥ यालागीं नाना साधनें करिजेती ॥ तेणेंचि माया वाढे सर्वार्थी ॥ ह्मणोनि येके विचारेंचि क्षणाप्रती ॥ नाश सर्वार्थी करावा॥१३०॥ तरी रघुपती येकचि करावें ॥ नाना उपाय सांडावे॥सम्यक्विचारुनि पाहावें ॥ तेणेंचि निरसावें मायेतें ॥ ३१ ॥ अगा सम्यक्विचाराच्याअंतीं ॥ माया नाहींच होय गा सुमती ॥ आंधार पाहे लाउनि वाती ॥ तो कोणेच प्रांतीं दिसेना ॥ ३२ ॥ येरवीं तमाचा पार नेणिजे ॥ व्यक्तीसिं नये कोणें व्याजें ॥ जे नाना उपाय तयासीं कीजे ॥ तरि तो सहजे काय जाये ॥ ३३ ॥ त्यासिं अनेक उपाय करितां ॥ ननिवर्ते गा-श्रीरघुनाथा ॥ हातीं दिवटी घेउनि पाहातां ॥ नाहींच सर्वथा ऐसा होय ॥ ३४ ॥ नाना स्वप्न संभ्रमाचि भरो-

१ आत्मज्ञान. २ काष्ठानें. ३ उपोषण. ४ मंत्रविद्या. ५ आत्मविचारानें. ६ आकारासीं. ७ निमित्तानें. ८ वैभव.

वरी ॥ अपरमित दिसतसे भारी ॥ दवडितां नाना उपायांतरीं ॥ कोटि प्रकारीं ननिवर्ते ॥ ३५ ॥ तेंचि प्रबोधु-
नि पाहिजे ॥ तंव ते कोठेंचि नदेखिजे ॥ तैसी माया विचारव्याजें ॥ पाहतां सहजे नाहींच होय ॥३६॥ अगा
अविचारेंचि संसार भासे ॥ तो विचारें क्षणमात्रेंचि नासे ॥ ह्मणोनि उपाय आन नसे ॥ दृढ विश्वासें जाणावें
॥३७॥ जरी कोणी ऐसें ह्मणती ॥ मुळीं साधनें काय दूषिलीं असती ॥ तरी टीकेसीं कां पां दूषिजेति॥ अतएव हे
गती निर्मूळ दिसे ॥३८॥ तरी प्रेक्ष्यमाणेव या एवंकारें ॥ सर्वही दूषिलीं साधनांतरें ॥ येक प्रेक्षणेंचि साचोकारें॥
जाण निर्धारें नाशहेतु ॥ ३९ ॥ यालागीं संस्कृत देखिल्याविण ॥ नकरिजे इषतांहि निरूपण॥तुह्मीं श्रोते असां
शास्त्रज्ञ ॥ सर्वही खुण जाणतसां ॥१४०॥ एवंकारें साधनांतराची व्यावृत्ती ॥ केली जाणा सर्वार्थी ॥ येक ईक्षण
मात्रेंचि नाशाप्रती ॥ साधन सुमती बोलिलें ॥४१॥ययालागीं गा रघुपती ॥ मायेच्या समूळ नाशाप्रति ॥ केवळ
ज्ञान मात्रेंचि सर्वार्थी ॥ आन गती असेचिना॥४२॥ तेणें सम्यक्ज्ञानें नासली ॥तरी माया नाहींच ऐसी झाली ॥
तेथें आनंदाची दिवाळी॥लाभे नव्हांळी नसाधितां॥४३॥अगा माया नासावयाचें कोडें॥कायसें पां तुज येवढें॥
हें अनिर्वाच्य परि संत नघडे ॥ जाण धडफुडे मिथ्यारूप ॥ ४४ ॥ मिथ्या तें मिथ्याचि असे ॥ तें नासाव-
या प्रयास काईसे ॥ तें विचारेंकरूनियां नासे ॥ मृगांभ जैसें कां रज्जुसर्प॥ ४५ ॥ अधिष्ठानीं अध्यारोपित ॥
तें तंव साच नव्हे गा निश्चित ॥ तें भ्रममात्रें परि विचारें भस्मांत ॥ होय क्षणांत रघुवर्या ॥ ४६ ॥ तैसी हे मा-

१ जागृत अवस्थेनें. २ अवलोकन. ३ खरोखर. ४ किंचित्‌हीं. ५ विवंचना. ६ आत्मज्ञानानें. ७ प्राप्ती. ८ निश्चय करण्यास अशक्य. ९ मृगजळ.

या जाण ॥ अधिष्टानीं ब्रह्मआरोप पूर्ण ॥ तें विचारें होतसे क्षीण ॥ प्रयास कोण साधनाचे ॥४७॥ आणि द्वादशा विकल्पीं विकल्पित ॥ ह्मणोनि हे कदा नव्हती संत ॥ तेंचि ऐक प्रस्तुत ॥ विकल्पार्थ रघुराया॥४८॥जरी माया संत ह्मणसी ॥ तरी संत ते अबाधीत परियेसी ॥ इयेचा बाधु ज्ञानें देखसी ॥ तरी संत कैसी ह्मणावी॥ ॥ ४९ ॥ संत तें त्रिकाळीं अबाधित ॥ जैसें ब्रह्म नित्य सदोदित ॥ तैसी ते नव्हे निश्चित ॥ असंबाधित सम्यक्ज्ञानें॥ १५० ॥ जरी हे माया संत असती ॥ तरी ज्ञानाचेनि बापें ननासती ॥ आणि ज्ञानें असे बाधिती ॥ तरी संत कैसेरिती ह्मणाल ॥ ५१ ॥ ययालागीं नव्हे संत ॥ असंत ह्मणतां तरी भासत ॥ खपुष्पाऐसी असंत ॥ नव्हे निभ्रांत रघुराया ॥ ५२ ॥ असंत तें त्रिकाळीं नभासावें ॥ वंध्या पुत्राऐसें निःशेष नसावें ॥ माया तरी हे ऐसी नव्हे ॥ प्रत्यक्ष संभवे विश्वाकारें ॥ ५३ ॥ तैसें मायेचें असणें ॥ नाहीं संत ना असंतपणें ॥ इयेचें यथातथ्य कोणें ॥ नव्हे प्रमाण षड्विधेंहि ॥५४॥ आतां सदसत ह्मणावी माया ॥ तरी हेही नघडे गा रघुराया॥ दोनीच पदार्थ बोलावया ॥ असती यया जगामाजी ॥५५॥एक तो जाण संत पदार्थ ॥ एक तो जाण असंत पदार्थ ॥ परी येकचि कांहीं संतासंत ॥ ऐसा अर्थ असेचिना ॥ ५६ ॥ अगा संत ते नव्हे असंत ॥ असंत ते नव्हे संत ॥ ह्मणोनि दोहीसीं येकार्थ ॥ सदसत घडेना ॥ ५७ ॥ आतां ह्मणावी सदसद्विलक्षण ॥ ह्मणिजे संता असंताहुनी भिन्न ॥ हेंचि तंव न घडे गा प्रमाण ॥ सदसद्विलक्षण माया होय॥५८॥ यालागीं सदसद्विलक्षणता ॥

१ जगदुत्पत्तिचा आरोप. २ आत्मज्ञानें. ३ आकाश पुष्पासारखी. ४ निश्चित. ५ जसी आहे तसी सांगणें.

मायेसीं घडेचि गा तत्वतां ॥ सदसद्विलक्षण सर्वथा ॥ सत्य ना असत्यता अनिर्वाच्य ॥ ५९ ॥ जे जे वस्तु अनिर्वाच्य होय ॥ ते ते नसाधितां मिथ्या आहे ॥ शुक्तिसी रजत अनिर्वाच्य होय ॥ तैसी पाहे माया ही॥१६०॥ जैसें स्वप्न कां मृगजळ ॥ संत ह्मणतां नासे तत्काळ ॥ असंत ह्मणतां भासे प्रांजळ ॥ ह्मणोनि पोकळ अनिर्वाच्य तें ॥ ६१ ॥ संत कीं असंत ज्या बोलतां नये ॥ ते ते वस्तु अनिर्वाच्य पाहे ॥ मायेचें यथातथ्य तैसें आहे ॥ यालागीं होय अनिर्वाच्य तें ॥ ६२ ॥ अनिर्वाच्य तें मिथ्याभूत ॥ हें तूं जाणपां निश्चित ॥ विचारें विलय पावत ॥ नाहींच होत क्षणमात्रें ॥ ६३ ॥ आतां ब्रह्मेसि माया भिन्न ॥ तरी स्वतंत्र पदार्थ आहे ते कोण ॥ ब्रह्म सद्वयं नव्हे जाण ॥ अद्वय पूर्ण येकरस ॥६४॥ ब्रह्मावेगळी वस्तु यथार्थ ॥ कोणी असता गा पदार्थ ॥ तरी ब्रह्मासीं सदसद्वयत्व॥येतें निश्चित राघवा ॥६५॥ ब्रह्म अद्वय स्वतःसिद्ध ॥ ऐसें श्रुती बोलति प्रसिद्ध ॥ सद्वय स्थापिती विरुद्ध ॥ श्रुति अगाध परियेसा ॥ ६६ ॥ श्रुती ॥ येकमेवाद्वितीयंब्रह्मनेहनानास्तिकिंचन ॥ टीका ॥ एक एवं अद्वितीयं ऐसें ॥ तीनी पदें येकार्थाशें ॥ बोलिलीं तें विन्यासें ॥ सांगों विश्वेशें परिसावें ॥ ६७॥एक्या पदेंचि कार्यार्थ होता ॥ तरी पदत्रय बोले कोण्या अर्था ॥ तेंही सांगेन तत्वतां ॥ ऐक रघुनाथा गुणनिधी ॥ ६८ ॥ तरी विजातीय सजातीय स्वगत ॥ हे ब्रह्मीं भेदत्रय कल्पित ॥याची व्यावृत्ती निश्चित ॥ केली निभ्रांत पदत्रयें ॥ ६९ ॥ तरी येक या पदें विजातीय भाव ॥ व्यावृत्तीला अनात्म प्रपंच सर्व ॥एवंकारें सजातीय जीव॥

१ निश्चय करण्यास अशक्य. २ शिंपीसी. ३ रूपें. ४ स्पष्ट. ५ नाश. ६ द्वैत. ७ अद्वैत. ८ विस्तारानें. ९ विवंचना. १० निश्चित. ११ मायारूप.

जाण सर्व व्यावर्तिले ॥ १७० ॥ जो कीं प्रपंच अनात्मा ॥ तो तंव वेगळा नाहीं ब्रह्मा ॥ रज्जूसिं अभिन्नत्वें भुजंगोत्तमा ॥ तैसें समब्रह्म नित्य सिद्धी ॥ ७१ ॥ गंधाक्षत लावितां रज्जूसर्पासीं ॥ तंव तें शोभलें जाण रज्जूसीं ॥ तरी सर्प राहिला कोणे देशीं ॥ यालागीं रज्जुसीं अभिन्न ॥ ७२ ॥ आतां सजातीय जे जीवयाति ॥ ते तंव चैतन्य गा रघुपती ॥ नाना घटीं सूर्य भासती ॥ काय भिन्न होती मुख्य तरणीसीं ॥ ७३ ॥ यालागीं भेद सजाती विजाती ॥ ब्रह्मासि नघडे कोणे अर्थी ॥ ह्मणोनि एकमेव ह्मणे श्रुति ॥ विश्वमूर्ती यया भाव ॥ ७४ ॥ आतां अद्वितीय शब्दें स्वगत भेद ॥ तोही निरसिला गा विषद ॥ ब्रह्म तें जाण अद्वयानंद ॥ अतीअगाध सर्वत्र ॥ ७५ ॥ स्वगत भेद सच्चिदानंद ॥ तिहीं पदीं भासे जो भेद ॥ तोचि येणें निरसिला विषद ॥ अद्वयानंद ब्रह्म येक ॥ ७६ ॥ या तिहीं पदाचें येकपण ॥ राम पद व्याख्यानीं केलें पूर्ण ॥ वैराग्यप्रकरणीं विषद जाण ॥ अनुभवखुण प्राप्त जेणें कां ॥ ७७ ॥ येथेंही विस्तारें सांगिजे ॥ तरी ग्रंथा विस्तार होय येणें व्याजें ॥ यालागीं अल्पचि बोलिजे ॥ सर्वज्ञ सहजें बुझतील ॥ ७८ ॥ इतुकाचि कोणी ह्मणेल विस्तार ॥ तरी हा तंव केला ब्रह्मविचार ॥ विपश्चितासि हाचि प्रियकर ॥ सेविती सार अत्यादरें ॥ ७९ ॥ जें कीं प्रापंचिक बोलणें ॥ तयासींच विस्तारु ह्मणणें ॥ ब्रह्मवेत्यासीं चांड जेणें ॥ विस्तार कोण त्यासि ह्मणिजे ॥ १८० ॥ आणि ग्रंथाचें हृद्गतं ॥ तें तंव ब्रह्मचि जाण निश्चित ॥ यालागीं करूनि एकाग्र चित्त ॥ ग्रंथार्थ निश्चित परिसिजे ॥ ८१ ॥ तरी

१ सूर्यासीं. २ स्पष्ट. ३ निमित्तानें. ४ समजतील. ५ संतांसीं. ६ इच्छा. ७ अभिप्राय.

ऐसेंचि बोलताति श्रुती॥ब्रह्म तें अद्वयचि गाती ॥ तेथें दुसरी मायादि विश्वास्थिती ॥ कैंची प्रतीति येईल॥८२॥
इहब्रह्मणिनानाकिंचनास्ती ॥ ऐसें प्रत्यक्ष बोले श्रुती ॥ तरी माया भिन्नत्वें वर्तती ॥ कोणे प्रांतीं ब्रह्माचिये
॥ ८३ ॥ यालागीं भिन्नत्व मायेसीं ॥ सर्वथा नघडे परियेसीं॥अभिन्न तरी जैसी तैसी ॥ ब्रह्माऐसी असावी॥८४॥
ब्रह्म जैसें स्वप्रकाश निघोट॥तैसीच असावी हे ब्रह्मनिष्ठ॥प्रपंचाकारें प्रकट ॥ प्रकाश स्पष्ट नासावी ॥८५॥ह्म-
णोनि नघडे अभिन्नपण ॥ आतां ह्मणावी भिन्नाभिन्न ॥ हें तंव वचनाचि अप्रमाण ॥ भिन्नाभिन्न घडेना ॥८६॥
भिन्न तें नव्हे अभिन्न ॥ अभिन्न तें नव्हे भिन्न ॥ एकाचि पदार्थ भिन्नाभिन्न ॥ कदा जाण घडेना ॥८७॥ आतां
भिन्नाभिन्न विलक्षण ॥ हें तंव सर्वथा घडेचिना जाण ॥ माया अनिर्वाच्य संपूर्ण ॥ निर्वचन नकरवे ॥८८ ॥
माया व्यक्त ना अव्यक्त ॥ अथवा नव्हे व्यक्ताव्यक्त ॥ व्यक्ताव्यक्त विलक्षण निश्चित ॥ अनिर्वाच्यार्थ संपूर्ण
॥ ८९ ॥ जैसें शुक्तीचा ठाईं रजत ॥ तें नव्हे संत ना असंत ॥ कदापि नव्हे सदसत ॥ लक्षण निश्चित अनिर्वा-
च्यपणें॥१९० ॥ ना ते सदसद्विलक्षण ॥ शुक्तिसी भिन्न ना अभिन्न ॥ ना ते भिन्नाभिन्न विलक्षण ॥ अनिर्वाच्य
जाण मिथ्या भासे ॥ ९१ ॥ तरी जो जो अनिर्वाच्य पदार्थ ॥ तो तो सर्वथा जाण मिथ्याभूत ॥ तो सम्यकुई-
क्षणेंचि असे नासत ॥ उपाय शत तया कायसे ॥ ९२ ॥ तैसी अनिर्वाच्य जाण माया ॥ ते प्रेक्षमाणेंचि नासे गा
रघुराया ॥ तेथें अनेक उपाय करावया ॥ कारण यया असेचिना ॥ ९३ ॥ अगा सद्गुरुचेनी लब्धबोधें ॥ ईक्षण-

१ परिपूर्ण. २ निश्चय करण्यास अशक्य. ३ सिद्धांत. ४ शिंपीच्या. ५ रूपें. ६ चांगलें. ७ अवलोकन करतांच. ८ मिळालेल्या बोधानें.

मात्रेंचि माया बाधे ॥ मग असिजे गा निजानंदबोधें ॥ परमानंदें परिपूर्ण ॥ ९४ ॥ अगा मायेचा निरास नक-
रितां ॥ स्वस्वरूप नप्रकाशे रघुनाथा ॥ तेंचि सांगेन एक आतां ॥ समाधान चित्ता जेणें होय ॥ ९५ ॥ श्लोक ॥
अहोविचित्रामायेयंतानविश्वविमोहिनी ॥ सर्वांगप्रोतमप्यात्मायात्मानंनपश्यती ॥ ७ ॥ टीका ॥ हेंचि थोर
आश्चर्य गा रघुराया ॥ अतिविचित्र हे दृढावली माया ॥ विश्वातें मोह करूनियां ॥ करी आत्मया आच्छादन
॥ ९६ ॥ तो मायेचा आच्छादनविकार ॥ सांगेन तुज पंच प्रकार ॥ पंचपर्वा ऐसें वेदांती थोर ॥ करिती नि-
र्धार इयेचा ॥ ९७ ॥ तैसी या पातंजलीचिया उक्ती ॥ पंचकोशा इयेतें ह्मणती ॥ तेचि पंचपर्व विश्वमूर्ति ॥ जे-
कां वेदांतीं बोलिली॥९८॥तयांचीं नावें गा श्रीनिवासा ॥ एकें येकाग्र करूनि मानसा ॥अविद्या अस्मिता राग
द्वेषाभिनिवासा ॥ ऐसीया भाषा करुनियां॥९९ ॥तरी येक ते अविद्या दुजि अस्मिता ॥तिसरी राग आणि द्वेष
चौथा ॥ पांचवा अभिनिवेश सर्वथा ॥ व्याख्यान आतां परियेसीं॥२०० ॥ तरी स्वरूपाचें करीजे आवरण ॥
तियेचें नाम अविद्या जाण ॥ स्वतः सिद्धाचेंचि होय विस्मरण ॥ येवढी पूर्ण शक्ति जियेची ॥१॥ अस्मिता ह्म-
णिजे विपरीत भावना ॥ देहात्मबुद्धी जे कीं विचक्षणा ॥ हे द्वितीय पर्व गा रघुनंदना॥ भवभावना विक्षेप हा
पैं ॥ २ ॥ देहाच्याठायीं जे अतिप्रीति ॥ तें तिसरें पर्व गा ह्मणती ॥ त्यासीं प्रतिकूळ ते द्वेषाभिव्यक्ती ॥ पर्व
वित्पत्ती चतुर्थांची ॥ ३ ॥ देहाभिनिवेश अहंकृश स्थूळ ॥ बाळ युवा वृद्ध इत्यादि मेळ ॥ आपण जिता मेला

१ आवरण. २ योगमार्गची. ३ भाषण. ४ अडथळा. ५ शास्त्रपठण. ६ देहात्मबुद्धी. ७ जड शरीर. ८ तारुण्य.

हे तळमळ ॥ पर्व समूळ पंचम हें ॥ ४ ॥ देहमरणें आपणा मृत्यु ॥ अजरामरासीं मानिती सत्य ॥ देहविकार मस्तकीं घेत ॥ तेणें भ्रमत नाना योनी॥५॥स्वयें स्वप्रकाश् निर्मळ निरंजन ॥ अज अमर चैतन्यघन ॥ त्यासीं येवढी दशा जियेचेन ॥ तियेतें जाण माया ह्मणती ॥ ६ ॥ ते जाण विश्वाची मोहिनी ॥ मोह करी स्वस्वरूप भुलउनी ॥ तेचि सांगेन कार्मुकपाणी ॥ चित्त देउनी परियेसी ॥ ७ ॥ यया मोहाचें मोहकपण ॥ विश्वीं आत्मा असतां प्रोत पूर्ण ॥ अनेका मणिमाजि सूत्र येक जाण ॥ अनुस्यूत घन निबिड॥८॥ हेंचि विचित्रपण मायेचें ॥ आच्छादन करी स्वतःसिद्धाचें ॥ प्रकाशन करी विपरीताचें ॥ जेणें जनाचें ज्ञान भ्रंशे॥९॥एक स्वरूपभूत जे किं नित्यज्ञान ॥ तेंचि विचित्र प्रपंचाकार करून॥तेंचि दृश्यचि बैसे सत्यत्वें घेउन॥मोह दारुण जाण हाची॥२१०॥ नाना शर्कराकणिके येकाचि गोडी ॥ अथवा दीपकळिके प्रकाश प्रौढी ॥ अनेका विस्फुलिंगीं उष्णता गाढी ॥ येकाचि पर्वडी सर्वा जैसी ॥ ११ ॥ कां तंतु जैसा पटाभीतरी ॥ प्रोत असेगा सर्वांपरी ॥ तैसा आत्मा हा विश्वांतरीं ॥ निरंतरी अखंडत्वें ॥ १२ ॥ असोनियां अपरोक्ष संत ॥ तो जैसा तैसा नदेखिजेत ॥ हेंचि मोहाचें मोहकपण अद्भुत ॥ करी विपरीत देहपणें ॥ १३ ॥ जें कीं सर्वदां सर्वगत ॥ तें ब्रह्मचि नाहीं केलें निश्चित ॥ आणि अनात्मा जे विपरीत ॥ तेचि कुश्चित भासवी ॥ १४ ॥ तरी या विश्वाची असत्यता ॥ तुज मी सांगेन गा रघुनाथा ॥ असत्यताचि यथार्थता ॥ सत्य भ्रांता मानिली॥ १५ ॥ श्लोक ॥ यदिदंदृश्यतेकिंचित्तन्नास्तिकि-

१ जन्ममरणरहितासी. २ निष्कळंक. ३ व्यापक. ४ अखंड. ५ विस्तार. ६ अग्नीच्या ठिणगींत. ७ पुष्कळ. ८ प्रकार. ९ प्रत्यक्ष. १० माया.

मपिस्फुटं ॥ यथागंधर्वनगरंयथावारिमरुस्थले ॥ ८ ॥ टीका ॥ अगा जे जे कांहीं वस्तु देखिजे ॥ जे जे मनादि इंद्रियीं प्रकाशिजे ॥ ते ते मिथ्याभूत सहजें ॥ दृश्य रघुराजें जाणावें ॥ १६ ॥ अगा जे वस्तुचें आहेपण ॥ तेंचि विचारें सत्य स्पष्ट नाहीं जाण ॥ ते वस्तु नाहींच संपूर्ण ॥ हेचि खुण जाणावी ॥ १७ ॥ अगा जे विचारें नराहे ॥ ते साच वस्तु कोण आहे ॥ हेंचि दृढ विचारूनियां पाहे ॥ जेणें होय निश्चय दृढ ॥ १८ ॥ यया विश्वा येवढें वोडंबर ॥ साच ऐसें दिसे सविस्तर ॥ निर्धारुनि करितां विचार ॥ तंव तें अस्थिर आभासमान ॥ ॥ १९ ॥ जरी तूं ऐसें ह्मणसी ॥ तरी प्रत्यक्ष देखे प्रपंचासी ॥ मा लटिकें कैसें ह्मणावें यासीं ॥ संदेहासीं होतसे॥२२० ॥ तरी रघुनाथा हें ऐसें जाण ॥ हें तंव भ्रमाचें कार्य संपूर्ण ॥ सत्य वस्तूच्याठाईं आभासन ॥ तें अज्ञानें जाण भासतसे ॥ २१ ॥ जैसें कां आकाशीं गंधर्वनगर ॥ भ्रमें अधिष्ठानीं दिसे साचार ॥ तयाचा करितां विचार ॥ मिथ्याचि फार भासत ॥ २२ ॥ नाना मरुस्थळाच्याठाईं ॥ जैसें मृगांभ दिसे पाहिं ॥ परि तें अज्ञानें साच ऐसेंही ॥ भ्रमें कांहीं भासत ॥ २३ ॥ तेंचि विचारें निर्धारुनि पाहतां ॥ जळ तेथें नाहींच तत्वतां ॥ तो केवळ भ्रमुचि गा रघुनाथा ॥ स्थळ तत्वतां जैसें तैसें ॥ २४ ॥ तैसें भ्रममूळचि हें सर्व जग ॥ भ्रमेंचि भासतसे सांग ॥ विचारूनि पाहतां चांग ॥ तंव तें व्यंग मिथ्यापणें ॥ २५॥ जे कीं निर्धारितां नराहे ॥ ते वस्तु सर्वथा साच नव्हे ॥ जागृत होऊनियां पाहे ॥ तंव स्वप्न काय भासत॥ २६ ॥ श्लोक ॥ यत्तुनो-

१ जगताचा पसारा. २ अशाश्वत. ३ मारवाड देशांत. ४ मृगजळ. ५ दोषयुक्त, लटिकें.

दृश्यतेकिंचिदंतेवस्त्वपिकिंचन ॥ अविनाशंतदस्तीहतत्सदात्मेतिकथ्यते ॥ ९ ॥ टीका ॥ तैसा आत्मा नव्हे जाण ॥ प्रपंचाऐसा नव्हे दृश्यमान ॥ प्रपंचाअंती कोणी पदार्थपण ॥ नाहीं निपटून कोणी हि ॥ २७ ॥ कोणीहि पदार्थ नव्हता ॥ आणि नाश तरी नाहीं सर्वथा ॥ तोचि ते सर्वत्र पाहतां ॥ आहे तत्वतां चित्सुखपणें ॥ २८ ॥ ऐसे अविनाश जे संत ॥ कोणी पदार्थ ही नमिळत ॥ तयासींच आत्मा ह्मणिजे त ॥ जाण निश्चित रघुनाथा ॥ २९ ॥ जें कीं सर्वेंद्रियांसी ग्राह्य जाण ॥ ह्मणोनि स्थूळ दृश्यमान ॥ तें तें नश्वर मिथ्या जाण ॥ मागे खुण सांगीतली ॥ २३० ॥ आत्मा प्रपंचनाशें ननासे ॥ प्रपंचोत्पत्ति उपजगें नसे ॥ तेंचि तें जाण सर्वांशें ॥ येर तें भ्रंशे विश्वजात ॥ ३१ ॥ तरी काय निमित्य हें भासे ॥ ल्टिकेंचि कोठें आभासे ॥ हें पुससी तरी सावकाशें ॥ सांगेन परियसें रघूत्तमा ॥३२॥ श्लोक ॥ स्वज्ञानदर्पणेस्फारेसमस्तावस्तुजातयः ॥ इमास्ताःप्रतिबिंबेतिसरसीवतटद्रुमाः ॥ १० ॥ टीका ॥ अगा स्वज्ञानदर्पणाच्याठाईं ॥ समस्त वस्तुजात प्रतिबिंबे पाहिं ॥ ज्ञानेविण विचारितां कांहीं ॥ सर्वथैव नाहीं कोठेंहि गा ॥३३॥ जें हें स्वरूपभूतचि ज्ञान ॥ वृत्तिरूप ज्ञानाहूनि भिन्न ॥ तोचितो जाण ज्ञानदर्पण ॥ विश्व हें पूर्ण तेथें बिंबे ॥ ३४ ॥ प्रपंचीं अनुस्यूत सर्वत्र ज्ञान ॥ ज्ञानाच्याठाईं सर्व भासमान ॥ नाहीं अणुमात्र ज्ञानेविण ॥ पाहें खुण विचारुनी ॥ ३५ ॥ सर्व विश्व पदार्थजात ॥ येका ज्ञानाच्याठाईं प्रतिबिंबत ॥ सरोवरतटींचे द्रुमं समस्त ॥ प्रतिबिंबत सरोवरीं जैसे ॥३६॥

१ केवळ. २ ग्रहणकरण्यास योग्य. ३ भ्रमिष्ट. ४ अखंड. ५ वृक्ष.

कोणी ऐसें ह्मणताती ॥ तटीं साच देखिले द्रुमजाती ॥ तरीच ते जळीं प्रतिबिंबती ॥ नसतां प्रतीति कैसी होय ॥ ३७ ॥ तैसा वस्तूच्याठाईं प्रतिबिंबला ॥ तरी पूर्वीं प्रपंच साच कोठें देखिला ॥ साचेवीण मूळ भ्रमा आला ॥ कोण मेला सांगपां ॥ ३८ ॥ नैय्यायिकाचें मत ऐसें ॥ साचचि हा प्रपंच असे ॥ साचासीच भ्रम ऐसें ॥ कायामानसें मानावें ॥ ३९ ॥ नाहो तुह्मी ह्मणतां भ्रमेचि होय ॥ तरी भ्रमाची सामग्री काय आहे ॥ जैसा शुक्तिंच्या ठाईं भ्रम होय ॥ सामग्री पाहे तेथें असे ॥२४०॥ तेथें सामन्य शुक्तिचें ज्ञान ॥ विशेष निळ-पृष्ठत्रिकोणाचें अज्ञान ॥ ऐसें कोणीयेक पदार्थाचें ज्ञान ॥ रजत स्मरण देशांतरीचें ॥ ४१ ॥ अन्य स्थळीं रजत साच देखिलें ॥ तरी तेंचि शुक्तिकेसीं भासलें ॥ अन्यथा तेथें उगलें ॥ कोणा बोलें भासेल ॥ ४२ ॥ तैसें सामान्य ब्रह्माचें ज्ञान॥आणि विशेष पदार्थाचें अज्ञान॥साचचि प्रपंचाचें स्मरण॥ झालें ह्मणोनि भ्रम ह्मणतां ॥ ४३ ॥ नकदाचिदनिदृश्यजगत् ॥ ऐसें श्रुती असे बोलत ॥ जग नाहीं ऐसा निभ्रांत ॥ काळ ईषत असेचिना ॥ ४४ ॥ प्रपंच सर्वदां साच आहे ॥ तरीच सर्वत्र स्मरतु जाय ॥ अन्यथा असत्याची प्रतीति होय ॥ ऐसें काय विचारि जो ॥ ४५ ॥ येकाच्याठाईं साच वस्तु देखिजे ॥ तरीच तेचि सादृश्यं स्मरिजे ॥ अन्यथा कांहीं नुपजे ॥ भ्रमु नदिसे निर्मूळ ॥४६॥आणि भ्रमुचि जरी ह्मणतां ॥ तरी शुक्तिका रजतरूपेंचि कां देखतां ॥ इतर पदार्थ प्रतीति पंथा ॥ कां पां सर्वथा नयेचि ॥ ४७ ॥ तरी ऐका येथें उत्तर ॥ जें काय बोलिजेल

१ शिंपीच्या. २ शिंपीच्या पाठीमागचा भाग निळा व त्रिकोणाकृति असतो तत्संबंधि अज्ञान. ३ रुपें. ४ व्यर्थ. ५ निश्चित. ६ किंचित. ७ सारखेपणा

मनोहर ॥ तेणें संदेहसागराचा पार ॥ पावसी साचार अनायासें ॥ ४८ ॥ अहो रजतभ्रमाप्रती कारण ॥ मुख्य शुक्तीचें अज्ञान ॥ तेणेंचि होय रजतभान ॥ सामग्रीविण आणीकिये ॥ ४९ ॥ अज्ञान झालियानंतरें ॥ तेथें काय येक नस्फुरे ॥ स्वप्नीं स्वशरीरछेद निर्धारें॥कोणें प्रकारें देखिजे॥२५०॥तुह्मी ह्मणाल जागृतीचा उलथा ॥ तेचि जाणा स्वप्नावस्था॥ तरी जागृतीसीं स्वशरीर छेदितां॥सांगा तत्वतां कोठें देखिलें॥५१॥आणि स्वप्नीं गगनभक्षण ॥ करीतसे स्वयें आपण ॥ हेंही जागृतीमाजी कोण ॥ देखे चिन्ह विपरीत ॥ ५२ ॥ आणि तुह्मी ऐसें बोलिलेती ॥ दोषसामग्रीविण नव्हे भ्रांती ॥ जैसी शुक्तिसी चाकचिक्यादि व्यक्ती ॥ दोषप्रतीति होतसे ॥५३॥ जैसें रजतासि चाकचिक्यादि असे ॥ तैसेंचि शुक्तिकेसीहि प्रतीति भासे ॥ सादृश्य देखोनि लोक पिसे ॥ रजत ऐसें मानिती॥ ५४ ॥ स्वप्नीं स्वप्न प्रपंचासीं ॥ सादृश्य दोष कोण आरोपिसी ॥ तेथें कारण येक अज्ञानासीं ॥ जे कीं आपणासीं विस्मृती॥ ५५ ॥ आपुलिया नेणण्यावांचून ॥स्वप्नीं सामग्री आणि कोण॥ न सादृश्य ना दोषदर्शन ॥ येक अज्ञानावांचुनियां ॥ ५६ ॥ आणि सादृश्यें जरी भ्रम होय ॥ तरी ब्रह्मासी प्रपंच सादृश्य काय ॥ ब्रह्म निर्गुण पूर्णानंद पाहे ॥ व्यापक आहे सर्वत्र ॥ ५७॥ स्वप्रकाश स्वसंवेद्य ॥ निरवयव निरवंद्य ॥ प्रपंच सगुण दुःखाद्य ॥ अतिनिंद्य भावयुक्त ॥ ५८ ॥ परिछिन्न परप्रकाश ॥ परसंवेद्य सावयवांश ॥ अविद्याभूत आणि दृश्य ॥ विश्वदृश्य नैश्वरपणें ॥ ५९ ॥ यया परस्परें सादृश्य काय ॥ विचारितां बहुत

१ चकाकणें. २ प्रकार. ३ सारखेपणा. ४ आत्मानुभवी. ५ नाशवंत. ६ अज्ञानयुक्त.

अंतर आहे ॥ यालागीं साद्दश्य भ्रम नोहे ॥ अज्ञान पाहे हो तुझें ॥२६०॥ हें जाणपां अन्यथा ख्याती ॥ निर्धारुनि ठेविलें वेदांतीं ॥ अन्य शास्त्राचिया युक्ती ॥ सर्वही निश्चिती दोषुनियां ॥६१॥ आणि ब्रह्माच्याठाईं ॥ सामान्य विशेष सर्वथा नाहीं ॥ ब्रह्म तें निःसामान्य विशेष अनपाईं ॥ निर्विशेष पाहिं सर्वदां ॥ ६२ ॥ ब्रह्मीं सामान्य विशेष बोलतां ॥ श्रुतीसिं येतसे अप्रमाणता ॥ आणि श्रुतिविरुद्ध बोलतां ॥ पाखांड तत्वतां आंगीं वाजे ॥ ६३॥ गोच्याठाईं सामान्य गोत्व ॥ विशेषें खंडत्व मुंडत्व ॥ तैसें ब्रह्मों सामान्य विशेषत्व ॥ कैंचें वक्तृत्व नाना नर्के ॥ ६४ ॥ कां शुक्तिच्याठाईं शुक्ती सामान्य ॥ विशेष तें नीलंपृष्ठत्रिकोण ॥ तैसें ब्रह्मीं विशेष सामान्य ॥ सांगा कोण वर्ततसे ॥ ६५ ॥ सामान्य शब्दें समस्त ॥ विशेष शब्दें बोलिजे व्यक्त॥ ऐसें समस्त व्यक्तात्मक ॥ ब्रह्म निश्चित ऐसें असे॥६६॥ समस्त शब्दें निर्विकार ॥ व्यक्त शब्दें प्रपंचाकार ॥ समस्त व्यक्तात्मक निर्धार॥ब्रह्म साचार ह्मणाल तुह्मी ॥६७॥आकार गेलिया विशेष ॥उरे सामान्य निर्विशेष ॥यालागीं भ्रम सामग्री सावकाश ॥ असे अशेष परब्रह्मीं ॥ ६८ ॥ ब्रह्म निर्विकाराहि होय ॥ प्रपंचाकारहि तेंचि आहे ॥ जैसें सुवर्ण येक सोनें होय ॥ तेंचि पाहे कटकाकारें ॥६९ ॥ तरी सुवर्ण विकारें परिणाम ॥ अलंकाररूपें झालें हेमँ ॥ तैसें नव्हे परब्रह्म ॥ सर्वदा सम परिणामशून्य॥२७०॥विश्व ब्रह्माचा परिणाम ॥ हें बोलणें अति विषम॥ विकारशून्य परब्रह्म ॥ तेथें परिणाम कैसा घडे ॥ ७१ ॥ ब्रह्म सर्वदां निर्विकार ॥ तेथें परिणाम कैंचा जगदा-

१ अविनाशी. २ भाषण. ३ शिंपी. ४ शिंपीच्या पाठिमागचा त्रिकोणी निळा भाग. ५ दृश्य. ६ अलंकाराच्या रूपानें. ७ सोनें.

कार ॥ हें बालणेंचि अविचार ॥ होय निर्धार भ्रममूळ ॥७२॥ जेजे वस्तु परिणामवंत ॥ ते ते जाण नाश पावत ॥दुग्ध परिणामोनि दधि होत ॥ स्वयें नासत नामरूपें॥७३॥जे कीं परिणाम वादबोलती ॥ ते सर्वथा कांहींच नेणती ॥ ते शब्दज्ञानीच ह्मणिजेति ॥ अनुभव नेणती सर्वथा ॥ ७४ ॥ परिणामीं ते विकारवंत ॥ सांशं जाणावे निश्चित ॥ ब्रह्म अविकारी निरंशं बोलत ॥ श्रुति सर्वत्र परियेसी ॥७५॥ ब्रह्म परिणामीं प्रपंचाकार असतें ॥ तरी वेदें कां विश्व निषेधिंजेतें ॥ नेति नेति येणें अर्थें॥प्रपंचातें निराकारी॥७६॥आणिकही वेदश्रुती॥ प्रपंचातें निषेधिती ॥ निषेधबोधें ब्रह्मस्थिती ॥ तेचि श्रोतीं परिसावी॥७७॥श्रुती॥अपूर्वंअनपरंअनंतरंअबाह्यं इत्यादि ॥टीका॥ पूर्व शब्दें बोलिजे कारण ॥ तें तंव शुद्ध अज्ञान ॥ ब्रह्म कार्य कारणाविहीन ॥ नव्हे अज्ञान सर्वथा॥ ७८॥ अपर शब्दें कार्यजात ॥ दृश्य प्रपंच हा समस्त ॥ ब्रह्म कार्य नव्हे निश्चित ॥ उभयातीत अनादिपणें॥७९॥ना ब्रह्म कोणाचेंहि अंतर ॥ दुसरा पदार्थ नाहीं साचार॥ बाह्यही नव्हे निरंतर॥ निर्विकार सर्वत्रपणें॥२८०॥ येक वस्तु साच असावें ॥ तरी त्यासीं दुजें अंतर्बाह्य बोलावें ॥ प्रपंचासीं तरी सत्यत्व नसंभवे॥ ह्मणोनि हें नव्हे सर्वथा॥८१॥ऐसी प्रपंचाची व्यावृत्ती ॥ सर्व प्रकारें करितसे श्रुती॥ब्रह्म प्रपंचरूप हे स्थिती॥ अघट सर्वार्थीं घडेना ॥ ८२ ॥ ब्रह्म सर्वदा निर्विशेष ॥ त्यासीं कैंचें सामान्य विशेष ॥ श्रुति निषेधी प्रपंचास॥ तेंचि सावकाश परियेसी ॥ ८३ ॥ श्रुती ॥ अस्थूलंअनणुअदीर्घंअन्हस्वंइत्यादि ॥ टीका ॥ ब्रह्म दीर्घ नाअदी-

१ नाशवंत. २ मायिक. ३ परब्रह्म. ४ धिःकारकेलाअसता. ५ आरंभरहित. ६ विवंचना. ७ कधींनघडणारी.

घं अस्थूळ ॥ अणु ना ऱ्हस्व केवळ ॥ ते ज्ञप्तिमात्र निष्कळ ॥ अतिनिर्मळ निःसंगपणें ॥ ८४ ॥ स्थूळ सूक्ष्मपणें प्रपंच घडे ॥ परि ब्रह्मी हें कांहींच नघडे ॥ ह्मणोनि श्रुति हें स्थूळादि कोडें ॥ अतिनिवाडें निषेधी ॥८५॥ यालागीं जैसें जग आहे तैसियासीं ॥ ब्रह्म ह्मणती तेणेंचि रूपेसीं ॥ सर्वथा वर्म नकळे त्यासीं ॥ मानिती ब्रह्मासी विशेष सामान्य ॥ ८६॥यालागीं भ्रमाचें कारण ॥ मुख्य येकचि गा अज्ञान ॥ तेणें विचित्र भ्रम हा जाण ॥ अधिष्ठानीं पूर्ण भासत ॥ ८७ ॥ तैसें अज्ञानदर्पणाच्याठाईं ॥ विश्वहें विचित्र भासे पाहीं ॥ तें केवळ अज्ञानावांचुनि नाहीं ॥ पाहतां सर्वही हेंचि मूळ ॥ ८८ ॥ यालागीं गा रघुनाथा ॥ विश्व हें समूळ विचारितां ॥ ब्रह्मीं स्फुरतसे मिथ्या ॥ साच भ्रांता भ्रमास्तव ॥ ८९ ॥ श्लोक ॥ सर्गश्चित्स्यंदमात्रात्मासम्यग्दृष्टौ विलीयते ॥ उदेत्यसम्यग्दृष्टौतुरज्ज्वांसर्पभ्रमोयथा ॥ ११ ॥ टीका॥ हा सर्ग समस्त विश्वरचना ॥ ते सर्व हि ज्ञानमात्रचि गा रघुनंदना ॥ नामरूप भासे तो भ्रम जाणा॥ नाहीं चिद्धनावांचुनि अन्य ॥२९०॥सम्यक्ज्ञानें विचारूनि पाहतां ॥ तंव नाहींच होय सर्वथा ॥ येऱ्हवीं अज्ञानें उद्बुधता॥पावे ताता जगदाभास॥९१॥ययाचें उपजणें निमणें॥होतसे गा ज्ञानाज्ञानें ॥ उदय पावतसे अज्ञानें ॥ लीन ज्ञानें होतसे ॥९२॥जैसी रज्जूच्याठाईं सर्पबुद्धी ॥ रज्जुअज्ञानें भयकंपवृद्धी ॥ सम्यक्दृष्टीनें निरवधी ॥ नास त्रिशुद्धी पावत ॥ ९३ ॥ तेंचि सुखदुःखाचें कारण॥ज्ञानें सुख अज्ञानें दुःख दारुण ॥ मोक्षबंधासीं मूळ ज्ञानाज्ञान ॥ जाण हे खुण रघुराया ॥९४ ॥



१ ज्ञानस्वरुप. २ धिःकार. ३ उत्पत्ती. ४ आत्मज्ञानानें. ५ जागृती. ६ विवेकदृष्टीनें. ७ अत्यंत.

॥ अज्ञानें भोग वासना उठी ॥ सर्व संसार वासनेच्या पोटीं ॥ संसारीं जन्म मरणाची आंटी ॥ दुःख कोटी उत्तरोत्तर ॥ ९५ ॥ श्लोक ॥ भोगवासनयायातिबंधोदार्ढ्यमवस्तुजः ॥ तयोपशांतयायातिबंधोजगतिमानवं ॥ १२ ॥ टीका ॥ विषय भोग वासनेकरून ॥ भवबंध दृढता पावे जाण ॥ विचारितां याचें कारण ॥ मुख्य अज्ञान रघुराया ॥ ९६ ॥ आणि अज्ञान विचारितां ॥ कोणाहि नमिळे पदार्थी ॥ हें अवस्थाभूत[2] तत्वता ॥ जाण ताता निर्धारें ॥ ९७ ॥ नविचारितां तरी भरलें आहे ॥ विचारितां नाहींचि होये ॥ हें नाहींचपणें पाहे ॥ स्फुरलें आहे अवस्तुपणें ॥ ९८ ॥ याचे विकल्प बोलतां ॥ तरी मायेचे बोलिले ताता ॥ ते मायाच अज्ञान तत्वतां ॥ दोनी सर्वथा असतीच ना ॥९९ ॥ ऐसें अवस्थाभूत अज्ञान ॥ त्यापासाव भवबंध जाण ॥ दृढता पावे संपूर्ण ॥ वाढतां पूर्ण भोगेच्छा ॥ ३०० ॥ तिये भोग वासनेची शांति ॥ समूळ झालिया रघुपती ॥ तेणें बंधही जाय क्षयाप्रती[3] ॥ तन्मूळ ह्मणती जयातें ॥ १ ॥ अज्ञानकृत बंध जाण ॥ अज्ञानक्षयें बंधही क्षीण ॥ बंध नाहीं तोचि मोक्ष पूर्ण ॥ जाणपां खुण रघुराया ॥२॥ अगा मोह तो इतुकाच रघुपती ॥ किं मनासीं सत्यत्वें विश्वप्रतीति ॥ मनाचेनि चंचळत्वें उपजती ॥ तन्नाशें शांती प्रपंचाची ॥ ३ ॥ श्लोक ॥ मनःसंपद्यतेतस्मान्महतःपरमात्मनः ॥ सुस्थिरादस्थिराकारंतरंगाइववारिधेः ॥१३॥ टीका ॥ त्याही मनाची उत्पत्ती ॥ ब्रह्माचिपासाव[4] गा रघुपती ॥ मनोत्पत्तीनें विश्वप्रतीति ॥ अन्य गती असेचि ना ॥ ४ ॥ जो कीं परमात्मा व्या-

१ कष्ट. २ अवस्थात्रयानें व्यापलेलें. ३ नाशाप्रती. ४ ब्रह्मापासून.

पकपणें ॥ जयातें श्रुति ब्रह्म ह्मणें ॥ तेथूनि मनातें उपजणें ॥ चंचळपणें रघुपुंगवा ॥ ५ ॥ तरी रघुनाथा तूं ऐसें ह्मणसी ॥ ब्रह्म सुस्थीर निश्चळ सर्वांसीं ॥ त्यापासाव चंचळ मनासीं ॥ उत्पत्ति कैसी घडेल ॥ ६ ॥ तरी एक तुज सांगेन ॥ स्थिरापासाव चंचळोद्गमन ॥ जैसा क्षीरांब्धि निश्चळ पूर्ण ॥ स्थिरता जाण गांभीर्यें ॥ ७ ॥ तयापासाव अतिचंचळ ॥ उठतसे बुंहुद जाळ ॥ क्षणिक अस्थीर सकळ॥स्थीर प्रांजळ भासती ॥ ८ ॥ तैसे या मनाचे उद्गार॥चंचळत्वें उठती संभार ॥ तेंचि हें विश्व चराचर ॥ क्षणभंगुर मनोमय ॥ ९ ॥ श्लोक ॥ तत्स्वयंस्वैरमेवाशुसंकल्पयातिनित्यशः ॥ तेनेयमिंद्रजालश्रीर्जाग्रतीप्रवितन्यते ॥ १४ ॥ टीका ॥ तेंचि मन स्वयें गा रघुनाथा॥ यथा स्वेच्छा अतिशीघ्रता॥निरंतर हें विश्व कल्पितां॥उसंत सर्वथा नाहीं यासीं॥ ३१०॥तेणें मन संकल्पें करुनी ॥ विश्वइंद्रजाळ भासे नयनीं ॥ जैसा इंद्रजाँळक जनीं ॥ संकल्प करूनि विचित्र दावी ॥११॥ इंद्रजाळकाचेनि संकल्पें ॥ येवढें इंद्रजाळ आरोपे ॥ पक्षाचीं पारवीं रूपें ॥ चर्मीं साप दाखवी ॥ १२ ॥ तें येवढें सापाचिसारिखें दिसे ॥ पाहतां साच कांहींच नादिसे ॥ तैसें मनसंकल्पेंचि विश्व भासे ॥ सर्वथा नसे साच कांहीं ॥ १३ ॥ जागृती अवस्थेच्याठाईं ॥ हें मनचि इंद्रजाळ कल्पीत पाहीं ॥ त्या नांव विश्व ह्मणती सर्वेही ॥ विचित्र पाहीं शामसुंदरा ॥ १४ ॥ मनकल्पनेविरहित ॥ जगहें नाहींच गा निश्चित ॥ कोण पदार्थ साच येथ ॥ भासे जगांत विचारिजे ॥ १५ ॥ अगा याचि प्रतीति रघुनाथा ॥ करूनि पाहेपां आतां ॥

१ उत्पत्ति. २ समूद्र ३ बुडबुडे. ४ स्पष्ट. ५ अतिशय. ६ विसांवा. ७ गाकडी.

मन स्वरूपिं निमग्न असतां ॥ प्रपंच सर्वथा नादिसे ॥ १६ ॥ मन विरालिया स्वस्वरूपीं ॥ मग प्रपंच कोण संकल्पी ॥ म्हणोनि हा संकल्प आरोपि ॥ असंकल्पीं भासेना ॥१७॥ हा मनाचेनि संकल्पें उठी ॥ मन स्वरूपस्थ झालिया कदां नुठी ॥ तरी मनसंकल्पीत हे गोष्टी॥साच जगजेठी झाली असे ॥ १८ ॥ स्वरूपानुभव नाहीं जयासीं ॥ कैसेनि प्रत्यया येईल तयासीं ॥ तरी सुषुप्तीचा अनुभव समग्रांसी ॥ लहान थोरासीं होतसे ॥१९॥ सुषुप्तीसिं मन नाहीं॥तेथें येक आत्माचि पाहीं ॥ तेथें मनाचे अभावें जग नाहीं ॥ ऐसा सर्वांहीं अनुभव असे ॥ ३२० ॥ अगा प्रपंच जरी साच असता ॥ तरी सुषुप्तीसी भासता ॥काळत्रंई ननासता ॥ जाण रघुनाथा हेचि खुण ॥ २१ ॥ आणि स्वप्नींहि जागृती ऐसा ॥ नदेखिजे जैसा तैसा ॥ तेथें दिसे विपरीत ठसा ॥ भासे विरेशा मनोकल्पित ॥ २२ ॥ ऐसें जागृतीये कल्पिलें ॥ स्वप्नीं आणिकचि विस्तारलें ॥सुषुप्तीसिं नाहीं झालें ॥ होय बोलें नश्वर ॥ २३ ॥ जे कीं साच वस्तु असे ॥ते काळत्रयीं असे जैसे तैसे ॥ सर्वथा नभासे अनारिसे॥खूण विश्वेशें जाणिजे ॥ २४ ॥ जैसा आत्मा सर्वदां संत ॥ काळत्रंई अबाधित ॥ विपरीत नव्हे ईषंत ॥ असे संतत येकरूप ॥ २५ ॥ तैसें विश्व हें साच असतें ॥ तरी काळत्रंई नबाधिजेतें ॥ आणि विपरीतही नभासतें ॥ सर्वदां असतें जैसें तैसें ॥ २६ ॥ यालागीं असंत सर्वांपरी ॥ हें मन संकल्पाचीच भरोवरी ॥ मनोदयें घेते फरारी ॥ नाहीं उरी मनोलयें ॥ २७ ॥ यालागीं जागृतदशे ॥ मनाचि हें इंद्रजाळ प्र-

१ समरसझालिया. २ निद्रेचा. ३ लयानें. ४ निराळी. ५ किंचित्. ६ सामग्री. ७ वोढी. ८ विश्वाभास.

काशे ॥ कल्पीत परी साच ऐसें ॥ मानिजे मानसें रघुराया ॥ २८ ॥ श्लोक ॥ यथाबालस्यवेतालोमृत्युपर्यंतदुःखदः ॥ असदेवसदाकारंतथामूढमतेजगत् ॥ १५ ॥ टीका ॥ अगा जैसा बाळकासी वेताळ ॥ साचपणें देतसे तळमळ ॥ मृत्युपर्यंत दुःखकल्लोळ ॥ करी सकळ दुःखमय ॥ २९ ॥ बाळासीं बागुल दाविती ॥ तो वस्तुता तरी नये व्यक्ती ॥ तेथें शब्दमात्राचीच व्याप्ती ॥ दुःखसंतति तितुकेनी ॥ ३३० ॥ त्या बागुलाचेनि भयेंकरून ॥ बाळक कांपे गदगदोन ॥ दुःख करी अतिदारुण ॥ शोक संपूर्ण मृत्युवरी ॥ ३१ ॥ बागुल आला ह्मणती ॥ तंव तंव पीडे दुःखाची आर्ति ॥ आप्तें केलिया वेताळनिवृत्ती ॥ सुखसंपत्ती पावत ॥ ॥ ३२ ॥ शब्देंचि ह्मणती बागुल आला ॥ तो दुःखरूप तयाबाळा ॥ मृत्युपर्यंत दुःखसोहळा ॥ दे त्यावेळा अढळपणें ॥ ३३ ॥ गेला ह्मणती आप्तवचनें ॥ अतिसुख मानी अंतःकरणें ॥ तैसा हा लटिकाचि संसारपणें ॥ दुःख दारुण देतसे ॥ ३४ ॥ अज्ञानें मूढता बुद्धीसीं ॥ परिपूर्ण जया मनुष्यासीं ॥ साच संसार होय तयासीं ॥ दे दुःखासीं वेताळापरी ॥ ३५ ॥ संसार साच तरी नाहीं ॥ अज्ञानें साच मानिती सर्वही ॥ बाळासीं बागुल जैसें पाहीं ॥ दुःख अनपांई देतअसे ॥ ३६ ॥ जैसेंमरणांतरें मरण ॥ पावतसे साच मानून ॥ तंव तंव दे दुःख दारुण ॥ संसार पूर्ण भासवी ॥ ३७ ॥ हा सत्यत्वें आला ना गेला ॥ केवळ शब्दमात्रेंचि रूढला ॥ परी दुःखरूपेंचि असे झाला ॥ अज्ञानाला रघुनाथा ॥ ३८ ॥ पाहतां हा असदाकारु ॥ अज्ञानें भासे संसारु ॥ यासि

१ दुःखलहरी. २ आकारास. ३ निवारण. ४ विनाकारण. ५ मिथ्याकार.

जो जो कीजे प्रतीकारु ॥ तेणेंचि फार होउंलागे॥३९॥जरी भाग्यें भेटे सद्गुरु॥ तरीच सरे हा भवपुरु ॥ येऱ्हवीं अतिदुस्तरु॥दुःखसागरु दुःखात्मक॥३४०॥शुद्ध ब्रह्माच्याठाईं॥हा असद्रूप भासे पाहीं॥तेणेंचि भांबावती सर्वही विचार कांहीं नकरितां ॥४१॥ श्लोक ॥ अव्युत्पन्नस्यकनकेकुंडलंकटकंयथा ॥ कटकज्ञप्तिरेवास्तिनमनागपिहे-मधीः ॥१६॥ टीका ॥ अगा सुवर्णाचेचि अलंकार॥ केलिया कटकसंभार ॥ तेथें कटक बुद्धीचा निर्धार ॥ करी सत्वर अव्युत्पन्न ॥४२॥ तया अव्युत्पन्ना पुरुषासीं ॥ अळंकारीं पृथक्बुद्धी निश्चयेसी ॥ होय परि सुवर्णाऐसी॥ नव्हे परियेसी बुद्धि त्याची ॥ ४३ ॥ जैसें ज्याचें नाम आकारा देखती ॥ तें तें तैसेंचि यथार्थ मानिती ॥ परि अधिष्टानीं गा रघुपती ॥ बुद्धि सर्वार्थीं नरिघे त्याची ॥ ४४ ॥ दृष्टि तरी प्रत्यक्ष सुवर्ण देखती ॥ परि सुव-र्णाकार नव्हे चित्तवृत्ती ॥ नामरूपाची करूनि भ्रांति ॥ होय सर्वार्थीं रघुपुंगवा ॥ ४५ ॥ हेंचि आश्चर्य गा रघु-नाथा ॥ प्रत्यक्ष यथार्थ वस्तु देखतां ॥ विपरीत भास होय चित्ता ॥ अपूर्वता काय सांगों ॥ ४६ ॥येवढें भ्रांती-चें बळ ॥ देखणें दृष्टीसीं घाली पडळ॥शुद्धासींच करी मैळ ॥ देखे बरळ पिशाच जैसा ॥ ४७ ॥ तैसा अपरोक्ष आत्मा स्वतःसिद्ध ॥ त्याचा भ्रमेंकरूनियां बाध ॥ नामरूपात्मक जे विरुद्ध ॥ देखे अंध शुद्ध स्वरूपीं ॥ ४८ ॥ अगा नामारूपासाठीं ॥ वस्तु दवडिली बारावाटी ॥ असत्प्रपंच देखे दृष्टी ॥ साचपणें सृष्टी रघुनाथा ॥ ४९ ॥ तेंचि नामरूप वेगळें करुनी॥विश्व पाहिजे विचारुनी॥तरि तेंचि ब्रह्म निर्वाणी॥नाहीं काहाणीं जगासीं॥३५०॥

१ दुरीकरण. २ खोटा. ३ अळंकार. ४ अविद्वान्. ५ निराळी बुद्धी. ६ उलट. ७ आवरण. ८ प्रत्यक्ष. ९ शेवटीं.

अगा दूरि कोठेंहि नव जावें ॥ तपादि नलगे साधावें ॥ येक नामरूप त्यजूनि राहावें ॥ तरीच पावा-
वें शुद्ध ब्रह्म ॥ ५१ ॥ नामपंचकाची व्याप्ती ॥ अवघी वर्ततसे गा रघुपती ॥ सांगेन ऐके संमती ॥ येकाग्रचि-
त्तीं परिसपां ॥५२॥ संमतिश्लोक ॥ अस्तिभातिप्रियंरूपंनामचेत्यंशपंचकं ॥ आद्यत्रयंब्रह्मरूपंजगद्रूपंततोद्वयं ॥
॥ १ ॥ टीका ॥ सत्ता प्रकाश आणि सुख ॥ हे तंव त्रयात्मक ब्रह्म देख ॥ जग तें नामरूपात्मक ॥ होय सम्यक्-
नामद्वयें ॥ ५३ ॥ यालागीं नामरूपात्मक हें जग ॥ नामरूपातीत ब्रह्म अव्यंग ॥ हें निश्चयें जाण तूं सांग ॥
नाहीं भाग ब्रह्मासि पैं ॥ ५४ ॥ श्लोक ॥ यथाज्ञस्यपुरागारनगनागादिगोचरा ॥ इयंदृश्यंदृगेवास्तिनत्वन्याप
रमार्थदृक्॥ १७॥टीका ॥ पुरें आगारें वृक्षयाती॥पर्वत मानुनि विश्व विचित्र स्थिती ॥येणें विभागेंचि क्षिती ॥ मूढ
मानिती अज्ञानें ॥ ५५ ॥ अगा अज्ञाना पुरुषासीं ॥ विपरीतचि दृष्टी परियेसी ॥ वैचित्र पृथ्वियेसीं॥ येक रूपासीं
देखती ॥५६॥ हा वृक्ष हा उंच पर्वत ॥ हें गृह हें नगर विस्तृत ॥ नाम रूपाचिप्रकार अनंत ॥ कल्पिती यथार्थ नेण-
पणें॥५७॥अगा पृथ्वीयेच्या ठाईं ॥ हे अनेक विकार कल्पिले पाहीं॥ ते यथार्थ मानुनि सर्वही॥भ्रमडोहीं बुडता-
ती ॥ ५८ ॥ पृथ्वी तेचि पृथ्वी नदेखती ॥ आणि नाना विकार कल्पिती ॥ नसतेंचि सत्य मानिती ॥ भ्रमु वाढविती
अज्ञानें ॥५९॥ जो कोणी परमार्थद्रष्टा असे ॥ तो तंव पृथ्वीचि जाणे सर्वांशें ॥ तेथें नेणोनि विपरीत भासे ॥ तें तं-
व नसे तयाप्रती ॥३६०॥ तैसें ब्रह्महो नानाकार ॥ विश्व भासे चराचर ॥ तेंचि भ्रमें मानिती साचार ॥ जे अविचार

१ व्यापकता. २ चांगलें. ३ पूर्णदोषरहित. ४ घरें. ५ पृथ्वी.

ज्ञानहीन ॥ ६१ ॥ तया विश्वाच्या उत्पत्ति क्षयीं ॥ दुःख मानिती जगत्रंई ॥ अधिष्ठान ज्ञानें सुख अक्षई ॥ जाण अनंपाई रघुनाथा ॥ ६२ ॥ श्लोक ॥ अज्ञस्यदुःखौघमयंज्ञस्यानंदमयंजगत् ॥ अंधंभुवनमंधस्यप्रकाशंज्ञानचक्षुषः ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ अगा अज्ञाना पुरुषासीं ॥ जग हें दुःखमयची परियेसीं ॥ बाह्य दृष्टीतें कारण दुःखासी ॥ निश्चयेसीं जाण रामा ॥ ६३ ॥ स्वस्वरूपाची अस्फूर्ति तें अज्ञान ॥ तेंचिस्वस्वरूपाचें नेणणेंपण ॥ तेंचि तें दुःखाचें कारण ॥ जाण खुण रघुनाथा ॥ ६४ ॥ अज्ञानकृत जे विपरीत बुद्धी ॥ जे ब्रह्मींच करी विश्ववृद्धी ॥ तेचि दुःखरूप क्षय व्याधी ॥ जाण त्रिशुद्धी रघुपुंगवा ॥ ६५ ॥ स्वशरीर आदिकरूनि ॥ जें कीं विपरीत भासे नयनीं ॥ तें तें दुःखरूप भवसेनी ॥ कोदंडपाणी जाण तुं ॥ ६६ ॥ जयासीं नाहीं स्वस्वरूपीं अज्ञान ॥ तोचि तो ब्रह्म नित्यानंदघन ॥ तयासी हें विश्वचि ब्रह्म पूर्ण ॥ दुःखस्वप्न कैचें भासे ॥ ६७ ॥ जरी ब्रह्मावेगळें दुजें भासे ॥ तरीच विश्वाकारें दुःख प्रकाशे ॥ तेणेंविण सुखरूपचि असे ॥ ब्रह्मचि भासे ह्मणोनीयां ॥ ६८ ॥ अगा आपण जो जैसा असे ॥ त्यासी तैसेंचि सर्वहि प्रतिभासे ॥ अंधासीं अंधगृह जैसें ॥ नकळे मानसें अंधकूप ॥ ६९ ॥ तरी माडिया गोपुरें धवळारें ॥ वरी चित्रें लिहिलीं मनोहरें ॥ तरी तें अंधासि गाभारें ॥ जाण निर्धारें अंधकाराचें ॥ ३७० ॥ अंध तो राजभुवनीं बैसविला ॥ तो मानी मी अंधकूपीं पडिला ॥ तैसा स्वस्वरूपीं जो आंधळा ॥ विश्व तयाला दुःखरूपची ॥ ७१ ॥ तेंचि राजमंदिर डोळसासीं ॥ प्रकाशमंत मनोहर परियेसीं ॥ तैसें विश्व हें ज्ञातयासीं ॥ ब्रह्मचि सर्वांसीं सुखरूप ॥ ७२ ॥ यालागीं जो जैसा स्वयें आहे

१ लयांमध्यें. २ अविनाशी. ३ विस्मरण. ४ वाढपसारा. ५ देवळाचा उंचभाग. ६ सुशोभितघरें. ७ मध्यभाग.

त्यासीं सर्वहि तद्रूपचि होय ॥ तृप्तासिं विश्व तृप्तचि पाहे ॥ क्षुधिता होये क्षुधारूप ॥७३॥ पीडितासिं भासे पीडित ॥ क्लेशिया क्लेशरूप निश्चित ॥ धनियासीं जग धनवंत॥कुश्चिता कुश्चित शुद्धासीं शुद्ध॥७४॥अगा तूं ऐसें ह्मणसी॥ शुद्ध ब्रह्मीं विश्वोत्पत्ति कैसी ॥ अजडीं जड रूपासीं ॥ वस्ती कैसी सांगिजे ॥७५॥ तरी दृष्टांतीं करूनियां उत्तर ॥ देइजेल अति चमत्कार ॥ तें एक अतिसादर ॥ संदेह पार पावसी जेणें ॥ ७६ ॥ श्लोक ॥ यथाविशुद्धआकाशेसहसेवाभ्रमंडलं ॥ भूत्वाविलीयतेतद्वदात्मनीहाखिलंजगत् ॥१९॥ टीका ॥ अगा अति विशुद्ध आकाशिं॥अकस्मात अभ्रमंडळें जैसीं ॥ होउनियां एकसरिसी ॥ तेंचि ते चौपासीं पसरती ॥७७॥ आकाश तरी निर्मळ अतिशुद्ध ॥ व्यापकपणेंचि अतिवृद्ध ॥ अजड अस्तब्ध अति अगाध ॥ उदंडपणें ॥ ७८ ॥ तयाच्या ठांईं जड अभ्रजात ॥ अकस्मात असे उपजत ॥ तें स्वयेंचि लयो पावत॥नभ तटस्थ अभंगपणें॥७९॥अभ्रें आकाश काय मेळलें॥किंवा अभ्रेसीं संग पावलें ॥ तें अभ्रचि आलें गेलें ॥ नभ उगलें जैसें तैसें ॥३८०॥अभ्रीं दुजेपण नाहीं आलें ॥ अभ्रें आकाशपण नाहीं गेलें ॥ अभ्रचि स्वयें नासलें ॥ व्योम उगलें जैसें तैसें ॥ ८१ ॥ तैसें शुद्ध आत्मयाच्याठाईं ॥ जड विश्व भासतसे पाहीं ॥ आणि पावतसे लयही ॥ आत्मा अनपाईं जैसा तैसा ॥ ८२ ॥ येकचि ब्रह्म विशुद्ध अरुपी ॥ अज्ञानें विश्व आरोपी ॥ इतुकेनि ब्रह्म काय लेपी ॥ लेपें आरोपी नानाविधी ॥ ८३ ॥ उत्पत्तिस्थिति विनाश ॥ ब्रह्मींच होतसे जगास ॥ परि ब्रह्म तें सदा उदास ॥ अति अविनाश उदासपणें॥८४॥ रज्जुच्याठाईं सर्प भासला॥ तो तेथेंचि स्थिती

१ जन्मरहित. २ विस्तीर्ण. ३ आकाश. ४ उरलें. ५ रूपरहीत. ६ कल्पनाकरी.

नाशु पावला ॥ रज्जु जैसा तैसा उगला ॥ क्षय वृद्धीला नपवेचि ॥ ८५ ॥ सर्पत्वें रज्जु नाहीं वेचिली ॥ सर्पत्वें रज्जु नाहिं मैळली ॥ सर्पत्वें विषरूप नाहीं झाली ॥ असे संचली जैसी तैसी ॥ ८६ ॥ तेंसें जगदाभासें ब्रह्म नमैळे ॥ जगदाभासें नाहिं वेंचलें ॥ ब्रह्म तें अचंचळत्वें नढळे ॥ असे निराळें असंगपणें ॥ ८७ ॥ विश्व जरी साच असतें ॥ तरी ब्रह्मासि दुजेपण येतें ॥ जग नसतां काय तेथें ॥ जग विपरीत होईल ॥ ८८ ॥ विश्व ऐसें जें ह्मणणें ॥ तेंचि वाचेचें विटंबणें ॥ वांचूनि दुजे विश्वपणें॥ देखिजे कोणें विनाब्रह्म॥८९॥अगा या जगाचिया गोष्टी ॥भ्रमेंवाचूनि नाहीं सृष्टी॥ यालागीं विश्व हे परिपाटी ॥ समूळ खोटी विचारितां॥३९० ॥ भुललेपणें गा रघुनाथा ॥ सिद्ध वस्तुसी करिती अन्यथा ॥ ब्रह्मीं विश्व आरोपितां ॥ अनर्थ ताता सहस्रावधी ॥ ९१ ॥ अगा ब्रह्मीं विश्वाचिया लहरी॥ होत जात ब्रह्मसागरीं ॥ परी नवचे नढळे तिळभरी ॥ अढळ परी ययाची ॥ ९२ ॥ ययालागीं गा रघुनाथा ॥ अखिल विश्व ब्रह्म स्फुरतां ॥ स्फुरणंपणेंचि हे मिथ्या ॥ नव्हे तत्वतां कल्पितपणें ॥ ९३ ॥ श्लोक ॥ आदित्याव्यतिरेकेणरश्मयोयेन भाविताः॥आदित्याएवतेतस्यनिर्विकल्पःसउच्यते॥२०॥टीका॥अगा जयावेगळें जें नाहीं॥तेंचि वस्तुत्वेंचि पाहीं ॥जैसा रविवीण रश्मि नाहीं ॥ रविच सर्वहि रश्मिरूप ॥ ९४ ॥ रविउदयें रश्मिचेंअसणें ॥ रवीचेनि अस्तें अस्तु पावणें ॥ तरि तेंचि रविरूपेंचि जाणणें ॥ वेगळेपणें उरि कैची ॥९५॥ ऐसें जाणे जो निश्चयेंकरून ॥ तोचि पुरुष जाणावा सज्ञान ॥ येणें दृष्टांतें ब्रह्मीं दुजेपण ॥ नदेखे आपण विश्वरूप ॥ ९६ ॥ ब्रह्मावेगळें विश्व भासे ॥ तरी येक ब्र-

१ उरला. २ दोरी. ३ पसरिली. ४ कल्पना करितां. ५ सर्व. ६ स्मरण होतांच. ७ किरण.

ह्मचि सर्वत्र असे ॥ अधिष्ठानीं सर्वथा नसे ॥ जाण सर्वांशें आरोपित ॥ ९७ ॥ यालागीं ब्रह्मीं विश्व दुजेपणें ॥ सर्वथा नाहींच ऐसें जो जाणे ॥ तोचि निर्विकल्प पुरुष सर्वज्ञपणें ॥ जया भोगणें ब्रह्मसुख ॥ ९८ ॥ आणि निर्विकल्प समाधीचि खुण ॥ तियेचें जाण हेंचि लक्षण ॥ विश्व नस्फुरे ब्रह्मेविण ॥ नित्य चिद्घन तेंचि तें कीं ॥ ९९ ॥ परि मन कोंडूनि निवांत राहाणें ॥ अंतरीं ब्रह्मखुण सर्वथा नेणें ॥ ते समाधी नव्हे विटंबणें ॥ वृथा करणें श्रमु तो ही ॥ ॥ ४०० ॥ श्लोक ॥ तंतुमात्रोभवत्येवपटोयद्वद्विचारितः ॥ आत्मांतन्मात्रमेवेदंतद्वद्विश्वंविचारितं ॥ २१ ॥ टीका॥अगा पटु विचारुनि पाहातां॥तंव पटत्व नाहींचगा तत्वतां॥पट तो तंतुचि रघुनाथा॥पाहातां अन्यथा भासेना॥१॥येक तंतुचि सैंघ[1] दिसतां ॥ ते पटप्रतीति होय भ्रांता ॥ बरवें विचारूनि पाहातां ॥ होय अन्यथा बुद्धि त्याची ॥२॥ परि विचार्यमाणें येक तंतुची ॥ तेथें मिथ्या भ्रांति पटत्वाचि ॥ तैसें जाण आत्मा तन्मात्रचि[2] ॥ विश्ववींचि ब्रह्माब्धि माजी ॥३॥ विश्व हें विचारूनि पाहातां ॥ येक ब्रह्मचि जाण तत्वतां ॥ विश्वप्रतीति होय भ्रांता ॥ विश्वीं[3] तत्वतां अढळ झाली॥४॥अज्ञानें विश्व हें देखती ॥ ज्ञानें ब्रह्माचि जाण प्रतीति ॥ हें तंव नचुके गा सर्वार्थीं ॥ विश्व मूर्ति विश्वंभरा ॥५॥श्लोक॥विश्ववीचिविलासोयंचित्सुधाब्धेरुदेत्विच॥विलीयतेचतत्रैवमध्येकथमतन्मयः ॥ २२ ॥ ॥ टीका ॥अगा चित्सुखाब्धीचिया[4] लहरी॥तैसीच विश्वाचिया भरोवरी[5]॥होती जाती क्षणाभीतरीं॥जाण सर्वापरी तेथेंची॥६॥चित्त शब्दें बोलिजे ज्ञान वरिष्ठ ॥ सुख शब्दें परमानंद श्रेष्ठ ॥ एतद्रुपें ब्रह्मानंदनिर्घोट[6] ॥ होय स्पष्ट चि-

१ कल्पीत. २ केवळ. ३ विश्वरूपी. लहरी. ४ ज्ञानानंदाचिया. ५ सामग्री. ६ परिपूर्ण.

त्सुखात्मक॥७॥तया ब्रह्माब्धीचा वीचिविलास ॥ तो ही जगद्रूपें उठि उदास ॥ तेथेंचि लयोहि सावकाश ॥ पावे निःशेष रामचंद्रा॥८॥अगा जेथुनि जें उदय पावलें॥ मागुती तेथेंचि लया गेलें ॥ तरि तेंचि तें नचुके कांहीं केलें॥ असे संचलें तेंचि तें कीं॥९॥उदय अस्त येकरूपता ॥ तरी मध्येंचि केंवी अस्तमयता॥उदया पूर्वीं तेंचि तत्वतां॥मावळतां तेंचि येक॥४१०॥ समुद्रीं उंचावे जें पाणी ॥ त्यासीं लहरीपणें दुजेपण आणी ॥ तेंचि सपाटल्या आन कोणी ॥ भासे जीवनीं दुजी वस्तु ॥११॥ यालागीं आदि अंतिं जें नसे ॥ आणि मध्येंचि जें आभासे ॥ तरि तेंआनें नव्हे तेंचि असे ॥ जाण सर्वांशें रघुनाथा॥१२॥तें नामरूपाचीच मिरवणी॥ वांचुनि सर्वत्र येकचि पाणी ॥ भ्रमें तयासीं दुजे आणी ॥ विपरीत करणी भ्रमाची॥१३॥तेंचि अज्ञान निःशेष जाये ॥ तेथें दुजेपण ही सामाये ॥ मग उदका वांचूनि काय आहे॥ विचारूनि पाहे चतुरनाथा॥१४॥तैसा सर्वत्र येक आत्माच असे ॥ तेथें दुजेपणें जें जगभासे॥ तें भ्रमावांचुनि आन नसे॥ जाण ऐसें रघुवर्या ॥१५॥ मुळीं ब्रह्माचेनि नेणपणें ॥ नाम रूपाचेंचि होय भासणें ॥ जगडंबरु हा असुंपपणें ॥ भासे नयनें भ्रमाचेनी॥१६॥ तेंचि अज्ञान जात खेंवो ॥ जगमिथ्यात्वें ब्रह्मभावो ॥ होय हें अपूर्व पाहाहो ॥ बोले रावो ज्ञानियांचा॥१७॥ श्लोक ॥ यथानतोयतोभिन्नाःफेनोर्मिहिमबुद्बुदाः॥आत्मनोनतथाभिन्नंविश्वमात्माविनिर्गतं॥२३॥ टीका ॥ अगा अधिष्ठानीं जें आभासे ॥ तें अधिष्ठानचि होय जैसें॥ तेणेंचि अभिन्नपणेंचि असे॥सर्वथा नसे स्वतंत्र कांहीं॥१८॥जैसे फेण उर्मि जळाच्या ठाईं॥कांहीं मध्यें बुद्बुदाकार पाहीं॥भा-

१ लाटा. २ पाण्यांत. ३ निराळें. ४ नाहींसेहोई. ५ जगद्रूपी पसारा. ६ अमित, पुष्कळ. ७ तत्क्षणीं. ८ ऐक्यपणें. ९ लहरीच्या. १० बुडबुडे.

सती तें तंचि सर्व कांहीं ॥ आणिक कांहीं असेना॥१९॥ जें कीं उंचावलें पाणी ॥ त्यासीं भ्रमें लहरीपण आणी॥कां हिम जैसें हिमकणीं॥वेगळेपणी बोलती॥४२०॥तैसें ब्रह्मी हें विश्व भासे॥तें ब्रह्मेसि तरी भिन्न नसे॥विचारूनि पाहातां असे ॥ ब्रह्म सर्वांशें रघुराया॥२१॥ अगा येकचि दुजें देखणें ॥ हें तंव भ्रमाचें साजेणें ॥ वांचूनि कोण वस्तु दुजेपणें ॥ वेगळेपणें उरलीसे॥२२॥ब्रह्मींच विश्व आभासे ॥ आणि स्थिती काळीं तेथेंचि वसे॥ लयहि पावे सर्वांशें॥ नाहींचि ऐसें तेथें जाणे॥२३॥ तेथें उत्पत्ति स्थिति लय भासती॥परी तयावेगळे नदिसती ॥ तरी तेंचि तें जाण विश्वमूर्ति ॥ आन गती भावो नये ॥२४॥ यदर्थीं श्लोकद्वयार्थें करून ॥ दृष्टांत चतुष्टय जाण ॥ अध्यारोपित तेंचि अधिष्टान ॥ नव्हे भिन्न हें निरोपूं॥२५॥ श्लोक ॥ आत्मनोपितथाविश्वमात्मन्येवलयंव्रजेत ॥ मृदिकुंभोजलेवीचिःकनकेकटकंयथा ॥२४॥ आत्मज्ञानाज्जगद्भ्रांतिरात्मज्ञानान्निवर्तते ॥ रज्वज्ञानादहिभ्रांतिस्तद्विज्ञानान्निवर्तते॥२५॥ तस्याहृश्यात्मतत्वस्यविस्मृत्येवस्थितिंगतं ॥ जगत्स्यादीश्वराद्भामततुरज्जुभुजंगवत ॥२६॥ टीका ॥ अधिष्टानचि साच असतां ॥ तेथें आणिक जें भासे भ्रांता ॥ तें भ्रांतिवांचूनि तत्वतां ॥ नाहीं अन्यथा वस्तु कोणी ॥ २६ ॥ येक असतां दुजें भासे ॥ तें तंव जाण अज्ञान पिसें ॥ तेथें नाहीं अनारिसें ॥ दृष्टांतें ऐसें बुझपां ॥ २७ ॥ जैसें मृतिकेच्या ठांई ॥ घटादिपात्रें भासती सर्वही ॥ तें तंव अज्ञानेंकरूनि पाहि ॥ येऱ्हवीं सकळही मृत्तिकाची ॥२८॥ घटाच्या आदि अंतीं ॥ येक मृत्तिकाचि गा विश्वमूर्ती ॥ तरी ते मृत्तिकाचि जाण सर्वार्थीं ॥ घटप्रतीति तो समूळ भ्रम ॥२९॥

१ वाला २ बोलणें. ३ जगदुत्पत्तीचाआरोपकरित. ४ निराळें. ५ समजावें.

आदि अंतिं मृत्तिकाचि असे ॥ घटरूपेंहि तेंचि वसे ॥ मध्यें पृथक् बुध्नोक्षाकार आभासे॥तेणेंचि पिसे घट ह्मणती ॥४३०॥ प्रत्यक्ष अधिष्टानचि दिसतां॥अज्ञानें आभासे आन रूपता॥तें साचचि मानिती नेणतां॥आश्चर्यता काय बोलों ॥ ३१ ॥ तेथें परिणामु तरी नाहिं झाला ॥ आणि व्यर्थचि भ्रम उपजला॥ विंवर्त देखतांहि तयाला ॥ अन्यथा झाला बुद्धिभ्रंश॥३२॥ परिणाम विवर्तांचें लक्षण ॥ तेंही तुजप्रती सांगेन ॥ मग तूं बुझेंसी संपूर्ण ॥ तेथिंचि खुण विबुधवर्या ॥ ३३ ॥ तरी विवर्त तो ऐसा असे ॥शुक्तिका जैसी तैसीच असे ॥तेथें मिथ्यारूपें जें भासे॥विवर्त ऐसें तया नाम ॥ ३४॥ तैसेंच मृत्तिकेच्या ठाईं॥निःशेष घट तंव नाहीं ॥ मृत्पिंड केलिया तया कांहीं॥घट कोणीहि नह्मणती ॥३५॥ कपाळ जरी तिचें झालें ॥ तरी मृत्तिकापण असे संचलें ॥ पृथक् बुध्नाकारें आलें ॥ नाम रूप भलें घटपणासीं ॥३६॥ परि तेव्हांही ते मृत्तिकाच असे ॥ तिसीं काळत्रंईं नाश नसे ॥ परिआकारें नाम रूप ठसे ॥ अनारिसें भासे जाणा ॥ ३७ ॥ यालागीं अधिष्टान असतचि असे ॥ तेथें भ्रमें जें कां आणिक भासे ॥ तो विवर्त जाणावा विश्वेशें ॥ वेदांत ऐसें बोलत ॥३८॥ आतां परिणाम तो ऐसा ॥ अधिष्ठान नासोनि अन्य ठसा ॥ होय तो जाण वीरेशा ॥ परिणाम ऐसा वोळख तूं ॥३९॥ दुध स्वरूपें स्वयें नासे ॥ त्याचेंचि आन दँधि भासे ॥ पहिलें अधिष्ठानचि अनारिसें ॥ अंतीं मध्यें नसे तो परिणामु॥४४०॥याचें नाम परिणामवाद ॥ सांगीतला गा तुज विंषद॥ विवर्तें अधिष्ठानासीं बाध॥नाहीं निर्बाध आन भासेंहि॥४१॥तैसा विवर्त भासत असतां॥तें साचचि माने अज्ञानवंता॥

१ निराळा. २ झाडांच्या स्वच्छ बुंधाप्रमाणें. ३ रुपांतर. ४ समजसीं. ५ शिंपी. ६ निराळें. ७ दहीं. ८ स्पष्ट. ९ प्रतिबंध.


हेंचि आश्चर्य वाटतसे चित्ता ॥ काय रघुनाथा बोलावें॥४२॥ जैसें मृत्तिकेच्या ठाईं घटादिक ॥ का जळाचे ठाईं वीचि अनेक ॥ कां कनकीं जैसें साच कटक् ॥ दोरी सम्यक सर्पाकार ॥ ४३ ॥ अधिष्ठानाचेनि अज्ञानें ॥ अधिष्ठानींच आन माने ॥ तैसें ब्रह्माचेनि अज्ञानें ॥ होय भासणें जगाचें ॥ ४४॥ तेंचि आत्मविषयिक अज्ञान ॥ ज्ञानें नासलिया संपूर्ण ॥ विश्वाभास निःशेष जाण॥हारपोनि जातसे ॥ ४५ ॥ रज्जुचेनि अज्ञानें अहिभ्रांति ॥ ते रज्जुज्ञानेंचि होय निवृत्ति ॥ तैसी विश्वभ्रांतीसि गा रघुपती ॥ कारण सर्वार्थीं अज्ञान ॥ ४६ ॥ अगा आत्मयाचें जें विस्मरण ॥ तेंचि जगभासाचें कारण ॥ यदर्थीं उपपत्ती नाहीं आन ॥ जाण खुण रघुराया॥४७॥अगा ईश्वरापासाव रघुपती ॥ यया जगाची वर्ते उत्पत्ति स्थिती ॥ जैसी रज्जु सर्पाची वसती ॥ असे वर्तती रज्जुपासाव॥४८॥ परि सदसद्विलक्षण ॥ जग तें मिथ्याभूत जाण ॥ कैसें तें सार्धश्लोकें करुन ॥ एक संपूर्ण सांगों तुज ॥४९॥ श्लोक॥ स्वप्नोजागृत्यसद्रूपस्यप्नेजाग्रदसद्रूपः ॥ मृत्युर्जन्मन्यसद्रूपोमृतौजन्माप्यसन्मयं ॥ २८ ॥ एवंनसन्नासदितिभ्रांतिमात्रंविजृंभते ॥ अनुभूयतएवाशुकिंचित्सर्वानुभूतितः ॥ २९ ॥ टीका ॥ अगा साच तें येकविधचि असावें ॥ काळत्रईंहि नपालटावें ॥ निःशेषहि ननासावें ॥ हें तों नसंभवे जगासि पैं ॥ ४५० ॥ स्वप्नकाळीं स्वप्न साच दिसे ॥ तें जागृतिसीं नाहींच भासे ॥ तेंहि जागृतिसीं साच नसे ॥ सर्वेचि भ्रंशे सुषुप्तिसीं ॥ ५१ ॥ तिहीं अवस्थाचें अनुसंधान ॥ नाहींच प्रकटलीया विज्ञान ॥ असद्रूप जें मिथ्या भाषण ॥ जाय बुडोन सर्वथा ॥ ५२ ॥ तैसा जन्मकाळीं मृत्यु नाहीं ॥ मृत्युकाळीं जन्म नाहीं ॥ एवं संत ना असंत पाहीं ॥ दोन्हीं नाहीं बोलावया ॥५३॥ एवं अवस्थारू

पचि येक रूपता ॥ नानाही जन्मास्थिती करितां ॥ ह्मणोनी हे असद्रूप सर्वथा ॥ सदसाद्विलक्षणता असे यासीं ॥ ॥ ५४ ॥ संत तरी सर्वदां असावें ॥ काळत्रंईं न नासावें ॥ आणि येकविधपणेचि असावें ॥ न भ्रंशांवे अवस्थांतरीं ॥ ५५ ॥ तैसें परी सत्य नव्हे सर्वथा ॥ पूर्वीं बोलिली याचि व्यवस्था ॥ असंत तरी भासे सर्वथा ॥ साच तत्वतां ऐसें गमे ॥ ५६ ॥ संत तरी हे नासतअसे ॥ असंत तरी साचपणें दिसे ॥ यालागीं सदस द्विलक्षण असे ॥ जाण सर्वींशें विश्वजाळ हें ॥ ५७ ॥ जें कीं सदसाद्विलक्षण ॥ तें तंव मिथ्याभूत जाण ॥ भ्रांतिमात्र विज्रंभण[2] ॥ जग संपूर्ण तैसें-भासे ॥ ५८ ॥ एवं सकळ निरूपणाचा इत्यर्थ ॥ जगन्मिथ्या हा फलितार्थ ॥ हा बाणलिया वैराग्यार्थ ॥ बाणे यथार्थ रघुपुंगवा ॥ ५९ ॥ येकोंहिपारि पाहातां ॥ जग साच नघडे गा रघुनाथा ॥ तरी लटिकीयासीं विमुख होतां ॥ प्रयास ताता काइसे ॥ ४६० ॥ ऐसें जगन्मिथ्यात्व बाणलिया ॥ तरि ते बोधलेचि[4] गा रघुराया ॥ मग जीवन्मुक्ती आपसया ॥ त्यासी सावयवा[5] वोळंगे[6] ॥ ६१ ॥ एकाग्र करूनि अंतःकरण ॥ संतश्रोतीं द्यावें अवधान[7] ॥ पुढील प्रकरणाचें व्याख्यान ॥ जें कीं करीन भगवत्कृपा ॥ ६२ ॥ तुमच्या अवधानाचि साठीं ॥ ग्रंथु सिद्ध होय उठाउठी ॥ आणि वक्तृत्वें[8] बुद्धि लाटी ॥ झोंबे पोटीं प्रमेयांचा ॥ ६३ ॥ ह्मणोनि तुमचे कृपेचा तुषार ॥ पावतांचि वाचा पावली मनोहर ॥ प्रमेय फळी विस्तार ॥ वोतंबरं अतिशयेसि करी ॥ ६४ ॥ सद्गुरु रंगनाथाचा फलितार्थ ॥ ह्मणें ऐका पुढील ग्रंथ ॥ जो कीं संवाद वसिष्ठ रघुनाथ ॥ जो इत्यर्थ करिते झाले ॥ ४६५ ॥ इतिश्रीयोगवासिष्ठसारेजगन्मिथ्याप्रकरणंद्वितीयंसमाप्तं

१ भ्रष्टावें. २ पसारा. ३ तात्पर्यार्थ. ४ बोधझालेला. ५ अवयवांसहित. ६ प्राप्तहोई. ७ लक्ष. ८ भाषणानें. ९ तात्पर्याच्या. १० टेंका.

॥ इति श्रीयोगवासिष्ठसारे द्वितीयं जगन्मिथ्याप्रकरणं समाप्तम् ॥

॥ अथ श्रीयोगवासिष्ठसारे तृतीयं मनोलय प्रकरणः प्रारंभः ॥



॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीनीलकंठगुरवेनमः ॥ जयजय श्रीसद्गुरुराया ॥ नमन करूनि तुझिया पायां ॥ ग्रंथव्या-ख्यान तरणोपाया ॥ जीवाचेया करीन मी ॥ १ ॥ तरी जड जीव उद्धारकु ॥ तूंचि तूं परिपूर्ण येकु ॥ जयाचा अवलोकदीपकु ॥ स्वप्रकाशकु करी जगा ॥ २ ॥ तया तुझिया कृपावलोकें ॥ ग्रंथु सिद्धि जाईल कौतुकें ॥ ये-रवीं येवढा उन्मेषु असे कें ॥ बोलचि फिके सर्वही ॥३॥ यालागीं जी कृपासागरा ॥ ऐकें ज्ञानदानीया उदारा ॥ रिघोनि मद्वाचेचा वोंवरा ॥ प्रकाश पुरा करी स्वामी ॥४॥ रिघा ह्मणतां परिछिन्न ॥ होउं पाहे तुझें परिमाण॥ तुज करितां सर्वां चलन॥ तूं व्यापक पूर्ण नियंतृत्वें ॥ ५ ॥ आणि वाचादि करणें तूंचि होसी ॥ तुजवीण स्थि-ती केंवि जगासीं ॥ यालागीं सर्व तूंचि अनुभवासीं ॥ अनुभवीयासीं येतसे ॥६॥ तरी कासया म्यां विनवावें॥ सर्वही तूंचि होसी स्वभावें ॥ वक्ता वदविता श्रोता सद्भावें ॥ होसी अनुभवें सकळ तूंचि ॥७॥ कर्ता करविता श्रीगुरुनाथा ॥ तेथें वर्णनाची काय कथा ॥ गुरु शिष्य भेद दावितां ॥ लीलावंत तूंचि तूं ॥ ८ ॥ माझें मीपण तुजविण ॥ कोठें पावेल अवस्थांन ॥ यालागीं तूंचि तूं आनंदघन ॥ मी तूंपण समूळ भ्रांती ॥ ९ ॥ आपुलेंचि ऐ-श्वर्य बोलावया ॥ ग्रंथमिसें करूनि सद्गुरुराया ॥बोलसी ब्रह्मानुभव अभिप्राया॥ उद्धरावया जड जीवां॥१०॥ तेथें माझें विनवणें तुजप्रती ॥ कासयालागीं सद्गुरुमूर्ति ॥ तथापि परोपकारार्थ विनंती ॥ आनंदमूर्ति करीं तुज ॥११॥तरी तेंचि ग्रंथाचें अनुसंधान ॥ संपलें जगन्मिथ्यात्व प्रकरण ॥ तेथें हेंचि केलें निरूपण ॥जगमिथ्याचि-

१ ज्ञान. २ ज्ञान, आनंद. ३ घरीं. ४ नाम्रवंत. ५ सत्तेनें. ६ इंद्रियें. ७ जागा. ८ ग्रंथरूपानें. ९ योजना.

पूर्ण आन नाहीं॥१२॥हें वैराग्य दृढ बाणावया ॥ सांगीतलें प्रकरणा यया ॥ प्रपंच मिथ्या दृढ कळलिया॥तेंचि रघुराया वैराग्य हें ॥१३॥ तया वैराग्याचें कारण ॥ विषयीं दोषदृष्टी संपूर्ण ॥ आणि प्रपंचाचें मिथ्या भान ॥ दोन्हीं जाण कारणें यासीं ॥ १४ ॥ तें वैराग्य दृढतर व्हावया ॥ सेवावें सद्गुरुंचिया पायां ॥ सद्गुरुनें कृपा केलिया ॥ अभ्यास रघुराया पाहिजे ॥१५॥ अगा निदिध्यासन करितां रघुपती ॥ मन आणि वासना अति पीडिती ॥ ह्मणोनि मनोनाश वासनेची शांति ॥ सीतापति करावी गा॥१६॥सद्गुरूनें तत्व उपदेशिलें ॥ तें महावाक्यें दृढतर केलें ॥ तेणें अंपरोक्ष जरी बाणलें ॥ तरी झालें कार्य सर्व ॥ १७ ॥ तें नहोवोनियां अयोध्यापती ॥ असंभावंना विपरीत भावना उठती ॥ तरी श्रवणें मननें निदिध्यासनें शांती ॥ करावी पुढती तयाची॥१८॥असंभावना द्विविधँ जाण ॥ येकी ते प्रमाणासंभावना ॥ दुसरी प्रमेयासंभावना पूर्ण॥जाण हे खुण द्विविधाची ॥ ॥ १९ ॥ येकी ते विपरीत कल्पना ॥ ऐसीया त्रिविधा असंभावना ॥ ययालागीं करावें तिहीं साधना ॥ श्रवण मनन निदिध्यासनादि ॥ २० ॥ त्याहीमाजी जें निदिध्यासन ॥ तेथें येकाग्रता पाहिजे पूर्ण ॥ करावें प्रपंच निरसन ॥ ब्रह्मानुसंधान अतिनेटें ॥ २१ ॥ तेथें मन आणि वासना ॥ इया अतिदुष्टा गा रघुनंदना ॥ आड येती स्वरूपानुसंधाना ॥ प्रपंचभाना प्रकट करिती ॥ २२ ॥ यालागीं मनोलयें वासना शांती ॥ आधिं करावी गा त्रिदशाधिपती ॥ हाचि अभ्यास ब्रह्मप्राप्ति ॥ आन करितां तो सकळ श्रमु ॥ २३॥ अभ्यासामाजी अ-

१ रात्रंदिवस विचार. २ प्रत्यक्ष. ३ सत्य अर्थाविषयीं सत्यत्व नवाटणें ती. ४ दोन प्रकारची. ५ ब्रह्मज्ञानाचा शोध.

भ्याससार ॥ मनोलयें वासनेचा संहार ॥ केलिया जीवन्मुक्तिप्रकार ॥ यथोपचारें प्राप्त होय ॥ २४ ॥ जीवन्मुक्तिची व्हावया प्राप्ती ॥ करावी मनोलय वासनेची शांती ॥ तेचि ते आतां रघुपती ॥ सांगेन स्थिती तुजलागीं ॥ २५ ॥ अगा अपरोक्षज्ञानही जालिया ॥ सर्वथा करावें मा मनोलया ॥ मग न्व्हती सुख दुःखें तया ॥ आपआपणया परिपूर्ण होय ॥ २६ ॥ मनोलय वासनाक्षयेंवीण ॥ ज्ञानियासि सुख दुःख दर्शन ॥ होतें ह्मणोनि अवश्य जाण ॥ दोहींचें पूर्ण भस्म करावें ॥ २७ ॥ तेणें सप्तमी भूमिकापर्यंत ॥ तयासीं दशा होतसे प्राप्त ॥ मग सुखदुःख नेणें निश्चित ॥ सर्वदां तृप्त ब्रह्मानंदें ॥२८॥ सर्वदां परमानंदें तृप्ती ॥ नाहीं विक्षेपें प्रपंचप्रतीति ॥ सर्वदां ब्रह्मानंदें डुल्लती ॥ कैंची व्यक्ती सुख दुःखाची ॥ २९ ॥ ऐसें बोलतां वसिष्ठऋषी ॥ रघुनाथा उल्हासु मानसीं ॥मग ह्मणे सांगा स्वामी मजपासीं ॥ जें बोलिलासि थोर साधने ॥३०॥ तुझिया वचनामृतावांचून ॥ नघडे असंमतातें सिंचन ॥ तेणेंवीण समाधान ॥ न्व्हे जाण कल्पांतीं ॥ ३१ ॥ तरी जें आतां पुढारेंलासी ॥ तेंचि साधन सांग मजपासीं ॥ तंव वसिष्ठ ह्मणती परियेसी ॥ सांगेन तुजपासी रघुवर्या ॥३२ ॥ सप्तही भूमिकांचें लक्षण ॥ तें जीवन्मुक्त प्रकरणीं जाण ॥ सांग कीजेल निरूपण ॥ प्रस्तुत साधन परियेसी ॥३३॥ आधीं मन तें किंलक्षण ॥ त्याचा लयप्रकार तो कोण ॥ हें तंव आधीं सांगेन ॥ दुसरें जाण वासनानाशु ॥ ३४ ॥ प्रस्तुत इये प्रकरणीं ॥ मनोलय ऐके कोदंडपाणी ॥ जो झालिया ब्रह्मसुखाचा धणी ॥ जनीं वनीं आपणची ॥

१ आत्मज्ञान. २ अडथळा. ३ प्रकार. ४ अनाधिकाऱ्याला. ५ बोलिलासी. ६ स्वामी.

॥ ३५ ॥ तरी आधीं मन हेंचि कोण ॥ तें तुज सांगों गा संपूर्ण ॥ मग लयोहि सांगों नियमन ॥ ऐक सावधान रामचंद्रा ॥ ३६ ॥ आतां जे बोलती श्रीवसिष्ठगुरु ॥ आणि श्रवण करील सर्वेश्वरु ॥ तो ऐकतां पावेल पाहुणेरु ॥ अमृतवोगरु श्रोतयांसी ॥ ३७ ॥ तरी मनाची करूनि आराणुक ॥ हा सुखसंवादु भोगा सम्यक॥ आजि श्रोतयांचा भाग्यासी आगळिक ॥ लाभाची देख लाधली ॥ ३८ ॥जो कां वसिष्ट श्रीरामचंद्राचा संवादु॥प्राप्त जाला बरवा विशदु ॥ तोचि भोगावा स्वानंदु ॥ अतिअगाधु श्रवणद्वारा ॥ ३९ ॥ श्लोक ॥ एषस्वभावाभिमतःस्वतःसंकल्प्यधावति॥ चेतसास्वयमम्लानस्तदेवमनआत्मनः॥ १॥ टीका ॥ तरीवसिष्ठ ह्मणती गा रघुपती ॥ ऐक या मनाची स्वरूपस्थिती ॥ मनचि कोण हें तुजप्रती ॥ दाउ निगुती फोडुनियां ॥ ४० ॥ अगा आत्मयासीं स्वभावाभिमत ॥ जे जे कांहीं पदार्थजात ॥ मुख्य अज्ञानें रमणीय भासत ॥ अतिप्रशस्त ग्राह्य बुद्धी ॥ ॥ ४१ ॥ मग आपुलिया मनेंकरुनी ॥स्वस्तां ग्राह्यत्वें संकल्पुनी ॥ स्वयें धांवे ज्यामार्गें लागूनी ॥ तेंचि निर्वाणी मन जाण॥ ४२ ॥ आत्मा तरी म्लान नव्हे ॥ आपण जैसा तैसाचि आहे ॥ परि जें संकल्पूनि धांवताहे ॥ तेंचि तें पाहे मन त्याचें ॥ ४३ ॥ आत्मयाचा शेजारीं ॥ राहोनि वस्तुमात्राचा संकल्प करी ॥ तेंचि मन जाण सर्वांपरी ॥ रावणारी निश्चयें॥ ४४ ॥ श्लोक ॥ एतस्मात्सर्वगादेवात्सर्वशक्तेर्महात्मनः ॥ विभागकल्पनाशक्तिर्लहरीचोत्थितांभसः ॥ २ ॥ टीका ॥ या सर्वगता देवापासाव ॥ जो कां सर्वशक्तिमंत स्वयमेव ॥ सर्व ज्ञाता ज्ञा-

१ वाढपी. २ समाधान. ३ आधिक्य. ४ स्पष्ट. ५ यथार्थ. ६ इच्छित. ७ शेवटीं. ८ व्यापक.

न भरिंव ॥ आदिदेव सर्वांचा जो॥४५॥त्यापासाव विभागकल्पना शक्ति ॥ ह्मणिजे भेदकल्पिका उठती ॥ हा देह हीं इंद्रियें कल्पिती॥प्राणापानादि व्यंक्ती जेणें होय॥४६॥हे देव हें जगटंवाळ ॥ हे घटपटादि पदार्थ सकळ ॥ या विभागाची कल्पना प्रांजळ ॥ करि तें निर्मळ मन जाण ॥ ४७ ॥ आत्मा निर्विकल्प नित्यशुद्ध ॥ सर्व साक्षी अतिप्रबुद्ध ॥ तेथें नाहीं विकल्पभेद ॥ हें निर्विवाद ओळखावें ॥ ४८ ॥ मग तयापासाव भेदसृष्टी ॥ जे कीं निरंतर दृश्यत्वें उठी ॥ तेंचि मन गा जगजेठी ॥ स्वयें दृष्टी पाहे पां ॥ ४९ ॥ जैसें उदक तरी निश्चळ ॥ त्याचाचिठाई लहरीमेळ ॥ उठी तैसा भेदकल्लोळ ॥ आत्मा निर्मळ जैसा तैसा ॥ ५० ॥ जैसें उदकापासाव जगजेठी ॥ लहरीशक्ती कोणें उठी ॥ अज्ञान अनेकत्वाची दृष्टी ॥ विवेक पोटीं नाहिं ह्मणोनी॥५१॥तैसें पूर्ण मनाचें स्वरूप जाणावें ॥ तरी आत्मस्वरूपे पूर्ण ओळखावें॥ तेथें भेदकल्पनाशक्ती तें स्वभावें॥ मन जाणावें ज्ञातेनी ॥ ५२ ॥ आत्मयाचें स्वरूप नकळे ॥ तरी मनपण जें वेगळें ॥ तें तया कांहींच नकळे ॥ येकत्र मेळें भासे ह्मणोनी ॥ ५३ ॥ शुभ्र आरक्तादि वस्त्रमेळा ॥ तया हातें पाहतां आंधळा ॥ काय वर्णव्यक्ति दिसे डोळां ॥ तैसी कळा जाण याची ॥५४॥ परी हेंचि याचें लक्षण ॥ आत्मा निश्चळ निर्विकल्प जाण ॥ जेथें नस्फुरे द्वैतभान ॥ तेंचि चिद्घन आत्मस्वरूप ॥५५॥ तेथुनी भेदशक्ति कोणी उठी ॥ मुळीं अहं द्वैत हें जगजेठी ॥ तेथुनी स्पष्ट होय सकळ सृष्टी ॥ भासवी दृष्टी तेंचि मन ॥ ५६ ॥ मनसंकल्पें विश्व भासे॥ मनविकल्पेंची सर्वही नासे ॥ हें

१ आकार. २ जगलटकें. ३ स्पष्ट. ४ ज्ञानी. ५ तरंग. ६ लाल.

ऐकावें विश्वेशें ॥ दृष्टांत विशेषें सांगेन ॥ ५७ ॥ श्लोक ॥ अंतःसंकल्पसिद्धेयंसंकल्पेनैवशाम्यति ॥ येनैवजायतेते नवन्हिज्वालेववायुना ॥ ३ ॥ टीका ॥ अगा या मनाचे संकल्पेंकरुनी ॥विश्वाभास भासे नयनीं ॥ संकल्पमात्रेंचि होय उभवणी ॥ संकल्पेंचि विरोनी जायक्षणें ॥ ५८॥ जेणें द्वैत कल्पिलें होय जाये ॥ तेंचि तें मन ओळखोनि राहे ॥ हेंचि जना अपूर्व वाटताहे ॥ येकेंचि होय प्रतीति द्वयें ॥ ५९ ॥ नाहो जेणें भासे विश्वभास॥ तेणेंचि त्याचा कैसा नाश ॥ या अभिनवासीं उत्तरांश ॥ सावकाश परिसिजे॥६०॥तरी ऐका याचें उत्तर ॥ जें सांगेन सपरिकर ॥ मनाच्या वृत्ती साचार ॥ दोनी प्रकार परियेसा ॥६१॥ येकी जाणा मळीण वृत्ती ॥ जे कां करी द्वैतप्रतीति ॥ विश्वाभासूचि ये व्यक्ती ॥ देहादि स्फूर्ति जियेचेनी ॥६२॥ ते मळीण वृत्ती उपजतां ॥ द्वैत विश्वाभास भासे तत्वतां ॥ तेंचि शुद्ध वृत्तिरूप ज्ञान होतां ॥ सर्व भस्मांता जाय द्वैत॥६३॥दुसरी मनाची शुद्धवृत्ती ॥ जे कां वृत्तिरूपें ज्ञान बोलती ॥ ते उदय पावतांचि करी शांती ॥ विश्वभ्रांती सकळिक ॥ ६४ ॥ ह्मणोनि मनोवृत्तीनें विश्व भासे ॥ आणि मनोवृत्तीनेंचि सर्व नासे ॥ ह्मणोनि येका मनेंचि उल्हासे॥ जाण सर्वांशें द्वैताद्वैत ॥ ६५ ॥ अथवा संकल्पें रचीं विश्वपरंपरा ॥ तेंचि विकल्पें मोडी विश्वंभरा ॥ यालागीं येक मनेंचि विश्व पसारा ॥ भस्म सारा मनेंचि जाय ॥ ६६ ॥ जैसी वायुचेनि वंन्हिज्वाळा झाली ॥ आणि वायुचेनि अस्तातें पावली ॥ तयापरी द्वैताद्वैत बोली ॥ मनेंचि झाली परियेसा ॥ ६७ ॥ जैसा फुंकेंचि दीप लागला ॥ आणि तेणें-

१ उभारणी. २ अपूर्वतेसी. ३ चांगलें ४ आकारास. ५ आठवण. ६ अग्नि.

चि फुंकें मालवला ॥ तैंसा मनेंचि विश्वाभासु भासला ॥ मनेंचि झाला नाहीं ऐसा ॥ ६८ ॥ श्लोक ॥ मनोमुधे-
वाभ्युदितंममैवानवेक्षणात् ॥ स्वस्वप्नमरणाकारंप्रेक्ष्यमाणंनविद्यते ॥४ ॥ टीका ॥ यालागीं मनचि द्वैताचें मूळ॥
मनेंचि हा संसार सकळ ॥ ऐसेंही परि तें निर्मूळ ॥मन केवळ मिथ्या भ्रम ॥६९॥वृथाचि मन ऐसें नाम ॥ वृथा
मन हाचि मुख्य भ्रम ॥ स्वस्वरूप अनवेक्षंणेंचि काम ॥ मन हें नाम वृथाचि भासे ॥७०॥ मन हें वृथाचि उ-
दया आलें ॥ आत्मविस्मरणेंचि प्रकट केलें ॥ तेंही झालेपणें नाथिलें ॥ बाळका बोलें बागुल जैसा ॥७१॥ बा-
गुल साच नाहीं देखिला ॥ नायेतां जातांहि प्रत्यक्ष झाला ॥ परि अंर्भकें साच मानूनि केला ॥ भयादि मेळा
मृत्युवरी ॥ ७२ ॥ बागुल यया बोलासाठीं ॥ साचपणें भयकंपासीं उठी ॥ पळे लपे होय हिंपुंटी ॥ मरण शे-
वटीं पावतु ॥ ७३॥ तैसेंचि मन हें वृथा नांव ॥ तें भ्रमाचेंचि सोलींव ॥ स्वस्वरूप नेणतांचि स्वयमेव ॥ मन ऐ-
सा भाव उपजे देहीं॥७४॥स्वप्नामाजी जैसें स्वमरण ॥ देखे आपुलें आपण ॥ पाहोंजातां स्वयें जाण ॥ आ-
प आपण जीतुचि ॥ ७५ ॥ स्वप्नामाजी मरणावस्था ॥ तेणें मृत्यु पावे तत्वतां॥देखे आपुलें दहन करितां॥प्र-
बोधतां कांहींच नाहीं ॥ ७६ ॥ तैसें मन भ्रमें करी मानी ॥ मन पावे संसारश्रेणी ॥ सुखदुःखादि नाना योनि॥
पावे अनुदिनीं कल्पकोटी ॥७७ ॥ तेंचि मनें विचारूनि पाहतां ॥ स्वरूप न कळे नानये हाता ॥ विचारें आ-
त्मप्राप्तीचि तत्वतां ॥ मन हें वृथा काल्पनीक ॥ ७८ ॥ ऐसें विचारें विचारितां ॥ तंव आत्माच येतसे हाता ॥

१ शोधानें. २ लटिकें. ३ बाळकानें. ४ कष्टी. ५ शुद्ध. ६ जागाहोतांच. ७ पंक्ति.

तेचि मनाची येकाग्रता ॥ नाश तत्वतां यया नाम ॥ ७९ ॥ हेंचि मनाचें नाशन ॥ विचारूनि कीजे संपूर्ण ॥ इतर साधन ते क्लेश जाण ॥ प्राप्तिलक्षण तें नघडे ॥ ८० ॥ श्लोक ॥ असम्यग्दर्शनंयस्मादनात्मन्यात्मभावनं ॥ यदवस्तूनिवस्तुत्वंतन्मनोविद्धिराघव ॥ ५ ॥ टीका ॥ आणिकही ऐक रघुनाथा ॥ या मनाची वोळखी तत्वतां॥ ऐकतांचि निश्चिंतता ॥ बाणें सर्वथा परियेसी ॥ ८१ ॥ अगा सम्यग्दर्शन तें ज्ञान ॥ असम्यग्दर्शन तें अज्ञान॥ जेणें होय यथार्थ वस्तुचें दर्शन॥तेंचि ज्ञान निश्चयेसीं॥८२॥आणिक जे अयथार्थ वस्तु प्रकाशी॥तें असम्यग्दर्शन परियेसी ॥ यथार्थ अनुभव प्रमाणेसी ॥ बोले नेमेसीं शास्त्रयुक्ती॥८३॥यथार्थ आणि अनुभवेंकरून ॥ जेणें साक्षात होय तेंचि ज्ञान॥ हेंचि शास्त्रें नेमिलें असे जाण ॥ अनुभवही पूर्ण ऐसाचि असे ॥ ८४॥ अगा यथार्थ शब्देंकरून ॥ अयथार्थाचें केलें निरसन ॥ अयथार्थ ह्मणिजे मिथ्या भान॥ मृगांभ जाण शुक्तिं रजतादि ॥८५॥ ऐसे नाना स्वप्नादि भ्रम असती ॥ ते ते अयथार्थ ह्मणिजेती ॥ यथार्थें केली सर्वांची व्यावृत्ति ॥ भिन्न गती यथार्थाची ॥ ८६ ॥ आतां यथार्थचि वस्तु तरी होय॥ परि ते देशांतरीं आहे ॥ तिचें स्मरण करणें ते स्मृती होय ॥ अनुभव नोहे सर्वथा ॥ ८७ ॥ अनुभव नाम स्मृतिव्यतिरिक्तं ज्ञान ॥ ह्मणोनि अनुभव शब्देंकरून ॥ स्मृतीचेंहि केलें व्यावर्तन ॥ त्याहूनि भिन्न ज्ञान तेंची ॥८८॥ यथार्थ आणि स्मृतिव्यतिरिक्त ॥ अनुभवसिद्ध प्रत्यक्ष भूत ॥ तेंचि ज्ञान ऐसें शास्त्र सिद्धांत ॥ असती गर्जत बांहे उभारुनी ॥ ८९॥ आणि अयथार्थाचें रूप ऐ-

१ विरक्ती. २ मिथ्या. ३ मृगजळ. ४ शिंपी. ५ रुपें. ६ विवंचना. ७ भिन्न. ८ व्यतिरेक, अव्याप्ति. ९ भुजा.

सें ॥ जें कीं अनात्मा मात्र असे ॥ त्यातें प्रकाशी तें सर्वांशें ॥ असम्यक् ऐसें ज्ञान होय॥९०॥तया असम्यक् ज्ञानास्तव ॥ अनात्मा जो प्रपंच सर्व ॥ देहादि जे सर्वहि भाव ॥ जाण ते सर्व अनात्मा ॥ ९१ ॥ तया अनात्मयासीं आत्मभावना ॥ कीजे जेणें रघुनंदना ॥ तेंचि मन गा जाण सर्वज्ञा ॥ यया खुणा सर्वत्र ॥ ९२ ॥ अगा देहादि अवस्तुच्याठाईं ॥ वस्तुबुद्धी जेणें होय पाहीं ॥ तेंचि मन जाण निश्चयीं ॥ आन कांहीं भासे जेणें ॥ ९३ ॥ यालागीं हें असम्यक्दर्शन ॥ तेंचि तें निश्चयें जाण मन ॥ केवळ भ्रमरूपचि जाण ॥ नाहीं आन रघुवर्या ॥९४॥ जे कां अवस्तु शुक्ति रजंत ॥ माळा भुजंगपणें भासत ॥ किरणीं मृगांभ दिसत ॥ ते वस्तु ऐसें जाणत तेंचि मन ॥ ॥ ९५ ॥ मुख्य अनात्मा तो देह जाण ॥ त्यातें आत्मत्वें जाणे तेंचि मन ॥ हेचि मनाची वोळखण ॥ जाण खुण सीतारमणा ॥९६॥ इत्यादि अवस्तुजाती ॥ वस्तुत्वें निश्चय करिती ॥ तेचि ते मनाची व्याप्ति ॥ जाण रघुपति निश्चयेंसी ॥ ९७ ॥ आणीकही मनाचें लक्षण ॥ सांगों श्रीरामा तुजलागुन ॥ जया युक्तिकरूनियां मन ॥ ओळखसी पूर्ण सीताकांता ॥ ९८ ॥ श्लोक ॥ अयंसोहमिदंतन्मेएतावन्मात्रकंमनः ॥ तदभावनमात्रेणविचारेण विलीयते॥६॥टीका ॥ अगा येकाचि आत्मस्वरूपा ॥ मिथ्या रचिलें विकल्पा ॥ नानात्व आणोनि संकल्पा॥सन्निपात झाल्या जल्पतु ॥ ९९ ॥ हा येक तो येक ह्मणत ॥ मी येक आणि मज हें दिसत ॥ ऐसें येकचि चतुर्धा विभागत ॥ मन निश्चित एतावन्मात्र ॥ १०० ॥ इत्यादि भेदांतें रचितें ॥ सर्वदा भेदांतेंचि देखतें ॥ भेददर्शनें

१ रुपें. २ मृगजळ. ३ चारप्रकारें.

नानात्व जल्पतें ॥ जाणा निश्चित तेंचि मन ॥ १ ॥ इत्यादिकांचें जें अभांवन ॥ करितांचि विचारें करून ॥ लय पावे सर्वथा मन ॥ नाहींच जाण ऐसें होय ॥ २ ॥ केवळ अविचारेंचि जयाची स्थिती ॥ विचारें जातसे भस्मांतीं ॥ तेंचि मन गा त्रिदशाधिपति ॥ नाहीं व्यक्ती स्वतंत्र॥ ३ ॥ मन संत ह्मणतां विचारें नासे ॥ असंत ह्मणतां प्रत्यक्ष दिसे ॥ त्यावीण जग भ्रम पिसें ॥ कोठें असे विचारिपां ॥ ४ ॥ मन नसतां जग नाहीं ॥ हे सुषुप्तिसमाधिसी प्रतीति पाहीं॥मनचि जगदाभास सर्वही ॥ असंत तेंही ह्मणोनये ॥ ५ ॥ मन नसतां ज्ञानादि साधनें ॥ कां प्रवर्तलीं असाधारणें ॥ मन जयासीं वेद शास्त्र पुराणें ॥ योगी साधनें योगादि करिती ॥ ६ ॥ घरोघरीं कपाळें पीटिती॥मन निश्चळ नव्हे ह्मणती ॥मनोजयासीं संन्यास घेती॥तेही रडती मनचांचल्यें॥७॥मनें उत्पत्ति मनें स्थिती॥मनें संहार मनें व्यवहारगती॥ज्ञानाज्ञान प्रतीति॥सकळ विकृती मनें करुनी॥८॥यालागीं मन नव्हे असंत ॥ नातें न घडे सदसंत ॥ संत असंत येकचि पदार्थ॥नाहीं घडत सर्वथा॥९॥नातरी ह्मणावें सदसद्विलक्षण ॥ तरि तेंचि तें अनिर्वाच्य जाण॥इदं मिथ्या वचनेंकरून ॥साच तें मन अनिर्वाच्य ॥ १ १०॥अनिर्वाच्य तें मिथ्याभूत ॥ हा तंव वेदांतसिद्धांत ॥आणि अनुभवासीहि असे येत ॥ सर्व निश्चित जाणावें ॥ ११ ॥ अनिर्वाच्य तें विचारें नासे ॥ ह्मणोनि तें मिथ्याभूत असे ॥ हेंचि मनाचें स्वरूप ऐसें ॥ रघुवंशें जाणावें ॥ १२ ॥ ॥ श्लोक ॥ उपादेयानुपतनंहेयैकांतविसर्जनं ॥ यदेतन्मनसोरूपंतद्बंधंविद्धिनेतरं ॥ ॥टीका॥ अगा आणिकही



१ गूढार्थ. २ आकार. ३ मिद्रेमध्यें. ४ एकेक, विशेष. ५ ज्याच्याविषयीं बोलतांयेतनाहीं तें.

मनाचें लक्षण ॥ रघुनाथा ऐकें सांगेन ॥ किं जे उपादेय पदार्थ जाण ॥ तेथें पतन जयाचें ॥ १३ ॥ उपादेय ते विषयजात ॥ अतिप्रियत्वें आवडत ॥ तेथें तुटलेंचिजें ज्ञान पडत ॥ अतिउद्यत तेंचि मन॥१४॥स्त्रियादि विषय देखे सुंदर ॥ तरि तेणेंचि होय तदाकार ॥ ते घ्यावया करी नाना प्रकार ॥ विषयातुर विषयत्वें ॥ १५॥ हेयें देखे जे सर्पादिक ॥ तरि पावे भय कंपादिक ॥ कांहीं केलिया न प्रवर्ते देख ॥ तेंचि सम्यक[4] मन जाण ॥ १६ ॥ हेंचि मनाचें स्वरूप जाण ॥ अनुकूल विषयपदार्थीं करी निर्वाण ॥ स्वयें वेचे परि नसोडी जाण ॥ मधुमाक्षिका पूर्ण जयापरी ॥ १७ ॥ कां शर्करेलागीं जेविं माक्षिका ॥ तैसीच जाणा पिपीलिका ॥ अर्ध तोडिलीयाहि देखा ॥ नसोडी कणिका शर्करेची ॥१८॥ कां मशकु गुंते शेंबुडीं ॥ कांहीं केलिया ते नसोडी ॥ तैसें विषयीं देतसे बुडी ॥ अतिगोडी मानुनी ॥ १९ ॥ त्याज्य पदार्थ देखे नयनीं ॥ तरीं प्राणचि त्यागी भयेंकरुनी ॥ तेंचि मन गा भवसेनी ॥ कोदंडपाणी जाण तूं ॥ १२० ॥ हाचि संसारीक बंध ॥ हाचि सर्वविधींचा बाध ॥ हाचि अनर्थाचा कंद ॥ जगद्बंध जाण तूं ॥ २१ ॥ ॥ श्लोक ॥ मनोहिजगतांकर्तामनोहिपुरुषःस्मृतः ॥ मनःकृतंकृतंरामनशरीरकृतंकृतं ॥ ८ ॥ टीका ॥ अगा जगाचा कर्ता हें मन ॥ मनेंचि जग भासे संपूर्ण ॥ मनेंचि नासे जगाचें भान ॥ नाहींच जाण होतसे ॥ २२ ॥ अगा मनोदयें उदय जगासीं॥ह्मणोनि जगाचें कर्तृत्व मनासीं ॥ आपुलेनि संकल्पें प्रपंचासी॥निश्चयेंसी करीतसे ॥ २३ ॥ मनें भाविलिया जग भासे ॥ मनें नभाविलीया कां-

१ घेण्यासयोग्य. २ सिद्ध, उद्युक्त. ३ टाकण्यास योग्य. ४ चांगलें. ५ शेवट. ६ मधमाशी. ७ मुंगी. ८ मूळ, गाभा.

२७

हींच नदिसे ॥ यालागीं मन कर्ता ऐसें ॥ बोलिलें असे जानकीनाथा ॥ २४ ॥ मनेंचि होय जगप्रतीति ॥ ऐशा पूर्वी वदलों उपपत्ती ॥ तेंचि तें पुडतापुडती ॥ जाण रघुपती निश्चयें ॥२५॥ मनचि पुरुष बोलिजे ॥ पुरुषपण मनेंचि जाणिजे ॥ येरवीं स्त्रीना पुरुष सहजें ॥ कांहीं नह्मणिजे परब्रह्मातें ॥२६॥ आणि मनेंचि पुरुष ह्मणणें ॥ तेंहि जाण येणेंचि लक्षणें ॥ चित्त देऊनि रघुनंदनें ॥ हें संपूर्ण परिसिजे ॥२७ ॥ यया मनामाजी प्रतिबिंबीत ॥ जें कां चैतन्य बिंबभूत ॥ तेणें परस्पराध्यास निश्चित ॥ त्यातेंचि ह्मणिजेत पुरुषनामें ॥२८ ॥ अंतःकरणीं प्रतिबिंबता ॥ जो चैतन्यांशु गा रघुनाथा ॥ तयातें बोलिजे प्रमाता ॥ पुरुष शब्दार्थी स्वयें आला ॥ २९॥ अथवा पुरुषाचा उपाधि हें मन ॥ ह्मणोनि पुरुष बोलती तयालागुन ॥ मनें कीजे तेंचि केलें जाण ॥ येर तें स्वप्न केलें नव्हे ॥ ३० ॥ जैसें जागृतीसिं मनें कीजे ॥ तेणें केलेनि पापपुण्य उपजे ॥ तेंचि स्वप्नीं मनेंविण निपजे ॥ त्याचिया सुंजे फळासि कोण ॥ ३१ ॥ अगा स्वप्नीं जें घडे दुरित ॥ त्यासि कोणें दीधलें प्रायश्चित्त ॥ अथवा अन्नदानें कोण तृप्त ॥ जागृती प्राप्त झालिया ॥ ३२ ॥ यालागीं मनें केलें तेंचि केलें ॥ मन नकरि तें नाहीं झालें ॥ केवळ शरीरें जें कर्म उपजलें ॥ तें नव्हे केलें सर्वथा ॥ ३३ ॥ यदर्थी दृष्टांत सांगेन ॥ मनें केलें तें कृत्य जाण ॥ शरीरें तें नव्हे केलेंपण ॥ सर्वत्र खुण जाणावी ॥३४॥ मनःपूर्वक सत्कर्म कीजे ॥ त्याचेंचि नाम केलें ह्मणिजे ॥ मन नसतां जें जें निपजे ॥ फोल सहजे विबुधनाथा ॥ ३५ ॥ केवळ शरीराचें केलें ॥ तें केलें नव्हेचि जाण बोलें ॥ जेणें कांततें आ-

१ दृष्टांत. २ वारंवार. ३ पितामह, जुनाटपुरुष. ४ समजे. ५ पातक. ६ मिथ्या.

लिंगिलें॥ प्रीतिमेळें सर्वांवयवीं॥३६॥तयाचि शरीरेंकरुनी ॥दुहिता आलिंगी प्रीतिकरूनी॥तरी काय तो पडेल पतनीं ॥ कोदंडपाणी सांगपां ॥ ३७ ॥ कांताआलिंगनीं जैसें मन॥तैसें कन्याआलिंगनीं पतन ॥ शरीर आलिं-गनीं समान ॥ परि मन भिन्न दोहीं ठाईं ॥३८॥ यालागीं शरीरें जें निपजलें ॥ तें नव्हेगा कर्म केलें ॥ मनें कीजे तेंचि भलें ॥ इहांमुत्र फळें मनकृत ॥ ३९ ॥ मनेंचि अतिशयें पापपुण्य ॥ परदारा अभिलाषी जरी मन ॥ तरी तया नरकांत पतन ॥ शरीरें गमन नकरितांहि ॥ १४०॥ तेंचि मन जरी स्वरूपीं लीन ॥ झालिया घडेल धर्माचरण ॥ तरी तें शरीरकृत नकरी पतन ॥ नाहीं मन ह्मणोनियां ॥ ४१॥मनेंचि स्वस्वरूप जाणिजे ॥ अथवा सगुण रूप मनेंचि ध्याईजे ॥ तेणें पुण्यातिशय जो उपजे ॥ तो तो ननिपजे शरीरकृत ॥ ४२ ॥ मनें होय स्वस्वरूप प्राप्ती ॥ मनेंचि पाविजे परम शांती ॥ येवढी या पुण्याचि उन्नती ॥ काय पावती शरीरें ॥ ४३ ॥ तैसेंचि मन देहातें आत्मा मानी ॥ तरी ते देहबुद्धी घालि पतनीं ॥ गेलीया कोटिकल्पाच्या श्रेणी ॥ अधःपतनीं नसुटे ॥ ४४ ॥ मन जिये कर्मीं नसे ॥ केवळ शरीरेंचि वर्ततसे ॥ ते यागादि होत भलतेसे ॥ नाहीं विशेषें फळ त्यासीं ॥ ४५ ॥ तीर्थ व्रत तपोदान ॥ यजन याजन अध्ययन ॥ संध्या स्नान देवतार्चन ॥ सर्व मनेंविण निर्फळ ॥ ॥ ४६ ॥ यालागीं मनकृत तेंचि कृत्य ॥ शरीरकृत तें नव्हे निश्चित ॥ जीवन्मुक्त देहें करी समस्त ॥ परी अलिप्त अमनस्कें ॥ ४७॥ श्लोक ॥ चित्तंकारणमर्थानांतस्मिन्सतिजगत्रयं ॥ तस्मिन्क्षीणेजगत्क्षीणंतच्चिकित्स्यंप्रयत्नतः

१ कन्या. २ मृत्युलोकीं व परलोकीं. ३ ध्यान करावें. ४ वृद्धि. ५ पंक्ति, योनी. ६ निराळा. ७ हेतुरहित.

॥ ९ ॥ टीका ॥ अगा या आठा श्लोकींकरून ॥ सांगीतलें चित्ताचें लक्षण ॥ आतां त्याचा नाशप्रयत्न ॥ तुज-लागुन निरोपूं ॥ ४८ ॥ ययालागीं गा रघुनाथा ॥ चित्तचि कारण सर्वा अर्था ॥ जगत्रय भासे चित्त असतां ॥ चित्त नसतां जग कैंचें ॥४९॥ अगा जगाचें उत्पत्ति मरण ॥ तें चित्ताचा भावाभाव जाण ॥ चित्तक्षीणें जग क्षीण ॥ नाहीं आन दैत्यदळणा ॥ १५० ॥ मनेंचि पदार्थजात स्फुरती ॥ मनोलयें लया पावती ॥ मनोनाशें सर्व शांती ॥ मनेंचि उत्पत्ति सर्वांची ॥ ५१ ॥ यालागीं मनाची चिकित्सा ॥ करावी गा त्रैलोक्याधीशा ॥ जैसी रोगाची निर्विशेषा ॥ कीजे चिकित्सा जयापरी ॥ ५२ ॥ विचारऔषधेंकरुनी ॥ चित्तआमय निर्दळुनी ॥ अतिसाहस करुनी ॥ भवसेनी चिकित्सिजो ॥ ५३ ॥ यासिं वासनाबांडुल्यें मलीनता ॥ निर्वासनें होय शुद्धता ॥ ह्मणोनि वासनाक्षय तत्वतां ॥ करावा सर्वथा रघुपुंगवा ॥ ५४ ॥ श्लोक ॥ रामवासनयाबद्धंमुक्तंनिर्वासनंमनः॥ तस्मान्निर्वासनीभावमानयाशुविवेकतः ॥१०॥ टीका ॥ ऐकें रामा कमळनयना ॥ मेघश्यामा चित्सुखैकघना ॥ परात्पर परम परिपूर्णा ॥ रघुनंदना परियेसी ॥ ५५ ॥ मुख्य वासनेचिकरून ॥ बद्धता पावतसे मन ॥ मुक्त जाणावें निर्वासन ॥ हेचि खुण ययाची ॥५६॥ नाहो मनेंचि बद्ध आणि मुक्त ॥ हें तंव भासे तें अयुक्त॥ जड अप्रकाश तें बद्धमुक्त ॥ हें अनुचित अघटमान ॥ ५७ ॥ तरी येथील अभिप्राय ऐसा ॥ मनेसी प्रमाता येकत्र विशेषा ॥ झाला ह्मणोनि तया आभासा ॥ विचार ऐसा बोलिजे ॥५८॥ जीवत्व सर्व मनाच्या माथां ॥ मन तो

१ आठवण होते. २ परिक्षा. ३ भेदरहित. ४ रोग, मळ. ५ क्षतिशयतेनें. ६ असंभवनीय.

जाण प्रमाता ॥ येणें अभिप्रायें बोलतां ॥ बाध तत्वतां असेचिना ॥ ५९ ॥ अहो चैतन्याचा आभास ॥ पडला चित्ताच्याठाईं बहुवस ॥ चित्त स्वच्छ सर्वेंद्रियांपरिस ॥ ह्मणोनि चैतन्यांशु बिंबत ॥१६०॥ ह्मणोनि मनाचे बद्धतेकरून ॥ जीवासींहि होय बंधन ॥ मन मुक्त वासनेंकरून ॥ तेंचि मुक्तपण जीवाचें ॥६१॥ अथवा जीवाच्या बंध मोक्षाप्रती॥ मुख्य मनचि कारण गा रघुपती॥मनोबंधें जीवासि बंधप्राप्ती॥मुक्तत्वें मुक्ति तत्वतां॥६२॥ जैसे उदकाचेनि मळीनपणें ॥ प्रतिबिंबही मळीन होणें ॥ शुद्ध जळीं शुद्धपणें ॥ सर्वदा असणें प्रतिबिंबें ॥६३॥ जळचांचल्यें चंचलता ॥ जळाचेनि स्थैर्यें[1] स्थैर्यता ॥ जळप्रवाहें प्रवाहता ॥ दिसे वाहतां प्रतिबिंबीं ॥६४॥ नाना दर्पणांचे[2] दोष ॥ तितुके प्रतिबिंबीं सावकाश ॥ राक्षसमोहऱ्यामाजी[3] कर्कश ॥ विशेष दृश्य प्रतिबिंबी॥६५॥ मनुष्य[4] गुण वर्तुळाकार ॥ स्वमुख दिसे महाथोर ॥ देव गुण मनोहर ॥ दिसे साचार जैसे तैसे ॥ ६६ ॥ दर्पणें मुखाची वस्तुता ॥ मळीनपणें मुळीं नसतां ॥ आंदर्शभाव विचारितां ॥ दिसती वर्ततां प्रतिबिंबी ॥ ६७ ॥ तैसा चैतन्यांशु मनदर्पणीं ॥ प्रतिबिंबला चित्तगुणीं ॥ त्याच्या मळीण जडत्वादि लक्षणीं॥स्वयें चित्त गुणीं विराजितु ॥ ६८ ॥ मनमळीनें मळीनता ॥ मनशुद्धत्वें हे शुद्धता ॥ जे चित्त गुण तोचि प्रमाता ॥ नाहीं अन्यथा भिन्न भावो ॥६९॥ जें मुख्य बिंबातें जाणें ॥ मुख्य बिंब हें मीचि ह्मणे ॥ तेणें चित्त भासे वेगळेपणें॥मुक्त ह्मणणें तयासीं ॥ १७० ॥ यालागीं चित्त गुणीं शोभतु ॥ चित्तशुद्धत्वें शुद्धहेतु ॥ चित्तमळीनें मळीणयुक्त ॥ ह्मणोनि हे

१ स्थिरतेनें, शांततेनें. २ आरशाचे. ३ आरशामध्यें आपलें प्रतिबिंब भयंकर दिसणें. ४ पुरुष.

मांतु ऐसी असे ॥७१॥ येरवीं जड अप्रकाश मन ॥ ययासीं नघडे मोक्ष ना बंधन ॥ हें बोलिलें तें प्रमाण ॥ परिभाव आन तो निरूपिला ॥ ७२ ॥ ययालागीं गा रघुपती ॥ सवासनें मना बंधप्राप्ती ॥ निर्वासनेंचि होय मुक्ती ॥ नाहीं विप्रतिपत्ति यया बोला ॥ ७३ ॥ ययालागीं गा त्रैलोक्यनाथा ॥ तत्वविवेक करूनि सर्वथा ॥ निर्वासन करावें गा चित्ता ॥ स्वयें मुक्तता साधावया ॥ ७४ ॥ सद्गुरुवाक्यविवेकेंकरुनी ॥ मन निर्वासन करीं धनुष्यपाणी ॥ यया साधनासी विलंबु झणी ॥ येक क्षणीं होऊंनेदीं॥ ७५ ॥रघुकुळटिळका हें मन ॥शीघ्र करावें गा निर्वासन ॥ ययाचि नाम निदिध्यासन ॥ जाण संपूर्ण आनंदमूर्ति ॥ ७६ ॥ अगा मनोवृत्ति विषयाकार॥ होती तोचि वासनाप्रकार ॥ त्यांचा बाह्यचि होय संचार ॥ परी अंतर नेणती गा ॥ ७७ ॥ यया इंद्रियाची बाह्य प्रवृत्ती ॥ हीं अंतर कदापि नेणती ॥ आणि अंतर्मुखही नव्हती ॥ तीं स्वयें कारिजेती बलात्कारें ॥७८॥ जितुका अनात्म वर्ग असे ॥ तितुकी चित्तवृत्ति प्रकाशित असे ॥ तरी वृत्ति नियमुनी मानसें ॥ अंतर्मुख ऐसें करावें ॥ ७९ ॥ जितुके विजातीय अनात्मा ॥ तेथुनी चित्तवृत्ती उपरमाँ ॥ नेउनी सजातीय जो आत्मा ॥ तोचि रामा अनुसंधावा ॥ १८० ॥ अगा अनात्मा तो मिथ्या असे ॥ विचारमात्रेंचि नासत असे ॥ ह्मणोनि वृत्ती अनायासें॥निघोनि बैसे आत्मरूपीं॥८१॥येणेंचि होय निर्वासनता॥ मग चित्तपण कैंचें चित्ता॥पावोनियां निजात्मता॥होय तत्वतां परिपूर्ण॥८२॥अनात्म वर्ग सत्यत्वें नस्फुरे॥चित्तवृत्ती स्वस्वरूपीं नुरे॥तेचि मुक्तता निर्धारें ॥

१ गोष्ट. २ मतभेद. ३ पंचवीस तत्वांचा विचार. ४ रात्रंदिवस विचार. ५ बाधा, प्रवेश. ६ स्वरूपोन्मुख. ७ शांतिप्रत. ८ निरंतर लक्ष लावावें.

नाहीं दुसरें मेघश्यामा ॥ ८३ ॥ श्लोक ॥ यथाभ्रलेखाशशिनंसुधालेपंमषीयथा॥ धर्षयत्येवमेवांतर्नरमाशापि शाचिका ॥ ११ ॥ टीका ॥ अगा हे आशा मुख्य पिशाचका ॥ शुद्धासींच मैळ करी देखा ॥ जैसी कां अभ्राची रेखा ॥ चंद्रासी देखा मैळ करी ॥८४॥ अथवा शुद्ध लेपातें मंसी ॥ करी आपणासादृश्य काळिमा ऐसी ॥ तैसी आशा भूत हें नरासी ॥ करी जैसी अमारजेनी ॥ ८५ ॥ नसतां अर्थप्राप्ति होणें ॥ प्राप्तही अर्थ अधीक करणें ॥ इये हावे भरिजे मनें ॥ जाण हे खुण आशेची कीं॥८६ ॥हेचि मुख्य विषयासक्ती॥हेचि हे विक्षेपाची गती ॥ हेचि मनाची मुख्य भ्रांती ॥ आत्मास्थिथती भ्रंशे जेणें ॥ ८७ ॥ येणें आत्मप्रकाशु लोपे ॥ अतिशयेसीं अज्ञान उद्दीपे ॥ तेणें गडदंचि पडे स्वरूपें ॥ अंतर खुपे विवेकाचें ॥ ८८ ॥ धवलारं मंसी माखिलें ॥ शुभ्र वस्त्र कांटें कांटिलें ॥ कां जळदेंकरूनि पांगुरविलें ॥ अवंसेचें भलें निशीर्थ जैसें ॥ ८९ ॥ कां आंधारें सिनीवांलीचे ॥ वरि लेवे दीजेति काजळाचे ॥ तैसें आशेकरूनि मनाचे ॥ मैळ पुरुषाचे परियेसीं॥ १९० ॥ मन हें स्वयें तरी मिथ्याभूत ॥ जैसा बाळाप्रती यक्ष सत्य ॥ तैसें अंतरीं भेडसावित ॥ वृथा दावित बडिवारु ॥ ९१ ॥ पाहतां सकळही मनचि येक ॥ जें जें देखे मिथ्या अनेक ॥ शास्त्रही बोले सम्यक् ॥ श्रुति ही देख बोलतसे ॥ ९२ ॥ यद्विषयींबृहदारण्यश्रुति ॥ बोलतसे अतीनिगुती॥विस्तारें तुजप्रती॥सांगेन ऐकें॥९३॥ श्रुति ॥ कामःसंकल्पोविचिकित्साश्रद्धाश्रद्धाधृतिरधृतिर्ह्रीर्धीर्भीरित्येतत्सर्वंमनएव ॥ १ ॥ इत्यादि ॥ टीका ॥

---

१ काजळ. २ अमावास्येची रात्र. ३ प्रकट होई. ४ अंधःकार. ५ सुशोभित घर. ६ मेघांकडून. ७ अमावास्येची. ८ मध्यरात्र.

तरी सकळही येवढें वोडंबर ॥ विरोनि जाय जेणें सत्वर ॥ तो सांगों तुज प्रकार ॥ मन स्थीर करीं आतां ॥ ॥ ९४ ॥ श्लोक ॥ अंतर्मुखतयासर्वंचिद्वन्हौत्रिजगत्तृणं ॥ जुव्हतोंतर्निवर्तंतेरामचित्तादिविभ्रमाः ॥१२॥ टीका ॥ तरी हें मन अंतर्मुख करूनि ॥ सर्वत्र जगतीं हवि चिद्वन्हीं ॥ तरी चित्तादि विभ्रम अंतरोनि ॥ जाती निवर्तोनि रघुपुंगवा ॥ ९५ ॥ आतां अंतर्मुख मन तें कैसें ॥ तेंही सांगोंगा सावकाशें ॥ आधीं बहिर्मुख तें परीयेसें ॥ मग अनायासें जाणसी ॥ ९६ ॥ तरी सर्वदां विषयाचें अभिधानें ॥ सर्वदां देहादि पदार्थ भान ॥ सर्वदां जगीं सत्यत्वदर्शन ॥ हेचि पूर्ण बहिर्मुखता ॥ ९७ ॥ जगीं मिथ्यत्वादि दर्शन ॥ आणि दोषदृष्टीनिवर्तन ॥ सर्वदां ब्रह्माकार स्फुरण ॥ अंतर्मुखता जाण मनाची ॥ ९८ ॥अनात्मा तितुका दृश्यजात ॥ हें तत्व जाणोनि बाधित ॥ स्वस्वरूपींच निमग्न चित्त ॥ हेचि निश्चित अंतर्मुखता ॥ ९९ ॥ इये अंतर्मुखतेकरुनी ॥ हें सर्व विश्व तृणप्राय भर्वसेनी॥तोंहि तृणहवि चिद्वन्हि ॥ तरी भर्वसेनी चित्त कैचें ॥ २०० ॥ तया पुरुषाच्या अंतरीं ॥ झाल्या चित्त भ्रमाचिया लहरी ॥ त्या त्या निवर्तती क्षणाभीतरी ॥ जाण असुरारी निश्चयें ॥ १ ॥ अंतरीं चिद्वन्हि झाला प्रदीप्त ॥ तेथें अचित्तादि भ्रम तृण समस्त ॥ विरूढती कैसे जाण तेथ ॥ होय भस्मांत वन्हिस्पर्शें ॥२॥ अगा तरु कोटरांतर्गत ॥ वन्ही असतां प्रदीप्त ॥ तेथें तृण पेरितांहि अंकुरित ॥ नव्हे निश्चित जयापरी ॥ ३ ॥ कां वडवानळ पेटलिया वन्ही ॥ तेथें अंकुर नुपजे पेरिलीया धांनी ॥ तैसा चित्तादि भ्रम ब्रह्मज्ञानाग्नीं ॥ जागृतीं स्वप्नीं

१ विश्वपसारा. २ होमद्रव्यें. ३ चित्ताग्नि. ४ नांव. ५ विषयोन्मुखता. ६ अंकूर येतील. ७ भेगीमध्यें. ८ धान्याला.

नुदेजे ॥ ४ ॥ आणिकही उपाय सांगेन ॥ जेणें चित्तचि होय भस्म पूर्ण ॥ चित्तासवेंचि दृश्यभान ॥ विरोनि जाण जातसे ॥ ५ ॥ श्लोक ॥ यदानभाव्यतेकिंचिद्धेयोपादेयरूपवत् ॥ स्थीयतेसकलंत्यक्त्वातदाचित्तंनजायते ॥१३॥ टीका ॥ तरी हेयंउपादेय जे जे पदार्थ ॥ ते कांहींहि न भावावे यथार्थ॥ तेणेंचि विरे नुपजे चित्त ॥ उर्वरीत सकळ त्यागें ॥६॥ तेव्हां नस्फुरे द्वैतभान ॥ चित्त पावलें अचित्तपण ॥ आतां द्वैत कल्पी कवण ॥ भस्मांत पूर्ण चित्ताद्वैता ॥ ७ ॥ जेव्हां विश्व कल्पी तें मुदल जाय ॥ तेव्हां विश्व कल्पी तें कवण आहे ॥ तेथें हेय उपादेय कवणा काय ॥ जरी आहे रूपवंत ॥ ८ ॥ अगा कारण अज्ञान नासलें ॥ तत्कार्य मन कैचें उरलें ॥ मनासवेंचि कल्पीत गेलें ॥ तें येकें उरलें ग्राह्याग्राह्य ॥ ९ ॥ आधीं कल्पीतें मुदल जरी असे ॥ तरीच कल्पीत हें विश्व भासे ॥ मग त्यामाजी ग्राह्य त्याज्य ऐसें ॥ घेईजे मानसें शुभाशुभ ॥१०॥ अगा अंतर्मुखतेकरूनी ॥ ते भावनाची होय निर्वाणीं ॥ नभावितां जगटवाळ नयनीं ॥ नदेखे स्वप्न जागृतीसीं ॥११॥ मुख्य चित्तचि मृत झालिया ॥ मग जग नस्फुरे गा रघुराया ॥ मन हें असे अवस्थात्रयां ॥ तें केव्हां क्षया जाईल ॥ १२ ॥ तरी तेंही सांगों तुजप्रती ॥ एकाग्र ऐक गा अयोध्यापती ॥ चित्त निमालिया हे त्रिजगतीं ॥ विश्वभ्रांती नभासे ॥१३ ॥ श्लोक ॥ घोरंजाग्रन्मयंचित्तंशांतंस्वप्नेव्यवस्थितं ॥ मूढंसुषुप्तिभावस्थंत्रिभिर्हीनंमृतंभवेत् ॥१४॥टीका॥घोररूप करूनि जागृतीसीं॥चित्त चपळ होय परियेसीं ॥ व्यवहारत ह्मणोनि तयासीं॥घोर ए-

१ त्याज्य व ग्राह्य. २ कल्पावे. ३. अवशिष्ट. ४ लटिकें. ५ व्यवहार करतें.

सी संज्ञा असे ॥ १४ ॥ अतिघोर हा रजोगुण ॥ तद्रूप तेव्हां झालें मन ॥ ह्मणोनि होतसे विश्वभान ॥ जागृती जाण ह्मणिजे तिसीं ॥ १५ ॥ स्वप्नीं मन शांत सत्वगुणें ॥ तेथें परिणमे स्वप्नपणें ॥ यालागीं शांतपण ह्मणें ॥ अतिमूढपणा सुषुप्तीसीं ॥ १६ ॥ सुषुप्तीसि तमोगुणेंकरून ॥ जडमूढता पावे हें मन ॥ यया वेगळें तें मृतपण ॥ जाण खुण रघुराया ॥१७॥ तिन्ही अवस्था जेथें नाहीं॥ तेंचि स्वरूप तूर्य पाहीं ॥ तिन्ही नसतां मनही ॥ कें-चें काई स्फुरेल ॥ १८ ॥ बुद्धिचे जे तिन्ही गुण ॥ सत्व आणि रज तम जाण ॥ त्याच्या वृत्ति जागृती सुषुप्ती स्वप्न ॥ जाण खुण विबुधनाथा ॥ १९ ॥ मन बुद्धी ये दोन्ही येकत्रपण ॥ तया मनचि ऐसें ह्मणणें ॥वृत्ति नास-लिया मनाचें नाशन ॥ नाहीं जाण सर्वथा ॥ २२० ॥ मनाच्या ज्या तिन्ही गुणवृत्ति ॥ तया बोलिजे जागृती स्वप्न सुषुप्ती॥वृत्तिरूपें मनाची व्यक्ती ॥ हीन वृत्ति मनाची नसे ॥२१॥ मनोवृत्ती त्याचि मन जाण ॥ वृत्तिहीन तेंचि मृतपण ॥ यालागीं अवस्थात्रयाविहीन ॥ केलिया मन मृत होय ॥२२॥ मनाचेनि मृत्यें जग नाहीं ॥ जग नभासे तें तूर्य पाहीं॥ तेंचि तें स्वरूपस्थिती सर्वही ॥ आन नाहीं सीतारमणा॥२३॥श्लोक॥ विलाप्यपंकंकृत-कंरजोप्सुविलयंयथा॥यथात्मनितथाविद्धिविलाप्यविलयंमनः ॥१५ ॥ टीका ॥ अगा सपंकगत जळाआंत ॥ क-तंकरज जरी निक्षेपिजेत ॥ तरी तें पंकातें करूनि अधस्त ॥ स्वयें जळगत तळीं राहे ॥ २४ ॥ जेणें पंकें शुद्ध-जळासीं ॥ डहुळ केलें स्वरजेसीं ॥ कतकरजें भस्म पंकासीं॥आपणेसीं केलें रामा ॥ २५ ॥ प्रथम पंकरज ग्रा-

१ लीन होतें. २ प्रकार. ३ गढुळ झालेल्या. ४ एका जातीच्या वृक्षाचे कण. ५ टाकिले. ६ घिसलास. ७ तळीं.

सुनी॥मग स्वयेंही लीन जळस्थानीं ॥ जळ तें स्वच्छ स्वरूपपणीं ॥ असे निर्वाणीं अति शुद्ध ॥२६ ॥ तैसें प्रपं-
चाध्यासें ब्रह्मासीं ॥ सद्वितीयत्व आलें परियेसीं ॥ तरी ब्रह्मीं निक्षेपिलीया मनासीं ॥ तें घेऊनि जगासीं स्वयें
शमेल ॥ २७ ॥ जळस्थानीं ब्रह्म निर्मळ ॥ तेथें जगदाभासु तो पंक डहुळ ॥ त्यामाजी मन कतक प्रबळ ॥ घा-
लितां निर्मळ जैसें तैसें ॥२८॥ जगद्वैत मन कल्पीतसे ॥ तेणें सद्वितीय ब्रह्म भासे ॥ तें मन जें स्वरूपीं प्रवेशे॥
तैसेंचि नासे जगटवाळ ॥ २९ ॥ अगा जगटवाळासरिसें ॥ स्वयें मनचि स्वरूपीं नासे ॥ तत्क्षणींच नाहीं
ऐसें॥अनायासें होय मन ॥२३० ॥ मन नासलिया सबाह्याभ्यंतरीं ॥ तरी सकळ ब्रह्मचि गा रावणारी॥मनोदयें
जग भरोवरी ॥ ब्रह्म निर्धारी नाहींच होय ॥ ३१ ॥ ह्मणोनि मन तोचि संसार ॥ मन तोचि बंध महा
थोर ॥ मनेंचि चंचळ हें शरीर ॥ मन मनोहर सर्वेंद्रिया ॥ ३२ ॥ श्लोक ॥ चित्तंजानीहिसंसारंबंधश्चित्तमुदाह
तः ॥ पादपःपवनेनेवदेहश्चित्तेनचाल्यते ॥१६॥ टीका ॥ जैसा पवनें करी पादप चळे ॥ पवनेंकरूनि सर्व हाले ॥
पवनेवीण सर्वथा नढळे ॥ कांहींच नचले स्थीरपणें ॥ ३३ ॥ तैसा चित्तेंचि हा देह चळे ॥ चित्त इंद्रियां चेष्टवी
बळें ॥ चित्तेंचि हें सुख दुःख फळे ॥ चित्त मैळें स्वरूपस्थिती ॥ ३४ ॥ यालागीं चित्त तेंचि संसार ॥ चित्तचि
हा महाबंध थोर ॥ चित्तलयेंचि सुख अपार ॥ निर्विकार होय स्थिती ॥ ३५ ॥ यालागीं गा त्रिदशाधिपती ॥
आधीं मन जिंकावें सर्वार्थीं ॥ मनोजयें सुख संपत्ति ॥ ब्रह्मस्थिती सर्वदां ॥ ३६ ॥ मनोजयें स्वराज्यप्राप्ती ॥ म

१ दुसरेपणा. २ लटिकें. ३ सामग्री. ४ झाड.

नोजयें ब्रह्मस्थिती ॥ मनोजयें शम दम होती ॥ साधनसमाप्ती मनोजयें ॥३७॥ मनोजयें ब्रह्मता सिद्ध॥ मनोजयें प्रपंचाचा बाध ॥ मनोजयें ब्रह्मावबोध ॥ जाय अबोध मनोजयें ॥ ३८ ॥ मनोजयें सुखकोटी ॥ मनोजयें-स्वस्वरूपीं भेटी ॥ मनोजयें फल्गुप्राय सृष्टी ॥ सरे द्वैतआटी मनोजयें ॥ ३९ ॥ मनोजयें सुखाचा सुकाळ ॥ मनोजयें दुःखाचा दुकाळ ॥ मनोजय तो द्वैतासि काळ ॥ आनंदकल्लोळ मनोजयें ॥ २४० ॥ मनोजयें संसृतिसीं भंग ॥ मनोजयें सदा अभंग ॥ मनोजयें अव्यंग ॥ परम भाग्य मनोजयें ॥ ४१ ॥ ह्मणोनि भलते प्रकारें ॥ मनोजय करावा अत्यादरें ॥ तीर्थं व्रतादि साधन पुरें ॥ कासया गव्हारें वाहवती ॥४२॥ तीर्थ व्रतादि तपोदान ॥ हें तंव संसृतीसीच कारण ॥ मोचक मनोनिग्रह जाण ॥ करिती सज्ञान सुखलब्धीसिं ॥४३॥ प्रतीति स्वानुभव आपणापाशीं ॥ करूनियां राहावें अहर्निशीं ॥ साधनें प्रवर्तलीं सुखासीं ॥ परि दुःखासी न व्हेती हेतु ॥ ४४ ॥ तीर्थाटणादि साधनें करितां ॥ आजन्म श्रमुचि उपजे चित्ता ॥ मनोलय क्षणमात्र करितां ॥ स्वसुख स्वरूपता प्राप्त स्वयें ॥ ४५ ॥ ये दोन्ही आपणाआधीन असती ॥ तेंचि करूनियां पाहावी संतिं ॥ मग जेणें होय सुखप्राप्ती ॥ तेंचि सर्वार्थी साधावें ॥४६॥ जो सद्गुरूचा असेल अनुग्रहीत॥ तेणें सेवावा येकांत ॥ तेथें मनोजय यथोचित ॥ करावा वाक्यार्थ सद्गुरुचिया ॥ ४७ ॥ वायुधारणेंकरूनि मनोजय॥ करणें तो सर्वथा जाण लय ॥ तेणें सिद्धी होति परि ब्रह्मोपाय॥ नव्हे अपाय तोचि हेतु ॥४८॥ परी तोहि ब्रह्मप्राप्ति वळेल ॥

१ ब्रह्मावी जागृति. २ मिथ्या. ३ जन्ममरणासीं. ४ पूर्ण. ५ मूर्खांनें. ६ मुक्त. ७ रात्रंदिवस.

मध्यें तंव सिद्धी अंतराय होतील ॥ निष्कामें चिरकाल होय फळ॥करतळामळ जैसा स्पष्ट ॥ ४९ ॥ ययालागीं ज्ञानविचारेंकरुनी ॥ नेती मुखें द्वैत निरसुनी ॥ मनोलय परब्रह्मस्थानीं ॥ अतिनिर्वाणीं करावा ॥ २५० ॥ अथवा स्वरूपाकारचि असणें॥विजातीय सन्मुख होऊं न देणें॥विजातीय स्फुरे तें मीपणें ॥ विक्षेप मनें जाणावा ॥ ५१ ॥ या मनाचे पंचविधवृत्तिदोष ॥ ते स्फुरलिया विक्षेप विशेष ॥ त्यांचीं नामें सविशेष ॥ बोलिजे सोस विक्षेपाचा ॥ ५२ ॥ त्यामनाचे दोष नेणती ॥ आणि वृथाचि मनातें कोंडिती ॥ कोंडिलिया पळे पुढती ॥ नये व्यक्ती कोंडिती तयां ॥ ५३ ॥ प्रपंचाचा तळवट घेती ॥ तळीं मनातें निक्षेपिती ॥ तेथुनि तें उफले पुढती ॥ जळीं बुडविती दोधिया जैसा ॥ ५४ ॥ तो जेविं तळीं दडपिती॥ तंव चळबळीत राहे क्षणस्थिती ॥ मग सोडितांचि उसळे सबळगती ॥ जळाहिवरुती धांवघे ॥ ५५ ॥ ऐसेनि कोटि कल्पजात॥ परि मनोजय नव्हे निभ्रांत ॥ लौकिकें सेविती येकांत ॥ समाधिस्थ होतों ह्मणती ॥ ५६ ॥ परमार्थ तो लौकिक नव्हे ॥ तो स्वहिताचीलागीं केला आहे ॥ सांडुनि लौकिक दंभ सोय ॥ धरावे पाय सद्गुरूचे ॥ ५७ ॥ सद्गुरूचे दृढ सेविलीया चरण ॥ सर्वांचाहि जय होय जाण ॥ नलगे दारुण अन्य साधन ॥ स्वयेंचि श्रीकृष्ण बोलती ॥५८॥ सप्तमस्कंधीं श्रीभागवतीं ॥ पाहेंपां सादरें हे संमती ॥ कृष्ण द्वैपायनाची उक्ती ॥ अति प्रीति अवधारा ॥५९ ॥ संमति श्लोक ॥ असंकल्पाज्जयेत्कामंक्रोधंकामविवर्जनात ॥ अर्थानर्थेक्षयालोभंभयंतत्त्वाभिमर्शनात ॥ १ ॥

---

१ विघ्नें. २ उद्भवले असतां. ३ विकार. ४ अधोभाग. ५ बुडवितात. ६ उसळतें. ७ निश्चित. ८ भाषण.

आन्विक्षिक्याशोकमोहौदंभंमहदुपासया ॥योगांतरायान्मौनेनहिंसाकायाद्यनीहया ॥ २ ॥ कृपयाभूतजंदुःखं दैवंजह्यात्समाधिना ॥आत्मजंयोगवीर्येणनिद्रांसत्त्वनिषेवया॥३॥रजस्तमश्चसत्त्वेनसत्त्वंचोपशमेनच॥एतत्सर्वंगुरोभक्त्यापुरुषोह्यंजसाजयेत् ॥ ४ ॥ यस्यसाक्षाद्भगवतिज्ञानदीपप्रदेगुरौ ॥ मर्त्यासद्धीःश्रुतंतस्यसर्वंकुंजरशौचवत् ॥ ५ ॥ टीका ॥ अगा संकल्प नकरितां पाहीं ॥ काम जिंकावा गा सर्वही ॥ कामाचेनि जयें क्रोधही ॥ होय निश्चयीं जिंकिला ॥ २६० ॥ अर्थाच्याठाईं अनर्थदृष्टी ॥ करितां होय अर्थलोभेसीं तुटी ॥ तत्वाभिमर्शनें भयकोटी ॥ जाय सृष्टी पळोनी ॥६१॥ आन्विक्षिकी विवेकरुनी ॥ शोक मोह जिंकिजेति भर्वसेनी ॥ संतांचिये सेवेकरुनि ॥ दंभ निर्वाणीं भस्म कीजे ॥ ६२ ॥लोकेंसीं लौकिक बोलणें ॥ योगियांसी अंतराय हाचि जाण ॥ तें जिंकावें धरुनि मौन ॥ अनीहपणें ईहा जिंकावी ॥ ६३ ॥ भूतांपासाव दुःखें होतीं ॥ ते कृपेकरुनी जिंकिजेती ॥ दैवसंबंधें दुःखें भस्मांतीं ॥ सर्वथा जाती समाधीस्तव ॥६४॥ देहापासाव दुःखें होती॥ ते योग सामर्थ्यें जिंकिजेती ॥ सत्वसेवनें सर्वदा जागृती ॥ निद्रा भस्मांतीं जाय तेणें ॥ ६५ ॥ रज तम गुण सत्वेंकरुनी ॥ जिंकावे गा भर्वसेनी ॥ सत्वगुणही उपशमें करुनी ॥ लीन निर्वाणीं करावा ॥ ६६ ॥ परि इतुकेहि क्लेश न करितां॥येकयेकाचे जयीं नलगतां॥ येकेचि काळें जय समस्तां ॥ प्रयास नसतां होय तें सांगों ॥६७॥ तरी भावें धरितां सद्गुरुचरण ॥ भक्तीनें करितां अनन्य भजन ॥सर्वांचा जय होय संपूर्ण॥ नाहीं आन उपाय

१ स्वस्वरूपाचा विचार झाल्यानें. २ सांख्य शास्त्रानें. ३ विघ्न. ४ अनेच्छेनें. ५ आशा. ६ शांतिनें,

येथें ॥ ६८ ॥ कांहीं नकोरेतां क्लेशसाधन ॥ अनायासें सर्वांचा जयो जाण ॥ येक सेवितां सद्गुरूचरण ॥ लाभ पूर्ण पूर्णत्वाचा ॥ ६९ ॥ अहो वास्तव तरी विचारितां ॥ भजनीय कोण सद्गुरूपरता ॥ जो कीं ज्ञानदीप प्रकाशिता ॥ जीवा तारिता ब्रह्मपणें ॥ २७० ॥ साक्षात सद्गुरू ब्रह्ममूर्ती ॥ तोचि भजनीय गा सर्वार्थी ॥ तेथें असत्यबुद्धी करुनी मूढमती ॥ अन्य पूजिती अन्योपायें ॥ ७१ ॥ सद्गुरूवेगळें देवतांतर ॥ पूजन जाण तो व्यभिचार ॥ स्वपुरुष टाकुनि परनर ॥ भजे गव्हारें पुंश्चली जैसी ॥ ७२ ॥ सद्गुरूची कृपा जयासी ॥ फळली नाहीं निश्चयेसी ॥ ययालागीं तो भक्तीसि ॥ विन्मुख सर्वांशीं रामचंद्रा ॥ ७३ ॥ तयाचें जें जें श्रुतंजात ॥ तें व्यर्थचि गेलें गा समस्त ॥ कुंजरशौच बोलिजेत ॥ धुतला घालित धुळी मागुती ॥ ७४ ॥ तैसें जें जें तो पढिन्नला ॥ श्रुतिअध्ययनाचा अभ्यासु केला ॥ महावाक्याचा विचारमेळा ॥ व्यर्थ गमाविला गुरुभजनेवीण ॥ ७५ ॥ यालागीं सद्गुरूसी येउनि शरण ॥ येकांतभक्ती करावें भजन॥तेणें सांगीतलेनि मार्गेंकरून ॥ मन संपूर्ण जिंकावें ॥ ॥ ७६ ॥ श्लोक ॥ हस्तंहस्तेनसंपीड्यदंतैर्दंतांश्चपीडयन् ॥ अंगान्यंगैःसमाक्रम्यजयेदादौस्वकंमनः ॥ १७ ॥ टीका ॥ वसिष्ठ ह्मणती गा रघुराया ॥ आधीं जिंकावें गा मना यया ॥ सर्व साधनाचे क्लेश सांडुनियां ॥ करावें उपाया मनोजयाच्या॥ ७७ ॥ अगा सर्वदा हेंचि करावें ॥ अतिप्रयासें मन जिंकावें ॥ स्थीर नराहे तरी दाटावें॥ येकत्र करावें बलात्कारें ॥ ७८ ॥अगा हस्तेंहस्त दडपोनी ॥ नेटें चुरावे बळेंकरूनी ॥दंतीं दंत रागें चाऊनी ॥ नेटेंकरु-

---

१ अज्ञानी, मुर्ख. २ दुसरें. ३ मुर्ख. ४ व्यभिचारिणी. ५ पाठान्तर. ६ हत्तीचा मलसर्ग.

नि जिंकावें ॥ ७९ ॥ क्रोधें दांत खाऊनी रघुपती ॥ मनातें जिंकावें गा सर्वार्थीं ॥ जैसा महाशूर रणाप्रती॥ अतिविक्रमें जिंकिजे ॥ २८० ॥ अंग अंगानें पीडुनी॥आसन घालावें चरण मोडुनी ॥परि आधीं जिंकावें भर्वसेनी ॥ मन निर्वाणीं सीताकांता ॥ ८१ ॥ हें मन जिंकिलीया रघुवीरा ॥ मोडे विश्वभ्रांतीचा पसारा ॥ मग बुडोनि राहिजे सुखसागरा ॥ नाहीं दरारा संसृतिचा ॥ ८२ ॥ अगा गुरुसंप्रदायेंवीण ॥ करितां मनाचें दमनं ॥ तें स्थीर नव्हे अधिकचि जाण ॥ होय दारुण अतिचांचल्यें ॥ ८३ ॥ अगा या मनाच्या ज्या दोषवृत्ती ॥ त्या पंचधा बोलों तुजप्रती ॥ त्या निरोधिल्या निवृत्तस्थिती ॥ पराजय ह्मणती मनाचा तो ॥ ८४ ॥ त्या वृत्ति जिंकिल्या नसतां ॥ मनोजय केला ऐसें ह्मणतां ॥ लाज मोठी गा श्रीरघुनाथा ॥ त्यासीं बोलतां कोण वारी ॥ ॥ ८५ ॥ मनाच्या वृत्ति वोळखोनी ॥ मग जय करावा वृत्ति त्यजुनी ॥ मग प्रयास नकरितां भर्वसेनी ॥ होय निर्वाणीं मनोजय ॥ ८६ ॥ तरी सद्गुरूमुखें वृत्तींचें ज्ञान ॥ करुनि करावें नियमन ॥ वृत्ति निरोधिल्या निवृत्तिकमन ॥ होय जाण आपसेंयां ॥ ८७ ॥ यया वृत्तींतें नोळखती ॥ आणि मनोजय करूं इछिती ॥ तेणें थोर श्रमु गा पावती॥ मनोजयाची प्राप्ति असेचिना ॥ ८८ ॥ त्या मनोवृत्ति कोण कोण ॥ सांगेन तयांचें लक्षण ॥ एक येकाग्र करुनि मन ॥ मनोनियमन महाथोर ॥ ८९ ॥ अगा महाशूरातें मारितां ॥ तो नमरे नाना उपाय करितां ॥ आधिं करचरण तोडितां ॥ मग तो सर्वथा निमेच कीं ॥ २९० ॥ नाना सहस्त्र करातें फरशधरु ॥ युद्धीं

१ पराक्रमानें  २ जन्ममरणाचा.  ३ सद्गुरूच्या अनुग्रहाशिवाय.  ४ आकलन.  ५ सहन.  ६ परशुराम.

देखोनि अनिवारु ॥ सहस्त्र भुजा छेदोनि महावीरु ॥ रणीं रणकेरु करी त्याचा ॥ ९१ ॥ नाना करचरण मोड-
लीयावरी ॥ पांगुळ निश्चळ बैसे परिवरीं ॥ तो कांहीं केलिया नरिघे बाहेरी ॥ तैसी परी मनासि होय ॥९२॥
तैसे या मनाचे करचरण ॥ त्याच या पंचवृत्ति जाण ॥ ययातें नेमिलिया आपण॥मना स्थीरपण स्वरूपीं॥९३॥
मग कांहीं केलिया नढळे ॥ बाहिर घातल्याही नचळे ॥ ब्रह्मींच राहे निश्चळ ॥ नव्हे मैळ बाह्यवृत्ती॥९४॥तया
पंचवृत्ती प्रकार ॥ तुज सांगेन गा सविस्तर ॥ तेणें बुझसी सर्वसार ॥ मनोमार जेणें होय ॥ ९५॥ तरि प्रमाण
विपर्यय विकल्प ॥ हा वृत्तित्रय जाणदीप ॥ निद्रा स्मृति हे संकल्प ॥ पंचविधरूप जाणावे ॥ ९६ ॥ आतां
येकयेकांचें लक्षण ॥ तेंही तुजप्रती सांगेन ॥ तेणें तूं बुझसी संपूर्ण ॥ ऐकें चिन्ह सर्वोत्तमा ॥ ९७ ॥ प्रमाण तें-
हि षड्विध प्रकार ॥ तितुकिया मनोवृत्ति साचार ॥ त्यासीं वोळखावें सविस्तर ॥ ऐक सादर रघुनाथा ॥९८॥
प्रत्यक्ष अनुमान उपमान ॥ शाब्दअर्थापत्ति अभाव जाण॥ हेंचि षड्विध प्रमाण॥ऐक लक्षण ययाचेंहि॥९९॥
नेत्रीं घटपटादि भासती ॥ श्रवणें शब्दाचि प्रतीति ॥ घ्राणें गंध त्वचा स्पर्श व्यक्ति ॥रसना रसवृत्ति प्रत्यक्षा-
ची ॥३००॥ जें जें प्रत्यक्ष जाणिजे ॥ तें तें प्रत्यक्ष प्रमाण ह्मणिजे ॥ अनुमान अनुमानें लक्षिजे ॥ तेंही परिसी
जे लक्षण ॥ १ ॥ जैसा पर्वतीं धूंम देखिला ॥ तेणें अग्नि आहे ऐसा अनुमानिला ॥ येणें न्यायें अनुमानमे-
ळा ॥ जाण शामला मदनमूर्ति ॥ २ ॥ आतां उपमान तें ऐसें ॥ येके वस्तूसीं साम्य देईजेतअसे ॥ गोसद्द-

१ गुप्तठिकाणीं एकांतांत. २ समजशील. ३ विपरीतपणा. ४ सहाप्रकार. ५ नाकानें. ६ दघड. ७ धूर. ८ गाईसारखा.

शो गवय ऐसें ॥ हेंचि सर्वांशें उपमान ॥३ ॥ हा पुरुष सिंहचि असे ॥ कां मुख चंद्रासारिखें दिसे ॥ येकेसीं येक उपमिजेत असे ॥ उपमान ऐसें या नाम ॥४ ॥ शाब्द तें जाण चौथें प्रमाण ॥ शब्दें अर्थप्राप्ती होतसे जाण ॥ महावाक्यें जैसें ब्रह्म पूर्ण ॥ घेइजे खुण गुरुमुखें॥५ ॥लौकिकशब्दें अर्थप्राप्ती ॥ होय हें सर्वांसि प्रतीति ॥ नदीतीरे पंचफलानिसंति ॥ होय प्राप्ती आप्त वचनें ॥६॥ आतां अर्थापत्तिचें लक्षण ॥ तें तंव एवंविध जाण ॥ येकु दिवसा नकरी भोजन ॥ पुष्टपण तरीं सर्वांगा ॥७॥ तेथें निशिभोजनाची संभावना ॥कीजे ती अर्थापत्ती जाणा॥ अभाव तो ऐसा रघुनंदना ॥ राजीवलोचना परियेसी ॥ ८ ॥ घट नाहीं जिये भूमिकेसीं ॥ तोचितो घटाभावो परियेसी ॥ येणें न्यायें सर्वत्र ऐसी ॥ अभाव रूपासि जाणिजे ॥ ९ ॥ ऐसें षड्विध हें प्रमाण ॥ या तंव चित्तवृत्तीच जाण ॥ प्रथम वृत्ती ते षड्विध प्रमाण ॥ दुसरी पूर्ण विपर्ययता ॥ ३१० ॥ तरी शुक्तिकेच्याठाईं जैसें रजत ॥ कां रश्मिजाळीं मृगांभ दिसत ॥ रज्जुसर्पादि भ्रम समस्त॥जाण निश्चित विपर्यय तो ॥११ ॥ येक साच वस्तुच्याठायीं ॥ अन्य दुजें भासे कांहिं ॥ तो विपर्यय जाण सर्वही ॥ मनोवृत्ति पाहीं रघुनाथा ॥१२॥ विकल्प तो असत्याचें स्मरण ॥ वंध्यापुत्रादि व्योमसुमन ॥ हेचि चित्तवृति संपूर्ण ॥ जाण खुण रघुपुंगवा ॥१३ ॥ मुख्य विकल्प तो संशयो जाण ॥ हें होय किं नोहे संदेह पूर्ण ॥ हेंचि विकल्पाचें लक्षण ॥ जाण खुण रघुनाथा ॥ १४ ॥ चतुर्थवृत्ती ते जाण निद्रा ॥ वस्तु अवलंबन जे राजेंद्रा ॥ स्वरूपास्थितीसिं हे अभद्रा ॥ भवसमुद्रा

१ अनुमान, २ तर्क. ३ अवस्थेला. ४ रूपें. ५ मृगजळ. ६ आकाशपुष्प. ७ अशुभ.

पाडितअसे ॥ १५ ॥ पूर्वीं अनुभवला जो अर्थ ॥ त्याचें स्मरण होय यथार्थ ॥ तेचि स्मृती जाणपां यथातंथ्य॥ हेहि निश्चित चित्तवृत्ती ॥१६॥ ह्या पंचविधा चित्तवृत्ती॥ यांचें नियमन करावें गा सर्वार्थीं ॥ वृत्तिनियमनें आवृत्तिक स्थिती ॥ होय प्राप्ति मनोनिग्रहाची ॥ १७ ॥ जागृती स्वप्न सुषुप्तीच्यापोटीं ॥ यया पंचवृत्तिची होतसे आंटी ॥ अवस्थात्रय टाकितां भेटी ॥ होय नेटी साक्षियासीं ॥ १८ ॥ साक्षी स्वरूप जाणतां खेंवो ॥ होय मनादि दृश्याचा अभांवो ॥ यालागीं हाचि मुख्य उपावो ॥ होय लयो मनाचा पैं ॥ १९ ॥ अगा येणेंचिमार्गेंकरुनी ॥ आधीं मन नियमावें भवसेनी ॥ हेंचि मुख्य कोदंडपाणी ॥ आणिक करणें तो सर्वही श्रमु ॥ ३२०॥ आतां मनोजय करूं नशकती ॥ लौकिकीं दंभचि मिरविती ॥ त्यांचि श्रीवसिष्ठ निंदा करिती ॥ ते श्लोकसंमति परिसिजे ॥ २१ ॥ श्लोक ॥ चित्तमेकंनशक्नोतिजेतुंस्वातंत्र्यवर्जितः ॥ ध्यानवार्तांवदन्मूढःसकिंलोकेनलज्जते ॥ ॥ १८ ॥ टीका ॥ येक चित्तचि गा रघुनाथा ॥ जें जिंकों नशकती सर्वथा ॥तयाचि हरपली स्वातंत्रता ॥ आसक्तता विषयाचेनी ॥२२ ॥ विषयासक्तिनें स्वातंत्र्यपण ॥ आणि हरितलें तयाचें ज्ञातेपण ॥ मग बोलती दंभेंकरुन ॥ करूं ध्यान सर्वदां ॥ २३ ॥ ऐसेही ध्यानवार्ता बोलती ॥ हें तंव आश्चर्य थोर गा रघुपती ॥ मूर्ख ते बोलतां नलाजती ॥ कैसी गती यालोकांची ॥ २४ ॥ हा प्रयत्न तो पुरुषाआधीन ॥ जें स्वचित्त करावें स्वाधीन ॥ तें नव्हे विषयासक्ती मलीन ॥ वार्ता श्लाघोनं ध्यानचि करिती ॥ २५ ॥ नाहो विषयासक्ति कां होय त-

१ खरोखर. २ श्रम, कष्ट. ३ तत्क्षणींच. ४ लय. ५ ऐकोन.

यासीं ॥ आणि आदरु कां नुपजे अभ्यासीं ॥ केलाहि अभ्यासु कां तयासीं ॥ नेदी फलासी तें सांगिजे ॥२६॥ तरी अवैराग्यें विषयासक्ती ॥ अनादरें अभ्यासु नकरिती ॥ अनाभ्यासें न०्हे फलप्राप्ती ॥ निरंतर नकरिती ह्मणोनियां ॥२७॥ हें नकरुनियां गा रघुपती ॥ दंभेंचि ध्यानवार्ता बोलती ॥ आह्मी ध्यानस्त होतों ह्मणती ॥ परि नकरिती प्रयत्न कांहीं ॥ २८ ॥ अगा मनोजय करावया ॥ तिन्हीं साधनें पाहिजेति गा रघुराया ॥ वैराग्य आदर आणि नैरंतर्या ॥ पाहिजेति साहाया प्रकार तिन्ही ॥२९॥ अगा वैराग्यें विषयासक्ति न०्हे ॥ विषयासक्ति न०्हतां विक्षेप नहोय ॥ आदरें अभ्यासीं उदासीनता नये ॥ यालागीं होय मुख्य अभ्यासु ॥३३०॥ आदरें अभ्यासुही करी ॥ परि तो निरंतर नकरी ॥ दों चौ मासाआड आदरु घरी ॥ तेणें न०्हे पुरी साध्यप्राप्ती ॥ ३१ ॥ यालागीं साधनत्रय असावें ॥ अखंड अभ्यासीं मन घालावें ॥ क्षण येक चित्तानुसार वर्त्तावें ॥ सवेंचि मोहरावें आत्ममोहरा ॥ ३२ ॥ जैसा कां खेल अश्वयाती ॥ सर्वथा नधरी सुमार्गगती ॥ अश्वधारकु तयाप्रती ॥ ऐसी युक्ति प्रयोजी॥३३॥मार्गानुसार नेउनी तयासीं ॥ नित्यानित्य करवी अभ्यासासीं॥अडल्या क्षणेक त्याच्या मार्गासीं ॥ अनुसरे कैसा तदनुसार ॥ ३४ ॥ सवेंचि नेमी अश्ववृत्तीसिं ॥ परि उमँसू घेवोंनेदी तयासी॥ ऐसा हळुहळु अतिप्रयासीं ॥ स्वाधीन तयासीं करीतसे ॥ ३५ ॥ तैसें या मनातें प्रज्ञावंत॥निरंतर अभ्यासीं घालित ॥ क्षणेकु तदनुसारहि चालत ॥ सवेंच वळित निजाभ्यासीं ॥ ३६ ॥ ऐसें वैराग्यादि तिहीं गुणीं ॥ अ-

१ अभ्यास न केल्यानें. २ विषयांमध्यें नैराश्यता. ३ अडथळा. ४ चित्ताप्रमाणें. ५ दांडगा. ६ घोडे शिकविणारा. ७ विश्रांती. ८ ज्ञानी.

भ्यासु कीजेगा अंनुदिनीं ॥ तेणें चित्त भर्वसेनी ॥ होय ततक्षणीं दितिजशत्रु ॥ ३७ ॥ श्लोक ॥ एकएवमनोदे-
वोज्ञेयः सर्वार्थसिद्धिदः ॥ अन्यत्रविफलक्लेशःसर्वेषांतज्जयंविना ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ सर्वांसिहि तमारिवंशप्र-
दीपा ॥ हा मनोजयमार्गु गा सोपा ॥ परि नकरिती हें आश्चर्य बापा ॥ थोरा पापाचें हें फळ ॥
॥ ३८ ॥ अगा सर्वही क्लेश त्यजुनी ॥ येक मनोजय करावा कार्मुकपाणी ॥ नकरावें फळ क्लेशालागुनी ॥
मुख्य समाधानीं मनोजय ॥ ३९ ॥ सर्व साधनाचें निराकरण ॥ येवंकारें क्लेशाचें परिहरण ॥ करुनि मनोदे-
वचि ज्ञेयत्वें जाण ॥ सर्व संपन्न सिद्धित्व देतु ॥३४०॥ नाहो मनोदेवो कां ह्मणितिलें ॥ देवत्व यासीं काइसे-
नि आलें ॥ तरी तेंही सांगों येका बोलें ॥ जेणें कळे पदार्थ हा पैं ॥ ४१ ॥ अगा सर्वां जो प्रकाशी ॥ तयासीं
देवो ह्मणती हृषीकेशी ॥ प्रत्यक्वृत्तीनें परियेसी ॥ सर्वां प्रकाशी अंतरपणें ॥ ४२ ॥ वृत्तिरूप ह्मणती जें ज्ञा-
न ॥ तें प्रकाशत्वें प्रकाशमान ॥ देवो ह्मणती तयालागुन ॥ आणिकही चिन्हें परियेसी ॥ ४३ ॥ सकळ इंद्रि-
यांच्या वृत्ती ॥मनसाह्यें प्रकाश करिती ॥ यालागीं मन हा देवो ह्मणती॥लक्ष्मीपति परियेसी ॥४४॥ ऐसीच ए-
कादशीं उद्धवासी ॥ स्वयें सांगे हृषीकेशी ॥ भयंकर देवो ह्मणती मनासिं ॥ दुर्जय योगियासीं ह्मणोनियां ॥
॥४५॥ संमतिश्लोक ॥ मनोवशेऽन्येह्यभवंस्मदेवामनश्चनान्यस्यवशंसमेति॥भीष्मोहिदेवःसहसःसहीयान्युंज्या-
द्वशेतंसाहिदेवदेवः ॥ ६ ॥ श्रुतिरपि ॥ मनसोवशेसर्वमिदंबभूवनान्यस्यमनोवशमन्वियंभीष्मोहिदेवःसहसःस-

* रात्रंदिवसं. १ सूर्यवंशाचा मुकुटमणी रामा. २ त्यागकरणें. ३ अंतरवृत्तीनें. ४ आजिंक्य.

हीयानिती ॥२॥ टीका ॥ असो यामनातें ज्ञेय करावें ॥ ज्यासीं जाणणें तेंचि नियमावें॥नियमनें तेंचि जाणावें॥ ज्ञेयत्वें ह्मणावें हेंचि वर्म ॥४६ ॥ तो येक मनोजय केलिया ॥ सर्व सिद्धी होति आपसेया ॥ अन्यत्र साधनें केलिया ॥ जया नकरी तया विफळ क्लेश ॥४७॥ अगा मनोजयेवीण जाण॥सर्व व्यर्थंचि होय साधन॥ येके मनोजयें सर्व संपूर्ण ॥ समाधान इतुकेनी ॥ ४८ ॥ तया मनोजयाची उपायसंपत्ती ॥ सांगेन तुज जनकजापती ॥ येकाग्र करूनि चित्तवृत्ति ॥ महामती परियेसी ॥ ४९ ॥ श्लोक ॥ अनुद्वेगःश्रियोमूलमनुद्वेगात्प्रवर्ततें ॥ जंतोर्मनोजयादन्यत्त्रैलोक्यविजयस्तृणं ॥ २० ॥ टीका ॥ अगा मनाचा जो अनुद्वेग ॥ जो कीं व्यवहारशून्य सांग ॥कामत्यागमात्रें मन निःसंग ॥ तो अनुद्वेग जाणावा॥३५०॥मनीं संकल्पमात्र तुठी॥सर्व कार्यजातासीं जेथें आटी॥ त्या नांव गा अनुद्वेग जगजेठी ॥ थोर सृष्टीं तो येकू ॥५१॥ जग बाधीत देखिलिया ॥ अनुद्वेग उपजे आपसया॥ मृगांभाच्या प्राप्त्युपाया ॥ ज्ञाता काय तया प्रवर्ते ॥५२॥ तोचि तो मोक्ष लक्ष्मीसिं मूळ ॥ तेणेंचि मोक्षलक्ष्मी सफळ ॥ अनुद्वेगेंचि सकळ ॥ प्राप्तीफळ अनुद्वेगाचें ॥५३॥ सर्व कार्यांचा अनुद्वेग करणें॥तेणेंचिअनुद्वेगाचें होणें ॥ यालागीं अनुद्वेगेंचि असणें॥उद्योग टाकणें सर्वथा॥५४॥सर्वदा अनुद्वेगें असणें॥तेंचि गा मनातें जिंकणें ॥ मनोजयें सर्व साधनें॥आत्मा साक्षात्करणें मनातें या॥५५॥यया प्राणियासि गा रघुनाथा॥मनोजयलाभु थोर सर्वथा ॥ मनोजयावेगळें तत्वतां॥त्रैलोक्य ताता तृणप्राय॥५६॥अगा मनोजया परतें॥त्रैलोक्य जिंकिलें तरी तृण तें॥याला

१ ज्ञानगम्य वस्तु. २ आपेआप. ३ विरक्ती. ४ श्रम, कष्ट. ५ मृगजळाच्या.

गीं जिंकणें सर्व सामर्थ्यें ॥ यया मनातें रघुवर्या॥५७॥अगा शूरामाजि तो महाशूर ॥जो येकलें मना जिंकि सत्वर॥हें सर्व सांडुनी करी सर्व विश्वसंहार॥ तो षंढ नर असुरपणें ॥५८॥ अगा मनापुढें सुरनायक॥त्रैलोक्याचा कोण लेख ॥ विश्व हें तृणतुल्य विश्वतोमुख ॥ नाहीं लेखा मनापुढें ॥ ५९ ॥ अगा अतिशूर जो कां असेल ॥तो त्रैलोक्य तात्काळ जिंकील ॥ परि मन जिंकी तो विरळ ॥ नभेदे भूतळ भेदिलीया ॥ ३६० ॥ मन जिंकिल्या त्रैलोक्य जिंकिलें ॥ मन जिंकिल्या सर्वही केलें ॥ मन जिंकिल्या आत्मत्व साधिलें ॥ सुख लाधलें ब्रह्मानंदें ॥ ॥६१॥ अगा त्रैलोक्य हें मनाच्या पोटीं ॥ मन जिंकिल्या जयो सृष्टी॥ सृष्टि जिंकिल्या कोणासी भेटी ॥ सांग जगजेठी पुरुषार्थ काय ॥ ६२ ॥ यालागीं मन जेणें जिंकावें॥ तया त्रैलोक्य आपैतें स्वभावें ॥ तरी मनो जया-चा उपाय गौरवें ॥ सांगेन तें राघवें परिसिजे ॥ ६३ ॥ श्लोक ॥ सत्संगोवासनात्यागःस्वात्मज्ञानविचारण। ॥ प्राणस्पंदनिरोधश्चेत्युपायाश्चेतसोजये ॥ २१ ॥ टीका॥अगा जयो करणें जयाठाईं ॥ हे उपाय चतुष्टय बोलिले पाहीं ॥ येकेपक्षें जाण पंचकही ॥ विचारणा हेही पद केलिया ॥ ६४ ॥ अतिनिकट तत्काळ फळतें ॥ तेचि उपाय सांगेन तूतें ॥ एकाग्र करुनि ऐकिजे रघुनाथें ॥ चित्त लयातें पावे जेणें ॥ ६५ ॥ तरी प्रथम उपाय महाथोर ॥ जो कीं उपायाचें सर्व सार ॥ तो साधुसंग गा उदार ॥ मनोमार जेणें होय ॥ ६६ ॥ अगा सर्वांहि संगाचें आपोहन ॥ होय येके साधुसंगेंकरून ॥ मनाजयें आपें आपण ॥ होय क्षण नलगतां ॥६७॥ मनाचा अहंका-

१ नपूंसक, मूर्ख. २ इंद्र. ३ सहज. ४ महत्वानें. ५ भस्म.

रेसीं संग ॥ मनें आवरिल्या आत्मा असंग ॥ मनें सर्वदां वासनासंग ॥ मनें अभंग देहबुद्धी ॥ ६८ ॥ मनें पुत्र वित्तादिकांची गोडी ॥ मनें द्रव्यदारादिकांची आसक्ती फुंडी ॥ मन पाडी भवअगेडीं ॥ संसारखेडी मनेंचि पडे ॥ ६९ ॥ मनें देहेंद्रियाचा संगु ॥ मनें वाढे संसाररोगु ॥ तो सत्संगें होय वियोगु ॥ निश्चयें अभंगु आत्मतत्वीं ॥ ३७० ॥ सत्संगु करितां त्रैलोक्यनाथा ॥ सर्व संग नासती गा तत्वतां ॥ सत्संगें वासनात्यागु सर्वथा ॥ होय निजात्मता सत्संगें ॥ ७१ ॥ अगा सत्संगापरतें कांहीं ॥या त्रैलोक्यांत बरवें नाहीं ॥ सत्संगलाभें सर्वही ॥ मनोजय काय तया पुढें ॥ ७२ ॥ मनादि प्रपंचभ्रम जेणें होय ॥ तें अज्ञान सत्संगें पळोनि जाय ॥ सत्संगें देहबुद्धि कैंची राहे ॥ सत्संगें होय निजात्मलाभू ॥ ७३ ॥ सत्संगें खळाचें खळपण मोडे॥ सत्संगें देहबुद्धी तत्काळ बिघडे ॥ सत्संगें सर्व संसार बुडे ॥ सत्संगें धडफुडें ब्रह्मज्ञान॥७४॥सत्संगें सत्कर्मादि अनुष्ठान ॥ सत्संगें जपतपादि साधन ॥ सत्संगें बाणें वैराग्य पूर्ण ॥ पावे खुण आत्मयाची ॥७५॥ ह्मणोनि येके सत्संगेंकरुन॥ मनाचें होय भस्म पूर्ण ॥ यालागीं करावें साधुसेवन ॥ रजें वंदणें साधूचे ॥ ७६ ॥ अगा संतांचे चरणिची धुळी ॥ तेणें करितां आंघोळी ॥ नुरे अज्ञानाचि काजळी॥मनमेळी उरे कैंची ॥७७॥ ह्मणोनि साधनामाजि साधन ॥ सत्संग साधनाचें शिरोवर्यरत्न ॥ अगा याहुनी कोटी गुण चढे गा जाण॥तूंहि सज्ञान जाणसी॥ ७८ ॥ दुसरें साधन वासनात्याग ॥ज्या ज्या चित्तवृत्ति उठती अभंग ॥ त्याची वासना हे जाणपां सांग॥रूप अव्यंग

१ मोठी. २ संसाररूप आडवाटेंत. ३ हातोहातीं, खरोखर. ४ चरणधूळ. ५ दोषरहित, परिपूर्ण

वासनेचें ॥ ७९ ॥ मनापासाव ज्या ज्या वृत्ति उठती ॥ तयांची मुळींच करावी आंटी ॥ साक्षि तयाचा अं-
गा नेहटी ॥ दृश्य पोटीं घालुनियां ॥ ३८० ॥ जो जो संकल्प विषयाकार ॥ उठे घेउनी वासनांकुर ॥ तो तो
करावा निर्विकार ॥ पदार्थाकार होऊं नेदी॥८१॥स्वरूपावेगळें अनात्मजात ॥ जें जें दृश्य सत्यत्वें स्फुरत ॥ जें-
स्फुरणेंचि चैतन्यार्थ ॥ करी निश्चित प्रत्यकूवृत्ती ॥ ८२ ॥ याचेंचि नाम वासनात्याग ॥ जाण श्रीरामा हा अ-
व्यंग॥नाना भेद वासनाचि सांग ॥ जाण अभंग रघुराया ॥ ८३ ॥ तिसरें साधन विचारणा॥ जे कीं आत्मवि-
द्या बोलिजे जाणा ॥ तेणें उरी नुरे मनपणा ॥ ब्रह्म संपूर्ण स्वयें होय॥८४॥अथवा विचारणा ते ऐसी॥ आत्मा-
नात्मविवेक परियेसी ॥ तेणें मनोजय निश्चयेसीं ॥ सर्वस्वेसीं होय रामा ॥ ८५ ॥ अगा आत्मविद्या तेंचि
ज्ञान ॥ मनादि लयाचें कारण ॥ आत्मज्ञान सर्व संपूर्ण ॥ नाहीं न्यून कोणेंविषयीं ॥ ८६ ॥ अथवा श्रवण म-
नन निदिध्यासन ॥ जें कीं आत्मविद्येचें मुख्य साधन ॥ तें करितां मनाचें होय भस्म पूर्ण ॥ जाणती खुण अ-
नुभवी जे ॥ ८७ ॥ आणि प्राणस्पंदाचें निरोधन॥हें ही येक मनोजयाचें कारण ॥ जो किं प्राणायाम निर्वाण॥
वायुधारण जेणें होय ॥८८॥ पवनरोधें मनोजय होय ॥ कां मनोजयें प्राणजय होय॥ परस्परें हा निश्चयो आ-
हे ॥ यालागीं पाहे साधुनी ॥ ८९ ॥ आणिक याचा अनुक्रम गा रघुपती ॥ साधुसंगें वासना तुटती ॥ वासना-
क्षयें ज्ञानप्राप्ती ॥ विचाराअंतीं जें होय ॥ ३९० ॥ प्राणस्पंद निरोधेंकरुनी ॥ मनोजय होय भर्वसेनी ॥ य-

१ पराभव, लय. २ मायिक. ३ स्वरूपाकारवृत्ति. ४ उणें. ५ रात्रंदिवस विचार. ६ प्राणाच्या गतीचें. ७ प्रतिबंधन.

यालागीं येहिसाधनीं ॥ होय निर्वाणीं मनोजय ॥ ९१ ॥ मनोजय जालिया रघुपती ॥ तेचि पूर्णता गा सर्वाथीं ॥ पूर्णपणें मोक्षसंपत्ती ॥ होय त्रिजगतीं सुखस्वरूप ॥ ९२ ॥ श्लोक ॥ पूर्णेमनसिसंपूर्णंजगत्सर्वंसुधाद्रवैः ॥ उपानद्गूढपादस्यनतुचर्मास्तृतैवभूः ॥२२॥ टीका ॥ ब्रह्माकार होतांचि मन ॥ त्याचेंचि नाम पूर्णपण ॥ पूर्ण मन असतांचि जाण ॥ जग संपूर्ण ब्रह्मत्वें ॥ ९३ ॥ मग ज्ञानामृत गा महावीरा॥ द्रवोंलागे सर्वेंद्रियद्वारां ॥ मग मनविश्वपसारा ॥ ब्रह्मेंसि दुसरा भासेना ॥९४ ॥ दुसरें नभासे ब्रह्मेविण ॥त्याचेंचि नाम जाण परिपूर्ण॥मग त्रिजगतीं त्या सुखसंपन्न ॥ आपणाविण नदेखे दुजें ॥ ९५ ॥ अगा उपानहें गूढ चरण ॥ तया पृथ्वीप्रती चर्मास्तरण ॥ चर्ममयचि धरा जाण ॥ नाहीं वणवण जळजळेचें ॥९३ ॥ अगा मोक्ष आणि बंधन ॥ हे दोन्ही आपणाचि आधीन ॥ विपरीत संकल्पें बंधन ॥ सुपरीतें मोक्ष स्वतःसिद्ध ॥ ९७ ॥ तेंही सांगेन तुजप्रती॥ ऐकें मिथिळेश्वरदुहितापती ॥ वैकुंठाधीशा विश्वमूर्ति ॥ सुखसंविती सुखरूपा ॥९८ ॥ श्लोक ॥ नाहंब्रह्मेतिसंकल्पात्सुदृढाद्बध्यतेमनः ॥ सर्वंब्रह्मेतिसंकल्पात्सुदृढंमुच्यतेमनः ॥२३॥ टीका ॥ मी ब्रह्म नव्हे या दृढ संकल्पें ॥ मन बंधन पावे येणेंचि अल्पें ॥ मन उपलक्षणें प्रमाताचि जल्पे ॥ निरूपण सोपें केलें मागें ॥ ९९ ॥ ह्मणोनि मी ब्रह्म नव्हेचि कल्पितां ॥ भवबंध पावे गा सर्वथा ॥ आणि मीच ब्रह्म सुदृढ जाणतां ॥ स्वयें मुक्तता वरी त्यातें॥४००॥ सर्व ब्रह्म ऐसें सुदृढ ज्ञानें ॥तत्काळ मुक्ति होइजे मनें॥ह्मणोनि दृढताचि सर्वज्ञें॥साधावी येणेंप्रकारें करुनी ॥१॥

१ जोडयानें. २ झांकिले. ३ चामडयाचें आच्छादन. ४ सुखानुभवी. ५ चिन्हानें. ६ विचारीपुरुष.

सर्व शब्दें विश्व बोलिजे ॥ जें जें दृश्याकारें देखिजे ॥ तें सर्वहि ब्रह्म जाणिजे ॥ श्रुति बोलिजे स्वयें सिद्ध ॥ २ ॥ इदं सर्वयदेवमात्मा ऐसें ॥ सर्वंखल्विदंब्रह्म ऐसें ॥ प्रत्यक्ष श्रुति बोलतसे ॥ अनुभवहि असे ऐसाची ॥३॥ जैसें सर्प रज्जुसीं ह्मणतां ॥ बाध काय पावे गा रघुनाथा ॥ वास्तव आदि मध्य अंतीं असतां ॥ रज्जुचि पाहतां रज्जुपणें ॥ ४ ॥ यश्चोरः सस्थाणु ऐसें ॥ ह्मणतां तंव स्थाणुचि असे ॥ चोर भासला ह्मणोनि उच्चार असे ॥ येरवीं वसे स्थाणुच स्थाणु ॥ ५ ॥ तैसें पूर्वीं भ्रमेंकरुनी ॥ विश्व भासलें ब्रह्मस्थानीं ॥ बुझांवया त्याचेचि वचनीं ॥ श्रुति परामर्षणीं प्रवर्तली ॥ ६ ॥ विश्वाचा परामर्ष करून ॥ इदंकारें विश्व दाऊन ॥ ब्रह्मचि दावी निर्वाण ॥ तेंचि प्रमाण श्रुतिवाक्य ॥७॥ तोचि अनुभव विपश्चितांसीं ॥ हेंचि विचारेंचि पाहतां मानसीं ॥ हेंचि कारण बंध मोक्षासीं ॥ हृषीकेशी जाण तूं ॥ ८ ॥ यथार्थ जैसें आहे तैसें देखणें ॥ हेंचि मोक्षाचें कारण जाणे ॥ विपरीत विश्वपणें जाणणें ॥ बंधन मनें तेंचि पाविजे ॥ ९ ॥ अगा आपण तें यथातथ्यं ॥ ब्रह्माचें जाणणे यथार्थ ॥ तेंचि मुक्ती वरी परमार्थ ॥ तयापरतें दुजें नाहीं ॥४१०॥ तेंचि देहाद्याकारेंकरुनी ॥ देहादि इंद्रियसमुदाय आपण मानी ॥ तोचि बंध तोचि सर्वस्वें हानी ॥ संसारश्रेणी उत्तरोत्तर ॥११॥ यालागीं अहंब्रह्मेति संकल्पें येणें ॥ सर्वदां मुक्तचि गा असणें ॥ नाहंब्रह्मेति हेंचि बंधनें ॥ संसारदैन्य पावावया ॥१२॥ अगा स्वतःसिद्ध स्वयें ब्रह्म असतां ॥ लोक लाजती मी ब्रह्म ह्मणतां ॥ जैसी परपुरुषा स्पर्शतां ॥ होय लाज्जिता पतिव्रता जैसी ॥१३॥

१ खरा. २ खांब. ३ समजण्यास. ४ अनुमानाप्रत. ५ सद्गुरुसीं. ६ उलट. ७ खरोखर. ८ नानाप्रकारच्या योनी.

पंचभौतिक बहुतांचा ॥ भक्ष तरी श्वान शूकरांचा ॥ तो देहचि मी ह्मणती साचा ॥ बोध तयाचा काय सांगों॥ ॥ १४ ॥ श्वान मस्तकावरी पाय देऊन ॥ जव्हां भक्षीतसे या देहालागुन ॥ तेव्हां येतां देखे दुसरा श्वान ॥ तंव गुरगुरून पाठी लागे ॥ १५ ॥ तें आपुला विभाग ह्मणोनी ॥ तें कलेवर आपुलें मानी ॥ स्पर्शोनेंदी दूसरियालागुनी ॥ धरी निर्वाणीं पोटाळुन ॥ १६ ॥ ऐसे जे जे भक्षिती तयासीं ॥ ते ते आवुलाचि मानिती निश्चयेसीं॥शृगालवृकादिकीं यासीं॥ह्मणती देहासीं विभागु आपुला॥१७॥तैसेचि जिता स्त्री पुत्रादिक॥सुहृद मित्र बंधु सकळिक ॥ माझा ह्मणती तयासि देख ॥ सांग निष्टंक कोणांचा हा ॥ १८ ॥ ऐसें या देहातें मीच ह्मणें ॥ आणि स्वयें ब्रह्म असोनि ब्रह्म नह्मणें ॥ ऐसे हे लोक अति शहाणे ॥ दुःख दारुण पावती ॥ १९ ॥ अगा मी-ब्रह्म ह्मणणें याचिसाठीं ॥ होय ब्रह्मेसीं अपरोक्ष भेटी ॥ संसारासीं लागे कांटी ॥पळे उठाउठी अज्ञान॥४२०॥ हें सकळही मनेंकरुनी ॥ बंध मोक्ष होती कोदंडपाणी ॥ द्वैताद्वैतही स्फुरे मनीं ॥ अनर्थकरणी मनाचिया ॥ ॥ २१ ॥ तरी यालागीं हेंचि करावें ॥ यया मनातेंचि समूळ टाकावें ॥ मग आपआपणिया स्वभावें ॥ असिजे गौरवें आपुलेनी ॥ २२ ॥ श्लोक ॥ चित्तमुक्तेलयंयातिद्वैतमैक्यंचसर्वतः ॥ शिष्यतेतुपरंब्रह्मशांतंनित्यमनामयं ॥ २४ ॥ टीका ॥ चित्ताचे संकल्प टाकितां ॥ चित्तचि लय पावतसे सर्वथा ॥ चित्तलयें श्रीरघुनाथा ॥ सर्व ताता द्वैत ना ऐक्य॥२३॥अथवा मन आपणाहुनी भिन्न देखणें ॥ मनाचा साक्षी स्वयें होणें॥ याचेंचि नाम गा म-

१ डुकरांचा. २ प्रेत. ३ शेवटीं. ४ कोल्हा. ५ लांडग्यांनीं. ६ निश्चयेंकरून. ७ साक्षात्. ८ महत्वानें.

न टाकणें॥ खुण जाणणें हेचि मुख्य ॥२४॥ मनाचे येकत्वें जंव हा असे ॥ तंवचि मनासीं मनपण वसे॥आपणा
हूनि भिन्न देखतांचि सर्वांशें ॥ चित्त आपैसें टाकिलें होय ॥ २५ ॥अगा मनेंचि करूनि द्वैत स्फुरे॥ आणि मनें-
चि करूनि द्वैत विरे ॥ द्वैताभावें द्वैत स्फुरे ॥ दोन्हीं निर्धारें मनेंचि होती॥२६॥ अहो द्वैताद्वैत स्फुरणें ॥ कां ऐ-
क्यस्फुरे द्वैतविस्मरणें ॥ ये दोन्ही हि अनुसंधानें ॥ करिजे मनें सर्वथा ॥२७ ॥ यालागीं मनाचा त्याग केलि-
या ॥मग द्वैत ना ऐक्य गा रघुराया ॥येक नहोनि येकलिया॥उरणें अद्वया परब्रह्मासीं॥२८॥अगा येक ह्मणतां-
चि विश्वमूर्ति ॥ गणितेनसी दोनी होती ॥ यालागीं द्वैत ना ऐक्य भासती ॥ मनोशांती झालिया॥२९॥यालागीं
संकल्पत्यागें लयो मनाचा ॥मनोलयें उपरमु द्वैताचा॥मग ब्रह्मचि उरे जेथें सर्वांचा॥होय साचा उपरमू॥४३०॥
अगा येकाचि ब्रह्माच्याठाईं ॥ मनेंचि द्वैतजाळ कल्पिलें पाहीं ॥ तैसेंचि ऐक्य येणें न्यायें हि ॥मनें सर्वहि कल्पिलें
॥३१॥ढवळे वातीच्या उपाधीकरुन ॥येका अग्निसींच भेद मानुन॥मन हें दीप मानी भिन्न भिन्न॥तैसेंही जाण
ऐक्यही ॥ ३२ ॥ दोहींहि दीपासीं ऐक्य मानित ॥ येरवीं येक अग्नी संतत ॥ तैसें ब्रह्मीं विश्व कल्पित ॥ मनेंचि
अद्वैत कल्पिलें ॥ ३३ ॥ कां जळासींच बुद्बुद वीचि ॥ भेदकल्पना तेथें मनाचि ॥ तेची सपाटल्या प्रतीति
ऐक्याचि ॥ येरवीं जळचि उपरमु ॥ ३४ ॥ तें कल्पितें मुदल मन जाये ॥ मग द्वैत ना ऐक्य दोन्ही नोहे ॥ मग
येकलें येकत्र सर्व आहे ॥ ब्रह्मचि पाहे सदोदित ॥ ३५॥ नातरि आकाश सर्वत्र येक असे ॥ घटमठादि उपाधी-

१ उद्भवे. २ लक्ष. ३ लय. ४ बुडबुडे. ५ लहरी.

नें भिन्न भासे ॥ घट मठ भंगल्या ऐक्य दिसे ॥ पाहतां मानसें द्वैत ना ऐक्य ॥ ३६ ॥ तैसें सर्वांहुनियां जें कीं पर ॥ तेंचि परब्रह्म गा साचार ॥ शांत शब्दें निर्विकार ॥ नाहीं विकार उपाधीचा ॥ ३७ ॥ अगा उत्पत्ति मरणादि रोग ॥ तेंचि तें आमय शब्दें सांग ॥ मुख्य अज्ञान तोचि रोग ॥ होय भंग ययाचा जेथें ॥३८॥ अथवा आमय शब्दें उपाधी ॥ तो सर्व नाशे जेथें निरवधी ॥ तेंचि निरामयपद गा सुबुद्धी ॥ ब्रह्म त्रिशुद्धी जाणिजे॥३९॥ तें निर्विकार निरंजन ॥ शांत परब्रह्म निर्गुण ॥ तेंचि उरे येर होय क्षीण ॥ विश्वभान कल्पित जें ॥४४०॥ अगा कल्पित जाउनि रघुनाथा ॥ उरे परब्रह्मचि तत्वतां ॥ तेंचि तो जाण सर्वथा ॥ सांगेन आतां तें ऐकें ॥ ४१ ॥ श्लोक ॥ चिन्मात्रत्वंप्रयातस्यतीर्णमृत्योःसचेतसः ॥ योभवेत्परमानंदःकेनासावुपमीयते ॥ २५ ॥ टीका ॥ अगा ऐसे उपाय करुनी ॥ चिन्मात्र पावे जो निर्वाणीं ॥ तो मृत्यु तरला भवसेनी ॥ चित्त निर्वाणीं प्रत्यङ्मुख॥४२॥ अगा प्रत्यङ्मुख तें मन कैसें ॥ तेंही तुज सांगों गा सावकाशें ॥ ऐक एकाग्र मानसें ॥ अपूर्व असे अर्थ याचा ॥ ॥ ४३ ॥ आधीं प्रत्यक् शब्दें काय बोलिजे ॥ तेंचि तंव आधीं वोळखिजे ॥ मग प्रत्यङ्मुख मन कीजे ॥ सांगों सहजें रमाकांता ॥४४ ॥ देहेंद्रिय समुदाय भवसेनी ॥ त्याच्या प्रातिकूल्यें जैसा तरणि ॥ प्रकाशत स्वतां ज्ञानी ॥ जागृतीं स्वप्नीं सुषुप्तीसिं ॥ ४५ ॥ सर्व देहेंद्रियांचा प्रकाशकु ॥ तोचि प्रत्यक् शब्दें ज्ञानदीपकु ॥ देहेंद्रियांचा जो चाळकु ॥ येकायेकु परमात्मा ॥ ४६ ॥ ऐसें प्रत्यक् चैतन्य जें निर्वाण ॥ साक्षित्वें परब्रह्म निर्गुण ॥

१ जन्म. २ रोग. ३ परिपूर्ण. ४ निष्कळंक. ५ शेवटीं. ६ स्वरूपाकार. ७ सूर्य. ८ मोक्ष.

तत्सन्मुख करावें मन ॥ वृत्ति शून्य करूनियां ॥ ४७ ॥ सर्व दृश्यासि पाठिमोरें ॥ करूनि प्रत्यङ्मुख मोहरे ॥ केलिया मन निर्धारें ॥ पावे खरें प्रत्यङ्मुखता ॥ ४८ ॥ ऐसें प्रत्यङ्मुख करितां मन ॥ चिन्मात्रत्वें होय संपन्न ॥ तें परब्रह्मचि होय संपूर्ण ॥ तेथें जाण मृत्यु कैंचा ॥ ४९ ॥ तो मृत्यु तरला गा रघुपती ॥ जयासीं झाली परमानंदप्राप्ती ॥ स्वयें तोचि परमानंदमूर्ति ॥ मृत्योत्पत्ति कैंचि तया ॥ ४५० ॥ तयासी कवणेसीं उपमावें ॥ तयासीं तोचि जाणणें स्वभावें ॥ उपमीजे ऐसें असावें ॥ जरी मानावें तयासमान ॥ ५१ ॥ हें सर्वंही मनोनाशें घडे ॥ मनोनाशें संसार उबडे ॥ यालागीं मनोनाशें वाडेंकोडें ॥ कीजे फुडे उपाय बळें ॥ ५२ ॥ तेही उपाय गा कैवल्यपती ॥ सांगीतलेचि पुनःपुन्हा सांगिजेती ॥ जेहीं उपायीं ब्रह्मप्राप्ती ॥ बाणे स्थिती चित्तनाशें ॥ ५३ ॥ ॥ श्लोक ॥ द्वौक्रमौचित्तनाशाययोगोज्ञानंचराघव ॥ योगश्चित्तनिरोधोहिज्ञानंसम्यगवेक्षणं ॥ २६ ॥ टीका ॥ अगा या उपायामाजी उपाय थोर ॥ जो कीं सकळ गुह्यांचें गुह्यसार ॥ चोरूनि ठेविलें जें साचार ॥ तेंचि गुह्यंतर सांगेन ॥ ५४ ॥ अगा सर्व साधनांचा मुगुटमणी ॥ तें हें साधन कोदंडपाणी ॥ तेंचि सांगेन तुज लागुनी ॥ चित्त देऊनी परियेसी ॥ ५५ ॥ तरी चित्त नासावया रघुनाथा ॥ हे दोनी क्रम जाणपां तत्वतां ॥ इतर साधनें सांडोनि आतां ॥ करीं सर्वथा हेचि दोन्ही ॥ ५६ ॥ इतर साधनेंहि बोलिजेती ॥ परि तें करणें चित्तशुद्धिप्रती ॥ चित्तशुद्धि जालिया परमार्थप्राप्ति ॥ ब्रह्मप्राप्ती चित्तनाशें ॥ ५७ ॥ तरी महत्प्रकारें गा रघुनाथा ॥ चित्त नासाव-

* स्वरूपाकार. १ सन्मुख, समोर. २ पालथापडे. ३ अत्यंत. ४ विशेषगुप्त.

याचे उपाय तत्वतां ॥ तुजप्रती सांगेन आतां ॥ सांडीं कथा इतरांची ॥५८॥ ते उपाय परिसतांचि येश्रवणीं ॥ तेणें सुख नमाये त्रिभुवनीं ॥ तेंचि येकाग्र ऐकें मनीं ॥ पुरे धणी जेणें तुझी ॥५९॥ तरी गा येक योग येक ज्ञान॥ हेंचि चित्तनाशाप्रति कारण ॥ याचेंहि सांगेन लक्षण ॥ सावधान परियेसी ॥ ४६० ॥ आतां योगाचें कैसें लक्षण ॥ आणि ज्ञानाहि तें किंलक्षण ॥ तेंहि सांगों विशद करून ॥ ऐक चिन्ह असुरांतका ॥ ६१ ॥ तरी योगाचें परिस लक्षण ॥ तें एवंविध गा जाण ॥ करावें चित्तवृत्ति निरोधन ॥ अष्टांग पूर्ण अंगें त्याचीं ॥६२॥ तेचि अष्टांग कोण कोण ॥ सांगेन ऐकें येकाग्रमनें ॥ यम निमय आसन जाण ॥ प्राणायाम खुण चतुर्थ हा पें ॥६३॥ पांचवें अंगप्रत्यॅहार ॥ साहावा तो ध्यानप्रकार ॥ सातवी धारणा महाथोर ॥ समाधिसार आठवें अंग ॥ ६४ ॥ आतां याचीं वेगळालीं लक्षणें ॥ सांगेन ऐकें येकाग्रमनें ॥ तरी यम तो ऐसा जाणे ॥ द्वादश लक्षणें उभयांचीं ॥ ६५ ॥ संमतिश्लोक ॥ अहिंसासत्यमस्तेयमसंगोन्हिरसंचयः ॥ आस्तिक्यंब्रह्मचर्यंचमौनंस्थैर्यंक्षमाभयं ॥ ७ ॥ शौचंजपस्तपोहोमःश्रद्धातिथ्यंमदर्चनं ॥ तीर्थाटनंपरार्थेंहास्तुष्टिराचार्यसेवनं ॥ ८ ॥

॥ टीका ॥ प्राणिमात्राची हिंसा नकरणें ॥ शब्दादिकींहि दुःख नदेणें ॥ तेचि अहिंसा जाणणें ॥ साधारण सांगीतलें ॥ ६६ ॥ अहिंसा शब्दें बहुतांपरी ॥ निरूपिली असे ग्रंथांतरीं ॥ तें बोलतां ग्रंथविस्तारीं ॥ जाईल यापरी जाणिजे ॥ ६७ ॥ आणि सदा सत्यचि बोलणें ॥ तृणादि चौर्य सर्वथा नकरणें ॥ हें तिसरें लक्षण जाण-

१ इच्छा. २ स्पष्ट. ३ प्रतिबंध. ४ इंद्रियांची अंतर्मुखता.

णें ॥ चौथें नकरणें संग कोणासीं ॥ ६८ ॥ सर्वदा असंगवृत्ती ॥ असावें गा सीतापती ॥ अकरणीं लज्जा स-
र्वार्थीं ॥ पांचवी वृत्ति लक्षणाची ॥ ६९ ॥ स्वयें आपण ब्रह्म असतां ॥ देहरूप पावलों तत्वतां ॥ आत्मघात
ययापरता ॥ विचारितां आंन नाहीं ॥ ४७० ॥ याची लज्जा सर्वदा वाहणें ॥ गुरुनिगमीं संशय नधरणें ॥
आस्तिक्य बुद्धी असोंदेणें ॥ सातवें जाणणें लक्षण हें ॥ ७१ ॥ असंचय आठवें लक्षण ॥ वित्तादिं संचयो न
करणें ॥ संचयें होय दुःख दारुण ॥ ह्मणोनि सज्ञान नकरिती ॥ ७२ ॥ संन्यासी आणि ब्रह्मचारी ॥ उभयतां
नैष्ठिक साचारी॥अष्टधा मैथुन परी॥वर्जुनी ब्रह्मचर्याचारी असावें॥७३॥संमतिमहाभारतेसनत्सुजातः॥दर्शनंस्प-
र्शनंकेलिःकीर्तनंगुह्यभाषणं ॥ संकल्पोध्यवसायश्चक्रियानिर्वृत्तिरेवच ॥९॥ एतन्मैथुनमष्टांगंप्रवदंतिमनीषिणः ॥
विपरीतंब्रह्मचर्यमेतदेवाष्टलक्षणं ॥१०॥ टीका ॥ ग्राम्यवार्तांचें जें वर्जन॥तेंचि तें जाणावें सर्वदा मौन॥ गुरुवच-
नीं धर्मीं स्थैर्यपण ॥ दाहावें लक्षण हें ऐसें ॥ ७४ ॥ सीतोष्णादि द्वंद्व सहन ॥ करणें तेंचि क्षमा जाण ॥ अभ-
य तें एवंविध लक्षण ॥ ऐक सांगेन रघुनायका ॥७५॥ साधितां सिद्धि होईल किं नव्हे ॥ अंतरायांसीं सर्वदां
बिहे ॥ होय नव्हे जो संशय आहे ॥ इत्यादि जाय भय त्याचें ॥ ७६ ॥ हीं यमाचीं लक्षणें बारा ॥ सांगीतलीं
तुज महावीरा ॥ आतां नियम लक्षणही शामसुंदरा ॥ सांगेन बारा तें ऐक ॥ ७७ ॥ तरी प्रथम शौचं तो जाणा-
वा ॥ तोहि अंतर्बाह्य द्विविध गा राघवा ॥ अंतर मनबुद्धीचा आघवा ॥ सर्व सांडावा दुष्ट संकल्पु ॥ ७८ ॥ हा

---

१ दुसरा. २ वेदांतशास्त्रीं. ३ संग्रह न करणें. ४ द्रव्यादि. ५ नीच भाषणांचें ६ दृढ निश्चय. ७ कलह, विघ्न. ८ विघ्नाला. ९ भितो. १० पवित्रपणा.

अंतरशौच तो ऐसा ॥ बाह्य मृत्तिका जळें होत तैसा ॥ जपु करावा वीरेशा ॥ मंत्र जैसा असेल तैसा ॥७९॥ कृ-
छ्रांदिकें तपें आचरावीं ॥ अग्निहोत्रादिकें करावीं ॥ आणि श्रद्धा असोंद्यावी ॥ सर्व भावीं कर्मांची ॥ ४८० ॥
अग्नि अतिथींचें पूजन ॥ सर्वदा सर्वोत्तमाचें अर्चन ॥ चित्तशुद्धीलागीं तीर्थाटण ॥ परोपकार करणें परत्रहिता-
लागीं ॥ ८१ ॥ सर्वदा संतुष्टचि असावें ॥ यथालाभें सुख मानावें ॥ येकाग्र गुरुभजन करावें ॥ संतोषवावें स-
द्गुरूराया ॥ ८२ ॥ इत्यादि बारा नियम जाण ॥ संक्षेपें केलें यांचें कथन ॥ अष्टांग योगाची हे जाण ॥ समसमा-
न भूमिका[1]हे ॥ ८३ ॥ तिसरें योगाचें अंग आसन ॥ उच्च नीच वर्जूनि समसमान ॥ जेणें चित्त पावे समाधान॥
वीरासन पद्मासन अथवा वज्र स्वस्तीक ॥ ८४ ॥ तिये आसनीं बैसोनी ॥ प्राणायाम करावा प्रणव जपोनी ॥
रेचक पूरक कुंभक करुनी ॥ यथाधारणीं[2] अभ्यासबळें ॥ ८५ ॥ चंद्रें पुरिलिया सूर्यें रेचावें[3] ॥ किंवा सूर्यें पुरिलि-
या चंद्रें रेचावें ॥ अथवा समसमान धरावें ॥ मुख्य कुंभावें हेंचि थोर ॥ ८६ ॥ ऐसा प्राणायाम केलियावरी ॥
प्रत्याहार[5] करावा बरव्यापरी ॥ विषयाकार वृत्ति होतांचि धरी ॥ रोंविं परवरीं हृदयाच्या ॥ ८७ ॥ जे जे वृत्ति
मनीहूनि उठी ॥ ते ते वळावी परतल्या दृष्टी ॥ नेऊनी घाली मनाच्या पोटीं ॥ मनही नेहटीं साक्षीयासी॥८८॥
हें प्रत्याहाराचें लक्षण ॥ वृत्तीचें विषयापासाव निवर्तन ॥ वृत्ति चित्ताच्या पोटीं जिरवून॥ मनें पूर्ण अभ्यासु की-
जे ॥ ८९ ॥ वृत्तीचा मोकळ होउनी ॥ उपजो नेदाव्या मुळीहुनी ॥ उपजल्या काढाव्या विषयावरुनी ॥ साठ-

१ कष्टरूप. २ अवस्था. ३ वायुधारणेनें. ४ कमी करावें. ५ इंद्रियांची अंतर्मुखता. ६ अंतरांत. ७ जोर करी.

वण मनीं करावी॥४९०॥ हें प्रत्याहाराचें लक्षण ॥ संक्षेपें केलें कथन ॥ ग्रंथ विस्तारेल ह्मणोन॥अल्प निरूपण केलें असे॥९१॥ परि निरूपणाचें जें लक्षणसार ॥ तो इतकियांत केला प्रकार ॥ जैसा बीजाच्या पोटीं तरुवर ॥ असे फार निर्धारें ॥ ९२ ॥ ययावरी ध्यानाचा योग ॥ तोहि करावा अव्यंग ॥ ध्यानलक्षणाचेंहि अंग ॥ सांगों सविस्तर परियेसी ॥९३ ॥ मनोवृत्ति ज्या पंचप्रकार ॥ त्या मागें सांगीतल्या सविस्तर ॥ प्रमाण विपर्यय विकल्पसार ॥ चतुर्थ प्रकार निद्रेचा ॥ ९४ ॥ पांचवी जाण अनुभूतस्मृती ॥ इया पांचही मनोवृत्ती ॥ निरोधुनियां प्रत्यगोवृत्ति ॥ लक्ष चित्तीं धरूनियां ॥९५॥ स्वरूप सगुण अथवा निर्गुण ॥ तें ध्येय ध्यावें चित्तें करून ॥ विक्षेप झालिया विषयावरून ॥ ध्येयीं नेऊनी लावावें ॥९६॥ मागुती असावें ध्यानपण ॥ ध्येय सांडुनियां जाय जरी मन ॥ सावध होऊनि मागुतें लावणें ॥ ध्यान ह्मणणें ययालागीं ॥ ९७ ॥ दृढ ध्येयीं चित्त ठेऊनी ॥ मागुतें उठोंनेदावें तेथुनी॥धैर्य धरावें गा दाटुनी ॥ धारणा जाण साहावी हे॥९८॥अथवा धैर्येंकरूनियां हें मन ॥ स्वरूपीं धरावें दाटुन ॥ या नाम धारणा हें साहावें लक्षण ॥ सातवें ध्यान तें परियेसीं ॥ ९९ ॥ स्वस्वरूपाकार मन करणें ॥ अन्यार्थ कांहीं स्मरों नदेणें ॥ ययाचें नाम ध्यान ह्मणणें ॥ समाधी लक्षण तें ऐसें ॥५०० ॥ सर्व मनोवृत्ति लयातें पावती ॥ मन मनपणा पावे निवृत्ती ॥ स्वरूपींच समाधान स्थिती ॥ समाधी बोलती तिये नाम ॥ १ ॥ ऐसा अष्टांग सांगोपांग ॥ अष्टांग बोलिजे हा योग ॥ चित्तवृत्ती निरोध जो सांग ॥

१ थोडक्यांत. २ पूर्ण, दोषरहित. ३ प्रतिबंध करून. ४ स्वस्वरूपाकार वृत्ति. ५ अढळ.

तोचि योग अत्युत्कट ॥ २ ॥ योगबळें करूनियां मन ॥ स्वस्वरूपीं झालिया निमग्न ॥ तेंचि प्रपंचाचें अदर्शन॥
विश्वभान भ्रांति कैंची ॥ ३ ॥ चित्तादि प्रपंचाचें अदर्शन ॥ तोचि मनोनाश ऐसें जाण ॥ हे योगमार्गींची खु-
ण ॥ जाणपां पूर्ण रघुनाथा ४ ॥ चित्तवृत्तीनिरोध योग ऐसें ॥ सकळ शास्त्रीं निर्णिलें असे ॥ वृत्तीच्या निरोधें
मन नासे ॥ उपाय विश्वेशें जाणावा ॥ ५ ॥ दुसरा उपाय मनोनाशासीं ॥ तें येक ज्ञान गा हृषीकेशी ॥ त्या
ज्ञानाची खुण ऐसी॥सांगों परियेसी सावकाश ॥६॥तरी ज्ञान तें गा सम्यग्वेक्षण ॥ हे ज्ञानाची मुख्य खुण॥येणें
मनोनाश होय संपूर्ण ॥ जें विश्वभान बाधीतें ॥७॥ अगा सम्यक् पाहाणें तें ऐसें ॥ सांगेन श्रीरामा सावका-
शें ॥ सद्गुरू महावाक्य समरसें ॥ अतिउल्हासें ज्ञानपण तें ॥ ८ ॥ सकळ जितुकें दृश्यजात ॥ जो कीं सत्यत्वें
प्रपंच भासत ॥ जितुका जड परप्रकाश निश्चित ॥ मिथ्याभूत जाण तितुकें ॥ ९ ॥ अगा जें जितुकें परिछिन्न ॥
तितुकें जड दृश्यमान ॥ दृश्य तें अनात्मा संपूर्ण ॥ असत्य जाण काळत्रयीं॥ ५१० ॥ याहुनि व्यतिरिक्त स्व-
प्रकाश ॥ जो किं साक्षित्वें बोलिजे परेश ॥ तयासीं भासे जो जो भास ॥ तेंचि सावकाश दृश्यजात ॥ ११ ॥
अहंकार मन बुध्यादिक ॥ जें जें सत्यत्वें भासे सम्यक् ॥ तें तें दृश्य जाणपां निष्टंक ॥ साक्षी येक सत्य असे ॥
॥१२॥तयासीं यथातंथ्य जाणणें ॥ तेथेंचि आरोपित विश्व देखणें॥साक्षी ब्रह्मेसी एकपणें॥तद्रूप राहणें आपण
स्वयें ॥ १३ ॥ निरंतर स्वस्वरूपीं राहतां ॥ विश्व अबाधितहोय गा तत्वतां॥ मग तेणेंचि विश्रांती पावती

१ अतिशय उत्तम. २ लय, नाश. ३ सत्य वस्तूची परीक्षा. ४ ऐक्यत्वानें. ५ नाशवंत. ६ माया ७ भिन्न. ८ निश्चयें करून. ९ जसा आहे तसा.

सर्वथा ॥ मन बाधकता न पावेच कीं ॥ १४ ॥ जैसें रज्जुच्याठांईं सर्पादिक ॥ शुक्तिकेसीं रजत सम्यक् ॥ वस्तु-
ज्ञानें बाधे सकळिक ॥ वस्तु देख वस्तुत्वें प्रकाशे ॥१५॥ ऐसें लक्षणीं अलंकृत ॥ तेंचि ज्ञान जाण गा निश्चित॥
सम्यग्वेक्षण तें इत्थंभूत ॥ जाण निर्भ्रांत रघुराया॥१६॥जो अनात्मा अविवेक ॥ दोन्ही सत्यत्वें भासे येक ॥
तेंचि तें अज्ञान जाण सम्यक् ॥ याचा विवेक तेंचि ज्ञान ॥ १७ ॥ अगा या मनाच्याठांईं ॥ चिदाभास बिंबला
पाहीं ॥ तोचि प्रमाता जीव येहीं ॥ शब्दीं सर्वांहि जाणिजे ॥१८ ॥ त्या चिदाभासें मनपण आलें ॥ चिदाभा-
सा प्रकाश मन झालें ॥ चिदाभासेंचि भासविलें ॥ आपण गोंविलें चिदैक्यपणें ॥ १९ ॥ आत्मा अजड स्व-
प्रकाश ॥ मन अनात्मा अचित्तांश ॥ ययाचा विवेक जो सावकाश ॥ ज्ञान यास ह्मणताती ॥ ५२० ॥ जैसी दे-
हाच्याठांईं आत्मबुद्धी ॥ अतिसदृढ बैसली अनादी ॥ उपाय करितां सहस्रावधी ॥ नसांडी कधीं कांहीं केलि-
या ॥२१ ॥ तें स्मरतां न स्मरतां लागलें असे ॥ कांहीं केलिया ही ननासे ॥ तैसेंच आत्मस्वरूपीं दृढ बैसे ॥
तेंचि सर्वांशें ज्ञान जाण ॥ २२ ॥ तो जरी इछिना मुक्तता ॥ तरि तो मुक्तचि जाण तत्वतां ॥ जयाची आत्मत्वीं
आत्मता ॥ बुद्धी तत्वतां पावे बरी ॥२३॥ श्लोकवार्तिक ॥ देहात्मज्ञानवज्ज्ञानंदेहात्मज्ञानबाधकं ॥ आत्मन्येव
भवेद्यस्यसनेच्छन्नपिमुच्यते ॥ ११ ॥ टीका ॥ अगा देहीं मीच आत्मत्वें जें ज्ञान ॥ दृढ बैसलें जें पुरातन ॥
तैसेंच आत्मयाच्याठांईं पूर्ण ॥ दृढ जाण बैसिजे ॥ २४ ॥ आत्मयाच्याठांईं आत्मपण ॥ दृढ बाणतांचि गा सं-

१ शिंपीसीं. २ रूपें. ३ सत्यवस्तूची परिक्षा. ४ निश्चित. ५ ज्ञानाभास. ६ जुनाटपुरुष. ७ गुंतविलें. ८ चित्तविरहित. ९ फारजुनाट.


पूर्ण ॥ देहात्मज्ञान बाधे जाण ॥ न इछितां खुण पावे मोक्ष ॥ २५॥ ऐसें जें कां आत्मज्ञान ॥ याचें नाम सम्यग्वेक्षण ॥ येणें होय मनोनाशन ॥ भस्म पूर्ण सर्व संसाराचें ॥२६॥ परि जैसें ज्ञानें होय मनोनाशन ॥ तैसें नव्हे योगेंकरून ॥ जोंवरी वृत्तिचें कीजे रोधन ॥ तोंवरी मन मूर्छित होय॥२७॥जेव्हां चित्तवृत्तीचा निरोध नाहीं ॥ तेव्हां जैसें तैसेंचि मन पाहीं ॥ मन सावध असतां जगही ॥ आहे सर्वहि जैसें तैसें॥२८॥आणि सुखदुःखादि जे भोग॥जे तया होणार सांग ॥ ते तंव होती गा अव्यंग ॥ प्रारब्ध अभंग ह्मणोनियां॥२९॥जेव्हां फळ द्यावया उद्यंत ॥ पूर्व कर्म होय प्राप्त ॥ तेव्हां समाधी व्युत्थान होत ॥ मन भोगीत सुखदुःखें॥५३०॥ अगा ईषंत हि जें सुखदुःख ॥ सुषुप्ति आदिकरून देख ॥ तें पूर्वकर्मोचि होय सकळिक ॥ थोर कौतुक प्रारब्धाचें॥३१॥यालागीं बाधु सर्व प्रपंचाचा ॥ज्ञानेंकरुनियां साच झाला जयाचा ॥तयासी भोगहि सुखदुःखाचा॥बाध झाला साचा निर्धारेसीं॥३२॥ज्याचा देहादि प्रपंच बाधला ॥ तया सुखदुःखादि भोग सत्यत्वें उरला ॥ नाहीं कोठेंहि देखिला ॥मिथ्या झाला बाधलेपणें ॥ ॥३३॥ हा उपाय मनोनाशाप्रती ॥ सर्वथा करावा गा महामती ॥ प्रज्ञा मांद्य असलिया सर्वार्थी॥ तेणें निरोध चित्तवृत्ती करावी॥३४॥ अगा बुद्धीचें मंदपण असतां ॥ ज्ञान प्रतिबिंबेना सर्वथा ॥ महावाक्याचिया अर्थी ॥ अशुद्धा चित्ता प्रवेशु नाहीं ॥३५॥ परि गुरूमुखें अर्थपूर्वक ॥ वाक्यार्थ बाणे सम्यक ॥यासी तीक्ष्ण बुद्धी अधिक ॥ पाहिजे सम्यक रघुराया ॥ ३६ ॥ अगा प्रज्ञा अतितीक्ष्ण असतां ॥ वाक्यार्थ प्रतिबिंबे गा सर्वथा ॥गुरूमुखेंहूनि उदेजंतां ॥

१ सत्यवस्तूची परिक्षा. २ प्रतिबंध. ३ दोषरहित. ४ तयार. ५ विसर्जन. ६ किंचित. ७ बुद्धि. ८ मंदपणा. ९ उदयपावतां

प्राम्यर्थी पाविजेचि कीं ॥ ३७ ॥ तेंचि प्रज्ञेसी मंदपण असतां ॥ वाक्य न प्रतिबिंबे सर्वथा ॥ तेणें योग करावा गा
ताता ॥ वृत्तिरोधितां मनाची ॥३८॥ ज्ञानें चित्तवृत्ती निरोध करणें ॥ हेंचि निदिध्यासन जाणणें॥ येणें विपरीत भा
वना ततक्षणें ॥ नासे सत्राणें रघुपुंगवा ॥३९॥ योगाउपारि वाक्यार्थ बोधितां ॥ गुरूसीं प्रयास नलगे सर्वथा ॥ नि-
दिध्यासनहि न करितां ॥ प्राप्ती तत्वतां परब्रह्माची ॥५४०॥ जरी पूर्वींच झालें आहे ज्ञान ॥ परि वासना उद्भवति-
पूर्व संस्कारेंकरून ॥ यालागींहि योगसाधन ॥ करावें जाण सीताकांता ॥ ४१ ॥ तेणें मनोनाश वासनाक्षय ॥ झा-
लिया सुख अप्रमेय ॥ प्राप्तहोय नि रामय ॥ यालागीं उपाय दोन्ही करावे॥४२॥यामाजी जो तुज आवडेल ॥ तोचि
उपाय कीजे प्रांजळ ॥ तेणेंचि मनोनाश होईल ॥ सुख पावसील निरतिशय ॥ ४३ ॥ यया दोहीं उपायें करुनी ॥ म-
नोनाश करावा कोदंडपाणी॥मनोनाशें सुख त्रिभुवनीं॥जनीं वनीं कोंदतसे॥४४॥जेथें जन विजन नाहींत दोन्ही॥
सुखचि सुखत्वें राहे कोंदोनी॥सुखावांचुनी त्रिभुवनीं ॥नाहीं निर्वाणीं दुजें कांहीं॥४५॥सद्गुरूचा ह्मणें रंगनाथु॥ स-
र्वभावें सेऊनि येकांतु॥ मनोनाश करावा हा फलितार्थु॥साधावा स्वार्थु आलस्यत्यागें॥४६॥पुढें वासनाक्षय प्रक-
रण॥श्रोतीं ऐकावें सावधान॥सद्गुरू करिती निरूपण॥निमित्त जाण मज करुनी ॥४७॥ हें मनोनाश प्रकरण ॥ येथें
झालें असे संपूर्ण॥य याचें अर्थ मनन करून॥हेंचि साधन साधावें॥४८॥सद्गुरूचरण युगुल॥तेथें सुखपराग अतिनि
र्मळ ॥ सेवी रंगनाथ होऊनि अळिउळ ॥ सुखकल्लोळ भोगितु ॥५४९॥॥ इतिश्रीयोगवासिष्ठसारेश्रीवसिष्ठरामसं-
वादेमनोलयप्रकरणंनामतृतीयंसमाप्तं ॥३॥ ओवि॥५४९॥मूळ ॥२६॥ संमति॥ ११॥श्रुति॥२॥एवंसंख्या॥५८८॥

॥ इति श्रीयोगवासिष्ठसारे तृतीय मनोलय प्रकरणंसमाप्तः ॥

॥ अथ श्रीयोगवासिष्ठसारे चतुर्थवासनोपशमनप्रकरणप्रारंभः ॥



श्रीगणेशायनमः ॥ ॥ श्रीनीलकंठगुरवेनमः ॥ ॥ जयजय श्रीगुरुमूर्ति ॥ अव्यक्तांचि मत्कृपा आलासि व्यंक्ती ॥
हेंही ह्मणणें माझि भ्रांती ॥ आनंदमूर्ति अविकार तूं ॥ १ ॥ अहो पुत्राचेनि झालेपणें ॥ मातेसीं जैसें माता हो-
णें॥तैसें माझेनि झालेपणें ॥ जननीपणें शोभसी तूं ॥ २ ॥ परी तूं जननी येकुलती ॥ मज येका अपत्यांतें प्रस-
वती ॥ स्नेहें येका वरँद झालिसी मूर्ति ॥ ह्मणोनि येकुलती येकपणें ॥ ३ ॥ अनेक शिष्यपणें बहु जनिता ॥ परि
सकळ कृपेची ऐक्यता ॥ मज सेमरसली ह्मणोनि तूं माता ॥ होसी तत्वतां येकुलती ॥ ४ ॥ ह्मणोनि तूं येकुल-
ती माउली ॥ संसारभ्रांताचि साउली ॥ तुझी कृपाचि मज प्रसवली ॥ माउली झाली अतिस्नेहें ॥ ५ ॥ परि
तुवां येक नवल केलें ॥ विवेकास्त्रें वासनानाळ खंडिलें ॥ उपजोनि पोटींच सामांवलें ॥ वाढविलें उदरामाजी॥
॥ ६ ॥ परि इतरा माउली सारिखें ॥ बाहेर घालूनियां बाळकें॥ वेगळेपणें पाळिती हरिखें ॥ द्वैतसुखें अतिदूर-
स्थ ॥ ७ ॥ जगदुदर तुझें विशाळ ॥ सांठविसी अनेक शिष्यबाळ ॥ परि मजवरि अतिस्नेहकल्लोंळ ॥ तेणें वे-
ल्हाळ तूं येकुलती ॥ ८ ॥ कृपाळुपणें तूं जननी ॥ मजलागीं उदरीं सामाउनी ॥ वाढविसी अतिस्नेहें करुनी ॥
वाक्यस्तनीं लाऊनियां ॥ ९ ॥ तेंचि तुझें गोड स्तन्यामृत ॥ पीऊनियां मी धालों बोधित ॥ तेणें बोधेंचि असें
डुल्लत ॥ नसे मात त्रिभुवनीं ॥ १० ॥ बाळसपण बाणलें ब्रह्मत्वाचें ॥ तेणें मी पढियंतें संतसज्जनांचें ॥ लडिवा-
ळ बोलकें तुझे प्रीतिचें ॥ ह्मणोनि संतांचें मन निवे ॥ ११ ॥ जैसें समर्थांचें आणि लडिवाळ ॥ सुंदर बोलकें वे-

---

१ निराकार. २ उदयास. ३ बाळकातें. ४ वर देणारी. ५ मिळूनगेली. ६ ऐक्यत्वपावलें. ७ स्नेहाचे तरंग. ८ प्रियकर. ९ समाधान पावलों. १० धावडतें.

ल्हाळ ॥ तें सकळांजनां होय प्रेमळ ॥ वेधी सकळ गुणीं लोकां ॥१२॥ तैसा मीहि तुझा लडिवाळ ॥ आणि स्नेहाचें येक वेलांउळ ॥ अपरोक्षज्ञानें परिपूर्ण सकळ ॥ अतिवेल्हाळ बाळसेनी ॥ १३ ॥ ब्रह्मपणाचेनि बाळसें ॥ सर्वांगीं सुंदर बाणलें असे ॥ परि बोधाचीं फुडलीं बाहुवसें ॥ अतिलाडिसें लडिवाळ ॥ १४ ॥ ब्रह्मवर्चस्वाचें गोरेपण ॥ आंगीं बाणलें सुंदर जाण ॥ अमानित्वादि ज्ञानलक्षण ॥ अलंकारभूषणें भूषित ॥ १५ ॥ याहिवरी ज्ञानशब्दें शब्दित ॥ तुवां बोलविले बोल बोलत ॥ तेणें संतांचें मन अविकृत ॥ प्रेमयुक्त डुल्लती ॥१६॥ त्यावरी त्रिभुवनीं तूं समर्थ थोर ॥ जगाचा नियंता सर्वेश्वर ॥ त्या तुझें बाळक सकुमार ॥ अतिधीर ते लाडविती ॥१७॥ सकळ स्नेहाचा येकवळा॥करूनि लाडविती वेल्हाळा ॥ वांकुडयाहि बोबडया बोला ॥ आनंद संतांला सर्वांपरी ॥ १८ ॥ असो तुझेनि बाळपणें मज ॥ प्राप्त झालें तुझें गुह्यगुज ॥ यालागीं जें जें बोले तें तत्व सहज ॥ फावे निजगुज ब्रह्मानंद ॥ १९ ॥ असो तुझें आपत्य मी येणें गुणें ॥ कांहीं मज नव्हेचि उणें ॥ सर्वत्र वर्ते संपूर्णपणें ॥ तुझेनिगुणें गुणवंत ॥ २० ॥ जैसें पितयाचें गुप्त धन ॥ तें आरुष जैसा पावे आपण ॥ तैसें तुझें गोप्यधन जें ज्ञान ॥ प्राप्त संपूर्ण तुझेनी॥ २१ ॥ आतां येकी विनंती माहेरा ॥ रिघोनि मद्राचेचा वोंवरा॥ प्रवर्तवीं ग्रंथविस्तारा ॥ आनंदसागरामाजि पोहवीं ॥ २२ ॥ तुझेंचि वैभव बोलावया ॥ वाणी विस्तारली सद्गुरूराया ॥ ग्रंथनिर्माणीं चातुर्या ॥ वासनाक्षया वदवीं मज ॥ २३ ॥ ऐसी ऐकोनि विनवणी ॥ प्रसन्न जाली

१ घर. २ आत्मज्ञानानें. ३ हात. ४ मानरहित. ५ बाळक. ६ वेडा. ७ गुप्त. ८ मायबापा. ९ खोलींत.

सद्गुरूजननी ॥ मस्तकीं अभयकर ठेऊनी ॥ ह्मणे ग्रंथनिर्माणीं प्रवर्तें आतां ॥ २४ ॥ ऐसें आज्ञालक्षण वचनामृत ॥ परम भाग्यें झालें प्राप्त ॥ तेणें आनंदें टीका करित ॥ जे कीं श्लोकार्थ यथामती ॥ २५ ॥ तया ग्रंथाचें अनुसंधान ॥ एकोत श्रोते सावधान ॥ मनोनाशावरी प्रकरण ॥ उठिलें कोण तें सांगो ॥ २६ ॥ मनोनाश वासनोपशमन ॥ ज्याचें होय तो जीवन्मुक्त जाण ॥ हेंचि करावया निरूपण ॥ मनोनाशन सांगीतलें ॥ ॥ २७ ॥ आतां वासनेचा क्षय पूर्ण ॥ व्हावया वासनाक्षय प्रकरण ॥ प्रारंभिलें अतिगहन ॥ श्रोतीं सावधान परिसावें ॥ २८ ॥ तेंचि निरूपण पैं आतां ॥ करिजेल अतिसावधानता ॥ सद्गुरूचरण स्मरतां ॥ ग्रंथ ऐकतां स्वतःसिद्ध ॥ २९ ॥ तरी आत्मानात्मविचारावेगळें ॥ कोणीच साधनफळीं नफळे ॥ यालागीं आत्मरूप निराळें ॥ अनात्म्यावेगळें निवाडिजे ॥ ३० ॥ तरी सर्वदां करितां आत्मविचार ॥ आत्मत्वीं होय दृढ निर्धार ॥ मग अनात्मविचार तितुका निःसार ॥ होय प्रकार फल्गु जैसा ॥ ३१ ॥ यालागीं वसिष्ठ ज्ञानियांचा रावो ॥ आधीं प्रबोधी आत्मविचाराचा भावो ॥ श्रोता ऐके देवाधिदेवो ॥ अयोध्येचा रावो श्रीराम ॥ ३२ ॥ श्लोक ॥ रामस्वात्मविचारोयंकोहंस्यामितिरूपकः ॥ चित्तदुर्द्रुमबीजस्यदहनेदहनःस्मृतः॥ १ ॥ टीका ॥ तरी ऐकें गा रघुकूळटिळका ॥ चित्सदानंद परब्रह्मव्यापका ॥ निर्गुणा निर्विकारा विश्वात्मका ॥ निर्विशेषा निरंजना ॥३३॥ जें कीं व्यापक चैतन्य निरंजन ॥ तो तूं ह्मणविसी दशरथनंदन ॥ करिसी प्रपंचाचें विडंबन ॥ भक्तजन ताराव-

१ लक्ष. २ खोटा. ३ फोलकट. ४ राजा. ५ जाग्रतकरी. ६ विध्वंसन, विटंबना.

या ॥ ३४ ॥ तयालागीं हें प्रश्नोत्तर ॥ करूनि करिसी जगदोद्धार ॥ तरी ऐकें आधीं आत्मविचार ॥ वासनासंहार जेणें होय ॥ ३५ ॥ तरी मुख्य आत्मविचार तो कैसा ॥ तरी देहीं आपण तो कोण ऐसा ॥ स्थूळ लिंग कारण देहाचा ठसा ॥ तो तो सहसा मी नव्हे ॥३६ ॥ तैसेचि अस्थि मज्जा मांस सप्त धातु ॥ त्या मी नव्हे सर्वातीतु ॥ सकळ मज दृश्य मी सर्वां अतीतु ॥ व्यतिरिक्त अवस्थात्रयीं ॥ ३७ ॥ इंद्रियें नव्हे मी इंद्रियां चाळकु ॥ बुध्यादि अहंकाराचा प्रकाशकु ॥ तो मी कोण ऐसा जो विवेकु ॥ तोचि येकु आत्मविचारु ॥ ३८ ॥ हाचि विचारू जो किं एवंभूत ॥ तो चित्तदुर्द्रुमबीजाचा अंत ॥ दुष्ट चित्तद्रुमाचें बीजभूत ॥ तें अज्ञान निश्चित मेघश्यामा ॥ ३९ ॥ तया अज्ञानाचा दहनकर्ता ॥ आत्मानात्म विचार गा ताता ॥ जाळूनि नेतसे भस्मांता॥ तेथें अविद्यात्मकाचि कैंचा ठावो॥४०॥मूळ छेदिलिया कैंचा तरु॥कारण नाहीं तेथें कैंचा कार्यविचारू॥सूर्यास्तव मृगजळपुरु ॥ प्रतिबिंबाकारु बिंबिन्नला ॥४१ ॥ यालागीं मन वासनादि यांचें ॥ मूळ अज्ञानचि जाण गा सांचें ॥ सर्व देहादि प्रपंचाचें ॥ अज्ञान याचें मूळभूत ॥४२ ॥ तेंचि मूळ छेदिल्या आत्मविचारें ॥ कैंचा वासनादि संसार थारे ॥ मन मुळासहित विरे ॥ आनंदें भरे ब्रह्मांड हें ॥ ४३ ॥श्लोक ॥ विचारदर्पणेलग्नांधियंधैर्यधुरंगतां ॥ आधयोनविलुंपंतिवाताश्चित्रलताइव ॥ २ ॥ टीका ॥ अगा विचारदर्पणाच्याठाईं ॥ धैर्येंसि बुद्धि जडालिया पाहीं ॥ अतिसदृढतर जैसी कांहीं ॥ अढळ पाहिं सर्वस्वें॥४४ ॥ धैर्य सात्यादिकांचे समृद्धि ॥ विचारीं स्थिरा-

१ धातुविशेष. २ निराळा. ३ कुकल्पनारूपी वृक्ष. ४ अज्ञानाचा, मायेचा. ५ वृक्ष. ६ खरोखर. ७ विपुलता.

ता पावली बुद्धी॥तेथें उठलियाहि थोरा आधि ॥ नलोटे बुद्धी तयाचेनि ॥४५॥ दर्पणीं जें रूप बिंबलें ॥तें दर्प-
णेसींच जडलें ॥ तें हस्तें काढितांहि बळें ॥ परि तें नढळे सर्वथा ॥ ४६ ॥ तैसीच विचारदर्पणीं ॥ बुद्धी जडल्या
गा कोदंडपाणी ॥ ते नकाढवे आधिचेनि ॥ हे खुण मनीं जाण तूं ॥ ४७ ॥ आधि ह्मणिजे ज्या मानसिकी व्य-
था ॥ चित्तरूपें ज्या परिणमता ॥ त्याचि वासना जाण तत्वतां ॥ पर्याय कथा इत्यादिक ॥ ४८ ॥ नाना संक-
ल्प जे मनोरथ॥चित्त करी सर्वदां विषयार्थ॥कांहीं करितांहि नव्हे तृप्त॥अखंड तप्त वणवणपणें॥४९॥स्वस्वरू-
पावेगळें राहतां ॥ मन स्थीर नराहे गा सर्वथा ॥ वणवण करी विषयार्थी॥ त्याचि तत्वतां आधी जाण ॥५०॥
त्या आधि उठितांहि चित्तस्वभावें ॥ परी विचारस्थ बुद्धि न अभिभवे ॥ विचारचित्रीं लिहिली ते नकाढवे ॥
कांहीं नकरवे तियेचें ॥ ५१ ॥ ते ज्ञानरूप होऊनि दृढावली ॥ तियेसीं आधिवायो लागतां महाबळी ॥ परि
ईषंत नढळे प्रयत्नमेळीं ॥ जैसी चित्रवल्ली वातोर्मियां ॥ ५२ ॥ वातोर्मि उठिलिया अनेका ॥ तरी चित्रींची न-
ढळे वल्लिका ॥ तैसी बुद्धी आरोपिली विवेका ॥ आधिवातझुळुका नलोटे कीं ॥ ५३ ॥ नाना पाषाण कोरूनि
अक्षरें ॥ लिहिलीं तीं पुसिजेति नीरें ॥ तरी आधी करूनि निर्धारें ॥ बुद्धि विरे विचारस्थ ॥ ५४ ॥ यालागीं
सर्वथा ऐसेंचि करावें ॥ विचारसमुद्रीं बुद्धिसीं बुडवावें ॥ ते कदापि आधीनें न अभिभवे॥ सुखें सुखावे ब्रह्मानं-
दें॥५५॥अगा नाना॥विचारवन्हिच्या ठाईं ॥ आधितृण नुगवेचि पाहीं ॥ विचाराग्नि भस्म करी उगवल्याही ॥

१ मनोव्यथा. २ परिणामपावणाऱ्या. ३ नामान्तर, पद्धत. ४ पराभव पावत नाहीं. ५ किंचित्. ६ वायुच्या लहरी. ७वेल.८ पाण्यानें.९ विच्याररूपी अग्निच्याठायीं

अलोट[1] ठाईं धिषणा[2] असे ॥ ५६ ॥ श्लोक ॥ विचारोध्यात्मविद्यानांज्ञानंतत्वविदोविदुः ॥ ज्ञेयंतस्यांतरेचास्ति-
माधुर्यंपयसोयथा ॥ ३ ॥ टीका ॥ अगा अध्यात्मविद्येचा रावो ॥ हा आत्मविचार जाण महाबाहो ॥ अध्या-
त्मविद्येचा अभिप्रावो ॥ हाचि निर्वाहो[3] नाना विद्या ॥ ५७ ॥ आत्मयातें आधीं करूनि वर्तती ॥ जे कीं जाणणें
याची संपत्ती ॥ जें जें ज्ञान ते विद्या सर्वार्थीं ॥ शास्त्रविंत्पत्ति[4] वेदाध्ययन ॥ ५८ ॥ ज्या ज्या विद्या अतिकुश-
ळा ॥ जेहिं आणिजे पदार्थमेळा ॥ ज्ञान जितुकें तितुकी चित्कळा[5] ॥ विद्या या बोला रूप झालें ॥ ५९ ॥ त्या
सर्वां विद्यांचा मुगुटमणी॥ हा आत्मविचार जाण कोदंडपाणी ॥ हेंचि मुख्य ज्ञान गा भर्वसेनी ॥ जाणती स-
ज्ञानी जे तत्ववेत्ते ॥ ६० ॥ अथवा आत्मविद्याविचार ॥ करणें जो तात्पर्य निर्धार ॥ त्यातेंचि ज्ञान ह्मणती च-
तुर ॥ अतिधीर ब्रह्मवेत्ते जे ॥ ६१ ॥ तया ज्ञानाच्या जाण पोटीं ॥ ज्ञेय सांपडे गा उठाउठी॥ जेथें ज्ञान तेथें ज्ञे-
येसीं भेटी ॥ ज्ञानाच्या पोटीं ज्ञेय वसे ॥ ६२ ॥ ज्ञेय शब्दें ब्रह्म केवळ ॥ जेथें नाहीं विशिष्टादि[6] मळ ॥ चिदा-
नंद निष्कळ निर्मळ ॥ अचळ अढळ परिपूर्ण जें ॥ ६३ ॥ ऐसें जें हें ज्ञेय जाण ॥ तें ज्ञानाच्या पोटीं वसे संपूर्ण
जैसें रसीं गौल्यँपण[7] ॥ माधुर्य जाण मधुसीं ॥ ६४ ॥ किंवा गुळाच्याठाईं गोडी ॥ लवणीं क्षारता असे फुडी[8] ॥
शब्दाच्या पोटीं अर्थपरवडी[9] ॥ अनुभवगोडी गुरूचरणीं॥६५॥जैसा काष्ठाच्या पोटीं ॥ वंन्हि[10] सर्वत्र जगजेठी ॥
पट तंतूच्या पोटीं ॥ मृत्तिका घटीं सगर्भ जैसी ॥ ६६ ॥ तैसें जरी आत्मज्ञान ॥ तदंतर्वर्ति[11] ज्ञेय जाण ॥ ऐसें अ-

---

१ फार मोठी. २ बुद्धि. ३ निवाडा. ४ शास्त्रपठण. ५ जीव कळा. ६ मायादि. ७ मधुरपणा, गोडी. ८ खरी. ९ प्रकार, चातुर्य. १० अग्नि ११त्याच्या आंत.

नुभवसिद्ध आणि सज्ञान ॥ विचारें पूर्ण बोलती ॥ ६७ ॥ श्लोक ॥ विचारेणपरिज्ञातस्वभावस्योदितात्मनः ॥ अनुकंप्याभवंतीहब्रह्मविष्णुशिवादयः ॥ ४ ॥ टीका ॥ ऐसिया आत्मविचारेंकरून ॥ ज्ञेयचि पावे सर्वस्वें जाण ॥ तेथें कैंचें वासनाशमन ॥ नकरितां क्षीण स्वयें होती ॥ ६८ ॥ यालागीं हाचि विचार दृढ करून ॥ साक्षात केलें स्वरूप पूर्ण ॥ जें कीं स्वप्रकाश चैतन्यघन ॥ उदित पूर्ण पूर्णत्वें ॥ ६९ ॥ जाण ऐसिया पुरुषासीं ॥ अनुकंप्य सकळ जीवराशी ॥ किंबहुना ब्रह्मादिकांसीं ॥ विष्णु शंकरासीं अनुकंपावें ॥ ७० ॥ ब्रह्मादिकांसी तेणें पुरुषें ॥ अनुग्रह करावा गा विश्वेशें ॥ तो परब्रह्मचि सगुण वेशें ॥ निर्विशेषें नांदत ॥ ७१ ॥ हें तंव प्रसिद्धचि असे ॥ निर्गुण ब्रह्मादिकांतें अनुग्रहीजेतअसे ॥ तेणें सृष्ट्यादि कार्यविशेषें ॥ सामर्थ्य वसे त्याच्याठाईं ॥ ७२ ॥ नाहो येकें विचारेंचि करुनी ॥ ब्रह्मचि झाला निर्वाणीं ॥ विश्व सत्यत्वें भासतां काहाणी ॥ प्राप्ति ब्रह्मत्वाची कैंची ॥ ७३ ॥ तरी ऐका याचें उत्तर ॥ जें जें सांगिजेल सपरिकर ॥ ज्ञानाचें सामर्थ्य महाथोर ॥ यथार्थ प्रकार तोचि भासवी ॥ ७४ ॥ विश्व आरोपीतपणें बाधीत होय ॥ तें भासतांहि मृगजळतुल्य पाहे ॥ येऱ्हवीं वास्तव्य पाहतां कैंचें काय ॥ विश्वाची सोय तेही नाहीं ॥ ७५ ॥ अगा हें अज्ञान जों वरी असे ॥ तंवचि विश्व साचासारिखें भासे ॥ तें अज्ञान अपरोक्षज्ञानें नासे ॥ मग सत्य तेंचि असे परब्रह्म जें कां ॥ ॥ ७६ ॥ यालागीं सत्य तें सत्यचि भासे ॥ नाथिला विश्वाभास तो भ्रंशे ॥ मग ब्रह्मसाक्षात्कारचि असे ॥ विचार

१ दयाकरून. २ भेदरहित. ३ सविस्तर. ४ आत्मज्ञानानें. ५ लटिका.

अशेष करूनि ॥ ७७ ॥ ह्मणोनि तो परब्रह्म झाला ॥ तेणें अनुग्रहही सकळां केला ॥ ऐसियासीं कैंचा वासना-मेळा ॥ तो असे निराळा सर्वातीत॥७८॥अगा हें विश्व साच भासावें ॥ तरीच वासनेनें उद्भवावें ॥ तरी विश्व हें आत्मविचारें आघवें ॥ बाधे स्वभावें रघुपुंगवा ॥ ७९ ॥ मग लटिकीयाच्याठाईं ॥ वासना उपजोनि करि-ती काई ॥ उपजल्याही नासती सर्वही ॥ निर्धनाचे पाहिं मनोरथ जेवीं ॥ ८० ॥ किंवा बाळकाचे व्यवसाय सर्व ॥ कीं गंधर्वनगरींचे हुंडे सांवेव ॥ कीं इंद्रजाळाचें गौरव ॥ नासे सर्व उपजलेंही ॥ ८१ ॥ तैसें बाधिता-च्याठाईं ॥ वासना न उपजती जाण कांहीं॥उपजल्याहि त्या अनपाईं ॥ नाश सर्वही पावती ॥८२॥ यालागीं गा रघुपती ॥ आत्मविचारचि करावा सर्वार्थीं ॥ विचारें नभासे विश्वभ्रांति ॥ सद्भावें शांती वासनेचि॥८३ ॥ तोचि आत्मविचारु कैसा ॥ तरी पूर्वींच सांगीतला विशेशा ॥ प्रस्तुत मागुताहि परियेसा ॥ विश्वविलासा वि-श्वंभरा॥८४॥श्लोक ॥किमिदंविश्वमखिलंकिंस्यादहमितिस्वयं॥विचारनिरंतरस्यैतदसदेवभवेज्जगत् ॥५॥टीका॥ तरी तोचि विचार गा येथ ॥ ह्मणें हें चराचर कोणाचें प्रस्तुत ॥ याचें स्वरूप कायपां यथार्थ ॥ यातें देखता तो मी कोण ॥ ८५ ॥ यया सकळ विश्वातें जाणत ॥ त्यामाझें स्वरूप काय यथार्थ ॥ हें विचारें पाहतां सत्य-भूत ॥ तेंचि यथार्थ आत्मरूप ॥ ८६ ॥ ह्मणे जो पंचमहाभूतांचा पसारा ॥ तो मी माझेनि नव्हे खरा ॥ वि-चारितांहि विवेकें बरा॥ नराहे पुरा कोणी अर्थ॥८७॥ इंद्रियें ह्मणों मनादिक ॥ तरि तीं प्रत्यक्ष भासती सक-

१ संपूर्ण. २ दरिद्याचे. ३ किल्ले. ४ अवयवांसहित. ५ मंत्रविद्या. ६ निर्जीव, फोलकट.

ळिक ॥ जें जें दृश्य तें मिथ्या सम्यंक ॥ भासे परांक ह्मणोनियां ॥ ८८ ॥ जे जे बाह्य पदार्थ भासती ॥ ते ते पराक जाणिजेती ॥ पराक ते नश्वर सर्वार्थीं ॥ दिसे व्यंक्ति स्थूळ ह्मणोनि ॥ ८९ ॥ तैसेचि अहंकारादि पदार्थ ॥ ते ते आपणासीं पृथक् भासत ॥ जें भासे तें सर्व दृश्यजात ॥ मिथ्याभूत जाण तूं ॥९०॥ आतां यया सर्वांविगळें ॥ आपण येथें कोणपां निराळें ॥ ऐसें विचारितांहि नकळे ॥ सद्गुरु मिळे तंववरी ॥९१ ॥ सद्गुरूचे कृपाप्रकाशभरें ॥ नासोनि जाय संसारआंधारें ॥ आपणा आपण सर्वप्रकारें ॥ भेटि निर्धारें तत्काळ॥ ९२ ॥ त्याही विचाराचें कारण ॥ तुजप्रती कांहीं सांगेन ॥ तें सांगतांचि जाणसी आपण ॥ हेचि खुण ऐकपां ॥ ९३ ॥ तरी जो देहेंद्रिय समुदाय असे ॥ तयातें पुरुष ऐसें बोलिजेतसे ॥ तो कोणाचे तेजें वर्तत असे॥जाण कैसें कोणेंकरुनी ॥ ९४ ॥ सर्व कर्म करी कर्तव्य जें जें ॥ तें सांगपां कोणाचेनि तेजें ॥सर्वेंद्रिय व्यापार निपजे ॥ कवणा सुजे विचारु सर्व ॥ ९५ ॥ येरु ह्मणें मी सांगेन ॥ सर्व प्रकाश सूर्येंकरून ॥ ऐक एकाग्र करूनि मन ॥ सूक्ष्म गहन हा विचारु असे ॥ ९६ ॥ इये विचारीं जयाचें मन ॥ प्रवर्तेल सावधान अतितीक्ष्ण ॥ तयासींच होय आत्मदर्शन ॥ भेटे आपण आपणयापैं ॥ ९७ ॥ तरी ऐक हें बोलिलासे यथार्थ ॥ सूर्यतेजें प्रकाशे समस्त ॥ मग पुरुष सर्व कर्मीं वर्तत ॥ हे प्रतीत सर्वांसी ॥९८ ॥ परि सूर्य अस्तवलियावरी ॥ पुरुष वर्ते हा कवणपरी ॥ येरु ह्मणे चंद्र प्रकाश करी ॥ रहाटी पुरी सर्वेंद्रियांची ॥ ९९ ॥ हेंही होय यथार्थ वचन ॥ परि चंद्रास्तेंहि प्र-

---

१ खरोखर. २ परकी, दुसरा. ३ आकार. ४ निश्चयेंकरून. ५ समजतो. ६ वागणूक.

काशि कवण ॥ उडुगणा सौदामिनी जाण ॥ कारिती भान सर्व कर्मी ॥ १०० ॥ हेंहि नसतां कवण प्रकाशी ॥
कोणें पुरुष वर्ते कर्मासीं ॥ येरु ह्मणे अनळें सर्वांसी ॥ पदार्थजातासि प्रकाशिजे ॥१ ॥ दीप दिविया इत्यादि
प्रकारें ॥ हव्यवाट तेज आविष्करे ॥ तेणें प्रकाशु प्रचुरे ॥ पुरुष व्यवहारे सर्व कर्मीं ॥ २ ॥ तोहि नसतां को-
णें जाणिजे ॥ हें आतां निश्चयेसिं बोलिजे ॥ येरु ह्मणे शब्दें प्रकाशिजे ॥ आंधारीं सुजे शब्दें सकळ ॥ ३ ॥ श-
ब्दहि नसतां कवण प्रकाशी ॥ हेंही सांगपां गुणराशी ॥ येरु ह्मणें मन सर्वां प्रकाशी॥ जाणणें त्यासीं सर्व प्र-
पंचजात ॥ ४ ॥ मनेंचि स्थूळ सूक्ष्म जाणिजे ॥ मनोंचि सर्वहि कल्पिजे॥मनेंचि व्यवहार घेंपे दिजे॥ मनेंचि बुं-
झे अंतर्बाह्य॥५॥तरि तेंहि मन स्वप्नाकार॥परिणमलें जेव्हां सविस्तर ॥ तेव्हां देखे स्वप्नव्यवहार॥सांग साचार
कवणें तेजें॥६॥मन आणि बुद्धी स्वप्नाकारें ॥पदार्थरूपेंचि आविष्करे॥तेथें देखावया मनाहि नुरे॥ सांगपां खरें
प्रकाशक॥७॥जीं जीं जाणावयाचीं कारणें॥तींहि स्वप्नीं झालीं लीनें॥तरी कवणे स्वप्नीं प्रकाशवणें॥ सांग ये-
खुणे विचारूनि ॥ ८ ॥ नाना प्रमांता स्वप्नीं देखत ॥ हें बोलतांचि होय अनर्थ ॥ मनोपाधि तो असे बिंबत ॥
मनातें वर्तत आभासोनि ॥ ९ ॥ उपाधि गेलिया प्रतिबिंब कैंचें ॥ घटजळ नासल्या सूर्यादिकांचें ॥ प्रतिबिंब
उमटे कोणाचें ॥ उपाधि साची असेचिना ॥११० ॥ जंववरी घटीं जळ असे ॥ तंवचि प्रतिबिंबहि प्रकाशे ॥
जळनाशें तेंहि नासे ॥ प्रत्यक्ष असे सर्वांजना ॥ ११ ॥ अगा आदर्शें परौतां नेलिया ॥ ठावो कैंचा प्रति-

१ नक्षत्रें. २ वीज. ३ अग्नीनें. ४ यज्ञादिकक्रिया. ५ प्रकटे, पसरे. ६ पुष्कळ. ७ घेतो. ८ समजतें. ९ बदललें. १० प्रमाणपाहाणारा पुरुष. ११ आरसा. १२ पलिकडे.

बिंब दिसावया ॥ उपाधिनाशें नाश तया ॥ जनां यया प्रत्यक्ष सिद्ध ॥ १२ ॥ जैसें अंतःकरणोपाधीसीं ॥ बिंबे जो चैतन्यांश तयासीं ॥ बिंबलेपणें प्रमाता तयासीं ॥ प्रमाता ऐसी संज्ञा झाली ॥१३ ॥ तो अंतःकरणउपाधी वेंचला ॥ स्वप्नपदार्थाकार परिणमला ॥ तयाआंत जो भासला ॥ तोहि गेला उपाधिनाशें ॥१४॥ तरि स्वप्न कोणें प्रकाशिलें ॥ पदार्थ सत्यत्वें कोणें देखिले ॥ हें सांगपां येका बोलें ॥ जैसें कळलें असेल तुज ॥ ॥ १५ ॥ इंद्रियवर्ग लयातें पावला ॥ मनाचा परिणाम स्वप्न झाला ॥ प्रमाताहि तेथें नासला ॥ कोणें देखिला स्वप्नसंभ्रम ॥ १६ ॥अगा प्रमातयाचें देखणें ॥ जंववरि असती बाह्य करणें ॥ तयावेगळें स्वतंत्रपणें ॥ जीवा नेणणें असेचि कीं ॥ १७ ॥ येथें नचले कोणे युक्ती ॥ तटस्थ राहिला मौनस्थिती ॥ जाणत नेणें स्वयें भ्रांति ॥ नवदवे भारती कांहीं त्याची॥१८॥मग गुरू ह्मणती ऐक आतां ॥ निर्धार सांगेन तुज तत्वतां ॥ जेणें बुंझसी सर्वा अर्था ॥ तेंचि आतां जाण तूं ॥ १९ ॥ तुझें स्वरूप तो साक्षी जाण ॥ जो करीतसे सर्वांचें भान ॥ झालियाहि इंद्रियें लीन ॥ स्वयें आपण जो प्रकाशी ॥ १२० ॥ अगा सकळ सामग्रीविण ॥ अंतराचें जो करी प्रकाशन ॥ तोचि तो सर्वथा साक्षी जाण ॥ नाहीं भिन्न आपणेसीं॥२१॥आणि बाह्यार्थाचेंहि प्रकाशन ॥ तेंही साक्षीच करी जाण ॥ इंद्रियें बाह्यत्वें स्थूळभान ॥ करी आपण स्वप्रकाशें ॥२२ ॥ जो जो रूपवंत असे पदार्थ ॥ तोचि इंद्रियां होय प्रत्यक्षभूत ॥ रूपवंत नव्हे तें न प्रकाशत ॥ तेंही जाणत साक्षीच येक ॥ २३ ॥ शुंक्ति

१ जुनाट पुरुषास. २ विस्तारला. ३ परिणाम पावला. ४ वैभव. ५ इंद्रियें. ६ वाचा. ७ समजशील. ८ प्रकाशम. ९ देहभाव. १० शिंपी.

रजत बाह्य पदार्थ ॥ परि तो नव्हे सत्य रूपवंत॥ यालागीं इंद्रियें न प्रकाशीत॥साक्षी जाणत चक्षुद्वारा ॥२४॥ तैसींच अंतरीचीं सुखें दुःखें ॥ तीं इंद्रियेंवीण साक्षीच जाणे असिकें॥तीं अरूपवंत इंद्रियां नटके ॥ त्यांतें प्रकाशी साक्षीच येक॥२५॥तैसेचि जे कीं स्वप्नपदार्थ॥ ते भासमात्र परि नव्हति रूपवंत॥ह्मणोनि तेहि साक्षीच प्रकाशित ॥ नव्हे अन्यार्थ रघुराया ॥ २६॥ तो जो साक्षी तेंचि स्वरूप आपुलें ॥ वास्तव्य अनुभवें जाणावें भलें ॥ तें विचारेंचि होय साधिलें ॥ तेंचि तें निराळें सुषुप्तीसीं ॥२७॥ तें स्वप्नडिंबहि मावळलिया ॥ तो साक्षीच उरे आपणिया ॥ साक्ष्य स्वप्नादि गेलिया ॥ साक्षित्व तयातेंहि नाहीं ॥२८॥ साक्ष्यापेक्षसाक्षित्व ॥ तें साक्ष्य गेलिया उरे येकत्व ॥ साक्षीपणाचेंहि तत्व ॥ राहे निवांत स्वस्वरूपें ॥ २९ ॥ तेव्हां सच्चिदानंद सुखपणें ॥ असे आपणया आपण ॥ सुखरूप नसे तरी कैसें जाणे ॥ प्रबोधीं कोणें प्रकाशिजे ॥ १३० ॥ सुखमहमस्वाप ऐसें ॥ प्रबोधीं स्वयें जाण तूंचि असे ॥ यालागीं मी केवळ सुषुप्तीसिं वसे ॥ दुजें नसे तेथें कांहीं ॥ ३१ ॥ ऐसें हें विचारें विचारितां ॥ स्वतःसिद्ध आपणचि ज्ञाता ॥ सर्वातीत ब्रह्मसत्ता ॥ तोचि तूं तत्वतां रघुराया ॥ ३२ ॥ अहो सुषुप्तीसिं कांहींच नेणें ॥ प्रपंचमात्राचें न जाणणें ॥ सुखदुःखादि नाहीं भोगणें ॥ मी अमुका नेणें कांहींच तेथें॥ ३३ ॥ जाती वर्णाश्रम गुण ॥ कांहींच नेणे अनुसंधान ॥ अमुक्याचा पिता पुत्र इत्यादि खुण ॥ नेणे संपूर्ण कांहींच तो ॥ ३४ ॥ केवळ चैतन्यसुखावबोधें ॥ राहे सुषुप्तीसिं अगाधें ॥ तें आपणचि जें ऐसें बोधे ॥



१ रुपें २ नेत्रद्वारां. ३ प्रतीभास. ४ जागृतींत ५ झोपेंत. ६ शोध, ध्यान.

तेंचि स्वानंद जाणजे ॥३५॥ मी कोण ऐसें जें जाणणें ॥ तें जाणावें इये खुणें ॥ विश्व नश्वर दृश्यपणें ॥ नाहीं-
च होणें वास्तव्य कदां ॥३६॥जग स्वप्न सुषुप्तीसिं बाधलें ॥ ह्मणोनि नैश्वर्यत्व पावलें ॥ तें आभासमात्रें संचलें ॥
विचारा भलें समर्थ नव्हे॥३७विचारा क्षेम नव्हे जे वस्तु॥तेचि ते आभासमात्र जाण तूं॥जैसा कां अहि रज्जुगतु॥
शुक्तिकांतरभूत रजताभासु॥३८॥ कां रोहिणी जळाचा पूर ॥ कीं गंधर्वनगरींचें गोपुर ॥ इंद्रजाळाचें सपुर॥ अ-
तिसुंदर लाघव तें ॥ ३९ ॥ वोडंबरीचे अळंकार ॥ कां चित्रींची वनिता सुंदर ॥ कां स्वप्नींचें वैभव परिकर ॥
मनोहार राज्यभोग ॥ १४० ॥ साइंखेडियाच्या गजघंटा ॥ छाया मंडपीचे शूरश्रेष्ठा ॥ युद्धाच्या होती खटप-
टा ॥ टिक्कु गोमटा गोळांगुळांचा ॥ ४१ ॥ तेंसें हें विश्वजाळ सकळ ॥ पाहतां आभासमात्र टवाळ ॥ विचारें
विचारितां निर्मूळ ॥ फोल सकळ रघुराया ॥४२॥ अगा हें सत्य वस्तुच्या ठाईं ॥ भासे ह्मणोनि सत्याभासु
पाहीं ॥ विचारितां असत्य सर्वहि ॥ भ्रमेवीण पाहि आन न देखे ॥ ४३ ॥ अगा येणें विचारेंकरुनी ॥ विश्व हें
असत्यचि बाधुनी ॥ सत्य आपण यातें निवडुनी ॥ राहाणें परिपूर्ण जाणोनियां ॥ ४४ ॥ तोचि आपण सकळ
अढळ ॥ प्रांजळ सत्यसेतु निर्मळ ॥ अखंड स्वप्रकाश अचळ ॥ सुखकल्लोळ सुखत्वें ॥ ४५ ॥स्वसंवेद्य निरंजन॥
अप्रमेय निष्कळ निर्गुण ॥ साक्षी निरंतर चैतन्यघन ॥ स्वार्थ पूर्ण पूर्णत्वें ॥ ४६ ॥ एवंविध पैं आपण असे ॥
देहादि प्रपंचाचें रूप तें ऐसें असे ॥ चंचळ दृश्य परिछिन्न भासे ॥ अनित्य असे मळीनपणें ॥ ४७ ॥ सखंड अ-

१ निरास केला. २ सर्प. ३ शिंपीच्या आंत. ४ रुप्याचा भास. ५ भरपूर. ६ बहुरूपीविद्या. ७ कळसूत्री बाहुली. ८ नाशवंत.

प्रकाश क्षणभंगुर ॥ दुःखरूप दुःखोंदर्के निरंतर ॥ परसंवेद्य जड अस्थिर ॥ जाणिजे सपुर दृश्यपणें ॥ ४८ ॥ अज्ञानांध कलंकयुक्त ॥ अतिस्थूळ बाह्यनियुक्त ॥ साक्ष क्षणिक जडयुक्त ॥ पदार्थ प्रतीत सर्वेंद्रियां ॥ ४९ ॥ एवं गुणीं जाण अळंकृत ॥ हें विश्व मिथ्याच भासत ॥ जें जें इंद्रियीं जाणिजेत ॥ तें तें मिथ्याभूत जाण तूं ॥ ॥ १५० ॥ ऐसिया विचारेंकरुनी ॥ सर्वदां पाहातां कोदंडपाणी ॥ असतचि जग नयनीं ॥ जैसें स्वप्नीं तैसें भासे ॥ ५१ ॥ मिथ्या भासलिया विश्व जन ॥ वासना नुपजती गा जाण ॥ अज्ञान नासलिया विश्वभान ॥ मिथ्या पूर्ण भासत ॥५२ ॥ तेंही साधन तुजप्रती ॥ सांग सांगेन गा रघुपती ॥ जेथें वासनाचि नुठेजती ॥ ते-चि विश्वमूर्ति परियेसी ॥५३॥ श्लोक ॥ यस्यमौर्ख्यंक्षयंयातंसर्वंब्रह्मेतिभावनात् ॥ नोदेतिवासनातस्यप्राज्ञस्यां-बुमतिर्मरौ ॥६॥ टीका ॥ अगा सत्य वस्तुच्याठाईं ॥ असत्य विश्व भासे सर्वही ॥ यासीं कारण अज्ञानावांचुनि नाहीं ॥ सत्य पाहीं रघुराया ॥५४॥ परम मौर्ख्य तें अज्ञान॥ ह्मणोनि मौर्ख्य तें अभिधान ॥ वस्तु विस्मरणें भासवि आन ॥ ह्मणोनि जाण मूर्खपण तया ॥ ५५ ॥ अनादि जें तें नाहिसें केलें ॥ तें मौर्ख्यत्व ज्याचें क्षया गेलें ॥ त्यासींच ब्रह्मत्व हाता आलें ॥ स्वयेंचि झालें ब्रह्म पूर्ण ॥ ५६ ॥ अगा सर्व ब्रह्मेति भावँना ॥ तेणें निः-शेष नाश होय अज्ञाना ॥ क्षय झालियाकारणा ॥ कार्य कोणा आश्रयें राहे ॥ ५७ ॥ कारण तें जाण अज्ञान॥ कार्य तें विश्वभास जाण ॥ कारणनाशें विश्वस्वप्न ॥ नभासे पूर्ण रघुराया ॥ ५८ ॥ ज्ञान झालें नसतांहि गा



१ दुःखाच्या राशी. २ भरपूर. ३ अतिजड. ४ विषयान्ध. ५ उत्पन्न होत नाहींत. ६ नाम. ७ निश्चय.

रघुपती ॥ सर्व ब्रह्म ऐसी करितांचि क्षणवृत्ती ॥ ते भावनाचि फळे सर्वार्थी ॥ त्रिजगतीं ब्रह्मचि भासे ॥ ५९ ॥ सर्वदां करितां ब्रह्मभावना ॥ अज्ञान नासे गा रघुनंदना ॥ तेथें हे विश्वाभास रचना ॥ नाहींच क्षणामाजी होय ‼ १६० ॥ ऐसा हा साधनप्रकार ॥ येणेंचि मौर्ख्यां होय संहार ॥ मौर्ख्यनाशें वासनांकुर ॥ नुगवे साचार सर्वथा ॥६१॥ अगा वासनावल्लीचें बीजभूत ॥ तेंहि अज्ञानचि जालें भंर्जित ॥ पुनरपि तें वासनांकुरित ॥ नव्हे सिंचित जरी जळें ॥ ६२ ॥ जैसा मरुस्थळाच्याठाईं ॥ ज्ञातया अंबुबुद्धि नव्हे पाहिं ॥ रज्जु हस्तगत तया कांहीं ॥ नभासे आँहि सर्वथा ॥ ६३ ॥ यालागीं मूळाचें छेदन करावें ॥ तेणेंचि वासनाक्षय संभवे ॥ अन्यथा तेहींच अभिंभवे ॥ वर्म जाणावें निश्चयेसीं ॥ ६४ ॥ ह्मणोनि वासनेची शांति ॥ अज्ञाननाशेंचि गा महामती ॥ करावी हे तुजप्रती ॥ साधनसंपत्ती बोलिलों ॥ ६५ ॥ आतां चित्ताहि जेणें अचित्तपण ॥ रघुनाथा यतसे गा जाण ॥ जेणें चित्तपण होय क्षीण ॥ तेंहि लक्षण सांगों आतां ॥ ६६ ॥ आणि वासनाक्षयाचे प्रकार ॥ तेंहि सांगो तुज सविस्तर ॥ तरी मन करूनि एकाग्र ॥ उपाय सार परियेसीं ॥ ६७ ॥ श्लोक ॥ वासनासंपरित्यागाच्चित्तंगच्छेत्यचित्ततां ॥ प्राणस्पंदनिरोधाच्चयथेच्छसितथाकुरु ॥ ७ ॥ टीका ॥ अगा वासना शब्दें पूर्वकर्म संस्कार ॥ जे कां धर्माधर्म मनोहर ॥ सूक्ष्म अद्दष्ट गोचर ॥ व्यंक्ती साचार नव्हेतीपैं ॥ ६८ ॥ ते फळोद्भवें व्यक्तिसीं येती ॥ येऱ्हवीं अव्यक्तपणेंचि असती ॥ तद्रूपाचि अंकुर निघती ॥ पुण्य अंघें होती तेणेंचि पैं ॥ ६९ ॥ आ-

१ भस्म. २ मारवाडदेशांत. ३ पाण्याची इच्छा. ४ सर्प. ५ पराभव पावे. ६ प्रकट. ७ आकार. ८ सूक्ष्मपणें. ९ पापें.

णि वासनेची स्वरूपस्थिति ॥ पूर्वींहि सांगीतली तुजप्रती ॥ त्याचि वासना जाणिजेती ॥ ऐकें गति तयांची॥ ॥ १७० ॥ तया वासनेचि सांग संगति ॥ झालिया चित्ताची तत्वस्थिती ॥ वासनाक्षयें अचित्तवृत्ती ॥ शुद्ध स्थिती सर्वदा॥७१॥विषयापेक्षा त्याचि गा वासना॥तेणें चित्त पावे चित्तपणा॥वासना झालिया सर्वहि लीना॥ तेणें चित्तपणा मुकलें ॥ ७२ ॥ नाहो पूर्व संस्कारें वासना होती ॥ त्या तंव प्रारब्धरूपें ठसावती ॥ प्रारब्धाचि अलोट गती ॥ नव्हे समाप्ती कोणा उपायें ॥ ७३॥ ज्ञान झालियानंतरें ॥ संचित क्रियमाण तत्काळ सरे ॥ परि प्रारब्ध तें भोगार्थ उरे ॥ सर्वथा नसरे ज्ञानेंहि कांहीं ॥ ७४ ॥ तेथें वासनाक्षय कोणें होये ॥ कैसें चित्ताचें चित्तपण जाये ॥ हें तंव अभिनवचि आहे ॥ कोण उपाय त्या बोला ॥ ७५ ॥ हें तंव बोलिलेति यथार्थ ॥ संस्कार प्रारब्धरूपें भोगार्थ ॥ झाले ते अचळ निश्चितार्थ ॥ नाहीं ढळत ज्ञानेंकरूनि ॥७६॥ ज्ञानाचीहि अपेक्षा थोर ॥ प्रारब्धाचें बळ गंभीर ॥ तयाहि परि सबळफार ॥ महाथोर योगाचें ॥७७॥ परि ज्ञानें विश्वबाधित होये ॥ विषयजात ते मिथ्यारूप पाहे ॥ मिथ्यत्वावरी वासना जाइल काये ॥ गेलिहि होय बाधित ॥ ७८ ॥ यालागीं ज्ञानेंहि वासना नासती ॥ प्रारब्धभोग तेहि बाधिजेति ॥ झालेही ज्ञानी नमानिती ॥ मिथ्या देखती सुखदुःख ॥ ७९ ॥ दुःखें दुखवोनि जे दुःखी होती ॥ उद्वेगें देहाकार प्रतीति ॥ तयासींच दुःखें दुःख देती ॥ ज्ञानीयांप्रती ते तंव नाहीं ॥ १८० ॥ तैसेंचि सुखें जे सुखावती ॥ सुखभोगें ऐसें धन्य मानिती ॥ आणिकांचि अपेक्षा

१ अचूक. २ पाप पुण्याचा सांठा. ३ प्रारब्धानें होणारीं शुभाशुभ कर्में ४ नवल. ५ उद्विग्नपणा, कंटाळा. ६ इच्छा.

करिती ॥ तेचि बुडती तेणें सुखें ॥८१॥ तैसे नव्हती ते ज्ञानीजन॥ते सुख दुःख देखती समान ॥ दोहींचें जाणती
नश्वरपण ॥ नव्हती उद्विग्न कां सुखरूप ॥८२॥ हें सुख हें दुःख निवाडाहि जाणती ॥ परि दुःखें तळमळ न क-
रिती ॥ बाधित सर्वही देखती ॥ स्पृहा न करिती सुखाची ॥८३॥दोन्हीहि मिथ्याभूत नश्वर ॥ क्षण येकही नव्हती
स्थिर ॥ सुखीं राग दुःखीं इतर ॥ नाहीं साचार ज्ञानबळें ॥८४॥ यदर्थीं शारंगधरें ॥ बोलिलें गीतेसिं निर्धारें ॥ तेंचि
परिसिजे येकाकारें ॥ जेणें स्फुरे अर्थ सकळ॥८५॥संमतिगीता ॥ दुःखेष्वनुद्विग्नमनाःसुखेषुविगतस्पृहः॥वीतरा-
गभयक्रोधःस्थितधीर्मुनिरुच्यते ॥ १ ॥ टीका ॥ ययाच्या अभिप्रायार्थ ॥ पूर्वींच बोलिला निश्चित ॥ तोचि
भाव जाणिजे यथार्थ ॥ नाहीं अन्यार्थ सर्वथा॥८६॥ज्ञानेंही वासना नासती ॥ इत्यादि खुण जाण उपपत्ती ॥
ते प्रारब्धातेंहि न गणिती ॥ मिथ्या देखती देहादि सर्व ॥ ८७ ॥ आणि योगें प्रारब्धभोग नासे ॥ तें सर्व शा-
स्त्रीं बोलिलें असे ॥ तें तंव नव्हे गा अनारिसें ॥ अनुभवें असे तैसेंचि ॥ ८८ ॥ योगाभ्यासें सम्यक् समाधी ॥
लागली या चिरकाळावधी ॥ प्रारब्धभोग काय तया बाधी ॥ सुख दुःख बुद्धी थारेना ॥ ८९ ॥ ऐसें अनुभव-
सिद्धहि असे ॥ यालागीं योगें प्रारब्ध नासे ॥ ह्मणोनियां योगाभ्यासें ॥ नाश असे वासनेसीं ॥१९०॥ ह्मणोनि
वासनेच्या क्षयासीं ॥ योगाभ्यास सांगे हृषीकेशी ॥ प्राणनिरोधें वासनेसीं ॥ क्षय सर्वांसीं निर्धारें ॥९१॥ ह्मणोनि
आसन पूर्वक प्राण ॥ रोधिल्या वासनाक्षय संपूर्ण ॥ वासनाक्षयें जाय चित्तपण॥अचित्तपण सर्वदा ॥९२॥ अगा

१ इच्छा. २ प्राप्त होई. ३ दृष्टांत. ४ लटिकें, भिन्न. ५ सत्य. ६ अखंड. ७ वायु कोंडून.

अचित्त तेंचि ब्रह्म संपूर्ण॥अचित्त तेंचि चैतन्यघन॥अचित्तपणें विश्व अभान॥अचित्तपूर्ण ब्रह्मत्वें॥९३॥वासनायोगें चित्तपण॥वासनाक्षयें अचित्त जाण॥चित्तें संसार होय दारुण॥अचित्तपूर्ण ब्रह्मत्वें॥९४॥वासनाक्षयाचा उपावो॥ तो सांगीतला तुज निर्वाहो ॥ आतां जैसी इच्छा तैसें रघुरावो ॥ करीं भावो माने तैसा॥९५ ॥ आतां आणी-कही उपाय प्रकार ॥ सांगेन तुज महाथोर ॥ जेणें ज्ञानप्राप्ती होय सत्वर ॥ आणि निर्धार अज्ञानाचा ॥९६॥ तें अज्ञान गा नासे ततक्षणीं ॥ सर्व वासनेचि होय धुणी॥तें वर्म कोदंडपाणी ॥ सांगों वचनीं ऐकपां॥९७॥सर्व उपाय अळंकाराचे ॥ शिरोमणी जे कीं मुगुटींचे ॥ जे साधिलिया उपायाचे ॥ उद्दीम साचे खाचंती ॥९८॥ स-र्वांहि उपायांचा राजा॥तो तूं ऐक गा सौमित्राग्रजा॥जो करितां संसृतीसमाजा ॥ मुक्ति वोजा होइजे कीं॥९९॥ ॥ श्लोक ॥ साधुसंगमसच्छास्त्रपरोभवसिसन्मते ॥ तद्दिनेनैवनोमासैःप्राप्तोसिपरमांधियं॥८॥ टीका ॥ तरी साधु-संगम आणि सच्छास्त्र ॥ येथें होसी जें तत्पर ॥ तरी तद्दिनींच असे बुद्धी थोर ॥ पावसी निर्धार विबुधपती ॥ ॥ २०० ॥ अगा सत्समागमाहुनि सार ॥ समाधान नाहीं महाथोर ॥ तैसेंचि जाण सच्छास्त्र ॥ जेणें दुस्तर निस्तरिजे ॥ १॥ परि नाना साधन करितां ॥ तैसी सद्बुद्धी नव्हे गा रघुनाथा ॥ जिये बुद्धीस्तव भवव्यथा ॥ जाय भस्मांता क्षणमात्रें ॥ २ ॥ बुद्धिशब्दें ज्ञान जाण ॥ जेणें निःशेष तुटे अज्ञान॥अज्ञाननाशें ब्रह्मपूर्ण ॥ प्राप्त जाण सर्वथा ॥ ३ ॥ अगा तैसी बुद्धी सद्गुरुविण ॥ साधु शब्दें तोचि तो जाण ॥ तयाच्या मुखें सच्छास्त्र श्र

१ प्रकार. २ उद्योग. ३ मागें हटतात. ४ जन्म मरणाचा समुदाय. ५ उत्तम. ६ त्याच दिवशीं.

वण ॥ तेणें पूर्ण ज्ञान होय ॥ ४ ॥ साधुसंग आणि सच्छास्त्र श्रवण ॥ जे दिवसीं पुरुषासीं होय जाण ॥ तेचि
क्षणीं ज्ञान होय संपूर्ण ॥ तेथें विलंब असेचिना ॥ ५ ॥ अगा महाभाग्येंकरून ॥ सत्समागम आणि सच्छास्त्र
श्रवण ॥ होतांचि तत्क्षणीं जाण ॥ सुखसंपन्न तोचि होय ॥६॥ तेथें विलंब नलागे येक मासहिभरी ॥ तेथें व-
र्षाची काय कुसरी ॥ तेचिक्षणीं दशग्रीवारि ॥ सद्बुद्धि वरी तयातें ॥ ७ ॥ परमबुद्धि ययास्तव बोलिजे ॥ जि-
येहुनी थोर बुद्धी नदेखिजे ॥ सर्वावरिष्ट तें ज्ञानचि सहजें ॥ नाहीं दुजें तत्समान ॥ ८ ॥ तो ज्ञानोदय होतां-
चिक्षणीं ॥ अज्ञानाची होय धुणी ॥ स्वतःसिद्धचि ब्रह्मत्व आणी ॥ बुद्धि निर्वाणीं तेचि ते ॥९॥ तेचि बुद्धी पावि-
जे सत्संगें करी ॥ दुजी सच्छास्त्र भरोवरी ॥ तेचि दिवसीं सद्बुद्धि वरी ॥ नलगे दुरी मासमर्यादा ॥२१०॥ स-
च्छास्त्र शब्दें निगमशीर ॥ जें कीं उपनिषद महाउदार ॥ तदर्थ वेदांत महाथोर ॥ तेंचि सच्छास्त्र बोलिजे ॥ ११ ॥
संत तोचि सद्गुरूरावो ॥ त्याच्यानिमुखें वेदांतश्रावो ॥ झालिया तोचि नासी ठावो ॥ अन्य भाव असेचिना ॥
॥ १२ ॥ अगा होतांचि सद्गुरूचरणीं मिळणी ॥ तन्मुखें वेदांत पडे श्रवणीं ॥ ब्रह्मज्ञान होय ततक्षणीं ॥ हात
धरूनि ब्रह्म भेटे ॥१३॥ ब्रह्म स्वतःसिद्ध स्वयेंचि असे ॥ परि तें अज्ञानें व्यवधानलें असे ॥ अज्ञाननाशें भेटलें
ऐसें ॥ जाणत असे तयापरी ॥ १४ ॥ जैसें कंठगत चामीकर ॥ भ्रमें झाला त्याचा विसर ॥ भ्रमनाशें आनंद
थोर ॥ प्राप्त प्रकार मानूनियां ॥१५॥ अथवा सच्छास्त्र वेदांतादिक ॥ अध्यात्मशास्त्रहि सम्यक ॥ तें आणि संत जो

१ महत्व, कौशल्य. २ स्वीकार करी. ३ शेवटीं. ४ सामग्री. ५ वेदांत. ६ अंतरलें. ७ गळ्यांतील सोन्याचा दागिना. ८ उत्तम.

सद्गुरूसीं तुक ॥ तेंचि देख संत शब्दें ॥१६॥ येथेंहि झालिया तत्पर ॥ ज्ञान होयचि हा निर्धार ॥ उभय अर्थीचें अ-
र्थांतर॥सर्वशिर शास्त्र सर्व॥१७॥ऐसें यासीं जेचि दिवसीं गा रघुनाथा॥सच्छास्त्र आणि संतीं प्रीति उपजतां॥ ते-
चिक्षणीं पावे ब्रह्मता ॥ विलंब सर्वथा असेचिना ॥१८॥ तेथें वासनेची कैंची गोष्टी ॥ सर्व ब्रह्ममय झाली सृष्टी ॥
वासना कासयाची कोणा उठी ॥ जाण जगजेठी विबुधनाथा॥१९॥आणिकहि उपाय थोर॥जेणें तुटती वासना
संभार ॥ तोहि सांगिजेल प्रकार ॥ ऐकें एकाग्र करूनि मन ॥३२०॥ परि तेहि उपाय जानकीपती ॥ सत्संगानंत-
रचि होती॥परि पूर्वीं करितां नसाधिती ॥ अंतरें असती ह्मणोनियां॥२१॥तरि तेहि सांगो प्रकारत्रय॥जेणें नव्ह-
ति वासनोद्भव ॥ त्या येकयेकीं सामर्थ्य गौरव ॥ सांगेन भाव तो ऐक॥२२॥श्लोक ॥ असंगव्यवहारित्वाद्भवभा
वनवर्जनात् ॥ शरीरनाशदर्शित्वाद्वासनानप्रवर्तते ॥ ९ ॥ टीका ॥ आतां प्रथम साधन तें ऐसें ॥ असंगपणें
व्यवहार दिसे ॥ तेणें वासना निःशेष नासे ॥ पुढें नप्रवेशे हृदयाकाशीं ॥ २३ ॥ तेंचि तें असंगत्व कैसें ॥ तेंहि
सांगों गा सावकाशें ॥ तरी सकळां व्यंतिरिक्त स्वयें असे ॥ बुझैला असे गुरुमुखें जो ॥ २४ ॥ देहादि इंद्रियें
आणि अहंकार ॥ हा मिथ्याभूत सर्व संभार ॥ तें तेंचि विश्वकल्पित चराचर ॥ मी निर्विकार तदभिन्न ॥२५॥
जें जें आपणासीं दृश्य प्रकाशे ॥ तें तें जाण मिथ्या आभासे ॥ आत्मप्रकाशें सुख प्रकाशे ॥ असंग उदास नि-
त्यपणें ॥२६॥ हें सद्गुरूमुखें बरवेप्रकारीं ॥ जो बोधलाअसेल पौलस्त्यारी ॥ तेणें अनुसंधानें असंगपरी ॥ जाणें

---

१ महत्व. २ समुदाय. ३ भिन्न. ४ समजला. ५ लक्षलावून.

कुसरी अकर्तेपणें ॥ २७ ॥ आपण निःसंग उदास ॥ अकर्ता अभोक्ता अपरेश ॥ कार्यकर्तृत्वादि नाहीं क्लेश ॥ जैसें आकाश अलिप्तपणें ॥ २८ ॥ येऱ्हवीं तरी गा रघुनाथा ॥ परी बाहेर चाले कर्मव्यवस्था ॥ ते बळात्कारें घे आपले माथां ॥ भवपंथा पडावया ॥ २९ ॥ ऐसी संमती असे थोर ॥ जे बोलिला श्रीकृष्ण उदार ॥ तेंचि सांगों ऐकें उत्तर ॥ श्रोते चतुर परिसोत ॥ २३०॥ अगा शरीर वाचा मानसें ॥ जें जें कर्म निपजत असे ॥ तें अधिष्ठानपंचकें आपैसें ॥ होतचि असे शुभाशुभ ॥ ३१ ॥ संमति गीता ॥ पंचैतानिमहाबाहोकारणानिनिबोधमे ॥ सांख्येकृतांतेप्रोक्तानिसिद्धयेसर्वकर्मणाम् ॥२॥ अधिष्ठानंतथाकर्ताकरणंचपृथग्विधं ॥ विविधाचपृथक्चेष्टादैवंचैवात्रपंचमम् ॥३॥ शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्मप्रारभतेनरः ॥ न्याय्यंवाविपरीतंवापंचैतेतस्यहेतवः ॥ ४ ॥ तत्रैवंसतिकर्त्तारमात्मानंकेवलंतुयः ॥ पश्यत्यकृतबुद्धित्वान्नसपश्यतिदुर्मतिः ॥ ५ ॥ टीका ॥ शामसुंदर राजीव लोचन ॥ देवाधिदेव विराजमान ॥ करी प्रपंचाचें विडंबन ॥ दीनोद्धारण करावया ॥ ३२ ॥ श्रीकृष्ण ह्मणे गा अर्जुना ॥ सांगेन याचिया विवंचना ॥ कर्मसिद्धीचिया प्रयोजना ॥ साखीं जाण निवाडा केला॥३३॥सर्व कर्म जेंहि निपजे ॥ तें न्यायें अथवा अन्यायें जें ॥ त्याचीं पंचकारणें जाणिजे ॥ सांगो व्योजें येणेंची ॥ ३४ ॥ तरी सकळांचें अधिष्ठान ॥ तें प्रथम हें शरीर जाण ॥ तैसाचि अहंकार कर्ता पूर्ण ॥ जयालागुन प्रमाता ह्मणती ॥ ३५ ॥ तिसरा समुदाय इंद्रियांचा ॥ परि वेगळाला व्यवहार त्यांचा ॥ तैसाचि विकार यया प्राणाचा ॥

१ चातुर्य. २ निराळा. ३ वेगळेपणानें. ४ धिःकार. ५ निमित्तानें. ६ जुनाट पुरुष.

विंविध यांची प्राणशक्ती ॥३६॥ पांचवें दैव पूर्वसंस्कार ॥ तेणेंचि सर्वांसीं चेष्टाविकार ॥ अंदृष्टें होय कर्माचार ॥ हा निर्धार रघुनाथा ॥ ३७ ॥ अथवा दैव शब्दें जाण ॥ अधिष्ठात्री देवता ह्मणती सज्ञान ॥ येहीं पांचीं कारणींकरून ॥ क्रियानिर्माण होय सर्व ॥३८॥ येहीं पांचीं कारणीकरुनी ॥ सर्व कर्म निपजे कोदंडपाणी ॥ आत्मा निर्विकार अकर्तेपणीं ॥ राहे निर्वाणीं साक्षित्वें ॥ ३९ ॥ तोचि साक्षी ययाचा प्रकाशकु ॥ अकर्ता अभोक्ता सर्वात्मकु ॥ ऐसें असोनीहि अविवेकु ॥ जरी कुतर्कु कर्तेपणाचा ॥ २४० ॥ अगा देहात्मबुद्धीकरुनी ॥ कर्ता भोक्ता आपणातें मानी ॥ देहात्मबुद्धी भरवसेनी ॥ सद्गुरूकृपेनें ज्याची गेली ॥ ४१ ॥ त्यासीं असंगपणें कर्म करितां ॥ सर्व शरीर व्यवहार कर्तव्यता ॥ क्लेश नाहींत श्रीरघुनाथा ॥ कूटस्थ ऐकतां धर्माध्यक्षु ॥ ४२ ॥ ऐसा असंगत्वें व्यवहार करितां ॥ वासना नुपजती गा सर्वथा ॥ हा उपाय येक गा रघुनाथा ॥ दुजा महंता परियेसी ॥ ४३ ॥ तरी भव भाव वर्जनकरी ॥ वासना नुठती गा धनदानुजारी ॥ तोही ऐकपां कुसरी ॥ सांगों विस्तारीं जैसी असे ॥४४॥ भवशब्दें संसार प्रपंचजात ॥ त्यासीं ब्रह्माच्याठाईं भावना भावित ॥ हेचि विपरीत भावना निश्चित ॥ विश्वाचें तथ्य नेणोनियां ॥४५॥ जैसा स्वप्नाभाव स्वप्नीं भासे ॥ तो अवस्थांतरीं नदिसे ॥ ऐसें जाणोनिहि घेऊनि बैसे ॥ यथार्थ ऐसें मानोनि ॥ ४६ ॥ मिथ्याभूत ऐसेंही होय प्रतीति ॥ तरी भ्रम यथार्थचि मानिती ॥ हे नवल भ्रमाची स्थिती ॥ काय रघुपती बोलावें ॥ ४७ ॥ तें जैसेंचि आहे तैसेंचि मानावें ॥

१ अनेक, चमत्कारिक. २ प्रारब्धानें ३ सत्ताधीश, चालक. ४ शेवटीं. ५ आत्मा. ६ खरेपणा.

इतुकेंहि तया नकरवे ॥ विपरीतचि आघवें ॥ जें नकरावें तें करिती ॥ ४८ ॥ जैसें आहे तैसेंचि देखतां ॥ तयाचें कांहीं नवेचे गा सर्वथा ॥ यालागीं सत्यबुद्धी गा तत्वतां ॥ प्रपंचीं रघुनाथा नकरावी ॥ ४९ ॥ यथार्थाचें अयथार्थ देखणें ॥ येकाचे ठाईं अनेक भावणें ॥ नसतें तेथें कल्पणें ॥ भावना येणें कारणें होय ॥ २५० ॥ पाषाणीं जैसी देवताबुद्धी ॥ अश्वत्थप्रमुखादिकीं तेचि वृद्धी[1] ॥ येक दिसतां येक प्रतिपादी ॥ भावनासुबुद्धी इया नाम ॥ ५१ ॥ कां आकाशीं जैसी नीळिमा[2] ॥ कीं मेघीं गंधर्वपूर[3] सीमा ॥ रश्मीसि मृगांभ[4]महिमा ॥ भुजंगप्रतिमा दोरासीं भावी ॥ ५२ ॥ दर्भमुष्टीचा यजमान ॥ सोमवल्ली नाम अमृतपान ॥ परी तें शास्त्रदृष्टी प्रमाण ॥ विश्व तें अप्रमाण सत्य ह्मणत ॥ ५३ ॥ तैसें सत्य ब्रह्माच्याठायीं ॥ असत्य विश्वाची भावना पाहीं ॥ हें त्यजिलिया वासना कांहीं ॥ नुठिजे हें कांहीं बोलावें नलगे ॥५४॥ अगा जो जो पदार्थ साच दिसे ॥ तेथेंचि वासना हे प्रवेशे ॥ तेंचि असत्य ऐसें जरी भासे ॥ तरी वासना नासे उपजल्याही ॥५५॥ अगा असत्य मृगांभ भासलें ॥ त्याचें रूप यथार्थ[5] कळलें ॥ तेथें मन काय प्रवर्तलें ॥ तृष्णेंही जरी पीडिलें असे ॥ ५६ ॥ कां वोडंबरी[6]चे अळंकार ॥ देखिले अतिमनोहर ॥ कां दर्पणींचा[7] अपूर्वहार ॥ देखिल्या सत्वर बुद्धी नव्हे ॥ ५७ ॥ तैसें विश्व हें मिथ्या भासलें ॥ तेथें वासनेचें आधींच उबडिलें[8] ॥ प्रवर्तल्या हे बोलें ॥ कोणें काळें प्रवर्तेना ॥ ५८ ॥ तैसें असत्य कळलियावरी ॥ वासना नघाली तयावरी ॥ मग आपेआप दनुजारी ॥ वासना पुरी भस्म होय ॥

---

१ वाढ, परिपाठ. २ नीळारंग. ३ संध्याकाळचे विचित्र ढग. ४ मृगजळ. ५ खरोखर. ६ गारुडीविद्येचें. ७ आरशाचा. ८ नष्ट झालें.

॥ ५९ ॥ तें दुसरें साधन गा रघुराया ॥ सांगीतलें वासनाक्षया ॥ तिसरेंहि चित्त देऊनियां ॥ परिस तनया कौशल्येच्या ॥ २६० ॥ जरी विश्व असत्य देखिलें ॥ तेणें वासनाटवाळ विरालें ॥ परि शरीर असे साचें भाविलें ॥ त्यालागीं मेळे विषयाचे ॥ ६१ ॥ जंववरी हें शरीर साच भासे ॥ तंव उत्तम तयासीं पाहिजे तें असे ॥ त्याविषयालागीं अनायासें ॥ वासना प्रवेशे पदार्थजातीं ॥ ६२ ॥ त्यालागीं तिसरें साधन गा रघुपती ॥ तें-हि सांगेन गा तुजप्रती ॥ शरीरनाश क्षण क्षणाप्रती ॥ देखावा सुमती विवेकेंहि ॥ ६३ ॥ जें हें शरीर दृश्य असे ॥ तंव तें आपणा देखतांचि नासे ॥ पितादि परंपरा कोठें असे ॥ शरीर नभासे त्यांचें कांहीं ॥ ६४ ॥ तैसेंचि आपुलेंहि शरीर ॥ नाशिवंत परिणामीं थोर ॥ बाळयुवांदिक प्रकार ॥ वृद्ध तरुणें तेंचि झालें ॥ ६५ ॥ ऐसा क्षण क्षणाप्रती नाश ॥ देहाचा देखावा सावकाश ॥ आत्मदृष्टी लक्षितां परेश ॥ होय उदास शरीरभारीं ॥६६॥ देह हें अ४व्यक्त स्वरूपीं असे ॥ स्वरूप प्रकाशें शरीर नभासे ॥ नभासतां नासलेंचि असे ॥ जाण ऐसें दितीजारी ॥६७॥ सर्वदां स्वरूपस्थिती असतां ॥ शरीर नभासे गा जगन्नाथा ॥ आणि शरीरनाश सर्वदां देखतां ॥ नुधविती माथां वासना इया ॥ ६८ ॥ कां अंतरीं वैराग्य तीव्रपणें ॥ आणि आत्मानात्मविवेकें निपुणें ॥ शरीरनाश सर्वदां देखणें ॥ वासना तेणें भस्म होती ॥ ६९ ॥ एवं या साधनत्रयेंकरून ॥ होय वासनाक्षय संपूर्ण ॥ मागुता वासनांकुर कोठून ॥ उगवेल जाण अनाथबंधो ॥ २७० ॥ अगा जेणें भावें जो असे ॥ तयासीं

१ लटिकेपणा. २ कल्पिलें. ३ तारुण्यादि. ४ सूक्ष्म. ५ उत्पन्न होत नाहींत.

तैसेंचि फळ होतसे ॥ मूढेंहि भाविल्यां होय विशेषें ॥ सज्ञानीयासीं काय अपूर्व ॥७१॥ मूढें देह भाविल्या देहचि होत ॥ जैसा भृंगी कीटकीचा वृत्तांत ॥ दुःखें दुःखरूपचि होत॥सुखी सुखावत सुखस्वरूपें॥७२॥ब्रह्म भावितां ब्रह्मस्था ब्रह्मचि होये ॥ संसार कल्पितां तेंचि आहे॥यालागीं भावी तेंचि तो होये॥ नवल पाहे भावनेचें ॥७३॥ तेंचि आतां ऐकें रघुपती ॥ सांगेन भावनेची ख्याती ॥ तेणें तुज चमत्कार चित्तीं ॥ होय सर्वार्थीं सीताकांता ॥७४॥ श्लोक ॥ दृढभावानुसंधानाद्धिमूढाअपिराघव ॥ विषंनयंत्यमृततताममृतंविषतामपि ॥१०॥ टीका ॥ अगा भावना शब्दें पदार्थ जाण ॥ ते दृढभावें करितां अनुसंधान ॥ मूर्खही पावे तदाकारपण ॥ भावि जें आपण तेंचि होय ॥ ७५ ॥ विषाच्याठाईं अमृताध्यासु ॥ करितां तोचि होय शुद्धांशु ॥ अमृतीं करितां विषाध्यासु ॥ अमृत लेश विषचि होय ॥ ७६ ॥ कोणी येका भुजंगें दंशिलें ॥ तयातें कृपेनें अपरें वंचिलें ॥ ह्मणे भुजंग कैंचा वृश्चिकें खादलें ॥ मरणभय गेलें इतुकेनीचि ॥ ७७ ॥ वृश्चिकाचेनि जीविताध्यासें ॥ सर्पकृतभय गेलें कैसें ॥ विषचि अमृत झालें आपैसें ॥ मरणपिसें टळलें त्याचें ॥७८॥ तोचि येक वृश्चिकें दंशिला प्राणी ॥ तयासीं सर्पभय लावी कोणी ॥ तोचि सर्पाध्यासें तत्क्षणीं ॥ मरण जीवनीं पावत ॥ ७९ ॥ वेताळभयाध्यासें बाळकासीं ॥ नसतां मृत्यु होय निश्चयेसीं ॥ गेला ह्मणतां सुखाध्यासीं ॥ जीवितासीं पावत ॥ २८० ॥ जड कीटकी भृंगी होत ॥ हें दृढाध्यासाचें जाण सामर्थ्य ॥किंबहुना भाविजे जो अर्थ ॥ पुरुष भावार्थें तैसाचि पा-

१ कल्पिल्या. २ भ्रमरी. ३ लक्ष. ४ भास. ५ दुसऱ्यानें. ६ विंचूनें.

वे ॥ ८१ ॥ अथवा विषरूप जें दुष्कर्म ॥ तेंचि उत्तम या अभ्यासें करी अमृतोपम ॥ कां अमृतासारिखा जो साचार धर्म ॥ तोचि विषम अभ्यासें मानी ॥८२॥ श्लोक ॥ सत्यभावेनदृष्टोयंदेहो देहोभवत्ययं ॥ दृष्टस्त्वसत्यभावेनव्योमतांयातिदेहकः ॥ ११ ॥ टीका ॥ अगा प्रत्यक्ष पाहें रघुपती ॥ सत्यत्वें भाविल्या देहमूर्ति ॥ सत्यचि भासे ययाची व्यक्ती ॥ अचळ कल्पांतीं चळेना ॥ ८३ ॥ देह भावितां देहचि होत ॥ तो सर्वदां सत्यत्वें स्फुरत ॥ लोटल्याही कल्पाचा अंत ॥ असत्यभूत कदा नव्हे ॥ ८४ ॥ अद्वय जो कीं आत्मा जाण ॥ तो देह भावितांचि पावे देहपण ॥ तो देखतांचि असत्यभावेंकरून ॥ देह नसोनि पूर्णत्वें पाहे ॥ ८५ ॥ तो देह देखतांचि असत्यबुद्धी ॥ व्योमता पावे त्रिशुद्धी ॥ असत्यपणेंचि बाणे बुद्धी ॥ नव्हे आधीसीं तो हेतु ॥ ८६ ॥ तो सत्य भावितां सत्य झाला ॥ असत्य भावितां नाहींच केला॥रज्जु अहिसा सत्य भावितां स्फुरला॥तोचि मोडिला रज्जुदर्शी ॥ ८७ ॥ तोचि विचारें असत्य देखिजे ॥ तरी तो असत्यपणेंचि नाहीं सहजे ॥ भयादि सर्वथा नुदेजे ॥ सुख असिजे सुखपणें ॥८८॥ हेंचि सदृष्टांतें तुज सांगेन ॥ तें एकाग्र ऐकें रघुनंदन ॥ जेणें संदेह होउनी भस्म पूर्ण ॥ पावे खुण निश्चयाची ॥ ८९ ॥ श्लोक ॥ सुखतल्पगतोयेनस्वप्नदेहेनदिक्तटान् ॥ परिभ्रमसिहे रामसदेहस्तेक्कसांप्रतं ॥ १२ ॥ टीका ॥ अगा सुखरूप पर्यंकं शय्येवरी ॥ निद्रा केलिया सुख सेजारीं ॥ तोचि अन्य देहीं स्वप्नाभीतरीं ॥ दिशा चारी हिंडतु ॥२९०॥ तरी स्वयें तूंचि पाहें रघुराया ॥ सुखें सेजेवरी निद्रा



१ आकार. २ आकाशपणा. ३ निश्चयें करून. ४ उत्पन्न होत नाहीं. ५ पलंग.

करूनियां ॥ असतां अन्य देह धरूनियां ॥ स्वप्न¹याहाळिया खेळसी ॥ ९१ ॥ तोचि जेणें स्वप्नदेहें करुनी ॥ सुखसंपत्ति भोगिली स्वप्नीं ॥ तोचि देह जागृतीसिं कोदंडपाणी ॥ जाण नयनीं नदिसे ॥ ९२ ॥ अथवा सुषु-प्तीसींहि भेटतां ॥ तरी तो साच मानिजेतां ॥ कोठेंही उप²लब्धी पावतां ॥ नदिसे ताता क्षणभरी ॥ ९३ ॥ तै-साचि हा देह मंगळमूर्ती ॥ जागृतीसिं भासे सत्यत्वें व्य³क्ती ॥ तोचि पाहतां स्वप्न सुषुप्ती ॥ कोणेंही अर्थी भासेना ॥ ९४ ॥ अगा जे कीं सत्य वस्तु असे ॥ ते काळत्रयींहि साचचि दिसे ॥ जें कोणें काळें बाधलें नसे ॥ तेंचि वसे सर्वदां ॥ ९५ ॥ देह तरी येकेंचि काळें भासे ॥ स्वप्नीं तो आनचि आभासे ॥ सुषुप्तीसिं तरी कांहींच नसे ॥ तरी तें सत्य कैंचें सांगपां ॥ ९६ ॥ जैसाचि स्वप्नींदेहभ्रम भासे ॥ तो जागृतीसिं कोठेंचि नदिसे ॥ जा-गृतीसिं तैसाचि देहही असे ॥ परि विचारें भ्रंशे मिथ्यापणें ॥ ९७ ॥ हा अध्य⁴स्त असे स्वस्वरूपीं ॥ ह्मणो-नि आत्मत्वें भलताचि आरोपी ॥ अविचारित सिद्धि जीवस्वरूपीं ॥ विचारेंचि भ्रमरूपीं असत्यचि हा ॥९८॥ अगा त्या असत्यासीं असत्यपणें ॥ देखतां काय होय उणें ॥ असत्याचें नाहींपणें ॥ हानि कोणें गुणें होय ॥ ॥ ९९ ॥ देह हा असत्यपणें देखतां ॥ वासना मात्र नुपजती गा रघुनाथा ॥ देहाचे नाशें जग नासतां ॥ होय तत्वतां रामचंद्रा ॥ ३०० ॥ अगा विश्व हें असत्य भासतां ॥ स्वतःसिद्ध ब्रह्म ये हाता ॥ स्वयेंचि बाणे पूर्णता॥ नलगे कथा साधनाची ॥ १ ॥ अगा मुख्य स्वस्वरूपा आड ॥ देहादि प्रपंचाचें पडिलें कवा⁵ड ॥ तेंचि नाहीं

१ स्वप्नक्रीडेमध्यें. २ प्राप्ती. ३ आकार. ४ काल्पनिक, सूक्ष्म. ५ पडळ, आच्छादन.

जालिया उघड ॥ सुख उदंड सच्चिदानंद ॥ २ ॥ यालागीं गा श्रीरघुपती ॥ देहबुद्धी हे खोटी सर्वार्थीं ॥ हे आहे तों स्वस्वरूपप्राप्ती ॥ कदा कल्पांतीं घडेना ॥३॥ तयालागीं इतुकेंचि करावें ॥ आह्मीं सांगों तें दृढ धरावें ॥ धरिल्या इतुकेंचि स्वभावें ॥ स्वसुख आघवें पावशील ॥ ४ ॥ श्लोक ॥ देहोहमितिधीस्त्याज्यासर्वनाशेप्युपस्थिते ॥ पोष्ठव्यास्तनभवनेश्वमांसेनेवपुल्कसी ॥ १३ ॥ टीका ॥ ह्मणोनि देह मीच ऐसी बुद्धी ॥ आत्मयासीं लागली क्षयव्याधी ॥ ते सर्वथा त्यजावी गा त्रिशुद्धि ॥ निरंतर आंधी ते खोटी ॥ ५ ॥ अगा जिये देहात्मबुद्धीकरून ॥ अनर्थ कोटी अति दारुण ॥ होती तियेतें संग्रहून ॥ कार्य कोण रघुवर्या ॥६॥ अगा ब्रह्मकल्पाचिया कोटी ॥ पडावें जन्ममृत्युच्या वाटीं ॥ ते देहबुद्धी सर्वथा खोटी ॥ त्यजीं जगजेठी मुळींहुनी ॥ ७ ॥ नाहो देहबुद्धीनें सर्व व्यवहार ॥ देहबुद्धीनें होय संसार ॥ देहबुद्धीनें पुत्र वित्त गृह दार ॥ सुखसंभार देहबुध्या ॥८॥ हे देहबुद्धीनें जप तप अनुष्ठान ॥ देहबुद्धीनें यज्ञ दानादि साधन ॥ देहबुद्धीनें देव देवतार्चन ॥ परलोकगमन देहबुध्या ॥ ९ ॥ ते देहात्मबुद्धी टाकितां ॥ इत्यादिक सर्व नासे सर्वथा ॥ तरी त्यजावी कैसी जी महंता ॥ सांगणें ताता कृपाकरुनी ॥ ३१० ॥ तंव वसिष्ठ ह्मणती गा रघुपती ॥ जरी सर्व नाशाची झाली उपस्थिती ॥ तरी हे त्यजावी गा सर्वार्थीं ॥ नको सुमती थारा देऊं ॥ ११ ॥ अगा निरंतिशय लाभाकारणें ॥ अल्प लाभ लागे टाकणें ॥ इत्यादि लाभ नव्हती मूर्खपणें ॥ व्यर्थ करणें काळक्षेप ॥ १२ ॥ तो काळक्षेप ऐसा जाण ॥



१ बहुत, फार. २ निश्चयें करून. ३ रोग. ४ द्रव्य. ५ प्राप्ती. ६ अतिशय मोठ्या. ७ वेळघालविणें.

स्वसुखा सांडूनियां संपूर्ण ॥ बाह्यार्थ करी कर्माचरण॥काळक्षेप याचें नाम ॥१३॥ यातेंहि वासना ह्मणिजेती ॥ येहीं होय पुनरावृत्ती ॥ अज्ञानीयासि याची परम प्रीति ॥ ज्ञानी मानिती अंतरायभूत ॥१४॥ तेहि सांगों रघुनाथा ॥ इया वासनांची समूळ कथा ॥ येक शुद्धा येकी मळीन ताता ॥ तेंचि आतां सांगेन ॥ १५ ॥ मळिना त्या संसारभावना ॥ सर्वदां त्या विषयवासना ॥ आणि विषयीं प्रीति ते रघुनंदना ॥ मळिना वासना जाणाव्या ॥१६॥ शुद्धा त्याही द्विप्रकार ॥ सांगेन त्यांचाहि विस्तार ॥ येकी मळिना येकी शुद्धतर ॥ भेदांतर परियेसी ॥१७॥ संध्या स्नान देवतार्चन ॥ जप तप यज्ञ अध्ययन ॥ तीर्थाटण अतिथिपूजन ॥ इच्छा पूर्ण हें करावया ॥१८॥ इत्यादिकी त्या शुद्ध वासना ॥ परि शुद्धांमध्येंहि मलीना ॥ शुद्धतर ते रघुनंदना ॥ जे विचारणा महावाक्याची ॥ १९ ॥ करावें वेदांतश्रवण ॥ गुरुमुखें महावाक्य परिसीलन ॥ समाधिसुखें सुख करून ॥ अनिह पूर्ण बैसावें॥२०॥हे शुद्धतर वासना ॥ लक्षण जाण गा रघुनंदना ॥ स्वसुखें राहावें आनंदघना ॥ अनित्य सर्व वासना टाकूनियां ॥ २१ ॥ बृहद्वासिष्ठ संमती ॥ सांगो एकें कल्याणमूर्ती ॥ तेचि धरोनियां चित्तीं ॥ स्वरूपस्थिती असावें गा ॥ २२ ॥ संमतिश्लोक ॥ कालंयज्ञतपोदानंतीर्थदेवार्चनंभ्रमैः ॥ चिरमाधिशतोपेताःक्षपयंतिमृगाइव ॥ ६ ॥ तस्मादेतांपरित्यज्यदुर्दृष्टिंरघुनंदन ॥ शुद्धसंवितिमाश्रित्यवीतरागःस्थिरोभव ॥ ७ ॥ टीका ॥ अगा मानसिक दुःखें अपरिमित ॥ तेणें आहाळे ज्याचें चित्त ॥ तेचि हे यज्ञदानादि आचरत ॥ आपणा

१ अडथळा. २ विचार. ३ इच्छेरहित. ४ असंख्य. ५ दुःखपावे.

मानित सदाचारी॥२३॥ जैसीं मृगें वनामाझारीं ॥ काळक्षेप करिती नानापरी ॥तैसीच हे इत्यादि धर्माचारीं॥ करिती संसारीं काळक्षेप ॥ २४ ॥ येणें पुनरपि प्राप्त संसृती ॥ परि अखंडैक आनंद नेणती ॥ वृथाचि धर्मपरायणें श्लाघ्यंती ॥ चवी नेणती ब्रह्मानंदाची ॥ २५ ॥ तूं हे दुर्दृष्टी टाकुनी ॥ निमग्न होसी ब्रह्मानंदस्थानीं ॥ न लगे आचारसोसणी ॥ सुखें सुखपणीं असावें ॥ २६ ॥ श्लोकसंमतिवार्तिक ॥ यत्सुखंसाधनाधीनंदुःखमेवतदुच्यते ॥ अनन्यसाधनंतस्मात्स्वात्मस्थंपरमंसुखं ॥ ८ ॥ टीका ॥ साधनसुख तें सुख भासतां ॥ परि तें सुख नव्हे गा सर्वथा ॥ हें वासनाकृत्यचि गा रघुनाथा ॥ निर्वासनता ते दुर्लभ ॥ २७ ॥ हें सर्व देहबुद्धीस्तव घडे ॥ देहबुद्धीनें संसार जोडे ॥ सत्कर्मादिक कोडें ॥ होय घडफुडें देहबुद्धया॥२८॥ ह्मणोनि जरी सर्व नाश झाला ॥ तरी इयेचा त्याग पाहिजे केला ॥ मीच देह ह्मणतां घात संचला ॥ आपला केला आपणची ॥२९॥ ऐशा कल्प कोटी जरी जाती ॥ तरी जन्ममरणें नसरे संतती ॥ तितकीयाहि आत्महत्या होती ॥ ऐसेनि निष्कृती केसी रामा ॥ ३३० ॥ असंख्य गोवधाचें वृजिन ॥ तैसेंचि आत्महत्येचें दारुण ॥ होय तयासीं गा संपूर्ण ॥ देहो हे जाण बुद्धि जयाची ॥३१॥ यालागीं भव्य जो सज्ञान ॥ तेणें देहात्मबुद्धी हे परम हीन ॥ न पोसावी त्यजावी जाण ॥ दृष्टांत सांगेन परियेसी ॥ ३२ ॥ श्वानाचेनि मांसें अत्यादरें ॥ पुल्कंसी पोसिजे जैसी गर्वारें ॥ तैसी देहबुद्धी अहंकारें ॥ वासनांतरें पुष्टि कीजे ॥३३॥ अगा चांडाळामध्यें नीच याती ॥ तियेतें पुल्कसी ह्मणती ॥

१ जन्ममरण. २ मोठेपणा मिरवितात. ३ गूढ. ४ त्वरित. ५ निरास, जन्ममरणाचा परिहार. ६ पातक. ७ चांडाळीन. ८ मूर्खानें.

तियेतें सडलेनि श्वानमांसें पोशिती ॥ काय निवती तेणेंकरूनी ॥ ३४ ॥ पुल्कसी चांडाळिणी निर्दय सर्वार्थी ॥ दर्शनें सचैल स्नान करिती ॥ तियेतें आलिंगोनि पहुडों येती ॥ कोणें अर्थी शुद्धता येईल ॥ ३५ ॥ यालागीं देहात्मबुद्धी गा रघुनाथा ॥ दूरी त्यजावी सर्वथा ॥ इतुकेनि सर्व कार्यार्थ ह्याता ॥ आला तत्वतां भरथाग्रजा ॥ ॥ ३६ ॥ यालागीं हे देहबुद्धी सर्वथा खोटी ॥ देहबुद्धीनें वासना लाठी॰ ॥ देहबुद्धीनें संसार लागे पाठीं ॥ यातना मोठी देहबुद्ध्या ॥३७॥ देहबुद्धि ज्ञानाचें पिधान॰ ॥ देहबुद्धी मुख्य तेंचि अज्ञान ॥ देहबुद्धीनें संसार दारुण ॥ नरक पूर्ण देहबुध्या ॥ ३८ ॥ देहबुद्धी स्वरूप आच्छादक ॥ देहबुद्धी ज्ञानाची घातक ॥ देहबुद्धी तोचि नरक ॥ तुच्छ देख देहबुद्धी ॥ ३९ ॥ किंबहुना गा धनुर्धरा ॥ देहबुद्धीनें संसारपरंपरा ॥ देहबुद्धी हिंडवी योनिद्वारा ॥ अनर्थ पसारा देहबुद्धी ॥ ३४० ॥ ह्मणोनि देहबुद्धी हे विबुधपती ॥ सर्वथा टाकावी गा सर्वार्थी ॥ देहबुद्धीत्यागें सुखसंपत्ती ॥ सीतापती पाविजे कीं ॥४१॥ तंव राम ह्मणती जी श्रीगुरूराया ॥ देहात्मबुद्धीतें टाकूनियां ॥ मग काय करावें बैसोनिया ॥ सांगावें स्वामियां कृपाकरुनी ॥ ४२ ॥ तंव वसिष्ठ ह्मणती गा आनंदमूर्ति ॥ सांगेन कर्तव्य तेंचि तुजप्रती ॥ देहबुद्धीयोगें सुमती ॥ जिये स्थिती असावें ॥ ४३ ॥ श्लोक ॥ ब्रह्मैकभावयन्साधुःशांतस्तिष्ठन्गतव्यथः ॥ ततस्तेसावहंभावःस्वयमेवविनश्यति ॥ १४ ॥ टीका ॥ तरी ऐकें रघुकुळटिळका ॥ सांगेन कर्तव्यतेचा उपाय निका॰ ॥ तरी येक ब्रह्मभावनाचि देखा ॥ नेणे आणिका प्रपंचासीं॥

१ निजण्यासाठीं. २ बळकट. ३ आच्छादन. ४ खरा, चांगला.

॥ ४४ ॥ अगा शास्त्रदृष्टांतेंकरून ॥ कळलें प्रपंचाचें मिथ्यापण ॥ सर्वत्र येक ब्रह्म परिपूर्ण ॥ तेचि खुण जाणावी ॥ ४५ ॥ तेणें सर्वदां सर्वत्र ब्रह्म येक ॥ हेचि भावना करावी देख ॥ न्‍हावें कदां प्रपंचोन्मुख ॥ अनेकीं येक परब्रह्म ॥ ४६ ॥ आणीक भावना शब्दें तद्रूपता ॥ साधावी गा रघुनाथा ॥ सर्व ब्रह्मभावेंचि तत्वतां ॥ सीताकांता असावें गा ॥ ४७ ॥ ऐसी निरंतर करावी ब्रह्मभावना ॥ तेणें काम क्रोध नासती ततक्षणा ॥ बुद्धीसीं शांति उपजे सहस्रगुणा ॥ विपरीत भावना नासती ॥ ४८ ॥ देहादि प्रपंचाचें सत्यत्व भान ॥ न्‍हे तेंचि शांतिलक्षण ॥ ब्रह्मदृष्टी प्रपंचाचें अभान ॥ नदेखे स्वप्न विश्वभ्रमाचें ॥ ४९ ॥ आणि जेंव्हांचि प्रपंचाचें भान गेलें ॥ काम क्रोधहि मावळले ॥ तेंव्हांचि सकळ वृथा उबंडले ॥ दुःखादि गेले भोग त्याचे ॥३५०॥ अगा प्रपंचाचें भान नसतां ॥ सुखदुःखाची कैंची व्यथा ॥ ह्मणोनि गतव्यथु तो सर्वथा ॥ नाहीं तत्वतां व्यथा लेशु ॥ ५१ ॥ राग द्वेष जेथें मावळले ॥ जगाचें सत्यत्व जेथें गेलें ॥ तेथें सुखदुःख व्यथा कोणें बोलें ॥ बाधीत झाले सर्व जन ॥ ५२ ॥ अधिभूत अधिदैवत अध्यात्मिक ॥ त्रिविध जाण हें सुखदुःख ॥ तेंहि सांगों गा सम्यक ॥ एकाग्र ऐक रघुनाथा ॥ ५३ ॥ तरी भूतांपासुनि जें जें उपजे ॥ तेंचि अधिभूत दुःख जाणिजे ॥ देवीं जो जो उपद्रव कीजे ॥ अधिदैवत सहज त्याचें नाम ॥ ५४ ॥ देहीं ज्वरादि उपद्रवमेळा ॥ तें अध्यात्मिक दुःख गा वेल्हाळा ॥ हा त्रिविध दुःखाचा येकवळा ॥ न्‍हे कोणें काळीं तयासीं ॥ ५५ ॥ कां जें जें

१ भास. २ नष्टझाले. ३ दुःखविरहित. ४ सत्य चांगलें.

हि सुखदुःख द्यावें ॥ अथवा जेणेंकरूनियां भोगावें ॥ तें बाधित झालें आघवें ॥ दुःख मानावें कोणें
कोणाचें ॥ ५६ ॥ यालागीं तो गतव्यथु झाला ॥ तेथें अहंभाव स्वयेंचि नासला ॥ सर्व ब्रह्मभा-
वचि बाणला ॥ अहंभाव गेला गळोनी ॥ ५७ ॥ जया सर्वत्र ब्रह्मभाव होये ॥ त्याचा अहंकार समूळ
जाये ॥ सूर्यअस्तवेंचि मावळताहे ॥ प्रकाश पाहें क्षणमात्र ॥ ५८ ॥ जेव्हां देहानुसंधान ब्रह्मभावें ॥ तुटोनि
गेलें पैं आघवें ॥ तेव्हांचि अहंभाव हा नसंभवे ॥ स्वयेंचि पावे नाश समूळीं ॥ ५९ ॥ श्लोक ॥ सर्वत्रैक्यावबो-
धेनस्वस्थांतःशीतलःसदा ॥ निरहंकृतिराकाशोविषदस्तेनसंस्थितः ॥ १५ ॥ टीका ॥ ऐसा सर्वत्रैक्यावंबाधेंकरु-
नी ॥ सर्वदां अंतर शीतळ मानी ॥ स्वस्वरूपीं स्थिरावोनी ॥ राहे निर्वाणीं ब्रह्मसुखें ॥ ३६० ॥ तेणेंचि सुखें अं-
तरीं शीतळ ॥ नेणे द्वैतदुःखाची तळमळ ॥ बोधल्याचें सार्थक फळ ॥ तो कीं प्रांजळ ऐक्यावबोधु ॥ ६१ ॥ देहा-
दि जे कां प्रपंचजात ॥ हे तयाठाईं सर्व अध्यस्त ॥ तें तेंचि जाणावें समस्त ॥ नाहीं व्यतिरिक्त तयाविण ॥ ६२ ॥ अ-
गा जें त्याच्याठाईं असे अध्यस्त ॥ तें तें जाणावें इत्थंभूत ॥ जैसें आपुल्याठाईं स्वप्न अध्यस्त ॥ नव्हे व्यतिरिक्त आ-
पणासीं ॥ ६३ ॥ आपणेवीण तरी नभासे ॥ प्रबोधिलिया कोठेंचि नदिसे ॥ तरी आपणचि सर्व असे ॥ दुजें नसे तें ऐ-
क्य जाण ॥ ६४ ॥ शुक्तिंच्याठाईं रजत भासे ॥ रजत तें शुक्तिकाचि असे ॥ परंतु परस्परें भेद नदिसे ॥ ऐक्य तैसें
जाणावें ॥ ६५ ॥ रज्जुचि स्वयें व्याळरूप झाली ॥ परि रज्जु ते रज्जुचि भली ॥ सर्पबुद्धी वावो झाली ॥ ऐक्यबो-

१ सर्वब्रह्म. २ स्पष्ट. ३ भ्रमानें कल्पिलेले. ४ निराळा. ५ सविस्तर. ६ ज्ञान झालिया. ७ शिंपी. ८ रुपें. ९ सर्परूपानें.

ली तैसी असे ॥ ६६ ॥ तैसें आपणासहित ब्रह्मेसीं ॥ ऐक्य बोधलें गा जयासीं ॥ नस्फुरे विश्वद्वैतभाव तयासीं ॥ ऐक्यता ऐसी रघुवर्या ॥६७॥ ऐसा ऐक्यबोधें जो बोधला ॥ तोचि अंतरीं शीतळ भला ॥ निरहंकृति आतळला ॥ कूटस्थ संचला आकाश जैसें॥६८॥ तोचि तो ऐक्यावबोध जाण ॥ जेणें झाला होय परिपूर्ण॥जैसें कूटस्थ नि-रीहगगन ॥ तैसा पूर्ण पूर्णत्वें॥६९॥ तया सर्व ब्रह्मचि येक झालें ॥ दुसरें नभासे कांहीं केलें ॥ स्वयें ब्रह्म ह्मणो-नि आतळलें ॥ ब्रह्म संचलें तया येक ॥ ३७० ॥ स्वयें ब्रह्म तोचि विश्वमूर्ती ॥ आनंदरूप झाली तया त्रिजग-ती ॥ द्वैत देखे त्या द्वैतदुःखस्थिती ॥ आपणा देखती दुःखरूप ॥ ७१ ॥ अगा जैसा जो अंतरीं असे ॥ तैसेंचि तया बाह्यही भासे ॥ हें निश्चित जाणावें रघुवंशें ॥ सावकाशें सांगेन ॥ ७२ ॥ श्लोक ॥ अंतः शीतलतांयाति लब्ध्वायांशीतलंजगत॥ अंतस्तृष्णोपतप्तानांदावदाहभयंजगत॥१६॥टीका॥ अगा ऐक्यावबोधेंकरून॥ शीतळ-अंतर जयाचें जाण ॥ तया जग शीतळ परिपूर्ण ॥ ब्रह्मत्वें जाण सुखरूप ॥७३॥ सकळ वासनेचेनि उपॅरमें ॥ अं तरीं कोंदलें परब्रह्म॥तया सकळ ब्रह्मचि संभ्रम ॥ गेलेनिभ्रम ऐसें होय ॥७४॥ आणि अंतरीं तृष्णाग्नीकरुनी ॥ तापला जैसा वडवाग्नी ॥ तया दाव दाहरूप जग नयनीं ॥ त्रिकाळ क्षणीं भासत ॥ ७५ ॥ यालागीं सर्व सं-सार रघुनाथा ॥ असे जाण वासनेच्या माथां ॥ वासनाक्षयें जीवन्मुक्तता ॥ बाणे तत्वतां जाण तूं ॥७६॥ येथें संपलें हें प्रकरण ॥ जें कीं बोलिलें वासनोपशमन ॥ तयाचें यथामति टिपण ॥ केलें दीपन सद्गुरुकृपा ॥ ७७ ॥

१ प्राप्तझाला. २ अविकारी. ३ इच्छारहीत. ४ लयानें. ५ व्यवहार.

सद्गुरूचिया कृपादृष्टी॥रंगनाथें बोलिली हे ब्रह्म गोष्टी ॥ जेणें होती संत संतुष्टी ॥ स्वानंद पुष्टी पातले॥७८॥ सद्गुरूचरण कमलयुगुळ ॥ वरी भ्रमे[1] रंगनाथ अळिउळ ॥ पुढील ग्रंथ अति रसाळ ॥ श्रोतीं सकळ परिसिजे॥७९॥ श्रीगुरूचा रंगनाथु ॥ श्रोतां विनवीत विनीत स्थितु ॥ पुढें आत्मोपास्ति विख्यातु ॥ प्रकरण असे ॥ ३८० ॥ ते कथा असे अतिरम्य ॥ श्रोतां ऐकिजे अनुपम्य ॥ वसिष्ठ राघव संवाद गहन ॥ अद्वैत आनंद जो ॥३८१॥ ॥ इतिश्रीयोगवासिष्ठसारेवसिष्ठरामसंवादेवासनोपशमनंनामचतुर्थप्रकरणंसमाप्तं ॥ ४ ॥ ॥ वोव्या ॥ ३८१ ॥ मूळ ॥ १६ ॥ संमति ॥ ८ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

---

[1] भ्रमर.

॥ इति श्रीयोगवासिष्ठसारे चतुर्थं वासनोपशमनप्रकरणं समाप्तम् ॥

## ॥ अथ श्रीयोगवासिष्ठसारे पंचमआत्ममननप्रकरणप्रारंभः ॥



श्रीगणेशायनमः ॥ श्रीगुरवेनमः ॥ ॥ जयजयश्रीसद्गुरुमूर्ति ॥ तूं अव्यक्तचि आलासि व्यक्ती॥ तूंचि कृपाळु त्रिज-
गतिं ॥ माझी भ्रांती फेडावया ॥ १ ॥ तुझिया चरणाब्जदर्शनें ॥ उठिलें अविद्येचें धरणें ॥ परमानंद सर्वदां
भोगणें ॥ तो बोलावा कोणें स्वसंवेद्य ॥ २ ॥ तो तूं सच्चिदानंदमूर्ति ॥ सन्मुख झालासि सहजस्थिती ॥ स्व-
स्वरूप वर्णावया भारती ॥ ग्रंथव्यक्ति वदविली ॥ ३ ॥ नातरी कोणी ऐसें ह्मणती ॥ प्रथमारंभीं मंगळमूर्ति ॥
वंदावा मंगळार्थ गणपती ॥ ग्रंथसमाप्ति अविघ्न तेणें ॥ ४ ॥ त्यानंतरें वाग्देवता ॥ जे कीं बोलिजे जगन्माता ॥
कार्यसिद्धी तियेसीं वंदीतां ॥ परंपरागत ऐसी असे ॥ ५ ॥ ह्मणोनि प्रथम मंगळाचरणीं ॥ वंदावी हे विघ्नेश-
भवानी ॥ हें यथार्थचि परी माझ्या मनीं ॥ अनुदिनीं आनचि वसे ॥ ६ ॥ पाहातां गणेशाची मूर्ती ॥ सर्वस्वें
तूंचि होसी व्यक्ती ॥ तैसीच शारदा मंगळमूर्ती ॥ तूंचि सर्वार्थीं भाससी ॥ ७ ॥ तुजव्यँतिरिक्त देवतांतर ॥
नभासे हें आश्चर्य थोर ॥ तूंचि तूं सर्वत्र निरंतर ॥ भेदांतर तेथें कैंचा ॥ ८ ॥ हें स्वयुक्ति वाचाबळें ॥ जरी मी
उपचारपणें बोलें ॥ तरी यदर्थींच तुझीं दिव्यपाउलें॥जिव्हा गळे जरी उपचारकरी॥९॥ यालागीं सर्वदां सर्वत्र
पाहे ॥ तंव अंतर्बाह्य तूंचि तूं आहे ॥ तुजवीण नदेखे त्रैलोक्य हें ॥ साच पाहें कोठेंही॥१०॥ स्वामी मृगजळा-
चिये परी ॥ विश्वाभास होय मृगजळ लहरी ॥ ब्रह्मादि मुख्य सुरवरीं ॥ तरंगलहरी होइजे ॥११॥ साचपणें
तूंचि येकु ॥ येकपणें तूंचि अनेकु ॥ सर्व तुजवांचूनि अवलोकु॥येकायेकु नभासे मज॥१२॥अवस्थात्रंई सर्वदां ॥

१ निराकार. २ आकारास, उदयास. ३ अज्ञानाचें. ४ ज्ञानस्वरूपवस्तु. ५ वाचा. ६ सरस्वती. ७ वेगळें. ८ गौरव. ९ जागृती, स्वप्न, सुषुप्तींत.

तूंचि भोगविसी परमानंदा ॥ भोग्य भोगणें या आस्वादा ॥ टाकूनि मर्यादा अमर्याद तूं ॥ १३ ॥ भोक्ता भो-
ग्य भोगणें॥या तिहींचें जेथें विंसावणें॥तेंचि तूं सच्चिदानंदपणें॥सर्वदां भोगणें म्यां स्वामी॥१४॥तेथें दुजयाची
कैंची मातु ॥ दुजें बाधुनी तुंचि भासतू ॥ तुजवीण नपुरे उसंतु ॥ सर्वत्र तूंचि मजलागीं॥१५॥दुजेपणें तें दृश्यजा-
त ॥ भासतां तत्काळ होय बाधित ॥ भेटी वास्तवरूपीं निश्चित ॥ होय निभ्रांत तुजसींच ॥ १६ ॥ सत्कर्मादि
धर्म आचरतां ॥जप यज्ञ दान तप तीर्थ व्रतां ॥ संध्या स्नानादिक कर्म करितां ॥ तूंचि सर्वदां भाससी॥१७॥ आ-
णिकही धर्म मानिती चित्ता ॥ अर्चि पूजी भावादि देवता ॥ अथवा अश्वत्थादि स्थावरांतां ॥ गौस्पर्शता इ-
त्यादि॥१८॥तेथें तुजवांचोनियां दुसरें ॥ मज नभासे गा निर्धारें ॥ तुझिया स्वरूपाचेनि विसरें॥होय पुरें ह्मणो-
नि बैसे ॥ १९ ॥ तंव तो विसरूचि उफराटा ॥ स्मारकूचि होय मोठा ॥ हें लाघव भोगितां ब्रह्मनिष्ठा ॥ दृश्य
वाटा मोडिती ॥२० ॥ किंबहुना माझें मीपण ॥ भासतांही देहभान ॥ मिथ्यात्वेंचि प्रतीयमान ॥ फावे पूर्ण स-
त्यत्वें तूंचि ॥२१॥ ऐसें काय नेणों मज केलें ॥ तुवांचि ये दशेसि आणिलें॥पाहों बैसे तों आंतळे ॥ तुवां कोंदलें
ब्रह्मांड हें ॥ २२ ॥ ऐसे सकळ इंद्रियांचे व्यापार ॥ श्रवण दर्शनादि व्यवहार ॥ करणग्राह्य पदार्थ प्रकार ॥
तूंचि सर्वत्र भाससी ॥ २३ ॥ ऐसियासीं मी काय करूं ॥ नभासे आणिक प्रकारू ॥ तूंचि येक सर्वेश्वरु ॥ बाह्य
अंतर व्यापिसी ॥ २४ ॥ यालागीं दुसरें देवतांतर ॥ नभासे सर्वथा साचार ॥ आणि मनोवृत्ती तदाकार ॥ ना-

१ रुचि, गोडी. २ विश्रांतीपावतात. ३ विसांवा. ४ खरोखर. ५ निश्चित. ६ वृक्षादिकानां. ७ गाई. ८ स्मरणकरणारा. ९ अनुभव. १० माप्तहोई.

नाकार नव्हेती ॥२५॥ मन लांचावलें तुझ्या पाईं ॥ आणिक गोडी नेणें कांहीं ॥ ह्मणोनि तूंचि वंदनीं पाहीं॥ मंगळार्थ कार्यीं प्रवर्ते ॥ २६ ॥ इतर देवांचे स्वरूपीं ॥ बळेंचि मी मनातें आरोपीं॥ पाहे तों केधवां तुझ्या स्वरूपीं ॥ आपण निक्षेपि लांचावलेनी ॥ २७ ॥ यालागीं जो जो चिंती उपावो ॥ तो तुझ्याचि स्वरूपीं करी सद्भावो ॥ ह्मणोनि सकळ इंद्रियीं निर्वाहो ॥ केला ठावो विश्रांतिसीं ॥ २८ ॥ मनें जें जें चिंतु जाये ॥ तें तें तूंचि येक वास्तव्य आहे ॥ चक्षुरिंद्रिय जें जें पाहे ॥ तें देखतजाये तुज येकातें ॥ २९ ॥ ऐसिया सर्वेंद्रियांच्या वृत्ती ॥ तुजचि घेऊनियां उठती ॥ तुजवांचुनी नाहीं प्रवृत्ती ॥ कोणें अर्थीं अगाधरूपा ॥ ३० ॥ तुजचि पासाव इंद्रियप्रवृत्ती ॥ तुजचि आलिंगूनियां उठती ॥ तुजवेगळी अकिंचित्करगती ॥ सर्वांहि अर्थीं सर्वांची ॥ ॥ ३१ ॥ आणिक अर्थ ऐसा शास्त्रसिद्धांतीं ॥ आत्मा नालिंगनी इंद्रियवृत्ती ॥ नकरितां पदार्थीं प्रवृत्ती ॥ महामती सांगेन ॥ ३२ ॥ यदर्थीं श्रीमत्सुरेश्वर ॥ आचार्यांमाजी आचार्य थोर ॥ बोलिले तो अर्थविचार ॥ असे साचार ऐसाची ॥ ३३ ॥ संमतिवार्तिक ॥ प्रत्यगर्थमनालिंग्यनपराग्वर्तिकिंचन ॥ विज्ञानंजायतेयस्मादात्मोपास्तिसदाततः ॥ १ ॥ टीका ॥ इंद्रियांच्या ज्या ज्या वृत्ती ॥ त्या त्या स्वरूपापासाव उठती ॥ आत्मयाविण जड स्थिती ॥ कांहीं नचलती करणें हें ॥ ३४ ॥ जें जें होय पदार्थस्फुरण ॥ ते स्फूर्ती उठे आत्मयातें आलिंगून ॥ कोणीच अर्थ नघडे त्यावांचून ॥ ह्मणोनि भजन सर्वदां घडे ॥ ३५ ॥ आत्मयापासाव विज्ञान होये ॥ ह्म-

---

१ कल्पनाकरीं. २ खरीवस्तु. ३ डोळे. ४ प्रपंच, गति, मार्ग. ५ किंचित् अन्यगति नाहीं असी, शून्य.

णोनि आत्मोपास्ति सर्वदां आहे ॥ परि नेणोनियां येवढें हें ॥ अज्ञानि वायें धाडिताती ॥ ३६ ॥ तैसें नव्हे स्वामि तुझेनिबोलें ॥ स्मृतिरूपचि मजला तुवां केलें॥तेथें तूतें विसरें कोण्या बोलें ॥ येर तें नकळे तुजवीण ॥ ॥ ३७ ॥ आतां श्लोकाचा प्रकटार्थु ॥ सांगों जैसा असे यथार्थु ॥ प्रत्यक् शब्दाचा फलितार्थु ॥ इत्थंभूत असे ऐसा ॥ ३८ ॥ देहेंद्रियेंसिं विलक्षण ॥ देहेंद्रियांच्या निराशें जाण ॥ स्वयें प्रकाशे प्रकाशमान ॥ प्रत्यक् पूर्ण तेंचि होय ॥ ३९ ॥ तयातें नालिंगुनि इंद्रियवृत्ती ॥ सर्वदां विषयाकार नव्हती ॥ विषयज्ञानाची नव्हे स्फूर्ती ॥ तयावीण स्थिती नव्हे तेही ॥ ४० ॥ आधीं ब्रह्माकार वृत्ति होय ॥ बाह्य पदार्थ कोंटाळित जाय ॥ प्रथम ब्रह्म स्फुरणें उठणें जें आहे ॥ उपास्ति होय तेंचि वरिष्ठ ॥४१॥ ह्मणोनि बाह्य सेवा ते गौण ॥ मुख्य सेवा ते आत्मानुसंधान ॥ ते होतसे वृत्त्युपरतीनें ॥ हेंचि खुण ज्ञातयाची ॥ ४२ ॥ ह्मणोनि सकळ इंद्रियवृत्ती ॥ आणि इंद्रियें जे जे पदार्थ घेती ॥ ते ते जाण तुझी उपास्ति ॥ आनंदमूर्ती श्रीगुरुराया ॥ ४३ ॥ माझीं सकळ इंद्रियें जाण ॥ नस्पर्शती तुजवांचुन ॥ यालागीं तूंचि तूं सेव्य संपूर्ण ॥ नाहीं आन गुरुवर्या ॥ ४४ ॥ जैसें पतिव्रतेचें अंतर ॥ नेणे सर्वथा पुरुषांतर ॥ स्वपतिवीण इंद्रिय व्यापार ॥ कोणें प्रकारें ननिपजे ॥ ४५ ॥ तैसीं लांचावोनि इंद्रियें माझीं ॥ उपास्ति करिती सर्वदां तुझी ॥ अन्य स्पर्शतां व्यभिचारवोझीं॥बुडे समाजीं वृजिनांच्या॥ ॥४६॥ आणिकही येक कारण ॥ देवतांतरें बाह्यचि जाण ॥ तीं करिती विघ्नादि विदारण ॥ परि प्रेरण अंतरीं

१ उपासना, भक्ति. २ तात्पर्य. ३ सविस्तर. ४ आठवण. ५ नीच. ६ भक्ति करण्यासयोग्य. ७ पापाच्या.

नकरवे ॥ ४७ ॥ जो किं साक्षि सर्वांचें अंतर ॥ तोचि तो बुद्धीचा प्रेरणार ॥ तयावेगळा बाह्य प्रकार ॥ होय नश्वर दृश्यपणें ॥ ४८ ॥ यालागीं आधीं बुद्धीसिं प्रेरिता ॥ होय तरीच स्फुरे कविता ॥ कवित्व नसतां निर्विघ्नता ॥ करी तत्वतां कोण कोणाची ॥ ४९ ॥ मुख्य मुळीं कवित्व स्फुरावें ॥ तरी गणेशें निर्विघ्न करावें ॥ तें नसतां कांहीं नसंभवे ॥ ह्मणोनि बोलावें पडिलें हें ॥ ५० ॥ ह्मणोनि साक्षी तूं सर्वांतर ॥ धिषणाप्रेरक निर्विकार ॥ यालागीं तुजला निरंतर ॥ वंदी साचार सार्वी तूंची ॥ ५१ ॥ वेदांत वदविता सद्गुरूराया ॥ तूंचि येक सर्व स्वामिया ॥ ह्मणोनि ग्रंथारंभीं मीं यया ॥ वंदन पायां तुझ्याचि केलें ॥५२॥ आणि बाह्यही निर्विघ्नकर्ता ॥ गणेश शारदा रूप तूंचि धरिता ॥ ह्मणोनि उभयरूपीं तूंचि तत्वतां॥येकचि अनंता अनेक होसी ॥५३॥ ह्मणोनि तूंचि तूं गणाधिपती ॥ शारदारूपेंहि त्रिजगतीं ॥ निर्विघ्न कर्ता मंगळमूर्ती ॥ तूंचितूं सर्वार्थीं वंद्य मज ॥ ॥ ५४ ॥ यालागीं सर्वदां सर्व कार्यांतरीं ॥ तुज वंदी मी सर्वांपरी ॥ माझें अंतरबाह्य श्रीहरी ॥ पूर्ण करी पूर्णत्वें ॥ ५५ ॥ यालागीं मी तुजवेगळें ॥ नेणे वस्तुता निराळें ॥ तुझेनि पूर्णानंदकल्लोळें ॥ जाकेळिला नकळे आन कांहीं ॥ ५६ ॥ ऐसें बोलतांचि प्रेमेंकरी ॥ प्रगटला सद्गुरू अंतरीं ॥ ह्मणे ग्रंथ वदवीं झडकरीं ॥ ते आज्ञा शिरीं वंदिली म्यां ॥५७॥ तो घेऊनियां महाप्रसाद ॥ आतां ग्रंथ बोलेन विषद ॥ जें कीं ज्ञान नित्य अगाध ॥ ऋषि सिद्ध बोलिले ॥ ५८ ॥ तेंचि प्रकरणानुसंधान ॥ अर्थ बोलिजेल अतिगहन ॥ पूर्वीं झालें वास-

१ बुद्धीचा चालक. २ लहरी. ३ व्यापिला. ४ स्पष्ट.

४१

नोपशमन ॥ तेंही कारण ऐसें असे ॥ ५९ ॥ सद्गुरूदर्शन झालियावरी ॥ गुरू महावाक्य उपदेश करी ॥ तेणें-
चि साक्षात्कार झाला जरी ॥ सिद्धि तरी साधिली ॥ ६० ॥ जरी चित्तमालिन्ये[1] असंभावना ॥ आणि उठती
विपरीत भावना ॥ तरी करावें श्रवण मनना ॥ निदिध्यासना[2] निरंतर ॥ ६१ ॥ अगा मनवासने करितां ॥ अ-
संभावना उठती अनंता ॥ यालागीं वासनेसीं चित्ता ॥ नाश सर्वथा करावा ॥ ६२ ॥ तो नाश करितां मनावा-
सनेसीं ॥ सर्वथा नव्हे अतिप्रयासी ॥ वेदांत गुरूच्याठाईं तयासिं ॥ असे मानसीं अविश्वास ॥६३॥ वेदगुरूनीं
जें उपदेशिलें ॥ विश्व मिथ्या ब्रह्म सत्य जें बोलिलें ॥ तेंचि तुझें स्वरूप असे संचलें[3] ॥ नमन बोले तयाचेनी ॥
॥ ६४ ॥ पूर्वाभ्यासें करुनी ॥ आपणा संसारीं जीव मानी ॥ विश्व सत्यत्वें देखे नयनीं ॥ हेचि करणी मनवास-
नेची ॥ ६५ ॥ त्या मनवासनेची शांती ॥ करितां नव्हे साधनसंपत्ती ॥ येके श्रवणावांचुनि त्रिजगतीं ॥ नदेखि-
जेती कोठेंही ॥६६॥ श्रवणावेगळाही अभ्यास करिती ॥ मनवासनेतें कोंडिती ॥ परि ते साधनेंचि क्लेशी होती ॥
नव्हे प्राप्ति साधनचि त्यां ॥ ६७ ॥ सर्वही शास्त्राचें तात्पर्य ॥ येका ब्रह्माच्याठायीं अन्वयं ॥ वेदगुरु प्रमाण
इतर मिथ्यामय ॥ जग सर्व पाहे श्रवणमात्रें ॥६८॥ श्रवणें ब्रह्मस्वरूप निर्धार ॥ वेदवाक्यासिं प्रमाण थोर ॥
विश्व असत्य मृगांभपूर[4] ॥ माने साचार इत्थंभूत[5] ॥ ६९ ॥ अगा प्रपंच मिथ्या जरी बाणला ॥ तोचि मनाचा ना-
शु संचला ॥ मिथ्याभूतासि कोणाला ॥ वासनामेळा उपजेल ॥ ७० ॥ यालागीं येके श्रवणेंचिकरुनी ॥ मनो-

---

१ मळीनपणा. २ रांत्रदिवस विचार. ३ व्यापी. ४ मृगजळ. ५ सत्य.

नाश वासनाक्षय भर्वसेनी ॥ होती निश्चयें ह्मणोनी ॥ श्रवण अनुदिनीं करावें ॥७१॥ श्रीरामा तोचि उपाय श्रवणाचा ॥ मागां निवेदिला साचा ॥ मनोनाश वासनाक्षयाचा ॥ उपाय साचा बोलिला ॥ ७२ ॥ मनोनाश वासनाक्षय प्रकरणीं ॥ श्रवण सूचिलें अनुदिनीं ॥ गुरूवाक्यें विश्वासुनी ॥ ब्रह्म मी ब्रह्मपणीं नित्य असे ॥७३॥ गुरूवाक्य आणि शास्त्रप्रतिती ॥ श्रवणें ये दोन्ही सिद्धि पावती॥तेंचि निरोपिलें पूर्व ग्रंथीं॥वासनाशांती मनोनाशें ॥७४॥ वेदांतश्रवणें ऐसें होय ॥ प्रमाणासंभावना तत्काळ जाय ॥ वेद आणि गुरु प्रमाण होय ॥ विश्वासु पाहे होय तेथें ॥७५॥ तया वेदवाक्याच्याठाईं ॥ दृढ विश्वास बाणे आनपांई ॥ तेणें शास्त्रान्वय जो ब्रह्मीं पाही॥ होय निश्चयीं बुद्धी तेथें॥७६॥तेणें सर्व ब्रह्म ऐसें कळलें ॥ प्रपंच मिथ्याभूत ऐसें प्रत्यया आलें ॥ परी तें शास्त्राचार्यांच्या बोलें ॥ परि अनुभविलें नाहीं स्वयें॥७७॥शास्त्राचार्यीं विश्वासु झाला ॥ तेणेंचि प्रपंच मिथ्या मानिला ॥ आपण ब्रह्म हा विश्वासु झाला ॥ परि स्वप्रतीतिला नयेची ॥७८॥ तेंचि आत्मप्रतीतिसीं पाहिजे आलें ॥ आणि आपण ब्रह्म ऐसें जें गुरूनें बोलिलें ॥ तें मानिलें तेथें उपजले ॥ संशय भले प्रमेयांसी ॥ ७९ ॥ तेचि ते प्रमेयासंभवना ॥ मीच ब्रह्म कैसें हा संदेह जाणा ॥ उपजला त्यालागीं साधना ॥ आत्ममनना प्रवर्तला ॥ ८० ॥ आपणचि ब्रह्म ऐसी व्यक्ती ॥ आपणासी आलि पाहिजे प्रतीति॥ यालागीं आत्ममननाची प्रवृत्ती ॥ झाली वदती वसिष्ठवाणी ॥ ८१ ॥ युक्तिकरूनि जें अनुचिंतन ॥ आत्मयाचें करणें जाण ॥ त्याचेंचि नाम आ-

---

१ निरंतर. २ पूर्ण. ३ विषयासी. ४ संशय. ५ ज्ञान.

त्ममनन ॥ केलिया पूर्ण प्रतीतिसी ये ॥ ८२ ॥ तया शास्त्रयुक्तीकरून ॥ निश्चय कीजे मी ब्रह्म ह्मणोन ॥ तयाचें नाम आत्ममनन ॥ वसिष्ठ आपण सांगती ॥८३॥ तेंचितें आत्ममनन प्रकरण जाण ॥ प्रवर्तलें येथें संपूर्ण ॥ तेंचि ऐका श्रोतेजन ॥ एकाग्रमनें करूनियां ॥८४॥ आतां येणें प्रकरणेंकरून ॥ निरूपिजेल आत्ममनन ॥ तयापुढें निदिध्यासन ॥ अनुक्रमें पूर्ण निरूपिजेल ॥ ८५ ॥ एवंभूत आत्मा आपण ॥ ऐसें अनुभवासीं येतसे पूर्ण ॥ तया नाम आत्ममनन ॥ तेंचि निरूपण येथें कीजेल ॥ ८६ ॥ अहो आत्मानुभवा आड ॥ असे मनवासनेचें कवाड ॥ तें श्रवणें केलिया उघड ॥ अनुभव अखंड बाणतू ॥८७॥ परि दृढनिश्चय युक्तिकरून ॥ झाला पाहिजेगा संपूर्ण ॥ त्यालागीं करावें आत्ममनन ॥ तेंचि निरूपण परियेसा ॥ ८८ ॥ तेंचि वसिष्ठऋषी रामाप्रती ॥ आत्ममनन अनुवादती ॥ तेंचि ऐका श्लोकसंमती ॥ कृपा संतीं करावी ॥ ८९ ॥ युक्तिकरूनियां निर्धारीं ॥ निश्चय कैसा होय अंतरीं ॥ प्रमेयासंभावना जाय दुरी ॥ निश्चय अंतरीं ऐसा होय ॥ ९० ॥ श्लोक ॥ शुद्धोनिरंजनोनंतोबोधोहंप्रकृतेःपरः ॥ चेष्टमानमिदंदेहंपश्याम्यन्यशरीरवत् ॥ १ ॥ टीका ॥ जो पूर्वीं मनावासनेकरितां ॥ मी देहचि ऐसें ह्मणत होता ॥ तोचि मनोनाशें उद्बोधतां ॥ आत्मा तत्वतां ऐसाचि बोधु ॥ ९१ ॥ अगा नाना युक्तिकरून ॥ नित्य करितां आत्मानुचिंतन ॥ तेणें बाणे मीच आत्मा पूर्ण ॥ ब्रह्म निर्वाण स्वसंवेद्य ॥ ९२ ॥ ह्मणोनि ज्ञानस्वरूप स्वयंबोध ॥ नित्य ज्ञानेकरूनि अगाध ॥ अखंड स्वप्रकाश शुद्धबुद्ध ॥ नित्यानंद गु-

१ पडळ, आच्छादन. २ पुनः बोलतात. ३ विषयसंभावना. ४ जाग्रत होतांच. ५ ज्ञानस्वरूप वस्तु. ६ ज्ञानघन.

णातीत ॥ ९३ ॥ शुद्ध शब्दें स्वप्रकाश ॥ सर्वथा नव्हे मी परप्रकाश ॥ परप्रकाशा होय नाश ॥ मी अविनाश शुद्धपणें ॥ ९४ ॥ तैसा मी जाण निजबोध ॥ स्वप्रकाश अगाध ॥ स्वप्रकाशक नित्य शुद्ध ॥ निर्विवाद अखंड ॥९५॥ सूर्य हा प्रकाशमंत असे ॥ परि अभ्रादि उपाधि तेथें वसे ॥ तैसा नव्हे मी निरुपाधि असे ॥ जाण सर्वांशें सर्वांपरी ॥ ९६ ॥ यालागीं मी निरंजन ॥ अंजन शब्दें उपाधि जाण ॥ तैसेंचि जनरहित करितां व्याख्यान ॥ निरुपाधि पूर्ण घडतसे ॥ ९७ ॥ जन शब्दें प्रपंचजात ॥ जें जें कीजे इंद्रियगृहीत॥ किंबहुना दृश्यजात ॥ दृष्ट-श्रुतार्थ सर्वही ॥ ९८ ॥ तें निःशेष जेथें नसे ॥ तया निरंजन बोलिजेत असे ॥ तो मी निरुपाधिक सर्वांशें ॥ सावकाशें जाणावें ॥९९ ॥ निरुपाधिक जरी झालें ॥ तरी परिच्छेद असे पावलें ॥ ह्मणोनि अनंतपद घेतलें॥ तेंचि भलें परियेसा ॥ १०० ॥ अंत शब्दें नाश त्रिविध ॥ नाहीं जया सर्वथा बाध ॥ तेंचि अनंत शब्दें अ-गाध ॥ नित्य शुद्ध ब्रह्म मी ॥ १ ॥ तोचि त्रिविध परिच्छेद कैसा ॥ सांगों ऐक बोधे तैसा ॥ काळ देशें वस्तुचा ऐसा ॥ हाचि ठसा सर्वत्र॥२॥ त्रिविध परिच्छेदा विरहित ॥ तूर्य परिच्छेद नाहीं निश्चित ॥ परिछेदत्रयें ना-हीं भ्रांत ॥ अबाधित स्वरूप माझें ॥३॥ तरी परिच्छेद कोण कोण ॥ तेंही आतां सांगेन ॥ येक काळ परिच्छेद जाण ॥ वर्ते पूर्ण घटादिकीं ॥ ४ ॥ घट तो येकेकाळें असे ॥ सवेंचि दुसरे काळीं विनाशे ॥ घट तो सर्वथा सत्य नसे ॥ काळें भ्रंशे ह्मणोनियां ॥५ ॥ जे जे देशें काळें वस्तुकरून ॥ परिच्छेद जे वस्तु पावे जाण॥तें तें नश्वर अपूर्ण ॥

१ पाहिलेलें व ऐकिलेलें २ भेद, नाश.

जाण खुण रघुनाथा ॥६॥ आतां देश परिच्छेद तो ऐसा असे॥नैय्यायकाचें मत ऐसें ॥ परमाणु अंशसिद्ध नित्य असे ॥ विनाश नसे कोणें काळें ॥ ७ ॥ महा प्रळई पृथ्व्यादि नासती ॥ परी याचे परिमाणु असती ॥ ते सर्वदां नित्य वर्तती ॥ नाशप्राप्ती असेचिना ॥८॥ मागुती ईश्वरइच्छेकरून ॥ सृष्टी होय जें निर्माण ॥ तें परमाणु येकत्र करून ॥ पृथ्व्यादि आपण स्वयें करी ॥ ९ ॥ हेंही यथार्थचि होय ॥ परि परमाणुसीं देशपरिच्छेद आहे ॥ सूक्ष्मरूपें येकेकाळीं राहे ॥ व्यापक नोहे परमाणु तो ॥ ११० ॥ सूक्ष्मरूप याचें असे अंतीं ॥ तेथें दुसरे स्थळीं कैंची व्याप्ती ॥ ह्मणोनि देशें परिच्छेदती ॥ नाहीं व्याप्ती सर्वत्र ॥११॥ ह्मणोनि तैसा मी नव्हे सर्वथा ॥ मज देशें काळीं नाहीं परिच्छेदता ॥ आतां आकाश नित्य व्यापकता ॥ परिपूर्णता सर्व देशीं ॥१२॥ हेंही यथार्थचि असे ॥ आकाश नित्य व्यापक भासे ॥ परि त्यासीं वस्तुपरिच्छेद वसे ॥ दुसरें असे वस्त्वंतर ॥ १३ ॥ पृथ्व्यादिक पंचमहाभूतें ॥ तैसींच घटपटादि अनंतें ॥ तेणें परिच्छेदलें जाण निरुतें ॥ येकचि तें ऐसें नाहीं ॥ १४ ॥ माझें स्वरूप तैसें नव्हे ॥ येकचि व्यापक सर्वत्र आहे ॥ दुजेपणाचि मात नसाहे ॥ परिपूर्ण आहे पूर्णत्वें ॥ १५ ॥ येथेंही विश्वप्रतीति ॥ होतसे दुजेपणाची व्यक्ती ॥ तरी वस्तुपरिच्छेद सर्वार्थीं ॥ होतसे अंतीं येथेंही ॥ १६ ॥ तरी जे कां भासें विश्वप्रतीति ॥ ते सर्वही जाणावी भ्रांती ॥ विश्व नाहींच हें अनेकायुक्ती ॥ अनुभवस्थिती ठाईं ठेविलें ॥ १७ ॥ विश्वाचि अविचारित सिद्धी ॥ ते विचारें होय

१ व्यापकता. २ खरोखर. ३ गोष्ट.

मिथ्या बुद्धी ॥ जैसी शुक्तिच्याठाईं रजतवृद्धी ॥ अविचारें सिद्धी होतसे ॥ १८ ॥ तेंचि विचारूनि पाहिजे ॥ तंव रजताची मातु नेणिजे ॥ शुक्ती ते शुक्तीच सहजे ॥ विचारें कीजे वस्तुभेटी ॥ १९ ॥ जैसें कां रज्जुच्याठा-ईं ॥ सर्पधारामाळादि पाहीं ॥ अविचारें भ्रमासि संख्या नाहीं ॥ विचारें पाहीं रज्जु येकी ॥ १२० ॥ रश्मी-च्याठाईं जैसें मृगजळ ॥ तें भ्रमें दिसे अळुमाळ ॥ विचारें आघवेंचि होय फोल ॥ असे केवळ रश्मीच येकी ॥२१॥ आणि विश्व हें ब्रह्मात्मक ॥ विश्व तें ब्रह्मचि देख ॥ सुवर्णचि जैसें कटक ॥ दुजे लेख तेथें कैंचे ॥ २२ ॥ ऐसिया उ-पपत्ती सांगों किती॥विश्वाकार हे सकळ भ्रांती॥ अविचारें वर्ते याची स्थिती॥विचारें भस्मांतीं जाय सकळ॥२३॥ यालागीं वस्तुसीं नाहीं दुसरें ॥ येकलें येक ब्रह्मचि खरें ॥ तेथें परिच्छेदत्रय हें नशिरे॥कोंदलें पुरें परिपूर्णत्वें ॥ ॥२४॥ ह्मणोनि परिच्छेदत्रयाविरहित ॥ सच्चिदानंद मी अनंत ॥ ऐसीया बोधें उन्नत ॥ नाहीं देखत आपणा न्यून ॥ २५ ॥ नाहो प्रकृत्यांतरवर्ति जे जाले ॥ ते तंव परिच्छेदांत पावले॥ब्रह्म तें प्रकृतिसंगें मैळलें ॥ परिच्छे-दलें येणें न्यायें ॥ २६ ॥ यालागीं प्रकृतीपर ऐसें ॥ ह्मणोनि बोलिलें असे॥ मी प्रकृतीचा नियंता असे ॥ अ-लिप्त वसे तियेहुनी ॥ २७ ॥ ते जड अप्रकाश परतंत्र ॥ मी बोधरूप स्वप्रकाश स्वतंत्र ॥ नियंता चाळक अगो-त्र॥ नाम रूप मात्र असेचिना ॥२८॥ एवंभूत व्यापक मी असे॥ऐसाचि बोधही उल्हासे ॥ आपुलें पूर्णत्व नादि-से ॥ दुजें ऐसें सर्वत्र ॥२९॥ ऐसाचि मी अगाधबोध ॥ नित्यानंद स्वसंवेद्य ॥ नाहीं देहादिकासिं संबंध ॥ शुद्ध

१ रुप्याची. २ किंचित्. ३ मिथ्या. ४ अलंकार. ५ दृष्टांत. ६ प्रफुल्लित. ७ नीच. ८ मायेमध्यें. ९ सत्ताधीश. १० ज्ञानी.

बुद्ध निर्विकार ॥१३०॥ आतां चेष्टमान जरी हें शरीर ॥ संस्कारें करी सर्व व्यापार ॥ तथापि साक्षी मी निर्विकार ॥ देहाकार नव्हे कदां ॥३१॥ जरी पूर्व संस्कारेंकरून ॥ देह हें कर्मेंकरूनि चेष्टमान ॥ तरी अन्य देहाचेपरी मी आन ॥ मजसी भिन्न देखतसे॥३२॥इतरांचे दृश्यत्वें करुनी ॥ देह देखें मी जैसे नयनीं ॥ तैसाचि माझा देह जागृती स्वप्नीं ॥ परकीय स्थानीं देखतसे ॥ ३३ ॥ वस्तुता तरी देह भिन्नचि असे ॥ भिन्न तें दृश्य जाण ऐसें ॥ दृश्य तें मिथ्या सर्वांशें ॥ नश्वर असे काळत्रयीं ॥ ३४॥ इमंदेह हें मुळीं बोलिलें ॥ इमंकारें भिन्नचि देखिलें ॥ भिन्न तें तंव आपणा नमिळे॥होय निराळें निश्चयेसीं ॥३५ ॥ इमंकार आणि इदंकार ॥ हें दृश्याचें वाचकः सर्वत्र ॥ भिन्न तें भिन्नपणेंचि निरंतर ॥ देखें पर परकीयत्वें ॥ ३६ ॥ स्वतःसिद्ध तरी भिन्नचि असे ॥ आपणा तया साहृश्यही नसे॥ ऐसें असोनिही लोक पिसे॥मीच ऐसें ह्मणताती ॥ ३७॥ मी तंव स्वयं बोधलेपणें ॥ देहातें मी ऐसें नह्मणे ॥ देह तें दृश्य वेगळेपणें ॥ परातें देखणें तैसें देखे ॥३८॥ अगा परत्वें देखतां ॥ देही साक्षित्वेंचि वर्ततां ॥ नमिळे देहाच्या कर्तव्यता ॥ नपवे उसंतता सुख दुःख भोगीं ॥ ३९ ॥ ऐसा नानायुक्तिकरुनी ॥ एवंविध ऐसा आपणा मानी ॥ हेंचि मनन गा कोदंडपाणी ॥ जाणे निर्वाणीं आपणा ऐसें ॥१४०॥ इतुकें विस्तारें सांगीतलें ॥ तें तंव युक्तीचें रूप केलें ॥ येही युक्तिकरूनियां भलें ॥ जाण निराळें आत्मरूप ॥ ॥४१॥अगा एवंभूत जरी आपण असे ॥ तरी देहादि प्रपंच कां भासे ॥ तेंही सांगों गा सावकाशें ॥ येकाग्र मा-

१ व्यवहार करणारें. २ सारखेपणा. ३ वेडे, मूर्ख. ४ विसांवा. ५ शेवटीं.

नसें परिसिजे ॥ ४२ ॥ श्लोक ॥ एतेहिचिद्विलासांतामनोबुद्धींद्रियादयः ॥ असंतःसर्वएवाहंअवधानंविनास्थि-
ताः ॥ २ ॥ टीका ॥ तरी हे सकळपदार्थजात ॥ मन बुद्धींद्रियादि समस्त ॥ हे चिद्विलास जाण समस्त ॥ सर्व-
दां असंत सर्वही ॥ ४३ ॥ चित्त शब्दें शुद्ध ज्ञान ॥ ब्रह्म जें प्रकाशचिद्धन ॥ त्याचाचि विलास प्रपंच जाण ॥
विलासे पूर्ण सर्वदां ॥ ४४ ॥ विलासमात्र विश्वरूप याचें ॥ मन बुध्यादि दृश्यजाताचें ॥ जो जयाचा विलास
तें रूप त्याचें ॥ वास्तव साचें विचारितां ॥ ४५॥ वास्तव तरी अधिष्ठान सत्य ॥ तेथें विपरीत भासे तें असत्य ॥
स्वप्नसंभ्रम अधिष्ठानीं भासत ॥ मिथ्याभूत तो सर्वथा ॥ ४६ ॥ जैसा आपण जो अधिष्ठान ॥ याचा विलास-
संभ्रम स्वप्न ॥ वास्तवार्थें सत्य आपण ॥ मिथ्यापूर्ण विलास तो ॥ ४७ ॥ कां शुक्तिका विलास रजत ॥ वास्त-
व शुक्त्यात्मक निश्चित ॥ पाहातां शुक्तिव्यतिरिक्त ॥ मिथ्याभूत भ्रममात्र ॥ ४८ ॥ जें ज्याच्याठाईं विपरीत
भासे ॥ तें तंव तदात्मकचि असे ॥ जैसा स्थाणूच्याठाईं चोर भासे ॥ दुजा नसे तो तदात्मक ॥ ४९ ॥ रज्जु-
च्याठाईं सर्पादि भासती ॥ ते तंव रज्ज्वात्मक प्रतीति ॥ रज्जुव्यतिरिक्त सर्वभ्रांती ॥ नाहीं स्थिती रज्जुविण ॥
॥ १५० ॥ तैसें हें देहादि दृश्यजाळ ॥ तो तंव चिद्विलास सिद्धचि सकळ ॥ विचारें अधिष्ठान केवळ ॥ वृथा फोल
विलासमात्र ॥ ५१ ॥ सकळही ब्रह्मात्मक पाहीं ॥ ब्रह्माव्यतिरिक्त दुजें नाहीं ॥ भासे तें तरी मिथ्या पाहीं ॥
सत्यत्वें कांहीं असेचिना ॥ ५२ ॥ हें तंव काळत्रईं असंत ॥ ज्ञानमात्रेंचि होय बाधित ॥ नाहो स्थिती याची दे-

१ चैतन्याचे खेळ. २ खरोखर. ३ वैभव. ४ शिंपीचा. ५ रुपें. ६ निराळा. ७ खांबाच्याठायीं. ८ मिथ्या.

खत ॥ असे भासत दीर्घ काळ॥५३॥ऐसा आक्षेप बोलिलेती॥ जे दीर्घ काळ भासे याचि स्थिती ॥तरि ते तों-
पर्यंत राहती ॥ व्यवधानप्राप्ती जों नाहीं ॥ ५४ ॥ विशेषेंकरूनि जें अवधान ॥ त्यातेंचि बोलिजे व्यवधान ॥
व्यवधान शब्दें अपरोक्षज्ञान ॥ अनवधान अज्ञानत्वें ॥ ५५ ॥ ऐसें प्राप्त होतांचि अपरोक्षज्ञान ॥ जेणें बोधें
ब्रह्म तें आपण ॥ ऐसें बोधतांचि दृश्यभान ॥ नासे स्वप्न जागृतीं जैसें ॥ ५६ ॥ जागृती प्राप्त होतांचि क्षणीं ॥
स्वप्नाभास नदिसे नयनीं ॥ अपरोक्षानुभव दृश्य काहाणी ॥ मनीं नयनीं नदेखिजे ॥ ५७ ॥ अहं विशिष्ट स्व-
यें जीव ॥ त्यासि होतांचि अपरोक्षानुभव ॥ तोचि जागृतीचा उद्भव ॥ होतांचि सर्व स्वप्न नासे ॥ ५८ ॥ अहो
परोक्ष भ्रम जरी झाला ॥ तो अपरोक्षज्ञानेंचि जाईल भला ॥ येरवीं जैसा तैसाच संचला ॥ नढळे कळिकाळा
लोटतांही ॥५९॥ यालागीं व्यवधान ऐसें बोलिलें ॥ तेणेंचि दृश्यजात नासलें ॥ ज्ञान नसतांचि संचलें ॥ असे
भरलें जैसें तैसें ॥ १६० ॥ यालागीं ज्ञान नसतां याची स्थिती ॥ कोटि कल्प राहे प्रतीति ॥ ज्ञान होतांचि भ-
स्मांतीं ॥ क्षणाप्रती जातसे ॥ ६१ ॥ जागृती जंववरी नये हाता ॥ तंववरी चिरकाळ स्वप्नावस्था ॥ मग नदि-
से दशदिशा पाहतां ॥ जागृती होतां तत्क्षणींच ॥ ६२ ॥ ह्मणोनि अज्ञान असतां याची स्थिती ॥ कोटि क-
ल्प पाहे प्रतीति ॥ ज्ञान होतांचि भस्मांतीं ॥ क्षणाप्रती जातसे ॥ ६३ ॥ ह्मणोनि अज्ञानेंचि विश्व सिद्ध ॥ दे-
हेंद्रियादि दृश्य प्रसिद्ध ॥ तें ज्ञान होतांचि पावे बोध ॥ निर्विवाद निश्चयेसीं ॥ ६४ ॥ ह्मणोनि देहेंद्रियादि क-

१ आत्मज्ञान. २ उत्पत्ति. ३ द्वैताचा. ४ आत्मानुसंधान. ५ निःसंशय.

रुनी ॥ मी देहवंत ऐसें मानुनी ॥ मी देही हे बुद्धी झंकोनी ॥लागा झणीं नेणपणें ॥६५॥ यालागीं देहेंद्रियांवि-
रहित ॥ मी आत्मा निर्गुण नित्यानंदभरित ॥ ऐशा युक्तिकरूनि होय निश्चितार्थ ॥ तेंचि निश्चित आत्म-
मनन ॥ ६६ ॥ आणिकही बोध कैशापरी ॥ मनन वाणे गा पौलस्त्यारी ॥ तेंही सांगों तुज अवधारी ॥ तूंही
करी तैसेंची ॥ ६७ ॥ श्लोक ॥ आपद्यचलचित्तोस्मिजगन्मित्रंचसंपदि ॥ भावाभावविहीनोस्मितेनजीवाम्यना
मयं ॥ ३ ॥ टीका ॥ नाना आपत्ति झालिया प्राप्त ॥ मी अचंळचित्त असें स्वरूपस्थ ॥ आपत्ति देहवंतासिं
होत ॥ मी तंव व्यतिरिक्त देहेंद्रियांसीं ॥ ६८ ॥ विश्वासिं संपत्ति विपत्ति होती ॥ मी तंव विश्व नव्हे स्वयंज्यो-
ती ॥ विश्वप्रकाशक आनंदमूर्ति ॥ संपत्ति विपत्ती कैंची मज ॥ ६९ ॥ ह्मणोनि विपत्ति झालिया अचळ कैसा॥
वातोर्मिनें झडपिला मेरु जैसा ॥ कां ग्रीष्म वर्षाकाळीं सरिता जैसा ॥ सिंधु तैसा अगाधपणें ॥ १७० ॥ सं-
पत्तीचिही झालिया प्राप्ती ॥ जगमिथ्यत्वेंचि होय प्रतीति ॥ सर्व विश्व आत्मस्थिती ॥ नाहीं व्यक्ती दुजेप-
णाची ॥ ७१ ॥ संपत्ति जालिया न उचंबळे ॥ क्षीराब्धि जैसा वर्षाकाळें ॥ संपत्ति विपत्ति यथाकाळें ॥ देहमेळें
होय जगा ॥ ७२ ॥ तैसेंचि देहसंबंधें नाना रोग॥आधि मानसिक धर्म सांग ॥ मी तंव देहेंद्रियासिं असंग ॥
कैंचा भवरोग मजलागीं ॥ ७३ ॥ मी तंव भावाभावविहीन ॥ भाव शब्दें देह जाण ॥ अभाव तोचि अभा-
वाचि पूर्ण ॥ असे विलक्षण दोहीसि मी ॥७४॥ येणेंचि साक्षित्व सर्वदां असे ॥ जीववी तें जीवन हेंचि असे ॥

१ चुकून, फसून. २ दुःख. ३ शांत. ४ भिन्न. ५ वायूच्यालहरीनें. ६ नदी. ७ समुद्र.

येणेंचि सुखें सुख उल्हासे ॥ नेणे मानसें विपरीत कांहीं ॥ ७५ ॥ ऐसिया मनें श्रीरघुनाथा ॥ आपणातें जाणणें गा तत्वतां ॥ येणेंचि निश्चयें ये ह्राता ॥ भवव्यथा नेणे कांहीं ॥७६॥ आणिकही तया बोध कैसा ॥ मननें उपजे गा वीरेशा ॥ तेंही सांगों वैकुंठनिवासा ॥ रमाविलासा विश्वंभरा॥७७॥श्लोक ॥ निरीहोस्मिनिराशोस्मि स्ववत्स्वस्थोस्मिनिस्पृहः ॥ शांतोस्म्यहमरूपोस्मीचिरायुरचलस्थितिः ॥ ४ ॥ टीका ॥ देहेंद्रियें चळतां कर्मगती ॥ मी तंव निरीह अचळस्थिती ॥ प्रवर्तवी सर्वांची गती ॥ कूटस्थस्थिती दीप जैसा ॥ ७८ ॥ दीपाधारें सर्व वर्तती ॥ दीपाधारें कर्मांची निष्पत्ती ॥ होय परी अचळस्थिती ॥ असे सर्वार्थी निरीह सदा ॥ ७९ ॥ आशा जरी असावी पोटीं ॥ तरीच कर्तव्याची आटाआटी ॥ आशा नभासे माझिये दृष्टी ॥ देखें सृष्टी नश्वरपणें ॥ १८० ॥ मिथ्याभूत पदार्थ जो नश्वर ॥ देखोनि वासना नव्हे तयासमोर ॥मृगजळीं वासनांकुर ॥ नुपजे नश्वर ह्मणोनियां ॥ ८१ ॥ यालागीं ईहा आशा विरहित ॥ मी तंव निरीह अकर्ता कूटस्थ ॥ नभासे परि सबरांभरित ॥ स्पृहा किंचित मज नाहीं ॥८२॥ मज कर्मी नाहीं कर्तेपण ॥ आशा स्पृहा गेली निपटून ॥ अतएव शांत मी गुणविहीन ॥ अरूप पूर्ण ययालागीं ॥८३॥ जो कीं गुणवंत पदार्थ ॥ तोचि तो रूपवंत बोलिजेत ॥ गुणाचा द्रष्टा मी साक्षिभूत ॥ रूपवंत कैसा होय ॥ ८४ ॥ रूपा आलें तें नासे सर्वथा ॥ मी अरूपपणें चिरकाळ वर्ततां ॥ चिरायु तो अचळ तत्वतां ॥ नचळे सर्वथा अविनाशपणें ॥ ८५ ॥ विनाशी तें सर्वत्र चळे ॥ अविनाशी तें कोठें नढ-

१ इच्छेरहित. २ अविनाशी. ३ समाप्ति. ४ श्रम, दीर्घप्रयत्न. ५ इच्छा. ६ व्यापक. ७ समूळ.

ळे ॥ राहे व्यापुनी सर्वत्र निराळें ॥ कोणा नमिळे पदार्थांसी ॥८६ ॥ ऐसाचि मी एवंविधु ॥ मननेंकरूनि हो-
य बोधु ॥ ह्मणोनि सर्वदा तूं कृपासिंधु ॥ मननवेधु सांडूंनको ॥ ८७ ॥ नाहो आशा स्पृहा येकार्थ ॥ असतां
बोलिलें कां पुनरुक्त ॥ तैसें नव्हे ऐका अर्थ ॥ विशेषार्थ कांहीं असे ॥ ८८ ॥ कांहींच नसे जो अर्थ प्राप्त ॥ त्या-
ची आशा इच्छा ते निश्चित ॥ प्राप्यर्थेंही न्यून मानित ॥अधिक इच्छित तेचि स्पृहा ॥८९ ॥ यालागीं दोन्हीं
सविशेष असती ॥ यास्तव आशा स्पृहा बोलिजेती॥परि सर्वथा नव्हे पुनरुक्ति॥ विचारें श्रोतीं पाहिजे ॥१९०॥
कोणी आशंका करील भेद ॥ ह्मणोनि वाखाणिलें हें पद ॥ श्लोकार्थ झाल्याहि विशद॥ निर्विवाद ऐसें केलें ॥
॥ ९१ ॥ आणि सकळ विश्वब्रह्मास्थिती ॥ मजसहित चिदेकमूर्ति ॥ ऐसेंहि आलें मज प्रतीति ॥ तेचि विंत्प-
त्ती परियेसा ॥ ९२ ॥ श्लोक ॥ चिदेवपंचभूतानिचिदेवभुवनत्रयं ॥ विज्ञातमधुनासम्यगहमेवचिदेवहि ॥ ५ ॥
॥टीका ॥ चित्स्वरूप पंचमहाभूतें ॥ पृथ्वी आप तेज वायु नभ तें॥तैसींच तज्जानितें चराचर भूतें ॥ जेकिं व्यक्ति
दिसताती॥९३॥इत्यादि सकळ चिद्धन ॥ चित शब्दें ज्ञान जाण॥ ज्ञान तेंचि ब्रह्म पूर्ण ॥ नाहीं भिन्न शब्दमात्रें
॥ ९४ ॥ हें विचारें करूनि आतां ॥ युक्तिकरूनि मनन करितां ॥ मीच परब्रह्मरूप तत्वतां ॥ प्रत्ययार्था आलें
मज ॥ ९५ ॥ सम्यक्प्रकारें जाणितलें ॥ मीही चिद्रूपचि संचलें ॥ ब्रह्म वेगळें उरलें ॥ नाहीं निराळें अणुमात्र
॥ ९६ ॥ आणिकही माझीं विशेषणें ॥ ऐकावीं संतीं एकाग्रमनें ॥ श्लोकाचेनि अनुसंधानें ॥ जीं किं ऋषीनें बो-

१ भिन्न. २ स्पष्ट. ३ विचार. ४ प्रकार. ५ संबंधानें.

लिलीं ॥ ९७ ॥ श्लोक ॥ सर्वातीतःसर्वगतःस्वमिवायमहंस्थितः ॥ यत्तदस्मितदेवास्मिवक्तुंशक्नोमिनेतरत् ॥६॥
॥ टीका ॥ सर्वदृश्या मी अतीत ॥ आणि सर्वत्र वर्ते तदंतंगत ॥ नाहीं कोठूनियां व्यांवृत्त ॥ अनुगत असेचिना
॥ ९८ ॥ वाक्यं ॥ ॥ अव्यावृत्तानुनुगतंवस्तुब्रह्मेतिभण्यतेइति ॥ ॥ सत्य असे जरी कोणी पदार्थ ॥ तरी त्या-
माजि दुसरें अनुगत ॥ विश्व मिथ्यापणेंचि असत ॥ ब्रह्म अनुगत तेथें कैंचें ॥ ९९ ॥ येक ब्रह्मचि सर्व श्रुती बो-
लती ॥ तेथें दुसरीयाची कैंची व्यक्ती ॥ दुसरें नाहीं तेथें अनुगति ॥ आणि व्यावृत्ति असेचिना ॥ २०० ॥ ह्म-
णोनि सर्व ब्रह्मचि असे॥ त्यातेंचि सर्वंगत बोलिजेत असे॥ गगनाचेपरी स्थिर असे॥ विश्व हें भासे त्याच्याठा-
ईं ॥१॥ ह्मणोनि जें जें दृष्टश्रुत विश्वभान ॥ तें तें मीच ब्रह्मत्वें पूर्ण ॥ मद्व्यतिरिक्त नाहीं जाण ॥ आनंदघन स-
र्वार्थीं मी ॥२॥ त्याहीवेगळें बोलावया ॥ बोलों नशकिजे गिरा यया॥ आणि मजव्यतिरिक्त भासावया ॥ लो-
कां यया कारण नाहीं ॥ ३ ॥ यालागीं सर्वातीत सर्वव्यापक ॥ स्थीर जैसें गगन येक ॥ जें विश्वरूपें भासतां
देख ॥ तेथें येकायेक मीच असे ॥ ४ ॥ ऐसें मननेंकरूनि भासे ॥ सर्वत्र आपणचि सर्वदां असे ॥ सर्व जीवसमू-
ह मजमाजीं वसे ॥ जीवित्व उल्हासे माझ्याठाईं ॥ ५ ॥ श्लोक ॥ मय्यनंतेचिदंभोधावाश्चर्यंजीववीचयः ॥ समु-
ल्लसंतिखेलंतिप्रविशंतिस्वभावतः ॥७॥ टीका ॥ ह्मणे मी जो कीं चिदांबुधी ॥ अनंत अगाध निरवधी ॥ परि-
छेदत्रयातीत ज्ञानाब्धी ॥ पूर्ण त्रिशुद्धी पूर्णत्वें ॥ ६ ॥ तया माझ्याठाईं उल्हासती ॥ जीववीचि अनंता भास-

१ त्यामध्यें. २ निराकरणकेलेलें. ३ समान, सारिखें ४ व्यापक. ५ पाहिलेलें व ऐकिलेलें. ६ माझ्याशिवाय. ७ वाचा. ८ विचारसागर. ९विस्तीर्ण. १०लहरी

ती ॥ उत्पत्ति आणि स्थिति पावती ॥ लया जाती माझ्याचिठाईं ॥ ७ ॥अहो हें स्वभावेंचि करुनी ॥ मज चि-
दाब्धिसी प्रतिदिनीं ॥ विश्वलहरी करूनी ॥ उल्हासे नयनीं जगाचिये॥८॥क्षीराब्धीचे वीचिविलास ॥ ते सर्व
क्षीराब्धीच सावकाश ॥ अज्ञाना भासती इतरांश ॥ तरी क्षीराब्धीस आन काय॥९॥ नाना पृथ्वीचे परिमा-
णु पृथ्वीवरी ॥ विलासतांही पृथ्वीच खरी ॥ तैसा सर्वत्र मी सर्वोपरी॥ नाहीं दुसरी मात जेथें॥२१०॥ ऐसा
बोध होय तयासीं ॥ मननेंचि जाणे आपणयासीं॥ निश्चय करी प्रमेयासीं॥आणिकही कैसी प्रतीति तया॥११॥
॥ श्लोक ॥ मय्यनंतचिदंभोधौविश्ववीच्यादिकल्पना ॥ उदेतुवास्तमायातुनमेवृद्धिर्नचक्षयः ॥८॥ टीका ॥ ह्मणो
नि सुखाचा समुद्र परिपूर्ण ॥देश काळ वस्तु परिच्छेदविहीन॥त्या माझ्याठाईं विश्ववीचि कल्पन॥भासे नाना
अज्ञानासीं ॥ १२ ॥ त्या विश्ववीचि उदयो होतां ॥ मज वृद्धी नाहीं पैं सर्वथा ॥ विश्ववीचि अस्तमय होतां ॥
क्षय तत्वतां असेचिना ॥१३॥ हें तंव प्रत्यक्ष सिद्धचि असे ॥ महार्णवें वीचिविलास भासे॥ इतुकेनि काय वृद्धी
होतसे ॥ सपाटल्या नसे क्षय त्यासीं ॥ १४ ॥ तैसें विश्वलहरी माझ्याठाईं॥ उदयास्त होतां क्षय वृद्धी नाहीं॥
मी तंव जैसा तैसा अक्षयी ॥ आनपाईं स्वतंत्र ॥ १५ ॥ हें विश्व असत्य तरी कां भासे ॥ तुह्मी मानाल जरी
ऐसें ॥ तरी तेंही सांगों सावकाशें ॥ एकाग्र मानसें परिसिजे ॥ १६ ॥ श्लोक ॥ मदज्ञानोदितंविश्वंमय्येवलयमा-
गतं ॥ अपरोक्षचिदानंदसाम्राज्यमधुनास्म्यहं ॥ ९ ॥ टीका ॥ तरी हें सर्व विश्वजात ॥ माझेचि अज्ञानें उदय

१ गोष्ट. २ प्रपंचासी. ३ भेदरहित, अविनाशी. ४ समुद्रांत. ५ अविनाशी.

पावत ॥ शेवटीं माझ्याचिठाईं लयस्थ ॥ ज्ञानें होय अनुभवसिद्ध ॥१७॥ जरी हें भासे माझ्याठाईं ॥ अथवा लय पावतसे सर्वही ॥ तरी मी आतां कैसा पाहीं ॥ ऐका सर्वही सर्वज्ञ ॥ १८ ॥ मी तंव अपरोक्ष चिदानंद ॥ चिदानंदैक साम्राज्यबोध ॥ दुसरें वीण परात्पर अगाध ॥ नित्य सिद्ध तें मी साम्राज्य ॥ १९ ॥ एवंरूप मी सच्चिदानंदघन ॥ तो हर्षें करीं आपणा नमन ॥ पूर्णानंदें उचंबळोन ॥ बोलें वचन नमनीतें ॥२२०॥ श्लोक ॥ सर्वभूतांतरस्थायनित्यमुक्तचिदात्मने ॥ प्रत्यक्चैतन्यरूपायमह्यमेवनमोनमः ॥१०॥ टीका ॥ जो मी सर्वभूतांचा अंतरस्थ ॥ अंतर्यामीं जो सर्वगत ॥ ऐसिया मज मी नमन करीत ॥ पुनरुक्त अत्यादरें ॥२१॥ आणि माझा स्वरूपीं जें स्फुरत ॥ तेंचि तें मजहूनि व्यतिरिक्त ॥ तें मिथ्यापणें मीचि सत्य ॥ होय निश्चित चिदात्मनि ॥ २२ ॥ तया मजकारणें नमन ॥ चित्त चिदात्मा चैतन्यघन ॥ प्रत्यग्रूप जो आनंदघन ॥ करीं नमन तयासीं ॥ २३ ॥ देहेंद्रियांच्या प्रातिकूल्यें ॥ जें स्वयंप्रकाशे सर्वकाळें ॥ तें मी प्रत्यग्रूप निराळें ॥ प्रपंचा नमिळे स्वप्रकाशें ॥ ॥ २४ ॥ तया मी आपणा कारणें ॥ पुनःपुन्हा करी नमनें ॥ आनंदाचेनि उचंबळपणें ॥ आपणा आपण वंदिजे ॥ २५ ॥ मजवेगळें कांहीं दुसरें ॥ नदिसेचि कोणेंप्रकारें ॥ यालागीं नमन पुरःसरें ॥ नमी आदरें आपणया ॥ ॥ २६ ॥ अगा शांत झाल्या वासना मन ॥ ऐसें बाणें आत्ममनन ॥ तें सांगीतलें तुज संपूर्ण ॥ जाण खुण रघुवर्या ॥ २७ ॥ आपुलें ब्रह्मत्व नबाणावया ॥ अंतरायं मन आणि वासना यया ॥ शुद्ध हें दोन्हीं उपशमलियां ॥

१ एकरस, अखंड. २ व्यापक. ३ भिन्न. ४ आत्मरूप. ५ मनःपूर्वक. ६ विघ्न. ७ लीनहोतां.

जाणे आपणयां आपण ॥ २८ ॥ मना वासनेची जे तीव्रता ॥ तेचि जाण निश्चयें मनाची मळिनता ॥ मळीन असतां तत्वतां ॥ नबाणे सर्वथा आत्मत्व ॥ २९ ॥ हे नसतां कोटि प्रयत्न ॥ केलिया नबाणे आत्मपण ॥ हा मळ गेलिया ब्रह्मचि जाण ॥ स्वतः सिद्ध पूर्ण स्वयें लाभे ॥ २३० ॥ आपण ब्रह्म हें स्वतःसिद्ध असे ॥ परि वासनेनें व्यवधानीं मन नप्रवेशे ॥ तेणें आपणा आपण नप्रकाशे ॥ तेणेंचि भ्रंशे स्वरूपाहुनी ॥ ३१ ॥ हें वर्म जाणपां रघुनाथा ॥ ह्मणोनि आत्ममननींच तत्वतां ॥ असों द्यावें नित्य चित्ता ॥ हेचि मुक्तता मुक्तांची ॥३२॥ ऐसी बोलतांचि गोष्टी ॥ रघुनाथा आनंद पोटीं ॥ परमानंदें हेलावे सृष्टी ॥ पडे मिठी निजरूपीं ॥ ३३ ॥ रंग-नाथ ह्मणे श्रीसद्गुरुरायें॥निरूपण केलें ग्रंथान्वयें ॥ हेंचि मनन मुक्ताभिप्रायें ॥ बोलिलें होय येणें अर्थीं ॥३४॥ अथवा मनोनाश वासनाक्षयासीं ॥ उपाय मनन हें निश्चयेसीं ॥ युक्तीकरूनि अहर्निशीं ॥ करावें परियेसी श्रोते हो ॥ ३५ ॥ येथें संपलें आत्ममनन ॥ पुढें बोलिजेल शुद्ध निरूपण ॥ तेंही जाणा निदिध्यासन ॥ श्रोतीं सावधान परिसिजे ॥ ३६ ॥ ॥ इति श्रीयोगवासिष्ठसारेश्रीवसिष्ठरामसंवादेआत्ममननप्रकरणंसमाप्तं ॥ ॥ ॥ मूळ ॥ ११ ॥ ॥ ओंव्या ॥ २३६ ॥ ॥ इतिपंचमप्रकरणंसमाप्तं ॥ ॥ श्रीः ॥

---

१ आत्मानुसंधानीं. २ डोलणें.

॥ इति श्रीयोगवासिष्ठसारे पंचमं आत्ममननप्रकरणंसमाप्तम् ॥

## ॥ अथ श्रीयोगवासिष्ठसारे षष्ठमशुद्धनिरूपणप्रकरणप्रारंभः ॥



श्रीगणेशायनमः ॥ श्रीनीलकंठाय नमः॥जयजयाजी सद्गुरुराया ॥ परमानंदा जी आत्मया॥ मजवरि कृपा करू-
नि स्वामिया ॥ ग्रंथा यया संपूर्ण करी ॥ १ ॥ तूं तंव निर्विघ्नकर्ता गणेशु ॥ तूंची विद्याविद्यांचा ईशु ॥ मंगळमू-
र्ति तूं तुंडेशु ॥ विघ्ननाशु करावया ॥२॥ प्रारंभिला ग्रंथसिद्धी॥ तुझ्या कृपाकटाक्षें कृपानिधी ॥ जातअसे अति-
वृद्धि ॥ त्या तुज नमो बुद्धिप्रवर्तका ॥ ३॥ ऐसें नानापरि स्तवन ॥ किती करावें ये वाचेनें ॥ तूं वाचादिकां अ-
प्राप्त जाण ॥ तुझी खुण नबोलती ॥४॥ ह्मणोनि नबोलतां वाणी ॥ नमन कीजे तुझिया चरणीं ॥ कांहीं नकर-
णें जें सर्वपणीं ॥ पूजा निर्वाणीं तेचि तुझी ॥५ ॥ ऐसिया सर्वगता तुज नमन ॥ करितांचि ग्रंथसिद्धी जाण ॥
तेंचि परियेसा निरूपण ॥ करीन कथन तुझिया कृपा ॥६ ॥ ऐसींये विनवणीच साठीं ॥ श्रीगुरु पाहाती कृपा-
दृष्टी ॥ ह्मणती ग्रंथेसींच तूं उठी ॥ जेणें संतुष्ट आत्मा होय ॥ ७ ॥ आमुचें ऐश्वर्य ग्रंथव्याजें ॥ जें कीं सर्वदां तु-
वां बोलिजे ॥ मनन निदिध्यासन सहजे ॥ तुवां कीजे हेंचि नित्य ॥ ८ ॥ तरी हाचि मनोभावो तुझा फळो ॥
ब्रह्मानंदीं तुझी वृत्ति रुळो ॥ वृत्तीचें वृत्तिपण मावळो ॥ स्वसुख आकळों स्वसुखेंची ॥ ९ ॥ आमुचें ऐश्वर्य बो-
लणें ॥ हेंचि तुझें मनन निदिध्यासन ॥तरी हेंचि फळो साक्षात्करणें ॥सर्वदां भोगणें ब्रह्मानंदु ॥ १० ॥ आमु-
च्या स्वरूपाचें निरीक्षण॥ तेचि तुझी समाधी जाण ॥ तरी तेंचि फळो गा निर्वाण॥ समाधान तेंचि तुज हो ॥
॥ ११ ॥ सर्वदां करितां कर्माचरण ॥ तेंचि तूं मानिसी आमुचें भजन॥ तरी तेंचि फळो गा तुजलागुन ॥ अन-

---

१ गजानन. २ बुद्धिचाचालक. ३ व्यापकास. ४ ग्रंथरूपानें. ५ अवलोकन.

न्यपणें हो तुज ॥ १२ ॥ श्रवण मननादिकि क्रिया ॥ गमन वक्तृत्व शिष्यराया ॥ तें तूं मानिसी मद्भजनीं यया ॥ त्या फळो तुझ्या तदर्थंची ॥ १३ ॥ आणि आमुच्या नामउच्चारणीं ॥ महामंत्र जप गुह्यस्थानीं ॥ तरि तेंचि फळो गा निर्वाणीं ॥ सुखस्वरूपें दोन्हीं होतकां ॥ १४ ॥ ऐसा महाप्रसाद लाधला ॥ तेणें ब्रह्मानंद उचंबळला ॥ तो नसमाये कांहिं केल्या ॥ वोसंडिल्या नित्यानंदु ॥ १५ ॥ आतां या ग्रंथाचें व्याख्यान ॥ यथार्थत्वें मी करीन ॥ सद्गुरूकृपा दिव्यांजन ॥ वरप्रदान लाधलों मी ॥ १६ ॥ अहो सद्गुरूकृपेच्यासाठीं ॥ कीजे ब्रह्मादि पदाचिया उठी ॥ स्वयें ब्रह्मत्व येतसे भेटी ॥ येराचि गोष्टी काय तेथें ॥ १७ ॥ सद्गुरूकृपेनें अमरस्थान ॥ सद्गुरूकृपेनें ब्रह्मलोकीं वसन ॥ सद्गुरूकृपेनें स्वयें ब्रह्म पूर्ण ॥ शब्दब्रह्म खुण तेणेंचि ॥ १८ ॥ जो जो कीं अभिलाषितार्थ ॥ तो सद्गुरूकृपा पूर्ण होत ॥ सद्गुरूकृपा कल्पनातीत ॥ ब्रह्म सदोदित स्वयें होय ॥ १९ ॥ येवढें ज्याचें कृपावलोकन ॥ तेथें किती ग्रंथाचें व्याख्यान ॥ त्याहीवरी प्रसाद अतिगहन ॥ पूर्ण कृपेनें दीधला मज ॥ २० ॥ अतिदुर्लभ सद्गुरूदर्शन ॥ तेथें स्पर्शनादिक तें मूर्तिमंतअर्चन ॥ जन्म कोटिपुण्य फळ तें अवलोकन ॥ प्रसाद पूर्ण तो बोलवेना ॥ २१ ॥ तेथें तोंडें भरूनियां बोलणें ॥ तें पुण्य प्रशंसावें पैं कवणें ॥ त्याहीवरी प्रसाद लाधणें ॥ कृपेनें बोलणें अतिदुर्लभ ॥ २२ ॥ हें किती कोणा पुण्याचें बळ ॥ हें तंव कांहीं ननिवडे केवळ ॥ अनंत जन्मीं करितां पुण्यकल्लोळ ॥ दर्शन केवळ सद्गुरूचें ॥ २३ ॥ दर्शना सामग्री पाहिजे हे ॥ तेथें प्रसादीं काय पुण्य आ-

१ भाषण. २ भरपूरझाला. ३ इष्टहेतु. ४ पुण्याच्याराशी.

हे ॥ तें तंव नबोलवे काय ॥ भाग्य पाहे अत्युत्कट ॥ २४ ॥ तया भाग्याची गणना ॥ नकरवे गा श्रुति शास्त्र पुराणा ॥ तो कृपाळु समर्थ दीना ॥ कळवळोनि जाणा कृपा करी ॥ २५ ॥ तो दीनदयाळ ईश्वर ॥ दीनाकारणें दयासागर ॥ पाहातां आपली सामग्री अपूर ॥ कोटि साधनसंभार जरी झाले ॥ २६ ॥ असो आतां बोलणें किती ॥ नाहीं पुण्यलेखा प्रसादाप्रती ॥ केवळ कृपाचि दीनावरि अती ॥ प्रकारीं बहुतीं हेंचि घडे ॥ २७ ॥ अहो देखोनियां मज दीनासीं ॥ कृपा आली तया सद्गुरूसीं ॥ तेणें कृपें लाधलों प्रसादासीं ॥ धरीन मानसीं तेंचि सिद्ध ॥ २८ ॥ येरवीं पाहातां काय सामग्री मज ॥ केलें नाहीं सत्कर्म निज ॥ अथवा जपलों नाहीं मंत्रगुज ॥ प्रसाद सहज लाधलों मी ॥ २९ ॥ असो त्याचें तो सर्व कर्ता ॥ मी तरी साईखेडियांचा वक्ता ॥ सूत्रधाराचि कर्तव्यता ॥ आपुल्या माथां कासया घेऊं ॥ ३० ॥ यालागीं जैसें करीतअसों तैसें ॥ माझें मीपण दवडोनि देशें ॥ जेथें मीपणासीं ठाव नसे ॥ तेथें काइसें करणें नकरणें ॥ ३१ ॥ असो सद्गुरूरायें बोलविलेंनिपणें ॥ ग्रंथाचें तों व्याख्यान करणें ॥ तेंचि अनुसंधान अंतःकरणें ॥ सावधान परिसि जो ॥ ३२ ॥ पूर्व प्रकरणीं ऐसें निरूपण ॥ मनन केलिया युक्तिकरून ॥ आपुलें आत्मत्व बाणें पूर्ण ॥ दृश्यही जाण तदात्मक ॥ ३३ ॥ देहादि विश्व दुसरेपणें ॥ साच नाहीं कोणेंहि गुणें ॥ आपण पूर्ण सच्चिदानंदपणें ॥ जाण खुणें अनुभवाचे ॥ ॥ ३४ ॥ ऐसें युक्तिकरूनियां कळलें ॥ परि तैसेंचि अनुभवा पाहिजे आलें ॥ आणि विश्व भासतसे निराळें ॥

१ फारमोठें. २ समुदाय, जमाव. ३ आपलें. ४ कळसूत्रीबाहुलीचा. ५ ध्यान.

ह्मणोनि नमिळे स्वस्थितीसिं ॥ ३५ ॥ प्रमेय जे कीं ब्रह्मस्वरूप ॥ तेथें संशय होता जो विक्षेप ॥ तो मननें नासला अमूप ॥ शुद्धस्वरूप ऐसें कळलें ॥ ३६ ॥ ब्रह्म मी तें होय कीं नोहे ॥ ऐसा संदेह होतांचि पाहे ॥ तो मननें नासला सर्व होय ॥ सर्वत्र आहे मीच ह्मणे ॥ ३७ ॥ निश्चयें तरी ब्रह्म मी ऐसें बाणलें ॥ परि देहादि प्रपंचाचें टवाळें ॥ सत्यत्वें भासती तेणें चळे ॥ स्थिती ढळे स्वरूपिहुनी ॥ ३८ ॥ जरी देहादिक दृश्य भासत ॥ तें सत्यत्वेंचि असे स्फुरत ॥ जंववरी नाहीं आत्मप्रतीत ॥ तंववरी वस्तुगत कदां नव्हे ॥ ३९ ॥ आणि ये स्वरूपस्थितीचे आड ॥ असे या दृश्याचें कंवाड ॥ जंव जंव भासे तंव नव्हे उघड ॥ ब्रह्म अखंड आत्मत्वें ॥ ४० ॥ यालागीं करावें निदिध्यासन ॥ तेणें निःशेष बाधे प्रपंचभान ॥ बाणे स्वस्वरूप चिदानंदघन ॥ अखंडपणें ब्रह्मात्म्यैक्यें ॥ ४१ ॥ तरी तेंचि निदिध्यासन कैसें ॥ सांगावया सावकाशें ॥ शुद्धनिरूपण प्रकरणमिसें ॥ आरंभिलें असे तें परिसिजे ॥ ४२ ॥ येथें प्रपंचाचें होय निरसन ॥ उपाधीचा क्षय संपूर्ण ॥ ह्मणोनि बोलिजे शुद्धनिरूपण ॥ ब्रह्म परिपूर्ण उरे केवळ ॥ ४३ ॥ तेंचि आतां कैशा रिती ॥ श्रीगुरुवसिष्ठ अनुवादती ॥ तें येकाग्र ऐकें त्रैलोक्याधिपती ॥ तेंचि श्रोतीं परिसिजे ॥ ४४ ॥ त्याहीमध्यें श्लोकत्रयेंकरून ॥ ऐसें कीजेल निरूपण ॥ मनें आत्मत्व बाणल्या पूर्ण ॥ कैसें अनुसंधान तयाचें ॥ ४५ ॥ तो विंचरे कैसा लोकांत ॥ आणि अंतरीं बाणें कैसा निश्चयार्थ ॥ तेंचि पुसताझाला श्रीरघुनाथ ॥ वदे साक्षात वसिष्ठगुरु ॥ ४६ ॥ ह्मणे ऐक सांगों गा रघुप-

१ सिद्धांत. २ विकार. ३ सर्व. ४ निरर्थक, लटिकें. ५ झांकण. ६ सांगतात. ७ वर्तनकरी.

ती ॥ मनन झालिया कैसी स्थिती ॥ तो वर्ते कैसा जगाप्रती ॥ अंतरगती तेंहि सांगों ॥ ४७ ॥ अगा या शुभे-
च्छा झालियानंतरें ॥ तुटे संसाराचें भेंडरें ॥ मा मनन झालिया कैंचें उरे ॥ निःसंग विचरे सर्व कर्मीं॥ ४८ ॥ ते-
चि निःसंगता पैं कैसी ॥ आणि अंतरीं प्रतीति जे मानसीं ॥तेंहि सांगेन परियेसी ॥ तूंही तैसी स्थिती साधीं ॥
॥ ४९ ॥ यावरी निदिध्यासनप्रकार ॥ तोहि सांगों सविस्तर ॥ तेंहि मन करूनियां एकाग्र ॥ ऐक समग्र रघु-
पुंगवा ॥ ५० ॥ श्लोक ॥ बहिःकृत्रिमसंरंभोहृदिसंरंभवर्जितः ॥ कर्ताबहिरकर्तांचलोकेविहरराघव ॥ १ ॥ टीका ॥
तरी रघुनाथा ऐक सांगेन॥लौकिकीं कैसें करावें वर्तन॥तरि अंतरीचें टाकूनि कर्तेंपण॥संरंभ पूर्ण कर्मांचा ॥५१॥
संरंभ शब्द अंतरींचा ॥ जो किं हव्यासु मनाचा ॥ अभिलाषोनि विषयाचा ॥ चळे तो मनाचा संरंभु ॥५२॥ बाह्य
कर्तव्यतेचि चरफड ॥ कर्म संपादावें अतिउदंड ॥ जेणें विषयसुख अतिगोड॥ होय उघड आचरतां॥५३॥तेथें आप
पर नविचारी ॥ युक्तायुक्त मनीं नधरी ॥ कर्म करितां हो विश्वबोहरी ॥ परि ते करी विषयालागीं ॥ ५४ ॥ययाचें
नाम संरंभ जाण॥ अंतर बाह्य वोळखे याची खुण ॥ तो अंतरींचा संरंभ टाकून ॥बाह्य वर्तन सुखें करी॥५५॥तो
संरंभ अंतरीहुनी॥सर्वथा नसे तया निपटोनी॥बाह्यसंरंभ अतिनिर्वाणीं ॥ दाखवी जनीं कृत्रिमपणें ॥५६॥नाहे
अंतरीं नसतां बाह्य कैसें करी॥ हें तंव नघडे कोणे प्रकारीं॥आधीं मनीं जरी इच्छा धरी॥तरीच करी बाह्यकर्म॥
॥५७॥यन्मनसाध्यायतियद्वाचावदति॥ऐसें बोलतसे स्वयें श्रुती॥आधीं मनें जे पदार्थ ध्याइजेति॥तेचि करिती

१ अनुतापयुक्तजीअवस्था. २ भय. ३ इच्छा. ४ भस्म, नाश. ५ लगटून. ६ कपट.

क*रणें सकळें ॥ ५८ ॥ वाचा हें उपलक्षण जाण ॥ वाचा शब्दें सर्वहि इंद्रियगण ॥ अर्थ मनीं धरिल्यियावीण ॥ इंद्रियें जाण नप्रवर्तती ॥ ५९ ॥ मनाच्या अभिलाषावांचुन ॥ बाह्य संरंभ नघडे जाण ॥ आधीं इछा जरी करी मन ॥ तरी वर्तन इंद्रियांसीं ॥ ६० ॥ तरी सर्वहि याची विवंचना ॥ मानेल जैसी सज्ञाना ॥ सांगेन तैसी द्या अवधाना ॥ येकाग्र मनेंकरूनियां ॥ ६१ ॥ तरी जितुकी विपरीत कल्पन ॥ तितुकें ज्ञानीयासि मिथ्याभान ॥ तेथें संकल्प विकल्प मनन ॥ करी कोण कोणा अर्थी ॥ ६२ ॥ अपूर्णकाम जो पुरुष असे ॥ तो कामना करी स्वेछासोसें ॥ आणि सर्वांहुनि उत्तम तें जो असे ॥ स्वयेंचि वसे सर्वांवरिष्ठ ॥ ६३ ॥ तो आपणाहुनि दुजें थोर ॥ देखेल तरी कामनाप्रकार ॥ त्याग करी अतिसत्वर ॥ येरवीं संपूर्ण परमानंदु ॥ ६४ ॥ सकळांसीं दुःखाचि अप्राप्ति ॥ आणि व्हावी सर्व सुखाची विश्रांती ॥ इतुकेंच सर्व जन इच्छिती ॥ पशु पक्षीयाति आदिकरूनि ॥ ॥ ६५ ॥ द्रव्यदारादि देहसौख्य ॥ इंद्रादिकें पदें असंख्य ॥ इच्छिती सर्वहि परम सौख्य ॥ हेंचि मुख्य जीवमात्रां ॥ ६६ ॥ भूत भविष्यदुःख आपणासीं ॥ नव्हावें येकेहि घटिकेसीं ॥ निरंतर सुख संयोगासीं ॥ असावें मानसीं हेंचि वर्ते ॥ ६७ ॥ तरी दुःखनाश आणि सुखउन्नति ॥ व्हावी निरतिशय सुखाची प्राप्ती ॥ ते आत्मसुखावेगळी गा रघुपती ॥ नाहीं सर्वांथीं सत्यलोकींहि ॥ ६८ ॥ जरी साम्राज्य भौज्य स्वाराज्य ॥ वैराज्य पारमेष्ठ्य महाराज्य ॥ सातवें तें आधिपत्यराज्य ॥ आठवें सायुज्य ब्रह्मानंद ॥ ६९ ॥ आतां या सप्तराज्यांचें विवर-

---

* इंद्रियें. १ दृष्टांत. २ लक्ष. ३ उत्सुकतेनें. ४ वृद्धि. ५ अगणित.

ण ॥ तुज सांगों देइजे अवधान ॥ इत्यादिक राज्याभिधान ॥ काय कोण कोण ह्मणिजेत ॥ ७० ॥ भुवादिक जे सप्तहि लोक ॥ भूर्लोक भुवर्लोक स्वर्लोक ॥ महर्लोक जनलोक तपोलोक ॥ सातवा सम्यक् ब्रह्मभुवन॥७१॥ अनुक्रमेंचि सप्तलोकांचें ॥ साम्राज्यादिक राज्य गा साचें ॥ तुळना नयेति ब्रह्मसुखाचे ॥ तेथें विषयाचें कोण सुख ॥ ७२ ॥ आणिक अर्थेंहि सांगेन ॥ सप्तराज्यांचें विवरण ॥ आपस्तंभ शाखेसी वचन ॥ उपनिषदें आपण गर्जती ॥ ७३ ॥ मनुष्यानंदापासुनी ॥ शतगुण आनंद वरिल्या स्थानीं ॥ ऐसें सत्यलोकपर्यंत वाखाणी ॥ कोंडीस वाणी स्वयें श्रुती ॥७४॥ आणिकही अर्थांतर ऐसें ॥ स्वयें बोलिलें वेदव्यासें ॥ तोंचि शुकें भागवतमिसें ॥ निरूपिलेंअसे परिक्षितीप्रती ॥ ७५ ॥ तरी साम्राज्य ह्मणिजे सार्वभौमता ॥ ते तंव ब्रह्मसुखासीं नये समता ॥ तेथें ते येकाधिपत्यता ॥ असे क्षुल्लकता तियेसीं ॥ ७६ ॥ स्वाराज्य ह्मणिजे इंद्रपद ॥ तेंही सुख तेथें अतिमंद ॥ आणि अंतरायेंही अगाध ॥ अतिबाध पतनाचा ॥ ७७ ॥ तेही ब्रह्मसुखेसींसम सरी ॥ नपवे येक निमिष्यभरी ॥ वैराज्य विराट सुखाची थोरी ॥ नपवे सरी ब्रह्मसुखेसीं ॥ ७८ ॥ जेव्हां महाप्रळय असे होत ॥ तेव्हां विराट होय अभिमानगळित ॥ ब्रह्मांड सर्वही लय पावत ॥राज्य करीत तेथें कोण ॥ ७९ ॥ सार्वभौम आणि इंद्रसुख ॥ दोन्ही येकत्र केलिया देख ॥ तोंचि उद्भट विराटसुख ॥ नपवे लेख ब्रह्मसुखाचे ॥ ॥ ८० ॥ पारमेष्ठ्यराज्य तें ब्रह्मपद ॥ चिरस्थायी अतिअगाध ॥ तें सुख निरूपितां विशद ॥ निरूपण बाध

१ लक्ष. २ अल्प. ३ विघ्नें. ४ प्रसिद्ध. ५ स्पष्ट.

विस्ताराचा॥८१ ॥ जेथें शुद्ध पेरो ज्याची उभवणी ॥ घरोघरीं कामधेनु चिंतामणी ॥ दैन्यंदुःख नदेखती स्व-प्नीं ॥ नायकती काहाणी मरणाची ॥ ८२ ॥ जरा मृत्यु नाहीं कोणासीं ॥ तेथें रोगाची गोष्टी कायसी ॥ अमृ-तपान सर्वां जनांसीं ॥ नाहीं सुखासीं मर्यादा ॥ ८३ ॥ असत्य नवोलती कोणी ॥ ब्रह्मविचारुचि बोलती व-चनीं ॥ प्रपंचदुःख नदेखती नयनीं ॥ नभीति कोणी कळिकाळा ॥ ८४ ॥ ऐसिया लोकांचा जो अधिपती ॥ चतुरानन मंगळमूर्ति ॥ निजासनीं सहजस्थिती ॥ बैसोनि उत्पत्ति जगाची करी ॥ ८५ ॥ तेहतीस कोटी देव सकळ ॥ गण गंधर्व नागकुळ ॥ अप्सरागण विद्याधर प्रबळ ॥ करिती सकळ उत्पत्ती ज्याची ॥ ८६ ॥ चंद्रार्क दोन्ही दीपधारी ॥ पवनासारिखा विंजणें वारी ॥ इंद्र स्वयें छत्रधरी॥ मेंढे करी अष्टौदिक्पाळ ॥ ८७ ॥ स-कळ ऋषींचि मांदी ॥ नमन करिती ब्रह्मपदीं ॥ वेदघोष पदोपदीं ॥ करिती शब्दीं सामगायनें ॥ ८८ ॥ सकळ देवांच्या मुगुटकोटी ॥ नमस्कारीं होतसे दाटी ॥ टगत्कारु निजासनीं पिटी ॥ होतसे पैठी रत्नांची ॥ ८९ ॥ ऐशा दाटणी दास्य करितां ॥ अवसरु नलभे इंद्रादि समस्तां ॥ तेथें अशुचि पुरुषाच्या कथा ॥ कोणें प्रांतीं होतील ॥ ९० ॥ अश्विनौ देव विंजणें जाणविती ॥ मूर्तिमंत वेद चारी तिष्ठती ॥ दोन्हीं पार्श्वभागीं चारी मू-र्तीं ॥ स्वयें बोलती उपनिषदार्थ ॥ ९१ ॥ काम क्रोध आणि राग द्वेष ॥ नाहीं जेथें सर्व जनांस ॥ तेथें स्वयें त्या सत्यलोकनाथास ॥ काय देखा संकल्पावें ॥ ९२ ॥ असो आतां किती बोलावें ॥ सुख सहस्रावदनीं नव-

१ उभारणी. २ दारिद्र्य. ३ चंद्रसूर्य. ४ रखवालदार. ५ समुदाय. ६ व्यासपीठ. ७ अपवित्र. ८ बाजूस.

र्णवे ॥ ऐसेहि परि सरी नपवे ॥ न उपमये ब्रह्मसुखेसीं ॥ ९३ ॥ महाराज्य तेंही ऐसें ॥ महत्तत्व जया ह्मणि जे-
तअसे ॥ ईश्वरूच प्रपंचउद्देशें ॥ इच्छी सोसें सृष्टी करूं ॥ ९४ ॥ जेथें प्रपंचाकार चित्तवृत्ती ॥ प्रपंच रचावा हे
आर्ती ॥ ह्मणोनि ब्रह्मसुखा सरी नपवती ॥ व्यवहारस्थिती ह्मणोनियां ॥ ९५ ॥ आधिपत्य तें नित्य तृप्त ॥
षड्गुणैश्वर्य ईश्वरयुक्त ॥ तेंही सुख न्यून ह्मणिजेत ॥ विकारवंत ह्मणऊनियां ॥ ९६ ॥ इत्यादि सुखें जेथें सर-
ति ॥ त्या ब्रह्मसुखाची जयांसी प्राप्ति ॥ तेही विषयफळा इच्छिती॥ समूळ भ्रांती भावितयांची ॥ ९७ ॥ जो
निरंतर परमानंद सेवी ॥ तो कांजि कासयालागीं आठवी ॥ जो नित्य दिव्यान्नें जेवी ॥ तो कां सेवी रुक्षशा-
खा ॥ ९८ ॥ इंद्रपदीं जो बैसलासे ॥ शूकराचे भोग त्याचेनि मानसें ॥ स्वप्नींहि परि नस्पर्शे ॥ भोगवशें वि-
टला जरी ॥ ९९ ॥ तैसा जो स्वयें ब्रह्म झाला ॥ नित्य ब्रह्मसुखेंचि जो धाला ॥ त्याचें मन विषयभोगाला ॥
कोणीहि वेळा इच्छीना ॥१००॥ ऐसें इछेवांचुन ॥ कर्म करी जो हेतुविण॥कर्मीं आसक्ति नाहीं इच्छेकरून ॥
अहं पूर्ण गेला ह्मणोनी ॥ १ ॥ जेथें अहंकार आसक्ति नाहीं ॥ तेथें कामसंकल्प कैंचा काई ॥ कामसंकल्प शू-
न्य जें कर्म सर्वही ॥ तेंचि पाही संरंभहीन ॥ २ ॥ ऐसें या अंतर संरंभेविण ॥ बाह्य संरंभ शिथिल जाण ॥ य-
दर्थीं पार्थाप्रति श्रीभगवान् ॥ स्वयें श्रीकृष्ण बोलिले ॥ ३ ॥ संमतिगीता ॥ यस्यसर्वेसमारंभाःकामसंकल्पव-
र्जिताः ॥ ज्ञानाग्निदग्धकर्माणंतमाहुःपंडितंबुधाः ॥ १ ॥ यस्यनाहंकृतोभावोबुद्धिर्यस्यनलिप्यते ॥ हत्वापिस-

१ उत्सुकतेनें. २ इच्छा. ३ डुकराचे. ४ समाधान पावला. ५ बाह्यव्यवहार. ६ पोकळ, निस्तेज.

॥ ५ ॥

इमाँल्लोकान्नहंतिननिबध्यते ॥ २ ॥ टीका ॥ अगा पूर्वसंस्कारेंकरुनी ॥ बाह्य संरंभ होती भरवसेनी ॥ पारि तो तर्थींचा नव्हे निर्वाणीं ॥ नलिंपे कोणी कर्मविषईं ॥४॥ अथवा बाह्यसंरंभही करी ॥ परी अहंविरहित अंतरीं ॥ तैसा तूंहि होय रावणारी ॥ लोकाभ्भीतरीं सुखें वर्ते ॥ ५ ॥ अगा हृदयीं संरंभ नसतां ॥ बाह्य करी जे ते कृत्रिमता ॥ तो तर्थींचा नव्हे कर्ता ॥ सर्वथा अकर्ता प्रतीतिबळें ॥ ६ ॥ बाह्य सकळ कर्मांचियेपरी ॥ सर्व संरंभ सर्वदां करी ॥ कर्ता दिसे जनाचियेपरी ॥ अकर्ता अंतरीं ब्रह्मत्वें ॥ ७ ॥ तयाचें साक्षीपण नमैळे ॥ यालागीं कर्तृत्व तया नातळे ॥ अकर्ता अंतरीं सबाह्य कळे ॥ संरंभमेळे इतर दृष्टी ॥ ८ ॥ तरी रघुनाथा ऐसिये स्थिती ॥ सर्वदां वर्तावें जनाप्रती ॥ तुज वर्ततांही नबाधिती ॥ कर्माकर्मगती स्पर्शेना ॥ ९ ॥ आणिकही राहाटी परी ॥ एकाग्र ऐकें रावणारी ॥ तैसेंचि वर्ततां काळांतरीं ॥ बाध अंतरीं नपाविजे ॥ ११० ॥ श्लोक ॥ अंतःसंत्यक्तसर्वाशोवीतरागोविवासनः ॥ बहिःसर्वसमाचारोलोकेविहरराघव ॥ २ ॥ टीका ॥ अगा राग शब्दें विषयीं प्रीति ॥ हेंचि कारण सर्वां अनर्थांप्रती ॥ आशापाश येणेंचि पडती ॥ ह्मणोनि सर्वार्थीं टाकावा हा ॥ ११ ॥ अंतरींचा राग जरी गेला ॥ सर्व आशांचा थांरा मोडला ॥ अप्राप्तीचा अभिलाष भला ॥ तोचि संचिला आशासमूह ॥ १२ ॥ जेथें विषयराग समूळ गेला ॥ तेथें अभिलाष सहजचि मावळला ॥ प्राप्तविषयही भोगाला ॥ नव्हे त्याला उद्यंत ॥ १३ ॥ ते आशा आणि विषयप्रीति ॥ अंतरीहूनि जयाच्या जाती ॥ तोचि

१ व्यवहार. २ कपट. ३ स्पर्श करीतनाहीं. ४ आश्रय. ५ तयार.

॥ ५ ॥

जाण वैराग्यमूर्ती[1] ॥ राग चित्तीं जया नाहीं ॥ १४ ॥ हेंचि निर्वासनेचें रूप ॥ नाहीं भोगेच्छा ना भयकंप ॥ अंतरसुख असे अमूप ॥ आत्मस्वरूप होउनी ठेला ॥ १५ ॥ अथवा आशा शब्दें व्याख्यान ॥ अप्राप्त विषयीं इच्छा पूर्ण ॥ तें व्हावें मजलागुन ॥ ऐसें जें आपण अभिलाषावें ॥ १६ ॥ प्राप्तविषयाच्याठाईं विषयप्रीति ॥ जे कीं द्रव्य दारादि संपत्ती ॥ तें न्यून नव्हावें हें सर्वदां चित्तीं ॥ वियोगें अतिमरण मानी ॥ १७ ॥ तो राग नाहीं जेथें विशेषें जाण ॥ तेंचि वीतरागाचें लक्षण ॥ विषयीं अतिप्रीति स्वानंदेंकरून ॥ लुलुप्तता[2] जाण तेथें कैंची ॥ १८ ॥ वासनाशब्दीं पूर्वीं अनुभविलें ॥ जे विषय गोडपणें मानिले ॥ तेचि चित्तीं दृढ बैसले ॥ ते स्मरे भले वेळोवेळां ॥ १९ ॥ हेंही सर्व जयाचें तुटलें ॥ बाह्यत्वें आचार असती उरले ॥ ऐसें विचारितां लौकिकीं[3] भलें ॥ बाह्य मेळे नलिंपे जो ॥ २० ॥ ऐसा असोनियां अंतरीं ॥ बाह्य बरवा आचार करी ॥ लोकसंग्रहार्थें कामसंस्कार करी ॥ लोकाभीतरीं रघुराया ॥ २१ ॥ जैसा रागें करी अज्ञानीजन ॥ करीतसे वासनें कर्माचरण ॥ तैसें बाह्यजनाचें वर्तन ॥ अंतरीं हीनरागद्वेषी ॥ २२ ॥ ऐसा होउनी लोकामाझारीं ॥ सुखें वर्ते गा पौलस्त्यारी ॥ लोकव्याख्या द्विप्रकारीं ॥ सांगेन कुसरी परियेसा ॥ २३ ॥ लोक शब्दें सर्वजन ॥ हेंचि तरी प्रसिद्ध असे जाण ॥ दुसरें लौकिक शब्दें देह संपूर्ण ॥ असे व्याख्यान सर्व शास्त्रीं ॥ २४ ॥ ऐसा अंतरीं असोन ॥ देहीं वर्ते बाह्य संरंभेंकरून ॥ बाधु नपवे सर्वथा जाण ॥ विदेहि आपण ह्मणऊनियां ॥ २५ ॥ जेधवांचि सकळाह्नि

१ विरक्त, वैराग्यशील. २ लुब्धता. ३ चातुर्य.

व्यतिरिक्त ॥ आपणातें जाणे सुनिश्चित ॥ तेथवांचि तो देहातीत ॥ नाहीं लिंपित देहसंगें ॥ २६ ॥ तैसाहि देही असोनी ॥ कर्म करी देह आश्राउनी ॥ परि तो तेथींचा नव्हे भर्वसेनी ॥ देहीं जनीं वर्ते जैसा ॥ २७ ॥ मननाउपरी वर्तणुक ॥ एवंविध वर्तावें देख ॥ सांगों आणिकही कौतुक ॥ वर्तणुक अंतर्बाह्य ॥२८॥ आणिकही वर्तती परी ॥ सांगेन तुज भवगजकेसरी ॥ तैसा होऊनियां अंतरीं ॥ जनाभीतरीं वर्ते सुखें ॥ २९ ॥ अंतरीं करूनि निदिध्यासन ॥ तेणेंचि अनुसंधानेंकरून ॥ जनीं वर्तावें ऐसें जाण ॥ सांगेन खुण विबुधवर्या ॥ १३० ॥ श्लोक ॥ पूर्णदृष्टिमवष्टभ्यध्येयत्यागविलासिनीम् ॥ जीवन्मुक्ततयास्वस्थोलोकेविहरराघव ॥ ३ ॥ टीका ॥ अगा ध्येयत्यागें विलासंती ॥ ते पूर्णदृष्टी गा सीतापती ॥ ध्येय स्फुरे ते अपूर्णगती ॥ द्वैतस्थिती ह्मणोनियां ॥ ॥ ३१ ॥ एक ध्येय आपण ध्याता ॥ ऐसें स्फुरे जेथें जानकीकांता ॥ तेचि अपूर्ण दृष्टी गा द्वैतता ॥ येकरूपता नाहीं जेथें ॥ ३२ ॥ ध्येय आपणावेगळें ॥ स्फुरे गा जेथें निराळें ॥ तें अपूर्णदृष्टी द्वैतमेळें ॥ जेथें खेळे अज्ञान॥ ॥ ३३ ॥ ब्रह्मात्मैक्यबोध ह्मणिजेत ॥ ध्येय ध्याता ध्यान नस्फुरे जेथ ॥ तेचि पूर्ण दृष्टी गा निश्चित ॥ विपश्चित ह्मणताती ॥ ३४ ॥ ऐसी पूर्ण दृष्टी अवलंबुनी ॥ आपण ध्याता हें येक ध्येय त्यजुनी ॥ राहे जीवन्मुक्तिकरूनि ॥ स्वरूपस्थ ये जनीं विहरावें ॥ ३५ ॥ स्वस्वरूपीं राहणें हें स्वस्थपण ॥ तैसा राहे मुक्त होऊन ॥ आतां दुसरें ऐकें व्याख्यान ॥ समाधान समाधीचें ॥ ३६ ॥ अगा पूर्ण दृष्टीकरून ॥ स्वस्वरूपस्थ राहें दृश्य

१ निराळा. २ रात्रंदिवसविचार. ३ रमतात, क्रीडाकरितात. ४ ज्ञानी.

त्यजून ॥ लोकांत वर्ते धरून खुण ॥ बाध जाण न पावसी ॥ ३७ ॥ अथवा अहंममतेकरून ॥ मी देहविशिष्टें जाणे आपण ॥ ममकारें पुत्र दारादि स्वधन ॥ इष्ट बंधूजन मानित ॥ ३८ ॥ तैसीयासारिखेंचि वर्तन ॥ भरण पोषणादिक जें चिंतन ॥ तें तें सर्वही ध्येय जाण ॥ त्या त्यागें पूर्ण राहे जो ॥ ३९ ॥ अहंकार ममकार विरहित ॥ जीवन्मुक्त सर्वत्र वर्तत ॥ तो तेणें कर्तव्यतेचा ईषत ॥ बाधु निश्चित कदां नपवे ॥ १४० ॥ ऐसा वर्ततां लोकाचारीं ॥ तेचि जीवन्मुक्तता रावणारी ॥ ऐसें मनन झालियावरी ॥ लोकाभीतरीं असावें ॥ १४१ ॥ तिहीं लोकीं करूनि वर्तणें ॥ सर्वदां सर्वत्र इये खुणे ॥ सांगीतलें परि येस्थिती न वागणें ॥ यालागीं साधनें करावीं ॥ ४२ ॥ तरी देहादि प्रपंचाचें सत्यत्वें भान ॥ होय तेंचि विपरीत भावन ॥ तेंचि समाधीसिं परम विघ्न ॥ स्वरूप पूर्ण नप्रकाशे ॥ ४३ ॥ असंभावना विपरीतभावना ॥ साक्षात्कारासीं हेंचि विघ्नजाणा ॥ यालागीं श्रवण मनन निदिध्यासना ॥ तिहीं साधना साधावें ॥ ४४ ॥ त्यामाजी श्रवण मनन दोन्ही ॥ सांगीतलीं गा कार्मुकपाणी ॥ आतां विपरीतभावनेलागुनी ॥ निदिध्यासनीं प्रवर्तावें ॥४५॥ ब्रह्मावेगळें जितुकें दृश्य स्फुरे ॥ तेंचि प्रपंचाकार द्वैत खरें ॥ तें निरसावया साधन बरें ॥ जाण निर्धारें निदिध्यासन ॥ ४६ ॥ तरी सर्वदां येकांतीं बैसोनी ॥ द्वैत निरसावें गा धनुष्यपाणी ॥ तेणें साक्षात्कारु ततक्षणीं ॥ होय निर्वाणीं अनाथबंधो ॥ ॥ ४७ ॥ आपणाहुनी जे जे विजाती ॥ ते ते स्फुरो नेदावे गा आनंदमूर्ति ॥ राहावें आपुले सहजस्थिती ॥

१ देहाच्या लक्षणानें २ किंचित्. ३ निराकरण करावें. ४ शेवटीं.

तेचि गती प्राप्तीची ॥ ४८ ॥ ऐसोंनि चित्तमालिन्येकरून ॥ विजातीय स्फुरे संस्कारें जाण ॥ अथवा विषयप्रीति करून ॥ देहादि स्फुरण जरी झालें ॥ ४९ ॥ तरी द्वैततिरस्कारेंकरून ॥ विजातीय ऐसें वोळखोन ॥ सजातीय प्रवाही[1] करून ॥ ध्येय पूर्ण करावें गा ॥१५० ॥ स्वजातीय रूप आपुलें ॥ ब्रह्मेंसि ऐक्य जेथें बाणलें ॥ तेंहि गुरुमुखें वोळखिलें ॥ सच्चिदानंद भलें तेंचि जाण ॥ ५१ ॥ तद्रूपेंकरूनि जें राहाणें ॥ तयातें साक्षात्कारु ऐसें ह्मणणें ॥ तो होय तोंवरी वळणें ॥ वृत्तीखुणें स्वरूपोंचिये ॥ ५२ ॥ तरी तेंचि निदिध्यासन गा कैसें ॥ सांगों ऐकिजे रघुवंशें ॥ जेणें साक्षात्कारु होतसे ॥ सुखें उल्हासे परमानंदु ॥५३॥ श्लोक ॥ एकोविशुद्धबोधोहमितिनिश्चयवन्हिना ॥ प्रज्वाल्यद्वैतगहनमेकएवसुखीभव ॥४॥ टीका ॥ अगा अद्वैतबोधाग्निपुढें ॥ द्वैततृणराशी काय बापुडें ॥ भस्मांत होय धडफुडें[2] ॥ ह्मणो कोडें हेंचि करी ॥ ५४ ॥ तोचि अद्वैतबोधाग्नि गा कैसा ॥ तोहि सांगों गा तुज विरेशा ॥ तरी सजातीय विजातीय ऐसा ॥ स्वगत भेदलेशा भेदेना कीं जो ॥ ५५ ॥ भेदत्रयाहूनि विहीन ॥ ऐसा सर्वत्र येकु अपरिच्छिन्न[3] ॥ स्वप्रकाशकु शुद्ध निर्गुण ॥ नित्य ज्ञानस्वरूप मी ॥ ५६ ॥ ऐसा अखंडैक्यावबोधदहन ॥ तेणें प्रज्वाळुनी द्वैतकानन[4] ॥ येकला येकचि होऊन ॥ सुखसंपन्न सुखें राहे ॥ ५७ ॥ अगा ऐसिया बोधेंकरूनि राहातां ॥ द्वैत बाधों नशके सर्वथा ॥ ह्मणोनि येणेंचि बोधें सीताकांता ॥ अपरोक्षता[5] स्वयें होय ॥ ५८ ॥ अगा मुख्य दैवत देहस्फुरण ॥ स्वस्वरूपीं होतसे देहभान ॥ हेंचि द्वैत गा अतिगहन ॥

१ सतत चालणारे. २ खरोखर. ३ अविनाशी. ४ द्वैतरूपी अरण्य. ५ साक्षात्कार.

पाशु पूर्ण बंधरूपें ॥ ५९ ॥ तोही सोडावयाचें साधन ॥ आणीक निर्वाण तुज सांगेन ॥ तें येकाग्र करूनियां म-
न ॥ ऐक पूर्ण पूर्णानंदा ॥१६०॥ अगा देहद्वैत जंव स्फुरतसे ॥ तंव स्वस्वरूप कैंचें प्रकाशे ॥ ह्मणोनि द्वैत जेणें
करूनियां नासे॥ साधन ऐसें जाण रामा॥६१॥ श्लोक ॥ देहोहंमानपाशेनदृढंबद्धोसिसर्वतः॥बोधोहंज्ञानखड्गेनत
न्निकृत्यसुखीभव ॥५॥ टीका॥अगा देहोहं मानपाशेंकरून॥सर्वत्र दृढ बांधलासे जाण॥मान शब्दें बोलिजे अज्ञा-
न॥ देहबुद्धि पूर्ण तेचि ह्मणिजे॥६२॥अगा देह मी जाणणें याचिसाठीं ॥ देहपाशाची पडे वज्रमिठी ॥ मग सो-
डितांही नसुटे गांठी ॥ जगजेठी परिस तूं॥६३॥ अथवा देह मी ऐसा जो मानी ॥ प्रसिद्ध जोकीं देहाभिमानी॥
तेचि पाशाचे लक्षणीं ॥ दुसरे व्याख्यानीं एवंविध ॥ ६४ ॥ त्या देहाभिमानपाशेंकरून ॥ सर्वत्र टाकिजे क-
ळासुन ॥ तोचि मी बोधरूप हेंचि ज्ञान ॥ खड्ग तीक्ष्ण छेदावया ॥ ६५ ॥ मी देह नव्हे ना इंद्रियवर्ग ॥ विश्व
नव्हे मी असंग ॥ ज्ञानस्वरूप मी अव्यंग ॥ नाहीं भंग जयासीं ॥ ६६ ॥ ऐसिया ज्ञानखड्गेंकरून ॥ देहोहं
मानपाश निंकृंतन ॥ सुखीं राहे सुखरूप होऊन ॥ हेचि खुण निदिध्यासनाची ॥६७॥ आणि ऐशिया स्थिती
राहतां ॥ ह्मणोनि बाह्यसंरंभें नपवे बाधकता ॥ तो अंतरीं असोनी अकर्ता ॥बाह्य कर्ता ऐसा भासे ॥६८॥ असो
निदिध्यासनाची परी ॥ आणिक तुज सांगेन गा असुरारी ॥ अनुष्ठितांचि सरे द्वैतवारी॥साक्षात्कारीं आपणा भे
टी ॥६९॥ श्लोक ॥ अनात्मनिरतिंत्यक्त्वानिर्विभागोजगत्स्थितौ ॥ एकनिष्ठतयातंस्थःसच्चिन्मात्रपरोभव ॥ ६ ॥

१ बंधन. २ बांधून. ३ दोषरहित. ४ छेदन.

टीका ॥ तरी अनात्मा जो देहमूर्ति ॥ तेथें टाकूनियां अतिप्रीति॥असतां जगाचि हे स्थिती॥निर्विभागगती असावें ॥१७०॥आतां जगस्थिती ते काय ॥ तेथें निर्विभाग काय आहे॥हेंचि विवंचुनी सर्व पाहे॥ऐक अर्थ हे विबुधपती॥ ७१ ॥ तरी भासतांही जगडंबर॥ स्थिती भासे नानाकार ॥ तेथें चित्त पावे जे विकार ॥ भागप्रकार या नाम ॥ ७२ ॥ हा गज हा पक्षी हा अश्वयाती ॥ मनुष्य पशु इत्यादि प्रतीति ॥ सत्य भासे ते जानकीपति ॥ विभागस्थिती या नाम ॥ ७३ ॥ हें सर्वही आकृतिजात॥ देखतांही नमाने ज्या यथार्थ॥अधिष्ठानत्वें वस्तुचि जाणत ॥ तोचि अर्थ निर्विभाग ॥ ७४ ॥ जग जगत्वें प्रतिभासे ॥ व्यक्तीहि जैसी तैसीचि दिसे॥ परि सर्वथा बाधित ज्या असे ॥ मिथ्या भासे जैसें मृगांभ ॥ ७५ ॥ ज्ञान तयाहीलागीं जैसें ॥ शुक्तिच्याठाईं रजत भासे ॥ परि तो रजत्वें घेतनसे ॥ जाणतअसे अधिष्ठान पूर्ण ॥ ७६ ॥ अधिष्ठान ज्यासीं यथार्थ कळलें॥ अपरोक्ष बरवें असे बाणलें ॥ तया तेथें आन जरी भासलें ॥ तरी साचमेळे नघे पैं तो ॥७७॥ त्याची इतराभासीं दृष्टि नसे ॥ अधिष्ठानचि शुद्ध जाणतसे ॥ तया प्रतीभासिक भास भासे ॥ परी साच दिसे अधिष्ठान ॥७८॥ हें निर्विभागाचें लक्षण ॥जग भासतां नेघे सत्यपण ॥ पूर्ण जाणे अधिष्ठान ॥ आकारशून्य देखत ॥ ७९ ॥ जेव्हां जगस्थिती प्रतिभासक ॥ बाणलिया जाण सम्यक ॥ तेथें आर्ति उपजे तया देख ॥ मिथ्यत्वीं सुख कैंचें उपजे॥१८०॥ वोडंबरीचे अळंकार ॥ देखिजेती जरी सुंदर ॥ तरी मिथ्या कळलिया प्रीति थोर॥नकरी धीर जयापरी ॥८१॥



१ निर्विकार २ विचार करून. ३ मृगजळ. ४ इच्छा. ५ गारुडीविद्येचे.

नातरी स्वप्नींचि सुंदर वनिता ॥ देखोनि नाभिलाषी जागृतहोतां ॥ हार देखिला दर्पणीं पाहातां ॥ घ्यावया-
चित्ता चळ नव्हे ॥ ८२ ॥ तैसें असत्य कळलियावरी ॥ प्रीति नुपजे सर्वप्रकारीं ॥ ह्मणोनि उपेक्षूनि सर्वप्रका-
रीं ॥ असे अंतरीं येकनिष्ठ ॥ ८३ ॥ ऐसें मिथ्या बाणल्या जगटवाळ॥ तेथें प्रीति नुपजे काय नवल ॥ याला-
गीं वृत्ति टाकूनि केवळ ॥ येक निर्मळ अंतरस्थ होईं ॥८४॥ अगा येकनिष्ठतेकरूनियां ॥ अंतर्मुख व्हावें रघु-
राया ॥ सच्चिन्मात्रपर होऊनियां॥ गूढार्थां यया रूप करूं ॥८५॥ येक शब्दें परब्रह्म जाण ॥ तन्निष्ठ होणें ते ये-
कनिष्ठता पूर्ण ॥ निष्ठेचेंही स्वरूपलक्षण ॥ सांगो खुण निर्जरपती ॥ ८६ ॥ तरी ते येकनिष्ठता ऐसी ॥ नस्पर्शे
दुजया पदार्थासीं ॥ ब्रह्माव्यतिरिक्त आणिकासीं ॥ दृश्यजातासीं स्पर्शेना ॥८७॥ जें जें दृश्य तें बाह्य जाण ॥
सर्वांचें अंतरस्थ तें ब्रह्म पूर्ण॥तेंचि तें सच्चिदानंदघन ॥ तत्परता जाण होइजे ॥८८॥ बाह्य नस्पर्शे दृश्यासीं ॥
तोचि अंतरीं पावे विश्रांतीसीं ॥ अंतर शब्दें ब्रह्म परियेसी॥ तेथें आपणासी विश्रांती कीजे॥ ८९ ॥ तया ना-
म अंतरस्थपण ॥ हें जाण रामा येथींची खुण ॥ तत्परचि व्हावें संपूर्ण ॥ कांहीं आन नस्पर्शावें॥ १९० ॥ त-
न्मात्र शब्दें अन्य व्यावृत्ती ॥ केली येणें पदें सर्वार्थीं॥ब्रह्मावेगळी दृश्याकार वृत्ती॥सीतापती होऊं नेदी॥९१॥
दुसरें तरी वास्तव नसे ॥ परि भ्रमास्तव मिथ्या भासे ॥ तें मन दृष्टीनेंही नस्पर्शे॥सर्वदां असे तत्परची ॥९२॥
ऐसिया निदिध्यासनें रमाकांता ॥ साक्षात्कारु होतसे गा सर्वथा ॥ तरी निरंतर करावें त्रैलोक्य नाथा ॥ वि-

१ स्त्री. २ ब्रह्मावेगळी. ३ विवंचना. ४ खरोखर.

परीतार्थी मुकिजे जेणें ॥ ९३ ॥ आतां सच्चिन्मात्रपर ॥ होई ऐसें बोलिले ऋषेश्वर ॥ तरी याचें व्याख्यान सविस्तर ॥ सांगेन सार परियेसा ॥ ९४ ॥ तरी तेंचि ब्रह्म कैसें आहे ॥ तें सच्चित शब्दें बोलिलें पाहे ॥ तें वाचे तरी बोलिलें न जाये ॥ परि विशिष्ट होय बोलावया ॥ ९५ ॥ अगा जें जें वाचा बोलिजे ॥ तें तें विशिष्ट जाणिजे ॥ त्याचीं हीं लक्षणें जरी कीजे ॥ तरी केवळ सहजें लक्षिजेत ॥ ९६ ॥ आतां विशिष्ट काय कैसें ॥ लक्षण तें कींलक्षण असे ॥ लक्षणा केलिया काय उरत असे ॥ वाचा प्रवेशे तें स्थान कोण ॥ ९७ ॥ हेंही सांगों तुह्माप्रती ॥ जेणें कळे ययाची स्थिती ॥ तें सर्व परिसोनि चित्तीं ॥ दृढ श्रोतीं धरावें ॥ ९८ ॥ तेंचि वसिष्ठ श्रीरघुनाथाप्रती ॥ सांगती ब्रह्मस्वरूपस्थिती ॥ ह्मणे तेंचि परिसोनियां चित्तीं ॥ विश्वमूर्ति धरावें गा ॥ ९९ ॥ वास्तव्य शुद्ध नित्य केवळ ॥ त्यासि मिळे कल्पीत मैळ ॥ तरी तेंचि जाण विशिष्ट सकळ ॥ जडेसीं केवळ येक जें भासे ॥ २०० ॥ शुद्ध तें सर्वांसीं मिळत ॥ जें तेथेंचि जड सर्व अध्यस्त ॥ उभयतां येकचि भासत ॥ त्यासीं ह्मणिजेत विशिष्ट ऐसें ॥ १ ॥ जैसे शुद्ध स्फटिकाच्या ठायीं ॥ नाना वर्ण भासती पाहीं ॥ ते येकत्र भासलिया जन सर्वही ॥ भाविति तेहि तोचि वर्ण ॥ २ ॥ तो आरक्तसंगें आरक्त भासे ॥ जैसा वर्ण तैसाच दिसे ॥ तयासींच विशिष्ट ऐसें ॥ संत सर्वांशें ह्मणताती ॥ ३ ॥ त्याची तेथील लक्षणा कीजे ॥ आरक्तादि गुण टाकिजे ॥ मग उर्वरीत शुद्ध उरे जें ॥ तेंचि सहजे उपाधिहीन ॥ ४ ॥ तैसें ब्रह्म अतिशुद्ध निर्मळ ॥ स्वप्रकाश व्यापक प्रांज-

१ वर्णादिलक्षणीं युक्त. २ खरीवस्तु. ३ सूक्ष्म. ४ राहिलेलें. ५ स्पष्ट, निर्मळ.

ळ ॥ तयासीं कल्पीत मिळे समेळ ॥ प्रपंचजाळ उपाधी हा ॥ ५ ॥ तें शुद्धव्यापक सर्वांठायीं ॥ विश्वासीं व्यापूनि राहिलें पाहीं ॥ उपाधीचे धर्म शुद्धाच्या ठाईं ॥ भासती सर्वही अधिष्ठानपणें ॥ ६ ॥ तियें उपाधियोगेंकरून ॥ दोन्ही येकत्र भासती ते विशिष्ट जाण ॥ ते निवडावया लक्षण ॥ कीजे सज्ञान तें ऐसें ॥ ७ ॥ अगा लक्षणेचे त्रिविध प्रकार ॥ तेही सांगेन तुज महाथोर ॥ संक्षेपें करिजेल विचार ॥ मन एकाग्र करूनि ऐकें ॥ ८ ॥ तरी जहल्लक्षणा अजहल्लक्षणा ॥ तिसरी ते जहदजहल्लक्षणा ॥ यांचीही सांगो विवंचना ॥ ऐक सज्ञाना रघुवर्या ॥ ९ ॥ अगा जेणेंकरूनि विशिष्ट बोलिजे ॥ त्याचाचि समूळीं त्यागु कीजे ॥ उपाधिवरूनि लक्षिजे ॥ तेचि जाणिजे जहल्लक्षणा ॥ २१० ॥ ॥ गंगायांघोषःप्रतिवसति ॥ ॥ अगा मित्र सांगे मित्राप्रती ॥ गंगेमाजी ग्रामाची वस्ती ॥ तेथें गेलिया होईल ग्रामाची प्राप्ती ॥ ऐसी युक्ति सांगीतली ॥ ११ ॥ तेथें गंगेची उपाधी ग्रामासी ॥ तो गंगेनेंचि विशिष्ट परियेसीं ॥ तेथें जहल्लक्षणा कीजे ऐसी ॥ त्यागु गंगेसीं करावा ॥ १२ ॥ गंगेमध्यें नघडे ग्रामवस्ती ॥ ह्मणोनि जहल्लक्षणा करिती ॥ समूळ गंगाचि टाकिजेती ॥ तीर लक्षिती ज्ञाते जन ॥ ॥ १३ ॥ समूळ गंगेचा त्यागु केला ॥ तीरीं ग्रामु जरी लक्षिला ॥ जहल्लक्षणा यया बोला ॥ होय भूपाळा श्रीरामचंद्रा ॥ १४ ॥ आतां जहल्लक्षणा ते ऐसी ॥ त्यागु नाहीं उपाधीसिं ॥ तद्युक्तचि पदार्थासीं ॥ घेइजे त्यासीं अजहल्लक्षणा ॥ १५ ॥ शोणो[१] धांवति ऐसें ॥ विशिष्ट येथें बोलिलें असे ॥ ह्मणिजे आरक्त अश्व[२] धांवतसे ॥

१ वर्णादि लक्षणयुक्त. २ तांबडा घोडा.

त्यागु नसे उपाधीसी ॥ १६ ॥ आरक्त गुणेसीं अश्वयाती ॥ लक्षिजे जेथें महामती ॥ तेंचि अजहल्लक्षणा सर्वा-
थीं ॥ स्वयें बोलती ज्ञातेजन ॥ १७ ॥ आतां सांगो जहदजहल्लक्षण ॥ तेथें त्यागात्याग विचक्षण ॥ वाच्यांशु
टाकूनि लक्षांशु जाण ॥ घेइजे खुण इयाचि परी ॥ १८ ॥ तेथें शबलांशु टाकिजे ॥ लक्षांशु शुद्ध घेइजे ॥ हे
मुख्य लक्षणा जाणिजे ॥ जे विशिष्ट त्यागिजे शुद्धालागीं ॥ १९ ॥ सोऽयं देवदत्त ऐसें ॥ ये पदीं लक्षणा
ऐसी असे ॥ देवदत्त या पदत्रयांशें ॥ लक्षणामिसें शुद्ध घेइजे ॥२२०॥ तो ह्मणिजे तत्काळ देशविशिष्ट ॥ अयं
पदें यत्काल देशविशिष्ट ॥ उभयतां देश काळ दोन्हीं स्पष्ट ॥ त्यागु उत्कट करावा ॥ २१ ॥ अन्य देशीं का-
ळीं देवदत्त देखिला ॥ वर्तमान देशीं काळीं तोचि भासला ॥ उभयतां देश काळ उपाधी झाला ॥ देवदत्त उ-
रला शुद्ध येक ॥ २२ ॥ अगा शुद्धासीं येका देवदत्तासीं ॥ उपाधि देश आणि काळ परियेसीं ॥ तेथें उभयतां
देश काळासीं ॥ त्यजूनि शुद्धासीं घेइजे ॥ २३ ॥ तेंसेंचि सत चित आनंद ॥ हें ब्रह्मवाचक पदत्रय शुद्ध ॥ हें
विशिष्ट जाण निर्विवाद ॥ सांगों भेद ययांचाही ॥ २४ ॥ इये विशिष्ट पदें तिन्हीं ॥ ह्मणोनि उच्चारणा
आली वाणी ॥ शुद्ध केवळ न बोलवे कोणी ॥ भर्वसेनी जाण रामा ॥ २५ ॥ तेथें दृश्य जें कीं मिथ्याभूत ॥
शुद्धा केवळासीं तेंचि मिळत ॥ तेणें मिश्रित झालिया वाचा बोलत ॥ तया ह्मणिजेत विशिष्ट ऐसें ॥२६॥ या-
माजीं दृश्यमिथ्या तें कोण ॥ आणि शुद्ध केवळ तें किंलक्षण ॥ आणि तेथें करावी जे लक्षणा॥शुद्ध सज्ञाना नि-



१ औपाधिक अंश २ शुद्ध स्वरूप. ३ अत्यंत, चांगला. ४ निःसंशय.

वडावें ॥ २७ ॥ हें सर्वही तुजप्रती ॥ बरवें सांगों गा जानकीपती ॥ तरी सत् शब्दें सत्ता ह्मणिजेति ॥ तैसेंचि ह्मणती आकाश सत्य ॥ २८ ॥ त्या गगनाची मिथ्याभूत सता ॥ आणि ब्रह्माची जे वास्तव सता ॥ येकत्र झालिया तत्वतां ॥ विशिष्ट रघुनाथा त्या नाम ॥ २९ ॥ ब्रह्मसत्ता तरी सर्वत्र असे ॥ आणि लौकिकीं आकाशसत्ताहि भासे ॥ महाप्रळयीं गगन असे ॥ तें साच ऐसें माने जगा ॥ २३० ॥ आकाशसत्ता ते शबल जाण॥ वाच्यांशु झाली असे ते मळीन ॥ ते टाकिलिया उरे चैतन्य ॥ शुद्ध पूर्ण सत्तारूपें ॥ ३१ ॥ तैसें चित् शब्दें बोलिजे ज्ञान ॥ ज्ञान तेंचि शुद्ध चैतन्य ॥ दुसरें तें वृत्तिरूप जाण ज्ञान ॥ दृश्य मिथ्यापण तयासीं असे ॥ ३२ ॥ येणें वृत्तिरूपेंकरून ॥ विशिष्ट वाच्यांशें झालें शुद्ध ज्ञान ॥ ययाची करूनियां लक्षणा ॥ शुद्धज्ञाना निवडावें ॥ ॥ ३३ ॥ तैसें सुखरूपचि ब्रह्म असे ॥ दुसरें चित्तवृत्तीनें जें ज्ञान प्रकाशे ॥ तेंही तुज सांगों कैसें ॥ तेंही विश्शें परिसावें ॥ ३४ ॥ अगा अंतःकरणवृतीच्याठाईं ॥ स्वतःसिद्ध चैतन्य असे पाहीं ॥ तैसेंचि सकळ विषईं ॥ चैतन्य सर्वही व्यापिलें असे ॥ ३५ ॥ ते वृत्ति आणि विषयासीं ॥ संन्निकर्ष होतां परियेसी ॥ तद्विषयक अज्ञानासीं ॥ नाशु त्या क्षणासीं तत्काळ होय ॥ ३६ ॥ उभयतां चैतन्य येक झालिया ॥ सुखोद्भव होय आपसया ॥ हें चैतन्यसुख परि विषयें यया ॥ केलें साचिया परिछिन्न ॥ ३७ ॥ हें क्षणिक सुख आणि चैतन्यसुख ॥ दोन्हीं येकत्र भासती देख ॥ येथें लक्षणा करूनि निर्विशेष ॥ आत्मसुख तेंचि घेइजे ॥ ३८ ॥ ह्मणोनि सत

१ खरी. २ औपाधिक. ३ संबंध, स्पर्श. ४ नाशिवंत, भेद्य. ५ दोषरहित.

चित आणि आनंद ॥ तिहीं पदीं येक ब्रह्मचि शुद्ध ॥ एकेविण एक जड उपेक्ष्य[1] मंद ॥ प्रतिष्ठितां वाद बहुत असे ॥ ३९ ॥ तथापि वेगळें करितां ऐसें असे ॥ सत्ता ज्ञानाहुनि वेगळी नसे ॥ वेगळी करितां दृश्य होतसे ॥ ज्ञानहीन ऐसें जड जाण ॥ ४० ॥ अगा जितुकें अनात्मक दृश्य जाण ॥ दृश्य तें मिथ्याभूत संपूर्ण ॥ यालागीं सत्ता ज्ञानेसीं भिन्न ॥ नघडे जाण रघुवर्या ॥ ४१ ॥ ज्ञान सत्तेहूनि वेगळें बोलतां ॥ तरी सत्तेवीण कल्पीत[2] तत्वतां ॥ जैसी स्वप्नींचि स्वप्नावस्था ॥ समूळ सर्वथा मिथ्या कल्पित ॥ ४२ ॥ स्वप्नाचा आश्रय आपण होय ॥ परि भ्रम स्तव भासे पाहे ॥ भ्रम गेलिया तोही जाय ॥ ह्मणोनि नोहे सत्य कांहीं ॥ ४३ ॥ ह्मणोनि ज्ञान सत्तेहुनि वेगळें ॥ करितां कल्पितपण तया आलें ॥ ह्मणोनि येकचि जाण सर्व मेळें ॥ नव्हे वेगळें काळत्रयीं ॥ ४४ ॥ ज्ञान आनंदेसि बोलतां भिन्न ॥ परि तें उपेक्षणीय झालें जाण ॥ सुखावेगळें प्रवर्ते कोठें कोण ॥ सर्वत्र लक्षण जाण रामा ॥ ४५ ॥ या जनाची प्रवृत्ति ऐसी ॥ सुखालागीं गोडी तयासीं ॥ आत्मसुख नेणोनि तरी त्यासीं ॥ विषयसुखासीं धावणें ॥ ४६ ॥ सुखावेगळें नप्रवर्ते कोणी ॥ ह्मणोनि ज्ञान आनंदेसीं भिन्न नमानी ॥ येकचि जाण सर्वथा तिन्ही ॥ लक्षणा करूनि पाहेपां ॥ ४७ ॥ आतां ज्ञानाहूनि आनंद भिन्न ॥ तरी ज्ञानेवीण आनंदमंद जाण ॥ मंद तेंचि अप्रकाशहीन ॥ ह्मणोनि अभिन्न येकरूप ॥ ४८ ॥ आनंदाहूनि सत्ता भिन्न ह्मणतां ॥ आनंद नाहीं तें उपेक्ष्य सर्वथा ॥ सुखेवीण प्रवृत्ति ताता ॥ पश्चादि समस्तां नदेखिजे ॥ ४९ ॥

[1] दुर्लक्ष करण्यास योग्य. [2] मायिक.

सत्तेवेगळा आनंद करिजेत ॥ तरि तो विषयानंदचि परिकल्पित ॥ विषय मिथ्या तेथें तज्जनित ॥ सुख सत्य केंवि होय ॥५०॥ अगा विषयासी जरी सत्ता असती ॥ तरी ते नित्य सुख असते रघुपती ॥ यालागीं त्याची - कल्पीत स्फूर्ति ॥ जैसी स्त्रियेसीं रति स्वप्नीं होय ॥५१॥ यालागीं तिहीं पदांचीं वाच्यें भिन्न ॥ परि शुद्ध तें येकचि अभिन्न ॥ लक्षणा केलिया केवळ जाण ॥ ब्रह्म निर्वाण रघुराया ॥ ५२ ॥ आतां केवळ तें कैसें बोलावें ॥ वाचा बोलतां बोली नफावे ॥ वाचा विशिष्टातेंचि अनुवादावें ॥ शुद्ध न बोलावे निरंशे ह्मणोनी ॥ ५३ ॥ अगा वाचेचें बोलणें किती ॥ तेंही परिसें जानकीपती ॥ जाती गुण क्रिया संबंध असती ॥ तेंचि वदती गिरा स्वयें ॥ ५४ ॥ अगा ब्राह्मण क्षत्रियादि वैश्यजाती ॥ गो अश्वादि मृग हस्ती ॥ तेथेंचि जाण वाचेची प्रवृती ॥ अयोध्यापती ऐसें जाण ॥ ५५ ॥ तैसेंचि नीळ कृष्ण आरक्तादि गुण ॥ शुभ्र पीत ऐसे नानावर्ण ॥ तेथें वाचा करी प्रवेशन ॥ जाण खुण ब्रह्ममूर्ती ॥ ५६ ॥ तैसीच क्रिया तेथेंचि असे ॥ वाचक पाठक लेखक ऐसे ॥ गमन चलन व्यापारोद्देशें ॥ तेथें प्रवेशे वाचा जाण ॥ ५७ ॥ तैसाचि संबंध जानकीपती ॥ जेथें जेथें असती दिसती ॥ तेथेंचि वाचेची प्रवृत्ती ॥ केवळ गती असेचिना ॥ ५८ ॥ धनिगोमान् इत्यादि संबंध ॥ देखसी जेथ जेथें प्रसिद्ध ॥ तेथेंचि वाचेचा अनुवाद ॥ नित्य संबंध प्रवेशनीं॥५९॥या चहुंकरूनि संकेति॥ डित्थडफित्थादि नाम व्यक्ती ॥ केवळ अमूका हा ऐसी नाम कीर्ति ॥ तेथेंहि वस्ती वाचेसीं असे ॥ ६० ॥ तथापि येथें देह-

१ त्यापासून उत्पन्न झालेलें. २ आठवण. ३ परब्रह्म. ४ वाचा. ५ गति, मार्ग.

संबंध अस ॥ तरीच वाचा संकेतीं प्रवेशे ॥ केवळीं प्रवेशु कैसेनी असे ॥ वाचा प्रवेशे विशिष्ट ॥ ६१ ॥ यया चौवेगळे गा रघुनाथा ॥ वाचा नप्रवर्ते सर्वथा ॥ ब्रह्मीं तंव जाति गुणादिकी वार्ता ॥ नाहीं कथा संबंध क्रियेची ॥ ६२ ॥ अथवा नाहीं नाम संकेत ॥ वाचा कैंची प्रवेशेल तेथ ॥ तें निर्गुण नित्यानंदभरित ॥ स्वयें प्रकाशत स्वप्रकाशें ॥ ६३ ॥ ऐसें जें सच्चिन्मात्र जाण ॥ दोनी पदें बोलतां आनंद पूर्ण ॥ न बोलतांही असे जाण ॥ नसंडी येकपण ह्मणोनियां ॥ ६४ ॥ अगा सत्ता तेथें ज्ञान असे ॥ ज्ञान तेथें आनंद भासे ॥ आनंद तेथें सत्ता ज्ञान वसे ॥ सामरस्यें तिनी पदें ॥ ६५ ॥ यालागीं सच्चिन्मात्र जें ब्रह्म केवळ ॥ तत्पर असतां सर्वकाळ ॥ सर्वथा नबाधी भवजाळ ॥ नित्य निर्मळ स्वयेंचि ॥ ६६ ॥ अगा सत् चित् पदें कळावया ॥ हें व्याख्यान केलें रघुराया ॥ यालागीं ब्रह्मपर होऊनियां ॥ राहावें त्या नित्यानंदें ॥ ६७ ॥ ग्रंथाचें हृदय न काढितां ॥ वरिवरी कीजे व्याख्यानकथा ॥ ते काळक्रमणुक परि सज्ञान श्रोता ॥ विश्रांति तत्वतां नपाविजे[1] ॥ ६८ ॥ आबाळ गोपाळ समजती ॥ परी चतुर श्रोतयांचि नधाय मती ॥ तैसें व्याख्यान केलिया संतीं ॥ निवती चित्तीं साधु श्रोते ॥ ६९ ॥ आणि आपण तों हेंचि करावें ॥ साधूचें हृदय तोषवावें ॥ ते साधु संतोषलिया स्वभावें ॥ पूर्णत्व पावे आपणासीं ॥७०॥ अगा साधु सन्मुख[2] झालिया ॥ कार्यसिद्धी होय आपणयां ॥ साधु विन्मुख तें जाय वायां ॥ कष्ट केलिया कल्प कोटी ॥ ७१ ॥ ह्मणोनि आह्मी हेंचि केलें ॥ संतांसि माने तैसें वाखा-

१ समाधान पावत नाहीं. २ अनुकूल, समोर.

णिलें ॥ त्यांसि वाखाणितां माने भलें ॥ येरां नकळे ह्मणोनि उबगु ॥ ७२ ॥ ते ययातें पाल्हाळ ह्मणती ॥ स्वयें तरी नकळे ग्रंथोक्ती ॥ हें असो साधुजन ते निवती ॥ हे ग्रंथव्यक्ती तयांचिलागीं ॥७३॥ परी इतरांसो ही करूनि नमन ॥ यथामति कीजेल व्याख्यान ॥ श्रोतीं देउनी अवधान ॥ ग्रंथानुसंधान परिसावें ॥ ७४ ॥ वसिष्ठ ह्मणती गा रघुनाथा ॥ पुनरपि निदिध्यासनाची कथा ॥ उपाय दुसरा याही परता ॥ सांगों तत्वतां तोही ऐक ॥ ७५ ॥ श्लोक ॥ अजाग्रत्स्वप्ननिद्रस्ययत्तेरूपंसनातनं ॥ सचेतनंविशुद्धंचतन्मयःसर्वदाभव ॥ ७ ॥ टीका ॥ अगा येक ब्रह्म दुजें नसे ॥ त्यालागीं नाना करूनि साहसें ॥ जाणावें मानसीं ऐसें ॥ तरी नव्हे तैसें रघुराया ॥ ७६ ॥ अगा ब्रह्म तें स्वतां तूंचि अससी ॥ त्या आपणा जाणावया आनंदराशी ॥ साहस कासया करिसी ॥ सिद्ध अससी तुझाचि तूं ॥ ७७ ॥ तरी तेंचि तुझें स्वरूप कैसें ॥ ऐक रघुनाथा सावकाशें ॥ तरी जागृती स्वप्न सुषुप्ती नसे ॥ तेंचि असे स्वरूप तुझें ॥७८॥ तूं अवस्थात्रयाहूनी वेगळ ॥ तूं अवस्थात्रयाचा साक्षी केवळ ॥ तेंचि तुझें स्वरूप निर्मळ ॥ नित्य निँखिल सनातन॥७९॥ नाहो अवस्थात्रयातें जाणते ॥ तिन्ही अभिमानी आहेति आयते ॥ विंश्व तैजस प्राज्ञ ययातें ॥ अभिमानीयातें जाणतसे ॥ २८० ॥ हें तरी यथार्थ बोलिलेती ॥ अवस्था ते अभिमानी जाणती ॥ परि ते येकीतेंचि प्रकाशिती ॥ दुजी नेणती सर्वज्ञपणें ॥८१॥ अहो स्वप्नावस्थेचें ज्ञान ॥ सर्वथा जागृती नेणे हें जाण ॥ तैसें जागृतीचें अभान ॥ नेणे अनुसंधान सुषुप्ती-

---

१ कंटाळा २ विस्तार. ३ लक्ष. ४ संपूर्ण. ५ विश्वावस्था. ६ स्वप्नावस्था. ७ सुषुप्ती अवस्था.

चें ॥ ८२ ॥ प्राज्ञ नेणे स्वप्न जागृती ॥ विश्व नेणे स्वप्न सुषुप्ती ॥ तैजसु नेणे जागृति सुषुप्ती ॥ परस्परें नेणती अवस्थांतरें ॥ ८३ ॥ जो जे अवस्थेचा अभिमानी ॥ तो तीतेंचि प्रकाशी भवंसेनी ॥ दुसरीचें ज्ञान तयाचेनी॥ कोदंडपाणी नकरवे गा ॥ ८४ ॥ हा जरी येकितेंचि प्रकाशी ॥ परि आपणातें नेणे परियेसीं ॥ ना इतराही अवस्थांसीं ॥ निश्चयेसीं नेणत ॥ ८५ ॥ साक्षी अवस्था तिहींचें ज्ञान ॥ येकला येक जाणे आपण ॥ येक समईंच अनुसंधान ॥ स्वयेंचि पूर्ण करीतसे ॥ ८६ ॥ भलता येकादा पदार्थ ॥ पूर्वीं जाणत नव्हतों होता ह्मणत ॥ आतां जाणतों ह्मणतां तेथ ॥ दोन्ही भासत परियेसी ॥ ८७ ॥ पदार्थ आणि पदार्थातें जाणता ॥ दोहींतें आपणचि प्रकाशिता ॥ [1]त्यां देखिलें ऐसें ह्मणतां ॥ प्रकाश देखतां आपणासीं ॥ ८८ ॥ अभिमानी आणि प्रमाता ॥ यातेंहि साक्षीच लागे प्रकाशिता ॥ ह्मणोनि साक्षी तो तूं रघुनाथा ॥ नित्य अनंता चिद्रूप तूं ॥ ८९ ॥ नित्य निरंतर सनातन ॥ स्वप्रकाश चैतन्यघन ॥ तन्मयचि होय तूं आपण ॥ सर्वदां पूर्ण रघुनाथा ॥२९०॥ जैसा तूं वास्तव आहेसी ॥ तैसाचि असें अहर्निशीं ॥ इतुकेनि स्वस्वरूपचि असती ॥ त्या सांगों वर्मासीं आणीकही ॥ ९१ ॥ श्लोक ॥ माभवग्राह्यभावात्माग्राहकात्माचमाभव ॥ भावनामखिलांत्यक्त्वायन्मयस्तन्मयोभव ॥ ८ ॥ टीका ॥ [2]ग्राह्य जे कीं घट पट पदार्थ ॥ जे जे आपणासीं दृश्यत्वें भासत ॥ तद्रूप होऊंनको अकस्मात ॥ आपणा [3]व्यतिरिक्त ह्मणोनियां ॥ ९२ ॥ देहादि दृश्याकार नव्हावें ताता ॥

१ खरीवस्तु. २ ग्रहण करण्यास योग्य. ३ वेगळा.

ग्राहक अहंकार विशिष्ट प्रमाता ॥ तद्रूपहि नहोऊनियां तत्वतां ॥ सांडीं कथा ग्राह्य ग्राहकाची ॥ ९३ ॥ य-
यावेगळा तूं होऊन ॥ अखिल भावनाजाळ टाकून ॥ स्वस्वरूपीं तन्मय होऊन ॥ सुखसंपन्न सर्वदां असे ॥
॥९४॥ हेंचि निदिध्यासनाचें वर्म ॥ विजातीयत्यागें केवळ ब्रह्म ॥ आश्रउनी राहावें निःसीम ॥ प्रपंचोपरम
करूनियां ॥ ९५ ॥ तूं जरी ह्मणसी मन आणि मनाचे संकल्प ॥ निरंतर हे असतां अमूप ॥ तें सांडूनियां कैसें
होऊनि चिद्रूप ॥ आपेंआप असावें ॥ ९६ ॥ तरी इयेविषयीं गा रघुनाथा ॥ साहास कासया तुह्मी मानि-
तां ॥ अतिसुख करी हा उपाय करितां ॥ प्रयास कथा काइसी येथें ॥ ९७ ॥ तोही उपाय आतां सांगेन ॥
ऐक एकाग्र करूनियां मन ॥ अतिशयेसीं सुगम सोपान ॥ ऐक खुण रघुनाथा ॥ ९८ ॥ श्लोक ॥ संकल्पेनैवसं
कल्पंमनसैवमनोमुने ॥ स्थित्वास्वात्मनितिष्ठत्वंकिमेतावतिदुष्करं ॥ ९ ॥ टीका ॥ अगा ऐसा संदेह तुझ्या चि-
त्तीं ॥ स्वस्थ राहातां ब्रह्माकार स्थिती ॥ तेथें संकल्प अनेक उठती ॥ ते करिती प्रपंचाकार ॥९९॥ हा अंत-
रीं स्वस्थ राहों पाहे ॥ तंव संकल्प हा उगा नराहे ॥ बाहेर घालोनि लवलाहें ॥ करूं पाहे विषयाकार॥३००॥
जरी सावध होऊनियां आपण ॥ कीजेल संकल्पाचें छेदन ॥ तंव अंतरीं मूळ असे तयाचें मन ॥ तेणें संकल्पन
कोटि करी॥१॥ह्मणोनि निदिध्यासन निश्चित ॥ मन आणि संकल्प अंतरायभूत ॥ हे असतां नव्हीजे स्वरूप-
स्थ ॥ ऐसें चित्त तुझें मानी ॥ २ ॥ तरी ययाचा उपाय गा रघुपती ॥ अपूर्व सांगेन तुजप्रती ॥ तोचि दृढ ध-

१ संपूर्ण. २ संसाराची शांती,लय. ३ अगणित. ४ सोपें, सुलभ. ५ विघ्नकारक.

रूनियां चित्तीं ॥ करीं सुमती उपाय हा ॥ ३ ॥ तरी असत्संकल्प हा देहाकार ॥ त्यासि ब्रह्माहमस्मि संकल्पेंकरूनि मार ॥ आणीक नाहीं उपायांतर ॥ संकल्पसंहार जेणें होय ॥ ४ ॥ देहादि विश्वाकारें संकल्प उठी ॥ तयातें कोण बळिया बळें लोटी॥साधनांतरें ते आटाआटी ॥ ब्रह्मास्मि जगजेठीवांचोनियां ॥५॥विपरीत संकल्पाचा मारिता॥ब्रह्माहमस्मि संकल्पेंवीण नाहीं तत्वतां॥ यालागीं संकल्पें संकल्प सर्वथा ॥ पाववी अंता रामचंद्रा ॥ ६ ॥ नाहो संकल्पही सरलियावरी ॥ परी मन तें असे अंतरीं ॥ तरी त्याचीहि सांगों परी ॥ ऐक निर्धारीं रघुपुंगवा ॥ ७ ॥ अगा संकल्प विकल्पात्मक मन ॥ जें कीं करी प्रपंचानुसंधान ॥ देहादि संसार भान ॥ करी जाण तें अशुद्ध ॥ ८ ॥ तयासीं शुद्धमनेंकरूनि ॥ जें ब्रह्माकार होय इतर निरशनीं ॥ दोषदृष्ट्या परतवी विषयापासुनी ॥ तेंचि भरवसेनी शुद्धमन ॥९॥ तेणें मनेंकरूनि रघुनाथा ॥ अशुद्ध मन छेदावें गा सर्वथा ॥ निरंतर करावी ब्रह्माकारता ॥ हेंचि छेदकता तयाची॥२ १०॥येही दोहीं शुद्धिकरुनी॥ मन संकल्प दोन्ही छेदोनी ॥ स्वस्वरूपीं राहे निर्वाणीं ॥ कोदंडपाणी परमानंदें ॥११॥ जैसें तप्त लोह शीतळ लोहें ॥ कुठारें करूनि छेदिजेत आहे ॥ तैसें शुद्ध संकल्प मन करी पाहे ॥ दहन होय अशुद्धाचें ॥ १२ ॥ तैसें राग द्वेषादिकीं प्रतिपादिलें ॥ तें मन शुद्ध मनें पाहिजे छेदिलें ॥ जें राग द्वेषत्यागें निवालें ॥ सन्मुख झालें आत्मयासीं॥१३॥ अगा इतुकें साधन करावया ॥ दुष्करै काय गा रघुराया ॥ स्वस्वरूपीं नित्य असावया ॥ क्लेश तया काय हो-

१ कष्ट, श्रम. २ लोखंडानें. ३ कठीण.

ती ॥ १४ ॥ अगा जेथें परमानंद निरंतर ॥ नाहीं दुःखाचा लेश किर ॥ तेंचि आत्मस्वरूप निर्विकार ॥ तदाकार होऊनि राहीं ॥ १५ ॥ तेथें राहातां कोण दुःख असे ॥ ऐसें विचारूनि सांगे मानसें ॥ हें सांडूनि देहाच्या अध्यासें ॥ लोक पिसे राहतातीं ॥ १६ ॥ शेवटीं देह तरी हा पुरुष नव्हे ॥ देहासिं यासिं काय संबंधु आहे ॥ आश्चर्य करूनि निंदितो पाहे ॥ कैसा आहे हा देह॥१७॥ श्लोकपंचकेंकरूनि निरूपण ॥ वसिष्ठ करितीं देहनिंदन ॥ त्यामाजी श्लोकद्वयें देहव्याख्यान ॥ भिन्नपण देह चैतन्या ॥ १८ ॥ श्लोकत्रयें जनाची निंदा करी ॥ आश्चर्य करितां नमाये अंतरीं ॥ वास्तव स्वस्वरूप त्यजूनि भिकारी ॥ देह धरी मीच ह्मणोनी ॥१९॥ ऐसें पांचाश्लोकीं निरूपण ॥ स्वयें करी वसिष्ठ आपण ॥ त्यामाजी श्लोकद्वयें देहलक्षण ॥ श्रोतीं सावधान परिसिजे॥२०॥ हें निरूपण ऐकिल्यासाठीं ॥ सुटे देह आत्मयाच्या गांठी ॥ देह निरसे उठाउठी ॥होय भेटी स्वस्वरूपीं ॥ २१ ॥ तेंचि निरूपण आतां ॥ एकाग्र परिसावें श्रोतां ॥ जे कीं श्रीवसिष्ठ श्रीरघुनाथा ॥ लोभें तत्वतां बोलिले ॥ २२ ॥ श्लोक ॥ कस्तवायंजडोमूको देहोभवतिराघव ॥ यदर्थंसुखदुःखाभ्यामवशःपरिभूयसे॥ ॥ १० ॥ टीका ॥ अगा कोण हा तुजकारणें ॥ देह झाला गा देहपणें ॥ त्या देहाचीं सांग लक्षणें ॥ मनें जाणखुण आपैसी ॥ २३ ॥ अगा देह तरी जड जाण अती ॥ अप्रकाश पाषाणस्थिती ॥ जड तें अमुक्त सर्वार्थी ॥ सीतापती जाण तूं ॥ २४ ॥ जें अजड आणि स्वप्रकाश असे ॥ तेंचि मुक्त जाण सर्वांशें ॥ जड तें अ-

१ खरें. २ निराकरण होतें.

मुक्त जाण ऐसें ॥ हें वर्म विश्वेशें जाणावें ॥ २५ ॥ आणि या देहाची परवशगती ॥ प्रारब्धाधीन वर्ते सर्वार्थी ॥ जैसी कां खांबसूत्रींची मूर्ती ॥ सूत्रें वर्तती तदधीनपणें ॥ २६ ॥ सूत्रधाराचिया जाण सूत्रें ॥ वर्तती खांबसूत्राचीं यंत्रें ॥ तैसीं देह सुखदुःखें विचित्रें ॥ भोगी परतंत्रें प्रारब्धेंकरी ॥ २७ ॥ ऐसा हा देह विचित्र कुश्चित जाण ॥ तोचि आपण ह्मणविजे कोण ॥ जड मूढ सुखदुःखाचें भाजन ॥ परिणामीं पूर्ण विकारवंत ॥ २८ ॥ आणिकही अपाडें तुज आणि देहासीं ॥ तेंही सांगों गा हृषीकेशी ॥ कोणतेंही साम्य तुज देहासीं ॥ येकही अंशीं असेचिना ॥ २९ ॥ देह जाणतां आपणासीं भिन्न ॥ आत्मत्वें नेघे यातें जाण ॥ मग करितां निदिध्यासन ॥ अति सोपान रघुराया ॥ ३३० ॥ ह्मणोनि ऐकें देहाचें लक्षण ॥ हा तंव आत्मस्वरूपेंसि विलक्षण ॥ जाणतांचि पावे आपणा आपण ॥ तेंचि निरूपण परियेसी ॥ ३१ ॥ श्लोक ॥ कमांसरुधिरादीनिकृत्यचैतन्यविग्रहः ॥ विजानन्नपिदेहेस्मिन्नात्मबुद्धिंजहासिकिं ॥ ११ ॥ टीका ॥ देह तो जाण एवंभूत ॥ मांस रुधिरादिकीं कुश्चित ॥ अस्थि चर्म मज्जा विष्ठा मूत्र ॥ लाळ रजत पूय पंकु ॥ ३२ ॥ सर्वदां दुर्गंधीचें बिऱ्हाड ॥ अंतरीं कृमि जंतु निरंतर ॥ स्रवताति नवही द्वार ॥ लुतिसपुरें सर्वेहि गळे ॥ ३३ ॥ यांचीं लक्षणेंहि तुजप्रती ॥ ते मागां सांगीतलीं गा रघुपती ॥ आतां निरूपितां पुनरुक्ती ॥ विस्तार अति ग्रंथास होय ॥ ३४ ॥ आणि षड्डर्मीहि महादारुण ॥ इये देहीं वर्तती श्रीरामा जाण ॥ क्षुधा तृषा शोक मोह तीक्ष्ण ॥ जरा मृत्यु अति दुस्तर ॥ ३५ ॥

१ त्याच्यासत्तेनें. २ कंटाळवाणा. ३ पात्र. ४ अंतर. ५ रक्तादि. ६ षड्विकार.

हें येक येक बोलतां गा रघुपती ॥ हें चिळशीस पात्र सर्वार्थीं ॥ परिणामीं निंद्य नश्वरगती ॥ कुश्चित स्थिती सर्वांपरी ॥ ३६ ॥ तरी ऐसा हा देह कोणीकडे ॥ आणि अविकारि चैतन्य हें तुझें नाम घडे ॥ दोहींसि विचारितां साम्य नघडे ॥ पाहतां अंपाडे क्षराक्षरत्वें ॥ ३७ ॥ तूं आत्मा अक्षर अविनाशी ॥ ज्ञानस्वरूप आनंदराशी ॥ ऐसें असोनियां देहासीं ॥ आत्मत्वें कैसी धरिसी बुद्धी ॥ ३८ ॥ अगा दोहींसि अंपाड सर्वांपरी ॥ ऐसें जाणतां गा रावणारी ॥ देहीं आत्मबुद्धी झडकरी ॥ लोक हे दुरी टाकितना ॥ ३९ ॥ तुज ही टाकितां कोण सांकडें ॥ तूं तंव दोहींतें जाणसी गा अपाडें ॥ तूं अक्षर निर्विकार धडफुडे ॥ त्यासि परिपाडे देह कैसा ॥३४०॥ देह तो परिणामीं अमंगळ क्षर ॥ जड विकारि आणि नश्वर ॥ ऐसीयासीं आत्मा येकाकार ॥ सविकार केंवि होय ॥ ४१ ॥ अगा ऐसिया देहाच्याठाईं ॥ आत्मबुद्धी टाकितां कठिण काई ॥ यालागीं देहात्मबुद्धी टाकूनि पाहीं॥ सर्वदां राहीं स्वस्वरूपीं ॥४२॥ श्लोक ॥ एतावतैवदेवेशःपरमात्मावगम्यते ॥ काष्ठलोष्ठसमत्वेनदेहोयदवगम्यते ॥ १२ ॥ टीका ॥ अगा इतुकियांचीं वर्मेंकरुनी ॥ देवाचा देव पाविजे निर्वाणीं ॥ तेंही वर्म तुजलागुनी ॥ कार्मुकपाणी सांगेन ॥ ४३ ॥ जो सर्वांसीं स्वप्रकाशें प्रकाशी ॥ त्यातेंचि देव ह्मणिजे गा आनंदराशी ॥ ईश शब्दें प्रकाशाही प्रकाशी ॥ सर्वस्वेसीं सत्तारूपें ॥ ४४ ॥ त्या देवेशा ब्रह्मातें पाविजे ॥ कीं तेंचि होउनी स्वयें असिजे ॥ जरी देह हा काष्ठतुल्य देखिजे ॥ ममता नेणिजे याच्याठाईं ॥४५॥ अथवा कीट

१ विलक्षण. २ शाश्वत. ३ अंतर. ४ नाशिवंत.

लोष्टादि मेळ ॥ तद्वद्देखिजे हा समूळ ॥ त्याच्याठाईं अनासक्ति केवळ ॥ नाहीं मोहजाळ जयापरी ॥ ४६ ॥ तैसा ये देहीं सर्वदां उदास ॥ परकीयत्वें देखे मिथ्याभास ॥ तरीच ब्रह्मेसिं रहिवास ॥ सावकाश स्थिती होय ॥ ४७ ॥ देहीं दृढ ममता धरितां ॥ आत्मत्वें देहासिं मानितां ॥ कदां नघडे गा आत्मता ॥ जाण सर्वथा ब्रह्मपण ॥ ४८ ॥ देह परकीयत्वें अन्य देखणें ॥ हें मिथ्याभूत जाणणें ॥ तरीच ब्रह्मसुखा पावणें ॥ जाण ये खुणे रघुनाथा ॥ ४९ ॥ श्लोक ॥ अहोनुचित्रंयत्सत्यंब्रह्मतद्विस्मृतंनृणां॥यदसत्यमविद्याख्यंतत्परःपरिवल्गति॥१३॥ टीका ॥ ह्मणे अहा कटकटा वोखटें ॥ या जगाचें कृत्य उफराटें ॥ जें सत्य ब्रह्म कदा नविटे ॥ दिसे प्रगटे सर्वांसींहि ॥३५० ॥ काळत्रईं जे अबाधित ॥ तेंचि वस्तु जाण पैं त्रिसत्य सत्य ॥ तेंचितें नित्यानंदभरित ॥ ब्रह्म सदोदित अपरोक्ष जें ॥ ५१ ॥ अहो तयातें विसरोनियां नर ॥ विस्मरणेंचि वर्तती निरंतर ॥ आणि परोक्ष असत्य जें नश्वर ॥ हें शरीर अविद्याख्य जें ॥ ५२ ॥ शीर्यते तत् शरीर ऐसें ॥ ययाचें व्याख्यान पैं असे ॥ अवयव गळती पैं आपैसें ॥ सर्वेंचि नासे विशीर्ण होउनी ॥ ५३ ॥ नूतन पट जैसा दृढ असती ॥ स्वयेंचि त्याचे तंतु विशीर्ण होती ॥ तंतुविशीर्णें पटुची शांती ॥ नफाटती तरी फाटे ॥ ५४ ॥ नातरी वृक्षफळ जैसें ॥ तारुण्य जरी अतिदृढ असे ॥ तेंचि स्वयेंचि परपक्क होऊनि नासे ॥ कोणी नस्पर्शें दुर्गंधीनें ॥ ५५ ॥ तैसें स्वयेंचि जें विशीर्ण होत ॥ कृमि गंधीकरूनि जें युक्त ॥ मग स्वयेंचि असे नासत ॥ उपचारित सहस्र जरी ॥५६ ॥ तयातें श-

१ मातीचें ढेंकूळ. २ निरिच्छा. ३ वाईट. ४ छिन्नभिन्न. ५ उपाय केले.

रीर ऐसें ह्मणती ॥ आतां देह शब्दाची ऐक वित्पत्ती ॥ दह्यते त्रिविधतापैस्तद्देह इति ॥ ऐसें बोलती शास्त्रज्ञ जे ॥ ५७ ॥ अधिभूत अधिदैवत अध्यात्मिक ॥ ऐसे त्रिविध ताप देख ॥ येहींकरूनि झाला सम्यक् ॥ तयासीं निःष्टंक देह ह्मणती ॥ ५८ ॥ आणि ज्यातें अविद्या ह्मणिजे ॥ जेणें विद्यमान नाहीं जे सहजे ॥ अविद्येपासाव उत्पत्ति पाविजे ॥ अविद्या मानिजे मूर्तिमंत हेचि ॥ ५९ ॥ ऐसें मिथ्याभूत कुश्चित शरीर ॥ त्यातें मीचि ह्मणोनि वल्गती नर ॥ त्याचें भरण पोषण उपचार ॥ निरंतर करिती भ्रमें ॥ ३६० ॥ अगा हें तों विचित्र सर्वांमाझारी ॥ सत्य सुखरूप वस्तु ते करिती दुरी ॥ अपरोक्ष श्लाघ्य सर्वोपरी ॥ आनंदलहरी स्वप्रकाशें ॥ ६१ ॥ ऐसें आत्मसुख टाकुनी ॥ कुश्चित परिणामीं देह मी ह्मणोनी ॥ विष्ठेचारासि हा कवटाळुनी ॥ सुख मानिती अभिमानी जन ॥ ६२ ॥ अगा देह केवळ हाडाची मोळी ॥ रक्त मांस मज्जादिकांची पोटळी ॥ अतिमोहाची मोहकाजळी ॥ दुर्गंधी भली गोठली जे ॥ ६३ ॥ ते आपणा देखतांचि नासत ॥ नवही द्वारीं लुति निरपीत ॥ ऐसा देह देखत देखत ॥ मी ह्मणत अभाग्यपणें ॥ ६४ ॥ धन्य त्याची माता पिता ॥ धन्य त्याचा विचार गा रघुनाथा ॥ ऐसें देखोनि देह मी ह्मणतां ॥ लाज सर्वथा असेचिना ॥ ६५ ॥ अहो स्वतःसिद्ध आपणचि ब्रह्म असतां ॥ आणि लौकिकीं लाजे मी ब्रह्म ह्मणतां ॥ मज जिव्हा आहे ऐसें पुसों जातां ॥ नलाजे सर्वथा लोकांमाजी ॥ ६६ ॥ अहो जेणें पुसे तेंचि नकळे ॥ हातीं वस्तु आणि वरते डोळे ॥ पाहे सभवते वेडावले ॥ भ्रमें नकळे सर्वथा ॥

१ उत्पत्ति, विचार. २ माया. ३ शाश्वत. ४ पाझरत.

॥६७॥तैसें ब्रह्म मी होय कीं नव्हे ॥ ऐसें जेणें करि जना पुसो जाये॥तेंचि प्रकाशितें तया नेणवे॥काय बोलावें नवल त्याचें ॥ ६८ ॥ अगा मुख्य विचारींच कुष्ठ लागला ॥ तेणें मी ब्रह्म ह्मणतां लाजे लोकांला ॥ तो लोकीं ह्मणतांच वेडावला ॥ लाज त्या वेळा पावतु ॥ ६९ ॥ ॥ उपस्थि कुष्ठी निवश्याविलासेषुविलज्जति ॥ ॥ उपस्थीं कुष्ठ झाला जियेसीं ॥ ते वेश्या वेश्यपणा लाजे जैसी सभेसीं ॥ विलास करितां मरणांत तियेसीं ॥ तैसें यासीं झालें असे ॥ ३७० ॥ मुख्य गुह्य तो आत्मविचार ॥ तेथें संदेहाचा कुष्ठ थोर ॥ झाला ह्मणोनि तो गव्हार ॥ लाजे फार मी ब्रह्म ह्मणतां ॥ ७१ ॥ ऐसें हें विचित्र भारी ॥ सत्य स्वप्रकाश वस्तु करिती दुरी ॥ असत्यींच धरिती ममता पुरी ॥ देह मी भिकारी आपणा ह्मणे ॥ ७२ ॥ असो आणिकही सांगों किती ॥ यया जनाची विपरीत गती ॥ तेचि आश्चर्य परम जानकीपती॥तुजप्रती सांगेन ॥७३॥

॥श्लोक ॥ अन्यच्चित्रंयत्परमंब्रह्मतद्विस्मृतंनृणां ॥ यन्ममेदमाविद्याख्यंतत्पुरःप्रबलायते ॥१४॥ टीका ॥ अगा मोठें हें आश्चर्य रमाकांता ॥ तें येकाग्र ऐकें रघुनाथा ॥ जें परम सर्वांचें वास्तव ताता ॥ तें ब्रह्म अनंता विसरले गा ॥ ७४ ॥ अगा सकळाचें कारणभूत ॥ वास्तव आणि निजानंदभरित ॥ तयातेंचि जन हे विसरत ॥ कोटि कल्पांत उपजावया ॥ ७५ ॥ ऐसें विसरोनियां रघुपती ॥ नश्वर देहातें मीच ऐसें ह्मणती ॥ आपण वास्तव आहे तें टाकिती ॥ नव्हे तें धरिती कुश्चित देह ॥ ७६ ॥ आणि देहसंबंधीय जे असती॥ त्यातेंचि ममकारें आ-

१ रोग. २ उत्पत्तिस्थान. ३ मूर्ख. ४ खरीवस्तु.

नघडे चलनज्ञातृत्व ॥ आणि अस्तित्व सत्ता जेकीं ॥ ४२ ॥ जडासी प्रकाशन जरी घडे ॥ तरी घट पटासीं प्रकाश कां नघडे ॥ यालागीं दृश्याचें प्रकाशक फुडें ॥ जाण निवाडें परमात्मा ॥ ४३ ॥ आणि देहेंद्रियाचें अस्तित्व ॥ आत्मेवीण नघडे वास्तवार्थ ॥ सत्यावेगळें असत्य ॥ नव्हे तें सत्य कदाकाळीं ॥ ४४ ॥ आणि जडासिं पाषाणाचेपरी ॥ चळण नाहीं कोणे अवसरीं ॥ जडासींच चळन आत्मेनकरी ॥ होय निर्धारीं जाण तूं ॥ ४५ ॥ येणें दृश्य प्रकारेंकरून ॥ आत्मा साधिजे चिदेकघन ॥ सत्ताप्रकाश सुखपूर्ण ॥ तेणेंचि वर्तणें सर्व दृश्याचें ॥ ४६ ॥ अविचारें सर्व नेणणेंचि असे ॥ विचारें जैसें तैसेंचि भासे ॥ ह्मणोनि आत्मा विचारें प्रकाशे ॥ जाणिजेत असे विबुधजनीं ॥ ४७ ॥ शुक्तिकेच्याठाईं रजत दिसे ॥ तें दृश्यचि परी प्रत्यक्ष भासे ॥ शुक्तिका कोणाही नदिसे ॥ सत्यचि ऐसें रजत मानिती ॥४८॥ त्याचि दृश्य रजतंकरून॥ शुक्तिका पावे प्रत्यक्ष जाण ॥ त्या रजता लावितां चंदन ॥ सांगे अवसान कोठें त्याचें ॥ ४९ ॥ तें चंदन काय रजतासि लागे ॥ किं शुक्तिका शोभे चंदनसंगें ॥ दृश्यचि अदृश्य फांवोलागे ॥ नवल सांगुं काय तुज ॥ २५० ॥ तैसें देहादिक दृश्यजात ॥ याचा निर्धारु कीजे जंव निश्चित ॥ तंव आत्माचि होय हस्तगत ॥ मिथ्याभूत देहादि भ्रमू ॥५१॥ ययालागीं गा रघुनाथा ॥ दृश्येंचि द्रष्टा आत्मा ये हाता ॥ पुर्ण विचारेंचि ये तत्वतां ॥ नाहीं अन्यथा यया बोला ॥ ५२ ॥ यया उपपत्ति सांगों किती ॥ इतुकेनीच जाणावें विश्वमूर्ति ॥ विचारीं घालितां चित्तवृत्ती ॥

---

१ सरोवर. २ अंत, नाश. ३ रूपें. ४ दृष्टांत. * दिसूंलागे.

आत्मसंवित्ती स्वयें पावे ॥ ५३ ॥ तुझिया प्रश्नाचें उत्तर ॥ तें सांगीतलें सविस्तर ॥ परिस निरूपण सुंदर ॥ जेणें निर्धार दृढ होय ॥ ५४ ॥ तरी ऐसें असतांहि गुरुराया ॥ लोक नेणति कां या आत्मया ॥ देहादि आत्मत्व घेति स्वामिया ॥ आत्मतत्व नेणोनियां किमर्थ हें ॥ ५५ ॥ तंव वसिष्ठ ह्मणती गा राया रघुपती ॥ सांगेन याचीहि निगुती ॥ परस्परानुध्यासें तेच होती ॥ लोक नेणती ययास्तव ॥५६॥ जडाचिया संगती ॥ अजडाही जडत्व प्राप्ती ॥ जडासी अजडप्रतीति ॥ ऐसी भ्रांती भ्रांतासि पैं गा ॥ ५७ ॥ ययास्तव आत्मयासीं नेणती ॥ आत्मा जडसंगें जडमानिती ॥ तेंचि सांगेन श्लोकसंमती ॥ विश्वमूर्ति ऐक तूं ॥ ५८ ॥ श्लोक ॥ आत्मनोजडसंगात्स्यादनात्मत्वंजडस्यतु ॥ स्यादात्मसंगादात्मत्वंजलाग्न्योःसंगवन्मिथः ॥१५॥ टीका ॥ आत्मयासीं जडसंगती ॥ अनात्मत्व आलें गा रघुपती ॥ आणि जडासि अजडसंगती ॥ आत्मप्राप्ती आली दिसे ॥५९॥ जड जें कीं अंतःकरण ॥ त्यामाजी बिंबलें चैतन्य ॥ तेणेंचि आलें त्या जडपण ॥ सामग्री पूर्ण तैसीच॥२६०॥ बुद्धि अहंकार इत्यादिक ॥ स्थूल लिंगदेह सम्यक ॥ आत्मयासीं हे लागली देख ॥ जडत्वादिक तेणें आलें ॥ ६१ ॥ नेणोनि आत्मानात्मविभाग ॥ देहचि आत्मयासीं ह्मणती सांग ॥ तैसेंचि बुद्धी मनातें चांग ॥ आत्मा अव्यंग आरोपिती ॥ ६२ ॥ येणें आत्मयासीं जडपण ॥ जड संगेंचि आलें जाण ॥ तैसेंचि आत्मसंगति आत्मपण ॥ देहादिकां पूर्ण आलें दिसे ॥ ६३ ॥ देहेंद्रियातें आत्मा प्रकाशिता ॥

१ आत्मज्ञान. २ मायिकत्व. ३ दोषरहित.

ते नेणोनियां आत्मसत्ता ॥ देहेंद्रियातेंचि तत्वतां ॥ आत्मा सर्वथा ह्मणताती ॥ ६४ ॥ येक प्राणातेंचि आत्मा ह्मणती ॥ येक लिंगदेहीं आत्मप्रतीति ॥ येक स्थूळदेहातेंचि ह्मणती ॥ येक भाविती इंद्रियांसीं ॥ ६५ ॥ येकासीं मन आत्मा ये प्रत्यया ॥ येकासीं बुद्धी आत्मा गा रघुराया ॥ ऐसें जडातें आत्मा ह्मणऊनियां ॥ राहिलें वायां नेणपणें ॥ ६६॥ परस्परें याच्या संगती ॥ जडीं होय आत्मप्रतीति ॥ आणि आत्मयासीं जडसंगती॥ जड बद्ध ह्मणती नेणोनियां ॥ ६७ ॥ जैसी प्रकाशमंता अग्नीसि ॥ जळसंगें शीतळता आली त्यासीं॥ हातीं धरिलिया तयासीं ॥ ऊष्मा सर्वांसीं असोचिना ॥ ६८ ॥ तैसेंचि अग्निचेनि संगें ॥ जळही ऊष्ण होऊं लागे ॥ तें अग्नीच होय सर्वांगें ॥ जाळी वेगें दुसरीयासीं ॥ ६९ ॥ दोन्ही महद्भूतें तरी होती ॥ परि अग्नि तो तेजसु गा रघुपती ॥ जळ तें जड शीतळ स्थिती ॥ तेजसगती अजड जाण ॥ २७० ॥ यासि येरयेरां संगती ॥ परस्परें जडाजड पावती ॥ परि लोक तेंचि घेऊनि बैसती ॥ नेणती सर्वार्थीं ह्मणोनियां ॥ ७१ ॥ श्लोक ॥ असत्यजड चित्तात्मानपराच्चिद्वपुर्जडं ॥ महाजलगतोह्यग्निरिवरूपंसमश्नुते ॥ १६ ॥ टीका ॥ देहादिइंद्रियें अहंकार मन ॥ असत्य जड दृश्य जाण ॥ यांचेनि संगें चिद्वपु[1] चैतन्य ॥ स्वयें जडपण पावलें दिसे ॥ ७२ ॥ जडसंगें जडचि भासे ॥ असत्यसंगें असत्यचि दिसे ॥ दृश्यसंगें दृश्या ऐसें ॥ संगदोषें भासे तद्रूप ॥७३॥ अगा शुद्धवस्तु जे कीं असे ॥ ते इतरसंगें तद्रूपचि भासे ॥ निजस्वरूप टाकिलें ऐसें दिसे ॥ जडा ऐसें भासत ॥ ७४॥ शुद्ध स्फटिक[2]

१ चैतन्यरूपी शरीर. २ पारदर्शक.

शुभ्रवर्ण ॥ आरक्त कुसुमें आरक्त वर्ण ॥ कज्जलसंगें कृष्णवर्ण ॥ नीळें नीळपणें दाखवी ॥ ७५ ॥ परि आपुली
शुभ्रता टाकून ॥ उपाधिसंगें नाना वर्ण ॥ तैसा आत्मा शुद्ध ज्ञानघन ॥ जडसंगें जाण जडचि भासे ॥ ७६ ॥
जैसा वैश्वानर प्रकाशमंत ॥ बहुजळें स्वरूप टाकित ॥ महाऱ्हदिं टाकिल्या विझत ॥ टाकी निश्चित स्वस्वरू-
प ॥ ७७ ॥ जड जळाचिये संगती ॥ अग्नि आपुलें रूप टाकिती ॥ तैसा आत्मा देहेंद्रियसंगती ॥ तद्रूपगती पा-
वलासे ॥ ७८ ॥ नातरी जळ स्वच्छ गा असे ॥ तें ऊसीं मधुरपणें उल्हासे ॥ क्षारीं क्षारता पावतसे ॥ तिक्तिं
असे तिक्त होऊनी ॥ ७९ ॥ कटुसंगें कटुचि होत ॥ अम्लीं अम्लपणें दावित ॥ तैसा आत्मा उपाधिगत ॥ असे
भासत देहादिरूपें ॥ २८० ॥ तो तैसाचि नेणोनि भाविती ॥ शुद्धीं जडाचि होय प्रतीति ॥ जडरूपचि मानूनि
राहाति ॥ नाहींच करिती आत्मयासीं ॥ ८१ ॥ ऐसें जडपणमिश्रित ॥ आत्मा होऊनियां निश्चित ॥ तो प्रयत्नें
निवडूनियां घेत ॥ अजड प्राप्त ऐसें होय ॥ ८२ ॥ स्वयें आत्मा जडसंगती ॥ जडाचि होऊनि ठेला गा रघुपती ॥
तो प्रयत्नें घेईजे गा सुमती ॥ विवेकसंपत्ति करूनियां ॥ ८३ ॥ आणि या उपाधीच्याठांईं ॥ आत्मा निश्चित
असे पाहीं ॥ तो प्रयत्नेंकरूनि साधूनि घेईं ॥ एकाग्र ऐकें दृष्टांतमुखें ॥ ८४ ॥ श्लोक ॥ इक्षौगुडस्तिलेतैलंकाष्ठे
वन्हिर्हृदृषच्चयः ॥ धेनावाज्यंवपुष्यात्मालभ्यतेचैवयत्नतः ॥ १७ ॥ टीका ॥ अगा जडीं अजडांचे प्राप्ती ॥ अ-
तिप्रयत्नें होय सुमती ॥ ते दृष्टांतमुखें तुजप्रती ॥ सांगेन निगुतीं तें ऐक ॥ ८५ ॥ जैसा इंक्षुदंडाच्याठांईं ॥ प्र-

१ फूल. २ काजळाचे संगतीनें. ३ अग्नि. ४ आंबटपणा. ५ यथार्थ. ६ ऊंस.

यत्नें गुळ पाविजे पाहीं ॥ कां तिळ गाळिलिया तेलही ॥ प्राप्त पाहीं होतसे ॥ ८६ ॥ तैसेंचि काष्ठाच्याठाईं ॥ अग्नि स्वतःसिद्ध असे पाहीं ॥ तो मंथन केलिया सर्वही ॥ प्राप्त ते ठाईं रघुनाथा ॥ ८७ ॥ कां दृषद् जो किं पाषाण ॥ त्याचें करूनियां चूर्ण ॥ अग्निपाकें लोह संपूर्ण ॥ प्राप्त जाण प्रयत्नें जैसें॥८८॥ कां धेनुच्याठाईं आ-ज्य असे ॥ तें दोहन मंथनादिकीं प्रत्यक्ष दिसे ॥ तैसा आत्मा सिद्ध देहीं वसे॥ प्राप्त सर्वांशें ज्ञानयत्नें॥८९॥ चकार येवंकारें निर्धारिलें ॥ प्रयत्नेवीण अलभ्य जाण केलें ॥ असे जैसें तैसें संचलें ॥ प्रयत्नें भलें प्राप्त सिद्ध ॥ ॥ २९० ॥ येकैक काय सांगों तुजप्रती ॥ देहीं आत्मयाची होय प्रतीति ॥ पदार्थमात्रीं गा महामती ॥ आत्म-प्राप्ती स्वतःसिद्ध ॥ ९१ ॥ सर्व व्यापकपणें आत्माचि असे ॥ पदार्थाकार भ्रमें भासे ॥ तेंचि विचारितां स-र्वांशें ॥ आत्माचि असे सर्वत्र येक ॥ ९२ ॥ तेंचि दृष्टांतेंकरूनि सांगेन ॥ ऐक रघुनाथा सावधान ॥ जेणें बुझे-सी गा संपूर्ण ॥ सर्वत्र खुण आत्मयाची ॥ ९३ ॥ श्लोक ॥ स्फटिकात्माननीरंध्रेस्थितंसंवीक्ष्यतेयथा ॥ तथा सर्वपदार्थेषुचिद्रूपपरमेश्वरः ॥ १८ ॥ टीका ॥ जैसा निरंध्रंहि जो स्फटिकमणी ॥ त्यामाजी आकाश असे व्यापुनी ॥ आकाश नसतां छिद्रपणी ॥ नपवे घणीं भेदिलियांही ॥ ९४ ॥ छिद्रता व्योमधर्म असे ॥ नभे-वीण सछिद्र कोणी नसे ॥ ह्मणोनि आकाश सर्वत्र असे ॥ त्यावीण नसे रिता ठाव ॥ ९५ ॥ ह्मणोनि स्फटिकाच्या पोटीं ॥ आकाश देखिजे लोकदृष्टी ॥ तैसें सर्व पदार्थाच्यापोटीं ॥ होय भेटी

१ तूप. २ दुर्मीळ. ३ समजशील. ४ छिद्ररहित. ५ आकाश.

आत्मयासीं ॥ ९६ ॥ अगा चिद्रूप जो कीं परमेश्वर ॥ तो पदार्थमात्रीं वर्ते निरंतर ॥ हें विचारें जाणिजे दृढतर ॥ अविचारें साचार नेणती ॥ ९७ ॥ नाहो ज्ञानस्वरूप व्यापक आत्मा असे ॥ तरी पदार्थमात्रीं कां चित्कळा नसे ॥ तरु पाषाणादिकीं नप्रकाशे ॥ ज्ञान कां नसे सर्वत्र जडीं ॥ ९८ ॥ तरी ऐका याचें उत्तर॥ बुद्धीं प्रकाश होतसे फार ॥ जडमळीनिं तो विचार ॥ नाहीं प्रकार प्रकाशाचा ॥ ९९ ॥ जैसा सूर्य सर्व पदार्थी- तें प्रकाशी ॥ परि सूर्यकांतीं पावे वृद्धीसिं ॥ जड मळीन पाषाणीं तैसी ॥ उपलंब्धी ऐसि नपाविजे ॥ ३०० ॥ कां चंद्रप्रकाशें सोमकांत ॥ विरींपाहे होय द्रवीभूत ॥ तैसे मळीन पाषाणजात ॥ असती वर्तत अतिकाठिन्यें ॥ १ ॥ तैसें सर्व इंद्रियांपरिस ॥ अंतःकरण बुद्धीतें शुद्धांश ॥ तेथें स्वप्रकाशें प्रकाशे परेश ॥ घट पटादि वोस बुद्धिहीन ॥ २ ॥ घट पट आणि पाषाण ॥ तेथें नाहीं बुद्धी अंतःकरण ॥ ह्मणोनि अतिजड ते मळीण ॥ ज्ञा- नप्रकाशन तेथें कैचें ॥ ३ ॥ अगा अंगणीं दर्पण ठेविला ॥ रवीनें प्रकाशिला तयाला ॥ तोहि शुद्धपण आणि- काला ॥ गृहादिकाला प्रकाशी ॥ ४ ॥ तेंचि खापर अथवा पाषाण ॥ रविसन्मुख ठेविलिया कोण गुण ॥ तैसा शुद्धिं प्रकाशे आत्मा पूर्ण ॥ सर्वत्र असोन शुद्धाशुद्धीं ॥ ५ ॥ परी शुद्धा अशुद्धासारिखें ॥ प्रकाश भासे उपाधिवेषें ॥ येरवीं तो समसमान असे ॥ न्यून नसे कोणे अर्थीं ॥ ६ ॥ परि आत्मा अंतरींच प्रकाशत ॥ ऐसा तूं धरूंनको हेत ॥ असे अंतर्बाह्य प्रकाशत ॥ सांगेन दृष्टांत तो ऐकपां ॥ ७ ॥ श्लोक ॥ बहिरंतःस्फु

१ माप्ति. २ वितळत. ३ आरसा.

रज्योतीरत्नकुंभप्रदीपवत् ॥ स्वप्रकाशाद्यथैवात्मास्वेषुधीष्वनुबिंबितः ॥ १९ ॥ टीका ॥ रत्नाचिया कुंभाभीतरी ॥ दीप ठेविला अंतरीं ॥ तो अंतर्बाह्य प्रकाश करी ॥ ज्योति सर्वांपरी स्फुरतसे ॥ ८ ॥ रत्नकुंभाचिया स्वच्छता ॥ अंतर्बाह्य सर्व प्रकाशता ॥ तैसा स्वच्छ बुद्धिमाजि बिंबतां ॥ प्रकाशी सर्वथा परमात्मा ॥ ९ ॥ बुद्धीचाहि अंतरीं ॥ आत्मा प्रकाशें स्वप्रकाश करी ॥ ह्मणऊनि बाह्य अभ्यंतरीं ॥ ज्ञानें करी प्रकाशतु ॥ ॥ ३१० ॥ एवं आत्म्यावेगळें कांहीं ॥ बाह्याभ्यंतरीं दुजें नाहीं ॥ सर्वत्र येकला तोचि पाहीं ॥ दुसरें नाहीं तयावीण ॥ ११॥ अहो विश्व हें प्रत्यक्ष दिसतां ॥ देहेंद्रियादि सर्व भासतां ॥ येक आत्माचि कैसें ह्मणतां ॥ हें तंव चित्ता आन वाटे ॥ १२ ॥ यदर्थीं ऐका उत्तर ॥ सांगों हाहि प्रकार ॥ विश्व आभासमात्र दृष्टिगोचर ॥ नव्हे साचार दृष्टिबुध्या ॥ १३ ॥ श्लोक ॥ तत्रस्थितेयंविश्वश्रीःप्रतिभामात्ररूपिणी ॥ रज्वाभुजंगवद्भातिस्वयमात्मा सदोदितः ॥ २० ॥ टीका ॥ जें कीं सर्वत्र येकचि प्रकाशित ॥ जें कीं सच्चिदानंद अपरिमित ॥ त्याच्याठाईं विश्व भासत ॥ जाण तें कल्पित रघुराया ॥ १४ ॥ प्रतिमामात्रचि रूप जगाचें ॥ परि वास्तव्य परब्रह्म साचें ॥ रवि रश्मी करी भास जळाचें ॥ कां कोल्हेरींचे असिवार ॥ १५ ॥ नाना रज्जुचाठाईं सर्पभास ॥ भासे लटिकाचि आभास ॥ वास्तव्य विचारितां असे शुद्धांश ॥ सावकाश रज्जुचि येकी ॥ १६ ॥ नाना गगनीं जैसी नीळिमा ॥ तेणें नीळत्वचि गमे व्योमा ॥ तो भासमात्र गा सुरोत्तमा ॥ नभगरिमा जैसी तैसी ॥ १७ ॥ तैसें

१ भांड्यांत. २ खरें. ३ खरीवस्तु. ४ कुंभाराच्याकारखान्यांतील. ५ स्वार. ६ आकाश.

भ्रमेंकरूनि विबुधनाथा ॥ ब्रह्मीं विश्वाचि आभासता ॥ आत्माचि देहेंद्रियादि भ्रांता ॥ भासे अन्यथा भास जना ॥ १८ ॥ तेंचि तें आत्मस्वरूप जाण ॥ जैंकीं देहेंद्रियाहूनि विलक्षण ॥ वरी वरी भासे तो भास पूर्ण ॥ जाण हे खूण सर्वत्र ॥ १९ ॥ तें सदोदित शब्दें परिपूर्ण ॥ आत्माचि जाण चैतन्यघन ॥ निद्रितासिं जैसें स्वप्न ॥ देहादि भान तैसें भासे ॥ ३२० ॥ तैसें आत्मयाच्याठाईं ॥ देहेंद्रियादि भासे पाहीं ॥ तें ज्ञानें विचारितां सर्वही ॥ आत्माचि पाहीं सदोदित ॥ २१ ॥ ऐसा आत्मा तो किंलक्षण ॥ तेंहि तुज सांगों संपूर्ण ॥ एकें एकाग्र करूनि मन ॥ समाधान जेणें होय ॥ २२ ॥ तें सार्ध सप्तश्लोकेंकरून ॥ सांगों आत्मयाचें लक्षण ॥ मग पूर्णतेचें विवरण ॥ श्रोतीं संपूर्ण परिसिजे ॥ २३ ॥ अपरोक्ष जाणतां आत्मलक्षण ॥ तद्रूपें राहतां संपूर्णता जाण ॥ वरीतसे गा तयालागुन ॥ तेही खुण सांगो मग ॥ २४ ॥ प्रस्तुत आत्मा तो किंलक्षण ॥ सांगों देइजे अवधान ॥ ऐकतांचि समाधान ॥ आनंद पूर्ण कोंदतसे ॥ २५ ॥ श्लोक ॥ आद्यंतरहितःसत्यश्चिद्रूपोनिर्विकल्पकः ॥ आत्मसंपूरिताकाशोजीवस्याद्यःपरात्परः ॥२१॥ टीका ॥ जया आत्मयासिं पाहीं ॥ आदि अंत मध्य नाहीं ॥ तो अनादिसिद्ध सर्वदाही ॥ आदि काई कोणत्याची ॥ २६ ॥ तयासिं नाहीं कार्यलेख ॥ यालागीं आदि नाहीं तया देख ॥ तें सर्व कारणाचें कार्य येक ॥ नाहीं अनेक जिये ठाईं ॥ २७ ॥ जे वस्तु उपजलीच नाहीं ॥ त्याची कोण पां बापुमाई ॥ जनकभावें आदि नाहीं ॥ अनादि पाहीं सर्वदा जें ॥२८॥ आदि नसतां

१ भातां. २ लक्ष.

नाहीं मध्य ॥ मध्यभावें अंत असाध्य ॥ उत्पत्ति विनाशें स्वतःसिद्ध ॥ सर्व साध्य आदिमंता ॥ २९ ॥ वंध्ये-
ची कन्या तरुणांगी ॥ गगनाच्यामध्यें कोणें विभागीं ॥ ते जैसी पाहे सवेगीं ॥ नित्य निःसंगी सर्वत्र जे ॥
॥ ३३० ॥ यालागीं मध्य नाहीं जयासीं ॥ आदिवीण अंत कोठें कल्पिसी ॥ ह्मणऊनि आद्यंतहीन परियेसीं॥
सत्य सर्वांसीं येणें होये ॥ ३१ ॥ अगा जयासीं आदि असे ॥ तें सर्वथा काळांतरीं नासे ॥ लोकांतही असे ऐ-
सें ॥ उपजलें नासे सर्वथा ॥ ३२ ॥ यदर्थी भगवंत आपण ॥ गीतेसीं बोलिले श्रीकृष्ण ॥ तेंचि ऐका संमतिव-
चन॥समाधान जेणें होय ॥३३ ॥ श्लोक ॥ संमतिगीता ॥ जातस्यहिध्रुवोमृत्युर्ध्रुवंजन्ममृतस्यच ॥ तस्मादपरि-
हार्येर्थेनत्वंशोचितुमर्हसि ॥ १ ॥ टीका ॥ जें जड तें नासे गा रघुपती ॥ तें असत्य जाणपां सर्वार्थी॥आद्यंतही-
न जें विश्वमूर्ति ॥ सत्य त्रिजगतीं तें जाण ॥ ३४ ॥ यालागीं सत्य तें जाणिजे ॥ सत्य तेंचि चिद्रूप सहजे ॥
असत्य तें जड ह्मणिजे ॥ दृश्यं[1]व्याजें भासत॥३५॥ब्रह्म तें सर्वांचें साक्षि जाण ॥ ह्मणऊनि सत्यरूप ज्ञानघन॥
संकल्प विकल्पविहीन ॥ निर्विकार पूर्ण ह्मणोनियां ॥३६ ॥ तें जीवात्मयाचें आदिभूत ॥ तें आकाश व्यापुनी
संतत ॥ तेंचि परब्रह्म सदोदित ॥ जाण निश्चित तमालश्यामा ॥ ३७ ॥ पर जें कीं ब्रह्मादिक ॥ त्याहूनि पर जें
येकायेक ॥ नातरी पर शब्दें माया सम्यक ॥ तें साक्षी देख तें परात्पर ॥ ३८ ॥ आणिक लक्षणें रघुपती ॥ ऐ-
कावीं गा येकाग्रमती ॥ जेणें बाणे आत्मास्थिती ॥ श्रवणसंपत्ति झालिया ॥ ३९ ॥ श्लोक ॥ आत्माविशुद्धचेत-

१ दृश्यरूपानें.

न्यस्वरूपःशाश्वतोविभुः ॥ निर्विकारः स्वयंज्योतिस्वभावोर्कप्रकाशवत् ॥ २२ ॥ टीका ॥ व्यापकपणें आत्मा बोलिजे ॥ हें पूर्वींहि बोलिलों श्लोकव्याजें॥व्यापक तें अतिशुद्ध जाणिजे॥मळ नेणिजे अज्ञानपंकु ॥३४०॥ जेथें अज्ञान निःशेष नाहीं ॥ तोचि शुद्ध आत्मा पाहीं ॥ अथवा गुणत्रयाविहीनाहि॥शुद्ध निश्चयीं आत्मरूप॥४१॥ नाना वृत्तींचें उपशमन ॥ मी पूर्ण ब्रह्म हेंही अनुसंधान ॥ सरे तेंचि विशुद्ध हे खुण ॥ निश्चयें जाण रघुनाथा ॥ ॥ ४२ जेथें निःशेष जडाचें ध्यानवर्तन ॥ तेंचि तें अतिशुद्ध जाण ॥ शुद्ध तेंचि चैतन्यघन ॥ निखिल ज्ञानस्वरूपची ॥ ४३ ॥ जड तितुकें दृश्यजात ॥ अजड तें ज्ञानघन निश्चित ॥ तेंचि चैतन्यस्वरूप बोलिजेत ॥ अबाधित काळत्रयीं ॥ ४४ ॥ जें ज्ञान बाधे काळेंकरुनी ॥ तें वृत्तिरूप भरवसेनी ॥ हें अबाधित अखंडपणीं ॥ स्वस्वरूपपणीं प्रकाशत ॥ ४५ ॥ अथवा चैतन्य आणि स्वरूप॥दोनी पदें केलिया एवंरूप॥अर्थ होतसे पैं तद्रूप॥चैतन्यरूप तें ज्ञानचि ॥ ४६ ॥ जें स्वरूपरूपेंचि ज्ञान ॥ तें चैतन्यरूप व्याख्यान ॥ आपुल्या स्वरूपींच अवस्थान॥ स्वरूपपण या नाम ॥४७॥ ज्ञानस्वरूप अजड असे ॥ तेंचि शाश्वत जाण सर्वांशें ॥ जड तितुकें नासतसे॥ अशाश्वत ऐसें नाम त्याचें ॥४८॥ अजड आणि स्वप्रकाशपणें ॥ आत्मयासी शाश्वत बोलणें ॥ काळत्रयीं अबाधितपणें॥ शाश्वत होणें आत्मयासीं ॥४९॥ जो कीं शाश्वत निरंतर॥तोचि जाण विभू सर्वेश्वर ॥ अशाश्वत तें नश्वर ॥ नियंतृत्वें थोर कैचें त्यासी ॥३५०॥ पुत्राह्नि पिता आधीं असे ॥ म्हणऊनि नियंतृत्व तेथें वसे ॥ यालागीं सर्वाह्नि

१ लय. २ संपूर्ण. ३ जागा, ठिकाण. ४ सत्तेनें.

शाश्वत असे॥तेथें सर्वांशें विभूत्व जाण ॥५१॥आणि जे किं विकारवंत वस्तु असे॥ते तंव नाशिवंत सर्वांशें ॥ अंशमंत ते विकारी असे॥आन नसे यया बोला॥५२॥आत्मा निरंश सर्वांपरी॥निरंश तें सहज अविकारी॥ सांशें तें परिणमे नानापरी॥म्हणऊनि निर्विकारी निरंतर॥५३॥पयादिक सांश असे ॥ म्हणऊनि दध्याकारें परिणमत असे॥विकार पावे अन्य रूपांशें॥विकार ऐसें या नाम॥५४॥अंश शब्दें परिणामवादि॥सूक्ष्म बिंदु प्रमाण अवधी॥ ज्यासि असे ते परिणामी सर्वादीं ॥ जळ पृथ्व्यादि सावयव जे ॥५५॥ तैसा आत्मा नव्हे अंशमंत ॥ अंशभावें नव्हे परिणामवंतु ॥ यालागीं निर्विकार बोलिजेत ॥ सदोदित निरंशत्वें॥५६॥विकारवंत आकारायेईल ॥ आकार तो सर्वथा नासेल ॥ यालागीं विकारी ह्मणाल॥ तो नित्य निर्मळ अविकारी॥५७॥नातरी कोणी परिणामवाद बोलती ॥ आत्मपरिणाम विश्व बोलती ॥ आणि विश्वाचि उत्पत्ति स्थिती ॥करी स्वशक्ति ऐसा प्रवादु॥५८॥तरी जया सद्गुरुकृपा नाहीं पूर्ण॥जया नाहीं आत्म्याचें अपरोक्षज्ञान॥त्याचें हें जल्पवाद जाण॥नव्हे खूण अनुभवाची ॥५९॥ दुसरीयासिं जिंकावयाकारणें ॥नानापरीच्या युक्ति बोलणें॥तया जल्प ऐसें ह्मणणें॥ निश्चय करणें शास्त्रें ऐसा ॥३६०॥ जिगिमीषोः कथा जल्प ऐसें॥शास्त्रींहि बोलिलें असे॥ह्मणऊनि बोलणें वाइसें॥सिद्धांत ऐसे नव्हती पैं ॥६१॥तरी ऐक आतां रघुपती॥आत्मा अविकारी जाण सर्वार्थीं॥याचा परिणाम विश्व ह्मणती॥ते तंव नेणती शास्त्रानुभव ॥६२॥ शास्त्रश्रवणअनुभव जयांसीं ॥ ते जाणती आत्मा अपरिणामी सर्वांशीं ॥ विश्व हें अभ्रजाल

१ परब्रह्म. २ मायिक. ३ दूध. ४ दह्यांच्यारूपानें. ५ बडबड. ६ निरर्थक.

जैसें आकाशीं ॥ नाथिलियासीं कोणें नेमिलें ॥ ६३ ॥ अंबरीं नीळिमा कैंची तेथ ॥ शुद्धा गगनासी नीळें मानित ॥ तें भ्रांतीवांचूनि ईषत ॥ नाहीं निश्चित रघुनाथा ॥ ६४ ॥ शुक्तिकेच्याठाईं रजत ॥ तें कोणें नेमिलें सतत ॥ किं शुक्तिका परिणमिली तेथ ॥ काय अर्थ बोलावा पैं ॥ ६५ ॥ शुक्तिका जैसी तैसीच असे ॥ तीसि चळनही कर्तव्य नदिसे ॥ तेथें उगेंचि रजत भासतसे ॥ कोण्या मिसें बोला पैं ॥ ६६ ॥ तरि शुक्तिकेचेनि अज्ञानें ॥ रजताकार शुक्तिसी होणें ॥ नसतेंचि रजत भासणें ॥ जाण ये खुणें भ्रमाचिये ॥ ६७ ॥ तेचिं शुक्तिकेचें ज्ञान झालिया ॥ तें प्रत्यक्ष अनुभवलिया ॥ कैंचें रजत कैंची माया ॥ जाण रघुराया येणें न्यायें ॥ ॥ ६८ ॥ तैसेंचि रज्जुच्याठाईं सर्पबुद्धी ॥ हे तंव अज्ञानाचि समृद्धी ॥ निद्रेमाजी स्वप्नवृद्धी ॥ जाण सुबुद्धी भ्रमाचि तो ॥ ६९ ॥ तैसें निर्विकार वस्तुच्याठाईं ॥ जगदाभास भासे पाहीं ॥ तें अज्ञानावांचूनि जड नाहीं ॥ ज्ञानें सर्वहि मिथ्याभूत ॥३७०॥ ह्मणऊनियां आत्मा निर्विकार ॥ कोणें काळीं देशीं नाहीं विकार॥स्वप्रकाश निरंतर ॥ प्रभाकर स्वप्रभे जैसा ॥ ७१ ॥ रात्रि दिवस दोन्ही नेणोनि ॥ स्वप्रकाशे प्रकाशे जैसा तरणी ॥ तैसा आत्मा अज्ञानादि नेणोनि ॥ स्वप्रकाशेंकरूनि शोभत ॥ ७२ ॥ आत्मयासी दृष्टांत देणें ॥ हें तंव नघडे गा सर्वस्वपणें ॥ तैसेंचि नाहीं ह्मणऊनि बोलणें ॥ दृष्टांत देणें अलौकिक ॥ ७३ ॥ अथवा स्वयं शब्देंस्वतः-सिद्ध ॥ आत्मस्वरूप अगाध बोध ॥ ज्योति शब्दें स्वप्रकाश निर्बाध ॥ अतिशुद्ध शुद्धाहुन ॥ ७४ ॥ अहो

१ लटिकें. २ आकाशांत. ३ सूर्य.

पराचेनि जें प्रकाशे ॥ त्यासि बोलिजे परप्रकाश ऐसें ॥ परप्रकाश तें जड दृश्य असे॥जड तें सर्वांशें मिथ्याभूत ॥ ७५ ॥ तैसें नव्हे आत्मस्वरूप ॥ तें प्रकाशैकचिद्रूप ॥ स्वयंज्योतिअमूप ॥ जाण निष्टंक अचलपणें ॥ ७६ ॥ यालागीं आत्मा विशुद्ध चैतन्यघन ॥ स्वस्वरूप नित्य निरंजन ॥ सत्य समर्थ नियंता पूर्ण ॥ आणि अगुण निर्विकारत्वें ॥ ७७ ॥ स्वतःसिद्ध स्वयंज्योती ॥ अनादि आइता प्रकाशमूर्ति ॥ अचळ अढळ स्वयंव्यक्ती ॥ ऐक सुमती चिन्ह आणिक ॥ ७८ ॥ श्लोक ॥ आत्मानुभवमात्रात्मासर्वगः सर्वसंश्रयः ॥ प्रकाशानंदचैतन्याऽव्यतिरिक्तोनलोष्ण्यवत् ॥ २३ ॥ टीका ॥ अनुभवमात्रचि आत्मा असे ॥ परि बोलिजे घेईजे ऐसा नसे ॥ इंद्रियग्राह्य नव्हे सर्वांशें ॥ दृश्य नसे जिये ठाईं ॥ ७९ ॥ दृश्य जेथें अणुमात्र नस्फुरे ॥ वृत्तिरूप ज्ञानही स्वरूपीं मुरे ॥ ग्राह्य ग्राहक जेथें वोसरे ॥ त्रिपुटी सरे ज्ञेय ज्ञानाची ॥ ८० ॥ अज्ञानवृत्ति निःशेषही ॥ मावळोनि जाती सर्वही ॥ वस्तुवेगळें आन कांहीं ॥ नसे जे ठाईं अनुभव जाण ॥ ८१ ॥ अथवा जें किं स्वरूपज्ञान ॥ तयासीं बोलिजे अनुभव पूर्ण ॥ निखिल ज्ञानेवीण नसे आन ॥ तेंचि चैतन्य अनुभवनामें ॥ ८२ ॥ तन्मात्रचि आत्मा असे ॥ अनुभवमात्रेंचि बोलिजे ऐसें ॥ तेंचि स्वरूप जयाचें असे ॥ आन नसे द्वैतलेशु ॥ ८३ ॥ यानामें अनुभवमात्रचि म्हणिजे ॥ वस्तुवेगळें दुजें नेणिजे ॥ कल्पीत तें परिछिन्न सहजें ॥ आत्मा जाणिजे सर्वगतु ॥ ८४ ॥ ज्या ज्या दिगंतरा जाय आपण ॥ तों तत्पूर्वींच तेथें असे गगन ॥ तैसें आत्मस्वरूप

१ निश्चयेंकरून. २ नाहींसें होतें. ३ संपूर्ण. ४ नाशवंत. ५ व्यापक. ६ अन्यदेशास.

सर्वत्र व्यापून ॥ असे भरोन सर्व देशीं ॥ ८५ ॥ कां वस्तु जे जे निर्माण होये ॥ ते आधींचि व्योमें व्यापिली आहे ॥ सर्वत्र देशीं काळीं नित्य पाहे ॥ तैसा आहे सर्वगत आत्मा ॥ ८६ ॥ आत्मा सर्वगत ययापरी ॥ ह्मणिजेत असे गा रावणारी ॥ सर्वाश्रय तेणेंचिपरी ॥ त्याभीतरीं जग सकळ ॥ ८७ ॥ प्रकाशानंद चैतन्य ॥ अव्यतिरिक्तपणेंचि येकपण ॥ याचोंहि सांगों विवरण ॥ ब्रह्मपूर्ण तेणें लाभे ॥ ८८ ॥ प्रकाश आणि आनंद ॥ तिसरें ज्ञान अतिविषद ॥ येहि तिहीं पदीं ब्रह्म अगाध ॥ नाहीं भेद वाच्यपणें ॥ ८९ ॥ अथवा प्रकाश शब्दें सत्ता ॥ घटःसन् पटःसन् हे अस्तिता ॥ ऐसी आहेपणाचि सर्व सत्ता ॥ तेचि तत्वतां प्रकाशरूप ॥ ३९० ॥ प्रकाश शब्दें सत्ता रघुपती ॥ ते वाखाणिली गा तुजप्रती ॥ आकाश सत्तेसी येकत्व पावती ॥ वाच्यहोती येणें अर्थें ॥ ९१ ॥ तैसाचि निरतिशय जो आनंद ॥ विषयसुखेंसिं येकत्व विषद ॥ पावलिया वाच्य प्रसिद्ध ॥ तत्त्यागें शुद्ध तोचि उरे ॥ ॥ ९२ ॥ तिसरें चैतन्य ज्ञान ॥ स्वप्रकाशक निरंजन ॥ वृत्तिज्ञानें वाच्य जाण ॥ तेणेंसि भिन्न तेंचि शुद्ध ॥ ९३ ॥ ऐसी सत्ता आनंदप्रकाश ॥ येहि तिहीं पदीं येकचि परेश ॥ अभेदपणें ब्रह्म उदास ॥ भिन्नाभास असेचिना ॥ ॥ ९४ ॥ जैसें अग्नि आणि उष्णता ॥ वेगळी न निवडे गा सर्वथा ॥ अग्निचेंच नाम उष्णता ॥ भिन्न तत्वतां असेचिना ॥ ९५ ॥ उष्णता तोचि अग्नि ॥ अग्नी तोचि उष्णता जनीं ॥ परस्परें भिन्न नव्हति दोन्ही ॥ एकपणीं येकचि तें ॥ ९६ ॥ नाना वायु आणि गती ॥ येक वायूचि जैसा गा सुमती ॥ अवकाश आणि आकाशस्थिती ॥ भि-

१ आकाशानें. २ व्यापक. ३ अभिन्नपणें. ४ अगणित.

न्न नव्हती कदाकाळें ॥९७॥ नाना आरर्द्रता आणि नीरें ॥ दोनी येकचि अंबु सर्वत्र ॥ द्रुति आणि पुष्पसार ॥ मनोहर येकत्वें॥९८॥ पर्जन्य आणि धारा ॥ गंध आणि कापुरा ॥ दीपप्रकाश येक वीरा ॥ नाहीं दुसरा भिन्न-भावो ॥ ९९ ॥ तैसें प्रकाश आनंद चैतन्य ॥ पदत्रयें आत्मा येकचि जाण ॥ तेंचि तें ब्रह्म परिपूर्ण ॥ नव्हे भिन्न वाच्य पदीं ॥ ४०० ॥ आतां आणिकही लक्षणें ॥ सांगों श्रीरामा तुजकारणें ॥ तें ऐकतां एकाग्र मनें ॥ बुझसी जेणें आत्मस्थिती ॥ १ ॥ श्लोक ॥ चेतवर्जितचिन्मात्रःपरमात्मावभासकः ॥ सबाह्याभ्यंतरव्यापिनिष्कलंसक-लाश्रयः ॥ २४ ॥ टीका ॥ तरी दृश्यवर्जित चैतन्यमात्र ॥ दृश्य देहादि विश्वविचित्र ॥ त्याचें नाम रूप त्यजूनि सर्वत्र ॥ ज्ञानमात्र जें निर्विशेषं ॥ २ ॥ चित्तकल्पीत चैतन्य बोलिजे ॥ तयातें दृश्य ह्मणिजे ॥ चित्तकल्पनेवीण सहजे ॥ तेंचि जाणिजे आत्मरूप ॥ ३ ॥ तेंचि तें सर्वी वरिष्ठव्यापक ॥ परमात्मा जो अवभासक ॥ जयाचेनि भासें भासे सकळिक ॥ येकानेक जेथें नाहीं ॥४॥ द्रष्टा दृश्याचा जो जाणता ॥ येके काळेंचि सर्व भासविता ॥ तोचि आत्मा जाण प्रकाशकता ॥ होय तत्वतां प्रकाशकु ॥५॥ जयाचेनि हें सर्व भासे ॥ जयाच्याठाईं सर्व प्र-काशे ॥ तो अवभासकु आत्मा असे ॥ हें रघुवंशें जाणावें ॥ ६ ॥ बाह्य जे कीं घटपटादि स्थूळ ॥ अंतरीं अहंकार मन बुद्धी सकळ ॥ काम क्रोधादि वासनाजाळ ॥ अंतर्बाह्य सकळ विश्व नाम ॥७॥ यया सर्वांचा जो अवभासकु॥ तोचि बोलिजे आत्मा येकु ॥ ऐसा असोनि निष्कळंकु ॥ सर्वाश्रय मुख्य अधिष्ठानत्वें ॥ ८ ॥ आणिकही ल-

१ ओलावा. २ पाणी. ३ सुगंध. ४ ब्रह्म. ५ प्रकाशक.

क्षणें रघुपती ॥ आत्मयाची सांगेन तुजप्रती ॥ तेंहि ऐका एकाग्रचित्तीं ॥ विश्वमूर्ति अवधारिया ॥९॥ श्लोक ॥ यआत्माचिन्मयःस्वच्छःप्रवृध्यापंचयच्युतः ॥ हेयग्राह्योज्झितोदेशकालजात्याद्यसंगतः ॥ २५ ॥ टीका ॥ जो कीं आत्मा तो चैतन्यमूर्ति ॥ केवळ ज्ञानमात्रचि गा रघुपती ॥ ह्मणऊनि तयातें स्वच्छ ह्मणती ॥ स्वयंज्योती स्वप्रकाशें ॥ ४१० ॥ निर्मळपणेंचि स्वच्छपण ॥ नाहीं अज्ञानादि जेथ मालिन्य ॥ उपाधिगुणें कार्य आणि त्रिगुण ॥ नाहीं तें पूर्ण स्वच्छपणें ॥ ११ ॥ उपाधिहीनासि व्यापकपण॥ उपाधि तितुका परिछिन्न ॥ ह्मणऊनि तेंचि येक परिपूर्ण ॥ नाहीं न्यून अंतर्बाह्य ॥ १२ ॥ व्यापका कैंचा वृद्धिनाश ॥ वाढाव्या तरी नाहीं देश ॥ क्षय पावणें तरी नव्हे सांश ॥ नित्य अविनाशु निरुपाधिपणें ॥ १३ ॥ तें जैसें तैसें सर्वदां असे ॥ जग भासतां नवेंचे अंशें ॥ वृद्धि नपवे जगनाशें ॥ परिपूर्ण असे अखंडपणें ॥ १४ ॥ यालागीं वृद्धि क्षय दोन्हीं ॥ मावळलीं जिये स्थानीं ॥ तें अखंड दंडायमानें जनीं वनीं ॥ सर्वत्र सर्वपणीं शोभत ॥ १५ ॥ आणिघेवों जातां इंद्रियें नेघवे ॥ टाकितां स्वतःसिद्धपणें नटाकवे ॥ सांडणें मोडणें नसंभवे ॥ न झेंपावें बुध्यादिकं ॥ ॥ १६ ॥ अगा सांडणें मोडणें दोन्हीं ॥ नसंभवती जिये स्थानीं ॥ घेतां दृश्यत्वें भासे नयनीं ॥ परि विकारपणीं जो उदास ॥ १७ ॥ साकारें साभास जें असे ॥ तें इंद्रियादिकीं घेवोंयेतसे ॥ हें निर्गुण निरंश सर्वांशें ॥ सर्वत्र प्रकाशे स्वप्रकाशें ॥ १८ ॥ ह्मणऊनि ग्राह्य नव्हे तो सर्वथा ॥ त्यजूं जाता सर्व स्वयेंचि आइता ॥

१ नाशिवंत. २ मायिक. ३ परब्रह्म. ४ ग्रहणकरण्यास योग्य.

अपरोक्ष परिपूर्ण सर्वांतरता ॥ नये त्याजिता त्याज्यबुद्धी ॥ १९ ॥ आणि घेवोंजातां दुजें नाहीं॥परिछिन्न न-
व्हे कोणें काळेंहि ॥ त्यजूं जातां तेंचि तें सर्वहि ॥ त्यज्यावें काई सर्वहीपणें ॥ ४२० ॥ ह्मणऊनि घेवोंजा-
तां कैसें घ्यावें ॥ निरंशपणें घेता नफावे ॥ सांडूं जाता सर्वत्र तेंचि फावे ॥ स्वयेंचि आहे येकलेंचि येक ॥
॥ २१ ॥ जें आपणाहूनि व्यतिरिक्त ॥ बाह्य सांशे आणि आकारवंत ॥ परिछिन्न तेंचि त्यजिजेत ॥ आत्मा
एवंभूत सर्वथा नव्हे ॥ २२ ॥ आत्मा अपरोक्ष सर्वांतर ॥ स्वस्वरूपनिरंशें निर्विकार ॥ व्यापक निर्गुण नि-
राकार ॥ त्याग साचार कैसा होय ॥ २३ ॥ हेयं ग्राह्याहूनि वेगळें ॥ तेंचि तें परब्रह्म निराळें ॥ जें संग न-
पवे देशें काळें ॥ कोणा नमिळे असंगपणें ॥२४॥ देश काळ क्षयातें पावती ॥ आत्मा अक्षयी जाण सर्वार्थीं॥
देश काळादि ब्रह्मीं कल्पिजेति॥अविकल्पिक मूर्ति परब्रह्म॥२५॥तैसेचि जाति वर्ण आश्रमाचार॥ ते ब्रह्मीं नाहीं-
त जे सविकार॥ ब्रह्म तें निर्गुण अविकार ॥ तेथें नानाकार असतीच ना॥२६॥संमतिश्लोक ॥ नवर्णानवर्णाश्रमा
चारधर्मानमेधारणाध्यानयोगादयोपि ॥२॥ टीका ॥ यालागीं येथें ग्राह्यादि समस्त॥आत्मा येणोंसि व्यतिरिक्त ॥
वर्ते सर्वभूतांतरगत ॥ स्वयें अलिप्त असंगपणें॥२७॥ श्लोक ॥ ब्रम्हांडेचयथावायुःसर्वभूतगतस्तथा ॥ सएवभग-
वानात्मातनुमुक्तोव्यवस्थितः ॥ २६ ॥ टीका ॥ वायु जैसा ब्रह्मांड भरोनि ॥ व्यापूनि राहिलासे जनीं वनीं ॥
परि संग नपवे तयाचेनी ॥ अंतर्बाह्यपणीं वर्ततां ही॥ २८ ॥ कां जैसें आकाश सर्वगत ॥ अंतर्बाह्य असोनि

१ निराळें. २ मायिक. ३ टाकण्यास योग्य. ४ व्यापक.

असंगत ॥ तैसा आत्मा असंगें संतत ॥ असे अलिप्त सर्वांपरी ॥ २९ ॥ यालागीं हेय ग्राह्य देश काळ ॥ जाति गुणादि सर्वमेळ ॥ ययाव्यतिरिक्त असंग निर्मळ ॥ नपवे मळ संबंधाचा ॥४३०॥ एवंभूत गुणी जो आत्मा ॥ तोचि षड्गुणैश्वर्य जाण रामा ॥ षड्गुण तेही वीरोत्तमा ॥ सांगेन गरिमा तयांची ॥ ३१ ॥ संमति श्लोक ॥ ऐश्वर्यस्यसमग्रस्यधर्मस्ययशसाश्रियः ॥ ज्ञानवैराग्ययोश्चैवषण्णांभगमितिस्मृतं ॥ टीका ॥ समग्रहि ऐश्वर्य धर्म जाण ॥ यश श्री लक्ष्मी वैराग्य ज्ञान ॥ हे षड्गुण जेथें संपूर्ण ॥ तो श्रीभगवान् परमात्मा ॥ ३२ ॥ तेंचि भगवन्नामें ब्रह्मपूर्ण ॥ तेंचि षड्गुण अंगीकरून ॥ विराजे परब्रह्म आपण ॥ नव्हे संपूर्ण षड्गुणेंहि ॥ ३३ ॥ तोचि व्यापकपणें परिपूर्ण ॥ मुक्तीच्याठाईं उपलब्धी जाण ॥ उपाधिरहित केवळ चिदैकघन ॥ भासे पूर्ण मुक्तीसीपें ॥ ३४ ॥ नाहो मुक्तिच्याठांई लाभे जरी ॥ तरी अन्यत्र काय आत्मा अनवसरी ॥ आत्मा सर्वत्र असेचि परी ॥ मुक्तिभीतरीं केवळ लाभे ॥ ३५ ॥ जागृतीं स्वप्नीं आत्मा वसे ॥ परि तो देहेंद्रियसमुदायें नभासे ॥ तो केवळ सुषुप्तीसिं लाभतसे ॥ जाण तैसें मुक्तावस्थेसीं ॥ ३६ ॥ केवळचि सर्वत्र व्यापूनि असे ॥ परि उपाधियोगें विशिष्टता भासे ॥ मुक्तीसीं केवळ उतरतसे ॥ आन नसे दुजें तेथें ॥ ३७ ॥ आतां मुक्तावस्था ते जाण ऐसी ॥ बाणलिया तुझिया-मनासीं ॥ केवळाची उपलब्धी कैसी ॥ ते अनुभवासिं येईल तुज ॥ ३८ ॥ तरी अगा मुक्तावस्थेचें लक्षण ॥ तें एवंविध रघुनाथा जाण ॥ भासतांहि प्रपंचभान ॥ बाधित पूर्ण ज्ञानें होय ॥ ३९ ॥

१ महत्व. २ प्राप्ति. ३ सांपडत नाहीं. ४ वर्णादिलक्षणें.

देहादिक प्रपंचजात ॥ ते वस्तुज्ञानें होय बाधित ॥ अपरोक्ष स्वस्वरूप जाणत ॥ वासना चित्त जाणोनियां ॥ ॥४४०॥जेथें जें जें कांहीं दृश्यमान ॥ तें दृष्टकल्पित भाव जाण ॥ तितुकें आरोपित मायामय पूर्ण ॥ बाधोनि समान ब्रह्मचि असे ॥ ४१ ॥ अंतर्बाह्य येक चैतन्य ॥ दुसरें नभासे ब्रह्मेवीण ॥ परमानंदाचें आस्वादन ॥ भोक्तेनवीण जेथें उरे ॥ ४२ ॥ तेंचि मुक्ति जाणपां रघुनाथा ॥ येथें केवळ लाभे आत्मसत्ता ॥ नेणे देहादि दुःखवार्ता ॥ तेंचि तत्वतां मुक्ति जाण ॥ ४३ ॥ केवळ मुक्तिच्याठाईं ह्मणसी ॥ तरी ते सर्वत्र चित्कळा परियेसी ॥ तेंही तुज येईल प्रतीतिसीं ॥ सांगेन मानसीं दृढ धरी ॥ ४४ ॥ श्लोक ॥ एवंचिद्गगनाभोगेभूषणेव्योम्नि भास्करे ॥ धराविवरकोशस्थासैवचित्कीटकोदरे ॥ २७ ॥ टीका ॥ तरी पृथ्वीच्याठाईं तेंचि ज्ञान ॥ केवळपणें वर्ते परिपूर्ण ॥ ज्याच्याठाईं पृथ्वी कल्पित पूर्ण ॥ जाण तें चिद्घन जाणावें जें ॥ ४५ ॥ तेंचि ज्ञानस्वरूप श्रीरघुपती ॥ व्योमीं अंतरिक्ष सूर्याप्रती ॥ भोगस्थान स्वर्ग ह्मणती ॥ तेथेंहि अनुगति आत्मयासीं ॥ ४६ ॥ अथवा भोगिं विरागीं आत्मस्वरूप ॥ पृथ्वीं पाताळीं असे अमूप ॥ तेंचि तें सर्वत्र व्यापक निष्कंप ॥ चित्स्वरूप देखतसे ॥ ४७ ॥ तेंचि सर्वत्र भासे जेथ ॥ तें तें येक दोनि नामें बोलिजेत ॥ परि वस्तुवेगळें नाहीं ईषत ॥ तेंहि बोलिजेत परियेसी ॥ ४८ ॥ तया ज्ञानाचि गा रघुपती ॥ धरा विवरीं असे व्याप्ती ॥ कोश भांडार संपत्ती ॥ सर्वत्र वर्तती व्यापकपणें ॥ ४९ ॥ तेंचि पशु पक्षी कीटकोदरीं॥व्यापूनि राहिले सर्वांतरीं ॥ ज्ञानेवीण

१ आकाशांत. २ प्रवेश. ३ अचळ. ४ पृथ्वी.

गोष्टी दुसरी ॥ नाहीं खरी तिहीं लोकीं ॥४५०॥ ज्ञान तेंचि तें ब्रह्म परिपूर्ण ॥ यया बोला नाहीं आन॥तें ज्ञान-
स्वरूप निखिल चैतन्य ॥ नित्य निरंजन परब्रह्म ॥ ५१ ॥ श्लोक ॥ नबंधोस्तिनमोक्षोस्तिब्रह्मैवास्तिनिरंतरं ॥
नैकमस्तिनचद्वैतंसंविस्फारंविजृंभते ॥ २८ ॥ टीका ॥ ऐसियासीं कैंचें मुक्तबंधन ॥ सर्वांद्य सर्वही चिद्घन ॥ नि-
श्चळ अखंड कोंदोन ॥ परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ५२ ॥ दुसरा पदार्थ साच असावा॥ तेणें बंध केलासा कळावा ॥ दुजें
नसतां बंधभावा ॥ नये राणिवा मोक्षाचा ॥ ५३ ॥ अज्ञानें बंध आत्मयासीं॥परि अज्ञान साच आहे कोणे देशीं॥
जन्मपत्रिका वंध्यापुत्रासीं ॥ कोण तो ज्योतिषी करीतसे ॥ ५४ ॥ अज्ञानाचिं मायबापें कवण ॥आणि कोणें
केलें पाणिग्रहण ॥ हें विचारितांचि विचारण ॥ पांगुळवाणें होऊनि ठाके ॥ ५५ ॥ जें उपजतां निमतां नादिसे॥
तें मिथ्याभूत मध्येंचि भासे ॥ तैसें अज्ञान कोणा दिसे ॥ उपजे नासे सांगिजे॥५६॥ अविद्या याचि नामेंजाण ॥
येणें नामें नव्हे विद्यमान॥सत्यरूपासीं नव्हे बंधन ॥ अघटमान सर्वार्थी ॥५७॥ स्वप्नीचा शत्रु आपणा॥जागृतीसि
आणि बंधना॥मृगांभतारु बुडवि सज्ञाना॥अमृता मरण जरी मारी ॥५८॥ राजा वंध्यापुत्रें जरी बांधला॥ सिंह स-
शानें शिंगीं गोंविला॥ प्रतिबिंबें पराक्रमु केला ॥ किं बिंब ग्रासिला पुरुषार्थें ॥५९॥साउली पुरुषाचें करी भक्षण ॥
अंधकारु करी भानूचें ग्रासन ॥ सीतें अग्नीचें आच्छादन ॥ अज्ञानें बंधन आत्मयासीं तैसें ॥४६०॥ कार्पास
तूळ अग्निसी जाळी ॥ तरी आत्मयासीं अज्ञान आकळी ॥ ह्मणऊनि बंधन नाहीं कोणे काळीं ॥ असतां मेळीं

१ राज्यसुख. २ लग्न. ३ अशक्य. ४ मृगजळ. ५ गुंतविला. ६ कापूस.

उपाधीच्या ॥ ६१ ॥ जेथें बंधन जया नाहीं ॥ तेथें मुक्तपण ह्मणणें तया काई ॥ यालागीं बंध मोक्ष दोनी नाहीं ॥ सबाह्य सर्वही व्यापकपणें ॥ ६२॥ परिच्छिन्नासीं बंधन घडे ॥ तेचि मुक्त होय बंधन विघडे ॥ हें तंव दुजेंवीण अद्वैत फुडें ॥ बंध मोक्ष सांकडें कदां नव्हे ॥ ६३ ॥ पुनरपि आत्मयाचें लक्षण ॥ श्रीरामा ऐके पूर्ण ॥ जो येक ना अनेक चैतन्य ॥ चिन्मात्र घनपरमात्मा ॥ ६४ ॥ अगा तें येक ना अनेक ॥ द्वैत ना अद्वैत देख ॥ नातें नव्हे व्याप्य व्यापक ॥ कांहीं येक स्वप्रकाश ॥ ६५ ॥ येक ह्मणतां दुजें भासे ॥ गणितोसिं दुजें असे ॥ यालागीं येक नव्हे ऐसें ॥ अनेक भासे तरि ते माया ॥६६॥ ह्मणऊनि येकानेकाविरहित ॥ येक परब्रह्मचि सदोदित ॥ ज्ञानमात्रचि विजृंभित ॥ नाहीं द्वैत अणुमात्र ॥६७॥ तें ज्ञानमात्र निरंजन ॥ येक ब्रह्मस्वरूप निर्वाण ॥ तेथें दुजें भासे तें भ्रमस्वप्न ॥ कल्पित जाण आरोपमात्र॥ ६८ ॥ अहो शुद्ध ब्रह्माच्याठाईं ॥ आरोपित भासे द्वैत पाहीं ॥ तेंचि विचारूनि पाहतां सर्वही ॥ ब्रह्मेंविण नाहीं दुजी मात ॥ ६९ ॥ हें सार्ध सप्तश्लोकाचें व्याख्यान ॥ येणें बोलिलें आत्मलक्षण ॥ आत्मा एवंभूत हें पूर्ण ॥ तुजलागुन सांगीतलें ॥ ४७० ॥ आतां आत्मयाची व्यापकता ॥ ज्ञानें दृढ बाणे तत्वतां ॥ तेहि सांग सांगों आतां ॥ श्रीरघुनाथा एक तूं ॥ ॥ ७१ ॥ श्लोक ॥ ब्रह्मचिद्ब्रह्मभुवनंब्रह्मभूतपरंपरा ॥ ब्रह्माहंब्रह्मचच्छत्रुर्ब्रह्मसन्मित्रबांधवाः ॥२९॥ टीका ॥ जें किं चित्स्वरूप परब्रह्म ॥ तेंचि तें नित्य येक सम ॥ नाहीं अणुमात्र विषम ॥ परा परम परब्रह्म ॥ ७२ ॥ ब्रह्म

१ नाशिवंतास. २ जाग्रत, भरपूर.

स्वर्ग मृत्यु पाताळ ॥ ब्रह्म पर्वतादि कुळाचल ॥ भूर्भुवः स्वर्लोकपाळ ॥ ब्रह्म निर्मळ चौदा भुवनें ॥ ७३ ॥ या भूताचि जे परंपरा ॥ ते सर्व ब्रह्मचि गा रघुवीरा ॥ सकळ प्रपंचाचा पसारा ॥ ब्रह्मरूप खरा जाण तूं ॥ ॥ ७४ ॥ किंबहुना श्रीरघुनाथा जाण ॥ ह्मणे मीचि ब्रह्म शुद्ध चैतन्य ॥ ऐसें स्वप्रतितीनें जाणे जाण ॥ ह्मणे शत्रुगण परब्रह्म ॥ ७५ ॥ पुत्र मित्र कलत्रादि सर्व ॥ येकचि ब्रह्मचि असे स्वयमेव ॥ देहेंद्रियादि दृश्यभाव ॥ ब्रह्म तें सर्व सर्वरूपें ॥ ७६ ॥ श्लोक ॥ चिच्चेत्याकलितोबंधस्तन्मुक्तोमुक्तिरुच्यते ॥ चिदेत्यखिलमात्मेति सर्वसिद्धांतसंग्रहः ॥ ३० ॥ टीका ॥ तंव रघुनाथ ह्मणति जी श्रीगुरुमूर्ति॥ एवं चैतन्य सर्व त्रिजगतीं ॥ तयासीं ब्रह्म मोक्ष कां ह्मणती ॥ कोणें अर्थीं तें सांगिजे ॥ ७७ ॥ तंव वसिष्ठ ह्मणती गा रघुनाथा ॥ चैतन्य बद्ध ना मुक्त सर्वथा ॥ परि दृश्यतादात्म्यें पावे बद्धता ॥ तेचि मुक्तता दृश्यनाशें ॥ ७८ ॥ तें चैतन्यचि दृश्यसंगती ॥ बंध पावतसे गा रघुपती ॥ दृश्यनाशें तेंचि मुक्ति ॥ ऐसें बोलती विबुधजन ॥७९ ॥ अथवा चैतन्य आणि दृश्याचित्त ॥ येकत्र जालिया बिंबत ॥ तया नाम बंध बोलिजेत ॥ चित्तव्यतिरिक्त तेचि उक्ती ॥४८०॥ चित्त चैतन्याचिये गांठी ॥ बंधकळा असे गा जगजेठी ॥ चित्तसंगें जीवत्वेंसि उठी ॥ देहोहं पुष्टी थोरावत ॥ ८१ ॥ चैतन्यासि जो चित्ताध्यासु ॥ तोचि बंध गा सावकाशु ॥ चित्ताध्यासु गेलिया स्वप्रकाशु ॥ स्वयें परेशु आपणचि ॥ ८२ ॥ चित्ताचेनि अध्यासें ॥ चैतन्यासीं देहपणाचें पिसें ॥ तोंचि तुटलिया चित्ताध्यासें ॥ स्वयें प्रका-

१ स्त्री. २ दृश्याच्या योगानें. ३ निराळी.

शे ब्रह्मरूप ॥ ८३ ॥ त्याचें नाम चिदचिद्ग्रंथी ॥ तेणेंचि दृढ होय संसृती ॥ ग्रंथिनाशें सच्चिच्छक्ति॥ ब्रह्ममूर्ति स्वयेंचि असे ॥ ८४ ॥ तिचेंचि नाम मुक्ति बोलती ॥ हाचि सिद्धांत जाण रघुपती ॥ मग दृश्यादृश्य चिन्मूर्ति ॥ नाहीं व्यक्ति आन कांहीं ॥ ८५ ॥ चित्त चैतन्य सर्व पदार्थ ॥ अखिलहि दृश्य तें आत्मा निश्चित ॥ चैतन्यावांचूनि ईषत ॥ नाहीं पदार्थ कोणीहि ॥ ८६ ॥ जें जें ऐकसी देखसी ॥ तें कीं दृश्यमात्र जाण हृषीकेशी ॥ देश विदेश पृथ्वि आकाशीं ॥ ब्रह्मचि चौंपाशीं सर्वत्र ॥ ८७ ॥ सर्व वेदशास्त्रांचा मथितार्थ ॥ सर्वंखल्विदंब्रह्म हा फलितार्थ ॥ ब्रह्मावेगळा कोणीहि पदार्थ ॥ नाहीं निश्चित जाण तूं ॥ ८८ ॥ श्लोक ॥ चिदिहास्तीहचिन्मात्रंचिदंचिन्मयमेवच ॥ चित्त्वंचिदहमेवेतिलोकाश्चिदितिसंग्रहः ॥ ३१ ॥ टीका ॥ अपरोक्ष परोक्ष तेंचि ब्रह्म असे ॥ इह परत्र ब्रह्मचि वसे ॥ परि इह परत्रादि दोनी नसे ॥ कोंदलें असे चैतन्य येक ॥ ॥ ८९ ॥ जगज्जाळ सर्व ब्रह्मसंविती ॥ ब्रह्मरूपचि जाण त्रिजगतीं ॥ चैतन्याविण नाहीं स्थिती ॥ सांगों किती बोलावरी ॥ ४९० ॥ आतां येकें बोलेंचि इतुकें जाण ॥ जितुकें दृश्य तें चैतन्यघन ॥ अंतर्बाह्य चैतन्यपूर्ण ॥ अणुमात्र न्यून असेचिना ॥ ९१ ॥ आतां किती सांगों गा रघुनाथा ॥ तूं तंव ज्ञानस्वरूपचि तत्वतां ॥ मीहि ज्ञानस्वरूपचि सर्वथा ॥ मी तूं हि कथा अज्ञानाची ॥ ९२ ॥ मी तूं जो इत्यादि व्यवहार ॥ चित्स्वरूप ब्रह्मचि निर्विकार ॥ आणि तिन्हीं लोक चराचर ॥ ब्रह्म निरंतर चिद्रूपत्वें ॥ ९३ ॥ सिद्धांत संग्रह इतुकाची ॥ खल्विदंब्रह्म सर्व हेंचि ॥ याहूनि मात दुजयाची ॥ देहादि दृश्याची असेचिना ॥९४ ॥आणिही ऐक हेचि स्थिती ॥

ब्रह्मेंवीण नाहीं कोणीच व्यक्ती ॥ दृश्यादृश्य सर्वहि संविती ॥ ऐक रघुपति श्लोकार्थें ॥९५॥ श्लोक ॥ यदस्ति-यद्भातितदात्मरूपंयस्मान्यतोभातिनचान्यदस्ति ॥ स्वभावसंवित्प्रतिभातिकेवलाग्राह्यंगृहीतेतिमृषाविकल्पः ॥ ॥ ३२ ॥ टीका ॥ आतां बहु काय बोलों गा रघुपती ॥ जें जें आहे तें तें चैतन्यस्थिती ॥ भासे तितुकें ब्रह्मसंविती ॥ सर्वत्र संमति आत्माचि येक ॥९६॥ आत्मयाव्यतिरिक्त दृश्य भासे ॥ तेंहि जाणपां आत्माचि ऐसें ॥असें नाहीं जे जाणिजे मानसें ॥ तें चि सर्व उल्हासें आत्मपणें॥९७॥नेणोनियां अन्य बोलती॥परि द्रष्टा दृश्य दर्शनस्फूर्ती॥स्फूर्तिसहित सुखसंविती॥भिन्न स्थिती स्वप्नींहि नाहीं ॥९८॥ भासविता भासतें आणि भास्य॥व्याप्य व्यापकता व्याप्यांश॥ज्ञान ज्ञेय ज्ञाता परेश॥सर्व सर्वस्व चिदानंद॥९९॥यया उपपत्ति गा रघुनाथा॥मागें निरूपिलिया बहुता॥ययालागीं जाण सर्व आत्मसत्ता॥आन तत्वतां असेचिना॥५००॥अगा ज्ञानाच्याठाईं सर्व भासे॥ आहे नाहीं हें ज्ञानींच दिसे ॥ सर्वहि दृश्यमात्र ज्ञानींच वसे ॥ ज्ञानेवीण नसे रितें कांहीं ॥ १ ॥ इंद्रियें आणि देह अहंकार ॥ सर्व चिन्मात्र जाण निरंतर ॥ स्वभाव मनबुद्ध्यादि साचार ॥ चिदेकसार प्रकाशत ॥ २ ॥ सुवर्ण जैसें कटकाकारें ॥ येक सुवर्णचि आविष्करे ॥ ॥ परि दुजें तेथें नशिरे ॥ नानाकारें तेंचि शोभे ॥ ३ ॥ कापुराचे टवळे वाती ॥ दिवाही कापुरस्थिती ॥ तेथें काय दुजें बोलती ॥ कापुरीं वस्ती कापुराची ॥ ४ ॥ जळावरी लहरी जाळ ॥ लहरी नामें बोलती बाळ ॥ परि येक नुसतेंचि जळ ॥ कल्पित मेळ लहरीपणें ॥५॥ आकाशीं गंधर्वनगर दिसे ॥ तें भासमात्र क्षणेक भासे ॥ येरवीं गगन असे ॥ नसतें पिसें नगराकारें ॥ ॥६॥ खांब सू-

त्रिचिया प्रतिमा ॥ अनेकिं भासति गा पुरुषोत्तमा ॥ ते येक काष्ठाचि श्रीरामा॥ नाहीं गरिमा अन्य वस्तूचि ॥
॥ ७॥ येक येक सांगावें तुज किती ॥ सर्वत्र येकचि जाण संविती ॥ तेथें ग्राह्य ग्राहक भासती ॥ मृषा भ्रांति
विकल्पाचि ॥८॥ हा नाथिला भेद रघुनाथा ॥ लोक कल्पिताति वृथा ॥ दृश्य भोग्य मी येक भोक्ता ॥ भिन्न
तत्वतां देखताती ॥ ९ ॥ येकाचि वस्तुच्याठाईं ॥ भिन्न भाव कल्पित पाहीं ॥ त्याचें अज्ञान किती काई ॥ व-
र्णूं येहिं नाना शब्दें॥१०॥साखरेचे हस्ति घोडे केले ॥ तयावरी राउत बैसविले ॥ वहनें स्वार अळंकारिले ॥
तेहि अळंकार वेगळे नाना॥११॥तेही नानापरीचे असती॥चित्र विचित्र नेत्रीं भासती॥चातुरंग सैन्य नाना आकृ-
ती॥ मुखीं घालिती तों शर्करा सर्व॥१२॥ तेथें अश्व कुंजर नाढळती॥स्वार आभरणादि नभासती॥चवी वेग-
ळालिया नेणिजेति ॥ नाहीं भ्रांती दुजेपणाची ॥ १३ ॥ तेथें शर्करेवांचूनि आन कांहीं ॥ नादुजें भासे गोडी-
च्याठाईं ॥ तैसें विचित्र विश्वहि भ्रमें पाहिं ॥ विचारें सर्वहि ब्रह्मचि भासे ॥ १४ ॥ कां पटाच्याठायीं चित्र लि-
हिलें ॥ तेथें चातुरंग सैन्यहि भासलें ॥ आधारीं पाहातां काय झालें ॥ विचारें भेटलें पटेविण काय ॥ १५ ॥कां
भिंतीवरील चित्र विचित्र ॥ अश्व कुंजर पदाति सर्व॥अग्नि उदकआणि क्षेत्र ॥ प्रसाद विचित्र नाना परी ॥१६॥
येक अश्वारूढ गजस्कंधांतर ॥ खर उष्टर मृगवेसर ॥ शिवालयाहि मनोहर ॥ मध्यें थोर देवोदेवी ॥ १७ ॥ तेथें-
हि नाना सेवा करिती ॥ प्रदक्षिणा नमस्कार घालिती ॥ येक ते समाधिस्त असती ॥ येक ते पढती वेदशास्त्रें॥
॥ १८ ॥ एवं विचित्रें कर्मं नानावर्णें ॥ भूषणें वस्त्रें विचित्राभरणें ॥ नाना आकार जाती गुण ॥ भासे संपूर्ण पा-

हतया ॥ १९ ॥ तेचि हातीं करुनी पाहिजे ॥ कां मुळीं दृष्टी घालिजे ॥ तरी येकि भिंतीवांचूनि नेणिजे ॥ वर्णादि सहजे असतीचना ॥ ५२० ॥ तैसें येकमात्र निरंजन ॥ परब्रह्मचि ज्ञानघन ॥ विश्व भासे तो भ्रम जाण ॥ सिद्धांत संपूर्ण इतुकाची ॥२१॥ येक ब्रह्मचि सर्वहि असे ॥ ऐसें साक्षात् श्रुति बोलतसे ॥ तेंहि ऐक सावकाशें ॥ जेणें भासे सर्वहि ब्रह्म ॥ २२ ॥ श्रुति ॥ एकोदेवःसर्वभूतेषुगूढः सर्वव्यापीसर्वभूतांतरात्मा ॥ कर्माध्यक्षःसर्वभूताधिवासःसाक्षीचेताकेवलोनिर्गुणश्च ॥१॥ टीका ॥ बुध्यादि दृश्याचा प्रकाशकु ॥ तोचि बोलिजे देव येकु॥ जेथें नाहीं विश्वावलोकु ॥ भाव अनेकु जेथें मावळे ॥ २३ ॥ ब्रह्मा विष्णु रुद्रादिक ॥ ऐसे देव बोलिजेति अनेक ॥ त्यांची व्यावृत्ति करूनि देख ॥ बोली येक ब्रह्मासि पैं ॥ २४ ॥ दिवीदिप्तींदेव ऐसे ॥ स्वप्रकाश बोलिजेत असे ॥ स्वप्रकाश त्या देव ऐसें ॥ नामशब्दांशें द्वितीयपदें ॥ २५ ॥ तो आपुलाचिठाईं असे शोभत ॥ ह्मणऊनि सर्व भूतेषु बोलिजेत ॥ सर्वभूतिं जो प्रकाशत ॥ सर्वां प्रकटित स्वप्रकाशें ॥२६ ॥ सर्व भूतांच्याठाईं प्रकाशे ॥ तरी सर्वां प्रकट नादिसे ॥ तो सर्वांतरीं गूढ असे ॥ इंद्रियें नभासे ह्मणऊनि गूढ ॥ २७ ॥ परि गूढ तितुकें परिछिन्न ॥ येक वस्तुमाजी जाय लपोन ॥ तरी याचें ऐका निर्वतन ॥ श्रुतिवचन सर्व व्यापी हें ॥ ॥ २८॥ तरी आकाशाचे परी ॥ सर्व व्यापूनि असे सबराभरी ॥ तें परिछिन्न कोणेपरी ॥ होईल सर्वोपरी नघडे हें ॥ २९ ॥ ह्मणऊनि सर्व व्यापूनि असे ॥ परिछिन्नत्व तया कदां नसे ॥ तरी काय बाह्यचि व्यापीतसे ॥ अंतरीं नसे कोणाचे तें ॥ ५३० ॥ तरी ऐक याचें उत्तर॥ सर्व भूतांचा आत्मा अंतर ॥ देहेंद्रियें बाह्य प्रकार ॥ स-

वींचें अंतर तें आत्मस्वरूप ॥ ३१ ॥ तरी काय प्रमाणयाचेपरी ॥ जडपणेंचि असे अंतरीं ॥ नातो कर्माध्यक्ष
सर्वांपरी ॥ प्रेरण करी बुध्यादिकांचें ॥३२॥ बुध्यादि इंद्रियांचा नियंता ॥ सर्वज्ञपणें सर्व चाळिता ॥ रवीचेपरी
प्रकाशिता ॥ चलनकर्ता सर्वां जनां ॥३३॥ तरी कुलालाचियेपरी ॥ इतरपणें भांड्यांदिकरी ॥ निमित्त होऊनि भ-
रोवरी ॥ चक्रादि फेरी निराळेपणें ॥३४॥ तैसें विश्व आणि कर्में दोनी ॥ आत्मेंसि असति भिन्नपणीं ॥ आत्मा वे-
गळेपणें राहोनि ॥ करी घाळणी सूर्या ऐसी ॥ ३५ ॥ यदर्थीं अतिभेदु भासतु ॥ येकत्वासि विधातु होतु ॥ ऐ-
सें नव्हे परियसा सिद्धांतु ॥ सर्व भूताधिगतु निवासपणें ॥ ३६ ॥ सर्व भूतांचा अधिवास ॥ त्याच्याठाईं सर्व
भूतांश ॥ भिन्न नव्हे तो परेश ॥ अथवा निवास भूतिं त्याचा ॥३७॥ तंतुचा निवास पटांमाझारी ॥ कीं मृत्तिका वर्ते
घटांतरीं ॥ सुवर्ण अळंकारीं वास करी ॥ लहरीमाझारी जळ जैसें ॥ ३८ ॥ सुगंध प्रवेशे कापुरीं ॥ किं कापुर
प्रवेशे हृतिमाझारीं ॥ आकाश अवकाशाभीतरीं ॥ भेदकुसरी तेथें कैंची ॥ ३९ ॥ तैसें सर्व भूतें आणि परमा-
त्मा ॥ येकत्वें येकपणाची महिमा ॥ नाहीं भिन्नपणाचि सीमा ॥ भूतें उपरमा ब्रम्हीं जाती ॥५४० ॥ तरी काय
आत्मा तद्रूप असे ॥ भूतेंचि आत्मा होय ऐसें ॥ तरी ऐका हें ऐसें नसे ॥ आत्मा असे सर्वांचा साक्षी ॥४१ ॥
साक्षी करीना करविता ॥ स्वयें भोगीना भोगविता ॥ देताना तो देवविता ॥ साक्षी आइता द्रष्टेपणें॥ ४२॥जैसा
सूर्य साक्षित्वें वर्ततु ॥ अलिप्तपणें सर्वां चेष्टवितु॥ स्वयें चेष्टेना प्रवर्तवितु ॥ सर्व जाणतु साक्षित्वें ॥४३॥ अयस्कां-
ताचिया संनिधी॥जड लोहा चेष्टी बुद्धी ॥ तैसें आत्मयांचा वेधीं ॥सर्व भूतादि वर्तती॥४४॥तैसा सर्व नियंता सर्व-

साक्षी॥ तद्रूप नव्हे भूतपक्षी ॥ सर्व ज्ञातृत्वें सर्वलक्षी ॥ सर्वांसीं अलक्षी ह्मणिजेतया ॥४५॥तरी दीप जैसा साक्षी होय॥गृहव्यापार तेणें सिद्धी जाय॥परि तो जडरूपेंचि आहे॥आपणाकायजाणतसे ॥४६॥तरी चेता येणें पदेंकरू-न॥तो ज्ञानस्वरूप चैतन्यघन॥जडत्व नाहीं त्यालागुन॥तो चिद्घन चिन्मात्र ॥४७॥तो स्वसंवेद्य स्वप्रकाशे॥दीप-प्रकाशक परप्रकाश॥तैसा नव्हे हा विश्वाभास ॥ज्योतिप्रकाश स्वयंभूत ॥४८॥ नाहो चेता ह्मणतां विकारी ॥ विकारि तें नश्वर सर्वांपरी ॥ तरी हेही नघडे कुसरी॥ अविकारी कैसें होय ॥ ४९॥ तरी केवळपदें बोले श्रुती ॥ अविकारी निरंश तें केवळस्थिती ॥ प्रपंचलहरीहि नव्हेविकरती ॥ म्हणोनी बोलती केवळ तया॥५० ॥ जेथें विकार मात्र नुपजे ॥ तेंचि केवळ ब्रह्म जाणिजे ॥ विश्वस्वप्न जेथें नेणिजे ॥ विचारें निर्बुजे विचारितां ॥ ॥ ५१ ॥ यालागीं जें कीं निर्विकार ॥ तेंचि केवळ शब्दें साचार ॥ तरी निर्विकारहि गुण थोर ॥ गुणनिर्धार येणें गुणें ॥ ५२ ॥ तरी त्या निर्गुण ऐसी बोले श्रुती ॥ गुणवंत ते नव्हे सर्वार्थी ॥निर्विकार निर्गुण चैतन्यमू-र्ति ॥ व्यक्ताव्यक्तिरहित जें ॥ ५३ ॥ यालागीं येकावांचूनि दुजी गोष्टी ॥ पाहातां नदिसे इये सृष्टी ॥ ह्मण-ऊनि सर्वत्र समष्टि व्यष्टी ॥ ब्रह्मपुष्टी ब्रह्मत्वें ॥ ५४ ॥ ब्रह्मावांचूनि दुसरें ॥ अणुमात्र नाहीं हें खरें ॥ नामरूप हें भ्रमें संचरे ॥ वास्तव्य निर्धारें ब्रह्म एक ॥ ५५ ॥ यदर्थीं आणिकही श्रुती ॥ येकत्वाचि प्रतिपादिती ॥ तेंहि ऐके आनंदमूर्ती ॥ संमतिश्रुति सांगेन ॥ ५६ ॥ श्रुती ॥ एकमेवाद्वितीयंब्रह्म ॥ नेहनानास्ति किंचन ॥ सदेवसो-म्येदमग्रआसीत ॥ आत्मावाइदमेकएवाग्रआसीत॥२॥टीका ॥ नेहनानास्तिकिंचन ॥ येणें नानात्व दूषिलें जा-

ण ॥ एकमेव परब्रह्म निर्वाण ॥ दुजेपणें तृण तेंहि नाहीं ॥ ५७ ॥आदि अंती तें येकचि असे ॥ दुजें सर्वथा तें काहीं नसे ॥ आत्मेवीण आन नभासे ॥ तेंचि तें असे सर्वत्र सर्व ॥ ५८ ॥ जें भासे तें भ्रमें गा रघुपती ॥ जैसें इंद्रजाळ नाना व्यक्ती ॥ गगनीं गंधर्वनगरें भासती ॥ रश्मिप्रती मृगांभ जैसें ॥५९॥ शुक्तिच्याठाईं रजत भासे सुवर्णी कनककुंडलें ठसे ॥ रज्जु सर्पधारामाळामिशें ॥ अनेक दिसे जयापरी ॥५६०॥ चंद्राच्याठाईं द्विचंद्रता॥ प्रतारकु लोकां समस्तां ॥ पिसंच पारवीं तत्वतां ॥ दावी पाहातां भ्रम अनेक ॥६१॥ ऐसीं उदाहरणें किती॥ बोलावीं गा श्रीरघुपती ॥ मागांहि अनेका उपपत्ती ॥ मंगळमूर्ति दाविल्या तुज ॥ ६२ ॥ ब्रह्माच्या येकत्वीं श्रुती ॥ यदर्थीं गा अनंता असती ॥ त्या सांगतां ग्रंथ अति ॥ विस्ताराप्रती जाईल ॥ ६३ ॥ सर्व श्रुतीचें तात्पर्य ऐसें ॥ ब्रह्माव्यतिरिक्त अणुमात्र नसे ॥ विश्व हें ब्रह्मींच उल्हासे ॥ मध्यें भासे तें भ्रमजाळ ॥ ६४ ॥ एवं ब्रह्मावेगळें तें काहीं ॥ अणुमात्रहि दुजें नाहीं ॥ ऐसें जाणूनि सर्वदां राहि ॥ नदेखे कांहीं आपणेंविण ॥ ॥ ६५ ॥ ऐसें निरूपितां वसिष्ठमुनी ॥ तंव श्रीराम परिपूर्ण ब्रह्मपणीं ॥ सर्वत्र पाहे ज्ञान नयनीं ॥ नदेखे जनीं दुजें कांहीं ॥ ६६ ॥ तेणें सुखें सुखावोनि ॥ तटस्थ राहिला कोंदोनि ॥ आन नदेखे जनीं वनीं ॥ ब्रह्मांड भरूनि पूर्णानंदु ॥ ६७ ॥ नदेखे शरीर इंद्रियादिक ॥ नदेखे मन बुध्यादि आणिक ॥अहंकार प्रमाता येकानेक॥ नदेखे लोक आपणेंविण ॥ ६८ ॥ नदेखे सकळ विश्वरचना ॥ धरा पर्वत गिरि द्रोणि नाना ॥ आकाशादि भूतें नयना ॥ नदेखे मनापासुनी ॥ ६९ ॥ आत्मस्वरूपाव्यतिरिक्त ॥ नदेखे कांहीं पदार्थजात ॥ ब्रह्मानंदें उचंबळत॥

राहे तटस्थ निर्विकल्पें ॥ ५७० ॥ तया ब्रह्मसुखाची मर्यादा ॥ नेणिजे तया परमानंदा ॥ कदापि नये देहबो-
धा ॥ परम पदा प्राप्त झाला ॥ ७१ ॥ तरी अंतर्बाह्य नेणे कांहीं ॥ आपणेंसि बुडाला ब्रह्मानंदडोहिं ॥ सु-
खोंचि सुख हेलावे पाहिं ॥ तें जाणाति सर्वहि अनुभवि जे ॥ ७२ ॥ जया सुखाचिया आवडी ॥ ब्रह्मादि इंद्र
पदाचि कीजे कुरवंडी ॥ तेथें विषयसुखें काय बापुडिं ॥ अंशकोडी स्फुल्लिंग ज्याचें ॥ ७३ ॥ ऐसिया सुखीं
निमग्न ॥ निमज्य निमज्यता बुडोन ॥ स्वयें राहे होऊनि निर्वाण ॥ वसिष्ठ धन्य ऐसें ह्मणें ॥ ७४ ॥ मुहूर्तो
येका झालें व्युत्थान ॥ आंगीं भरलें सुखावतरण ॥ इंद्रियां नाहीं इंद्रियपण ॥ विकळ जाण सुखानुभरीं ॥
॥ ७५॥ जळनिधीसिं भरितें उतट ॥ तें सर्वही खारियासी दाटे ॥ तैसें अंतरी सुख जें कोंदाटे ॥ सर्वत्र प्रक-
टे कर्णद्वारां ॥ ७६ ॥ तेणें सुखें सुखावली ॥ ह्मणऊनि विषयावरील धांव मोडली ॥ तेणेंचि सुखें पुंजाळली॥
तटस्थ ठेली सुखावशेषें ॥ ७७ ॥ अतिप्रयासेंकरून ॥ देहस्मृती धरी रघुनंदन ॥ देहावरी आला ऐसें देखो-
न ॥ दिधलें आलिंगन वसिष्ठें प्रेमें ॥ ७८ ॥ मग ह्मणे श्रीरामा परियेसी ॥ स्वरूपलक्षण निरूपिलें तुजपा-
सीं ॥ एवंभूत जाणऊनि आत्मयासी ॥ राहे स्थितीसीं तदाकारें ॥ ७९ ॥ ऐसें बोलतां मुनी ॥ रघुनाथ ला-
गले गुरुचरणीं ॥ ह्मणे धन्य धन्य तुमची वाणी ॥ सुखाची धनी श्रवणमात्रें ॥ ५८० ॥ श्रीवसिष्ठा तुझिया
उपकारा ॥ उत्तीर्ण नव्हिजे जी दातारा ॥ अर्पिलिया संभारा॥नाना उपचारा देहादिकां॥८१॥ ह्मणऊनि घाली
लोटांगण ॥ पुनःपुन्हा करीतसे नमन ॥ वसिष्ठें धरिला आलिंगुन ॥ ह्मणे धन्य धन्य वंश तुझा ॥८२॥ जिये वंशीं

ब्रह्मनिष्ठ पुत्र ॥ धन्य तयाचें कुळ शीळ गोत्र ॥ तूंचि स्वयें ब्रह्म तेथें काय विचित्र॥बोलेल वक्र किती माझें॥८३॥ अगा आत्मस्वरूप जाणोनी॥राहिजे तद्रूप निर्वाणीं॥तरी तेचि जीवन्मुक्ति भवसेनी॥कार्मुकपाणी जाण तूं ॥८४ तरी तेचि जीवन्मुक्ति आतां ॥ लक्ष्मणेंसहित श्रीरघुनाथा ॥ सांगेन ते एक सीताकांता ॥ जे किं तत्वतां तुज बाणली ॥ ८५ ॥ हेंचि उत्तरप्रकरणीं ॥ निरूपिती जे श्रीवसिष्ठमुनी ॥ श्रवण करील कोदंडपाणी ॥ तें श्रोतां जनीं परिसिजे ॥ ८६ ॥ ऐसा बोलोनि उत्तरार्थु ॥ उगाचि राहिला तटस्थु ॥ तेथें विनवी रंगनाथु ॥ झालों कृतार्थु ग्रंथवक्तृत्वें ॥ ८७ ॥ सर्वहि ग्रंथीं ब्रह्मनिरूपण ॥ तें वाखाणितां थोर समाधान ॥ ब्रह्मानंद जातअसे उलथोन ॥ सुखसंपन्न सुखत्वें ॥ ८८ ॥ निरूपणामाजी विवरतां ॥ तत्काळ समाधी वरी चित्ता ॥ याग्रंथाचेंहि लेखन करितां॥निदिध्यासनता स्वयेंचि होय ॥ ८९ ॥ विजातीय प्रपंचाचें निरसन ॥ सजातीय ब्रह्माचें प्रतिपादन ॥ करितां उभयतां निरूपण ॥ समाधान निदिध्यासें ॥५९०॥ एवं ग्रंथ लिहितां विवरितां ॥ ब्रह्मसुखीं होय निमग्नता॥ ह्मणऊनि ये ग्रंथीं वर्ततां ॥ सुखसंपन्नता ब्रह्मानंदें ॥९१ ॥ येथें संपलें हें प्रकरण ॥ गोडाहुनी गोड निरूपण ॥ ऐकोनि तोषती सज्जन ॥ तें सज्ञान ब्रह्मानंदें ॥९२॥ सद्गुरुचेनि प्रसादें ॥ प्रकरण संपलें ब्रह्मानंदें ॥ तेणें तें एक तूं स्वानंदें ॥ मन अगाध निर्मळ करूनी ॥९३॥ श्रोतयांसी हेचि विनंती ॥ ग्रंथावगमन पुढतो पुढती केलिया ब्रह्मसुख उन्नती ॥ नेणत्याहि प्राप्ती समाधानाची ॥ ५९४॥ इतिश्रीयोग०आत्मनिरूपणंनाम अष्टमप्रकरणं ॥ ८ ॥ मूळ श्लोक ॥ ३२ ॥ समंतीश्लोक ३ श्रुति २ ओवी ॥ ५९४ ॥ ॥ एवं संख्या॥६३१॥

इति श्रीयोगवासिष्ठसारे अष्टम आत्मनिरूपणंनाम प्रकरणंसमाप्तं

## ॥ अथ श्रीयोगवासिष्ठसारे नवम जीवन्मुक्ति प्रकरणप्रारंभः ॥



श्रीगणेशायनमः ॥ श्रीनीलकंठगुरवेनमः ॥ वंदितां श्रीगुरुचरण ॥ होय भवभयाविध्वंसन ॥ अज्ञान निःशेष नासोन ॥ सुखसंपन्न ब्रह्मानंदें ॥ १ ॥ यालागीं भलीं हेंचि करावें ॥ अखंड सद्गुरूतेंचि भजावें ॥ इतुकेनि कैवल्यपद पावावें ॥ ब्रह्म अनुभवावें सिद्धची ॥ २॥ जैसी कां भोजनीं तृप्ति होय ॥ बळपुष्टी वाढे क्षुधा जाय ॥ तैसें सद्गुरुभजनें सर्व होय ॥ जाणती सर्व हें अनुभवि जे॥ ३ ॥ ह्मणवुनी म्यां हेचि बुद्धि केली ॥ जीवें धरिली सद्गुरुमाउली ॥ तेणें मी कृतकृत्यता केली ॥ मालवली संसृति[1] माझी ॥ ४ ॥ वरकड नेणेचि मी उपावो ॥ ह्मणऊनि धरिला सद्गुरुरावो ॥ तेथेंही येक सद्भावो ॥ अन्य भाव नेणेचि कांहीं ॥ ५ ॥ कांहीं सेवा नेणेचि सद्गुरूची ॥ तथापि कृपा असाधारण त्याची ॥ कृपेसाठीं होळी अज्ञानाची ॥ आणि स्वस्वरूपाची प्राप्ति झाली ॥६॥ ऐसें बोलतां श्रोतयांप्रती ॥ तंव हृदईं आविर्भवली[2] सद्गुरुमूर्ति ॥ आनंदेंकरूनि तीतें प्रार्थिती ॥ प्रेमाचि जोती उदया आली ॥७॥ ऐकें जी दीनोद्धरणा ॥ मायबापा कृपागहना ॥ तोडूनि माझी देहभावना ॥ आनंदघनामाजि बुडविलें ॥ ८ ॥ माझें कर्म क्रिया करणें ॥ तूंचि झालासि चिदेकघन ॥ आतां म्यां कर्म करावें कोण ॥ माझें मीपण बुडविलें तुवां ॥ ९ ॥ मी जें जें पाहों बैसे दृष्टी ॥ तें तें तूंचि होऊनियां उठी ॥ वाचा बोले जे जे गोष्टी॥ शब्दपरिपांटी तूंचि तूं ॥ १० ॥ शब्दाच्या आदिअंतीं ॥ शब्द शब्दार्थ भारती[4] ॥ अवघा तूंचि गा आनंदमूर्ति॥ ऐसी व्यक्ति मजलागीं ॥ ११ ॥ श्रवणें जें कीं ऐकोंजाय ॥ तंव ऐकतें ऐकणें तूंचि आहे ॥ ऐकण्याआद्यंतीं तूंचि

१ जन्ममरण. २ प्रकटली. ३ रचना, रीत. ४ वाचा.

पाहे ॥ व्यक्ती नये अन्य कांहीं ॥ १२ ॥ चरणें करितां गमनक्रिया ॥ तंव करविता तूंचि गुरुराया ॥ हस्तें देणें घेणें तूंचि यया ॥ चाळक स्वामिया तुजचि देखें॥१३॥ किंबहुना सर्व क्रियाजात ॥ क्रियाजाती तुजचि देखत॥ तें देखणें देखतें निश्चित ॥ तुजव्यतिरिक्त असेचिना ॥ १४ ॥ अहो सद्गुरुचा नेणोनि महिमा ॥ ह्मणऊन वरपंडे झालेति भ्रमा ॥ महिमा जाणतांचि उपरमा ॥ संशयगरिमा जातअसे ॥ १५ ॥ ऐसा तूंचि तूं सर्वांपरी॥ मजमाजी बाह्याभ्यंतरीं ॥ नांदसी तुरउनी उरी ॥ काय करी मी कर्माक्रिया॥ १६ ॥ सर्वही करणें नकरणें ॥ तूंचि होउनी चाळिसी करणें ॥ ऐसें केलें मजलागीं येणें ॥ तुरेचि मीपण तुझ्याठाईं ॥ १७ ॥ एवं कांहीं सेवाही नकरितां ॥ चरणदर्शन मात्रचि होतां ॥ कांहीं नकेलें तत्वतां ॥ स्वयें पुरुषार्थी मेळविलें ॥ १८ ॥ पुरुषाचा पुरुषार्थ हाची॥निःशेष निवृत्ति होय दुःखाची ॥ आणि प्राप्ती निरतिशय सुखाची ॥ व्यक्ती हेचि पुरुषार्थी ॥ १९ ॥ सर्व दुःखरूप संसार ॥ ज्यामाजी जन्ममरण दुर्निवार ॥ त्याची निवृत्ती सविस्तर ॥ तोचि निर्धार दुःखनिवृत्तीचा॥ ॥ २० ॥ अज्ञानपूर्वक भवशांती ॥ तेंचि दुःखाचि निःशेष निवृत्ती ॥ सुखामाजी सुखउन्नती ॥ होय प्राप्ती ब्रह्मानंद ॥ ॥ २१ ॥ सर्व आनंदाचें आकारस्थान ॥ तेंचि ब्रह्मानंदसुख जाण ॥ होतांचि सद्गुरूचें दर्शन ॥ प्राप्त आपणा नसाश्रितांही ॥ २२ ॥ नाहो हें तंव नघडे सर्वथा ॥ सद्गुरूचें दर्शन होतां ॥ दुःखनिवृत्ती सुखप्राप्तता ॥ होय हे कथा अघटमान ॥२३॥ जंव चिदचिद्ग्रंथी नाहीं सुटला ॥ संशयराशी नाहिं छेदिला ॥ कर्माकर्मक्षय ना-

१ सांपडले, स्वाधीनझाले. २ लया. ३ निवारणकरण्यास अशक्य. ४ अशक्य.

हीं झाला ॥ ब्रह्मानंद त्याला कैंचा लाभे ॥ २४ ॥ जंव चिदचिद्ग्रंथी हा असे ॥ तंव संशय असंभावना दिसे॥ जंव कर्माकर्म न नासे ॥ तंववरी नसे दुःखनिवृत्ती ॥२५॥ दुःखाची नाहीं जंव निवृत्ती ॥ तंव कैंची होय सुखाची प्राप्ती ॥ ययालागीं हें सर्वार्थीं ॥ कदां कल्पांतीं घडेना कीं ॥ २६ ॥ एवं हें सद्गुरुचेनि दर्शनें ॥ घडे हा विस्मय मानिजे मनें ॥ तरी ऐका सांगेन तुह्माकारणें ॥ वर्म जेणें बुझाल ॥ २७ ॥ तुह्मीं सद्गुरूचा नेणा महिमा ॥ ह्मणऊनि वरपडे झालेति भ्रमा॥महिमा जाणतांचि उपरमा ॥ संशयगरिमा जातसे ॥ २८॥ तरी यदर्थीं श्रुति असे प्रमाण॥ येथेंचि विप्रतिपत्ती नाहिं जाण॥ तेंचि ऐका श्रुतिवचन॥ जेणें समाधान पावाल ॥ २९॥ एक सद्गुरुदर्शनमात्रेंचि ॥ शांति हृदयग्रंथ्यादि त्रयाची ॥ तेचि ऐका श्रुति निर्वाणीचि ॥ जे उपनिषदांची विधात्री पैं ॥ ३० ॥ ते श्रुति ऐकतांचि क्षणीं ॥ संशयमात्राची होय धुंणी ॥ ते श्रुति परिसोनि श्रवणीं ॥ मनन मनीं करावें ॥ ३१ ॥ तेचि श्रुती आतां सांगेन ॥ ऐका एकाग्र करूनियां मन॥ जेणें सर्व संशय नासोन ॥ समाधान ब्रह्मानंदें ॥ ३२ ॥ श्रुति ॥ भिद्यतेहृदयग्रंथिश्छिद्यतेसर्वसंशयः ॥ क्षीयंतेचास्यकर्माणितस्मिन्दृष्टेपरावरे॥१ ॥ ॥टीका॥ हृदय शब्दें अंतःकरण ॥ तेंचि अचित्त जड मळीन ॥ त्याच्याठाईं आभासलें चैतन्य ॥ जें कीं ज्ञान स्वप्रकाश ॥ ३३ ॥ जयातें प्रमाता हें अभिधान॥ जें अहंप्रत्यय प्रत्यक्ष जाण॥ तें अंतःकरणेसी येकपण ॥ पावतां संपूर्ण ग्रंथी दोघां ॥ ३४ ॥ तया परस्परानुध्यासें ॥ चित्तातें जडपण आत्मत्वीं दिसे ॥

१ समजाल. २ मतभेद. ३ नाश. ४ जुनाट.

यो.वा.

॥ २ ॥

आत्मप्रकाश चित्तीं आभासे ॥ एवं ग्रंथी बैसे जडाजडीं ॥ ३५ ॥ मन तेंचि मी ऐसा अध्यास ॥ आत्मयासीं
झाला असे सोस ॥ तेणें देहादि हा सर्वाभास ॥ संसारपाश पडे जेणें ॥ ३६ ॥ जोंवरीं चित्तीं अध्यास मीप-
णाचा ॥ तंववरी आत्मयासीं संसारबंध साचा ॥ मग कल्पमात्रें त्याचा ॥ मोक्ष कैसा होईल ॥ ३७ ॥ तेंचि
सद्गुरूचें दर्शन होतां ॥ आत्मानात्मविवेक करी चित्ता ॥ ह्मणे मी आत्मा अकर्ता अभोक्ता ॥ भिन्न चित्ता द्रष्टे
पणेसीं ॥ ३८ ॥ मन आणि दृश्य मजहूनि भिन्न ॥ मी आत्मा तयाचा साक्षि पूर्ण ॥ ऐसें जाणतांचि होय द-
हन ॥ सर्वेचि जाण चिदचिद्ग्रंथी ॥ ३९ ॥ आपणासीं साक्षित्व असतां ॥ अनर्थपरंपरा होतसे वृथा ॥ स्वप्नीं-
हि नाइके संसारकथा ॥ दर्शन होतां सद्गुरूचें ॥ ४० ॥ तैसेंचि असंभावनादि संशयजाळ ॥ जें कीं पडळ
होतें महाप्रबळ ॥ आत्मसाक्षात्कारीं सबळ ॥ अतिमळ विघ्नरूप ॥ ४१ ॥ साधनचतुष्टयाची संपत्ती ॥ झा-
ल्याहि न्व्हे आत्मप्रतीति ॥ नाना संशय तेथें उठती ॥ जे कीं देती योनि नाना ॥ ४२ ॥ ते संशय कोणको-
ण ॥ हें तुजप्रति सांगेन ॥ करूनियां सावधान मन ॥ देऊनि अवधान आयकीजे ॥४३॥ हा आत्मास्थूळ देह
असे ॥ किंवा सूक्ष्मदेहीं वसे ॥ किंवा त्याहूनि वेगळा असे ॥ किंवा सूक्ष्मांशें वर्ततो ॥ ४४ ॥ किंवा मध्य-
मपरिमाण ॥ ईशईश्वराहूनिआन ॥ जडरूप अथवा ज्ञान ॥ चिदचिद्रूपअभिधान ह्मणावेंकीं ॥ ४५ ॥ प्रपंच
सत्य मिथ्यापणें ॥ कर्में अथवा ज्ञान मोक्षसाधन ॥ असे संशय स्वबुद्धीजन ॥ बहुविध व्यसन करिति ॥
॥ ४६ ॥ बहुविध शास्त्राभ्यास करितां ॥ वित्पन्न झाले ताता ॥ बहिर्मुखास अनुभव सर्वथा॥जाण निश्चित य

सार.

प्र०

॥ ९ ॥

॥ २ ॥

यापरी ॥ ४७ ॥ तेचि श्रीगुरुचरणदर्शनें ॥ महावाक्यादि श्रवण मननें ॥ संशय छेदीजेति प्रमाणें ॥ अपरोक्ष-पणें आत्मानंदें ॥ ४८ ॥ तेसेंचि कर्माकर्म पूर्व संस्कार ॥ आहेति तों नव्हे आत्मसाक्षात्कार॥बुद्धीहि नव्हे आत्माकार ॥ शुद्ध विचार तोही नुपजे ॥ ४९ ॥ संचित प्रारब्ध क्रियमाण ॥ ऐसें हें त्रिविध कर्म जाण ॥ याचा क्षय नव्हतां संपूर्ण ॥ नव्हे दर्शन आत्मयाचें ॥ ५० ॥ पूर्विल्या कर्मासीं माझें ह्मणे ॥ त्याचें फळ मज असे भोगणें ॥ क्रियमाण करी अहंकर्तेपणें ॥ हेचि नागवण आत्मप्राप्ती ॥ ५१ ॥ तेचि सद्गुरूचेनि दर्शनें ॥ संचितें माझीं नव्हे ह्मणे ॥ तीं भस्म होती वेगळेपणें ॥ ब्रह्मखुणे स्वये असतां ॥ ५२ ॥ माझी ऐसी हे वासना ॥ लिंगदेहीं होती जाणा ॥ तंव त्याचेनि फळभोग दारुण ॥ पावे यातना संसारीं किं ॥ ५३ ॥ तें वासनारूप लिंग-शरीर ॥ सद्गुरुदर्शनें भस्मसार ॥ झालें तेव्हांचि कर्म निराहार ॥ झाला समग्र शुभाशुभाचा ॥ ५४ ॥ तैसीच आपुलिया प्रतीति ॥ क्रियमाण भिन्नत्वें देखती ॥ तेथें अहंकर्तेपणा नयेती ॥ ह्मणोनि नासती तेहि कर्में ॥५५॥ जेथींचा कर्ता आपण नव्हे ॥ तेथील फळ भोगूं कोण काय होय ॥ह्मणोनि क्रियमाणासिं वेगळा होय॥ प्रारब्ध पाहे देहावरीं ॥ ५६ ॥ पर जें कीं ब्रह्मादि सकळ ॥ तें अवर जयासीं केवळ ॥ तें परब्रह्म निर्मळ॥ देखिल्या सकळ इत्यादि लाभे ॥ ५७ ॥ देहाचा माथां प्रारब्धकर्म॥आपण अभोक्ता परब्रह्म॥ऐसा पावोनि उपशम॥स्वयें निस्सीम आत्मा झाला॥५८॥आणीक करितां उपायांतर॥कदापि नघडे अन्यप्रकार ॥ ब्रह्म देखिजे जें परावर॥तरीच

---

१ केलेलेंकर्म. २ शांति ३ साक्षात्.

संसारभस्म होय॥५९॥आणीक उपाय करितां सृष्टी॥जाती अनेक कल्पकोटि॥परी नतुटे संसारपाटी॥ब्रह्मेसि भेटी कदां नव्हे॥६०॥ सकळ उपायांचा शिरोमणि ॥ तो ब्रह्मसाक्षात्कार ये जनीं ॥ झालिया संसारश्रेणी ॥ भरवसेनी तुटोनि जाती ॥६१॥ तें ब्रह्मदर्शन होतांचि क्षणीं ॥ चिंदचिद्ग्रंथी जाय तुटोनि॥संशयराशी जाती निरसोनि॥क्षय निर्वाणीं कर्माकर्म॥६२॥ऐसा अर्थ बोलतसे श्रुती ॥ परी माझि येथें इतुकी युक्ति ॥नतुटतां चिदचिद्ग्रंथी ॥ ब्रह्मप्राप्ती कैसी होय ॥ ६३ ॥ असंभावनादि संशयजाळ ॥ छेदिलें नाहीं जंव सकळ ॥ तंव असंशय ब्रह्म निर्मळ ॥ नव्हे केवळ प्राप्त कदां ॥ ६४ ॥ तेसींच कर्माकर्में जंव असती॥ तंव तीं वासनारूप परिणमती॥ वासनाजाळ तेथें ब्रह्मप्राप्ती ॥ कदां कल्पांतिं घडेना कीं ॥ ६५ ॥ ह्मणोनि सद्गुरुचे दर्शनें ॥ घडती यया श्रवण मननें ॥ निदिध्यासनपरिपाकें होणें ॥ गुरुखुणें साक्षात्कार ॥ ६६ ॥ अहो सद्गुरुचेनि दर्शनें ॥ ग्रंथ्यादि त्र्याचें भस्म होणें ॥ मग ब्रह्मचि उरे ब्रह्मपणें ॥ तें स्वयें आपण अनुभवावें ॥ ६७ ॥ साक्षात्कारु तें आत्मदर्शन ॥ तेथें निःशेष झालें दृश्यनिरसन ॥ ब्रह्माकार वृत्ती स्थिरावोन ॥ समाधान नित्यानंदें ॥ ६८ ॥ ययाचें नांव आत्मदर्शन ॥ हें तंव गुरुदर्शना उपरी जाण ॥ तत्पूर्वीं नघडे हें संपूर्ण ॥ नाहीं छेदन चिदचिद्ग्रंथीचें ॥ ६९ ॥ आतां हेंही जरी तुह्मी नमाना ॥ ब्रह्मदर्शन जरी ह्मणा ॥ तरी तेंही मानलें माझिया मना॥ग्रंथ्यादि दहना पावती येणें ॥ ७० ॥ परी ब्रह्म तेंचि सद्गुरुनाथ ॥ येथें संशय धरी तो परमभ्रांत॥तया भ्रांताप्रती हे

१ जडचैतन्यपरस्पराध्यास. २ परिणाम पावतात. ३ परिणामानें.

मात ॥ गुह्य येकांत बोलोंचिनये ॥ ७१ ॥ ये अर्थीं श्रुतिप्रमाण ॥ सद्गुरु तोचि ब्रह्म पूर्ण ॥ स्वयें अनुभवही तैसाचि जाण ॥ श्रुतिवचन परिसिजे ॥ ७२॥श्लोक॥गुरुगीता ॥ यस्यदेवेपराभक्तिर्यथादेवोतथागुरो ॥ तस्यैते कथिताह्यर्थाःप्रकाश्यंतेमहात्मनः ॥ २ ॥ टीका ॥ भक्ति शब्दें परमप्रीति ॥ निरंतर अनुराग जो चित्तीं ॥हेचि मुख्य भक्तिची व्यक्ति ॥ इतर बोलती ते बाह्य सेवा ॥ ७३ ॥ ते भक्ती देवाच्याठाईं जैसी ॥ देव शब्दें ब्रह्मचि ऐसी ॥ व्याख्यान केलें निश्चयेसीं ॥ तेंचि मानसीं दृढ धरिजे ॥ ७४ ॥ तया ब्रह्माच्याठाईं जे भक्ती ॥ तैसी सद्गुरुच्याठाईं अनन्यगती ॥ गुरूनें उपदेशिलें तें प्रकाशती ॥ अर्थसंगती ब्रह्मान्वयें ॥ ७५ ॥ गुरूनें अनुगृहीत पुरुषांसीं ॥ प्रकाशती अर्थ ब्रह्मरूपेसीं ॥ तरी गुरुवेगळें ब्रह्म तयासि ॥ कोणे देशीं उरलें असे ॥ ७६ ॥ ब्रह्मातें इतर जड तो नप्रकाशी ॥ तें स्वसंवेद्य प्रकाश ऐसी ॥ वेद बोले वचनासीं ॥ तरी गुरूनें कैसा प्रकाश केला ॥ ७७ ॥ गुरुवेगळें तरी नप्रकाशे ॥ जड तें ब्रह्मातें प्रकाशि कैसें ॥ यालागीं ब्रह्म स्वसंवेद्य ऐसें ॥ होय सर्वांशें येणें बोलें ॥ ७८ ॥ सद्गुरु साक्षाद्ब्रह्ममूर्ति ॥ तरी स्वप्रकाश करी शिष्याप्रती ॥ सद्गुरु सेविल्या सर्वनिवृत्ती ॥ ब्रह्मप्राप्ती तेचि तया ॥ ७९ ॥ ह्मणोनि साक्षाद्ब्रह्ममूर्ति॥ सद्गुरु होय निश्चितार्थी ॥ येथेंही जे अन्य भाव धरिती ॥ नरका जाती कोटिकल्प ॥ ८० ॥ सद्गुरुसीं ऐक्य आपणेंसीं ॥ हेंचि बहुधा बोले हृषीकेशी ॥ आचार्यंमांविजानीयात् ऐसी ॥ संमति कैसी श्रीभागवतीं ॥ ८१ ॥संमति श्रीभागवत ॥ आ-

१ प्रीति. २ ज्ञानस्वरूप.

चार्यमांविजानीयान्नावमन्येतकर्हिचित् ॥ नमर्त्यबुध्यासेवेतसर्वदेवमयोगुरुः ॥ १ ॥ टीका ॥ सर्व देवमय गुरुची मूर्ति ॥ सर्व देव त्याचे उदरस्थितीं ॥ मी तोचि गुरु हें निश्चितीं ॥ स्वयें श्रीपती बोलिले ॥ ८२ ॥ आणीकही श्रीभागवतीं आपण ॥ भगवंत बोलिले स्वमुखेंकरून॥श्रीगुरू तोचि मी आपण॥ नाहीं भिन्न सर्वथा॥८३॥ संसारताप शमवावयालागीं ॥ परमामृत भोगिजे अंतरंगीं ॥ ते तिनी गुरू तयालागीं ॥ श्लोक प्रसंगीं सांगेन॥ ॥ ८४॥ संमत दशमस्कंधीं भागवत ॥ सर्वैतत्कर्मणांसाक्षात्द्विजातेरिहसंभवः ॥ अद्योऽगयत्राश्रमिणायथाहंज्ञानदोगुरुः ॥ २ ॥ टीका ॥ यया संसाराच्याठाईं ॥ जन्ममात्र ज्यापासाव पाहीं ॥ तो आदि गुरु पिता देहीं॥ पूज्य पाहिं गुरुत्वें ॥ ८५ ॥ तैसेंचि द्विजपण जेणें आलें ॥ सत्कर्माचें जन्म जेथें झालें ॥ उपनयन अध्ययन करविलें ॥ गुरुत्व बोलिलें तयासीं ॥ ८६ ॥ तो साक्षात् जाणा ईश्वर ॥ प्रथमापरीस पूज्य थोर ॥ आतां ब्रह्मपद पूज्यतर ॥ महाथोर थोराहुनी॥८७॥सर्वही जे आश्रमवंत॥ब्रह्मचर्यादि संन्यासांत ॥ त्यांसीं ज्ञानदाता मी साक्षात् ॥ सदोदित परब्रह्म॥८८॥ तो पूज्याहुनी पूज्यतर॥साक्षात्परब्रह्म निर्विकार ॥ जयाच्या कृपाकटाक्षें संसार॥ भस्मसार होऊनि जाय॥८९॥जे कीं ज्ञानप्रदा गुरूतें॥उपासुनी येकाग्रचित्तें॥संसार तरति बुद्धिमंत ते॥तेचि श्लोकार्थं परियेसा॥ ९० ॥संमतिदशम ॥ नन्वर्थकोविदोब्रह्मन्वर्णाश्रमवतामिह ॥ येमयागुरुणावाचातरंत्यंजोभवार्णवं ॥ ३ ॥ टीका ॥ अगा यया जन्माच्याठाईं ॥ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्रही ॥ तैसेचि चारी आश्रम

१ ज्ञानदाता.

पाहीं ॥ त्यामध्यें तोही अर्थकोविंद ॥ ९१ ॥ अर्थ ह्मणिजे आपुलें प्रयोजन ॥ तें साध्य मुख्य ब्रह्मस्वस्वरूप संपूर्ण ॥ तेंचि साधावें गा निर्वाण ॥ आणिक कारण कोण पुरुषा ॥ ९२ ॥ तेथें कोविद ह्मणिजे अत्यंत कुशळ॥ तत्सुखें साधनीं अतितळमळ ॥ नावडति विषय अमंगळ ॥ प्रवर्ते केवळ आत्मसुखें ॥ ९३ ॥ यदर्थींहि भगवद्व-चन ॥ श्रीभागवतीं असे प्रमाण ॥ तेंचि ऐकिजे कुशळपण ॥ करी वर्णन बुद्धिमंताचें॥ ९४॥संमतिश्लोक ॥ एषाबुद्धिमतांबुद्धिर्मनीषाचमनीषिणां ॥ यत्सत्यमनृतेनेहमर्त्येनाप्नोतिमामृतं॥४॥टीका ॥ असत्य मर्त्य² जें शरीर ॥ क्षणभंगुर अतिनश्वर ॥ तेणें करोनि पावे जो सर्वसार ॥ निर्विकार मत्स्वरूप॥९५॥मोक्षरूप जें कीं अमृत ॥ सत्य चिद्घन मीचि निश्चित ॥ त्या मातें जो येणें पावत ॥ बुद्धिमंत तोचि जाणा ॥ ९६ ॥ सकळ बुद्धिमंतामाझारीं॥ बुद्धिमंत तोचि अवधारीं ॥ कुशळामाजी कुशळ भारी ॥ अतिचतुरीं चतुरपणें ॥ ९७ ॥ ह्मणऊनि तेंचि निश्चयेसीं जाण॥या मनुष्यामध्यें कुशळपण ॥ त्याहीमाजि उत्तम वर्ण ॥ आश्रम धन्य भाग्यें पावला ॥९८॥इतुकी साम-ग्री भाग्येंकरुनी ॥ लाधली तो भाग्याचा धनी ॥ आत्मसुख साधि तो भरवसेनी ॥ धन्य जननी तयाची॥९९॥ त्यामाजी जप तपादि जे करीति ॥ ते कुशळ परी तैसे नव्हती ॥ जे सद्गुरूतें शरण जाती ॥ अनन्यगति ते अति कुशळ ॥१००॥ तो सद्गुरुरूपें मीचि जाण ॥ जन्म जन्मांतरीं नाना भजन ॥ करूनि केलें मज समर्पण ॥ तेणें मी पूर्ण आभारलों ॥ १॥ तया आभारलियासाठीं ॥ मी सद्गुरुरूपें प्रगटे सृष्टीं ॥ मग भाग्यें होय मजसीं भेटी ॥

१ अर्थजाणणारा. २ नाशिवंत.

सांगो गोष्ठी महावाक्याच्या ॥ २ ॥ ते माझी गोष्टि ऐकोनि कानीं ॥ मग मद्रूपेंचि वर्तती जनीं ॥ उपदे-
शमात्रें भरवसेनी ॥ संसारश्रेणी भस्म करिती ॥ ३ ॥ ते आत्मसुखेंचि करूनियां जाण ॥ भवार्णव तरती सं-
पूर्ण ॥ पुन्हां नदेखती संसारदैन्य ॥ सद्गुरूचरण सेवितांची ॥ ४ ॥ यालागीं ज्ञानप्रदाता सद्गुरूहुनी॥ अधिक
नाहीं सेव्य कोणी ॥ संसारदैन्य ज्याचे दर्शनीं ॥ जनीं स्वप्नीं नदिसे ॥ ५ ॥ ह्मणोनि पूर्वद्वयापरिस ॥ ज्ञान-
दाता सेव्य सावकाश ॥ तो मीच देही तुह्मास ॥ सांगें सुदाम्यास श्रीस्वयें हरी ॥ ६ ॥ ज्ञानप्रदाहूनि दुसरा॥
नाहींच यया संसारा ॥ आणि तद्भजनापरिस दुसरा ॥ धर्म साचोकारा असेचिना ॥ ७ ॥ गुरुवचनाहूनि आणि
क धर्म ॥ थोर नाहीं गा येणेंसि सम ॥ महाधर्मांचें हें निजधाम ॥ तेंचि परम गुरुभजन ॥ ८ ॥ सद्गुरूभजनाचि
सरी ॥ नाना धर्म नपवति निमिष्यभरी ॥ ह्मणोनियां निजमुखें श्रीहरी ॥ बोले थोरी गुरुसेवेची ॥ ९ ॥ चारी
आश्रम अवलंबितां ॥ तथें उचितही सर्व धर्म करितां ॥ मी सुखी नव्हे पैं तत्वतां ॥ सद्गुरू सेवितां जैसा होय
॥ ११० ॥ तेचि श्लोकाचिये संगती ॥ स्वमुखें बोलिले श्रीपती ॥ तें ऐकावें येकाग्रमती ॥ श्रोतीं आर्तें करूनियां
॥ ११ ॥ संमतीश्लोक ॥ नाहमिज्याप्रजातिभ्यांतपसोपशमेनवा ॥ तुष्येयंसर्वभूतात्मागुरुशुश्रूषयायथा ॥ ५ ॥
॥ टीका ॥ ईज्या शब्दें यज्ञादिकर्मैं ॥ जियेठाईं वर्तती स्वधर्में ॥ तो गृहस्थाश्रम अतिनियमें ॥ चालवितां संभ्र
में नतोषें मी ॥ १२ ॥ तैसेंचि प्रजाति ह्मणिजे उत्कृष्ट जन्म ॥ जे ब्रह्मचर्याख्य अतिधर्म ॥ चालवितांही मीपरम

१ ज्ञानदाता. २ उत्कंठेनें.

॥५॥

नपवे काम आनंदाचा ॥१३॥ तैसेंचि तपादि नाना क्लेश ॥ वानप्रस्थादि अतिअसोस ॥ ते आचरतांही मी परेश ॥ नपवे संतोष सर्वदां ॥ १४ ॥ उपशम शब्दें सन्यासपण ॥ उपशमादि मुख्यत्वें धर्म जाण ॥ ते आचरतांही दारुण ॥ संतोष पूर्ण मज नव्हे ॥ १५ ॥ सर्व भूतांचा आत्मा जरी मी ॥ तरी संतोष नपवे आश्रमधर्मीं ॥ तो सद्गुरुसेवेनें करूनि सुखोत्तमीं ॥ पहुडे संभ्रमीं परमानंदें ॥ १६ ॥ यालागीं गुरुभजनापरता ॥ धर्म नाहीं जाण सर्वथा ॥ ऐसें बोलिला जगत्पिता ॥ ह्मणोनि तत्वतां सद्गुरुचि ब्रह्म ॥ १७ ॥ परी अभाग्य जन जे असती ॥ ते मनुष्याकारें मनुष्य मानिती ॥ व्यक्तीसाठीं परमार्थ हरविती ॥ अढळ भ्रांती दृढ झाली॥१८॥ अहो भ्रमेंकरूनियां मनुष्याकार ॥ जरी दिसतसे साकार ॥ तरी तें ब्रह्म निर्विकार ॥ नाहीं विचार अन्य येथें ॥ १९ ॥ जैसी जळाची जळगार ॥ गोठोनि झाली जरी साकार ॥ तरी साकारत्वें असे नीर ॥ नाहीं विचार अन्य कांहीं ॥१२०॥ जरी ते विराली न विराली॥ तरी ते जळरूपेंचि स्थिरावली ॥ तैसी सद्गुरुमूर्ति साकारली ॥ ते ब्रह्मावेगळी कैसी बोलिजे ॥ २१ ॥ नाना सुवर्णाचें पेंडकें केलें ॥ तरी पाषाणपणा नाहीं आलें तैसें सद्गुरुरूप साकारलें ॥ नये बोलें मनुष्यपणा ॥ २२ ॥ नाना शर्करेचा पुरुष केला ॥ नाना अवयवीं विस्तारला ॥ तरी तो काय साखरपणा टाकूनि गेला ॥ असे संचला शर्करारूपें ॥ २३ ॥ तेथें नाम रूपाचीच मिरवणी ॥ नाहीं अन्य शर्करेवांचुनी ॥ तैसा सद्गुरु निर्वाणीं ॥ सगुणपणेंही शोभतो ॥ २४ ॥ आणि ज-

१ आरोहण करी. २ पाणी.

गचि ब्रह्म असे जेथें ॥ तेथें सद्गुरु नव्हे काय निमित्य ॥ यालागीं गुरुचि ब्रह्म सदोदित ॥ लोक भ्रांत ते न मानिती ॥ २५ ॥ असो जनाची जनमती ॥ मजलागीं सद्गुरुची ब्रह्ममूर्ति ॥ जे तद्वाक्यें बोधिले असती ॥ तेचि देखती ब्रह्मत्वें गुरू ॥ २६ ॥ जयांसीं बोध नाहीं झाला ॥ स्वयें ब्रह्मभाव नाहीं बाणला ॥ ते काय जाणती सद्गुरूला ॥ नाहीं मोडला भ्रांतिफांसा ॥ २७ ॥ असो त्याचें काय बोलावें ॥ सद्गुरु परब्रह्मचि स्वभावें ॥ अंधासीं सूर्य सूर्यत्वें नभावे ॥ तरी काय नव्हे सूर्य जनासिया ॥ २८ ॥ नेणोनि परिसासी पाषाण मानी ॥ तो टाकूनि देती उपेक्षूनि ॥ तरी तो काय परिसपणापासुनी ॥ जाय उठोनि देशांतरा ॥ २९ ॥ तैसा गुरु ब्रह्मत्वें नमानिती ॥ तरी ब्रह्मीं ब्रह्मत्वें ते व्यक्ती ॥ अन्य भावना नाहीं सर्वार्थीं ॥ दिव्य लोकांतीं देईन मी ॥ १३० ॥ माझें दिव्य सद्गुरुचरण ॥ त्याचें केलें म्या स्पर्शन ॥ तेंचि दिव्याचें दिव्य संपूर्ण ॥ नाहीं अन्य सर्वथा ॥ ३१ ॥ यालागीं साक्षाद्ब्रह्ममूर्ति ॥ सद्गुरु होय निश्चितार्थीं ॥ त्याचे दर्शनमात्रेंचि नासती ॥ चिदचिद्ग्रंथी संशयकर्में ॥ ३२ ॥ इतुकियालागीं निरूपण ॥ साधूनि सद्गुरुसीं ब्रह्मपण ॥ सर्व लाभे तद्दर्शनेंकरून ॥ श्रुत्यर्थ पूर्ण ठाईं ठेविले ॥ ३३ ॥ ऐसें सद्गुरुसीं प्रार्थून ॥ साष्टांग घातलें लोटांगण ॥ तंव कोणी करिती आक्षेपणं[1] ॥ तें निर्वचनं[2] परिसा ॥ ३४ ॥ नाहीं मंगलाचरण निमित्त ॥ सद्गुरुसीं वंदितां येकचित्त ॥ ग्रंथविस्तार बहुत ॥ केला निमित्त बहुप्रकारें ॥ ३५ ॥ तरी हा तंव नव्हे ग्रंथविस्तार ॥ हेंचि

१ शंका. २ भाषण.

ग्रंथाचें ग्रंथसार ॥ बोलिजे सद्गुरुचें ऐश्वर्य फार ॥ होंचि थोर थोराहुनी ॥ ३६ ॥ म्यां तंव करूनियां ग्रंथमि-
ष ॥ गुरुमहिमा बोलें सावकाश ॥ गुरूचें ऐश्वर्य निर्दोष॥अतीअसोस मी बोलें॥३७॥तेंचि ग्रंथाचे मिषेंकरूनि॥
गुरूचें ऐश्वर्यचि वाखाणी ॥ काय करी पुढें जाउनी॥मजलागुनी सर्वत्र तेंची ॥ ३८॥ बुद्बुद जरी ठायीं स्थिराव-
ला ॥ अथवा वेगें पुढां गेला ॥ तरी तो नव्हे जळावेगळा ॥ नपडे निराळा जळेविण ॥ ३९ ॥ मंगळाचरण आ-
णि ग्रंथार्थ ॥ अवघा सद्गुरूचा ऐश्वर्यार्थ ॥ सर्वत्र येकचि परमार्थ ॥ दुजी मात असेचिना ॥१४० ॥ येक निर्वि-
कल्प समाधी ॥ जे कीं निरीहें स्थिती निरवधी ॥ तेथेंचि राहावें परमानंदीं ॥ तेंचि अवधी परमसुखाची ॥
॥ ४१ ॥ तैसें नकरितां समाधान ॥ करावें सद्गुरूचें वर्णन ॥ वाखाणावें ऐश्वर्य पूर्ण ॥ तेंचिसमाधान निर्विकल्प॥
॥ ४२ ॥ निर्विकल्पीं जो आनंदप्राप्ती ॥ तेचि सद्गुरुवर्णनीं वर्ते स्थिती ॥ त्या ह्मनि येथें सुखोपायगती ॥ प्रयास न-
लागती हटयोगाचे ॥ ४३ ॥ नाहो योगाचेनि बळेंकरून ॥ करावें निर्विकल्प समाधान॥ निरोधुनी इंद्रियादि
मन ॥ स्वरूपस्थ पूर्ण करावें॥४४॥हें सर्व नकरितां आटाआटी॥मनोवृत्ती होतसे उफराटी ॥सद्गुरुदर्शनेंची सुख
कोटी ॥ वर्णनीं भेटी परमानंदाची॥४५॥सद्गुरूचें ऐश्वर्य वर्णितां॥ लाभे आपुली निजात्मता॥नलगे त्यजणें इं-
द्रियार्था ॥ इंद्रियें सर्वथा कोंडणें नलगे ॥ ४६ ॥ अहो सर्वत्र असे जें सर्वत्रपणें॥ त्यालागीं कासया समाधी क-
रणें ॥ उघडया नेत्रींच भोगणें ॥ नलगे घालणें आसनादिक ॥ ४७ ॥ जे सर्वत्र स्वरूप नदेखती ॥ जे स्वयें ब्रह्म

१ मोव्याउत्कंठेनें. २ बुडबुडे. ३ आशारहित.

झाले नसती ॥ साधकपणें आपणा देखती ॥ तयांसिं प्राप्ती समाधिसाधनें ॥ ४८ ॥ अथवा सर्वत्र जेहीं ब्रह्म देखिलें ॥ स्वयें ब्रह्म असती झाले ॥ परी दुःखदर्शनासीं भ्याले ॥ ह्मणोनि निराळे निर्विकल्पें ॥ ४९ ॥ येऱ्हवीं सर्वत्र जे ब्रह्म देखती ॥ स्वयेंही ब्रह्म झाले असती ॥ ते सविकल्पें निर्विकल्पें राहाती ॥ किंचित् अर्थी नव्हति न्यून ॥ १५० ॥ ब्रह्मचि स्वयें झाले आपण ॥ तेथें ब्रह्माहुनी अधिक कोण ॥ ब्रह्म ब्रह्मेसि तरी नव्हे न्यून ॥ तें परिपूर्ण सर्वावस्थां ॥ ५१ ॥ यालागीं जे जे अवस्थे राहिजे ॥ तेथें तेथें ब्रह्मत्वेंचि असिजे ॥ तेथें न्यूनाधिक्य काय बोलिजे ॥ ब्रह्मचि सहजें नित्यरूप ॥ ५२ ॥ यालागीं तो निर्विकल्प असो ॥ अथवा सत्कर्माचरणें वसो ॥ सविकल्पें अथवा उगाचि बैसो ॥ परी गुरुभजनीं बैसो बुद्धि त्याची ॥ ५३ ॥ तरी हाचि हा सर्वत्र आपण ॥ करणीं नकरणीं नव्हे न्यून ॥ ह्मणोनि मुख्य समाधि गुरुभजन ॥ तेंचि आपण सर्वदां करी ॥ ५४ ॥ यालागीं हें मंगळाचरण ॥ आणि ग्रंथाचें या निरूपण ॥ दोन्ही ब्रह्मत्वें समाधान ॥ नव्हे न्यून समाधीसिं ॥५५॥ यालागीं विस्तार ह्मणोनये येथें ॥ याचें साहित्यहा सर्वग्रंथ ॥ येणें सद्गुरुऐश्वर्य बोलिजेत ॥ ब्रह्म सदोदित ग्रंथ हा ॥ ॥५६॥ ऐसें करूनियां गुरुस्तवन ॥ तेंचि ब्रह्मरूपें मंगळाचरण ॥ करूनि करी ग्रंथनिर्माण ॥ श्रोतीं सावधान परिसिजे॥५७॥ आतां ऐका ग्रंथव्याख्यान ॥ मागें संपलें आत्मनिरूपण ॥ जें गोडाहुनी गोड प्रकरण ॥ तेथें आत्मनिरूपण इतुकें केलें ॥५८॥ वास्तव आत्मस्वरूप जाणोन ॥ तद्रूपें राहावें स्थितीकरून॥ सर्वत्र बाणे चिदानंदघन ॥ परिपूर्ण पूर्णानंदें ॥ ५९ ॥ ऐसी सर्वत्र स्थिती बाणलिया॥जीवन्मुक्ती साधका तया ॥मग जीवन्मुक्ती होऊनि

यां ॥ स्वेच्छेकरूनियां वर्ततसे ॥ १६० ॥ तेचि जीवन्मुक्तिची स्थिती कैसी ॥ तेचि जीवन्मुक्तो लक्षणेसीं ॥ वसिष्ठ सांगती रघुनाथासीं ॥ तेचि श्रोतयांसीं सांगेन मी ॥ ६१ ॥ ते महाराष्ट्र भाषेंकरून ॥ यथामति कीजेल व्याख्यान॥तें श्रोतीं परिसिजे सावधान ॥ करूनियां मन येकाग्र ॥ ६२ ॥ तरी आत्मबोध बाणल्या दृढ ॥ तोचि जीवन्मुक्त अतिरूढ ॥ त्या जीवन्मुक्ताचें लक्षण प्रौढ ॥ अतिरूढ वसिष्ठ बोले ॥ ६३ ॥ यामाजी श्लोकद्वयेंकरून ॥ बोले श्रीवसिष्ठ बोधलक्षण ॥ आत्मबोध तो किंलक्षण ॥ तेंचि निरूपण परिसीजे ॥ ६४ ॥ मग तया जीवन्मुक्ताचें लक्षण ॥ तेंहि कीजेल निरूपण॥श्रोतीं परिसीजे सावधान॥ परिसतां पूर्ण बाणे मुक्ती ॥ ६५ ॥ श्लोक ॥ तत्वावबोधएवैकःसर्वाशातृणपावकः ॥ प्रोक्तःसमाधिशब्देननतुतूष्णीमवस्थितिः ॥१॥टीका ॥ तरी तत्वावबोधचि येक ॥ सर्वही आशा तृष्णाचा पावक[१] ॥ समाधि शब्दें तोचि सम्यक ॥ असम्यक तूष्णींपणें[२] ॥६६॥ आतां तत्व तें काय ह्मणिजे ॥ बोध तो कासया बोलिजे ॥ तेंही सांगों तुज सहजे ॥ श्लोकव्याजें परियेसा ॥ ॥६७॥ अनारोपित रूप तत्व ऐसें ॥ वेदांत सिद्धांत केला असे ॥ तेंही रघुनाथा परियसें ॥ सावकाशें सांगेन॥ ॥ ६८ ॥ तरी जें जें कांहीं दृश्यजात ॥ देहेंद्रियादि समस्त ॥ श्रुत दृष्ट जें मनोजृंभित[३] ॥ स्थूळ सूक्ष्मांत विश्वनामें॥ ॥ ६९ ॥ तें सकळही ब्रह्मीं आरोपित ॥ ऐसें जाण रामा सुनिश्चित ॥ आरोपित शब्दाचा अर्थ ॥ तुज यथार्थ सांगीतला ॥ १७० ॥ अधिष्ठानवस्तु साच असे ॥ तयाच्या अज्ञानें जें अन्य भासे ॥ तें आरोपित जाण विश्वभासें॥

१ अग्नि. २ शांतपणानें. ३ विकटलेलें.

रघुवंशें घेइजे ॥ ७१ ॥ जैंसे शुक्ति नेणोनि रजत ॥ रज्जु नेणोनि सर्प भासत ॥ ते ते पदार्थ आरोपित ॥ जाण निश्चित वस्तुच्याठायीं ॥ ७२ ॥ तैंसें ब्रह्माच्याठायीं जगज्जाळ ॥ आरोपित हें असे सकळ ॥ ब्रह्म अनारोपित निर्मळ ॥ अतिनिष्कळ स्वतःसिद्ध ॥ ७३ ॥ तया ब्रह्मासीं तत्व बोलिजे ॥ तयासींच अपरोक्ष जाणिजे ॥ तयातेंचि अवबोध ह्मणिजे ॥ ज्ञान सहजें तेंचि जाण ॥ ७४ ॥ येवंकारें येक बोधचि घेतला ॥ तोचि वन्हिरूपें असे बोलिला ॥ तो जाळि आशा तृष्णा सकळा ॥ प्रज्वळला प्रत्यक्वृत्ती ॥ ७५ ॥ आशा शब्दें वासनाजाळ ॥ तयाचे संस्कारही सकळ ॥ स्वरूपाआड जें जें समळ॥बोलिले सकळ सर्व शब्दें ॥ ७६ ॥ तत्वावबोध प्रज्वळलिया वन्ही ॥ सर्वही आशा तृणप्राय होउनी ॥ त्याही बोधें सर्व जाळुनी ॥ केलें निर्वाणीं स्वयंरूप ॥ ७७ ॥ बोध तोचि समाधि जाण ॥ यया बोला नाहीं आपण ॥ परि तूष्णिपणें राहोन ॥ समाधी भिरवणें येक करिती ॥ ॥ ७८ ॥ येकांतीं तुष्णीभूत बैसला ॥ आणि अंतरीं बोध नाहीं झाला ॥ तो वाउगाचि शीण केला ॥ नाहीं बाणला तत्वावबोध ॥ ७९ ॥ येक तत्वावबोधें असोनी ॥ विचरतांही जनीं वनीं॥ वेगळा देहादिकाहुनी ॥ न मिळे मिळणीं अहंकाराचे॥ १८०॥जनीं असोनियां जनपणें॥नाहींच जयासी जग होणें॥जगेसीं जयासिं ब्रह्महोणें ॥ तिये खुणे परिसपां ॥८१॥ श्लोक ॥ चिदाकारमिदंसर्वंजगदित्येवभावयन् ॥ यस्तिष्ठत्युपशांतात्मासब्रह्मकवचःसुखी ॥ २ ॥ टीका ॥ चित् शब्दें ब्रह्मपूर्ण ॥ तदाकार सर्वही जन ॥ देखोनि राहे शांतांतःकरण ॥

१ जाग्रति. २ अज्ञान. ३ स्तब्ध.

ब्रह्मकवच पूर्ण तोचि पुरुष ॥ ८२ ॥ ब्रह्माकार जग देखणें ॥ तें जाणिजे ऐसिये खुणें ॥ येणें समानाधिकरण ॥ येकत्वें ह्मणीं बोलाल ॥ ८३ ॥ तरी येकत्वीं समानाधिकरण असे ॥ येथेंही नाहीं अनारिसें ॥ तैसेंचि बोधिं ही देखिलें असे ॥ सिद्धांतमिसें वेदांतीं ॥८४॥ यःस्थाणुःसश्चोरएव ॥हे समानाधिकरणाची बरवे ॥ बाधुचि करी स्वयमेव ॥ परी ऐक्यभाव नबोले ॥ ८५ ॥ चोर स्थाणुसी ऐक्यवाद ॥ सर्वथा तंव नबोले वेद ॥ तेथें चोराचा करूनि बाध ॥ स्थाणुचि सिद्ध प्रतिपादी ॥ ८६ ॥ जैसें रज्जु सर्पाचेठायीं ॥ तैसी जाण रजतशुक्तिकाही॥ समानाधिकरणेंचि पाहीं ॥ इतर बाधूनाहीं स्थापिला ॥ ८७ ॥ तैसें ब्रह्माकार जग बोलतां ॥ जगाचा बाधूचि तत्वतां ॥ करूनि बोलिले सत्यता ॥ वास्तवता ब्रह्मासीं ॥ ८८ ॥ जरी जग ब्रह्मासिं ऐक्य बोलावें ॥ तरी हें सर्वथा नसंभवे ॥ जग जड नश्वर स्वभावें ॥ ऐक्य ह्मणावें ब्रह्मासि कैसें ॥ ८९ ॥ ऐसें येकेक प्रतिपादितां ॥ दोहींसि ही ऐक्य अंपाड तत्वतां ॥ यालागीं नघडे येकात्मता॥ बाधे पूर्णता वस्तुबोलें ॥ १९० ॥ तैसेंचि चिदाकाराचें व्याख्यान ॥ जगबाधें ब्रह्माचि परिपूर्ण ॥ विश्वचि ब्रह्म हे खुण ॥ सर्वत्र जाण जाणावी ॥ ॥ ९१ ॥ एवं व्याख्यानमथितार्थ हा ऐसा ॥ सर्व जग ब्रह्मरूपाचि ठसा ॥ देखे ह्मणोनि रघुवंशा ॥ शांति मानसा सहज आली ॥ ९२ ॥ सर्व जग आपणचि असे ॥ तेथें त्या शत्रु मित्र कोणा भासे ॥ आपणेवीण दुजें नदिसे ॥ ह्मणोनि असे शांतबुद्धी ॥ ९३ ॥ तोचि ब्रह्मकवच बोलिजे ॥ ब्रह्माचि कवच जयासीं साजे ॥ कवच

१ सारिखेंस्थान. २ शोभा. ३ अंतर.

दुजें नाहींच कीजे ॥ असे सहजें तेंचि तें कीं ॥९४॥ जो कीं ब्रह्मपणें सर्वदां असे ॥ आपणेवीण दुजें नदिसे ॥
तो सुखी हें बोलतां पिसें ॥ लागेल ऐसें दुजेपणें ॥ ९५ ॥ जो कीं सच्चिदानंद परिपूर्ण ॥ तोचि तो येकला ये-
क जाण ॥ तयासीं सुखी ऐसें प्रशंसन ॥ भिन्नपणें कोण करी ॥ ९६ ॥ ऐसा जीवन्मुक्त तो झाला ॥ तो कोणें
लक्षणीं पाहिजे लक्षिला ॥ देहीं लक्षण असे बोलिला ॥ वसिष्ठ भला ज्ञाता रावो ॥ ९७ ॥ तेंचि अष्टादश-
श्लोकेंकरून ॥ बोले जीवन्मुक्ताचें लक्षण ॥ त्याचेंहि कीजेल व्याख्यान ॥ श्रोतीं सावधान परिसिजे ॥ ९८ ॥
॥ श्लोक ॥ सर्वातीतपदालंबीपूर्णेंदुशिशिराशयः ॥ यस्तिष्ठतिसदायोगीसएवपरमेश्वरः ॥ ३ ॥ टीका ॥ तरी
सर्वातीत जे संत वस्तु ॥ तोचि अवलंबु जया निश्चितु ॥ पूर्ण चंद्राचिया परि संततु ॥ शीतळार्थु मनीचा ॥९९॥
आशय जयाचा शीतळ ॥ नेणे द्वैतबुद्धीतळमळ ॥ ब्रह्मपदींच सुनिश्चळ ॥ तोचि अढळ योगीश्वर ॥ २०० ॥
तोचि तो जाण नित्य मुक्त ॥ देहाकारें परमेश्वर सतत ॥ जयासीं विश्रांती सुनिश्चितं ॥ सदोदित परब्रह्म ॥१॥
तोचि तो जीवन्मुक्त जाण ॥ यया बोला नाहीं आन ॥ आणिक ऐकें तयाचें चिन्ह ॥ जो कीं पूर्ण ब्रह्मानंदें ॥२॥
॥ श्लोक ॥ ब्रह्मोपनिषदांतत्त्वंभावयन्योंतरात्मना ॥ नोद्वेगीनचहृष्टात्मासंसारेनावसीदाति ॥ ४ ॥ टीका ॥ अहो
अंतरात्मा जो शुद्धबुद्धी ॥ तेणें शोधोनियां उपनिषदाब्धी ॥ तत्प्रतिपाद्य जें ब्रह्म निरवधी ॥ तत्वावबोधीं बु-
द्धि नेहटी ॥ ३ ॥ जे कीं उपनिषदांतर्गत ॥ उपनिषदैकगम्य जें तथ्य ॥ तें परब्रह्म सदोदित ॥ तेथें बुद्धि

१ वेड. २ खरोखर. ३ अनंत. ४ लावी.

निश्चित सदां जयाची ॥ ४ ॥ स्वरूपानुसंधानीं सुनिश्चळ ॥ म्हणोनि नाहीं संसारीं तळमळ ॥ कर्म कर्तृत्वादिक मळ ॥ ते अकर्तृत्वें सकळ नस्पर्शती ॥ ५ ॥ तो बाह्यदृष्टी भोक्ता ऐसा दिसे ॥ परी तो अकर्तेपणें अभोक्ता असे ॥ कर्माकर्मे तया नस्पर्शे ॥ भोग पिसें तेथें कैंचें ॥ ६ ॥ कर्माकर्म दोषजनित सकळ ॥ जेहीं देइजेत असे संसारफळ॥तें पुण्य तरी अमंगळ ॥ भवफळ जेणें होय ॥ ७ ॥ ऐसें पुण्यापुण्यात्मक ॥ दोषरूप जें सकळिक॥ तेंही नस्पर्शे तया देख ॥ दृष्टांतश्लोक परियसा ॥ ८ ॥ श्लोक॥ यथापर्वतमादीप्तंनाश्रयंतिमृगाद्विजाः ॥ तद्वद्ब्रह्मविदोदोषानाश्रयंतिकदाचन ॥ ५ ॥ टीका ॥ जैसा पर्वतासीं सर्वत्र वन्ही ॥ लागलीया वडवाग्नी ॥ मृग पक्षी वनौकें[1] तत्क्षणीं ॥ पर्वत नयनीं नपाहती ॥ ९ ॥ तेक्षणीं आश्रितीं काय बोलावें ॥ दशदिशा पळती स्वभावें ॥ तैसें ब्रह्मविदासीं दोषी नस्पर्शवे ॥ स्पर्शतां स्वभावें भस्म होय ॥२१०॥ पर्वताऐसा अचळस्थिती ॥ तेथें ज्ञानाग्निज्वाळा तेजोमूर्ति ॥ देखोनि दोषवनौकें दिगंताप्रती[2] ॥ जाती भस्मांतीं लंघूनियां ॥ ११ ॥ कदाचित कोणे काळीं ॥ दोष नस्पर्शती त्याच्या कपाळीं ॥ ब्रह्मवित पर्वतज्ञानानळीं[3] ॥ प्रदीप्त ज्वाळीं प्रकाशतां ॥ ॥ १२ ॥ अहो अविद्यादोष नस्पर्शती ॥ तेथें विस्मय कोणगा रघुपती ॥ परोक्ष ज्ञानियांसिही नातळती ॥ तेथें हे स्थिती काय बोलावी ॥ १३ ॥ संमतिश्लोक ॥ परोक्षमपिवाज्ञानंशाब्दंदैशिकपूर्वकं ॥ बुद्धिपूर्वकृतंपापंकृत्स्नंदहतिवन्हिवत ॥ ६ ॥ टीका ॥ परोक्ष जें कीं शाब्दिक ज्ञान ॥ गुरुमुखें झालें ज्या संपूर्ण ॥ तेणें बुद्धि

---

१ वनचरें. २ दुसऱ्यादेशांत. ३ पर्वतरूपीज्ञानाग्नींत.

पूर्वक केल्या वृजिनं ॥ बाध त्यालागुन घडेना कीं ॥ १४ ॥ परोक्ष ज्ञानेंचि सर्वातीत ॥ अहं इंद्रियादिकां व्यतिरिक्त ॥ बाणल्या पापा असे जाळित ॥ ज्ञानसामर्थ्य ऐसें असे ॥ १५ ॥ कापुरातुळातें जयापरी ॥ अग्नि जाळुनी भस्मकरी ॥ तैसें परोक्षज्ञानें पाप संहारी ॥ रावणारी जाण तूं ॥ १६ ॥ तेथें अपरोक्ष जो कीं ज्ञानाग्नी ॥ तो ब्रह्मविदांचा दोषांलागुनी ॥ जाळि येथें कार्मुकपाणी ॥ विस्मय मनीं कोण धरी ॥ १७ ॥ जेव्हांचि अपरोक्ष ज्ञान उदय पावलें ॥ तेव्हांचि सकळ दोष त्याचे जळाले ॥ भावनाभ्रांतिभूत पळालें ॥ ज्ञानानळें दोहिलें होत्सातें ॥ १८ ॥ तंव श्रीराम ह्मणती श्रीगुरुमूर्ति ॥ ज्ञानीयाचाहिठाईं दोष भासती ॥ आणि काम क्रोधादिक दिसती ॥ ते कोण्या अर्थीं सांगा स्वामी ॥ १९ ॥ तेथें वसिष्ठ ह्मणती श्रीरघुनाथा॥ तेथें रागादि नाहींत गा सर्वथा ॥ परी लौकिकीं दाविती विपरीयार्था ॥ तेंचि आतां सांगेन ॥२०॥ श्लोक॥ असंतइवसंतोपिकोपयंतीपरंनरं ॥ निजकर्मगुणोदारंपरिपाकंपरीक्षितुं ॥६॥ टीका ॥ आपण तरी स्वतां संत॥ परी असंतासारिखें दावित ॥ बळात्कारें कोपवित ॥ कोपयुक्त करिती परां ॥ २१ ॥ कदाचित् ऐसें करी ॥ जेणें परातें क्रोध अंतरीं ॥ उपजे तैसी परिक्षा करी ॥ चित्त अंतरी कैसें असे ॥२२॥ दुसरीयासिं क्रोध उपजविला ॥ तरी तो अपमानिल आपणाला ॥ त्याच्याविरुद्ध वचनीं चित्ताला ॥ क्षोभ भला होईल कीं ॥ २३ ॥ निजकर्मांचे जे उदार गुण ॥ त्या परिपाकपरीक्षेलागुन ॥ विरुद्ध दावी जेणें हे जन ॥ विषाद पूर्ण मानिती ॥



१ पाप. २ जाळुन टाकिलें. ३ राग.

॥ २४ ॥ त्याच्या असत्कारें नविसकुंसे ॥ सत्कारेंकरुनी नसंतोषे ॥ समानत्वें अतिहर्षे ॥ नाहीं विशेषें राग द्वे-
षादि ॥२५॥ जरी संतें सत्कारिला ॥ असंतें असत्कार केला ॥ तरी चित्त नपावे हर्ष विषादाला ॥ नाहीं देखि-
ला शत्रुमित्र ॥२६॥ आत्मत्वें सर्वत्र असतां स्थिती ॥ नेणे सुहृद अमित्रव्यक्ती ॥ उदास द्वेष बंधु नेणती ॥ आ-
णि नदेखती आप पर ॥२७॥ दुसरेपणें आप्त अनाप्त ॥ नाहीं तया प्राप्ताप्राप्त ॥ तो समबुद्धी निश्चित ॥ ऐसें भ-
गवंत पार्थी सांगे ॥२८॥ संमतिगीता ॥सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबंधुषु ॥ साधुष्वपिचपापेषुसमबुद्धिर्वि-
शिष्यते ॥ ७ ॥ टीका ॥ यालागीं तो तरी ऐसा असे ॥ परी अज्ञानासीं अन्यचि भासे ॥ तो लीलेंकरोनी
परीक्षामिसें ॥ अन्य ऐसें जगा दावी ॥२९॥ मनिं जनसंग नकरावा ॥ जनें अपमानचि करावा ॥ प्रतिष्ठेवा
उबग[2] जीवा ॥ नाहीं बोलावा देहबुद्धी ॥२३०॥ देहबुद्धी जेथें दृढ असे ॥ तोचि मनालागीं उल्हासे ॥ जो आ-
त्मानुभवें संतोषे॥ तृप्त असे निरंतर ॥ ३१ ॥ तोचि जीवन्मुक्त जाण ॥ यया बोला नाहीं आन ॥ परि संस्कारें
ही रागादि दर्शन ॥ जेथें जाण दिसतसे ॥ ३२ ॥ जरी अज्ञान असे नासलें ॥ परी प्रारब्धरूपें शेष राहिलें ॥ तेणें
रागादिक भासले ॥ असती देखिले जीवन्मुक्तीं ॥ ३३ ॥ श्लोक ॥ ज्ञात्वाप्यसर्पसर्पोत्थंयथाकंपंनमुंचति ॥ विध्व-
स्ताखिलमोहोपिमोहकार्यंनमुंचति ॥ ७ ॥ टीका ॥ अंधःकारी रज्जु देखिला॥ तो सर्पबुद्धीं दृढ मानिला॥ निर्धारु-
नी जंव पाहिला ॥ तों रज्जुचि संचरला रज्जुपणें ॥३४ ॥ रज्जु प्रत्यक्षही देखोनी ॥ परी भयकंप नसोडि

१ तुटातुट होत नाहीं. २ कंटाळा.

तियेक्षणीं ॥ तें पूर्व संस्कारेंकरूनि ॥ राहे क्षण दोनी जयापरी ॥ ३५ ॥ दोरीचें अज्ञान तरी गेलें ॥
सर्पबुद्धीसिंही उबडलें ॥ परी भयकंपादि राहिले ॥ संस्कारें भले दृढ असती ॥ ३६ ॥ तेव्हां सर्पदर्शन तरी ना-
हीं ॥ परि भयकंप राहिले त्याच्या देहीं ॥ तेणें मागुता सर्पभ्रमुकंपही ॥ नुदेजे पाहीं कंपादिक ॥ ३७ ॥ का-
रण नासलिया अज्ञान ॥ कार्य भयकंप राहे जाण ॥ परी तें येक दोनीच क्षण ॥ अतिविलंबन नाहींच कीं ॥
॥ ३८ ॥ तैसें जीवन्मुक्ताचें मोहजाळ ॥ निःशेषही नाशिलें अखिल ॥ तथापि मोहकार्य प्रांजळ॥ संस्कारें सक-
ळ देहांत राहे ॥ ३९ ॥ तेंचि अज्ञान शेषेंकरूनी ॥ राहिलें आत्मविदांच्या मनी ॥ इतुकेनि भवश्रेणी ॥ भरव-
सेनी बाधितना ॥ २४० ॥ नाहो कारण नासोनि जाये ॥ मग कार्य चिरकाळ कोठें राहे ॥ येक दोनी क्षणचि
होय ॥ परि यावद्देह राहे हें कैसें ॥ ४१ ॥ हें बोलिलेती तें यथार्थ ॥ संस्कार राहे क्षण दोनीपर्यंत ॥ परी जि-
तका भ्रम तितकें गणित ॥ जाण निश्चित संस्काराचें ॥४२॥ सर्पभ्रम घडिभरि झाला ॥ तरी भयकंप क्षण दो-
नी राहिला ॥ अज्ञानकृत देहादि भ्रममेळा ॥ किती कल्प झाला हें नकळे ॥ ४३ ॥ इतुकिया काळ संबंधीं ॥
संस्कारें राहे प्रारब्ध अवधी ॥ हें क्षणाह्वानि अल्प अवधी ॥ संस्कारबुद्धी आति अल्प ॥ ४४ ॥ यालागीं ज्ञानि-
याच्याठाईं ॥ मोहकार्य देखिलें असे पाहीं ॥ परि तो नबाधिजे तेणेंही ॥ साक्षित्वें सर्वही वर्तता ॥ ४५ ॥ सर्वा-
तीतपणें प्रकाशत ॥ सर्वसाक्षी होऊनियां राहत ॥ सूर्य जैसा साक्षित्वें अलिप्त ॥ तैसा वर्तत असोनि देहीं॥४६॥

१ लयझाला. २ संपूर्ण. ३ पंक्ति, येरझारा. ४ ज्ञानी.

मिथ्याभूत देखे दृश्यजात ॥ तथापि राहिलें क्रियाकर्तृत्व ॥ इंद्रजाळ मिथ्याहि जाणत ॥ पाहे विपश्चित कौतुकें करी ॥ ४७ ॥ संस्कारें साच ऐसेंहि दिसे॥शुभाशुभें विषादे संतोषे॥ परी तें असत्य मानसें ॥ दृढविश्वासें मानलें जया ॥ ४८ ॥ तेणें रागादिकीं जरी कार्य केलें ॥ तरी तें आत्मानुवृत्या बोधिलें ॥ इतुकेनी तया काय आलें ॥ किंवा बाणलें कर्तेपण ॥४९॥ यदर्थीं वार्तिककार ॥ करिता झाला दृढनिर्धार॥रागादिकीं भ्रमपूर ॥ नये अविचार कामवशें ॥ २५० ॥ संमति वार्तिक ॥ रागादिदर्शनंयच्चज्ञानिनोपिहिचोद्यते ॥ बाधितस्यैवतत्सूते सदयुक्तेनदूषणं ॥ ८ ॥ टीका ॥ यालागीं काम क्रोधादिक ॥ दिसती जीवन्मुक्तिं सम्यक ॥ परी तयासी नव्हती बाधक ॥ आत्मोन्मुख ह्मणोनियां ॥ ५१ ॥ काम क्रोधरूप होय मनोवृत्ती ॥ क्षण येक ज्ञानातें आवरिती ॥ तंव सवेंचि ब्रह्माकार होय वृत्ती ॥ ते बाधि सर्वार्थीं इतरांसीं ॥ ५२ ॥ ह्मणोनि रागादिकीं आवरलें ॥ तरी ज्ञान नझांके कांहीं केलें ॥ ज्ञान तेथें बंधन कोण बोले ॥ सर्वथा नबोले जीवन्मुक्ता तया ॥ ५३ ॥ श्लोक ॥ स्फटिकः प्रतिबिंबेनयथानायातिरंजनं ॥ तज्ज्ञःकर्मफलेनापितथानायातिरंजनं ॥ ८ ॥ टीका ॥ तेंचि दृष्टांतमुखेंकरुनी ॥ ऐका आतां कोदंडपाणी ॥ स्वयेंचि शुद्ध स्फटिकमणी॥ पदार्थें कोणी मिळेना॥५४॥स्फटिक संनिधीं ठेविले॥ जया कुसुम तेथेंचि बिंबलें ॥ बाह्य स्फटिकासी आरक्त केलें ॥ परी अंतर भेदिलें नाहींच कीं ॥५५ ॥ अंतरीं शुभ्राचा शुभ्र असे ॥ बाह्यपणीं आरक्त भासे ॥ तोही अज्ञानें आरक्त दिसे॥ येरवीं असे जैसा तैसा ॥५६॥ वास्तव पाह-

१ ज्ञानी. २ रागद्वेई. ३ आत्मानुभवानें. ४ जवळ. ५ फूल.

तां बाह्यही नाहीं ॥ तो अंतरबाह्य शुद्धचि पाहीं ॥ तैसा ज्ञाता कर्मैंकरूनिही ॥ नलिंपे कांहीं तत्फळें कदां॥ ५७ ॥
तो कामरागादिकें कर्म करू ॥ परी कर्मफळीं नमिळे भीतरू ॥ बाह्य कर्ता दिसे तोही संचरू ॥ अज्ञान निर्धारु मा-
नतसे ॥ ५८ ॥ संचारें तया विपरीत केलें ॥ अन्यांचि देखती तयाचे डोळे ॥ जगामध्यें भ्रममेळें ॥ असोनि
तो बोले भलतेंची ॥ ५९ ॥ तो कर्म कर्ता ऐसा आवडे ॥ परि तो अकर्ता सर्व पाडें ॥ आपुलिया साक्षित्वें नि-
वाडे॥ धडफुडें जाणतसे ॥२६०॥ यालागीं जरी तो कर्म करी ॥ तरी नबुडे कर्मफळसागरीं ॥ तो अकर्ता सर्व प्र-
कारीं ॥ अंतर्मुखें करी लिंपेना ॥ ६१ ॥ श्लोक ॥ अंतर्मुखतयातिष्ठन्बहिर्वृत्तिपरोपिसन् ॥ परिश्रांततयानि-
त्यंनिद्रालुरिवलक्ष्यते ॥ ९ ॥ टीका ॥ सर्वदां जो अंतर्मुख राहिला ॥ तरी कर्ता नव्हे यया बोला ॥ तो बाह्य-
वृत्तीवरी जरी आला ॥ दृष्टांत भला परियेसीं ॥ ६२ ॥ निद्रेहुनी जो उठिला ॥ परि निद्रासुखें असे भरला॥
कां निद्रा प्रारंभतां तयाला ॥ सुखकल्लोळामाजि असे ॥ ६३ ॥ याचें मन निद्रासुखें भरलें ॥ संस्कारें बाह्य-
कर्म असे उरलें ॥ परि आसक्तीं नाहीं क्षोभलें ॥ मन मुरालें परम सुखीं ॥ ६४ ॥ आतां अंतर्मुख या शब्दा-
चा अर्थ ॥ तोही सांगो बा यथार्थ ॥ सर्वांचें अंतर ब्रह्म सदोदित ॥ बाह्य तें निश्चित दृश्य स्फुरे ॥ ६५ ॥ वस्तु
वेगळें जेंजें भान ॥ तेंतें बाह्य प्रपंच दृश्य जाण ॥ अहंकार बुध्यादिक मन॥ आणि सर्वही जाण स्थूळ सूक्ष्मा-
दिक ॥ ६६ ॥ हे सर्वही बाह्य पदार्थ ॥ ते ते ब्रह्माहुनी व्यतिरिक्त ॥ ह्मणोनि ते नाशिवंत ॥ असति असंत
सर्वदां ॥ ६७ ॥ यालागीं सर्वांचें जें अंतर ॥ तेंचि परब्रह्म साचार ॥ बाह्यत्यागें तया समोर ॥ होय निरंतर

ते अंतर्मुखता ॥ ६८ ॥ बाह्य देखोनि प्रतिभासक ॥ परि अधिष्ठानीं दृष्टी सम्यक ॥ बैसे जरी निष्टंक[1] ॥ अंत-
र्मुख तेंचि जाण ॥ ६९ ॥ बाह्य इंद्रियव्यापार करोनि ॥ मन परिभ्रांत झालें भ्रमणीं ॥ विश्रांती पावलें आधिष्ठा-
नीं ॥ नुठे तेथुनी उठवितांही ॥ २७० ॥ ऐसा स्वस्वरूपीं असतां ॥ बाह्यव्यापारही व्यापारतां ॥ तो तेथींचा
नव्हे गा सर्वथा ॥ अनुभवपंथा आश्रयिला ॥ ७१ ॥ जैसा निद्राभरें जो दाटला ॥ पूर्ण निद्रिस्त नाहीं झाला ॥
तो अंतरसुखें असे सुखावला ॥ बाह्यव्यापारला व्यापारें ॥ ७२ ॥ बाह्य व्यापार दर्शनादि करी ॥ परि सुखें सु-
खावला अंतरीं ॥ तैसा ज्ञानी अंतर्मुख शेजारीं ॥ पहुडूनि[2] करी बाह्यव्यापार ॥ ७३ ॥ इतुकेनि सुख नाहीं भंग-
लें ॥ आपुलें आत्मत्व नाहीं गेलें ॥ असंगपण नाहीं उणावलें ॥ कोणें नेलें पूर्णत्व ॥ ७४ ॥ कर्में करूनि तो
अकर्ता ॥ भोग भोगूनि तो अभोक्ता ॥ इंद्रियमेळें करूनि वर्ततां ॥ नमळे असंगता जयाची ॥ ७५ ॥ त्या जी-
वन्मुक्ताची स्थिती सांगणें ॥ तें येकेक किती बोलणें ॥ तो आत्मसुखें तोषलेपणें ॥ काय नेणे वर्तलें देहीं ॥ ७६ ॥
तो देहीं असोनि देहातीत ॥ कर्में करूनि तत्फळें अलिप्त ॥ निर्विकार असंग सदोदित ॥ आनंदभरित[3] पूर्णत्वें ॥ ७७ ॥
नाहो जयाची द्वैत बुद्धि गेली ॥ अद्वैत बुद्धी स्थिरावली ॥ तयासीहि कर्तव्यता उरली ॥ हे तंव बोली अघटमान ॥
॥ ७८ ॥ अहो दुसरें जेथें नस्फूरे ॥ तेथें कर्म कैंचें करणें उरे ॥ द्वैतबुद्धीनें निर्द्धारें ॥ कर्म सपुरें घडों शकें ॥ ७९ ॥ ऐसि-
या आक्षेपासि[4] उत्तर ॥ देता श्रीवसिष्ठ चतुर ॥ सांगो याचाहि प्रकार ॥ होऊनि येकाग्र ऐकें रामा ॥ २८० ॥ अगा द्वैतदृ-

१ निश्चयेंकरून. २ निजून. ३ भरपूर. ४ शंका.

ष्टी जरी गेली॥ब्रह्मात्मैक्यें स्थिती बाणली॥तरी कर्तव्यता असे उरली॥संस्कारें भली प्रारब्धशेषें ८१ अज्ञान जरी निःशेष सरे॥तरी प्रारब्धसंस्कारें शेष उरे॥तेणें इंद्रियग्राम व्यवहारें॥प्रारब्ध खरें चेष्टवी॥८२॥श्लोक॥ अद्वैतस्थैर्य मायातेचित्तंचप्रशमंगते ॥ योगिनःकर्मकुर्वंतिपश्यंतिस्वप्नवज्जगत्॥१०॥टीका॥ अद्वैत ब्रह्मस्थिती अढळ झाली॥ द्वैतबुद्धी निःशेष विराली ॥ तरी योगिये कर्मकल्लोळीं ॥ पोहती मेळीं अनुभवाचिये ॥ ८३ ॥ जगस्वप्नसंभ्रम टवाळ ॥ ते देखती जैसें मृगजळ ॥ तथापि संस्कारें सकळ ॥ कर्म प्रांजळ करिताती ॥८४ ॥ कर्ता कर्म आणि करण ॥ हे त्रिपुटी नस्फुरतां कर्माचरण ॥ जीवन्मुक्तासी घडे जाण ॥ द्वैतस्वप्न देखताती॥८५॥परी यथार्थ नमानिती व्यवहार ॥ आग्रहें नकरिती कर्माचार ॥ अहंकर्तृत्वादि संचार ॥ गेला समग्र आत्मत्वें ॥८६॥ यथाकाळीं विधि पाळिती ॥ निषेध तें निषेधें गाळिती ॥ उभयतां गुणागुण नदेखती ॥ अर्भकस्थिती हेतुविण ॥८७॥ विधि पाळिलिया गुण होईल ॥ निषेधें दोष मज जडेल ॥ ह्मणोनि प्रवृत्ति निवृत्ती टवाळ ॥ नसोनि सकळ प्रवृत्ति दिसे ॥ ८८॥ सहस्र जन्माच्या भरोवरीं ॥ सत्कर्मेंचि केलीं सहस्रवरी ॥ निषेध गाळी त्याभितरीं ॥ तेणें पुरी चित्तशुद्धि झाली ॥८९ ॥ तेणेंकरूनि झालें ज्ञान ॥ ज्ञानोत्तरकाळीं तेंचि आचरण ॥ संस्कारबोधेंचि आलें जाण ॥ करी ह्मणोनि तेंचि सदां ॥२९०॥ जैसी चेष्टा बाळकाची ॥ स्वभावें येक मोडि येक रची ॥ परी उभयतां फळाचि॥ नाहीं इछेची सोय जया ॥ ९१ ॥ तैसीं ज्ञानिही कर्में करिती ॥ परी कर्मीं कर्मफळाचि नाहीं आसक्ती ॥ करितांही

१ लटिका. २ बाल्यावस्था.

नमोडे जयाचि स्थिती ॥ असंग गती अखंड ॥ ९२ ॥ एक ज्ञानी कर्मे करिती ॥ येक ते कांहींच नकरिती ॥ येक ते निर्विकल्पेंचि असती ॥ राजभोगप्राप्ती भूमिकाभेदें ॥ ९३ ॥ समंतिवार्तिक ॥ प्रारब्धकर्मनानात्वाद्बुधानामन्यथायथा ॥ वर्तनंतेनशास्त्रार्थेभ्रमितव्यंनपंडितैः ॥ ९ ॥ स्वस्वकर्मानुसारेणवर्ततेतेयथातथा ॥ अवशिष्टःसर्वबोधः समामुक्तिरितिस्थितिः॥ १० ॥ टीका ॥ त्या ज्ञानाचिया सप्तभूमिका ॥ असती गा रघुनायका ॥ त्यामाजि प्रथम तिन्ही देखा ॥ अज्ञान भूमिका जाणाव्या ॥ ९४ ॥ जो प्रस्थान करी गमनासीं ॥ तो गेलाचि ह्मणती कासियेसीं ॥ तैसा प्रवर्तला जो शुभेच्छेसीं ॥ ज्ञान तयासिं प्राप्ताचि कीं ॥ ९५ ॥ह्मणोनि जरी तिन्ही अज्ञान भूमिका ॥ तरी ज्ञानभूमिच सकळिका॥ ताटीं बैसत खेवो जेविला देखा ॥ हे प्रतीति लोकां होतेच कीं ॥ ९६ ॥ चौथीपासुनी सातवरी ॥ जीवन्मुक्ती भूमिका अवधारीं ॥ परि भूमिकांच्या भेदांतरीं ॥ सर्वांपरी ज्ञान भेदे ॥ ९७ ॥ ज्ञान तें अखंड येकविध॥तेथेंचि दिसती भूमिकाभेद ॥ भूमिकाभेदें ज्ञान विषद॥ नपवे बाध रघुनाथा ॥ ९८ ॥ सुखदुःखाचें भान नव्हावें ॥ अखंड निरतिशय सुख भोगावें ॥ ऐसीया भरें जों व्हावें ॥ तेणें साधावी सप्तभूमी ॥ ९९ ॥ जो सप्तभूमीतें पावला ॥ तो दुःखादि दर्शना मुकला ॥ सुखें सुखरूपचि झाला ॥ नपवे दुःखाला देहवरी ॥ ३०० ॥ तो परें प्रबोधिल्याही नुमजे ॥ सुखें पहुडला सुखशेजे ॥ येरातें सुखदुःखादि सुंजे ॥ आनंदसेजे परि नसंडी ॥ १ ॥ दोघांचि संसृति निमाली ॥ नाहीं स्वात्मसुखाचि हानि

१ तयारी. २ लागलाच. ३ निजला. ४ समजे. ५ जन्ममरण.

झाली ॥ येका सुखदुःखें दर्शना आलीं ॥ भूमिकामेळीं रघुराया ॥ २ ॥ भूमि चौथी आणि पांचवी॥ व्युत्थानकाळीं सुख दुःख अनुभवी ॥ येरवीं ब्रह्मानंदें सुखानुभवी ॥ भोगिजे सर्वां ज्ञानवंतीं ॥ ३ ॥ षष्ठ सप्त भूमिकेसीं ॥ सर्वथा नेणे सुखदुःखें कैसीं ॥ परे बोधिलीयाहि जयासीं ॥ देहस्मृतिसीं नयेती ॥ ४ ॥ तुरीय पंचभूमिकेसी ॥ सुख दुःखें दर्शनें नेमेसी ॥ होती पारि अनुभवबळें तयासीं ॥ ऐक्यतेसी नमिळे ॥ ५ ॥ अज्ञानि जैसा लुटोनि जाय ॥ तैसा ज्ञानी सर्वथा नोहे ॥ सर्वांचा साक्षी होऊनि राहे ॥ आपणावरी तो सुखदुःखें नेघे॥६॥ विषयसुखें नासुखावे ॥ दुःखेंकरूनि नादुखावे ॥ अप्राप्तिची चाड नपवे ॥ परिपूर्ण स्वभावें ह्मणोनियां ॥ ७॥ प्रारब्धभोग देहाच्या माथां ॥ आपण विदेहि अकर्ता अभोक्ता ॥ ऐसा स्वानुभवें सर्वांरिक्तता ॥ निःसंगता भोगित ॥ ८ ॥ यालागीं दोहींचें सुख येक ॥ दोनी पूर्णानंदें सम्यक॥ पारि विशेष तो इतुकाचि देख ॥ भान सुखदुःख इतरांसीं ॥ ९ ॥ ऐसें ऐकोनि भूमिकाभेद ॥ भेदें वर्तणेंहि कळलें विषद॥ त्यावरी रघुराज अतिप्रबुद्ध ॥ परमानंद पावले ॥३१० ॥ आनंदें ह्मणे श्रीगुरुराया ॥ अत्यंत सुख झालें हें एकोनियां ॥परी भूमिकाभेद स्वामिया ॥ ऐकावया उत्कंठित मी ॥११॥ ते उत्कट डोहळे पुरवावया॥समर्थ कोण तुजवांचूनियां ॥ तें कृपेकरूनि सांगावया ॥ करी स्वामिया कृपा मज ॥ १२ ॥ लळे बाळाचे पाळनीं ॥ दुजें समर्थ कोण माउलीवांचूनि ॥ तोचि तूं कृपाळु जननी ॥ अपत्यांलागूनि प्रसन्न होई ॥ १३ ॥ स्वयें आपण ज्ञातयावरि-

१ आवड. २ अत्यंत, चांगले. ३ बाळकाला.

ष्ठ ॥ रघुराज वरिष्ठाहूनि श्रेष्ठ ॥ तो होऊनियां कनिष्ठ ॥ सद्गुरु श्रेष्ठ स्वयें करी ॥ १४ ॥ अतिविनयपणें वि-
ज्ञापन ॥ करूनि सद्गुरूसीं करिती प्रश्न ॥ लीलाविग्रहाचें संपादन ॥ विटंबन स्वयें दावी ॥ १५ ॥ असो ते
विनवणीचसाठीं ॥ श्रीवसिष्ठ सप्रेमेंचि उठी ॥ ह्मणे सप्तभुमिकाची परिपाठी ॥ तुज जगजेठी सांगेन ॥ १६ ॥
येकि येकि भूमिका सांगतां ॥ तुज चमत्कार होईल गा रघुनाथा ॥ ते आपुलेठाईं विचारितां ॥ नसेल ते त-
त्वतां साधावी ॥ १७ ॥ऐसी उत्तरोत्तर भूमिका साधून ॥ राहावें स्वरूपीं स्थिरावोन ॥ ते जीवन्मुक्ति निर्वाण
जाण ॥ नाहीं कारण तियेवरी ॥ १८ ॥ ऐसीया भूमिकांचें श्रवण ॥ करी करूनि येकाग्र मन ॥ हेंचि श्रव-
णाचें श्रवण ॥ नित्य सावधान श्रवणार्थी ॥ १९ ॥ ऐसें बोलतांचि मुनी ॥ श्रीराम सर्वांगें सावध श्रवणीं ॥
तेंचि निरूपण श्रोतेजनीं ॥ सावधानि परिसीजे ॥ ३२० ॥ संमतिवासिष्ठ ॥ श्रीरामउवाच ॥ सप्तानांयोग
भूमीनामभ्यासःक्रियतेकथं ॥ कीदृशानिचचिन्हानिभूमिकांप्रतियोगिनः ॥ ११ ॥ टीका ॥ जियेठाईं योगिये र-
मती ॥ जे कीं चिदानंदघनमूर्ति ॥ तो श्रीरघुनाथ वसिष्ठाप्रती ॥ करी विनंती विनयवृत्या ॥ २१ ॥ ह्मणेजी व-
सिष्ठा गुरुवर्या ॥ उपाय सांगावा भूमिका साधावया ॥ आणि अभ्यासही त्याचा स्वामिया ॥ जेणें आपैसि-
या होती भूमि ॥ २२ ॥ आणि तया भूमिकांप्रती ॥ चिन्हें कैसीं उदय पावती ॥ तें कृपाकरूनि सद्गुरुमूर्ति ॥
मजप्रती सांगिजे कां ॥ २३ ॥ ऐसा प्रश्न करितां श्रीरामासीं ॥ मनीं संतोषला तो महाऋषी ॥ ह्मणे ऐका

१ क्रम. २ सहज.

सांगेन भूमिकांसि ॥ आणि साधनासिं प्राप्तिचिया ॥ २४ ॥ श्लोक ॥ वसिष्ठउवाच ॥ ज्ञानभूमिशुभेच्छा ख्याप्रथमासमुदाहृता ॥ विचारणाद्वितीयाचतृतीयातनुमानसा ॥ ११ ॥ सत्वापत्तिश्चतुर्थीस्याततोसंसक्ति नामिका ॥ पदार्थभाविनीषष्ठीसप्तमीतुर्यगास्मृता ॥ १२ ॥ आसामंतेस्थितामुक्तिःतस्यांभूयोनशोचति ॥ एतासांभूमिकानांतुइदंनिर्वचनंशृणु ॥ १३ ॥ टीका ॥ तंव वसिष्ठ ह्मणती तमाळशामा ॥ राजीवलोचना पुरुषोत्तमा ॥ जानकीवल्लभा निष्कामकामा ॥ उत्तमोत्तमा रघुवर्या ॥ २५ ॥ आनंदरूपा चिदेकघना ॥ लीला विग्रहा दीनोद्धारणा ॥ ज्ञानसंपदा उद्दीपना ॥ रघुनंदना परियेसी ॥ २६ ॥ तरी ज्ञानभूमिका सप्त आहेती ॥ ऐके त्यांच्या नामांचि उत्पत्ती ॥ तरी शुभेच्छा ते प्रथमा बोलती ॥ दुसरी रघुपति विचारणा ते ॥ २७ ॥ तनुमानसा तिसरी भूमिका ॥ चौथी ते सत्वापत्ति देखा ॥ पांचवी असंसक्ति नामिका ॥ षष्ठी ऐका रघुवर्या ॥ २८ ॥ सहावी ते पदार्थाभाविनी ॥ सातवी ते तुर्यगा निर्वाणी ॥ तया सप्तामाजी कोदंडपाणी ॥ कोडींस वाणी मुक्ति वसे ॥ २९ ॥ मुक्तीच्याठाईं रघुनाथा ॥ संसारदुःख नाहीं गा सर्वथा ॥ ह्मणोनि भूमिकांचि आतां ॥ सांगों सर्वथा कर्तृत्वास्थिती ॥ ३३० ॥ पहिली जे शुभेच्छा बोलती ॥ तियेचें स्वरूप ऐकापां रघुपती ॥ आणीक कोण साधनें तेथें बोलती ॥ तेही गति अवधारा ॥ ३१ ॥ संमतिश्लोक ॥ प्रवृत्तश्चनिवृत्तश्चभवतिद्विविधःपुमान् ॥ स्वर्गा पवर्गोन्मुखयोः शृणुलक्षणमेतयोः ॥ १२ ॥ किमेतन्नामनिर्वाणं वरं संसृतिरेवमे ॥ इतिनिर्णयकर्ताचसप्रवृत्तउ-

१. लहानसी.

दाहृतः ॥ १३ ॥ टीका ॥ तरी यया जगामाझारीं ॥ द्विविध पुरुष गा अवधारी ॥ प्रवृत्त निवृत्त दोनी परी ॥ असे व्यवहारीं वर्तत ॥ ३२ ॥ आतां प्रवृत्त निवृत्तांचिं लक्षणें ॥ ती सांगेन ऐकें येकाग्र मनें ॥ तरी सकाम धर्मानुष्ठान करणें ॥ स्वर्गांकारणें आणि इहभोग ॥ ३३ ॥ तो ह्मणे जे निवृत्त कर्में करिती ॥ ते व्यर्थचि ह्मा शीण पावती ॥ कर्में करूनि वृथा दवडिती ॥ नाहीं प्राप्ति विषयसुखाची ॥३४॥ जिये कर्मी विषयसुख नाहीं॥ तें कर्म करूनियां प्रयोजन काई ॥ यालागीं आत्मा श्रेष्ठ हे पाहीं ॥ पुरुषार्थ सर्वही प्रवृत्तिकर्में ॥ ३५ ॥ प्रवृत्तीचिं कर्में आचरतां ॥ विषयसुखाचि प्राप्ती उभयतां ॥ इहलोकीं आन स्वर्गाचे माथां ॥ रंभादि वनिता सुखभोगेसीं ॥ ३६ ॥ नानापरींचें सुख भोगणें ॥ तोचि आह्मीं पुरुषार्थ साधनें ॥ यावेगळें तें व्यर्थ शिणणें ॥ काळ क्षेपणें वृथाचि पैं ॥ ३७ ॥ ऐसा दृढ निश्चय करुनी ॥ काम्य कर्में करिती चित्त देउनी ॥ तो प्रवृत्त पुरुष गा कार्मुकपाणी ॥ ऐक करणी निवृत्ताची॥३८॥संमति वासिष्ठ॥चलार्णवयुगच्छिद्रकूर्मग्रीवाप्रवेशवत् ॥ अनेकजन्मनामंतेविवेकीजायतेपुमान् ॥ १४ ॥ क्रियातिशयनिर्मुक्तं किंस्याद्विश्रमणःफलं ॥ इतिनिश्चयवान्योंतःसनिवृत्तइतिस्मृतः ॥ १५ ॥ कथंविरागवान्मुक्तासंसाराब्धितराम्यहं ॥ १६ ॥ टीका ॥ तरी तो संसारदुःखातें आठवी ॥ संसार देखे जळती आटवी ॥ तेणें पोळत जाय अतिजीवि ॥ ह्मणे न व्हावी हे मागुती दशा ॥ ३९ ॥ तो दुःख मानितसे कैसें ॥ दोनी समुद्र उचंबळती जैसे ॥ येका भेणें जों पळों-

१ त्रास. २ त्रिया. ३ अरण्य.

बैसे ॥ तंव दुसरा दिसे पुढां थोरू ॥३४० ॥ दोहींच्या संधिं सांपडला ॥ अतिशय तळमळूं लागला ॥ तंव पुढें कूर्मे जातां देखिला ॥ भयें वळंघला तयावरी ॥ ४१ ॥ कूर्मे बाहेर काढिली मान॥तो चालिला तिये वरी बैसोन ॥ तेणें बेटीं घातला नेऊन ॥ तेही क्षणीं बुडोंपाहे ॥ ४२ ॥ तो कूर्म गेला समुद्राभीतरीं ॥ तो येकला राहिला बेटावरी ॥ तों बुडवावया येती लहरी ॥ येरासि सीयारी भयाची ॥४३॥ जिकडे पाहे तिकडे उदधी ॥ लहरीयांचि अतिसमृद्धी ॥ समुद्र गडाडे व्याकुळबुद्धी ॥ नदिसे संधी पळावया ॥ ॥ ४४ ॥ तेथेंही जळचरांचे वळसे ॥ तेणें भयें येताति उसासे ॥ पुढें प्रवेशेना मागें निर्गम नसे ॥ दुःख अतिसोसें पावत ॥ ४५ ॥ हृदय पिटी रडे आर्ती ॥ दुजें नाहीं जें करी उपशांती ॥ तें दुःख सांगेल कोणाप्रती ॥ तळमळ चित्तीं अत्यद्भुत ॥ ४६ ॥ येक उदधी वोलांडूनि आला॥ तंव दुसरीयाचा वेढा पडला ॥ तेथें ही वर्ते दुःखमेळा ॥ नव्हे निराळा कोणे परी ॥ ४७ ॥ मागें संसाराब्धि टाकुनी ॥ तंव पुढाही भवार्णवप्रवेशनीं ॥ मध्येंही दुःख पावे निर्वाणीं ॥ विश्रांति क्षणीं असेचिना ॥ ४८ ॥ पूर्व जन्मीं जरामृत्यु परंपरा॥पावल्या येकावरी येक अपारा॥पुढें होणारामाजी बाल्यादि जरा ॥ देखे थोर दुखासी ॥ ४९ ॥ वर्तमान असे जियेठाईं ॥ तंव तेथें यम यातना हीं दारुण पाहीं ॥ तें चुकल्या गर्भवासामध्येंही ॥ यातना देहीं अनावर ॥३५०॥ ऐसीया जन्म मरणाच्या कोडीं ॥ दिसती संसाराच्या बांदवंडी ॥ ऐसीया संसाराची घडामोडी ॥ होती कोटी असंख्य वेळा॥५१॥ ऐ-

१ कांसव. २ कंप. ३ समुद्र. ४ सुटका. ५ बंधन.

सीं मागील दुःखें स्मरे ॥ विश्रांतिलागीं सर्वदां झुरे ॥ ह्मणे हें किमर्थ दुःखार्जन पुरे॥येणें संसारें साधावें॥५२॥ ऐ-
सीया भवार्णवामाझारीं ॥ नाना पाप पुण्यें भरोंवरी ॥ करितां सद्बुद्धी तयातें वरी ॥ मग निर्धारी निश्चिय ऐ-
सा ॥ ५३ ॥ असंख्य जन्माच्या अंतीं ॥ विवेकीं होय तयाचि मती ॥ मग प्रवर्ते या विचाराप्रती॥ ह्मणे संसृतीं
पुरे आतां ॥ ५४ ॥ अनेक उत्तम जन्म जरी झाले ॥ तरी तेथेंही दुःख भोगिलें॥ आतां पुरे हें मन विटलें ॥का-
य साधिलें इतुक्या जन्मीं ॥ ५५ ॥ आतां पुरे हें पुन्हा नकरी ॥ मागुता नप्रवर्ते संसारीं ॥ प्रवृत्ति कर्मींहि दुः-
ख भारी ॥ सर्वथा नकरी असार हें ॥ ५६ ॥ सार नाहीं जयाआंत ॥ तें कर्मादि असार समस्त ॥ बळात्कारें
दुःख जोडिजेत ॥ अतिकुश्चित सर्वार्थीं॥५७॥ऐसेनिही स्वर्गादि फळ झालें ॥ कां इहलोकींचे विषय फळले॥तेही
आगमापाईं भले॥ काय आले हातासिं येथें ॥ ५८ ॥ देहवर्तमानें विषय सरे ॥ तेव्हां तेणें दुःख अतिशय थोरे ॥
तेचि विषय स्मरों सरे ॥ आद्यंत विसरे अतिदुःखें ॥ ५९ ॥ अथवा विषय असतां होय देहांत ॥ तरी तो विषय कव-
णें भोगिजेत ॥ एवं दोहीं परी नाडत ॥ नाहीं अंत त्या दुःखासीं ॥३६०॥ जेणें कर्मफळें दुःख होय॥ तें फळचि परी
सुफळ नहोय ॥ दुःखरूप फळ पावोनि काय ॥ असार होय यालागीं ॥ ६१ ॥ यदर्थीं श्रुति असे बोलत ॥ ह्मणे कर्में
करूनि जे जे लोक प्राप्त ॥ ते सर्वथा क्षयातें पावत॥अंतवंत ह्मणोनियां॥६२॥श्रुती॥तद्यथेहकर्मजितोलोकःक्षीय ते
एवमेवामुत्रपुण्यजितोलोकःक्षीयतइति॥३॥ स्मृति ॥ तेतंभुंक्त्वास्वर्गलोकंविशालंक्षीणेपुण्येमर्त्यलोकेविशंति॥ ४॥

१ सामग्री. २ जन्ममरण.

॥ टीका ॥ जैसे इहलोकींचे भोग नासती ॥ ते प्रत्यक्ष आपणातें दिसती ॥ तैसेचि परलोकही क्षया पावती ॥ निश्चयार्थीं जाण तूं ॥६३॥ ऐसें असार कर्म करुनी ॥ दिवस घालावे शून्यपणीं ॥ जैसी हरिणें महावनीं ॥ करिती दोन्ही काळक्षेप॥६४॥ आणि जे आत्मविचार नकरिती ॥ ते लोक अंधतमामाजी पडती ॥ तेथें नाहीं सूर्याची गती ॥ तेआत्महन[1] हें श्रुती स्वयें बोले ॥६५॥ श्रुती॥ असूर्यानामतेलोकाअंधेनतमसावृताः ॥ तास्तेप्रेत्याभिगछंति येकेचात्महनोजनाः ॥ ५ ॥ नचेदवेदीन्महतीविनष्टिइत्यादिश्रुतेः ॥ ६ ॥ यालागीं जे आत्मयातें नेणती ॥ ते आत्मनाश पावती ॥ ह्मणउनी तो आत्मविचाराप्रती ॥ प्रवर्ते सर्वार्थी नेटेंपाटें ॥६६ ॥ ह्मणोनि त्या नावडे कर्मसंगती ॥ निःशेष उडाली विषयप्रीति ॥ ऐसी वैराग्याचि स्थिती ॥ त्यामाजि पाहीं मुमुक्षुता ॥ ६७ ॥ नित्यानित्य वस्तुविवेक ॥ इहामुत्रार्थ फळभोगविरागादिक ॥ तिसरे ते शमदमादि षट्क ॥ यांत सम्यक दिसतसे ॥ ६८ ॥ चौथी ते जाण मुमुक्षुता ॥ चौथें साधन सीताकांता ॥ वैराग्य बाणल्या ह्मणे आतां ॥ हे संसारव्यथा तरूं कैसी ॥ ६९ ॥ आतां यया भवार्णवाआंत ॥ विचारितां दुःखचि समस्त ॥ तरी विश्रांती ते काय तेथ ॥ विचारस्थ स्वयें होत ॥ ३७० ॥ ऐसा अंतरीं निश्चय असे करित ॥ ह्मणे हा भवाब्धी उतरूं कवणें हेत ॥ मुक्त व्हावें ऐसें निश्चित ॥ जाण इच्छित निवृत तोची ॥ ७१ ॥ तोचि मुमुक्षु तोचि निवृत्तजन ॥ हेंचि जाण ययाचें लक्षण ॥ मुमुक्षू तेंचि दृढपण[2] ॥ तेंचि जाण शुभेच्छा गा ॥ ७२ ॥ हे प्रथम भूमिका रघुपती ॥

१ आत्मघातकी. २ निश्चयरूप.

शुभेच्छा इयेतें ह्मणती ॥ आतां सांगों इयेचि वर्तती स्थिती ॥ तेचि ह्मणती साधनें तिचीं ॥७३॥ अगा संसा-
राब्धी कैसा तरेन ॥ यया विचारीं प्रवर्तला संपूर्ण ॥ तेचि शुभेच्छा रघुनाथा जाण ॥ ऐक वर्तन सांगों तुज ॥
॥ ७४ ॥ संमतिवासिष्ठ ॥ विरागमुपयात्यंतर्वासनास्वनुवासरं ॥ क्रियासुदाररूपासुरमतेमोदतेन्वहं ॥ १७ ॥
ग्राम्यासुजडचेष्टासुसततंविचकित्सति ॥ नोदाहरतिवर्णानिपुण्यकर्माणिसेवते ॥ १८ ॥ अनन्योद्वेगकारीणिमृ-
दुकर्माणिसेवते ॥ पापाद्बिभेतिसततंनचभोगमपेक्षते ॥ १९ ॥ स्नेहप्रवणगर्भाणिपेशलान्युचितानिच ॥ देश-
कालोपपन्नानिवचनान्यभिभाषते ॥ २० ॥ तदासौप्रथमामेकांप्राप्तोभवतिभूमिकां ॥ मनसाकर्मणावाचासज्ज-
नानुपसेवते ॥ २१ ॥ यतः कश्चिदिदानींयोज्ञानशास्त्राण्यवेक्ष्यते ॥ एवंविवादकर्तव्यःसंसारोत्तरणंप्रति ॥२२॥
सभूमिकावानियुक्तःशेषस्त्वार्यइतिस्मृतः ॥ २३ ॥ टीका ॥ सर्वत्रविषयीं गेली प्रीति ज्याची ॥ तेचि व्यक्ती
विरागाची ॥ अंतरवासना सर्वकर्मांची ॥ विराली सार्या प्रवृत्तिकर्मीं ॥ ७५ ॥ जंव जंव क्रियेचा त्याग क-
री ॥ तंव तंव सुखपावे अंतरीं ॥ ग्राम्यचेष्टा सर्वप्रकारीं ॥ त्याग करी व्यर्थ ह्मणोनि ॥ ७६ ॥ ग्राम्यविचारीं
प्रवर्ततां ॥ सद्विचार प्रवर्तें त्याच्या माथां ॥ ह्मणे व्यर्थ काळक्षेपता ॥ पापही तत्वतां वृथालागे ॥ ७७ ॥
ईश्वरनिष्ठेवांचुन ॥ सर्वही व्यर्थ प्रपंचव्यवहरण ॥ ह्मणोनि देतसे उपेक्षुन॥विचारस्थ पूर्ण स्वयें होय ॥७८॥को
णाचेंही वर्म नबोलावें ॥प्रांजळपणेंचि स्वयें चाले॥निवृत्त कर्में जें पुण्य फळे॥त्यासींच आतळे करणीयत्वें ॥७९॥

---

१ नीचभाषण. २ निर्मळपणानें.

तेंहीं कर्म नव्हे कठिण ॥ अति मृदु दुःखहरण॥कोणासीहि उद्वेग नव्हेदारुण॥ सुखकारण सर्वांसीं जें ॥३८०॥निरंतर पापाचें भय धरी॥ पाप नप्रवेशे जयाच्या अंतरीं॥ भोगाचि अपेक्षा सर्वांपरी॥नाहीं क्षणभरी इंद्रियभोग्याची ॥ ८१ ॥ सकळ जनासीं मृदुपण ॥ स्नेहपूर्वक बोले वचन ॥ अतिआदरें नम्रतेकरून ॥ सुंदरपणें अर्थगांभिर्य ॥ ८२ ॥ देशकाळासिं उचित ॥ तदनुसारें बोले वचनामृत ॥ तेव्हां तो जाण निश्चित ॥ झाला प्राप्त प्रथम भूमिका ॥ ८३ ॥ अथवा मनसा वाचा कर्मणा ॥ शरण जाय तो सज्जना ॥ आणि सद्गुरूचिया चरणा ॥ अनन्य शरण जो झाला ॥८४॥ पूर्वीं सद्गुरुही नसेवितां॥ परि साधुसंगीं अतिप्रीति चित्ता॥अध्यात्मशास्त्र मेळऊनि प्रयत्नता ॥ विचार तत्वतां करी स्वयें ॥ ८५॥ ऐसा संसारतरणाप्रती ॥ विचार करी अहोरात्री ॥ तोचि भूमिकावंत गा रघुपती ॥ येरू तो ह्मणती आर्य ऐसें ॥ ८६ ॥ जो कीं सन्मार्गातें भजतां ॥ परि उपजली नाहिं मुमुक्षुता ॥ तोचि आर्य गा रघुनाथा ॥ मुमुक्षु तो सर्वथा शुभेच्छावंत ॥८७॥ तो ह्मणे मूर्खांचेपरी येथें असोन ॥ साधावें म्यां कार्य कोण ॥ शास्त्रसज्जनेसि संसारोत्तरण ॥ साधुसंगें पूर्ण वैराग्ययुक्त ॥ ८८ ॥ तेंचे शुभेच्छेचें लक्षण ॥ आणि सांगितलें साधनवर्तन ॥दुसरी विचारणा ते ऐसी जाण ॥ एके खुण परब्रह्मा ॥ ८९ ॥ प्रथम भूमिकेपासून॥वैराग्य सर्व भूमीस जाण ॥ पाहिजे गा अति[१]निर्वाण ॥ हे सर्वत्र खुण जाणावी ॥ ३९० ॥ आतां दुसरी भूमिका विचारणा॥तेही ऐकें गा रघुनंदना ॥ सांगों तियेचाहि लक्षणा॥जेणें मना संतोष होय ॥९१॥

१ कंटाळा, उदासीनता.

संमीतवासिष्ठ ॥ शास्त्रसज्जनसंपर्कवैराग्याभ्यासपूर्वकं ॥ सदाचारेप्रवृत्तिर्याप्रोच्यतेसाविचारणा ॥ २४ ॥
॥ टीका ॥ अगा पूर्वील साधनचतुष्टयसंपन्न ॥ वैराग्यवंत अतिनिर्वाण ॥ झालिया सद्गुरूसीं शरण ॥ करी
सेवन अनन्यभावें ॥ ९२ ॥ ब्रह्मनिष्ठ आणि शास्त्रज्ञ ॥ तेंही गुरुत्वें सर्वत्र लक्षण ॥ मागां निरूपिलें संपूर्ण ॥
तेचि खुण जाणावी ॥९३॥ यदर्थीं स्वयें बोलतसे श्रुती ॥ तेही ऐका रघुपती ॥ तें लक्षण जाणोनि गुरुप्रती ॥ शरण
होती अनन्यभावें॥९४॥श्रुती ॥ तद्विज्ञानार्थंसगुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिंश्रोत्रियंब्रह्मनिष्ठमितिआचार्यवान्पुरुषो
वेदेति ॥ नैषातर्केणमतिरापनेयाप्रोक्तान्येनैवसुज्ञानायप्रेष्ठेत्याद्याश्रुतयः॥७॥भगवताउक्तं॥तस्माद्गुरुंप्रपद्येतजिज्ञा-
सुःश्रेयउत्तमं ॥ शाब्देपरेचनिष्णातंब्रह्मण्युपसमाश्रयं ॥ ८ ॥ टीका ॥ जिज्ञासा[1] वरी जे अंतःकरणा ॥ जो ई-
श्वर जाणावा सर्व प्रयत्ना ॥ तेंव्हां सद्गुरूचिया चरणा ॥ हस्ती उपाहरणा[2] घेऊनि शरण ॥ ९५ ॥ तया गुरूचें
ऐसें लक्षण ॥ श्रोत्रिय शब्दें शास्त्रज्ञ ॥ ब्रह्मनिष्ठत्वें ब्रह्मनिष्ठ जाण ॥ व्हावें शरण तयासीं ॥ ९६ ॥ जयासिं
असे सद्गुरु भेटला ॥ तो आत्मवेत्ता बोलिला ॥ सद्गुरुवीण तो आंधळा ॥ जाणे कळा सर्वहीजरी ॥ ९७ ॥
ऐसीया शरण जावें गुरुसीं ॥ तयासिं भजावें सर्वस्वेसीं ॥ तोचि उपासनीय यथार्थेंसीं ॥ होय भाविकांसीं
निश्चय ॥ ९८ ॥ सज्जनसंपर्कें[3]करूनि गुरुभजन ॥ शास्त्रींहि ऐसें लक्षण ॥ गुरुमुखें महावाक्यश्रवण ॥ य-
थालक्षणें करावें ॥९९॥ तेणें नव्हे जरी साक्षात्कार ॥ उठी असंभावनादि संभार॥तरी करावा वेदांतविचार ॥

१ जाणण्याचीइच्छा. २ नजराणा, भेट. ३ समागमानें.

अथवा शास्त्र अध्यात्म जें ॥ ४०० ॥ ऐसें शास्त्र सज्जनसंपर्केंकरून ॥ तें वैराग्यपूर्वक बोलिजे जाण ॥ सदाचार प्रवृत्तीचि खुण ॥ तेही पूर्ण ऐसी असे ॥ १ ॥ श्रवण करी यथालक्षणें ॥ जें अद्वैत ब्रम्हीं तात्पर्यावधारण ॥ सर्वेंचि युक्तिकरूनि अनुचिंतन ॥ हेंचि मनन जाणावें ॥ २ ॥ यद्रूप जो सदाचारप्रवृत्ती॥ वर्ते जयासीं सर्वार्थी॥ कां यथोचित वर्णाश्रम करिती ॥ तरी बहुप्रीति श्रवणमननीं ॥ ३ ॥ सर्वांचा संग त्याग करी ॥ सद्गुरूचा संग दृढधरी ॥ नित्यानित्य विवेक अंतरीं ॥ जागे सर्वांपरी गृहपति जैसा ॥ ४ ॥ गृहाचिं उचितानुचितें ॥ अनुकूळ प्रतिकूळ समस्तें ॥ जाणे जैसा सुनिश्चितें ॥ तैसा पंडित सर्वार्थी ॥ ५ ॥ किंबहुना गा रघुनाथा ॥ प्रथम भूमिची सांगीतली कथा ॥ वैराग्यादिकीं समस्तां ॥ तेंचि तत्वतां वर्ते येथें ॥६॥ जेथें इया चिन्हाचि संपत्ती ॥ तेचि विचारणा ते भूमिका निश्चिती ॥ आतां तिसरीचि स्वरूपास्थिती ॥ येकाग्र चित्तीं परिसपां ॥ ७ ॥ संमतिवासिष्ठ ॥ विचारणाशुभेच्छाभ्यामिंद्रियार्थेंष्वसक्तता ॥ यत्रसातनुताभावात्प्रोच्यतेतनुमानसा ॥ २५ ॥ टीका ॥ शुभेच्छा विचारणा भूमिसीं ॥ अभ्यास करितां अहिर्निशीं ॥ विषयीं विरक्तता निश्चयेसीं ॥ इये भूमिसीं दृढ होय ॥ ८ ॥ हें वैराग्यभूमिसी झालेंचि असे ॥ परी येथें अतिशय दृढ बैसे ॥ ह्मणोनि नव्हे पुनरुक्त ऐसें ॥ बाणलेसें होइजे येथें ॥ ९ ॥ पूर्व भूमिसीं झालें श्रवणमनन ॥ तत्परिपाकें करी निदिध्यासन ॥ निदिध्यासें मन होय क्षीण ॥ ह्मणोनि अभिधान तनुमानसा ॥ ४१० ॥ अगा जे कां अध्यात्मशास्त्रें

१ श्रवण. २ मनन. ३ परिणामानें.

असती ॥ तेथील निश्चित वाक्यें जे बोलती ॥ त्याचा अर्थ ब्रह्मात्म्यैक्य स्वयंज्योती ॥ तेथें विमळ मति निक्षेपीं सदा ॥ ११ ॥ अथवा वेदांतशास्त्रींचें महावाक्य ॥ जें कीं बोधी ब्रह्मात्म्यैक्य ॥ तोचि पूर्ण अर्थ सम्यक ॥ परब्रह्म येक सच्चिदानंद ॥ १२ ॥ पूर्वील भूमिकाकरून ॥ शुद्ध बुद्धी झाली जे निर्वाण ॥ जे कीं विक्षेप निद्राशून्य ॥ तियेतें ब्रह्मीं स्वयें लीन करी ॥ १३ ॥ विजातीय जे देहादि समस्त ॥ ते तिरस्कारूनियां प्रपंचजात ॥ परब्रह्मीं बुद्धि निक्षेपित ॥ सावचित्त होऊनियां ॥ १४ ॥ ब्रह्म ध्येय आपण ध्याता ॥ हे विसरोनियां द्वैतकथा ॥ आपणा ब्रह्मेसीं ऐक्यता ॥ सुखस्वरूपता राहाणें जेथें ॥ १५ ॥ ययाचें नाम निदिध्यासन ॥ द्वैताभावें स्वरूपीं स्थिरावण ॥ झालिया तोचि साक्षात्कार पुर्ण॥ येथें तें न्यून इतुकेंची॥ १६॥ बुद्धि स्वरूपिं राहे ॥ मागें सवेंचि उठोनि जाय ॥ देहादिक स्फुरत आहे ॥ मागुता होय सावधान ॥ १७ ॥ पुनरपि सावध होऊनि ॥ देहादि प्रपंच तिरस्कारुनी ॥ बुद्धीतें मागुते वळुनी ॥ ब्रह्मीं सुलीन स्वयें करी ॥ १८॥ मागुती बुद्धी तेथूनि उठी ॥ प्रपंचाकार होय दृष्टी ॥ ते मागुती वळूनि ब्रह्मीं नेहटी ॥ जाण जगजेठी निदिध्यासन हें ॥ १९ ॥ निदिध्यासन जे अवस्था ॥ तेचि तनुमानसा गा रघुनाथा ॥ अभ्यासें मन पावे तनुता ॥ ह्मणोनि तत्वतां तनुमानसा ॥ ४२० ॥ मनाचें तनुत्व जें ऐसें ॥ प्रपंचानुसंधान न्यून होतसे॥ ब्रह्माकारें परिणमतसे ॥ तनुत्व ऐसें जाण रामा ॥ २१ ॥ प्रपंचाकारें जें बहुपण ॥ तेंचि मनाचें पुष्टपण ॥ प्रपंचक्षयें क्षीणप-

१ लावावी, लीनकरावी. २ लावणें.

ण ॥ जाण ह्मण रघुवर्या ॥ २२ ॥ ऐसें निदिध्यासन करितां ॥ भूमिका पाविजे गा रघुनाथा ॥ तेचि तनुमानसा तत्वतां ॥ होय सर्वथा तिसरी भूमि ॥ २३ ॥ तंव रघुनाथ ह्मणती श्रीगुरुमूर्ति ॥ परियेसी माझी येक विनंती ॥ गुरुकृपा झालिया कां बाधिती ॥ ज्या बोलिजेती असंभावना ॥२४॥ असंभावना विपरीत भावना ॥ यया कां उठती कोण्या कारणा॥ साक्षात्कारासी अतिदारुणा ॥ होती विघ्ना विघ्नरूप ॥ २५ ॥ सद्गुरूनें दाविल्या तत्व ॥ शिष्य झालिया ब्रह्मीभूत ॥ मागुतें श्रवणमनन कां करित ॥ आणि साधित निदिध्यासन ॥ २६ ॥ हें करावया कोण कारण ॥ वस्तुप्राप्तेंही उरलें साधन ॥ तरी सांगावें हें विवंचन ॥ जेणें अज्ञान फिटे माझें ॥ ॥ २७ ॥ तंव वसिष्ठ ह्मणती गा त्रिदशाधिपती ॥ बरवें पुशिलें गा कल्याणमूर्ति ॥ तरी ऐकें सांगेन ययाची स्थिती ॥ तें येकाग्रचित्तीं परिसपां ॥२८॥ जरी सद्गुरूनें दाविल्या परब्रह्म ॥ जें कीं आत्मस्वरूप निरूपम ॥ आपणेसीं अभिन्न सर्वोत्तम ॥ परा परम निजरूप ॥ २९ ॥ तेंचि तो तेणेंचि काळें ॥ झाला पाहिजे येकेवेळे ॥ परी चित्तसंस्कारें नाकळे ॥ ह्मणोनि बैसलें असंभावनीं ॥ ४३० ॥ श्वेतकेतु आणि भृग्वादिक ॥ ययासीं साक्षात्कार तत्काळिक ॥ झाला परि तैसे विरळा देख ॥ बहुतेक ऐसेची॥३१॥इतरां सद्गुरूचे उपदेशें॥असंभावनाउकचि ज्ञान होतसे ॥ तेथें उद्भवती दोष आपैसे ॥संस्कारशेषेंपूर्वकर्माचा ॥३२॥तेणें असंभावना विपरीतभावना ॥ यया उठती अतिदारुणा ॥ तेणें साक्षात्कार सज्ञाना ॥ नव्हे जाणा अभ्यासेंही॥ ३३ ॥ हेंचि विंषद तुज-

१ विचार. २ स्पष्ट.

तुजप्रती ॥ सांगीतलें गा श्रीरघुपती ॥ आतां असंभावना कां नजाती ॥ तेही गती सांगेन ॥ ३४ ॥ असंभावना विपरीत भावना ॥ नजावया कारणें चारी रघुनंदना ॥ तीं सांगेन देईं अवधाना ॥ समाधाना पावसी जेणें ॥३५॥ तरी विषयासक्ती प्रज्ञामांद्य॥ कुतर्क विपर्ययाग्रह विशद ॥ हीं चारी कारणें असती बाध ॥ करिती द्वंद्वें साक्षात्कारा ॥ ३६ ॥ तरी हींचि सांडावयाचीं कारणें ॥ तींही परिसावीं रघुनंदनें ॥ शम दम श्रवण निदिध्यासनें ॥ भस्म क्षणें होताती ॥ ३७ ॥ संमतिश्लोक ॥ अहंब्रह्मेतिवाक्यार्थबोधोयावदृढीभवेत् ॥ शमादिसहितस्तावदभ्यसेत्श्रवणादिकं ॥ २६ ॥ टीका ॥ अहो विषयासक्ती असतां ॥ ते ब्रह्माभास नकरी सर्वथा ॥ केलिया विषयीं लुलुप्तता ॥ साक्षात्कारता कैसी होय ॥ ३८ ॥ यालागीं शम दम करिजेती ॥ जे मागां निरूपिले तुजप्रती ॥ तेचि करावे गा महामती ॥ विषयासक्ती तुटावया ॥ ३९ ॥ दुसरे प्रज्ञामांद्येचि तळमळ ॥ प्रज्ञामांद्यें अनर्थचि केवळ॥ अल्पज्ञानें करी कोल्हाळ ॥ मन निश्चळ कदा नव्हे ॥ ४४० ॥ प्रज्ञामांद्यें प्रमाणासंभावना॥प्रमाण वेद आणि सद्गुरुराणा ॥ तेथेंचि करी असंभावना॥ ह्मणे होय कीं ना प्रमाण वेद ॥ ४१ ॥ गुरुसीं मनुष्यरूपें मानी ॥ निश्चय नाहीं त्याच्या वचनीं ॥ प्रज्ञामांद्यें निश्चय मनीं ॥ नभेदे ह्मणोनि भुले ऐसा ॥ ४२ ॥ तें प्रज्ञामांद्य तुटावया ॥ श्रवण करावें गा रघुराया ॥ जेणें प्रज्ञामांद्य आपैसया ॥ जाय लया कार्यासहित॥४३॥कार्य जे कीं प्रमाणासंभावना ॥ तेणेसीं लय पावे गा रघुनंदना ॥ ह्मणोनि क-

१ बुद्धीचा मंदपणा. २ विघ्न. ३ मिथ्या कल्पना.

रावें वेदांतश्रवणा ॥गुरुवचना विश्वास होय ॥ ४४ ॥ मग महावाक्य गुरूच्याठाईं॥ निश्चय बाणे जाण अनपा-
यी ॥ तीक्ष्ण प्रज्ञा होय पाहीं ॥ साधे सर्वही कार्य आपुलें ॥ ४५ ॥ तिसरें विघ्न गा रघुपती ॥ कुतर्क ऐसें
जया बोलती ॥ तेणें प्रमेयासंभावनाहोती ॥ नाश करिती सर्वस्वाचा ॥ ४६ ॥ प्रमाण जें कीं महावाक्य॥ जेणें
जाणिजे प्रमेय सम्यक ॥ प्रमेय तेंचि ब्रह्म येक ॥ प्रमेय निष्टंक त्यातें ह्मणती ॥ ४७ ॥ तेंचि तें होय कीं नव्हे
ह्मणती ॥ ऐसे कुतर्क नाना करिती ॥ ब्रह्म तें अप्राप्त सर्वार्थी ॥ साधनें करिती अनेक त्यासीं ॥ ४८ ॥ नाना
साधनीं जें नव्हे प्राप्त ॥ तें अनायासें आह्मां केंसें अनुभूत ॥ तरी तें होय कीं नव्हे ऐसें ह्मणत ॥ जाण निश्चित
कुतर्क हा ॥ ४९ ॥ याचेंचि नाम प्रमेयासंभावना ॥ येणें साक्षात्कार नव्हे जाणा ॥ साक्षात्कार तेथें असंभाव-
ना ॥ आनंदघना केविं भेटे ॥४५०॥ हें तोडावयाचें साधन ॥ करावें युक्तिकरूनि अनुचिंतन ॥ तेंही करावें गा
अनुदिन ॥ अनालस्य सर्वदां ॥५१॥ युक्ति विचारितां सूक्ष्मदृष्टी ॥ तंव होय सर्वत्र ब्रह्मेसीं भेटी ॥ युक्तिविचारें
पडे मिठी ॥ ब्रह्मात्मैक्य दृष्टी तेंचि भासे॥ ५२ ॥ तेणें स्वस्वरूपीं निर्धार होय॥ह्मणे मज ब्रह्मेसीं ऐक्य आहे ॥
ब्रह्म मी तें हेंचि होय ॥ कुतर्क आहे व्यर्थ सर्व ॥५३॥ ऐसा निश्चय दृढ बाणला ॥ परी विपर्ययाग्रह असे उर-
ला ॥ तोही जावया असे केला ॥ अभ्यास भला निदिध्यासन ॥ ५४ ॥ विपर्ययाग्रह ह्मणिजे ऐसा ॥ तोही
ऐकें जगन्निवासा ॥ ब्रह्मेवीण भासे तो विपर्यय ऐसा ॥ देहादि ठसा प्रपंचजात ॥ ५५ ॥ देहीं अहमात्मा

१ निश्चयेंकरून. २ आळस टाकून.

हा आग्रह करी ॥ पुत्रादिक माझें हें दृढ धरी ॥ तो विपर्ययाग्रह गा असुरारी ॥ त्यालागीं करी निदिध्यासन ॥ ५६ ॥ देहादि प्रपंच जेथें स्फुरत ॥ तेथें प्रपंचाकार होय चित्त ॥ साक्षात्कार कैंचा तेथ ॥ ह्मणोनि करिजेत निदिध्यासन ॥ ५७ ॥ निदिध्यासनाचें लक्षण॥विपरीताचें करावें परिवर्जन[1] ॥ येकनिष्ठ करोनि अंतःकरण ॥ करावें लीन स्वस्वरूपीं ॥ ५८ ॥ येणें विपर्ययाग्रह समूळ तुटे ॥ आणि हे विपरीतभावना निःशेष आटे ॥ केवळ स्वस्वरूपचि प्रगटे ॥ त्या नामें गोमटें साक्षात्कार ॥ ५९ ॥ यालागीं गा रघुनाथा ॥ श्रवणादि साधनें करावीं सर्वथा ॥ येणें असंभावनादि तत्वतां ॥ जाती भस्मांता पूर्ण ब्रह्मीं ॥ ४६० ॥ ऐसें ऐकोनि रघुपती ॥ गुरुचरणीं मस्तक ठेविती ॥ ह्मणे अतिसुख पावलों जी सुखमूर्ति ॥ नाहीं चित्तीं संशय कांहीं ॥ ६१ ॥ आतां भूमिकेचें लक्षण ॥ सद्गुरुराया सांग संपूर्ण ॥ आणि उर्वरितां[2] भूमिकांचें कथन ॥ कृपा करूनि वदावेंजी ॥ ६२ ॥ मग संतोषोनि वसिष्ठऋषि ॥ श्रीराम आलिंगी सप्रेमेसी॥ह्मणे धन्य ते माउलीची कुसी ॥ परब्रह्म पोटासीं जियेच्या आलें ॥ ६३ ॥ जेणें धन्य हा सूर्यान्वय[3] ॥ जेणें धन्य माझें आचार्य ॥ जेणें कुळींचें ज्ञानगौरववर्य ॥ तो रघुवर्य मज शिष्य ॥ ६४ ॥ ऐसें बोलोनि सुखावला ॥ पुनरपि आनंदें बोलूं लागला ॥ ह्मणे तृतीय भूमीकेचा निर्वाळा ॥ तुज कथिला फाडोवाडें[4] ॥६५॥ जो सर्वदां निदिध्यासन करी ॥ तो तृतीय भूमिकागत निर्धारी ॥ व्युत्थानकाळीं राहाटती परी ॥ ऐकें रावणारी सांगेन ॥ ६६ ॥

१ त्याग. २ राहिलेल्या. ३ सूर्यवंश. ४ स्पष्टपणें.

॥ संमतिवासिष्ठ ॥ तापसाश्रमविश्रांतैरध्यात्मकथनक्रमैः ॥ संसारानिंदकैस्तद्वद्वैराग्यकथनक्रमैः॥२७॥शिला-
शय्यासनासीनोजरयत्यांपुरातनं ॥ वनावलिविहारेणचित्तोपशमशोभिना॥२८॥ असंगसुखसौख्येनकालंनय-
तिर्नीतिमान् ॥ अभ्यासात्साधुशास्त्राणांकारणात्पुण्यकर्मणां ॥ जंतोर्यथावदेवेयंवस्तुदृष्टिःप्रसीदति ॥२९॥
टीका ॥ तापसाचे जे आश्रम ॥ जे कीं वानप्रस्थादि उत्तम ॥ जेथें तपादि साधनाचे संभ्रम ॥ करूनि विश्राम
पावले जेथें ॥ ६७ ॥ तेथें परब्रह्मीं जे निवाले ॥ ते ब्रह्मवेत्ते ह्मणितले ॥ अध्यात्मनिष्ठ तेचि बोलिले॥येक
वेगळे नामभेदें ॥ ६८ ॥ तयाचेनिसंगेंकरून ॥ अध्यात्मशास्त्र करिती कथन ॥ तेंचि जाणपां निदिध्यास-
न ॥ दुसरें जाण साधुसंगें ॥ ६९ ॥ अध्यात्मशास्त्राचें श्रवणकथन ॥ अथवा स्वयें कीजे निर्माण ॥ तें सर्वही
जाण निंदिध्यासन ॥ ह्मणोनि सज्ञान हेंचि करिती ॥ ४७० ॥तीहीं अध्यात्मशास्त्रें कैसीं ॥ जेणें निःशेष नि-
वृत्ति संसारासीं ॥ उपपांदिती जे वैराग्यासीं ॥ आणि ब्रह्मासि आत्मैक्य ॥ ७१ ॥ तरी दोन्ही निदिध्यास-
नें कैसीं ॥ तेंही सांगो गा हृषीकेशी ॥ तरी दोहींचिं लक्षणें ऐसीं ॥ जाण मानसीं सांगेन तें ॥ ७२ ॥ निदि-
ध्यासनाचें ऐसें लक्षण ॥ प्रपंचप्रत्ययाचें तिरस्कारण ॥ परब्रह्माचें आत्मैक्यग्रहण ॥ तैसेंचि जाण अध्यात्म-
शास्त्र ॥ ७३ ॥ तेथेंही संसारानिंदन वैरस्यता ॥ वैराग्यें उपरंती इंद्रियार्था ॥ ब्रह्मनिरूपणें होय तद्रूपता ॥
तेंचि तत्वतां निदिध्यासन ॥ ७४ ॥ ह्मणोनि स्वआयुष्य जें विस्रत ॥ तेंणेंकरूनि असे क्षिपित ॥

१ खटपट,. व्यवहार. २ प्रतिपादन करितात. ३ विरक्ती. ४ विषयनिवृत्ति.

हें नसतां वनावळी हिंडत ॥ सुख पावती नानापरी ॥७५॥ वन देखोनि अतिप्रीति॥ तेणें संतोष पावे चित्तीं॥ ह्मणऊनियां वनविहार करिती ॥ जेणें उपशांती स्वयें पावे ॥ ७६ ॥ समाधानासीं विक्षेप करी ॥ तैसें वनविहरण नकरी ॥ वनीं येकांती बैसे शिळेवरी ॥ शयन करी शिळापृष्ठीं ॥ ७७ ॥ अथवा असंग जो कां आत्माराम ॥ त्याचेनिसंगें पावे विश्राम ॥ ऐसा नीतिमंत पुरुषोत्तम ॥ काळसंभ्रम अतिक्रमी ॥ ७८ ॥ कां साधुशास्त्राचेनि अभ्यासें ॥ अथवा पुण्यकर्मानुसारवशें ॥ वस्तुदृष्टी स्वस्थ होतसे ॥ सावकाशें ये भूमिसीं॥७९॥ ज्ञानाची सीमा तृतीय भूमिसी ॥ चाड याह्वनि नाहीं विवेकासीं ॥ मग स्वरूपस्थिती उत्तर भूमिसीं ॥ त्याही तुजपासीं सांगेन ॥४८० ॥ आणिकही अवांतर भेद असती॥तेही सांगेन तुजप्रती ॥ तृतीय भूमिसीं अनुभविती ॥ ऐक स्थिती विविध त्यांची ॥ ८१ ॥ एक श्रेष्ठ एक सामान्य ॥ ऐसें द्विविध असंगपण ॥ दोन्ही बाणती तया संपूर्ण ॥ ऐक चिन्ह सामान्याचें ॥ ८२ ॥ सामान्य असंसक्तता ते कैसी ॥ते आधीं ऐक गा हृषीकेशी ॥ जे चिन्हे तनुमानसेसीं ॥ तिसरे भूमिसीं होताती ॥ ८३ ॥ संमतिवासिष्ठ ॥ तृतीयांभूमिकांप्राप्यबुद्धोनुभवति स्वयं ॥ द्विःप्रकारमसंसंगंतस्यभेदमिमंशृणु ॥ ३० ॥ द्विविधोयमसंसंगःसामान्यःश्रेष्ठएवच ॥ नाहंभोक्ताचकर्ताचनबाध्योनचबाधकः ॥ ३१ ॥ इत्यसज्जनमर्थेषुसामान्यासंगनामकं ॥ प्राक्कर्मनिर्मितंसर्वमीश्वराधीनमेववा ॥ ॥ ३२ ॥ सुखंवायदिवादुःखंकैवात्रममकर्तृता ॥ भोगाभोगामहारोगाःसंपदःपरमापदः ॥ ३३ ॥ वियोगा-

१ आवड. २ अन्य.

यैवसंयोगाआधयोव्याधयोधियः ॥ कालःकवलनाद्युक्तसर्वांभावान्विनाशयन् ॥ ३४ ॥ तिष्ठतीतिविचारोयःसा-मान्योसावसंगमः ॥ ३५ ॥ टीका ॥ ह्मणे मी सर्वथा नव्हे कर्ता ॥ कां जें निष्क्रिय मी असे तत्वतां ॥ क्रिया आणि कर्तव्यता ॥ तें तंव माथां अहंकाराच्या ॥ ८४ ॥ अहो अहंकार जळे जयाचा ॥ त्यासी बाध कोण क-र्तव्यतेचा ॥ तो क्रिया नाकर्ता तियेचा ॥ अकर्ता सर्वांचा अक्रियपणें ॥ ८५ ॥ ऐसें भगवद्गीतेंतही श्रीकृष्ण ॥ अर्जुनाप्रति बोलिले वचन ॥ जें अहंकारेवीण कर्तेपण ॥ पाप पुण्यें लिंपिजेना ॥ ८६ ॥ संमतिगीता ॥ यस्य-नाहंकृतोभावोबुद्धिर्यस्यनलिप्यते ॥ हत्वापिसइमाँल्लोकान्नहंतिननिबध्यते ॥ ३६ ॥ टीका ॥ अहंकारेवीण क्रियाचरण॥तें सर्वथा नेदी कर्तेपण ॥ यालागीं ह्मणे मी अकर्ता पूर्ण ॥ अक्रिय[1] ह्मणऊनि सर्वथा ॥८७॥ तें-साचि ह्मणे मी अभोक्ता ॥ भोग भोगूनि अलिप्तता ॥ सर्वत्र अहंकारव्यतिरिक्तता[2] ॥ हेचि ज्ञातृता जाणावी॥ ॥ ८८ ॥ नित्य तृप्त ह्मणउनी ॥ अभोक्ता मी जनीं वनीं ॥ मी बाधक नव्हे भरवसेनी ॥ निर्व्यापार ह्मणोनि कोणा नबाधी ॥ ८९ ॥ आणि बाध्य जें कीं दृश्यजात ॥ तेंही मी नव्हे कदाचित ॥ ऐसें पदार्थमात्रीं असंगत्व ॥ तेंचि निश्चित सामान्यत्वें ॥४९० ॥ हेंचि सामान्य असे असंगता ॥ जाण निश्चित गा रघुनाथा॥ करूनि कैसा अकर्ता ॥ पुससी तरी आतां सांगेन ॥९१ ॥ ह्मणे सुख अथवा दुःख ॥ हें पूर्वकर्मेंचि होय देख ॥ हें अनीश्वर-वादी मीमांसक ॥ बोलती सकळिक येणें न्यायें ॥ ९२ ॥ ईश्वरवादी याचियानुमतें ॥ सर्व ईश्वराधीन वर्तत ॥

१ क्रियाविरहीत. २ वेगळेपणा.

सर्वही ईश्वरेंचि करिजेत ॥ मी कोण येथें कर्ता भोक्ता ॥ ९३॥ ह्मणे भोग अभोग विस्तार ॥ हे सकळही रोंगाचा संभार ॥ जे कीं परिणामीं संतापकर ॥ दुःख थोर देताती ॥ ९४ ॥ तैसी जितुकी संपत्तीजात॥ तितुकीहि विपत्ती समस्त ॥ परम आपदा स्वयें मानित॥ दुःख देत सर्वांपरी ॥ ९५ ॥ संपत्ति अर्जितां दुःख कोटी ॥ रक्षितां होय प्राणेंसी आटी ॥ व्यय होतां मरणेसिं भेटी ॥ होय आटाटी दुःखाचि पैं॥ ९६ ॥ तैसा प्रिय वस्तूचा जो संयोग ॥ त्याचा होतांचि पैं वियोग ॥ वियोगीं दुःख अभंग॥ नित्य रोग तळमळेचा॥९७॥ आधि आणि व्याधि दोन्ही ॥ आधि मनोदुःख भरवसेनी ॥ व्याधी शरीररोग निर्वाणीं ॥ दुःख जनीं वनीं देताती ॥ ९८ ॥ बुद्धिमंत अतिक्लेश देखती॥ ते जळजळ नवाहती चित्तीं ॥ सर्वही भाव काळें नासिजेती॥ हे विचारस्थिती सर्वदा वर्ते ॥९९॥ सामान्यकाळें जे असंगतता ॥ ते एवंविचाररूप गा रघुनाथा ॥ आतां सांगतों श्रेष्ठ असंगतता ॥ ऐक आतां नित्यानंदा ॥५००॥ संमतिवासिष्ठ ॥ अनेनक्रमयोगेनसंयोगेनमहात्मनां ॥ वियोगेनासतामंतप्रयोगेनात्मसंविदा ॥ ३७ ॥ पौरुषेणप्रयत्नेनसतताभ्यासयोगतः ॥ करामलकवद्वस्तुन्याग-तेस्फुटतांदृढं ॥ ३८ ॥ नाहंकर्तेश्वरः कर्ताकर्मवाप्राक्तनंमम ॥ कृत्वादूरतरेनूनमितिशब्दार्थभावनं ॥ ३९ ॥ संसारांबुनिधेःपारेसारेपरमकारणे ॥ यस्मिन्मौनेनसंशांततत्श्रेष्ठासंगउच्यते ॥४०॥ टीका ॥ अगा पूर्वोक्त अभ्यासेंकरून ॥ करितां असंगसंगवर्जन ॥ सत्संगेंकरूनि निर्वाण ॥ करितां विचारण आत्मस्वरूप ॥ १ ॥ आत्म-

१ दुःख. २ मिळवितांना.

विचारणेचा प्रयोग ॥ करितां पुरुषप्रयत्न अभंग ॥ निरंतर अभ्यास निःसंग ॥ करितां सांग थोरावला ॥ २॥
जैसा कीं स्फुटतर करतळामळ ॥ तैसी वस्तु कळे जया सकळ ॥ स्फुट स्वरूपचि भासे निर्मळ ॥ टाकी तळम-
ळ तेणेंकरुनी ॥ ३ ॥ कर्तेपणाचें आपुले माथां॥ वोझें नघेई तो सर्वथा ॥ आणि ईश्वर सर्वांचा नियंता ॥ तो-
चि कर्ता हेंही नव्हे ॥४॥ अथवा प्राक्तनकर्मेंकरून ॥ नमानी सर्व भोग होती ते जाण ॥ टाकी शब्दार्थसंधा-
न ॥ राहे निर्वाण स्वस्वरूपिं ॥ ५ ॥ प्राक्तनकर्म देहाच्या माथां ॥ आणि देहादिकर्मैं बाधित सर्वथा ॥ ब्रह्म-
स्वरूप मी कर्मांचा भोक्ता ॥ नव्हेचि तत्वतां ऐसाचि बोध॥६॥ तें स्वस्वरूप कैसें असे ॥ सर्वही जग त्यामा-
जी वसे ॥ सर्वांचें कारण सर्वांशें ॥ जें कीं ननासे काळत्रंई ॥ ७ ॥ देशें काळें जें अबाधित ॥ जें कीं संसारांबु-
निधीचा प्रांत ॥ जें कीं सर्व प्रपंचातीत ॥ स्वप्रकाशमंत परब्रह्म ॥ ८ ॥ ते ब्रह्मस्वरूपिं मौनवृत्ती ॥ शांतासनें
राहाणें गा सुमती ॥ श्रेष्ठांगसंग त्यातें ह्मणती ॥ स्वरूपस्थिती जिये नाम ॥ ९ ॥ प्रपंचाचेनि तिरस्कारें ॥
स्वस्वरूपिं राहाणें एकाकारें ॥ तो श्रेष्ट असंग जाण निर्धारें ॥ रघुवीरें आकर्णिजे ॥ ५१० ॥ आणि श्रेष्ठ सं-
गाचें लक्षण ॥ ऐक रघुनाथा संपूर्ण ॥ परब्रह्मीं नित्य अवस्थान ॥ सचिद्घन तें कैसें ॥ ११ ॥ संमतिवासिष्ठ ॥
यन्नांतर्नबहिर्नाधोनोर्ध्वंनाशासुनांबरे ॥ नपदार्थैनापदार्थैनजडेननचचेतने ॥ ४१ ॥ आश्रितंभासनंशांतमभा-
सनमभावनं ॥ अनाद्यंतमजं कांतंतच्छ्रेष्ठासंगउच्यते ॥ ४२ ॥ संतोषामोदमधुरःसत्कार्यामलपल्लवः ॥ चित्त-

१ हाताचाआंबळा. २ स्थिती.

नालाग्रसंलीनोविघ्नकंटकसंकटः ॥ ४३ ॥ विवेकपद्मरूढोंतर्विवेकार्कविकासितः ॥ फलंफलत्यसंसर्गात्तृतीयाभूमिकास्मृता ॥ ४४ ॥ टीका ॥ जें कीं अंतर ह्मणतां परिछिन्न ॥ बाह्य ह्मणतां दृश्यमान॥एवं तें अंतर्बाह्यविहीन ॥ परिपूर्ण व्यापकत्व जें ॥ १२ ॥ अधः ह्मणतां ऊर्ध्वभावो ॥ ऊर्ध्व ह्मणतां अधिं अभावो ॥ एवं अध ना ऊर्ध्व नाहीं निर्वाहो ॥ व्यापक पहाहो गगन जैसें ॥१३॥ महाप्रळयाचें उदक ॥ कोण करी ऊर्ध्व अधलेख ॥ तेंचि तें सबरांभरित येक ॥ नाहीं अनेक कल्पावया ॥ १४ ॥ ना ते पृथ्वी ना तें अंबर ॥ दिशा विदिशा देशांतर ॥ ना तें नव्हे पदार्थाकार ॥ अपदार्थसार तेंही नव्हे ॥ १५ ॥ जड ना तें चेतन ॥ नाहीं जडाजडीं अवस्थान ॥ दोही नहोनि जें संपूर्ण ॥ येकलें जाण नित्यपणें ॥ १६ ॥ चेतना अचेतना जें नफावे ॥ जडाजडीं जें नघेववे ॥ सर्वांचें भासक जें स्वभावें ॥ कोणी नाभिभवे अनादिपणें ॥ १७ ॥ सर्वांचें जें आश्रयभूत ॥ ह्मणऊनि सर्वांसी नभासत ॥ जैसें मातेसीं नेणे उदरस्थ ॥ तेंचि समस्त प्रकाशी ॥ १८ ॥ तैसें सकळांचें भासक होय ॥ त्यातें नभासती ना नेणति सोय ॥ तें भावांवया योग्यही नव्हे ॥ निराकार स्वयें ह्मणऊनियां ॥१९॥ विद्यमानेंही नभासे कोणासीं ॥ ह्मणोनि अभावन नाम जयासीं ॥ आद्यंतविहीन सर्वांसिं ॥ विकारासीं उदासपणें ॥ ५२० ॥ निर्विकारत्वें शांत बोलिजे ॥ निरंशपणें विकार नेणिजे ॥ अपरिणामीं गगन सहजें ॥ घेपें दीजे येकलेनी ॥ २१ ॥ जन्ममरणशून्य अजत्वें ॥ स्वप्रकाशमंत स्वप्रकाशत्वें ॥ तद्रूप राहाणें जें आत्मत्वें॥

१ नाशिवंत, भेद. २ व्यापक, अंतर्बाह्य. ३ आकाश. ४ कल्पावया.

जाण निश्चित श्रेष्ठसंग॥ २२ ॥ ऐसा तो परब्रह्ममूर्ति ॥ देहीं असोनि नेणे देहस्थिती ॥ संतोषामोद मधुरगति॥ ऐक विुत्पत्ती यया पदाची ॥२३॥ संतोष ह्मणिजे अतिशय तृप्ती ॥ आणिकांची अपेक्षा नकरिती ॥ तेणें होय हर्षाची उन्नती ॥ तेणें घमघमती मकरंदु जैसा ॥२४॥ तोचि स्वयें ज्ञानकल्पतरू ॥ सत्कर्मा फळपल्लवीं ज्या विस्तारू ॥ चित्तनाळांतर्गत लीन प्रचरु ॥ ह्मणोनि विघ्नभारु नबाधि जया ॥२५॥ ज्ञानफळें असे फळला ॥ इंद्रियपत्रीं विवेकार्क प्रकाशला ॥ वैराग्यपुष्पीं वोतंबरला ॥ अतिशोभला पुष्पीं फळीं ॥२६॥ तृतीय भूमिकेचा आळां ॥ विस्तार पावला फुलीं फळां ॥ हे लक्षणीं तरणीवंशभूपाळा ॥ तमाळनीळा रघुनाथा ॥२७॥ हें तृतीय भूमिकेचें लक्षण ॥ तुजप्रती विस्तारें केलें कथन ॥ आतां चतुर्थ भूमिकेचें निरूपण ॥ सावधान परियेसीं ॥२८॥ पूर्वोक्ता या तिन्हीं अवस्था ॥ या जागृतस्थानीं त्रैलोक्यनाथा ॥ हे साधनकोटी जाण सर्वथा ॥ नव्हे तत्वतां साध्यभूमि ॥२९॥ परी हें अंतरज्ञानसाधन ॥ ह्मणोनि ज्ञानभूमिका हें अभिधान ॥ हे उपचार ह्मणिजे ज्ञान ॥ साक्षात ज्ञान हें नव्हे ॥५३०॥ आणि तिन्ही भूमिकांसि भेद भासे ॥ ह्मणोनि जागृती ह्मणिजेत असे ॥ आतां चौथीचें लक्षण ऐसें ॥ एकाग्रमानसें परिसावें ॥३१॥ संमतिवासिष्ठ ॥ भूमिकातृतीयाभ्यासाच्चित्तेर्थविरतेर्वशात ॥ सत्वात्मनिस्थितेशुद्धेसत्वापत्तिरुदाहृता ॥४५॥ टीका ॥ भूमिकात्रय अभ्यासेंकरून ॥ चित्त अनात्म पदार्थीं उदासीन ॥ विमुख विषयप्रपंचापासून ॥ चित्त प्रसन्न स्वयें हो-

_१ विवंचना, विचार. २ इच्छा. ३ विचाररूपी सूर्य. ४ लवला. ५ मायिक.

य ॥ ३२ ॥ प्रसन्न झालिया स्वयें चित्त ॥ लीन होउनी ब्रह्मीं राहत ॥ जें येकसत्तामात्र निरंजन नित्य ॥ चि-
द्धनभरित परब्रह्म ॥ ३३ ॥ विषयांचि अरुचि करुनी ॥ मन उदास होय विटे तेथुनी ॥ मग तीक्ष्णवृत्ती एकाग्र
करूनि ॥ स्वरूप निर्वाणीं घेपतसे ॥ ३४ ॥ ते तीक्ष्णवृत्ती येकाग्र करून ॥ अकस्मात अज्ञान जाय नासोन ॥
मग ब्रह्मीं पूर्णस्थिती पावोन ॥ जाय चित्तपण वृत्तित्यागें ॥ ३५ ॥ मनासिं नाहीं वस्तुग्राहकपण ॥ ह्मणोनि
वृत्तिसहित होय लीन ॥ मग स्वसंवेद्य अनुभव पूर्ण ॥ आपणा आपण वोसंडित ॥ ३६ ॥ सत्व शब्दें परब्रह्म
जाण ॥ तेथें मनासीं होय विश्रामपण ॥ तिये नाम सत्वापत्ति जाण पूर्ण ॥ हेचि खुण चतुर्थ भूमिकेची ॥ ३७ ॥
चतुर्थ भूमिका प्राप्त जयासीं ॥ तयाचीं अंतर्बाह्य चिन्हें कैसीं ॥ तेंही सांगेन हृषीकेशी ॥ ते निजमानसीं धरा-
वी गा॥३८॥ संमतिवासिष्ठ॥सम्यक्ज्ञानोदयेचित्तपूर्णचंद्रोदयोपमे॥निर्विभागमनाद्यंतयोगिनोयुक्तचेतसः॥४६॥
समंसर्वंप्रपश्यंतिचतुर्थीभूमिकांगताः ॥अद्वैतस्थैर्यमायातेद्वैतेचप्रशमंगते॥पश्यंतिस्वप्नवल्लोकंचतुर्थीभूमिकामिताः॥
॥४७॥टीका ॥ जे कीं निर्विभाग निरंजन ॥ आदि मध्य प्रांतविहीन ॥ स्वयंज्योती स्वप्रकाशमान ॥ चिद्धन
परब्रह्म ॥ ३९ ॥ निःशेष नासलिया अज्ञान ॥ उदय पावे अपरोक्षज्ञान ॥ तेणें चित्ताचें ब्रह्मीं अवस्थान ॥ होय
युक्तीनें तद्रूप ॥ ५४० ॥ येणेंचि हे रघुनाथा ॥ योगी चतुर्थ भूमि पावला तत्वतां ॥ त्याचीं अंतरचिन्हें परिस
आतां ॥ होय प्रसन्नता चित्तासिं ज्याच्या॥४१॥असंदिग्धं ज्ञान झालें असतां ॥ असंभावनादि गेल्या समस्ता॥

---

१ भरपूरहोत. २ निरंश. ३ निःसंदेह.

तेणें चित्त पावे प्रसन्नता॥ पौर्णिमें पुरता हिमांशु जेवी ॥४२॥ द्वैत तळमळ एकसरी॥गेलिया आधीं कळंकलह-
री ॥ तो चित्तशुद्धांशु परिपूर्णलहरी ॥ शोभे चिदंबरीं प्रसन्नपणें ॥ ४३ ॥ चित्त राहे सर्वदां ब्रह्मपणें ॥ हेंचि
अंतरींचें चिन्ह जाणणें ॥ बाह्य जग देखे ब्रह्मपणें ॥ समसमानें सर्वत्र ॥ ॥ ४४ ॥ अद्वैत स्थैर्यता पावलीया ॥
द्वैत निःशेष जाय लया ॥ तेव्हां स्वप्नाचिया परि लोकां यया ॥ देखे योगिया चतुर्थ भूमिसीं ॥ ४५ ॥ सत्त्वाप-
त्ति भूमिका चौथी ॥ जेथें जग देखे प्रातिभासिक स्थिती ॥ ह्मणोनि इयेतें सत्त्वापत्ति बोलती ॥ जाण रघुपती
निश्चयें॥४६॥हे चौथी भूमिका प्राप्त दशा॥ मुख्य ज्ञानभूमि हे वीरेशा॥करितां पूर्वसाधन अभ्यासा ॥ संप्रज्ञा-
त ऐसा संकेत इयेसीं ॥४७॥ पंचमीपासुनी सातवींवरी॥ तिहीं भूमिका भीतरीं ॥ निर्विकल्पाभ्यासें करी ॥
तारतम्यें वरी जीवन्मुक्ती ॥ ४८ ॥ सातवी विदेह मुक्ति जाण ॥ पुढें नाहीं तियेहुन॥ तिन्हीं अवस्था त्या सुषु-
प्तिघन ॥ विश्वभान नाहीं ह्मणउनी ॥ ४९ ॥ आतां पांचवें भूमिकेचें लक्षण ॥ सांगों रघुनाथा दे अवधान ॥
जेणें होय समाधान ॥ ब्रह्मनिर्वाण पाविजे गा ॥ ५५० ॥ संमतिवासिष्ठ ॥ दशाचतुष्टयाभ्यासादसंसर्गफला-
भृशं ॥ रूढसत्त्वचमत्काराप्रोक्तासंसक्तिनामिका ॥ ४८ ॥ टीका ॥ चहूं भूमिकांचेनि अभ्यासें ॥ सूक्ष्म ब्रह्मानंद
भोगीतसे ॥ कोणाही फळीं संसर्ग नसे ॥ फळलीच नसे जयासीं ॥ ५१ ॥ ते हे असंसक्ति नामिका ॥ पांचवी
भूमि रघुकुळटिळका ॥ इयेचें लक्षणही ऐका ॥ ब्रह्मसुखा जे पावती ॥ ५२ ॥ संमतिवासिष्ठ ॥ सक्तविशेषए-

१ चंद्र. २ सविकल्प. ३ लक्ष.

वास्तेपंचमीभूमिकांगतः ॥ जगद्विकल्पोनोदेतिचित्तस्यात्रविलोपनात् ॥ ४९ ॥ पंचमीभूमिकामेत्यसुषुप्तपदना मिका ॥ शांताशेषविशेषांशास्तिष्ठत्यद्वैतमात्रके ॥ ५० ॥ गलितद्वैतनिर्भासोमुदितोंतःप्रतापवान् ॥ सुषुप्तघनए- वास्तेपंचमीभूमिकांगतः॥५१ ॥ अंतर्मुखतयातिष्ठन्बहिर्वृत्तिपरोपिसन् ॥परिश्रांततयानित्यंनिद्रालुरिवलक्ष्यते॥ ॥५२ ॥ टीका ॥ सकळांचे निरासेंकरून ॥ केवळ सत्तामात्र उरे निरंजन ॥ तद्रूपेंचि तो असे जाण ॥ नेणे भा- न प्रपंचाचें॥ ५३ ॥ मग स्वरूपीं झाले लीन ॥ ह्मणऊनि नुदिंजे द्वैतस्वप्न ॥ सुषुप्तीचेपरि स्वरूपीं सुलीन ॥ हेचि जाण पंचमभूमिका ॥ ५४ ॥ सकळ जेकीं विशेषांश ॥ पशुपक्ष्यादिक मनुष्य ॥ ब्राह्मण क्षत्रिय शूद्र वै- श्य ॥ स्त्रीपुरुष नस्मरे तेथें ॥ ५५ ॥ केवळ अद्वैतमात्र समसमान ॥ तद्रूप राहणें तेंचि होऊन ॥ ह्मणोनि न- स्फुरे विशेष भान ॥ दृश्य क्षीण स्वरूपस्थिती ॥ ५६ ॥ द्वैतमात्र नस्फुरे जेथें ॥ केवळ अद्वैतस्थिती निश्चि त ॥ अंतरीं स्वानुभवें डुल्लत ॥ प्रबोधयुक्त ह्मणोनियां ॥ ५७ ॥ अगा सुषुप्तिचियेपरी ॥ लीन असे ब्रह्मानंद- सागरीं ॥ तेव्हां पंचमीभूमिका रावणारी ॥ तया पुरी बाणलीअसे ॥ ५८ ॥ बाह्य दृष्टी वृत्तिरूढ ऐसा दि- से ॥ देखतां ऐकतां कर्ता भासे ॥ परि तो गा अंतर्मुखें असे ॥ शांत सर्वांशें ब्रह्मदृष्टी ॥ ५९ ॥ जैसा निद्रा- भरें जो दाटला ॥ बाह्य जागृत कळे लोकांला ॥ परि इंद्रियवृत्ती असती परतल्या ॥ त्या सुख पावल्या अंत- र्मुखें ॥ ५६० ॥बाह्य कर्मीं परिशांतता ॥ अंतरसुखें सुखरूपता ॥ यालागीं निद्राळुपणें सर्वथा ॥ तैसा तत्व-

१ उत्पन्नहोतनाहीं. २ पूर्णतेनेंनिमग्न.

तां भासत ॥ ६१ ॥ अंतरीं ब्रह्मानंदसुखें भरे ॥ बाह्य व्यवहार ऐसा स्फुरे ॥ तो पंचमीभूमिका निर्धारें ॥ ज्ञानद्वारें पावला॥६२॥इहीं लक्षणीं जो अळंकृत ॥ तोचि तो पंचमीभूमिकागत॥ आतां षष्ठीचें लक्षण इत्थंभूत ॥ सावचित्त परियेसी ॥ ६३ ॥ संमतिवासिष्ठ ॥ भूमिकापंचकाभ्यासात्स्वात्मानुमतयादृढं ॥ अभ्यंतराणांबाह्यानांपदार्थानामभावना ॥ ५३ ॥ टीका ॥ भूमिकापंचकाचेनि अभ्यासें ॥ स्वस्वरूपीं रमतां विशेषें ॥ दृढतर स्थिती स्वरूपीं बैसे ॥ तेणें नस्पर्शे पदार्थजात ॥ ६४ ॥ अंतरीं मन बुद्धी अहंकार ॥ काम क्रोध मद मत्सर॥ दंभ लोभादि वासनासंभार ॥ नस्पर्शे अंतर इत्यादिकां ॥ ६५ ॥ बाह्य घटपटादि समस्त ॥ किंबहुना विश्वपदार्थजात ॥ तें कांहीं नस्मरे किंचित ॥ स्वयें डुल्लत ब्रह्मानंदें ॥ ६६ ॥ हे पदार्थभाविनी षष्ठीभूमिका ॥ जाण तूं निश्चयें रघुकुळटिळका ॥ पदार्थमात्राचें अभावन देखा ॥ येक येकाहूनि अधिक ॥ ६७ ॥ आतां षष्ठीभूमिका प्राप्त जयासीं ॥ तयाचें स्वस्वरूप परियेसीं ॥ ऐकतां चमत्कार चित्तासि ॥ वाटे सर्वांसीं रघुराया ॥६८॥ संमतिवासिष्ठ ॥ यत्रनासन्नसद्रूपोनाहंनाप्यनहंकृतिः ॥ केवलंक्षीणमननआस्तेऽद्वैतैक्यमागतः ॥ ५४ ॥ निर्ग्रंथिशांतसंदेहोजीवन्मुक्तोविभावनः ॥ अनिर्वाणोपिनिर्वाणश्चित्रदीपइवस्थितः ॥ ५५ ॥ अंतःशून्योबहिःशून्यःशून्यःकुंभइवांबरे ॥ अंतःपूर्णोबहिःपूर्णःपूर्णकुंभइवार्णवे ॥ ५६ ॥ टीका ॥ तरी इये षष्ठी भूमीच्याठायीं ॥ योगियांचें ऐसें चिन्ह पाहीं ॥ तो असद्रूप नव्हे कांहीं ॥ निपट नाहीं ह्मणोनियां ॥ ६९ ॥ व्यवहार सर्व क-

१ आभास. २ अगदीं, समूळ.

रितां दिसे ॥ तरी तो असद्रूप ह्मणतां कैसें ॥ ह्मणोनि निर्धारिजे ऐसें ॥ तरी तो नस्पर्शे व्यवहारासीं ॥५७०॥ जो कीं अंतरीं सर्वदां निर्वासन ॥ तो सर्वथा व्यवहारीं नव्हे जाण ॥ बाह्य दिसे तया देहपण ॥ परी विदेही- पूर्ण निरहंकृती ॥ ७१ ॥ जरी अहंकारवंत ह्मणिजे ॥ तरी अहंकृती तया नदेखिजे ॥ आतां अहंकारशून्य बो- लिजे ॥ तरी देखिजे प्रवर्तक ॥ ७२ ॥ देहेंद्रियांचा प्रवर्तक ॥ सत्तामात्र तोचि येक ॥ अनहंकृति स्वप्रकाशक॥ नाहीं तर्क कोणी तेथें॥७३॥तरी तो काय आहे ह्मणसी ॥क्षीणमन तो परियेसी॥कल्पनाशून्य सर्वांसी॥अहंका- रासीं कैंचा ठाव ॥ ७४ ॥ अहो ज्याचें गेलें द्वैताद्वैत ॥ होऊनि ठेला उभयातीत ॥ द्वैत ह्मणतां सर्वांव्यतिरिक्त॥ केवळ उर्वरित[1] परब्रह्म ॥ ७५ ॥ नेणे बाह्यप्रपंचवार्ता ॥ अंतरीं वासनाही शून्यता ॥ ह्मणोनि तो नेणे द्वैतकथा॥ पूर्णपूर्णता परब्रह्मत्वें ॥७६॥ द्वैताद्वैत बोलावें ॥ तरी तें त्रिकाळीं नसंभवे ॥ यालागीं द्वैताद्वैत केवीं ह्मणावें ॥ ह्मणोनि नलक्षावें विश्वाभावेसी ॥ ७७ ॥ चिदचिद्ग्रंथी तुटला ॥ अहंकार तेथेंचि मावळला ॥ यालागीं तो आत्माराम झाला ॥ ह्मणऊनि गळाला संदेह त्याचा ॥ ७८ ॥ नाहीं कोणी तया भावना ॥ ह्मणऊनि नभासे- विश्वकल्पना ॥ तेथें कोण संदेह त्याचिया मना ॥ निर्वासना वर्तत ॥ ७९ ॥ ऐसा योगी जो जीवन्मुक्त ॥ दे- ह असोनि देहातीत ॥ अति निर्वाणत्वें वर्तत ॥ अहंकारातीत ह्मणऊनियां ॥ ५८० ॥ देहीं अहंबुद्धि जया ना- हीं ॥ तो देहींचा नव्हे कहीं देहीं ॥ निर्वासन सर्वदां पाहीं ॥ ह्मणउनी विदेही मुक्तपणें ॥ ८१ ॥ जैसी चित्रीं-

१ दोहींवेगळा. २ राहिलेलें.

चि दीपकळा ॥ नामरूप भासे लोकां सकळां ॥ परी दीपपणाच्या लेखाला ॥ नये देखिल्या अकर्तृत्वें॥८२॥ अभ्राचेनि वेगें चंद्रासीं॥ वेगु मानिती बाळें जैसीं ॥ तैसें कर्तृत्व जीवन्मुक्तासीं ॥ लोक पिसी मानिती॥८३॥ बाह्य देहेंद्रिय व्यवहारतां ॥ अंतरीं स्वस्वरूपिं असे स्थिरता ॥ चित्रदीपाचे परी निश्चळता ॥ कां जैसा सविता[1] जन चेष्टवी ॥८४॥अंतरीं वासनादि प्रपंच नाहीं ॥ बाह्य देहादि दृश्य नदेखे पाहीं॥ ह्मणोनि अंतर्बाह्य शून्य सर्वही ॥ नभाच्याठाईं घट जैसा॥ ८५॥ नभीं घट अंतरबाह्य रिता ॥ तैसा योगियासीं प्रपंच शून्यता ॥ स्वस्वरूपें अंतर्बाह्य पूर्णता ॥ सर्व ब्रह्मता बाणलेपणें ॥ ८६ ॥ अंतर्बाह्य वस्तुचि जयासीं ॥ ह्मणऊनि परिपूर्ण ह्मणिजे तयासीं ॥ समुद्रजळीं पूर्णता घटासीं ॥ जळ चौपासीं सर्वत्र तया ॥८७॥ ऐसें अंतर्बाह्य परब्रह्म ॥ तेथें अणुमात्र नाहीं विषम ॥ येकायेक परापरम ॥निरूपम परिपूर्णत्वें ॥ ८८ ॥ ऐसी स्वरूपस्थिती गा रघुनाथा ॥ षष्ठि भुमिसीं जाण तत्वतां ॥ तेचि पावलीया स्थीरता ॥ होय तत्वतां सप्तमी तुरीया ॥ ८९ ॥ जिये पावलिया भुमिकेसीं ॥ पावणें नाहीं गा सर्वस्वेसीं ॥ जे कीं वरिष्ठ सर्वां भूमिसीं ॥ नाहीं जियेसीं कर्तव्य कांहीं ॥५९०॥ मुख्य सुषुप्ती ते सप्तम भूमिका॥ पंचमी षष्ठि अर्धोन्मालिका ॥ चतुर्थ ते स्वप्न देखा ॥ जागर लेखा इतरातिन्ही॥९१॥ परें प्रबोधिलीयाही चिरकाळें ॥ प्रबोध न्हे तुर्यामेळें ॥ अखंड स्वरूपानंदेंचि खेळे॥ कदां नातळे[2] द्वैतप्रपंचा ॥९२॥ संमतिवासिष्ठ ॥ भूमिषष्ठींचिराभ्यासाद्भेदस्यानुपलंभतः ॥ यत्स्वभावैकनिष्ठत्वंसाज्ञेयातुर्यगागतिः ॥ ५७ ॥

१ सूर्य. २ स्पर्शकरीतनाहीं.

एषाहिजीवन्मुक्तेषुतुर्यावस्थेहविद्यते ॥ विदेहमुक्तविषयंतुर्यातीततमः परं॥५८॥टीका ॥ हे विदेहमुक्ति पैं जाण ॥ जे हे भवभूमिचें निर्वाण ॥ हें वामदेव शुकादिकां पूर्ण ॥ जें अळंकरण सर्वां भूमिचें ॥ ९३ ॥ ऋषभदेवादि सनकादिक॥जड भरत विदेही जनक ॥आह्मीं सर्वेही व्यासप्रमुख ॥ असों सम्यक सप्तमीसिं ॥ ९४ ॥ यया सप्तही भूमिका तुजप्रती ॥ सांगीतल्या श्रीरघुपती ॥ तेचि तुर्या सातवी निश्चिती॥ स्वरूपस्थिती अखंड॥९५॥ जेथें भेद नस्फुरे सर्वार्थी ॥ ऐसी स्वाभाविक निष्ठा गा रघुपती ॥ हेचि जाणपां सहजस्थिती ॥ कवी-आदि वर्तती इयेमाजी ॥ ९६ ॥ ह्मणोनि चतुर्थी पांचवी माझारी ॥ भासक झाल्या जगलहरी ॥ तो ब्र-ह्मत्वेंचि कर्मं करी ॥ द्वैतपरी असेचिना॥९७॥ ऐसा जरी कर्मं करी ॥कां निर्विकल्पें राहे अंतरीं ॥ तरी स्वरू-पस्थिती क्षणभरी ॥ नमोडोनि दुसरी नव्हे भावना ॥९८॥ कर्म केलें नकेलें दोन्हीं॥ बाधकें नव्हती तयाला-गुनी ॥ तो सकळ झाला स्वयें निर्वाणीं ॥ प्रकाशी दोन्ही बाध्यबाधकता ॥ ९९ ॥ तो देहसंगें संग न-पवे ॥ कर्म करूनि फळ नाभिभवे ॥ नकरितां प्रत्यवाय नसंभवे ॥ कोणा नफावे असंगपणें ॥ ६०० ॥ ना तुह्मी ऐसें बोलिलेती॥ देहीं असोनि नये देहसंगती ॥ तरी देह असतां जीवन्मुक्ती ॥ विदेहमुक्ती तंव नाहीं ॥ १ ॥ विदेहमुक्ती श्रेष्ठ बोलती॥तैसीच झाली जीवन्मुक्ती ॥ तेव्हां विदेहमुक्तीचि प्राप्ती ॥ करावी अंतीं जि-वन्मुक्तीं ॥ २ ॥ जरी ऐसें झालें सर्वथा ॥ तरी देहसंगें कैसी विदेहता ॥ तेथें वासिष्ठ ह्मणती गा रघुनाथा ॥ भ्रांती

१ शेवटीं. २ दोष.

चित्ता नको आणूं ॥३॥ दृढ जीवन्मुक्ति झालिया॥तेचि विदेहमुक्ती गा रघुराया॥नाहीं प्रयोजन साधावया॥ अपूर्ण तया काय असे ॥४॥ जेव्हां अपरोक्ष साक्षात्कार॥झाला तेव्हांचि तो निर्विकार॥ देहादि दृश्य सर्वसंभार॥वि-रोनि निर्विकार ब्रह्मचि झाला ॥५॥ देह त्यागिल्या त्या अधिक येईल॥कां देहअसतां ब्रह्मताजाईल ॥ काय तयाचें न्यूनहोईल॥किंवा बाधिल कर्माकर्में॥६॥ ह्मणोनि देह असतां नसतां ॥ तो तंव ब्रह्मरूपचि तत्वतां ॥ तेंचि तें गा श्रीरघुनाथा॥श्लोकार्था परियेसी॥७॥ श्लोक ॥ अद्यैवमरणंवास्तुकल्पतानिचयेथवा॥तज्ज्ञःकलंकंनाप्नोतिहेमपंक[1]गतंयथा ॥१४॥ टीका ॥ तयाच्या देहासिं मरण[1] ॥ आतांचि हो नलगतां क्षण ॥ ना सहस्त्र कल्पांतीं हो नि-धन ॥ कां स्थिरपण कोटिकल्प ॥ ८ ॥ जरी कोटिकल्पांतीं देह पडला ॥ अथवा आतांचि क्षणार्धें गेला ॥ तरो हानि लाभ नाहीं झाला ॥ असे संचला ब्रह्मत्वें ॥ ९ ॥ चिरकाळ राहिल्या पाप जडेल ॥ किंवा कर्तेप-ण आंगा येईल ॥ किंवा शीघ्र मरणें जाईल ॥ काय होईल न्यूनाधिक्य ॥ ६१० ॥ देह पडला अथवा राहि-ला ॥ शीघ्र कां कल्पांतीं वेंचला ॥ तरी कर्म नबाधि तयाला ॥ कर्तृत्वाला नातळे ॥ ११ ॥ तो प्रपंचीं असो देहसंगें ॥ नातरी कर्मेंही करो अनेगे ॥ तरी तो नमेळे कोणासंगें ॥ साक्षित्व आंगें भोगित ॥ १२ ॥ जैसें पंक[2]-गत शुद्ध सुवर्ण ॥नमळे नपालटे वर्ण ॥ अथवा कसादिकीं नसे न्यून ॥ शुद्धपण सर्वथा त्यासीं ॥ १३ ॥ नात-री पद्मपत्र[3] जळगत ॥ जळीं असोनि सर्वदां अलिप्त ॥ कां गगन जैसें असंगत ॥नाहीं खतेजतं[4] धूमादिकीं॥१४॥

१ मृत्यु. २ चिखलांतपडलेलें. ३ कमळ. ४ लिंपत.

तैसा देह राहो अथवा जावो ॥ परी देहातीता कोण संदेहो ॥ तो स्वरूपप्रतीतिचा रावो ॥ नाहीं आन भावो देहांतीं ॥ १५ ॥ तत्शब्दें ब्रह्मपूर्ण ॥ तें जाणे तो तज्ञ जाण ॥ तो देहसंगें कलंक पूर्ण ॥ नपवे क्षण येकही ॥ १६ ॥ घटीं अवलंबन घटाकाश ॥ तें घटधर्मा नातळे सावकाश ॥ घटीं उदक भरल्या वोल्हांश ॥ नपवे निःशेष सर्वथा ॥ १७ ॥ घटीं शुद्ध गंगोदक भरिलें ॥ तेणें नभ पवित्र नाहीं झालें ॥ मद्य घातल्या विटाळलें ॥ नाहीं बुजेलें तंदुलीं ॥१८॥ घृत घातल्या नाहीं सोज्वळलें ॥ दुग्धें नाहीं पुष्ट झालें ॥ अग्नींत घातल्या नाहीं जळालें ॥ चंदनें निवालें तेंही नाहीं॥१९ ॥ तैसें देहीं सत्कर्म घडो ॥अथवा प्रपंचसंग वाढो॥तीर्थी कां चांडाळ गृहीं पडो ॥ अथवा बुडो मनकर्णिकेसीं ॥ ६२० ॥ श्लोक ॥तत्तुंत्यजतुवाकाश्यांश्वपचस्यगृहेथवा ॥ ज्ञानसंप्राप्तिसमयेमुक्तोसौविगताशयः ॥ १५ ॥ टीका ॥ तो देहातीत स्वप्रकाश ॥ अद्वयानंद पूर्णपरेश ॥ सर्वसाक्षी निर्विशेष ॥ तया दोष देहत्वें कैंचा ॥२१ ॥ देहातीत साक्षीपणें ॥ असतां बाध कोण्या गुणें ॥ देह पडे विधी अविधीनें ॥ काय कारण तीर्थें अतीर्थें ॥ २२ ॥ तो तनु त्यजो कां काशियेसीं ॥ अथवा चांडाळगृहवासी ॥ परी तो सर्वथा मुक्त परियेसीं ॥ नाहीं तयासीं अन्य भाव ॥ २३ ॥ आतां अथवा कल्पांतीं ॥ पडो अथवा करो स्थिती ॥ जरी राहिलें सत्संगतीं ॥ नसतां संगती हानि काय ॥ २४ ॥ शवासीं स्त्रकचंदनादि सोहळा ॥ लेवविला अळंकारमेळा ॥ अथवा चंदनकाष्ठीं जाळिला॥कुकाष्ठीं दाहिला तरी काय॥ २५ ॥ तैसें दे-

१ स्वच्छझालें. २ प्रेताला. ३ माळा.

हसंबंधें आत्मयासीं॥कोणींच पदार्थी नालिंपे शुभाशुभासीं ॥ नव्हती जाण जीवन्मुक्तासीं॥देहाभिमानीयासिं होतील ॥ २६ ॥ जेव्हांचि झाली ज्ञानप्राप्ती ॥ तेव्हांचि मुक्त तो सर्वार्थी ॥ जयाचिया वासनेचि शांति ॥ होऊन स्थिती अखंड ॥ २७ ॥ तयाचें मनचि गा नासलें ॥ तें मनपणा नये कांहीं केलें ॥ तयाचे आशापाश तुटले ॥ अंतर्बाह्य झाले स्वतेजें सूर्यजैसा ॥२८॥ तयासीं मन असोनि तो अमन ॥ श्रवणेंचि तो अश्रवण ॥ नयन असोनि तो अनयन ॥ चरणेंवीण चरणेची ॥ २९ ॥ सर्वही असोनियां बाधलें ॥ तें असतांचि नाहीं झालें ॥ करूनि अकर्तेपण आलें ॥ नाहीं मेळलें साक्षित्वें ॥ ६३० ॥ यालागीं तेव्हांचि तो मुक्त ॥ त्यासीं स्थूळास्थूळ नलगे शोधित॥ कैकट[1] अथवा पुण्यक्षेत्र ॥ सदोदित ब्रह्म तया ॥ ३१ ॥ जो कीं सर्वत्रचि आपण झाला ॥ पूर्णत्वें आपणचि संचला ॥ तया उत्तम मध्यम भाग उरला ॥ कनिष्ठ कोणाला सांगपां ॥ ३२ ॥ देश-काळ सर्वही आपण ॥ तीर्थ अतीर्थ क्षेत्र जाण ॥ देह विदेह परिपूर्ण ॥ सर्वही आपण सर्वपणें ॥ ३३ ॥ तया काळ अकाळ नाहीं ॥ सर्वही तो आपणचि पाहीं ॥ गती अगती भ्रांति सर्वही ॥ तो पूर्ण पाहीं पूर्णत्वें ॥३४॥ घट फुटलिया घटाकाश ॥ मार्गेंचि गेलिया मिळे आकाश ॥ कीं अमार्गें पडलें वोस ॥ कीं काळें भेटे आकाश अकाळें नाहीं ॥ ३५ ॥ पुण्यकाळीं तीर्थघट भंगला ॥ तरीच महदाकाशीं आकाश मिळाला ॥ येरवीं कोणत्या स्थळासीं तो गेला ॥ कीं मध्येंचि राहिला चुकोनियां ॥३६॥ घटें नभरतां गगन॥ अनुरूप[2] झालें आपण॥ घटभंगेंचि गगन ॥

१ पापभूमी. २ त्यासारखें.

येरवीं काय अन्य होय ॥ ३७॥ यालागीं पुर्वींच तो ब्रह्म आहे ॥ देहांतीं काय तो अन्य होय॥देहीं विदेहीं तेंचि
आहे ॥ आन काय होईल ॥ ३८॥ देह असतांचि ब्रह्म झाला ॥ मग देहसंबंध काय तयाला ॥ देह असतां नस-
तां संचला ॥ ब्रह्मत्वें झाला ब्रह्मचि तो ॥ ३९ ॥ झाला हें शब्दें बोलावें ॥ परि झालेंपण तया नसंभवे ॥ तो
ब्रह्मचि आहे स्वभावें ॥ झाला ह्मणावें उपचारें ॥ ६४० ॥ श्रुती ॥ ब्रह्मैवसन्ब्रह्माप्येति ॥ विमुक्तः सन्नविमुच्य-
तइति ॥ ऐसें बोलतसे श्रुती ॥ नाहीं व्यक्ति भेदाची ॥ ४१ ॥ ब्रह्म असोनि ब्रह्म होय ॥ मुक्त होत्साताचि
मुक्त स्वयें ॥ ऐसें स्वयें श्रुति बोलताहे ॥ उपचार पाहे बोलाचा ॥ ४२ ॥ ब्रह्म जैसें तैसेंचि असे॥ झालें
नाहीं हें सर्वथा नसे ॥ कोणी विकार तेथें नभासे ॥ क्रियाफळ ऐसें नाहीं तेथें ॥ ४३ ॥ चतुर्विध ते क्रिया
फळ ॥ येक उत्पत्ती अतिकेवळ ॥ विकार्य संस्कार्य सकळ ॥ नव्हे फळ येकही ॥ ४४ ॥ ह्मणोनि ब्रह्मत्व सि-
द्धचि आहे ॥ आलें गेलें उपचार पाहे ॥ देह असतां नसतां नोहे ॥ आन पाहे वस्तुविण ॥ ४५ ॥ अज्ञानें व्यवधा-
न केलें ॥ ह्मणोनि झालेंपण यया आलें ॥ येरवीं तेंचि तें संचलें ॥ नाहीं झालें आन कांहीं ॥ ४६ ॥ देह तीर्थिं
पडल्या कोण स्वार्थ ॥ अतीर्थिं पडल्या कोण अनर्थ ॥ हें अज्ञानें कल्पिल्या अर्थानर्थ ॥ देहबुध्यर्थ लागले॥४७॥
देहातीता हें सर्वथा नाहीं ॥तो देहींच विदेही सर्वदां पाहीं॥यया बोला आन नाहीं॥संशय कांहीं नधरावा॥४८॥
देहाच्याठाईं नैरास्यता ॥ देहाचा साक्षी तो तत्वतां ॥ नैरास्यालंकरणें अलंकृता ॥चिन्ह तत्वतां एक त्याचें॥४९ ॥

१ दुर्लक्ष. २ विरक्ति.

॥ श्लोक ॥गोष्पदंपृथिवीमेरुःस्थाणुराकाशमुद्रिका ॥तृणंत्रिभुवनंरामनैरास्यालंकृताकृतेः ॥१६॥ टीका॥जो नैरा-
श्यें अलंकारला ॥ तो गोष्पद मानी ब्रह्मांडाला ॥ आपणाहुनी थोर कोणाला ॥ पदार्थाला नदेखे ॥ ६५० ॥
ह्मणोनि पृथ्वी मानि गोष्पद ॥ मेरू तो स्तंभतुल्य विषद ॥ दिशांतें पेटी निबंद्ध॥ जाण समृद्ध तृण जैसें॥५१॥
किंबहुना प्रपंचजात ॥ शून्य रूपें झालें बाधित ॥ असोनि मिथ्यत्व निश्चित ॥ तें सत्य कदाचित भासेना॥
॥ ५२ ॥ रज्जुसर्पाचि सत्यता ॥तंवाचि दृढ माने चित्ता ॥ रज्जुज्ञानें यथार्थता ॥ कदां कल्पांता नयेची ॥ ५३ ॥
तैसा जगद्भ्रमु तंवचिवरी ॥ जंव ब्रह्मज्ञान मनातें नवरी ॥ साक्षात्कार जगलहरी ॥ क्षणाभीतरी मावळे ॥ ५४ ॥
जंववरी रज्जुचें ज्ञान ॥ तंववरी भुजंगाचें सत्यपण ॥ यथार्थ झालिया रज्जुज्ञान ॥ सर्पपण नसांपडे ॥ ५५ ॥
ह्मणोनि जग झालें हें तृणतुल्य ॥ तें नाहींचपणें प्रति भासे केवळ ॥ ह्मणउनी आशेचि तळमळ॥ गेली सकळ
नैराश्यें ॥ ५६ ॥ आणिकही लक्षणें गा रघुपती ॥ जीवन्मुक्तांची तुजप्रत्ती ॥ सांगेन तें येकाग्र चित्तीं॥ विश्वमूर्ति
परिसावें ॥ ५७ ॥ श्लोक ॥ अंतःशून्योबहिःशून्यःशून्यकुंभइवांबरे ॥ अंतःपूर्णोबहिःपूर्णःपूर्णकुंभइवार्णवे॥१७॥
टीका ॥ तरी अंतरीं जो वासनाशून्य ॥ बाह्य नाहीं प्रपंचभान ॥ ऐसें अंतर्बाह्य प्रपंचविहीन ॥ तेंचि शून्यप-
ण परियेसीं ॥ ५८ ॥ सूक्ष्म प्रपंच त्या अंतर्वासना ॥ स्थूळ तो नाना व्यक्ति जाणा ॥ दोन्ही शून्य तो रघुनं-
दना ॥ शून्यपणा येतसे ॥ ५९ ॥ जैसा आकाशीं कुंभ रिता ॥ अंतर्बाह्य पावे शून्यता ॥तैसा प्रपंचविहीन त-

१ खांबासारखा. २ बांधलेली. ३ भांडें.

त्वतां ॥ पावे शून्यता जीवन्मुक्ता ॥ ६६० ॥ प्रपंच पावल्या शून्यता ॥ मग सर्वत्र बाणे ब्रह्मता ॥ अंतर्बाह्य पावे पूर्णता ॥ प्रपंच सर्वथा ब्रह्मरूप ॥ ६१ ॥ जें जें भासे प्रपंचभान ॥ तें तें अधिष्ठानत्वें पूर्ण चैतन्यघन ॥ सर्वत्र नदिसे दुजेपण ॥ आनंदघन सबाह्य ॥ ६२ ॥ अंतरीं ब्रह्मानंदें पूर्णता ॥ बाह्य पदार्थ कोणी नाहिं रिता ॥ ब्रह्मांडकोटि पावे ब्रह्मता ॥ ब्रह्मचि तत्वतां सबाह्य पूर्ण॥६३ ॥ नाहीं दुजें ब्रह्मेंविण ॥ तेथें जगत्व उरलें नाहीं जाण ॥ तया स्वस्वरूपेंसिं निर्वाण ॥ दुजेपण तेथें कैचें ॥ ६४ ॥ तया अंतर्बाह्य काय बोलावें ॥ जेथें दुसरें कांहींच नसंभवे ॥ हें गुरुखुणें जाणावें स्वभावें ॥ अनुभवें आपुलेनी ॥६५ ॥ शास्त्राचार उपदेशें ॥ अनुभविलें ब्रह्मचि ऐसें ॥ तेथें काय भासिलें अनारिसें ॥ गेलें पिसें दुजेपणाचें ॥६६॥ ह्मणऊनि रितें नभासे तयासीं ॥ परिपूर्ण ब्रह्म आनंदरासी ॥ उदकीं बुडाले कुंभासीं ॥ जळ चौपासीं अंतर्बाह्य ॥ ६७ ॥ घटाचें भान लोपलें ॥ अंतर्बाह्य जळचि झालें॥जळावांचूनि दुजें नाहीं निराळें॥शब्द खोलें नयेची॥६८॥जळीं परिपूर्ण घट असे॥यदर्थींच हा दृष्टांत वसे ॥ हा येक देशी परि सर्वांशें॥सर्वथा मानसे नघ्यावें ॥६९॥ पूर्णपण तें आपणांसहित ॥ परिपूर्ण ब्रह्म सदोदित ॥ नाहीं वेगळेपणें उरत ॥ जळीं तळपत जळ जैसें ॥६७०॥ आणिकही जीवन्मुक्ताचें ॥लक्षण सांगेन निर्वाणीचें ॥ परि पूर्णपण वासनेचें ॥ गेलें वेंचें कल्पनेसहित॥७१॥ श्लोक ॥ ईप्सितानीप्सितेनस्तोयस्यांतर्वस्तुदृष्टिषु ॥ सुषुप्तइवयश्चरतिसमुक्तइवकथ्यते॥१८॥ टीका॥जयाचि बाह्य दृष्टि मोडुनी॥ अंतर दृष्टी भरली कों-

१ वेगळें. २ निष्फळ.

डुनी ॥ तया ईप्सितानीप्सिता दोन्हीं॥जनीं वनीं उरलें नाहीं॥७२॥वस्तुहुनी दुजें असावें॥तरीच नेणें इप्सितावें ॥ वस्तुविणें दुजें भासावें ॥ तरी न ईप्सावें द्वेषबुद्धी ॥ ७३ ॥ जो आत्मलाभापरतें॥ नमानी दुजिया लाभातें ॥ तैसेंचि देह जेतीतें ॥ त्यागितां तेथें केवळ उरे ॥ ७४ ॥ जो निरतिशय सुखसंपन्न ॥ झाला ह्मणोनि नाहीं आन ॥ इतरा सुखासीं अतिशय पूर्ण ॥ नाहीं जाण रघुनाथा ॥ ७५ ॥ तया आत्मलाभसुखापुढें ॥ दुःख केंचें जेणें चरफडे ॥ ब्रह्मसुखाबाहेर नपडे ॥ दुःख कोणीकडे जाणेल तो ॥७६॥ आत्मलाभापुढें लाभ नाहीं ॥ ह्मणोनि तया ईप्सित उरेल काई ॥ निरंतर सुखीं निमग्न पाहीं ॥ दंडळिल काई तेथुनि तो ॥७७॥ दुःखभोगें दुःख मानावें ॥ तरीच देहबुध्या नईप्सावें ॥ त्यजावया उपाय करावे ॥ हेंही स्वभावें नाहीं तया ॥ ॥ ७८ ॥ यदर्थीं तया किरीटिप्रती ॥ गीतेसीं बोलिला स्वयें श्रीपती ॥ तेचि ऐकावी संमति ॥ एकाग्र श्रोतीं मनोभावें ॥ ७९ ॥ संमतिगीता ॥ यंलब्ध्वाचापरंलाभंमन्यतेनाधिकंततः ॥ यस्मिन्स्थितोनदुःखेनगुरुणापिविचाल्पते ॥ ५९ ॥ टीका ॥ आत्मसुख पावल्या नंतर ॥ आन लाभ नमानि त्याहूनि थोर ॥ जे सुखीं राहिल्या स्थीर ॥ नेणे गुरुतर दुःख झालें ॥६८०॥ यालागीं सुखाहुनी थोर असावें ॥ तरीच लाभत्वें तेणें इच्छावें ॥ दुःख अलाभत्वें त्यजावें ॥ अनिष्ट स्वभावें ह्मणोनियां ॥८१॥ ह्मणोनि ईप्सिता नीप्सिता दोन्ही ॥ गेली सुखस्वरूप वस्तु पावोनि ॥ सुप्तोचेपरी अकरणी ॥ अनिहपणीं सर्वदां ॥८२॥ इच्छा अनिच्छा जेथें ना-

१ इष्टानिष्ट. २ निजलेला. ३ इच्छेरहित.

हीं ॥ तेथें क्रिया उरे काई ॥ अकर्ता सर्वदां विदेही ॥ मुक्त पाही तो येक ॥ ८३ ॥ आणिकही तयाचें लक्षण ॥ ऐकें रघुनाथा सांगेन ॥ जेणें बुझसी संपूर्ण ॥ जीवन्मुक्तपण तें कैसें ॥८४॥ श्लोक ॥ निर्ग्रंथिःशांतसंदेहोजीवन्मुक्तःस्वभावतः ॥ अनिर्वाणोपिनिर्वाणश्चित्रदीपइवस्थितः ॥ १८ ॥ टीका ॥ तरी तो स्वभावेंचि मुक्त जाण ॥ तुटल्या चिदचिद्ग्रंथि संपूर्ण ॥ ह्मणोनि तो मुक्त जाण ॥ येरवीं बंधन ग्रंथि असतां ॥ ८५ ॥ चिदचिद्ग्रंथी तोहि कैसा ॥ तुज सांगो गा परेशा ॥ तें चित्त देऊनि परियेसा ॥ ग्रंथी कैसा जडाजडीं ॥ ८६ ॥ तरी चित्त शब्दें ज्ञान अजड ॥ अचित् शब्दें अप्रकाश जड ॥ उभयतां ग्रंथी प्रचंड ॥ पडे सदृढ रघुनाथा ॥ ८७ ॥ ययाची मूळ मांडणी ॥ ऐकें गा कोदंडपाणी ॥ हे ग्रंथी जाणे तो निर्वाणीं ॥ संसार स्वप्नीं भासेना ॥ ८८ ॥ तरी ब्रह्मस्थानीं महदाकाश ॥ तेंचि अभ्रीं बिंबल्या अभ्राकाश ॥ अभ्र तें अविद्या सावकाश ॥ तेथें बिंबे ईश तो ईश्वर ॥ ८९ ॥ देहस्थानीं घट एक असे ॥ घटामाजी जें आकाश असे ॥ त्यातें कूटस्थ बोलिजे ऐसें ॥ हे मांडणी विश्वेशें जाणावी ॥ ६९० ॥ घटामाजी असे जळ ॥ जळस्थानीं बुद्धि निर्मळ ॥ जळीं अभ्राकाश सकळ ॥ बिंबे तत्काळ उपाधिवशें ॥ ९१ ॥ घटामाजी जें आकाश असे ॥ त्यातें कूटस्थ बोलिजे ऐसें ॥ हे मांडणी विश्वेशें ॥ जाणावी गा ॥ ९२ ॥ बुद्धिजळीं जें ब्रह्म बिंबलें ॥ तेंचि जीवशब्दें चैतन्य बोलिलें ॥ तें अजड चित्तज्ञानबळें ॥ असे निराळें प्रकाशपणें ॥ ९३ ॥ बुद्धी जळस्थानीं अचित्त ॥ तेथें प्रतिबिंबलें स्वयें चित्त ॥ तें परस्प-

---

१ रचना. २ माया, अज्ञान. ३ अविकारी.

रानुध्यासें येकत्व ॥ पावे निश्चित अहंसंगें ॥ ९४ ॥ दोहींच्यासंगें अहंस्थिती ॥ हेचि विलासली चिदचिद्ग्रं-थी ॥ प्रमाता घे बुद्धीबुंथी ॥ सर्व ग्रंथीं हेंचि सिद्ध ॥ ९५ ॥ तिये बुद्धीतें मीचि ह्मणे ॥ सर्वथा भिन्न ऐसें नेणे ॥ मन बुद्धी तंव येकपणें ॥ असती अभिन्नें निरूपिलीं ॥ ९६ ॥ मनोबुद्धीचा व्यापार ॥ मस्तकीं घेतसे विकार ॥ सुखदुःखादि प्रकार ॥ मानी साकार आपणया ॥ ९७ ॥ मनाचें जडत्व आपणासीं ॥ आत्मप्रकाश आला मनासीं ॥ एवं ग्रंथी जडा अजडासीं ॥ पडली अध्यासीं येरयेरां ॥ ९८ ॥ ऐसें जंववरी अभिन्न दिसे ॥ कोटि कल्पवरी अध्यास असे ॥ तंववरी संसृति हे ननासे ॥ हें रघुवंशे जाणिजे कां ॥ ९९ ॥ बुद्धी आपणाहू-नि भिन्न ॥ ऐसें जाणे जेव्हां साक्षी होऊन ॥ बुद्धीचा प्रकाश आपण ॥ हेंचि ज्ञान सज्ञानत्वें ॥ ७०० ॥ येणें ज्ञानेंचि तत्काळ ॥ चिदचिद्ग्रंथी तुटे सकळ ॥ तेव्हांचि संसृतिची शृंखळ[3] ॥ नलागतां वेळ तुटोनि जाय ॥ १ ॥ इये संसृतीचें[2] कारण ॥ हा चिदचिद्ग्रंथीच जाण ॥ तो तुटला जयाचा पूर्ण ॥ तोचि संपूर्ण जीवन्मुक्त ॥ ॥२॥ जेव्हां सद्गुरूनें दृश्यावेगळा ॥ केला असतां जडा सकळा ॥ तेव्हां साक्षि होउनी निराळा ॥ असे चित्कळा बोधरूपें ॥ ३ ॥ क्षणिक संदेह उपजला ॥ बुध्यादिकाहूनि कैसा वेगळा ॥ स्वप्रकाश ज्ञान कळा ॥ साक्षी स-कळां मीचि कैसा ॥ ४ ॥ अथवा सद्गुरुवचन प्रमाण ॥ होय कीं नव्हे संदेह पूर्ण ॥ उपजे तें ज्ञानाचि अज्ञान ॥ तम महादा-रुण होऊनि ठाके ॥ ५ ॥ तैसा नव्हे तो रघुराया ॥ गेला संशय समूळ माया ॥ सकळ संदेहाचि नाहीं तया ॥ गेल्या लया

१ पांघरूण, बुरखा. २ जन्ममरण. ३ सांकळी, बेडी.

असंभावना॥६॥यालागीं तो शांत संदेह होय॥ तो स्वभावेंचि मुक्त आहे॥ बाह्य मनुष्यत्वें दीसताहे॥ परि तो नव्हे देहवंत ॥ ७ ॥ अनिर्वाण ऐसा दिसे ॥ परि तो निर्वाणीं ब्रह्मचि असे ॥ स्थिती जयाची नभ्रंशे॥ स्थीर असे चित्रदीप जैसा ॥ ८ ॥ चित्रीं दीप दीपपणें असे ॥ परि तो निचेष्ट सर्वांशें ॥ तैसा देही निरहंकार वसे॥ स्थिती विलासे अढळपणें ॥१९ ॥ निचेष्ट असावया कारण ॥ तें रघुनाथा तुज सांगेन ॥ स्वरूपस्थिती अढळपण ॥ नलगे जाण जेणे करी ॥७१०॥ श्लोक॥ अहंकारमयींत्यक्त्वावासनांलीलयैवयः ॥ तिष्ठतिध्येयसंत्यागीजीवन्मुक्तःसउच्यते ॥ ९ ॥ टीका ॥ अहंकारमय जे वासना ॥ ते लीलेंकरूनि टाकिली जाणा ॥ ह्मणउनी ईहां नुरेचि कर्तेपणा ॥ अनीहपणा शोभत ॥ ११ ॥ अगा अहंकारसंवेळित ॥ सर्व संकल्प असती उठत ॥ अहंकारेंवीण कदाचित ॥ वासना ईषत नुठे कदां ॥ १२ ॥ स्वरूपाश्रयें असे ज्ञान ॥ अज्ञानें अहं हें उठे जाण ॥ तोही द्विविध अहंकार पूर्ण ॥ विशेष सामान्य येणें रूपें ॥ १३ ॥ जो सामान्यत्वें सर्व देहीं ॥ मी ऐसा अहंकारु पाही ॥ मग तोचि हढावे विशेषेंही ॥ सांगों तेही खुण तुज ॥ १४ ॥मी ब्राह्मण क्षत्रिय वैश्यादिक ॥ तैसेचि आश्रम सकळिक ॥ येणें रूपें अहंकार येक ॥ बोलिजे सम्यक विशेष तो ॥ १५ ॥ हा सर्वत्र सर्व देहीं॥ अनुस्यूत सामान्यत्वें पाही ॥ विशेषें ब्राह्मणाच्या ठांई ॥ ब्राह्मणत्वें पाहीं वर्तत ॥ १६ ॥ क्षत्रियत्वें क्षत्रियासीं ॥ वैश्यत्वें वैश्यासीं॥ शूद्रत्वें जाण शूद्रासीं ॥ पिता पुत्रासीं पितापुत्रत्वें ॥ १७ ॥ तैसेंचि आश्रमादि-

१ मायिक. २ इच्छा. ३ वेढलेला. ४ अखंड.

कांसीं ॥ विशेषें अहंकार परियेसीं ॥ सामान्यता सर्वांसीं ॥ अहंपणेंसीं भासत ॥ १८ ॥ तेथूनि मग संकल्प विकल्प ॥संकल्प तो जाण एवंरूप ॥ अशोभन जें विषयस्वरूप ॥ तेंचि शोभनरूप स्वयें करी॥१९॥एवं शोभनाध्यास तो संकल्प ॥ तेणें होवावें हा ऐसा आरोप ॥ ते वासना जाण कामरूप ॥ भवपादप[1] वाढे जेणें ॥ ७२० ॥ ते अहंकाराच्या पोटीं ॥ संस्काररूपें राहे शेवटीं ॥ वासनेसारिखेंचि घेऊनि उठी ॥ नेटीपाटीं आनकाळीं ॥ २१ ॥ दिवसाचे जे जे काम संकल्प करी ॥ तेंचि जे राहाती अहंकाराभीतरीं ॥ तेंचि देखे स्वप्नामाझारीं ॥ तेंचि पुरी[2] वासनाजाण ॥ २२ ॥ मग प्रबोधातिये वेळे ॥ अहंकार स्वयें प्रबळे ॥ तेथें पूर्वकृत संस्कारमेळें ॥ वासनाफळें उत्फुल्ल[3] होती ॥ २३ ॥ यालागीं अहंकारसंवलितें[4] ॥ वासना जाण प्रबळ होत ॥ त्या अहंकारासमवेत ॥ वासना त्यक्त जेणें केल्या ॥ २४ ॥ परी अपरोक्ष साक्षात्कारें ॥ नलगती टाकणें बलात्कारें ॥ तें लीलेंचिकरूनि वासनाभ्र विरे ॥ केवळ उरे ज्ञेय जया ॥२५॥ तें ध्येय आपण ध्याता ॥ध्यान जे वृत्ति तदाकारता॥ हे त्रिपुटी स्फुरे ते तत्वतां॥ते संप्रज्ञात समाधि॥२६॥जेथें हे त्रिपुटी स्फुरे॥ ते सबीज समाधि निर्धारें॥ सविकल्प संप्रज्ञात नामांतरें ॥ नामें मनोहर इयेसीं ॥२७॥ ध्याता ध्येय आणिध्यान ॥नुरोनि होय समसमान ॥ आपणा आपण परिपूर्ण ॥ निर्बीज जाण समाधी तो ॥२८॥अथवा ध्येयत्यागाचें लक्षण ॥ तेंही तें एवंविध जाण ॥ ध्येय तें अहंकार ममकारें पूर्ण ॥ अखंड चिंतन तें चित्तीं ॥ २९ ॥ देह विशिष्ट आपण जातिवर्ण ॥ ऐसें जें अहं-

१ संसाररूपी वृक्ष. २ निश्चयरूप. ३ प्रफुल्लीत, टवटवीत. ४ वेष्टलेली.

कारें स्फुरण ॥ ममकारें पुत्रवित्तादि स्त्रीगण ॥ त्याचें भरण पोषण योजणें तें ॥ ७३० ॥ किंबहुना देह बुद्ध्या-
दि चिंतन ॥ तें तें ध्येय गा सज्ञानादि जाण ॥ तत्त्यागें त्याचें वर्तन ॥ तोचि पूर्ण जीवन्मुक्त ॥ ३१ ॥ सर्व संग
टाकी ह्मणोनी ॥ विक्षेप टाकी तयालागुनी ॥ यालागीं निमग्न ब्रह्मपणीं ॥ राहे कोंडुनी ब्रह्मानंदें ॥ ३२ ॥ ऐ-
सा निर्बीज समाधिस्थित ॥ तोचि जाण जीवन्मुक्त ॥ सर्व संगविनिर्मुक्त ॥ स्वरूपस्थ राघवेंद्रा जो ॥ ३३ ॥ सं-
गत्याग तोही तुजप्रती ॥ सांगों ऐकें श्लोकसंगति ॥ सादरें परिसे अयोध्यापती ॥ अर्थप्राप्ती जेणें होय ॥ ३४ ॥
जरी श्रवणीं नाहीं सादरता ॥ तरी तो जाणावा सबाह्य रिता ॥ तो काय पावे श्रवणार्था॥दंभी तत्वतां लौकि-
कीं ॥ ३५ ॥ जया श्रवणीं असे सादरता ॥ तोचि मननीं निदिध्यासनीं पुरता ॥ ययाची सांगों व्यवस्था ॥ र-
घुनाथा परियेसी ॥ ३६ ॥ वाक्य ॥ षड्विधलिंगैःसर्वेषांवेदांतवाक्यानांअद्वैतेब्रह्मणितात्पर्यावधारणंश्रवणं ॥
॥ ९ ॥ टीका ॥ सर्वही वेदांतवाक्यें ॥ तें परब्रह्मचि बोधिती आत्मैक्यें ॥ तेंचि तात्पर्य वाक्याचें निकें ॥ अव-
धारीं येके मानसें करीं ॥ ३७ ॥ जें जें बोले वेदांतशास्त्रवचन ॥ त्याचें कोठें होतें अवसान ॥ ययाचा तात्पर्या-
र्थ संपूर्ण ॥ घेइजे तें जाण श्रवण होय ॥३८॥ वेदवाक्याचा तात्पर्यार्थ ॥ त्यामाजी रिघोनि घेइजे अर्थ ॥ त्या-
चें अवसान पावे तो तात्पर्यार्थ ॥ घेइजे निश्चित तें श्रवण ॥३९॥ तरी यासि पाहिजे एकाग्रता॥तें विचारी जा-
नकीकांता ॥ हें नसोनि कीजे काळक्षेपता ॥ पुण्य जनकता नघडे कांहीं ॥७४०॥आणि पुण्य श्रवणाचें श्रवण॥

१ विकार. २ अलिप्त, निराळा. ३ शेवट.

त्यासींच पुण्य जनकता पूर्ण ॥ श्रवणा नयेतां श्रवणपण ॥ पुण्यभाजन केंवि होय ॥ ४१ ॥ जरी सांग सिद्ध पावे याग ॥ तरी तो पुण्यजनीं अभंग ॥ यागचि यागपणा अंग ॥ नपावतां सांग पुण्यही कैचें ॥ ४२ ॥ यालागीं श्रवणें श्रवणपण ॥ सिद्धि जाय जरी तात्पर्यावधारण ॥ तैं सकळ सिद्धी आणि पुण्य ॥ तयाकारणें बोलंगती ॥ ॥ ४३ ॥ यालागीं श्रवणीं सादरता ॥ अवश्य व्हावी गा रघुनाथा ॥ श्रवणाची समूळ कथा ॥ तुज तत्वतां सांगीतली ॥ ४४ ॥ येणें श्रवणें सिद्धि होय ॥ अन्यथा तो काळक्षेप आहे ॥ यालागीं सादर होय ॥ हें पुनःपुन्हां पाहे असें बोलिजेत ॥ ४५ ॥ अशी करूनियां एकाग्रता ॥ श्लोकार्थचि ऐकें रघुनाथा ॥ जीवन्मुक्त बाह्य अर्थां ॥ त्यजी तत्वतां तें कैसें ॥४६॥ श्लोक ॥ दूरेमुंचतिबंधुमंधमिवयःसंगाद्भुजंगादिवत्रासंयोविदधातिवेत्तिसद्दशंभोगंचरोगंचयः ॥ स्त्रैणेयस्तृणवत्घृणांप्रकुरुतेमित्रेष्वमित्रेष्वपिस्वांतंयस्यसमंसमंगलमिहामुत्रापिमर्त्योश्नुते ॥२०॥ टीका ॥ तरी जो कीं सकळ बंधुमात्र समस्त ॥ सखे सहोदर मित्र गोत॥५॥ त्याही जामातादि दूरस्थ॥ टाकी समस्त स्नेहत्यागें ॥ ४७ ॥ जैसी निगडशृंखला उपेक्षुनी ॥ दुरी टाकिजे उद्वेगें करूनि ॥ तैसा सुहृदवर्गा- अस्नेहेंकरूनि॥टाकी भरवसेनी वैराग्यबळें ॥ ४८ ॥ तैसा संगापासाव त्रास धरी ॥ कोणाचाही संग न- करी ॥ संगें अनर्थ होती भारी ॥ यास्तव करी संगत्याग॥४९ ॥पुत्रवित्तादि गृहदारा॥याचा संग तंव नाहीं बरा॥ जैसें सर्पसंगें राहिजे विवरा ॥ मृत्युखरा नप्रार्थितां ॥ ७५० ॥ त्याचेनि संगें अनिष्ट होय ॥ त्याचें काय अ-

१ पात्र. २ श्रवण. ३ माप्तहोतात. ४ बेडी. ५ कंटाळून.

पूर्व आहे ॥ परि विजातीयाचा निःसंगें पाहीं ॥ संसारभय कृपेस्तव ॥ ५१ ॥ भरथराज महाराजचूडामणि ॥ सकळ पृथ्वीचे भोग भोगुनी ॥ मग संग दीधले उपेक्षुनी ॥ ज्ञान साधुनी राहिला ॥५२॥ परम तपस्वी महा-
मुनी ॥ समाधिस्त होतां निरंजनीं ॥ व्युत्थान होतां कोणी येक हरिणी ॥ तिये वनीं प्राप्त झाली ॥ ५३ ॥ भरथ स्नान करितां नदीभीतरीं ॥ तंव सिंहें हाक दीधली येकसरी ॥ गर्भिणी हरिणी भयें करी ॥ पळाली भारी प्राणलिप्सयां ॥ ५४ ॥ नदी उडतां अतित्रांणें ॥ तंव गर्भपात झाला ततक्षणें ॥ तो नदीमाजि पडतां महंतें तेणें ॥ देखिला नयनें दीनरूप ॥ ५५ ॥ तें अतिसकोमळ सुंदर ॥ त्यासी प्राणांतवस्था देखे ऋषीश्वर ॥ मग सकृप होउनी सत्वर ॥ काढी आंतुन तें पाडस ॥ ५६ ॥ त्यासी कोणी नाहीं स्तनपान देता ॥ अनाथ प्राण त्यागील हे चिंता ॥ ह्मणोनि संग्रह झाला करिता ॥ वाढविता झाला कृपेकरुनी ॥५७॥ शेवटीं त्याचे-
नि संगेंकरुनी ॥ स्वयें हरिण झाला तो मुनी ॥ त्याभयास्तव संग त्यागुनी ॥ टाकूनि दुसरे जन्मीं राहि-
ला ॥ ५८ ॥ संगें सुखदुःख होय भारी॥ ह्मणोनि टाकि तें संसारीं ॥ जड भरथ ज्ञानियांमाझारी ॥ सर्वांउ-
परी शोभत ॥ ५९ ॥ येथें स्त्रीपुत्रादिकांचा संग ॥ तो नबाधिल गा कैसा सांग ॥ येक येक संगें बाध अभंग॥ पावेल अव्यंग कलंक जैसा ॥ ७६० ॥ हरिण पतंग आणि मीन ॥ गज भ्रमर हे पांचही जण ॥ ते पांचाविषईं पांचही जाण ॥ क्षय संपूर्ण पावले ॥ ६१ ॥ श्रवणाचा विषय जाण॥ तेणें शब्दें मृत्यु पावला हरिण ॥

१ विसर्जन. २ प्राणाचे आवडीनें. ३ मोठ्यासंकटानें.

पारधीनादें वेधून ॥ धरी जाण हरिणासीं ॥ ६२ ॥ रूप तो नेत्राचा विषय जाण रघुपती ॥ तेणें पतंगवेधें दीपादिप्ती ॥ तो मरण पावे सर्वार्थीं ॥ तैसीच गती मीनाची ॥ ६३ ॥ रसनेचा विषय रस जाण ॥ तेणें रसें मीनासि मरण ॥ त्वचेचा विषय स्पर्शन ॥ कुंजरा मरण तेणेंचि होय ॥ ६४ ॥ घ्राणविषय गंध होय ॥ गंधवेधें भृंगासिं मृत्यु पाहें ॥ ऐसें येकयेक विषयें नाश होय ॥ संगें पाहे सर्वथा ॥६५॥ ऐसें येकयेक संगें बंध प्राप्ती ॥ आणि वाढोंलागे दुःखसंतती ॥ तेथें एकैक सांगो तुजप्रती किती ॥ पुत्रविपत्ती ते येक सांगो ॥ ६६ ॥ पुत्र दुःख आरंभापासुनी ॥ तें येकयेक ऐकें कोदंडपाणी ॥ पुत्रसंगालागुनी ॥ सतत अनुदिनीं दुःख कोटी ॥६७॥ पुत्र नसतां अतिचरफडी ॥ पडनादिकीं घालिती उडी ॥ पुत्रेंविण देहाचि कोरडी ॥ तपव्रतकोडी पुत्रालागुनी ॥ ६८ ॥ पुत्रेंविण धिक जीवित ॥ संसाराचि शून्य मानित ॥ यालागीं देहादिधन वेंचित ॥ दुःख अपरिमित पुत्रार्जनीं ॥ ६९ ॥ पुत्र नसतां दुःख कोटी ॥ अर्जनीं शरीरधना होय आटी ॥ गर्भीं राहिल्या करी कष्टी ॥ सदां पोटीं जडजाड्य ॥७७०॥ स्त्रियेचेनि दुःखें दुःखवे ॥ ह्मणे पुत्र नसे हेंचि बरवें ॥ होतां दुःख नसाहवे ॥ दुःखें अभिभवे जन्मतां ॥ ७१ ॥ गर्भपात झाल्या अतिदुःख ॥ जन्मतां व्यथेनें कैचें सुख ॥ मातेशीं अतिशय दुःख ॥ होय आणिक तें परियेसी॥७२॥पांचवे दिवशीं मृत्युपावे॥वांचलीया रोगें अभिभवे ॥ पंगु वेडे बधिर झाल्या नपवे॥सुख नव्हे पितरांसीं ॥७३ ॥ अपवित्र झाल्या दुःख कोटी ॥ मूर्ख दैन्य इत्यादि गोष्टी ॥

१ हत्तीस. २ भ्रमरासी. ३ खर्चित. ४ संपादन.

अनपत्य झाल्या दुःख पोटीं ॥ नाहीं भेटी सुखेसीं ॥ ७४ ॥ ज्ञाता झाला तरी दरिद्री होय ॥ समर्थ झाल्या
रोग खाय ॥ रोग भोग भोगूनलाहे ॥ तेणें पाहे दुःख पितरां ॥ ७५ ॥ सर्वही गुणी झाला संपन्न ॥ तरी तया
शीघ्रचि पावे मरण ॥ पितरां दुःख अतिदारुण ॥ सुख कोण अनुभवी ॥ ७६ ॥ ऐसें असतां नसतां आदि
अंतीं ॥ दुःखावांचुनी नाहिं प्राप्ती ॥ तैसे स्त्री आणि सर्व संपत्ती ॥ द्रव्याची गती तैसीच ॥ ७७ ॥ द्रव्य नस-
तां दुःख कोटी ॥ अर्जनीं होय प्राणाचि आटी॥ रक्षणीं आटाटी मोठी ॥ व्ययकाळीं भेटी मरणेसीं ॥ ७८ ॥
अपहार हृश्य राज्यादिक ॥ करितां अतिशय दुःख ॥ अणुमात्रही सुख ॥ दुःखचि दुःख उत्तरोतर॥७९॥ ऐसीया
पदार्थांची संगती ॥ करितां त्रास मानी मती ॥ जैसा भुजंगदर्शनें त्रास चित्तीं ॥ तैसा नर इच्छिती संग त्याचा॥
॥७८०॥ व्याघ्रादिकांदि भयंकर ॥ जेणें होय प्राणनिर्हार ॥ त्याचा त्रास महाथोर ॥ अतिशय नर मानी जैसा
॥८१॥ तैसा संगापासाव त्रास मानी ॥ संग नकरीं पदार्थ कोणी॥असलिया संग प्रारब्धेंकरूनि॥ त्रास मनीं स-
र्वदां वाहे ॥८२॥तैसेचि स्रक् चंदनादि भोग जितुके ॥ते रोगतुल्य मानी तितुके॥प्राप्तझाल्या नमानी निके ॥
परि तो नतोषे रोगदृष्टीं ॥ ८३ विषयभोगाकारणें ॥ सर्वथा नबैसे धरणें ॥ प्राप्तझाल्याही मनें ॥ संतोष तेणेंहि
नाहीं ॥ ८४ ॥ प्राप्तझाल्याही विषयभोग ॥ ते काकविष्ठेसमान मानी चांग ॥ मनें मानी तैसा रोग ॥
अतिअभंग वैराग्यबळें ॥८५॥ तेथें प्रयत्नाचि कें असे गोष्टी ॥ भोगाकडे नेदी दृष्टी ॥ आत्मलाभें नित्य संतुष्टी

१ वांझ. २ कष्ट. ३ नाश. ४ माळा.

आनंदकोटी ब्रह्मानंदें ॥ ८६ ॥ जो तृप्तअसे अमृतपानें ॥ तयासीं कांजी कासया सेवनें ॥ नित्य मिष्टान्न सेवि तेणें ॥ तुषं सेवने घडेना कीं ॥ ८७ ॥ जो इंद्रपद देतां अव्हेरी ॥ तो काय भिक्षा मागेल घरोघरीं ॥ तैसा निमग्न जो परमानंदसागरीं ॥ तो काय करी विषयभोग ॥ ८८ ॥ जो षण्मासाचा निराहारी ॥ तोही सर्वथा विषभक्षण नकरी ॥ तेथें षड्रसें तृप्त तो नस्वीकारी ॥ अपूर्व परी काय तेथें ॥८९॥ तैसा मुमुक्षु साधनदशे ॥ विषयभोग त्यजी मानसें ॥ तेथें ज्ञानी नसेवी हें काय ऐसें ॥ कारणमिसें बोलावें पां ॥ ७९० ॥ हें काय येथें अपूर्व मानावें ॥ तो स्त्रियादि भोग मनोभावें॥नइच्छी हें काय प्रशंसावें ॥ मानी स्वभावें शुभ्र कुष्ठं जैसा॥९१॥ तैसाचि मित्रा अमित्रांसि सरिसा ॥ सूर्य भलत्यासन्मुख जैसा ॥ षड्ऋतुसीं सरिसा ॥ गगन वीरेशा जैसें असे ॥ ९२ ॥ गायीचि तृषा हरावी ॥ व्याघ्रादि विष होऊनि मारावीं ॥ हे जैशी नाहीं ठेवाठेवी ॥ सर्वी सम भावीं जळ जैसें ॥ ९३ ॥ तैसेंचि मित्रा अमित्रां कृपाळू ॥ निष्ठुरत्वें पडोनेदी अडळू ॥ चंद्र जैसा कां शीतळु॥ अति निर्मळ श्रोतियां चोरां ॥ ९४ ॥ त्याचें श्रोत जें अंतःकरण ॥ तें तत्वज्ञानें झालें समान ॥ तेणें आपपर भिन्नाभिन्न ॥ समसमान आत्मत्वें ॥ ९५ ॥ तया नाहीं आपपर ॥ कैंचा बंधु शत्रु मित्र ॥ समसमानचि सर्वत्र ॥ सर्वही पवित्र ब्रह्म जया ॥९६ ॥ ऐसें जयाचें वर्तन ॥ सर्वत्र सम अंतःकरण ॥ तो देही विदेही ब्रह्म पूर्ण ॥ स्वानंदघन अनुभवी ॥ ९७ ॥ जे मंगळ होत्साते सम ॥ चिद्घनैकरस ब्रह्म परम ॥ ते देही विदेही निरूपम ॥ भो-

१ भाताचाकोंडा, २ कोड, रोग. ३ स्पर्श.

गी परम भोक्तृत्वेंवीण॥९८॥सकळ मंगळाचें मंगळ॥मंगळ शब्दें सुखकल्लोळ ॥ जेथूनि सर्व मंगळाचें प्राबल्य ॥ तें अतिमंगळ परब्रह्म॥९९॥ऐसा सर्व संग त्याग करुनी॥ सर्वदां ब्रह्मानंदाचिये धनी ॥ अपेक्षा नपडे काळीं कोणी ॥ अतिनिर्वाणीं परमानंदें ॥ ८०० ॥ मर्त्य शब्दें मरणधर्मक शरीर ॥ हें जे पावले विवेकी नर ॥ त्या मर्त्य शरीरेंचि महाथोर ॥ सुखसंभार पावले ॥ १ ॥ अथवा देहाभिमानी जो जीव ॥ तो ब्रह्मवि झाला स्वयमेव ॥ ब्रह्मसुखाचा अनुभव ॥ भोगी जीवभाव टाकुनी ॥ २ ॥ इहलोकीं आणि परलोकीं ॥परमानंदसुखें अतिसुखी॥ ऐसा तोचि बोलिजे सुखी ॥ येर दुःखी संसारें ॥ ३ ॥ इहलोकीं जीवन्मुक्त सुख ॥ अनुभवितु सर्वदां देख ॥ इच्छेनें पावला जरी परलोक ॥ तेथें ही देख परमानंद ॥४॥ कदाचित् जीवन्मुक्तासीं ॥ परलोकइच्छा मानसीं ॥ असलीया पावे नेमेसिं ॥ हानी सुखासिं असेचीना ॥ ५ ॥ यावत् इच्छा तो ते लोकीं असे॥ तेथेंही ब्रह्मसुखेंचि वसे ॥ त्याचें ज्ञान कदापि नभ्रंशे ॥ भोगांतीं कैसें अन्य होय ॥ ६ ॥ अथवा इहामुत्राचा अर्थ ॥ देह विदेह जाण यथार्थ ॥ विदेहपणें काय कृतार्थ ॥ देहीं अर्थ काय होती ॥ ७ ॥ ह्मणऊन देहीं विदेही ब्रह्म पूर्ण ॥ देशीं विदेशीं नव्हे आन ॥ काळीं अकाळीं समसमान ॥ चैतन्यघन चिद्रूपें ॥ ८ ॥ तया देश काळ वयावस्था ॥ सर्व इत्यादि आत्मसत्ता ॥ नाहीं आपणाहुनी परता ॥ नसे रिता कोणी भाव ॥ ९ ॥ आणिकही जीवन्मुक्ताचें लक्षण ॥ रघुवर्या गा तुज सांगेन ॥ ऐक एकाग्र करूनियां मन ॥ समाधान जेणें होय ॥८१०॥

१ ईच्छा. २ मृत्यूलोकाचा व परलोकाचा.

॥ श्लोक ॥ त्हृदयात्संपरित्यज्यसर्वंहृश्यंप्रशांतधीः ॥ व्योमसौम्यतरोव्यग्रःसमुक्तःपरमेश्वरः ॥ २१ ॥
टीका ॥ ऐक रघुवंशदीपका ॥ दशरथकुळटिळका ॥ परा परमव्यापका ॥ प्रकाशका रघुवर्या ॥ ११ ॥ हृदय शब्दें जाणपां मन ॥ त्या मनापासुनी टाकिजे हृश्यभान ॥ हृश्य तें स्थूळ सूक्ष्मात्मक जाण ॥ तें सांगेन चिन्ह श्रीरमणा ॥ १२ ॥ सूक्ष्म ते अंतर्वासनासंपत्ति ॥ मन बुध्यादि जें जें जाणती॥ तें जाण स्थूळ हृश्य गा रघुपती॥ नाहीं वित्पात्ति यया बोला॥१३॥ याची येकचि खुण सांगेन ॥ तेणें बुझसी हें संपूर्ण॥इंद्रियें जाणति त हृश्य जाण ॥ नव्हे अन्य सर्वथा ॥ १४ ॥ ब्रह्मावेगळें जें जें भासे ॥ तें इंद्रियेंकरूनि नप्रकाशे॥सर्वांचें अंतर ब्रह्मचि असे ॥ तेणें प्रकाश इंद्रियां ॥ १५ ॥ कार्य कारणातें नप्रकाशी ॥ जड अजडातें काय प्रकाशी॥ज्याचेनि प्रकाशें प्रकाश ज्यासीं ॥ ते तयासीं जाणती काय ॥ १६ ॥ इंद्रियें तितुकीं बहिर्मुखें ॥ तीं प्रपंचाचीं प्रकाशकें ॥ तयासी परब्रह्म ठाउकें ॥ कोणें वेषें पडेल ॥ १७ ॥ ययालागीं मनबुद्धीचें जाणणें ॥ तें तें सूक्ष्म हृश्य मी म्हणे ॥ चक्षुरादिकीं प्रकाशणें ॥ स्थूळ ह्मणणें तयासीं ॥१८॥ ऐसें जें स्थूळ सूक्ष्मात्मक ॥ तें मनापासुनी गेलें सकळिक॥ वस्तुता मनाच्याठाईंच भासे देख ॥ मनोलय निःशेष हारपे ॥१९॥ हें मनोलयप्रकरणीं ॥ मनविकारण हृश्य दर्शनीं ॥ ऐसें ठाईं ठेविलें निर्वाणीं ॥ तैसेंच मनीं जाणावें गा ॥ ८२० ॥ नाहो हृश्य तितुकें मिथ्याभूत ॥ तें मनोमयचि मनें भासत ॥ हें मानलें परी संशय येथ॥सावाचित्त परियेसीं ॥ २१ ॥ जरी मिथ्याचि प्रपंच समस्त ॥ तरी सत्यासत्य त्यामाजी स्फुरत ॥ घटादि सत्यत्वें मानित ॥ रज्जु सर्प

घेत असत्यत्वें॥२२॥ स्थूळ देहातें सत्य मानिती ॥ सूक्ष्म जंतु क्षणिक ह्मणती ॥ ऐसी सर्वत्र जनांची प्रतीति ॥ कोणे अर्थी तें सांगिजे ॥ २३ ॥ असत्य तरी येकरूपचि असावा ॥ सत्य तरी सत्यरूपचि भासावा ॥ असत्यामाजिही ह्मणावा ॥ कोण ठेवा असत्यसत्या ॥ २४ ॥ तरी ऐकें याचें उत्तर ॥ जें सांगिजेल मनोहर ॥ जेणें संदेहसागराचा पार ॥ अतिदुस्तर पाविजे॥२५॥तरी पूर्वापूर्वसंस्कारें॥सत्यासत्य ययासीं स्फुरे॥येऱ्हवीं सत्यासत्य नव्हे खरें ॥ पूर्व संस्कारें मनीं वसती ॥ २६ ॥ स्थूळ पडतां स्थूळाचि नासे॥ परी लिंग देह जैसें तैसेंचि असे ॥ लिंगदेहीं सूक्ष्म वसे ॥ संस्कारशेषें राहती ॥ २७ ॥ संस्कारेंसहित लिंगशरीर ॥ अज्ञानामाजि वसे सविस्तर ॥ तेणें संस्कारेंचि समग्र ॥ जन्मांतरें थोर भासत ॥ २८ ॥ ययालागीं जन्मसंस्कारें ॥ दृढतर सत्यासत्य प्रपंच स्फुरे ॥ तेंही ऐका दृष्टांतद्वारें ॥ कळे निर्धारें निश्चित ॥ २९ ॥ जागृतीचे सकळ संस्कार॥ ते स्वप्नीं प्रगटती सविस्तर ॥ जो पावे जागृतीचें घर ॥ तंव सर्व संभार जैसा तैसा ॥८३०॥ स्वप्नीं जग सत्यत्वें देखे ॥ तेथेंही रज्वादि अहिवेषें ॥ परी सत्य भोगी अतिहरिखें ॥ जरी देखे तरी विषाद ॥ ३१ ॥ भयकंपादिकीं दुःख पावे ॥ रज्जुज्ञान झालिया हरिखावे ॥ सत्यासत्यत्वेंहि स्वभावें॥ दोन्ही अनुभवें जाणत ॥ ३२॥ तेथेंही शास्त्रार्थ ऐके ॥ अग्नि होत्रादि साधन मानी निकें ॥ त्यामाजी साधनें अनित्य येकें ॥ येकानेकें मानित ॥ ३३ ॥ ज्ञानसाधनें साच मानी ॥ बोधशास्त्रें ऐके कानीं ॥ जे तप्तशिळाआरोहणीं ॥

१ सर्परूपानें. २ मोठ्याआनंदानें. ३ राग. ४ चांगलें.

व्यर्थ मानी तयातें ॥ ३४ ॥ ऐसे सत्यासत्य प्रकार ॥ स्वप्नीं भासती सविस्तर ॥ प्रबोधिलीयातें सर्व असार ॥ एकही निर्धारें नराहे तेथें ॥ ३५ ॥ सत्य तेंही असत्य झालें ॥ असत्यही तद्रूपचि ठेलें ॥ नाहीं सत्यासत्य संचलें ॥ दोन्हीं टवाळें असंत होती ॥ ३६ ॥ तैसा स्वबोध पावे तंववरी ॥ सत्यासत्य प्रपंचभरोवरी ॥ ज्ञान झाल्या अंतरीं ॥ सरे वारी दोहींचि ॥ ३७ ॥ जगभानें स्वप्नस्थ होता ॥ तंव सत्यासत्य मानी तत्वतां ॥ स्वरूपावबोधें दोन्ही मिथ्या ॥ स्वयें सत्यता निजबोधें ॥ ३८ ॥ ययालागीं स्वात्मबोधेंकरुनी ॥ दृश्य हरपलें हृदयापासुनी ॥ प्रशांतबुद्धी ययालागुनी॥ दृश्य अभावनी शुद्धत्वें॥ ३९ ॥ निःशेष दृश्याभास जाय॥ ते प्रशांतबुद्धी ह्मणिजेत आहे ॥ ह्मणोनि ते सौम्यतर पाहे ॥ कूटस्थ होय गगन जैसें ॥ ८४० ॥ अतिशय सौम्य तें सौम्यतर ॥ प्रपंचोपशमें झाला स्थीर ॥ तोचि तो जाणा अतिधीर ॥ सर्वदां अव्यग्र ह्मणोनियां ॥ ॥४१ ॥प्रपंचसंगें होय व्यग्रता ॥ जे कीं मनासी प्रपंचोन्मुखता ॥ तोचि प्रपंच मिथ्यात्वें बाणतां ॥ चळ चित्ता कदां नव्हे॥४२॥ स्वरूपा आड प्रपंच वसे ॥ आणि तदाकार जेव्हां मन असे ॥ तेचि व्यग्रता सावकाशें॥दृश्य नासे अव्यग्रपणें॥४३॥ दृश्यकंचुक बांधलियावरी ॥ स्वस्वरूपिं विश्रांती होय पुरी॥तेचि अव्यग्रता सर्वांपरी॥ मुक्त दनुजारी तोचि तो॥४४॥तोचि तो परमईश्वर॥तोचि नियंता परमेश्वर॥ बुध्यादि नियंता निर्विकार॥परापर परब्रह्म॥४५॥ऐसा जो जीवन्मुक्त ईश्वर ॥ तो करो कां कर्मव्यवहार ॥ अथवा राहो सर्वदां स्थीर ॥ समाधि पार



१ खोटें. २ लटिकीं. ३ अविकारी. ४ अवराण.

पावोसुखें ॥ ४६ ॥ जरी तो असंगोदास ॥ नाहीं संग ना कर्मपाश ॥ तेंचि निरूपण सावकाश ॥ परिसा परेश रघुनाथा ॥ ४७ ॥ श्लोक ॥ समाधिमथकर्माणिमाकरोतुकरोतुवा ॥ हृदयेनास्तसर्वांशोमुक्तएवोत्तमाशयः॥२२॥ टीका ॥ ऐसा जो कीं जीवन्मुक्त ॥ तो कर्मे करो कां समस्त ॥ विधिनिषेध पाळित ॥ अथवा गाळित दोन्हीतें-हीं ॥ ४८ ॥ तो यज्ञादिक कर्मं करू ॥ अथवा सर्व कर्में अव्हेरू[1] ॥ परि बाध नपावे अंतरू ॥ बोधला थोरू ह्मणोनियां ॥ ४९ ॥ अथवा निरंतर असो समाधिस्थ ॥ सविकल्प निर्विकल्प तटस्थ ॥ अथवा असो व्युत्थित चित्त ॥ कदाचित नकरू कांहीं ॥ ८५० ॥ हृदयापासाव सर्वही आशा ॥ ज्याच्या गेल्या वीरेशा ॥ उत्तमांतः-करण तो परेशा ॥ दृश्य लेशा नस्पर्शे तो ॥ ५१ ॥ तोचि तो मुक्त आन नाहीं ॥ येथें संदेह धरिसी काई ॥ तोचि येवंकारें ठेविले ठाईं ॥ दुसरी नाहीं मात तेथें ॥ ५२ ॥ आतां बंध मोक्षाचें मुख्य कारण ॥ तेंही तुजप्रती सांगेन ॥ तेणें तूं बुझसी संपूर्ण ॥ थोर चिन्ह जीवन्मुक्ताचें ॥ ५३ ॥ हाचि जीवन्मुक्तीच्या लक्षणाचा ॥ उप[2]संहार बोलिजे साचा ॥ तेही लक्षणीं जीवन्मुक्ताचा ॥ भीतरी साचा वोळगा ॥ ५४ ॥ श्लोक ॥ अनात्मन्यात्मधीर्बंधस्तन्नाशोमोक्षउच्यते ॥ बंधमोक्षौनाविद्येतेनित्यमुक्तस्यचात्मनः ॥ २३ ॥ टीका ॥ तरी तेंचि ऐक गा रघुनाथा ॥ चिन्ह सांगोंगा जीवन्मुक्ता ॥ बद्धाचीहि बद्धता ॥ ऐक तत्वतां ऐसी असे ॥ ॥ ५५ ॥ अनात्मा जो अहंकार देहादी ॥ तेथें जयाचि आत्मबुद्धी ॥ पुत्र मित्र कलत्रावधी ॥ जाण

१ विसर्जन केलेलें. २ वर्णन.

सुबुद्धी आत्मा जया ॥ ५६ ॥ विचारितां तरी पुत्रादिक ॥ तो आत्मा नव्हे कीं सकळिक ॥ ययाचा सांगेन तुज विवेक ॥ तेंचि सम्यक परियेसी ॥ ५७ ॥ पुत्रचि आत्मा ह्मणे ऐसें ॥ तरी पुत्र मेलिया स्वयें असे ॥ अथवा आपण मेलिया स्वयें वसे ॥ आत्मा कैसा विचारिपां ॥ ५८ ॥ पुत्र आत्मा जरी होय ॥ तरी तो नासलिया आपण नराहे ॥ पुत्रनाशें स्वनाश होय ॥ अथवा पाहे विपरीत ॥ ५९ ॥ श्रुति ॥ आत्मनस्तुकामायसर्वंप्रियंभवति ॥ ऐसें बोले बृहदारण्यश्रुति ॥ पुत्रादि आत्मसुखाचिये प्राप्ती ॥ ह्मणोनि पुत्रार्थी सर्वही जन॥ ॥ ८६० ॥ पुत्राच्या प्रियीं आत्मत्व नाहीं ॥ पुत्रचि आत्मत्वें प्रियत्वें पाहीं ॥ पुत्रा लेपिले अळंकार सर्वही॥ सुख काय पुत्रासीं होय ॥ ६१ ॥ तेणें आपणचि संतोषिजे॥अथवा पुत्रासीं चुंबन दीजे ॥ तेणेंकरूनि रडे निंबुजे ॥ तें सुख उपजे कवणासीं ॥ ६२ ॥ यालागीं सर्व आपणाचिकारणें ॥ स्त्रीपुत्रादि नाना उपकरणें ॥ ह्मणऊनि तया आत्मा नह्मणणें ॥ अहंकारखुणें जाण तोंची ॥ ६३ ॥ देह आणि अहंकार ॥ हे तंव आपणा दृश्य गोचर ॥ आपण साक्षी निर्विकार ॥ ह्मणोनि अंतरु सर्वांचा ॥ ६४ ॥ तया आपणातें नेणोनी ॥ देहादिकांसी आत्मा मानी ॥ तोचि बंध गा कोदंडपाणी ॥ दृढपणीं दृढावला ॥ ६५ ॥ अगा संसारदुःखासीं कारण ॥ हा बंध यावांचूनि नाहीं आन ॥ बद्ध तो देहात्मबुद्धी जाण ॥ निरयपतन हेंचि बोलिजे ॥ ६६ ॥ देहात्मबुद्धीवांचुनी ॥ बंध नाहीं गा त्रिभुवनीं ॥ जन्ममरण जयाचेनी ॥ अनुदिनीं होतसे ॥ ६७ ॥ संमती ॥ देहात्मबुद्धि-

१ घाबरे. २ नरकवास.

जंपापंनतद्गोवधकोटिभिः॥६०॥टीका॥इत्यादि वचनें बहुत असती॥देहात्मबुद्धी घातक सर्वार्थी॥कोटि गोवध फल्गु होती ॥ नाहीं समाप्ती कल्पांतींहि ॥ ६८ ॥ आत्महत्येसम भार ॥ येकत्र केलिया गोहत्येचे डोंगर ॥ तरी देहात्मबुद्धी याहुनी थोर ॥ नये समभार तुळणेसीं ॥६९॥ अगा बंध तो इतकाचि असे ॥ देहीं आत्मबुद्धी कळासलीसे ॥ तेणें जन्ममृत्युवळसे ॥ अतिआवेशें फिरताती ॥ ८७० ॥ आणि मोक्षाचेंही लक्षण ॥ तेंही इतकेंचि असे जाण ॥ जैसें देहीं बाणलें आत्मपण ॥ अलोट पूर्ण लोटेना जें ॥ ७१ ॥ तैसेंचि आत्मयाच्याठाईं ॥ आत्मबुद्धी हृढावे पाहीं ॥ अज्ञानपणें जैसी देहीं ॥ आनपाईं हृढ होती ॥ ७२ ॥ तेचि आत्मयाच्याठाईं ॥ आत्मबुद्धी जाणे जें आनपाईं ॥ तेचि मुक्ति गा जाण निश्चयी ॥ अवधी पाहीं मोक्षाची ॥ ७३ ॥ ऐसी चित्रदीपिच्याठाईं सर्वांपरी ॥ संमति ऐके रावणारी ॥ जेणें संदेहाची अवसरी ॥ फिटोनि पुरी स्थिती बाणे ॥ ॥७४॥ संमति ॥ देहात्मज्ञानवतज्ज्ञानंदेहात्मज्ञानबाधकं ॥ आत्मन्येवभवेद्यस्यसनेच्छन्नपिमुच्यते॥६१॥टीका॥ देहाच्याठाईं आत्मा ऐसें ज्ञान ॥ तैसेंचि आत्मत्वीं अविछिन्न ॥ देहात्मबुद्धीतें निरसून ॥ उपजे ज्ञान अढळ जया ॥७५॥ तो जरी इच्छिना गा रघुनाथा ॥ तरी तो मुक्तचि जाण सर्वथा ॥ मुक्ती बैसे त्याचे माथां ॥ दवडितांही नव जाय ॥ ७६ ॥ परम बोधाची अवधी ॥ हेंचि जाण गा सुबुद्धी ॥ याहुनी नचढे सर्वादी ॥ आत्मबुद्धी आत्मत्वीं ॥७७॥ इतुकेंनि होतसे कृतकृत्यता ॥ पुढें साधन नलगे तत्वतां ॥ येथें संमति सांगेन आतां ॥

१ फोल, व्यर्थ. २ बांधली, गुंतली. ३ परिच्छेदरहित.

अवधी त्वतां बोधादिकांची॥७८॥ संमतिपंचदशप्रकरणचित्रदीप ॥ ब्रह्मलोकतृणीकारोवैराग्यस्यावधिर्मतः ॥ देहात्मवत्परात्मत्वदार्ढ्येबोधःसमाप्यते ॥ ६२ ॥ सुप्तिवद्विस्मृतिःसीमाभवेदुपरमस्यही ॥ दिशानयाविनिश्चयेंतारतम्यमवांतरं ॥ ६३॥ टीका ॥ इहलोकींचे भोग नावडती ॥ स्वर्गभोगही तुच्छ करिती ॥ किंबहुना ब्रह्मलोकसंपत्ती ॥ स्वयें मानिती तृणासमान ॥ ७९ ॥ ब्रह्मलोक मनोमानसें ॥ तेथील भोगही तृणाऐसे ॥ मानले जया सर्वांशें ॥ वैराग्य ऐसें यया नाम ॥८८० ॥ वैराग्याची अवधी जाण ॥ ब्रह्मलोक मानी तृणासमान ॥ तेथें इतर भोगाची गणना कोण ॥ वैराग्य पूर्ण यया नाम ॥ ८१ ॥ आतां बोधाचा अवधी इतुका॥ तो जाणगा रघुकुळटिळका ॥ तरी देहीं आत्मबुद्धी जैसी देखा ॥ तैसा लेखा आत्मपणीं ॥ ८२ ॥ आत्म्याचे ठाईं आत्मपण ॥ देहात्मबुद्धी ऐसें जाण ॥ बाणे तें बोधाचें अवसान ॥ दृढतर पूर्ण रघुवीरा ॥ ८३ ॥ तैसीच उपरमाची सीमा ॥ तेही ऐके पुरुषोत्तमा ॥ विश्वस्मृती जावया उपरमा ॥ जैसी श्रीरामा सुषुप्तिसीं होय ॥८४॥ प्रपंचाचें विस्मरण ॥ सुषुप्तिसीं निःशेष होय जाण ॥ तैसें झाल्या प्रपंचोपशमन॥तो अवधी पूर्ण उपशमाचा॥ ॥ ८५ ॥ याह्रनि नाहीं अधिक कांहीं ॥ हाचि ययाचा अवधी पाहीं ॥ यालागीं ऐसा बोध जो कांहीं ॥ मुक्ती पाहिं यया नाम ॥ ८६ ॥ संमतिश्लोक ॥ वैराग्यबोधोपरमासहायास्तेपरस्परं ॥ प्रायेणसहवर्ततेवियुज्यंतेक्कचित क्कचित ॥ ६४ ॥ त्रयोप्यत्यंतपक्काश्चेन्महतस्तपसःफलं ॥ दुरितेनक्कचित्किंचित्कदाचित्प्रतिबध्यते ॥ ६५ ॥

१ जोर, बळ. २ लया.

तत्वबोधप्रधानंस्यात्साक्षान्मोक्षप्रदत्वतः ॥ बोधोपकारिणावेतौवैराग्योपरमावुभौ ॥ ६६ ॥ वैराग्योपरतिःपूर्णे बोधस्तुप्रतिबध्यते ॥ यस्यतस्यनमोक्षोस्तिपुण्यलोकस्तपोबलात् ॥६७॥ पूर्णेबोधेतदन्योंद्वौप्रतिबंधौयदातदा॥ मोक्षोविनिश्चितःकिंतुदृष्टदुःखंननश्यति ॥ ६८ ॥ टीका ॥ आणि वैराग्य बोध उपरम ॥ हे तिघे परस्परें सखे परम ॥ त्याचें सख्य अतिउत्तम ॥ तिघे सम येकत्र वसती ॥ ८७ ॥ येक तेथें वसती दोघे जण ॥ परी नराह- ती येकयेकेविण ॥ यांचें उपजावयाचें कारण ॥ स्वरूपफळ पूर्ण सांगों तुज ॥ ८८ ॥ वैराग्यप्राप्तीचें कारण ॥ मुख्य विषयीं दोषदृष्टी जाण ॥ विषय तितुका विदारून ॥ स्त्रक्चंदन वनितादिक ॥८९॥ ऐसी दोषदृष्टी झा- लियावरी ॥ जिज्ञासा उपजे मनाभीतरीं ॥ दोष दृढ झालियावरी ॥ प्रीति विषयावरी उपजेना कीं ॥९०॥ विषय टाकावे हेंचि मनीं ॥ निरंतर वर्ते ज्यालागुनी ॥ तेचि जिज्ञासा कोदंडपाणी ॥ स्वरूप निर्वाणीं वैरा- ग्याचें हें ॥ ९१ ॥ ययाचें फळ तेंही ऐक ॥ मागुतें विषयीं मन नव्हे रंक ॥ नधरी भोगाची अलुकं ॥ नलगे भूक विषयाची ॥ ९२ ॥ मागुतें विषयीं प्रेम झालें ॥ तरी वैराग्यफळ नाहीं फळलें ॥ पूर्ण वैराग्य नाहीं जड- लें ॥ जैसें वमिलें अन्न नापेक्षी ॥ ९३ ॥ आतां बोधोत्पत्तीचें कारण ॥ श्रवण मनन निदिध्यासन ॥ तेणेंचि उ- पजे ब्रह्मज्ञान ॥ हेतु पूर्ण बोधाचा ॥ ९४ ॥ ब्रह्मप्रपंच मिश्रितपण ॥ झाला तेथें विवेक कवण ॥सत्य घेऊनि अ- सत्य त्यजणें ॥ स्वरूप जाणणें बोधाचें हें ॥ ९५ ॥ बोध झाल्याचें फळ हेंचि जाण ॥ नव्हे सत्यासत्येसी ग्रंथन॥

१ शांति. २ स्त्री. ३ जाणण्याचींइच्छा. ४ आवड.

नव्हे मोह विवेक येकपणें ॥ हेंचि पूर्ण फळ बोधाचें ॥ ९६ ॥ यम नियम उपरम उपजे ॥ ह्मणउनी यमादिक हेतु जाणिजे ॥ मनाचा निरोधं सहजे ॥ स्वस्वरूप जाणिजे उपरमाचें ॥ ९७ ॥ व्यवहाराचा क्षय होणें ॥ हेंचि त्याचें फळ जाणणें ॥ पुनरपि व्यवहारीं नप्रवर्तें मनें ॥ जाण खुण उपरमाचि हे ॥ ९८ ॥ एवं वैराग्य बोध उपरम ॥ याचे हेतु स्वरूपफळ परम ॥ निरूपिलें निरूपम ॥ नसे तेंही वर्म सांगों आतां ॥ ९९ ॥ प्रारब्धानुसार गा रघुपती ॥ पूर्णसंस्कारानुरूप हे उठती ॥ या तिघांची येकत्र होय वसती ॥ अथवा होती न्यून कोणी ॥ १०० ॥ आतां येक असतां दोन्ही नसती ॥ तरी तेणें करी काय प्राप्ती ॥ तेही निरुपिजेल व्यक्ती ॥ सावध श्रीपति परियेसी ॥ १ ॥ बोध तरी दृढतर आहे ॥ वैराग्य उपरम जरी साह्य नव्हे ॥ तरी मुक्ति तया सर्वथैव होय ॥ मुक्तीसिं पाहे कारण बोध ॥ २ ॥ बोध येक नसतां गा रघुपती ॥ वैराग्य कां उपरम जागती ॥ तरी उत्तम लोकाचि होय प्राप्ती ॥ परि नव्हे मुक्ती सर्वथैव ॥ ३ ॥ ऐसेही गा योगीश्वर ॥ पूर्वीं आतां आहेति थोर थोर ॥ जनकासीं वैराग्यविचार ॥ दृढतर नव्हता जाण ॥ ४ ॥ अति वैराग्याचें हेंचि लक्षण ॥ तात्काळ कीजे संन्यासग्रहण ॥ संन्यास नघेतां मंदपण ॥ आलें जाण विरक्तीसिं ॥ ५ ॥ आणि वसिष्ठादि ऋषीश्वर ॥ करीत ठेले गृहकर्माचार ॥ ज्ञानी तरि अतिशय थोर ॥ परी वैराग्य सपुर तें तैसें नव्हे ॥ ६ ॥ सर्व विषयीं उदास असती ॥ आतिशय नाहीं विषयासक्ती ॥ परी संग टाकणें हे मती ॥ नुपजे चित्तीं मंद वैराग्यें ॥ ७ ॥



१ शांति. २ आकलन.

आणि तुळाधार प्रमुख ॥ ऐसे ज्ञानी आहेति अनेक ॥ परी त्यांसीं वैराग्यमंदत्व देख ॥ संन्यास सम्यक नघे-
तीच ॥ ८ ॥ परी इतुकेनि न्यून काय झालें॥ प्रपंचसंगें काय बाधलें ॥ ते असंगी अकर्ते ज्ञानबळें ॥ कोपेंही
नमैळे चित्तवृत्ति त्यांची ॥ ९ ॥ ते देहीं असोनि विदेहवंत ॥ संगीं असोनि संगराहित ॥ बोधबळेंचि जीवन्मुक्त॥
जरी करित राज्यादिकें ॥ ९१० ॥ तैसाचि ज्ञानियांमाजि उत्तम ॥ नारद देवऋषी सर्वोत्तम ॥ परी अल्प
होतां उपरम ॥ करी काम कलहादिक ॥ ११ ॥ परी उपरमाचेनि अल्पपणें ॥ काय बोधासिं आणिलें उणें ॥
ब्रह्मरूपेंचि सर्व वर्तणें ॥ पुरे उणें काय तेथें ॥ १२ ॥ ब्रह्मरूप त्याचा व्यवहार ॥ ब्रह्मरूप त्याचा राज्यभार ॥
ब्रह्मरूप त्याचा कुळाचार ॥ ब्रह्म चराचर सर्वही जया ॥ १३ ॥ एवं वस्तुवेगळें कांहीं ॥ अणुमात्र दुजें नाहीं ॥
तेथें बाध्य बाधकता तया काई ॥ सर्वत्र पाहीं ब्रह्म जया ॥१४॥ भरथासीं अतिवैराग्य होतें ॥ तेणें सार्वभौम
टाकिलें राज्यातें ॥ परि पूर्ण बोधेविण होतें रितें ॥ हारिण देहातें पावला तो ॥ १५ ॥ यालागीं मुख्य मुक्ति-
प्रति कारण॥ येक पूर्ण बोधचि सर्वथा जाण ॥ मुक्ति होय वैराग्य उपरमेंविण ॥ ऐसे सामर्थ्य पूर्ण बोधाचें हें
१६॥बोध नसतां मुक्ति नव्हे ॥ जरी वैराग्य उपरम आहे ॥ यालागीं येकला बोध होय ॥ तरी सिद्ध जाय सर्व
ही ॥ १७ ॥ परी येक असतां दोन्हीं असती ॥ येकेवीण सर्वथा नसती ॥ ऐसीच परस्परें यांची व्याप्ति ॥ तिघे
सांगाती सख्यत्वें ॥ १८ ॥ परि इतुकेंचि येथें असे ॥ येक अधिक दोघांचें मांद्य दिसे ॥ परी निःशेष न-

१ शांति. २ कमीपणा.

सतां दुजें नसे ॥ सख्य ऐसें त्रिवर्गांचें ॥ १९ ॥ जैसे सत्व रज त्रिगुण ॥ प्राणिमात्रीं असती जाण ॥ परि येकें येकाचें आधिक्य पूर्ण ॥ दोन्ही न्यून परि असती ॥ १२० ॥ परि येकेंविण येक नाहीं ॥ हे व्याप्तीच तिहीं गुणासीं पाहीं ॥ तैसे हे बोधादिक तिघेही ॥ सर्वथा नाहीं येकेंविण येक ॥ २१ ॥ मुळीं दृढ वैराग्य नसतां ॥ तरी बोध नुपजे गा सर्वथा ॥ बोधेंवीण उपरमंता ॥ कदा कल्पांता उपजेना ॥ २२ ॥ ह्मणऊनि ऐसी व्याप्ति असे ॥ यालागीं बोध तेथें सर्वही वसे ॥ हा निर्धार जाणिजे विश्वेशें ॥ अनारिसें तेथें नाहीं ॥ २३ ॥ प्रसंगेंकरूनि गा रघुनाथा ॥ सांगीतली बोधादि कथा ॥ यालागीं देहात्मबुद्धी सर्वथा ॥ करी घाता सर्वस्वाच्या ॥ ॥ २४ ॥ ह्मणउनी देहात्मबुद्धी हेंचि बंधन ॥ तियेचा नाश तोचि मोक्ष जाण ॥ तोहि ब्रह्मज्ञानावांचुन ॥ नव्हे क्षीण सर्वथा ॥ २५ ॥ ब्रह्मज्ञानासीं उपाय कोटी ॥ केलिया नव्हे ज्ञानेसीं भेटी ॥ तें सद्गुरुदर्शनें उठाउठी ॥ तें ज्ञानचि भेटी येतसे ॥ २६ ॥ ह्मणोनि सद्गुरुकृपावलेशें ॥ देहबुद्धिबंधन निःशेषें नासे ॥ तोचि मोक्ष हें विश्वासें ॥ रघुवंशें जाणावें ॥ २७ ॥ नित्य मुक्त जो कीं परमात्मा ॥ तोचि जीवन्मुक्ताचा महिमा ॥ त्यासीं बंध मोक्षाची सीमा ॥ नाहीं श्रीरामा विदित त्यासीं ॥ २८ ॥ तो नेणे बंधमोक्षासीं ॥ बंध मोक्ष कैंचा त्यासीं ॥ तो आत्माराम स्वरूपेसीं ॥ क्रीडे निश्चयेसी स्वरूपीं ॥ २९ ॥ देहबुद्धीचि वार्ता नेणे ॥ तेथें देहबुद्धी गेली हे कोण ह्मणे ॥ ते गेलिया मोक्ष ह्मणणें ॥ ये दोन्ही वार्थां उपाधिगत ॥ १३० ॥ तोचि तो जाण नित्यमुक्त ॥ बंधमोक्षासीं नाहीं जाणत ॥

१ शांतता. २ भिन्न, दुसरें. ३ व्यर्थ.

परमानंदें असे डुल्लत ॥ मीपणाचि मात टाकूनिया ॥ ३१ ॥ अहो पूर्वोक्त लक्षणेंकरूनि ॥ जीवन्मुक्त जाणिजे भरवसेनी॥उपसंहारें मुक्ताचे निरूपणीं ॥ येहिं लक्षणीं जाणावा ॥३२ ॥ मुख्य मुक्ताचि सुखसंपन्नता ॥ ते इतुकीचि गा रघुनाथा॥ तेचि ते एका बोलें आतां ॥ तुज तत्वतां सांगेन ॥३३॥ श्लोक ॥ दृश्यंनास्तीतिबोधेनमनसो दृश्यमार्जनं॥संपन्नाचेत्तदुत्पन्नापरानिर्वाणनिर्वृतिः॥२४॥ टीका ॥दृश्य अवास्तव्यबोधेंकरून॥मन होय जें दृश्या विहीन ॥ बोधाचें मुख्य कारण ॥ सद्गुरुचरण महावाक्य ॥ ३४ ॥ तें महावाक्य गुरुमुखेंकरुनी ॥ पदार्थ बरवे शोधूनि दोन्हीं ॥ वाक्यार्थ बोधेंकरूनि ॥ बोध निर्वाणीं दृढतर तो ॥ ३५ ॥ ऐसा बरवा बोध झालिया ॥ निःशेष दृश्य जातसे लया ॥ मनाच्याठाईं आपसया ॥ दृश्यमार्जन यया शब्दा नाम ॥ ३६ ॥ अन्यथा इतर बोध ह्मणती ॥ तेणें नव्हे दृश्यसमाप्ती ॥ ते तंव शब्दांचीच वदंती ॥ दृश्य उन्नती जैसी तैसी ॥ ३७ ॥ असो ऐसिये बोधें सर्वदां ॥ गेली तयाचि दृश्यबाधा ॥ मन संपन्न आरूढ बोधा ॥ परमानंदा पावला तेव्हां ॥३८ ॥ तेव्हां परमसुख जे निवृत्ती ॥ जियेतें निर्वाण ऐसें बोलती ॥ तेचि तया होय प्राप्ती ॥ मोक्षस्थिती अखंड॥३९॥ निवृत्ति शब्दें निरतिशय सुख ॥ जयासीं अतिशय नाहीं देख ॥ परमकाष्ठा जें निर्वाण येक ॥ तेंचि सुख तयाचें ॥ ९४० ॥ निर्वाण निवृत्ति आड ॥ असे यया दृश्याचें कवाड ॥ दृश्यमेळें निरतिशय कोड ॥ अति दुर्वाड रघुपुंगवा ॥ ४१ ॥ सर्वदां सुख प्राप्तचि असे॥ परी दृश्य सत्यत्वें नाहिंसें दिसे ॥दृश्यसंवलित तें मंद भासे॥

१ वर्णन. २ मिथ्या. ३ त्याग. ४ इच्छा. ५ कठिण. ६ व्याप्त.

निर्वाण असे दृश्यक्षयीं॥ ४२ ॥ सर्व सुखमात्र जें कीं रघुनाथा ॥ तें तंव आत्मसुखचि गा तत्वतां ॥ विषयभो- गें सुखसंपन्नता ॥ तेंचि तें तत्वतां जाणावें ॥ ४३ ॥ परि दृश्य विषय संवलित ॥ झालें ह्मणोनि सुख किंचि- त ॥ दृश्यनाशें अपरमित ॥ सुख उन्नत सुखकोटी ॥ ४४ ॥ जेथें दृश्यमात्र नस्फुरे ॥ तेथें द्वैत तें सहजचि विरे ॥ मग अद्वैतसुखेंचि स्फुरे ॥ परमानंद धुरे तोचि जाण ॥ ४५ ॥ ययातें परमानंद ह्मणिजे ॥ तयावेगळें दुजें ने- णिजे ॥ ते स द्गुरुकृपाचि जाणिजे ॥ येरीं नेणिजे अनुमानीं ॥४६॥हेचि निर्विकल्प समाधी ॥ असंप्रज्ञात निर्बी- ज अवधी ॥ हेंचि ज्ञान पैं त्रिशुद्धी ॥ नाहीं वृद्धी ययाहुनी ॥ ४७ ॥ सप्तभूमिका ह्मणिजे इयेसीं ॥ ज्ञानी अनु- भविती अहर्निशीं ॥ निर्वाण ऐसें ह्मणती इयेसीं ॥ सर्वस्वेसीं जाण बापा ॥ ४८ ॥ हाचि मोक्ष हेंचि मुक्ती ॥ हेंचि जाणावी स्वरूपस्थिती ॥ हेंचि बोलिजे ब्रह्मप्राप्ती ॥ इतर गती न्यून जाण ॥ ४९ ॥ हेंचि समाधान चित्ता- चें ॥ हेंचि मुक्त लक्षण मुक्ताचें ॥ जेथें नांवचि पुसे दृश्याचें ॥परमानंदाचें आरोगणं ॥५०॥भोक्ता भोग्य भोग आ- पण ॥ भोक्तृत्व नाहीं आपणेंविण ॥ ऐसें अभिनव अवस्थानं ॥ स्थान मान जेथें नाहीं ॥ ५१ ॥ जेथें सरे शब्दाची वारी ॥ आनंदें आनंदाचीच भरोवरी ॥ नदेखे दुजें मनें करी ॥ आनंदभीतरीं आनंदें॥५२॥हे परानिवृत्ति जाण॥ जें कीं निरतिशयसुख निर्वाण ॥ सच्चिदानंदैकघन ॥ परम पावन पावना ॥ ५३ ॥ ऐसें केवळ परमानंदसुख ॥ जेथें नस्फुरे द्वैतमात्र दुःख ॥ दृश्यादृश्य सकळिक ॥ नाहीं देख जियेठाईं ॥ ५४ ॥ऐसें सुखेंकरूनि देणें घेणें ॥

१ पुढें. २ निर्विकल्प. ३ भक्षण. ४ स्थिति.

सुखेंचि सुख भोगणें ॥ हाचि मोक्षमुक्ति ह्मणणें ॥ नाहीं नेणणें दृश्य जेथें ॥५५॥ येच देहीं येच डोळां ॥ भो-
गिजे गा सुखाचा सोहळा॥तो दुरी नाहि दिग्मंडळा॥नाहीं पाताळा खालुताही॥५६॥श्लोक॥नमोक्षोनभसःपृ-
ष्ठेनपातालेनभूतले ॥ सर्वाशासंक्षयेचेतःक्षयो मोक्षइहेष्यते ॥ २५ ॥ टीका ॥ ऐसा मोक्ष गा रघुनंदना ॥ नाहीं
स्वर्गावरुता जाणा ॥ आणि नाहीं पाताळभुवना ॥ खालुता ह्मणा नाहींच तो ॥ ५७ ॥ तो मोक्ष नाहीं गा
भूतळीं ॥ नाहीं लपविला ब्रह्मांडगोळीं॥तो नभेटे जप तप धूमकल्होळीं॥ पंचाग्निमेळिं नभेटेच कीं॥५८॥त्रि-
भुवनीं नसांपडे पाहतां॥अमित मौल्यही देतां नये हाता॥तोचि सद्गुरुचरण सेवितां॥लाभे आइता स्वतःसिद्ध
॥ ५९ ॥ सद्गुरुचेनि वाक्यवचनें ॥ सर्वाशांचा क्षय होय पूर्ण ॥ आशासंक्षयें क्षयो मनें ॥ अतित्राणें[2] पाविजे गा
॥ ९६० ॥ आशानाशें क्षय जो चित्तासीं ॥ तोचि बंध विच्छेद परियेसी ॥ बळें निग्रह कीजे मनासीं ॥ नव्हे
तो मोक्षासि हेतुभूत ॥ ६१ ॥ वायुनिरोधें मन निरोधिती ॥ लयलक्षीं लय पाववीति ॥ ते मूर्छा कां जैसी सुषु-
प्ती॥नाहीं संपत्ति विवेकाची ॥६२॥ विवेकसंपत्ति करूनि जें ज्ञान ॥ महावाक्यें उठिजे संपूर्ण ॥ तें जग टवाळ
अभास जाण॥मग सत्य निर्वाण स्वरूप भासे ॥६३॥ दृश्यजात मिथ्या बाणल्या ॥ मग कैचें मनवासना इया ॥
वासनाक्षयेंचि गा रघुराया ॥ मनही विलया जातसे ॥ ६४॥ मन नासावयाचें कारण ॥ येकि वासनाक्षयाचि-
गा जाण ॥ वायुधारणें मूर्छित पूर्ण॥उठिल्या तरुण जैसें तैसें ॥६५॥ जंव मन निरोधिलें असे ॥ तंव दृश्य-

१ यज्ञाच्याधुरांत. २ त्वरित.

जात कांहीं नभासे ॥ परि तें निःशेष बाधिलें नसे ॥ लीन असे चित्तामाजि ६६ ॥ चित्त सावध झालियावरी ॥ जैसी तैसी मायाविश्वलहरी ॥ जैसी दिवा निद्रा बाळें करिती परी ॥ निजोनि झडकरी उठती जैसीं ॥ ६७ ॥ दिवसचि रात्रि झाली ह्मणती ॥ ह्मणउनी नेत्र लाउनी निजती ॥ तेव्हां क्षणेक दृश्य जरी न देखती॥ तरी कोण स्थिती बाणली तया ॥ ६८ ॥ इतुकेनि काय दृश्य बाधलें ॥ कीं परमानंदसुख लाधलें ॥ व्यर्थचि स्वसंकल्पें नेत्र झांकिले ॥ स्वयेंचि उघडिले सूर्योदयें ॥ ६९ ॥ तया अर्भकांच्या खेळणीं ॥ दिवस तैसाचि होय रजनी॥व्यर्थचि उठती निजोनि ॥ काय निर्वाणीं फावलें तया ॥ १७०॥ तैसें चिरकाळ मननिग्रहण ॥ केलिया काय प्राप्त जाहालें जाण ॥ आणि ज्ञानेंवीण वासनादहन ॥ केलियाहि पूर्ण सर्वथा नव्हे ॥ ७१ ॥ सुषुप्तीसिं मननिग्रह होय ॥ वासनाजाळही लया जाय ॥ इतुकेनि जरी संसृति नहोय ॥ तरी निजावें पाहे अहोरात्रि लोकीं ॥ ७२ ॥ अहोरात्र जैसें कां निजणें ॥ तैसें वायुरोधें चित्त निग्रहणें ॥ ह्मणोनि वासनाक्षय करावा ज्ञानें॥तेणेंचि मन क्षय पाविजे ॥ ७३ ॥ मनाचेनि क्षयें मोक्ष बोलिजे॥तो मोक्ष ये देहींच अनुभाविजे ॥ स्वर्गादिठाईं नपाविजे ॥ नशिणिंजे बाह्यदृष्टी ॥७४ ॥ बाह्यदृष्टी हा जंव जंव पाहे ॥ तंव तंव शीणचि होत आहे ॥ परी मोक्ष तो सर्वथा हाता नये ॥ वेडावोनि राहे अतिमूढपणें ॥ ७५ ॥ मोक्षालागीं नाना साधनें ॥ ज्ञानेंसि सर्वथा नकरणें ॥ केलिया, दुःखचि पावणें ॥ अति शीणणें जन्मोजन्मीं ॥ ७६ ॥ याचा येकचि उपाय असे ॥ धरावे

१ दिवसास. २ मुलांच्या. ३ रात्री. ४ जन्ममरण. ५ त्रासपावतनाहीं.

गुरुचे पाय अतिविश्वासें ॥ तेणें मोक्ष स्वतःसिद्ध असे ॥ अतिप्रयासें कोण काजा ॥ ७७ ॥मुक्तता ते इतुकीचि जाण ॥ जैसें हातीचें हातीं भेटे रत्न ॥ हातिंच्यालागीं व्यर्थचि प्रयत्न ॥ नुसता शीण जो जो कीजे ॥ ७८ ॥ आणि मोक्षाचें ही मोक्षलक्षण॥ तेंही तें एवंविध जाण ॥ जैसें देहाच्याठाईं आत्मपण ॥ दृढतर पूर्ण होय जैसें॥ ॥७९॥ तैसेंचि आत्मयाच्याठाईं ॥ आत्मत्व बाणे जरी आनपाईं॥ तरी तोचि मोक्ष आन नाहीं ॥ नमैळे देहीं वर्तता जाण ॥ ९८० ॥ आत्मत्वीं आत्मत्व दृढतर बैसे ॥ मग तेथील आनंद कैसा असे ॥ तो अनुभवी जाणती आपैसें ॥ सुखवेशें सुखरूप ॥८१॥ सहज आत्मसुख निरतिशय ॥ तेथें नाहीं दुःखलेश परिमेय ॥ अनुकूळ ना प्रतिकूळ द्वेभय ॥सांडूनि तृतीय अनुभवावें॥८२॥अनुकूळ तें विषयसुख॥जें दुःखाभावें अतिअक्लृक ॥ जैसें मार्गीं जातां सुवर्णादिक ॥ भेटल्या सुख जेविं उपजे ॥ ८३ ॥ तैसें व्याघ्र सर्पदर्शनें ॥ द्वेष सुख त्याज्यपणें ॥ तैसें दोनी नसोनि जें असणें ॥ पालट कोणें क्षणें नपवे॥८४॥ तेंचि सहजें सुखमर्यादा ॥ येहीं दोहीं लक्षणीं नये बाधा ॥ नाहीं कदापि दुःखसांधा ॥ परमानंदा आनंदवी ॥ ८५ ॥ तें सुख अतिनिरुपम ॥ नाहीं कोणासी जें उपम ॥ तेंचि ब्रह्मसुख जाण परम ॥ अति सुगम सद्गुरुकृपा ॥ ८६ ॥ देहात्मज्ञान नसतांचि क्षणीं ॥ सुखचि नमाये सुखपणीं ॥ आत्मसुखासिं हेचि व्यव धानीं ॥ जाण निर्वाणीं देहबुद्धी हे ॥ ८७ ॥ ते नासत क्षणीं सुख असे ॥ आणि तया बंध कोणीच नसे ॥ सुख सुखेंचि उल्हासे ॥ मोक्ष असे ऐसाचि जाण ॥ ८८ ॥ हा मोक्ष तंव दे-

---

१ सहज. २ परिमाण. ३ चांगलें. ४ विघ्न.

शातरीं नाहीं॥स्वर्गपाताळादि शोधितां ही ॥ तो तंव अनुभाविजे येचि देहीं ॥गुरुकृपा पाहीं झालिया ॥८९॥ देहात्मबुद्धीच्या संगती॥सर्वत्र स्फुरे द्वैतसंपत्ती॥द्वैतबुद्धी नेणे ब्रह्मसुखाचि शांती ॥ जाण रघुपती निर्धारें॥९०॥ दृश्यनाशें ब्रह्मसुखचि असे ॥ तेथें आत्मत्वीं कोणा बंध भासे ॥ सर्वथा मग कांहींच नसे ॥ स्वयें उल्हासे ब्रह्मपण ॥ ९१ ॥ तेंचि ऐके त्रिदशाधिपती ॥ निरूपणकीजेल श्लोकसंगती ॥ तेंचि ऐकें ऐकाग्रचित्तीं ॥ स्वरूपास्थिती बाणे जेणें ॥ ९२ ॥ श्लोक ॥ अनंतेचिद्घनानंदेनिर्विकल्पैकरूपिणि ॥ स्थितेद्वितीयस्याभावात्कोबंधःकश्चमुच्यते ॥ २६ ॥ टीका ॥ ब्रह्म जें अनंत चित्सदानंद ॥ निर्विकल्पैकरूप अगाध ॥ तेथें स्थिती बाणलिया निबद्ध ॥ मग सांग बंध कवणासीं ॥ ९३ ॥ आतां येकेक पदाचें व्याख्यान ॥ सांग तुजलागीं सांगेन ॥ सद्गुरुचरणा करूनि नमन ॥ अर्थानुसंधान परियेसीं ॥ ९४ ॥ देश काळ वस्तुपरिछेदक ॥ कैसे तें सांगों तुज सम्यक ॥ ब्रह्म तें सदाअपरिछेदक ॥ नित्य व्यापक परिपूर्ण ॥ ९५ ॥ देशकाळें वस्तुता ॥ परिछेद नाहींच तत्वता ॥ हेचि काळत्रयीं अबाधिता ॥ नित्य नित्यता ब्रह्माची ॥ ९६॥ ग्राम अतिथोर जरी झाला ॥ परी अन्य देशीं नाहिं व्यापला ॥ तो देशपरिछेदत्वें बोलिला ॥ परिछिन्नत्व पावला अव्यापकपणें ॥ ९७ ॥ ऐसाचि अनेका दृष्टांतीं ॥ देशपरिछेद जाणावा संतीं ॥ जे येकदेशी असोनि देशांतीं ॥ असे समाप्ति जयांची ॥ ९८ ॥ याचें नाम देशपरिछेदन ॥ अव्यापकासीं घडे जाण॥ब्रह्म तें व्यापक परिपूर्ण ॥ अनुभवें जाण सिद्धची॥९९॥

१ अर्थदृष्टि. २ भेदरहित.

तैसेचि घटपटादि पदार्थ ॥ असती काळपरिछेद् पावत ॥ काळांतरीं असत नासत ॥ ह्मणोनि पावती परिछेदन ॥ १००० ॥ नश्वरपणें काळपरिछेदता ॥ हे तंव आहे पृथ्व्यादिभूतां ॥ ते ब्रह्मीं नाहिं तत्वतां ॥ असे नित्यता ह्मणोनियां ॥ १ ॥ जें कीं शुद्ध नित्य निरंतर ॥ त्यासि नाहींहि काळव्यभिचार[1] ॥ सर्वेही वस्तु नश्वर ॥ नित्य निर्विकार परब्रह्म ॥ २ ॥ काळें व्यभिचार सर्वांसि होत ॥ जागृतीमाजि सुषुप्तींत नासत ॥ स्वप्नकाळीं दोन्हीं नाहींत ॥ दोन्ही भ्रंशत सुषुप्तीसिं ॥ ३ ॥ तैसेचि जे जे अवस्थेचे पदार्थ ॥ ते अवस्थात्रयीं नाश पावत ॥ सुषुप्तिकाळीं नाहींच होत ॥ नाशिवंत सर्वही ॥ ४ ॥ त्या तिहीं अवस्थाचेनि नाशें॥नाना पदार्थ भ्रंशती तैसे ॥ आत्मा तो येकचि असे ॥ तो जाणतसे सर्वांसीं ॥५॥ तिहीं अवस्थांचें ज्ञान ॥ आणि जें जें अवस्थेचें भान ॥ तें तें सर्व तयाचें अनुसंधान ॥ अविनाशी ह्मणोनि सर्वदां ॥ ६ ॥ यालागीं तिहीं अवस्था ॥ जातां येतां आत्माचि तत्वतां ॥ यासि नाहीं काळपरिछेदकता॥नित्य अकर्ता अविनाशपणें ॥७॥जैसें आकाश देश काळें अपरिछेद्य[2] ॥ तैसी वस्तु नपावे परिछेद ॥ वस्तु दुसरी तेणेंसि विरुद्ध ॥ घटादि प्रसिद्ध असेचि कीं॥८॥पंचमहाभूतें पृथ्व्यादिकरूनि॥वस्तु असती दुजेपणीं॥तेणें आकाश परिछेदनीं ॥ पावे निर्वाणीं परिछेद ॥९॥तैसें ब्रह्म नव्हे जाण॥यासि वस्तुसीं परिछेदन॥करी ऐसें सत्यत्वें कोण॥दुजेपण वस्तुसीं॥ १०१०॥ब्रह्मीं ऐसी दुसरी वस्तु कोण ॥ जे ब्रह्मासि करी परिछेदन ॥ ब्रह्मावेगळें तें नश्वर परिछिन्न॥दृश्य जाण असत्यत्वें ॥ ११ ॥

१ प्रतिबंध, विक्षेप. २ भेदरहित.

तेणें परिछेद सत्य वस्तुसीं ॥ कैसा घडे कोण देशीं ॥ यालागीं ब्रह्म अविनाशी ॥ व्युत्पत्ति ऐशी अनंतपदें ॥ १२ ॥
ह्मणोनि देश काळें वस्तुविचारें ॥ अपरिछेद्य अविनाश निर्धारें ॥ अनंत परिपूर्ण येणें प्रकारें ॥ एक दुसरें चि-
त्पद ॥ १३॥चित्त शब्दें ज्ञानस्वरूप ॥ कीं स्वप्रकाश निष्कंप ॥ जडाचें व्यावर्तने अमुप ॥ज्ञानस्वरूप स्वप्रका-
शें॥ १४॥ चित्सदानंद पदेंकरुनी ॥ ब्रह्मस्वरूपचि बोलिजे निर्वाणीं॥तेंचि येक येक पदें वाखाणी ॥ चित्त देउनी प-
रिसीजे ॥ १५॥ सत शब्दें सत्तारूप असे ॥ तेथें असंताचि व्यावृत्ती केलि असे ॥ ब्रह्म सर्वदां संतचि असे॥ सत ऐसें
बोलिजे कीं॥ १६॥ आनंद शब्दें परमानंद ॥ जो कीं स्वानुभवैक सुखस्वाद ॥ येणें दुःखाचि व्यावृत्ती विषद ॥ क-
रूनि बोध केवळ जो ॥ १७॥ नाहो येकेंचि वस्तुचिं वाचकें॥ तिनी पदें कोणें निमित्तिकें॥ तरी काय गुण गुणी भाव
निके ॥ वर्तती कौतुकें परब्रह्मीं॥ १८॥ ब्रह्म नव्हे तें स्वयें गुणी बोलावें॥त्याचे तेही गुण जाणावे॥ सच्चिदानंद स्व-
भावें॥गुण हे गौरव वस्तुचेकीं॥ १९॥तरी गुण गुणी तो भाव ऐसा॥सांगिजेल एकाग्र परियेसा॥घट गुणीं तेथें रस-
रूपादि ठसा॥तोचि गुण ऐसा निर्णय॥ १०२०॥ अथवा नीलोत्पला स्वयें गुणी ॥ नीळादि गुण वसती तिये स्था-
नीं॥म्हणोनि नीळगुण नीलोत्पल गुणी॥येहीं लक्षणीं वर्ततसे॥ २१॥तेथें गुण वेगळे तयाहुनी॥गुणी वेगळाचि असे
निर्वाणीं॥तयासिं परस्परें भेदचि जनीं॥प्रसिद्ध नयनीं देखिजेत॥ २२॥ तैसें हें परब्रह्म सर्वथा नसे॥तिहीं पदीं ब्रह्म-
चि प्रकाशे॥गुण गुणी भावभेद नसे॥तेंचि तें असे सर्वोत्कर्षें॥ २३॥जरी गुण गुणी भाव बोलिजे॥ तरी परस्परें त्या

१ विवंचना, विचार. २ शांत. ३ अव्याप्ति. ४ नीळें कमळ.

भेद नेणिजे ॥ येक येका वेगळें कीजे ॥ तरी सिद्धी नपविजे ब्रह्मपणें ॥ २४ ॥ हे सर्वही मागों विवंचना ॥ स्पष्ट
केलीसे सज्ञाना ॥ तोचि येथें करितां निरूपणा ॥ पुनरुक्तपणा येतसे ॥२५॥ यालागीं सत्तादिक ते गुण॥ब्रह्म तें
गुणी तद्विशिष्ट जाण ॥ ऐसें तूं सर्वथा नह्मण ॥ अर्थ हा पूर्ण नेणोनियां ॥ २६ ॥ याचा मुख्यार्थ ऐसाचि
असे ॥ आणि ब्रह्म तें वाचक नव्हे सर्वांशें ॥ हीं पदें जाणिजेति लक्षांशें ॥ तेंही सावकाशें परिसावें ॥२७॥
चित् शब्दें स्वप्रकाश॥ज्ञानरूप चित्तवृत्तीसीं साभास॥घट पट प्रकाशी सावकाश॥तो वाच्यांश जाणावा॥२८॥
तें वाच्यांशत्व टाकुनी ॥ स्वप्रकाश घेइजे लक्षुनी ॥ चित्तवृत्ति जे किं जाणपणीं॥ टाकिल्या निर्वाणीं स्वप्रका-
श फावे ॥ २९ ॥ जैसें लौकिक आकाश ॥ सत्य शब्दें तेंचि वाच्यांश॥ त्याचें टाकिल्या नामरूपांश॥ सत्ता सा-
वकाश स्वयेंचि लाभे ॥ १०३० ॥ तैसाचि चित्तवृत्तीनें विषयानंद ॥ भोगिजे जो सुखस्वाद ॥ त्याचें भोगणें
ज्ञातृत्व विषद ॥ करूनि बाध वाचकांचा ॥ ३१ ॥ विषयानंदाची सुखस्फूर्ति ॥ विषयानंदत्वें झालिया समा-
प्ती ॥ परमानंद येतसे व्यक्ती ॥ सुखसंविंती परमानंदें ॥ ३२ ॥ ऐसें पदत्रयाचें वाच्यांश ॥ टाकूनियां सावका-
श ॥ फावे चित्सुखानंद स्वप्रकाश॥सद्रूपांश नित्यानंद ॥ ३३ ॥ जे कीं गुरुखुणेचे कुशळ ॥ ते पावती सच्चिदा-
नंदकल्लोळ ॥ दृश्यमात्रीं पदत्रयमेळ ॥ वाच्यांश मळ टाकिल्या फावे ॥३४ ॥ ऐसें अनंत चित्सदानंद ॥ परब्रह्म
जें कीं अगाध॥जेथें सर्व कल्पनेचा बाध ॥ तेंचि ते निर्विवाद नित्यानंद ॥३५ ॥ कल्पनामात्रही लेश ॥ जेथें वि-

---

१ लक्षणयुक्त. २ उद्भव. ३ आनंद. ४ निःसंशय.

रतसे निःशेष ॥ तेंचि तें परब्रह्म येकरस ॥ नाहीं भास दुजेपणाचा ॥ ३६ ॥ ऐसा परमानंद जो येकरस ॥ नाहीं दुसरीयाचा आभासलेश ॥ तेंचि सच्चिदानंद पदत्रयांश ॥ सावकाश जडादि हीन ॥३७॥ असत् जड दुःखादिक ॥ व्यावर्तलें पदत्रयें देख ॥ विश्व या वेगळें आणिक ॥ नाहीं सम्यक बोलावया ॥३८॥ जें जें बोलाल नयनीं देखाल ॥ श्रवणीं जें कांहीं ऐकाल ॥ घ्राणें घ्राणाल त्वचेनें स्पर्शाल ॥ रसनें चाखाल जें जें कांहीं ॥३९॥ मनें जें जें संकल्पाल ॥ बुद्धीनें जें जें कांहीं बोधाल ॥ सर्वेंद्रियें जें जें कांहीं जाणाल ॥ दृश्य सकळ जड तितुकें ॥ ॥१०४०॥ तेंही मिथ्याभूत दुःखरूप ॥ स्थूळ सूक्ष्म विश्व अमूप ॥ जें कीं श्रुतदृष्ट असद्रूप ॥ जाण सकंप चंचलत्वें ॥ ४१ ॥ तरी हें तंव कांहींच नाहीं ॥ पदत्रयें व्यावर्तिलें पाहीं ॥ तरी उरे जें येकरस सर्वही ॥ नाहीं कांहिं दुजें तेथें ॥ ४२ ॥ यालागीं परमानंद येकरस ॥ ह्मणऊनि येकरूप निर्विशेष ॥ ऐसें ब्रह्म तें सावकाश ॥ असम सहास परिपूर्ण जें ॥४३॥ दुसरीयाचेनि अभावें ॥ स्थीर झाला जो कीं अनुभवें॥ तो ब्रह्मानंदस्वरूपिं न संभवे ॥ बंध स्वभावें अविद्यक ॥ ४४ ॥ तेथें बद्धता काय असे ॥ कोणासीं बद्धता बोलिजेत असे ॥ बोधें बोधलिया मानसें ॥ बंध नसे काळत्रयीं ॥ ४५ ॥ जेथें अविद्या उरली असावी ॥ तरी बंध मोक्षाचि ठेवाठेवी ॥ ते आत्मबोधें गेली आघवी ॥ बंध उरवी कोणालागीं ॥ ४६ ॥ सद्गुरूचेनि कृपावलेशें ॥ अविद्या गेली दाहीदिशें ॥ सर्वत्र ब्रह्मानंदचि उल्हासे ॥ सामरस्यें येकपणें॥४७॥दुजें असलिया येक बोलिजे ॥ येकीं एक काय ह्मणिजे ॥ सा-

१ व्यापिलें. २ भेदरहित ३ मायिक. ४ ऐक्यत्वानें.

मरस्य कोणाचें कोणें कीजे ॥ दुजें नेणिजे आपणेंविण ॥ ४८ ॥ एवंभूत जो कां आपण ॥ तो सद्गुरुकृपें झाला निर्वाण॥त्यासीं बंध तो कोणाचा कोण ॥ मोक्षही कोण कैंचा काय ॥ ४९ ॥तयासीं मोक्ष ना बंधन ॥ तो परिपूर्ण चैतन्यघन ॥ येकायेक परम निर्वाण ॥ आनंदपूर्ण पूर्णत्वें ॥१०५० ॥ मन मनपणें चैतन्यघन॥तयासीं कैचें मनपण ॥ मन नासलिया ब्रह्मपूर्ण ॥ मनें बंधन सर्वांपरी ॥ ५१ ॥ श्लोक ॥तस्माद्दुल्हासमात्रेणमनसोबंधतांगते ॥ मनःप्रशमनेराममोक्षएवावशिष्यते ॥ २७ ॥ टीका ॥ याकारणें गा श्रीरघुनाथा॥मनोल्हासमात्रेंचि बद्धता ॥ तें मन होतांचि प्रशमता ॥ मोक्ष आइता स्वतःसिद्ध ॥ ५२॥ यालागीं मन ब्रह्मीं लीन कीजे॥ मन मनपणा येवों नदिजे ॥ इतुकेंनि मुक्तिच सहजे॥ येथें नधरिजे संशय कांहीं ॥ ५३ ॥ जीवन्मुक्ताचें हें लक्षण ॥ लक्षणीं संपलें निरूपण ॥ जीवन्मुक्ति हें प्रकरण ॥ झालें संपूर्ण इतुकेनी ॥ ५४ ॥ यया प्रकरणाचेनि श्रवणें ॥ बद्धेंही जीवन्मुक्त होणें ॥ययालागीं हें श्रवण मनें ॥ सादर करणें अनुदिनीं ॥५५ ॥ रंगनाथ ह्मणे श्रीगुरुचा ॥ अर्थ घेइजे प्रकरणाचा ॥ इतुकेनि लाभ स्वात्मसुखाचा ॥ होय साचा अनायासें ॥१०५६ ॥ ॥ इति श्रीयोगवासिष्टसारे श्रीवसिष्ठरामसंवादे जीवन्मुक्तिप्रकरणं समाप्तं ॥ ॥ मूळश्लोक ॥ २७ ॥ ॥ संम०॥ ६८ ॥ ॥ श्रुति ॥ ९ ॥ ॥ ओव्या ॥ १०५६ ॥ ॥ एवं ॥ ११६० ॥ ॥

इति श्रीयोगवासिष्ठसारे नवमं जीवन्मुक्तिप्रकरणं स०

# अथ श्रीयोगवासिष्ठसारे दशम निर्वाणप्रकरणप्रारंभः

*१



श्रीगणेशायनमः ॥ जयजयाजी कृष्णानंद ॥ जयजय परमानंदैक अगाध ॥ जयजय परब्रह्म विशुद्ध ॥ अगाधबोधा विशुद्धवर्या ॥ १ ॥ जयजय सच्चिदानंदैकघन ॥ जयजय निरतिशय ज्ञानसंपन्न ॥ ज्ञाता ज्ञेय ज्ञानविहीन ॥ परमपावनपावना ॥ २ ॥ जयजय परमानंदैकमूर्ति ॥ जयजय अगाध ज्ञानसंपत्ति ॥ व्यक्ताव्यक्तरहित स्थिती ॥ अगम्य[1] श्रुती श्रीगुरुवर्या॥३॥ जयजय त्रिगुणातीत॥ जयजय अज्ञानांधतमनिरासित ॥ सर्वी[2] वरिष्ठ विश्वंभरित ॥ मना अचिंत्य गुरुवर्या॥४॥जयजय नित्य निर्मळा ॥ अखिल[3] जनानंदाखिल मंगळा॥ परम निधानैक केवळा॥ नित्य निष्कळ श्रीगुरुवर्या ॥५॥ जयजय अचिंत्यानंदशक्ती ॥ जयजय निखिलानंद चैतन्यमूर्ति ॥ परात्पर परम गति चिच्छक्ति ॥ ज्ञानमूर्ति श्रीगुरुवर्या ॥ ६ ॥ जयजय पवित्रातिपवित्र ॥ जयजय व्यापक निरंतर सर्वत्र ॥ विश्वस्थितिलयादि सूत्र ॥ कर्ता विचित्र श्रीगुरुवर्या ॥ ७ ॥ जयजय त्रैलोक्यपावन ॥ जयजय जडजीवउद्धरण ॥ जनकृपादिक निधान ॥ सच्चिद्घन श्रीगुरुवर्या ॥ ८ ॥ जयजय अविद्यापाशनिकृंतन ॥ स्वानंददानी उदारैकघन॥सौंदर्यवरत्वें जनमोहन॥ मनमोहन श्रीगुरुवर्या॥९॥जयजय सद्गुरुपरातीत ॥ जयजय वाच्यवाचकभावव्यतिरिक्त[4] ॥ सर्वसाक्षी चिद्रूपास्थित ॥ सर्वातीत श्रीगुरुवर्या ॥ १० ॥ नमोस्तु चित्कळाज्योति ॥ नमोस्तु मूर्तामूर्तमूर्ति ॥ नमोस्तुसकळातीत चिदैकस्थिती ॥ परेपरती वस्ति ज्याची ॥ ११ ॥ नमोस्तु भवभयविध्वंसन॥नमोस्तु शरणशरण्य ॥ नमोस्तु चिद्रसैकस्वादन ॥ रसारसन र-

---

१ अवघड. २ सर्व. ३ नाशकरणारा. ४ निराळा.

सत्वें ॥ १२ ॥ नमोस्तु चिदैकचिद्घन ॥ भवभयनिर्दळन ॥ नमो आचार्यवर्या सिंहवदन ॥ ब्रह्मसंपन्न ब्रह्मरूपा ॥ १३ ॥ ऐसें त्रयोदश श्लोकीं स्तवन॥ केलें श्रीगुरुराया तुजलागुन ॥स्तोत्र बोलतांचि सुखसंपन्न ॥ मन उन्मन पावतसे ॥१४॥ तयाचि सुखें मंगळाचरण ॥ तेणें छंदें तुझें स्तवन ॥ मन ध्यातसे तुझे चरण ॥ सुखसंपन्न सुखरूपा ॥ १५ ॥ तुझें स्वरूप वर्णावया ॥ येवढी स्फूर्ति कैंची सद्गुरुराया ॥ ह्मणोनि मौन्यचि लागे तुझिया पायां ॥ दृढ धरूनियां हृदयावकाशीं ॥ १६ ॥ जेंजें वाचा बोलों जाय ॥ तें तें स्वरूप तुझोनि होय ॥ तूंचि सर्वत्र येकुचि आहे ॥ दृष्टि काय देखेल माझी ॥ १७ ॥ जें जें ऐकें देखें बोलें ॥ तें तें तुवां येकेंचि कोंदलें ॥ इंद्रियें देति घेति तें सकळें ॥ तूंचि निराळें सर्वत्र ॥ १८ ॥ तुजवीण आणिक ठावो ॥ पावता कां माझा मनोभावो ॥ तूंचि माझा सर्व सद्भावो ॥ देवाधिदेवो सद्गुरुराज तूं ॥१९॥ तुजपरतें नभावे कांहीं॥ह्मणोनि सर्व व्यापारीं तूंचि पाहीं ॥ मज तें तुजवीण दुजें नाहीं ॥ तूंचि तूं सर्वही एकपणें ॥ २० ॥ ऐसें विनवितां श्रीगुरुनाथ ॥ हर्षें मस्तक डोलवीत ॥ ह्मणती पुढारां वदें शीघ्र ग्रंथ ॥ नको बहुत प्रार्थूं मज ॥ २१ ॥ तुझीया अतिकोमळ वचनीं ॥ मी हर्षें निर्भर सर्वदां मनीं ॥ तोचि प्रसाद तुजलागुनी ॥ ग्रंथव्याख्यानीं प्रवर्ते आतां ॥ २२ ॥ हें ऐकोनी परमामृत ॥ परमानंदें असे डुल्लत ॥ येणें प्रसादेंचि शीघ्र ग्रंथ ॥ जेणें संत निवतील ॥ २३ ॥ तया संतांसि नमन करून ॥ आरंभिलें ग्रंथव्याख्यान ॥ तें श्रोता होउनी सावधान ॥ ग्रंथनिरू-

१ ज्ञान. २ परिपूर्ण.

पण परिसीजे ॥ २४ ॥ जीवन्मुक्तप्रकरण संपल्यावरी ॥ पुढें निरूपणा कैंची उरी ॥ ग्रंथ सिद्धजाला सर्वोप-
री ॥ नाहीं पुढारी रचना तेथें ॥ २५ ॥ तरी पुढां यया प्रकरणाचें ॥ कारण कोण उठावयाचें ॥ जें जें उपयो-
गी ज्ञानाचें ॥ आणिक साधनाचें सिद्धजालें ॥२६॥ मुख्य जें कीं ज्ञानसाधन ॥ ते मूळभूमिका वैराग्य जा-
ण ॥ तें सांगीतलें वैराग्यप्रकरण ॥ विषय वितृष्ण जेणें होय ॥ २७ ॥ देहादि प्रपंच यथार्थ भासतां ॥ तंव
वैराग्य नुपजे सर्वथा ॥ ह्मणऊन जगन्मिथ्याभूत तत्वतां ॥ प्रकरणगाथा निरोपिला ॥ २८ ॥ येणें दृढ वैरा-
ग्येंकरुनी ॥ साधनें निरोपिलीं प्रयत्नीं ॥ अंतरंग साधन सर्वांहुनी॥करितां क्षणीं तत्व प्राप्ती ॥२९॥ ते वा-
सनाक्षय आणि मनोनाश॥साधनद्वयें हा सावकाश॥ करितांचि आत्मापरेश॥ स्वप्रकाश परोक्ष होय ॥३०॥
हे सर्व श्रवणाचि संपत्ती ॥ यावरी मनन पाहिजे सर्वार्थी ॥ ह्मणोनि आत्ममनन प्रकरणोक्ति॥ आणिलें श्रु-
तिचिया पंथा ॥ ३१ ॥ याउपरी निदिध्यासन ॥ तें प्रकरणद्वय निरोपण॥ येक बोलिजे शुद्ध प्रकरण ॥ आ-
त्मार्चन दुसरें तें ॥ ३२ ॥ एवं निदिध्यासन जालियावरी ॥ श्रीरघुराज आक्षेप करी ॥ ह्मणे तो आत्मा किं-
लक्षण कैसी परी ॥ सांगे झडकरीं श्रीगुरुराया ॥ ३३ ॥ यावरी आत्मतत्वनिरोपण ॥ करिता झाला वसिष्ठ
आपण ॥ तया नांव आत्मनिरोपण ॥ बोले प्रकरण यथातथ्य ॥ ३४ ॥ हे सर्व साधनसंपत्ति जालिया ॥
जीवन्मुक्तता बाणे आपसया ॥ तीं लक्षणें सांगीतलीं रघुराया ॥ नाहीं उपाया वृद्धि येथें ॥ ३५ ॥ तेणें रघु-

१ निरीच्छ. २ आशंका.

राज सुखसंपन्न ॥ परमानंदें डुले आपण ॥ ब्रह्मानंदें त्रिभुवन ॥ भरे कोंदोन सर्वत्र ॥ ३६ ॥ इतुकेन जाली कृतकृत्यता ॥ निरूपणाचि राहिली कथा॥पुढें प्रकरण उपजतां॥प्रकार सर्वथा दिसेचना॥३७॥ ऐकतां जीवन्मुक्तिलक्षण ॥ स्वयें जीवन्मुक्त जाला आपण ॥ श्रीरघुनाथ सुखसंपन्न ॥ समाधान पावला ॥ ३८ ॥ या सुखाचि सुखगोष्टी ॥ सांगतां भासे सकळ सृष्टी ॥ ब्रह्मानंदाचि होय पुष्टी॥देहादि व्यष्टि नुरे जेथें ॥३९॥ ऐसें रघुनाथाचेनि जालेपणें ॥ वसिष्ठासीं आनंद सहस्र गुणें ॥ जाला तो नजाणिजे मनें॥आपणा आपण भोगितसे ॥४०॥ एवं दोघे परमानंदें जाले तृप्त ॥ तेणें ब्रह्मांड आनंदरूप होत ॥तेथें निरूपणाचि हे मात॥ राहिली तटस्थ परमानंदें ॥ ४१ ॥ तथापि उठवावया हें प्रकरण ॥ याचें सांगेन थोर कारण ॥ तें ऐका येकाग्र करूनि मन ॥ सुखसंपन्न होइजे ॥ ४२ ॥ श्रीरघुनाथ पावले समाधान ॥ तेथें पुढारें संपलें निरोपण ॥ परी श्रीराम आक्षेप[२] पूर्ण ॥ घेऊनि प्रश्न करिता जाला ॥४३॥ ह्मणे ऐका जी विनंति सद्गुरुराया ॥ मी आनंदरूपचि जालों स्वामियां ॥ स्वयेंचि सुखरूप असोनियां ॥ जाण हा वायां नेणु कां जाला ॥४४॥ परि सद्गुरुकृपेवांचून ॥ सर्वथा प्राप्त नव्हे ब्रह्मज्ञान ॥ आत्मा स्वप्रकाश चैतन्यघन ॥ परि सद्गुरुवीण प्राप्त नव्हे॥ ॥४५॥ आपुले कंठींचा माणि ॥ जैसा भ्रमें जाय विसरोनि ॥ मग हिंडे जनीं वनीं ॥ प्राप्तिलागीं तयाचे ॥ ॥ ४६ ॥ तथापि तो अप्राप्त तयासिं ॥ भ्रमें हिंडे दाहीं दिशीं ॥ मग हिंडला आप्त भेटलिया माणिसीं ॥

१ समुदाय. २ आशंका.

प्रत्यक्ष तयासीं दाखवी ॥४७॥ तसाचि स्वयें आपणासि विसरुनी ॥ नेणपणें जाय भुलोनी ॥ मग व्याकु-
ळ हिंडे देवालागुनी ॥ तीर्थीं वनीं गिरीं कपाटीं ॥ ४८ ॥ देवालागीं हिंडे दिशा दाही ॥ तंव देव नभेटे त-
यासि कांहीं ॥ जळ पाषाणादि आलिंगी बाहीं ॥ आणि देवो आपण देहीं तो नदेखे ॥ ४९ ॥ जेणें देखे
नाना स्थानें ॥ तया देवासिं स्वयें नेणे ॥ हाले चाले बोले जेणें ॥ तया नेणे स्वयें देवा ॥ ५० ॥ देवो आ-
णि देविभावो ॥ तया सर्वां प्रकाशिता जो देवो ॥ तया अज्ञानें नेणे पाहावो ॥ जंव सद्गुरुरावो भेटलानाहीं
॥५१॥येक सद्गुरु न भेटलियासाठीं॥ अपरोक्ष आत्मत्वें नव्हे भेटी ॥ तेंचि गुरुकृपे अज्ञान पळे उठाउठी ॥
स्वानंदपुष्टी स्वयें पावे ॥५२॥ ते सर्वही तुझे कृपादृष्टी ॥ मज अपरोक्ष स्वरूपिं भेटी ॥ नदेखे मायादि वि-
श्वसृष्टी ॥ ब्रह्मांड कोटि नभासती ॥ ५३ ॥ अवघा स्वानंदुचि हेलावतु ॥ कांहिं नदिसे दुसरा पदार्थु ॥ जें-
सा महाप्रळयीं जळसंकेतु ॥ भरोनि राहत सर्वत्र ॥ ५४ ॥ ऐसी स्थिती बाणली सद्गुरुराया ॥ तरी येक
पुसणें असे स्वामिया ॥ हे सर्वदां सर्व स्थिती बाणावया ॥ कठिण उपायामाजि मन ॥ ५५ ॥ मनोनाश वा-
सनाक्षय करुनी ॥ स्वरूपस्थिती पावावी क्लेशेंकरुनीं ॥ तो मनोनिग्रह भरवसेनी ॥ दुर्लभ जनीं असे स्वा-
मी ॥ ५६ ॥ ऐसेंचि बोलिलेंहि असे ॥ मनोनिग्रह कठीण दिसे ॥ तेचि संमति सावकाशें ॥ स्मृति ऐसें बो-
लत ॥ ५७ ॥ संमतिगीता ॥ चंचलंहिमनःकृष्णप्रमाथीबलवद्दृढं ॥ तस्याहंनिग्रहंमन्येवायोरिवसुदुष्करं ॥१॥

---

१ हातांनीं. २ पसरला, प्रकट झाला. ३ पूर, समुदाय.

*.२

टीका ॥ या मनाचा स्वभावो ऐसा असे ॥ अतिचंचलत्वें सर्वदां वसे ॥ हा स्वभाव ययाचा कैसा नासे ॥ तरी हें कैसें सांगे स्वामी ॥ ५८ ॥ हृढयोगें मनोनिग्रहासाठीं ॥ होतसे आजन्ममरणांत आटी ॥ वासना हे अतिशय लाटी ॥ स्वरूपिं भेटी अतिदुर्लभ ॥ ५९ ॥ आणि ते निर्विकल्प समाधीचें ॥ साधन हें मानलें साचें ॥ परि तयावीण या जीवन्मुक्ताचें ॥ न्यून साचें काय होय ॥ ६० ॥ ज्ञानमात्रचि जालियासाठीं ॥ अपरोक्ष ब्रह्मेसि होय भेटी ॥ अज्ञान जाय बारावाटीं ॥ संसारकपाटीं लागतसे ॥ ६१ ॥ तेथें येवढी आटि करुनी ॥ कां पां भरावें योगसाधनीं ॥ स्वरूपस्थ राहावें ज्ञानेंकरुनी ॥ जनीं वनीं स्वप्नजागरीं ॥ ६२ ॥ चालतां बोलतां वर्ततां ॥ स्वरूपानुभवें असावें तत्वतां ॥ मन वासना न कोंडितां ॥सांग उपायार्था सोपानासीं ॥६३॥ तंव वसिष्ठ ह्मणती गा रघुपती ॥ धन्य धन्य तुझी भारती ॥ अपूर्व केली गा प्रश्नोक्ति ॥ सुखसंपत्ति जेणें लाभे ॥ ६४ ॥ तरी एक आतां सांगेन ॥ जेणें सहजस्थिती पावसी निर्वाण ॥ नलगे प्राणायामादिक आसन ॥ ना मननिरोध वासनाक्षय ॥ ६५ ॥ वासनाक्षय मनोनाश ॥ ज्ञानपूर्वक केलिया सावकाश ॥ तेणें निर्विकल्प दशा तयास ॥ जीवन्मुक्तास होतसे ॥ ६६ ॥ ज्ञानेवीण मनवासनेचा क्षयकरणें ॥ तेणें होय प्रपंचउपसंहरणें ॥ प्रपंचलय तो समाधि बोलणें ॥ नये खुणे अनुभवाचिये ॥ ६७ ॥ मनोलयें प्रपंचोपशमन ॥ केलिया निरसे अज्ञान ॥ तें अज्ञान असतां आत्मदर्शन ॥ नघडे जाण अपरोक्ष ॥ ६८ ॥ ब्रह्मसाक्षा-

१ कष्ट. २ मोठी, अवघड. ३ वाचा. ४ लय.

त्कारावांचून ॥ सर्वदां नचुके संसरण ॥ तेथें मनोनाश केलिया कार्य कोण ॥ प्रपंचभान काय करी ॥ ६९ ॥ बहुरूपि मनाचा लय करी ॥ वासनाअभावें प्रपंच संहरी॥ ताटस्थ्यें राहे चिरकाळवरी ॥ त्यागासिं अंतरीं-धरूनियां ॥ ७० ॥ तेचि समाधीचेनि व्युत्थानें ॥ उचित दे राया ऐसें ह्मणे ॥ तरी अज्ञान काय निरसलें तेणें ॥ कीं उठे धरणें संसाराचें ॥ ७१ ॥ यालागीं मन वासनाक्षयेंकरुनी ॥ अज्ञान ननिरसे गा भरवसेनी ॥ सुषुप्तीसिं लयो प्रतिदिनीं ॥ होतां भवश्रेणी नचुकती ॥ ७२ ॥ सुषुप्ती मूर्छना प्रळईं ॥ मनोलय होय जागृती-समयीं ॥ तेथें विश्व नभासे गा कांहीं ॥ तरी संसृती काय निमाली ॥ ७३ ॥ किं अज्ञान निःशेष निमालें ॥ कीं आत्मसुख प्राप्त जालें ॥ यालागीं ज्ञानेवीण क्लेश केले ॥ ते वायां गेले सर्वही ॥ ७४ ॥ मुख्य अज्ञानाचें नाशक ॥ येक आत्मज्ञानाचि सम्यक ॥ वांचोनि साधनें सकळिक ॥ निरर्थक ज्ञानविषईं ॥ ७५ ॥ ययालागीं ज्ञानमात्रेंचिकरुनी ॥ अज्ञान निरसे भरवसेनी ॥ कार्य प्रपंचसहित कोदंडपाणी ॥ तत्क्षणीं नासोनिजाय ॥ ॥ ७६ ॥ सविलासा अविद्या जेथें नाशिली ॥ तेथें समुळीं संसृती निमाली ॥ ब्रह्मानंदें नित्य नवी दिवाळी ॥ अतिनव्हाळी तया सुखाची ॥ ७७ ॥ इतुकेंचि मुमुक्षिं करावें ॥ येक ज्ञानमात्राचि साधावें ॥ ज्ञानही अन्य साधनें नसंभवे ॥ येक परिसावें महावाक्य ॥ ७८ ॥ सद्गुरुमुखापासोनी ॥ महावाक्य ऐकावें श्रवणीं ॥ तयाचें मनन करितांच क्षणीं ॥ पूर्णपणीं स्वयें शोभे ॥ ७९ ॥ महावाक्यश्रवणकाळीं ॥ अज्ञानाचि होय होळी ॥

१ जन्ममरण. २ विसर्जन. ३ विचित्र.

अज्ञानकार्यंही तयेवेळीं ॥ होय समुळीं भस्मिभूत ॥ ८० ॥ अज्ञानसविलास जात खेंवो ॥ आत्मा स्वप्रकाश स्वयें देवो ॥ तो जाणतांचि नासे भवभेवो ॥ मग होय राव मोक्षश्रियेचा ॥ ८१ ॥ ऐसें अनंत बोलती श्रुती ॥ आत्मज्ञानेंचि मोक्ष प्राप्ती ॥ नलगे उपायाचि संपत्ति ॥ ऐक संमती सांगेन ॥ ८२ ॥ श्रुती ॥ तमेवविदित्वाअतिमृत्यमेतिन ॥ नान्यः पंथाअयनायविद्यते ॥ १ ॥ टीका ॥ तेंचि जें आत्मस्वरूप ॥ स्वप्रकाशें प्रकाशदीप ॥ अचळ निष्कळ निष्कंप ॥ सच्चिद्रूप सत्तामात्र ॥ ८३॥ हेंचि येक जाणितलियासाठीं ॥ होय परमोक्षेसिं भेटी ॥ अतिमृत्यु ह्मणिजे जगजेठी ॥ मोक्ष ऐसी गोष्ट बोलिजे ॥ ८४ ॥ मृत्युतें[1] अतिक्रमोनि असे ॥ ह्मणोनि अतिमृत्यु बोलिजेतसे ॥ मृत्युव्याजें[2] जन्मही नसे ॥ दोनी नासे तें मोक्षस्थान ॥ ८५ ॥ नाहो मुळीं मृत्यु बोलिलाअसतां ॥ नसतां जन्म तेथें कां आणितां ॥ तरी मृत्यु हें उपलक्षणें सर्वथा ॥ जन्मप्रसंगता आलाअसे ॥ ८६ ॥ काकेभ्योदधिरक्षतां हें वचन ॥ बोलतां याचें ऐसें अर्थन ॥ दधि[3] रक्षावें काकापासुन ॥ तरी काय लक्षण इतुकेंची ॥८७॥ काकापासुनी दधि रक्षावें ॥ तरी मार्जाराकरुनी काय खाववावें ॥ यालागीं उपलक्षण जाणावें ॥ भक्षुनद्यावें उपघातैकां[4] ॥ ८८ ॥ ऐसा वाक्यार्थ असे ॥ उपलक्षणें जाणिजेतसें ॥ मृत्यु तेथें जन्मही भासे ॥ दोनी नसे तें मोक्षस्थान ॥ ८९ ॥ जन्ममरण दोन्हीं नाहीं ॥ तें आत्मस्वरूप मोक्ष पाहीं ॥ तो तें पावे होउनी विदेही ॥ आत्मा जेंहिं जाणितला ॥ ९० ॥ अन्य मार्ग ना-

१ लागलेंच. २ मृत्युच्यायोगानें. ३ दहीं. ४ हिंसकांना.

हीं जाणावयासीं ॥ ऐसें श्रुति स्वयें उपदेशी ॥ एक ज्ञानमात्रेंचि मोक्षासीं ॥ होय प्राप्तीसिं कारण ॥ ९१ ॥ तैसाचि आणिकहि श्रुति॥ज्ञानमात्रेंचि बोलति मुक्ति ॥ नलगे अन्य साधनसंपत्ति ॥ तेही श्रुति परिसावी ॥ ॥ ९२ ॥ श्रुति ॥ ब्रह्मविदाप्नोतिपरमिति ॥ २ ॥ टीका ॥ ह्मणउनी ब्रह्मज्ञानेंकरून ॥ ब्रह्मवेत्ता पावे ब्रह्मपूर्ण ॥ नलगे तेथें इतर साधन ॥ क्लेश जाण व्यर्थची ॥ ९३ ॥ ऐशा किती बोलों श्रुति ॥ ज्ञानमात्रेंचि ब्रह्मप्राप्ती ॥ ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति ॥ स्वयें श्रुति ऐसें बोले ॥ ९४ ॥ तेथें एक असें ह्मणताती ॥ ज्ञानधारा करावी सर्वार्थी ॥ ज्ञान जालिया दृश्य जगतीं ॥ जावयाप्रति यत्ननलगे ॥९५ ॥ ते ज्ञानधारा करावया ॥ निरंतर करावें मनोजया ॥ तरी हेंही नलगे गा रघुराया ॥ ज्ञानचि आत्मया अपरोक्ष करी ॥ ९६ ॥ अहो व्रतबंध करून ॥ विधीनें जो जाला ब्राह्मण ॥ त्यासि काय घोकणें लागे मी ब्राह्मण ॥ नलगे अनुसंधान अहोरात्र ॥९७॥ त्याचा व्रतबंध जाला यासाठीं ॥ पुढें ब्राह्मणत्वाचीच वज्रमिठी ॥ कळांसे ब्राह्मणपणाचि गाठी ॥ टाकितां संकटीं टाकविनाकीं ॥ ९८ ॥ तैसें आत्मत्व जाणत खेंवो ॥ स्वयेंचि वरी तयासि ब्रह्मभावो ॥ ज्ञानधारा नकरितां स्वभावो ॥ नहोय भावो अनारिसा ॥ ९९ ॥ तमेवविदित्वा या एवंकारें ॥ सर्वही दूषिलीं साधनांतरें ॥ ज्ञानधारा हेंही साधन खरें ॥ सर्व प्रकारें दूषिलें असे ॥ १०० ॥ असंभावना विपरीतभावना ॥ यया निःशेष जालिया लीना ॥ तो अपरोक्ष साक्षात्कार जाणा ॥ ज्ञानाभिधाना तेंचि रूप ॥ १ ॥ इतुकेंचि अ-

१ लागली. २ तत्क्षणीं.

तिचोखट कीजे ॥ असंभावनारहित ज्ञान साधिजे ॥ तेणेंचि आत्मा अपरोक्ष कीजे ॥ भ्रम निवर्तिजे तेचि-क्षणीं ॥ २ ॥ रज्जु ते जाणत खेवो ॥ जाला भुजंगाचा अभावो ॥ मग सर्पत्व देखतांचि सर्पभावो ॥ नुपजे नवलावो अपरोक्षाचा ॥३॥ सर्पसहित रज्जुचें अज्ञान ॥ रज्जुविषयीं जालें जेव्हां क्षीण ॥ तेथें मागुतें नव्हे सर्पज्ञान ॥ रज्वानुसंधान करितांही ॥ ४ ॥ असंदिग्ध जालें रज्जुचें ज्ञान ॥ मग कां करावें तयाचें अनुसं-धान ॥ भयकंपादिक भस्म पूर्ण ॥ समाधानें पावला जो ॥५॥ तैसेंच अपरोक्ष जालिया ब्रह्मज्ञान॥निःशे-ष निरसलें अज्ञान ॥ मग सत्यत्वें नेघे विश्वस्वप्न ॥ जागृती पूर्ण जालिया ॥ ६ ॥ शुद्ध जालिया जागृती ॥ त्यासि काय होईल स्वप्नप्रतीति ॥ स्वप्नीं पाठि लागला हस्ती ॥ जागृति भयें पळति कोणी तेथें ॥ ७ ॥ अथवा स्वप्नींचिये भाजे ॥ जागृतीस कोणी भुजे ॥ स्वप्नीं राया रंकपण साजे ॥ कीं परिव्राजे अंत्यजपणें ॥ ८ ॥ ऐसी संमति श्रीभागवतीं ॥ बोलिलाअसे तो विश्वमूर्ति ॥ तेही एकाग्र परिसावी श्रोतीं॥ भाव चित्तीं धरूनियां॥९॥समंतिभागवत ॥ तंसप्रपंचमधिरूढसमाधियोगःस्वाप्नंपुनर्नभजतेप्रतिबुद्धवस्तु ॥ इत्यादि॥२॥ ॥ टीका ॥ ह्मणोनि अपरोक्ष जालिया आत्मभेटी ॥ मागुता नव्हे संसारापाठीं ॥ अज्ञान गेलें उठाउठीं ॥ कैंचि भेटी नेणें तयाची ॥ ११० ॥ तयालागीं गा श्रीरघुनाथा ॥ ज्ञानधारा नलगे सर्वथा ॥ आत्मा जा-णूनि राहि ताता ॥ सांडि कथा साधनाची ॥११॥ तरी नाना साधनविरहित ॥ मन वासनालय नकरित॥

१ लोप. २ निःसंदेह. ३ व्रियेस. ४ सन्यासी.

आत्मा कैसा जाणिजेत ॥ तेंही निश्चित सांगों आतां ॥१२॥ ते जीवन्मुक्ताचि स्थिती ॥ सर्वदां तेचि स्थि-
तीनें वर्तती ॥ मग चालवितां राज्यसंपत्ति ॥ संसृतिस्थिती नपावती ते ॥ १३ ॥ सर्वदां तटस्थचि पाहिजे
बैसलें ॥ तरी जनकें राज्य कां केलें ॥ व्यासादिक काय ताटस्थ्यें राहिले ॥ गार्हस्थ्य केलें वसिष्ठादिकीं ॥
॥ १४ ॥ वाणिज्य करी तुळाधार ॥ कर्कटी करी मनुष्यआहार ॥ भागवत सांगे श्रीशुकेंद्र ॥ कर्मांतर श्री-
दत्त सांगे ॥ १५ ॥ ऐसें ज्ञानिये सांगों किती ॥ नारदासि कळिवरी अतिप्रीति ॥सनकादिक सर्वत्र हिंडति ॥
तैसीच गती जाय त्यांची ॥ १६ ॥ ऐसेच सहजस्थितीनें योगेश्वर ॥ येक चालविती सर्वही व्यवहार ॥ प-
रि ते अकर्त्ते निर्विकार ॥ पारावार स्वयें जाले ॥ १७ ॥ येक ज्ञानमात्रेंचिकरून ॥ आत्मस्वरूप अपरोक्ष जा-
णून ॥ स्वयेंचि जाले ब्रह्मनिर्वाण ॥ बाधक कोण व्यवहारतां ॥ १८ ॥ त्यांचा बाह्यदृष्टी व्यवहारु दिसे ॥
परि ते अकर्तेंपणेंचि ब्रह्म असे ॥ तया नेणोनियां लोक पिसे ॥ वर्ते ऐसें त्यातें ह्मणती ॥ १९ ॥ ययालागीं
गा विश्वमूर्ति ॥ सांगेन तेचि सहजस्थिती ॥ तेचि ऐकाया येकाग्रचित्तीं ॥ सुखसंपत्ति जेणें लाभे ॥ १२० ॥
आधीं सांगों स्वरूप तें कैसें ॥ व्यवहारही जाणितसे ॥ मग ते स्थितीहि अनायासें ॥ बाणे ऐसें सांगेन ॥
॥ २१ ॥ मनादिकांचा लय नकरितां ॥ इंद्रियेंही नकोंडितां ॥ प्राप्त होय निर्विकल्पता॥ त्या उपायार्थी सां-
गेन ॥ २२ ॥ नाहो इंद्रिय प्राणादि नेमकरूनी ॥ बैसावें मन निग्रहुनी ॥ वासनेचा नाश करूनि ॥ समाधा-

१ जन्ममरण. २ गृहस्थाश्रम. ३ मुक्त.

नीं रहावे ॥ २३ ॥ वासनाक्षय मनोनाश ॥ योगाभ्यासें जालिया निःशेष ॥ तोचि निर्विकल्पता सावकाश ॥ समाधि इयेसि बोलती ॥ २४ ॥ आणि तुह्मी बोलतां अनारिसें ॥ जे इत्यादिक नकरितां प्रयासें ॥ निर्विकल्पता होतसे अनायासें ॥ हा संदेह मानसें मानिजेत ॥ २५ ॥ तरी ऐका याचें उत्तर ॥ सांगिजेल अतिसुंदर ॥ प्रयासेंवीण मनोमार ॥ समाधिस्थीर निर्विकल्प ॥ २६ ॥ अगा संकल्प ह्मणिजे याचि नाम ॥ वस्तुवेगळा जो दृश्य भ्रम ॥ तो यथार्थ मानूनियां परम ॥ करी संभ्रम हेयोपादान ॥ २७ ॥ असत्य तें सत्य मानुनी ॥ आणि भोग्यत्वें तया देखोनि ॥ ग्राह्य ग्राहकता कल्पूनि ॥ कल्पि मनीं ग्राह्यबुद्धी ॥ २८ ॥ याचें नाम विकल्प ह्मणिजे ॥ इतुकेन संसृति पाविजे ॥ हे जेथें संकल्प नेणिजे ॥ तोचि जाणिजे निर्विकल्पता ॥ २९ ॥ असतांचि प्रपंच बाधिला ॥ नामरूपत्यागें असत्य बाणला ॥ निर्विशेष ब्रह्मचि जाला ॥ संकल्प तयाला कासयाचा ॥ १३० ॥ आपणावांचोनि दुसरें जनीं ॥ देखे जरी संकल्प करी मनीं ॥ सर्वथा नेणे तो ब्रह्मावांचूनि ॥ जागृतीं स्वप्न सुषुप्तीसि ॥ ३१ ॥ देहादि प्रपंच प्रतिभास ॥ जया झाला सावकाश ॥ तया ब्रह्मावेगळा कोण्ही लेश ॥ नाहीं अंश उरला कीं ॥ ३२ ॥ संमति ॥ सर्वंब्रह्ममयंयस्यनतस्यपृथगस्तिवै ॥ एकांतसेवनंव्यर्थंव्यर्थंमौनादिसाधनं ॥ ३ ॥ टीका ॥ प्रातितीक नामरूप ऐसें ॥ दृश्य सत्यपणें कदां नभासे ॥ दृष्टि तरी साचार असे दिसे ॥ जैसें कां भासे मृगजळ ॥ ३३ ॥ प्रातितीक विश्वप्रतीति ॥ जालियाहि सर्व ब्रह्म-

१ निराळें. २ व्यवहार. ३ त्याज्य व ग्राह्य. ४ संपूर्ण. ५ प्रतितिलायेणारें.

संविती ॥ तेथें संकल्प कशाचे उठति ॥ तेचि स्थिती निर्विकल्प ॥ ३४ ॥ ब्रह्मरूप जाला भूगोळ ॥ ब्रह्मरूप जालें कुळाचळ ॥ ब्रह्मरूप सर्वही नागकुळ ॥ देव सकळ ब्रह्मरूप ॥ ३५ ॥ शुद्धाशुद्ध तें ब्रह्मरूप भासे ॥ बरें वाईट तितुकें ब्रह्मचि असे ॥ किंबहुना घटपटादि ठसे ॥ ते स्वयंभ असे परब्रह्म ॥ ३६ ॥ ब्रह्मावेगळें अणुमात्रही ॥ नभासे विश्वीं आणि देहीं ॥ देहचि देहपणें तेथें नाहीं ॥ नदेखे कांहीं ब्रह्माविणें ॥ ३७ ॥ तेथें कल्पिता आणि कल्पना ॥ केलियाहि नभासे सज्ञाना ॥ तेथें उरी नाहीं दुजेपणा ॥ तेथें कल्पना कासयाची ॥ ३८ ॥ यालागीं नकरितां अष्टांगयोग ॥ मनोनाश नकरितां सांग ॥ वासनाक्षय अभंग ॥ नलगे अन्यंग अन्य साधन ॥ ३९ ॥ उघडेचि डोळां स्वैरें समाधि ॥ उठतां बैसतां व्यापारसंधि ॥ जागृतीच्या आधीं मधिं ॥ असे समाधि निर्विकल्प ॥ १४० ॥ क्षण येक देहावरी येत ॥ तरी देहसंबंधीं सुखदुःखें जाणत ॥ तेही आत्मरूपेंचि देखत ॥ परिपूर्ण स्थित तोचि पूर्ण ॥ ४१ ॥ हे पंचमी भूमिकेमाझारी ॥ चतुर्थींसि भोगी सुखदुःखलहरी ॥ तरी एक क्षणाभीतरीं ॥ सवोंचि पुरी बाणे दशा ॥ ४२ ॥ तरी ते क्षणेक सविकल्प ॥ होईल जाण समाधिसुख ॥ तेंही तया नव्हे बाधक ॥ बोधला सम्यक ह्मणोनियां ॥ ४३ ॥ अगा ज्ञाता आत्मत्व जाणे ॥ तया नाहिं संसृतिपावणें ॥ ब्रह्मानंदचि सर्वदां भोगणें ॥ जरी करणें नकोंडितां ॥ ४४ ॥ अथवा सविकल्पही असतां ॥ काय संसृति वाजे तयाचे माथां ॥ तो सविकल्प निर्विकल्प हे वर्ततां ॥ स्थिती स-

१ दोषरहित. २ सहज. ३ जन्ममरण. ४ इंद्रियें.

र्वथा भंगेना कीं ॥ ४५ ॥ त्यासिं इंद्रियें नेमिता ननेमितां ॥ गुण अवगुण नव्हे सर्वथा ॥ तो ब्रह्मसुखींच प-
डुडतां ॥ कोण व्यथा तया बाधी ॥ ४६ ॥ पूर्ण जाणितलें आत्मत्व जेणें ॥ तयासिं नलगे इंद्रियकोंडणें ॥
मन बुध्यादिकें नियमनें ॥ क्षय नकरणें वासनेचा ॥ ४७ ॥ तो इंद्रियसमाधानें असो ॥ अथवा व्यवहारदशे-
नें वसो ॥ परि तया भ्रांतिचा अतिसो ॥ स्वरूपें नासोनियां गेला ॥ ४८ ॥ तया समाधी दोनीच असती ॥
विश्रांतीचे स्थानिं वसती ॥ येक निर्विकल्प दुजी ह्मणाति ॥ सविकल्पास्थिती अखंड ॥ ४९ ॥ तयावेगळें
तिसरे ठाईं ॥ योगियां सर्वथा रहाणें नाहीं ॥ तरी दोहींचें स्वरूप सांगों काई ॥ त्यांत् येक पाहीं सांगित-
ली ॥ १५० ॥ निर्विकल्प समाधीचि खूण ॥ तुज सांगीतली गा संपूर्ण ॥ सविकल्प ते इतुकीचि जाण ॥
द्दष्टा द्दश्य दर्शन जेथें स्फुरे ॥ ५१ ॥ जेथें ज्ञेय ज्ञान आणि ज्ञाता ॥ हे त्रिपुटी स्फुरे गा रघुनाथा ॥ तियेतें
बोलिजे सविकल्पता ॥ समाधि तत्वतां जाण तूं ॥ ५२ ॥ स्वरूपें स्थिती तरी आहे ॥ परी त्रिपुटी जेथें
स्फुरताहे ॥ तेचि ते सविकल्प समाधि पाहे ॥ निर्धारें होय योगियांसीं ॥ ५३ ॥ हे त्रिपुटी जेथें नस्फुरे ॥ ते-
चि निर्विकल्प जाण निर्धारें ॥ यया दोहीं वेगळी तिसरें ॥ नाहीं खरें योगियांसीं ॥ ५४ ॥ तो इंद्रियें नेमूनि
बैसला ॥ अथवा ननेमि कोणा इंद्रियाला ॥ परी परब्रह्मीं ब्रह्मरूप संचला ॥ नव्हे वेगळा प्रपंचरूप ॥ ५५ ॥
दधि मंथुनी काढिलें लोणी ॥ तें ताकीं घालितां नमिळे मिळणी ॥ तैसा जो निघाला प्रपंचाहुनी ॥ तो नये
मिळणीं वर्ततां तेथें ॥ ५६ ॥ इक्षुदंडाचि कीजे शर्करा ॥ ते गाळितां नाना प्रकारा ॥ मागुता ऊंस नव्हे को-

णें विकारा ॥ शर्करा ते शर्करा नढळेची ॥ ५७ ॥ तैसें सद्गुरुप्रसादेंकरून ॥ देहादि प्रपंचविहीन॥ स्वयें ब्रह्म जाला जो आपण ॥ तो नपावे देहपण वर्ततांही ॥ ५८ ॥ दुग्ध मथितां घृत होय ॥ मागुतें दुग्धीं घालितां दुग्ध नोहे ॥ तैसा ज्ञानी तो अज्ञानी होय ॥ हें कोण्हें उपायें घडेनाकीं ॥ ५९ ॥ तैसा ज्ञानी प्रपंचीं वर्ततां॥ परी प्रपंचरूप नव्हे सर्वथा ॥ नातरी समाधिस्थ बैसतां ॥ नाहीं तत्वता विशेष कांहीं ॥ १६० ॥ रत्नपेटिये नाना वेष्टनें बांधिलें ॥ तरी तें रत्नपणाहूनि अधीक जालें ॥ किंवा धुळींत पडल्या मोकळें ॥ नाहीं हरपलें रत्नपणा ॥ ६१ ॥ तैसा निर्विकल्पें काय होय ज्ञानी ॥ किंवा सविकल्पें होईल अज्ञानी ॥ त्या दोहीं समाधींत नव्हे लाभ हानि ॥ सर्वत्र निर्वाणीं ब्रह्मचि तो ॥ ६२ ॥ यालागीं समाहितकरणें केलीं ॥ तरी विशेषता नाहीं आली ॥ असमाहितें स्थिती बुडाली ॥ हे तंव बोली नघडे कदां ॥६३॥ यदर्थीं श्रीकृष्णभगवंत॥ उद्धवाप्रति बोले सिद्धांत ॥ संमति श्रीभागवतोद्भूत ॥ दत्त चित्त परिसावें ॥ ६४ ॥ संमतिभागवत ॥ समाहितैः कः करणैर्गुणात्मभिर्गुणोभवेन्मत्सुविविक्तधाम्नः ॥ विक्षिप्यमाणैरुतकिंनुदूषणंधनैरुपेतैर्विगतैरवेः किम ॥ ४ ॥ टीका ॥ श्रीकृष्ण ह्मणती उद्धवासीं ॥ अपरोक्ष जाणे जो मजस्वरूपासीं ॥ नाहीं असंभावना मळ जयासिं ॥ तया पुरुषासीं कोण बंध ॥६५॥ त्रिगुणात्मकें जीं इंद्रियें ॥ तीं त्रिगुणवृत्ती येक येकवियें ॥ तें समाहित कोण कोणा आहे ॥ ब्रह्माहूनि काय अधिक होईल ॥ ६६ ॥ तो पावला असे गा निर्वाण ॥ स्वयेंचि

१ तूप. २ एकाग्रकरणें.

परब्रह्म आपण ॥ ते इंद्रिया नेमीलिया होईल कोण॥ ब्रह्माहुनी थोर दुसरा ॥ ६७॥ किं मुक्तीसहित मुक्ती हो-
य ॥ किंवा तयासीं आणिकाहीं फळ होय ॥ किंवा तो स्वर्गादिकासिं जाय॥ फळरूप आहे सर्वांसि तोचि॥
॥ ६८ ॥ करणें समाहितें असतां ॥ त्रिगुणवृत्याही विचरतां ॥ कोण हाणी तयाच्या माथां ॥ अनात्मा मा-
गुता होईल काय ॥ ६९ ॥ किंवा तो ब्रह्म अब्रह्म होय ॥ किं जालें जें ज्ञान मागुतें जाय॥ किं संसृती[1] स्वप्नीं
बुडोनि राहे ॥ काय होय अपकारु त्यासीं ॥ १७० ॥ जागृतीं तो काय स्वप्न देखे ॥ किं अमृतेंचि मरे मार-
कें ॥ किं अग्नि जळे स्वजाळकें ॥ निरें निरकें बुडोनिजाय ॥ ७१ ॥ अथवा वारयाच्या लहरी ॥ वायोचि उ-
डोनि जाय जरी ॥ विखाचि विखकंदें चुरमुरी ॥ किं मरण मारी मरणातें ॥ ७२ ॥ अथवा सूर्येंचि सूर्य भक्षि
जे ॥ सूर्यें सूर्य आच्छादिजे ॥ चंद्रें चंद्रकळा ग्रासिजे ॥ तैसें जाणिजे नवल हें ॥ ७३ ॥ तैसें सर्व ब्रह्ममय ज-
यासीं प्रतीति॥ तयासिं इंद्रियनियमनें कोण प्राप्ती॥जरी सत्व रज तमोगुणवृत्ती ॥ उठती त्या स्थिती काय
भंगे ॥७४॥ सत्व रज तमोगुणाच्या वृत्ती ॥ क्षण येक चित्तातें आवरिती ॥ परि सर्वेंचि स्फुरे ब्रह्मस्फूर्ति ॥
लया जाति सकळिका ॥७५॥ पहिलेच आहाच वाहाच उठिलिया ॥ त्याही बाधित जालिया गा रघुराया॥
सर्वेंचि ब्रह्मस्फूर्ति जालिया ॥ जाती लया सर्वेही ॥ ७६ ॥ ऐसीच बृहदारण्यश्रुती ॥ सुरेश्वराचार्य वाखाणि-
ती ॥ नमोडे आत्मविदांचि स्थिती ॥ त्रिगुणवृत्ती उठल्याजरा ॥ ७७ ॥ संमति ॥ रागादिदर्शनंयच्चज्ञानि

१ जन्ममरण.

नोपिहिचोद्यते ॥ बाधितस्यैवतत्सूतेःसत्वयुक्तेनदूषणं ॥ ५ ॥ टीका ॥ काम क्रोध लोभादि पाहीं ॥ दिसती ज्ञानियाच्याठाईं ॥ परि ब्रह्मस्फूर्तिनें बाधित सर्वही ॥ नबाधिती कांहीं तयासीं ॥ ७८ ॥ यालागीं इंद्रियेंहि नकोंडितां ॥ स्थिती न्यून नव्हे गा सर्वथा ॥ मेघें व्यापिल्याहि सविता ॥ काय न्यूनता पावेल ॥ ७९ ॥ काय सूर्यपण त्याचें गेलें ॥ कीं खद्योतपण अंगासि आलें ॥ किं स्वप्रकाशपण हारपलें ॥ काय जालें न्यून त्याचें ॥ १८० ॥ तया मेघाचिया दाटी ॥ प्रतिबंध जाला जनाचिये दृष्टी ॥ परि सूर्य तो प्रकाश सकळा सृष्टी ॥ नाहीं भेटी अंधःकाराची ॥८१ ॥ तया अभ्राचाहि प्रकाशिता ॥स्वप्रकाशें होय तो सविता॥ प्रकाश आछादेना सर्वथा ॥ समूळ हे कथा असंबद्ध ॥ ८२ ॥ नाना तिमिरें अस्त जालियावरी ॥ प्रकाश पावे तो तमारीं ॥ अभ्रें गेलिया लाभ काय करी ॥ सांगा निर्धारीं विचारूनियां ॥ ८३ ॥ अभ्रेंचि येति आणि जाती ॥ परि तो तैसाचि तेजोमूर्ति॥ नटाकी आपुली प्रकाशगती ॥ प्रकाशें वर्तती त्याचेनि सर्व ॥८४॥ अभ्र आलें गेलें असतां ॥ परि देहींचा साक्षी सविता ॥ तैसा गुणवृत्यादि आत्मवेत्ता॥ नभुले सर्वथा साक्षित्वें ॥८५ ॥तो स्वप्रकाशेंकरुनी॥गुणदोष नपावे भरंवसेनी॥जडा अप्रकाशावृत्तिकरुनी॥नियमनीं इंद्रियांचा८६॥ ऐसें स्वप्रकाशेंचि येणें ॥ सूर्यासिं जेथें नाहीं लिंपणें ॥ तेथें सूर्यप्रकाशकासि कोणें ॥ इंद्रियवृत्तीनें आवारिती ॥ ८७ ॥ जेथें सूर्यचंद्रादि तेजमंत ॥ तेणें प्रकाशति स्वप्रकाशें जेथें ॥ त्या कोण प्रकाशी आत्मयातें ॥

१ सूर्य. २ काजव्याचें तेज. ३ मिथ्या. ४ काळोख.

आवरणातें कोण करी ॥ ८८ ॥ यदर्थी स्वयें बोलतसे श्रुती ॥ अग्निसूर्यादि तेथें नभासती ॥ तेथें इतरांचि कोण गती ॥ सर्व प्रकाशती त्याचेनी ॥ ८९ ॥ श्रुती ॥ नतत्रसूर्योभातिनचंद्रतारकंनेमाविद्युतोभातिकुतोयमग्निः ॥ तमेवभांतमनुभातिसर्वंतस्यभासासर्वमिदंविभातीति ॥ ३ ॥ टीका ॥ अहो चंद्रसूर्य जेथें नभासती ॥ तारांगणें विद्युल्लताचि संपत्ती ॥ तेथें अग्निची किती दीप्ति ॥ जे प्रकाशती आत्मयातें ॥ १९० ॥ यालागीं सूर्यचंद्रादिकांसी ॥ येक आत्माचि स्वयें प्रकाशी ॥ तो भासतांच प्रकाश सर्वांसी ॥ जग हें व्यक्तीसिं येतसे ॥ ९१ ॥ नेत्रादिकें प्रकाशिकें होती ॥ परी अंधारीं काय वस्तु देखती ॥ ते सूर्यप्रकाशेंचि प्रकाशती ॥ अकिंचित्करगती सूर्याविण त्यांची ॥ ९२ ॥ सूर्यकांतू प्रकाशक होय ॥ दर्पणीं रूप दीसताहे ॥ परि सर्व सूर्यप्रकाशेंचि पाहे ॥ येऱ्हवीं काय प्रकाशती ॥ ९३ ॥ सोमकांत द्रवता होय ॥ परि ते हातवटि चंद्रींच आहे॥ तैसें प्रकाशमंतासि प्रकाशितु जाय ॥ आत्मा पाहे स्वप्रकाशें ॥९४॥ त्याचा प्रकाश कोण्ही नअभिभवी ॥ ना प्रकट करी उचलुनी दिवीं ॥ प्रकाश आहे नाहीं हे ठेवाठेवी ॥ अज्ञाना गोंवी सर्वस्वाची ॥ ९५ ॥ हें रविदृष्टांतें सांगीतलें ॥ आतां असंगपणेंहि तो नमैळे ॥ हें आकाशदृष्टांतेंकरूनि बोले ॥ ब्रह्मसांवळें उद्धवाप्रती ॥ ९६ ॥ श्लोक ॥ संमतिभागवत ॥ यथानभोवाय्वनलांबुभूर्गुणैर्गतागतैर्वर्तुगुणैर्नसज्जते ॥ तथाक्षरंसत्वरजस्तमोमलैरहंमतेःसंसृतिहेतुभिःपरम् ॥ ६ ॥ टीका ॥ जैसें हें किं गगन ॥ वारेनि नशोषे जैसें जाण ॥ अग्नी-

१ शून्य. २ गुंतागुंत.

नें नवजाय जळोन ॥ उदकीं बुडोन नजाय कदां ॥ ९७ ॥ तैसेंचि रजो धूंसरादिकीं ॥ नमैळे काळिं तीहिं कीं ॥ अथवा षड्ऋतूवर्षादिकीं ॥ गुणीं विशेषी तैसें नव्हे ॥ ९८ ॥ सीतें कांकडोनि गेलें गगन ॥ अथवा उष्णें नाहीं गेलें करपोन ॥ पर्जन्यें वोलें निथळोन ॥ नाहीं बुडोन गेलें उदकीं ॥ ९९ ॥ साही ऋतूयेति आणि जाती॥ गगन जैसें तैसें अलिप्तस्थिती॥ नबुडे नजळे नमिळे गती॥धूसरें नव्हती कदांकाळीं ॥२००॥ कोणीहि संगातें नपावे ॥ कोणाचेनही नअभिभवे ॥ त्याचाचठाईं सर्व संभवे ॥ मागुतें मालवे त्याचाठाईं ॥१॥ आगंमापाईं षड्ऋतुगुण ॥ तेणेसीं संग पावे गगन ॥ असंगपणें आपणा आपण ॥ शुद्ध संपूर्ण जैसें तैसें ॥ २ ॥ तैसा जो अहंकाराह्लनि पर ॥ आत्मा शुद्ध बुद्ध निर्विकार ॥ त्यासीं सत्व रज तमादि विकार ॥ नकरिती विचित्र आपणा ऐसें ॥ ३ ॥ या सत्व रज तमाचिया वृत्ती ॥ अतिमलीन संसृति देती ॥ तरी आत्मयातें नबाधिती ॥ जरी उठती स्वकार्यरूपें ॥ ४ ॥ अगा सर्वही अहंकारें बाधितां ॥ संसृति अहंकाराचे माथां ॥ तोही विपरीत जाला तत्वतां ॥ तेथें काय कथा जन्ममरणाची ॥५॥ जो देहाकारें परिणमतु ॥ मी देहो ऐसा अध्यासभूतु ॥ तोचि ब्रह्माहमस्मि ऐसा उठतु ॥ उठतांचि भस्मांतु अज्ञानासीं ॥६॥ देहो अहंकारें सत्व तम रजोवृति ॥ त्या निश्चयें संसृति देति ॥ तोचि ब्रह्माहमस्मि होतां क्षणांतिं ॥ भस्म होती जन्ममरणें ॥ ॥७॥देहसंग नलगे ज्यासीं॥ तेथें कोण अर्थ बाधि त्यासीं ॥ तो असंग सर्वांसि॥उदासपणें॥८॥आत्मा सर्वदा-

१ धूळ. २ गळणें. ३ होणें नहोणें. ४ जन्ममरण.

असंग असे॥ऐसी श्रुती हे बोलतसे ॥ असंगोत्पथं पुरुष ऐसें ॥ बोले सर्वांशें आत्मयासीं ॥९॥ ह्मणोनि तो सविकल्प निर्विकल्पें ॥ असतां नलिंपे पुण्यपापें ॥ असंगपणें विषईं नतापे ॥ असे अमूपें ब्रह्मानुभवें॥२१०॥ ह्मणोनि देहअहंकारें जें करिजे ॥ तेणें कर्तेपणा लिंपिजे ॥ अहंकारावीणें जें जें करिजे ॥ ब्रह्मचि सहजें तें तें कर्म ॥ ११ ॥ देहाकारें तो ब्रह्ममूर्ति ॥ कर्माकर्म तया ब्रह्मस्थिती ॥ ते विश्वाचा जरी संहार करिती ॥ तरी नपावती बाध कांहीं ॥ १२ ॥ यदर्थीं स्मृतीचिं हीं वचनें ॥ स्वयें बोलिलीं श्रीनारायणें ॥ मुखीं घातलीं अतिप्रीतिनें ॥ जनार्दनें अर्जुनाच्या ॥ १३ ॥ संमतिगीता ॥ यस्यनाहंकृतोभावोबुद्धिर्यस्यनलिप्यते ॥ हत्वापिसइमाँल्लोकान्नहंतिननिबध्यते ॥ ७ ॥ टीका ॥ जयासीं अहंभाव नाहीं ॥ मी देहीं ब्राह्मण क्षत्रिय वैश्य पाहीं ॥ तैसा आश्रमाभिमानही ॥ गेला देहीं जयाचा ॥ १४ ॥ अगा अभिमान तो द्विविध जाण ॥ येक विशेष येक सामान्य ॥ त्याचेंही सांगों लक्षण ॥ सावधान परिसापां ॥ १५ ॥ अहं प्रत्यय सर्व देहीं ॥ मी ऐसा अहंकार पाहीं ॥ हा सामान्य वर्ते सर्व देहीं ॥ विशेष तोही लक्षणें जाणावा ॥ १६ ॥ मी शूद्र वैश्य अथवा ब्राह्मण ॥ गृहस्थ वानप्रस्थ यति जाण ॥ भिक्षुक उदमी धनी गोमान ॥ हा विशेष अभिमान जाण ऐसा ॥ ॥ १७ ॥ या दोहीं अभिमानेंकरुनी ॥ विश्व हें बाधलें कळासुनी ॥ त्यासि स्वानुभवें देइजे टाकोनि ॥ तरी अकर्ता जनीं तोचि येकू ॥ १८ ॥ हा द्विविध अहंकारु ज्याचा गेला ॥ त्याचि बुद्धी नलिंपे कर्तेपणाला ॥ तेणें जगत्रयाचा संहार केला ॥ तरी पापाला नलिंपे तो ॥१९॥ जरी तो कर्माचा कर्ता होईल ॥ तरीच तो

पापपुण्यासि लिंपिजेल ॥ त्याचि बुद्धी कर्तेपणें उठेल ॥ अहंकारिं असेल देहपणें ॥ २२० ॥ ह्मणऊनि अहं-
कार सांडून कर्म ॥ केलें तेंचि तें परब्रह्म ॥ तेंही संस्कारें करी परि नाहीं देहधर्म ॥ हेंचि वर्म अकर्तेपणाचें
॥ २१ ॥ यालागीं सर्व कर्में केलिया ॥ अथवा निर्विकल्पें राहिलिया ॥ परी नपावे उणिया पुरिया ॥ परिपू-
र्ण तया न्यून काय ॥ २२ ॥ यदर्थीं ऐसेंचि बोले श्रुती ॥ ब्रह्मनिष्ठा कर्माकर्में नबाधिती ॥ केलिया कर्में न-
मोडे स्थिती ॥ नकेल्या गती न्यून काय ॥ २३ ॥ श्रुती ॥ एषनित्योमहिमाब्राह्मणस्य ॥ नकर्मणावर्धतेनो-
कनीयानित्यादि॥३॥टीका ॥ हा नित्य अविशिष्ट ब्राह्मणाचा ॥ ज्ञानमहिमा जाण साचा ॥ कर्में करितां सं-
बंधु वाढिचा ॥ नव्हे साचा तद्योगें ॥ २४ ॥ कर्में करितां काय अधिक होईल ॥ किंवा नकरितां तुटि येई-
ल ॥ तो जैसाचि तैसाचि केवळ ॥ नाहीं तळमळ अहंभावाची ॥ २५ ॥ नाहो ब्राह्मण शब्दें सर्व साधारण॥
सकळहि बोलिजेताति ब्राह्मण ॥ तो कर्में करितां पावे महिमान ॥ नकरितां हीन नव्हे सर्वथा ॥ २६ ॥ येक
सामान्य ब्राह्मण असती ॥ ते सर्व कर्मेंहि आचरती ॥ परी ते साधारणाचि बोलिजेति ॥ केवळ जातिकरू-
नियां ॥ २७ ॥ परि वेषेंकरूनियां नव्हे ब्राह्मण ॥ ब्राह्मणाचें सांगेन लक्षण ॥ वार्तिकीं बोलिले सुरेश्वर आ-
पण ॥ तेंही चिन्ह परिसावें ॥ २८ ॥ संमतिवार्तिक ॥ यस्त्वक्षरपरिज्ञानान्मृत्योर्मृत्युःप्रमीयते ॥ सएवब्रा
ह्मणोनान्योजगत्यध्यवसीयतां ॥ ८ ॥ टीका ॥ जें कीं शाश्वत नित्य अक्षर ॥ परब्रह्म जें निर्विकार ॥

१ परमधर्म

त्याच्या परिज्ञानेंकरूनि संसार ॥ भस्मसार जेणें केला ॥ २९ ॥ मृत्यूउपरि मृत्यु हारी ॥ होती ज्या सं-साराभीतरीं ॥ गेलिया कोटिकल्पाच्या हारी ॥ परि नसरे वारि संसाराची ॥ २३० ॥ ऐसीया संसारा-चें धरणें ॥ उठलें ब्रह्माच्या अपरोक्षज्ञानें ॥ तयातेंच ब्राह्मण ह्मणणें ॥ येर तें जाणणें वेषधारी ॥ ३१ ॥ दुसरें ऐसें व्याख्यान ॥ वस्तुचें जें अपरोक्षज्ञान ॥ तेणें मृत्यूचा मृत्यु जें चैतन्य ॥ होय तो ब्राह्मण निश्चये-सीं ॥ ३२ ॥ अगा त्रैलोक्यामाझारी ॥ बरवा निश्चय सर्वांभीतरी ॥ जो ब्रह्म जाणे स्वज्ञानें करी ॥ ब्राह्मण-त्व वरी तयातेंचि कीं ॥३३॥ इतर तेही ब्राह्मण होती॥परी मुख्य ब्राह्मण ते नहोती॥जे सत्कर्मी आचारवंत होती ॥ पारि मुख्य ते होती पूर्वोक्त ॥३४॥ यालागीं तोचि तो ब्राह्मण ॥ कर्मे अधीक नव्हे ज्याचें महिमान॥ महिमान ह्मणिजे स्वरूपज्ञान ॥ नव्हे क्षीण कर्म करितां ॥ ३५ ॥ यालागीं तो सत्कर्म करो ॥ अथवा तो कांहींच नकरो ॥ समाधिस्थ राहो कां राज्य करो ॥ कां व्यवहारो ग्रहस्थाश्रमीं ॥३६॥ यालागीं कर्मे करितां नकरितां ॥ तोचि तो ब्रह्मरूप तत्वतां ॥ अगा अल्पही मन ब्रह्मीं लावितां ॥ कर्मे करितां नलिंपे तो ॥३७॥ तो परमानंदचि पावेल ॥ परि नदेखे तो दुःखकल्लोळ ॥ करितांही व्यवहार सकळ ॥ अतिनिर्मळ असंगत्वें ॥ ३८ ॥ संमति ॥ योगरतोवाभोगरतोवासंगरतोवासंगविहीनः ॥ किंचिद्ब्रह्मणियोजीच्चित्तोनंदतिनंदति नंदतियत ॥ ९ ॥ टीका ॥ जेणें किंचित्कदाचित चित्त ॥ ब्रह्मीं ठेविलें गा सुनिश्चित ॥ तो परमानंद पावे

१ ज्ञानानें. २ आत्मज्ञान.

अद्भुत ॥ हेलावत ब्रह्मगोळ ॥ ३९ ॥ तो परमानंद श्रीरघुनाथा ॥ पावे निश्चयें जाण सर्वथा ॥ नकोआणूं तूं भ्रांति चित्ता ॥ दिव्य सर्वथा देईन मी ॥ २४० ॥ परी ता असो भलतिये व्यापारीं ॥ कीं योगसाधूनि राहे अंतरीं ॥ अथवा भोग भोगो नानापरि ॥ किंवा संगु करी स्त्रीपुत्रांचा ॥ ४१ ॥ अथवा निःसंग होऊनि वनीं बैसो ॥ किं स्त्रीपुत्रसंगें गृहींच वसो ॥ कां यागादिकर्मे करूनि असो ॥ अथवा नसो गृहाश्रमीं ॥ ४२ ॥ परि तो संगें असंगें नजळे ॥ भोगीं अभोगीं वर्ततां नपोळे ॥ पुत्रादिसंगेंकरूनि नमैळे ॥ जरी खेळे खेळ नाना ॥ ॥ ४३ ॥ यालागीं कर्मीं वर्ततां ॥ परि तो नपावे अधिक न्यूनता ॥ तो ब्रह्मीं ब्रह्मरूप तत्वतां ॥ नेणे कथा जीवित्वाची ॥ ४४ ॥ ह्मणऊनि कर्माचरणें वर्ततां ॥ परि तो बाधु नपावे गा रघुनाथा ॥ अथवा समाधिस्थ राहतां ॥ अधिकता काय पावे ॥ ४५ ॥ आतां बहु बोलोनि काय ॥ ब्रह्मनिष्ठासिं सर्वत्र निष्ठा होय ॥ तो स्वयेंचि ब्रह्मरूप आहे ॥ न्यून काय होईल त्यासीं ॥ ४६ ॥ तो देहीं असोनि देहातीत ॥ स्वात्मबोधेंचि जो वर्तत ॥ यदर्थीं भागवतीं श्रीभगवंत ॥ मातें बोलत उद्धवासीं ॥ ४७ ॥ संमतिभागवत ॥ देहस्थोपिनदेहस्थोविद्वान्स्वप्नाद्यथोत्थितः ॥ अदेहस्थोऽपिदेहस्थःकुमतिःस्वप्नदृग्यथा ॥ १० ॥ टीका ॥ अगा देहीं असोनि तो विदेही ॥ जो सर्वसाक्षित्वें वर्ते पाहीं ॥ नेणे आपणाव्यतिरिक्त कांहीं ॥ कर्म आपणासिं ही भिन्न नदेखे ॥ ४८ ॥ आपुलें स्वरूप नदेखे भिन्न ॥ ब्रह्मीं ब्रह्मरूप चैतन्यघन ॥ पुर्वीं जो देखतसे विश्वस्वप्न ॥ तें आ-

१ कर्मीपणा. २ गोष्ट.

पण नेणोनि भ्रांतिस्तव ॥ ४९ ॥ तो स्वात्मबोधें जाला जागृत ॥ देहोस्मि स्वप्न गेलें निभ्रांत ॥ जैसा जागा पुरुष स्वप्नस्थ ॥ देखे स्वस्थ स्वप्नमिथ्या ॥ २५० ॥ तो जागलिया काय स्वप्नींचा होय ॥ तैसा ब्रह्मावबोधें संसारी नोहे ॥ येणेंच दृष्टांतें तूं पाहे ॥ सर्वथा नोहे मोहो पाहीं ॥ ५१ ॥ तैसा अज्ञानी जाण विपरीत ॥ तो देहस्थ नहोनि देहस्थ ॥ बुद्धि तयाचि कुश्चित ॥ आत्मतत्व नेणोनियां ॥ ५२ ॥ जैसा स्वयें ब्राह्मण असतां ॥ तो स्वप्नीं चांडाळवेष होय धरिता ॥ परि तो नव्हे अंत्यजता ॥ मानिता होय स्वयें आपणासीं ॥ ५३ ॥ मग त्या देहाचेनि सुखदुःखें करी ॥ तद्रूपचि होय सर्वांपरी ॥ तैसाचि अज्ञानि गा रावणारी ॥ नहोनि भारी दुःखरूप होय ॥ ५४ ॥ यालागीं तो वास्तव देह नोहे ॥ तेथें देहींचें कर्म बाधिल काय ॥ ऐसें उद्धवाप्रति यदुराय ॥ बोधीं पाहे स्वरूपज्ञान ॥ ५५ ॥ यालागीं आतां सहजस्थिती ॥ संगासंग बाधूं नशकती ॥ मनादि निरोध करणें नलगति ॥ सहजस्थिती सहजपणें ॥ ५६ ॥ तरी ते सहजस्थिती कैसी असे ॥ मनादि निरोध करितां अनायासें ॥ ब्रह्मरूप असिजेत असे ॥ तेंही कैसें सांगेन ॥५७॥ ऐसें बोलतां वसिष्ठमुनी ॥ रघुनाथा हर्ष नमाये गगनीं ॥ तेंचि पुसावया प्रवर्तला प्रश्नीं ॥ प्रत्युत्तर मुनी देताजाला ॥ ५८ ॥ तेंचि निरूपण करावया लागुन ॥ प्रवर्तलें हें दशमप्रकरण ॥ येथें नवाहि प्रकरणाचें निरूपण॥आहे पूर्ण ब्रह्मानंद ॥ ५९ ॥ यास्तव हें निर्वाणप्रकरण ॥ गोडपणें पावलें अभिधान ॥ तेंचि कीजेल निरूपण ॥ साव-

१ निःसंशय. २ नीचपणा. ३ नाम.

धान परिसावें॥२६०॥त्यामाजी कितीयेक श्लोकेंकरून॥प्रथम कीजेल स्वरूपज्ञान॥वर्ततांही व्यवहारेंकरून॥ होय भान ब्रह्मचि तया ॥६१॥ ब्रह्म तें सद्रूप चिद्रूप आनंदरूप ॥ त्रिप्रकारें येक ब्रह्मस्वरूप ॥ तेंही त्रिप्रकारें वोळखी अनुरूप ॥ सांगिजे स्वरूप तिहीं श्लोकीं ॥ ६२ ॥ त्यावरी पांच श्लोकेंकरून ॥ त्याचेंच कीजेल दृ-ढीकरण ॥ आणि ते वस्तुची पाहती खुण ॥ सांगिजेल पूर्ण बोधे तैसी ॥ ६३ ॥ त्यामाजी प्रथम श्लोकीं आनंदांश ॥ ब्रह्म बोलिजेल वोळखि मिषें ॥ द्वितीय श्लोकीं चित्प्रकाशें ॥ आणि सत्तांशें तृतीयश्लोकीं॥६४॥ तेंचि आठां श्लोकीं जाणिजे ॥ सर्वत्र ब्रह्मदर्शन कीजे ॥ तयावरी श्लोकद्वयें वाखाणिजे ॥ स्थिती सहजे ते सहजस्थिती ॥ ६५ ॥ यावरी स्थिती तेंचि दृढीकरण ॥ यावत्समाप्ति हें प्रकरण ॥ मध्यें इतरभागीं निरो-पण ॥ कीजेल जाण श्रोतेहो ॥ ६६ ॥ परस्परें प्रकरणाचि संगति ॥ निरोपिली श्रीरामाचि प्रश्नोक्ती ॥ आ-तां निरोपण वसिष्ठ जें करिती ॥ तें सावधान श्रोतीं परिसावें ॥ ६७ ॥ संमति ॥ दृश्यदर्शनसंबंधाद्ध्रुवेत्प-रमंसुखं ॥ तदेवैकांतसंचिंत्यमनोनाशःपरंपदं ॥ ११ ॥ टीका ॥ श्रीरामा तुझेनि प्रश्नेंकरुनी ॥ सुखनिर्भर जालें अंतःकरणीं ॥ तरी ऐक सांगों विस्तारोनि ॥ जोंवरी धनी पावे मना ॥ ६८ ॥ तरी सहजस्थितीनें अ-सतां ॥ आत्मानुभवो चालतां बोलतां ॥ तेंचि ऐके श्रीरघुनाथा ॥ अपूर्वता इये स्थितीचि ॥ ६९ ॥ तरी आत्मयाचें जें जाणणें ॥ तें अतिसुलभ गा इये खुणे ॥ सोपें आणि सुख पावणें ॥ विटिजेना मनें अनुभ-

१ भरित, पूर्ण. २ समाधान.

वितां ॥ २७० ॥ मनासि तरी अनुभव नाहीं ॥ परी वृत्तिरूप ज्ञानास्तव पाहीं ॥ बोलि बोलिलों तो दोष कांहीं ॥ नमानी देहीं रघुवर्या ॥७१ ॥ केवळ शुद्धि बुद्धीचि जे वृत्ती ॥ ते चैतन्याकारें होय गा रघुपती ॥ तेणें आत्मविषैक अज्ञाननिवृत्ती ॥ होय क्षणाप्रती राघवा ॥७२॥ अगा तया अज्ञानाचा नाश ॥ होतां-चि आत्मस्वरूपप्रकाश ॥ तो स्वयें अनुभव आपणास ॥ सावकाश होतसे ॥ ७३ ॥ यालागीं बुद्धि ग्राह्य ह्मणती ॥ हेंचि खुण बोलावया श्रीरघुपती ॥ येचिविषंई द्वारकापति ॥ पार्थाप्रति बोले गीता॥७४॥संमति-गीता ॥ सुखमात्यंतिकंयेतत्बुद्धिग्राह्यमतींद्रियं ॥ १२ ॥ अथश्रुती ॥ दृश्यतेत्वग्रयाबुद्ध्यासूक्ष्मयासूक्ष्मदर्शि-भिः ॥ यन्मनसैवानुष्टेयंहृदामनीषामनसाभिक्लृप्तोयएनंविदुरमृतास्तेभवंति ॥ ४ ॥ टीका॥ ययालागीं गा त्रैलोक्यपती ॥ बुद्धिग्राह्य ऐसें ह्मणति ॥ येऱ्हवीं अनुभविजे स्वयें प्रतीति ॥ परि इंद्रियवृत्ति नपावे ॥७५॥ तरी प्रिय दृश्याचिये भेटी ॥ जे कीं दर्शनें स्वयेंचि उठी ॥ दृश्य दर्शनाच्या संघटीं ॥ सुख कोटी उद्भवे जें ॥ ॥ ७६ ॥ दृष्टिं देखिली प्रियवनिता ॥ तियेसिं दर्शनाचा संबंध होतां ॥ सुख जें होय गा रघुनाथा ॥ आइक तत्वतां वर्म सांगों ॥ ७७ ॥ चैतन्य सर्वत्र येकचि असे ॥ तें दृश्यीं स्वतःसिद्धचि वसे ॥ चित्तवृत्ति ते दर्शन ऐसें ॥ तियेमाजिं भासे चैतन्य ॥ ७८ ॥ होतां दृश्य दर्शनाचि भेटी ॥ दोहीं चैतन्यासि पडे मिठी ॥ तेथें अज्ञान पळे उठाउठी ॥ सुख कोटी चैतन्यरूप ॥ ७९ ॥ तें सुख नमाये गगनीं ॥ स्वदेहीं भरे कोंदोनि ॥

१ बुद्धीस घेण्यास योग्य. २ संबंध. ३ स्त्री.

तेव्हां मन वासना जाती विरोनी ॥ क्षणें दोन्ही परमानंदें ॥ २८० ॥ हा भलतयासीं अनुभव असे ॥ तो येकांतसंवित्याही होतसे ॥ एकांतसंविती ह्मणिजे ऐसें ॥ तें सांगों विंन्यासें परिस पां ॥ ८१ ॥ घटपटादि जेणें जाणणें ॥ तें स्थूळवृत्तीकरूनि पाहाणें ॥ तें लौकिक ज्ञान मी ह्मणे ॥ वृत्तिरूप तें जाण एकांतरूप ॥ ८२ ॥ वृत्तिरूपचि घटज्ञान असे ॥ परि तत्क्षणेंचि तें नासे ॥ त्या लौकिक ह्मणिजेत असे ॥ स्थीर वसे तें येकांत ज्ञान ॥ ८३ ॥ अनेकाकारा जे वृत्तिसंविती ॥ ते लौकिक ऐसें बोलती ॥ येक ब्रह्माकार जे चरमांतःकरणवृत्ति ॥ येकांत संविती तितें ह्मणिजे ॥ ८४ ॥ दृश्य दर्शनसंबंधेंकरूनि ज्ञान ॥ जें कीं उद्भवे सुख गहन ॥ तेंचि निर्वाह केलिया पूर्ण ॥ हेचि खुण येकांताची ॥ ८५ ॥ विषयनाशेंकरूनि नाशिलें ॥ ह्मणोनि तें लौकिकज्ञान झालें ॥ विषयउपाधीनें युक्त भलें ॥ ह्मणोनि आलें लौकिकपणा ॥ ८६ ॥ तेंचि उपाधीच्या त्यागेंकरुनी ॥ निर्वाह तें कीजे संपूर्ण जनीं ॥ तरी तेंचि ज्ञान येकांतपणीं ॥ सुख निर्वाणीं होय जेथें ॥ ८७ ॥ तें दृश्य दर्शनयोगेंकरून ॥ तेणें येकांतज्ञान संपूर्ण ॥ परम सुख उद्भवे जाण ॥ मनोनाशन जेणें होय ॥ ८८ ॥ तेथें मनाचा नाश होय ॥ तेंचि तें परमानंदस्वरूप आहे ॥ तेंचि आत्मरूप निश्चयें पाहे ॥ जें सुख होय दृश्यभेटी ॥ ८९ ॥ तरी दृश्य आणि दर्शनव्यक्ती ॥ सांडूनि घेईजे सुखसंविती ॥ केवळ आत्मसुख तें गा सुमती ॥ जाण निश्चिती आन नाहीं ॥ २९० ॥ अगा अखंड ज्ञानेंकरून ॥ जरी जालें

१ सविस्तर. २ ज्ञान. ३ देहबुद्धि.

मनोनाशन ॥ तरी तेंचि परमपद निर्वाण ॥ ब्रह्मपूर्ण तूंचि रामा ॥ ९१ ॥ ऐसेंचि सर्वत्र गा जगजेठी ॥ सकळ दृश्य दर्शनाचिये भेटी ॥ तेंचि पाहतां स्थिरावलेनिदृष्टी ॥ होय भेटी स्वरूपेसीं ॥ ९२ ॥ जें विषयदर्शनें सुख उपजे ॥ तेंचि विषयत्यागें जरी निर्वाहिजे ॥ तरी आत्मसुख जाणिजे ॥ नाहीं दुजें तयावीण ॥ ॥ ९३ ॥ सर्वत्र सुख नाम जें जें बोलती ॥ तें तें आत्मसुख जाण विश्वमूर्ति ॥ परी तें अल्प जालें विषयसंगती ॥ विषयीक ह्मणती आत्मसुखातें ॥ ९४ ॥ तैसें येकचि महदाकाश ॥ सर्व जगा देतसे अवकाश ॥ तेणें व्यवहार करिती सावकाश ॥ सुख संतोष पावती ॥ ९५ ॥ तेंचि अवकाशसंबंधेंकरून ॥ घटाकाश मठाकाश भिन्न भिन्न ॥ जालिया तेंचि परिच्छिन्न ॥ सुख संपूर्ण जनां नेदी ॥९६॥ घटाकाशीं काय व्यवहार होईल ॥ किंवा तयामाजि लोक वर्ततील ॥ तेथें कोण सुख पावतील॥आहारण जळावांचोनी ॥९७॥ घटीं जळादिकांचें आहारण ॥ मठीं गृहकर्मादि वर्तन ॥ तेथें तितुकेंचि सुख प्राप्त जाण ॥ नाहीं संपूर्ण पूर्णाऐसें ॥ ९८ ॥ ऐसेंचि आत्मसुखही येक ॥ तें विषयसंबंधें जालें अनेक ॥ त्याविषयासारिखें होयसुख ॥ परि असंख्य संपूर्ण नोहे ॥ ९९ ॥ परी तें आत्मसुख सर्वत्र जाण ॥ तेंचि विषयसुख ह्मणती नेणोन ॥ ज्ञानि तो तद्रूपें राहोन ॥ सुखसंपन्न सर्वत्र ॥ ३०० ॥ यालागीं हेंचि सुख सर्वत्र पाहीं ॥ दृश्यदर्शनें जें सुख आनपायी ॥ तेंचि अनुभविजे अनुस्यूत देहीं ॥ तेंचि पाहीं आत्मसुख ॥१॥ आणिकही आत्मसुखाचि खुण ॥ सां-

१ निवारण केलें. २ अविनाशी. ३ अखंड.

गेन विश्वंभरा तुजलागुन ॥ तें ऐके येकाग्र करूनियां मन ॥ जेणें ब्रह्मज्ञान प्राप्त होय ॥२॥ श्लोक ॥ दृश्यदर्शनसंबंधेसुखसंविदनुत्तमा ॥ दृश्यसंवलितोबंधस्तन्मुक्त्यामुक्तिरुच्यते॥१॥टीका ॥ अगा दृश्येसीं दर्शनसंलग्न ॥ हातांचि सुखस्वरूप ज्ञान ॥ उद्धवे अतिगहन जाण ॥ थोर जयाहून आन नाहीं ॥ ३ ॥ तेंचि तें सुखस्वरूप ज्ञान ॥ तेंचि तें परब्रह्म पूर्ण॥ दृश्यावेगळें निवडून॥स्थिरावोनि घेइजे सुख ॥४॥ अहो दृश्याचें जें जाणणें॥ तें होय दर्शनसंबंधेंचि येणें ॥ तेंचि स्थिरावलेनि अंतःकरणें ॥ नासो नदेणें घेइजे ऐसें ॥ ५ ॥ तेंचि तें दृश्याचें ज्ञान ॥ जालें जेव्हां दृश्यविहीन ॥ त्यासि कोलिया स्थीरपणें ॥ ब्रह्मपरिपूर्ण तेंचि तें कीं ॥६ ॥ तेंचि दृश्येसिं जालिया संवळित ॥ तरि तोचि संसारबंध निश्चित ॥ दृश्य दृश्यत्वें सत्य जरी जाणत ॥ तरी तोचि भ्रांत बंद्धरूपें ॥ ७ ॥ अगा सर्वही ब्रह्मचि असे ॥ ब्रह्मावेगळें अणुमात्रहि नसे ॥ परि मध्यें दृश्यत्वें जें भासे ॥ तें मिथ्या ऐसें जाण तूं ॥ ८ ॥ जितुकेंही ज्ञानमात्र जाण ॥ तितुकेंचि पूर्ण चैतन्य ॥ दृश्य प्रातिभासिक अध्यस्तहीन ॥ भ्रमेंचि जाण स्वप्न जैसें ॥९ ॥ तया दृश्याचें युक्त जालें ज्ञान ॥ ह्मणउनी तेंहि पावलें दृश्यपण ॥ त्याचें क्षणिकत्वें क्षणिकपण ॥ पावलें जाण उपाधियोगें ॥ ३१० ॥ तेंचि दृश्यावेगळें करितां ज्ञान ॥ जरी निर्वाहतें कीजे स्थिरावोन ॥ तरी तेंचि ज्ञान चैतन्यघन ॥ ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ११ ॥ येथें आणिकही येक अनर्थ ॥ जेव्हां तेंचि ज्ञान होय दृश्यसंवळित॥ तेव्हां तोचि गा बंध सुनिश्चित ॥ दुः-

१ मिश्रित. २ आरोपाशिवाय. ३ निवारण.

ख देत संसारिकां ॥ १२॥ तोचि दृश्याचा योग वेगळा होतां ॥ तेंचि शुद्धज्ञान गा रघुनाथा ॥ तेंचि तें जाण तत्वतां ॥ परम पुरुषार्था पावलें ॥ १३ ॥ आणिकही तुज सांगेन खुण ॥ जेणें पाविजे ब्रह्मपूर्ण ॥ पावतांचि सुख समाधान ॥ सच्चिद्घन स्वयें प्राप्त ॥ १४ ॥ श्लोक ॥ शुद्धंसदसतोर्मध्येपदंलब्ध्वाचलंचतत् ॥ सबाह्याभ्यंतरंविश्वंमागृहाणविमुंचमाम् ॥ २ ॥ टीका ॥ दृश्यामाजि जे वस्तु संत ॥घटपटादि जे पदार्थ॥ ते अस्ती ह्मणतांचि सत्ता भासत ॥ तेंचि निश्चित ब्रह्म जाण ॥ १५ ॥ यालागीं संतवस्तुचा पोटीं ॥ सत्तारूपें ब्रह्मचि उठी ॥ त्याची विचारमात्रेंचि होय भेटी ॥ पडे गांठी येकत्वें ॥ १६ ॥ घटपटाचि आहेपण जे सत्ता ॥ तेंचि ब्रह्म गा रमाकांता ॥ घटपट त्यजूनि केवळ सत्ता ॥ घेइजे तत्वतां निरंतर ॥ १७ ॥ तैसेंचि असंत जे किं पदार्थ ॥ ते खपुष्प[1] आणि वंध्यासुत ॥ त्याचेनि नाहींपणेंचि ब्रह्मसंत ॥ प्राप्त सुनिश्चित निरंशत्वें॥१८॥जें पदार्थजाताचें नाहींपण ॥ तेंचि तें जाण निखिल चैतन्य ॥ विश्वाचा अभावो आनंदघन ॥ ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ १९ ॥ आणि नाहींपण जेथें स्फुरत ॥ जेणें नाहींपण जाणिजेत ॥तेंचि तें ब्रह्म सदोदित ॥ जाण निश्चित आनंदरूप ॥ ३२० ॥ आणि संता असंतामाझारी ॥ शुद्धज्ञान जें कीं रावणारी ॥ अचळ अढळ सर्वांपरी ॥ सबाह्य अभ्यंतरीं तेंचि येक ॥ २१ ॥ संत असंत ऐसें जाणिजे ॥ असंतें संत जेथें भासिजे ॥ तेंचि ब्रह्म जाण सहजें ॥ श्रीरघुराजें जाणिजे पैं ॥ २२ ॥ अथवा सत्र शब्दें द्रष्टा जाणिजे ॥ अ-





१ आकाशपुष्प. २ सरोवर. ३ संपूर्ण.

संत तं तंव दृश्य सहजें ॥ यादोहींमाजि असोनि प्रकाशिजे ॥ तेंचि निर्व्याजें अचळ वस्तु ॥ २३ ॥ ब्रह्मावेगळें अचळ नाहीं ॥ तेंचि तें सर्वत्र येक पाहीं ॥ विचारें पाहतां लाभे सर्वही॥ पद अनपांई तेंच कीं ॥२४॥ दृश्य तें दृश्यत्वें सरे॥दृश्याभावें दृष्टाही वोसरे॥मध्यें अचळपण जें वावरे॥ निर्धारें पाही तेंचि ब्रह्म॥२५॥ऐसें स्वस्वरूप सबराभंरी॥पावल्या बाह्य अभ्यंतरीं॥विश्व हें मध्येंच भासे लहरी॥नको रावणारी घेऊंत्यातें॥२६॥ अथवा भासतें विश्व सांडावें॥इयेहि पडो नको हावे॥सांडिमांडि सांडूनि राहावें ॥ स्वयें अनुभवावें स्वस्वरूपा ॥२७॥यया विश्वाचें सांडणें मांडणें ॥ सोडोनियां निवांत राहणें॥जें कीं सदसतामाजी पाहाणें॥पद लाधणें तेचि स्थिती ॥ २८ ॥ आणिकही येक खुण ॥ सांगेन तुज निर्वाण ॥ तेचि जाणूनि राहे लीन ॥ समसमान पूर्णत्वें ॥ २९ ॥ श्लोक ॥ जडाजडदृशोर्मध्येयत्तत्त्वंपारमार्थिकम् ॥ अनंताकाशहृद्यंतत्समाश्रयसर्वदा ॥ ३ ॥ टीका ॥ घटपटाचें वृत्तिज्ञान ॥ जें जाणिजे घटपटादि भान ॥ विश्वाभास भासे आपण ॥ तें ज्ञान जाण जडरूप ॥ ३३० ॥ ज्ञान तरी सर्वत्र येकचि असे ॥ परी जड जालें दृश्य जडांशें ॥ ह्मणोन तें जड बोलिजेतअसे ॥ अजड तें ऐसें स्वरूपभूत॥३१॥ येक त्या इंद्रियांच्या वृत्ती ॥ तें जड ज्ञानजाण रघुपती ॥ येक साक्षित्वें साक्षी स्फुरती ॥ इंद्रियवृत्ति नसोनियां ॥ ३२ ॥ इंद्रिय आणि इंद्रियवृत्ति ॥ येहीं पदार्थ जे प्रकाशजेति ॥ यांतें जाणे जे संविंती ॥ तें जाण रघुपती अजड ज्ञान ॥ ३३ ॥ जडज्ञान तें विषयस्फूर्ति ॥ अजड

१ निष्कंटक. २ अंतरबाह्य. ३ टाकणें घेणें. ४ ज्ञान.

ज्ञान तें द्रष्टा सर्वार्थीं ॥ दृश्य तें प्रकाशिजे संविती ॥ तें जाण रघुपति परम तत्व ॥ ३४ ॥ तेंचि कैसें पुससी रघुनाथा ॥ तरी तें अनंत अपरिमित सर्वथा ॥ नाहीं त्रिविध परिच्छेदता ॥ तेंचि तत्वतां अनंत वाच्य ॥ ३५ ॥ या दोहीं ज्ञानांचें लक्षण ॥ सांगीतलें तुज संपूर्ण ॥ यामाजि जें पारमार्थिक ज्ञान ॥ तेंचि जाण परम तत्व ॥३६ ॥ ऐसें परिपूर्ण सबाह्याभ्यंतरीं ॥ परिच्छेद न पावे कोणेपरी ॥ आकाशालागूनि नउरे उरी ॥ अतिनिर्धारीं निघोटरूपें ॥ ३७ ॥ जयामाजि दुसरें नसरे ॥ येकत्वें गणनेसि नपुरे ॥ ऐसें सुखरूप जें उरे ॥ जाण निर्धारें परब्रह्म तें ॥ ३८ ॥ तेंचि आश्रावूनि राहे सर्वदां ॥ तद्रूप भोगी परमानंदा ॥ जाणोनियां सुखस्वानंदा ॥ नाहीं मर्यादा जयासीं ॥ ३९ ॥ तेथें नेणणें ना जाणणें ॥ नाहीं भोगणें ना पाहाणें ॥ नाहीं तेथें घेणेंदेणें ॥ अनुभवणें परमानंद ॥ ३४० ॥ श्लोक ॥ द्रष्टुर्दृश्यस्यसंयोगोबंधइत्यभिधीयते ॥ द्रष्टादृश्यवशाद्बद्धोदृश्याभावाद्विमुच्यते ॥ ४ ॥ टीका ॥ हें नेणोनियां रघुपती ॥ द्रष्टा दृश्यचि साच देखती ॥ तोचि बंध जाण सर्वार्थीं ॥ विश्व देखती साचपणें ॥ ४१ ॥ दृढ जालिया विश्वभावना ॥ तोचि संसारबंधु गा रघुनंदना ॥ द्रष्टा जालिया दृश्याधीना ॥ पावे बंधन संसारादिकां ॥ ४२ ॥ हें देहादि दृश्य सत्यत्वें स्फुरतां ॥ द्रष्टेपणें आपणातें मानितां ॥ तोचि भव तोचि बंध निरुता ॥ संसार पुरता आगीं वाजे ॥ ४३ ॥ जंव जंव दृश्य हें साच स्फुरे ॥ तंव तंव पडे संसारगुंफिरें ॥ मग तें अकल्पांत नसरे ॥ तेथेंचि मरे उपजे पुढती ॥ ४४ ॥ कोश

१ भेद. २ परिपूर्ण. ३ गुंताडा, बेडी.

कीटकाचेपरी ॥ सत्यत्वें तंतुचें घर करी ॥ शेंखीं गुंफे तेणेंचि करी ॥ मरणावारी तेथेंचि फावे ॥ ४५ ॥ नातरी ऊर्णनाभिका जैसा ॥ ऊर्णा वमुनी करी फांसा ॥ तेणेंचि गुंफे स्वयें सहसा ॥ मरणवळसा पडतअसे ॥ ॥ ४६ तैसे देहादि दृश्य मनोविलास ॥ मनकल्पित हे सकळांश ॥ ते यथार्थ कल्पितांचि पडे पाश ॥ पावे सावकाश बंधनातें ॥ ४७ ॥ आपणच कल्पूनि दृश्य जाणा ॥ तेणेंचि बंधन पावे जैसी ऊर्णा ॥ तिये ऊर्णीचेपरि पावे बंधना ॥ आपआपणा बांधोनी घे ॥ ४८ ॥ तेंचि दृश्यमात्र नस्फुरतां ॥ स्वयेंचि वरी आपली मुक्तता ॥ तोचि मुक्त गा रघुनाथा ॥ दृश्य सर्वथा नस्फुरे जया ॥ ४९ ॥ वास्तव वस्तुचेनि ज्ञानें ॥ प्रपंच न देखिजे मनें ॥ तरी तेचि स्वरूपस्थिती जाणणें ॥ नाहीं करणें आणि कांहीं ॥ ३५० ॥ आणिकही ब्रह्माचें लक्षण ॥ सहजस्थिती जे कीं परिपूर्ण ॥ बोळखोनियां बाणे जाण ॥ तेंचि अनुसंधान परियेसीं ॥ ॥ ५१ ॥ श्लोक ॥ द्वयोर्मध्यगतंनित्यमस्तिनास्तीतिपक्षयोः ॥ प्रकाशकंप्रकाशानामात्मानंसुखमाश्रय ॥ ५ ॥ टीका ॥ जो जो दृश्य पदार्थ देखिजे ॥ श्रवणीं जो जो ऐकिजे ॥ तेथें तेथें अस्तित्वें सोस घेइजे ॥ वस्तु जाणिजे आहेपणें ॥ ५२ ॥ जे जे सत्तारूप तेचि वस्तु पाहे ॥ तेथें अस्तित्वें ब्रह्मचि आहे ॥ जेथें नाहीं ह्मणोजाय ॥ तेथेंही आहे सर्वाभावें ॥ ५३ ॥ सर्वांचें जें अभावरूप ॥ सर्वनिराशें उरे निष्कंप ॥ तेंचि तें ब्रह्मस्वरूप ॥ अतिअमूप उदारपणें ॥ ५४ ॥ अस्ति नास्ति या पक्षद्वयीं ॥ मध्यें भासे जें कीं अक्षयी ॥ नित्य-

१ शेवटीं. २ कोष्टी, कोळी.

व्यापक जें कीं सर्वही॥जाण अनपांई तेंचि ब्रह्म ॥ ५५ ॥ जेजे प्रकाशमंत पदार्थ ॥ अग्नि चंद्र आणि भास्वंत ॥ विद्युल्लता मनादि समस्त ॥ यांतें प्रकाशित स्वप्रकाशें जें ॥ ५६ ॥ सर्व प्रकाशाचें प्रकाशन ॥ तोचि आत्मा व्यापक परिपूर्ण ॥ शूद्ध निर्मळ निरंजन ॥ चैतन्यघन परमानंद ॥ ५७ ॥ तेंचि आश्रावें गा रघुपती ॥ निरंतर रहावें तेचि स्थिती ॥ सांडूनियां दृश्यप्रतीति ॥ अधिष्ठानिं मती स्थीर करीं ॥ ५८ ॥ आणिकही लक्षणें विश्वमूर्ति ॥ सांगेन तुज त्रिदशाधिपति ॥ तेणें होय ब्रह्मप्राप्ती ॥ सहजस्थिती पावसील ॥ ॥ ५९ ॥ श्लोक ॥ द्रष्टादर्शनदृश्यानित्यक्त्वावासनयासह ॥ दर्शनंप्रथमाभासमात्मानंकेवलंभज॥६॥ टीका ॥ हे द्रष्टा दृश्य आणि दर्शन ॥ आणि दृश्याचिया वासना जाण ॥ टाकोनि येक समयापन्न ॥ पहाती खुण ते ऐका ॥ ३६० ॥ द्रष्टा अहंकार मनासंवळित ॥ जो कां आपुला अहंकार निश्चित ॥ तोचि द्रष्टा जाण इत्थंभूत ॥ चैतन्यमिश्रित जाण कां जो ॥ ६१ ॥ तेणें प्रकाशली मनोवृत्ति ॥ घेउनी चक्षुरिंद्रियादि वृत्ती ॥ जे असे दृश्यातें प्रकाशिती ॥ दर्शन ह्मणती जियेतें ॥ ६२ ॥ तेणें दर्शनें जें प्रकाशिजे ॥ तयातें दृश्य ऐसें ह्मणिजे ॥ या त्रयातें निःशेष विसरिजे ॥ आणि टाकिजे वासनातें ॥ ६३ ॥ सर्व वासनासहित जाण ॥ टाकिजे द्रष्टा दृश्य दर्शन ॥ दर्शनापूर्वीं जें भास्वन ॥ तेंचि ज्ञान ब्रह्मरूप ॥ ६४ ॥ द्रष्टा दृश्याकार जंव नव्हे ॥ दर्शन दृश्यातें जंव नपावे ॥ तंव स्वप्रकाशें जें जें संभवे ॥ तेंचि जाणावें परब्रह्म ॥ ६५ ॥ द्रष्टा दृश्य दर्श-

१ अविनाशी. २ सूर्य. ३ वीज.

नातें ॥ ये त्रिपुटीपुर्वीं प्रकाशियातें ॥ प्रकाशमंत स्वतःसिद्ध तें ॥ जाण निरुतें परब्रह्म ॥ ६६ ॥ अगा द्रष्टा दृश्य दर्शनाआधीं ॥ प्रकाशमंत जें स्वयें अनादि ॥ तेंचि परब्रह्म जाण सुबुद्धि ॥ जें कां निरवधी परमानंद ॥ ६७ ॥ दर्शना होय दृश्याचि भेटी ॥ तंव पहिलेंचि जें प्रकाश प्रकटी ॥ तेंचि ब्रह्मगा नेटीपोटी ॥ जाण जगजेठी रमाकांता ॥६८॥ अगा या इंद्रियांच्यावृत्ति॥दृश्यातें जंव झोंबती ॥तयापूर्वीं जे प्रकाशस्थिती॥जाण सुमती तेंचि चैतन्य ॥ ६९ ॥ हा नेत्र जंव रूपातें प्रकाशी ॥ तंव आधींच जें स्वयंप्रकाशी ॥ प्रकाशमंतें जें निर्देशि ॥ तें परब्रह्म जाण ऐसी खुण ॥ ३७० ॥ दर्शन जंव दृश्यासिं झोंबे ॥ तों त्रिपुटीपूर्वींच जें उभें ॥ स्वप्रकाशें स्वयें शोभे ॥ दृश्यप्रभे नमिळे जें कां ॥७१॥ द्रष्टा दृश्य आणि दर्शन ॥ हें वासनासहित टाकून ॥ यापूर्वीं जें कां भाषण ॥ तेंचि चैतन्य जाणावें पां ॥ ७२ ॥ तोचि आत्मा व्यापक परिपूर्ण ॥ द्वैतादिक भावविहीन ॥ केवळ नित्य निरंजन ॥ आनंदघन उपासिजे ॥ ७३ ॥ तयाचें भजन तें ऐसें ॥ आपणाविणे दुजें नभासे ॥ तयावीण अणुमात्रही नसे ॥ स्वयें समरसे कर्पूराग्नि जैसा ॥ ७४ ॥ अग्नि कर्पूराच्या मिळणीं ॥ येकत्वें तुरतीच गा दोन्ही ॥ ना नयेतीच येकपणीं ॥ लेखा निर्वाणीं तुरोनियां ॥ ७५ ॥ जैसे अवकाश आकाशीं समरसे ॥ तेथें तुरती नामरूपाचे ठसे ॥ कां वीचि जळीं उल्हासे ॥ होय समरसें जळाचि येक ॥७६ ॥ नातरी गंध आणि परिमळ ॥ कीं प्रकाश आणि उजाळ ॥ सुवर्णकांतीसिं होय मेळ ॥ तुरे आडळ द्वैताचि

१ खरोखर. २ अनंत. ३ निश्चयरूप. ४ ऐक्यपावे. ५ तेज. ६ स्पर्श.

तेथें ॥ ७७ ॥ कां माणिक आणि कीळ ॥ रत्न आणि झळाळ ॥ तें येकत्वें नव्हेचि वेगळें ॥ तैसें तें निर्मळ भजन जाण ॥ ७८ ॥ नातरी वाचा आणि अर्थ ॥ अर्थत्वें वाचाचि येकत्व ॥ कां वर्ण आणि गीत ॥ स्वयें येकार्थ येक जैसा ॥ ७९ ॥ कां सोनें आणि कांकण ॥ तें सोनेपणें सोनेंचि जाण ॥ तैसें ब्रह्म नेणे आपणावीण ॥ जाण भजन होंचि मुख्य ॥ ३८० ॥ मुळीं भजन ऐसें जें पद असे ॥ तयाचा अर्थ ऐसा असे ॥ सूर्यासि सूर्य प्रकाशिजे जैसें ॥ भजिजेत असे तयापरी ॥ ८१ ॥ कां चांदणें भजे चंद्रासि॥ किं प्रकाश भजे दीपासि ॥ नातरी शर्करा गोडियेसीं ॥ अनन्य ऐसी भजनदशा ॥ ८२ ॥ तयापरी आत्मभजन ॥ श्रीरघुनाथा जाण अभिन्न ॥ उपचारें जें बोलिजे भजन ॥ परी अनन्यपण येकत्वाचें ॥८३॥ सर्वदां जे कीं ब्रह्माकारता॥ प्रपंच सत्य नभासे दृष्टी पाहातां ॥ तेंचि भजन गा रघुनाथा ॥ जाण तत्वतां सामरस्याचें ॥ ८४ ॥ सर्वदां ब्रह्मपणेंचि असणें ॥ हे देहबुद्धीसिं कदा नस्पर्शणें ॥ तयातेंचि मी भजन ह्मणे ॥ येर तें करणें साधनाभ्यास ॥ ८५ ॥ विषय घ्यावयाचि वासना ॥ आणि टाकुनी द्रष्टा दृश्य दर्शना ॥ येतत्पूर्वि ययाचा भाना ॥ घेई चैतन्या साधूनियां ॥ ८६ ॥ मग तया चैतन्याच्याठाईं ॥ आपणासीं अभेद राहीं॥ तेंचि भजन सर्वदां पाहीं ॥ जाण आनपाईं ब्रह्मस्थिती हे ॥८७॥ आणिकही एक आनंदमूर्ति ॥ आत्मवोळखी सांगों गा तुजप्रती ॥ जियेचि असे सकळां अनुभूति ॥ परि ते नेणती अतिभ्रमें ॥ ८८ ॥ सकळांसि तरी अनुभव असे ॥

१ तेज. २ ऐक्याचें. ३ अविनाशी. ४ अनुभव.

परि नेणती अज्ञानवसें ॥ आणि उघडे तरी स्वप्रकाशें॥तैसें नभासे नाना साधनीं ॥ ८९॥ ऐसें सुगम आणि सोपारें ॥ परी परमानंदसुखही स्फुरे ॥ कांहींच नलगती साधनांतरें ॥ तेंचि स्वयें अंतरे आपणामाजी ॥ ॥ ३९० ॥ ऐसी येक खुण जगन्नाथा ॥ तुजलागीं सांगेन अपूर्वता॥ते खुण जाणतांचि आत्मता ॥ बाणे तत्वतां परमानंद ॥ ९१ ॥ तेंचि ऐकतां एकाग्र ॥ मन हें करूनियां अव्यग्र ॥ ऐकतांचि ब्रह्म समग्र॥ पाविजे अपार सच्चिदानंद ॥९२ ॥ तंव श्रीराम ह्मणती सद्गुरुमूर्ति॥येवढी ब्रह्मखुणेचि स्थिती ॥ तियेच्या श्रवणें पावलों विश्रांति ॥ सुखसंपत्ति परमानंद ॥ ९३ ॥ मातें खुण प्रत्यक्ष पावलिया ॥ कोण सुख तें श्रीगुरुराया॥ हें तंव नकळे जी स्वामिया ॥ तरी सांगा तया उपायासि॥९४॥ तंव वसिष्ठ ह्मणती गा जानकीपती॥ सांगेन तिये आत्मखुणेचि गती ॥ तेचि जाणतां ब्रह्मस्थिती ॥ होय त्रिजगतीं ब्रह्मरूप ॥९५ ॥ ते स्थिती पावतांचि क्षणीं ॥ उघडे ब्रह्मसुखाचि खाणी ॥ तें ऐका एकाग्र स्वस्थकर्णीं[1] ॥ समाधानीं आरुढे जेणें॥९६॥ श्लोक ॥ निद्रादौजागरस्यांतेयोभावउपजायते ॥ तंभावंभावयन्साक्षादक्षय्यानंदमश्नुते ॥ ७॥ टीका॥ तरी जागृती अवस्थेच्याअंतीं ॥ जेव्हां प्रवेश करीतसे सुषुप्ती ॥ तेव्हां होय जे सुखप्राप्ती ॥ ब्रह्ममूर्त्ति तेंचि ब्रह्म ॥ ९७॥ अहो जागृती जातजातां ॥ स्वयें सुषुप्ती प्रवेशु लागतां॥ या दोहींच्या संधि[2] निर्विकारता॥ तेंचि तत्वतां ब्रह्म जाण ॥ ९८ ॥ सर्व देहेंद्रिय प्रपंचाचा ॥ उपसंहार जेथें सर्व वृत्तींचा ॥ तोचि ठाव गा समाधीचा॥ निर्विकल्पा

१ स्वस्थ. २ झोंपेंची संधी.

चा जाण तूं ॥ ९९ ॥ सर्व प्रपंचाचेनि उपरमें ॥ लय विक्षेप जेथें शमे ॥ तेथें उरिजे केवळ ब्रह्म ॥ साधन निमे जियेठाईं ॥ ४०० ॥ ऐसें केवळ आनंदरूप ॥ उरे तेंचि परमात्मस्वरूप ॥ सुखें सुख कोंदे अमूप ॥ तेंचि स्वरूप परब्रह्म ॥ १ ॥ ऐसी हे वेदांतगर्भिंची उक्ती ॥ अनुभवी ते अनुभवें जाणती ॥ तैसीच जाण हे स्थिती ॥ भिन्न गती असेचिना ॥ २ ॥ जरी जागृतीच्या अंतीं ॥ आदिं प्रवेशु जो सुषुप्ती ॥ तेव्हां इंद्रियवृत्ति उपरमती ॥ लया पावती इंद्रियवर्गें ॥ ३ ॥ पूर्ण लय तरी नाहिंझाला ॥ परी वृत्तिचा विषयव्यापार टाकला ॥ हेय उपादानाचा मेळा ॥ सर्वही गेला वृत्तिपासाव ॥ ४॥ त्या इंद्रियांच्या ज्या वृत्ती ॥ त्या त्या इंद्रियांमाजि प्रवेशती ॥ इंद्रियें मनामाजि लय पावती ॥ संकल्पवृत्ती मन सांडी ॥ ५ ॥ जैसें सूर्याचे अस्तमानीं ॥ किरणें प्रवेशती मंडळस्थानीं ॥ मंडळ सामावलें तरणीं ॥ उरे निर्वाणीं सविता येक ॥ ६ ॥ कां पांगुळ स्वार नेटका ॥ तो अश्वारूढ जाला देखा ॥ तेव्हां त्रिभुवन हिंडतां तया एका ॥ नाहीं लेखा गमनाचा ॥ ७ ॥ नातरी करचरणविहीन ॥ सूर्यरथीं बैसतां अरुण ॥ तया क्षणीं हिंडतां त्रिभुवन ॥ नाहीं उमान गमनाचा ॥ ८ ॥ नातरी पवन झालिया साह्यभूत ॥ अग्नी करी त्रैलोक्य भस्मांत ॥ तोचि वायू नसतां सामर्थ्यहत ॥ भस्मीभूत स्वयेंचि होय ॥ ९ ॥ तैसीं इंद्रियें सारथि मनासीं ॥ तेचि अश्वरथस्थानीं तयासीं॥ मन पंगु अंगिकारितां त्यासीं ॥ त्रैलोक्यासीं नपुरे मग ॥४१०॥ तेचि इंद्रियें साह्य नसतां ॥ मनाचि सहज

१ विकार. २ नाहींसाहोतो. ३ लयपावतात. ४ सूर्य. ५ गणती.

होय स्थिरता ॥ सांडी संकल्पाची चाळकता ॥ बुद्धि स्वरूपता पावलिया ॥ ११ ॥ साह्य असतां पंगुची थोरी ॥ साह्य नसतां अकर्ता भिकारी ॥ तैसें मन पंगु इंद्रियें साह्यकारी ॥ अतिव्यापारीं दक्ष होय ॥ १२ ॥ इंद्रियांविण होय निचेष्टीत ॥ सांडी व्यापार विकल्प संकल्पांत ॥ ह्मणोनि इंद्रियें नेमावीं हे मात॥ बोले अच्युत अर्जुनेसीं ॥ १३ ॥ संमतिगीता ॥ तस्मात्त्वमिंद्रियाण्यादौ॥नियम्यभरतर्षभ ॥ तस्माद्यस्यमहाबाहोनिगृहीतानिसर्वशः ॥ १२ ॥ टीका ॥ ऐशा इत्यादि संमति ॥ त्या येथें बोलाव्या किती ॥ इंद्रियनिरोधें कुंठितगती ॥ होय सर्वार्थी मनाची ॥ १४ ॥ येथें कोणी ऐसी करी भावना ॥ श्रीरामअवतारीं नसतां कृष्ण ॥ पूर्वीहि नसतां जाण ॥ संमति कोण अपूर्वासि हे ॥ १५ ॥ रघुनाथावरी कृष्णअवतार ॥ याचें बोलणें भविष्योत्तर॥तें येथें कैसें मत्यंतर ॥ हा नघडे विचार सर्वार्थी॥१६॥तरी ययाचा विचार ऐसा असे॥ पूर्वापार येथें कांहीं नसे ॥ अवतार येकामागें येकचि होतसे ॥ खंडना नसे कोणें समई ॥१७॥ श्रीरामाचें झालें अवतरण ॥ तत्पूर्वीहि होय श्रीकृष्ण ॥ जैसे वारामागें वार संपूर्ण ॥ नकळे खुण आद्यंताची ॥ १८ ॥ शनिवाराउपरि रविवार असे ॥ तंव मागेंही येक गेलाच असे ॥ यालागीं गेले अनादि ऐसे ॥ अवतार तैसे सर्वोत्तमाचे॥ ॥ १९ ॥ धर्मसंस्थापनाकारणें ॥ आदिपुरुषें अवतार धरणें ॥ अवतारें विश्वाचें पाळणें ॥ यालागीं नह्मणे ऐसें कांहीं ॥ ४२० ॥ आणिकही येक विचार ॥ सकळाहुनी वेद अनादितर ॥ तोही भविष्य बोले समयो

१ लंगडें. २ इंद्रियें स्वाधीन ठेवल्यानें.

त्तर ॥ कथासार जनकादिकांची ॥ २१ ॥ वरुण हरिश्चंद्रादिक समस्त ॥ भविष्यें चरित्र बोले महंत ॥ह्म-
णउनी दूषण नाहीं किंचित ॥ भविष्यार्थही ऐसा असे ॥२२॥ यालागीं इंद्रियनियमनें मनोव्यापार ॥ रा-
हिल्या उरे निर्विकार॥ हें सर्वही सिद्धांताचें सार ॥ नाहीं विचार अन्य कांहीं ॥ २३ ॥ ह्मणोनियां सर्वेंद्रि-
यांच्या वृत्ती ॥ विषयव्यापार सर्व टाकिती ॥ सर्वही मनाच्याठाईं वास्ति पावती ॥ स्थिरावती हृदयाका-
शीं ॥ २४॥ इंद्रियांचे स्थिरावलेपणें ॥ मनेंही सर्व व्यापार टाकणें ॥ सुषुप्ती नसतां अनुभवणें ॥ सुख भो-
गणें तुरीय जें कीं ॥ २५ ॥ निद्रेमाजी तरि सुख असे ॥ परी तें नेणिजे अज्ञानवशें॥ दोहींच्या संधीं सा-
वकाशें ॥ सुखें उल्हासे परमानंद ॥ २६ ॥ ते तरी आत्मसुखनिर्वेडी ॥ पारि गुरुखुणेंवीण नेणती बापुडीं॥
तरी तेचि अनुभऊनियां गोडी ॥ राहे परवडी स्थिरावोनी ॥ २७ ॥ निर्विकल्प दशेचें लक्षण ॥ तें तुज
सांगीतलें गा संपूर्ण ॥ आणि या दशेचें पावे जरी चिन्ह॥ तरी काय न्यून सांग येथें॥२८ ॥ येथें सुखा-
चि सुखसंपत्ती ॥ सुखभरें कांहींच नेणती ॥ येके उठविल्या भोजनाप्रती ॥ परी नुठती सुखभरें ॥ २९ ॥
त्या सुखासीं विक्षेप होतां ॥ विक्षेपकर्त्या करूं धांवे घाता ॥ येवढी सुखाचि सुखरूपता ॥ सांग तत्वतां
कोण सुख॥४३०॥ मैथुनादिक विषयसुख ॥ तें नावडे तयासीं देख ॥ तेथें इतर भोग अनेक॥ तेही सकळिक
काय इछी॥३१॥तेथें लय ह्मणावा तरी नाहिं सुषुप्ती ॥ विक्षेप तरी नभासे विश्वस्थिती ॥ मी येक द्रष्टा भो-

१ तत्व, गोडी. २ प्रकार, स्थिति. ३ विघ्न.

क्ता हे प्रतीति ॥ नस्फुरती त्या सुखावीण॥३२॥ आपणेसीं सुखरूप झाला॥ नेणे भोक्ता भोग्य भोगाला ॥ विश्वस्वप्नेसीं निःशेष मावळला॥नेणे मेळा इंद्रियांचा ॥३३॥ सर्वां वृत्तीच्या उपसंहारें॥ केवळ निरूपाधिक जें सुख उरे ॥ तेंचि आत्मसुख जाण निर्धारें॥ जेथें नुरे अवस्थात्रय ॥३४॥ जागृतीचेनि उपरमें ॥ सर्व विक्षेपमात्र विरमे॥निद्रा नसतां लयही शमे ॥ मध्यें निःशेष उरे तें ब्रह्म॥३५॥लय विक्षेप निःशेष नाहीं॥सुखानुभव तरी जागतां पाहीं ॥ तेंचि ब्रह्मस्थिती अनपाई ॥ हें अनुभउनी ठांई ठेविलें असे ॥ ३६ ॥ ह्मणोनि जागृतीच्या अंतीं ॥ आरंभ होतांचि सुषुप्ती ॥ जो भाव उपजे रघुपती ॥ तेचि स्थिती परमानंद ॥ ३७ ॥ तो लयविक्षेपाचेनि अभावें ॥ सहजेंचि ब्रह्मस्थिती स्वयें पावे ॥ तो सुखभाव तेंचि वस्तु जाणावें ॥ जेथें नेणवे जें कांहीं ॥ ३८ ॥ तोचि भाव भावितां साक्षात ॥ तोचि अनुभवितां सदोदित ॥ अक्षयानंद परमित ॥ भोगी सतत परमानंद ॥ ३९ ॥ जया सुखासीं काळत्रयीं ॥ अणुमात्र सर्वथा नाश नाहीं ॥ तोचि तो अक्षयानंद पाहीं ॥ भोगीं अनपाई श्रीवल्लभा ॥ ४४० ॥ अथवा सुषुप्तीच्या अंतीं ॥ जेव्हां वर्ते कां जागृती ॥ तेव्हां होतसे सुखप्राप्ती ॥ जाण रघुपती तें चैतन्य ॥ ४१ ॥ सुषुप्तीसिं लय पूर्ण असे ॥ नेणोनि परि सुखानुभव वसे ॥ तोचि सुषुप्ती सरतां मध्य दशे ॥ जागृती नसे पूर्ण जेथें ॥ ४२ ॥ लयापासोनि तरी उठिला ॥ विक्षेपावरी तरि नाहीं आला ॥ मध्येंच जे स्थितीनें राहिला ॥ तोचि भला परमानंद ॥ ४३ ॥ तेथुनि माघारेंही नवजा-

१ नाशानें. २ अविनाशी.

वें ॥ सुषुप्ती वरपडे नव्हावें ॥ पुढें जागृतीवरी नयावें ॥ विक्षेप पावे जेणेंकरुनी ॥ ४४ ॥ यालागीं मध्यस्थि-
तीच्या पोटीं ॥ देउनी धैर्येसिं मिठी ॥ तेथेंचि राहावें नेटीपाटीं ॥ सुखकोटी सुखानुभवें ॥ ४५ ॥ जागृती
सुषुप्तीच्या संधीं ॥ जें सुख उपजे गा निरवधी ॥ तेंचि साक्षात् केलिया गा सुबुद्धी ॥आनंदाब्धी प्राप्त स्वयें ॥
॥ ४६ ॥ साक्षात् ह्मणिजे तें ऐसें ॥ हें सुख सर्वांस तरी होतसे ॥ परी तें नेणती अज्ञानवशें ॥ परोक्ष ऐसें
झालें तया ॥ ४७ ॥ प्रत्यक्ष असोनि हें नेणिजे ॥ तेंचि अपरोक्ष ऐसें जाणिजे ॥ ह्मणोनि अपरोक्ष स-
र्वां सहजें ॥ जाणती व्याजें तेंचि सुख ॥ ४८॥ जैसा आपुले कंठीचा मणी ॥ नजाणे नादेखे नयनीं ॥
तेंचि परोक्ष जाण कोदंडपाणी ॥ सर्व जनीं अनुभविजे ॥ ४९ ॥ आपुला आपण जवळी असतां ॥ नवां-
चि गणना स्वयें करितां ॥ दहावा नगणी स्वयें असतां ॥ तेंचि परोक्षता जाण रामा ॥ ४५० ॥ तैसाचि
आत्मा सर्वांसीं प्रत्यक्ष असे ॥ अणुमात्रही व्यवधान नसे ॥ ते आपणचि असोनि नेणती पिसे ॥ परोक्ष
ऐसें याचें नाम ॥ ५१ ॥ तैसेंचि जागृतीच्या अंतीं ॥ आणि सुषुप्तीच्याआदिं जे सुखप्राप्ती ॥ ते साक्षात्
असोनि अपरोक्षगती ॥ नेणोनि करिती जग श्रम ॥ ५२॥ तेंचि सुख आत्मत्वें जाणोनी ॥ तैसेंचि राहि-
जे वोळखोनी ॥ तयासुखींच राहिजे बुडोनी ॥ साक्षात् जनीं त्यातें ह्मणिजे ॥ ५३ ॥ त्याचें नाम साक्षात्क
रणें ॥ अथवा ऐसें व्याख्यान जाणणें ॥ सुषुप्ती जागराच्या संधीं पावणें ॥ तो भावकरणें अनुभवारूढ॥५४॥

१ गुंतलेला. २ निश्चयरूप. ३ लक्ष.

तं भावं भावयेत् ऐसें ॥ मुळीं ग्रंथार्थ बोलिलें असे ॥ तया सुखाकार होणें सर्वांशें॥ साक्षात् ऐसें नाम तया॥ ॥ ५५ ॥ जो आपुलाचि स्वरूपानंद ॥ पावला होता परोक्षवाद ॥तोचि तदाकारें अक्षयानंद॥ स्वतःसिद्ध साक्षात तो॥५६॥तो भाव भावितांचि क्षणीं॥साक्षात अक्षयानंदाचा धनी॥भोगी भोक्तेपणेंवीण निर्वाणीं॥ जनीं वनीं तद्रूप तेंचि ॥ ५७ ॥ ऐसें स्वस्वरूपाचें जाणणें ॥ सांगीतलें प्रकारें येणें ॥ तद्रूप राहतां जे स्थिती बाणे ॥ तींहि लक्षणें सांगूं आतां ॥ ५८ ॥ आठ श्लोकीं स्वरूपवोळखी ॥ सांगीतली तुजप्रति निंकी ॥ तद्रूपें राहाणें स्थिती येकीं ॥ सांगो अलौकिकीं जें दुर्लभ ॥ ५९ ॥ तेही श्लोकद्वयेंकरुन आतां ॥ स्थिती सांगों गा रघुनाथा ॥ श्रवणमात्रेंचि स्थीरता चित्ता ॥ वरी तत्वतां अनायासें ॥ ४६० ॥ श्लोक ॥ जडतांवर्जयित्वैकांशिलायांहृदयंचयत् ॥ अमनस्कंमहाबाहोतन्मयोभवसर्वदा ॥ ८ ॥ प्रशांतसर्वसंकल्पायाशिलावदवस्थितिः ॥ जागृन्निद्राविनिर्मुक्तासास्वरूपस्थितिःपरा ॥ ९ ॥ टीका ॥ सर्व संकल्पाची जे शांती ॥ देहादि इंद्रियें आणि मती ॥ अहंकारप्रमुख अंतर्गती ॥ ते नभासती जियेठाईं ॥ ६१ ॥ आणि बाह्यही नाना पदार्थ॥ घटपटादिकूरूनि समस्त ॥ विश्वपरंपरा स्वर्ग मृत्य ॥ आणि समस्त व्यक्तिमात्र ॥ ६२ ॥ इत्यादिक नस्फुरे मनासीं ॥ तेंचि संकल्पशांति अतिशयेसीं॥निघोट अच्छिद्र शिळा जैसी ॥ चेष्टा तैसी गेली त्याची ॥ ६३ ॥ निचेष्ट आणि सहज यापरी ॥ पर्वत राहे जैसा अंतरीं ॥ संकल्पशून्यता शिळेचिया परी ॥ बाह्य अभ्यंतरीं

१ चांगली. २ स्वच्छ.

अतिशुद्ध ॥ ६४ ॥ येक घेणें येक नघेणें ॥ अथवा पदार्थाकारत्वें स्फुरणें॥हें निःशेष नाहीं जें जाणणें॥ निः-
संकल्प ह्मणणें या नाम ॥ ६५ ॥ पदार्थ यथार्थपणें स्फुरे ॥ तेथेंचि सांडि मांडिहि उरे ॥ तोचि संकल्प जा-
ण निर्धारें ॥ इत्यादि नस्फुरे तेंचि निर्विकल्प ॥ ६६ ॥ ऐसीया संकल्पाचिया हारी ॥ मावळती अनेका ल-
हरी ॥ मागुती नुपजति क्षणाभीतरि ॥ जाण सर्वांपरी निर्विकल्प ॥ ६७ ॥ ऐसी संकल्पाचि प्रशांती[1] ॥ रा-
हे शिळेचिये परी अवस्थिति ॥ येके ब्रह्मेवीण नाहिं स्फूर्ति ॥ जेथें लया पावती जागरनिद्रा ॥ ६८ ॥ सर्वेही
इंद्रियांच्या वृत्ती ॥ स्थूळ पदार्थ बाह्य घेती ॥ ययाचें नाम जाण जागृती ॥ विक्षेप ह्मणती ययातेंचि ॥६९॥
हा विक्षेप जेथें निःशेष सरे ॥ आणि लय सुषुप्तीं जेथें नुरे ॥ कषाय[3] दोष नव्हती निर्धारें ॥ तेंचि स्थान खरें
ब्रह्मस्थितीचें ॥ ४७० ॥ इंद्रियांच्या वृत्तिकरून ॥ नकरिजे स्थूळ सूक्ष्म पदार्थग्रहण ॥ सर्वांचा लय होय सं-
पूर्ण ॥ सुषुप्ति जाण ती नाव ॥७१॥ इंद्रियांचाही लय असतां॥ केवळमनासींच पदार्थाकारता ॥ वासनारू-
पें भासे यथार्थता ॥ तें स्वप्न रघुनाथा याचें नाम ॥७२॥ तरी निद्रा नास्वप्नजागृती ॥ सर्व संकल्पाची हो-
य शांती ॥तेचि ते शिळेचियेपरी अवस्थिती ॥ तेचि स्वरूपस्थिती पराकाष्ठा॥७३ ॥ सर्वेही स्थितीहूनि
श्रेष्ठ ॥ तेही स्वरूपस्थिती अतिवरिष्ठ ॥ इयेहुनी नाहिं उत्कृष्ट ॥ हेंचि स्पष्ट श्रेष्ठपणें ॥ ७४ ॥ तरी ब्रह्म हें ए-
वंभूत असे ॥ तें मागें निरोपिलें सावकाशें ॥ तथापि संमतिविशेषें ॥ जाण सर्वांशें सांगेन ॥ ७५ ॥ संमति-

१ पूर्णशांती. २ स्थिती. ३ मळिण.

वासिष्ठ ॥ श्लोक ॥ सर्वसंकल्पसंशांतौप्रशांतघनवासनं ॥ नकिंचिद्भवनाकारंतद्ब्रह्मपरमंविदुः ॥ १३ ॥ टीका॥
प्रशांत ह्मणिजे निःशेष जाण ॥ सर्व संकल्पाचें भस्म पूर्ण ॥ निबिंड वासनेचें संहरण॥ नव्हे भावन विप-
रीताचें ७६ ॥ विषयपदार्थाचें होय उपादान ॥ कारण तोचि संकल्प जाण ॥ संस्कारें होय पदार्थस्फुरण ॥
वासना पूर्ण तिये नांव ॥७७॥ येकेवेळे स्वयें घट देखिला ॥ तो मागुता घटाकारें स्फुरला॥ वासना ह्मणिजे
तयाला ॥ याचा मेळा तें घनपण ॥ ७८ ॥ दिंवा व्यापारें निशी निद्रा करी ॥ सुषुप्तीं उठे तदाकारी ॥ पूर्व
दिवसींचें स्फुरे अंतरीं ॥ व्यवहार व्यवहारीं तैसें भासे ॥ ७९ ॥ जैसें पूर्व दिवसीं देखिलें ॥ तें ज्ञान सुषुप्तिं
निमालें ॥ परि संस्कारें मनीं राहिलें ॥ तेंचि उद्भवलें अपर दिवशीं ॥४८०॥ तैसें ज्ञान अक्षणिक॥ पदार्थ स्फु
रती क्षणेक ॥ तें ज्ञान नासोनि आणिक ॥ पदार्थ अनेक स्फुरताती ॥ ८१ ॥ तरी तें ज्ञान नासलें असतां ॥
तद्रूपचि पदार्थ स्फुरे मागुता ॥ तयाचा संस्कार मनीं होता ॥ ह्मणोनि तत्वतां स्फुरे तैसाचि ॥ ८२ ॥ याचें
नांव जाण वासना ॥ यासीं मर्यादा नाहीं रघुनंदना ॥ ह्मणोनि घनपणाचिया अभिधाना॥आलें जाणा निंबिड-
पण ॥ ८३ ॥ ह्मणोनि निबिडा यया वासना ॥ निःशेष जेथें झालिया लीना ॥ आणि संकल्पविहीन रघुनं-
दना ॥ क्षीणपणा पावती जेथें ॥ ८४ ॥ मागुती संस्कारेंकरूनि ॥ विपरीत भावना नुपजे क्षणीं ॥ तेंचि परब्र-
ह्म जाण निर्वाणीं ॥ खुण मनीं दृढ धरीं ॥ ८५ ॥ येथें राहाणें जिये वृती ॥ तेचि दृढ जाण ब्रह्मस्थिती ॥ ते

---

१ घनदाट. २ दिवसास. ३ दुसरें. ४ घनपणा.

शिळेपरी निंघोट गती ॥ अचळ स्थिती अंतर्बाह्य ॥ ८६ ॥ अथवा दुसरें ऐसें व्याख्यान ॥ संकल्प तो एवंविध जाण ॥ स्वस्वरूपापासाव प्रथम स्फुरण ॥ अहंपणें पूर्ण ऐसा जो उठी ॥ ८७ ॥ अहं जीव देहीं ब्राह्मण ॥ग्रहस्थ वानप्रस्थ संन्यासी जाण ॥ अहंकार नाबधिर मुकेपण ॥ पंग्वादि पूर्ण जेथें भासे॥ ८८ ॥ हे ऐसे जे संकल्प उठती ॥ ते शांत जिये ठाईं राहती ॥ आणि विश्वभावनेचि नस्फुरे स्फूर्ति ॥ तेचि स्थिती निर्वाण पैं ॥ ॥ ८९ ॥ भावनेचें रूप तें ऐसें ॥ शुद्ध¹ ब्रह्माच्याठाईं विश्व भासे ॥ तेंचि यथार्थ मानी ऐसें ॥ भावना सर्वांशें हेचि जाण ॥ ४९० ॥ शुद्ध एकचि ब्रह्म असतां ॥ विश्वाकारें भावि तेंचि तत्वतां ॥ ते भावना उपजोंनेदीजे चित्ता ॥ तेचि तत्वतां ब्रह्मस्थिती ॥ ९१ ॥ शुद्ध स्वस्वरूपापासोनि ॥ संकल्प उठती जीवोहं ह्मणोनी ॥ तथें ते विपरीत भावना तत्क्षणीं ॥ घटपटपणीं उठताती ॥९२॥ येकाचि ब्रह्माच्याठाईं॥हे स्त्री हा पुरुष पाहीं ॥ अश्व गज रथ महिषी सर्वही ॥ व्यक्तिमात्र पाहीं भाविता॥९३॥हे विपरीतभावना झालियावरी॥ते उपादेयपणें ग्राह्य बुद्धि करी ॥ त्याची वासना सहस्त्रांतरीं ॥ ब्रह्मांडभरीं उठताती ॥९४॥ त्या येकयेकाचे कारणें ॥ येरयेरासीं होय उठणें ॥ संकल्प होतांचि विश्वपणें ॥स्वयें उठणें भावनेतें ॥९५॥ ते भावना दृढतर झालिया॥उठती वासनेच्या चळथिया॥ तेणेंचि प्रपंचगा रघुराया॥वाढे माया सर्वत्र जाणा ॥९६॥यालागीं संकल्पभावना॥वासना जेथें निःशेषहोति लीना ॥तेंचि ब्रह्म जाण रघुनंदना॥अन्य विचारणा येथें नाहीं॥९७॥ऐसीया ब्रह्माचियाठाईं ॥ तद्रूपचि राहणें अनपा

१ स्वच्छ. २ तृतीयआश्रम. ३ लहरी.

ई ॥ तरीच ब्रह्मस्थिती बाणे सर्वही॥ निघोट पाहीं शिळा जैसी ॥९८॥ ह्मणउनी ब्रह्मस्थिती ते ऐसी ॥ सर्व संकल्प जाती क्षयासीं ॥ जागृती निद्रा स्वप्नेंसिं॥ निश्चयेसीं मावळे जेथें॥९९॥ इयेचें नांव निर्विकल्पसमाधी॥ स्थितमाजि स्थिती ते निरवधी॥हे साधितां विघ्नसमृद्धि ॥ अतिबाधी साधकासीं॥५००॥ ते चतुर्विध विघ्नप्रकार ॥ वेदांतीं बोलिले सविस्तर ॥ तें सांगेन ऐकें सादर॥दोष हे थोर कळावया ॥१॥जयासीं हा दोष कळेल जरी मोठा ॥ तरी तो नवचे दोषाचिये वाटा ॥ यालागीं सांगणें लागे सुरश्रेष्ठा ॥ ऐक उत्कंठा दोषांची ॥ २ ॥ जयासीं मार्ग आडमार्ग ऐसें सुजे॥जो उत्तम अधम ऐसें बुझे॥तो आडमार्गीं नप्रवर्ते सहजें॥अधिष्टी निर्व्याजें सुमार्गेची॥३॥अन्न विष एकत्र केलिया॥नेणता तो सेवि नकळोनियां॥कळे तो पात्रावरूनियां॥उठोनियां पळेच कीं ॥ ४॥सर्प आणि हार दोन्ही ॥ नेणतां सर्पचि घे नेणोनी ॥ जाणतां अनर्थीं नप्रवर्ते कोण्हीं॥ नदेखिजे नयनीं सर्वत्र ॥ ५ ॥ ह्मणोनि दोष अदोष कळावया ॥हें सांगणें घडे गा रघुराया ॥अदोष ते व्यतिरिक्त यया ॥ जाण सावयवा कळतील ॥ ६ ॥ तेचि वेदांतवाक्यें आतां ॥ तुज सांगेन जानकीकांता ॥ तें ऐकें एकाग्र करूनियां चित्ता ॥ निर्विकल्पता पावसी जेणें ॥ ७ ॥ श्लोकवाक्यानि ॥ अस्यनिर्विकल्पस्यलयविक्षेपकषायरसस्वादलक्षणाश्चत्वारोविघ्नाःसंभवंति ॥ ४ ॥ टीका ॥ ये निर्विकल्प समाधीसीं ॥ येथें चारि विघ्नें परियेसीं ॥ लय विक्षेप कषाय रसस्वाद ऐसीं ॥ लक्षणें त्यासीं बोलिजेती ॥ ८ ॥ त्यामाजी प्रथम लयाचें लक्षण ॥

१ निर्मळ. २ जलद. ३ कळे. ४ शुद्ध, निष्कपट. ५ अवयवांसहित, सविस्तर. ६ दोष.

लय ह्मणिजे सुषुप्ति जाण ॥ तें सांगेन तुजलागुन ॥ सावधान परियेसी ॥ ९ ॥ वाक्यानि ॥ तत्रलयस्तावत् ॥ अखंडवस्त्वनवलंबनेनचित्तवृत्तेर्निद्रा ॥ ५ ॥ टीका ॥ आतां ते निद्रा ऐसी जाण रघुपती ॥ पूर्ण ब्रह्मीं लावितां चित्तवृत्ती ॥ धारणेनें विकल्प टाकिती॥मग विश्वस्थिती नस्फुरे॥५१० ॥ विपरीत देहादि विश्वाभास॥ निमाल्या व्हावा स्वरूपिं वास॥तैं चित्तमालिन्यें होय उदास॥उठी सावकाश तेथुनी॥११॥या चित्ताचा स्वभाव पाहे॥ अवलंबनेवीण कदां नराहे ॥ध्येयाश्रय सोडितांचि जाय ॥ लय पावताहे गाढमूढ ॥१२॥बाह्य प्रपंचाचें अनुसंधान गेलें ॥वस्तूचें अवलंबन तुटलें ॥ मग चित्तवृत्तीसिं उबंडलें ॥ लीन झालें अज्ञानासीं ॥ १३ ॥ अज्ञान बुडाल्या चित्तवृत्ती ॥ तेचि जाण गा मूढ सुषुप्ती ॥ हे समाधीच्या विघ्नाप्रति ॥ मूळ हे सुमति महाथोरी ॥ १४ ॥ येणेंचि-विघ्नें किती नाडिले ॥ ध्यानमिषें सुषुप्ती पावले ॥ तेही लौकिक दंभ संपादिले ॥ नाहीं पावले परमतत्व ॥१५॥ स्वस्थ बैसतांचि क्षणीं॥निद्रा बाधी तयालागुनी॥ते बुडोनि जाती अज्ञानीं॥सुख स्वप्नीं नदेखती ॥१६॥ पावतां आत्मास्थितीचा गांवो॥टाकिला दुर्धर मार्ग विपरीत भावो॥निद्रा घाला घाली पाहाहो ॥ आन ठाव जोडोनि दिधला॥१७॥शम दमादि मार्गे क्रमूनि आला॥क्रोधादि व्याघ्रसंग चुकवीला॥अखेरीं निद्रामैदें सांपडविला॥घाला घातला महामारकां॥१८॥प्रवेशतां ब्रह्मराज्यसिंहासनीं॥ प्रवेशकरितां समाधीद्वारस्थानीं॥निद्रामैंदी गाचिये धरुनी॥बोले नेटुनी आकळिला॥१९॥नेऊनि अज्ञानअरण्यांत॥वस्त्वलंबन देऊन भुलवीत॥मोहपाश गळां घालि

१ नाहींसेंझालें. २ शेवटीं.

त॥निःशेष मारित स्मृति घेउनी॥५२०॥ हें नातें ऐसें यया केलें ॥ स्वग्रामना पर ऐसें झालें ॥ सिद्धविषयें सुखही नेलें ॥ नेणें केलें सकळार्थीं ॥ २१ ॥ असो हें किती बोलावें ॥ स्वसुख नाविषयसुख तया पावे ॥ दोन्ही नेणोनियां राहावें ॥ तयातें जाणावें लय ऐसें ॥ २२ ॥ अगा अल्प अभ्यासेंकरून ॥आणि तमोगुणाचें निबिडपणं ॥ तेणेंचि लय होय संपूर्ण ॥ जाण खुण रघुपुंगवा ॥ २३ ॥ आतां विक्षेप तोही सांगेन ॥ ऐकें एकाग्र करूनि मन ॥ विक्षेप तो महादारुण ॥ घातक पूर्ण स्वरूपच्युतीं ॥ २४ ॥ वाक्यानि ॥ अखंडवस्त्वनवलंबनेनचित्तवृत्तेरन्यावलंबनंविक्षेपः ॥ ६ ॥ टीका ॥ आतां बैसतां अखंडैकब्रह्माकारें॥ चित्तातें वृत्तिरूप ज्ञान अवतरे ॥ ते वस्तु सांडून धांवे बाहेर ॥ प्रपंचाकारें जे वर्तत ॥२५॥ सांडुनी आत्मसुखाचि गोडी ॥ चित्तवृत्ति धांवे बाहेर सवडी ॥ खेटी विषयसुखाचिया बरडीं ॥ पाडी दरडी धारणेच्या ॥ २६ ॥ वातान्नाचोंचि करी चर्वण ॥ जैसें निंसुग पडकें श्वान ॥ दुःखें पावे जरी ताडण ॥ तरी उपशमन नव्हेची ॥ २७ ॥ विषय ते दुःखरूपचि असती ॥ अनुभव बाणे जरी चित्तीं ॥ तरी तो नसांडी गा सीतापति ॥ श्वानस्थिती आपुली ॥ २८ ॥ असो याचें नाम विक्षेप बोलिजे ॥ ब्रह्मसुखत्यागें प्रपंच अवलंबिजे ॥ हा महाथोर दोष जाणिजे ॥ संसारबीज हेंचि जाण ॥ २९ ॥ अवैराग्येंकरून ॥ विक्षेप होय महादारुण ॥ वैराग्य असतां नव्हे जाण ॥ हेंचि खुण येथींचि पैं ॥ ५३० ॥ आतां कषाय तो जाण ऐसा ॥ भ्रमें लोक ह्मणती समाधी ऐसा॥ समाधीच्या साम्यें पडे ठसा॥

१ घनपण. २ माळजमीन. ३ आळशी.

साधक पिसा गर्व वाहे ॥ ३१ ॥ त्या कषायासींच समाधी ह्मणती ॥ ऐसे साधक ठकले नेणो किती ॥ सांगो तयाचिही स्थिती ॥ परिस भूपती ब्रह्मांडाचिया ॥ ३२ ॥ वाक्यानि ॥ लयविक्षेपाभावेंपिचित्तवृत्तेः॥ रागादिवासनायास्तब्धीभावातअखंडवस्त्वनवलंबनंकषायः ॥ ७ ॥ टीका ॥ स्वस्वरूपाकार करितां चित्तवृत्ती ॥ साधक साधनपणें राहाती ॥ परि विषयाचेठाईं अतिप्रीति ॥ राहे चित्तीं संस्काररूपें ॥ ३३ ॥ त्या विषयरागेंकरून ॥ चित्तवृत्ति राहे स्तब्धोन ॥ लय विक्षेप नास्वरूपावस्थान ॥ मध्येंच जाण ताटस्थता ॥ ३४ ॥ स्वरूपसुख नाविक्षेप[1] करी ॥ नानिद्राही नये तेव्हां पुरी ॥ हें त्रय सांडूनि राहे अंतरीं ॥ स्मृति पुरी बुडाली ॥ ३५ ॥ वैराग्यबळें विक्षेप गेला ॥ अभ्यासबळें लयही बुडाला ॥ परि सूक्ष्म विषयराग मनीं स्थिरावला॥तेणें तुटला आत्मानुभव ॥ ३६॥ ऐसी मध्येंचि जे ताटस्थता॥ निचेष्टपणें कांहीं नेणतां॥ सूक्ष्मपणें विषयराग वर्तता॥ जाण निश्चित कषाय हा ॥ ३७ ॥ हें प्रज्ञामांद्येंकरून[2] ॥ स्वस्वरूप नप्रकाशे जाण ॥ अंतरीं विषयासक्ती दारुण॥ कषाय पूर्ण महाथोर ॥ ३८ ॥ आतां रसस्वाद कींलक्षण ॥ तेंही सांगों तुजलागुन ॥ हाही दोष महादारुण॥ निर्विकल्प पूर्ण होनेदी ॥ ३९ ॥ वाक्यानि ॥ अखंडवस्त्वनवलंबनेनचित्तवृत्तेः ॥ सविकल्पकानंदास्वादोरसास्वादः ॥ ८ ॥ टीका ॥ स्वस्वरूपाकार करितां चित्तवृत्ती ॥ अखंड वस्तुचें अवलंबन करिती ॥ सविकल्प आनंदातें भोगिती ॥ तयातें ह्मणती रसस्वादन ॥ ५४० ॥ आतां अखंड वस्तु ते कैसें ॥ आणि सखंड तेंही

१ निदिध्यासकाळीं अन्यथा भास भासून चित्त विक्षेप. २ मंदबुद्धीनें.

केसें असे ॥ सविकल्प कोणास ह्मणतसे ॥ तें सावकाशें सांगेन ॥ ४१ ॥ तरी जेथें ज्ञेय ज्ञान आणि ज्ञाता ॥ हे त्रिपुटी नस्फुरे गा रमाकांता ॥ आपणासहित येकात्मता ॥ भेद सर्वथा नस्फुरे जेथें ॥ ४२ ॥ जेथें आनंदाचेंचि घेणेंदेणें ॥ आनंद आनंदेंचि भोगणें ॥ भोक्ता भोग्य नुरे भोगणें ॥ ते वस्तु जाणणें अखंडत्व ॥ ॥ ४३ ॥ एवं अखंड वस्तुचेठाईं ॥ चित्तवृत्तिसीं अवलंबन नाहीं ॥ स्फुरे ज्ञेयत्वें ब्रह्म पाहीं ॥ अखंड येहीं लक्षणें होय ॥ ४४ ॥ सर्वत्र येका ब्रह्मावांचुनी ॥ दुजें अणुमात्र नसतां जनीं वनीं ॥ तेथें ज्ञाता ज्ञेय ज्ञान तिन्हीं ॥ विभागुनी देखतसे ॥ ४५ ॥ येकेचि अखंड वस्तुसीं ॥ त्रिखंड केलें गा परियेसीं ॥ आपण ज्ञाता तें ज्ञेय ऐसी ॥ प्रतीति मानसीं वर्ते जे कीं ॥ ४६ ॥ ह्मणोनि अखंडासींच खंड केलें ॥ अखंडाचें अनुसंधान तुटलें ॥ ज्ञातेपण सुख अनुभविलें ॥ जाण संचलें रसस्वादन ॥ ४७ ॥ आणि अखंड वस्तूच्याठाईं ॥ संकल्पमात्राचा उद्भव नाहीं ॥ ह्मणून ते दशा निर्विकल्प पाहीं ॥ येर ते पाहीं सविकल्प ॥ ४८ ॥ जेथें ज्ञाता ज्ञेय ज्ञान स्फुरे ॥ तो सूक्ष्म संकल्प जाण निर्धारें ॥ हे त्रिपुटी निःशेष जेथें विरे ॥ निर्विकल्प पुरें तेचि जाण ॥ ४९ ॥ ध्येयाचेनि अभिव्यक्तिपणें ॥ ध्यात्यासीं हर्षनिर्भर होणें ॥ तोचि रसस्वाद मी ह्मणे ॥ जाण ये खुणे विबुधपती ॥ ५५० ॥ अथवा समाधीचिये प्रारंभीं ॥ चित्तवृत्ती सुखातें अवलंबी ॥ तेंचि सुखस्वानंद चितनभीं ॥ ते पद्मनाभीं रसस्वादन ॥ ५१ ॥ हा निर्विकल्पासीं दोष थोर ॥ परी दोषत्रया ऐसा नव्हे अन-

१ अनुभवानें. २ भरित. ३ वाटपहाते.

❊ १०

र्थाकार ॥ हा आत्मसुखासीं नव्हे व्यभिचार ॥ कोमळ प्रकार ह्मणउनी न्यून ॥५२ ॥ त्रिपुटी स्फुरे ह्मणउनी अपक्कता ॥ निर्विकल्प समाधी घातकर्ता ॥ ह्मणोनि नको घेऊं तूं रघुनाथा ॥सांडि कथा ययाची॥५३॥इतर ज्या तिन्ही स्थिती ॥ त्या अनर्थाकारी फल्गुप्राय असती ॥ त्या निरर्थक जाण सर्वार्थी ॥ फळप्राप्ती कांहींच नाहीं ॥ ५४ ॥ यालागीं दोषचतुष्टयाविरहित ॥ जे निर्विकल्प समाधी निश्चित ॥ तेचि आत्मस्थिती गा निभ्रांत ॥ यथातथ्य जाण हरी ॥५५॥ बाडुल्यें नेणोनि इये स्थितीसिं ॥ दोषचतुष्टयांत विश्रांतीसिं ॥ पावती परि भवमोचनासीं ॥ नये कार्यासीं रघुराया ॥ ५६ ॥ रसस्वादन येकेपरी ॥ हा सावधानरूप गा अवधारी ॥ येणेंचि निर्विकल्प दशा पुरी ॥ काळेवरी होतसे ॥ ५७ ॥ अखंड ब्रह्मात्म्यैक्य ज्ञानेवीण ॥ सर्वथा अज्ञान नतुटे जाण ॥ अज्ञान असतां नाना साधन ॥ अप्रयोजन केलें जरी ॥ ५८ ॥ ह्मणून दोषचतुष्टय सांडुनी ॥ निर्विकल्प दशा आश्रउनी ॥ राहे रघुनाथा तूं निर्वाणीं ॥ मग जनीं वनीं तूंचि पैं ॥ ५९ ॥ अहो दोषचतुष्टयाविरहित ॥ राहे जे स्थिती निश्चित ॥ तेचि ब्रह्मस्थिती गा निंभ्रांत ॥ अतिउन्नत ब्रह्मानंदें ॥ ५६० ॥ तेचि पराकाष्ठा गा मंगळमूर्ती ॥ तियेहुनी नचढे ब्रह्मस्थिती ॥ शिळेचेपरी अचळ गती ॥ अखंड सर्वार्थी स्वप्रकाशें ॥ ६१ ॥ आतां ऐक गा रघुनाथा ॥ सांडावी शिळेचि काठिण्यता ॥ कठिण ते जड अप्रकाश सर्वथा ॥ त्यजून स्थीरता तैसी घेई ॥ ६२ ॥ तें जडत्व टाकुनी

१ पोकळ. २ अनेकत्व. ३ निःसंशय.

शिळेची ॥ तियेचि हृदयस्थिती स्थीरतेची ॥ निघोटपणें स्थिती वस्तूचि ॥ सर्व स्थितीचि जननीच हे ॥ ॥ ६३ ॥ इयेचि नाम अमनस्क बोलिजे ॥ इयेतेंचि उन्मनी ह्मणिजे ॥ सुलीनता ते हेंचि जाणिजे ॥ सर्वा उपरिजे वरिष्टपणें ॥ ६४ ॥ तन्मय होई महाबाहो ॥ हाचि सर्व साध्याचा रावो ॥ स्थितीमाजि स्थिती निर्वाहो ॥ स्थितीचा उपावो मुगुटमणी ॥६५ ॥ आजानुपर्यंत बाहुप्रमाण ॥ यासीं महाबाहो नाम ह्मणऊन ॥ तरी रघुनाथ चक्रवर्ती या भूषण ॥ होय निधान राजचिन्हाचें ॥६६॥ अभय वरदहस्त दोन्ही ॥ विराजताति परामुक्तिदानी ॥ क्रोधादि असुर निर्दाळुनीं ॥ अकर्तेपणीं शोभताती ॥६७ ॥ नाना निर्वाण स्थितीलागुन ॥ रघुनाथप्राप्तीचें मात्र कारण ॥ द्यावया करा करपण ॥ ह्मणोनि यालागुन महाबाहो ॥ ६८ ॥ श्रीगुरुनीं सांगीतली ब्रह्मस्थिती[१] ॥ ते जयाचिये नचढे हातीं ॥ तें क्षुल्लक हस्त ह्मणिजेति॥ स्थूळ सर्वार्थीं अप्राप्तपणें ॥ ६९ ॥ तैसा तो नोहे रघुरावो ॥ तोचि स्वयें ब्रह्मविद्येचा ठावो ॥ सांगतांचि झाला ब्रह्मभावो ॥ महाबाहो यालागीं ह्मणिजे ॥ ५७० ॥ तुवां तन्मयचि असावें ॥ अनर्थ दोष तयावरी नयावे ॥ संकल्प वासना भावनासवें[२] ॥ नलागावें रघुराया ॥ ७१ ॥ इये स्थितीनें सर्वदां असतां ॥ तरी तूंचि ब्रह्म गा रघुनाथा॥ विराली प्रपंचाची कथा ॥ येकचि तत्वतां जगीं तूंचि॥७२॥ श्लोक ॥ सत्यानंदचिदाकाशस्वरूपः परमेश्वरः॥ मद्राजनेषुमद्दिवसर्वत्रास्त्यपृथक्स्थितिः ॥ ११ ॥ टीका ॥ आतां षट्श्लोकेंकरून ॥ सांगिजेल आत्मा किं-

---

१ तुळतुळीतपणा. २ हेतुविरहित.

लक्षण ॥ तोचि तूं परिपूर्ण जाण ॥ आनंदघन परब्रह्म ॥ ७३ ॥ सत्ता आनंद आणि ज्ञान ॥ तदैक तूं चिद्घ-
न ॥ सर्वांचा नियंता जो आपण ॥ परिपूर्ण परमानंद ॥ ७४ ॥ तोचि तूं जाण श्रीरघुपती ॥ तोचि तूं विश्वा
त्मा विश्वमूर्ति ॥ तुजवांचोनियां त्रिजगतीं ॥ दुजी स्थिती असेचिना ॥ ७५ ॥ हे सर्वही विश्वपरंपरा ॥ ब्रह्म-
रूपचि जाण श्रीरघुवीरा ॥ जैसे घट शरावादि भांडपसारा ॥ सर्वत्रचि सैरां मृत्तिका जैसी ॥ ७६ ॥ अगा
या मृद्भाजनाच्याठाईं ॥ मृत्तिकेवांचुनी दुजें नाहीं ॥ नामरूप तें मिथ्या पाहीं ॥ शब्देवीण कांहीं वस्तु नसे
॥ ७७ ॥ नाना घटशरावादि रांजण ॥ नाहीं वास्तव्य मृत्तिकेवांचुन ॥ ऐसीच स्वयें श्रुति बोले आपण ॥
वाचारंभण नामविकार ॥ ७८ ॥ श्रुति ॥ वाचारंभणंविकारोनामधेयंमृत्तिकेत्येवसत्यं ॥ ६ ॥ टीका ॥ याला-
गीं नाम आणि विकार ॥ हा वाचेचाचि विस्तार ॥ मृत्तिकेवांचोनि वस्त्वंतर ॥ नाहीं साचार रघुपुंगवा ॥
॥ ७९ ॥ तैसा तोचि तो सर्वांपरी ॥ नाहीं पृथक् बाह्याभ्यंतरीं ॥ येकाचि येकुलता चराचरीं ॥ नाहीं दुस-
री मात तेथें ॥ ५८० ॥ तैसें हें जरा नामरूपात्मक असे ॥ नामरूप तें मिथ्या भासे ॥ तें वाचारंभणमा-
त्रचि असे ॥ ब्रह्म सर्वांशें सर्वत्र जें ॥ ८१ ॥ संमतिश्लोक ॥ अस्तिभातिप्रियंरूपंनामचेत्यंशपंचकं ॥
आद्यत्रयंब्रह्मरूपंजगद्रूपंततोद्वयं ॥ १४ ॥ निस्तत्वेनामरूपेद्वेजन्मनाशयुतेचते ॥ बुध्याब्रह्मणिवीक्षस्वसमुद्रे-
बुद्बुदादिवत ॥ १५ ॥ टीका ॥ सत्ता ज्ञान आणि सुख ॥ हें अंशत्रयें ब्रह्मचि येक ॥ विश्व तें नामरूपात्मक ॥

१ परळ. २ अफाट. ३ मातीचें भांडें. ४ वाणीनें बोलावयापुरता मात्र विषयः

श्रुति सम्यक् सर्वत्र बोले ॥ ८२ ॥ यालागीं नामरूपात्मक मिथ्या असे ॥ ब्रह्म तें सत्तासुखें स्वयं प्रकाशे ॥
ब्रह्मेवीण दुजे कांहींच नसे ॥ सर्वत्र वसे परिपूर्णत्वें ॥ ८३ ॥ श्लोक ॥ अपारावारविस्तारसंवित्सलिलवज्ज-
नैः ॥ चिदेकार्णवएवैकोस्वयमात्माविजृंभते ॥१२॥ टीका ॥ पारावार नाहिं जयासीं ॥ ऐसा ज्ञानसमुद्र चि-
दैकराशी ॥ विश्ववीचि शोभती ज्यासिं ॥ असे सर्वांशीं पूर्णत्वें ॥ ८४ ॥ विश्वलहरी चित्रेंकरून ॥ येक चि-
दाब्धी उल्हासे जाण ॥ नाहीं दुजें तयावांचुन ॥ अणुप्रमाण आदिकरुनी ॥ ८५ ॥ श्लोक ॥ भरिताशेषदिकुं-
भमनंताकाशनिर्भरं ॥ एकंवस्तुजगत्सर्वंचिन्मात्रंवारिचांबुधिः ॥ १३ ॥ टीका ॥ जैसें आकाश हें सर्वांपरी ॥
विस्तारिलें त्रैलोक्य बाह्याभ्यंतरीं ॥ तें रितें नाहीं तिळभरी ॥ सर्व विस्तारी सर्वपणें ॥ ८६ ॥ आकाशें भ-
रल्या दिशा विदिशा ॥ स्वर्ग मृत्यु पाताळासरिसा॥गिरी गव्हर कुंजविशेषा ॥ दाहाही दिशा परिपूर्ण॥८७॥
तैसें देश काळ वस्तुपरिछेद ॥ नाहीं काळत्रयीं जया बाध ॥ तेंचि तें अनंतपद निर्बाध ॥ जाण शुद्ध नभ
जैसें ॥ ८८ ॥ ऐसें सर्वही विश्वमात्र ॥ तें सकळही जाण चिन्मात्र ॥ वस्तुवीण नाहीं स्वतंत्र ॥ नाहीं सर्वत्र
जग नामें ॥८९॥ जैशा समुद्रिचिया लहरी ॥ तो समुद्रचि जैसा गा रावणारी ॥ नाहीं तेथें भेदपरी ॥ सब-
रांभरी तोचि पैं ॥ ५९० ॥ आकाश दृष्टांतेंकरून ॥ ब्रह्म तें निःसंग तैसें जाण ॥ ब्रह्म तें उपमाविहीन ॥ लौ-
किकें पूर्ण साम्य घडे ॥ ९१ ॥ श्लोक ॥ निरंशत्वादिभूताच्चतथानश्वरभावतः ॥ ब्रह्मण्योम्नोनभेदोस्तिचैतन्यं-

१ गुहा. २ निःसंशय. ३ बाह्यांतर.

ब्रह्मणोधिकं ॥ १४ ॥ टीका ॥ जो जो अंशमंत पदार्थ ॥ तो परिणामीं होय सतत ॥ जैसें अंशत्वें दुग्ध परिणमत ॥ तें दधि होत ज्यापरी ॥ ९२ ॥ पृथ्व्यादिकें अंशमंतें ॥ तितुकींहि परिणाम पावत ॥ तैसें आकाश नव्हे सर्वार्थें ॥ ह्मणोनि तयातें निरंश ह्मणती ॥ ९३ ॥ ऐसें परिपूर्ण सर्वांपरी ॥ कोंदलें बाह्याभ्यंतरीं ॥ परिछिन्न नव्हे कोणेपरी ॥ असे उजेरी विभुत्वाची ॥ ९४ ॥ आकाशेंवीण रिता ठावो ॥ कोणी नाहिं महाबाहो ॥ ह्मणउनी व्यापकत्वें निर्वाहो ॥ आन भावो येथें नाहीं ॥ ९५ ॥ तैसीच अनश्वरता तयासीं ॥ नाश न पावे कोणे अंशीं ॥ स्थीर सूक्ष्म असंग वेशीं ॥ जाण सर्वांसीं नांदत ॥ ९६ ॥ ऐसें ब्रह्म परिणामीं निरंश ॥ व्यापक अपरिछिन्न उदास ॥ नित्य अनश्वर सावकाश ॥ जैसें आकाश तैसें जाण ॥ ९७ ॥ दोहींचि समान समता ॥ नाहीं कोणें अंशीं न्यूनता ॥ परी येक चैतन्याचि रघुनाथा ॥ अधिक तत्वतां ब्रह्मासि पैं ॥ ९८ ॥ गगनाच्याठाईं जडपण ॥ आणि असे प्रकाशविहीन ॥ आत्मा स्वयंज्योति प्रकाशमान ॥ चिद्घन चिदानंद ॥ ९९ ॥ चैतन्यगुण्यें श्रीरघुनाथा ॥ ब्रह्माच्याठाईं हे अधिकता ॥ स्वप्रकाश जाणूनि तत्वतां ॥ स्वयें ब्रह्मता साधी आपुली ॥ ६०० ॥ आणिकही आत्मयाचें वोळखण ॥ तेंही सांगों ऐक चिन्ह ॥ तूं होयी तेचि जाणोन ॥ सुखसंपन्न तेणें होसी ॥ १ ॥ श्लोक ॥ निस्तरंगोतिगंभीरंसांद्रानंदसुधार्णवं ॥ माधुर्यैकरसाधारएकएवास्तिसर्वतः ॥ १५ ॥ टीका ॥ अतिनिबिडपणें निघोट ॥ सर्व आनंदाह्लानियां श्रेष्ठ ॥ तो सांद्रानंद अतिउद्भट ॥

१ परिणामपावत. २ दहीं. ३ उत्कर्ष. ४ निर्मळ. ५ आनंदभरित.

सर्वत्र प्रगट सर्वपणें ॥ २ षड्रसातें तिरस्कारून ॥ सर्व रसांचें रसपण ॥ तेंचि तें येकरस परिपूर्ण ॥ नाहीं भान नाना व्यक्ती ॥ ३ ॥ विषयरस ते नानाकार ॥ ब्रह्म तें येकरस निर्विकार ॥ सर्वी गोडियांचें गोडकर॥ अतिमधुर माधुर्याचें ॥ ४ ॥ शर्करेची माधुर्यता ॥ वाचा बोबडी पडे बोलतां ॥ वेगळी ननिवडे सर्वथा ॥ जाण तत्वतां माधुर्य ऐसें ॥ ५ ॥ सर्वत्र सदा सर्वपणें ॥ असे सर्वी सर्व एकपणें ॥ जें जें बोलिजे तें येथें उणें॥पूर्णा पूर्णपणें पूर्णचि वर्ते ॥ ६ ॥ मुका भक्षी जैसी शर्करा ॥ सांगतां नप्रवर्ते त्याची गिरा ॥ परि तो गोडीच जाणे भीतरा ॥ नये बहिरा बोलवरी ॥ ७ ॥ ब्रह्मरसगोडिये उपमा॥तेथें कोण रस पावेल सीमा॥ तैसी माधुर्यता निःसीमा ॥ मेघःशामा असे जाण ॥ ८ ॥ स्त्रीसंभोगरतीच्या अंतीं ॥ जे कीं होय सुखाचि प्राप्ती ॥ ते कोटिसुखें बोलिजेती ॥ तैसी ते स्थिती आनंदाची ॥ ९ ॥ ब्रह्मपदसुखाचि गोडि ॥ कीजे आनंदाचि कुरवंडी ॥ तैसी आनंदपरवडी ॥ पडे वेगडी बोलतां वाचे ॥ ६१० ॥ हें बहु काय बोलों रमाकांता ॥ ब्रह्मानंद चहूं वाचा नयेबोलतां ॥ हा अनुभवावा ब्रह्मवेत्ता ॥ जाण तत्वतां ज्याचा तेणेंचि ॥ ११ ॥ अगा जें जें विश्वाकारें भासे ॥ तें तें ब्रह्मचि येक उल्हासे॥ ब्रह्मावेगळें अणुमात्रही नसे॥ सर्वत्र असे तेंचि येक ॥ ॥१२॥ब्रह्मत्वें जाण एवंभूत॥आणिकही सांगों अद्भुत ॥ तें एकें एकाग्रचित्त॥स्वयें निश्चित होइजे तेंची॥१३॥ श्लोक ॥ समस्तंखल्विदंब्रह्मसर्वमात्मैवमाततं ॥ अहमन्यदिदंचान्यदित्यंखंडनखंडय॥ १६ ॥ टीका समस्त

१ वाणी. २ ओंवाळणी. ३ मुर्छा.

जितुकें विश्वजात ॥ तितुकें येकचि स्फुरत ॥ ब्रह्मेंवीण अणुमात्र किंचित ॥ नाहीं निश्चित जाण हरी ॥१४॥ हें आकारमात्र जें समस्त ॥ आत्मा येकचि जाण सतत ॥ सर्वत्र येकला येक व्याप्त ॥ सर्वी सर्वगत अनन्यपणें ॥ १५ ॥ ऐसें जें अखंड दंडायमान ॥ पूर्णानंदैक पूर्णघन ॥ तयातें खंडिती अज्ञानपण ॥ आपणा अन्य मानूनियां ॥ १६ ॥ मी अन्य तो मजहुनी अन्य ॥ तोही तेणेसिं असे भिन्न ॥ ऐसें अज्ञानी करिती खंडण॥ अहं अन्य ह्मणोनियां ॥ १७ ॥ जग तें मजहूनियां वेगळें ॥ मी तो जगाहूनियां निराळें ॥ ऐसें अखंडासीं अज्ञानबळें ॥ खंडिती सगळे येक वस्तू ॥ १८ ॥ ऐसें षट्श्लोकींकरून ॥ सांगीतलें आत्मयाचें लक्षण ॥ एवं जाणुनी आत्मा पूर्ण ॥ तद्रूप जाण राहिजे ॥ १९ ॥ श्लोक ॥ यदेवंब्रह्मणोरूपंततंबुद्धमखंडितं ॥ तदानिस्तीर्णसंसारपरमेश्वरतांगतः ॥ १७ ॥ जें कीं एवंरूप परब्रह्म ॥ सर्वत्र व्यापक परिपूर्ण सम ॥ अखंड सुखरूप निःसीम ॥ परा परम जाणसी जेव्हां ॥ ६२० ॥ ऐसें जाणितलीयाचिसाठीं ॥ तरी मग तूंचि ब्रह्म गा जगजेठी ॥ परमेश्वरता तेचि भेटी ॥ पडे तुटी संसाराची ॥ २१ ॥ जेव्हांचि पावसी गा ब्रह्मता ॥ तेव्हांचि संसाराची भस्मता ॥ निःशेष होई गा रघुनाथा ॥ नव्हे मागुता कल्पांतींहि ॥ २२ ॥ स्वस्वरूप ब्रह्माच्याठायीं ॥ अज्ञान तेथें निःशेष नाहीं ॥ तत्कार्य संसार तो कैचा कायी ॥ मग दुजे नाहीं आपणाविण ॥२३॥ श्लोक ॥ समस्तमेवब्रह्मेतिभावितेब्रह्मवैपुमान् ॥ पितमृतेमृतमयःकोनामनभवेदिति ॥ १८ ॥ टीका ॥ आणि समस्त हें

१ व्यापक. २ पूर्ण. ३ अमर्दी.

जगजाळ ॥ तो देखेचि जो ब्रह्म केवळ ॥ तो स्वयेंचि ब्रह्म हें काय नवल ॥ नित्य निष्कळ तोचि ब्रह्म ॥ ॥२४॥ संमतिश्लोक ॥ अनुभूतेरभावेपिब्रह्मास्मीत्येवचिंत्यतां ॥ अप्यसंप्राप्यतेध्यानान्नित्याप्तंब्रह्मकिंपुनः ॥ ॥ १६ ॥ टीका ॥ नाहो नसता देह भाविंतां ॥ पुरुष देहरूपचि होय तत्वतां ॥ जड कीटकीं जडातें ध्यातां ॥ भृंगी तत्वतां स्वयें होय ॥ २५ ॥ नातरीं प्रत्यक्ष अनुभूत ॥ स्वदेह भावितां देह होत ॥ तैसें स्वतःसिद्धचि ब्रह्म निश्चित ॥ विचार येथें कायसापां ॥ २६ ॥ आपण स्वतां ब्रह्मचि असे ॥ आणि सर्वत्र ब्रह्म देखे सर्वांशें ॥ तो ब्रह्म नव्हे येथें अनारिसें ॥ कैसें मानसें मानावें ॥२७॥ आणि सर्वत्र देखतां रघुपती ॥ तो पुरुष असे स्वयें ब्रह्ममूर्ति ॥ येथें नाहीं विपरीत मती ॥ जाण निश्चिती त्रिवाचा ॥२८॥ अगा अमृत प्राशन जो करी ॥ तो अमृतरूप नव्हे कवणेंपरी ॥ ऐसें कोठें त्रैलोक्यामाझारी ॥ अमृत मारी कवणातें ॥ २९ ॥ जेणें जैसी वस्तु सेविजे ॥ तेणें तत्काळ तद्रूपचि होइजे ॥ विषें विष होउनी मारिजे ॥ अमृत सहजें अमृतरूप ॥ ६३० ॥ यालागीं देहोहं ऐसी भावना जो करी ॥ तो देहरूपेंचि देहधारी ॥ आणि ब्रह्मभावि तो ब्रह्मरूप हरी ॥ जाण निर्धारी विवेकचंद्रा ॥३१॥ यालागीं जो ब्रह्मचि देखे समस्त ॥ तो स्वयें ब्रह्मचि गा निश्चित ॥ ह्मणोनि सर्वदां ब्रह्माकार चित्त ॥ करी सतत श्रीरामा ॥ ३२ ॥ श्लोक ॥ भव्योसीचेत्तदेतस्मात्सर्वमाप्नोषिनिश्चयात् ॥ नोचेद्ब्रह्मपिसंप्रोक्तंत्वयाभस्मनिहूयते ॥१९॥ टीका ॥ यालागीं सर्व ब्रह्म या अनुभवें ॥ रघुपती सर्वदां तुवां रा-

१ निर्गुण. २ कल्पितां.

हावें ॥ राहतां परमानंदचि फावे ॥ नाहीं स्वभावें दुजें तेथें ॥ ३३ ॥ जरी तूं भव्य आहेसि गा रघुनाथा ॥ ह्मणजे साधनचतुष्टयीं पुरता ॥ तरी सर्व ब्रह्म सर्वदां देखतां ॥ सीताकांता सर्व पावसी ॥ ३४ ॥ सर्व शब्दें ब्रह्मचि जाण ॥ तेंचि तूं गा होसी निर्वाण ॥ ब्रह्म स्वतःसिद्ध आहेसि पूर्ण॥ उपचारें जाण ह्मणणें असे ॥ ॥ ३५ ॥ साधनचतुष्टयाचें लक्षण ॥ तें सांग पूर्वींच केलें असे निरोपण ॥ तें पुनरुक्त बोलोन कार्य कोण ॥ तूं तंव संपन्न साधनें तिहीं ॥३६॥ साधनचतुष्टयेंकरून ॥ योग्य झाला आहेसि पूर्ण ॥ तरी सर्व ब्रह्म हे स्थिति संपूर्ण ॥ निश्चयें जाण पावसी ॥ ३७ ॥ पूर्ण ब्रह्मस्थिती पावावया ॥ साधनक्रम हाचि गा राया ॥ चित्तशुद्धी साधनेंकरूनियां ॥ होतसे राया त्रैलोक्यपती ॥ ३८ ॥ इतुकेंचि वर्म नसिजे जरी ॥ तरी तो उपाय करूं कां सहस्रवरी ॥ जैसा रक्षेमाजि होम करी ॥ व्यर्थ रावणारी सर्वस्वें ॥ ३९ ॥ यया साधनचतुष्टयाविरहित ॥ शुद्ध नसतां ज्याचें चित्त ॥ तेथें उपाय जे सहस्रांत ॥ अतिव्यर्थ निर्फळत्वें ॥ ६४० ॥ स्वयें दर्पण[1] जरी शुद्ध असे ॥ तरीच तेथें मुख प्रकाशे ॥ त्याचे पाठीसिं काय मुख प्रकाशे ॥ किंवा भासे रवि चंद्र तेथें ॥ ॥ ४१ ॥ ह्मणोनि ब्रह्मबोधासिं मुख्य कारण ॥ येक चित्तशुद्धी गा पैं जाण ॥ चित्तशुद्धी तेथें निश्चय जाण ॥ ब्रह्म पूर्ण प्राप्त स्वयें ॥ ४२ ॥ हें मागां तुज निरोपिलें सकळ ॥ श्लोकें शिष्यप्रज्ञेव केवळ ॥ यालागीं चित्त झालिया निर्मळ ॥ लाभे प्रांजळ[2] स्वात्मसुख ॥४३॥ नसतां अंतःकरणशुद्धी ॥ न साधनचतुष्टयासीं समृद्धी ॥





१ आरसा. २ सुगम, निर्मळ.

तेथें प्रयोजितां नाना बुद्धी ॥ वेदांतसिद्धी व्यर्थ होय ॥ ४४ ॥ गुरुसीं होय अगुरुत्व ॥ महावाक्यासीं ये अवाक्यत्व ॥ साधन तेवढें व्यर्थजात ॥ भस्मीभूत तैसें होय ॥ ४५ ॥ आतां व्यर्थचि क्लेशासीं दृष्टांत ॥ सांगेन तुज अपरिमित ॥ वाळु घाणा गाळित ॥ ते क्लेश प्राप्त तयापरी ॥४६॥ गगनाच्या नाकीं व्यसणी ॥ किं नरशृंगा कीजे चितारणी ॥ कां वांझ वृक्षासि घालिजे पाणी ॥ सौभाग्यमिरवणी कांतहीने ॥ ४७ ॥ मृदंगासीं पेंद्य दीजे ॥ खपुष्पीं वंध्यापुत्र शृंगारिजे॥ शशकविषाणाचें औषध कीजे ॥ रोग सहजे नासती तेणें ॥ ४८ ॥ जरी नाना साधनें केलीं ॥ तरी तीं कोणें उपयोगा आलीं॥ कूर्माचि रोमशुद्धी झाली ॥ काय फळली ब्रह्मविद्या ॥ ४९ ॥ सर्वांगीं नेत्र झाले मयूरासीं ॥ परी दोनी देखते नसलीया त्यासीं ॥ कोण उपयोग कोण कार्यासीं ॥ बहु नेत्रांसीं सांग पां ॥६५०॥ गगनासीं करितां पायरिया ॥ कोणीयेक प्रारंभीं स्वर्गा जावया ॥ तरी याग करितां रघुराया ॥ दीक्षिता यया स्वर्गवरी ॥ ५१ ॥ दधि नसतां भांडेंचि घुसळी ॥ बीज नसतां कृषीं वाहिली ॥ तैसी महावाक्यें जीं बोधिलीं॥ तीं व्यर्थ गेलीं चित्तशुद्धीविण ॥५२॥ कापुराची मँशि करूनियां ॥ धांव घे मेघ रंगावया ॥ गगनासी अरविंद तोडावया ॥ नाना उपाया कीजे तैसे॥ ॥५३॥ यालागीं गा मंगळमूर्त्ति ॥ तुज लाधली साधनसंपत्ति ॥ शुद्ध झाली असे चित्तवृत्ति ॥ तरी रमापती फावलें तुज ॥५४॥ चित्तशुद्धी पावलासि ज्ञान॥ यया बोला नाहीं आन ॥ आनंदमूर्त्ति तुझीच गा आण ॥ करी सा-

---

१ माणसाचें शिंग. २ ससाचें शिंग. ३ शेतकींत. ४ काजळ. ५ कमळ. * प्यावपास.

धन ब्रह्माभ्यास ॥५५॥ श्लोक ॥ अपिविज्ञानतत्त्वेनत्वयाभ्यस्यमिदंसदा ॥ ननाममात्राकतर्कफलमंबुप्रसादकं॥ ॥ २० ॥ टीका ॥ जरी असंदिग्ध झालें तुज ज्ञान ॥ निश्चयें जाणलें ब्रह्मपूर्ण ॥ तरी ब्रह्माभ्यासाचि कीजे जाण ॥ प्रपंचानुसंधान टाकोनियां ॥ ५६ ॥ अखंड निर्विकल्पता साधनीं ॥ ब्रह्मानुभवें राहे समाधानीं॥ तत्चिंतन तत कथनीं ॥ राहे प्रबोधोनि परस्परें ॥ ५७ ॥ संमतिवाक्यवृत्ती ॥ तच्चिंतनंतत्कथनमन्योन्यंतत्प्रबोधनं ॥ एतदेकपरत्वंचब्रह्माभ्यासंविदुर्बुधः ॥ १७ ॥ टीका ॥ तोचि ब्रह्माभ्यास कैसा असे ॥ तोही सांगों तुज विन्यासें ॥ तरी चित्त देउनी विश्वेशें ॥ सावकाशें परिसावें ॥५८॥ तरी येकाकीं असतां रघुपती॥ ब्रह्मस्थितीनें राहावें येकांतीं ॥ तोचि शिष्य आल्या आपणाप्रती ॥ कीजे सुमती ब्रह्मकथन ॥ ५९ ॥ समान भेटलिया प्रबोधना ॥ परस्परें करावें ब्रह्मनिरोपणा ॥ सर्वांही पदार्थत्रयाचें पूर्ण॥ येकत्वें खुण जाणावी ॥ ६६० ॥ जैसी शब्दमात्राचि प्रवृत्ती ॥ येक परब्रह्मींच पावे विश्रांती॥ तैसीच सर्व पदार्थजातीं ॥ एक ब्रह्मप्रतिति परतत्व ॥ ६१ ॥ हेंचि विचाराचें अवस्थान ॥ करूनि साधावें ब्रह्मसाधन ॥ अथवा वासनाक्षय मनोनाशन ॥ करावें जाण अभ्यास नाना ॥ ६२ ॥ हेंचि दृढ ब्रह्माभ्यासन ॥ स्वयें षड्गुणैश्वर्य भगवान॥ शामसुंदर कमळनयन ॥ स्वयें श्रीकृष्ण बोलिले ॥ ६३ ॥ अर्जुनाप्रति भगवद्गीता ॥ सांगताझाला जगत्पिता ॥ तेंचि ऐकें श्रीरघुनाथा ॥ अभ्यास पुरता परब्रह्माचा ॥ ६४ ॥ संमतिगीता॥ मच्चित्तामद्गतप्राणाबोध-

१ निःसंशय. २ सविस्तर.

यंतःपरस्परं ॥ कथयंतश्चमांनित्यंतुष्यंतिचरमंतिच ॥ १८ ॥ टीका ॥ स्वयें येकला असतां गा सुमती ॥ माझ्या स्वरूपिं घाली चित्तवृत्ती ॥ ते बाहेर नये विषयाप्रती ॥ तैसी स्थिती साधावी ॥६५ ॥ प्राणाचेनि परीस्पंदेंकरून ॥ जरी नराहेल स्थीर मन ॥ तरी तेथें करी प्राणसमर्पण ॥ मद्गत प्राण करूनि राहे ॥ ६६ ॥अथवा प्राणशब्दें इंद्रियें जाण ॥ माझ्या स्वरूपिं घाली नियमून ॥ समस्त करणें आणि मन ॥ मद्रूपिं समर्पण करी त्यांचें ॥ ६७ ॥ अर्जुना मन आणि हे प्राण ॥ माझ्या स्वरूपिं केलिया समर्पण ॥ तरी तो तद्रूपचि झाला जाण ॥ ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ६८ ॥ मग तया परमानंदाचिया गोडी ॥ कीजे विषयसुखाची कुरवंडी ॥ तेंचि ते अनुभविजे फुडी ॥ विश्वपरवडी नस्फुरे जेथें ॥ ६९ ॥ येकांत नसतां गा महामती ॥ आणि समान भेट जरी भाग्योन्नती ॥ तरी बोलावी मत्स्वरूपस्थिती ॥ परस्परें डुल्लती ब्रह्मानंदें ॥ ६७० ॥ परस्परें स्वरूप बोधितां ॥ आनंद नमाये दोहींच्या चित्ता ॥ तेणेंचि पावती सुलीनता॥ देहादि वार्ता विसरूनियां॥७१॥ परस्परें बोलतां दोघां जणां ॥ आनंद नमाये ब्रह्मांडभुवना ॥ ते मद्रूप होती कुरुनंदना ॥ काय वर्णना करूं त्यांची ॥ ७२ ॥ ते देहभावातें विसरले ॥ मग परस्परें बोल तेही राहिले ॥ मग ब्रह्मानंदींच बुडाले॥ नेणती वर्तले बाह्य कांहीं ॥७३॥ समान भेटतां महामती॥शिष्य आला जरी शुद्धमती ॥ तरी मत्स्वरूप कथन तयाप्रती ॥ अतिप्रीति करावें ॥ ७४ ॥ नेणे उभयतां समाधान ॥ मीच प्रगटे पूर्णानंदघन ॥ माझें स्व-

१ इंद्रियें. २ ओंवाळणी.

रूप बोलतांचिपूर्ण ॥ प्रगटे जाण पूर्णानंद॥७५॥ ऐसें चतुःप्रकारें ब्रह्माभ्यासन॥हेंचि निरंतर करितां जाण॥ परमानंदें डुल्लती पूर्ण ॥ नेणती अन्य मजवांचुनी ॥ ७६ ॥ तेणें परमानंदें डुल्लती॥ माझ्या स्वरूपींच रमती ॥ बाह्य दृश्यावरी कांहीं नयेती ॥ वर्तले देहीं नेणती कांहीं ॥ ७७ ॥ ऐसें निरंतर करिती ॥ निरंतर शब्दाचि ऐसी वित्पत्ती ॥ अंतर नाहीं जयाप्रती ॥ निरंतर स्थिती या नांव ॥ ७८ ॥ करितां ऐसा ब्रह्माभ्यास ॥ मध्यें असो नेदि जो अवकाश ॥ अन्य व्यापारीं येकही लेश ॥ मनीं विषयांश लागोंनेदी ॥ ७९ ॥ ऐसें तें निरंतर जाण ॥ करितां ब्रह्माभ्यास पूर्ण ॥ असंभावनादि दोष दारुण ॥ नासुनी ज्ञान शुद्ध मी देतों॥ ॥ ६८० ॥ जया ज्ञानातें पावोन ॥ आनंदामाजि होइजे निमग्न ॥ मग नुरे दोघां दोनीपण ॥ परिपूर्ण मज ऐक्य ॥ ८१ ॥ ऐसें स्वमुखें श्रीपती ॥ बोलताझाला अर्जुनाप्रती ॥ तोही श्लोकगीता संमती ॥ ऐक सुमती एकाग्र ॥ ८२ ॥ श्लोकगीता ॥ तेषांसततयुक्तानांभजतांप्रीतिपूर्वकं ॥ ददामिबुद्धियोगंतंयेनमामुपायांतिते॥ ॥ १९ ॥ टीका ॥ ऐसे प्रीतिपूर्वक निरंतर ॥ मातें भजती जे महाधीर ॥ ते मातेंचि पावती साचार ॥ नाहीं विचार अन्य येथें ॥८३॥ ययालागीं श्रीरघुपती ॥ तत्व जाणीतलें जरी विश्वमूर्ति ॥तरी अभ्यास करी या रिती ॥ सर्वदां चित्तीं हेंचि धरी ॥ ८४ ॥ जया अभ्यासावीण उपाय कोटी ॥ करितां होसी गाहिंपुंटी ॥ उदकीं नघालितां कतकपिटी ॥ नव्हे भेटी शुद्ध जळेसीं ॥ ८५ ॥ रजें डहुळे जें उदक ॥ त्या

१ विचार. २ त्रिपुटि. ३ ज्ञानी. ४ कष्टी.

माजी घालिजे जरी फल कतंक॥ तरीच शुद्ध जळ प्राप्त सम्यक ॥ येऱ्हवीं देख जैसें तैसें॥८६॥कतकावि-
रहित गा रघुराया ॥ कीजे जरी नाना उपाया ॥ तरी नपाविजे शुद्ध तया ॥ जाण राया त्रैलोकींच्या ॥
॥ ८७ ॥ तैसें ब्रह्माभ्यासावांचुन ॥ नाहीं ब्रह्मप्राप्तीसि कारण ॥ यालागीं नित्य कीजे अभ्यासन ॥
ब्रह्म पूर्ण जेणें प्राप्त ॥ ८८ ॥ तेणें अभ्यासेंकरून ॥ मीच ब्रह्म ऐसी बाणे खुण ॥ राहे ब्रह्मत्वें अ-
नुसंधान ॥ नित्य निमग्न परमानंदीं ॥ ८९ ॥ श्लोक ॥ अहमेवपरंब्रह्मवासुदेवाख्यमव्ययं॥इतस्यांन्निश्चया-
न्मुक्तोबद्धएवान्यथाभवेत् ॥ २१ ॥ टीका ॥ आतां पूर्ण बोध जाण तो कैसा ॥ तोही परियेसी वीर-
विलासा ॥ तरी मीच परब्रह्म गा ऐसा ॥ बाणे ठसा अवस्थात्रयीं ॥ ६९० ॥ जें कोठून व्यावर्त्तलें ना
हीं ना अनुगत ॥ ऐसें परिपूर्ण व्यापक अखंडित ॥ आकाशादि भूतांचें महद्भूत ॥ तेंचि सतत परब्र-
ह्म मी ॥ ९१ ॥ जयासीं वासुदेव नाम बोलती ॥ सर्व भूतें जेणें भासती ॥ जेथून भूतव्यक्ति उदया
पावती ॥ आणि निमग्न होती जिये ठायीं ॥ ९२ ॥ जेथें सर्व चराचराचें जन्मस्थान ॥ तेथें विश्व ऐसें
होय कल्पित भान ॥ तेंचि वासुदेव नामें परिपूर्ण ॥ नित्य निर्गुण चिन्मय ॥ ९३ ॥ आणि चराचर विश्वा-
च्या लयीं ॥ जं कीं अविनाश असे अक्षयीं ॥ व्यापकपणें नव्हे क्षयी ॥ अनपायी सर्वदां जें ॥९४॥ ऐसेंचि सर्व-
दां बोले श्रुती ॥ जे चराचराची माझ्याठायीं उत्पत्ति स्थिती ॥ आणि माझ्याठायीं होय समाप्ती ॥ अद्वय चिन्मू-

१ एकाजातिच्या वृक्षाचें बीं. २ व्यापक.

र्ति अखंड मी ॥९५॥ श्रुती ॥ मय्येवसकलंजातंमयिसर्वंप्रतिष्ठितं ॥ मयिसर्वंलयंयांतीतद्ब्रह्माद्वयमस्म्यहं॥९॥ टीका ॥ ऐसा निश्चय होतांचि क्षणीं ॥ तेंचि मुक्ती वरी तयालागुनी ॥ स्वयें ब्रह्म बाणतां स्वसुखधनी ॥ मुक्त त्रिभुवनीं तोचि येक ॥ ९६ ॥ ऐसा बोध जयासीं नाहीं ॥ तरी तयासीं तोचि बंध पाहीं ॥ मी इंद्रियसमुदाय देहीं ॥ जीवत्वें पाहीं बोध जया ॥ ९७ ॥ अगा ब्रह्मभाव नसतां पोटीं ॥ देहपणें जया संकल्प उठी॥ मी जीव ऐसें गा जगजेठी ॥ भावना खोटी जरी वाटे ॥ ९८ ॥ तरी तेंचि जाण गा बंधन ॥ अतिदृढ कळासे संदेहत्वें जाण॥मग करितां नाना साधन ॥ नव्हे मोचन सद्गुरुवांचूनियां ॥ ९९ ॥ आतां तेंचि परब्रह्म तें कैसें ॥ तें कोण उपायें जाणिजेत असे ॥आणि प्रत्यक्ष देहादि दृश्य भासे ॥ तें कैसें निरसे प्राप्ति कैसी॥ ॥ ७०० ॥ विश्व भासतां प्रत्यक्ष दृष्टी ॥ सांपडलादिसे देहसंपुटीं॥ऐसें असोनि ब्रह्मेंसि भेटी ॥ कोणे गोष्टी होतसे ॥ १ ॥ तरी तें सांगो गा रघुनाथा ॥ एकें येकाग्र करूनि चित्ता ॥ जेणें आत्मानुभव पुरता ॥ बाणे तत्वतां श्रीरामा ॥ २ ॥ श्लोक ॥ नेतिनेतीतिनेतीतिशेषितंतत्परंपदं ॥ निराकर्तुमशक्यत्वात्तदस्मीतिसुखीभव ॥२२॥ टीका ॥ नेति नेति ह्मणोनि श्रुती ॥ दृश्यमात्राचा निषेध करिती ॥ श्रुत दृष्ट विश्व जें रघुपती॥ ते ते व्यक्ती ब्रह्म नव्हे ॥ ३ ॥ जें जितुकें आकारा आलें ॥ तें उत्पत्ति विनाशा पावलें ॥ तें तितुकेंही नेश्वर भलें ॥ असे संचलें कल्पित ॥ ४ ॥ दृश्य तें ब्रह्म नव्हे ऐसें ॥ श्रुती स्वयें बोलतअसे ॥ स्थूळ लिंग देह ही

१ सुटका. २ देहरूपी करंड्यांत.

तैसें ॥ नश्वर असे जाण रामा ॥५॥ षोडश कळा लिंगदेहीं ॥एक सतरा ह्मणती पाहीं ॥ तो तंव आत्मा नव्हे कांहीं ॥ देह क्षयी परिणामवंत ॥ ६ ॥ सोळा कळा लिंगदेहीं भेद ॥ तेही तुज सांगों गा विषद ॥ तरी इंद्रियें जाण दशविध ॥ एक भेद तयांचे ही ॥ ७ ॥ चक्षु श्रोत्र आणि स्पर्शन ॥ चौथें रसना पांचवें घ्राण ॥ हें ज्ञानेंद्रियपंचक जाण ॥ सांगेन ऐकें कर्मपंचक ॥ ८ ॥ तरी कर चरण वाचा गुदोपस्थ ॥ हें कर्मेंद्रियपंचक निश्चित ॥ ऐसें दशेंद्रिय इत्थंभूत ॥ प्राणवृत्त तें ऐक ॥ ९ ॥ प्राणापान व्यानोदान समान॥ आणि सोळावें तें मन ॥ ऐसें षोडश कळाचें हें पूर्ण ॥ लिंगदेह जाण रघुराजा॥७१०॥ सतरावी बुद्धि ही गणितां॥ तरी सतरा कळा होती जानकीकांता ॥ हें येकेक निरसितां ॥ विस्तार ग्रंथा होतसे ॥११ ॥ ह्मणोनि एकाचि दृष्टांतेंकरूनि ॥ स्थूळ लिंगदेह निरसुनी ॥ तें परिसे मन एकाग्र करुनी ॥ शूरशिरोमणी अयोध्यानाथा ॥ १२ ॥ पंचमहाभूतांचा समुदावो ॥ त्याचें नाम बोलिजे स्थूळ लिंगदेहो ॥ तैसेंचि नैश्वर जाण निःसंदेहो ॥ ब्रह्म स्वयमेव देह नव्हे ॥ १३ ॥ एवं स्थूळ लिंग दोन्ही शरीरें ॥ तें नश्वर दृश्यपणेंचि निर्धारें ॥ हें ब्रह्म नव्हे गा साचोकारें ॥ तें जाण खरें साक्षिभूत ॥ १४ ॥ जो जयाचा होय द्रष्टा ॥ तो तें दृश्याचि केंवि होय सुभटा ॥ ह्मणोनि येक नकरी दृश्य द्रष्टा ॥ भिन्न द्रष्टा द्रष्टेपणें ॥ १५ ॥ ऐसें नेतिमुखें दृश्यजात ॥ निरसिजेति दृश्य पदार्थ ॥ जे जे उत्पत्ति क्षय असे पावत ॥ ते जाण निश्चित मिथ्याभाव ॥ १६ ॥ या

१ स्पष्ट. २ वीरा.

स्थूळ सूक्ष्माचे साक्षिभूत ॥ सर्व निषेधें जें उर्वरीत ॥ स्वप्रकाशें जें प्रकाशित ॥ तेंचि निश्चित परमपद ॥
॥ १७ ॥ श्रुती ॥ अस्थूलंअनणुअऱ्हस्वंअदीर्घंअचक्षुअश्रोत्रंअपाणिपादंइत्यादि ॥ १० ॥ टीका ॥ जें सर्वांचें
अधिष्ठान ॥ जेथें सकार्य भासे अज्ञान ॥ जेथें भासे विश्वस्वप्न ॥ होय लीन मागुतें जेथें ॥ १८ ॥ अहो ज्या-
च्या अज्ञानें विश्व भासे ॥ ज्याच्या ज्ञानमात्रेंचि सर्वही नासे ॥ तया अविनाशातें जाण ऐसें ॥ जें ननासे
निषेधितां ही ॥ १९ ॥ संकल्पची निराकरणें ॥ उरे जें सर्वांचे साक्षिपणें ॥जयासीं निराकरण करवेना श्रुती-
नें ॥ नेणती करणें तेंचि ब्रह्म ॥ ७२० ॥ नेति नेति ऐसें ह्मणतां श्रुती ॥ जेथें मौन धरूनियां राहाती ॥ तेंचि
ब्रह्म गा ब्रह्ममूर्ति ॥ नभासे व्यक्ति जिये ठायीं ॥ २१ ॥ सर्वां दृश्याचें निरासपण ॥ जेथें विचाराचें पुरेपण॥
मनोवृत्तीचें बळाचें मालवण ॥ तेंचि जाणणें परब्रह्माचें ॥ २२ ॥ देहादिकांचे निराशेंकरून ॥ अवशेषित जें
प्रकाशमान ॥ तेंचि परब्रह्म ऐसें जाण ॥ नाहीं आन रमाकांता ॥ २३ ॥ यदर्थीं भगवान सुरेश्वर ॥ बृहदार-
ण्य श्रुतिसीं थोर ॥ विस्तारें केला आत्मविचार ॥ तोचि येकाग्र परियेसी ॥ २४ ॥ संमतिवार्तिक ॥ अध्या-
त्मादिपदार्थेभ्योविरक्तंस्वात्मनिस्थितं ॥ तन्नपश्यंत्यहोकष्टंदौर्भाग्यंदुष्टचेतसां ॥ २० ॥ टीका ॥ अध्यात्म
आधिदैव आधिभूत ॥ देहादि प्रपंच समस्त ॥ तैसेचि अंतरींचे पदार्थ ॥ जाण निश्चित अध्यात्मादिक ॥
॥ २५ ॥ यया समस्ताहुनी वेगळें ॥ दृश्यमात्राहुनी निराळें ॥ तेंचि आत्मरूप जें निर्मळ ॥ वर्ते सोज्वळ स्व-

१ राहिलें. २ निरास. ३ इंद्रियें. ४ अतिनिर्मळ.

परिसावें सांगेन ॥ अतिउत्तम जाण [illegible]तां ॥ ५ ॥ जैसे सर्व अवयवांमाजि येक ॥ आपुलिया शोभा शोभे नासिक ॥ तैसें उत्तम क्षेत्रामाजि नासिक ॥ उत्तम देख उत्तमाचें जें ॥ ६ ॥ सर्व अवयव अतिसुंदर ॥ सकोमळ सुभग शरीर ॥ त्याहीवरी लेइले अळंकार ॥ शोभा प्रचुर अनुपम्य ॥ ७ ॥ तेथें येक नासिकचि नसतां ॥ सर्वांहि सुंदरता जाय वृथा ॥ तैसें येक नासिकेवीण समस्तां ॥ काश्यादि तीर्थां शोभा कैंची ॥ ८ ॥ ह्मणून सर्व क्षेत्रांचे अळंकार ॥ तेंचि नासिकनाम महाक्षेत्र ॥ तें चतुर्युगाचें नगर ॥ दक्षिणतीर गोदावरीचें॥ ९ ॥श्लोक॥ कृतेतुपद्मनगरंत्रेतायांचत्रिकंटकं॥द्वापारेतुजनस्थानेकलौनासिकमुच्यते॥३५॥टीका॥ ऐसें हें चतुर्युगाचें नगर॥ पवित्र आणि महाक्षेत्र ॥ यावरी श्रीमद्गोदावरीतीर ॥ ब्रह्मरूप नीर जयेचें जें ॥ १२१० ॥ क्षेत्रस्वामी श्रीसुंदर नारायण ॥ जेथें विरंचीचें झालें कपाळमोक्षण ॥ ह्मणोनि कपालेश्वर नामें श्रीभवजाण ॥ ब्रह्मनिर्गुण शंकरवेषें ॥ ११ ॥ हा देखोनि देवसमाज॥अणि क्षेत्रामाजि क्षेत्रराज॥ तीर्थांमाजी गंगाविराज ॥ ह्मणोनि श्रीरघुराज आले स्वयें ॥ १२ ॥ पंचवटिकेसिं करूनि वस्ती ॥ असतां सीता लक्ष्मणेसि विश्वमूर्त्ती॥ करूनि सर्व राक्षसांचि शांती ॥ येथें विश्रांती निजानंदें ॥ १३ ॥ अरुणासंगमा तिरीं॥ पूर्वाभिमुख सरस्वती संगम करी ॥ स्मरणमात्रें ब्रह्महत्या निवारी ॥ स्नानें करी भवरोगावेगळें ॥ १४ ॥ ऐसा या क्षेत्राचा महिमा ॥ बोलोंनशके स्वयें ब्रह्मा ॥ तेथें समाप्ति पावावया ग्रंथोत्तमा ॥ जेथें श्रीरामा वस्ति नित्य ॥१५॥क्षेत्रीं श्रीरामाचें अधिष्ठान ॥ ग्रंथीं श्रीरघुनाथ पूर्ण ॥ एवं नाहीं श्रीरामावांचुन॥सर्वत्र संपूर्ण श्रीरघुनाथ ॥१६॥

श्रोता वक्ता श्रीरघुनाथ ॥ श्रीरघुनाथचि ग्रंथ ग्रंथार्थ ॥ क्षेत्र क्षेत्रज्ञ श्रीरघुनाथ ॥ परिपूर्णार्थ श्रीरघुनाथ ॥१७॥ आजन्ममरणास्तववरी ॥ निवास केलिया काशीपूरी॥ जें फळ होतसे मुक्तिवरी ॥ तेंचि क्षणार्धें करी पंचवटीसिं ॥ १८ ॥ अर्धमामाण परीमाण ॥ केलिया पंचवटींसि निवासन ॥ काशीवासाचें फळ पूर्ण ॥ पावो निर्वाण निश्चयेसीं ॥ १९ ॥ संमति ॥ आजन्ममरणाभ्यासाद्वाराणस्यांनिवासिनां ॥ तत्फलंअर्धयामेनपंचवट्यांतुराघव ॥ ३३ ॥ जन्मांतरसहस्त्रेषुकाशीवासस्ययत्फलं ॥ तत्फलंअर्धयामेनपंचवट्यांतुराघव॥३४ ॥ गोदायास्तीरमाश्रित्ययस्तुप्राणान्विमुंचति ॥ व्याचष्टेतारकंब्रह्मसाक्षाद्देवोमहेश्वरः ॥ ३५ ॥ टीका ॥ ह्मणोनि श्रीरघुनाथ आपण ॥ पंचवटिके करी निवासन ॥ तया क्षेत्राचा माहिमा वदेल कोण ॥ ब्रह्मनिर्वाण नांदे तेथें ॥१२२०॥ तें क्षेत्रचि ब्रह्मरूप जाण ॥ हें मागां केलें निर्वचन ॥ ग्रंथग्रंथाचें व्याख्यान ॥ ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ १२२१ ॥ ॥ इतिदशमप्रकरणंसमाप्तं ॥ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥ ॥ संख्याओंवी ॥ १२२१ ॥ श्लोक ॥ ३५ ॥ संमति ॥ ३५ ॥ श्रुति ॥ ११ ॥ एवं ओवी संख्या ६८०० एवं ग्रंथसंख्या ॥१००००॥ ॥ ॥ ॥

॥ इति श्रीयोगवासिष्ठसारे दशम निर्वाणप्रकरणंसमाप्तं ॥

प्र मानिती ॥ परी सकळ अविद्याख्य हे स्थिती ॥ प्रबळ होती स्वविस्मरणें ॥ ७७ ॥ अगा जों जों आपणातें विसरिजे ॥ तों तों देहादिकीं सबळ होइजे ॥ हेचि खुण सर्वत्र जाणिजे ॥ जाणे तो बुझे येरु नेणे ॥ ७८ ॥ य-यालागीं गा त्रैलोक्यनाथा ॥ अविद्येक टाकावें गा सर्वथा ॥ आपुली साधुनी ब्रह्मता ॥ राहीं आतां ब्रह्मानंदें ॥ ॥ ७९ ॥ श्लोक ॥ सर्वंब्रह्मेतियस्यांतर्भावनासाविमुक्तिदा ॥ भेदबुद्धिरविद्येयंसर्वथातांपरित्यज ॥१५॥ टीका॥ अगा जयाची अंतर्भावना ॥ सर्वही ब्रह्म जाण रघुनंदना॥तेचि मुक्तिदाते तुह्मी जाणा ॥ आन भावना बंधरूप ॥३८०॥ देहादि इंद्रियांसहित ॥ जें जें दृश्य प्रपंचजात ॥ तें सर्वही ब्रह्म सदोदित ॥ जाण निश्चित अंतर्बाह्य ॥ ॥ ८१ ॥ आणि ब्रह्मावेगळें किंचित ॥ सर्वथा नेणे वस्तुजात ॥ दुजेपणें जें भासत ॥ जाणे व्यर्थ मृगजळ ॥८२॥ ऐसिया निश्चयें अंतर्भावना ॥ सर्वदा जयाची गा रघुनंदना ॥ तेचि मुक्तीसि कारणा ॥ नाहीं आन रघुवर्या ॥ ॥ ८३ ॥ आणि जे किं भेदबुद्धी ॥ नानात्व देखे त्रिशुद्धी ॥ तेचि अविद्या जाण सुबुद्धी ॥ मुख्य कुबुद्धी ज-नांसि होय ॥८४॥ हेचि संसारासीं दायक ॥ निरर्थक पातक करी हे सम्यक ॥ ह्मणोनि त्यजावी सकळिक ॥ कांहीं शेष उरोंनेदी ॥ ८५ ॥ ययालागीं सर्वदां रघुपती ॥ हे भेदभावना त्यजावी सर्वार्थीं ॥ जे आकल्पांत देतसे संसृती ॥ निंद्य भूपती सर्वथा हे ॥ ८६ ॥ हेचि प्रत्यक्ष अविद्या जाण ॥ जे कीं भेदबुद्धी नानात्व दर्शन॥ हेचि जाणपां मुख्य भवबंधन॥निरयपतन हेंचि असे ॥ ८७॥ह्मणोनि इयेचा त्यागु कीजे ॥ सर्वत्र ब्रह्माध्यासीं-

१ अज्ञानात्मक. २ समजे. ३ मायिक. ४ जन्ममरण. ५ नरक.

च असिजे ॥ सर्व ब्रह्मेति बोधव्याजे ॥ आनंद भुंजे सर्वदां ॥ ८८ ॥ ज्यासीं सर्व ब्रह्म प्रत्यया आलें ॥ स्वयें ब्रह्मत्वचि जया बाणलें ॥ तयासींच जगीं पाहिलें ॥ धन्य ऐसें बोले तयासी मी ॥ ८९ ॥ ह्मणोनि रघुनाथा ऐसें करी ॥ सर्वदां ब्रह्मभावना अंतरीं ॥ सर्वत्र असोंदे रावणारी ॥ तेणें शरीरिं नव्हेसि तूं ॥ ३९० ॥ हेंचि सजातीय प्रवाहिकरण ॥ याचें नाम बोलिजे निदिध्यासन ॥ येणेंचि तुटे विपरीतभावन ॥ होय अवसान परब्रह्मीं ॥ ॥ ९१ ॥ आणीक ब्रह्मावेगळी जे कल्पना ॥ जियेतें भेदबुद्धी ह्मणिजे सज्ञाना ॥ ह्मणिं ते उपजोंदेसी मना ॥ विपरीतभावना हेचि होय ॥ ९२ ॥ इयेतें सांडोनि सर्वदां पाहीं ॥ ब्रह्मात्मबोधें सर्वदां राहीं ॥ नको चिंतूं आन कांहीं ॥ मग देहीं विदेही तुंचि ब्रह्म ॥ ९३ ॥ ऐसें सांगतां वसिष्ठऋषी ॥ श्रीराम आनंदले मानसीं ॥ पुढें कथा झाली कैसी ॥ सांगेश्रोतयांसीं कृष्णदासू ॥९४॥ बोधरंगें रंगोनि श्रीगुरुचरणीं ॥ रंगें रूळतां अनुदिनीं ॥ रंगनाथु नामाभिधानीं ॥ पावे चरणीं सद्गुरुच्या ॥९५॥ ह्मणोनिश्रीगुरुचा केला॥ रंगनाथ ऐसें नाम पावला ॥ श्रीमत्कृष्णानंद बोधविला ॥ तेणें बोलिला ग्रंथवाचा ॥९६॥तेणें प्रकरण हें संपलें ॥ जें कीं शुद्ध निरूपण केलें॥ एकोनियां संत निवाले ॥ ह्मणती बोले पुढांग्रंथू ॥ ९७ ॥ माझी विनंती श्रोतयांप्रती ॥ जे प्रीति धरूनि इये ग्रंथीं ॥ श्रवण मनन पुढतोपुढतीं ॥ याचेंचि सर्वार्थी करावें ॥ ९८ ॥ इतुकेनीच कृतकृत्यता ॥ स्वभावें वरीतसे चित्ता ॥ नकरोनि इतरा उपायार्था ॥ स्वयें ब्रह्मता ब्रह्मपणें ॥९९॥नाहो थोडेनि बहुताचिप्राप्ति ॥ तरीबहुत

१ बोधरूपानें. २ भोगतात. ३ शेवट. ४ विराजतां.

क्लेश कासया करिजेती ॥ गृहींचेचि तरु कल्पवृक्ष होती॥ तरी का इच्छिती स्वर्गींचे ते ॥४००॥ अहो लोकांचि हेंचि विपरीतता ॥ अल्पचि कार्य सिद्धी असतां ॥ तरी कां कठीण मानुनियां चित्ता॥ नाना अर्था कां प्रवर्तती ॥१॥ऐस तें अभाग्य सर्वांपरी॥तयासीं आत्मप्राप्ती दुरीचा दुरी ॥ ते निमज्जति संसारसागरीं ॥ भवभय भारी सर्वत्र ॥ २ ॥ असो तयाचें किती बोलावें ॥ संत ते तरताति स्वभावें ॥ या ग्रंथाचेनि अनुभवें ॥ सर्वी रहावें हेंचि सार ॥ ३ ॥ अहो या ग्रंथाचेनि श्रवणें ॥ ब्रह्मज्ञान घेतसे धरणें ॥ सिद्धचि ब्रह्मत्व पावणें ॥ पावाल खुणें आपुलिये ॥ ४०४ ॥ इति श्रीयोगवासिष्ठसारेश्रीवसिष्ठरामसंवादेशुद्धनिरूपणंनामषष्ठप्रकरणंसमाप्तं ॥ ६ ॥ मूळ ॥ १५ ॥ टीका ॥ ४०४ ॥ संमति ॥ २ ॥ एवंसंख्या ॥ ४२१ ॥ ॥ ॥ ॥

१ बुडती.

॥ इति श्रीयोगवासिष्ठसारे षष्ठमशुद्धानिरूपणप्रकरणंसमाप्तम् ॥

# अथ श्रीयोगवासिष्ठसारे आत्मार्चनप्रकरणप्रारंभः

५१



श्रीगणेशायनमः॥जयजय श्रीसद्गुरुराया ॥ नमन करूनि तुझिया पायां॥ ग्रंथव्याख्यान तरणोपाया॥जीवाचि-
या करीन मी ॥१॥ तया जड जीवांचा उद्धारकु॥ तूंचि तूं परिपूर्ण येकु॥जयाचा अवलोकदीपकु॥ स्वप्रकाशकु-
करी जगा ॥२॥ तरी तुझिया कृपावलोकें ॥ ग्रंथसिद्धी जाईल कौतुकें ॥ येऱ्हवीं येवढा उन्मेष असेकें ॥ बोलचि
फिके सर्वही ॥ ३ ॥ ययालागीं जी कृपासागरा ॥ ऐकें ज्ञानदानीया उदारा ॥ रिघोनि मद्वाचेचा वोवरा ॥ प्र-
काश पुरा करी स्वामी॥४॥रिघ ह्मणतांचि परिछिन्न ॥ होऊं पाहे तुझें परिमाण॥ तुज करितां सर्वांचें चळण॥
व्यापक पूर्ण नियंतृत्वें ॥ ५ ॥ आणि वाचादि करण तूंचि होसी ॥ तुजवीण स्थिती कें या जगासीं ॥ यालागीं
तूंचि अनुभवासीं ॥ अनुभवियासीं येतसे ॥ ६ ॥ तरी म्यां कासयालागीं विनवावें ॥ सर्वही तूंचि होसी गा
स्वभावें ॥ वक्ता वदविता श्रोता गौरवें ॥ होसी अनुभवें सकळ तूंचि ॥ ७ ॥ कर्ता करविता सद्गुरुनाथा ॥ तेथें
वर्णनाची कायसी कथा ॥ गुरू शिष्य भेद दावितां ॥ लीलावंता विडंबक ॥ ८ ॥ तरी माझें जें मीपण ॥ कोठें
नपावेल अवस्थान ॥ यालागीं तूंचि आनंदघन ॥ मी तूंपण मूळभ्रांती ॥ ९ ॥ आपुलेंचि ऐश्वर्य बोलावया ॥
ग्रंथमिसें करूनियां सद्गुरुराया ॥ बोलविसी ब्रह्मानंदअभिप्राया ॥ उद्धारावया सर्व जनां ॥ १० ॥ तेथें माझें
विनवणें तुजप्रती ॥ कासयालागीं सद्गुरुमूर्ति ॥ तथापि परोपकारार्थ विनंती ॥ आनंदमूर्ति केली तुज ॥११॥
आतां ऐका ग्रंथव्याख्यान॥मागें संपलें शुद्ध निरूपण॥शुद्धत्वेंचि असल्या आत्मार्चन॥सर्वदा पूर्ण होतसे॥१२॥

---

१ उल्लास, आनंद. २ खोलींत. ३ भेदयुक्त. ४ पूर्णावस्था. ५ इंद्रियें

स्वस्वरूप जाणोन राहाणें ॥ तेंचि मी आत्मार्चन ऐसें ह्मणे ॥ तें वसिष्ठें रघुनाथाकारणें ॥ सांगती खुणें तें ऐका ॥१३॥ तेंचि महाराष्ट्रभाषेंकरून ॥ यथामति करिजेल व्याख्यान ॥ तें श्रोतीं परिसावें सावधान॥ करूनि मन एकाग्र ॥ १४ ॥ तरी पूर्वप्रकरणीं निरूपण ॥ संमति श्लोकीं बोलिलें जाण ॥ सर्व ब्रह्म हें अंतर्भावन ॥ मुक्तपण देतसे ॥ १५ ॥ आणि भेदबुद्धी तेचि अविद्या ॥ सर्वथा त्यजावी गा सुविद्या ॥ तरी भेदबुद्धी तेचि देहाद्या ॥ होय अविद्या तेचि जाण ॥ १६ ॥ तेचि देहबुद्धी टाकिलिया ॥ स्वयें लाभे आपण आपणयां ॥ हेंचि ऋषी सांगती श्रीरघुराया ॥ त्या प्रकरणा यया परिसावें ॥ १७ ॥ हेंही होय निदिध्यासन ॥ आणि स्वस्वरूपाचें वोळखण ॥ तेंचि सांगती ऋषी आपण ॥ ते निर्वाण खुण परियेसा ॥ १८ ॥ येथें विजातीयाचा तिरस्कार ॥ करोनी स्वस्वरूपाचा निर्धार ॥ ब्रह्मींच राहणें तदाकार॥साक्षात्कार तोचि होय ॥१९॥ तेंचि निरूपण इये प्रकरणीं ॥ रघुनाथासीं सांगे वसिष्ठमुनी ॥ या नाम आत्मार्चन ऐसेनी ॥ अभिधानीं बोलती यासीं ॥ २०॥ अगा मुख्य जें कां आत्मानुसंधान॥ तेंचितें जाण आत्मार्चन॥ उपचारें कींजे बाह्य भजन॥ तें जाण गौण मंदाप्रती ॥ २१ ॥ शुद्धांतःकरणीं जो गुरु अनुग्रहीत ॥ तेणें सर्वदां सेवावा येकांत ॥ तेथें निदिध्यासन यथोचित ॥ करावें निश्चित दृश्यत्यागें ॥२२॥ देहादि दृश्याचा तिरस्कारें ॥ आत्मस्वरूप अविस्कारे ॥ तद्रूप राहाणें जें येकाकारें ॥ जाण निर्धारें आत्मार्चन तें ॥ २३ ॥ तेंचि आत्मार्चन पैं कैसें ॥ऋषिरायें बो-

१ अभिप्राय. २ अन्य. ३ प्रकटे.

लिलें असे ॥ तेंचि मी संतकृपाविशेषें ॥ सावकाशें सांगेन ॥ २४ ॥ तेंचि कृपा करूनियां संतीं ॥ एकाग्र एकावें चित्तीं ॥ ऐकिल्याचीं स्वरूपप्राप्ती ॥ होय सर्वार्थीं भाविकां ॥ २५ ॥ ॥ श्लोक ॥ यदिदेहंतिरस्कृत्य-चित्तिंविश्रम्यातिष्ठसि ॥ तदातृणीकृताशेषस्वयमेकोभाविष्यसि ॥ १ ॥ टीका ॥ तरी या स्थूळ लिंगदेहातें ति-रस्कारुनी ॥ राहसील गा कार्मुकपाणी ॥ स्वस्वरूपीं विश्रामुनी ॥ स्वरूपज्ञानी अखंड ॥ २६ ॥ तरी तिर-स्कार तोही ऐसा ॥ देह तो मी होय ऐसा ठसा ॥ बाणला तो वीरविलासा॥ सांडी सहसा देहात्मबुद्धी॥२७॥ देहद्वय तें जड समूळ॥याचा द्रष्टा तो आपण निर्मळ॥द्रष्टा तो दृश्यासीं वेगळ॥जो कीं सोज्वळ ज्ञानस्वरूप॥२८ यया देहद्वयातें जें जाणतें ॥ तें मी निंखिल ज्ञान आपणचि तें ॥ तेथें विश्रामोनि देहद्वयातें ॥ सांडी सर्वार्थें देहात्मदृष्टी ॥ २९ ॥ तें अशेषही प्रपंचजात ॥ तृणतुल्य होईल निश्चित ॥ सत्य नभासे कदाचित ॥ हें जाण निश्चित प्रतिभासकत्वें ॥ ३० ॥ तेणें कळे मग येकला येक ॥ तूंचि स्वयें अससी बोधार्क ॥ विश्व नहोनि वि-श्वात्मक ॥ अवितर्क प्रकाशें ॥ ३१ ॥ श्लोक ॥ येनेदंवेत्सितंज्ञात्वाकुरुप्रत्यङ्मुखंमनः ॥ ततआकाशरूपत्वंद्रक्ष्य सिस्फुटमात्मनः ॥ २ ॥ टीका ॥ देहातिरस्कृतीचें लक्षण ॥ तें सर्व तुजसी सांगेन ॥ करूनियां एकाग्रमन ॥ सावधान परियेसीं ॥ ३२ ॥ तरी हें सकळाहि दृश्यजात ॥ जें जें इंद्रियें ग्राह्य समस्त॥तें तें सर्वही जाण मि-थ्याभूत ॥ स्थूळ भासत जगटवाळ ॥ ३३ ॥ तें दृश्य जेणेंकरुनी जाणसी ॥ तें मन वोळखोनियां हृषीकेशी ॥

१ अतिस्वच्छ. २ संपूर्ण.

तेंचि मन नेहटावें आत्मयासीं ॥ सांगेन तैसी बुद्धि करीं ॥ ३४ ॥ अगा इंद्रियादिकां सर्वां प्रकाशी ॥ प्रत्यक् जाणपां त्हृषीकेशी ॥ त्या प्राङ्मुख करी मनासीं ॥ तेणें देखसी आपणया ॥३५ ॥ प्रत्यक् तेंचि साक्षी चैतन्य ॥ तद्रूप करावें अंतःकरण ॥ आत्मोन्मुख करितांचि मन ॥ चिद्घन देखसी तूं ॥३६॥ गगन जैसें कूटस्थ स्थिती ॥ व्यापक निसंग अतर्क्यगती ॥ तें तैसीच तुझी मूर्ति ॥ येईल प्रतीति तुझी तुज ॥ ३७ ॥ येक मन प्रत्यङ्मुख करितां॥ आपुली आपणा लाभे ब्रह्मता ॥ चढे सर्व सुखाचे माथां॥ हें न करितां अनर्थ कोटी ॥३८॥ अथवा जेणें हें सर्व जाणिजे॥ तें ज्ञानचि स्वस्वरूप सहजें॥ तें जाणऊनी तदाकार कीजे ॥ मन रघुराजें सर्वदां ॥ ३९ ॥ अहो आपुलें स्वरूप प्रत्यक्ष असे ॥ परि तें भ्रमें व्यवधानिलें असे॥मन प्रत्यङ्मुख केलिया आपैसें॥ ब्रह्म सर्वांशें आपणचि पैं ॥४०॥ तरी तेंचि आत्मस्वरूप कैसें॥ जया साक्षी चैतन्य ह्मणिजेत असे॥ तेंही पुससी तरी सावकाशें ॥ सांगों विन्यासें रघुराया ॥ ४१ ॥ तया साक्षी स्वरूपाकार ॥ मन करावें गा निरंतर ॥ त्या साक्षीस्वरूपाचा निर्धार ॥ सविस्तर सांगेन ॥४२॥ श्लोक ॥ येनशब्दंरसंरूपंगंधंजानासिराघव ॥ तमात्मानंपरंब्रह्मजानीहिपरमेश्वरं ॥ ३ ॥ टीका ॥ तरी ऐके गा श्रीरघुपती ॥ सांगेन ब्रह्मस्वरूप तुजप्रती ॥ जें कीं एकतांचि येतसे प्रतीति ॥ एकाग्रमती घेइजे जरी ॥४३॥तरी जेणें हा शब्द चळे ॥ जेथूनि उठती शब्द उमाळे॥ उठिला शब्द जेणें कळे ॥ जाण निराळें परब्रह्म तें ॥४४॥ इंद्रियें इंद्रियवृत्ति विषयजाण॥ यातें जाणतें जें चतुर्थ



१ लावावें. २ उलट. ३ अविकार. ४ दुर्लक्षझालें.

मन ॥ या समस्तां एक समयीं करिजे प्रकाशन ॥ हे सर्वत्र खुण साक्षियाची ॥ ४५ ॥ तैसीच रसीं राहोनियां रसगोडी ॥ जे कीं स्वसाक्षित्वें निवडी ॥ गोडीसहित रस निवडी ॥ जाण परवडी तोचि तेकीं ॥ ४६ ॥ तैसेंचि रूपातें प्रकाशिता ॥ चक्षू दिसे बाह्य पाहतां ॥ परि चक्षूसहित रूपाचा ज्ञाता ॥ मनादि तत्वतां प्रकाश जेणें ॥ ४७ ॥ तैसेंचि घ्राणेंद्रियें गंधप्रतीति ॥ जेणें स्पष्ट येतसे व्यक्ती ॥ तेंचि परब्रह्म गा विश्वमूर्ति ॥ जाण निश्चिती हेचि खुण ॥४८॥ इंद्रियचतुष्टयाचे विषय ॥ मुळीं बोलिले जे उपादेय ॥ तें उपलक्षण अनुमेय ॥ परि सर्वेंद्रिय-मेळें सूचिलें ॥ ४९ ॥ ह्मणोनि सर्वेंद्रियांच्या राहाटी ॥ तुज सांगों जगजेठी ॥ चित्त देईं माझिये गोष्टी ॥ श्रवणें भेटी निजात्मया ॥५०॥ तरी त्वगिंद्रियाचें स्पर्शन॥स्पर्शनीय ज्ञातृत्वें जाण॥यातें जाणे तो चिदानंदघन॥परिपूर्ण परमात्मा ॥५१॥ आणि वाचा वदे जे जे अर्थ ॥ अर्थेंसीं जेणें वाचा प्रकाशत ॥ त्या वागेंद्रियातें जाणत ॥ त्यातें निश्चित जें प्रकाशी ॥ ५२ ॥ तैसेंचि हाताचें जें क्रियाजाळ ॥ घेणें देणें इत्यादि सकळ ॥ ययातें प्रकाशिजे निर्मळ ॥ जाण अढळ परमात्मा ॥ ५३ ॥ चरणाची जे चरणगती ॥ चरण जेणेंकरूनि चालती ॥ चरणादिक प्रकाशी सर्वार्थीं ॥ तोचि निश्चिती परमात्मा ॥ ५४ ॥ आणि गुदाचें जें गुदपण ॥ गुदीं उत्सर्ग कर्माचरण ॥ जेणें जाणसी तें चैतन्य ॥ आनंदघन परमात्मा ॥ ५५ ॥ शिश्नक्रिया रतिविलास ॥ रतिसुखांचि जे सविलास ॥ जेणें होय इत्यादि प्रकाश ॥ तोचि परेश परमात्मा ॥ ५६ ॥ मनाचें जें मंतव्यपण ॥ संकल्प विक-

१ प्रकार. २ नेत्र. ३ ग्राह्य. ४ मार्ग, वागणूक. ५ त्वचा.

ल्पात्मक जाण ॥ जेणें जाणे हें अनुसंधान ॥ तेंचि चैतन्य निश्चयेसीं ॥ ५७ ॥ तरी इतुकेंहि इंद्रियव्यापारीं ॥
येक मनचि होय सहाकारी॥ मनासहित सर्वांचा प्रकाश करी ॥ जाण निर्धारीं परमात्मा ॥५८॥ ऐसें सर्वेंद्रिय
वृत्तिकरुनी ॥ जो जो पदार्थ घेइजे जनीं ॥ त्यासीं मन सहाय भरवसेनी ॥ ऐसें नेणोनि ज्ञाता ह्मणिजे ॥५९॥
परंतु परस्परानुध्यासें ॥ मनचि जाणे ऐसें दिसे ॥ परि त्याचाही प्रकाश करीतसे ॥ नेणती भ्रमांशें कोणी जन
॥ ६० ॥ अगा तें स्थूळ दृष्टीनेंचि पाहती ॥ ह्मणउनी सूक्ष्मद्रष्टा साक्षी नेणती ॥ त्या नेणण्याचिसाठीं संसृती
पावती ॥ कोटि कल्पांतीं उमजेना ॥ ६१ ॥ तेंचि साक्षीयातें अपरोक्ष जाणतां॥स्वप्नींहि नाइकीजे संसारवा-
र्ता ॥ परमानंदीं निमग्नता ॥ ते नयेती द्वैता स्वप्नतुल्या ॥ ६२ ॥ यालागीं तुवां तैसें नकरावें ॥ मी सांगेन तैसें
पहावें ॥ तेणेंचि आपणया स्वभावें ॥ पावसी गौरवें निश्चयेसीं ॥६३॥ तरी जे जे इंद्रियें प्रकाशती ॥ तेथी-
चि सहाय होय चित्तवृत्ती ॥ बुद्धीनिश्चयातें असे करिती ॥ प्रकाशिती विषयपदार्थ ॥ ६४ ॥ इतुक्याचें अनुसं-
धान धरितां ॥ जाणे जो जीवशब्दें प्रमाता ॥ तयाहिसहित प्रकाशि समस्तां ॥ जाण तत्वतां तोचि साक्षी ॥
॥ ६५ ॥ इंद्रियें आणि पदार्थजात ॥ मन बुद्धी प्रमाता निश्चित ॥ यातें जाणे तो साक्षी तत्वतां॥जाण रघुना-
था परमात्मा ॥ ६६ ॥ तोचि साक्षी निजानंदघन ॥ तोचि आत्मा ब्रह्म परिपूर्ण ॥ तोचि परमेश्वर निर्गुण ॥
जाण खुण रघुवर्या ॥६७॥ इतुक्या विशेषणाचें व्याख्यान ॥ ऐक एवंभूत लक्षण ॥ याचेंचि कीजेल निरूपण ॥

१ जन्ममरण. २ आत्मज्ञानानें.

तेंचि विवरण परियेसी ॥ ६८ ॥ संमतिश्लोक ॥ यच्चाप्नोतियदादत्तेयच्चात्तिविषयानिह ॥ यच्चास्यसंततोभावस्त स्मादात्मेतिकथ्यते॥ १॥टीका॥जो कीं सर्वत्र देशीं काळीं॥सर्व ही पावला सर्व मेळीं॥त्याव्यतिरिक्त पावण्याची शैली ॥ कोणेंकाळीं असेचिना ॥ ६९ ॥ जो जेथें जें जें अपूर्व बैसे ॥ तंव तें जेणें पावविलेंचि असे ॥ आपण अ-र्पावें हें नसे ॥ पूर्वींच असे प्राप्त तया ॥७०॥ गगन हें घटीं भरूं पाहिजे ॥ तंव तें तेथेंच आधींच असिजे ॥ ज्या ज्या पदार्थासीं मेळविजे ॥ तंव तें सहज असे तेथें॥७१॥तैसें जेंजें तया अर्पूं जाइजे॥ तंव अर्पि तेंचि त्यामाजी सहजे ॥ यालागीं सर्वत्र तेणेंचि पाविजे ॥ आत्मा जाणिजे येणें न्यायें॥ ७२॥आणि सर्वत्र जें किं घेतें॥ज्यावीण घ्यावया नाहीं रितें॥तोचि आत्मा जाण निरुतें॥आणि भोक्तें सर्वत्र जें ॥ ७३ ॥ सर्वत्र देशीं काळीं वसतें जरी॥ विषय भोगी सर्वप्रकारीं ॥ भोक्ता ऐसी जे दुजी परी ॥ नसे पृथ्वीवरी आत्मेविण ॥७४॥ ह्मणउनी सर्वत्रभो-गी विषयांतें ॥ रस रूपादिक निश्चितें ॥ आत्मा ह्मणणें जाण तयातें ॥ भोगी विषयांतें ह्मणोनियां ॥ ७५ ॥ आणि ज्याचें कीं अस्तित्व संतत ॥ कोणें काळीं नव्हे उपहत ॥ सर्वत्र जें कीं असे विसृत॥तेंचि निश्चित आत्म-रूप ॥ ७६ ॥ यालागीं यासि आत्मा ह्मणिजे ॥ जयावीण कांहीं नेणिजे दुजें ॥ सर्वत्र परिपूर्ण जा-ण सहजें ॥ तस्मात ह्मणिजे आत्मा यासीं ॥ ७७ ॥ आणीक दुसरें व्याख्यान॥तेंही तुजप्रति सांगेन ॥तरी सु-षुप्तीठाईं सर्वही जाण ॥ उपसंहरण जेथें होय ॥ ७८ ॥ सर्वहि इंद्रियें आणि विषयजात ॥ दृश्यमात्र जें जें वि-

१ निराळा. २ निस्तेज, नष्ट. ३ पसरलेलें. ४ लय.

श्व समस्त ॥ जयाच्याठाईं लय पावत ॥ जाण निश्चित तोचि आत्मा ॥ ७९ ॥ यालागीं सर्वांहि जेणें पावलें ॥ सुषुप्तीप्रळईं जें लया गेलें ॥ जेथें सकळही सामावलें ॥ जाण निराळें आत्मरूप तें ॥८०॥ तैसेंचि स्वप्नावस्थेच्याठाईं ॥ जागृतीसिं जे पदार्थ भोगिले पाहीं ॥ ते वासनाद्वारासर्वही ॥ अंगिकारू पाहीं करीतसे ॥ ८१ ॥ जागृतीचे जे जे पदार्थ ॥ ते स्वप्नीं वासनेंकरूनि घेत ॥ ह्मणऊनि आत्मा ऐसें बोलिजेत ॥ जाण निश्चित रघुराया ॥ ८२ ॥ तोचि आत्मा जागृतीसीं ॥ इंद्रियद्वारां विषयांसीं ॥ भोगीतसे समस्तांसीं ॥ ह्मणऊनि यासीं आत्मा ह्मणती ॥ ८३ ॥ तोचि तूर्यावस्थेच्याठाईं ॥ अनुभूत भाव तयाचा सर्वही ॥ तयावांचूनि दुजें नाहीं॥अवस्था तिहींमाजि अखंड ॥ ८४ ॥ एवं सर्वत्र सर्व तेणें पाविलें ॥ सर्वत्र सर्व तेणेंचि घेतलें ॥ सर्वत्र सर्व विषय भोगिले ॥ आणि निराळें सर्वत्रपणें ॥ ८५ ॥ ऐसें आत्मशब्दाचें व्याख्यान ॥ सांगीतलें तुजलागुन ॥ आतां पर शब्दाचें निरूपण ॥ सावधान परियेसी ॥ ८६ ॥ तरी निरंतिशय जयाच्याठाईं ॥ ज्याहूनि अतिशय कोठें नाहीं ॥ सर्वांचें जें अधिष्ठान पाहीं ॥ ब्रह्मादिकांही श्रेष्ठ तें पर ॥८७॥ बृहनात् ब्रह्म ह्मणिजे ॥ बृहत् शब्दें थोर जाणिजे ॥ त्याहुनी थोर नाहीं दुजें ॥ यालागीं ह्मणिजे परब्रह्म ॥ ८८ ॥ ब्रह्मपदाचें दुसरें व्याख्यान ॥ तेंही सांगों तुजलागुन ॥ जेणें बुझेसी संपूर्ण ॥ ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ८९ ॥ श्रुती ॥ अव्यावृत्ताननुगतं वस्तुब्रह्मेतिभण्यते ॥ टीका ॥ कोणापासाव नाहीं परतलें ॥ सर्वत्र तेंचि असे संचलें ॥ दुसरें नाहीं तयावेगळें ॥ को-

१ परब्रह्म. २ समजशील.

ठोनि व्यावर्तलें ह्मणाल ॥ ९० ॥ आणि पदार्थ जेथें साच नाहीं ॥ तेथें तें परतेल कोठोनि काई ॥ ह्मणउनी सर्वत्र तेंचि पाहीं ॥ आन पाहीं परब्रह्म ॥९१॥ आणि जें कोठें नाहीं अनुगत॥तेंचि तें बोलिजे अननुगत ॥येक वस्तु जरी साच भासत ॥ तदंतर्गत तें अनुगतार्थ ॥ ९२॥ घट मठादि जरी साच असती ॥ तरीच तेथें गगनाची अनुगती ॥ घट मठ नसतां अननुगती ॥ तेंचितें सर्वार्थी एक जाण ॥ ९३ ॥रज्जु जैसी सर्पीं अनुगत ॥ ऐसें ह्मणतांचि अनर्थ होत ॥ सर्प नाहीं साच दिसत ॥ तेथें अनुगत कोण मानी ॥ ९४ ॥ नातरी शुक्ति रजतीं अनुगत ह्मणतां॥ हेंही असंबद्धचि सर्वथा ॥ रूपें विचारें विचारितां ॥ नये हाता प्रयत्नेंही ॥९५॥ तैसें विश्वीं ब्रह्म अनुगत ॥ ह्मणणें हें परम अनुचित ॥ विश्व विवर्तरूपें असे भासत ॥ नाहीं यथार्थ ब्रह्मेविण ॥९६॥ यालागीं ब्रह्मा वांचून दुसरें ॥ नदेखिजे गा साचोकारें ॥ अव्यावृत अननुगत हें खरें ॥ यालागीं निर्धारें ब्रह्म जाण ॥ ९७ ॥ आणि परमेश्वर यातेंचि ह्मणिजे ॥ थोराचा थोर नियंता जाणिजे ॥ ब्रह्मयादि नियंत्यातें जेणें नेमिजे॥तोचि तो सहजे परमेश्वर ॥ ९८ ॥ इत्यादि विशेषणीं इहीं ॥ परब्रह्म बोलिजे पाहिं॥ हेंचि जाणतसे सर्वांहीं ॥ जाण निःसंदेही रघुनाथा॥९९ ॥ येणेंचि गा सर्वांहि जाणिजे ॥ अंतर्बाह्य येणेंचि सुजे ॥ साक्षी चैतन्य हेंचि सहजे ॥जाणोनि राहिजे सर्वदां ॥ १०० ॥ बाह्य सांडोनियां मनोवृत्ति ॥ करावी सर्वथा प्रत्यक्वृत्ति ॥ प्रत्यक् तेंचि ब्रह्म सर्वार्थी ॥ करीं वृत्ति एतद्रूप ॥ १ ॥ हे सांगितली ब्रह्मस्वरूपखुण ॥ हेचि वोळखूनि राहे पूर्ण ॥

१ सम, सारिखें. २ मिथ्याभास. ३ खरोखर. ४ समजतें.

सर्वदां येथेंचि ठेऊनि मन ॥ बाह्यस्फुरण टाकावें ॥ २ ॥ हेचि प्रत्यङ्मुखस्थिती॥ अभ्यासावी गा रघुपती ॥ येथें राहाणें ते जीवन्मुक्ती ॥ नाहीं विप्रतिपत्ति रघुराया ॥ ३ ॥ हेंचि जाणपां आत्मार्चन ॥ जें कीं निरंतर आत्मानुसंधान ॥ स्वस्वरूपींच अवस्थान ॥ येर ते गौण बाह्य भक्ती ॥ ४ ॥ आणिकही जाणावयाची खुण ॥सांगेन आत्मयाचें लक्षण ॥ तद्रूप राहोनि आत्मार्चन ॥ करीं भजन सुखवरी ॥ ५॥ श्लोक ॥ यत्रभावाहिस्पंदंते निर्मियंतेचयेनवा ॥ तमेवात्मानमानंदरूपंजानीहिराघव॥४॥ टीका ॥ अगा सकळ देहादिकरुनी॥मन बुद्धि अहंकारादि श्रेणी ॥ किंबहुना जे श्रवणीं नयनीं ॥ भासे मनीं दृश्य टवाळ ॥ ६ ॥ यया सर्वांतें भाव ह्मणती ॥ हे सर्वही जियेठायीं भासती ॥ तें परब्रह्म जाण आनंदमूर्ति ॥ आत्मा ह्मणती तयातें ॥ ७ ॥ आणि जेणें याचा निर्णय कीजे ॥ हे घट पट ऐसी संज्ञा जाणिजे ॥ हें उपायत्वें घेइजे सांडिजे ॥ तेंचि तो सहजें परमात्मा ॥ ८ ॥ किंबहुना जेणें सर्वही जाणसी ॥ त्याचयाठाईं भासलें देखसी ॥ तोचि आनंदरूपें परीयेसी ॥ आत्मा ऐसी संज्ञा जाणिजे या ॥९॥ तरी हें सूक्ष्म विवेकदृष्टी ॥ विचारूनि पाहासी जगजेठी॥ तेंचि होय आत्मत्वेसीं भेटी॥ निश्चय पोटीं दृढ धरी ॥ ११० ॥ हेचि आत्मयाचें वोळखण ॥ वोळखूनी तदाकार करीं मन ॥ विश्वनिराशें संपूर्ण ॥ पावसी खुण आपुली ॥ ११ ॥ तेंचि निरसन कैसें कीजे ॥ तेंही सांगों तुज श्लोकव्याजें ॥ तेणेंकरूनि बुझिजे ॥ खुण जाणिजे रघुराया ॥ १२ ॥ श्लोक ॥ यद्यज्ज्ञेयमिदंतत्त्वंनेतिसंत्यज्ययुक्तिभिः ॥ प्राप्यावशिष्टचि-

१ मतभेद. २ पंक्ति. ३ श्लोकरूपानें.

न्मात्रंसोस्मिसोस्मीतिभावय ॥ ५ ॥ टीका ॥ अगा अहंकारादिकरुनी ॥ जें जें ज्ञेय तुजलागुनी ॥ मनादि इंद्रियें ज्यालागुनी ॥ जाणती भरवसेनी तें तें ज्ञेय ॥ १३ ॥ अगा नेत्रीं जें जें देखिजे ॥ तें तें सर्वथा ज्ञेय जाणिजे ॥ मनें जें कांहीं कल्पिजे ॥ निश्चय कीजे मनीषाजो ॥ १४ ॥ श्रवणें जें कांहीं गृह्यमाण ॥ तें तें रघुनाथा ज्ञेय जाण ॥ त्वचा कीजे जें ज्ञेयस्पर्शन ॥ रसस्वादन रसनादिकीं ॥१५॥ वाचा जें जें कांहिं बोलिजे ॥ घ्राणें गंध आस्वादिजे ॥ करचरणें आपादिजे ॥ घेइजे देइजे जें जें कांहीं ॥१६॥ तें तें सर्वही ज्ञेय जाण ॥ ज्ञेय तितुकें दृश्य पूर्ण ॥ दृश्य ज्ञेय तें मिथ्या जाण॥कल्पितभान अधिष्ठानीं ॥ १७ ॥ तें श्रुतिमुखें नेति नेती ॥ इतुकीयाचा निषेध करिती ॥ तें तें त्यजावें गा सर्वार्थीं ॥ सदा भक्ति करूनियां ॥ १८ ॥ तया ज्ञेयालागीं श्रुती ॥नेति नेती ऐसें ह्मणती॥दृश्य तें वस्तु नव्हे गर्जती ॥ व्यतिरिक्त गती ब्रह्माचि पें ॥ १९ ॥ सर्वा ज्ञेयाहूनि विलक्षण॥ सर्वा निषेधाचें अवधिस्थान ॥ तेंचि तें परब्रह्म निर्गुण ॥ बोलती खुण सर्व श्रुती ॥ १२० ॥ जें जें ज्ञेय गा तुजलागुनी ॥ तें तें त्यजावें युक्तिकरुनी ॥ त्यजितां उर्वरीत जें निर्वाणीं ॥ कोदंडपाणी तेंचि ब्रह्म ॥२१॥ त्या युक्ति कोण कैसिया ॥ त्याहि तुज सांगों गा रघुराया ॥ जो जाणे अवस्थात्रयां॥खुण आत्मयाची जाणे तो॥२२॥ आणि आत्मेन जें जें जाणिजे ॥ स्वप्रकाशें जें प्रकाशिजे ॥ तें तें ज्ञेय जाण सहजें ॥ तें तें त्यजिजे हेचि खुण ॥ ॥ २३ ॥ यदर्थीं संमति गीता भागवतीं ॥ श्रीभगवंत बोलिले उद्धवाप्रती ॥ तेचि हंसरूपें ब्रह्मयाप्रती ॥ उपदे-

---

१ संपादिजे. २ निराळी. ३ राहिलेलें.

शिती सनकांदिकां ॥ २४॥ संमतिश्रीभागवतयेकादशस्कंध ॥ श्लोक ॥ यावन्नानाऽर्थधीःपुंसोननिवर्तेतयुक्तिभिः ॥ जागर्त्यपिस्वपन्नज्ञःस्वप्नेजागरणंयथा ॥ २ ॥ टीका ॥ जोपर्यंत युक्तिकरूनि पुरुषासीं ॥ नानाधीन निवर्ते निश्चयेसीं ॥ तंव अज्ञान नतुटे गा परियेसी ॥ जाण तो राशी अज्ञानाचा ॥ २५ ॥ आणि ब्रह्मीं जे नानात्व देखती ॥ ते मृत्युउपरि मृत्यूच पावती ॥ ऐसें स्वयें बोलतसे श्रुती ॥ ऐक भूपती रघुनाथा ॥ २६ ॥ श्रुती ॥ मृत्योःसमृत्युमाप्नोतियइहनानेवपश्यति ॥ टीका ॥ ते अनर्था वरपडे होती ॥ नानापरींचीं दुःखें भोगिती ॥ चौऱ्यांशीलक्ष योनी जन्म पावती ॥ कोटि कल्पांतीं सुटेना ॥ २७ ॥ अगा तो जागाचि परि निजेला ॥ जो नानात्वें विश्व देखों लागला ॥ नाहो निद्रिस्थासि जगदाभास निमाला ॥ हा तंव विश्वाला देखतसे ॥ २८ ॥ तरी निद्रिस्थहि स्वप्नीं विश्व देखत ॥ उभयतां भेद नाहीं निश्चित ॥ तरी तो निजेला हा जागत ॥ भेद बहुत दोघांजणां ॥ २९ ॥ तरी निद्रिस्थही स्वप्नीं जागा असे ॥ जागृतीचा व्यवहार करीतसे ॥ ह्मणऊनि उभयतां भेद नसे ॥ दोघे पिसे भ्रांतिबळें ॥ ३० ॥ ह्मणउनी नानाप्रकारें विश्व देखत ॥ तो स्वप्नस्थासारिखा असे भ्रांत ॥ आतां युक्ति सांगेन अनंत ॥ परिस मात रघुराया ॥ ३१ ॥ ह्मणऊनि त्यजावी नानात्व बुद्धी ॥ निरशितां उरेल जो शेष अवधी ॥ तोचि युक्तीकरूनियां साधी ॥ युक्ति सुबुद्धी त्या ऐसीया ॥ ३२ ॥ संमतिश्लोक ॥ यो जागरेबहिरनुक्षणधर्मिणोर्थान्भुंक्तेसमस्तकरणैर्हृदितत्समक्षान् ॥ स्वप्नेसुषुप्तउपसंहरतेसएकःस्मृत्यत्वयांत्रिगुणवृ

१ सांपडतात. २ मूर्ख, वेडे.

त्तिद्दर्गिंद्रियेशः॥३॥टीका॥ जे स्थूळ पदार्थ देहादिकरूनि ॥ जे कीं अनुक्षण धर्मीं भरवसेनी॥परिणामवंत नासति क्षणीं ॥ दिसती नयनीं दृश्यपणें जे ॥३३॥ बाल्यतारुण्यादि जरा॥ परिणाम क्षणाप्रति नश्वर खरा ॥ ऐसिया पदार्थातें वीरा ॥ भोगी कर्णद्वारां जागृतिसीं जो ॥ ३४ ॥ त्या बाह्य स्थूळा समस्तां अर्थी ॥ तत्वतां तोचि आत्मा जाणे श्रीरघुनाथा ॥ जो कीं जागृतीसीं भोगी ताता ॥ घेई सर्वथा युक्तिकरुनी॥३५॥ तोचि स्वमीं सीताकांता ॥ जागृतीं ऐसिया भोगी पदार्था ॥ तें वासनामय अंतरीं चित्ता ॥ भोगी तत्वतां जागरा ऐसा ॥ ३६ ॥ तोचि येक सुषुप्तीच्याठाईं ॥ सर्वांचा उपसंहार करूनि सर्वही ॥ स्वस्वरूपें येकला पाहिं ॥ अनपाई साक्षिभूत ॥ ३७ ॥ तो तिहीं अवस्थांचा द्रष्टा ॥ येकला एकचि जाण वीरश्रेष्ठा ॥ येथें आशंका असती स्पष्टा ॥ तिहींचा येकचि द्रष्टा पैं कैसा ॥ ३८ ॥ तरी सर्व इंद्रियें जागृती देखती ॥ स्थूळ पदार्थातें इंद्रियें घेती ॥ तियेसींच जागृती ह्मणती ॥ द्रष्टेपणें निश्चिती इंद्रियां आली ॥ ३९ ॥ तैसेंचि मन प्रकाशी स्वप्नावस्था ॥ तत्संस्कार बुद्धी जे किं गा रघुनाथा ॥ तेंचि प्रकाशी सुषुप्त्यावस्था ॥ आत्मा देखता येथें कैंचा ॥१४०॥ तरी अवस्थात्रयांचा द्रष्टा ॥ येकचि आत्मा कैसा ऋषिश्रेष्ठा ॥ तरी आत्मा इंद्रियांचा ईश सुभटा॥ करी उत्कंठा प्रकाशसिद्धी ॥ ४१ ॥ नाहो इंद्रियें आणि प्रकाशक ॥ विश्व तैजस प्राज्ञ हे देख॥ हे अवस्थांचे अभिमानी सम्यक ॥ अवस्था सकळिक प्रकाशिती ॥ ४२ ॥ येथें आत्मयासीं कैंचें द्रष्टेपण ॥ ऐसें ह्मणसी तरी ऐकें

१ लय. २ अविनाशी. ३ योद्धा. ४ जागृति. ५ स्वप्न. ६ सुषुप्ति.

वचन ॥ विश्व प्रकाशी जागृती जाण ॥ तरी तो स्वप्न प्रकाशिना॥४३॥तो जागृतीचाचि अभिमानी ॥ परि नप्रकाशी अवस्था दोन्हीं ॥ इतुकें सामर्थ्य त्यालागुनी ॥ कामुकपाणी असेचिना ॥ ४४ ॥ जो जिये अवस्थेचा अभिमानी ॥ तोचि प्रकाशि तियेलागुनी ॥ दुसरींचें ज्ञान अन्याचेनी ॥ भरवसेनि नकरवे ॥ ४५ ॥ अभिमानी आणि अवस्थात्रयासीं ॥ येक आत्माचि स्वयें प्रकाशी ॥ येकें काळेंचि सर्वांसी ॥ स्मृत्यन्वयेसीं जाणतु ॥४६॥ पहिलें स्वप्न देखिलें ऐसें ह्मणे ॥ सुषुप्तिकाळीं स्वसुख भोगणें ॥ तेंचि सुख सांगे जागेपणें ॥ विषय भोगणें जागृतीसिं ॥४७॥ ऐसें तिन्ही अवस्थांचें ज्ञान॥ येक समयीं येकला परिपूर्ण॥ आणि अभिमानी विश्वतैजस प्राज्ञ ॥ जाणे संपूर्ण इंद्रियांसहित ॥ ४८॥ तैसेंच बाल्य तारुण्यादि जरा ॥ त्यामाजि भोगिलेहि सुखसंभारा ॥ दोन घटिका दिवस पसारा॥ जाणे रघुवीरा येकसमईं जो॥ ४९ ॥ ऐसीया युक्तिकरूनियां श्रीरामा॥ जाण अवस्थात्रयांचा द्रष्टा आत्मा ॥ ज्यातें प्रकाशि ते दृश्य गरिमा ॥ तीं न्यावी उपरमा[1] नेतिमुखें ॥ १५० ॥ ऐसीया सद्युक्तिकरून ॥ दोनी भिन्न केलीं संपूर्ण ॥ द्रष्टा तो आत्मा सर्वज्ञ॥दृश्य जाण प्रकाश्य जें॥५१॥ ऐसीया युक्तिकरूनि रघुपती ॥ श्रुति नेति मुखें निषेधिती[2] ॥ तें तें त्यजावें गा सर्वार्थीं ॥ पावसी अंतीं अवसिष्ठातें॥ ॥ ५२ ॥ उरेल जें चिन्मात्र निरंजन ॥ तें सर्व निषेधें प्राप्त जाण ॥ स्वयेंचि भेटे ज्ञानघन ॥ जाणतें जाण सर्वांचें जें ॥५३॥ जेथें ज्ञेय मात्र कांहीं नभासे ॥ केवळ ज्ञान मात्रचि प्रकाशे ॥ तेंचि ब्रह्म आपणचि ऐसें ॥ जा-

१ लय, शान्ति. २ धिःकारितात.

ण विश्वासें सर्वेश्वरा ॥ ५४ ॥ तोचि मी ऐसें अनुसंधान ॥ दृढ धरूनियां राहे संपूर्ण ॥ भावय शब्दें होचि खुण ॥
भावना ज्ञान कोणी ह्मणेल ॥ ५५ ॥ भावना शब्दाचा ऐसा अर्थ ॥ येके पदार्थीं अन्य भाविजेत ॥ पाषाण दे-
व ऐसें ह्मणिजेत ॥ मृत्पिंडीं भावित गणेश गौरी ॥ ५६ ॥ धातुमय ज्या मूर्ति पाहीं ॥ तेथें भावि देवो देवी
सर्वही ॥ दर्भ मुष्टीचा यजमानही ॥ भाविति सर्वही अन्य पदार्थीं ॥ ५७ ॥ आणि येकेचि मूर्तिमाजी जाण ॥
महेश चंडिका आसन ॥ त्रिशूळादि आयुधाभरण ॥ छत्रें व्यजनें चामरादिकें ॥ ५८ ॥ हें येकेचि पितळेच्या-
ठाईं ॥ येही चिन्हें येक मूर्ति पाहीं ॥ महेशावयवादि सर्वांहि ॥ भावि कांहिं त्याचिमध्यें ॥ ५९ ॥ ययाचें नाम
भावना ह्मणिजे ॥ तैसें हें तो नव्हे सहजें ॥ आपणचि आत्मा स्वतःसिद्ध जाणिजे ॥ तेथें भावना कीजे
कोण कोणाची ॥१६०॥ ऐसा हा असे व्यानरणार्थ ॥ स्वयेंहि सिद्ध करी वेदांत ॥ श्रीवासिष्ठाचा ही हाचि
मनोगतार्थ ॥ मीहि तदन्वयार्थ बोलिलों ॥६१॥ ह्मणऊनि ह्मणे गा श्रीरघुपती ॥ सर्व किंषेधें उरे जे चिन्मूर्ति ॥
तेचि निर्धारुनी स्वयें स्थिती ॥ विश्वमूर्ति तद्रूपें राहीं ॥ ६२ ॥ याचेंचि नाम गा आत्मार्चन ॥ स्वस्वरूपें राह-
णें संपूर्ण ॥ इतर तें यथार्थ साधन ॥ जाण खुण रघुनाथा ॥ ६३ ॥ जें कीं सर्वांच्या निषेधेंकरूनी ॥ ज्ञानमा-
त्र उरे जें कोदंडपाणी ॥ तें भिन्न नव्हे गा तुजहुनी ॥ सादरें आकर्णीं सांगेन ॥ ६४ ॥ श्लोक ॥ ज्ञानंनभवतो
भिन्नंज्ञेयंज्ञानात्पृथङ्नहि ॥ अतोनत्वितरंकिंचितस्माद्भेदोनविद्यते ॥ ६ ॥ टीका ॥ अगा ज्ञान ययातें ह्मणिजे॥

१ मातीचागोळा. २ संदर्प. ३ त्यागकरून.

जें सर्वांचें प्रकाशक बोलिजे ॥ तें तुजवीण भिन्न नदेखिजे ॥ तेंचि सहजें ज्ञानस्वरूप ॥ ६५ ॥ आणि ज्ञानेंकरूनि जें गमिजे ॥ तयातें ज्ञेय ऐसें ह्मणिजे ॥ तेंहि ज्ञानेसी नव्हे दुजे ॥ ज्ञेय तें जाणिजे निखिल ज्ञान ॥ ६६ ॥ भ्रममात्र जो ज्ञेयाकार ॥ भासे जो कीं जगडंबर ॥ त्याचें अधिष्ठान साचार ॥ ज्ञान परिकर तेंचि जाण ॥ ६७ ॥ अगा पदार्थीं जो चैतन्यांशु ॥ आणि इंद्रियवृत्तिमाजी परेशु ॥ एकत्र झाल्या होय प्रकाशु ॥ अन्यथा भासु व्यक्तिसीं नये ॥ ६८ ॥ एवं घट पट पदार्थजाती ॥ चैतन्यचि अधिष्ठान सुमती[1] ॥ पदार्थ मृगांभतुल्य[2] असती ॥ चैतन्यमूर्ति ते अखंड ॥ ६९ ॥ इंद्रियवृत्ति आणि पदार्थ ॥ दोन्ही प्रकाशत्वें जड मिथ्याभूत ॥ उभयतां चैतन्य अनुस्यूत[3] ॥ जाण निश्चित अवनिजाकांता ॥ १७० ॥ एवं प्रकाश्य आणि प्रकाशिता ॥ उभयतां चैतन्यचि गा तत्वतां ॥ आभास टाकूनि रघुनाथा ॥ पाहे उभयतां काय असे ॥ ७१ ॥ अगा जडीं नसतां चैतन्य ॥ कदापि नव्हे तयाचें भान ॥ इंद्रियवृत्तिमाजी नसतां चिद्घन ॥ पदार्थभान कदां नकरी ॥ ७२ ॥ जड जडातें तंव नप्रकाशी ॥ यालागीं चैतन्य आपआपणा प्रकाशी ॥ मध्यें आन भासे तेंचि निश्चयेसीं ॥ भ्रांती आपैसी रघुराया ॥ ७३ ॥ एवं ज्ञेय आणि ज्ञान ॥ तें उभयतां जाण चैतन्यघन ॥ तेंचि तूं रघुनाथा आपण ॥ नाहीं भिन्न परस्परें ॥ ७४ ॥ ज्ञेय ज्ञान आणि आपण ॥ हे जाण शब्दाचीच मिरवण ॥ वांचूनि एकचि निखिल[4] चैतन्य ॥ अनुभवें जाण रघुपुंगवा ॥ ७५ ॥ अगा स्थूळदृष्टी जे बाह्य देखती ॥ त्याचि कोटिकल्पें नतुटे भ्रां-

१ उत्तम. २ मृगजळासारिखें. ३ अखंड. ४ संपूर्ण.

ती ॥ सूक्ष्म दृष्ट्या अनुभवें पाहाति ॥ चैतन्यस्थिती तया बाणे ॥ ७६ ॥ आपणचि सर्वांचाहि ज्ञाता ॥ तो ज्ञानरूपचि तत्वतां ॥ ज्ञानचि येतसे ज्ञेयार्था ॥ ह्मणऊनि येकार्थी स्वयेंचि येत ॥ ७७ ॥ याकारणास्तव गा रघुपती ॥ दुसरें नाहीं गा त्रिजगतीं ॥ इतर असंत भेदप्रतीति ॥ निश्चयार्थी जाण रामा ॥ ७८ ॥ सुवर्णाची केलि अंबिका ॥ महिष त्रिशूळादि आयुधें देखा ॥ नानारूपें काय सुवर्णी येका ॥ भेद लेखा होईल ॥ ७९ ॥ नातरी घृताचें थिजलेपण ॥ नाना कनकीं अनेकपण ॥ भेदलें काय अन्य होऊन ॥ घृता कारण आलें तेथें ॥ १८० ॥ नाना पटाचिया कुसरी ॥ अनेक चौकडीयांच्या भरोवरी ॥ परी येकचि पट सर्वांपरी ॥ गोष्टि दुसरी असेचिना ॥८१॥ नाना कुसरी नानाप्रकार ॥ केले तरी नाना भेदांतर ॥ सर्वत्र येकचि तंतुनिर्धार ॥ नाहीं विचार अन्य कांहीं ॥८२॥ पाहातां भ्रांतिचिया दृष्टीं ॥ नाना विचित्र रंग भासती पटीं ॥ तेथें तो अनेकत्वें प्रकटी ॥ नाहीं भेटी तंतुवीण ॥८३॥ जो कीं नाना प्रकारांतरीं ॥ एकचि तंतु देखे आद्यंतवरी ॥ त्यासि भेद पळे दुरी वा दुरी ॥ तत्वनिर्धारें तोचि राहे ॥८४॥ तैसेंचि एका ब्रह्माच्याठाईं ॥ जेथें ज्ञानादि भासती पाहीं ॥ तैसेंचि हें विश्व विचित्रहि ॥ अ³नपाईं ऐसें भासे ॥८५॥ परि तें अज्ञानासींच गा रघुनाथा ॥ ज्ञानियासीं नाहीं गा तत्वतां ॥ अविचारभेदांची सिद्धि ताता ॥ विचारीं सर्वथा असेचिना ॥८६॥ ह्मणऊनि विचारें पाहातां रघुपती ॥ आपणेंवीण नभासे त्रिजगतीं ॥ तेथें नाहींच अन्यथा व्यक्ती ॥ जाण निश्चितीं विबुधनाथा ॥८७॥ भेदतो तंव पारमार्थिक नसे ॥ पारमार्थिक ज्ञा

१ तुपाचें. २ सोनें. ३ अविनाशी.

नें तो न नासे॥ भेदज्ञानें नासता तरी प्रत्यक्ष दिसे ॥ यालागीं असे औपाधिक हा ॥ ८८॥ अज्ञानउपाधिकरून ॥ ब्रह्मीं भेद भासे जाण॥ अज्ञान नासल्या चैतन्यघन॥ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥८९॥ केशांतरीं[1] ठेविला स्फटिक॥दिसे भेदावला सम्यक॥ उपाधी गेलिया एकाएक॥शुद्ध देख भासतसे॥१९०॥जयाकुसुमाचि संगती ॥शुभ्रचि स्फटिक पावे आरक्ती[2] ॥ निळे निळेपणाची व्यक्ती ॥ उपाधीनें भासती रघुराया ॥९१॥तैसेंचि सर्वही अज्ञानकृत॥नानात्वेंचि जो भेद भासत॥उपाधीनिराशें सदोदित॥जाण निश्चित अद्वयब्रह्म ॥९२॥ ह्मणऊनि भेदचि नाही सर्वथा॥भेदप्रतीति होतसे भ्रांता॥तो भेद टाकूनि घेई एकात्मता॥मग तूंचि सर्वथा सर्वत्र॥९३॥अगा जरी तूं ऐसें ह्मणसी रघुपती ॥ विष्णु विरंचि शिवादि मजहूनि भिन्न दिसती ॥ आणि त्यांचीं कर्तृत्वें भिन्न भासती ॥ भेदव्यक्ती तेणें येतसे ॥९४॥ तरी एक रघुनाथा उत्तर ॥ तद्रूपें तूंचि करिसी व्यवहार॥बाह्य नाम रूपाचेंचि वोडंबर ॥ असे अंतर येकत्वें येक ॥ ९५ ॥ श्लोक ॥ ब्रह्माविष्णुशिवेंद्राद्यायद्यत्कुर्वंतिसर्वतः ॥ तदाहंचिद्वपुःसर्वंकरोमीत्येवभावय ॥७ ॥ टीका ॥ अगा ब्रह्मा करी विश्वोत्पत्ती ॥ विष्णु पालन करीतसे स्थिती ॥ रुद्र संहारी प्रळयांतीं ॥ इंद्रादि करिती तेही एक ॥ ९६ ॥ सस्यादि[3] वृद्धि पर्जन्यधारा ॥ मघवान[4] करीतसे गा रघुवीरा ॥ सूर्य प्रकाशि चंद्रतारा ॥ औषधीसंभारा पोषती ॥ ९७ ॥ वीतिहोत्रें[5] पचवावें अन्न॥कृतांतें[6] करावें सर्व संहारण॥ वायूनें प्राणादिकांचें चळण ॥ तृषाहरण जळादिकीं ॥ ९८ ॥ तैसेंचि अष्टौ लोकपाळ ॥ करिती जो जो व्य-

१ केसांमध्यें २ तांबडारंग. ३ धान्यादि. ४ इंद्र. ५ अग्नीनें. ६ यमानें.

वहार सकळ ॥ आणिकही शेषादि नागकुळ ॥ पृथ्वीतळीं धारणादिक ॥९९॥ इत्यादि सर्वत्र जे जे करिती॥ तद्रूप तूंचि एक गा जानकीपती ॥ ऐसेंचि अनुसंधान विश्वमूर्ति ॥ सर्वदां चित्तीं धरावें गा॥२००॥ जो कीं ज्ञानरूप तूंचि आपण ॥ तया चिद्रूपाच्याठाईं सर्व निर्माण ॥ऐसी अनुभवें जाणोनि खुण ॥ राहावें पूर्ण रघुराया ॥ १ ॥ अगा पूर्णत्व बाणल्या आपुलें ॥ तेथें आपणचि कर्ते भोक्ते सर्व झाले ॥आपणावीण काय उरलें ॥सांग वहिलें रघुपुंगवा ॥ २ ॥ आपुलिया अनुभवेंकरूनि ॥ पाहे रघुनाथा विचारुनी ॥ आपणेंवीण जनीं वनीं ॥ नाहीं त्रिभुवनीं आपणावीण ॥३॥ तेथें ब्रह्मादिक दुसरेपणें ॥ कर्तव्यालागीं भासे उरणें॥सर्वत्र तुजवांचुनी दुजेपणें ॥ नदेखिजे कोणें प्रकारेंकरुनी ॥४॥ श्लोक ॥ अहंसर्वमिदंविश्वंपरमात्माहमव्ययः ॥नभूतंनास्तिनोभावी मत्तोन्यदितिभावय ॥ ८ ॥ टीका ॥ अगा जें कीं इदंकारास्पद ॥ दृश्य जें कीं विश्व विशद ॥तें सर्वही मीचि हा बोध ॥ अनिर्बाध जो कीं उपजे ॥ ५ ॥ ययाचेंचि नाम आत्मार्चन ॥ सर्व विश्व मीचि हें अनुसंधान॥ परमात्मा जो चिदैकघन ॥ तो मीच पूर्ण पूर्णत्वें ॥ ६ ॥ आणि काळत्रईं जो जया व्यय नाहीं ॥ तो मी निर्वेदु अव्यय पाहिं ॥ मजवीण कांहीं पदार्थ नाहीं॥मीच मी सर्वहि सर्वपणें॥७॥आणि मजआधीं हें विश्व नव्हतें॥नाआतांही नाहीं दिसतें ॥ पुढेंहि नव्हेल मागुतें ॥ मीच मी सर्वांथें येकला येक ॥८॥ मजवीण आणिक कांहीं ॥ आत्मत्वीं दुजी मात नाहीं ॥ ऐसेनि अनुसंधानें राही ॥ अनुभवें नाहीं पाहतां दुजें ॥ ९ ॥ भावय शब्दें भावना ॥ हें पूर्वीच निवेदिलें लक्षणा ॥ भावय या शब्दें याचि अभिधाना ॥ येथें जाणा आला असे॥२१०॥ भा-

वयु शब्दाचा अर्थ जाण ॥ तद्रूपेंचि राहाणें परिपूर्ण ॥ ऐसें जें सर्वदां सर्वत्र अनुसंधान ॥ आपणावीण दुजें न-देखे ॥ ११ ॥ अर्थापेक्षां अर्थन ॥ पदाचें सर्व कीजे जाण ॥ एथें ऐसेंचि व्याख्यान ॥ पाहिजे पूर्ण रघुराया ॥ १२ ॥ भावना शब्दें भावनाचि कीजे ॥ तरी ते ब्रह्मस्थिती नबोलिजे ॥तियेतें उपासना ह्मणिजे॥वर्म सहजें जाण रामा ॥ १३ ॥ येथें बोलिजेत असे ब्रह्मस्थिती ॥ उपासनापर नकीजे वित्पत्ति ॥ तेथें ऐसेंच व्याख्यान सर्वार्थी ॥ केलिया स्थिती सर्व पूर्ण लाभे ॥ १४ ॥ श्लोक ॥ एकंब्रह्मचिदाकारंसर्वात्मकमखंडितं ॥ निष्कंपभूरिवाशेषमितिभावययत्नतः॥९॥ टीका ॥ ययालागीं तूं रघुनाथा॥येणेंचि अनुसंधानें राहे तत्वतां ॥ येक ब्रह्म मी नाहीं अन्यथा ॥ हेंचि ताता अनुसंधावें ॥ १५ ॥ तेंचि तूं ब्रह्मचिदाकार ॥ ज्ञानस्वरूप निर्विकार ॥ सर्वात्मक अखंड निर्धार ॥ निष्कंपतर जाण तूं॥१६॥जयासिं नाहीं चळण विकार॥तेंचि निष्कंप निर्विकार॥तेंचि तें परम साचार॥बहु प्रचुर अप्रमेय॥१७॥आणि सर्वात्मक तें ऐसें॥सर्वहीं सर्वत्र तेंचि असे॥नामरूपादि वरी वरी भासे॥ विचारें असे तेंचि तें कीं ॥ १८ ॥ जैसें षड्रसीं लोपिजे जीवन ॥ त्याजीवना कट्वाम्लत्वें घेती जन ॥ तया षड्रसींच होतसे भान ॥ परि नेणती जीवन सर्वात्मक ॥ १९ ॥ नेणत्या षड्रसाची प्रतीति ॥ज्ञानी ते सर्व उदकचि देखती ॥ स्वादुरस भेदें जळचि जाणती॥जळाचि स्थिती रसात्मक॥२०॥नातरी हेमाचिं कटक कुंडलें॥ नाम रूप भासेचि सकळ॥परि येक सुवर्णचि केवळ॥जाणनिर्मळ सर्वात्मक ऐसें ॥ २१ ॥ नातरी शर्करेचा परिवार ॥ अश्व कुंजरादि चातुरंगभार ॥ परि सर्वात्मक शर्करा साचार॥आन विचार तेथें कैंचा ॥ २२ ॥ घृत कणि-

कीं अनेकपण ॥ येका घृतासींच भासे पूर्ण ॥ परि तें घृतावांचूनि नाहीं अन्य ॥ सर्वात्मक जाण ययापरी ॥
॥ २३ ॥ नाना तरंग लहरी अनेकाकार ॥ भासतांही तेथें येकचि नीर ॥ अवयवसमुदायें येकचि शरीर ॥ स-
मुदायें अक्षर येकि वाचा ॥ २४ ॥ नाना रागीं येकचि गीत ॥ नाना शब्दीं येकचि अर्थ ॥ तैसें जगहें ब्रह्म स-
दोदित॥अन्य भावित ते भ्रांती॥२५॥तैसें सर्वात्मक ब्रह्म जाण ॥ विश्वहें नाम रूपाचि अभिधान॥परितें ब्रह्माचि
परिपूर्ण॥तूंचि तूं निर्वाण परब्रह्म ॥२६॥ तैसें अखंड जें कीं देशें काळें ॥ खंडेना जें किं वस्तुमेळे॥तेंचि तें अखंड
निराळें॥अवस्थाकाळें पालटेना॥२७॥तैसें भूरि शब्दें बहुवाचक ॥जें कीं सर्वत्र पूर्ण व्यापक॥ अशेष शब्दें तेंचि
सम्यक ॥ नाहीं आणिक दुजें कांहीं॥२८॥अथवा दुसरें व्याख्यान ऐसें॥ पृथ्वीचे परी अशेष तें असे॥ ह्मणिजे
समग्रपणें तेंचि तें वसे ॥ आन स्वतंत्रपणें नसे वस्तुतरी ॥२९॥ काष्ठ पाषाण तृण वृक्ष लता ॥ मानूनि शि-
खरें पर्वता॥रत्नादि माणि धातु समस्ता ॥ हें सर्व वस्तुता पृथ्वीच जैसी ॥२३०॥तैसें जें जें भासे पदार्थाकार॥
दृश्यमात्रें जें किं मनोहर ॥ तें अशेषहि निर्विकार ॥ ब्रह्म साचार रघुनाथा ॥ ३१॥ नाना प्रयत्नेंकरुनी ॥ ऐसी
स्थिती साधीं कोदंडपाणी ॥ दुजें नभासे आपणावांचूनि ॥ राहे निर्वाणीं तेणें बोधें ॥ ३२ ॥ हे बाणावयाचा
उपाय कोटी ॥ मागां सांगीतल्या गा जगजेठी॥ त्या करूनि होई यासृष्टी ॥ तुजवीण गोठी नाहींच करी॥३३॥
अगा ऐसें अनुभवें बाणलिया ॥ तेंचि आत्मार्चन गा रघुराया ॥ नाहीं विश्वीं आपणावांचूनियां ॥ अनुभव
यया नामें बोलिजे ॥ ३४ ॥ श्लोक ॥ नाहंनचान्यद्वास्मीतिब्रह्मैवास्तिनिरंतरं ॥ आनंदपूर्णसर्वत्रेत्यनुद्वेगाद्रुपा

स्यतां ॥१०॥ टीका ॥ ययालागीं गा श्रीपती ॥ हेंचि अनुसंधान असोंदे चित्तीं ॥ मी तंव अहंपणें नये व्यक्ती॥
नव्हे सर्वार्थीं अन्य वस्तुही॥३५ ॥ मी नव्हे आणिक वस्त्वंतर ॥ किंचित् कदाचित् नव्हे सर्वत्र ॥ येक ब्रह्मचि
निरंतर॥बाह्यंतर मीच येक॥३६॥निरंतर ह्मणिजे अखंड दंडायमान॥सर्वदां काळत्रईं अबाध्य जाण॥ देशें काळें
नपाविजे खंडण ॥ परिपूर्ण पूर्णत्वें॥३७॥तेंचि तें आनंदघन सर्वत्र॥ जेथें दुजें नाहीं वस्तुमात्र ॥ तेंचि उपासावें
निरंतर ॥ ह्मणिजे साचार तद्रूपें राहे॥३८ ॥ रात्रि दिवस त्रिकाळीं सर्वदां॥यातें अनुवेळ ह्मणिजे प्रबुद्धा ॥ दृ-
श्यत्यागें प्रपंचबाधा ॥ करूनि बोधा राहावें ॥ ३९॥ तेंचि आत्मबोधाचें लक्षण ॥ तेंही तुजप्रती गुह्य सांगेन ॥
ऐक एकाग्र करूनियां मन ॥ जेणें समाधान पाविजे ॥३४०॥ श्लोक ॥ ग्राह्यग्राहकसंबंधेसामान्येसर्वदेहिनां॥
योगिनःसावधानत्वमेतदर्चनमात्मनः ॥ ११ ॥ टीका ॥ सर्व प्राणियांच्याठाईं॥ ग्राह्य ग्राहक भाव असे पाहीं॥
सामान्यकाराहि सर्वांहीं ॥ अनपाई असतचि असे ॥४१ ॥ ग्राह्य जे कीं विषयजात ॥ ग्राहकां जीवांचे भोग्य
पदार्थ ॥ ग्राहक तो प्रमाता निश्चित ॥ घेणें घेइजे सर्वहि स्वयें ॥ ४२ ॥ हें सामान्याकारें सर्वांसिही असे ॥
परि याचें अंतर नेणिजे भ्रंशें ॥ योगी तो येथें सावधान असे ॥ तेंही कैसें एक रामा ॥ ४३ ॥ तरी ग्राह्य ग्राह-
क ग्रहण तें दृश्यजात ॥ तें साक्षी चैतन्यें प्रकाशिजेत ॥ परि तो साक्षी आपण हेंचि निश्चीत ॥ वोळखत सर्वदां
योगी ॥ ४४ ॥ जेणें या सर्वांतें प्रकाशणें ॥ तया साक्षीयातें सर्वदां जाणणें ॥ आणि सर्वहि प्रकाशिजे जेणें ॥
तें ज्ञान जाणणें आपणचि ॥ ४५ ॥ जेथें जाणण्याची सावधानता ॥ तेंचि आत्मार्चन गा रघुनाथा ॥ साक्षी

आपण तोचि तत्वतां ॥ त्यातेंचि सर्वथा वोळखणें जें ॥४६॥ प्रकाशकातें वोळखणें ॥ ग्राह्य तें ग्राह्यपणें जाण-णें ॥ तेंचि आत्मार्चन मीं ह्मणें ॥ जाण ये खुणे रघुनाथा॥४७॥आणि ग्राह्य जें किं ह्मणिजे ॥ तेंहि वास्तव ग्रा-हकचि सहजे ॥ ग्राहकेवीण देखिजे ॥ तरी तेंचि बोलिजे वस्तुदृष्टी ॥ ४८ ॥ हें तंव मागां तुज सांगीतलें ॥ जें तुजहूनि ज्ञान नाहीं वेगळें ॥ ज्ञेय ज्ञानेंसि नव्हे निराळें ॥ येकचि भलें पदत्रय ॥ ४९ ॥ ह्मणऊनि ज्ञान तें तूं चि गा रघुपती ॥ ज्ञेय तें ज्ञानाचि सर्वार्थी ॥ परस्परें तिन्ही भिन्न नव्हति॥ येकचि असती तत्वदृष्ट्या॥२५० ॥ ऐसें जें सावधानत्वें देखणें ॥ तेंचि आत्मार्चन ऐसें मी ह्मणे ॥ तेंचि तें आत्मार्चन सर्वदां करणें॥ जाण ये खुणे त्रिदशाधिपा ॥ ५१ ॥ इये स्थितीनें सर्वदां असतां॥कर्ता नव्हे तो कर्म कर्ता ॥ सर्वही तोचि झाला सर्वथा ॥ नाइंके वार्ता दुजयाची ॥५२ ॥ ऐसें साधनत्वें सर्वदां असतां॥ वरकड नव्हे जे संसृतिपंथा ॥ तोचि जाणे ब्रह्म तत्वतां॥साधनता काइसि तेथें॥५३॥ ऐसें ऐकतांचि सद्गुरुवचन॥श्रीरघुनाथ स्वयें सुखसंपन्न॥ब्रह्मानंदें वोसंडले पूर्ण ॥ प्रपंचभान अस्तवलें ॥५४॥ त्यासुखाची सुखगोष्टी ॥ ब्रह्मानंदें हेलावे सृष्टी ॥ व्युत्थानांतरें जगजेठी ॥ करील गोष्टी पुढां कैसी ॥ ५५ ॥ येथें संपलें हें प्रकरण ॥ जें कीं बोलिलें आत्मार्चन ॥ रंगनाथ श्रीकृष्णानं-दासीं शरण ॥ मी तूंपण नुरऊनियां ॥५६॥ श्रीकृष्णानंद सद्गुरुनाथु ॥ तोहि प्रगटिला हा ग्रंथार्थु ॥ त्याचें मुख तें रंगनाथु ॥ प्रकटार्थ तेथूनियां ॥ ५७ ॥ तोचि पुढतोपुढती हेचि विनवणी॥प्रीति पावो सद्गुरुचरणीं॥विनवणी सर्वेचि अर्पुनी ॥ पूर्णपणीं पूर्णत्वें॥२५८॥ ॥ इतिश्रीयो०आत्मार्चनप्र०श्लोक॥११॥ सं०॥५॥ वोवी ॥ २५८ ॥

॥ इति श्रीयोगवासिष्ठसारे आत्मार्चनप्रकरणं समाप्तम् ॥

# अथ श्रीयोगवासिष्ठसारे अष्टम आत्मनिरूपण प्रकरणप्रारंभः

५५



श्रीनीलकंठसद्गुरुभ्योनमः ॥ श्रीसद्गुरुचिया कृपादृष्टी ॥ होय अपरोक्ष वस्तुसी भेटी ॥ तेथें शब्दब्रह्म वाचक सृष्टी ॥ पावे पुष्टी काय नवल ॥ १ ॥ यालागीं सर्वदां सर्वकाळीं ॥ मन रातलें स्नेहें श्रीसद्गुरुचरणकमळीं ॥ घेऊनि तेथींचि सुखनव्हाळी ॥ आनंदमेळीं निमग्न मी ॥२॥ परमानंदाचिया प्राप्ती ॥ सहज इतर विषयां विरक्ति॥यालागीं ते सर्वही नावडती ॥ सर्वदां तृप्ती परमानंदें॥३ ॥ तैसा मी निमग्न सद्गुरुचरणीं ॥ ह्मणऊनि इतर पदार्थांतें नगणी ॥ तेही दुजेपणें नदेखे नयनीं ॥ येकु येकपणीं श्रीसद्गुरुरावो ॥ ४ ॥ अहो मायबाप कुळदेवता ॥ गुरुगुरुत्वें पूज्यतत्वतां ॥ नमाने इतर माझिया चित्ता ॥ येक येकुलता सर्व गुरू ॥ ५ ॥ अहो इतर इष्ट देवताचे नमनीं॥बाह्यत्वें गणेश शारदा भवानी ॥ परि येक देखे सद्गुरुनयनीं ॥ दुजेपणीं मुकलों मी ॥६ ॥ कां मातेलागीं जैसें बाळक ॥ भुकेलें देखे तेंचि सर्वत्र येक॥ तैसें मन माझें सम्यक ॥ श्रीगुरु सर्वत्र देखे॥७॥ सद्गुरुचेनि प्रसन्नपणें ॥ पुरुषासीं येक ज्ञान होणें ॥ ज्ञानें येकचि ब्रह्म पावणें ॥ तरीच निवणें परमानंदें ॥८ ॥ तैसेंचि नव्हे मजलागीं ॥ ज्ञान ज्ञेय ज्ञाता नविभागीं ॥ येक सद्गुरुचि चहूंभागीं ॥ नदेखे जगीं दुजें कांहीं ॥९॥ ज्ञान ज्ञेय आणि ज्ञाता ॥ तो सद्गुरुचि येक तत्वतां ॥ ह्मणऊनि आन मोहर माझिया चित्ता ॥ नव्हेचि आतां काय करूं ॥ १० ॥ असो हें तंव बोलावें किती ॥ गुरुज्ञान तें ज्ञाते जाणती ॥ येर ते शब्दज्ञानी नेणती ॥ आत्मप्राप्ती जया नाहीं ॥ ११ ॥ ते सद्गुरुमहिमा काय जाणती ॥ शब्दें गुरुशिष्यत्वें लौकिकीं मिरविती ॥ अंतरीं नर-

१ रममाण झालें. २ प्राप्ति. ३ मार्ग.

त्वें गुरुसीं देखती ॥ तयासीं प्राप्ती ते शब्दवरी ॥१२॥ असो तो वंदूनि सद्गुरुरावो ॥ केला ग्रंथारंभासी प्रस्तावो ॥ येथें नाहीं मज प्रयासभावो ॥ ग्रंथ सरावो करावया ॥ १३ ॥ अहो ग्रंथ करावयाचे प्रयास ॥ येवढे कासया हे सहास ॥ सिद्ध करूनि सद्गुरुपरेश ॥ मुखीं घांस घाली माझ्या ॥ १४ ॥ जैसें प्रयासेंकरूनि जननी ॥ दधि मथुनियां काढी लोणी ॥ तें आइतें घाली आपत्यवदनीं ॥ गिळतां लागोनि कोण प्रयास ॥ १५ ॥ तैसा मथुनियां हा शब्दसिंधु ॥ मुख्यार्थ काढूनि नवनीतबोधु ॥ घालीं मजमुखीं स्वतःसिधु ॥ अतिअगाध्र गोडपणें ॥ १६ ॥ तो गिळूनियां नवनीत गोळा ॥ धावोनि ढेंकर देतसे वेळोवेळां ॥ तया नामें ग्रंथ झाला ॥ ढेकरमेळा पदबंधू ॥ १७ ॥ ह्मणोनि यालागीं मज प्रयास नाहीं ॥ ग्रंथ हा आइताचि सिद्ध पाहीं ॥ तो संतांसींच रिझॉववया सर्वही ॥ उद्योग पाहीं यया ग्रंथाचा ॥१८॥ आतां माझें इतुकेंचि कारण ॥ जें संन्मुख करावे संतसज्जन॥ तयाचें हेंचि वर्म जाण ॥ बोबडें वचन बोलावें ॥ १९ ॥ अहो वांकुडी पाउलें घाली बाळ ॥ आणि बोबडे बोल बोले रसाळ ॥ देखोनि संन्यासियासीहि कळवळ ॥ स्नेहकल्लोळ नसांवरे ॥ २० ॥ तें सन्मुख होऊनियां प्रती॥ स्नेहें घेऊनियां लाडविती ॥ जरी गुरु तयाची व्यक्ती ॥ आणि वक्रोक्ति वक्रचालणें॥२१॥ तैसा मीं वांकुडयापिसाटां बोलि ॥ संतकृपा येकाकार करी भली ॥ ते संतोषति यया बोली ॥ ग्रंथनव्हाळी त्यालागीं हे ॥ २२ ॥ ते परिसा वांकुडे बोल ॥ परमानंदें जे अतिरसाळ ॥ ते देऊनियां मनाची वोल ॥ ग्रंथ सखोल परिसिजे ॥२३॥

१ रचना. २ बालकाच्या तोंडांत. ३ लोण्याचा. ४ संतोष देण्यास. ५ अनुकूल, समोर. ६ वेड्या.

इतुकीच माझी कृतकृत्यता ॥ जें हातासी ये तुमची प्रसन्नता ॥ तेणें सर्वदां तुमची सन्मुखता ॥ हेंचि निजात्म-
ता निजभावें ॥ २४ ॥ माझिया श्रीगुरुरायें मजलागून ॥ तुह्मीं संत दिधलेति माहेर जोडून ॥ त्या तुह्मा सि
रिझवावया लागुन ॥ ग्रंथ निर्माण बोबड्या बोलीं ॥ २५ ॥ वरी वरी जरी बोबडे बोल ॥ तरी प्रमेय असे अ-
तिसखोल ॥ ते घेतां अतिरसाळ ॥ सप्रेमळ निवति सुखी ॥ २६ ॥ जैसा इक्षुदंड वक्र आणि काळा ॥ तो बाह्य
दिसे जनां सकळां ॥ परी अंतरीं रसगौल्यतेचा मेळा ॥ रस रसाळ अतिप्रिय ॥२७॥ त्याची जंव जंव आटणी
कीजे ॥ तंव ते रसपाकें शर्करा निपजे ॥ तये गोडीचा पार नेणिजे ॥ ते जाणती सहजें रसज्ञ जे कां ॥ २८ ॥
तैसें ययाचा पदच्छेद कीजे ॥ जंव जंव याच्या अंतरीं रिघिजे॥ तंव तंव प्रमेय गोड पाविजे ॥ तेथें ज्ञातीं निव-
डिजे परमानंदें ॥ २९ ॥ यालागीं ग्रंथाचें निर्माण ॥ केलें सन्मुख व्हावया सज्जन ॥ संतसन्मुख ते कृतकृत्यता
पूर्ण ॥ नाहीं अन्यत्रीं सत्यसत्य ॥३०॥ इतुकें बोलतांचि सज्जनीं ॥ माथा डोलविला संतोषुनी ॥ ह्मणती प्रस-
न्न झालों तुजलागुनी ॥ ग्रंथनिर्माणीं प्रवर्त आतां ॥ ३१ ॥ ऐसा लाधोनि महाप्रसादु ॥ तेणें उल्हासला बोध
सिंधु ॥ संतप्रसादें ग्रंथावबोधु ॥ अतिअगाधु परियेसा ॥ ३२ ॥ तरी मागां आत्मार्चनप्रकरण ॥ संपलें संपूर्ण
गोडपण ॥ तेथें आक्षेप करी नंदन ॥ आत्मा कींलक्षण वोळखिजे ॥ ३३ ॥ आधीं आत्मा कींलक्षण जाणावें॥
तरीच आत्मार्चन करावें ॥ हे आशंका करितां अंतर्भावें ॥ श्रीवसिष्ठा स्वभावें कळोंसरलें ॥ ३४ ॥ आतां ऐसें

१ विषय. २ ऊंस. ३ मिळून. ४ शंका.

आत्मार्चन करितां ॥ येथें भेद भासतसे जी तत्वतां ॥ येकी अर्चनीय देवता ॥ दुसरा कर्ता येक आपण ॥३५॥ तरी जीव ब्रह्मासी ऐक्य तें कैसें ॥ हेंही सांगावें सावकाशें ॥ तरी गुरू ह्मणती अपूर्व ऐसें॥ सांगों विश्वेशें ऐकावें ॥ ३६ ॥ वसिष्ठ ह्मणती गा श्रीरघुनाथा ॥ बरवी आशंका केली ताता ॥ तरी आत्मा एवंभूत ऐक आतां ॥ सांगेन तत्वतां जैसा असे ॥ ३७ ॥ तरी पूर्वप्रकरणीं आत्मलक्षण ॥ आणि तदाकार करणें अंतःकरण ॥ तो साक्षात्कार निदिध्यासन ॥ सर्वहि गुरुखुण सांगीतली ॥ ३८ ॥ तथापि दृढीकरणार्थ निरूपण ॥ केलेंचि आत्मयाचें कीजेल जाण ॥ आणि जीवची हें ब्रह्म हे खुण ॥ सांगों निर्वाण ब्रह्मात्मैक्य ॥३९॥ तरी देहेंद्रियसंघातेंकरून ॥ आत्मतत्व नकळे भ्रमून ॥ जीव तोचि परमात्मा जाण ॥ केल्या निरसन उपाधीचें॥४०॥ उपाधीकरितां भ्रमती ॥ शुद्ध आत्मा ऐसें नेणती ॥ ह्मणऊनि प्रश्न तुझा रघुपती ॥ तरी ऐके स्थिती सांगेन ॥४१॥ ऐसी प्रतिज्ञा स्वीकारुनी ॥ वसिष्ठ निरूपिती कोदंडपाणी ॥ सांगों आत्मनिरूपण इये जनीं ॥ प्रकरणाभिधानी पावलें ॥ ४२ ॥ तेंचि आत्मनिरूपण आतां ॥ सांगीजेल परिसावें श्रोता ॥ आत्मनिरूपण श्रवण करितां ॥ होय तत्वतां स्वयें तो ब्रह्म ॥ ४३ ॥ ह्मणोनि एकाग्र ऐकिजे ॥ आत्मा एवंविध ऐसें जाणिजे ॥ तंव वसिष्ठचि बोलिजे ॥ स्वयें घेइजे लक्षणेंकरुनी ॥ ४४ ॥ श्लोक ॥ तस्मिन्देहेंद्रियादीनांसंघातेस्फुरतिस्वतः ॥ अहंसोहमयंभावःसजीवोमलगुंठितः ॥ १ ॥ टीका ॥ तरी तेंचि आत्मयाचें स्वरूप जाण ॥ जया उपाधिमेळें आलें जीव-



१ उपासना करण्यास योग्य. २ समुदायानें.

पण ॥ उपाधिनिरासें ब्रह्म पूर्ण ॥ हेचि खुण परियेसी॥४५॥तरी हे जयाच्याठाईं॥ देहेंद्रियादि समूह पाहीं॥भासती जाण जेथें सर्वही ॥ तोचि निःसंदेही जीव जाण॥४६॥ते सकळही जीव रघुनाथा॥ ब्रह्मीं भासती तत्वतां॥ आणि देहेंद्रियादि संघाता ॥ भासणें ताता जयाच्याठायीं ॥ ४७ ॥ हे समष्टि व्यष्टिरूपें असे ॥ यालागीं देहेंद्रियादि जीविं भासे ॥ तोचि जीव हें विश्वासें ॥ रघुवंशें जाणावें ॥ ४८ ॥ मनादि इंद्रिय देहद्वयसंपत्ति ॥ स्वतांचि जेथें हेचि सर्व स्फुरती ॥ तेंचि जाण जीवाचि व्यक्ती ॥ श्रीरघुपती निश्चयें ॥ ४९ ॥ हें नकळे तरी ऐकें दुसरें ॥ जाणतें वर्म सांगों निर्धारें ॥ तरी हें अहं सोहं अयं जेथें स्फुरे ॥ जाण तें खरें जीवतत्व ॥ ५० ॥ तरी अहं हें देहातें ह्मणे ॥ सोहं शब्दें करणें समुदाय मनें ॥ अयं शब्दें हा आत्मपणें ॥ अपरोक्षगुणें स्फुरतसे॥५१॥ परी हें समूळ गुंठित जाणावें ॥ कां जें अहंकारमिश्रित स्वभावें ॥ यालागीं समूळ तत्व ह्मणावें ॥ वर्म जाणावें अयोध्यापती ॥ ५२ ॥ हा मळत्याग केलिया तेंचि ब्रह्म ॥याचेंहि सांगों तुज वर्म ॥ जीवपणें अहं सोहं इत्यादि भ्रम ॥ तुरे विभ्रमें जीवत्वनाशें ॥ ५३ ॥ श्लोक ॥ सर्वमेवचिदाकारंब्रह्मेतिघननिश्चय ॥ स्थितिंयातेशमंयाति जीवोनिःस्नेहदीपवत्॥ २ ॥ टीका ॥ हें सर्वाहि जगजाळ ॥ सच्चिदानंदचि ब्रह्म केवळ ॥ ऐसा दृढ निश्चय अढळ ॥ स्थिति निर्मळ पावे जीव॥ ५४ ॥ असंदिग्धपणें ब्रह्मावबोध ॥ जगत्वीं झाला यया विशद ॥ मिथ्यात्वें जग पावोनि बाध ॥ ब्रह्म निर्विवाद स्फुरे जया ॥ ५५॥ तेंसीच बाणल्या अखंड स्थिती ॥ अहं सोहं भाव

१ ब्रह्मांड. २ पिंडरूपानें. ३ उत्पन्न होतात. ४ भ्रांति. ५ निःसंशय. ६ स्पष्ट.

नुपजती ॥ नदेखे भिन्नत्वें विश्वस्थिती ॥ तरीच शांति जीवित्वाची ॥५६॥ सर्वे स्फुरतां ब्रह्मभावा ॥ मग जीव
जीवित्वा कैंचा ठावो ॥ स्नेहाभावें दीपाचा अभावो ॥ तैसा जीवभावो मळनाशें ॥ ५७ ॥ जंव देहादिक स-
त्यत्वें भासती ॥ अहं सोहं अयं हे व्यक्ति ॥ तंवचि जीवपणाची स्थिती ॥ जाण रघुपती निश्चयें ॥५८॥ उपा-
धिनाशें जीवाची शांति ॥ जीव नाहींच होय गा रघुपती ॥ जळ आटलिया प्रतिबिंबव्यक्ति ॥ त्रिजगतीं पाह-
तां नदिसे ॥ ५९ ॥ घट नासलीया घटाकाश ॥ मठ भंगलिया मठाकाश ॥ नुरे जैसा प्रतिभास ॥ दर्पणास
नेलिया ॥६० ॥ तैसें मुख्य उपाधि नासलिया ॥ उपाधीगत जीव जाय लया ॥ मग ब्रह्मचि येक येकलिया ॥
उरे रघुराया उपाधिहीन ॥ ६१ ॥ मुख्य उपाधी जो जीवाचा ॥ अंतर सूक्ष्म जो नेटाचा ॥ तोही सांगों एक त्या-
चा ॥ विवेक साचा रघुनाथा ॥ ६२ ॥ ॥ तरी मन बुद्धी आणि अहंकार ॥ येकचि पार पावले भेदांतर ॥ तें
उपाधि करितां व्यापार ॥ तदनुसार नावें पडती ॥ ६३ ॥ येका अंतःकरणाच्या वृत्ती ॥ व्यापाररूपें चतुर्धा[1] वि-
भागती ॥ मन बुद्धी चित्त अहंकार ह्मणती ॥ तेथें चिच्छक्ती जीवत्वें बिंबे ॥६४ ॥ बुद्धींत प्रतिबिंबित जें चैतन्य॥
तया उपाधीवशें आलें जीवपण ॥ तेणें विभागलेनी अहं सोहंपण ॥ उठी अयंपण त्रिपुटी हे ॥ ६५ ॥ अहंकारें
देहा अहं ह्मणत॥सोहंकारें मन बुद्धी योग उठीत ॥ बुद्धीनें आपणा अयं ह्मणत ॥उपाधिवशें संतत त्रिविध ऐसा
॥ ६६ ॥ या त्रयापासाव गा रघुनाथा ॥ भासती विश्वव्यक्ती समस्ता ॥ जीवत्व दृढावे तेणेंकरितां ॥ हें नास-

१ चारप्रकारांनीं.

तां जीवा नाशु ॥ ६७ ॥ टवळांचें स्नेह जेव्हांचि सरे ॥ तेव्हांचि दीप कोठें उरे ॥ दर्पण नेलिया मुख वोसरे ॥ मुख्य तें उरे उपाधिहीन ॥ ६८ ॥ तो जीव नासलिया रघुनाथा ॥ उरे शुद्ध ब्रह्मचि तत्वतां ॥ तेणेंचि होय आत्मनिश्चयार्था ॥ आलें पंथा अनुभवाच्या ॥ ६९ ॥ ऐसीया खुणा सांगेन तुज ॥ तेणें आत्मा कोण हें बुझ ॥ तो जाणतां कृतकृत्य सहज ॥ सरे व्याज भवभयाचें ॥७०॥ अगा सर्वहि ब्रह्मचि असे ॥ जीव तोहि ब्रह्मत्वेंचि वसे ॥ परि नाथिलेंचि जीवत्व घेऊनि बैसे ॥ आणि पिसें नेणपणाचें ॥ ७१ ॥ जैसा उत्तम उत्तमत्वा टाकुनी ॥ भ्रमें अधमत्व आपणा मानी ॥ संन्यासी अंत्यज होय स्वप्नीं ॥ नाठवे मनीं उत्तमत्व ॥ ७२ ॥ तैसा स्वयें ब्रह्म असोनि ॥ भ्रमें आपणा जीवत्व आणी ॥ तेणें भ्रंशे स्वस्वरूपापासुनी ॥ शोच्य सर्व गुणी जीवपणें ॥ ७३ ॥ ॥ श्लोक ॥ स्वमहत्वंयथोपेक्ष्यकश्चिद्विप्रोदुरीहया ॥ अंगीकारोतिशूद्रत्वंतथाजीवत्वमीश्वरः ॥ ३ ॥ टीका ॥ अगा कोणीयेक ब्राह्मण ॥ आपुलें शुद्ध महत्व उपेक्षून ॥ आपुलिया विस्मरणेंकरून ॥ शूद्रपण अंगिकारी ॥ ७४ ॥ शूद्रपणाचीं कर्मे करी ॥ तेणें शूद्रपण आपणा निर्धारी ॥ सहस्त्रीं सांगतांहि क्षणभरी ॥ सोय पुरी नधरीच ॥ ॥ ७५ ॥ तैसा कर्ता भोक्ता येणें अध्यासें ॥ ईश्वरासी जीवपणाचें पिसें ॥ तेंचि धरूनियां भ्रमें बैसे ॥ नेणे सर्वांशें ईश्वरत्व ॥ ७६ ॥ आपुलें सत्ताप्रकाशसुख ॥ ब्रह्मत्व सांडी स्वयें अशेष ॥ ईश्वरत्व ऐश्वर्यादि सम्यक ॥ विसरे देख जीवभ्रमें ॥ ७७ ॥ देहादिकाचेनि अध्यासें ॥ ईश्वरासीं जीवपणाचें पिसें ॥ येरवीं तो स्वयेंचि शुद्ध

१ दिव्याचें चाडें. २ तेल. ३ समज. ४ लटिकें. ५ अतिशूद्र. ६ संपूर्ण.

असे ॥ आत्मा ऐसा जाण रामा ॥ ७८ ॥ आणि वास्तव तरी हा शरीर नव्हे ॥ परि स्वसंकल्पें शरीर भावे ॥ शरीर मानी गा स्वभावें ॥ तेणेंचि गौरवें श्लाघ्यतु ॥ ७९ ॥ श्लोक ॥ असत्यमेवसंकल्पभ्रमेणेदंशरीरकं ॥ जीवः पश्यतिमूढात्माबालोयक्षमिवस्थितं ॥ ४ ॥ टीका ॥ अगा सत्य जें किं शरीर ॥ जागृतीदशेचें भ्रमसार ॥ स्वयें संकल्पुनी नश्वर ॥ तदनुसार वर्तत ॥ ८० ॥ असत्य देह ते जाण ऐसे ॥ नश्वर परिणामीं तरी प्रत्यक्ष दिसे ॥ हें सांगतां सावकाशें ॥ विस्तार असे ग्रंथासि पैं ॥ ८१ ॥ क्षणक्षणा परिणाम पावत ॥ बाल्य तारुण्य वार्धक्य भोगीत ॥ इतर शरीराचा नाश देखत ॥ नैश्वरार्थ प्रत्यक्ष सिद्धचि असे ॥ ८२ ॥ आणि शरीरभ्रम जागृतिसीं दिसे ॥ स्वप्नीं तो आणीकचि भासे ॥ सुषुप्तीसीं तरी कांहींच नदिसे ॥ तरी साच कैसें ह्मणावें ॥ ८३ ॥ ऐसें असत्य जें कीं शरीर ॥ तेणें नसतचि संकल्पीं साचार ॥ त्यातेंचि ह्मणे मी साकार ॥ भ्रम थोर घेवोनि बैसे ॥ ८४ ॥ हें मन संकल्पीं तरी साचार भासे ॥ मन नसतां कोठेंचि नदिसे ॥ यालागीं मन संकल्पित हें सर्वांशें ॥ भासतसे मिथ्याध्यासें[1] ॥ ८५ ॥ ऐसें असत्य हें जें शरीर ॥ तें भ्रमें संकल्पूनि साकार ॥ आपण असोनि निर्विकार ॥ भ्रमें शरीर आपणा मानी ॥ ८६ ॥ स्वस्वरूपाचे विस्मरणेंकरूनि ॥ विपरीताध्यास होय भरवसेनी ॥ विपरीत तें देहादि कोदंडपाणी ॥ नसतें संकल्पूनि आपण ह्मणे ॥ ८७ ॥ तया सत्य संकल्पूनि मी ह्मणत ॥ तो जीव शब्दें जाण निश्चित ॥ अतएव मूढ ऐसें ह्मणिजेत ॥ अविवेकयुक्त ह्मणोनियां ॥ ८८ ॥ अगा सत्कर्माचें अनुष्ठान ॥ ना-

१ मिथ्याभास, भ्रांति.

हीं घडलें ईश्वरभजन ॥ स्वप्नींहि नेणे साधुसेवन ॥ तो श्रीगुरुचरण काय देखे॥८९॥तया कैंची चित्तशुद्धी ॥ म-
लिनत्वें विषयाकार बुद्धी ॥ ते काय पावती स्वरूपसिद्धी ॥ ह्मणोनि मूढधी नांव पावे ॥ ९० ॥ आत्मा शब्दें
बुद्धि जाण ॥ तियेचें सत्कर्मादिकीं नाहीं शोधन ॥ ह्मणऊनि सर्वदां ते मलीन ॥ मूढपण यया नाम ॥ ९१ ॥
आत्मा बुद्धीचा प्रकाशक ॥ बुद्धी दर्पणीं भासे बोधार्क ॥ बुद्धीमालिन्यें आत्मावलोक ॥ नव्हे निष्टंकें[2] रघुराया ॥
॥ ९२ ॥ जैसें दर्पणाचेनि मळीणपणें ॥ मुखासीं वक्रादि विकार होणें ॥ अतिमालिन्यें भासणें ॥ दर्पणेंचि क-
रणें प्रकार नाना ॥ ९३ ॥ मुख मुखीं शुद्धाचि असे ॥ वक्रादि विरूप भावहि नसे ॥ परि दर्पणाचिसारखें भासे॥
शुद्ध दिसे जैसें तैसें ॥ ९४ ॥ ह्मणोनि दर्पणची सहाणे लाविती ॥ तेणें भासे शुद्ध मुखप्रतीति ॥ परी दर्पणाप-
राधें सहाणे नतोडिती ॥ मुख सर्वार्थी रघुराया ॥ ९५ ॥ तैसी बुद्धी दर्पणासीं सत्कर्मादिकीं ॥ शुद्धता कीजे
बरवी येकीं ॥ तरीच आत्मोपलब्धी[3] अतिनिकी ॥ होय निष्टंकी रघुपुंगवा ॥ ९६ ॥ तैसें बुद्धीचें नव्हे शोधन ॥
ह्मणऊनि राहिलें मळीणपण ॥ अविवेकें राहे निमग्न ॥ तेंच मूढपण बुद्धीचें ॥ ९७ ॥ तिये बुद्धीसिं मळिणत्व
जाण॥ कदापि नघडे स्वस्वरूपदर्शन ॥ ह्मणऊनि देहचि देखे विपरीतभान ॥ यक्षाचें भान बाळका जैसें॥९८॥
बागुल साच तरी नाहीं ॥ परि बाळें नसतांचि कल्पिला पाहिं ॥ साच मानूनि तो कांपे देहिं ॥ किंबहुना पा-
हि देहांत पावे ॥ ९९ ॥ स्वयें आपणातें विसरे ॥ कल्पित बागुलपणें आविर्स्फुरे[4] ॥ तेणें आंगासिं आणी श-

१ मूर्ख, अक्कलशून्य. २ निश्चयेंकरून. ३ आत्मप्राप्ती. ४ प्रकट होई.

हारे ॥ भयें भरे नसतेंचि ॥ १०० ॥ तैसें आपण असतां सुखस्वरूप ॥ नसता देहाचा करी आरोप ॥ देहपणें दुःखें अमुप ॥ भयकंप मरणवरी ॥ १ ॥ अगा आपुलें विसरोनि आत्मपण ॥ मिथ्याभ्रमें देहारोपण ॥ करूनि तदनुसार वर्ते आपण ॥ काय अज्ञानत्व वानूं त्याचें ॥ २ ॥ यदर्थी दृष्टांत सांगेन ॥ एक रघुनाथा तुजलागून ॥ जेणें वर्म याचें संपूर्ण ॥ बुझसी जाण रघुनाथा ॥ ३ ॥ ॥ श्लोक ॥ मृन्मयेभेभत्वंशिशुरध्यस्यधावति ॥ अध्यस्यात्मनिदेहादीन्मूढस्तद्वद्विचेष्टते ॥ ५ ॥ टीका ॥ अगा मृन्मय कुंजराच्याठाईं ॥ बालक हस्तित्व आरोपी पाहिं ॥ मग तद्रूपें पळे दिशा दाही ॥ विश्रांति कांहीं नपावे तो ॥ ४ ॥ जेंव्हां मिळेल एखादा सांगता ॥ बाळा हा हस्ति नव्हे रे तत्वतां ॥ हे मृत्तिकाचि प्रत्यक्ष दिसतां ॥ कुंजरभ्रांता असेचिना ॥ ५ ॥ तेंव्हां सावध होऊनि पाहे ॥ ह्मणे हे तंव मृत्तिकाचि आहे ॥ हा हस्ति ह्मणणें भ्रमु होय ॥ जाणोनि राहे सुखरूप ॥ ६ ॥ तैसें आत्मयाच्या ठाईं ॥ नसतें कल्पूनि देहादि कांहीं ॥ मूढ चेष्टे तदनुसार सर्वही ॥ विस्मय पाही रघुवर्या ॥ ७ ॥ देहानुसारें चेष्टा करी ॥ कर्तृत्व भोक्तृत्व घे मस्तकावरी ॥ स्त्री पुत्राधीन सर्वोपरी ॥ देहबुद्धीवरी होतसे ॥ ८ ॥ विचारितां देह तंव साच नसे ॥ तेथें नांथिलें कल्पूनियां मानसें ॥ तेंचि आत्मत्व घेऊनियां बैसे ॥ तदनुध्यासें वर्ते आपण ॥ ९ ॥ तुह्मी ह्मणाल सर्व आत्माचि असे ॥ सर्व दृश्य तें मिथ्या भासे ॥ तरी साच तेंचि कां नदिसे ॥ मिथ्याचि कैसें लोक घेती ॥ ११० ॥ हें तंव कुंजरदृष्टांतेंकरून निरोपिलें ॥ परि तें नाहीं तुह्मासि कळलें ॥ तरी ऐका आतां

१ मातीचा. २ हत्ती. ३ मिथ्या, लटिकें.

सांगेन तें भलें ॥ जेणें उकलें भ्रमजाळ ॥ ११ ॥ तरी मृत्तिकेचा जो हस्ती ॥ तोतरी मृत्तिकाच सर्वार्थी ॥ परि सावयवत्वें भासे हस्ती ॥ नामप्रतीति अवयवांची ॥ १२ ॥ नामाचसारखी आकृती ॥ आकृतीनें नामाची प्रतीति ॥ हें तंव प्रत्यक्ष भासे सर्वांप्रती ॥ सांगणें किती फाडोवाडें ॥१३॥ मस्तकाकार मस्तक दिसे ॥ तेणेंचि मस्तक नाम निर्दिशे ॥ कर्ण कर्णापरी भासे ॥ कर्ण ऐसें नाम ठेविती ॥ १४ ॥ नासिक शुंडादंड प्रबळ ॥ चरण चरणत्वें नेत्र गोळ ॥ विचारितां मृत्तिकाचि केवळ ॥ कैंचा मेळ अवयवांचा ॥ १५ ॥ नाथिला आकारु नाथिलें नाम ॥ मृत्तिकेच्याठायीं केवढा भ्रम ॥ तें सत्य मानी तो नराधम ॥ अतिनिःसीम अज्ञानी ॥१६॥ प्रत्यक्ष मृत्तिकाचि दिसे ॥ तेथें नाम रूप मानी कुंजराध्यासें ॥ तेणें आपणा लाविलें पिसें ॥ कोण दशे आणिला तो ॥ ॥ १७ ॥ नाना चित्रपट भासे दृष्टी ॥ तेथें अनेक कल्पित सृष्टी ॥ अश्व हस्ती पदाति कोटी ॥ सैन्यपरिपाठी चतुर्विधा ॥ १८ ॥ तेथें नाना अवयव नाना नामें ॥ येक सुखी दुःखी संभ्रमें ॥ येके व्यवहारें येके नियमें ॥ येके निःसीमें ध्यानारूढ ॥ १९ ॥ कूप विहिरी तडाग नदी ॥ आंत जळचर समृद्धी॥ अग्नि आणि नाना औषधी ॥ आधि व्याधी येकासीं कल्पी ॥ १२० ॥ किंबहुना पटाच्याठाईं ॥ तो ही येकला येक पाहीं ॥ तेथें सर्व नाना रूपें कल्पुनीहि ॥ येकचि येहीं रूपेंचि भासे ॥ २१ ॥ नाना कुंडयादिकांचे चित्र ॥ मूर्ख कल्पी अतिविचित्र ॥ रज्जु सर्प शुक्ति रजतसूत्र ॥ नीळिमा सर्वत्र आकाशीं ॥ २२॥ इत्यादि दृष्टांत सांगों किती ॥ तूं तंव जाणसी गा

१ नष्ट झालें. २ अवयवांच्या आकृतीनें. ३ पुष्कळ, स्पष्ट. ४ पायदळ. ५ रीत. ६ तळें.

रघुपती ॥ तैसेंचि आत्मत्वीं देहादि व्यक्ती ॥ भासे पंक्ती नामरूपाची ॥२३॥ तें नाथिलें कल्पूनि आपण ॥ करीतसे तदनुसार वर्तन ॥ तोचि आत्मा अज्ञानेंकरून ॥ देहादि भान स्वयें भावी ॥ २४ ॥ होंचि जरी विचारें करून ॥ वास्तव्य तें जाणे आपण ॥ तरी तया नव्हे सुखदुःखभान ॥ कैंचें अज्ञान भ्रम कैंचा ॥२५॥ अगा नाथिलेंचि कल्पूनि दुजेपण ॥ तेंचि सत्यत्वें स्वयें मानून ॥ सुखदुःख पावे भ्रमेंकरून ॥ संसारदैन्य भोगीतसे ॥ ॥ २६ ॥ तेंचि सद्गुरूचिया कृपाभरें॥ फिटलें अज्ञानाचें भेडरें ॥ तरीच आत्मविचार संचरे ॥ लाभे निर्धारें आपणया ॥ २७ ॥ तेंचि दृष्टांतें सांगेन ॥ ऐकें श्रीरामा चित्त देऊन ॥ जेणें निरसे हें भवअज्ञान ॥ द्वैतभान नाहींच होय ॥२८॥ अहो प्रबोधिलीया जैसें ॥ स्वप्नडिंब नाहींच भासे ॥ स्वयें येकला येकच असे ॥ कैंचें पिसें द्वैताचें ॥ २९ ॥ श्लोक ॥ चित्रसर्पः परिज्ञातोनभवद्भयदोयथा ॥ जीवसर्पपरिज्ञातोनतथासुखदुःखदः ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ तरी चित्रसर्प जंव भासत ॥ तंव प्राणांतभयें असे कांपत ॥ दुःखें होय व्याकुळित ॥ नेणे मात मिथ्यत्वाची ॥१३० ॥ तोचि वास्तव नाहींसा कळला ॥ तेव्हां भयकंप नेणो काय झाला ॥ दुःखत्यागें सुख पावला ॥ उरग झाला काय नेणों॥ ३१ ॥ तैसा हा जीवसर्प गा रघुपती ॥ अज्ञानी जीवत्वें देखती ॥ कर्ता भोक्ता ऐसें ह्मणती ॥ अनुभविती सुख दुःखें ॥ ३२ ॥ आपण कोणीयेक जीव असे ॥ भ्रमें दुःख भोगी देहाध्यासें तंव तंव जन्मांतर पावतसे ॥ उसंत नसे क्षणभरी ॥३३ ॥ तोचि सद्गुरुकृपालेशें ॥ तेणेंचि विवेकें विचारु बैसे ॥

१ भय. २ जागृती पावला असतां. ३ सर्प. ४ विसांवा.

ह्मणे देहादिक मज दृश्य असे ॥ मी वेगळा असें द्रष्टेपणें॥३४ ॥जीव ऐसें आपणा ह्मणतां ॥ या देहेंद्रियांचा प्रकाशिता ॥ तो मी येथें कोण तत्वतां ॥ मन तंव सर्वथा मी नव्हे ॥ ३५ ॥ मनातें स्वयें असे देखत ॥ बुद्धीतेंही मीच प्रकाशित ॥ तरी मी ऐसें जो ह्मणत ॥ कोण हेतु कोणा ठायां ॥ ३६ ॥ तरी मी ह्मणतां तो अहंकार ॥ तोहि मज दृश्य निरंतर ॥ बुद्ध्यादिकांचा साक्षी साचार॥ अतिथोर थोरपणें मी॥३७॥ ऐसा तो मी कोण येथें ॥ जीव मी ऐसा ह्मणे कोणातें ॥ ऐसें विचारितां विचारु तेथें ॥ मुरे जेथें तो आपण॥३८॥ हें जाणणेंचि जाणतां ॥ तंव जीवसर्प गेला गा रघुनाथा ॥ दीपेंकरूनि तम पाहतां ॥ प्रकाश हाता येतसे जैसा ॥ ३९ ॥ जैसा निद्रिस्थ निद्रा धरूं जाय ॥ तंव जागेपणा वरपडा होय ॥ स्वप्नडिंब जंव पाहों जाय ॥ तंव स्वयेंचि लाहे जयापरी॥ ॥ १४० ॥ तैसें आपुलें जीवत्व पाहों जाय ॥ तंव तें साक्षित्वचि हातासि ये ॥ स्वसुखें सुखरूप राहे ॥ दुःख काय कैंचें तेथें ॥४१॥ जीवपणाचें जें सुख दुःख ॥ तें तत्काळ हारपे तेथें देख ॥ आपला आपण येकला येक॥ नेणे क्लेश देख जीवत्वाचा ॥४२॥ हें अज्ञानकृत जीवटवाळ ॥ आपणा नेणोनि शुद्ध निर्मळ ॥ होतो सुखदुःखें व्याकुळ ॥ आति तळमळ शोच्यतेचि ॥४३॥ ऐसें विचारमात्रेंचि गा रघुराया ॥ पावे आपण आपुलिया ठायां ॥ गेली समूळ अविद्यामाया ॥ सद्गुरुपायां सेवितांची ॥४४॥ यालागीं आपणची आत्मा असे ॥ तें नेणोनि अंगीं जीवपणाचें पिसें ॥ अविचारें अरंबळतु असे ॥ विचार वसे स्वस्वरूपीं ॥ ४५ ॥ इत्यादि खुणा गा रघु-

१ अंधःकार. २ सांपडलेला, प्राप्त. ३ स्वप्नाचा प्रतिभास. ४ लाभे. ५ ओरडतो.

पती ॥ तुज करितसे आत्मव्यक्ती ॥ हें जाणोनि राहे ब्रह्मसंविंती ॥ जेणें भ्रांती कदां नव्हे ॥ ४६ ॥ श्लोक ॥ स्त्रजिसर्पोयथाध्यस्तोमालायामेवलीयते ॥ आत्मनःप्रोत्थितोभेदस्वात्मन्येवविलीयते ॥ ७ ॥ टीका ॥ अगा जैसा माळेच्याठायीं ॥ सर्प अध्यस्त भासे पाहीं ॥ वास्तव तंव सर्वथा नाहीं ॥ स्त्रजीच पाहीं स्वस्वरूपें ॥ ॥ ४७ ॥ ते येकली येक आपुल्या स्वरूपें ॥ स्त्रजीचि असे निजस्वरूपें ॥ तेथें व्यर्थचि भासिजे सर्पें ॥ अज्ञानदर्पें अध्यास तो ॥ ४८ ॥ अधिष्ठानीं तंव दुजें नाहीं ॥ आणि तेथें आरोपिती जें दुजें कांहीं ॥ यया नाम गा अध्यस्तही ॥ आन ते ठांईं भाविती ॥ ४९ ॥ अगा माळेनें सर्प देखिला नाहीं ॥ नाते आपण सर्प झाली नाहीं ॥ मा आला गेला मात ते कांहीं ॥ नेणे स्वप्नींहि कोणेंकाळीं ॥ १५० ॥ तेथें भ्रमेंकरूनियां गा रघुनाथा ॥ सर्पारोप करिती तत्वतां ॥ माळा ते नोहे सर्प सर्वथा ॥ व्यर्थ वार्ता वाढविती ॥ ५१ ॥ तोचि विचारूनि पाहिजे ॥ तंव सर्प कोठेंचि न देखिजे ॥ माळा ते माळाचि जाणिजे ॥ आरोप सहजे मिथ्या भ्रमु ॥ ५२ ॥ सर्प माळेच्याठाईं आरोपित ॥ तो माळेचिमाजी लय पावत ॥ व्यर्थ आला गेला ह्मणिजेत ॥ असे निश्चित माळाचि येकी ॥ ५३ ॥ तैसें आत्मयाच्याठाईं ॥ देहादि भेद भासे पाहीं ॥ मन बुद्धी इंद्रियें सर्वही ॥ अहंकार पाहिं नानाकार ॥ ५४ ॥ इत्यादि चित्रविचित्र गा रघुपती ॥ आत्मयाच्याठाईं भेद देखती ॥ नसता भ्रम कल्पिती ॥ वास्तव स्थिती नेणोनियां ॥ ५५ ॥ तो सद्गुरुचिया कृपादृष्टी ॥ विवेक प्रवेशे भेदाच्या पोटीं ॥ तंव तो

१ ब्रह्मज्ञानात, ब्रह्मस्वरूपीं. २ सूक्ष्म, काल्पनिक.

कर्ता कारण ॥ कर्तृत्वादिहि निमोन ॥ ब्रह्मचि पूर्ण पूर्णत्वें ॥ १८ ॥ सर्वही जितुका जगदाभास ॥ जाण तांचि ब्रह्म उदास ॥ पाताळ मृत्युलोक स्वर्गास ॥ नित्यनिवास सर्वपणें ॥ १९ ॥ दिशा विदिशा अंतराळ ॥ उत्तर दक्षिणादि दिशामेळ ॥ कुळाचळादिं नभमंडळ ॥ श्रुति निर्मळ ऐसेंचि बोले ॥ २० ॥ छांदोग्यश्रुति ॥ सएवाधस्तात्सउपरिष्टात्सपश्चात्सपुरस्तात्सदक्षिणतः सउत्तरतः सएवेदंसर्वमिति ॥ ११ ॥ टीका ॥ पुत्र दारादि सुत्हृद्पणें ॥ ब्रह्मचि स्फुरे रूप तेणें ॥ देणें घेणें चालणें बोलणें ॥ निद्रा जेवणें तद्रूपची ॥ २१ ॥ श्रवण श्रवणीय श्रोता ॥ वचन वक्तव्य वक्ता ॥ भोगणें भोग्य भोक्ता ॥ ब्रह्म तत्वतां परिपूर्ण येक ॥ २२ ॥ दृश्य द्रष्टा आणि दर्शन ॥ कर्ता क्रियादि कारण ॥ ज्ञाता ज्ञेय आणि ज्ञान ॥ त्रिपुटी पूर्ण ब्रह्म येक ॥ २३ ॥ जें जें मी पाहों जाय दृष्टी ॥ तें तें सर्व ब्रह्मरूपेंचि उठी ॥ श्रवणें शब्दार्थ जो घोटी ॥ तो ब्रह्मपुष्टी पूर्णत्वें ॥ २४ ॥ स्पर्शू जातां स्पर्शन ॥ स्पर्श तो ब्रह्मरूपचि जाण ॥ घ्राणें करितां अवघ्राण ॥ समसमान परब्रह्म ॥ २५ ॥ जे जे रसन[illegible] रसगोडी ॥ ते गोडीसहित ब्रह्मनिरंवडी ॥ वाचा वाचक परवडी ॥ ब्रह्म[illegible]
देणें ॥ चरणचरणाचें गति चालणें ॥ शिश्नशिश्नेसिं रतिसुख भोगणें ॥ [illegible]
चा व्यापार ॥ व्यापारीं व्यापार निर्विकार ॥ एवं सकळहि येका[illegible]
चें मनपण संकल्पन ॥ तें तें जाण ब्रह्मपूर्ण ॥ बुद्धिबुद्धीचें बोद्धव्य[illegible]

---

१ पर्वत. २ श्वास. ३ कौशल्य.

ब्रह्मावेगळें कांहीं ॥ बोलिज एस दुज [illegible] ॥ [illegible]
पाणी कोंदलें पाणिये ॥ तरी परिपूर्ण तेथेंचि राहे ॥ [illegible]
आकाश कोंदलें आकाशीं ॥ येणें जाणें नघडे तयासीं ॥ घेणें देणें [illegible]
॥ ३२ ॥ दृष्टि कोंदली बुबुळीं ॥ बुबुळ बुबुळा खेवें कवळी ॥ कापुर [illegible]
जैसा ॥ ३३ ॥ क्षीराब्धि उचंबळे क्षीरें ॥ तथें येणें जाणें सहजेंचि मुरे [illegible]
दुसरें बोलावया ॥ ३४ ॥ जैसें कल्पांतीचें उदक ॥ सबराभरित भरलें येक ॥ त [illegible] नष्टंक ॥ स[illegible]
सम्यक निघोटपणें ॥ ३५ ॥संमति ॥ किंकरोमिक्कगच्छामिकिंगृण्हामित्यजामिकिं॥ आत्मनापूरितंसर्वंमहाक-
ल्पांबुनायथा ॥ २५ ॥ टीका ॥ यालागीं नलगे येणें जाणें ॥ करणें तें करणें ब्रह्मपणें ॥ होणें नहोणें जेणें
भासणें ॥ तें कोंदणें तेंचि परब्रह्म ॥ ३६ ॥ यालागीं जैसा आहे तैसिया रिती ॥ सुरवर्या राहे सहजस्थिती ॥
ह्मणउनी प्रेमें वसिष्ठ आलिंगिती ॥ यशस्थिती बाणली पूर्ण ॥ ३७ ॥ देह झाला रोमांचित ॥ प्रेमें कंठचि दा-
टत ॥ नयनीं अश्रु लोटले भरित ॥ जैसें गळत कर्दळीपुटें ॥ ३८ ॥ आनंद नमाये त्द्दयांबरीं ॥ तो बाह्य
फांकला इंद्रियद्वारीं ॥ स्वेदकणं दाटले शरीरिं ॥ सुखें थरारी देह कांपे ॥ ३९ ॥ शुद्धतत्वाचें उत्थान ॥ आ-
नंदें येतसे स्पंदन ॥ ऐसें ऐक्य कोंदलें संपूर्ण ॥ देहीं मीपण विसरला ॥ ९४० ॥ आनंद नमाय सृष्टीं ॥ वृत्या

१ सुवासांत. २ अंतर्बाह्य. ३ निश्चयेंकरून. ४ केळींतला रस. ५ घाम.

नंद विराला पोटीं ॥ मग सच्चिदानंद तटतटी ॥ सर्वत्र दाटे कोंदलेपणें ॥ ४१ ॥ अष्टही भाव सात्विकपणीं ॥
उपशमले सत्वगुणीं ॥ सत्व मिळालें उपशमनीं ॥ कोंदलें निर्वाणीं ब्रह्मसुख ॥४२॥ ब्रह्मसुखें नकळे दिंवा राति॥
ना नदिसे दृश्यांचिये व्यक्ती ॥ स्वप्रकाशक स्वयंज्योती ॥ नित्यानंदभरित नित्यानंदें ॥ ४३ ॥ हें देखोनि-
यां वसिष्ठऋषी ॥ आनंद पूर्ण नसांठे मानसीं ॥ शिष्याचेनि पूर्णत्वें सद्गुरूसि ॥ आनंद आकाशीं नसमाये ॥
॥ ४४ ॥ मगप्रबोधोनि रघुनाथासीं ॥ व्युत्थान करूनि समाधीसिं ॥ आलिंगिला सप्रेमेसीं ॥ ह्मणे ये स्थिती-
सिं कुरवंडी करूं ॥ ४५ ॥ मग ह्मणे धन्य धन्य हे स्थिती ॥ धन्यधन्य गा तुझी मती ॥ धन्य धन्य गा तुझी दे-
हाकृती ॥ ब्रह्मस्थिती बाणली तुज ॥ ४६ ॥ तुझे भाग्याचे गणनेसीं ॥ तुळना नाहीं ये महिमेसीं ॥ काय वानूं
ये ब्रह्मस्थितीसिं ॥ ह्मणूनि पोटासीं मागुता धरी ॥४७॥ अहो पुत्राचेनि झालेपणें ॥ पितयासी तें झालेपण॥
बाणे परि तें न्यून सहस्रगुणें ॥ असे उणें शिष्याहुनी ॥ ४८ ॥ शिष्यपणाचे झालेपणासाठीं ॥ गु[illegible]
नंदाचि होय सृष्टी ॥ नचले ययाहूनि कोटी ॥ आनंदपुष्टीं स्वानंदें ॥ [illegible]
मानंदें पडली मिठी ॥ जिराले येरयेरां पोटीं ॥ द्वैतदृष्टी मावळली ॥ [illegible]
मिसें श्रीरामवदनीं ॥ बोधामृताचि रिचउनी ॥ येकपणीं शोभत ॥ [illegible]
टलें दोघां तयां ॥ तरी ऐक्य दोघांच्या आंतुलया ॥ निबिड हो[illegible]

१ दिवस. २ विसर्जन. ३ ओंवाळणी. ४ ओनन.

परमानंदीं बुडालों आतां ॥ नोंणजे दृश्यस्फूर्ति [illegible]
चोनि दुसरें ॥ अणुमात्र नदिसे साचोकारें ॥ सर्वही आत्मानंद [illegible]
सकळ प्रपंचजात ॥ होता दृश्यत्वें भिन्न देखत ॥ तो सर्वही झाला [illegible]
स्वामी तुझेनि प्रसादेंकरूनि ॥ मीच येक झालों त्रिभुवनीं ॥ दुजें नो[illegible]
॥ ५६ ॥ गुरुशिष्यादि द्वैतगोष्टी ॥ मावळोनि झाली ब्रह्मपुष्टि ॥ ब्रह्मासि[illegible]
दें ॥ ५७ ॥ नदेखे क्रिया कर्म कारण ॥ नदेखे मजसहित मीपण ॥ देहादि इंद्रिय [illegible] ॥ [illegible]सम ॥ [illegible]
देखे ॥५८॥ माझें ज्ञान आणि अज्ञान ॥ उभयतां एकचिद्धन॥क्रिया कर्तृत्व गमनागमन ॥ चैतन्यघनें चिद्रूपें ॥
॥ ५९ ॥ आतां मज नाहीं कर्तव्यता ॥ कर्तव्य करणें मीचि तत्वतां ॥ मजवेगळें सर्व पाहातां ॥ नाहीं रिता ठा-
व कोणी ॥ ९६० ॥ मी व्यापक चिद्रूप अनंत ॥ करणें क्रियादि व्यवहार समस्त ॥ मजवेगळा मज नाहीं
भासत ॥ त्रिविध अंत नाहीं जया ॥ ६१ ॥ ऐसें बोलतां तया विषदं[1] ॥ तंव वाचा झाली सद्गद ॥ उठिला
बोध तुटला बाध ॥ निर्विवाद होऊनि ठेला ॥ ६२ ॥ वसिष्ठ वोंवाळी जीविच्या जीवें ॥ चिद्रत्नाचे वोंवाळू-
नि दिवे ॥ ह्मणे चिरंजीव तूं माझेनि जीवें ॥ काय करावें तुजलागीं ॥ ६३ ॥ तूं आनंदाचें पडपं[2] ॥ चित्प्र-
काशांचे चैतन्यदीप ॥ तूं आनंदाचें मूळरोप ॥ उदंड अमूप परिपूर्णत्वें ॥ ६४ ॥ तूं आनंदादि नियंता सर्वेश्व-

१ स्पष्ट. २ शोभा.

रा ॥ ब्रह्मविद्येच्या पूर्णसागरा ॥ अकर्ता अभोक्ता निर्विकारा ॥ सदा साचार जनप्रवृत्ती ॥ ६५ ॥ तूं अनादिपणाचेंही मूळ ॥ तूं सर्वातीत सर्व सकळ ॥ तूं अकळ अचळ अढळ॥ नित्यनिर्मळ स्वयंज्योती ॥ ६६ ॥ तूं सच्चिदानंदैकघन ॥ तूं व्याप्य व्यापकविहीन ॥ नित्य निर्गुण निरंजन ॥ ब्रह्म परिपूर्ण अनादिरूप॥६७॥ तूं कर्ता कर्म क्रियाविहीन ॥ तूं अनादिचि मूळस्थान ॥ नित्य निराकार निर्गुण ॥ परम पावन पावना ॥ ॥ ६८ ॥ तूं सगुण निर्गुणाचे आदीं ॥ तूं या आकाराचि अवधी ॥ तूं बुद्धीचि बोधक बुद्धी ॥ तूं सर्व सिद्धीसाधक ॥ ६९ ॥ तुझें स्वरूप तुज कळलें ॥ अपरोक्षानुभव स्वयेंचि बाणलें ॥ तुझें सुख तुज फावलें ॥ अज्ञान गेलें तुटोनी ॥९७०॥ स्वयें आपण स्वतःसिद्ध असतां ॥जें अज्ञान प्रतिबंधी सर्वथा ॥ तें सद्गुरुप्रसादें विचारुंजातां ॥ मागुहि पुरता नलाभेची॥ ७१ ॥ तेव्हां स्वतंत्र आपुला आपण ॥ परिपूर्ण पूर्णानंदघन ॥ तें तूं राहिलास जाणोन ॥ जगीं धन्य तूं येक॥ ७२ ॥तुझी स्थिती वर्णू जातां ॥ तेथें वाचा कुंठित गा समस्ता ॥ तुवां जगीं उपकार केला आतां ॥ उद्धरणार्थी त्रैलोक्यासीं ॥ ७३ ॥ तुझी माझी हे गुह्य गोष्टी ॥ ते समूळ पावली प्रसंगें सृष्टी ॥ भाग्याचा जो धरूनि पोटीं ॥ ब्रह्मींच भेटी श्रवणमात्रें ॥ ७४ ॥ मज पाहतां तुझें अवतरण ॥ मनीं धरूनि हेंचि कारण ॥ जें करावें जगदोद्धारण ॥ हेंचि तें आपण दाविसी ॥ ७५ ॥ अज्ञानाचि घेउनी बुंथी ॥ अंगिकार करिसी स्वशक्ति ॥ तेव्हां जनासीं मनुष्यत्व प्रतीति ॥ शामलाकृती दावितोसी॥७६॥

१ साक्षात्कार. २ बुरखा.

गुरु शिष्याचि मिरवणी करुनी ॥ जगा ब्रह्मसुखाचि धनी ॥ दिधली तुवां कार्मुकपाणी ॥ जगदोद्धारणीं स-
मर्था ॥ ७७ ॥ जे ज्ञानार्थासिं पावती ॥ ते ज्ञानार्थचि स्वयें होती ॥ परमानंदें डुल्लतो ॥ नसमाती ब्रह्मांडीं ॥
॥७८॥आणि जे ज्ञानार्थासिं नपावती ॥ संवाद तरी हा ऐकती॥ इतुकेनीच तया ब्रह्मप्राप्ती ॥ ग्रंथाचि शक्ती
ऐसि आहे ॥ ७९ ॥ संप्रदाय या ग्रंथाचा ॥ येकांत संवाद तुझा आमचा ॥ श्रवणमात्रेंचि स्वसुखाचा ॥ पावे
साचा नित्यानंद ॥ ९८० ॥ जो जया ठायांसिहि नपवे ॥ तो श्रवणसुखेंचि सुखावे ॥ मूर्खासिं प्रेम दुणावे ॥
शेखीं पावे ब्रह्मसुख ॥ ८१ ॥ याहुनी जो मंद ॥ तया तुझें नाम विषदें[1] ॥ उच्चारितां परमपद ॥ पावे अगाध
ब्रह्मानंदें ॥ ८२ ॥ तुझिया नामाचें जें संबोधन ॥ तन्मिसें नामें सगुण निर्गुण ॥ बोलिले जे भवतारण ॥ सं-
सारदैन्य निर्दळिती ॥ ८३ ॥ ते भक्ति अथवा अभक्ती ॥ प्रीति अथवा अप्रीति ॥ सावध अथवा अव्यग्रम-
ती ॥ उच्चारितां प्राप्ती ब्रह्मसुखाची ॥ ८४ ॥ जरी नेणोनियां गंगाजळ ॥ सेविल्या हरि पापमळ ॥ कीं नेणो-
नियां स्पर्शला अनळ[3] ॥ पोळी तत्काळ स्वतेजें ॥ ८५ ॥ नेणोनि शर्करा घातली तोंडीं ॥ तरी आपणा ऐ-
सीच दे गोडी ॥ कां सेवितां अमृतउडी ॥ करी फुडी[2] अमरत्वें ॥८६॥ तैसें तुझेनि नामोच्चारणें ॥ उठे संसाराचें
धरणें ॥ तोषे वैकुंठीचेनि राज्यपणें ॥ सुख भोगणें नित्यानंद ॥८७ ॥ ऐसे मुक्त मुमुक्षु विषयी जन ॥ सुखें होती
श्रवणेकरून॥हा उपकार तुवां रघुनंदन॥ अवतरोन केला जगा॥८८॥ते तुझिये गुणगणनेसीं॥ बोलतां सांकडें जेथें

१ दुप्पटहोतें. २ स्पष्ट. ३ अग्नि.

श्रुतीसिं ॥ तेथें पाड काय इतरांसीं ॥ धन्य कुशी तव मातेची ॥८९॥ माझें गुरुत्व सकळां वरिष्ठ ॥ ह्मणोनि नाम पावलों वसिष्ठ ॥ तुझेनि झालों अतिश्रेष्ठ ॥ भाग्य उत्कृष्ट गुरुत्व माझें ॥ ९९० ॥ आणि धन्य तयाची माता पिता ॥ हा माझा तुझा संवाद रघुनाथा ॥ जे स्वस्थ बसोनि आणिती चित्ता ॥ ते पावती तत्वतां ब्रह्मानंद ॥९१॥ अगायया ग्रंथाचें श्रवण॥ जांणते नेणते जे करिती जन ॥ ते ब्रह्मसुखें नित्य पावन ॥ जरी जाणणें संसारसुख ॥ ९२ ॥ जोंवरी हा ग्रंथ श्रवण करिती ॥ तंववरी एक सुख पावती ॥ तेणें ब्रह्मानंदें एक निर्वाहति ॥ येक उठती व्यासंगें ॥ ९३ ॥ परी क्षणभरी जरी ब्रह्मानुसंधान ॥ तें करी संसारआटवीचें दहन ॥ ऐसें ब्रह्मसुखाचें सामर्थ्य पूर्ण ॥ जाण हे खुण रघुपुंगवा ॥९४॥ जरी अग्नीचा विस्फुलिंग सानां ॥ तरी तृण राशी करी भस्म पूर्णा॥ कां जाळितसे तत्काळ वना ॥ पेटला वनामाजी वणवा जैसा ॥९५॥ नातरी अमृताचिया कणिका ॥ सेविल्या अमर करी देखा ॥ कां सानि जरी दीपकळिका॥प्रकाशसुखा मेळवीचि कीं ॥९६॥

॥संमति ॥ स्नातस्तेनसमस्ततीर्थसलिलेदत्ताचसर्वावनि॥यज्ञानांचकृतंसहस्त्रमखिलंदेवाश्चसंपूजिताः ॥२६॥ संसाराच्चसमुद्धृताःस्वपितरस्त्रैलोक्यपूज्योप्यसौ ॥ यस्यब्रह्मविचारणेक्षणमपिस्थैर्यंमनःप्राप्नुयात् ॥ २७ ॥ कुलंपवित्रंजननीकृतार्थावसुंधरापुण्यवतीचतेन ॥ अपारसंवित्सुखसागरेस्मिन्लीनंपरेब्रह्मणियस्यचेतः ॥२८॥

टीका ॥ ययालागीं तयाचें कुळ पवित्र ॥ जननी तयाची कृतकृत्य ॥ तो जेथें चरण ठेवी पृथ्वीआंत ॥ ती-

१ अभ्यास. २ ठिणगी. ३ लहान.

थवंत ते होय ॥ ९७ ॥ त्याचे चरणरज जेथें पडती ॥ त्याचा स्पर्श तीर्थें वांछिती ॥ तो जेथें वसे ते पवित्र क्षिती ॥ ब्रह्मसंविती जो लाभे ॥ ९८ ॥ क्षणभरीहि जयाचें चित्त ॥ ब्रह्मविचारिं राहे सुनिश्चित ॥ तोचि गा नर कृतकृतार्थ ॥ नाहीं अर्थ करणीयत्वें ॥ ९९ ॥ सर्व कर्मादिकांचें फळ ॥ यज्ञयागादि जप तप सकळ ॥ तीर्थ व्रत शम दमादि मेळ ॥ त्या सर्वांचें मूळ ब्रह्मसुख ॥ १००० ॥ तया ब्रह्मविचाराचेठांई ॥ क्षणेक चित्त स्थीर ज्याचें पाहीं ॥ तरी दान व्रतादिकें सर्वही ॥ केलें पाहि तेणें पुरुषें ॥ १ ॥ जो व्यवहार करूनि आरंाणुक ॥ ब्रह्मविचार करी क्षणेक ॥ तरी तोचि पवित्रापवित्र देख ॥ निष्कळंक ब्रह्मस्वरूप ॥२॥ सर्वां तीर्थि तोचि न्हाला ॥ पृथिव्यादि दान दिधलें ब्राह्मणाला ॥ नाना परीचा यज्ञादि मेळा ॥ तेणेंचि केला अश्वमेधादि ॥३॥ सकळही देव तेणें पूजिले ॥ भयापासाव पितर मुक्त केले ॥ तेणें जाणे त्रैलोक्य पूजिलें ॥ आनंदविलें सर्वभूतां ॥ ४ ॥ येवढीया फळाचा भोक्ता ॥ तोचि होय गा रघुनाथा ॥ धन्यधन्य त्याची माता पिता ॥ ब्रह्मवेत्ता जो होय ॥ ५ ॥ क्षणभरी चित्त ब्रह्मविचारीं ॥ घालितां त्याची येवढी थोरी ॥ मग ब्रह्म जाणे साक्षात्कारी ॥ त्याचि थोरी काय बोलों ॥ ६ ॥ तो तंव ब्रह्मरूपाचि तत्वतां॥ तेथें काय इतर कथा॥ तो सकळां प्रकाशनियंता ॥ जग चाळिता ब्रह्मरूप ॥ ७ ॥ यालागीं या ग्रंथाचेनि श्रवणें ॥ उठे संसाराचें धरणें ॥ स्वयें ब्रह्मसुख अनुभवणें ॥ होय पारणें ब्रह्मानंदाचें ॥ ८ ॥ तंव राम ह्मणे जी श्रीगुरुराया ॥ हें मी





१ समाधान. २ पूर्णता.

लाधलों प्रसादें तुझिया ॥ बुडतां भवार्णवामाजि यया ॥ तारिलें स्वामि कृपा करुनी ॥ ९ ॥ या सं-
सारसागरामाझारी ॥ गिळिलों होतों क्रोधादि जळचरीं ॥ तें सोडविलें काढोनि बाहेरी ॥ ब्रह्मानंदपुरीं नि-
मग्न केलें ॥ १०१० ॥ तरी तुझिया उपकारा उत्तीर्ण ॥ नव्हेंजि केल्या देहादि अर्पण ॥ ते नैश्वर सर्व पदार्थ
जाण ॥ तनु मन धन अर्पिलें जरी ॥ ११ ॥ तुवां दिधली जे वस्तु शाश्वत ॥ अचळ अमळ पूर्णानंदभरित ॥
त्यासीं शिष्यें उत्तीर्ण होइजेत ॥ हा व्यवहार व्यर्थ करणें याचा ॥ १२ ॥ जें जें गुरूसिं कीजे समर्पण ॥ देह
पुत्रादि संपत्ति जाण ॥ तें तें मिथ्या नश्वर हीन ॥ नव्हे समान परब्रह्मेसी ॥१३॥ जन्म मरणाचिया कोडी ॥
असती संसाराचिया बांदवडी ॥ ऐसियाचा उतरंडी ॥ करि राखोंडी कृपा जयाची ॥ १४ ॥ जैसें रंकासीं
अमरत्व देणें ॥ कां भणंगासीं क्षीराब्धि समर्पणें ॥ मृतासिं जैसें अमर करणें ॥ इत्यादि हीन ययाहुनी ॥
॥ १५ ॥ ऐसीये पदवीचा दाता ॥ तयासिं नश्वरें केंवि कीजे उत्तीर्णता ॥ हें लज्जित होय बोलतां ॥ काय
आतां निवेदावें ॥ १६ ॥ यालागीं सद्गुरूसीं नमन ॥ सद्भावेंचि करावें जाण ॥ आणि मौन्येंचि करावें स्तव-
न ॥ चित्तें भजन सर्व सेवेचें ॥ १७ ॥ ऐसें बोलोनियां रघुपती ॥ सद्गुरुचरणावरी लोळती ॥ येरु उचलूनि-
यां आलिंगिती ॥ धन्य त्रिजगतीं ह्मणे आपण ॥ १८ ॥ श्रीरघुनाथ ब्रह्ममूर्ति ॥ ज्ञानाचि देवता अधिष्ठा-
त्री ॥ ताही माझा शिष्य ह्मणती ॥ धन्य त्रिजगतीं मी येक ॥ १९ ॥ परब्रह्म आणि बोधकर्ता ॥ कोण-
ही गुरुत्वाची गुरुता ॥ ऐसें स्मरस्मरोनि विस्मय करितां ॥ सुलीनता पावला ॥ १०२० ॥ दोघां नाठवे

दोनीपण ॥ ब्रह्मसुखें ब्रह्मचि परिपूर्ण ॥ नाठवे देहादि प्रपंचभान ॥ आपणा आपण कोंदलें ॥ २१ ॥ जया सुखाचि सांगतां गोष्टी ॥ बोलतां बोलि हे गिरा तुठी ॥ असो ब्रह्मरूपचि झालों सृष्टी ॥ सर्वत्र पुष्टी ब्रह्मानंदें ॥ २२ ॥ तंव विश्वामित्र ह्मणे धन्य ॥ यया दोघांचें गुरुशिष्यपण ॥ मीनले परस्परें आपण ॥ दोघां दोनीपण उरेचिना ॥ २३ ॥ शिष्यत्वें रघुनाथ झाला वरिष्ठ ॥ गुरुत्वें वसिष्ठ अतिश्रेष्ठ ॥ दोघां झालें ऐक्य उत्कट ॥ ब्रह्म स्पष्ट पूर्णानंदें ॥ २४ ॥ दोघांचें जाऊनि दोनीपण ॥ ब्रह्मरूप झाले परिपूर्ण ॥ धन्य माझें आगमन ॥ फळला यज्ञ ब्रह्मफळेसीं ॥ २५ ॥ चित्तशुद्धीलागीं यज्ञसाधन ॥ साधक करीति सांग जाण ॥ मग चित्तशुद्धीनें प्राप्त ज्ञान ॥ जें ब्रह्म निर्गुण निर्विकार ॥२६॥ तो यज्ञ आरंभितांचि क्षणीं॥सगुण ब्रह्म देखिलें नयनीं ॥ आतां याचीच करितां काहाणी ॥ झाली धणी ब्रह्मानंदाची ॥ २७ ॥ बाप भाग्य माझें थोर ॥ यज्ञामिसें पावलों निर्विकार ॥ कोण पूर्ण सामग्रीचा संभार ॥ सुखसागर प्राप्त मज ॥ २८ ॥ यज्ञादि कर्मं चित्तशुद्धिद्वारा ॥ ब्रह्मज्ञान पाविजे परंपरा ॥ तेंचि यज्ञारंभिं येकसरा ॥ ज्ञानसागरामाजि निमग्न ॥ २९ ॥ कोणी भोजनसामग्रील.बुभु ॥ यांचा करी मनीं धरून ॥ तो जाय येकाचें घर लक्षून ॥ तों अपूर्वपण तेथें देखे ॥ १०३० ॥ ओगरिलीं ताटें आइतीं ॥ शुद्ध असती उभयपंक्ती ॥ तेथें आदरें बैसऊनि जेविति॥अतिप्रीति परमानंदें ॥३१॥ तैसेंचि झालें मजलागुन॥यागसाधनासीं श्रीरामयाचन ॥ करितां फावलें सगुण निर्गुण ॥ ब्रह्म परिपूर्ण चिद्रूप जें कीं ॥ ३२ ॥ मुष्टि धान्यालागिं मार्गिं जातां ॥ तंव तेथें निधि भेटे

अवचिता ॥ तेंवि मज ब्रह्मप्राप्ति तत्वतां ॥ साधन नकरितां अलभ्यलाभ ॥ ३३ ॥ तृषाहरणार्थ कांजिप्राशन ॥ करितां फावलें अमृतपान ॥ तैसें झालें मजलागुन ॥ ब्रह्म परिपूर्ण लाधलें ॥ ३४ ॥ ह्मणोनि हर्ष नमाय गगनीं ॥ रघुनाथा आलिंगी धांवोनी ॥ प्रेम नमाय तिघांलागोनी ॥ झालें निर्वाणीं ब्रह्मपूर्ण ॥ ३५ ॥ वसिष्ठ विश्वामित्रासिं करी नमन ॥ राजा झाला सुखसंपन्न ॥ सुर नर पन्नग परिवारजन ॥ आनंदें पूर्ण डुल्लती ॥ ३६ ॥ नकळोनि तरी राजादशरथ ॥ संवादसुखें सुखोन्नत ॥ आनंद पोटीं नसमात ॥ क्षेम देत रघुनाथा ॥ ३७ ॥ सकळांसीं झाला आनंद ॥ रघुनाथा चित्तीं परमानंद ॥ अवघा कोंदला ब्रह्मानंद ॥ सुखस्वाद सर्व सभेसीं ॥ ३८ ॥ सभेसिं पिटिली येक टाळी ॥ जयजयकार कीजे सकळीं ॥ उत्साह नसमाये नभमंडळीं ॥ भूमंडळीं परमानंद ॥ ३९ ॥ मग आनंदें बैसोनि सभेसीं ॥ श्रीरामीं लक्ष सर्व जनासीं ॥ पुष्पवर्षाव करिती स्वर्गवासी ॥ सुख विबुधांसीं कोंदतसे ॥ १०४० ॥ स्वर्गीं नाचती नृत्यांगना ॥ गंधर्व करिती गायना ॥ आनंद होतसे त्रिभुवना ॥ सर्व जनां महोत्साह ॥ ४१ ॥ तंव विश्वामित्र ह्मणे रायासीं ॥ मी यज्ञफल पावलों अनायासीं ॥ सगुण ब्रह्म देखिलें श्रीरामासीं ॥ नाहीं सुखासीं मर्यादा ॥ ४२ ॥ तंव प्रसंगें वसिष्ठाचें दर्शन ॥ रघुनाथसंवादें सुखसंपन्न ॥ ब्रह्मानंद वोसंडला जाण ॥ ब्रह्मनिर्गुण असोनि झालों ॥४३॥ ब्रह्मैवसन्ब्रह्माप्येति ॥ ऐसें स्वयें बोले श्रुती ॥ ह्मणोनि ब्रह्म असोनि ब्रह्मप्राप्ती ॥ झाली गति ऐसि माझी ॥ ॥ ४४ ॥ आतां कासया यज्ञादि साधनें ॥ राहिलीं सत्कर्मादि क्रियादानें ॥ जप तप व्रतादि तीर्थाटणें ॥

ज्याकारणें तें प्राप्त झालें ॥ ४५ ॥ तुझेनि दर्शनें कृतकृत्यता ॥ भेटी झाली श्रीरघुनाथा ॥ झाली जन्माचि साफल्यता ॥ कांहीं कर्तव्यता नाहीं मज ॥ ४६ ॥ राया तुझेंही भाग्य थोर ॥ पोटीं आला सर्वेश्वर ॥ ज- यातें पाहाती योगेश्वर ॥ धन्य अंतरीं लक्षिती जे ॥ ४७ ॥ नाना साधनें करून ॥ सर्वत्यागें संन्यास घेऊ- न ॥ प्रत्यगावृत्ति करुनी मन ॥ निरंतर ध्यान करिती ज्याचें ॥ ४८ ॥ अंतरीं पाहातां नसांपडे॥ नाना सा- धनीं साधका नातुडे ॥ तो पोटा आला वाडेंकोडें ॥ भाग्य गाढें दशरथा तुझें ॥ ४९ ॥ तुझिया भाग्याचें वर्णन ॥ करूं नशके चतुरानन ॥ तेथें येक मुखें मी ब्राह्मण ॥ भाग्यगणना केंवि करूं ॥ १०५० ॥ त्याहीवरी वसिष्ठा ऐसा गुरू ॥ स्वयें ज्ञानाचा सागरू ॥ उपदेशी ब्रह्मानंदाचा पुरू ॥ अतिथोर पूर्ण केला ॥ ५१ ॥ यया सुखाह्लनियां कोड ॥ नाहिं कोणीच सुख अतिगोड ॥ सरलें साधनाचें कवाड ॥ झाला निबिड ब्रह्मानंद ॥ ॥५२॥ तथापि कार्यांतर मनीं धरून ॥ करणें असे राक्षसनिर्दळण ॥ पुढें जानकीचें परिणयन ॥ होईल लग्न समारंभें ॥५३॥ यया कार्यांतरीं घालून दृष्टी ॥ मग करी रायासीं गोष्टी ॥ ह्मणे माझें कार्य धरुनी पोटिं ॥ राम जगजेठी देईंमज ॥ ५४ ॥ माझा यज्ञसिद्धी पाववीं ॥ मनींचा मनोरथ पुरवी ॥ राम लक्ष्मणा देई मनो- भावीं ॥ नको गोंवि करूं यज्ञा ॥ ५५ ॥ तंव राजा ह्मणे विश्वामित्रासीं ॥ तुह्मीं अतिथोर केलें आह्मासीं ॥ उत्तीर्ण नव्हेजि उपकारासीं ॥ ह्मणोनि चरणासीं लागला ॥ ५६ ॥ श्रीराम लक्ष्मण दोघेजण ॥ वसिष्ठ करी विश्वामित्रार्पण ॥ रायासिं ह्मणें नको निवारण ॥ करुन जाण राहवूं रामा ॥ ५७ ॥ श्रीराम परब्रह्म निर्गुण ॥

तो रामरूपें झाला सगुण ॥ करावया दैत्यनिर्दळण ॥ स्वयें आपण प्रगटला ॥ ५८ ॥ ऐसें बोलोनियां राया-
सीं ॥ रामलक्ष्मण दिधले विश्वामित्रासीं ॥ श्रीरामें कार्यसिद्धयज्ञासीं ॥ स्वयंवरासीं गेले सर्व ॥ ५९ ॥ तेणें
आनंद झाला सर्व जनांसीं ॥ रामराज्य झालें पृथ्वीसिं ॥ सुखसोहळा त्रैलोक्यासीं ॥ विपश्चितासीं ब्रह्मानं-
द ॥ १०६० ॥ येथें समाप्ति झाली ग्रंथीसी ॥ व्याख्यान झालें ब्रह्मानंदासीं ॥ तोचि आनंद श्रोतयांसीं ॥
विनवी प्रेमेसीं रंगनाथ ॥ ६१ ॥ सद्गुरूचा अंकिला ॥ कीं सद्गुरूवाचि असे केला ॥ ब्रह्मीं रंगूनियां रंगला ॥
विनवी श्रोतियां रंगनाथ ॥ ६२ ॥ येथें संपलें निर्वाणप्रकरण ॥ याचें यथामती केलें टिप्पण ॥ केवळ भा-
वार्थदीपन ॥ प्रकाशमान परमार्थ ॥ ६३ ॥ भावार्थ टीका हे संपूर्ण ॥ मूळग्रंथाचें यथामती व्याख्यान ॥
करूनि केलें समर्पण ॥ सद्गुरुचरण स्मरोनियां ॥ ६४ ॥ जें कीं परमार्थाचें रहस्य गहन ॥ म्यां याचिला-
गीं केलें कथन ॥ करावया सन्मुख प्रसन्न ॥ आनंदघन सद्गुरुराव ॥ ६५ ॥ तो निरंतर असतां प्रसन्न ॥ अ-
तिप्रीति करितां मजलागुन ॥ तेथें करितां म्यां अतिप्रयत्न ॥ सन्मुखपणें करी त्याचे ॥६६॥ हा सर्व व्यर्थ-
चि श्रम करणें ॥ करितां नकरितां सद्गुरु तेणें ॥ सर्वदां सर्वत्र प्रीति करून ॥ दुजें नेणे मजवांचुनी ॥ ६७ ॥
अहो बालक प्रिय असे जननीसीं ॥ स्वभाविक तें सन्मुख तयासीं ॥ तें गुण सांडुनी करी अवगुणांसी ॥ तरी
तें तियेसी अतिवल्लभ ॥ ६८ ॥ तैसा मी सेवा करी अथवा नकरीं ॥ तरी सद्गुरूचा प्रियचि अवधारीं ॥ मी
अन्याय करितांही क्षमा करी॥ जननीयेचिपरी सद्गुरुरावो ॥ ६९ ॥ संमति ॥ अहंकरोमित्वमपाकरोषिपापानि

पापानिपतेपशूनां ॥ बालंयथापंकगतंह्यजस्त्रंपुनःपुनःक्रीयतीवमाता ॥ २९ ॥ टीका ॥ बाळक नाना अवगु-
णातें करी ॥ तरी क्षमा वर्ते मातेच्या शरीरिं॥ तें पंकें लुटे तरी उपेक्षा नकरी ॥क्लेश नधरी कोणेकाळीं॥ १०७०॥
जों जों बाळ करी अवगुणांसीं ॥ तों तों अधिकचि प्रेम मातेसीं ॥ विष्ठादि लेप करी आपणासीं ॥ तरी तिसीं
चिळसि नाहीं ॥७१॥ तें मळीण होय सर्वांपरी ॥ माता प्रेमें प्रक्षाळणकरी ॥ परी तयाचा उबग नधरी ॥ अधिकचि
करी प्रेमाचरण७२॥नाना अपराध क्षमा करुनी ॥पुनःपुन्हा त्यातें प्रक्षाळुनी॥अतिप्रेमें वोसंगा घेउनी ॥स्तनपानीं
लावित ॥७३॥ अहो या प्रेमाचि जातीच ऐसी ॥भुलोनि टाकी प्रेमळासीं॥ मग ते नदेखे गुणांसीं ॥ दोष अदोषा-
सीं मानिना ॥ ७४ ॥ शुद्ध अशुद्ध भासवित ॥ प्रेमा अतिशयेंचि उठत ॥ सुरूप कुरूप मानवित ॥ असे भुल-
वित गोडपणें ॥ ७५ ॥ तैसीच सद्गुरुमाउली ॥ शरणांगतासिं साउली ॥ शिष्यबाळकालागीं उतावेळी ॥
भुलोनि मुळीं प्रेमाचिये ॥७६॥ नाना गुण अवगुण नपाहे॥सुरूप कुरूप नविचारीच मोहें ॥ त्याहीमाजि मी
अतिप्रिय आहें ॥ जाण निजभावें सद्गुरूसीं ॥७७॥ तेथें ग्रंथाचें करणें ॥ दोनी होताति वायानें ॥ अद्भुत प्रेमा
भुललेपणें ॥ मजकारणें करितची ॥ ७८ ॥ ह्मणोनि कांहींच नलगे तुझियाठाईं ॥ तुज मातेचें कृपाळुत्व पा-
हीं ॥ तेणें संपूर्ण सर्वही ॥ नकरी कांहीं तरी प्रियची॥७९ ॥नातरी अतिप्रिय अंगना ॥ भ्रतार तद्रूपें प्रेमवंत जा-
णा ॥ नपाहे तिच्या गुणावगुणा ॥ सुंदरपणा नपाहे ॥ १०८० ॥ तेणें सौभाग्य केलें नकेलें ॥ तथापि त्याचें
मन वश्य झालें ॥ देखे सर्वदां सौभाग्यचि भलें ॥ नेणे मेळलें चोखट दोन्हीं ॥८१॥ ह्मणोनि सौभाग्यादि क-

रणें॥ तें व्यर्थ झालें प्रेमाधिक्यें तेणें ॥प्रेम नपालटे कवणें गुणें॥केला अवगुणाचि गुण करी ॥८२ ॥संमति॥त्व-
यिप्रसन्नेममकिंगुणेनत्वय्यप्रसन्नेममकिंगुणेन ॥ रक्तेविरक्तेचवरेवधूनांनिरर्थकःकुंकुमपत्रभंगः ॥ ३० ॥ टीका ॥
तैसें प्रसन्न असतां सद्गुरुराया ॥ काय प्रयोजन गुणीं माझिया ॥ अथवा अवगुण केलिया ॥ उणे स्वामिया का-
य होय ॥८३॥ जैसी अतिप्रिय कामिनी ॥ नाना शृंगार करी पतिलागुनी ॥ अनावेन्ही असतां दोन्हीं॥ गु-
णकरणी सौभाग्याची ॥८४॥ प्रियत्वेंहि व्यर्थ दोन्हीं होती ॥ केल्या नकेल्या सारिखीच प्रीति॥ तरी केल्या
कोण अधिक स्थिती॥ न्यून गती नकेलीया॥८५ ॥ प्रीति असतां दोनी व्यर्थ॥प्रीति नसतां करूनि कोण अ-
र्थ ॥ ह्मणोनि प्रीतिच मुख्य येथ ॥ केलें तें व्यर्थ दोहींपरी ॥ ८६ ॥ तैसे माझे गुण अवगुण ॥ नकरिसी तूं
प्रेमळघन ॥ यालागीं माझें कर्तव्यपण ॥ व्यर्थ पूर्ण येणें न्यायें॥८७॥ यालागीं तुझिये प्रसन्नतेसीं ॥ नलगे मज
करणीय अर्थासीं ॥ तुझी कृपा मज सर्वस्वीं॥ वंद्य जगासीं करून ठेली॥ ८८ ॥ तथापि तुज संतोषालागीं ॥
ग्रंथमिसें तूंच सर्वांगीं ॥ गाइलासी नाना विभागीं ॥ अंतरंगीं निविजे जेणें ॥ ८९ ॥ तुझेंचि वास्तव स्वरूप व-
र्णून ॥ ग्रंथीं गाइलें तुजलागुन ॥तुजचि स्मरोनि चिंतन ॥ केलें समर्पण तुजलागीं ॥१०९० ॥ पितरें संतुष्ट बा-
ळकाचेनि ॥ त्याचे नपाहाति गुणालागुनी ॥ नाना स्वरूप कुरूप पाहाणें दोन्हीं ॥ अतिकृपेनें देखती ॥
॥ ९१ ॥ तेणें केलीया अवगुणराशी ॥ कां चिखल लावि सर्वांगासीं ॥ तरी तो प्रिय मायबापासीं ॥ जरी रू-
पासिं बिभत्सी ॥ ९२ ॥ तथापि तें खेळे नाना परि ॥ बोल बोले वक्रोत्तरीं॥ तेणें प्रेम दुणावे भारी ॥ माता अं-

तरीं सुखी असे ॥९३॥ तें बोबडें बोले आणि खेळे ॥ तेणें निवती जननीचे डोळे ॥ अधिक प्रेमें पान्हा गळे ॥
थोर कळवळे अतिप्रेमें ॥ ९४ ॥ त्याचिं पितरें कांहीं नपाहाती ॥ तरी खेळे बोले लावि प्रीति ॥ तेणें ते जीवें न-
विसंबती ॥ वोंवाळिती प्रेमभरें ॥ ९५ ॥ तैसें माझें कांहीं सद्गुरुराया ॥ नपाहासि उणिया पुरीया ॥ तथापि
बोबडें बोलोनियां॥तुजलागोनियां संतोषवी ॥९६॥ तुवांचि बोलविले बोल ॥ तेचि पदबंध झाले रसाळ ॥ तें-
चि ग्रंथव्याजें परमार्थफळ ॥ अर्पीं निर्मळ तुझिया चरणीं ॥ ९७ ॥ येहींच बोबडे बोलीं ॥ तुझी कृपा म्यां
आकळिली ॥ ते पदरूपें होउनी ठेली ॥ येकुलती झाली बहुपुत्रींहि ॥ ९८ ॥ माझि आळि ग्रंथाचिया ॥
तुवां पुरविलि पूर्ण माउलिया ॥ तेणें मी परमानंदीं बुडोनियां ॥ लोकीं यया विचरत ॥९९ ॥ तेणें परमानंदा-
चेनि पुष्टिपणें ॥ ब्रह्मांड सहस्त्रासीं आणी उणें ॥ सर्वदां असे तुझेनिपणें ॥ दृश्य नेणे देहादि कांहीं ॥ ११००॥
येहीं बोलीं सद्गुरुचरणीं ॥ प्रेमें आलिंगी हृदयीं धरूनि ॥ तो आनंद नमाय त्रिभुवनीं ॥ लीन गुरुचरणीं तद्रूप-
त्वें ॥१॥ मग हारउनी गुरुशिष्यपण ॥ नुरवी दोघाचें दोनीपण ॥ परि व्यवहारार्थ दावी भिन्नपण ॥ काय व-
चन बोलत ॥ २ ॥ संतोषोनि ह्मणे सद्गुरुरावो ॥ ह्मणे ग्रंथीं दिधला पसावो ॥ वर दिधला अतिनिर्वाहो ॥
भवभय पळे जेणें ॥ ३ ॥ या ग्रंथरसस्वादाचि उडी ॥ सद्भावें पडेल ज्याच्या तोंडीं ॥ तो ब्रह्मज्ञानाचि रोक-
डी ॥ संपत्ति पुढें पावेल ॥ ४ ॥ सज्ञानासिं तरी ब्रह्मविश्रांती ॥ अज्ञानासीं होय ज्ञानप्राप्ती॥मूढही श्रवणीं सु-
खी होती ॥ ब्रह्मप्राप्ती अंतीं होय ॥ ५॥ यया ग्रंथाचा अभिमानी ॥ स्वयें आपण कोदंडपाणी ॥ तोचि ग्रं

थश्रवण निर्वाणीं ॥ स्वपदस्थानीं बैसवी ॥ ६ ॥ ऐसें ऐकोनि वचनामृत ॥ मी परमानंदें ढेंकर देत ॥ वचन स्मरोनि मी डुल्लत ॥ अतिउन्मत्त ब्रह्मानंदीं ॥ ७ ॥ आतां श्रोतयां माझी विनंती ॥ कर जोडुनी पुढतापुढती ॥ जें कां न्यून असेल या ग्रंथीं ॥ तें परिपूर्णार्थी घेइजे ॥ ८ ॥ न्यून तितुकें करावें पूर्ण ॥ हेंचि माझें विज्ञापन ॥ जेथें तुटेल अर्थानुसंधान ॥ तें [illegible] ॥ पूर्ण करावें तुह्मीं ॥ ९ ॥ तुमचा तरी स्वभावचि ऐसा ॥ न्यूनासाहि पूर्ण करीतसां ॥ अतिअज्ञानें जो कां भ्रम पिसा॥ तोही सहसा ब्रह्मनिष्ठ करा॥ ११११० ॥ तेथें मी तुमचाच केला॥ तुह्मींच ऐसा आपुला ह्मणितला ॥ तेथ मी न्यून राहेन यया बोला ॥ बोल लाजिला बोलतां ॥ ११॥ ऐसें विनवोनियां संतासीं ॥ लोटांगण घातलें चरणासीं ॥ लीन झालों सद्गुरूसीं ॥ कांहीं मनासीं नाठवे ॥ १२ ॥ तेणें कळवळोनि संत ॥ उचलोन हृदईं आलिंगित ॥ ह्मणती आमचिया कृपा परिपूर्णार्थें ॥ ग्रंथ सार्थकता परिपूर्ण तुह्मां॥ १३॥ ऐसा संतप्रसाद वंदूनि शिरीं ॥ नमन करी सहस्त्रावरी॥ ग्रंथसमाप्ति संभ्रम करी॥ वाचा उच्चारी जयजयकारें ॥ १४॥ आतां गोदेच्या नाभीं अब्जकल्पा संनिध ॥ नामें मोगरें ग्राम अगाध ॥ श्रीमन्नृसिंहक्षेत्र प्रसिद्ध॥ क्षेत्र जें सिद्ध सिद्धांचें ॥ १५ ॥ गोदावरीच्या दक्षिणतिरीं ॥ तत्क्षेत्र प्रतिष्ठूनि श्रीनरहरी ॥ दर्शनमात्रें जगासीं तारी ॥ कृपाळु भारी कृपाळुत्वें ॥ १६ ॥ तेथें प्रसिद्ध गा कपिलगोत्रोत्पन्न ॥ श्रीनरसिंहांकित अनंतगुण ॥ कुळस्वामी जयासीं सिंहासन ॥ करी रक्षण परंपरेसी ॥ १७ ॥ श्रीमत् अनंत नामेंकरून ॥ अवतरला श्रीनारायण ॥ करी जनाचें कलिमलदहन ॥ करी तारण नाममात्रें॥ १८॥ त्रिविध अंत नाहीं जयासी॥ देशकालादि

प्रमाणासीं॥ह्मणोन अनंत नामें प्रसिद्ध ऐसीं ॥ तारी जगासीं स्वप्रकाशें ॥१९॥ तत्पुत्र स्वयें जाण आपण ॥ सर्वत्र ब्रह्मात्मक खुण ॥ ह्मणोनि करितां नामकरण ॥ पिता जाण नाम ठेवी ॥ ११२०॥ ब्रह्म अपरोक्ष जाण आपणासीं ॥ ह्मणोनि आपेराज संज्ञा त्यासीं ॥ पिता नाम संज्ञा ऐसी ॥ अनामासी नामसंकेत॥ २१ ॥ तयाचा पुत्र तत्कळावंत॥रंगनाथनामें असे विख्यात॥तो ग्रंथार्थीं प्रगटी यथार्थ॥वेंचोनि चित्त सद्गुरुचरणीं॥२२॥ तें करावयाचें कारण॥ तेंही निमित्य आतां सांगेन ॥ करूनि तत्वपदाचें व्याख्यान ॥ निरूपण करीन आतां २३ ॥ आतां गोशब्दें इंद्रियगण ॥ तयातें प्रकाशी गोविंद पूर्ण ॥ नियंता प्रवर्तक होय आपण ॥ तेंचि अभिधान गोविंद ऐसें॥ २४ ॥ तयाचा पुत्र विठ्ठलमूर्ति ॥ तो स्वयें प्रकाशाचि ज्योती ॥ ऐका नामाचि उत्पत्ति ॥ एकाग्र चित्तीं परिसावी ॥ २५ ॥ विठ्ठलनाम या तीहिं अक्षरांचि वित्पत्ती ॥ ते कीजेल येक येकाक्षराप्रती ॥ तें सूक्ष्मदृष्टी पाहावें संतीं ॥ प्रबुद्ध जाणती स्वज्ञानें ॥ २६ ॥ संमति ॥ विशेषेणठसितंभासमानंजगतलसितंप्रकाशतेयस्मिन्नततसविठ्ठलः ॥ ३१ ॥ टीका ॥ एवं व्याख्यानाची वित्पत्ती ॥ किती लिहावी इये ग्रंथीं ॥ बहुधा प्रकारीं व्याकर्णस्थि[illegible] कीजेल वित्पत्ति व्याकर्णबळें ॥ २७ ॥ जें स्वस्वरूपाचेनि विस्मरणें ॥ स्थूळ सूक्ष्म भासे दृश्यपणें ॥ तें लया पावे स्वप्रकाशें जेणें ॥ तेंचि जाणणें विठ्ठलनाम ॥ २८ ॥ अथवा जयाची स्वप्रकाशमूर्ति ॥ प्रकाशें वर्ततां स्वयंस्थिति ॥ विश्वाभास पावे समाप्ति॥नभासे व्यक्ति दुजयाची॥२९॥अथवा ज्या अधिष्ठानाचे ठाईं॥विस्तृत जें जग प्रकाशे पाहीं॥तेंचितें अधिष्ठानत्वें सर्वंही॥शोभे कांहीं

विठ्ठलनाम॥११३०॥ तेंचि विठ्ठलनाम बोलिजे॥विठ्ठल ऐसें त्यातेंचि ह्मणिजे॥ त्या प्रीतिस्तव वारिजे ॥ ग्रंथव्याजें गुरुमहिमा॥३१॥ते श्रीमद्विठ्ठलाचिया प्रीति॥ग्रंथ हा पावला समाप्ती॥करावयाची हे आर्ति॥पांडुरंगमूर्ति स्नेहातिशय॥३२॥तत्स्नेहसहित ग्रंथव्याप्ती ॥ प्रीति पावो सद्गुरुमूर्ति॥चरणीं रंगोनि अतिप्रीति ॥ पावे समाप्ति जीवित्वें ॥ ३३ ॥ आतां नबोलतां श्रीगुरुपरंपरा ॥ तरी व्यर्थचि श्रम पावेल गिरा॥ ह्मणून बोलों येक दों अक्षरा ॥ प्रसाद पुरा लाभे जेणें ॥ ३४ ॥ ईश्वरापासोनियां ज्ञान ॥ तें शिष्य परंपरेनें आलें पूर्ण ॥ तितुकें नबोलवितीं सद्गुरु जाण ॥ परी येक दोन तीन वर्णावे कीं ॥३५॥ तरी तोचि आतां करणें आह्मां॥कांहीं वर्णूं सद्गुरुमहिमा॥ वर्णितां वाचेची गरिमा ॥ जाय उपरमा अवाच्यपणें ॥ ३६ ॥ नाना दुर्बळ जरी भक्त असती ॥ भावें समर्पितां गंगावती ॥ तरी तोषे विश्वमूर्ति ॥ समानगती दुर्वारत्न ॥३७॥कां त्रैलोक्य प्रगटी जो स्वप्रकाश तेजें॥तया सूर्यातें दीपें वोवाळिजे ॥ तेथें भक्तिवांचुनी प्रकाश नेणिजे ॥ परी अभिष्ट दीजे संतोषोनि भक्तां ॥३८॥ तैसें भक्तिभावें गुरुपरंपरेसीं ॥ वर्णनीं अल्पचित्सुखासीं ॥ तोचि ज्ञानदावाग्नि अविद्येसीं ॥ जाळूनि ब्रह्मानंदासीं वाढवी ॥ ३९ ॥ तरी आदिश्रीमद्वासुदेवानंद सरस्वती ॥ ते साक्षात्सगुणत्वें ब्रह्ममूर्ति ॥ नवर्णवे तयाचि कीर्ति ॥ अगुण अमूर्ति परमानंदत्वें ॥ ११४० ॥ कोणी सिद्धानंद ऐसें ह्मणती ॥ किती वर्षें करूं क्षेत्रीं वस्ती ॥ करूनि देह ठेविला श्रीभागीरथी ॥ सागराप्रति गंगासंगमीं ॥४१॥ ब्रह्मग्राम उत्तर तिरीं ॥ तेथें परमानंदादिकां प्रबोध करी ॥ देह ठेऊनि गंगातीरीं ॥ ब्रह्मत्व वरी स्वयें आपण ॥ ४२ ॥ तयाचा शिष्य

वैकुंठानंद ॥ तो साक्षात् आनंदकंद ॥ ब्रह्म परिपूर्णपूर्णानंद ॥ब्रह्मस्वानंद स्वादिता॥४३॥तयाचि कीर्ति बोलिजेल ॥ तरी वाचा पवाडु नपाविजेल ॥ तो सर्व प्रकाशक पूर्ण कमळ ॥ नित्यनिर्मळ ब्रह्ममूर्ति ॥४४॥ कितीयेक काळ गमन ॥ करूनि आनंदवनीं निवासन॥पश्चात् बद्रिकाश्रमीं निवास पूर्ण ॥जनतारण करावया॥४५॥ अनेक शिष्य बोधिले ॥ ब्रह्मानंदसुखें निवाले ॥ ते बोलें किती जाति बोलिले ॥ असो ते नमिले मनेंकरूनि ॥ ४६ ॥ मग देहविसर्जन केदारीं ॥ केलें अलकनंदातिरीं ॥ स्वयें ब्रह्मत्व असोनि ब्रह्मत्वावरी ॥ लीलें करी जनसंग्रह ॥४७॥ तयाचें शिष्यत्व अंगिकारूनि॥स्वयें प्रगटला शारंगपाणी॥श्रीकृष्णानंद नामें मिरवणी॥ जनीं वनीं प्रकाशक ॥ ४८ ॥ श्रीकृष्णानंद नामें येणें ॥ तेणें त्रैलोक्यासीं उद्धरणें ॥ नामरूपातीतपणें ॥ ब्रह्म निर्गुण ब्रह्ममूर्ति॥४९॥ नामनिर्दोष तें परब्रह्म ॥ सर्वदा सर्वगत सर्वसम॥करूनि नामव्याख्यान उत्तम ॥पावना पावन परब्रह्म॥११५०॥श्रीकृष्णनामें ब्रह्ममुर्ति ॥ ज्ञातया नामोच्चारें होय प्रतीति ॥पावोन पावनीं विश्रांती ॥ स्वानंद चित्तीं भोगिती ते॥५१॥ तयावरी आनंदपद येणें ॥ब्रह्मत्वासिं आणिलें उणें॥ऐका ब्रह्माभिधान येणें ॥ निराकरणें जडदुःखादि ॥ ५२ ॥ आणि समस्ताह्वनियां बृहत ॥ आकाशाहुनी थोर विस्तृत ॥ तयातेंचि ब्रह्म ऐसें ह्मणिजेत ॥ सापेक्षत ब्रह्म ह्मणउनी ॥ ५३ ॥ जड विश्वापेक्षा तें चैतन्य ॥ दुःखापेक्षा तें आनंदघन ॥ कल्पितापेक्षा तें अधिष्ठान ॥ सत्ता पूर्ण पूर्णत्वें ॥ ५४ ॥ स्थूळ सूक्ष्मापेक्षा तें बृहत ॥ इत्यादि अपेक्षा ब्रह्म ह्मणिजेत ॥ सर्व व्यावृत्ति त्याज्य निश्चित ॥ इत्थंभूत तेंचि ब्रह्म ॥ ५५ ॥ हें सर्व नसतां कल्पित-

पणें ॥ इत्यादि नामें कासया ठेवणें ॥ ब्रह्मत्वाहि हरवि सच्चिदानंदपणें ॥ आनंदपणें परिपूर्ण ॥ ५६ ॥ शेव-
टींच्या आनंदेंकरूनि ॥ सर्वही परमानंदेंचि वाखाणी ॥ परमानंदावांचूनि जनीं ॥ नाहीं कोणी दुजेपण॥५७॥
ज्या ज्या अपेक्षा नाम बोलिजे ॥ तंव त्या जडादिकांसी आभाव सहजे ॥ यालागीं तें नवाखाणिजे ॥ सर्व
जाणिजे परमानंद ॥ ५८ ॥ हेंचि जाणावयालागुन ॥ आनंदपद मिरवी आपण ॥ ह्मणोनि कृष्णानंदनामें
पूर्ण ॥ ब्रह्मनिर्गुण अनिर्देश ॥ ५९ ॥ नेणोनियां दुजियाचि मात ॥ येकला येक आनंदभरित॥ तोचि कृष्णा-
नंदनामें संकेत ॥ जाण हेत ब्रह्माख्य तें ॥ ११६० ॥ तेंचि कृष्णनामाचें व्याख्यान ॥ यथाधिषणा करीन
पूर्ण ॥ नभंगोनियां व्याकरण ॥ शुद्ध निरोपण सांप्रदायें ॥ ६१ ॥ तेंचि संमतिश्लोकेंकरुनी ॥ प्रगट कीजे
आर्षवाणी ॥ परिसावें श्रोतेजनीं ॥ आनंदघनीं पावावया ॥ ६२ ॥ संमति ॥कृषिर्भूवाचकः शब्दोणश्चनिर्वृति-
वाचकः ॥ तयोरैक्यंपरंब्रह्मकृष्णइत्याभिधीयते ॥ ३२ ॥ टीका ॥ तरि कृषी या वर्णद्वयेंकरून ॥ भूवाचक श-
ब्द होतसे जाण ॥ भूसत्ता या धातूचें व्याख्यान ॥ प्रसिद्ध पूर्ण व्याकरणशुद्ध ॥ ६३ ॥ एवं आद्यवर्णद्वय स-
त्ताघन ॥ करी कल्पिताचें व्यावर्तन ॥ णकार जो कीं तृतीय वर्ण ॥ वाचक पूर्ण निवृत्तीचा ॥ ६४ ॥ निवृ-
त्ति परमसुख ऐसें ॥ सर्व शास्त्रीं बोलिलें असे॥ परम शब्दें निरतिशय ऐसें ॥ ज्याहूनि नसे सुख थोर॥६५॥
निरतिशय सुख तें ब्रह्म जाण ॥ जें कीं परमानंदैकघन ॥ तें सत्तेसीं पावतां ऐक्यपण ॥ ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥
॥६६॥ सत्तासुखाचे अंतरीं॥ ज्ञान नांदे बरव्यापरी ॥ येकेवीण येक क्षणभरी ॥ भिन्न परस्परीं पावेना॥६७॥हें

स्वगतभेद निरसनमिसें ॥ कां श्रीरामपदव्याख्यानांशें॥पूर्वीं सांग निरोपिलें असे॥जाणिजे ऐसें सज्ञानीं॥६८॥
सत्ता तेंचि जाणावें ज्ञान ॥ ज्ञान तोचि आनंद पूर्ण ॥ तिहीं पदीं एक ब्रह्म निर्गुण ॥ नव्हे न्यून येकत्वें ॥
॥ ६९ ॥ येथें नाहीं गुणी गुणविभाग ॥ तिहीं पदीं एक ब्रह्मचि सांग ॥ ह्मणोनि भिन्न नलगे पदांग ॥ ए-
क अव्यंग परब्रह्म ॥ ११७० ॥ ते कृष्णानंदनामें मिरवणी ॥ हाचि मंत्र परम गुह्यस्थानीं ॥ हें महावाक्य को-
डीसवाणी ॥ करी निर्वाणीं साक्षात्कार ॥ ॥ ७१ ॥ ह्मणून श्रीकृष्ण नामें येणें॥ परब्रह्मचि सर्वदां बोलणें ॥ व
री आनंद शब्द पुरवणें ॥ आनंद येणें सर्वत्र पैं ॥७२ ॥ तें श्रीकृष्णानंद नामउच्चारण ॥ उठिजे स्वरूप साक्षा-
त्कारपणें ॥ ज्ञाते सुख पावती तेणें ॥ नाहीं दैन्य परमानंदपणें ॥७३॥ शब्दादेव अपरोक्ष सिद्धि ऐसें॥ सिद्धांत
शास्त्रीं बोलिलें असे ॥ तेंचि अनुभवाहि येतसे ॥ शब्दें प्रकाशे वाच्यवस्तु ॥७४॥ लौकिकही शब्देंकरून ॥वा-
च्यार्थासीं तद्रूपपण ॥ करीतसे स्वयें जाण ॥ नकरीतां प्रयत्न शक्ति ऐसी॥७५॥गो अश्व मनुष्य घटपट हस्ती॥
जे जे नामशब्दें भारती ॥ तदाकार होय चित्तवृत्ति ॥ संत बोलती साक्षात्कार तो ॥७६ ॥ यालागीं
श्रीकृष्णानंद नाम येणें ॥ स्वरूपसाक्षात्कारचि बोलणें ॥ ह्मणोनि हेंचि उच्चारणें ॥ ब्रह्मसुख जेणें पाविजेत ॥
॥ ७७॥ ह्मणोनि सर्वदां हेंचि मी करी ॥ बुडे श्रीकृष्णानंदसागरीं ॥ नेणे तत्सुखेंवीण दुसरी ॥ मात पुरी सर्वदां
॥७८॥असो त्याची कीर्ति वाखाणणें ॥ तरी ग्रंथरूपें केलें बोलणें ॥ संत निवती तत्श्रवणें॥अनुदिनीं परमानंद
॥ ७९ ॥ यालागीं सर्वदां सर्वपणीं ॥ग्रंथरूपनामें तयातें वाखाणी ॥ तेव्हांचि विचरे सर्वत्र सर्वपणीं ॥ पूर्ण-

पणीं पूर्णत्वें ॥ ११८० ॥ एवं आदि मध्य अवसानीं ॥ गाइला श्रीकृष्ण मंगळाचरणीं ॥ ऐसेंच उक्ती शिष्टाचरणीं ॥ ग्रंथपरिपूर्णपणीं सिद्ध येणें ॥८१॥ श्लोक ॥ ग्रंथादौग्रंथमध्येग्रंथांतेमंगलमाचरणीयंइतिशिष्टाचारः ॥ नमस्कारात्मकंआशीर्वादात्मकंवस्तुनिर्देशात्मकंचेत्यादि ॥ ३४ ॥ टीका ॥ ययांत नमस्कारात्मक ॥ मंगळाचरण केलें देख ॥ जय शब्दें आशीर्वादात्मक ॥ केलें सम्यक मंगळाचरण ॥ ८२॥ आणि वस्तु निर्देशात्मक ॥ तें सद्गुरुरूपवर्णन देख॥ नामरूपावरी निष्टंक ॥ केलें एक मंगल ऐसें ॥८३॥ एवं आदि मध्यें अवसानीं॥ नमन आशीर्वादरूप वर्णनीं ॥ केलें परम प्रेमेंकरूनि ॥ मनें काया वाचा करोनियां ॥८४॥ ते प्रीति पावो सद्गुरुरावो ॥ येणें बोधेंचि फळो माझा भावो ॥ आतां क्षमा करो हा सखासद्गुरुरावो ॥ नित्यमद्भाव नित्यत्वें ॥ ८५ ॥ धारा नाम महानगरीं॥गोदावरीच्या दक्षिण तिरीं ॥ षोडश क्रोशाभीतरीं॥ वर्ते पुरी अतिविशाळ ॥ ८६ ॥ तद्देश दुर्ग पश्चिमतिरीं ॥ महाविशाळ गुह्यगिरी ॥ तेथें अतिकृपाकटाक्ष करी ॥ पद्मकर शिरीं ठेविला ॥ ८७ ॥ त्या हस्तस्पर्शाचेनि संयोगें ॥ समाधीच स्वयें पायां लागे ॥ प्रपंच विसरे स्वयें स्वांगें ॥ ब्रह्मचि अंगें होऊनि ठेलें ॥ ॥ ८८ ॥ नेणे दिशा विदिशा अंतराळ ॥ नेणे स्वर्ग मृत्यु पाताळ ॥ नेणे गिरी दरि ब्रह्मांडगोळ ॥ झालों सकळ ब्रह्मचि मी ॥ ८९ ॥ आत्मस्वरूपावांचूनि कांहीं ॥ दुजेपणाचि मातु नाहीं ॥ तुरीन देह विदेह पाहीं ॥ ब्रह्मसुखडोहीं सुखरूप ॥ ११९० ॥ तेचि निर्विकल्प सुखगोडी ॥ ग्रंथमिसें म्यां केली उघडी ॥ आतां कासया कीजे शब्दप्रौढी ॥ व्यर्थ वोढी पुनरुक्तीची ॥९१॥ जें किर ठेविलें होतें सर्वां चोरुनी ॥ तेंचि माझ्या स्वामीनीं मज-

लागुनी ॥ अतिरहस्य हृदईचें काढोनि ॥ मद्वदनीं रिचविलें जें ॥ ९२ ॥ तेंचि म्यां ग्रंथमिसें करून ॥ प्रगट केलें जनालागुन ॥ सुखपूर्णोद्वारें ग्रंथ संपूर्ण ॥ कवित्वगुण येथें नाहीं ॥ ९३॥ येथें नेणोनि अक्षरादि वर्णभेद ॥ अक्षर साम्य ऱ्हस्व दीर्घ विषद ॥ काव्यमुद्रा वचनावबोध ॥ नेणोनि बाध पदबंधाचा ॥ ९४ ॥ ऐसाहि रचिला ग्रंथसागर ॥ पूर्णानंद स्वादाचा पूर्णोद्गार ॥ येणें कवित्व नकरोनि विचार ॥ बोधसमुद्र आश्रय हा ॥९५॥ येथें बोधसमुद्रींच घालूनि दृष्टी ॥ ग्रंथान्वयें पदार्थपुष्टी ॥ पावोनि मोक्षश्रियेच्या पाठीं ॥ बैसिजे सृष्टी आनंदाच्या ॥ ९६ ॥ आतां हेचि माझी असे विनंती॥नमन करूनि पुढतपुढती ॥ न्यून पाविजे पूर्णार्थीं ॥ ग्रंथसमाप्ति अत्यादरें॥९७॥ॐतत्सतब्रह्मार्पण॥करूनि ग्रंथ केला संपूर्ण॥जयजयकारें गर्जोन॥हेंचि नमन श्रोत्यावक्त्या ॥९८ ॥इतियोगवासिष्ठसारेश्रीवसिष्ठरामसंवादेनिर्वाणप्रकरणंनामदशमंसमाप्तं ॥ श्रीरामार्पणमस्तु ॥११९९ ॥ स्वस्ति नृपशालिवाहन॥सर्व शकामाजि शक गहन॥ वर्ष पंचदशशत त्रिंशद्गुण॥कलिकाळाभिधान संवत्सराचें ॥ १२०० ॥ षड्ऋतुमाजि श्रेष्ठपणें ॥ श्रीशरदृतु नामें येणें ॥ अश्विनमास अतिशुद्धपणें ॥ अष्टगुणें अष्टमी ॥ १ ॥ गुरुवासर सद्गुरुपणें ॥ निर्जरानुग्रहें दैत्या उणें॥ आणि ह्मणुन नाम येणें ॥ सुंदरपणें विराजत॥२॥ सुकर्मा योगकाळीं ॥ संपूर्ण ग्रंथाची समाप्ति झाली॥श्रीसद्गुरुरायें पुरविली आळी ॥ परमानंद दिवाळी भाविकां केली ॥ ३ ॥ तेंचि तें निरूपण सुखसमाधानीं ॥ श्रवणें करी परमानंदधनी॥ह्मणोनि परिसावें अनुदिनीं॥ करी विनवणी श्रीकृष्णदास ॥ ४ ॥ आतां ग्रंथसमाप्तिचें स्थान ॥ जें कां सर्व क्षेत्राचें अलंकरण ॥ तेंहि आतां

भासे ॥ ज्ञानदृष्टी ब्रह्मचि असे ॥ ज्ञानाज्ञानाचे दोनी ठसे ॥ येरवीं असे ब्रह्मचि येक ॥ ६ ॥ दर्पणामाजि मुख पाहिजे ॥ तरीच तेथें दुजें देखिजे ॥ येरवीं मुख तें मुख सहजें ॥ नाहीं दुजें देखतां ही॥७॥ दर्पणीं काय नवें मुख आणिलें ॥ कीं दर्पणीं होतें ठेविलें ॥ कीं दर्पण नघेतां हारपलें ॥ किंवा लपालें कोणा आड ॥८॥ यालागीं दर्पणाचिये उपाधी ॥ येकीं झाली द्वैत बुद्धी ॥ उपाधि त्यागितां निरवधि॥ब्रह्मनिरुपाधि येक येकलें॥ ॥९॥ जैसें सुषुप्तीचेनसंगें ॥ स्वप्नीं भासति देह अनेगे ॥ शेखीं येकचि उरे निद्रात्यागें ॥ स्वयें निजांगें स्वयंभची ॥१[१]०॥ तैसें अज्ञानउपाधीनें जग भासे ॥ तेंचि उपाधिनाशें ब्रह्मचि असे ॥ परी येकचि भासति अनंत ठसे ॥ परी तें येकचि ऐसें जाण तूं॥११॥ह्मणून जे हे विश्वपरंपरा ॥ तें सर्वहि ब्रह्मचि गा रघुवीरा ॥ तरू पावला विस्तारा ॥ तरी बीजांकुरा भिन्न नाहीं ॥१२॥ नातरी अवयव जरी अनेक ॥ नानाकार नाना वेश ॥ नामेंचि दिसति असंख्य ॥ परि देह येक नचुकेची॥१३॥ नानाकारें भिन्न भिन्नीं ॥ भेदाचि दृढावला इये जनीं ॥ तो अधिष्टान ज्ञानावांचुनी ॥ नजाय प्रयत्नीं कोटिसंख्या ॥१४॥ तेंचि अधिष्ठान ज्ञान होतां ॥ भेद नासोनि जाय तत्वतां ॥ उरे अधिष्ठान येकात्मता ॥ नाहीं वार्ता दुजयाची ॥ १५ ॥ ऐसेनि वस्तुविचारें ॥ सांडोनि सर्वही भेदांतरें ॥ राहे येकात्म निर्धारें ॥ नेणोनि दुसरें कल्पिजे पैं ॥१६॥ ब्रह्मचि मन बुद्धि आणि प्राण ॥ इंद्रियें सर्वहि ब्रह्मचि पूर्ण ॥ ब्रह्मचि देह विदेह जाण ॥ संकल्पन परब्रह्म ॥ १७ ॥ देह देहत्वें ब्रह्म जाण ॥ इंद्रियव्यापार

१ अत्यंत. २ अनेक, पुष्कळ.

वार्य उपजेल ॥ केलिया अभीष्ट फळ उपजेल ॥ इत्यादि केवळ नाहीं तया ॥ ७३ ॥ पूर्वप्रवाहें करून ॥ उगेंचि करी विहिताचरण ॥ तैसेंच निषेधाचें परिवर्जन ॥ स्वभावें जाण करितसे ॥ ७४ ॥ तो तरी स्वयें उभयातीत ॥ नेणे पुण्यपापाचि मात ॥ विधिनिषेध दोनी नेणत ॥ स्वभावें उचित आचरे ॥ ७५ ॥ सत्कर्म स्वयें आचरावें ॥ असत्कर्म सर्वस्वें गाळावें ॥ ऐसा सर्वथा नेणे इये हावें ॥ सहज स्वभावें वर्तत ॥ ७६ ॥ परि वर्ततां नवर्ततां दोष नाहीं ॥ केल्याचें फळ तेंचि पाहीं ॥ देहीं असोनि तो विदेही ॥ नाहीं कांहीं दोषादोष ॥ ७७ ॥ जैसा बाळक हा जयापरी ॥ गुणदोषातें नेणे अंतरीं ॥ परि संस्कारें बाह्य चेष्टा करी ॥ शुभाशुभ परी नेणोनियां ॥ ७८ ॥ संकल्पविकल्पविरहित ॥ चेष्टा करी स्वभावपतित ॥ त्यामाजी येक शुभ येक अशुभ होत ॥ स्वयें नेणत जयापरी ॥ ७९ ॥ देव पूजिलिया हित होईल ॥ तोचि टाकिलिया दोष जडेल ॥ हे दोन्हीं कांहींच नेणे तो बाळ ॥ करी खेळ संस्कारवशें ॥ ८० ॥ इंद्रियांच्या ज्या ज्या राहाटी ॥ ज्ञानी नेणतां आत्मदृष्टी ॥ इयापरी तो जगजेठी ॥ करी राहाटी कर्मांचि हे ॥ ८१ ॥ तया अकर्म आणि कर्म ॥ दोन्ही झालिया परब्रह्म ॥ जग तें ब्रह्मत्वें निःसीम ॥ नाहीं विषम अणुमात्र जया ॥ ८२ ॥ ब्रह्म नेणोनियां पाहिजे ॥ तरीच ब्रह्म जग देखिजे ॥ येरवीं सर्व ब्रह्म सहजें ॥ नाहीं दुजें वस्तुवीण ॥ ८३ ॥ श्लोक ॥ अनुत्कीर्णेयथास्तंभे संस्थिताशालभंजिका ॥ तथाविश्वंस्थितंतत्रतेनशून्येनतत्पदं ॥ ३२ ॥ टीका ॥ अगा या ब्रह्माचाचि पोटीं ॥

१ दोष. २ इच्छेस.

ठाईं रजत ॥ तैसें ब्रह्मीं विश्वजात ॥ अज्ञानें भिन्नसें भासत ॥ येरवीं सदोदित परब्रह्म ॥ ९६ ॥ प्रथम सर्व निरासेंकरून ॥ साधिजे स्वस्वरूप निर्वाण ॥ मग सर्वत्र सर्व ब्रह्म पूर्ण ॥ नाहीं अपूर्ण पूर्णत्वें ॥ ९७ ॥ सर्व ही जग हें ब्रह्मपूर्ण ॥ ब्रह्मेंवीण नदेखे आन ॥ हे रघुनाथा शेवटील खुण ॥ जाणिजे पूर्ण ब्रह्म येक ॥ ९८ ॥ ॥ श्लोक ॥ यथानपुत्रिकाशून्यस्तंभोनुत्कीर्णपुत्रिका ॥ तथाभजंतिजगद्ब्रह्मशून्यपदंमतं ॥ ३३ ॥ टीका ॥ जैसा कां स्तंभ न कोरितां ॥ पुत्रिंका शून्य नव्हे तत्वतां ॥ तैसें जग वेगळें नभासतां ॥ तदंतर्गता असेच कीं ॥ ९९ ॥ जग भासतां नभासतां ॥ ब्रह्मीं ब्रह्मरूपचि तत्वतां ॥ नाहीं येथ आन कथा ॥ ब्रह्म सर्वथा ब्रह्मचि येक ॥ ९०० ॥ श्लोक ॥ सौम्यांभसियथावीचीर्नचास्तिनचनास्तिच ॥ तथाजगद्ब्रह्मणीदंशून्याशून्यपदंगतं ॥ ३४ ॥ टीका ॥ जैसें महाऱ्हदाच्याठाईं॥ जळ गंभीर निमग्न पाहीं ॥ जेथें लहरीपणें भासे अनेकही ॥ परि निंवाड दोहीं नहोय ॥१॥ सपाटलेपणें उदकचि असे ॥ तेथें वीचि बुदबुद कांहीं नभासे ॥ तेंचि पाहातां वायुवसें ॥ दिसति सर्वांशें वीचि सर्वत्र ॥ २ ॥ तथापि वीचि भासतां नभासतां ॥ सर्व हीजळचि तत्वतां ॥ लहरी असे जळात्मता ॥ भास अन्यथा तो भ्रम ॥ ३ ॥ परि वीचि आणि बुद्बुदाकारें ॥ येक जळ तेथें नाहीं दुसरें ॥ तैसें ब्रह्मचि हें विश्वाकारें ॥ भासे साचारें नानाकृती ॥ ४ ॥ विश्वाचें आहे नाहींपणे ॥ हें कांहीं नबोलों ब्रह्मेंवीण ॥ यालागीं जग ब्रह्मासीं भिन्नपण ॥ नाहीं जाण सर्वथा ॥ ५ ॥ भेदहृष्टी तरी विश्व-

१ पुतळी. २ समुद्र. ३ वेगळेपणा. ४ लहरी. ५ बुडबुडे.

विश्व संचलें असे जगजेठी ॥ ब्रह्मेंवीण विश्वाची गोष्टी ॥ समूळ खोटी भिन्न ह्मणतां ॥८४॥ जैसा नकोरिता दारुस्तंभ ॥ पुतळिया असति स्तंभीं स्वयंभ ॥ कोरिलिया पुतळीयांचे गळंभ ॥ दिसे भांबें नानाकारें ॥ ॥ ८५ ॥ स्तंभ नकोरितां सुतारें ॥ तो स्तंभचि असे पुतळियाकारें ॥ कोरितां पुतळीयाच्या संभारें ॥ उठी निर्धारें स्तंभचि जैसा ॥ ८६ ॥ इतुकियाचा सिद्धांत ऐसा ॥ स्तंभेवीण नाहीं पुतळियांचा ठसा ॥ तैसें जग हें ब्रह्मींच परेशा ॥ नाहीं दशा दुजेपणाची ॥ ८७ ॥ नातरी गगनाच्याठाईं॥ मारुत सर्वत्र असे पाहीं ॥ हालविल्या भेटे देहीं ॥ येरवीं नाहीं ऐसाचि गमे ॥ ८८ ॥ ऐसें सकळ विश्व ब्रह्मचि असे ॥ निराळें पाहिलें तरी दिसे ॥ येरवीं ब्रह्मपणेंचि असे ॥ भिन्न नसे आन कांहीं॥८९॥परी विश्वावांचुनीभिन्न ॥ ब्रह्म तें सर्वथा नसेचि जाण ॥ सकळ विश्वाचें अधिष्ठान ॥ असे ह्मणऊन विश्व तेथें ॥ ९० ॥ जैसें पृथ्वीच्या पोटीं ॥ घट शरावादि भांडिं गोमटीं ॥ असती जाणपां जगजेठी ॥ केली तरी भेटी होतसे ॥ ९१ ॥ नातरी कापुसामाजि कापड॥कापुसरूपें आहे उदंड॥ केलिया निमित्त भासे उघड ॥ दिसे निवाड कापडपणें॥९२ ॥नातरी सुवर्ण अळंकार ॥ कटक कुंडलादि प्रकार ॥ का सुषुप्तीमाजि जागर ॥ असे निरंतर अधिष्ठानत्वें॥९३ ॥जें जयाचें अधिष्ठान॥ते वस्तु तद्रूपेंचि जाण ॥ नव्हती परस्परें ते दोनी भिन्न॥तया ऐक्यपण तें अखंड॥९४॥ उसामाजी जैसी शर्करा ॥ गुळी गोडी जैसी रघुवीरा॥परिमळ जैसा कापुरा॥ शब्द अंबरा माजि जैसा ॥९५॥कां शुक्तिकेच्या-

१ लांकडाचाखांब. २ आकृती. ३ शोभा. ४ वारा. ५ मातिचीं भांडींवगैरे. ६ वास.

तैसा ज्ञानियां वर्तत ॥ ८५० ॥ अगा देहादिकांच्याठाईं ॥ नुठता आत्मबुद्धी कांहीं ॥ तो देहीं असलिया तरी पाहीं ॥ बाधिल काय आत्मविदां ॥ ५१ ॥ यालागीं देह असतां कां नसतां ॥ सर्वथा नलिंपे तो आत्मवेत्ता ॥ देहत्वेंचि अनुसंधान तत्वतां ॥ नाहीं सर्वथा तयासीं ॥ ५२ ॥ तो देहीं असोनि देहातीत ॥ देहसाक्षित्वें असे वर्तत ॥ तेणें केलियाहि जगाचा घात ॥ स्वयें अलिप्त अकर्तेपणें ॥ ५३ ॥ तूं जरी ऐसें ह्मणसी सीताकांता ॥ जरी तो कर्माचा होय अकर्ता ॥ तरी तो हिंसाकर्म करितां ॥ कैसा अकर्ता तो दिसे ॥ ॥ ५४ ॥ बुद्धिपूर्वक केलियावांचून ॥ कर्मसांग ननिपजे जाण ॥ निषेध गाळून विधीचें पाळण ॥ कर्ता कोण कर्मादिकांचा॥५५॥बरें वाइट ऐसें सुजे॥विधिनिषेध ऐसें बुझे ॥ तरीच तदनुसार कर्म निपजे ॥ कर्तेन कीजे विध्युक्तानुसार ॥५६॥ निषेध करितां पापदर्शन ॥ विधि आचरतां अति पुण्य ॥ पुण्य पापें सुख दुःखभान ॥ तरी जाण वर्ते तैसा ॥ ५७ ॥ पापास भिऊन निषेध गाळी ॥ पुण्यातिशयें विधीतें पाळी ॥ तरी देहानुसंधानाची काजळी ॥ त्याचे कपाळीं कैसी नाहीं ॥५८॥ आणि बुद्धीवांचुनी कर्माचरण ॥ कैसें घडेल त्यालागुन॥ निषेधादिविधी पाळण ॥ करी वर्तन कैसें जाण ॥ ५९ ॥ तरी एकें सांगों गा रघुपती॥येकाग्र होऊनियां चित्तीं ॥ परिसतांचि पावसी विश्रांती ॥ विश्वमूर्ति विश्वंभरा ॥ ८६० ॥ श्लोकसंमति ॥ दोषबुद्ध्याभयातीतोनिषेधान्ननिवर्तते ॥ गुणबुद्ध्याचविहितंनकरोतियथार्भकः ॥ २४ ॥ टीका ॥ स्वस्वरूपीं जया अवस्थान ॥तो-

१ वेगळा. २ कळतें. ३ अज्ञान.

चि तो स्वयें ब्रह्म पूर्ण ॥ देह तयाचाचि नव्हे जाण॥अनुसंधान तया नाहीं ॥६१॥ लोकदृष्टी तरी देह दिसे ॥ परि तो देहाचेनि संगें नसे ॥ तो अकर्ता अभोक्ता सर्वांशें ॥ प्रारब्धशेषें देह चळे ॥६२॥ ज्ञान विक्षेपात्मकेंक रून ॥ प्रारब्ध राहिलें असे जाण ॥ तेणेंचि होय देहद्वयभान ॥ कर्माचरण तत्शेषेंची ॥ ६३ ॥ परी दोष होईल ह्मणऊनि ॥ कर्मीं दोषदृष्टी करुनी ॥ ननिवर्ते निषेधापासोनी॥कर्तेपणें उदास तो॥६४॥आधीं निषेधातें देखेल ॥ निषेधवर्तनीं पाप होईल ॥ इतुकें बुद्धि नेणोनि केवळ ॥ टाकी सकळ निषेधजात ॥ ६५ ॥ नेणतां नाना जन्मांतरीं ॥ साधन करितां सहस्त्रवरी ॥ निषेध गाळुनी विधिचि करी ॥ निष्ठा अंतरीं धरूनियां॥६६॥ तेणें सत्कर्माचें अनुष्ठान ॥ निषेधाचें परिवर्जन ॥ करितां सहस्त्र जन्म जाण ॥ संस्कारपूर्ण तोचि बैसला ॥ ॥ ६७ ॥ अगा व्रतबंध झालियावरी ॥ संध्येवीण नजेवी ब्रह्मचारि ॥ तो पूर्वींच निषेधाचरण करी ॥ व्रतबंधावरी सर्व टाकी ॥ ६८ ॥ गायत्रीमंत्रमात्राचेनि उपदेशें ॥ तो विप्र होऊनी बैसे ॥ मरे तो राहे तेणेंचि अध्यासें ॥ ननासे संस्कार त्याचा ॥६९ ॥ मा जन्मजन्मांतरीं केलें ॥ तें केवीं पां राहे उगलें॥ कुमारीचें जेव्हां लग्न झालें ॥ तेव्हांचि बाणलें अहेवपणें ॥ ८७०॥ यालागीं संस्कारेंचि करून ॥ प्रवाहेंचि निषेध गाळी जाण ॥ तैसेंच करी विहिताचरण ॥ गुणागुण नेणोनियां ॥७१॥ स्नान संध्या देवतार्चन ॥ यज्ञदानादि नाना साधन ॥ सांग करी सत्कर्मानुष्ठान ॥ नधरून मनीं गुण त्याचा ॥७२ ॥ हें केलिया दोष जाईल ॥ अकरणीं प्रत्य-

१ त्याग. २ सौभाग्य. ३ योग्य आचरण.

ही ॥ जग नाम नाहीं दुजें तेथें ॥२९॥ सकळ ज्ञानमात्रचिअसे॥ज्ञानाच्याठाईं सर्व भासे॥तद्व्यतिरिक्त कांहीं-
च नसे॥हें पूर्ण मानसें जाणावें॥८३०॥ऐसें तें आत्मस्वरूप जाणोनी॥राहातातिं योगि ये निर्वाणीं॥तैसाचि
तुवांही राजचूडामणि ॥ ब्रह्मपणें राहावें गा ॥ ३१ ॥ मग देह असो अथवा जावो ॥ परि त्या देहांतीं नाहिं
संदेहो ॥ स्वस्थितीनें नाठवे देहभावो ॥ तो बोधाचा रावो ब्रह्मस्वरूप ॥ ३२ ॥ ज्ञानदिनमणी उदयातें पा-
वतां ॥ तेथें देहात्मबुद्धीतम नाशे तत्वतां ॥ आत्मप्रभाव तत्पावे सोज्वळता ॥ स्वयें स्वरूपता स्वस्वरूप-
दृष्टी ॥ ३३ ॥ जैसें कां रंक पावे राज्यातें ॥ तत्काळ हारविल्या रंकपणातें ॥ कीटकी पावे जसी भृंगीपणा-
तें ॥ स्वदेहातें विसरे जैसी ॥ ३४ ॥ तैसा असतां देहसंग कोडें ॥ परि तो नपाहे तया देहाकडे ॥ स्वस्व-
रूपींच वाडेंकोडें ॥ भोगी निवाडे उमजेवीण ॥ ३५ ॥ तेंचि सर्व तूं ऐकें आतां ॥ सांगेन तुज अवनीपाळ-
नाथा ॥ तेंचि येकाग्र करूनियां चित्ता ॥ देह नेणता तो कैसा असे ॥ ३६ ॥ श्लोक ॥ अहिनिर्ल्वयनीमहि-
रात्मतयाजगृहेपरिमोक्षणतस्तुपुरा ॥ परिमुंचतितान्नुरगःस्वबिलेननिरीक्षतिचात्मतुतयापुनः ॥ ३१ ॥ टी-
का ॥ तरी महासर्पअद्भुत ॥ पूर्वीं कांति आत्मत्वें होताघेत ॥ मीच ह्मणउनी देखत पाळित ॥सुख दुःख
पावत तत्संगेकरुनी ॥ ३७ ॥ मग तेचि मुळींहुनी सुटली ॥ भुजंगें अनात्मपणें तात्काळ त्यजिली ॥ ते-
व्हांचि मीपणाचि अहंता गेली ॥ उपेक्षिली परकीयत्वें ॥ ३८ ॥ जरी वारुळादारीं ॥ पडिली असे तदाका-

१ तत्काळ, ब्रह्म. २ अत्यंत.

रीं ॥ परी येतां जातां येरझारी ॥ नस्वीकारी मी ह्मणउनी ॥ ३९ ॥ तैसेंचि अज्ञानदशेच्याठाईं ॥ आत्मत्वें देह घेत होतों पाहीं ॥ तेथील उर्मी ज्या किं साहि ॥ घेतु डोयीं आपुलिया ॥ ८४० ॥ त्या साहि उर्मी कोण कोण ॥ ऐक पुरुषोत्तमा सांगेन ॥ तरी क्षुधा पिपासा जन्ममरण ॥ शोक मोह जाण साहि उर्मी ॥ ४१ ॥ कोण निष्ठा उर्मी त्या कोणी ॥ तेही सांगतों कार्मुकपाणी ॥ तरी क्षुधा पिपासा वर्तती प्राणी ॥ धर्म अनुदिनीं तयाचे हे ॥ ४२ ॥ यया दोनी क्षुधा आणि तृषा ॥ हे प्राणाचे धर्म गा सर्वेशा ॥ देहीं जरा मृत्युचा वळसा ॥ धर्म ऐसा स्थूळदेहाचा ॥ ४३ ॥ शोक मोह हे मनाचे धर्म ॥ मानसीं वर्तती हे अधम ॥ हें जाण षड्उर्मींचें वर्म ॥ त्याहुनी परब्रह्म व्यतिरिक्त ॥४४॥ यया षड्उर्मींवंत हें शरीर ॥ ते हें आत्मत्वें नघे धीर ॥ आत्मप्रतीति देखे दृशतर ॥ स्वयें निर्विकार साक्षि असे ॥ ४५ ॥ झालिया स्वस्वरूप प्राप्ती ॥ तोचि आत्मदेह आत्मत्वें मानिती ॥ बाह्य दिसतिही तत्संगती ॥ परि नाहीं भ्रांति देहपणाची ॥ ४६ ॥ जैसा जागृतीच्याठाईं ॥ देह आत्मत्वें घेतपाहीं ॥ सुषुप्तीसिं अनुसंधान तेंही ॥ नधरी कांहीं देहपणें ॥ ४७ ॥ देहाचेंचिनेणे अनुसंधान॥ तेथें कैंचा ह्मणो येईल क्षत्रीय वैश्य शूद्र ब्राह्मण॥ना ग्रहस्थ वनी यती आपण॥नेणे जाण रघुवर्या ॥ ४८ ॥ अज्ञानास देहधारी ऐसा दिसे ॥ परि तो देहावेगळा असे ॥ ज्ञानि जाणतु तैसा असे॥ देह सर्वांशें नेणत ॥ ४९ ॥ पुरुषपणें पुरुषछाया ॥ सवें असतांही विबुधराया ॥ परी अनुसंधान नाहीं तया ॥

१ मनाचेतरंग. २ तहान. ३ निराळे.

अनुभूत सर्वांस स्वतःसिद्ध ॥ ८ ॥ तेचि स्थितीकरूनि गा ज्ञान ॥ पाहिजे जरी अविछिन्न ॥ तरी तेंचि पूर्णानंदघन ॥ ब्रह्म पूर्ण परमामृत ॥९॥ हें तंव ज्ञान सर्वांसींहि असे ॥ परी आपुलें आपण नेणती ऐसें ॥ तेंचि विचारितां सावकाशें ॥ वस्तुचि असे चिदानंदघन ॥ ८१० ॥ या जगाचें होणें आणि जाणें ॥ उत्पत्ति क्षय इत्यादि वर्तणें॥ तें सर्व जाणे जेणें ज्ञानें॥जाण खुण चिद्रूपाचि ॥११॥ आणि आपुलेंही क्रियाजात॥ देखणें परिसणें देत घेत ॥ तया व्यापारातें जें जाणत ॥ ज्ञान निश्चित सर्वात्मक तें ॥ १२ ॥ ऐसें सर्वही व्यापारांतरीं ॥ मन बुद्धीतेही प्रकाशी अंतरीं ॥ साक्षित्वें साक्षिभूत सर्वांपरी ॥ निघोट निर्धारी तेंचि ब्रह्म॥ ॥ १३ ॥ यालागीं सर्वही ज्ञानरूप असे ॥ विश्वाभास तो मिथ्या भासे॥ जगद्रूपें मनचि उल्हासे ॥ मनेंवीण नसे विश्वाभास ॥ १४ ॥ श्लोक ॥ मनोदृश्यमिदंसर्वंयत्किंचित्सचराचरं ॥मनसोत्युन्मनीभावाद्वैतंनैवोपलभ्यते ॥२९॥टीका ॥ जें चराचर विश्वजाळ॥ यत्किंचित श्रुत दृष्ट सकळ ॥ तितुकें मनोमय केवळ ॥ स्वयें निर्मळ मृगांभ जैसें ॥ १५ ॥ रविरश्मीं मृगजळ भासे ॥ तें सम्यकेंनिरीक्षणेंचि नासे॥ नासे तया मूळ कायिसें ॥ जाण सर्वांशें विवर्त सर्व ॥ १६ ॥ तैसें जाण हें जगटवाळ ॥ असत्यपणेंचि हें निर्मळ॥ ब्रह्मीचा विवर्तचि केवळ ॥ नाहीं मूळ सत्यपणाचें ॥१७॥ मनें निर्मितां विवर्त स्फुरे ॥ मन विराल्या स्वयेंचि विरे ॥ ब्रह्माचेनि सत्यत्वें सत्यत्व स्फुरे ॥ येऱ्हवीं लेकुरें वांझेचि जैसीं ॥ १८ ॥ स्वप्नींचिया लेकुरासीं ॥ कवण मायबा-

१ भेदरहित. २ निर्मळ. ३ विवेकदृष्टीनें.

प तयासीं ॥ हें उठोनि पाहिजे जागृतींसिं॥तंव सिद्धयासीं ठाव नाहीं ॥१९॥ तैसें या जगाचें आहेपण ॥
तें तंव सर्वही मनाचें मनपण ॥ तेंचि मन झालिया उन्मन ॥ विश्वभान नाहींच होय॥ ८२० ॥ देहादि, अंत-
र जें द्वैतजात ॥ तेंहि सत्यत्वें नस्फुरे जेथें ॥ मग विश्व भासेल काय तेथें ॥ सर्वही अनित्य होऊनियां ॥
॥ २१ ॥ यालागीं विश्वाचा उदय रघुपती ॥ होय मनापासाव श्रीपति निश्चिती ॥ उन्मनीं झालिया शांती॥
जगप्रतीति कैंची तेथें ॥ २२ ॥ यालागीं जग तें मिथ्याभूत॥आहे तें ज्ञानमात्राचि समस्त ॥ तेंचि परब्रह्म
जाण निश्चित ॥ सर्वगत सर्वही जें ॥ २३ ॥ तेंचि आईके श्लोकेंकरून ॥ जेणें बुझसी सर्वही ब्रह्म पूर्ण ॥ ते-
चि सांगों पैं निजखुण ॥ होय समाधान समाधीशीं ॥ २४ ॥ श्लोक ॥ यद्दृश्यंचशिवंशांतंयस्यांतर्जगतःस्थि-
तिः ॥ स्पंदास्पंदाविनाशात्मायएकोत्रचिदाकृतिः ॥ ३० ॥ टीका ॥ तरी ऐसें जें देखिजे यया दृष्टी ॥ तेंचि
शिवरूप गा इये सृष्टी [1]॥ नस्फुरे जेथें विश्वव्यष्टी ॥ शांत जगजेठी तया नाम ॥२५॥ निःशेष उपाधीचा उप-
रम ॥ तेंचि बोलिजे शांत परम ॥ जयामाजी जग हें विषम ॥ येकत्वें सम ब्रह्मरूपें ॥ २६ ॥ ऐसें शांत शिव-
रूप कल्याण ॥ पूर्णानंदैक ब्रह्म परिपूर्ण ॥ माजी विश्वस्थिती वर्ते जाण ॥ उत्पत्ति मरण त्यामाजी दिसे॥२७॥
जगाचि उत्पत्ति आणि मरण ॥ दोहींचें जें अत्यंत भान ॥ तद्विनाशात्मक ब्रह्म जाण ॥ येक चिद्घन चिदाकृ-
ती ॥ २८ ॥ तया ज्ञानरूपाच्या ठायीं॥ विश्वोत्पत्ति स्थिती नाश भासति पाहीं॥तरी तें तदात्मकचि जाण सर्व-

१ भास. २ व्यापक.

किंत्साश्रद्धाश्रद्धाधृतिरधृतिः ॥ र्‍हीर्धीर्भीरित्येतत्सर्वंमनएव ॥२६॥ टीका ॥ काम संकल्पादि हें मन सर्व ॥ऐ-सें श्रुति बोले मनाचें गौरव ॥ मनेंकरूनि सर्व भयादि भाव ॥ होय अभाव मनेंवीण सर्व ॥ ८९ ॥ तेंचि ऐकें श्लोकसंमति ॥ वसिष्ठ जे रघुनाथा निरोपिती ॥ तेंचि आतां परिसावें श्रोतीं ॥ जेणें विश्रांती पावेल॥७९०॥ ॥ श्लोक ॥ कल्पांतवायवोवांतुयांतुचैकत्वमर्णवाः ॥ तपंतुद्वादशादित्यानास्तिनिर्मनसःक्षितिः॥२७॥टीका ॥ कल्पांतीचा सर्वत्र वारा ॥ एकत्र मिळोनि सुरश्रेष्ठवरा ॥ वाजो जरी सैरावैरा॥ तरी दरारा नाहीं त्यासीं ॥ ॥ ९१ ॥ त्रैलोक्याचा करूनि गोळा ॥ हा वायु नेऊं कां अंतराळा ॥ परी अमनस्कां भयादि मेळा ॥नाहीं कळवळा क्षितीचा[1] ॥ ९२ ॥ अथवा सप्तोदधि येकत्र होती ॥ ते त्रैलोक्यातें बुडऊं पाहाती ॥ तरी ज्ञाननिष्ठां नाहीं क्षिती ॥ बाह्य नेणती ह्मणोनियां ॥ ९३ ॥ द्वादशादित्य एकवट होती ॥ द्वादशकळीं खडतर तपती ॥ ब्रह्मांडाची रक्षा करिती ॥ परी नेणे सुमती अमनस्क तो ॥ ९४ ॥ मन स्वरूपिं ब्रह्माकार ॥ ते नेणती अंतर्बाह्य विचार ॥ ह्मणून नकळे विचार इतर ॥ तेथें विकार काय उपजे ॥ ९५ ॥ मनेंचिकरूनि दृश्यप्रतीति ॥ मनें चराचर सत्यत्वें भासती ॥ मनें युक्तायुक्त स्फुरताती ॥ मनें होती लज्जादिक ॥ ९६ ॥ आधीं मनें प्रपंच कल्पिला ॥ त्यामाजी उत्तम मध्यम भाग केला ॥ तेथेंही बुध्यादिक मेळा ॥ वोढवला निश्चयात्मक ॥ ९७ ॥ त्यामाजी येकची लज्जा धरी ॥ येकाच्या भयें कांपे थरारी ॥ येके उपजवी येके मारी ॥ संकल्प

१ निरीच्छ. २ भूमीचा. ३ बारा सूर्य. ४ प्राप्तझाला.

माझारीं करी तैसें॥९८॥ तेंचि मन ब्रह्माकार झालिया ॥ स्वयें मनपणा मुकलिया ॥ नेणे वर्तऊं लोकां यया॥ अथवा प्रळयामाजी पडिलें ॥ ९९ ॥ प्रळय झालियाहि महामारी ॥ कोणें जाणावीहि प्रळयाचि थोरी ॥ मन बुडालें ब्रह्मानंदसागरीं ॥ याचि अवसरी नाहीं ह्मणे ॥ ८०० ॥ येथें कल्पि ते कल्पना ॥ मावळोनि गेलिया रघुनंदना ॥ हे सर्व मनाचि विभागलक्षणा ॥ मनक्षयीं भावना सर्वही बुडे ॥ १ ॥ येथें उत्पत्ति प्रळय कोणासीं ॥ होती भासती परियेसीं ॥ यालागीं झालिया प्रळयासीं ॥ अमनस्कासीं क्षिति कैंची ॥ २ ॥ ब्रह्मज्ञानेंकरूनियां मन ॥ जयाचें विरोनि झालें अमन ॥ तोचि तो पूर्णानंदघन ॥ नित्यनिर्गुण चित्स्वरूप ॥ ३॥ तंव श्रीराम ह्मणती श्रीगुरुमूर्ती ॥ अपूर्व निरोपिली हे ब्रह्मस्थिती ॥ ज्ञानेंकरूनि इयेचि निष्पत्ति ॥ तरी ते ज्ञानव्यक्ती कैसी असे ॥ ४ ॥ ज्ञान ऐसें ह्मणिजे कोणासीं ॥ प्रगट कीं गुप्त असे या जनांसीं ॥ तें सांगीतलें पाहिजे मजपासीं ॥ खुण ऐसी अतिसोपी ॥ ५ ॥ तंव वसिष्ठ ह्मणती गा रविकुळज्योती ॥ बरवें पुसिलें तुवां विश्वमूर्ति ॥ तरी करीन ज्ञानाचि व्यक्ती ॥ प्रगटवि जनांप्रति अप्रगट जालें ॥६॥ सर्वांहि प्रत्यक्ष अनुभूत असे ॥ परी ते नेणती अज्ञानवशें ॥ आणि तें विचारीतां तरी स्वयेंचि असे ॥ सांगेन ऐसें तें आईक रघुराया ॥ ७ ॥ श्लोक ॥ याचितिःसर्वभूतानामुदयव्ययसाक्षिणी ॥ तांचितिंपश्यतोवस्थांपूर्णानंदघनामृते ॥ २८ ॥ टीका ॥ सर्व भूतांचा उत्पत्ति नाश ॥ साक्षित्वें जो देखे सावकाश ॥ तेंचि ज्ञान जाणपां उदास॥

१ हेतुरहित. २ उद्भव.

ल्पूं ऐसें ॥ ६७ ॥ अगा जीवात्मा जो कां आपण ॥ तोचि शोधितां ब्रह्म पूर्ण ॥ नाहीं परस्परें दोघे भिन्न ॥ येक चिद्घन निरंतर ॥ ६८ ॥ जीवाचें परिछिन्नत्व किंचिंज्ञत्व ॥ ऐसें कर्तृत्व आणि भोक्तृत्व ॥ सांडूनि निवडी विशुद्धत्व ॥ आणि अज्ञानत्वें देहाध्यास॥६९॥ईश्वराचे परोक्षत्व ऐश्वर्य गुण॥सोडोन शुद्ध घेइजे निवडून ॥ तरी दोहींसि ऐक्य अकृत्रिम जाण ॥ नाहीं भिन्नपण स्वानुभवें ॥ ७७० ॥ दोहींचे सांडितां विशिष्ट गुण ॥ हरपोनि जाय दोहींचें दोनीपण ॥ येक आपणचि ब्रह्म पूर्ण॥उरे निर्वाण दुजेनविण॥७१॥ ऐसें आपणचि एक ब्रह्म जाण ॥ निरंतर सर्वात्मैक परिपूर्ण ॥ हेंचि जाणोनि राहे निर्वाण ॥ चिदानंदघन आपणची ॥ ७२ ॥ यालागीं ध्येय ध्यान सांडूनि ॥ स्वयें ध्यातेपणहि विसरुनी ॥ राहें येक निर्वाणीं ॥ नको शिराणी ध्यान योगाची ॥ ७३ ॥ जरी करूंचि ह्मणसी ध्यानयोग ॥ तरी तोहि तुज सांगेन सांग ॥ न करूनि क्लेश अव्यंग ॥ सांगों योग परियेसी ॥७४ ॥ श्लोक ॥ सोऽहंचिन्मात्रमेवेतिचिंतनंध्यानमुच्यते ॥ ध्यानस्यविस्मृतिःसम्यक्समाधिरभिधीयते ॥ २४ ॥ टीका ॥ अगा समाधि आणि ध्यान ॥ सांगों याचेंही लक्षण ॥ तोचि योग करितां संपूर्ण॥समाधान पावसी तूं॥७५॥ तरी त्वंपद शोधिलिया जाण ॥ उरे जेवीं चिद्रूप निरंजन ॥ शुद्ध स्वप्रकाश उपाधिर्वीण ॥ नित्य परिपूर्ण पूर्णानंदें ॥ ७६ ॥ चिद्रूप चिन्मात्र आनंदघन ॥ तेंचि मी असे जें चिंतन ॥ त्याचेंचि नाम बोलिजे ध्यान ॥ परिशीळॆन स्वस्वरूपाचें ॥ ७७ ॥ तया ध्यानाचें लक्षण ऐसें ॥ चित्त स्वरूपाकार

१ अल्पज्ञान. २ महत्व. ३ पूर्ण. ४ अभ्यास.

करीतसे ॥ तें तेथुन उठे प्रपंचाध्यासें॥मागुतें तैसें तदाकार कीजे ॥ ७८ ॥ ययाचें नाम ध्यान बोलिजे ॥ यया ध्यानातें सम्यक् विसरिजे ॥ स्वस्वरूपिं स्थीर राहिजे ॥ समाधि बोलिजे तया नाम ॥ ७९ ॥ तेंचि समाधीचें लक्षण ॥ आइके रघुनाथा संपूर्ण ॥ करूनियां एकाग्र मन ॥ सावधान परियेसीं ॥ ७८० ॥ श्लोक ॥ ब्रह्माकारमनोवृत्तिप्रवाहोहंकृतिंविना ॥ संप्रज्ञातसमाधिःस्यात्ध्यानाभ्यासात्प्रकर्षतः ॥ २५ ॥ टीका ॥ ब्रह्माकार मनोवृत्ती ॥ तिचा प्रवाह कीजे प्रत्यगांवृत्ती ॥ तेही सांडूनिया अहंकृती॥जीवत्वभ्रांती जे बोलिजे॥८१॥गेला निःशेष अहंकरण ॥ मी जीव ऐसें अनुसंधान ॥ तें त्यागेंचि ब्रह्मरूप स्फुरण ॥ होय पूर्ण अखंड जें कां ॥ ८२ ॥तैलधारेचिया परी ॥ अखंड चित्तवृत्ती ब्रह्माकार करी ॥ आणि तेथेंचि स्थिरावे ते रावणारी ॥ समाधि पुरी संप्रज्ञांत ॥८३॥ हें ध्यानाच्या अभ्यासास्तव ॥ समाधि प्रकाशे हे स्वयमेव ॥ समाधिसंपत्ति चित्तस्वभाव॥ राहाति सर्व ब्रह्माकारें ॥ ८४ ॥ तेव्हां ब्रह्मरूपचि राहे मन ॥ निःशेष नकरी प्रपंचभान ॥ तेचि अमनस्क समाधि जाण ॥ चित्तपण हारविलें ॥ ८५ ॥ संकल्प विकल्पाची फरारी॥तेचि जाण या मनाचि थोरी ॥ तेचि राहातां ब्रह्माकारीं ॥ नुरेचि उरी चित्तपणा ॥ ८६ ॥ जेव्हां चित्ताचें अचित्त झालें ॥ तेव्हांचि संसारादिक भय गेलें ॥ दृश्याचें दृश्यपण उघडलें ॥ तेथें आलें भय कोण ॥ ८७ ॥ जेव्हां चित्तीं असे चित्तपण ॥ त्याचेनि नाम दृश्य स्फुरण ॥ तेव्हांचि शोक मोह दारुण ॥ होती मनें करूनियां ॥ ८८ ॥ श्रुतिसंमति ॥ कामसंकल्पोवि-

१ उलट, स्वरूपाकारवृत्ति. २ सविकल्प. ३ हेतुरहित.

रिती आपणा स्थान ॥ कोणा शरण जाऊं ह्मणती ॥ ४७ ॥ संमतिवार्तिक ॥ प्रत्यक्षतमभमप्येनांवित्तमस्क तयास्थितं ॥ अहोकष्टंनपश्यंतीकंयामशरणंवशे ॥ २२ ॥ टीका ॥ घट पट प्रत्यक्षामध्यें प्रत्यक्षभूत ॥ देहादिक जे समीप पदार्थ ॥ तेही दृश्यत्वें असती स्फुरत ॥ त्याहुनी समीपस्थ तें प्रत्यक्षतम ॥ ४८ ॥ ययाच्या तीन कोटि असती ॥ एक ते प्रत्यक्ष पदार्थ दिसती ॥ एक ते प्रत्यक्षतर ह्मणती ॥ तिसरीयाची गती प्रत्यक्षतम ॥ ४९ ॥ तरी प्रत्यक्ष घट पट देहादिक ॥ प्रत्यक्षतर मन बुद्धी सम्यक ॥ आणि बुद्धींचें साक्षि जें प्रकाशक ॥ जाण प्रत्यक्षतम तें ॥ ७५० ॥ ऐसें प्रत्यक्षामाजि प्रत्यक्षतम ॥ तोंचि तें जाण शुद्ध ब्रह्म ॥ एवं हें प्रत्यक्षाचें परम ॥ व्याख्यान उत्तमोत्तम शब्दाचिया ॥ ५१ ॥ प्रत्यक्ष घट पट देहादि असे॥ परि देह अज्ञानें व्यापिलें दिसे ॥ चक्षुरादि प्रमाणेंचि प्रकाशे ॥ स्वयें तरी असे प्रकाश जड ॥ ५२ ॥ तें दुसरेंनि प्रकाशिल्या प्रकाशे ॥ येरवीं अप्रकाशपणेंचि असे ॥ दुसरीयासीं प्रकाशिना स्वयें प्रकाशे ॥ तेंचि जड असे सर्वार्थीं ॥५३ ॥ तैसें नव्हे तें आत्मस्वरूप ॥ तें तंव स्वप्रकाशें प्रकाशदीप[1] ॥ जें अज्ञानाचें उद्दीप[2] ॥ तमाचा लेप तेथें नाहीं ॥ ५४ ॥ ऐसियासीं नाहीं व्यवधान ॥ स्वस्वरूपीं जयाचें अवस्थान ॥ ऐसियातें जे देखती अंधजन ॥ दुःख दारुण अत्याश्चर्य ॥५५॥तरी आतां आह्मीं कोणासीं जावें शरण ॥ आमुचें समाधान करील कोण ॥ यालागीं श्रुति भाकिती[3] अतिदैन्य ॥ देखोनि मूर्खपण लोकांचें ॥ ५६ ॥ हातीचें कंकण नदेखती ॥ देखावया दर्पणातें इछिती ॥ दर्प-

१ अज्ञानाचा छेदकरणारा दीप. २ उद्योग. ३ बोलतात.

णसाधनेवीण नाहिं प्राप्ती ॥ ऐसें जल्पति अतिचतुर ॥ ५७ ॥ आपणासीं जिव्हा असे कीं नसे ॥ ऐसें ही ये जिव्हेनें जगातें पुसे ॥ स्वयें आत्मा नेणोनि तैसें ॥ जाणोनि पिसे मिरविताती ॥५८॥ इतुकियाचा ऐसा मथितार्थ ॥ सर्व दृश्याचे निरासें जें उर्वरीत॥ तेंचि जाणपां इत्थंभूत ॥ व्यापक नित्य आत्मस्वरूप॥५९॥ जयासिं निरसितां ही कांहीं ॥ सर्वदां असत्यपणें निरास नाहीं॥ तेंचि तूं ब्रह्मस्वरूप पाहीं॥तूंचि तूं प्रत्यक्ष नित्यानंद ॥७६०॥ ऐसीये स्थितीनें रघुनाथा ॥ तूं कृतार्थ होसी सर्वथा ॥ याहुनी नको अन्य कथा ॥ वर्ततां अनर्थी वरपेडा होसी ॥ ६१ ॥ तेथें ध्याता ध्येय ध्यान सांडोनी ॥ येक येकत्वें राहे निर्वाणीं ॥ त्रिपुटी कल्पूं नको कोदंडपाणी ॥ ब्रह्म तूंचि तूं निरंतर ॥ ६२ ॥ श्लोक ॥ अहंध्यातापरंदेहमखंडंखंडयेत्कथं ॥ आत्मानंसततंब्रह्मविद्धिचैकंनिरंतरं ॥ २३ ॥ टीका ॥ येका अखंड ब्रह्मासीं ॥ खंडपण तें पाप परियेसीं ॥ त्रिपुटी कल्पितां येकासीं ॥ मा अनेकासीं अनेक पाप ॥६३ ॥ येकाचि ब्रह्मासि गा जगजेठी ॥ भावितां ध्याता ध्येय ध्यानात्रिपुटी ॥ होती दोषाचिया कोटी ॥ तेथें काल्पितां सृष्टी अनेक पाप ॥ ६४ ॥ यालागीं स्वयें आत्मा तेंचि ब्रह्म ॥ येक व्यापक निरंतर सम ॥ नाहीं व्यवधान निबिड परम ॥ अखंड निःसीम परिपूर्णत्वें ॥ ६५ ॥ अखंड निरंतर जे वस्तु ॥ तेथें दुजेपणाचि येक मातु ॥ ऐसीया ब्रह्मातें ध्येय ह्मणतु ॥ आपण मानित ध्याता ह्मणउनी॥६६॥ आपणा जीवित्वें ध्याता ह्मणे ॥ ईश्वरत्वें ब्रह्मासी ध्येयत्वें जाणे ॥ हेंचि गा अखंडासीं खंडपणें ॥ नको मनें क-

१ खरा, शुद्धअर्थ. २ गुंतलेला.

प्रकाशें ॥ २६ ॥ तया नाहीं व्यवधान ॥ नाहीं आपणाहूनि भिन्न ॥ अपरोक्ष आपुलेंचि स्वरूप जाण ॥ स्वप्रकाशे जाण स्वप्रकाशें ॥ २७ ॥ जयाचिये भेटिलागीं ॥ नलगे पडणें पडणी आंगीं ॥ नलगे जाणें साधनमार्गीं ॥ अंतरंगीं स्वयेंचि पाहावें ॥२८॥ आपुल्याचिदेहीं आपणाआंत ॥ आत्मस्वरूप पाहावें निश्चित ॥ पाहातेक्षणींच स्वयें भेटत ॥ परि तें असत स्वतःसिद्ध स्वयें ॥२९॥ यालागीं कासया साधनें ॥ अपरोक्ष वस्तुसीं पाहिजे देखणें ॥ हेंचि अंतरीं आणि स्वतःसिद्धपणें॥ कोणा पुसणें लागेचिना ॥ ७३० ॥ पाहातां नपाहातां स्वयेंचि असे ॥ तया साधनाचे कां करावे वळसे ॥ तें साधनही जयाचे प्रकाशें ॥ तें साधनीं कैसें आतुडेल ॥ ३१ ॥ डोळा पदार्थातें प्रकाशी ॥ डोळ्या दाविते कोण वस्तु ऐसी ॥ यालागीं आत्मप्रभा आत्मयासीं ॥ स्वयें प्रकाशी स्वसंवेद्यत्वें ॥ ३२ ॥ ऐसें प्रगट आणि प्रकाशमंत॥ स्वयें स्वतःसिद्ध प्रत्यक्षभूत ॥ तयासीं नदेखती भाग्यहत ॥ दुःख अद्भुत महाथोर ॥ ३३ ॥ अहा कटा हें अतिवोखटें ॥ हें दुष्टभाग्य या जनांचें उफराटें ॥ स्वतःसिद्ध नेणोनि कल्पिती मोठें ॥ विषय गोमटे मानिताती ॥ ३४ ॥ काम क्रोध लोभादिकरून॥ दुष्ट नष्ट जयाचें मन॥ तयाचें दुर्भाग्य वाखाणी कोण॥ अतिदीन अभागी जे ॥३५॥ तया दुष्ट भाग्याहुनी थोर ॥ आणीक दुःख नाहीं गा साचार ॥ आत्मस्वरूप प्रत्यक्ष निर्विकार ॥ अभाग्य नर नदेखताती ॥ ३६ ॥ ऐसें स्वयें श्रुति बोलताती ॥ खेद करुनी कपाळ पिटिती ॥ तेही सुरेश्वराचार्य बो-

१ प्राप्तहोईल. २ नशीबा. ३ फारवाईट.

❋ १३

लती ॥ ते ऐक संमति रघुपुंगवा ॥ ३७ ॥ संमतिवार्तिक ॥ प्रत्यक्षगोचरंदेवंलोकंचातिप्रमादितं ॥ दृष्ट्वाश्रुतिशि रस्ताडमनुक्रोशतिदुःखिता ॥ २१ ॥ टीका ॥ प्रत्यक्ष गोचर असतां देवो ॥ लोक हा प्रमादि कैसा पहाहो ॥ सर्वी प्रकाशी तोचि बोलिजे देवो ॥ तो सिद्ध पाहाहो स्वयेंचि असे ॥ ३८ ॥ जरी हा लोक पाहोनि बैसे ॥ तरी पाहतां नपाहतां स्वयेंचि प्रकाशे ॥ जनाच्या नेणण्यातेंही प्रकाशीतअसे ॥ तो पहाहो कैसे नदेखती ॥ ॥ ३९ ॥ मी आपणातें नेणे ह्मणतां ॥ तया नेणण्यातें जो प्रकाशिता ॥ तोचि स्वयें स्वतःसिद्ध असतां ॥ सर्वी प्रकाशितां नेणती ॥ ७४० ॥ जरी नेणपणेंचि स्वरूप याचें ॥ तरी नेणपणेंचि वसने शिळेचें ॥ तैसेंचि असावें हृदय याचें ॥ नेणपणाचें ज्ञान नसावें ॥ ४१ ॥ शुद्ध नेणपण असे सुषुप्तीसिं ॥ ते प्रकाशी काय नेण-ण्यासीं ॥ कीं नेणतयाचेंही ज्ञान वृक्षासी ॥ ते मूढवृत्तीसिं अतिमूढ ॥ ४२ ॥ तैसें हें नव्हे गा जाण ॥ तेथें नेणणें याचें होतसे भान ॥ भान करितें तेंचि जाण ॥ चिदानंदघन परब्रह्म ॥४३॥ ऐसें प्रत्यक्ष प्रकाशमंत गो-चर ॥ त्यातें प्रमादी लोक ह्मणती पामर ॥ ते देखोनि फोडिती शिर ॥ श्रुति संहार कळवळोनी ॥ ४४ ॥ अ-तिआक्रोशें कपाळ पिटिती ॥ आपण वर्तलों लोकस्थिती ॥ लोक होईल विषयासक्ती ॥ आपणा नेणती ह्म-णोनियां ॥ ४५ ॥ ह्मणऊनि प्रवर्तलों यया भागीं ॥ तंव लोक वेधले विषयसंगीं ॥ नेणती आत्मसुख अंतरंगीं॥ दुःखभागी ह्मणोनियां॥४६॥आह्मीं अतिदुःखिता श्रुति होऊन॥ आक्रोश करिती पुनः पुनः जाण॥ मग विचा-

१ मोह पडला. २ भ्रमिष्ट. ३ नीच.

पळे उठाउठी ॥ होय भेटी आपआपणया ॥ ५६ ॥ रामा येवढा जो भेद देखिला ॥ त्यासीं ब्रह्मांड थोडें बसावयाला ॥ तो सांगपां कोठोनि आला ॥ मागुता गेला कोणे ठायां ॥५७॥ येके मुंगीचा ही माग दिसत ॥ आला गेला असें कळत ॥ आणि तो भेद कोठें हारपत ॥ सांग मात रघुराया ॥ ५८ ॥ येवढा भेद आलेपणें दिसे ॥ नागेला हेंही कोण्हा नभासे ॥ तरी याचा विचार हाचि असे ॥ जाण सर्वांशें मिथ्या भ्रमु ॥ ५९ ॥ अगा अधिष्ठानाचेनि नेणपणें ॥ अध्यस्ताचा आरोप करणें ॥ लीन होणें अधिष्ठानज्ञानें ॥ आलें गेलेंपण दोन्ही मिथ्या ॥ १६० ॥ येवढा द्वैताभास मिथ्या उठिला ॥ तो विचारेंचि लया गेला ॥ जेथें भासला तेथेंचि निमाला ॥ आत्मा उरला जैसा तैसा ॥ ६१ ॥ द्वैतारोप आत्मयाच्याठाईं ॥ पाहतां निमाला तेथेंचि पाहीं ॥ यालागीं द्वैताध्यस्त सर्वही ॥ मिथ्या पाहीं तिहीं काळीं ॥ ६२ ॥ मिथ्या तें तंव नासोनि जाय ॥ परि आत्मा जैसा तैसाचि पाहे ॥ गंधर्वनगरें पावे भय ॥ गगन आहे गगनीं जेसें ॥ ६३ ॥ शुक्तिका सत्यत्वें वर्तमान ॥ तेथें रजत उद्भवे नासे आपण ॥ दिसे मावळे जैसें स्वप्न ॥ अधिष्ठानें जैसा तैसा ॥ ६४ ॥ यालागीं सर्वही येक अधिष्ठान ॥ अध्यस्त भास तो भ्रम पूर्ण ॥ ऐक यदर्थीं निदर्शनें ॥ आत्मखुण जेणें बुझसी ॥ ६५ ॥ श्लोक ॥ नैकमप्यंगदाद्यैश्वयथैकंहेमसंस्थितं ॥ उपाधिभिरनेकोपितथात्मैकस्वरूपतः ॥ ८ ॥ टीका ॥ आणीक दृष्टांत गा रघुनाथा॥ तो तुज सांगेन गा तत्वतां ॥ जेणें बुझसी वास्तवार्था ॥ ऐक आतां एकाग्र तूं ॥ ६६ ॥ तरी अनेक जैसे अळं-

१ सूक्ष्माचा. २ रूपें. ३ शास्त्रवचन. ४ समजशील.

कार ॥ अंगदें कंकणें पदक हार ॥ मुद्रिकादि नाना प्रकार ॥ अतिमनोहर नामरूपें ॥ ६७ ॥ चितांक कुंडलें भवरिया ॥ वाळे वांकीवाचि आकार यया ॥ तीं येकची सुवर्ण[1] गा रघुराया ॥ तयावीण यां ठाव कैंचा ॥ ६८ ॥ येकाचि सुवर्णाचियाठाई ॥ नाना अलंकार कल्पिले पाहिं ॥ विचारें अळंकार भिन्न नाहीं ॥ येकाचि सर्वहि हेम जैसें ॥ ६९ ॥ त्या लेणियाचेनि संकल्पें ॥ हेमीं अळंकाराभास आरोपे ॥ विचारें सुवर्ण येकचि स्वरूपें ॥ नानात्वें विकल्पें कल्पिताती ॥ १७० ॥ तैसा उपाधिकरूनि गा रघुनाथा ॥ आत्मा पावे अनेकता ॥ परि स्वरूपें आत्माचि तत्वतां ॥ विश्व हें भ्रांता प्रतिभासे ॥ ७१ ॥ देहादि प्रपंचेंकरून ॥ येकासींच नानात्व मानी जन ॥ येथें भ्रमेंवाचूनि नाहीं आन ॥ विचारें संपूर्ण आत्मस्वरूप ॥ ७२ ॥ आणिकही दृष्टांत तुजप्रती ॥ सांगेन ऐक मंगळमूर्ती ॥ अनेकीं येकत्व प्रतीति ॥ येकीं भ्रांती अनेकपणाची ॥ ७३ ॥ श्लोक ॥ शरीरावयवा यद्वद्विकाराश्चयथामृदः ॥ अद्वैतंद्वैतवद्भातितथास्थावरजंगमं ॥ ९ ॥ टीका ॥ अगा येकचि हें शरीर पाहीं ॥ नाना अवयवाकार भासे सर्वही ॥ पारि येकासारिखा येक नाहीं ॥ नामें तयाही तदनुसार ॥ ७४ ॥ नेत्र श्रोत्र आणि नासिक ॥ हस्त चरण अंगुल्यादिक ॥ अनेक आकार आणि नामें देख ॥ परि होय सकळिक देहचि येक ॥ ७५ ॥ ऐसी अनेकांची येकाकारें ॥ भासत असती जाण निर्धारें ॥ कीं येकची मृत्तिका घटपटाकारें[2] ॥ नाना प्रकारें येक भासत ॥ ७६ ॥ घट शरावादि अनेक पात्रें ॥ घडले राजणादि विचित्रें ॥ ते मृत्तिके-

१ सोनें. २ परळ.

वीणनव्हती स्वतंत्रें ॥ बहुतां प्रकारें येकचि भासे ॥७७॥ तैसें हें स्थावर जंगमादिक ॥ विश्व अद्वैतीं भासे अनेक ॥ तें अद्वैत नमानूनियां लोक ॥ साचाचि अनेक मानिती ॥७८॥ अद्वैतचि द्वैतासारिखें ॥ भासे तैसेंचि अज्ञानी देखे ॥ तेणेंचि भोगी जन्मदुःखें॥ पशुवेषें असे वर्त्तत ॥ ७९ ॥ अगा श्वान शूकरादि पशुयाती ॥ भिन्न परस्परें सृष्टी देखती ॥ तैसीच जाण त्याचीहि गती ॥ तरी नराकृती धिक् त्याची ॥ १८० ॥ नराकृती ह्मणवणें ॥ आणि पशुज्ञानें करूनी वर्तणें॥धिक्[1]जिणें तें लाजीरवाणें ॥ परावृत्ति[2] मनें नधरिती ॥८१॥ असो काय बोलावे अवगुण ॥ जन्मजन्मांतरीं ते ऐसेचि जाण॥स्वप्नींहि नाहीं सेविले गुरुचरण ॥ कैसेंनि ज्ञान भासे त्यासी॥८२॥ असो तें भावनें ऐसेंचि पावती ॥ ह्मणउनी असो त्यांची गती ॥ दृष्टांत ऐके लक्ष्मीपती ॥ आत्मस्थिती बुझंसी जेणें ॥८३॥ श्लोक ॥ मणितोयघृतादर्शेष्वेकमप्याननंयथा ॥ भात्यनेकमिवात्मापितथाधीष्वनुबिंबितः ॥ १०॥ ॥ टीका ॥ अगा आत्मा येकचि सतत ॥ तो अनेक मानिती उपाधिगत ॥ उपाधिवशें नाना भावित ॥ ऐक दृष्टांत विबुधनाथा॥८४॥स्वच्छ मणि आणि उदक ॥ घृत आणि आदर्श[3] देख॥ या उपाधीच्याठांईं मुख येक॥ दिसे अनेक अज्ञानीयासी ॥ ८५ ॥ विचारें पाहतां गा रघुपती ॥ मणीच्याठायीं भासे मुखव्यक्ती ॥ तेचि भासे पैं जळाप्रती ॥ आदर्शीं स्फूर्ति[4] तेचि होय ॥ ८६ ॥ येकचि मुख उपाधिवेषें ॥ अनेकसें नेणत्या भासे ॥ परि ते उपाधी ऐसें दिसे ॥ अनारिसें भासेनाकीं ॥ ८७ ॥ नीळ आरक्त मणीच्याठायीं॥ नीळआरक्त मुखचि

१ विरक्ती. २ समजशील. ३ आरसा. ४ उत्पत्ति.

पाहीं॥घृतीं पीतादि वर्णी कांहीं ॥ उदकीं पाहीं उदक ऐसें ॥ ८८ ॥ दर्पण जरी मळीन असिला ॥ तरी मुखीं मळिणाकारु भासला ॥ उपाधिदोष प्रकटला ॥ नाहीं भेदला बिंबासि पैं ॥ ८९ ॥ हें सर्वही जन जाणती ॥ भासतां मुखीं मळीन स्थिती ॥ तरी दर्पणचि सहाणे लाविती ॥ परि नतोडिती मुख सहाणे ॥ १९० ॥ मुख तें मुखीं मुखाची ऐसें ॥ परि तें उपाधिसारिखें भासे ॥ वक्र कुरूपादि ठसे ॥ अनेकीं दिसे अनेकपणें ॥९१॥ हें उपाधिकरूनि गा रघुपती ॥ भासे मुखाची आकृती ॥ जितुकी उपाधी तितुकी व्यक्ती ॥ जानकीपती जाण तूं॥ ॥ ९२ ॥ तैसें बुद्धीआंत प्रतिबिंबत ॥ आत्मा येकाचि अनेक भासतु ॥ जनें तोचि मानूनि निश्चितार्थु ॥ असे भ्रांतु ह्मणऊनियां ॥ ९३ ॥ बुद्धिभेदंकरूनि अनेकपण ॥ आत्मयासीं आलें गा जाण ॥ जैसें घटाचें अनेकपण॥ सूर्यासि पूर्ण आणितसे ॥ ९४ ॥ तैसें शुद्धासीं मळीनपण ॥ उपाधिवशें आलें पूर्ण ॥ स्वयें प्रकाशक चिद्घन ॥ नित्य निरंजन शुद्ध बुद्ध ॥ ९५ ॥ तेंहि दृष्टांतमुखें सांगेन ॥ ऐक श्रीरामा सावधान ॥ करूनियां एकाग्र मन ॥ श्लोकार्थ खुण जाण बापा ॥ ९६ ॥ श्लोक ॥ धूलिधूमांबुदैर्यद्वन्मलिनीक्रियतेनभः ॥ परामृष्टस्तथैवात्माविशुद्धःप्राकृतैर्गुणैः ॥ ११ ॥ टी० ॥ अगा वाहाटुळिचिया धुळी ॥ नभ धूसर केलें रजमेळीं ॥ शुद्धचि मळीन तियेकाळीं ॥ केलें धुळी आपणा ऐसें ॥९७ ॥ जो गगनाकडे पाहों जाये ॥ त्याचे नेत्रीं धुळी समाये ॥ एवं धुळीच गगन होय ॥ नसता पाहे दोष आला ॥ ९८ ॥ कां धूम चढे गगनावरी ॥ तेंव्हां धूममयाचें होय नभ जरी॥

१ धुळीनें भरलेलें. २ शिरे.

तें शुद्धातेंचि मळीण करी ॥ अपूर्व परी उपाधीची ॥ ९९ ॥ नातरी गगन भरी अंबुद[1] ॥ गगनीं दाटले निबद्ध[2] ॥
तेणें मळीन पावलें बाध ॥ शुद्धत्वीं अशुद्ध ऐसें भासे ॥ २०० ॥ नातरी वायु असे स्वयें शुद्ध ॥ दुष्ट गंधादिकीं
कीजे दुर्गंध ॥ तैसा आत्मा शुद्ध बुद्ध ॥ गुणीं अशुद्ध ऐसा भासे ॥ १ ॥ प्रकृतीचे तिन्ही गुण ॥ सत्व रज तम हे
जाण ॥ येहिं स्वस्वप्रकृत्या कीजे मळीन ॥ स्वतां तो निर्गुण गुणीं कीजे ॥ २ ॥ सत्वगुणें सात्विक ह्मणती ॥
सात्विक कर्ता भोक्ता ऐसी प्रतीती ॥ राजसें पावे रजोवृत्ती ॥ कर्तृत्वादि स्थिती गुणान्वयें ॥ ३ ॥ तामस गुणें
तामस झाला ॥ तामसपणातें स्वयें आला ॥ एवं गुणाधीन ऐसा भासला ॥ मळीन केला स्वकल्पना ॥ ४ ॥
अपाड गुणा आणि आत्मयासी ॥ जैसें तमा आणि तरणीसी[3] ॥ पृथ्वी प्राणी गगनासीं ॥ चंद्रा राहुसीं अंतर
जैसें ॥ ५ ॥ दोन लक्ष गावें चंद्रमंडळ ॥ राहू अर्वाक्[4] असे समळ[5] ॥ पन्नास सहस्र त्याचें मंडळ ॥ येकत्र मेळ
तयां कैंचा ॥ ६ ॥ येक नक्षत्रीं वास दोहींसी ॥ चंद्रमंडळ आड येणें राहूसी ॥ यालागीं राहुग्रहण होय ज-
गासीं ॥ राहू चंद्रसूर्यांसिं मळीन करी ॥ ७ ॥ अपाड असतांहि मळीन भासे ॥ राहुग्रस्त ह्मणती जन पिसे ॥
आत्मा गुणाधीन तैसें ॥ माने ऐसें नेणतां तत्व ॥ ८ ॥ विचारितां गा रघुराया ॥ अपाड[6] गुणा आणि आत्मया ॥
परी मळीन भासे नेणोनियां ॥ विचारें तया संगु कैंचा ॥ ९ ॥ आत्मा तो असंगी अनावृतं[7] ॥ शुद्ध बुद्ध नित्य
मुक्त ॥ अकर्ता अभोक्ता अनासक्त ॥ नित्य सदोदित निरंजन ॥ २१० ॥ ऐसा तो जरी मळीन भासे ॥ हें तो

---

१ मेघ. २ घनदाट. ३ सूर्यास. ४ अलीकडचा. ५ मलीन. ६ अंतर. ७ आवरणरहित.

प्रत्यक्ष जाण पिसे ॥ तैंसाचि चंचल ऐसा दिसे ॥ देहवशें तें ऐक ॥ ११ ॥ श्लोक ॥ आद्यंतवतिदेहेऽसौतथाभू तइवेक्ष्यते ॥ वीचिवत्यंभसिस्तंभो यथाभासचलश्चलः ॥१२॥ टीका ॥ आदि अंत जयासीं असे ॥जन्म मरण पावे जें सर्वस्वें ॥ तें देहनामें बोलिजेतअसे ॥ नश्वर सर्वांशें क्षणिकत्वें ॥ १२ ॥ ऐसिया नश्वर देहाच्याठांईं ॥ एवंभूत आत्मा लक्षिती पाहीं ॥ भाविती देहगुणें सर्वही ॥ चलत्व देहीं तेंचि त्यासीं ॥१३॥ देहविकारें विकारवंत ॥ देहचळणें असे चळत ॥ देहमरणें असे मरत ॥ देहत्वें जीतु ऐसेंचि म्हणती ॥ १४ ॥ जैसा जळामाजी स्तंभ[1] असे ॥ तो तरी अचळ सर्वांशें ॥ पारि वीचिसंगें[2] चंचळ भासे॥लोक पिसे साच मानिती ॥ १५ ॥ जैसा अभ्राचा वेग चंद्रासीं ॥ प्रतिभासे अर्भकासीं[3] ॥ तैसे देहधर्म आत्मयासीं ॥ कल्पित भ्रमासीं नेणोनियां ॥१६॥ नाहो देहेंद्रियांसिं तरी जडता ॥याचेनि संगें आत्मयासीं तद्रूपता ॥ अनात्म[4] धर्म आत्मयाचे माथां ॥ भाविता नेणतां तुम्ही ॥ १७ ॥ तरी देहेंद्रियें संत न दिसती ॥ तीं तरी आत्मत्वेंचि दिसती ॥ यालागीं यासिं आत्मा ह्मणती ॥ असे प्रतीती सर्वां जनां ॥ १८ ॥ जरी असत्य आत्मव्यतिरिक्त[5] ॥ आणि असती मिथ्याभूत ॥ तरी सत्य ऐसीं कां भासत ॥ हेंचि निरुतें[6] सांगिजे ॥ १९ ॥ तरी ऐका याचें उत्तर ॥ जें कीं बोलिजेल सपरिकर[7] ॥ जेणें संदेहसागराचा पार ॥ पैल तीर पाविजे ॥ २२० ॥ तरी सत्याचिये संगती ॥ असत्यही सत्यवद्भाससती ॥ सत्य रश्मी मृगांभप्रतीति[8] ॥ सत्य व्यक्ती दिसे त्याची ॥ २१ ॥ साच शुक्तिकेच्याठाईं ॥ असत्य रजत

१ खांब. २ लहरीच्यायोगानें. ३ बाळकासी. ४ मायिक. ५ निराळें. ६ खरें. ७ सविस्तर. ८ मृगजळ.

भासे पाहीं ॥ तें सत्यसंगें संत सर्वेही ॥ भासे देहीं देखत्याचे ॥ २२ ॥ यदर्थीं ऐक निश्चयवचन ॥ रघुनाथा परिसें सावधान ॥ करूनियां एकाग्रमन ॥ जेणें समाधान पावसी ॥ २३ ॥ श्लोक ॥ अग्निसंगाद्यथालोहमग्नित्वमुपगच्छति ॥ आत्मसंगात्तथागच्छत्यात्मतामिंद्रियादिकं॥१३॥टीका ॥ जैसें अग्निसंगेंकरून ॥ लोह अग्नित्व पावे जाण ॥ जड अप्रकाश जें मळीन ॥ तें देदीप्यमान स्वयें होय ॥ २४ ॥ तैसें देहेंद्रियादि जडजात ॥ मळीन अप्रकाश मिथ्याभूत ॥ आत्मसंगेंकरूनि यथार्थ ॥ आत्मता निभ्रांत पावती ॥ २५ ॥ अगा सत्याचेठाईं जें भासे ॥ तें असत्यही सत्यासारिखें दिसे ॥ अधिष्ठान नेणोनि लोक पिसे ॥ सत्य ऐसें त्यातें ह्मणती ॥ २६ ॥ अधिष्ठानाचें होतांचि ज्ञान ॥ तरी सर्वही भासमात्र दृश्य जाण ॥ अधिष्ठान नेणतां भिन्नाभिन्न ॥ भास पूर्ण अचुरांतका ॥ २७ ॥ अधिष्ठानाच्यासारिखें ॥ अध्यस्त भासे तेणेंचि वेषें ॥ यालागीं त्यासींच सत्यत्वें देखे ॥ लोक निकें तेंचि मानिती ॥ २८ ॥ शुक्तीच्याठायीं रजत अध्यस्त ॥ तेंचि सत्यत्वें लोक मानित ॥ मानण्याचिसाठीं भ्रांत ॥ नाहींच करीत सत्य वस्तु ॥ २९ ॥ तैसा आत्मा तो नित्य अधिष्ठान ॥ तेथें देहेंद्रियादि मिथ्या भान ॥ तें चैतन्यसंगें भासत चैतन्य ॥ मुख्यत्वें पूर्ण तेंचि मानिती ॥२३० ॥ हें देहेंद्रियादि सत्य मानितां ॥ आत्मस्वरूप कैचें त्या भ्रांता ॥ यालागीं नेणती तत्वतां ॥ स्वयें आत्मता आपुली ॥३१॥ तंव श्रीराम ह्मणती जीश्रीगुरुमूर्ती ॥ जे देहेंद्रियादि आ-

१ निश्चित. २ सूक्ष्म. ३ खरें.

त्मा मानिती ॥ ते ज्ञान जाणितलिया आत्मा देखती ॥ कोणे रीती तें सांगिजे ॥ ३२ ॥ तंव वसिष्ठ ह्मणती गा रघुनाथा ॥ सांगों ययाची व्यवस्था ॥ प्रत्यक्ष दृश्य भासत असतां ॥ आत्मा तत्वतां कैसा जाणिजे ॥ ॥ ३३ ॥ अगा दृश्यभास भरोवरी ॥ आत्मा निर्धारीजे तेणें करी ॥ हे थोर पाहाति कुसरी ॥ रावणारी सांगेन ॥ ३४ ॥ जैसी दृश्यशाखा साधिलिया ॥ सूक्ष्म शंशि दिसतसे शाखेवरूनियां ॥ तैसें देहेंद्रियाकरूनियां ॥ पाहे आत्मया सूक्ष्मदृष्टीं ॥ ३५ ॥ आणीकही दृष्टांत सांगेन ॥ ऐकें एकाग्र करूनियां मन ॥ जेणें होईल समाधान ॥ तेंचि निरूपण परियेसीं ॥ २३६ ॥ श्लोक ॥ अदृश्योदृश्यतेराहुर्गृहीतेनयथेंदुना ॥ तथानुभवमात्रात्मादृश्येनात्माविलोक्यते ॥ १४ ॥ टीका ॥ राहु सर्वदां अदृश्य सर्वांसीं ॥ कोणी कदां न देखे त्यासीं ॥ परी दृश्य चंद्रें त्या अदृश्यासीं ॥ सर्वस्वेसीं देखती जन ॥ ३७ ॥ राहु सर्वदां असे गगनीं ॥ परि त्यातें कोणी नदेखती नयनीं ॥ चंद्रमंडळा समान आल्या ग्रहणीं ॥ सर्वही जनीं देखिजे ॥ ३८ ॥ ग्रहणीं राहु सर्वींसिं दिसे ॥ ग्रहण सरल्या कोणासिं नदिसे॥दृश्य चंद्र तो अदृश्य प्रकाशे॥नवल ऐसें भरताग्रजा॥३९॥याल्लागीं नदिसतें हें राहुमंडळ ॥ दृश्य चंद्रें होय प्रत्यक्ष सकळ ॥ तैसें अनुभवमात्रेंचि केवळ ॥ आत्मा निर्मळ प्रत्यक्ष झाला ॥२४० ॥ तो प्रत्यक्ष असतांही जनासीं ॥ भ्रमें अप्रत्यक्ष होय सर्वांसीं ॥ तोंचि दृश्या देहेंद्रियासीं ॥ प्रत्यक्ष बुद्धीसिं करितांति ॥ ४१ ॥ देहेंद्रियादि दृश्य समस्त ॥ हें तंव जड अप्रकाशवंत ॥ ययासीं

१ सामग्री. २ फांदी. ३ चंद्र.

" भावार्थरामायणासारखा " फार मोठा ग्रंथ मासिक पुस्तकाच्या रूपानें छापून आह्मीं सुमारें दोन वर्षांत पुरा केला; हें आमच्या आश्रयदात्यांस माहीतच आहे. सदरील ग्रंथ ईश्वरकृपेनें आमच्या हातून नियमितवेळीं शेवटास गेल्यामुळें, व आमच्या उदार आणि धार्मिक आश्रयदात्यानीं ही आपलें कर्तव्य वेळेवर बजाविल्यामुळें आह्मांस उमेद येऊन " योगवासिष्ठसार " हा ग्रंथ हाल्लीं दुर्मिळ असून अध्यात्मपर असल्यामुळें त्याचालोप न होतां प्रसार होणें इष्ट आहे; असें वाटल्यावरून तोही आश्रयदात्यांवर पैशाचें ओझें एकदम नपडावें ह्मणून मासिकपुस्तक रूपानेंच छापून काढावा असें मनांत आलें. परंतु मूळग्रंथाची एकही प्रत आह्मांजवळ नसल्यामुळें ह्याकामास सुरवात करण्यास अडचण पडली पण रा० रा० जावजी दादाजी निर्णयसागर छापखान्याचे मालक, रा० रा० नारो नरसिंह फडके वकील कऱ्हाड, व रा० रा० गोविंद रामचंद्र वेलणकर पुणें, यांणीं आपल्या संग्रहीं असलेली एकेक प्रत उदारबुद्धीनें आह्मांस देऊन ही अडचण दूर केली, ह्मणून आह्मीं या त्रिवर्गाचे फार फार आभारी आहों. तसेंच पुढें रा० रा० नारायण रामचंद्र सोहनी जगदीश्वर छापखान्याचे मालक यांणीं ह्या सदरील तीन प्रतींवरून शुद्धकेलेला ग्रंथ उत्तमरीतीनें वेळेवर आपल्या छापखान्यांत छापून देण्याविषयीं फार मेहनत घेतली ह्मणून त्यांचेही आह्मी फार आभारी आहों. शके १८११ विरोधीनाम संवत्सरे.

## विक्रीचीं पुस्तकें.

सदरहु वरील दोन ग्रंथांपैकीं भावार्थ रामायण चित्रांसह याची किंमत २० रुपये व टपाल हांशील १॥ रुपया आणि योगवासिष्ठसार याची किंमत ५ रुपये. ट० हां० ·।। प्रमाणें असून दोह्नी ग्रंथ खालीं लिहीलेले ठिकाणींविकत मिळतील.

आत्माराम येशवंत.

## विक्रीचीं ठिकाणें.

१ मुख्यठिकाण मुंबई गिरगांव विष्णु घनश्यामाचे चाळींत आत्माराम येशवंत यांजकडे. २ मुंबई कांदेवाडी जगदीश्वर छापखाना. ३ मुंबई--कांदेवाडी शांतारामाचे चाळींत रा० रा० वासुदेव मोरेश्वर पोतदार यांजकडे. ४ रा०रा० जनार्दन महादेव गुर्जर रामवाडीचे नाक्यावर.

हें पुस्तक आत्माराम येशवंत यांणी जगदीश्वर छापखान्यांत छापविलें. किं० ५ रु०

॥ इति श्रीयोगवासिष्ठसारं समाप्तं ॥

[OrderDescription]
,CREATED=13.08.20 15:21
,TRANSFERRED=2020/08/13 at 16:38:02
,PAGES=599
,TYPE=STD
,NAME=S0003496
,Book Name=M-3082-SHRIYOGVASISHATH SAR
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF

FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,FILE22=00000022.TIF
,FILE23=00000023.TIF
,FILE24=00000024.TIF
,FILE25=00000025.TIF
,FILE26=00000026.TIF
,FILE27=00000027.TIF
,FILE28=00000028.TIF
,FILE29=00000029.TIF
,FILE30=00000030.TIF
,FILE31=00000031.TIF
,FILE32=00000032.TIF
,FILE33=00000033.TIF
,FILE34=00000034.TIF
,FILE35=00000035.TIF
,FILE36=00000036.TIF
,FILE37=00000037.TIF

FILE38=00000038.TIF
,FILE39=00000039.TIF
,FILE40=00000040.TIF
,FILE41=00000041.TIF
,FILE42=00000042.TIF
,FILE43=00000043.TIF
,FILE44=00000044.TIF
,FILE45=00000045.TIF
,FILE46=00000046.TIF
,FILE47=00000047.TIF
,FILE48=00000048.TIF
,FILE49=00000049.TIF
,FILE50=00000050.TIF
,FILE51=00000051.TIF
,FILE52=00000052.TIF
,FILE53=00000053.TIF
,FILE54=00000054.TIF
,FILE55=00000055.TIF
,FILE56=00000056.TIF
,FILE57=00000057.TIF
,FILE58=00000058.TIF
,FILE59=00000059.TIF
,FILE60=00000060.TIF

FILE61=00000061.TIF
,FILE62=00000062.TIF
,FILE63=00000063.TIF
,FILE64=00000064.TIF
,FILE65=00000065.TIF
,FILE66=00000066.TIF
,FILE67=00000067.TIF
,FILE68=00000068.TIF
,FILE69=00000069.TIF
,FILE70=00000070.TIF
,FILE71=00000071.TIF
,FILE72=00000072.TIF
,FILE73=00000073.TIF
,FILE74=00000074.TIF
,FILE75=00000075.TIF
,FILE76=00000076.TIF
,FILE77=00000077.TIF
,FILE78=00000078.TIF
,FILE79=00000079.TIF
,FILE80=00000080.TIF
,FILE81=00000081.TIF
,FILE82=00000082.TIF
,FILE83=00000083.TIF

FILE84=00000084.TIF
,FILE85=00000085.TIF
,FILE86=00000086.TIF
,FILE87=00000087.TIF
,FILE88=00000088.TIF
,FILE89=00000089.TIF
,FILE90=00000090.TIF
,FILE91=00000091.TIF
,FILE92=00000092.TIF
,FILE93=00000093.TIF
,FILE94=00000094.TIF
,FILE95=00000095.TIF
,FILE96=00000096.TIF
,FILE97=00000097.TIF
,FILE98=00000098.TIF
,FILE99=00000099.TIF
,FILE100=00000100.TIF
,FILE101=00000101.TIF
,FILE102=00000102.TIF
,FILE103=00000103.TIF
,FILE104=00000104.TIF
,FILE105=00000105.TIF
,FILE106=00000106.TIF

FILE107=00000107.TIF
,FILE108=00000108.TIF
,FILE109=00000109.TIF
,FILE110=00000110.TIF
,FILE111=00000111.TIF
,FILE112=00000112.TIF
,FILE113=00000113.TIF
,FILE114=00000114.TIF
,FILE115=00000115.TIF
,FILE116=00000116.TIF
,FILE117=00000117.TIF
,FILE118=00000118.TIF
,FILE119=00000119.TIF
,FILE120=00000120.TIF
,FILE121=00000121.TIF
,FILE122=00000122.TIF
,FILE123=00000123.TIF
,FILE124=00000124.TIF
,FILE125=00000125.TIF
,FILE126=00000126.TIF
,FILE127=00000127.TIF
,FILE128=00000128.TIF
,FILE129=00000129.TIF

FILE130=00000130.TIF
,FILE131=00000131.TIF
,FILE132=00000132.TIF
,FILE133=00000133.TIF
,FILE134=00000134.TIF
,FILE135=00000135.TIF
,FILE136=00000136.TIF
,FILE137=00000137.TIF
,FILE138=00000138.TIF
,FILE139=00000139.TIF
,FILE140=00000140.TIF
,FILE141=00000141.TIF
,FILE142=00000142.TIF
,FILE143=00000143.TIF
,FILE144=00000144.TIF
,FILE145=00000145.TIF
,FILE146=00000146.TIF
,FILE147=00000147.TIF
,FILE148=00000148.TIF
,FILE149=00000149.TIF
,FILE150=00000150.TIF
,FILE151=00000151.TIF
,FILE152=00000152.TIF

FILE153=00000153.TIF
,FILE154=00000154.TIF
,FILE155=00000155.TIF
,FILE156=00000156.TIF
,FILE157=00000157.TIF
,FILE158=00000158.TIF
,FILE159=00000159.TIF
,FILE160=00000160.TIF
,FILE161=00000161.TIF
,FILE162=00000162.TIF
,FILE163=00000163.TIF
,FILE164=00000164.TIF
,FILE165=00000165.TIF
,FILE166=00000166.TIF
,FILE167=00000167.TIF
,FILE168=00000168.TIF
,FILE169=00000169.TIF
,FILE170=00000170.TIF
,FILE171=00000171.TIF
,FILE172=00000172.TIF
,FILE173=00000173.TIF
,FILE174=00000174.TIF
,FILE175=00000175.TIF

FILE176=00000176.TIF
,FILE177=00000177.TIF
,FILE178=00000178.TIF
,FILE179=00000179.TIF
,FILE180=00000180.TIF
,FILE181=00000181.TIF
,FILE182=00000182.TIF
,FILE183=00000183.TIF
,FILE184=00000184.TIF
,FILE185=00000185.TIF
,FILE186=00000186.TIF
,FILE187=00000187.TIF
,FILE188=00000188.TIF
,FILE189=00000189.TIF
,FILE190=00000190.TIF
,FILE191=00000191.TIF
,FILE192=00000192.TIF
,FILE193=00000193.TIF
,FILE194=00000194.TIF
,FILE195=00000195.TIF
,FILE196=00000196.TIF
,FILE197=00000197.TIF
,FILE198=00000198.TIF

FILE199=00000199.TIF
,FILE200=00000200.TIF
,FILE201=00000201.TIF
,FILE202=00000202.TIF
,FILE203=00000203.TIF
,FILE204=00000204.TIF
,FILE205=00000205.TIF
,FILE206=00000206.TIF
,FILE207=00000207.TIF
,FILE208=00000208.TIF
,FILE209=00000209.TIF
,FILE210=00000210.TIF
,FILE211=00000211.TIF
,FILE212=00000212.TIF
,FILE213=00000213.TIF
,FILE214=00000214.TIF
,FILE215=00000215.TIF
,FILE216=00000216.TIF
,FILE217=00000217.TIF
,FILE218=00000218.TIF
,FILE219=00000219.TIF
,FILE220=00000220.TIF
,FILE221=00000221.TIF

FILE222=00000222.TIF
,FILE223=00000223.TIF
,FILE224=00000224.TIF
,FILE225=00000225.TIF
,FILE226=00000226.TIF
,FILE227=00000227.TIF
,FILE228=00000228.TIF
,FILE229=00000229.TIF
,FILE230=00000230.TIF
,FILE231=00000231.TIF
,FILE232=00000232.TIF
,FILE233=00000233.TIF
,FILE234=00000234.TIF
,FILE235=00000235.TIF
,FILE236=00000236.TIF
,FILE237=00000237.TIF
,FILE238=00000238.TIF
,FILE239=00000239.TIF
,FILE240=00000240.TIF
,FILE241=00000241.TIF
,FILE242=00000242.TIF
,FILE243=00000243.TIF
,FILE244=00000244.TIF

FILE245=00000245.TIF
,FILE246=00000246.TIF
,FILE247=00000247.TIF
,FILE248=00000248.TIF
,FILE249=00000249.TIF
,FILE250=00000250.TIF
,FILE251=00000251.TIF
,FILE252=00000252.TIF
,FILE253=00000253.TIF
,FILE254=00000254.TIF
,FILE255=00000255.TIF
,FILE256=00000256.TIF
,FILE257=00000257.TIF
,FILE258=00000258.TIF
,FILE259=00000259.TIF
,FILE260=00000260.TIF
,FILE261=00000261.TIF
,FILE262=00000262.TIF
,FILE263=00000263.TIF
,FILE264=00000264.TIF
,FILE265=00000265.TIF
,FILE266=00000266.TIF
,FILE267=00000267.TIF

FILE268=00000268.TIF
,FILE269=00000269.TIF
,FILE270=00000270.TIF
,FILE271=00000271.TIF
,FILE272=00000272.TIF
,FILE273=00000273.TIF
,FILE274=00000274.TIF
,FILE275=00000275.TIF
,FILE276=00000276.TIF
,FILE277=00000277.TIF
,FILE278=00000278.TIF
,FILE279=00000279.TIF
,FILE280=00000280.TIF
,FILE281=00000281.TIF
,FILE282=00000282.TIF
,FILE283=00000283.TIF
,FILE284=00000284.TIF
,FILE285=00000285.TIF
,FILE286=00000286.TIF
,FILE287=00000287.TIF
,FILE288=00000288.TIF
,FILE289=00000289.TIF
,FILE290=00000290.TIF

FILE291=00000291.TIF
,FILE292=00000292.TIF
,FILE293=00000293.TIF
,FILE294=00000294.TIF
,FILE295=00000295.TIF
,FILE296=00000296.TIF
,FILE297=00000297.TIF
,FILE298=00000298.TIF
,FILE299=00000299.TIF
,FILE300=00000300.TIF
,FILE301=00000301.TIF
,FILE302=00000302.TIF
,FILE303=00000303.TIF
,FILE304=00000304.TIF
,FILE305=00000305.TIF
,FILE306=00000306.TIF
,FILE307=00000307.TIF
,FILE308=00000308.TIF
,FILE309=00000309.TIF
,FILE310=00000310.TIF
,FILE311=00000311.TIF
,FILE312=00000312.TIF
,FILE313=00000313.TIF

FILE314=00000314.TIF
,FILE315=00000315.TIF
,FILE316=00000316.TIF
,FILE317=00000317.TIF
,FILE318=00000318.TIF
,FILE319=00000319.TIF
,FILE320=00000320.TIF
,FILE321=00000321.TIF
,FILE322=00000322.TIF
,FILE323=00000323.TIF
,FILE324=00000324.TIF
,FILE325=00000325.TIF
,FILE326=00000326.TIF
,FILE327=00000327.TIF
,FILE328=00000328.TIF
,FILE329=00000329.TIF
,FILE330=00000330.TIF
,FILE331=00000331.TIF
,FILE332=00000332.TIF
,FILE333=00000333.TIF
,FILE334=00000334.TIF
,FILE335=00000335.TIF
,FILE336=00000336.TIF

FILE337=00000337.TIF
,FILE338=00000338.TIF
,FILE339=00000339.TIF
,FILE340=00000340.TIF
,FILE341=00000341.TIF
,FILE342=00000342.TIF
,FILE343=00000343.TIF
,FILE344=00000344.TIF
,FILE345=00000345.TIF
,FILE346=00000346.TIF
,FILE347=00000347.TIF
,FILE348=00000348.TIF
,FILE349=00000349.TIF
,FILE350=00000350.TIF
,FILE351=00000351.TIF
,FILE352=00000352.TIF
,FILE353=00000353.TIF
,FILE354=00000354.TIF
,FILE355=00000355.TIF
,FILE356=00000356.TIF
,FILE357=00000357.TIF
,FILE358=00000358.TIF
,FILE359=00000359.TIF

FILE360=00000360.TIF
,FILE361=00000361.TIF
,FILE362=00000362.TIF
,FILE363=00000363.TIF
,FILE364=00000364.TIF
,FILE365=00000365.TIF
,FILE366=00000366.TIF
,FILE367=00000367.TIF
,FILE368=00000368.TIF
,FILE369=00000369.TIF
,FILE370=00000370.TIF
,FILE371=00000371.TIF
,FILE372=00000372.TIF
,FILE373=00000373.TIF
,FILE374=00000374.TIF
,FILE375=00000375.TIF
,FILE376=00000376.TIF
,FILE377=00000377.TIF
,FILE378=00000378.TIF
,FILE379=00000379.TIF
,FILE380=00000380.TIF
,FILE381=00000381.TIF
,FILE382=00000382.TIF

FILE383=00000383.TIF
,FILE384=00000384.TIF
,FILE385=00000385.TIF
,FILE386=00000386.TIF
,FILE387=00000387.TIF
,FILE388=00000388.TIF
,FILE389=00000389.TIF
,FILE390=00000390.TIF
,FILE391=00000391.TIF
,FILE392=00000392.TIF
,FILE393=00000393.TIF
,FILE394=00000394.TIF
,FILE395=00000395.TIF
,FILE396=00000396.TIF
,FILE397=00000397.TIF
,FILE398=00000398.TIF
,FILE399=00000399.TIF
,FILE400=00000400.TIF
,FILE401=00000401.TIF
,FILE402=00000402.TIF
,FILE403=00000403.TIF
,FILE404=00000404.TIF
,FILE405=00000405.TIF

FILE406=00000406.TIF
,FILE407=00000407.TIF
,FILE408=00000408.TIF
,FILE409=00000409.TIF
,FILE410=00000410.TIF
,FILE411=00000411.TIF
,FILE412=00000412.TIF
,FILE413=00000413.TIF
,FILE414=00000414.TIF
,FILE415=00000415.TIF
,FILE416=00000416.TIF
,FILE417=00000417.TIF
,FILE418=00000418.TIF
,FILE419=00000419.TIF
,FILE420=00000420.TIF
,FILE421=00000421.TIF
,FILE422=00000422.TIF
,FILE423=00000423.TIF
,FILE424=00000424.TIF
,FILE425=00000425.TIF
,FILE426=00000426.TIF
,FILE427=00000427.TIF
,FILE428=00000428.TIF

FILE429=00000429.TIF
,FILE430=00000430.TIF
,FILE431=00000431.TIF
,FILE432=00000432.TIF
,FILE433=00000433.TIF
,FILE434=00000434.TIF
,FILE435=00000435.TIF
,FILE436=00000436.TIF
,FILE437=00000437.TIF
,FILE438=00000438.TIF
,FILE439=00000439.TIF
,FILE440=00000440.TIF
,FILE441=00000441.TIF
,FILE442=00000442.TIF
,FILE443=00000443.TIF
,FILE444=00000444.TIF
,FILE445=00000445.TIF
,FILE446=00000446.TIF
,FILE447=00000447.TIF
,FILE448=00000448.TIF
,FILE449=00000449.TIF
,FILE450=00000450.TIF
,FILE451=00000451.TIF

FILE452=00000452.TIF
,FILE453=00000453.TIF
,FILE454=00000454.TIF
,FILE455=00000455.TIF
,FILE456=00000456.TIF
,FILE457=00000457.TIF
,FILE458=00000458.TIF
,FILE459=00000459.TIF
,FILE460=00000460.TIF
,FILE461=00000461.TIF
,FILE462=00000462.TIF
,FILE463=00000463.TIF
,FILE464=00000464.TIF
,FILE465=00000465.TIF
,FILE466=00000466.TIF
,FILE467=00000467.TIF
,FILE468=00000468.TIF
,FILE469=00000469.TIF
,FILE470=00000470.TIF
,FILE471=00000471.TIF
,FILE472=00000472.TIF
,FILE473=00000473.TIF
,FILE474=00000474.TIF

FILE475=00000475.TIF
,FILE476=00000476.TIF
,FILE477=00000477.TIF
,FILE478=00000478.TIF
,FILE479=00000479.TIF
,FILE480=00000480.TIF
,FILE481=00000481.TIF
,FILE482=00000482.TIF
,FILE483=00000483.TIF
,FILE484=00000484.TIF
,FILE485=00000485.TIF
,FILE486=00000486.TIF
,FILE487=00000487.TIF
,FILE488=00000488.TIF
,FILE489=00000489.TIF
,FILE490=00000490.TIF
,FILE491=00000491.TIF
,FILE492=00000492.TIF
,FILE493=00000493.TIF
,FILE494=00000494.TIF
,FILE495=00000495.TIF
,FILE496=00000496.TIF
,FILE497=00000497.TIF

FILE498=00000498.TIF
,FILE499=00000499.TIF
,FILE500=00000500.TIF
,FILE501=00000501.TIF
,FILE502=00000502.TIF
,FILE503=00000503.TIF
,FILE504=00000504.TIF
,FILE505=00000505.TIF
,FILE506=00000506.TIF
,FILE507=00000507.TIF
,FILE508=00000508.TIF
,FILE509=00000509.TIF
,FILE510=00000510.TIF
,FILE511=00000511.TIF
,FILE512=00000512.TIF
,FILE513=00000513.TIF
,FILE514=00000514.TIF
,FILE515=00000515.TIF
,FILE516=00000516.TIF
,FILE517=00000517.TIF
,FILE518=00000518.TIF
,FILE519=00000519.TIF
,FILE520=00000520.TIF

FILE521=00000521.TIF
,FILE522=00000522.TIF
,FILE523=00000523.TIF
,FILE524=00000524.TIF
,FILE525=00000525.TIF
,FILE526=00000526.TIF
,FILE527=00000527.TIF
,FILE528=00000528.TIF
,FILE529=00000529.TIF
,FILE530=00000530.TIF
,FILE531=00000531.TIF
,FILE532=00000532.TIF
,FILE533=00000533.TIF
,FILE534=00000534.TIF
,FILE535=00000535.TIF
,FILE536=00000536.TIF
,FILE537=00000537.TIF
,FILE538=00000538.TIF
,FILE539=00000539.TIF
,FILE540=00000540.TIF
,FILE541=00000541.TIF
,FILE542=00000542.TIF
,FILE543=00000543.TIF

FILE544=00000544.TIF
,FILE545=00000545.TIF
,FILE546=00000546.TIF
,FILE547=00000547.TIF
,FILE548=00000548.TIF
,FILE549=00000549.TIF
,FILE550=00000550.TIF
,FILE551=00000551.TIF
,FILE552=00000552.TIF
,FILE553=00000553.TIF
,FILE554=00000554.TIF
,FILE555=00000555.TIF
,FILE556=00000556.TIF
,FILE557=00000557.TIF
,FILE558=00000558.TIF
,FILE559=00000559.TIF
,FILE560=00000560.TIF
,FILE561=00000561.TIF
,FILE562=00000562.TIF
,FILE563=00000563.TIF
,FILE564=00000564.TIF
,FILE565=00000565.TIF
,FILE566=00000566.TIF

FILE567=00000567.TIF
,FILE568=00000568.TIF
,FILE569=00000569.TIF
,FILE570=00000570.TIF
,FILE571=00000571.TIF
,FILE572=00000572.TIF
,FILE573=00000573.TIF
,FILE574=00000574.TIF
,FILE575=00000575.TIF
,FILE576=00000576.TIF
,FILE577=00000577.TIF
,FILE578=00000578.TIF
,FILE579=00000579.TIF
,FILE580=00000580.TIF
,FILE581=00000581.TIF
,FILE582=00000582.TIF
,FILE583=00000583.TIF
,FILE584=00000584.TIF
,FILE585=00000585.TIF
,FILE586=00000586.TIF
,FILE587=00000587.TIF
,FILE588=00000588.TIF
,FILE589=00000589.TIF

FILE590=00000590.TIF
,FILE591=00000591.TIF
,FILE592=00000592.TIF
,FILE593=00000593.TIF
,FILE594=00000594.TIF
,FILE595=00000595.TIF
,FILE596=00000596.TIF
,FILE597=00000597.TIF
,FILE598=00000598.TIF
,FILE599=00000599.TIF
,